पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

४१

मराठी राज्याची अखेर

[किंमत—४ रुपये १५ आणे किंवा ८ शिलिंग ३ पेन्स]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी.ए.

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३४

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि जबाबदारी सरकारावर नाहीं.)

Selection No. 41.

THE LAST DAYS OF THE MARATHA RAJ,

1. BAJIRAO II.

Maratha state-papers begin to lose their historical importance as one approaches the downfall of the Maratha Raj, their place being taken by the full and well-edited British records of statesmen like the Wellesleys and Mountstuart Elphinstone. The Peshwa Daftar does, however, now and then yield stray documents furnishing fresh and illuminating details. It is puzzling that so few of Bajirao's own state-papers are to be found. This is probably due to the fact that the last of the Peshwas, though not destitute of ability, was indolent and vicious, and left the conduct of public affairs to his officials. Whatever the true reason may be, the contrast becomes striking as one passes from the regime of Nana Fadnis to the succeeding period.

The crisis in Bajirao's fortunes was precipitated by Yashwantrao Holkar's invasion of the Deccan in the autumn of 1802. An eloquent letter incorporated in this selection is addressed by Yeshwantrao to Bajirao, in which he says : " The house of Holkar has been serving the Peshwa faithfully for generations and I am very anxious myself to continue to do the same loyal service. If Your Highness has taken offence at my own conduct or that of my brother, I beg to be forgiven and crave the same favour in the future as my house used to receive in the past " (30). This letter failed to pacify Bajirao, with a result equally detrimental to himself and his Raj. Yashwantrao invaded Poona and inflicted a crushing defeat upon the combined armies of Sindia and the Peshwa. The latter sought British protection at Bassein and contracted an engagement by which he basely surrendered the liberties of the Maratha Confederacy.

Although the papers here presented number about 300 and range over a period extending from 1796 to 1818, they do not bear upon all the important incidents of the regime of the last of the Peshwas. Some of the earlier events, such as his campaign against the Chhatrapati of Satara and his flight to Bassein, are rather scantily represented, and the period between 1803 and 1815 is hardly touched at all. But all through, there are curious side-lights, particularly on the life and habits of Bajirao himself. One paper alludes to a gold *hukka* ordered by Bajirao, and now an heirloom of the Peshwa's household, from which we may infer that he used to smoke tobacco (53). No such allusion has been discovered in the case of any of his predecessors. Bajirao's intrigues against the British Government extended to places so far distant as the Panjab, Afganistan and Nepal; and Lord Hastings mentions in his private journal how Bajirao tried to induce the King of Burma to invade Bengal and cripple the British in that quarter. A few interesting details are revealed in some of the letters with reference to the fatal visit to Poona of Gangadhar Shastri, the envoy from Baroda, and his subsequent murder at Pandharpur. It was this crime which precipitated the fall of the Peshwa (84, 89, 91).

But it is the last Maratha War which is found most graphically depicted in these papers. Both Bajirao and the British Resident Elphinstone are

seen slowly drifting into a decisive conflict in which the Pindaris and several North Indian chieftains are implicated. The designs of the Chhatrapati of Satara and his surrender to the British power, the hard fought battles of Koregaon and Ashti, the flight of Bajirao and other important occurrences are here well depicted. Balajipant Natu is here seen persuading Bajirao's Sardar Aba Purandare to desert his master and join the English. Similarly Rango Bapuji is found working in Malwa under Col. Briggs, who won the battle of Mahidpur on 21st December 1817.

Similarly a quantity of striking information is supplied by numerous news-writers in the employ of Elphinstone, such as Balawantrao Bapuji, Raoji Balaji, Yeshwant Baburao, Rango Vasudeo who are writers of numerous letters addressed to Elphinstone some of which are now for the first time reproduced. After all, these agents appear to have imparted little really valuable information, although they were not slow afterwards to demand exorbitant rewards for their services. In fact one is struck with the unending claims forced upon the attention of the Bombay authorities by innumerable persons who had been given hopes of a lucrative bargain in that time of stress and difficulty. Bajirao too appears to have engaged similar agencies to supply news of the movements of the British; but it seems he was not faithfully served and those who, like Bahiro Narayan, many of whose letters, containing detailed information, are here reproduced, struggled hard to help him in various ways, invariably failed to secure encouragement from him.

Further details are revealed about the fate of Bajirao's notorious confidant Trimbakaji Dengale and the members of his family, under the British regime. The closing episode of the whole chapter is the despatch of the family-gods of the Peshwa from Wai to Brahmavarta so late as the year 1836. The varied contents of this selection will, it is hoped, supply matter of great historical interest, and at the same time furnish the student with a fair idea of the nature of the material he may expect to find in the Daftar bearing on the period.

2. DIARIES OF DAULATRAO SINDIA.

The last batch of 41 letters (276–316) forms an independent subject of its own and has consequently been kept separate. It gives realistic glimpses of the life and court of Daulatrao Sindia during a period of some four years (1811–1815) and singularly corroborate the eloquent pen pictures given in his letters by Broughton. They are addressed to Trimbakji Dengle at Poona by his agent, a relation of his, named Krishnaji Gaikwad who was stationed at Gwalior for that purpose. The papers here selected are only a few out of a large number that exist in the Daftar. They are mainly news-letters describing the doings of Daulatrao and incidentally offering minute and useful details, not only about political occurrences of the time, but about the social, religious and economic conditions then prevailing throughout the country, which students of history would love to learn.

No. 1] [1792 ?

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

हरिपंत तात्या यासी.

प्रति माहादेव शास्त्री आशीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत जाणें विशेष. राजश्री बाळाजीपंत नातू याजला आपण हरकोठे अंनास लाविले पाहिजे म्हणून पूर्वी आपणाजवळ आम्ही बोलली होतों. त्याजवरी आपण मान्य केले. त्यास मारनिले दप्तरी उमेदवारीनें सरकारचे लिहिणे लिहितात. दोन वर्षें जाहाली, लिहिणार चांगले जाहले. रामचंद्रपंत ढमढेरे यास आम्हीहि विचारिलें. त्याणी प्रत्योत्तर दिल्हें कीं आमचे निशेचे आहेत. श्रम बहुत याणी केला. कर्जदार लोकांचे बहुत जाहले आहेत. याची सोय आपण करून दिल्ही पाहिजे. तालुके रायगड हा किला सरकारांत नवा घेतला तेथें असामी कारकुनाच्या होतील, यास्तव आपणास याचे चालवणे. आपले जावई व आमचे भाचे हे आपले स्वकीये आहेत, यांस तेथे एक असामी आपण करून दिल्ही पाहिजे. यास सर्व भरंवसा आपला आहे. आम्ही तेथें यावे तर आमचे शरीरी समाधान बहुत नाहीं, यास्तव आम्ही आलो नाहीं. तेथें कारकुनाची नेमणूक बेहड्यास होऊ लागली तर एके असामीस नांव यांचे लावावे. परस्पेरें ऐकिलें कीं फडणिसी व मजमदारी दुसरे कोणी गृहस्तांनीं करून घेतली, बाकी असाम्या होणार, त्या आपणांस कळतील. ब्राम्हणास अन्नास लाविले पाहिजे. यांस पाठऊन द्यावे ऐसा प्रकार असिला तर पत्र देऊ. आम्ही आपणाजवळ शब्द घातला आहे हा आपण सिधीस नेला पाहिजे. बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद.

¶*Mahadeo Shastri recommends Balajipant Natu to the notice of Haripant Tatya and requests him to find employment for him in the Peshwa's service. The early life of this historical person deserves to be noted.*

No. 2] [1794-95

श्री

यादी दिमत माहाराज राजश्री
छत्रपति स्वामी यांजकडील सुा खमस
तिसैन मया व अलफ. येणेप्रमाणे कलमे

माहाराजांचे पुत्र याणी घोडा व हाती पाहिल्यास वर बसावयाकरितां

पागेत घोडी लाहानमोठी तीस पस्तीस आहेत. परंतु चांगले घोडे

हर्षायमान होऊन मोठा छंद घेतात. मूल लहान थोरा घोड्यावर व मोठ्या हतीवर बसवितां नये. येथे छावा हती व लाहान रहिवाल घोडे मुलाजोगे नाही. यास्तव हती व घोडा वाड्यांत फिरवावयाजोगे

१ हती छावे असतील त्यात लाहान असेल तो सडका व गाशा वगैरे सामानसुधा

१ घोडा रहिवाल लहान सामान सुधां

२

कलम १

कारखान्यांत उटे नाहींत. उंट होते परंतु मयत जाहाले. हमेशा सौ उभयतां कन्येच्या स्वाऱ्या सासऱ्यास न्याव्या आणाव्या लागतात, तेव्हा वोझ्याचा पेंच पडतो. दोन च्यार वेला वोझी हतीवरून पोंचवावी लागलीं. त्याणें हती पाठीस लागोन खराब जाहाले. शहरांत कोणापासोन उट मागोन आणावे तरी येथे येकहि मिलावयाचा नाही. याजकरिता नेहेमी कारखान्यांत येणेप्रो असावें

४ उट नफर

१ मादी

३ नर

४

१ साडणी

५

येकूण कलम १

6982

खासा स्वारीचे उपयोगी नाही. पांच सात घोडी मध्यम प्रतीची आहेत, ती खोडील, स्वामीची रीझ घोड्यावर, फार परंतु रिझेयोग्य घोडे नाही, म्हणौन पेशजी स्वारी सातारेयास आली त्या वेलेस येविशीचें बोलणें जाहालें आहे. तरी घोडी चांगलीं खाशांच्या उपयोगी पाठवावी म्हणौन आज्ञा आहे

२ नर रास

१ चलाख

१ फेरावयाच्या उपयोगी

२

३ मादवाना

५

तिरंदाजीचे सामान सरकारातून यावे ते येत नाही व येथेहि खरेदी मिलत नाही. तिरंदाजी नेहेमी चालत्ये यास्तव येणेप्रो

१० कमाना

१०० लेसा

१०० तीर

१०० तुके

४ तरकस

३१४

कलम

१

निशाण बादली होते तें जीर्ण जाहालें. याजकरितां तासी जामेवारे सरकारातून आलीं त्याचे निशाण केले ते दोन वर्षात फाटले. यास्तव

गची जामेवारे दोन व पटका येक येणेप्रो दसऱ्यास निशाणाकरिता पाठवावे कलम १

खाशे अंबारीस हती येथे पांच हती आहेत त्यापो उपयोगी नाही, यास्तव तीनझोली हती अंबारीसुद्धा पाठवावा कलम १

कलमे ६

¶*A requisition is sent to Poona for animals and articles required at Satara for the use of the King. The list contains camels, horses and some accessories of archery.*

No. 3] [*21-7-1798*

श्री

येकोजी राजेसाहेब अमरसिंव्ह राजे

विनंती विनवावया प्रार्थना ऐसीजे. शेवक तंजावर संस्थानी श्रीमंत राजश्री समागमे शेवकांचे प्रपितामाहा आले, तधीपासून त्याचे सेवेत आहो. सांप्रत इंग्रजानी श्रीमंत राजश्री साहेबास येकायेकी अन्यायेकडून संवस्थान आपण आक्रमावें, म्हणोन साहेबास केला अवमान, रहश्येकडून साहेबाचे इशाऱ्याप्रमाणे विनंति ऐसिजे. साहेब तक्तावर बसून बारा वर्षे जाहाली. त्या वेलेस चालले. पूर्वोतर सर्वहि वेदमूर्ति राजश्री भटाचार्य स्वामी आपले सनिधान आहेत त्यास विचारलीयानें श्रुत करितील म्हणोन शेवकाने विस्तार लिहिला नाही. धर्म संस्थान जाहल्याकरितां स्वाम या युगी ब्रम्हकुलामाजी अवतार घेतला आहा. माराष्ट्र देशांत राजश्री भोसले भूपाचे मुख्य प्रधान म्हणोन नाव गाजवीत आहा. त्याकरितां धार्मिष्टभूपांस नीच्यानी अवमान केला तो एकून आपल्याच्याने सोसवेना. त्या गोष्टीचा अभिमान पूर्ण असेल म्हणोन तंजावरी नीच्याकडोन अवमान भोगिले, ते सेवेसी विदित व्हावयाकारणे शेवकानें विनंती लिहिली आहे जे, विजय संवत्छरी अरकाटचे नवाब महंमद अलीखान याणी

6983

शंभर वर्षें चालत होतें, तें राज्य इंग्रजाची फौज कुमक घेऊन तंजावरचा किला घेतला. माहाराजास कै(देत) (ठेवि)ले. तेव्हां पुण्यांत कैलासवासी श्रीमंत दादासाहेब होते, त्यांस हे वर्तमान कलोन, आपण फौजेनसी महंमदअलीखानाचें पारिपत्य करावें म्हणोन तुंगभद्रापावेतो आले. ईश्वरास दया नाहींसें जाल्यामुलें आवंतर होऊन या देशास येणे राहिले. तेव्हा इंग्रजास नीट बुधी येईलसे लेहून संवस्थान माहाराजास देविले. त्या वेलेस कृत्रिम करोन, संवस्थानचें जवाहीर व भांडार व मालमालियेत व हत्येरे व घोडी व हती समस्त जिंदगी वीस कोट रुपयाची लुटली ती साहेबास न देतां, किल्यांत फौजहि आपली ठेऊन, त्यास खर्चास साहिबानी चवदा लाख रुपये प्रतिसंवछरी देणे म्हणोन वारोन, पुन्हा दुर्मुखी नाम संवच्छरी राज्य साहेबाचे स्वाधीन केले. त्यानंतर इंग्रजाचे देशात असणार कुंपणीवाल्यानी पत्र लेहून पाठऊन तीन लाख रुपयांची जाहागीर साहेबाकडोन घेतली. त्यानंतर प्लवंगनाम संवछरी तुलजा राजे कैलासवासी जाहाले. त्यावेलेस त्याणी दोन महिने आगोधर दाईज बुवाजी भोसले याचे संततीतील येक मूल आणोन, दत घ्यावा म्हणोन, त्या मुलास वाड्यांत आणोन, दतहोम करून घ्यावयासी पंडितास बोलाऊन, धर्मशास्त्रविचारणा केली. तेव्हा तो मूल आपले बापास येकच पुत्र विषये जाल्याकरितां, दत घ्यावयास अयोग्य म्हणोन, शास्त्रज्ञानी सांगितल्यावरून ते राहाते करून, सांप्रत या माहा-राजसाहेबास तक्तावर बसविले. ते पूर्ववृत्त वेदमूर्ति राजश्री भटाचार्ये स्वामीस ठाऊक आहे; त्यास्तव विस्तार लिा नाही. तें श्रुत करितां ध्यानास येईल. त्यावेलेस इंग्रजानी नवाबाची पेशकसी म्हणोन मागील बाकी म्हणोन फिरंगी-याकडोन कर्ज घेतले आहे. त्या देण्याचे ऐवजी म्हणोन येकवीस लाख रुपये प्रतिसंवत्छरी जाहागीरखेरीज देणे म्हणोन साहेबाकडोन लेहून घेऊन, बारा-वर्षे जाली. प्रतिसंवछरी याप्रो ऐवज घेतात आणि मध्यें मध्यें साहेबाचे थोरवीस उणीव जसीजसी यावी तसतसे उपद्रव करितात. असें असोन अर्धे राज्य बलात्कारे करून बांधोन घेतलें. त्या कामास साहेबानी सेवकास व विश्वनाथ यासी उभयतास पाठऊन, लार्ड मार्निंगटन म्हणार चेनापटणास येणार आहे; तुम्ही जाऊन त्यास सांगोन, आमचा निमे मुलूक बांधोन घेतला आहे, तो सोडोन घेऊन येणे, म्हणोन पाठविले. बंगाल्यासहि साहेबानी पत्रे लेहून पाठविली. त्यास प्रतिउतर न लिहितां आषाढ शुध्ध पौर्णिमेस इंग्रजाची फौज किल्यांत होती ते आणऊन, साहेबाच्या वाड्यांत चहूकडे चवक्या बसऊन तुम्ही राज्यांस आयोग्य, शर्फोजीस मसनदावर बसवितो म्हणोन सांगोन, आषाढ बहुल द्वितीया स्थिरवारी इंग्रजाचा रसिडंट बिजामीन तोरीन व त्या किल्याचा कर्नल याणी शर्फोजी

म्हणारास मसनदावर बसविले. का म्हणजे त्याजकडोन राज्य सर्वहि तुम्ही कुंपणीत विल्हे लाऊन घ्या, आंम्हास खर्चास काही द्या, म्हणोन लेहून घेऊन भोसले याचें धर्मसंस्थान आपण आक्रमिलें. देवालये ब्रम्हालये दक्षण देशांत बुडालें. ब्राम्हणाचे व देवाचे कोटी दिवे या नीचानी येकायेकी राहाते केले. ते कोणत्या रूपें पुन्हा प्रकाश होतील की ते आपण कराल. या भूमीवर देव ब्राम्हण असावे म्हणोन आपणास अगत्य असेल, यैसे जाणोन या अनाथाने विनंती लिा आहे. या कामास कोणत्या प्रकारें यत्न करावा कीं, तो करून धर्म स्थापाल म्हणोन यजमानसाहेबाची आज्ञा रहस्येकडोन आली. त्याप्रमाणे हे विनंती पत्र लिा आहे. त्याचे पत्र आपले नावें यावयासी नाही. शेवकाचे नावे मोहर निशाणानसी इंग्रजाकडोन काम करून घेऊन या म्हणोन आज्ञापत्र लिा होते ते या विनंतीपत्राबराबर पाठविले आहे. ते पाहातां हा शेवक यजमानसाहेबाचा ऐसे चितास नीट कलेल. यास्तव आज्ञापत्र आले तेहि पाठविले आहे. हे सर्वहि नीट पाहून परलोकाचे ठाई द्रिष्टी देऊन खर्चास पाहिजे म्हणौन गै न करितां या प्रत्नास आरंभ करून चेनापटणपर्यंत येऊन दाखल होये तोपर्यंत बेगमी करून दिल्यास पुरे. ईश्वराचे दयेने तेथे आलियावर खर्चासहि पुरोन भांडारांतील द्रव्य पींहचे असे करूं येईल, असें येथें आहे. याचे प्रतिउतर दया करून लेहून वो राजश्री भटाच्यार्ये याजबल दिल्यास पावते होऊन, शेवक सनाथ व यजमान स्वामी संतोष होतील; व ब्राम्हण उभय लोकी तारणार असें नीट समजतील. हे विनंती. जिवाजी देवाजी मुा चेनापटण अधि(क) श्रावण शुध नवमी स्थिरवार कालयुक्ताक्षीनाम सवछरे.

¶*Amarsing, Raja of Tanjore, in an eloquent manner appeals to the Peshwa, Bajirao, for help against the English who have despoiled him of his kingdom.*

No. 4] *[26-6-1798*

पौ छ १४ मोहरम सन तिसा तिसैन आषाढ मास.

श्री

राजमान्य राजेश्री बाजीराव पंडित प्रधान यासी आज्ञा केली यैसीजे, तुम्ही विनंतीपत्र पाठविलें तें पावलें. माधवराव अनंत याणी लिहिलेअन्वयें बंदोबस्त करून पाठविला. पुढें दर्शनास येईन तेव्हां समजोन बंदोबस्त होईल, असे असतां अविचारवंत काय विनंती करितात? त्याजवरून मर्जीहि तशीच दिसते. वाहटु[१]-लीचें वारें च्यार घटका राहत नाहीं. करवीरकर वगैरे भंरी (?) अंतकरणांत येऊ नयेत. कोणहाचे राजकारण विनंती मान्य न होता पूर्ववत कृपा करावी.

१ वावटळीचे.

6985

सेवक मर्जीशिवाय नाहीं म्हणून लिहिले तें कळलें. यैसियास तुमचे परंपरेने निष्ठेने सेवा घडत आली. आलीकडे कारभारी ठेविले त्याचे योगेकरून सीमेपरते नष्टचर्य भोगिले, ते क्लेश दूर व्हावे, येविसी तुमचाहि दृढ निश्चय असतां कोण्ही काय विकल्प भासविले तेच मनांत भरून हली कारभारी आले त्यांच्याहि चाली एक प्रकार पडत गेल्या. सांप्रत तरी तुमचे वंशांत कधींच अमर्यादा जाली नाहीं. आशा गोष्टी रास्ते याणी काय समजोन, आपण तयार होऊन सर्व चीजवस्त आटोपून बाहेर निघाले, आणि बंदिवानहि घेऊन चालले. तेथें मनाई करविली. तेव्हां तेथे कटकट वाढली. कवायती गारदी याणी गोळी चालविली. माणसें बायकामुलें जाया जाली, तेव्हा इकडील लोकानी मारामार केली आणि काढून दिल्हे. त्याजवर माधवराव याणी शहरावर तोफा लाऊन, राजवाड्यावर गोळे चालविले. दोन प्रहरापासून सायंकालपर्यंत तोफा चालल्या, ते समई इकडूनहि त्याजकडून जाल्यावर तोफा चालू जाल्या. सर्व राज्यभाराचे वोझें घेणार तुम्हासारखा दुसरा सेवक कोण आहे, यैसाच अंत:करणांत निश्चय धरून सर्व भार तुम्हावर ठेऊन स्वामीचा मनोदय स्वामीस क्लेश होतात ते न व्हावे. हें तुम्हास सेवाधर्मास योग्य ते तुम्ही रास्तेयास लेहून बंदोबस्त करविला लिहिता, त्यातील याजकडून काही येक न घडले. असमंतात काही येक स्वाधीनता असल्यास काय घडेल हा संषय जातच नाही; आणि येथील बंदोबस्त फौजा वगैरे पाठऊन करावा हेच सर्वोपरी यैसे दृढ जाले आहे. भेट व्हावी त्यांत दुतर्फा मनोदय समजोन घेऊन पाहिजे तसी खातरजमा करून घ्यावी; तोपर्यंत स्वामीचा मनोदय तितका रक्षावा ते घडत नाही. हे तुमचे चालण्याचे निश्चयास बहुत आश्चीर्य भासते. येविसींचे पर्याय पत्री काय म्हणून ल्याहावे? भेटीचा योग तरी कालेकरून घडवाल, तेव्हा घडणार; तोपर्यंत पूर्ववत नष्टचर्य भोगावे. हें तुमचे अत:करणांत यावे; परंतु समजाविणार समजावितात, तदनुरूप घडते, ते न घडावे; आणि जे गोष्ट तुम्हास श्रेयस्कर तेच घडावी. येथील बंदोबस्त स्वामीचे मनोदयानरूप घडावा हे उत्तम. हलीहि माधवराव किल्याखालील जवलील गाव लुटणे जालणे वगैरे करीत आहेत. बुधवार पेठेस आगी दिल्ही, लुटली, हे तुम्हास समजावे. जाणिजे. छ ११ मोहरम. तुमचे ठाई इकडून दुसरा अर्थ नाही. तुमचेहि निष्ठेत अंतर पडू नये. बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा.

¶*This is a protest made by Shahu II to Bajirao against the atrocities committed by Rastia at Satara. The paper discloses the abject condition of the Raja.*

6986

No. 5] [*3-8-1798*

श्री

शेवेसी मोरो बापूजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ २० सफरपर्यंत येथास्थित असे विशेष. स्वामींनी छ ११ सफरचे आज्ञापत्र पाठविले ते पावलें. पत्री आज्ञा रा। नाना बानवडीस आले. केवल मोकले नाहीत, परंतु मोकले होतील. आज सकाळीं सखाराम घाटगे व फकीरजी गाढवे वगैरे कैद जाले. तुम्हांस कलावे. पेसजी तुम्हांस येण्याविसीं लिहिलेच आहे. याप्रो। सोय करून लौकर यावे म्हणौन आज्ञा. त्यास आज्ञेप्रो। निघालो. शेवकाकडील वर्तमान चिरंजीव पांडोबा विनंती करितील. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer Moro Bapuji reports that Sakharam Ghatge and Fakirji Gadhve have been imprisoned and adds that Nana Fadanis will be soon released from confinement.*

No. 6] [*11-8-1798*

श्री.

सेवेसी विज्ञापना. ता। छ २८ सफर रोज मंदवार प्रातःकाळपर्यंत वर्तमान शहरात फौजा सिरल्या. रयत लोकांची लूट जाहली. त्यात पूर्वेकडे कांही एक पेठेत घरे वांचली. पंचमेस मंगळवारात डोंगराकडील लगत घरे कांही वाचली. गुरुवारी साऱ्या फौजेस ताकीद होऊन, प्रातःकाळापासून लूट बंद केली. शहराभोवत्या चौकिया बसविल्या. किल्याच्या यायजास नाकेबंदी चौकिया बसविल्या. वरील माणूस खाली येऊ नये, व खालीकडील माणूस वर्ते जाऊं नये या प्रो। ताकीद जाहली आहे. राजश्री माहाराजाकडील कारभारी छत्रसिंग माहाराजाचे धाकटे बंधु, व भवानजी शिर्के व कुसाजी मोहार्डीक, व नरसिंगराव गुजर व लिंगोजी कासकर सर्व माहाराजांचे आप्त राजपागा घेऊन किल्यातून मोड जाहाला, ते समई घेऊन गेले. त्यास बरोबर ऱ्यारशे पाचशे जमाव आहे, याप्रमाणे बोलवा आहे. यास्तव राजश्री परशरामभाऊ याजकडील हरिपंत धायगुडे त्याच्या पिछावर लोक सुधां लागले आहेत. येविसीचा मार काय होईल तो त्याचा शोध पकेपणे घेऊन, सेवेसी विनंती लिहीन. माहाराजाकडील हस्ती कालचे व आजचे मिळोन दाहा पाडाव जाले. त्याचा खर्चाचा बंदोबस्त रास्ते याजकडून चालला आहे. राजश्री माहाराजाकडील बोलणें सोयचे

अद्यापि नाहीं. राजश्री रास्ते व भाऊ व विंचूरकर यांचा मुकाम आहे तेथेंच आहे. करवीरकर यांजकडील बातमीस जोडी गेली आहे, ती अद्यापि आली नाहीं. आल्यावर सेवेसी विनंती लिहीन. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter reports that Parashuram Bhau Patwardhan attacked Satara and routed the Raja's forces.*

No. 7] [*14-8-1798*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य नरसिंह खंडेराव साष्टांग नमस्कार विनंती उपरि. येथील कुशल तागायत छ १. रबिलोवलपावेतों यथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. श्रीमंतानी सातारियास जावयाची आज्ञा समक्ष केली, मसलत दुसरीकडे निसबतीस आम्ही चाकरी केली नाहीं असें असोन, श्रीमंतानी आज्ञा केली. त्यास नाहीं म्हटल्यास मर्जी राहणार नाहीं असें समजोन, कांहीं येक अडचणी न दाखवितां गोव्यास आलों. तेथून कूच करून सातान्यानजीक आलों. आधिक वद्य ८ शनवारीं लढाई जाली; व गुरुवारीं द्वादसीस राज्याचे फौजेवरी चालून घेऊन, शहरांत आपल्या फौजा दाखल जाल्या. राज्याची फौज पलाली. किल्याभोंवत्या चौक्या बसविले. लौकरच बंदोबस्त होईल. येविसीचे तपसीलवार वर्तमान राजश्री माधवराव रास्ते यानी सरकारांत लिहिलें, त्याजवरून कळेल व राजश्री निंबाजी विठल व रामाजी राजेश्वर सविस्तर सांगतील, त्याजवरून कलेल. इकडील मसलत श्रीमंताचे प्रतापें आटोपली. राजश्री पर्शरामपंत भाऊ करवीरकरावरी जातील. राजश्री माधवराव रास्ते सातारियास राहून बंदोबस्त करतील. आम्ही रिकामे येथें कालहरण करावें ठीक नाहीं; याजकरितां आपण श्रीमंताचे कानावरी घालून आम्हांस हुजूर येण्याविसी सरकारचें पत्र पाठवावें, येविसीं अनमान करूं नये. माहाल सरंजामास आहे, तेथील अवस्ता सिंदे होलकर यानी काय केली, आम्हांस पैका येतो किंवा नाहीं, याचा शोध करावा. सर्व भिस्त माहालावरी, माहालचा पैसा येईना कर्ज कोठें मिलेना, तेव्हां फौज कोणते भिस्तीवरी बाळगावी, चरितार्थ कसा चालेल ही चिंता रात्रंदिवस आहे. याचा निर्वाह दुसरियाच्यानें होत नाहीं. श्रीमंतापासी विनंती करावी, आणि श्रीमंताचे मनांत द्रव येऊन बंदोबस्त केल्याखेरीज परिणाम नाहीं. परंतु आपण अनकूल असल्यास कोणती गोष्ट घडत नाही? येविसी राजश्री

बलवंतराव कुगांवकर यानी आपल्यास आम्हांविसी सविस्तर सांगितले आहे. आम्ही इकडे आल्यामुळें तसेंच राहिले. त्यास श्रीमंतास विनंती करून, आम्हांस हुजूर बोलाऊन घ्यावें; आणि अंगेंजनी करून, हरयेकविसीं बंदोबस्त करून घ्यावा. आम्हीं आपल्याखेरीज नाही. आपले भेटीनंतर ज्यांत आपली मर्जी राहील तोच अर्थ घडेल. परंतु आपण आमचा प्रतिपक्ष करून, हरयेकविसीं बंदोबस्तास अनमान करू नये. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंति.

¶*The writer Narsinha Khanderao Vinchurkar communicates to Naropant Nana that the Raja's army was defeated and guards had been placed at the gates of the Fort. The addressee Naropant may be Chakradev.*

No. 8] [*15-8-1798*

श्री

शेवेसी कृष्णराव नारायण क्रा। सा। ना। वि। ता। छ २ रौवलपावेतो स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. बहुत दिवस आज्ञापत्र येऊन सांभाल होत नाही, येणेकरून चित सापेक्षित आहे, याजकरिता विनंति लि। आहे तरी सदैव कृपापत्री सांभाल होत असिला पाहिजे. यानंतर पेशजी रा। माधवरावजी रास्ते येथून निघोन निंबगोवे येथे मुकामास गेले, त्या समई आम्हीहि समागमे जावें, परंतु त्याचे निकडीने जाण्यामुले योग न घडला. मागाहून जावे तरी येथे याच्या पेचांत सांपडल्यामुलें उपाय न चाले. त्यांत त्यांची ताकीद व शहराभोवत्या नाकेबंधा याजकरितां उगेच होतो. ऐसे असताहि त्यानी परामृष करावयाचा तो केलाच. पदरचे च्यार रुपये भरीस घालून जीव वाचवून होतो. इतकियात स्वामीचे पुण्यप्रतापेकरून माधवरावजी यांचे आगमन फौजेसह जाहाले. ही गोष्ट मोठीच जाहाली. फौजेचे काम अनिवार याजमुलें शहर लुटलें गेलें. त्यांत आमची पागा व गोट व मागील चौक व तीर्थस्वरूप रा। विश्वनाथराव काका यांचा वाडा व पांच साहा कारकुनाची घरे वगैरे दरोबस्त लुटली गेली. ते समईच रावजीजवल लस्करात येऊन पोहचलो. स्वामीचे कृपाकटाक्षे राहात्या वाड्याचे दोन चौक वाचले, तेणेकरून आबरू वाचली. येविसींचे वगैरे सांप्रतचे जाहालेले वर्तमान रावजीचे लिहिल्यावरून विदित जाहालेच असेल. पुढे सांभाल करणार व कृपाकरून चालविणार स्वामी वितिरिक्त दुसरा कोणीहि नाही, हे खचित ध्यानात असिले पाहिजे. येतद्विषईचे वृत रावजीचे लिहिल्यावरून निवेदन होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This letter from Krishnarao Narayan Joshi probably to the Peshwa describes the siege of Satara by Raste and the losses suffered by the writer.*

No. 9] [18-8-1798

श्री

सेवेसी विज्ञापना ताा छ ९ रबिलोवल रोज मंदवार राा प्रातःकालपर्यंत वर्तमान तर छ ४ रोज भृगुवार राजश्री रास्ते यांजकडे येसाजीपंत आगऱ्ये व बापू शेमेकर श्रीमंत मातुश्री आईसाहेब व माहाराज याजकडून बोलणे बोलावयासी आले. त्यांचे बोलणे कीं, तूर्त किला आमचे स्वाधीन असावा. कारण आमचे पदरी च्यार ग्रहस्त आहेत, त्यांची आमच्यामुळे खराबी जाहाली. यास्तव त्याजकडे तुम्ही वाईट नदरेने पाहू नये. तुम्ही शाहारांत राहून काम कारभार करावा. याजप्राा माहाराज यांचे बोलणे आहे म्हणून रास्ते याजपासी बोलले. नंतर यांही बोलणे केले कीं, किल्यावर दोन तीनसे लोक व कारकून घेऊन असावे आणि पैल्याप्राा शेवाचाकरी घ्यावी. पूर्वीचा बंदोबस्ताप्राा असावे. याप्रमाणे माहाराजास मान्य गोष्टी नाहींत. त्यांच्या बोलण्यास रास्ते मान्य करीत नाहीं. याप्रमाणे छ २९ सफरपासून सल्याचे बोलणे लागलें त्यास आज नऊ रोज होत आले. आद्यापि निर्गम दिसण्यांत येत नाहीं. माहाराजानी किल्याच्या तटांच्या गल्या-खालीं चौकियां बसऊन बंदोबस्तानें आहेत आणि हिकडे सल्याचे बोलणे लाविले. त्याची गत या प्रकारची आहे. आज ऐकिण्यांत आणखीं आले कीं, श्रीमंत मातुश्री आईसाहेब व माहाराज यांजकडील बोलणे कीं, तूर्त आमचे स्वाधीन आसावा आणि किल्यावर लोक आहेत त्यांचा जामीन येक कोणी ग्रहस्त तुमच्या खातरजमेचा देतो. त्यास रास्ते यांचे म्हणे की, ऐसे म्हणतां तरी किल्यावर जितके लोक आहेत तितकीयानी प्रथक प्रथक जामीन द्यावे आणि दोन तीनसे लोक कारकून ऐसा किल्यावर घ्यावा म्हणजे सलाच आहे. आम्हीहि सेवाचाकरी पैल्या पुरवतप्रमाणे करू. माहाराजानी पूर्वीत प्राा असावे. त्यासहि निग्रह माहाराजांचा फार आहे. परंतु आज आगऱ्ये व बापू सेमेकर आले होते त्याणी रास्ते यांजकडील लक्ष्मण धोंडदेव फडणीस यास माहाराजाकडे नेले होते. च्यार घटका रात्री आवसीची डेऱ्यास आले, तो आज सुक्रुवारची रात्र म्हणून कांही बोलणे माहाराजाचे रास्ते यास सांगितले नाही. याचा शोध मनास आणून विनंती लिहीन. राजश्री रामराजे माहाराज याची बहीण अहल्याबाई सिंदी आली होती. रास्ते याचे व बाईचे दोन घटका खलबत जाहले. भोजन होऊन चोली, लुगडे देऊन निरोप घेऊन आपले घरास गेली. कोणत्या गोष्टीविसी आली होती याचा शोध घेऊन विनती लिहीन. करवीरकर माहाराज याचा मुकाम बतीसिराले याजकडे गेलाची बातमी आहे, परंतु किला मलकाअर्जुन डोंगरावर येथे किला बांधावयासी मोहूर्त केला म्हणून ऐकिण्यात आले आहे.

राजश्री माहाराज याजकडील आप्त आहेत, त्यांजकडे गाव असतील ते जप्त रास्ते याणी केले आहेत व माहाराज याजकडे चाकरीस गावगंना लोक असतील त्यास गावगंना पाटील कुलकर्णी यास रोखे करून आणून चौकसी करीतच आहेत. कही त्रिवर्गची जात असते. सरपणचे रोखे होत असतात. लढाई जाहाली त्याचे दुसरे दिवसी पत्र तपसीलवार पो कीं, येलोजी मोहिते हे तरवारीने ठार जाहाले, पैली लढाई व त्याचा लेक धाकटा माहाराजाचा जावई यास जखमी तरवारीची येक दोन लागल्यानंतर त्याणी लढाई कोणी सरदार उभे पुढे राहून घेतली नाहीं. शाहाराभोवता वेढा घालून दाबाने होते. मोड जाहाला तेव्हा दोन तीनसे घोडे पाडाव केले ते भाऊकडे फार आले. विंचूरकर व रास्ते याकडे थोडे बहुत आले असेल. याप्रो अदमास दिसतो आहे. शाहारची लूट भाऊकडील लोकाकडे गेली. या दो ग्रहस्ताकडे थोडी बहुत लोकांकडे आलीच आहे. माहाराजाचे पायदल जखमी फार दोन तीनसे जाहाले-याचा अदमास आहे. याजकडील भाऊकडील सितोले तरवारीने ठार जाहाले व विठलराव बाबा यास डोल्यावर बरचीची जखम लागली. याजखेरीज कोणी नामांकित ग्रहस्त त्यांजकडील व याजकडील पडला नाही. पडला असता तर विनती लिहिली असती. तत्रापि आमच्या (अपूर्ण)

¶*This incomplete letter describes the battle of Satara and the negotiations started by Agte and Shemeker with Rastia on behalf of the Raja. The interview between Rastia and Ahilyabai Sindia; the sister of Ramraja, the movements of the Raja of Kolhapur and the casualties that occurred in the fighting are some of the topics mentioned in this letter.*

No. 10] [*22-8-1798*

श्री

सेवेसी विज्ञापना. तागायत छ ९ रबिलौवल रोज सौम्यवार प्रात:कालपर्यंत वर्तमान तर राजश्री रास्ते याजकडे येसाजीपंत आगश्ये इंदुवारी चारघटिका रात्रीस येऊन बोलले कीं तीनसे लोक व कारकून घेऊन त्यांचे हातोन सारा कारभार घ्यावा म्हणोन सांगितले. त्यावरोन श्रीमंत मातुश्री आईसाहेब भोमवारी प्रात:काली किल्ल्यावरून खाली येऊन, रास्ते याणी पुढें जाऊन सनमान करून आणून वकील याणी करार केल्याप्रमाणें लोक व कारकून किल्यावर घेऊ, बाकीचे किल्ल्यावर लोक वगैरे राहिले त्यांचा खातरजमा करावयासी येणार होती ती सोवली जाहाली म्हणून चिठी आली. मंदवारी प्रात:काली येणार म्हणोन चिठीत लिहिले आहे. दिवसगतीवर घातले आहे. खाली आल्यावर होईल

ते वर्तमान लिहीन. राजश्री परशरामभाऊ यांचे चिरंजीव अपा मिरजेहून आले, ते काल इंदुवारी पौवाई येथें मुक्काम केला. त्यांच्या भेटीस राजश्री माधवराव रास्ते व विंचूरकर भौमवारी प्रातःकाली गेले. तो भाऊचे चिरंजीव बाबा व दाजीबा व बापू त्रिवर्गांची स्वारी आली, तेव्हां तिघांच्या भेटी होऊन नंतर रास्ते यांच्या भेटीकरितां गोलीच्या टपेपर्यंत चालोन आले. तेथें भेटी जाहाली; नंतर विंचूरकर यांची भेट घेऊन नंतर मानकरी याजकडील व त्याजकडील यांच्या जाहालिया उपरांतिक रास्ते श्रीबहिरोबाचे दर्शन घेऊन डेऱ्यास आले. विंचूरकर याणीं लष्करपर्यंत पोचऊन, आपल्या डेऱ्यास आले. आणखी फिरोन भेटावयासी आपा व बाबा व बापू त्रिवर्ग रास्ते यांचे डेऱ्यास प्रहर दिवस सायंकालचा आमलांत आले. घटकाभर कचेरीस बसोन, साखर-पाणी मानकरीसुद्धा घेऊन तांबूल भक्षूण अर्ध घटिका बसोन माघारे डेऱ्यास गेले. त्याजबरोबर एक हजार फौज आहे. नंतर रास्ते याणी से दीडशे गाडदी नवे चांगले पाहून ठेविले. करवीरकर महाराज यांचा मुक्काम बतिसिराल्यास होता, तो करविरास गेले म्हणून बातमी रास्ते यांच्या डाकेची आहे. रत्नाकरपंत करवीरकर महाराज याजकडील व धोंडोपंत गोखले यांची व त्यांची लढाई सावणूर येथें जाहाली. धोंडोपंत गोखले यास तरवारीच्या जखमा दोन तीन लागल्या, आणि कचकरले म्हणून बातमी रास्ते यांजकडे आहे. बापू सेमेकर आले होते. दोन घटिका बोलणे होऊन, निघोन सातारियास गेले. सेवेशी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*This is a news-letter which states that the three sons of Parashuram Bhau Patwardhan with an army of one thousand men reached Satara and that the Maharaja of Kolhapur returned to his capital. The writer appears to be Krishnaji Narayan.*

No. 11] [*24-8-1798*

श्री

सेवेसी विज्ञापना ताा. छ ११ माहे रबिलोवल रोज भृगुवार प्रातःकाल एक घटका दिवसपर्यंत वर्तमान तर राजश्री माधवराव रास्ते याजकडे श्रीमंत मातुश्री आईसाहेब मंदवारी प्रातःकाळीं किल्यावरोन खाली येणार आहेत. आल्यावर त्यांच्या व यांच्या अनुमते विचारे ठरऊन लोक व कारकून घेणार ऐसा बेत ऐकितों आहे. आल्यावर वर्तमान काय होईल ते लिहीन. काल छ १० रोजी गुरुवारी राजश्री येसाजीपंत आगाशे प्रथम दोन घटका रात्रीस येऊन फराल करून, दोन घटका खलबत करून फिरोन महाराजाकडे गेले. बोलण्यांचा

इत्यार्थ कांही समजला नाहीं. शोध घेऊन विनंती लिहीन. राजश्री परशराम भाऊ याणी हरसिंग कोकणचा यांचे लोक पायदळ ३२ व गाडदी २०० याप्रमाणें नवे हुजेरी घेतली आहे. राजश्री हरिबा धायगुडे यांच्या रावटीस भाऊ यांचे चिरंजीव आपा गेले होते. दोन घटका एकांत होऊन आपल्या डेऱ्यास आले. राजश्री माधवरात्र रास्ते यांणीं पायदळ पनास यांची नवे हुजेरी घेतली आहे. बापूभट ठकार आले होते. रास्ते व त्याचे एकांत होऊन फिरोन माघारे गेले. भाऊकडील कारभारी रास्ते याजकडे येतात जातात, व रास्ते याजकडील कारभारी येतात जात आहेत. राजश्री महाराज यांणीं रास्ते यांस पेशजी धुडाऊन शहरा बाहीर घालविले, ते समई सिकेकटार व देवपूजा वगैरे चीजवस्त जितकी गेली होती तितकी महाराजांनी पाठऊन दिल्ही, म्हणून ऐकिण्यांत आले आहे. आणखी ऐकिण्यांत आले आहे कीं गेंड्याच्या मालावरून कूच करून पोवाईपलीकडे भाऊ यांचा मुकाम जाणार आहे. रास्ते विंचूरकर यांचा मुकाम गेंड्याच्या मालावर राहातो, किंवा आणखी कोणिकडे होतो हे समजल्यानंतर विनंती लिहीन. हली भाऊ व रास्ते विंचूरकर यांचा मुकाम जेथे आहे तेथेच आहे. कागद कोरे ल्याहावयासी नाही व पोटास कांही नाही. दररोज पाऊण रुपये खर्चास लागत आहे. कृपाळु होऊन द्यावयाची आज्ञा असावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*This news-letter refers to the negotiations going on between the Maharaja of Satara and Rastia.*

No. 12] [*August 1798*?

श्री

सेवेसीं विज्ञापना. ऐकण्यांत नामांकित ग्रहस्त पडला ऐसे नाहीं. पायदळ व स्वार, रास्ते व भाऊ व विंचूरकर या त्रिवर्गाचे पाचशेपर्यंत अदमास होईल. याखेरीज रास्ते याजकडील ग्रहस्त पिसाळ ओझर्डेकर येवरपारेकर व लाड लस्कर त्रिवर्ग तरवारीच्या जखम्या दोन तीन या प्रो लागल्या; व आनंदराव सिलेदार कारकून यास गोळी बंदुखीची लागोन ठार जाहले, या प्रो बोलवा आहे, म्हणून पेशजी पत्र लिहिले होते; व हालीं विनंती लिहिली आहे. रास्ते याची उठावणी यवतेश्वरचे अंगाकडून, करंजेच्या अंगाकडून परशरामभाऊ, व दोघांच्या मधी विंचूरकर त्रिवर्गांनीं एकदांच उठावणी करून, फौजेवर चालोन घेऊन, तोफा वरचेवरी पुढें नेऊन चांगली मारगेरी कासी रघुनाथ यांहीं केली;

आणि बेलाशख चालोन पडले. त्या वेळेस अर्ध घटका लडाई चांगली होऊन, इकडील तीन पथकांतील पाच सहाशें जखमी जाहले. त्यांजकडीलहि जखमी जाहले. हिकडील भरणा भारी, यामुळें त्यांचा मोड जाहला. हजार स्वारानिसी सिर्के व कुसाजी महाडिक व छत्रसिंग महाराजांचे धाकटे बंधु वगैरे त्याजकडील पलोन, पाटणखोरे याच्या सुमारें कोयना उतरोन, करवीरकर महाराज याजकडे जावयासी निघोन गेले. हजारस्वारांपैकीं झाडून लोक पुटोन आपल्या सोईनें निघोन गेले. खाशे मंडळी दोनशें स्वारांनिशीं कोयनापार जाहले. त्यांच्या पाठीवर राजश्री परशराम भाऊ यांचे चिरंजीव चार हजार फौजानिशीं गेले, तेहि कृष्णा कोयनाचे आलीकडेच आहेत. लढाईचे दिवशीं शाहर लुटले गेले. लोकांची खराबी बहुत जाहली. हें वर्तमान पेशजी सविस्तर लिहिलें आहे. याउपरहि वरचेवरी लिहीत जाईन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापति.

¶*The letter gives a detailed account of the attack on Satara by Raste etc. The Raja's army was defeated and a part of it crossed the Koyna river with a view to take shelter within the Kolhapur territory.*

No. 13] [*August 1798*

श्रीशंकर प्रसन्न

पुरवणी शेवेसी विज्ञापना ऐसी जे. छ ४ रावलचे आज्ञापत्र पाठविले ते पावलें. सातारा शहर प्राचीन लुटलें. लोकांची मालमालियेत फार लुटीस गेली त्याचा बंदोबस्त तुम्ही केलाच असेल. खजिना नगारा निशाण हाती लुटीस आल्यास सरकारचेहि चाल तुम्हांस ठाउकीच आहे. चौकशी करून ठिकाण लाऊन सरकार काम येथास्थित करणें म्हणून आज्ञा. ऐसियास सातारा शहराची अमदानी स्वामीच्या ध्यानातच आहे. त्यांत विरुध वाढल्यापासून लोक सावधच होते. त्या आलीकडे शहर लुटले जाईल या आंदेशाने साहा रोज गोलागोली होऊन दोहींकडील फौजा उभ्या होत्या, त्या आवकाशांत इकडून सूचनाहि केली होती. लोकानी आछादन करावयाचे तें केलेच होतें. प्रहर दाहा घटका लूट जाहाली. भांडे कुंडे, कापड, गुरे, घोडी कार्याकारण नग-नगोटें लुटीस गेलें. शहरासमीप मुकाम केला. नंतर दोन च्यार कोसी चौक्या बसंऊन गोटात वगैरे जे उमगले ते ज्याचे त्यास देविलें. खजिन्याचा विषय कांहीच नाहीं. हाती सरकारचे सारे येके जागां करून राजवाड्याजवलच ठेविले आहेत. स्वामिशेवा घडेल तितकी करीत आहें. सेवेसी श्रुत व्हावे हे विज्ञापना.

¶*The letter describes the sack of the capital, Satara, and says the people did not suffer much owing to measures taken to restore order in the city.*

No. 14] [26-12-1798

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री विश्वासराव नारायण गो

सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सुा तिसा तिसैन मया व अलफ. किले सातारा येथे पेशजीचे कदीम लोक चाकरीस होते त्याणी व नवे लोक ठेविले त्याणी मिलोन बखेडा केला. सबब त्यांची घरे व सेतें व इनामगाव व जमिनी व सरंजाम व वतने किले वंदन येथील सरंजामाचे गावगना आहेत त्याचीं जफ्ती सरकारांत करून जफ्तीचे काम रा बाजी गणेश याजकडे सांगोन पाठविले असेत. तरी ज्याजकडे इनाम गाव व जमिनी व सरंजाम चालत असतील त्याचा मजकूर हुजूर समजोन आज्ञा करणे ते केली जाईल. तोपावेतो सदरहू प्रा जफ्ती करून उत्पन्न होईल ते खंड गुन्हेगारीचा ऐवज ठराऊन वसूल घेऊन डौल सातारा येथील खर्चास देत जातील. तुम्ही दिकत न करणे. याजकडे कामकाजास प्यादे कार्याकारण लागतील ते किले मजकूरपैकी देत जाणे. जाणिजे छ १७ रजब आज्ञा प्रमाण.

बार

¶*Peshwa Bajirao Raghunath orders the attachment of the houses and property of the employees at the fort of Satara for having rebelled against the Peshwa's Government.*

No. 15] [4-6-1799

श्री

सेवेसीं हरि सदाशिव दामले चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत जेष्ट शु १ मंगळवार दोन प्रहरपर्यंत मुकाम मुंबई येथें स्वामीचे कृपाअवलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. इंग्रजाकडील बातमीचा मजकूर आज दोन प्रहरीं अकस्मात शेंदोनशें तोफाचे आवाज केले. भोज्यनाची वेल, तेव्हां कोटांत सिपाई चौहूंकडे पाठऊन बातमी आणिली, तों विलाइतचा पाछाय याचा जन्मकालचा दिवस, यामुळें जनरालचे वाड्यांत सर्वांस खाणे करून तोफा मारिल्या. मोठा आनंदाचा दिवस केला. बारीक वर्तमान आंतून काय असेल तें मागाहून सविस्तर लिहितों. पेशजीं टिपूची बातमी लिहिली आहे, त्यास टिपूचें वर्तमान येतांच कागदोपत्रीं छापोन,

सर्वांस कळविली. त्याची नकल इंग्रेजी करून युक्तीनें घेऊन पाठविली आहे. त्यावरून सर्व ध्यानांत येईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Sadashiv Damle writes news from Bombay about the rejoicings of the Company's servants on account of the birthday of their King and the fall of Tipu.*

No. 16] [*16-6-1799*

श्री

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ ११ मोहरम भानुवासर संध्याकाल च्यार घटिका रात्रपरियंत यथास्थित असे विशेष. राजश्री बालाजी जनार्दन याजकडे प्राथःकालीं नारोपंत चक्रदेव व चिमणाजी खंडेराव व बज्याबा सिरालेकर व यांचें च्यार घटिका बोलणें होऊन श्नानास उठले. नंतर नारायणराव वैद्य यांचें दोन घटिका देवघरांत बोलणें जालें. आज आंबरस केला होता. सवासें ब्राह्मण भोजनास बोलाविले. त्यास येक रुपया दर आसामीस दक्षणा दिल्ही. भोजनोत्तर निजावयास गेले. निजोन उठल्यावर बालोजी कुंजर यांचें अर्ध घटिका बोलणें होऊन गेल्यावर चिमणाजी खंडेराव व नारोपंत व लक्ष्मणपंत चक्रदेव, बज्याबा सिरालेकर यांचे दोन घटिका बोलने जाले. नंतर फकरुदीन याचें दोन घटिका बोलनें होऊन गेल्यावर वेंकटराव पिंगले व सदाशिव माणकेश्वर व आत्या गुरुजी व शेषाद्रिपंत व सदाशिव भट दात्ये व वामनाजी हरि व दादो हरि मराटे व अन्याबा जुनरकर व लाला फत्तेचंद याचे दोन घटिका बोलणें होऊन, मग खंडोपंत वर्तक व रावजी आपाजी व माधवराव व जावजी पाटील याचें संध्याकालपर्यंत खलबत जालें. नारोपंत व लक्ष्मणपंत चक्रदेव व बज्याबा चिमणाजी खंडेराव अद्याप बसले आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer states how Nana Fadnis spent the day and what interviews he gave. This gives an idea how disconsolate Nana was a few months before his death. Fakruddin mentioned in the letter was the son of Sayad Nuruddin Hussein Khan, who was Munshi to Sir C. W. Malet.*

No. 17] [*11-7-1799*

पौ छ ७ सफर

श्री

सेवेसी विज्ञापना येथील वर्तमान तागायत छ ७ सफर गुरुवासर संध्याकाल दोन घटका रात्रपरियेंत यथास्थित असे विशेष. राजश्री बालाजी जनार्दन याजकडे प्राथःकालीं दोन घटिका दिवस आल्यावर खंडोपंत वर्तक व व्यंकटराव गोविंद व सदासिव माणकेश्वर या त्रिवर्गाचे तीन घटिका बोलणें जालें. नंतर

श्नान होऊन भोज्यनोत्तर निजोन उठल्यावर, बज्याबा सिरोलकर व शंकर जोसी व खंडोपंत वर्तक याचें दोन घटिका बोलणें जालें. मग रंगराव त्रिंबक व व्यंकटराव रास्ते याचे घटिका येक बोलणें जालें. नंतर नारायेणराव वैद्य व अजमतदौला याचें अर्ध घटिका बोलणें जालें. नंतर स्वारी करून काल्या हवदाजवल बागांत गेले. तेथून बेलबागांत आल्यावर श्री विष्णूचें दर्शण करून, सायेंकाली घरास आले. गोपालराव मुनसी व आण्याबा जुनरकर व बाळाजीपंत सहस्त्रबुधे व गणपतराव माधव इतकियांचे नमस्कार जाले. बज्याबा तिसरा प्रहरापासोन वाड्यांत आल्यावर, स्वारीबरोबर जाऊन अल्यावर, फिरोन संध्याकालापासोन आद्याप बसले आहेत. छबिना नित्याप्रमाणें आहे. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*The writer gives the names of the persons who interviewed Nana Fadnis during the day. Nana was keeping mounted guards about him to prevent mischief.*

No. 18] [*15-7-1799*

पौ छ ११ सफर मयातैन.

श्री

विज्ञापना तागायत इंदुवार साईंकाल अस्तमान वर्तमान कुशल असे विशेष. राजश्री कासीराव होलकर याची स्वारी पुण्यात त्याचा वाडा आहे तेथें आजी दोन प्रहरा आली. नंतर रो। चिमणाजी खंडेराव याजला बलाऊन नेले. चिमणाजीपंत व कासीराव व पाराजीपंत व नथू कारले चौघांचे चार घटिका खलबत जाहाले. उपरांत खंडोपंत आले. नंतर अर्ध घटिकेनें चिमणाजीपंत निघोन गेले. उपरांत कारभारी होलकर यांचे येथें आहेत हे वगैरे झाडून कारभारी खलबतास येऊन बैसले. सहा घटिकापावेतो बोलणें जाहाले. शेवट आजीचा बेत सरकारवाड्यांत यावयाचा राहिला. कारण ऐकण्यात दाजीबा व श्रीपतराव यांचे येण्यास सरकारांत अनमान पडतोसें वाटतें. कासीराव यांची स्वारी निघोन माघारी लष्करांत अस्तमानी गेली. आतां यावयाचा बेत प्रतिपदेवरी गेला म्हणून लोक बोलत होते. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*It is reported in this paper that Kashirao Holkar came to his residence in Poona to hold a consultation in order to decide certain important issues.*

No. 19] [*10-12-1799*

श्री

अपत्यें हरिनें चरणावरीं मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत मार्गशीर्ष शु॥ १३ पर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष. पेशजी पत्रें पाठविलीं

तीं पावलींच असतील. मेस्त्र पालमर येणार म्हणून वंदता होती. परंतु त्याचे ऐवजीं तीन इंग्रज मोठे माणूस आले. मेस्त्र मुर्कीलसाहेब याचे घरीं त्याचें जाणें फार. कांहीं मसलतींत आहेत ऐसें दिसतें. इतके दिवस मुकिलास येथें कोणी पुसत नवता. हालीं त्याकडे इंग्रेज लोक जाऊं लागले, तेव्हां त्यास हिकडे संमत होऊन भडोजेवर मसलत करणार, म्हणोन बाजारी वर्तमान दाट आहे. टोपीकराचा विश्वास येत नाहीं. टिपूची मसलत जिंकोन आले, त्यामुळे त्यांस अहंकार बहुत जाला आहे. पागडीवाले यासी मोजीत नाहीं, ध्यानात असावें. यानंतर कंपूचे लोकानी आपणांस अडविलें यास्तव पळून कोकणांत आला म्हणोन बातमी येथें दोन दिवस दाट होती. चौकसी करितां भाऊ वैज्यनाथास आले आहेत खरे, तेव्हां चित्ताचें समाधान जाहालें. मी लेकरानें काय ल्याहावें? परंतु बंदोबस्त लौकर जाल्यास सर्वांचें कल्याण; नाहीं तरी येथील लोक मनस्वी गपा बोलतात त्या कागदीं कोठवर ल्याहाव्या? श्रीहरिनें बंदोबस्त लौकर करून सर्वांचीं पारणी फिटतील तेव्हां चांगलें. दीढ वर्ष जाहलें, येक वेल चरणाजवल आल्यानें सर्व निवेदन करीन. मार्गसीर्ष अखेर येणार होतो परंतु बिराडीं चोरी जाहाली, त्याचे चौकसींत आहे. दैवानरूप पता लागेल तेव्हां खरा. चोरी जाली हा मजकूर पेशजीं सविस्तर लिहिला आहे. दोघा चौघांची वस्तभाव सर्वस्व जाऊन, आपले नुकसान दोन हजार रुपयांचें जालें. वकिलीचें नांव करून वडिलानी दिल्हें, परंतु चौकी पाहाऱ्यास सिपाई नाहींत. समई सिपाई देखील महिना पंधरा दिवस जवल नसतात. याप्रमाणें सेवकाचें वर्तमान आहे. बहुत काय लिहूं? सेवेसी श्रुत होय हे विज्ञापित.

¶*The writer Hari Damle gives news of three Englishmen of note having arrived and met Michael Fillows with a view to attack Broach. The English, the writer says, have become overbearing in their attitude since the overthrow of Tipu.*

No. 20] *[1799*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री
नानासाहेब खिजमतीस

समस्त सिंदी जमादार सलाम विज्ञापना येसीजे. गव्हार जमादार वगैरे सिंदी सरकारात चाकरी सखाराम घाटगे याचे मारफातीने करीत असता पोटास मागावयासी घाटगे याजवल गेले. त्याणी दौलतराव सिंदे याजवल जाऊन गैरवाका समजाऊन सिंदी जमादार जीवेंच मारिले. त्यासी आम्ही या राज्यांत चालीस

पनास वर्षे चाकरी करीत आलो, परंतु यैसे कंधी जाहाले नाही; आणि आतां हा प्रकार जाहाला. त्यास साहेबी मनास आणून आम्हास आज्ञा काये ते करावी. स्वामी आमचे इनसाफ मनास आणीत नाही, तर सर्वत्र सिंदी मरून जाऊ हे विज्ञापना.

¶*The Sindhi Jamadars complain against Sakharam Ghatge having put to death some of their comrades and implore justice at the hands of Nana Fadnis. These are probably the Arabs.*

No. 21] [*1803 ?*

श्री

चिरंजीव राजश्री नारायणराव व जनार्दनपंत भाऊ यासी प्रति केसो रघुनाथ वझे आसीर्वाद उपरी येथिल क्षेम ता छ ३ रजब सुखरूप असो विशेष. इंग्रजी पलटणे पुणियाहून कुमकेस येणार म्हणून ऐकतो, याजकरितां वाट पाहत बसलो आहो. त्यास ती येतात किंवा नाही हे समजत नाही, तर आपण खचित काये ते लिहून पा॥. येथील मार तर तिकडून कुमक आल्यास हे उमेदवारी धरणार, नाही तर काही येथील सुमार दिसत नाही. रा॥ धोंडोपंत गोखले काही येत नाहीत. मला तिकडे या म्हणून पत्र आल्यास तिकडे येईन, नाही तर कोंकणची हावा पाहावयासी जाईन. बहुत काय लि॥ हे॥ पत्री वामनाजीपंत यासी आसीर्वाद लि॥ परिसोन लोभ करावा हे आसीर्वाद. वझे मंडली कोण तेथे आहे हे लिहून पा॥ हे आसीर्वाद.

¶*Keso Raghunath Vaze writes to Narayanrao Vaze inquiring whether British regiments were coming from Poona for the writer's succour.*

No. 22] [*1799 ?*

श्रीपांडुरग

सेवेसी बाळोजी कुंजीर दंडवत विज्ञापना ऐसीजे. आज राजश्री दौलतराव बाबाकडील बाजारचे व लशकरचे लोक दोन या॰[1] बा॥ वाणी उदमी लोक पुन्यात गेले, ते रा॥ मानाजी सिंदे याणी आडथळा केला म्हणून बोभाट आला. त्यास आम्ही बोललो की ही गोस्ट घडनार नाही. याकरता येथून रा॥ रामाजीपंत

---

१ दानपा पा॥ (?)

याजकडील प्यादा दाखवयास आला त्याजबराबर आपला हुजुऱ्या देऊन खरेखोटे हेहि पाहावे. बसविले आसतील त्यास आज्ञा व्हावी; आणि पुढे निक्षून ताकीद जाली पाहिजे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Baloji Kunjir urges upon Bajirao an inquiry into the disturbance created by the soldiers of Daulatrao Sindia.*

No. 23] [*21-1-1800*

श्री

अपत्येसमान हरि सदाशिव दामले चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत पौष वद्य ११ भौमवारपर्यंत वडिलांचे आसीर्वादेंकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. पेशजीं तीन च्यार पत्रें पाठविली आहेत तीं पावलींच असतील. येथून इंग्रज पेशजीं पुणेयासी पाछायाचीं पत्रें घेऊन गेले होते ते माघारे येऊन साहा दिवस जाले. त्यास मनोदयानरूप जाबसाल जाहाला नाहीं, म्हणोन बाजारी वर्तमान आहे. येक वेळ कोंकणपटींत गडबड करावी याप्रमाणे येथील लोकांचे सांगण्यांत बातमी आहे; परंतु तूर्त होतां दिसत नाहीं. तेथील विचार यथास्थित आहे; तरी याच्यानें कांहीं उचल करवत नाहीं. हा खंबीर पका. येथील लोक खबरा नेत असतील त्या खोट्या. इंग्रज लोक आपले ठिकाणी म्हणतात कीं प्रस्तुत आम्हांस कोण्ही शत्रु नाहीं; परंतु फरासीसाचें भये मोठें बाळगतात. त्यासी याची लढाई अद्याप होत आहे. वलंदेज याणी मोडला म्हणोन सांगतात. त्यावरून याचा त्याचा सल्लक होणार म्हणोन बातमी आहे. दुसरे वर्तमान अधिकोतर ल्याहावें ऐसें नाहीं. मी निघोन लौकर येणार आहे, सेवेसीं श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Hari Sadashiv Damle writes from Bombay to Poona, giving news of the English casting a covetous glance upon the neighbouring districts of Konkan.*

No. 24] [*June 1800*

श्री

पुरवणी सेवेसी माहादाजी अनंत साष्टांग नमस्कार विज्ञापना. कितुर तालुक्याचीं ठाणीं मलप्रभेचे उत्तरतीरींचीं घातलीं, व पलीकडील कसबे बेलवडी व उडकिरें दोनी ठाणीं बसविलीं आहेत. देसाई याचा जमाव संगोली, व शिगेंहली व देगाव मिलोन पांच सा हजार आहे. इकडे पर्जन्याचे दिवस जवल आले. ठाणीं बसविलीं आहेत; परंतु गांवगनाच्या रयता परागंदा होऊन, गुरें दाणा चीजवस्तसुद्धां सरकार तालुक्यांत जाऊन राहिलीं आहे(त). तेव्हां देसाई याचा बंदोबस्त जाहाल्याशिवाय रयतेस भरवसा पुरोन पुढील लावणी होणें कठिण

दिसतें. आम्ही निकड केली तर देसाई झाडींत जाईल; मुलकाची वस्ती फौजें नसल्यास होऊं देणार नाहीं. तेव्हां देसाई यास पोटाची बेगमी व काटक लोकांच्या पहिल्या जमिनी चालत आहेत त्यांची चौकशी करून, वाजबी द्यावयाच्या असतील त्या देऊन, काटक व देसाई यांजपासून बदफैलीविशी जामीन पक्का घ्यावा, तेव्हां परिणाम लागेल. मुलकाची लावणी होऊन, सरकारकिफाइतहि अमल चांगला करणार असला तर होईल असें वाटतें. कोणताहि प्रकार निश्चयांत येतो ऐसें दृष्टीस पडल्यावर स्वामीस विनंती लिहीन. सावनुराकडे कोणी गृहस्थ आहे, त्याणें आजच पत्र पाठविलें आहे कीं धोंडजी वाघ फौजसुद्धां कितुरकरांस येऊन मिळणार अशी बातमी पक्कीच लिहिली आहे. आम्ही हुषारीनेंच आहों. देसाई व काटकाचे बंदोबस्ताचा लिहावयाचा मजकूर, कारण पर्जन्य समीप आला, तो झाडींत गेला असतां फौजेचा उपाय पर्जन्य काळी चालणार नाहीं; व रयेत आहे ती त्याचे लक्षाचे, मुलकाची लावणी होणार नाहीं, याजकरिता लिहिलें आहे. राजश्री भिमाजी बाबूराव तिकडे गेले आहेत; आल्या-नंतर मागाहून विनंती लिहितों. आज्ञा होईल त्याप्रमाणें करीन. इकडील आढलला मजकूर स्वामीस समजावा याजकरितां विनंती लिहिली आहे. आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक करीन. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Mahadaji Anant reports the disturbed condition of the Taluka of Kittur.*

No. 25] *[June 1800*

श्री

पुरवणी सेवेसी माहादाजी अनंत साष्टांग नमस्कार विज्ञापना. राजश्री सखोजी काटे व आनंदराव बाबर व राजश्री धोंडो बल्लाळ गोखले याणी काटकाचे पहिले लढाईत, व बेलवंडीस रात्रीस राहून, दुसरे दिवशीं हल्ला करावयास व कितुराजवळ काल लढाई जाली यांत शिपायगिरीची बशर्त केली ती काय लिहों? स्वामीचे समक्ष अशीं कामें जाहालीं असतीं तर त्यांत बहुत उपयोग पडता. असो, त्याची पराकाष्टा जाली आहे, यास्तव स्वामीचें दर्शन जाहालियावर विनंती करावयाची ती करीन व संगोलीजवल लढाई जाहाली तेव्हां विनंती लिहिली आहे, ध्यानास येईल. सारांश, ही चाकरी स्वामीचे रुबरू जाहाली असती तरी ठीकच जाहलें असतें. चाकरीविशी सालमजकुरीं शर्तच केली आहे. तपशील लिहितां फारच होतो. दर्शन जाहालियावर समक्ष विनंती करीन. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadaji Anant reports the courage and valour of Dhondo Ballal Gokhale and Anandrao Babar to the Peshwa.*

No. 26] [*June 1800*

श्री

पुरवणी सेवेसी माहादाजी अनंत साष्टांग नमस्कार विज्ञापना. राजश्री धोंडो बल्लाळ गोखले बदामीचे स्वारीस मजबराबर होते. आलीकडे राजश्री परशरामपंत भाऊचे स्वारीबराबर होते; परंतु इतकी शिपाईगिरीची शर्त आजपर्यंत कळली नव्हती. सर्वांबरोबर लिहिलेंच आहे; परंतु लढाईविशी मोठी जुवामर्दी. सरकार लक्ष बहुत मोठ्या कामांत असावें. सरदारी योग्य सरकार दौलतींत बहुत उपयोगी अशी खातरजमा आहे. समक्ष निराळी विनंती करीन. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Mahadaji Anant recommends Dhondo Ballal Gokhale to the notice of Bajirao.*

No. 27] [*1800*

मसुदा

श्री

यादी अपराधी

१ श्रीमंत कैलासवासी भाऊसाहेब स्वारीस निघाले. गारपिरावर कचेरीचे डेऱ्यांत बसले होते. दीप लावावयाचे समयास मुसाफरजंग गाड्याचा जमातदार जवळ बसला होता. डेऱ्यांत कोणी नाहीं असा समय पाहून भाऊसाहेबांवर कटार चालविली ती कुसीस लागली. भाऊसाहेबानी कटारेचा हात धरिला. पुढें त्यास ठार मारला.

३ श्रीमंत कैलासवासी नारायेणरावसाहेब यांस मारावयाचें प्रकर्णांत होते, त्यांचीं पारपत्यें :—

२ सुमेरसिंग व खरगसिंग पळून गेले होते ते स्वारींत हरिपंत फडके यास सांपडले. त्यांणीं ठार मारलें.

१ तुळाजी पवार पळून गेला होता, तो पाण्यांत गलबतांत धुलपानीं धरून पुण्यास पाठविला. त्याचें पारिपत्य केलें. तपशील

१ हातांस काकडे बांधून तेल घालून आग लाविली. मणगटांपर्यंत हात जळाले.

१ पायांस नालबंदी केली.

१ आंगास सुया दाभण टोंचून मिठाचें पाणी घालून रोज मार मारावा, याप्रमाणें करीत असत.

१ सेवटीं हतीचे पायास बांधून शहरांत फिरऊन कातरजेचे मार्गावर मुर्दा टांगून ठेविला होता.

—
४

—
३

२ तोतयाप्रकर्णी पारपत्यें

१ ऐन तोतया याणें दरोबस्त कोकणपटीचे किले घेऊन सिंहीगडपर्यंत आला. सिंहीगडचा किला घेतला. पुढें माहादजी शिंदे देशीं होते त्यांणीं स्वारी करून सिंहीगड घेऊन त्यास धरून पुण्यास आणिला. त्याची चौकशी पुरातन वृद्ध मुच्छदी वगैरे लोक भाऊसाहेबांजवळ राहाणार त्यांस पाठऊन केली. खोटा असें ठरल्यावर त्यास मेकसू खालीं मारला.

१ तोतयाजवळ दौलतगीर गोसावी होता, त्यास हतीचे पायीं बांधून मारला.

—
२

कारकीर्द थोरले रावसाहेब.

४ श्रीमंत कैलासवासी माधवरावसाहेब याचे कारकिर्दीत पारपत्यें केलीं :—

१ गंगोबा तात्या दिवाण निसबत होलकर यांणी रावसाहेबांस थेऊरचे मुकामीं श्रीगणपतीच्या दुर्वा उचलून दिल्ह्या कीं होळकर यास दादासाहेब यांजकडे जाऊं देत नाहीं. अशा शपता होऊन होळकर यांस घेऊन दादासाहेबांकडे गेला. पुढें दादासाहेबाचा मोड करून पुण्यास घेऊन आले; नंतर गंगोबा तात्यास धरून आणून वाड्यांत छड्यांनीं मारला. ब्राम्हण ठार मारूं नये याजकरितां किल्यावर ठेविला.

कारकीर्द थोरले रावसाहेब

१ मुरारराव जाधव मुइंजकर संपत टाकून गोसावी होऊन फिरत होता. पुढें त्याचें नांव करून कोणी येक आला, त्यास कैद करून ठेविला होता. पुढें खरा मुरारराव फिरत फिरत, त्यास बातमी कलली कीं आपलें नांव करून, खोटा तोतया होऊन कोणी पुण्यास गेला आहे म्हणोन तोच आला. त्यास सर्वांनी वळखिला. नंतर यास ठार मारिला.

7003

१ तळेगांवकर सिकलगार मुसलमान ब्राम्हणाची बायको घरांत घातली, त्यास धरून आणून हत्तीचे पायीं बांधून ठार मारला. बायकोस मारूं नये असें आहे म्हणोन तिजला किल्यावर टाकिली.

१ मानसिंग खलाटा सरकारचा पाग्या याणें कोणी येका कुणब्याची बायको घरांत घातली. तिचे नवऱ्यास मारून मुर्दा घरांत पुरला. ही बातमी सरकारांत कळल्यावर त्याची पागा काढून त्यास किल्या-वर टाकिला. तिचें नांक कान कापिले.

१ पटवेगार वाड्यांतील याणें श्रीमंतांचे कंठींतील मोत्यें चोरून मोबदला मोत्यें कंठींत घातलीं. हें वर्तमान सरकारांत कळतांच त्याचे आंगीं मुदा शाबूद करून हत्तीचे पायांशीं बांधला.

१ घाशीराम कोतवाल याणें श्रावणमासची दक्षणा घेऊन ब्राह्मण तैलंग देशास जात होते, त्यांस आणून आपले पेठेंत चावडीचे कोठडींत कोंडून टाकिले. येक दिवस होते. ते आंत ओरडूं लागले. त्यावांटेनें मानाजी फांकडे जात होते, त्यांणीं तें ऐकिलें. नंतर पालखींतून उतरून हातांतील तरवारेनें कोठडीचें कुलूप तोडून, ब्राम्हण बाहेर काढिले. दाहांपांच मेले, दाहावीस जिवंत होते. त्यांस साखरपाणी पाजून वारा घातल्यावर ते वांचले. नंतर तसाच वाड्यांत येऊन, जाला मजकूर श्रीमंतांचे कानावर घातला. गांवांतील ब्राह्मणांस वर्तमान कळल्यावर तैलंग ब्राह्मण तेथें जाऊन ब्राह्मण वळखिले. सायंकाळीं नानाचे वाड्यापाशीं ब्राह्मण जमा जाले आणि वाड्यावर दगड मारूं लागले. नानांनी दाजीबा फडके यास व भास्करपंत कानिटकर यांस पाठऊन ब्राह्मणांपाशीं घाशीरामाचे पारपत्याचा ठराव केला. च्यार घटका रात्रीस घाशीरामास हत्तीवर बांधून रमण्यांत ठेविला. दुसरे दिवशीं तो जिवंत आहे असें कळल्यानंतर ब्राह्मण सरकारचे वाड्यांपाशीं दोन हजार जमा जाले. श्रीमंत उपाशी ब्राह्मणांकरितां बसले. मग घाशीरामास रमण्यांतून अणून चावडीवर पाट काढून उंटावर बसऊन शहरांत फिरविला. गुलटेकडीस नेऊन ब्राह्मणाचे हवालीं केला, त्यांणीं दगडांखालीं ठार मारिला.

१ बाजीरावसाहेब यांचे कारकिर्दीत बाजीपंत मराठे गाडद्यांकडील याचे सदाशिवपंत दत्तपुत्र याणें आपले आईस ठार मारून घरांत पुरून टाकिली; आणि आपणच बाळजीपंत गोखले यांचें घरीं जाऊन

फिर्याद केली कीं दोन दिवस तिचें ठिकाण लागत नाहीं. इतक्यांत घरांतील माणसांस घाण येऊं लागली. बोभाट जाल्यावर त्यास धरून आणिला. चौकशी करितां त्याचे अंगीं मुदा लागला, पुढें त्यास किल्यावर घातला.

१ अंदुखान याणें कर्नाटकप्रांतीं काटकाई करून बंडे करीत होता, त्यास धरून आणून तोफेचें तोंडीं दिल्हा.

१ गुलाम कादर व इस्माल बेग यांणीं दिलीपति पातशाहा याचे डोळ्यांत सळया फिरविल्या. नंतर फौज धरून राजेरजवाडे यांस सामील करून चमेलीपर्यंत अंमल बसविला. पुढें सरकारांतून अली बहादर यांस पाठऊन शिंदे व ते येकत्र होऊन गुलाम कादर यास अलीबाहादर यांणीं धरिला, आणि शिंदे यांचे स्वाधीन केला; त्यांणीं ठार मारिला. नंतर पुढें अली इस्माल बेग याच्या लढाया जाल्या. त्यांस शिंद्यांनींच धरून आणून मारला.

¶*This paper enumerates several offenders who were punished, during the regimes of the last four Peshwas, and describes the savage punishments inflicted on them. The prominent amongst them are Mujfarkhan, Sumersing, Khargsing, Tula Pawar, the Pretender of Bhausaheb, Gangoba Tatya Chandrachud, Ghashiram Kotwal, Gulam Kadar and Ismail Beg.*

No. 28] [*9-3-1801 ?*

श्री

सेवेसी बाळाजी सदासिव वैशंपायन कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ २३ सवालपावेतो मुाा लस्कर नजीक किले कोरगिड येथे सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. हाजी अहंमद आरब रूपरामाचे दिमत जमातदार आरबाचा आहे. त्याचे आमचे बोलणे आज एक मही जाहले होते. त्यास जेव्हां त्याचे डावांत गोष्ट आली तेव्हां त्याणे वरील आरबास बोलाऊन त्याचे याचे बोलणे छ १३ सवाली जाहाले, ते प्रमाण असी त्यांची खातरजमा जाहाली. यांवर त्याचे आमचे फिरोन बोलणे जाहालें. तेव्हां पके संधान आहे असे वाटले, म्हणोन छ २१ सवालीचे पत्री विनंती सविस्तर लिहिली. त्यास तेरावे सवाली ते आरब वर जाऊन आपले भाईबंदात विचार केला कीं आपले जातीचा जमातदार म्हणोन त्याणें आमचे कल्याणाची गोष्ट आम्हांस सांगितली ती खरी. पृथ्वीपतीसी भांडून आपला परिणाम लागत नाहीं असा त्याणी आपले जागीं निश्चय ठरऊन, रास्ते वर आहेत त्यास येविसी साफ सांगितले कीं आम्ही तुम्हाबरोबर सरकारासीं कोठवर भांडावें? यांत आमचा परिणाम लागत नाहीं म्हणोन आम्ही

१ जिऊबाई नाना फडणिसाची बायको इचा भाऊ.

आपले बोलणं श्रीमंताकडे लाविले. आम्ही खालीं जातो असा वरील आरबांचा निश्चय आज आठ दिवस ठरला असे रास्ते यांस जेव्हां समजलें, तेव्हां सर्वांचा धीर सहज तुटला. दरकदार व रास्ते मुलेसुधा सारीच गलबली. ज्या आरबाचे आश्रयानें आजपर्यंत हिमत बांधिली होती तेच जेव्हां परभारें समजतात असे जेव्हां जाहालें, तेव्हां त्यांची स्वामीचे पुन्यप्रतापेकरून कमरच बसली. त्यास जर आरब परभारे समजले तर हे आमचे चाकर असता आमचे मुसक्या बांधून आम्हास खावंदाचे हवाली करितात, त्यापक्षीं आपले बोलण्याची जर सुस्ती करावी तर हे आरब आपल्ये तलबेची तलब घेऊन, आम्हांस खाली नेऊन बाळाजीपंत पटवर्धन याचे हवाली करितात याचा संदेहे राहिला नाहीं. तेव्हां मग आपले बोलणे चालणार नाहीं. याजकरितां तुम्ही आमचे चाकर, तुमचे जिवाचा बचाव जाहला पा। म्हणोन तुम्ही खावंदासी संधान लाविले. त्यास आतां असे करूं नका. आम्हीच बोलणे लावितो. आमचे बंदोबस्ताचा दारमदार ठरल्यावर यांत तुमचा बंदोबस्त सहजच जाहला. आम्हीच खाली बोलणे लावितों. असा आरबांचा व त्यांचा विचार ठरला. बोलावयासी खाली कारकून येताहे. हाजी अहंमदाने काल मला येऊन सांगितलें की च्यार रुपये बाळाजीपंतास दरबारखर्च अधिक उणा द्यावा; आणि सरकारातही च्यार रु॥ कबूल करावे. एक दुसरा किला द्यावा आणि आपले दौलतीचा बंदोबस्त करून घ्यावा. या बोलण्यास कारकून येता त्याप्रमाणें आज च्यार घटका दिवसास मी खाली येतो. तोफा बंद कराव्या. असें गोविंदपंत पानशाने वरून गोसावीबावाचे मोर्च्यात हाक मारून सांगितल्यावर गोसावी याणी दादाकडे निरोप पाठविला. याणी त्यास घेऊन येणे असी परवानगी जाऊन तो प्रहर दिवसाचे सुमारें रेड्यात (डेऱ्यात) आला. दादाचे भोजन होऊन आडचा प्रहराचे सुमारे तो वर गेला. याप्रमाणे वर्तमान जाहाले. त्यास कालचे विनंतीत तीन चिठ्या याव्या म्हणोन लि॥ आहे त्याप्रो॥ तर जलद याव्या. जसा प्रसंग पडेल तसे करावयास येईल. येविसीं दादानी विनंती त्याचे आमचे बोलणे काय जाहले असेल त्याविसी त्याणी लि॥च असेल. तेही ध्यानात आणून जसी मर्जी असेल तसी आज्ञा व्हावी. कदाचित मागे याचे गोविंदपंताने एकवेळ भूलथाप दादास दिलीच आहे तसेच कांही संधान असल्यास ते चिठ्याचे संधान मजपासी पाहिजे, याजकरितां विनंती लि॥ आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. बोलावणे आले याजवर केवळ जाण्यांचे नाहीं. गोपाळपंत वाघाची रवानगी सत्वर व्हावी हे विज्ञापना.

¶*Report of a scuffle at Korigad, between the Arabs of Nana Fadnis and the Peshwa's forces and of the negotiations that followed about their release is sent by Balaji Sadashiv Vaishampayan.*

7006

No. 29] [30-6-1801

श्री

सेवेसी गोदजी ससाणा जासूद सा दंडवत विज्ञापना. ता छ १८ सफर मंगलवार मुा कोरेगांव वर्तमान येथास्थित असे विशेष. हिकडील वर्तमान रा सखाराम घाटगे व आपा लिंपाणकर व इंग्रज वकील संगमावरील या तिघा जणाची मसलत येक प्रहर जाहाली. नंतर संगमवाले पुण्याकडे गेले. येथें जमाव भारी पडणार असे दिसत आहे. पूर्वेकडून फौज दाहा हजार येणार ऐसे बोलत आहे. जमाव करून पुण्याकडे चढाई करून जाणार ऐसे वदंता आहे. चौकडे कह्या कडबा भरून आणितात व घरात सिरून वैरणी काढितात. रा पुरंधरे याजकडील सिलेदार त्याचे आडनाव काटकर रोजगारास आले आहेत त्याची हजिरी होणार या प्राा वर्तमान आहे. सेवेसी शृत होय हे विज्ञापना.

¶*The news of common consultation of the Ghatge, Nipanikar and the English Resident and also of mobilising of troops is reported in this letter by a certain Jassood.*

No. 30] [17-6-1801

श्रीम्हाळसाकांत

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे शेवेसी

विनंति शेवक येशवंतराव होळकर कृतानेक दंडवत विज्ञापना. येथलि क्षेम ता जेष्ठ शुा ६ पर्यंत स्वामीचे कृपोकटाक्षेकरून यथास्थित असे विशेष. इकडून विनंतिपत्रे वरचेवर पाठवितो, परंतु उतराची आज्ञा होत नाही याजमुले चित सापेक्षित असे. तरी स्वामीनी कृपा करून पत्रोत्तराची आज्ञा केली पाहिजे. तीर्थस्वरूप विठलराव होळकर यानी स्वामीची आज्ञा न घेता श्रीपंढरपुराकडे जाऊन क्षेत्रास उपसर्ग दिल्यामुळे इतराजी होऊन प्रकार घडला तो समजला. त्यास देवाची जागा, तेथे उपद्रव दिल्हा तेव्हा श्रीचे इच्छेने घडले, त्यास उपाय काय? तथापि स्वामीचे हाते जे घडेल ते शेवक लोकास श्रेयस्करच आहे. आमचे लक्ष कैलासवासी वडिलानी शेवा केली त्याप्रोाच जपून शेवा करून दाखवावी हेच आहे. कदाचित आम्हापासोन कोठे काही अधिक उणे दिसोन

आल्यास आज्ञापत्री सूचना करून मार्गास लाऊन लोभ करून शेवा घ्यावी हेच विहित. वडिलानी येकनिष्टपणे चाकरी केली आणि पूर्वीपासून लोभ संपादन केला त्याप्राो आम्हीहि चाकरीची उमेद धरून आहो. तेव्हा स्वामीचेहि मनांत ईश्वर प्रेरणा करून लोभच करितील. तीर्थस्वरूप रा कासीराव बाबा स्वामीची आज्ञा घेऊन इकडे येतात. आम्हास वडिलांचे ठिकाणी तेच आहेत. पूर्वीपासून त्यांचा लोभ आमचे ठाई व आमचीहि निष्टा त्यांचे ठिकाणी अंत:कर्णपूर्वक आहे. सर्वानी येकदिल राहून स्वामीशेवेव्यतिरिक्त दुसरा अर्थ किमपि नाही. इकडील संशय कोणेविसी तिलप्राय मनांत न आणिता लोभयुक्त उतराची आज्ञा होऊन उमेदीने चाकरी घडे ते करणार स्वाम समर्थ आहेत. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Yashwantrao Holkar writes to the Peshwa expressing his regret at the fate suffered by his brother Vithoji Holkar for the ravages he committed at Pandharpur. As for himself, he adds, he is always ready to obey the Peshwa's commands.*

No. 31] [*23-7-1801*

श्री

शेवेसी राघो बलाल काादार किले कुकरमुंढे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ ११ रोावल पावेतो शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. येशवंतराव होलकर व सिंदे यांची लढाई हांड्याचे घाटानजीक जाहली. आज तेरावा दिवस आहे. तरवारेसी तरवारी भिडोन मातबर लढाई जाली. बहुत मनुष्य उभय दळचे पडले; परंतु मोड कोणाचा जाहला नाहीं, म्हणोन वर्तमान ऐकिण्यांत आहे. स्वामीकडे डाकेबराबर लिहिले गेलेच असेल. इकडे होलकराकडील बारगळ म्हणोन सरंजामी आहेत, त्यांजकडे तळोदे कुकरमुंढ्यानजीक अडीच कोसावर आहे, तेथें बागस (बंगस ?) सिलेदार होळकराकडील नंदुरबार सुलतानपूरचे बंदोबस्ताकरितां आला आहे. बराबर दोन अडीच हजार फौज आहे. त्याणे शह देऊन गावची गुरे वळून नेली; व आणखी खंडणीचा तगादा लाविला आहे. एक दोन लढाया जाहल्या. बागस याची दृष्ट वाकडी दिसते. बनल्यास तळोदे हस्तगत करावें या विचारांत आहे. ते सिधीस गेले तरी किल्याकडे पाहणार म्हणोन वर्तमान आहे. त्यास त्याचे आचरणावरून पाहतां वास्तविकच दिसतें. सबब जाजती सिबंदी ठेऊन मजबुदी केली आहे, व दारूगोळी खरेदी करून ठेविली आहे. उलबाण एक गेले तर एक उभे राहते,

यामुळें सिबंदी वगैरे खर्च जाजती करणे प्राप्त आहे. कारण की सरकारचा नक्ष राहिला पाहिजे. स्वामीस श्रुत व्हावें म्हणोन विनंती लिा आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Ragho Ballal, Kamavisdar, Kukarmundha, reports to the Peshwa the severely contested battle of Handia between Yashwantrao Holkar and Sindia.*

No. 32] [*26-8-1801*

श्री

श्रीमंत राजश्री दादा
स्वामींचे शेवसी

विनंती सेवक बाळाजी बापूजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा श्रावण वाा ३ पावेतो मुाा महेश्वर आपले कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. आपण आषाढ वद्य तृतीयेचें पत्र पाठविलें तें पावलें. गुाा ची वहिवाट व रसदेचा ऐवज लवकर पाठवावा म्हणोन आज्ञा. त्यास इकडील वर्तमान तर श्रीमंत राजश्री कासीराव बाळा नागपंचमीस महेश्वरी गडावर दाखल जाले. आपले महालावर पांच हजाराचा रोखा घासदाण्याचा केला. स्वार प्यादे पाठऊन दंगा बहुत केला. तीन साडेतीनपावेतो निदान आम्ही बोलतों. ऐकत नाहीं. मोठे मिनतीने साडेतीन ठरावेसे केले आहे. राजश्री यशवंतराव होळकर पनास हजार फौजेनिसी सत्वासचे घाटाचे रोखानें सिंदे याजवर दबाव घालून आहेत. सरजेराव घाटगे बऱ्हाणपुरास दाखल जाले. सिंद्याकडील पेंढारी पांच सात हजार नर्मदा उतरून बढवेनजीक ओंकारेश्वराकडे आले. त्याचे पाठीवर दहा हजार फौज आहे. महेश्वराकडे रूख आहे; कासीराव बाळा जवळ पांच हजार फौज चांगली आहे. पेंढार उतरल्यामुळें महालचे लोक भयाभीत होऊन कितेक परागंदा जाले. ईश्वरे काय नेमले आहे कळत नाहीं. आपण ऐवजाविसीं निकडीने लिा. ऐवज तरतूद करून दोन तीन हजार पाठविणार होतो, तो होळकर यांस घासदाण्यामुळें अडचण पडली; व पेंढारी दहापंधरा कोसी आले. येणेकरून साहुकार वगैरे परम भयाभीत आहेत. मासपक्षात स्वस्थता आपले आशीर्वादेंकरून जाली, म्हणजे दिवाळीपावेतो थोडाबहुत ऐवजाची तरतूद करून पाठवितों. पेशजी रामकर्ण बोथरा याजवर पांचहजाराची हुंडी पाठविली होती. श्रीमंतास विनंती करून हा ऐवज उगवल्यास साहुकार आपले उपयोगी फार पडेल. या कार्यास पांच च्यारशे रुा दरबारखर्च पडल्यास करून, श्रीमंतास सख्त रदबदली करून ऐवज वसुलात येई तो अर्थ करावा. महालची

7009

वहिवाट आठ च्यार दिवसीं रवाना करीन. इकडील वृत श्रीमंतास व कारभारी यांस कळऊन जेणेकरून परिणाम आपला लागे तो तो विच्यार पहावा. वहिवाट आपल्याजवळ पावल्यावर फाजीलहि समजेल. तीा राजश्री शेषरावजाच्या गळ्यास गल्याढा जाला, तेणे करून दोनमास फार हैराण जाले. फोड फुटला; आतां किंचित आराम आहे. सेवेसी कळावें. बहुत काय लिहिणे, लोभ असो दिल्हा पाहिजे. हे विज्ञापना.

¶*This is another letter about the clash of arms between Sindia and Holkar. Yashwantrao Holkar with an army of fifty-thousand is reported to be hovering about the pass of Satvas. The Pindaris of Sindia and Holkar are ravaging the country, says the writer.*

No. 33] [*16-9-1802*

श्री

रा। बालोजी कुंजर गोसावी यांसीं

आसीर्वाद उपर तुम्ही पत्र पो। ते पावले. होलकर याजकडील माहल तूर्त जप्त केले यात तूर्त सिंद्याचा संतोष होईल. पुढे सोडणे जाहले तर पंधरा लक्षाचा सरंजाम सरकारात घेऊन मग सोडून देऊ म्हणोन लिहिले; त्यास उतम आहे असेच करावे. होलकर याजकडील माहालाची दाहावीस पंचवीस कोसाची आपण जप्ती करावी म्हणोन विनंती लिहिली होती, त्याप्रो। करतात किंवा मीच करू, जसी आज्ञा होईल तसे करीन म्हणोन लिहिले, त्यास दाहावीस पचवीस कोसी होलकर याजकडील माहालाची जप्ती करणे म्हणोन तुम्ही लिहिल्याप्रमाणे रा। नाना पुरंधरे यास आज्ञा केली. त्याणी आज्ञेप्रो। मान्य केले; परंतु नानानी मान्य केले या भरवशावर तुम्ही न जाता इकडेहि जितके होलकराचे माहाल असतील तितक्यावर जप्त्या पाठऊन जप्त्या करणें. ज्या महाली नानानी जप्ती करविली असेल असे पके पाहून त्या माहाली मात्र न करणे. नानानी जप्ती केली नसेल तेथील करणे. विलंब न करणे. जाणिजे छ १८ जमादिलवल हे आसीर्वाद.+

¶*Bajirao Raghunath orders Baloji Kunjar to attach all the lands belonging to Holkar.*

+ वरील सबंध पत्र बाजीराव रघुनाथ याचे हातचें आहे.

No. 34] [26-9-1802?

श्रीराजराजेश्वर

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नारायेण रावजी स्वामी
गोसावी यासी

पो लक्ष्मणराव गोविंद दंडवत विनंती उपरी (येथील) कुशल ता छ २८ जमादिलोवलपेर्यंत मुा नजीक * * * येथास्तित जाणून स्वकीय कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. तुम्ही बहुता दिवसी पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ मजकूर ध्यानास आला. ऐसेच निरंतर * * * * (प)त्री परामृष करावयासी अविस्मर असावे. यानंतर इकडील वर्तमान तरी राजश्री येशवंतराव होलकर फौजेसुधा खांदेश प्रांतांत नारोशंकर यांचे मालेगावावरी मुकाम क * * * हेत. त्याजकडील पठाण माने वगैरे अलीकड येऊन गंगथडी प्रांतात धामधूम मांडली आहे. त्यास येथोन सरकारातून बंदोब * * * न वकील पाठवावयाची त्याजकडस योजना करितात * * * * व्ही अद्यापि निश्चयात आला नाही. मग काये घ * * * * * ते खरे; परंतु होलकर मजकूर याजकडील लोकानी फारच * * * * आहे. त्याचे निवारण जाहालियासिवाय ठीक घडणार * * बंदोबस्त जालियावरी दुसरी मसलत होणे ते होईल. याजक(रि)ता ही मसलत येथास्थित होऊन यावी बहु * * * *

¶*Lakshmanrao Govind reports the disturbances created by Yashwantrao Holkar and his armies and their arrival in the province of Naro Shankar near Malegaon.*

No. 35] [7-2-1803

छ १४ सवाल माघ मास
सन आर्बा मया तैन रा
सदाशिव माणकेश्वर सनद लिहिणे.

श्री

समुद्रांत फरासीसी जहाजासी व इंग्रजी जहाजांशी लढाई होऊन फरासीसी जहाज इंग्रजानी शिकस्त करून मुंबईस भरून आणिले; त्याचा झाडा घेता तीन सरदार फरासीसी संगमेश्वराचे बंदरी उतरून खुषकीवर आले आहेत, ते सरकारात आणवावे म्हणोन खुषरोजी मोदी दिा इंग्रज याणी विदित केले. त्यावरून हे पत्र सादर केले असे. तरी बंदर मजकुरी तीन असामी फरासीस उतरले असल्यास

याची चौकशी करून तेथे असलिया समागमे तुम्ही आपली पंचवीस माणसे देऊन वाटेत चौकी पाहाऱ्याचा बंदोबस्त करून हुजूर पोहाचाऊन देणें. तेथून निघोन गेले असलीया कोणीकडे गेले याचा पत्ता लागेल तेथवर लाऊन, सरकारात विनंतीपत्र लिहिणे म्हणोन संगमेश्वरचे कमाविसदाराचे नावे. पत्र १

सदरहूप्रमाणे खुषरोजी मोदी दिा इंग्रज कलकत्तेकर याणी हुजूर विदित केले त्याजवरून हे पत्र सादर केले असे. तरी फरासीसाकडील तीन असामी बंदर संगमेश्वर ताो रत्नागिरि येथे उतरले असिल्यास याची तुम्ही वाजबी चौकशी करून तीन असामी तेथे असल्यास बंदोबस्ताने हुजूर पोहोचाऊन देणे. तेथून निघोन गेले असल्यास कोणीकडे गेले याचा पत्ता लागेल तेथवर लाऊन हुजूर विनंती पत्र लिहिणे, म्हणून मामलेदार तालुके माार यास पत्र. रुजू सनद देणें.

¶*Mamlatdar of Sangameshwar is ordered to send to Poona under proper escort the three French Officers who were taken prisoners by the English and who had escaped to Sangameshwar.*

No. 36] [11-12-1803

नकल

सिका

श्री

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाजीराव पंडित प्रधान ताा खुसरवजी वलद जमसेदजी पारसी वस्ती कसबे खंबाईत पाो मजकूर तालुके अमदाबाद सुाा आर्बा मयातेन व अलफ शके १७२५ रुधिरोद्गारी नाम संवत्छरे. तुम्ही सरकारकामाचे उपयोगी सबब तुम्हास कुटुंबाचे बेगमीस मौजे वलीपूर पाा जंबूसर प्रांा गुजराथ हा गांव नूतन इनाम द्यावयाविसी सन इसने मयातैनात सनदा लिहिल्या होत्या. परंतु गांव तुमचे सोईचा नाहीं. याजकरिता सरकारात येऊन साल मजकुरी मौजे * * * * ताा लाटाणे पाो पेटलाद ताो अमदाबाद हा गांव सात हजार रुपयाचे बेरजेचा त्यापैकी निमे अमल सरकारात व निमे दादाभाई अमील याजकडे चालत आहे त्यासुधा तुम्हास कुटुंबाचे बेगमीस खेरीज हकदार व इनामदार करून नूतन इनाम सरकारातून करून दिल्हा असे. तरी मौजे मजकूर हा गांव तुम्ही दुमाला करून घेऊन तुम्ही व तुमचे पुस्त दरपुस्त वशपरंपरेने इनाम अनभऊन सुखरूप राहाणे. जाणिजे छ २६ साबान आज्ञा प्रमाण मोर्तब.

¶*Bajirao II grants an inam village to Khusru Jamshetji of Cambay for his loyal services.*

No. 37] [13-1-1804?

नकल

श्री

विनंती विशेष. माघ शुा १ कुंभेरीनजीक इंग्रजाची व होलकराची लढाई जाली. त्यास इंग्रेज सिकस्त होऊन काही पाच सात पलटणे मारली गेली. बाकीची पळून गेली. नंतर माघ शुा १० पुन्हा पलटणे जमून भरतपुरास जाऊन माहसरा केला. होलकर व जाट येकत्र होऊन लढाई मारून पलटणे गारत केली. काही जखमी होऊन जिकडील तिकडे पळून गेली. तिवे सरदार इंग्रजाकडील पाडाव जाले; घोडी, उंटे, तटे वगैरे समग्र लुटले. लढाईसमई इंग्रजाचे लस्करात सोळा रुपये शेर पीठ जाले होते. बहुत नाश जाहाला. पलटणे याउपरी तिकडे राहिली नाही. सिंद्यानी कूच करून तिकडे जात असता हरजी होळकर वीस हजार फौजेनिसी सिंद्यास सामील जाहाला; व सिंद्यास होळकरानी लिहिले कीं तुम्ही हिकडे येऊ नये. उज्यनीकडे जावे. आम्हीहि लौकरच महेश्वरास येतो, म्हणजे भेटी होतील. इकडील जळाची समग्र पराभव केला. काही पलटणे राहिली नाहीत. त्याजवरून सिंद्यानी सागराहून कूच करून सुरज भेलशानजीक आले. उज्यनीस येऊन बराणपुरास येतात म्हणोन नागपुराहून नारायणराव वैद्य याजकडील श्रीमंतास पत्रे आली; त्याजवरून येथील अधिकारी याणी नेम ठरविला की, वाईस जाऊन माहाडाहून घोडबंदरास जाऊन राहावे असी तजवीज केली आहे. संवत्सर प्रतिपदा अथवा द्वितीयेस जाणार. उंटे चराईस होती ती आणविली आहेत म्हणौन यैकिले. इंग्रेजाकडील वकिलासहि समागमे घेऊन जाणार म्हणौन ऐकिले. व सिंद्याचे लस्करची पत्रे आली त्यात मजकूर की इकडील पलटणे काही होलकरानी राहू दिल्ही नाहीत. मसलहत अखेर जाल्या याप्रो दिसत आहे म्हणौन लिा आहे. वैद्यानी लिहिले आहे की, जळाकडील बोलणार येऊन कलमबंदी ठराविली आहे. त्यात कर्नाटकचे कलमाची भानगड पडली आहे. सुलतान याची चीजवस्त वगैरे व वसूल आजपर्यंत व खंडणीचा ऐवज मागो नये. यात ठराव जाहला म्हणजे जिकडील तिकडे जातील म्हणौन लिहिले आहे असे ऐकिले. याहून विशेष नाही. लोभ कीजे हे विज्ञापना.

¶*The writer gives an account of the battle of Bharatpur between the English and Holkar and the Jats combined and adds that the English suffered heavily in the contest.*

No. 38] *[24-4-1804*

नकल

श्री

विनती जे. होळकरानी जळांचा समग्र फडच्या केला. मागील लढाई भरतपुरसमीप जाली म्हणौन आपल्यास सूचना पूर्वी लिहिण्यात आली होतीच. त्यात तीन सरदार मातबर सापडले तेव्हां तह ठरला. दोन सवस्थानापौ येक स्थळ द्यावे असे ठरले. नंतर सिंद्यास पत्र पा। की पत्र पावतेक्षणी सडे होऊन यावे. त्याजवरून सिंदे राघोगडानजीक लस्कर ठेऊन सडे पाच च्यार हजार फौजेनिसी स्वार होऊन दरकूच होळकराचे भेटीस मथुरेनजीक गेल्याची पत्रे आली. इकडे पेंढार व जोत्याजी माने रवाना जाहाले आहेत हे खचित, काही येक तथा नाही. छ १० मोहरमी श्रीमंताकडे अस्तमानी इंग्रेज आले होते. वाईस तूर्त जाऊ नये, यशोदाबाईस तेथून आणावे म्हणौन आग्रह पडला तेव्हा केलंज्यास आणितो असे ठरले. बराणपुराकडील पलटणे नगरास आली. नवाबाकडील फौज पलटणे हैदराबादेस महिपतरावसुद्धा चालले. विंचूरकर विंचुरास गेले. नगरचे किल्यातील सरंजाम समग्र बाहेर काढिला. तह जाला असे दिसते. साहुकारी पत्रे आली त्यात तह जाहला पत्रे करार करून आणावयासी पंधरा दिवसाचे मुदतीने कलकत्यास पाठविली आहेत. काल छ १२ मोहरमी येथे प्रहर रात्रपर्यंत विचार जाहाला. बहुत ग्लानि दिसोन आली. येकूण जळानी जळात राहावे, खुसकी समग्र सोडून द्यावी असे जाहालेसे दिसोन आले. चिंतामणराव मिरजकर सात आठ हजारानिसी जामखडी तालुक्यात गेले. फौज ठेवीत आहेत. सांप्रत विठल बाबाजी व लाडकोबा व मोरोपंत दातार वगैरे दोन तीन हजार जमले आहेत. करकंबपर्यंत त्याचे रोखे आले आहेत. येथील मंडळीस बहुत विचार पडला आहे म्हणौन ऐकिले. होळकर सिंदे छावणीस देशात येत आहेत. तथा राहिली नाही. येथून जे होईल त्याप्रो। आपल्यास कळेल. हे विज्ञापना. आवरंगावादचे वर्तमान आद्याप आले नाही, आणखी गेले आहेत. वर्तमान येताच सूचना करितो. हे विज्ञापना.

¶*News-letter communicating the reverses which the British sustained at the hands of Holkar near Bharatpur and the consequent sensation it produced in the Deccan.*

+ जलचरांचा.

No. 39] [20-6-1804

(नकल)

श्रीशंकर प्रो

चिरंजीव राजश्री कृष्णराव यासी खंडेराव नीलकंठ आसीर्वाद उपरी. येथील जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. मुंबईहून करनेल लोदनसाहेब इंग्रेज वसईच्या मार्गे सुरतेस जावयास वसई बंदरी उतरून जातील. त्यासी हरएकविसी दिकत न होता जात ते करावे. येविसीची श्रीमंताची आज्ञा जाहली आसे. याजवरून तुम्हास लिा आहे, तरी मारनिले इंग्रेज खोलंबा न होता जाऊ द्यावे. रा छ ११ रावल सुा खमस मया तैन व अलफ. बहुत काय लिहिणे हा आसीर्वाद.

¶Khanderao Nilkanth Rastia to Krishnarao communicating the Peshwa's instructions to give free passage to Col. Lodan in his journey from Bombay to Surat.

No. 40] [1804

श्री

यादी बाजीराव गोविंद बर्वे सुा खमस मयातैन व अलफ प्रांत कर्नाटक येथील कामकाज सरकारातून सांगितले.

१ फौजेचा सरंजाम.

१५००००० स्वार ५०००
१७६००० गाडदी २०००
६०००० तोफखाना दरमहा ५०००
१२०००० पागाचे स्वार २०० यो

१८५६०००
४४००० पीलखाना व उष्टरखाना वगैरे

१९०००००

८ यासी माहाल

२९७१५३॥≈ पाा गदक व बंकापूर दुमाले खेरीजकरून.

९५०९८२।।।= तालुके सावनूर माहाल १९ पैा वजा दुमालेकरून बाकी अमल.

7015

३००००० सरदेसकत मामले तोरगल
५६३०९॥≡ जुनी हुबळी
१८०८५०८≡ रास्ते याजपैकी पो अथणी व जत
व करजगी.
११४७०३॥– तालुके धारवाड व कितूर वगैरे
माहाल पैकी.

१९०००००

१ सरसुभा सरकारी माहाल कमाविसीचे आहेत
ते काम.

२

फौजेचा संरजाम व सरसुभा कर्नाटकचा सांगितला होता त्याप्रमाणे करून घ्यावयाचा.

¶*This is a detailed assignment of territory granted by the Peshwa to Bajirao Govind Barve for the maintenance of his contingents.*

No. 41] [*3-5-1808*

पौ वशाख वद्य ९ बुधवार
प्रात:काल च्यार घटका दिवस
सन समान मयातैन

श्री

राजश्री गोविंदपंत भट व
तात्या आभेकर स्वामीचे सेवेसी

पो पांडुरंग रामचंद्र सां नमस्कार विनंती विशेष. आम्ही पुणियांहून निघालों ते वैशाख शुध ८ मंगळवारी च्यार घटका आस्तमानचे दिवसी पावलो. आम्ही सिवपुरी येताच चिरंजीव रो हरिपंत भाऊचे पत्र वाईहून आले. त्यात लिा आहे की राज्याभिशेक जाला म्हणजे तोफा व्हावयाचा. सिरस्ता तालुके हाय व पुणियातील तोफखानियांत वगैरे कसकसा आहे, त्याचा दाखला चौकसी करून येकयेका ठिकाणीं तोफेचे बार किती किती ते तपसीलवार लेहून जलद पाठवावे. तूर्त अवघा तरी पुणियातील तोफखानियाचा व आणखी दोन च्यार ठिकाणचा यैसा आधी लेहून पाठवावा; व मागाहून झाडून लेहून पाठवावा. वाईहून गडी आला आहे तोच पाठविला आहे; तरी याजबराबर येक दाखला

व डाकेबराबर येक दाखला यैसा पाठवावा. कलावे. मिा वैशाख वा ८ मंगलवार पाहाटेची रात्र च्यार घटका. श्रीमंतास वस्त्रे माहाराजाकडील होतात तेव्हा तोफा किती सुटतात त्याचाहि दाखला लेहून पाठवावा. वाईहून चिरंजीव राजश्री हरिभाऊ याचे पत्र आहे, तेच आलाहिदा पाठविले आहे. जलद पाठवावे हे विनंती.

¶*Pandurang Ramchandra writes to Govindpant Bhat and Tatya Abhyankar to supply Haripant Bhau of Wai with information regarding the number of cannon-shots to be fired on the occasion of the King's Coronation.*

No. 42] [*1806*

डे. क. रु. १९९

मुछदी

१ चिंतो वामन देशमुख सन सीत मयातैन साले १९
१ राघो केशव टोसर सन आर्बा मयातैन १७
१ नारो गोविंद सन इसने मयातिन १९
१ परशराम खंडेराव सन खमस मयातैन १६
१ रामाजी भुजंग सन खमस मयातैन
१ विठल मल्हार पुरंधरे सन सलास आर्बैन ७८
१ नारो नीलकंठ मजमदार सन सीत खमसैन ६९
१ विष्णु आपाजी चिटणीस.
१ बापूजी नारायण पारसनीस सन आर्बा सितैन ९७
१ नारो हरि
१ विठलराव मोरेश्वर गोळे सन इसने समानीन ३९
१ जिवाजी रघुनाथ समानीन ४१
१ महिमत मल्हार समान सितैन ६३
१ गोविंदराव भगवत तिसैन ३१
१ सिवराम रंगनाथ इहिदे मयातैन १९
१ अंताजी सदासिव साने आर्बा मयातैन १७
१ बाळाजी लक्ष्मण ०
१ बाबूराव गणेश इहिदे मयातैन २०
१ दिनकर अनंत
१ विनायक नीलकंठ सन सबैन ९०
१ पुंडलीक नाईक रास्ते अजमासे ६०
१ गंगाधर नारायण इसने मयातैन १८
१ नारो रामचंद्र देवस्थळे खमस मयातैन १६
१ राघो मल्हार तिसा मयातैन ११

१ गणपतराव माधवराव जाधवराई सन इसने सबैन ४९
१ सखाराम भगवंत याची स्त्री सन समानीन ४०
१ बाळाजी लक्ष्मण आठवले सन सबा सितैन ५४
१ गोपाल बलाल वाव सन इसने मयातैन १९
१ रामचंद्र नारायण वार्खरे अजमासे ५५
१ जगनाथ केशव वोक सन मयातैन २१
१ बळवंतराव नागनाथ अजमासे ५०
१ रामचंद्र व्यंकटेश खमस सितैन ५६
१ लक्ष्मण कृष्ण कोलटकर अजमास ६५
१ माधवराव गंगाधर तिसा खमसैन ६२
१ बाळाजी केशव सन आर्बा समानीन ३७
१ लक्ष्मण हरि पारोलकर तिसा खमसैन ६२
१ नारायणराव यादव भागवत सबा सबैन ४४
१ रामचंद्र माहादेव नगरकर सन समानीन ४१
१ बाळाजी गोविंद बुंदेले मासे ६५
१ माधवसेट तुलसिसेट अजमासे ६८
१ देवराव माहादेव हिंगणे अजमासे ६०
१ नारायण बाबूराव वैद्य समान सबैन ४२
१ नीलकंठराव गोविंद ०

१ नारायणराव आपाजी माहाराजाचें देणे १००
१ लक्ष्मण वामन बक्षी आजमासे ६०
१ माधवराव कृष्ण पानसी इहिदे सबैन ४९
१ यशवंत सखाराम पानसी इहिदे सबैन ४९
१ पुंडलीकराव गोपाल पानसी इहिदे सबैन ४९
१ अनंदराव जिवाजी सन खमस खमसैन ६७
५० खंडेराव राम वगैरे सन सबा सितैन ५४

५१ मारा चिंतामण वोकर (ओंकार) अजमासे ७०
५२ गोपाळ नारायण येकबोटे
५३ श्रीराम श्रीधर अजमासे ७०
५४ सदासिव दामोदर
५५ सदासिव रामचंद्र खमस खमसैन ६७
५६ गोविंदराव काळे ०
५७ कृष्णाजी माणकेश्वर व मल्हारजी १६
५८ कृष्णराव नारायण अजमासे ३५
५९ विनायक आबाजी अजमासे ४५
६० बाळाजी अनंत भिडे अजमासे ६५
६१ जनार्दन सिवराम
६२ भिकाजी बाबूराव अजमासे ७५
६३ भास्करराव यादव अजमासे ८५
६४ धोंडो नारायण

¶*This is a list of notable persons at the time of Bajirao II. The figures perhaps denote the period of the recognition of the families by Government.*

No. 43] [*20-5-1809*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य

राजश्री

सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सुरु तिसा मयातैन व अलफ. पागा दिमत बाजीराव गोविंद याजकडे मौजे खेडद ता। नारायणगांव येथील अमल जातीस व मौजे नारोडी ता। माहाळुंगे येथील अमल पागेचे बेगमीस होता, त्यास ते मृत्य पावले, सबब त्याजकडून दूर करून साल गुदस्त सनें समान मयातैनापासून कमावीस तुम्हाकडे सांगितली असे. तरी इमानेइतबारे वर्तोन अमल चौकसीनें करून जमाखर्चाचा अजमास आलाहिदा करून दिल्हा जाईल त्याप्रमाणें वर्तणूक करणे. व सन सबा मया तैन अखेर बाकी बाजीराव गोविंद याचे कारकीर्दीची गावाकडे येणे असेल त्याची रुजुवात चौकसीनें करून घेऊन वसूल करून ऐवज सरकारांत पावता करणे जाणिजे छ ५ रबिलाखर.

¶*Bajirao Raghunath appoints (name not mentioned) to take charge of the assignment belonging to Bajirao Govind Barve who had recently died.*

7019

No. 44] [*Before 9 February 1811*

श्री

विशेष. इकडील वर्तमान डाकेचे वगैरे येते, त्याप्रो इा २९ जिल्हेज ता छ १४ मोहरमपावेतो विनंतीपत्रे सेवेसी पाच पाठविली. ती प्रविष्ट होऊन वर्तमान निवेदन जाले किंवा विनंतीपत्रेच प्रविष्ट जाली नाहीत हे काहीच समजत नाही. त्यास मी आज्ञांकित. आज्ञेप्रमाणे वर्तनूक करून वरधी कलवीत असावी, हा माझा धर्म. प्रथम छ २९ जिल्हेजी विनंतीपत्र पाठविले त्यात विनंती की, गुजरदरी व कालदरी येथे दाहा बारा हाव्या भिलाच्या नेहेमी राहून सरकारी माहलाचे गावास व मोगलाईतील गावास मनस्वी उपद्रव करून गुराच्या वोळत्या केल्या. त्याचा पाठीलाग ठाणेदार याणी केले. तेसमई भिलानी गाईच्या कुच्या मारून भील निघाले. हाटीत गेले. याप्रो उपद्रव करितात म्हणून या प्रांतीचे व दैव्या (?) प्रांतीचे गावकरी येथे येऊन सागू लागले. त्याजवरून भिलाकडे बोलावयास भले माणूस पाठविले की गावगना रयतेस उपद्रव न करित सरकार चरणी लक्ष ठेऊन वर्तनूक करावी हे चांगले. यैसे बोलावयास पाठविले. त्यासी भिलानी उतरे केले की, आम्ही वणराजे, आमचे प्रकर्ण निराळे, त्यात तुम्ही मन घालू नये. यैसी कितेक प्रकारे उन्मतपणाची बोलणी बोलून, समेटाचा आर्थ दिसेना आणि रयतीस तो उपद्रव होतो. हा बोभाट हुजूर आल्यास मजकडेस माहाराज दोष ठेवितील की, त्याप्रांती आसोन रयेतीचा बोभाट येतो हे काय? यैसे जाणून भिलाविसीचा वाका सविस्तर पत्री लिहून स्वारी करितो म्हणून विनंती लिहिलीच होती. त्याप्रो भिलावर श्वारी करून तेथे लढाई होऊन से दोनसे भील मारले व से दोनसे कड्याखाली उड्या टाकून मेले. पाच सात नाईकहि मारले आणि सर्वांचा नाईक खंड्या यास दोन बार मजकडील नारबा ताकटे यानी करून तो धरून आणि त्यातील गुरे च्यार पाचसे व सेरडे से दोनसे व घोडी लाहानमोठी मिळून चवतीस आणिली. हेहि विनंती सेवेसी लिहून पाठविली. त्याजवर चत्रसिंग भोसले हे गुजराथेहून निघोन नागपुरास रघूजी भोसले याची विहीन घेऊन जात होती, त्याचा मुकाम लोहेनेर ठगाडे येथे होता हे बातमी समजली. यावर याजपासी दोन च्यार लोकाचा जमाव होता. तो युक्तीनें फोडून जिकडेतिकडे लाविला आणि त्यास भेटीस बोलाविले. मालेगावास आले तरी बरावर पंचवीस तीस घोडे व पनास माणूस बरावर होते. याची भेट घ्यावी तो त्याची चंचलवृति दिसो लागली. तैसेच ठेवावे तरी तो उठोन गेल्यास माहाराज काये म्हणतील हा आदेशा मणात आणून त्यास आटकेत ठेऊन सेवेसी विनंती लिा. त्याजवर लस्करची वर्धी आली ती

व त्यातील मााराचे पत्र यैसी च्यार पाच विनंतीपत्रे पाठविली ते प्रविष्ट होऊन आज्ञा येईल त्याप्राो पुढे वर्तनूक करीन. आज्ञेखेरीज कोणतेहि करता येत नाही, आणि आज्ञा तो येकाहि पत्राची येत नाही. यास्तव आदेशा पडला की, माहाराजास पत्रेच प्रविष्ट जाली नाहीत. यास्तव हाली विनंती लिहिली आहे तरी पेशजीची विन(ती)पत्रे निवेदन जाली त्याचे उतर द्यावयास आज्ञा व्हावी अथवा मजकडील कारकुणास आज्ञा केली म्हणजे उतर लिहील. त्याप्राो पुढे वर्तनूक करीन. हाली इकडील मजकूर कितेक बारी मोठे आहेत ते निवेदन जाले पाहिजेत व रेवा उतरतीरास पेंढारी याजकडील खबर होती, ते दक्षणतीरास मुकाम करून आहेत. त्याचा जमावहि दाहा बारा हजारपर्यंत आहे.

¶*This is a news-letter reporting the disturbances of the Bhils in Khandesh and the movements of the Pindaris. A reference is also made to the capture of Chatrasing Bhonsle while going over to Nagpur from Gujarat.*

No. 45] [*9-2-1811*

श्री

चतरसिंग राजे यास छ १४ मिनहून बारा घटका रात्रीस धरले. तेसमई त्यास धरतेसमई गलबल जाली, परंतु त्याचे गोटास चौकीहि शे दोनशे बसविली. मी चतरसिंगाजवल राहिलो. मंडली तिकडे होती. त्या गलबलीत जागा जागा निराले निराले उतरले होते ते व पठाण वगैरे लोक होते. मात्र पाच पंचवीस घोडे व ते निघोन तेच वेलेस गेले. याचा बंदोबस्त करावयास मी इकडे लागलो होतो. पाा तो ते गलबल होतां तुटून दूर राहिलें ते कोणास न समजता तिकडे मंडली ते गेले. वरकड पथकास समजू द्यावे तरी प्रसंगी गलबल होऊन हास्तगत होईल न होईल या आदेशामुले सरकारचे लोक माझे निसबतीस आहेत ते घेऊन गेलो, आणि बापू मजकूर घर पथकचे लोक पाईदल हास्तगत केले. मजला ठेवावयाची आज्ञा जाली. ते नंतर सर्व मंडलीस सागोन चौकीपाहाऱ्याच बंदोबस्त केला. कारण दिवसाचा प्रसंग आसता आणि चतरसिंग याजवल पाच हजार फौज आसती तरी त्याची खातरजमा करितो, परंतु रात्रीमुले गलबलीत निघोन गेले. माहाराजाची आज्ञा की जे सरकार आनकूल जाले आसतील ते खेरीजकरून बाकी मंडलीचा बदोबस्त करावा. त्यास त्याजकडील कोन्ही आनकूल जाला नाही. [१]मजकडील लोकाची फोड करावयास लोहेनर रगोडे (?)

---

१ हा मजकूर मुळांत खोडला आहे. पत्र अत्यंत घाईनें व शोधपूर्वक लिहिले असल्यानें बरेच ठिकाणीं मजकूर विसंगतसा दिसतो.

येथील मुक्कामी गेला. त्याणे फौजची वगैरे दाब दाखविला. त्याच भयाणे ते उठोन गेले. मग चतरसिंग मडलीसुधा आला तो स्वामीचे पुन्यकरून कारस्थान होऊन हास्तगत जाला. माहाराजाचे प्रतापे सर्वाचा गर्व परिहार होऊन हस्त. सारे कारस्थान स्वाम चरणप्रतापे जाले. जे जाले ते स्वामीचे पुण्यप्रतापे जाले.

¶*Trimbakji Dengle reports to the Peshwa how Chatarsing Bhonsle was captured.*

No. 46] *[16-2-1811*

श्री

शेवेसी बालाजी लक्ष्मण व नायकूजी गुजर रामराम विज्ञापना येथील क्षेम ताा छ २१ मोहरमपावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष. आपण श्रीमंत माहाराजाचे नावाचा लाखोटा व आम्हास पत्र पो ते पावले. चतरसिंग राजे धरून कैद केले हे वर्तमान पत्रात होते त्याजवरून माहाराजाचे नावाचा लाखोटा माहाराजास प्रविष्ट केला. माहाराजानी पत्र वाचून पाहून आपले नावे उतर लिहून लाखोटा करून दिल्हा आहे त्यात मजकूर लिहिला, की चतरसिंग भोसले बलवंतराव भोसले मुाा तुझे घरापुढे राहातो त्याचा बाप आहे किंवा दुसरा कोणी आहे खचित लिहून पाठवणे. खासा स्वारी कोपरगावास फालगुन मासी येईल, असा मजकूर लिहिला आहे. आम्ही येथे खातरजमा करून सांगितले की, बलवंतराव भोसला त्याचाच बाप आहे. दुसरा कोणी नाही. चतरसिंग भोसले खचित आहे. याप्रो त्रिंबकजीचे पत्रच आम्हास आले. नंतर माहाराज बोलले की, तुजला पत्र कसे आले ते दाखवावयास आण. त्याजवरून आमचे नावचे पत्रहि नेऊन दाखविले. ते वाचून पाहिले आणि बोलले की, जो आमचे पत्रात मजकूर तोच ह्या पत्रात मजकूर आहे. चतरसिंग असल्यास धरून कैद केला हे चांगलेच जाले, परंतु तोच खचित असे त्रिंबकजीचे उतर आले पाहिजे, याप्रो आज्ञा जाली. त्याजवरून आपणास लिाा आहे. त्यास आपण माहाराजांस पत्र ल्याहावे त्यात मजकूर चतरसिंग भोसले बलवंतराव भोसले यांचे बाप आहेत व बलवंतराव भोसले याची मातुश्री ती ह्याच चतरसिंग भोसले याची बायको माझे वराजवळ आहे, यांत आंतर किमपि नाही, असे खातरजमेचे पत्रे ल्याहावे म्हणजे येथे माहाराजाची खातरजमा होईल. स्वारीचा बेत तूर्त सिवरात्रीस जाण्याचा राहिला आहे. वरकड सविस्तर मजकूर राजश्री सदासिवपंत भाऊ व हरिपंत आबाचे पत्री लिहिला आहे, त्याजवरून ध्यानास येईल. यैवजाच्या वराता * * *

¶*The writers Balaji Lakshman and Naykuji Gujar communicate to the Peshwa the news of the capture of Chatarsing Bhonsle and ask the addressee to convince the Peshwa that the captured person is Chatarsing, father of Balwantrao Bhonsle.*

No. 47] [23-2-1811

श्री

विशेष. स्वामींनी आज्ञापत्रे छ २९ जिल्हेजचे व छ २१ माहे मिनहूची तीन येकूण च्यार पाठविली ती छ २८ मिनहूस पावोन सिरसा वंद्य करून परम संतोष जाहाला. पत्री आज्ञा की, मकरसंक्रमणाचे तील शर्करायुक्त पाठविले ते आत्यादरें सिरसा वंदून भक्षिले व चतरसिंग भोसले व त्याचे बरोबरच्या आसाम्या कैद केल्या, त्याचे पायात बेड्या घालून पक्या बंदोबस्ताने मालेगावचे किल्यात येकाची येकास भेट न होऊ देता तुम्ही आपल्या जिमेस ठेवणे. चतरसिंग त्रिंबकजी भोसले वावीकर याचे पुत्र व बलवंतराव भोसले पुण्यात तुमचे घरासमोर आहेत त्याचे बाप व सातारियाचे पहिले राजे होते त्याचे भाऊ, तेच जर सापडले आसले तर तुम्हीं ही चाकरी आमच्या मर्जीस खूब करावयाजोगी केली. जर हे चतरसिंग ते नसले आणि दुसरे बंडवाले आसले तरी बंड मोडले इतकाच संतोस, तर हा मजकूर सविस्तर लिहून पाठवणें. खासा स्वारी फाल्गुनचे सुमारे त्या प्रांती येणार आहे. तेथे तुमची हुजुरात भेट जाहाल्यावर जसे ठरण्यांत येईल तसे येविशी केले जाईल व चतरसिंग याचे लस्करात फितूर करून त्यास मंडलीसुध्धा कैद केले, त्यास त्यांजकडील सरदार व स्वार व गाडदी जे सरकारात आनकूल जाले आसतील ते खेरीजकरून बाकी त्याचे सोबतीचे सरदार व स्वार व गाडदीं याची जफ्ती करून गोट लुटून घेऊन जे काय सापडेल ते सरकारात जमेस करून यादी लिहून हुजूर पाठवणे; व तुम्हाबरोबर सरकारची फौज आहे त्यापैकी सिलेदार दिमत हाये

असामी

२२४ दिा जनार्दन नारायेण
१४८ दिा विनायेक वासुदेव निा बापू गोखले
८७ दिा बाजीराव पाटणकर
७४ आनंदराव बाबर खुद पथकसुध्धा
१४ आबाजी माहादेव खुद पथकसुधा
१७ दिा गंगाधरपंत कानडे

५६४

येकूण पाचशे चौसष्ट असामी सिलेदार यास हुजूर पाठऊन देणे. पुण्याचे मुकामी आथवा जेथे स्वारी आसेल तेथे त्याणी बातमी राखून येऊन पोहेचावे. खासा स्वारी माघ मासात पुण्यातून निघत नाही. फाल्गुनात कोपरगावाकडे जात्रे आसा विच्यार आहे. . याजकरिता सदरहू स्वारास माहे मोहरम ऊर्फ मात्र

मासचा रोजमरा देऊन पाठविल्यास तैसेच लिहून पाठवणे. तेथे रोजमरा न देता पाठविले तर तैसेच लिहिणे म्हणजे हुजूर दिल्या जाईल म्हणोन च्यारी आज्ञा पत्रात मजकूर. त्यास चेतरसिंग भोसले हे कैलासवासी माहाराज याचे बधु. माईसाहेबाचे दीर. बलवंतराव भोसले माझे वाड्यासमोर पुण्यात राहतात त्याचे बाप, त्रिमकजी भोसले वावीकर याचे पुत्र, हेच जाणून कैद करून सेवेसी विनती लिहिली. दुसरे बंडवाले नाहीत. याची स्त्री माझे जिमेस आहे तेच हे. याजबराबर मंडली आहे. त्याची नावानिसी बिता :—

११ मंडली

१ रघुनाथराव गुजर
१ आपाजी इंगले
१ बापू फडणीस
१ गोपालराव न्यायाधीश व बक्षीगिरी
३ आपाभट पुणतांबेकर त्रिवर्गबंधू पोतनिसी व पोतदारीचे काम
१ बाबाजी केशव पाडलीकर बापू फडनिसाचे हाताखाली लिहिण्याचे कामास
१ लाडेखान जमादार
१ बापू जगथाप हवालदार
१ रघुनाथराव गुजर याचा लेकवला उा वर्षे ९

११
१ जामदार कुसाजी
१ महादू मडक्या खिजमतगार

१३

सदरहू मंडलीसुध्धा कैद करून किरकोल सिबंदी कामगार माणसे होती त्याजवल झाडे घेऊन चौकशी करून लाऊन दिल्ही. तेच समई मारनिले जवल घोडी थोर रास १२, तटे सिगरे रास १७ व रोही १ येकूण तीस व उट नफर दोन आहेत त्याचा तपसील छ १९ मिनहूस विनंतीपत्री लिहिला आहे. वरकड चीजबस्त वस्त्रे त्याचे आंगावर व बिछाने मात्र आहेत ते त्याजवलच आहेत.

¶*The writer probably Trimbakji Dengle gives to the Peshwa the identification of Chatursing Bhonsle captured by him. "He is the same Chatursing," says he, "who is the brother of the late Chhatrapati and the father of Balwantrao Bhonsle living at Poona." The writer confiscates his baggage and enumerates the persons arrested.*

No. 48] [February 1811

मजला सरकारातून पथक ठेवावयाची आज्ञा जाली होती, ते घर पथकाचे स्वार व पायेदल मी बराबर घेऊन चतरसिंग हस्तगत त्याचे मंडली सुधा केला. नंतर चौकी पाहाऱ्याचा बंदोबस्त कर्तेसमई समजले की, पठाण वगैरे लोक वेगलाले उतरले होते ते निघोन गेले. त्याजवलहि लाहान मोठी वीस पचवीस घोडी होती. वरकड पथकास समजू द्यावे तरी बइदा होईल याजमुळे हस्तगत होई तोपावेतो कोणास समजू दिल्हे नाहीं. जे जाले ते स्वाम पुण्यप्रतापे जाले.

¶*The writer reports how Chatarsing Bhonsle was captured.*

No. 49] [March 1811

श्री

सदरहू स्वारास रोजमरा देऊन कबज घेऊन माहाराजाचे स्वारीची बातमी ठेऊन स्वारी जेथे आसेल तेथे पोहचावे म्हणून पथकास ताकीद केली आहे. छ मजकुरी निघाले. सत्वरच येऊन पोहचतील. सांप्रत पेंढारी याची खबर रेवा उतरतीरास होती, ते रेवा उतरोन बऱ्हानपूर जैनाबाद येथे मुकामास आली आहे. जमाव सात आठ हजार आहे म्हणून छ २६ मिनहूस बातमी आली आहे. पुढे कोणीकडे जातील ते बातमी आल्यावर सेवेसी विनंती लिहीन. घरी मुलीचे लग्न. स्वारी कोपरगावी येणार म्हणून फाल्गुन शुा ९ नवमीचा निछय केला होता. परंतु स्वारी आली नाही व इकडे पेंढारी याची आवई यामुले, तेव्हा नवमीची तिथि रहीत जाली. आता वद्य ५ पंचमीची तिथि आहे. इतक्यात श्वारी आल्यास उतमच आहे. नाही तरी आज्ञा आली तरी इकडील बंदोबस्त ठेऊन बाा पंचमीस लग्नास च्यार दिवसाचे अवसराणे इकडील बातमी पेंढाऱ्याची निवल आली तरी निंबगावास जाऊन कार्यसिध्धि करीन. याउपरी आज्ञा येईल तैसे करीन.

चतरसिंग भोसले याजबराबर चीजवस्त किरकोल वस्तभाव आहे, त्याची याद आलाहिदा त्याचे कारकुनाचे विद्यमाने पाा आहे. हे बंड, जे उत्पन्न करावे ते याणी बराबरचे मंडलीसुध्धा खावे, कोठे पोशाख कोठे काही इकडे मेलवावे, इकडे खावे. याची नजर दुसऱ्याचे पागोट्यावर, तेव्हा याजवल दौलत ती कशाची? बंडपण मात्र करून पोट भरावे हीच दौल(त) याची. घोडी बसावयाची मात्र तार्जी हुशार नामी दोनतीन चांगली खासी आहेत. बाकी रावती घोडी व तटे आहेत. मी स्वामचरणारविंदी लक्ष ठेऊन वागतो हे (अपूर्ण)

¶*This is Trimbakji Dengle's letter to Bajirao informing him of the capture of Chatursing Bhonsle and describes how Chatarsing us:d to secure his livelihood.*

7025

No. 50] [28-4-1811?

पुरवणी ग्वालेर

१ होळकरांकडून पत्रें आलीं, त्यांत मजकूर आमचे फौजेंत बखेडा आहे. बंदोबस्त करण्यायोग्य मनुष्य नाहीं. त्यांत मीरखानही येत आहे. तो आल्यावर बखेडा अधिकच होईल. कपुरखां रुसून गेला तो त्याचा आप्त, याजकरितां आमचे दौलतीचा बंदोबस्त करण्याचा अधिकार आपल्याकडे आहे. त्यापैकी शाहाणा कारभारी पाठऊन बंदोबस्त राखावा म्हणोन, त्याजवरून शिंदे याणी मीरखांस पत्र पाठविलें कीं तुम्ही आहां तेथें असावें. तुम्ही आल्यानें संशय उत्पन होऊन बखेडा होईल, याजकरितां तेथेंच असावें, असें पाठऊन आत्माराम शिवराम वाकडे यास होळकरांकडे पाठवावयाचें बोलण्यांत आलें आहे.

१ हतरसवाले व इंग्रज याचा तह होऊन येक गोरा व दोन कंपणी इग्रजां-कडील ठेवण्याचा करार ठरला आहे.

१ मंदोसरकर कमाविसदार याचें पत्र आलें, त्यांत मजकूर, तुळसाबाई होळकर कडाल पत्र आलें का आम्हास मंदोसरास घेऊन जावें. त्याजवरून च्यारशें स्वार रवाना केले, आणि विनंतीपत्र लिहिलें आहे, तरी उत्तर येईल त्याप्रमाणें बाईस येथें आणवयाचें करूं.

नागपूर

१ श्रीधरपंत बापू याची स्त्री निवर्तली. सर्व काशींत, श्रीमंत रावसाहेब याणी आग्रह करून लग्न करविलें. आधीं सडे काशींत राहून खटलें दरोबस्त नागपुरास रा। केलें.

१ रावसाहेब चित्रकोटास येऊन राहिले. तो माहाल त्याचे सरंजामास खर्चाकडे लाऊन दिल्हा.

१ मुधोजी भोंसले यास छ ४ रबिलाखरीं लग्नाची हळद लागली.

बाळाजीपंत वाघ मुकाम नाशीक. पुलावरील वाड्याचे दोन मजला गिलावा सफेदी सुद्धां इमारत तयार जाली. वर छ्यावणी करावयाची. चैत्र मासीं पर्जन्य पडतो, याजकरितां स्वारी येथें आल्यावर समक्ष पाहाण्यांत येऊन आज्ञा होईल तसें करावें, म्हणोन वाट पाहिली. हालीं पर्जन्य समीप आला. काम भिजलें असतां खराब होईल. येविशीची आज्ञा येईल तसें करीन. माझे बुद्धीस सुचलें तसे नकाशे लेहून पाठविले आहेत म्हणोन.

मुंबई

१ जैयपूरकर याजकडून वकील दिलीस गेले होते, त्याणीं इंग्रजाचे मार्फतीनें कलकत्यास लेहून पाठविलें, कीं दरसाल तुम्हास देनगी देत जाऊं. तुम्ही आमचा पुस्तपना राखावा. या कामाबद्दल दोन वकील दिलीहून मथुरेस आले आहेत. उत्तर यावयाची वाट पाहत आहेत.

१ जोतपूरकर यांणीं मीरखान यास दोन लाख रुपये देऊन फौज सुद्धां त्यास सरहद् आपली पार करून लाऊन दिल्याची अकबार आली म्हणून.

१ दौलतराव शिंदे व जोतपूर व जैयपूर त्रिवर्ग येकत्र होऊन आपली येखलासी[1] करून घेतली; आणि मसलत योजिली आहे कीं ज्याजपासून आपल्यास उपद्रव होईल त्याचें पारपत्य त्रिवर्ग मिलोन करूं. म्हणोन आकबार.

लष्कर होलकर

१ पलटणें व कपुरखां चंदवशापलीकडें दोन कोशावर मुकाम आहे. चंदवशापासून आठ हजार रुपये खंडणी घेतली, व गंगराडचे किल्यांतील चीजवस्त व दरोबस्त गांव लुटून फना केला. दोन अडीच लाख रुपयाची लूट जाली. लष्करांत मेवाती व पुर्बे याची चौकशी करून राहूं देत नाहींत.

१ मीरखांकडे पत्रें रवाना केलीं. गणेश कृष्ण मुजरा केला. शाखभाजी पाठविली.

१ राजे जयसिंग सोपारवाले याणीं कोटेवाल्याकडील दाहावीस गांव लुटिले.

१ मीरखांची व जैपुरकराचे सरदाराचीं लढाई जाली. जयपुरकराचीं दोन मोठीं माणसें कामास आलीं. मीरखांचे फौजेनें शिकस्त खाली. राजे जगतसिंग जैपूरकर कांहीं नेमस्त व गादीवर बसत नव्हते, सा। हालीं बसूं लागले.

१ मीरखां याजकडून पत्रें आलीं जे इकडील प्रांताचा बंदोबस्त करून पंधरा विसां दिवसांत मी येतों म्हणून.

१ आंतर्वेदींत भरतपुरापलीकडे हतरस संस्थान दयाराम जाट यांचें आहे, तेथें त्याचा याचा बिघाड होऊन इंग्रजाच्या पलटणें येऊन लढाई सुरू आहे.

१ लाला ख्यालीलाल व येक कारकून व दोन हलकारे जोड्या मीरखान याजकडे बोलण्या(स) रवाना केले.

¶*This is a summary of many news-letters received from several quarters concerning the activities of the English in northern India, and the affairs of Holkar, Sindia and the Bhonsle of Nagpur.*

---

[1] स्नेह.

7027

No. 51] [22-8-1811

श्री

श्रीमंत माहाराज राजेश्री बाबासाहेब
साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक रूपचंद नाईक व भवानजी नाईक सुतार निा सरकार विज्ञापना. सरकारवाडा पेठ बुधवार शहर पुणें येथे पश्चमेकडील सोपा दुघई व पुढे आडीच गजाची पडवी अथवा सोप्याबराबर दुमजला जसी सरकारची आज्ञा होईल तसे खण सुमारी ९ नऊ व चापेखण दाही (दोही?) बाजूचे दोन येकूण अकरा खण व उतरेकडील सोप्याचे चालीचे खण च्यार येकघई व पुढे पडवी अडीच गजाची अथवा सोप्याबराबर दुमजला येविसी सरकार आज्ञा होईल त्याप्रमाणे, याचे काम खांब सुरूदार महरापासुधां व भिंतीचे आंगचे खांब चौरस लाकूड सागवानी चांगले निकोप लाल उतम नामी विश्रामबागचे दिवाणखान्याचे मासल्याप्रमाणे व चुना मसाला व विटा पक्या लाल चांगल्या उतम लाऊन ह्यापासून साडेसाहा महिन्यात काम तैयार करून द्यावयाचा आम्ही उभयतांनीं करार करून मख्ता कबूल केला. रुपये २२००० सदरहू बेवीस हजार रुपये मख्याचे स्वामीनी रा त्रिंबकजी डेंगले याजकडून देविले ते भरून पावलो. वर लिहिल्याप्रमाणें साडेसाहा महिन्यात काम उतम चांगले तैयार करून देऊ. मिति शके १७३३ प्रज्यापति नाम सवछरे भाद्रपद शुा ३ गुरुवासरे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. हास्तआक्षर खुद भवानजी नाईक.

¶*[Contract-bond passed by Rupchand and Bhawanji Naik Sutar for constructing the Budhwar Palace in Poona at an estimate of Rs. 22,000—the work to be finished within 6½ months.*

No. 52] [13-7-1812

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री भाऊ व हरिपंत आबा स्वामीचे सेवेसी

पो बालाजी लक्ष्मण सां ना विा विा. सासवडचे मुकामी श्रीमंत महाराज याणी आज्ञा केली की आंबे खरदी करून पंढरपुरास आणावयाचे खर्चाबदल रुो २००० दोन हजार चांदवड राजश्री विठल नारायण लिमये यांचे हवाली करावे म्हणोन, त्यावरून तुम्हास लिो आहे. तरी पत्र पावताच विठल नारायण लिमये याचे हवाली सदरहू आज्ञेप्रो दोन हजार रुा करून पावती जलद

पाठऊन द्यावी. पंढरपुरास आंबे आषाढ शुा येकादसीस येऊन पोहोचले पाहिजेत. सरकारचा शब्द न लागे असे करावे. सारांश रुो पत्रदर्शनी बक्षीसचे हवाली करून पावती पाा म्हणजे आपल्याकडेस दोष नाही. यैवज बिनदिकत द्यावा. राा छ ३ रजब सुरु सलास अशर सुाा सासवड. बहुत काय लिाे लोभ करावा हे विनंति.

¶*Bajirao II intended to distribute to the pilgrims at Pandharpur mangoes worth Rs. 2,000 on the auspicious day of the Ashadhi Ekadashi. The above letter from Balaji Lakshman Salkade issues the order for execution.*

No. 53] *[1-9-1812 ?*

श्रीगजानन

राजश्री सदासिवपंत व

हरि भगवंत गोसावी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नाे त्रिंबकजी पाा डेंगले रामराम विनंती. उपरी, रुप्याची झरझरी व चिलीम व तोटी व नेच्या+ कलाबतूचा घरचे जामदारखान्यात राा हैबती जामदार याजवळ आहे ते सरंजामसुधा पत्र पावताच कोपरगावचे मुकामी मुंजरद सिपायाबराबर देऊन पाठऊन देणे. येक क्षणाचा विलंब करू नये. नेच्या झरझरी चिलीम तोटीसुधा रातोरात येऊन पोहोचे असे सिपायास निक्षूण ताकीद करावी. व पाे बारागाव नांदूर येथील कुरणात व रानात घोडनदीवरील इंग्रेजाचे बारातील उदिमी यांचे व गवलीयांचे गुरे पाचसाहा हजार आज दोन महिने चारणी करून आहेत. कुणब्याचे ऐकत नाहीत. कुणब्यास मारहाण करितात. साा गावकरी आम्हाजवळ आले. त्यांचे म्हणे की, आमच्याने राहावत नाही. गाव उज्याड करून जातो. इंग्रजाचा उपद्रव मोठा याजकरिता लिाे आहे. तरी राजश्री भाऊसाहेब व मोदी यांचे कानावर घालून चगदी पाठऊन द्यावी. येविसी पेशंजी उरळीचे मुाा तुम्हास सांगितले असता तुम्ही आलस करून चगदी पाठविली नाही. त्यास नुकसान जाले ते आमचे जाले. तुम्हास कालजी कशास आसावी? तरी आता चगदी आधी आधी पाठऊन देणे. पारगावचे कुरणास उपद्रव होत असल्यास तेथीलहि बंदोबस्त ठेवावा. राा छ २४ साबान. बहुत काये लिाे हे विनंती.

¶*Trimbakji Dengle writes to Sadashiv Pant, requesting among other matters that the hukka be sent at once to Kopargaon.*

+ The pipe of a hukka.

No. 54] [6-2-1813

श्री

श्रीमंत राजश्री त्रिंबकजी पा तात्या डेंगले साहेबाचे शेवेसी

आज्ञाधारक मल्हारराव भोसले रामराम विनंती विज्ञापना. ताा माघ शुा ६ शनिवारपावेतो साहेबाचे कृपावलोकणेकरोण येथास्थित असो विशेष. काल बसंतपंचमीस विश्रामबागेत स्वारी श्रीमंत बाबासाहेब आले होते. केसरी रंग जाला होता. शास्त्री पुराणिक याची बैठक भोजनउत्तर होऊन सायंकाली मागील च्यार घटका दिवस राहताणी ग्रहस्त लोक व मानकरी वगैरे याची बैठक जाली. नाचकलावंतणी व्यंकटनरसी होती. दुसरे शेनवारचे वाड्यात श्रीमंत आपासाहेब याणी रंग करूण चार लोक वगैरे त्या मंडळातील जितके होते तितक्यास रंग जाला. आज शनवारी पाषाणास स्वारी जाणार या करिता शुकुरवारचे वाड्यापासून बेलबागेपरियंत स्वार व लोक दोन अडीच प्रहर परीत उभे होत. नंतर स्वारी विश्रामबागेत आली ती सायंकाळ परीत तेथेच आहे. पुढे होईल ते लिहून कळऊ. थोरल्या वाड्यातील लोकाची हजरी होऊन रोजमरे आज काहीं जाले. राहेल्याचे उदईक होणार. सेन्याचा तपसील—

१ बारगीर लोक याचा दर ७ प्रो
१ पायेदल मराठे दर ६ प्रो
१ कानडे व परदेसी दर ७ व सा प्रो

येकूण सदरहू प्रो आले. मुसलमानाचे रोजमरे उदईक होणार त्याचा शेरा पडेल तो लिहून पाठऊ. याप्रमाणे साहेबास श्रुत होये. रात्री गस्तीस आबाजी पाा व आम्ही आसतो. चौकी पाहऱ्याचा बंदोबस्त आपले आज्ञेप्रो आहे. रात्री हजरीस रावजी बापट असतात. साहेबास कलावे बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*Malharrao Bhonsle informs Trimbakji Dengle how the Peshwa and his brother celebrated the Vasantpanchmi. This may be taken as a specimen of Bajirao's manner of life.*

No. 55] [24-4-1813

सरदार अलीशान खुदावंद न्यामत हनराबल
मोईष्टवारीट इलपिसतनसाहेब बाहादुर याम
मकबलहुर

अर्जदास्त फिदवी बापूजी सदासिव आदाब तसलिमात बज्या आऊरदे मारुज मे रसानद दिगर आकी. यथील खैरसला आमंदार देवडी श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति बाहादुर याची स्वारी मुाा करवीर छ २४ इप्रल सन १८१३ इसवी मुताबिक छ २२ रबिलाखर सन १२५८ हिजरी रोज शनवारी सुक्रवारी दोन

घटिका दिवस राहिला तेव्हां श्रीमंत सिवाजी माहाराज यास देवआज्ञा जाली. तेव्हां कारभारी व लोक वगैरे याणी शोक केला. रत्नाकर आपा व रायाजी जाधव व नारायणराव पाटणकर, हैबतराव गाइकवाड, व श्रीगुरुमाहाराज याणी विच्यार करून श्रीमन्माहाराज संभाजी माहाराज छत्रपति याची दुराई गावांत फिरविली आणि श्रीभाऊमहाराज यास व दिनकरराव गाइकवाड यास पत्रे पुण्यास व खलिता येक सांडणीस्वाराबरोबर रातोरात्र पुण्यास रवाना केला. किले पन्हाला व पावनगड व प्रसिध्धगड वगैरे ठाणियास पत्रे माहाराजाचे नावे रवाना जाली. दोन घटिका दिवस राहिला, तेव्हा दरवाजे बंद करून परवानगीखेरीज कोण्ही माणूस गावात घेतले नाहीं व बाहेरील गावात येऊ देत नाहीं. प्रहर रात्री कृष्णरावजी यास जाहले वर्तमान सांगितले. नंतर कृष्णरावजी निरोप घेऊन गेले. च्यार प्रहर रात्र ज्यागरण सर्वत्रानी केले. शंकरराव सिंदे सेनाखासकील तोरगलकर व चिंतामणराव आपा व सरस्वतीबाई पटवरधन यास पत्रे रात्री रवाना केली. नंतर सूर्य उदय होऊन नंतर सिवाजी माहाराज यास पालखीत घालून वस्त्रे सिरपाव बांधून समारंभानिसी घेऊन निघाले. समागमे हैबतराव गाईकवाड व रत्नाकरपंत आपा व रायाजी जाधव वगैरे लोक होते. वाड्यात श्रीमंत बाइसाहेबा-जवळ नारायणराव पाटणकर व नारायणराव पंडित दोघे राहिले व रामचंद्र जोसी-राव पंचगंगातीरी संभाजीमाहाराजाचे देवलाचे दक्षणभागी सार्थे(क) केला. श्रीमन्माहाराज छत्रपति व बावासाहेब उभयतास घेऊन गेले. सार्थक बावासाहेब भोसले खानवटकर याणी केले. दीड प्रहरी सार्थक होऊन स्नाने केली. नंतर दोन प्रहरी माहाराज मंडलीसहवर्तमान वाड्यांत आले. नंतर भोजन करून आराम केला. रत्नाकरपंत आपा व नारायणराव पाटणकर तिसरे प्रहरी पुन्हा पंचगंगातीरी सार्थक केले त्याचा समाचारास गेले. रात्री ज्यागरण जाहाले यामुळे वाड्यात कोण्ही फारसे आले नाहीत. च्यार घटिका दिवस राहिला, तेव्हा माहाराज जागे होऊन वाड्यात श्रीमंत बाईसाहेब याजकडे उभयता गेले. रायाजी जाधव सरनोबत वाड्यात आले व नारायणराव पंडित वाड्यात आहेत. श्रीमंत बाईसाहेब याजकडे समाधानार्थ कोण्ही येतात तो शोक ऐकवत नाही. रत्नाकरपंत आपा व नारायणराव पाटणकर अस्तमानी वाड्यात आले. च्यार घटिका रात्रपर्यंत राहून चौकीपाहाऱ्याचा बंदोबस्त करून नंतर आपले घरास गेले. बंदगीस रोशन होय हे अर्जदास्त.

¶*Bapuji Sadashiv sends to Elphinstone a report of the death and funeral of Shivaji, Raja of Kolhapur on 23rd April 1813.*

---

१ वाड यांनीं करविलेल्या नकलेची नकल. मूळ नकलेवर 'कर्नाटक रुमाल नंबर ९६७' व 'तपासले १९-६- ९७' असे दोन शेरे आहेत.

No. 56] [4-5-1813

पैवस्ती छ २१ जमादिलाखर जेष्ठ सन आर्बा मुकाम पुणें.

श्री

सेवेसी विनंती. सेवक रघुनाथ रणसोड मुकाम बंदर मुंबई कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ४ माहे जमादिलाखरपावेतों स्वामींचे कृपावलोकनें सेवकाचें वर्तमान येथास्थित आहे विशेष. बंदर मजकूरचे अखबारीची दोन च्यार विनंतिपत्रें राजश्री लक्ष्मण गोविंद याजकडून जासूद सेवेसीं पत्रें घेऊन जात असतां त्याजसमागमें पाठविली तीं पोहचली न पोहचली याचें सेवकास समजलें नाहीं. पत्रांत मजकूर राजकारणी यास्तव मध्यें गलत न व्हावी म्हणोन विनंती लिहिली आहे. शेवेसीं पत्रें किती पावलीं याची आज्ञा आली पाहिजे. आलीकडे विलायेथेहून इंग्रेजास पत्रें आलीं आहेत, त्यांत बातमी आहे कीं पेसजीं रुशान व फरासेन याची लढाई जाहली होती ; ते समई रुशान याचे फौजेचे मोड जाहाली. आलीकडे बातनी कीं फरासेन याच्या फौजा त्याचे मुलकांतून रुषन याजवर येतां मार्ग चुकले, ते वेलेस प्रात:कालचें बर्फहि पडलें होतें. ती संध रुशान याणी पाहून त्यांचे अंगावर फौजा पाठऊन तुंबळ लढाई केली. तेथें फरासेन याचे फौजेची मोड जाहाली म्हणोन वर्तमान आहे. दुसरा मजकूर करवीरकर माहाराज यांचा किला भरतगड म्हणोन मालवणानजीक आहे. तो वाडीकर सावत याणी नवीन घेतला, तें वर्तमान माहाराज याणी इंग्रेज यासी सांगताच येक पलटण तेथें रवाना करोन रेडी व भरतगड वरचेवर सही करोन ठाणे घेतले म्हणोन बातमी आहे. व विलायेथेहून पांच तरांडी माल भरीत बंदर मजकुरीं दाखल जाहालींत. त्यामधें विलायेथी जिनस तोफारी वगैरा बहुत आला आहे. साहेबाचे सेवेसीं निवेदन, व्हावें. याजवर बातमी निघाली म्हणजे सेवेसीं विनंति लिहून पाठवितों. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Raghunath Ranchod reports to the Peshwa from Bombay that the ruler of Kolhapur obtained the aid of the English and recovered the fort of Bharatgad from the Sawant of Wadi. The writer also gives news received in Bombay of a severe battle having been fought between the French and the Russians in which the former were defeated.*

7032

No. 57] *[29-7-1813*

पैवस्ती छ ३० रजब सन आर्बा
श्रावण

श्री

साहेब साहेबांचे सेवेसी आज्ञांकित बयाजी नाईक विज्ञापना. मिस्तर एल्फिन्स्टन वकील दिंमत इंग्रेज कलकत्तेकर यांजकडील दिनचर्येची ब्रातमी.

छ ९ रजबची, येरहोड्याचे मुक्कामीहून दोन पलटणें व घोड्याच्या तोफा दोन, टोपकर मंडळी सुद्धां प्रात:काळीं निघोन खडकीचे पुलानें लांकडी पुलावरून शहरांतून बुधवारांतील सरकारवाड्याजवळोन भवानीपेठेचे रस्त्यानें घाशीरामाचें तळ्याजवळ जाऊन उभीं राहिलीं. तेथें बंदुकांत बार भरून तोफेचे संदुकाचीं कुलपें काढून संदुका मोकळ्या केल्या. तोफेंत बार भरले नाहींत. गारपीरचे लष्करांतील दोन पलटणें तयार जाहालीं होतीं, तीं चार तोफा सुद्धां निघालीं. एकूण च्यार पलटणें सहा तोफांसुद्धां बराबर निघोन वानवडीनजीक निपाणीकर यांचे फौजेलगत जाऊन वेगळालीं मुक्काम करून राहिलीं आहेत. बापूजी. गोपाळ साने येऊन, मशारनिल्हेशीं दोन घटका बोलणें करून मोधीकडे येऊन गेले. करवीरकरांकडील मोरोपंत चिटणीस व श्वरूपजी हुजरा तिसरे प्रहरीं येऊन मशारनिल्हेशीं एक प्रहर बोलणें केलें. कांहीं कागदपत्र बराबर आणिले होते ते मशारनिल्हेस वाचून दाखवून बाहेर येऊन बसले. कपतान क्लोज बोलण्यांत होते. मागून निपाणीकर यांजकडील आपाजी लक्ष्मण व लिंगोपंत सायंकाळीं आले. मशारनिल्हेशीं व कपतान क्लोज यांशीं च्यार घटका बोलणें करून दोन घटका रात्रींस गेले. नंतर करवीरकराकडील कारकून गेले. मुंबई व हैदराबाद व श्रीरंगपट्टण व बऱ्हाणपुरचीं पत्रें डाकेबराबर आलीं. जाब रवाना जाले. खुसरवजी मोधी कोणाचेही बोलण्यांत नव्हते. आंगरेयाजकडील बापूभट सोमण येऊन दोन आननस मशारनिल्हेकडे पावते करून गेले. गांठ पडली नाहीं. हरि चिंतामण दीक्षित येऊन माणीक जमादार यांसीं बोलून गेले. मुंबईहून एक पलटण गोऱ्याचें व शिरुरनजीकचे लष्करातून एक पलटण एकूण दोन पलटणें आणखी येणार म्हणून बातमी आहे.

सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶The writer Bayaji Naik, Bajirao's informant, gives an account of the military postings of the English at Poona. The names of the persons who interviewed Elphinstone and the several affairs executed by him are also mentioned.

7033

No. 58] [29-7-1813

पैवस्ती छ ३० रजब
श्रावण सन आर्बा

श्री

साहेब साहेबांचे सेवेसी आज्ञांकित बयाजी नाईक विज्ञापना. मिस्तर एल्फिन्स्टन् वकील दिंमत इंग्रज कलकत्तेकर यांजकडील दिनचर्येची बातमी.

१ छ ६ रजबचें वर्तमान. नागपुरकर भोसले यांजकडील गणपतराव येऊन मशारनिल्हेशीं दोन घटका बोलून गेले. बापूजी गोपाळ साने येऊन मशारनिल्हेशीं दोन घटका बोलणें करून गेले. करवीरकराकडील श्वरूपजी हुजरा येऊन कपतान क्लोज यांशीं बोलून गेला. बाळाजीपंत पेंडसे यांजकडील भगवंतपंत येऊन मोधीसी बोलून गेले. जानराव नाईक निंबाळकर यांस मशारनिल्हेनीं पत्र लिहून थैली तयार केली. ती मोधी यांणीं प्रभाकरपंत जोशी यांचे हवालीं करून निंबाळकर यांस पावती करावयास सांगितलें. त्याजवरून थैली घेऊन प्रभाकरपंत गेले. निपाणीकर यांस मशारनिल्हेनीं पत्र लिहून थैली तयार करून जासुदाबरोबर त्यांचे लष्करांत पाठविली. मीर इभराम दिंमत गोविंदबक्ष यांणीं च्यार डाल्या भरून आंबे व दोन आननस कारकुनाबरोबर पाठविले, ते मशारनिल्हेस पावते करून कारकून गेला. आंगरे यांजकडील बापूभट सोमण येऊन दोन आननस मशारनिल्हेकडे पावते करून गेले. गांठ पडली नाहीं. श्रीमंत राजश्री आपासाहेब यांजकडील चिंतोपंत जोशी व महंमद हुसेन आल्ली येऊन माघारे गेले. मशारनिल्हेची गांठ पडली नाहीं. कपतान फोर्ट+ यांणीं सरकारी पलटणाचे भरतीस हिंदुस्थानांतून लोक आणविले होते, ते तीन च्यारशें आसामी बाळापूर आकोल्याचे मुक्कामी आले, तेथें आकोलेकर गांवकरी याणीं कजिया करून मारामार केली. सबब भरतीचे लोकांपैकीं सात आसामी जखमी जाले म्हणोन डाकेबरावर कपतान यांजकडे वर्तमान आलें. मुंबई व हैदराबाद व श्रीरंगपट्टण व बऱ्हाणपुरचीं पत्रें डाकेबरावर आलीं, जाब रवाना जाले. कपतान बिली बिबीसुद्धां व दुसरा एक टोपकर छ ९ मिनहूस सायंकाळीं निघाले, ते थोरला सरकारवाडा डावा घेऊन बुधवारांतील, व शुक्रवारचा सरकारवाडा पाहून हिरावागेंतून श्रीपर्वतीस गेले. देवळाबाहेरून चहूकडे पाहून ठिकाणास आले. त्रिंबकजी डेंगळे यांजकडील प्यादा परवानगीत बरोबर होता.

+ Ford.

7034

१ छ ७ रजबचें वर्तमान. मशारनिल्हे प्रातःकाळीं गणेशखिंडीपावेतों जाऊन सहल करून आले. खुसरवजी मोधी प्रातःकाळीं थोरले सरकारवाड्यांत आले. दिवाणखान्याचे पश्चिमेकडील खोलींत बिछाईत होती, तेथें श्रीमंत राजेश्री आपासाहेब यांसीं एक घटका बोलणें केलें. जेठीबा व विनायकपंत सबनीस व रामचंद्रपंत पेंडसे ऐसे बोलण्यांत होते. आपासाहेब यांणीं मोधीस विडे दिल्हे. नंतर मोधी वाड्यांतून निघोन राजश्री सदाशिवपंत भाऊ यांजकडे बुधवारांतील गजऱ्याचे वाड्यांत आले. च्यार घटका भाऊशीं बोलणें करून निघाले. ते घरींहून बंगल्यांत आले. हुरमोजीशेट दोन प्रहर दिवसास राजश्री भाऊ याजकडे गजऱ्याचे वाड्यांत जाऊन दोन घटका बोलणें करून बंगल्यांत आले. मल्हार रेणुराव व आनंदराव मल्हार बोलण्यांत होते. करवीरकरांकडील श्वरूपजी हुजरा येऊन मशारनिल्हेसीं बोलून गेला. निपाणीकर यांजकडील आपाजी लक्ष्मण व लिंगोपंत येऊन मशारनिल्हेशीं दोन घटका बोलणें केलें. निपाणीकर यांस पत्र लिहून थैली तयार केली ती पावती करावयास मशारनिल्हेनीं आपाजी लक्ष्मण यांचे हवालीं केली, ती घेऊन गेले. बापूजी गोपाळ साने येऊन, मशारनिल्हेशीं च्यार घटका बोलून गेले. मशारनिल्हे व कपतान क्लोज सायंकाळीं गारपीरचे लष्करांत जाऊन आले. मुंबई व हैदराबाद व श्रीरंगपट्टण व बऱ्हाणपुरचीं पत्रें डाकेबरोबर आलीं. जाब रवाना जाले. भाऊ भिडे यांजकडून एक तबक भरून आंबे मशारनिल्हेकडे आले.

२

दोन रोजां वर्तमान निवेदन् जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Bayaji Naik in this news-letter mentions the names of the persons that had come to visit Elphinstone and gives an account of their interviews.*

No. 59] *[30-7-1813*

पैवस्ती छ १ साबान
मुक्काम चिखलठाण
सुा आर्बा.

श्री

साहेब साहेबाचे सेवेसी आज्ञांकित बयाजी नाईक विज्ञापना. मिस्तर एल्फिन्स्टन वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर यांजकडील दिनचर्येची बातमी.

छ २ रजबची. मशारनिल्हे प्रातःकाळीं गणेशखिंडीपावेतों जाऊन सहल करून आले. बापूजी गोपाळ साने तिसरे प्रहरी येऊन मशारनिल्हेशीं

दोन घटका बोलणें करून गेले. करवीरकरांकडील श्वरूपजी हुजरा व रामचंद्र परशराम पटवर्धन यांजकडील बाळकृष्णपंत व प्रभाकरपंत जोशी व चिंतामणराव पटवर्धन यांजकडील सदासिवपंत ऐसे वेगळाले येऊन कपतान क्लोज यांसीं बोलून गेले. रूपराम चौधरी यांजकडील कारकून येऊन खुसरवजी मोधी यासी बोलून गेले. खुसरवजी मोधी बंगल्यांतून निघोन हरेश्वर साहूकार यांचे घरात जाऊन दोन घटका बोलून आपले घरास गेले. त्रिंबकजी डेंगळे बोलण्यांत होते. कपतान फोट व हुरमोजी शेट प्रातःकाळचे बारा घटिका दिवसास शुक्रवारचे सरकारवाड्याजवळ तालीमखान्यांत गेले. कपतान यांणीं भोजन करून श्रीमंत महाराज साहेबाजवळ दोन घटिका बोलणें केलें. सरकारांतून कपतान यांस दोन हजार रुपये बक्षीस दिल्हे. नंतर सरकारआज्ञा घेऊन ठिकाणास आले. मुंबई व हैद्राबाद व श्रीरंगपट्टण व बऱ्हाणपुरचीं पत्रें डाकेबराबर आलीं. जाब रवाना झाले. शामराव रास्ते यांचा खिजमतगार लयनेंत दारू पिऊन मशारनिल्हेकडील रावजी कारकून यांचे घरांत तिसरे प्रहरीं जाऊन कांहीं पांघरुणें चोरून घेऊन चालला. सबब शिपायांनीं धरून कपतान हेर यांजवळ आणिला. कपतान यांनीं बांधून कोरड्यानें मार देऊन नदीपार करून दिल्हा. गारपीरचे लष्करांतील पलटणें रात्रीं तयार असतात म्हणोन बातमी आहे.

सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Bayaji Naik writes news that the English detachment stationed at Garpeer was kept ready by night. The names of the persons who obtained audience of Elphinstone are also mentioned.*

No. 60] [*30-7-1813*

पैवस्ती छ १ साबान श्रावण
मुक्काम चिखलठाण सुरु सन
आर्बा अशर

श्री

साहेब साहेबांचे सेवेसी आज्ञांकित बयाजी नाईक विज्ञापना. मिस्तर एलफिन्स्टन वकील दिंमत इंग्रज कलकत्तेकर यांजकडील दिनचर्येची बातमी.

छ ८ रजबची. निपाणीकर यांजकडील आपाजी लक्ष्मण व लिंगोपंत तिसरे प्रहरीं येऊन मशारनिल्हेशीं चार घटका बोलणें केलें. करवीरकरांकडील श्वरूपजी हुजरा येऊन बसला होता. त्यास मशारनिल्हेनीं बोलाविलें.

त्याचें एक घटका बोलणें जाहालें. नंतर आपाजी लक्ष्मण व लिंगोपंत निघोन खुसरवजी मोदी यांसीं बोलून गेले. मागून श्वरूपजी गेला. शिरूर नजीकचे लष्करांतून दोन पलटणें मशारनिल्हेनीं आणविलीं. तीं पलटणें दोन व पन्नास तुरुकस्वार व घोड्याचे गाड्यावरील दोन तोफा ऐसे येऊन मौजे येरवडेनजीक मुकाम केला आहे. त्या पलटणांतील कपतान मेन बंगल्यांत येऊन मशारनिल्हेस भेटले. पलटणें उदईक येरवड्याहून निघोन गारपिरास येणार. सबब खडकीचे पुलावरून लाकडी पुलानें शहरांतून जावयाचा रस्ता दाखवावयाकरितां मशारनिल्हेनीं आपलेकडील एक जासूद व सरकारचा जासूद एक एकूण दोन जासूद येरवड्यास पलटणांत पाठविले. गारपीरचे लष्करांतील गाडदी असामी साठ दररोज बेटांत बंगल्यानजीक रात्रीचे चौकीपाहाऱ्याकरीतां येत होते, ते छ ७ मिनहूपासून लष्करचे सरदारांनीं पाठविलें नाहींत; व सरकारी पलटणांतील नवे लोकास कवाईत शिकवावयास गारपीरपैकीं गाडदी होते तेहि गारपिरास नेले. गारपीरचे पलटणांत दररोज रात्रीं तयारी असती. सबब नेमणुकीस लोक होते ते एके जागां जमा केले. गोपाळ खंडेराव रास्ते यांजकडील श्रीनिवासपंत व जनार्दनपंत व विश्वास खंडेराव रास्ते यांजकडील बाळाजीपंत नातू व प्रभाकरपंत जोशी व गोपाळपंत रानडे ऐसे येऊन मोधीसीं बोलून गेले. मुंबई व हैदराबाद व श्रीरंगपट्टण व ब-हाणपुरचीं पत्रें डाकेबराबर आलीं. जाब रवाना जाले. श्रीमंत राजश्री आपासाहेब यांजकडील चिंतोपंत जोशी व माधवराव रास्ते यांजकडील गोपाळपंत व आंगरे यांजकडील बापूभट सोमण ऐसे वेगळाले येऊन माघारे गेले. मशारनिल्हेची गांठ पडली नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Bayaji Naik reports that the English have brought over two Companies from Sirur to Poona. The names of the persons who interviewed Elphinstone in the course of the day are mentioned.*

No. 61] [*30-7-1813*

पौ। छ १० साबान
श्रा शु।। १२ सन आर्बा
अशर शके १७३५

श्री

सेवेसी विनंती सेवक रघुनाथ रणसोड मुकाम बंदर मुंबई कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १ माहे शाबानपावेतो स्वामीचे कृपावलोकनें सेवकाचें

वर्तमान यथास्थित आहे विशेष. येथील अखबारींत बंदर मजकुरची बातमी नेहमी सेवेसी लिहून पाठवीत आहेच. अलीकडील बातनी आबरक्रांबी विलायेतेहून सेनापतीचे कामावर मुंबईस पाठविले होते; नंतर त्यांस मदरासेची सेनापति देण्याविशी हुकूम आला; तेव्हां येथून मद्रासेस गेले तो मजकूर पेशजीचे अखबारींत सेवेसी लिहिला गेलाच आहे. अलीकडे त्यास मदरासेची जनरालगिरी देण्याविशी हुकूम आला. त्याजवरून जनरालगिरीवर कायम होऊन तेथील जनराल पहिला सर बार्लो म्हणून होता तो विलायेतेस जाणार आहे, व आबरक्रांबी यांसी मुंबईचे सेनापती होती ते मदरासेस गेले; तेव्हां त्यांचें ठिकाणीं येथें दुसरा सरदार विलायेतेहून रवाना जाहाले. त्यास अमारिक टोपीकर यांची गांठ पडोन, लढाई शिकस्त करून, आपले मुलकांत धरून नेले, ते व मेस्त्र फरबस इंग्रज साऊकार याचा माल विलायतेहून भरून मुंबईस येत होते, त्यांस समुद्रांत वादळ पडून, जहाज वादलानें हाणून, बतामीचें+ बंदरांत आणून टाकिलें. तें जहाज फुटलें, तेव्हां जहाजावरील दर्यावर्दी व खलाशी व कपितान यांणीं गळबतांतून मात्र नख्त ऐवज काढून दुसरें गलबतावर घालून घेऊन जात असतां आपसांत खटला करून दर्यावर्दी यांणीं कपितान यांसीं ठार मारून टाकिलें. हें वर्तमान बतावींचे अमलदार यांसीं समजतांच त्यांणीं दर्यावर्दी वगैरे धरून जाणून अटकाव करून ठेविले आहेत. याप्रमाणें बंदर मजकूरची बातनी आहे. सेवकास आढलला मजकूर विनंतीपत्रीं सेवेसी लिहिला आहे. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*This is a news-letter which gives an account of an English ship laden with cargo being damaged by a storm. The names of the transferred military officers of Madras are given.*

No. 62] *[23-9-1813*

पैवस्ती छ २७ रमजान
भा सन आर्बा
मुक्काम फुलगांव

श्री

साहिब साहेबांचे सेवेसी आज्ञांकित बयाजी नाईक विज्ञापना. मिस्तर एल्फिन्स्टन वकील दिंमत इंग्रज कलकत्तेकर यांजकडील दिनचर्येची बातमी :—

छ २९ साबानची राजश्री बापूजी गणेश गोखले यांणीं मोरो बाबूराव फडणीस यांचे बागांत मशारनिल्हेस मेजमानी केली. सबब मागील एक प्रहर दिवस राहातां मशारनिल्हे व कपतान क्लोज व कपतान हेट व खुसरवजी मोधी वगैरे मंडळी निघोन लाकडी पुलावरून बागांत गेले. बंगल्यांत बिछाईत केली होती.

+ Bantam ? Batavia ?

7038

तेथे गोखले बंगल्याबाहेर पुढें येऊन सलाम करून बिछाइतीवर घेऊन गेले. खैर आफीयेतचें बोलणें जाहालें. रमी कळवांतीण इचा नाच दोन घटका पाहून त्रिवर्ग टोपकर उठोन बंगल्याखालील दालनांत जाऊन भोजन केलें. गोखले परामर्षास जवळ बसले होते. भोजन जाहाल्यावर मागती बिछाइतीवर आले. दोन घटका नाच जाहाल्यावर गोखले यांणीं पोषाख व जवाहीर दिल्हें. बितपशील.

खुद वकील मवसुफ यांस

३ शिरपेंच व जेगा व कंठी मोत्याची एक पदरी ऐकूण रकमा.

१ पोशाख सनगें

१ तिवट पैठणी लाल

१ शालजोडी गुल अनार

१ किमखाप भरगच्ची हिरवा

२ महमुद्या थानें

——

५

खुसरवजी मोधी यांस तिवट पैठणी व शालजोडी व महमुदी व किनखाप मिळोन चारा सनगाचा १ पोशाख दर असामीस दुपटा व तिवट एकूण दोन सनगेंप्रमाणें

१ बापूजी गोपाळ साने सनगें २

१ शामजी खंडेराव सनगें २

१ सदानंद डाकवाले सनगें २

——

३

कपतान क्लोज यांस

१ शिरपेंच

१ पोशाख तिवट पैठणी व शालजोडी व किनखाप थान व महमुदी मिळोन सनगें चार

कपतान हेर यांस तिवट पैठणी व शालजोडी व किनखाप निमें व महमुदी ऐकूण साडेतीन सनगाचा १ पोशाख. दर आसामीस तिवट व शालजोडी व महमुदी व किनखाप निमें ऐकूण साडेतीन सनगेंप्रमाणे पोशाख

१ हुरमोजीशेट सनगे ३॥

१ महंमद हतीफ मुनशी ३॥

१ खंडो यादव सनगें ३॥

——

३

सेवकाकडील दाजी त्रिंबक यांस दुपट्टा व तिवट एकूण दोन सनगांचा १ पोशाख

येणेप्रमाणें अकरा आसामीस देऊन फुलाचे हारतुरे गजरे व अत्तरगुलाब विडे दिल्हे. साहा घटका बैठक जाहाली. नंतर निरोप घेऊन मशारनिल्हे मंडळीसुध्धां गेल्यामार्गें ठिकाणास आले. मोधी मागें राहिले होते, ते कांहींसें बसून निघाले. ते घरास गेले. गोविंदबक्ष दिंमत नवाब यांजकडील मिर इभराम येऊन तिसरे प्रहरीं मशारनिल्हेशीं बोलून गेले. निपाणीकर यांजकडील आपाजी

लक्ष्मण व लिंगोपंत सायंकाळीं येऊन मशारनिल्हेशीं बोलून गेले. करवीरकरांकडील सरूपजी हुजरा व आंगरे यांजकडील कारकून सलाम करून तिसरे प्रहरीं गेले. बोलणें जालें नाहीं. मुंबई व हैदराबाद व श्रीरंगपट्टण व बऱ्हाणपुरची पत्रें डाकेबराबर आलीं. जाब रवाना झाले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Bayaji Naik gives an account of the dinner party given by Bapu Gokhale in honour of Elphinstone at the Garden of Moroba Dada.*

No. 63] [*23-9-1813*

पौ छ २० सवाल
आश्विन सन आर्बा

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री
बाबासाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक विसाजी देवराव देशपांडे मुा कोपरगांव कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २७ रमजानपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरोन सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. बारगीर मंडलीची कवाईत करून पाहात असावी म्हणोन आज्ञा. त्याजवरून छ मजकुरी पागा निाा रो नारो विष्णु आपटे याजकडील पागेतील बारगीर मंडली कवाइत पाहावयास बाहीर आलो. त्यात बाहादरखान व मुर्तुजाखान दोघे बापलेक आडहत्यारी आहेत, त्यास बंदुखी बांधाव्या म्हणोन सांगितले. त्यांचे म्हणे पडले की आम्हास बंदुख बांधावयाची नाही. मर्जीस आल्या चाकरी ठेवावे, नाही तर निरोप द्यावा. त्यावरून त्यास सांगितले की तुम्ही अडहत्यारी म्हणता त्यास तरवारेची कवाईत दाखवावी. त्यांचे म्हणे पडले कीं मजवळ तरवार नाही, मी सुरी लकडी बाळगितो. त्यास सांगितले की सुरी बाळगिता त्याची कवाईत दाखवावी तेव्हा सुरी काढोन आपल्या लेकावर मारावयास धावला, तेव्हा अली भालदार व जिवाजी सोनवलकर दिा विठोजी कारके दरम्यान धाऊन मुर्तुजाखान यास दूर केले. हली मुर्तुजाखान याचे बोलणे दाहा रुपये चाकरी कोण करितो? शंभर रुपये रोज दिल्हे तरी कोपरगावी राहणार नाही. म्हणोन सांगितल्यावरून निरोप दिल्हे आहे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Deorao Deshpande of Kopargaon reports to the Peshwa the circumstances under which he had to dispense with the services of one Murtajakhan.*

No. 64] [1-10-1813

श्री

राजश्री त्रिंबकजी डेंगले गोसांवी यासी

ॐ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री बाजीराव रघुनाथ प्रधान आसीर्वाद सु॥ आर्बा अशर मया तैन व अलफ. श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामी व श्रीमंत माहाराज मातुश्री माईसाहिब व श्रीमंत सौ मातुश्री बाईसाहेब व श्रीमंत राजश्री भाऊसाहेब व आपासाहेब व उभयेताच्या स्त्रिया यांस विजयादशमीचे पोषाक पाठविले आहेत, त्यांची यादी आलाहिदा असे त्याप्रो जिकडील तिकडे पावते करून उत्तरे घेऊन पाठवणे व तुम्हांस विजयादशमीचा पोषाख सनगे सुमार

१ तिवट
१ सेला
१ महमुदी
॥. किमखाप

३॥

येकूण साडेतीन सनगे पाठविली आहेत. घेऊन उत्तर पाठविणें. जाणिजे छ ९ सवाल * आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa sends dresses to Trimbakji Dengle and asks him to present the robes to the king and other members of the royal family on the occasion of the Dassara day.*

No. 65] [25-11-1813

पौ छ ९ जिल्हेज
मार्गशीर्ष सन आर्बा

श्री

सेवेसी विनंती सेवक रघुनाथ रणसोड मुकाम बंदर मुंबई कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १ माहे जिल्हेजपावेतों स्वामीचे कृपावलोकनें सेवकाचे वर्तमान येथास्थित आहे विशेष. दारूविशी मेस्त्र इलफिष्टण यांची चक्ती जनराल यांसी पाठविली, ती त्यांस देऊन दारूविशी विचारिलें. त्यांणीं पस्तीस हजार रुपयांची पेशवे यांसी द्यावी लागती म्हणोन दारूचे कारखानदार मेस्त्र जुनम यांसी परवानगी सांगितली. त्याणें कौशल ठराऊन सेवकास पहिले

भेटीस उत्तर सांगितलें कीं दारू देऊन तुमची रवानगी सत्वरच करितों. दोहो दिवशीं यावें म्हणून बोलिला. त्याजवरून दोन दिवस गेल्यानंतर मागतीं जाऊन पुशिलें, त्याचें उत्तर जहालें कीं झाडेनशीं दारू मिळत नाहीं. निमशिम देऊं, याप्रमाणें बोलले. त्याजवरून तिसरे वेळेस गेलों तेव्हां उत्तर केलें कीं दारू मुंबईचे कारखान्यांत नाहीं. तीन हजार पिंप बंगालेस देवितों. अशा तीन बैठकेस तीन उत्तरें सांगितलीं. त्याजवरून त्याचें आमचें बोलणें बहुत प्रकारें जाहालें, त्या वेळेस करार केला कीं च्यार दिवशी यावें; तुम्हांस निखालस जाबसाल सांगतों; त्याजवरून च्यार दिवशी पुन्हा गेलों तों गांठच पडली नाहीं. आज उत्तर सांगितलें कीं येथील कारखान्यांत दारू नाहीं. येविशी मेस्त्र इलफिष्टण यांसी पुणियास लिहिलें आहे, तेथें ठरोन उत्तर येईल त्याप्रमाणें तुम्हांस सांगूं. तुम्ही आपले खावंदांस ल्याहावें म्हणोन सांगितल्यावरून विनंती लिहिली आहे. इलफिष्टण याणें तेथें खास ठराऊन लिहिल्याखेरीज दारू प्राप्त व्हावयाची कठिण. त्यास तेथें ठराव होऊन दारू देण्याविशी मेस्त्र इलफिष्टन यांचें पत्र यावें, अगर पुढें कसें करावयाचें त्याची आज्ञा यावी त्याप्रमाणें करीन. अलीकडील बंदर मजकुरीं बातनी तीन विलायती जाहाजें दाखल जाहालीं, त्यांत माल भरून आला आहे. तांबें, शिसें व लोखंड वगैरे असें बंदरमजकुरीं आलें आहे; व येथून दारूचीं पिंपें सुमार ५०० पांचशें व गोळ्या ऐसें पणवेलीचे मार्गेहून घोडनदीवर पलटणाचे खर्चास रवाना जाहालें आहे; व दुसरा जंगी जिन्नस गुजराथेस जावयास गलबतावर चढविला आहे. याजवर सेवकास बातमी आढळली म्हणजे सेवेसी लिहून पाठवितों. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Raghunath Ranchhod, the Peshwa's agent stationed at Bombay, communicates that the General is not prepared to comply with the request of the Peshwa for a supply of gunpowder and adds that three foreign ships laden with cargo have arrived from England.*

No. 66] *[25-12-1813*

पौ छ ११ मोहरम
पौष सन आर्बा
मुा पुणे

श्री

सेवेसी विनंती सेवक रघुनाथ रणसोड मुकाम बंदर मुंबई कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १ माहे मोहरमपावेतों स्वामीचे कृपावलोकनें सेवकाचें वर्तमान यथास्थित आहे विशेष. पेशजीं साहेबांचें सेवेसी विनंतीपत्र

7042

पाठविलें आहे त्याजवरून दारूचें प्रकर्ण व बातनीचा मजकूर सेवेसी निवेदन जाहलाच असावा. अलीकडील बातनी आहे कीं राजश्री गंगाधरपंत शास्त्री हल्लीं गायेकवाड यांची दिवाणगिरी करितात, ते बडोद्याहून मुंबईस यावयासी निघाले आहेत. येथील मुख्याची भेट घेऊन हुजूर जाणार आणि मशारनिल्हे गायेकवाड संमधें सरकारांत विनंती करून बंदोबस्त करून घेणार असा बेत आहे म्हणून बातनी. याजवर सेवकास बातनी आढळली म्हणजे सेवेसी विनंती करितों. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*The writer reports that Gangadhar Shastri, Diwan of the Gaikwad, has left Baroda for Poona and will have an interview with the Governor at Bombay on his way.*

No. 67] *[9-2-1814*

पौ छ ९ रोवल

फाल्गुन सन आर्बा

श्री

सेवेसी विनंती सेवक रघुनाथ रणसोड मुकाम बंदर मुंबई कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १७ माहे सफरपावेतो स्वामीचे कृपावलोकने सेवकाचें वर्तमान येथास्थित आहे विशेष. बंदर मजकूरचे अखबारीचें विनंतीपत्र जासुदासमागमे सेवेसीं लिहून पेसजीं पाठविलेंच आहे. राजश्री गंगाधरशास्त्री यांस निकडीनें पुण्यास जाऊन पोहचावें म्हणोन येथील मुख्याची ताकीद जाहाली, त्याजवरून माघ वद्य ४ भोमवारीं निघोन पुण्यास जावयासी गेले. कारनल कारानिक कपतान बडोदकर याचा मार्ग मशारनिल्हे पाहात होते. ते येऊन उभयेताचीं बोलणी जाहालीं. त्यांतील हांसील पुण्यास गेल्यावर सरकारांत गायेकवाड प्रकर्णी बोलणी होऊन, संकेताप्रमाणे उलगड्यांत आणावे. कमपेश जाबसाल पडल्यास येथें लिहून पाठवीत जावे. त्याचा पुरावा येथून होत जाईल. याप्रमाणें घांट ठराऊन महिना पंधरा दिवस तेथील बोलणी समजण्यांत येत तोंपर्यंत करनेल याणें येथें असावें असा बेत ठराऊन, शास्त्री निघोन गेले. करनेल येथें आहेत. दुसरा मजकूर आबरक्रांबी जनराल मदरासेस होते त्याचे चित्तांत विलायथेस जावयाचे, याकरिता विलायथेहून त्याचे जाग्यावर दुसरा जनराल ईस्लुप+ म्हणोन नेमिला आहे. इतक्यात येऊन पोहचेल. यावर मजकूर नवल विशेष आढळेल ते शेवेसीं लिहीत जाईन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Raghunath Ranchhod writes that Gangadhar Shastri, after his interview with the Governor and with Col. Carnac, proceeded to Poona.*

+ Hislop.

No. 68] [24-2-1814

श्री

साहेब साहेबाचे सेवेसी आज्ञांकित बयाजी नाईक विज्ञापना. मिस्तर एल्फिनूस्टन् वकील दिंमत इंग्रज कलकत्तेकर यांजकडील दिनचर्येची बातमी.

१ छ ३ रबिलोवलची, मशारनिल्हे प्रातःकाळीं गणेशखिंडीपावेतों जाऊन सहल करून आले. गंगाधर शास्त्री चिंचवडाहून निघोन दोन प्रहर दिवसास बंगल्यानजीक आले. गाईकवाड यांजकडील दोनशें स्वार व एक हात्ती आंबारीचा व एक खुला एकूण दोन हात्ती वगैरे लवाजिमा जिलबीचा बराबर होता. बंगल्याचे दरवाज्याबाहेर घोड्यावरून उतरून एक घटका उभे राहून पन्नास असामी भले लोक बापू मैराळ यांजबरोबर अगोधर पुढें पाठवून मशारनिल्हेस भेटविलें. मागून जातीनें बंगल्यांत आले. पुढील बंगल्याचे दालनांत मशारनिल्हेनीं, खुरच्याची बिछाईत करविली. दालनाचे जोत्यापावेतों मशारनिल्हे पुढें आले. तेथें शास्त्री याणी हातास हात लाऊन मशारनिल्हे व कपतान क्लोज व मिस्तर रसेल व कपतान हेर व खुसरवजी मोधी यांस भेटले. मशारनिल्हेजवळ खुर्चीवर बसून एक घटका खैरआफीयतचें बोलणें जालें. आनंदराव गाईकवाड यांणीं मशारनिल्हेस पत्र पाठविलें, ती थैली एक व मुंबईकर जनरल वगैरे यांचे इंग्रजी पत्रांचे तीन लाखोटे ऐसे शास्त्री यांणीं मशारनिल्हेजवळ दिल्हे. मशारनिल्हेनीं अत्तर गुलाब विडे मंडळीस देवून आपले हातें बापू मैराळ यांस एक डबा व शास्त्रीबावा यांस एक डबा भरून विडे दिल्हे. नंतर निरोप घेऊन निघाले ते लाकडी पुलाजवळ डेरा दिल्हा आहे तेथें राहावयास गेले. आंगरे यांजकडील बापूभट सोमण प्रातःकाळीं मशारनिल्हेशीं बोलून गेले. करवीरकरांकडील मोरोपंत वगैरे तीन असामी कारकून व प्रभाकरपंत जोशी ऐसे कपतान क्लोज यांसीं बोलून गेले. श्रीमंत राजेश्री आपासाहेब नाशकास जावयाकरितां निघोन वाकड्याचे बागांत राहिले. सबब सरकारांतून दोनशें स्वार व पायदळ देवावें म्हणून त्यांजकडील जासूद येऊन मोधीस सूचना करून गेला. त्याजवरून दोनशें स्वार व दोनशें पायेचे लोक बरोबर द्यावयाचें ठरलें आहे, त्याप्रमाणें द्यावें म्हणून मोधीनीं सरकारचे जासूदाबरोबर धोंडो मल्हार यांजकडे निरोप पाठविला. नंतर तिसरे प्रहरीं चिंतोपंत जोशी व रावोपंत वेव्हारे येऊन मशारनिल्हेशीं बोलून गेले. सावनूरकर नवाब यांजकडून मशारनिल्हेशीं पत्र आलें. ती थैली त्यांजकडील कारकून येऊन मशारनिल्हेस पावती करून गेला. मुंबई व

हैद्राबाद व श्रीरंगपटण व बऱ्हाणपुरचीं पत्रें डाकेबराबर आलीं. जाब रवाना झाले. माधवराव रास्ते व मिर इभराम व गोपाळराव रास्ते व गणपतराव पटवर्धन व सुरापूरकर व शिवराव हरि झांशीकर व गणपतराव परभु व जिऊबाई भानु व रामचंद्र परशराम पटवर्धन यांजकडील कारकून ऐसे येऊन माघारे गेले. मशारनिल्हेची गांठ पडली नाहीं.

सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer Bayaji Naik in communicating the daily happenings at the Residency reports that Gangadhar Shastri, Diwan of Baroda, had his first interview with Elphinstone. The names of other visitors are also mentioned.*

No. 69] [*18-2-1817 ?*

मुक्काम घोडनदी

१ वैजापूरचे मुक्कामाहून तोफखाना व मोधीखाना बोलाविला; व किनेऊ[1] व मेणसाहेब माघारे येणार.

१ बालापूरची पलटणे पंधरा कोश पुढें गेली. पेंढारी यांचा दंगा भारी आहे. पंधरा हजारांचा जमाव त्यांचा आहे.

१ जालन्यावर छयावणीची तयारी होत आहे.

किता अखबार

१ पुण्यातील ग्रहस्तानीं कृष्णराव याजबरोबर निरोप पाठविला कीं त्रिंबकजी फौज ठेऊन प्रांत लुटून आणखी फौज जमा करणार. हे सरकार मनावर धरीत नाहीं तेव्हां आंतून इतला आसेल असे वाटते.

१ भाऊ व दीक्षित यांचे सख्य फोटसाहेब याणी केले, आणा भाषा जाली. भाऊनी दीक्षिताचे व अलफइस्टन याचे सख्य करून द्यावें, येविसी भाऊकडील कारकून व कृष्णराव व फोटसाहेब याणी बोलणे केलें. थोरले साहेबाचे म्हणणे दीक्षितानीं इमानेइतबारे सरकारकाम करून आम्हास कलवीत जावे, याप्रमाणें कबूल असल्यास त्याची आमची भेट होईल.

१ दीक्षित याणी आलफईस्टीन यास मेजवानी केली. त्यासमंधें कोणास काय दिल्हे त्याची याद आलाहिदा आहे.

१ भाऊचे व दीक्षिताचे बोलणे जाले, त्याची याद अलाहिदा आहे.

---

1 Kennaway.

ग्वालेर

१ येमुनातीरीं इंग्रजानीं वाटबंधा करावयाबा॥ तुरुबस्वार ठेविले आहेत.

१ ग्वालेर सुभ्याचे आमदानीच्या यादी बायजाबाईस मनसुखराव याणी समजाविल्या. त्याजवरून गैरराबता करून बाई व आपण बसोन मनसुखराव याजकडील यादी पाहिल्या. याप्रों पारखाकडे माहालचा वसूल आला म्हणोन सांगितले.

१ इंग्रजाकडील तीन पलटणे हतरेसेस गेली. आठ कोशावर मुक्काम करून आहेत. हतरसकराकडील वकील इंग्रजाकडे आला आहे.

१ बालोजी इंगले यांस हलकारा बोलावणेस पाठविला. त्याचे उत्तर आले कीं मी चाकर होलकराचा, बाईस पुसोन त्यांचे विचारे येईन, परंतु प्रथम छ १ रबिलाखरी लष्करात आले, ते वेलेस सामोरे जाऊन भेट जाली आहे.

१ महमुदशहा बादशहा पिसोरेवाला अजारानें हैराण आहे. त्याचा विजीर फत्तेखा आटकेजवल येऊन सिखासी सलुक करावा म्हणोन वकील रवाना केला.

१ छितू पेंढारी याजवर छापा घालावयास पलटणे इंग्रजाकडील नर्मदा उतरून आली, ही बातमी कलताच पेंढारी कूच करून सुजालपुराकडे गेले. पलटणे सत्वासचे मुक्कामी आहेत.

¶*This is a news letter which supplies news items to the Peshwa from several quarters in connection with the activities of the Pindaris, the English and the Maratha Sardars.*

No. 70] [*7-4-1814*

श्रीभास्कर

राजश्री त्रिंबकजी पा॥

तात्या गोसावी यास

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो कासी सिवराम बंदरे रामराम विनंती. येथील कुशल ता॥ छ १५ राखर गुरुवारपर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंत माहाराज मातुश्री माईसाहेब यांच्या आज्ञा जाहाल्या आहेत त्याची तपसील कलमे

१ नवा राजवाड्यात दिवाणखान्यात तख्त आहे, तेथे आमचा दाहिजा चौकीस आहे व तख्तापुढी खोल्यात दोन जामदारखाने ठेविले आहे(त), त्यास मातुश्री माईसाहेब व माहाराज याणी आज्ञा केली की, खाली माजघरचे माहालात ढेकूण जाहाले आहेत तरी तख्त व जामदारखाने खाली आणावे व चौकी खाली आणावी आणि दिवाणखाना रिकामा करून द्यावा.

+ Hathras.

ते समई मी विनती केली की माहाराज तख्ताजोगी दुसरी जागा नाही. आहे तेथे बरे आहे व जामदारखाने ठेवावयाजोगी दुसरी नव्या वाड्यात जागा नाही व दिवाणखान्यातहि ढेकूण बहुत पहिल्यापासून आहेत हे ध्यानांतच आहे. त्यापेक्षा तख्त काढावयाचे कारण नाहीं. तेव्हा बहुतच अग्रह पडला. ते समई विनंती केली की, माहाराज मी हा मार पुणियास लिहितो. तेथे श्रीमत राजश्री भाऊसाहेब[१] याचे कानावर घालून उतर येईल त्याप्रो विनंती करीन. नंतर आज्ञा जाहाली की, उतर किती दिवसात आणविता ? नंतर विनंती केली पंधरा दिवसी आणवितो. येणेप्रो येथे (मार) * * * * * दिवाणखान्यात तेरा चौदा खिडक्या आहेत. राजवाड्यात चौकी म्हणावयास तेवढीच आपली आहे. ती उठवावयाची सोय दिसत नाहीं. नंतर उतर येईल त्याप्रो करीन. कलम.

१ नव्या राजवाड्याचे पश्चमेस झडीचे सोप्यानजीक धुदा नाइकीण कलवतीण इचे घर होते. ती कलवंतीण कैलासवासी माहाराज याणी ठेविली होती. ते घर हाली सुभ्याकडे आहे. त्यात चौकी आहे. अजीराचा पाहारा म्हणतात. राजवाड्यास लगत राजवाड्याची व पाहाऱ्याची भिंत मात्र मध्यें. पेशजीचे घर हुजरातीकडील होते. त्यास हाली मातुश्री माईसाहेब याचे म्हणणे पडले आहे की, हाली कलवंतीण राजवाड्यात आत आहे तरी मुसलमान माणसाची सोय पडत नाही. तरी पेशजी आमचे घर रिकामे करून देणे. तेव्हा मी विनंती केली की, माहाराज आज्ञेप्रो घर देणे, परंतु कलवतीण इणे बाहेर राहावे, बाहेरून वाटेने वागावे. तेव्हा माहाराज याचे म्हणणे पडले की, मागील घर आमचेच आहे त्यापेक्षा आम्ही राजवाड्यात बाग आहे त्या भितीस चौकट लाऊन वाट आतून जाण्यायेण्यास कलवंतिणीस करून बाहेरील वाट बुजऊन टाकू. तेव्हा मी विनंती केली की, आतून वाट पेशजीपासून आहेच, परंतु हाली * * * पाहारा आहे. या वहीवाटीप्रो केल्यास पाहारा रिकामा करून आपले घर देतो. आम्ही दुसरा पाहारा त्या सेजारी बाधू. व्यत्यय काय आहे. ते समई आज्ञा जाहाली की, कलवंतीण लोकाच्या द्रिष्टीस पडून बाहेरून वागावयाची सोय पडणार नाही. बाहेरील चौकटीस भित घालून दरोबस्त बुजऊन आतील चौकट मोकली करू. याप्रमाणे जाहाल्यास आमचे घर आम्हास द्यावे. आत मुसलमान * * * मुले आडचण जाहाली आहे. ते समई विनती केली की, पाहारा नवा करावा लागतो, हा मार

---

१ सदाशिव माणकेश्वर.

पुणियास लिहून उतर आणोन विनंती करीन. त्यास याचे कसे करावें. पाहारा दुसरा करून त्याचे घर रिकामे करून द्यावे किंवा बाहेरील वाट बुजविणार आतून पाडणार याचे कसे करावे, ही आज्ञा लिहावी. येथे निकड बहुत आहे. कलम

१ कैलासवासी शाहू माहाराज याचे श्रात्ध वैशाख शुा ९ नवमीस आले आहे. ते दिवसी आकरा पितर मराठे लागतात व दाहाच मराठणी जेवावयास येतात व दाहा पाच भोसले खाल्हून येतात. त्यास सालाबादप्रो श्रात्धाचे दिवसी यावयाचे आसल्यास श्रात्ध होईल, त्याचे कसे काय ते आताच सागणे म्हणौन आज्ञा जाहाली. त्याजवरून विनंती केली की, पुणियास लिहून श्रीमंत राजश्री भाऊच्या कानावर घाल्हून उतर येईल त्याप्रो विनंती करीन. येणेप्रो येथे बोलणे पडले आहे. त्यास सालाबाद पितर आकरा येत असतात त्यास वर घ्यावयाची आज्ञा आली पाहिजे. सवाष्णी मराठणी येणार त्यास त्याचे झाड्याची कटकट पडती. झाडा निखालस होत नाही. घेतला असता मर्जी राहात (नाही). याचे मनन होऊन आज्ञा होईल त्याप्रो करीन. भोसले दाहा पाच सालाबादप्रो वर घ्यावे किंवा न घ्यावे याची आज्ञा लिहावी. आज्ञोतर येईल त्याप्रो बेत करावयास ठीक पडेल. कलम

१ छ १३ राखरी मगलवारी मातुश्री साहेबजीचा वाखा बहुत जाहाला. याजमुळे मी खाली जाऊन रंगमाहालात जाऊन रात्रौ राहिलो. च्यार प्रहर वैद्य दोन च्यार आणून उपाय केले. काले टाकलीचे तेल राजश्री आपाजी पा पानसरे याणी दिल्हे व दोन च्यार सिपाई बदोबस्तास दिल्हे. पायास गुडघ्याखाली कला बहुत लागल्या आहेत. सिरागत वायूची भावना वैद्य बोलतात. ज्वरहि आहे. काहिली बहुत. हा मार मातुश्री माईसाहेब यास निवेदन केला. त्याणी बायको समाचारास पाठविली होती. त्यास मातुश्री माईसाहेब याचे म्हणणे येक व * * * स साहेबजीस आणून भेटवावे व साहेबजीचे म्हणणे की, मी यातून वाचेन याचा भरवसा काय? त्यास माझी येक वल भेट करावी. हा मार आपाजी पा यास सागितला. त्याचे म्हणणे की, दुखण्याचे काम परिणाम काय होईल याचा भरवसा कोणास? त्यास येकवेल वर नेऊन भेटऊन आणावी. त्यास हाली प्रकृत फार बिघडली आहे. काही बरी जाहाली * * * * * खाली पोहचवितो. येविसी पेशजी मार येक दोन वेल लिहिला परंतु आज्ञोतर काहीच आले नाही. हाली येणेप्रो मार आहे. कलम

१ माहाराज याचे जामदारखान्यापैकी किरकोळ मोडके दागिन्याचे रुपे शंभर रुा भार निघाले. त्याचे चुनाल च्यार करावयाची आज्ञा जाहाली आहे. आज्ञेप्रो सोनार बसऊन सुभ्याचे वाड्यातून करून देतो. कलम

१ आपण आज्ञा केली त्या धोरणाप्रो चाकरी करीत आहे. पेश(जी) (आ)ज्ञापत्र आले त्यात साहेबानी (लि)हिले की, तुमचे बारीक मोठे गिल्ये बहुत आले. त्यास सावधपणे चाकरी करणे. त्यास साहेबाचे आज्ञेप्रो धोरण ठेऊन चालत आहे. सरकारकामामुळे सोबतीची मंडळी व राजवाड्यात सर्वानी भलेपणे ठेऊन मजकडे वाईटपणा दिल्हा आहे तरी सरकारकामामुळे वाईटपणा आल्यास भीत नाही. बेमुरवत सरकारकाम करीत आहे. मार्गान कोणी चालले त्यास * गो * आहे. गैरमार्ग सरकार कामात कोणी केल्यास त्याचे चालू देत नाही. त्याणी गैरवाजबी माझा गिला साहेबास लिहिला अस्ता साहेब वाजबी पाहाणार समर्थ आहेत. मी गैरवाजबी चालतो असे मजकडे लागू जाहाल्यास स्वाम पारपत्य करणार समर्थ आहेत. फार काय लिहू. कलम

६

येकूण कलमे साहा लिहिली आहेत. त्याची उतरे द्यावयास सत्वर आज्ञा पाहिजे. जाबसाल * * सिवाय वागणुकेस ठीक पडत नाही. येथे काय बोलावे असा विच्यार पडतो. मनन होऊन आज्ञोतर सत्वर आले पाहिजे. बहुत काय लिहिणे कृपा लोभ करावा हे विनंती.

¶*Kasi Shivaram Bandre submits his report on some six items to Trimbakji Dengle and solicits Peshwa's orders on some of them. These show how strict the Chhatrapati's confinement was at the fort of Satara. The six items are :*

1. The removal of the throne and the Jamdarkhanas to the drawing-room downstairs owing to the nuisance of bugs, as desired by the Maharaja and Maisaheb his mother.

2. Whether Dudha—the concubine of the late Chhatrapati—should be allowed to reside within the precincts of the palace.

3. The search of the persons of females invited for dinner on the anniversary Day of the late Chhatrapati Shahu.

4. Permission for an interview between Maisaheb and the late King's mother who is ill.

Of the last two items one pertains to the ornaments of the King and their repairs and the other to his explanation of the complaints carried to Poona against him (the writer).

No. 71] [7-4-1814

२

(ना) सिकाहून निघोन चैत्र वद्य त्रितीया गुरुवारी नव्याणव वाटे पुण्यास आम्ही दाखल व्हावे. निदान पंचमीपावेतो तर व्हावेच व्हावे. तेथे आल्यानंतर आपली व अलफइष्टीन व मोधी याची व आमची भेट होऊन तहनाम्याबरहुकूम फौजेचे रवानगीचा वगैरे मजकूर जसा विचारांत ठरेल तसे व्हावयास अवघड काय? हा इतला मोधीस करावा. त्याजकडून इंग्रजास करवावा.

¶*The writer has left Nasik for Poona and informs that steps would be considered for despatching troops according to treaty probably against the Pindaris.*

No. 72] [8-4-1814

श्री

राजश्री त्रिंबकजी पाटील
तात्या गोसावी यांसी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री गोंदाजी डेंगला राम राम विनंती येथील कुशल ताा छ १६ राखरपर्यंत साहेबाचे कृपेकरून मुाा किले सातारा वर्तमान यथास्थित असे विशेष. येथील वरदीचा मजकूर सविस्तरवार राजश्री कासीपंत दादा याणी लिहिला आहे त्यावरून विदित होईल. आम्ही साहेबाचे आज्ञेप्रमाणे राजवाड्यात चाकरी करीत आहो. श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याची स्वारी बाहेर कोठे निघत नाही. आबदारखान्याचे दरवाज्यात येकादे रोजी येतात. त्यासमई आम्ही मुजरे करून हात जोडून उभे राहातो. हाली माहाराज व मातुश्री माईसाहेब याची मर्जी सुप्रसन आहे. जाहाला माार शेवेसी लिहिला आहे. पुढे होईल माार तो शेवेसी लिहून पाठवितो. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Gondaji Dengla communicates to Trimbakji Dengla news from Satara about the King.*

No. 73] [26-4-1814

श्री

सेवेसी विनंति सेवक रघुनाथ रणसोड मुकाम बंदर मुंबई कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ५ माहे जमादिलावलपावेतों स्वामीचे कृपावलोकनें सेवकाचें वर्तमान येथास्थित आहे विशेष. आलीकडील बातमी राजश्री कानोजी

गायेकवाड यासी बडोद्याहून साष्टीस आणून पाहाऱ्यासुधा ठेविले होते, त्यास मशारनिल्हे गायेकवाड याणी कांहीं येथील मुख्यास अर्ज लिहून पाठविला होता; परंतु इंग्रेजानी विचार ठराऊन वरचेवर आज्ञा देऊन, कानोजीस परभारें जाहाजावर चढऊन मदरासेस रवाना केलें. त्याचे खर्चास दरमाहा रुपये पांचसें मदरासेस द्यावे म्हणून तेथील अधिकारियासी मुंबईकर मुख्य यांहीं लिहून पाठविलें आहे. सारांश जवळ न ठेवितां लांब नेऊन कैदीत ठेविलें. दुसरी बातमी विलायेथीं थोरलें जाहाज येक, त्यास डागडुगी करावयासी गोदीमधें आणून जाहाजास काम मुस्तकीन[१] करून, उधाणाची संध पाहून जाहाज पाण्यांत लोटिलें. त्या वेलेस कांहीं पाणी कमती होतांच जाहाज बाजूस खिचून जखमी जाहालें. उपयोगी न पडे म्हणून अडीच लक्ष रुपयांचें जोखीम इंग्रेजांस जाहालें. सरकारची नवी पलटणाचे सरंजामाबदल येथें मेस्त्र कोट व त्याचे कारकून खरेदी करावयासी आले होते. त्याणी इंग्रजाचे कारखान्यांतून जंगी जिनस वगैरा सरंजाम घेऊन मावारे गेलेत. याजवर बातमी निवाली म्हणजे साहेबाचे सेवेसीं विनंति लिहून पाठवितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Raghunath Ranchhod communicates that the English removed Kanhoji Gaikwad from Salsette to Madras and fixed on him a pension of Rs. 500 per month. There is further news of an English ship being stranded in the dock at Bombay.*

No. 74] [*27-4-1814*

श्री

राजश्री त्रिंबकजी पा। तात्या

डेंगले गोसावी यांसी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृंत राजमान्य श्नो सटवाजी पा। पिंजण राम राम विनंती येथील क्षेम ता। छ ६ जौवल बुधवार तिसरा प्रहरपावेतो मु॥ घोडे येथे वर्तमान येथास्थित असे विशेष. श्रीमंत माहाराजाची स्वारी सांवरगावीहून दोन प्रहरी मु॥ मारी आली. येताच गावकरी पाटील कुलकर्णी मी जाऊन गावकरी याजकडून भेट करविली. भाजी वांगीं पाटीभर व हिर्वी केली दीडसे, कारली पाच शेर व नारेल टोपाची दाहा व उसाची मोली सुमारी २९ व रसाची घागर व बेल-फुले पिवले[१] चाप्याची ब्राह्मणाचे हाती देऊन नायकू गुजर व लक्ष्मण पा। याचे गुजारतीने पुढे ठेविले. आज्ञा जाली की हा सरंजाम आसाच तुम्ही आपले माणसा-

---

१ तयार.

बराबर देऊन वाड्याचे मुा पावत करावा. त्याजवरून आज्ञेप्रा माणसे देऊन वाड्यास पाठविले. गावचा बोभाट काही येक नाही व मर्जीहि बरीच होती. नंतर घोडनदीचे काठी आंब्याची झाडे होती तेथे स्वारी बसली. गाणार मंडळी गात बसली. साईंकाली संध्या करून वाड्यास जाणार होती. ती लौकरच श्रीहरिश्चंद्राचे दर्शन घेऊन गेली. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति.

शेवेसी बालाजी लक्ष्मण राम राम विज्ञापना सदरहू लिहिण्यावरून ध्यानास येईल हे विज्ञापना.

¶Satwaji Patil Pinjan writes to Trimbakji Dengle, reporting the presents offered to Peshwa Bajirao at Ghoda and the manner in which the Peshwa spent the day.

No. 75] *[23-5-1814?*

श्रीगजानन

राजश्री सदासिव भिकाजी व हरि भगवंत
गोसावी यासी

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो त्रिंबकजी पा डेंगले रामराम विनंति उपरी येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. जैनाबादकर देशमुखाचा जामीनकतबा लिहून घ्याल त्यात ऐसे लिहून घ्यावे की शेख डलाची व पेंढाऱ्याची लुटीची गुरेढोरे वगैरे जिनस देशमुख खो घेत होते त्याजकडून मोडतोड करीत होते हा दोष देशमुख याचे आंगीं लाऊन सरकारात धरून आणिले, त्यास जामीन आसो आसा जामीनकतबा आमीलदाराजवळून लिहून घ्यावा. दुसरे रतनगिरी गोसावी व चिमण्या सिंपी व खंड्या परीट ह्या तीन्ही आसाम्या देखतपत्र पाठऊन द्याव्या. दुसरे राजश्री भाऊचे व मोधीचे साधन चांगले ठेवावे. ऐवजाविसी मोधीसी व भाऊसी बोलणे करावयाचे ते विठलपंत मामासी मी बोललों आहे ते समई तुम्ही नवता, त्यास जे बोलणे ते मामास पुसून त्याप्रो भाऊचे व मोधीचे साधन ठेवावे. म्हणजे वाड्यात लोक जावयाचे ते ऐवजाचे दोन्ही कामें उलगडून येतील. थोरले वाड्यांत चांगला कारकून पाहून उगाच ठेवावा. त्याणे वाड्यातील कची वर्दी रोजचे रोज लिहून तुम्हाजवळ देत जावी. तुम्ही मजकडे पाठवीत जावी. वर्दी फार बारकाईने ठेवीत जावी. आपल्याकडील लोक फोडून त्यांत कांहीं कमीजास्त आसल्यास बारकाईने शोध काढावा. सारौष कोणते गोष्टीचे कमी पाहात आसावे आणि वर्दी आम्हाकडे लिहीत जावी.

भाऊचे व मोधीचे साधन चांगले ठेवावे. हे पत्र कोणास दाखऊ नये, फाडून टाकावे. राा छ तीन जाखर बहुत काय लिहिणे हे विनंति. ताा पारगावीहून गाई चांगल्या दुधाच्या चिरंजीव भागाबाईकरिता पुण्यास आणवाव्या.

¶Trimbakji Dengle in a confidential letter to Sadashiv Bhikaji directs him to execute the following orders (1) to compel the Deshmukh of Jainabad to sign a security bond, (2) to despatch at once to the writer three persons, namely, Ratangir Gosawi, Chimnya tailor, and Khandya, washerman, and (3) to engage a special person in the Shanwar Palace to convey to him minute news of all occurrences there. Khusru Modi referred to in the letter died in February 1815.

No. 76] [*29-5-1814*

पौ छ ७ साबान
सन खमस अशर मया तैन
व अलफ श्रावण मास.

श्री

सेवेसी विनंती सेवक रघुनाथ रणसोड मुकाम बंदर मुंबई कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ९ माहे जमादिलाखरपावेतों स्वामींचे कृपावलोकनें सेवकाचें वर्तमान येथास्थित आहे विशेष. पेशजीं दोन विनंतीपत्रें बंदर मजकुरचीं अखबारीसुद्धां सेवेसी पाठविलीं आहेत. राजश्री लक्ष्मणराव याणीं सरकारांत विनंती करून प्रविष्ट केलीच असावीं. मशारनिल्हेकडून पत्रांचीं उत्तरें अद्यापि आलीं नाहींत. सेवकाचे हातांशीं विनंती केल्याअन्वयें वसई व बेलापूरपैकी प्यादे अद्यापि आले नाहींत. सबब अखबाराचीं पत्रें परभारें सरकारांत रवाना करीत असतों. आलीकडील बातमी विलायतेहून बंदर मजकुरीं पांच जाहाजें दाखल जाहालींत. साल दरसाल जिनस येत असतो त्याप्रमाणें आला आहे. तेथील बातनी इंग्रेज बोलतात कीं फरांसेज यांजसी पुन्हः लढाई घेऊन त्याचा येक गांव सही केला; व कांहींक तोफा काबीज केल्या. मुंसा बोनापार्ट फौजसुद्धां आपले मुलकांत पळोन गेला, अशी बातमी याजकरितां येकवीस तोफांची सरबती येथें केली. दुसरी बातमी राजश्री गंगाधर शास्त्री यांचे पत्र राजश्री शिवरामपंत त्याचे व्याही निसबत कारनल करनेक बडोदेकर यांसी आल्यावरून मशारनिल्हे जलदीनें पुण्यास गेले, व करनेल येथें बहुत दिवस होते, तेहि परवांचें रोजीं बडोद्यास निघून गले. इराणकर वजीर बंदर मजकुरीं आले आहेत, ते हैदराबादेस नबाबाचे भेटीस जाणार. चित्ती आहे कीं माहाराजाची

भेट घेऊन पुढें जावें. येविशीं येथील मुख्यांचीं पत्रें तयार होतात तीं जाहली म्हणजे सेवकाचेहि विनंतीपत्र सरकारांत ध्यावयाविशीचा बेत आहे. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*This is a news-letter which gives information of the war between France and England in Europe. The Vazir of Persia, says the letter, has arrived at Bombay and will proceed to Hyderabad paying a visit to the Peshwa on his way there.*

No. 77] *[3-11-1814*

श्रीराम

राजश्री त्रिंबकजी पाटील तात्या
डेंगले गोसावी यासी

ॐ अखंडितलक्ष्मीआलकृत राजमान्य श्री आपाजी पाटील पानसरे व बलवंतराव साबाजी रामराम विनंती विशेष. येथील क्षेम ता। छ २० जिलकाद-पावेतो येथास्थित असो विशेष. श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याज-कडील हुजरे आसामी दोन पत्रे व पोषाक घेऊन श्रीमंत राजश्री बाबासाहेब याजकडे आले आहेत. काल संध्याकाली किल्यावरून येऊन शहरात राहिले होते. आज निघोन पुण्यास गेले. त्याजबरोबर आपल्यास निरोप सांगून पाठविला आहे कीं, घोड्याचा सरंजाम अद्यापि आला नाहीं. तुम्हाकडील गोपाल-पंत किल्यावर येत आसतो. त्यास पाचच्यार वेला समक्ष सांगितले. परंतु सरंजाम तयार होऊन येत नाहीं. याप्रों हुजरे याजबरोबर निरोप माहाराजानी आपणाकडे पाठविला आहे. राघोपंत जोसी याणी विनंती केली होती की रायाचे पत्रात सरंजामाविसी ल्याहावे. राहातेकर याजकडील सरंजाम येऊन पोहोचला. त्रिंबकजीकडील आला नाही म्हणौन ल्याहावे. त्याजवरून आज्ञा जाहाली की, त्रिबकजीकडे येकवल सागून पाठऊ, त्यानी नच पाठविल्यास मग रायास ल्याहा-वयास येईल. हुजरे यास राघोपंत विच्यारीत होता की तुम्हास काही निरोप सागावयास सागितला आहे की काय? हुजरे याणी सांगितले की, त्रिबकजी तात्यास मात्र घोड्याचे सरजामाविसी सागावयास सागितले आहे. राघोपंत बोलला की, रायासहि याप्रो निरोप आसल. हुजरे याणी उतर केले की, आम्हास रायास सागावयाविसी सागितले नाही. येथे सरंजाम तयार करून देण्याविसी नारायण-दास यास नित्य तगादा केला. परंतु तो म्हणे की, दोन तीनसे रुपये लागणार यास येवज कोणीकडील खर्च करावा? त्यास आम्ही सांगितले की, च्यार हजार रुपयांची नेमणूक करून दिल्ही आहे त्याप्रो सरजाम करून द्यावा म्हणौन राजश्री

आबा फडणीस याणी तुम्हास लिहिले आहे त्याप्रो करून देणे. त्याजवरून सेटजी याणी आजमास करून दाखविला. त्याप्रो त्याणी आबा फडणीस यास लिहिले होते व आम्हीहि दोन च्यार वेळा लिहिले, परंतु सरंजाम तयार करून दिल्हा नाही. मोठे नेट लाविले तेव्हा खोगरमात्र तयार करून दिल्ही. ती प्रा केली आणि विनंती केली की, जो सरंजाम तयार होईल तो वरचेवर आणून पोहोचवीत जाऊ. दोन च्यार दिवस खोगरे ठेऊन घेऊन मावारी पाठऊन दिल्ही. सारा सरंजाम आल्यावर घेऊ याप्रो आज्ञा जाहाली. जाहाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. रघुनाथराव भो व हवालदार दिा पीलखाना हुजरात याची जमीन गोडवलीस आहे. त्याची जती करून ऐवज घ्यावा म्हणौन राजश्री कासीपंत बदरे याजबरोबर आज्ञा आली त्याजवरून जती करून जतीचे काम बंदरे याजकडे सांगितले आहे. त्याची जती आम्ही परभारा केली म्हणौन नारायण-दास म्हणू लागले की, हे काम आम्हाकडे आसावे. परभारा तुम्ही जमी करू लागल्यास आम्ही आमल तो कशाचा करावा ? त्याजवरून आम्ही त्यास सांगितले की, तात्यानी काम आम्हाकडे परभारा सांगितले आहे. त्यात तुमचा इतला नाही. काल पत्रे पाठविले आहे त्याजवरून सर्व विदित होईल. बापू माली करजेकर याणे म्हालू गडी निा विठलपंत फडणीस यास सेतात निजल्या जागी डोईत धोडा घालून ठार मारिला. त्यास धरून आणून बेडी घालून ठेविला आहे. सर्वत्राचा आक्षेप आहे की, याचा सिरछेद करावा. येविसी पेशजी येक दोन वेळा विनंती लिा होती. आज्ञा आली नाही, त्याजवरून हाली विनंती लिहिली आहे, तरी सिरछेद करावयाची परवानगी पाठवावी. बहुत काय लिा लोभ असो द्यावा हे विनती.

¶*The writers report to Trimbakji Dengle that in spite of the oft-repeated demands from the Chhatrapati for the accessories of a harness, etc., no arrangement is yet made from Poona to supply them. They therefore ask him to arrange to send the accessories promptly. They also communicate to him the complaint of Narayandas against the Peshwa's order of attachment of the lands of Raghunathrao Bhonsle issued not in his name but in the name of Kasipant Bandre. Finally they ask for orders in connection with a case of murder.*

No. 78] *[20-12-1814*

श्रीराम

राजश्री त्रिंबकजी पाटील तात्या
डेंगले गोसावी यासी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो आपाजी पाटील पानसरे रामराम विनंती विशेष. येथील वर्तमान ताा छ ७ मोहरमपावेतो येथास्थित

7055

असो. यानंतर इकडील मजकूर तरी संतुकी दालवाला याजपासून नारायणसेट याणी दीडसे रुपये घेतले होते. त्याची चौकसीविसी राजश्री परशरामपंत वोक यास आज्ञा जाहाली होती. त्याणी चौकसी करून सेटे माहाजन याचे साक्षीनिसी जबानी घेऊन सेटजीस समजाविले, त्याजवरून सेटजीने दीडसे रुपयाचा हवाला रा। विठलपंत फडणीस याचा येका माहिन्याचे मुदतीचा दिल्हा. ऐसे आसता हाली दालवाला याजवर दुसरे निमित्य ठेऊन त्यास तगादा लाविला. ते वर्तमान किल्यावर समजले. त्यानी हुजऱ्या व चोपदार यास खाली पाठविला की संतू दालवाला यास तगादा केला आहे तो मना करून घेऊन यावा. याचे आगोधर दालवाला याजपासून दीडसे रुपयाची निशा घेतली होती. मिर्धा व हुजरे आले. त्यानी दालवाला यास किल्यावर घेऊन गेले. नंतर जिमेदार याजपासून दीडसे रुा घेतले ते वर्तमान श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामी यास कलले. त्याजवरून फार रागे भरले आणि आज्ञाहि सांगून पाठविली आसता सेटजीनी ऐकिली नाही. त्याजवरून आज्ञा जाहाली की आम्ही पुण्यास लिहू. हाली तिलगुलाची पत्रे श्रीमंत राजश्री बाबासाहेब यास जावयाची. त्याचे मसुदे तयार जाहाले आहेत, त्यात लिहिले आहे की, दालवाल्याचा मजकुर राजश्री परशरामपंत वोक समजून गेले आहे ते सागतील. हे वर्तमान आम्हास समजल्यावर आम्ही सेटजीस सागितले की हे चागले नव्हे. रुपये घेतले आहेत ते माघार द्यावे आणि माहाराजाची मर्जी प्रसन राखावी. त्याजवर आम्हापासी बोलला की, मी उदईक जाऊन माहाराजाची मर्जी प्रसन करून येतो. पत्रे पुण्यास जाऊ देत नाही. त्यास दोन तनि दिवस जाहले चुकवाचुकव करितो. किल्यावर जाऊन बदोबस्त करीत नाही. आद्यापि आम्ही त्यास सागतच आहो. परतु जाहाले वर्तमान लिहिले आहे. भोई नगारची रोजमुरा मागावयास आले. त्यास से(ट)जीनी उतरे केली की आम्ही पुण्यास लिहिले आहे. तेथून बंदोबस्त होऊन आला म्हणजे रोजमुरा देऊ. हे वर्तमान भोई नगारची याणी कानावर घातले. तेथून मजकडे आज्ञा आली की, भोई नगारची याचा रोजमुरा सेटजी देत नाहीत. येविसी रायास ल्याहावे लागेल. त्याजवरून आम्ही सेटजसि ताकीद करून साफच सागितले की, किल्यावरील बोभाट पडला आसता कार्यास येण नाही. त्याजवर रोजमुऱ्याचा हवाला फडणिसाकडे दिल्हा आहे. आम्ही सागितले आसता यैकत नाही. बोलतो येक करितो येक, यामुले आमलाची पायेमली होती. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब व राजश्री आपासाहेब याची स्वारी छ ९ मोहरमी खाली सिर्के याचे वाड्यांत राजश्री आपासाहेब याचे स्त्रीस न्यावयास आले होते. सिर्के याणी मजवानी केली. च्यार

मऱ्हाठेहि जेवावयास बोलाविले होते. कलावतणीचा नाच जाहाल्यावर उभयतास पोषाक दिल्हे. सध्याकालचा च्यार घटका दिवस राहिल्यावर स्वारी किल्यावर गेली. तेथे रात्री वरात मिरवली. दारू दोन रुपयाची नेहली होती. राजश्री चितोपंत देशमुख छ मारी सातारियास आले. दांडेकराचे घरी भोजन करून मळ्यास राहावयास जाणार. पेशजी पत्रे आपणाकडे पाठविली होती त्यात लग्नाचा वगैरे मजकूर लिा होता. त्याजवरून विदित जाहालाच आसेल. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Apaji Patil communicates to Trimbakji Dengle the affairs at Satara, especially the reluctance of Narayanshet to pay off the arrears of the servants of the King, and requests to report the matter to the Peshwa and to remove the inconvenience to which the King is being subjected.*

No. 79] [*28-12-1814*

श्री

शेवेसी बालाजी लक्ष्मण व गोपाळ आत्माराम मुा गुहागर रामराम विनंती विज्ञापना ताा छ १५ मोहरम सायंकालपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. आपली स्वारी घाटमाथाहून गेलियानंतर खासा स्वारी घाटाखाली उतरून चिपळुणास मुकामास आली. रात्रौ वाड्यात राहून दुसरे दिवसी हज्यामत जाली. यामुळें उसीर जाला. साा परशरामाचे दर्शनास गेले नाहीत. चिपळूणास वाड्याचे इमारतीबदल मोरोबा मोने व राघोबा ओक यास तीन हजार रुपये आपले देण्याविसी आज्ञा होऊन स्वारी निघाली, ते गुहागरास आली. रात्रौ फडके याचे वाड्यात राहिले. दुसरे दिवसी नवे वाड्यात येऊन राहिले, ते हाली दोन तीन दिवस तेथेच आहेत. आपलेकडील बिछाईत आली नाही याजकरिता बहुत रागास आले. उतर जहाले की तुमचेकडील बिछाईत येत आसल्यास ठीक आहे, नाही तरी दुसरियाकडून करवितो. तेव्हा लक्ष्मण पाटील याणे उतर केले की बिछाईत पुण्याहून निघाली आहे, परंतु मार्गात झाडीमुळे रुजामे फाटू लागले, साा मळ्या घाटाहून वाकडे घेऊन कुभारल्याने येत आहे, आज उद्या येईल. परंतु मर्जी फारच जात राहिली. काल ग्रहणाचा दानधर्म फार काही जाला नाही. आपलेकडील सात हजार रुपये मात्र गे(ले) * * किरकोल हजार बारासे गेले. येकूण आठ हजार खर्च जाला. आपलेकडील श्रीमंत माहाराजास दोन पत्रें व हरि भगवंत यांचे पत्र आले ते आजच पावलें. माहाराजास प्रविष्ट केले वाचून पाहून हरि भगवंत यांचें पत्र व त्याच माराचे आपले दोन्ही कागद माहाराजानी आपलेजवल ठेविले. दुसरे पत्र लाखोटा बिछाईतीचे माराचा होता तो वाचून आपले

स्वाधीन केला. आज मर्जी बरीच आहे. आज आज्ञा जाली की पुण्यास शुक्रवारचे वाड्यातील भोजनखर्चाबद्दल पधरासे रुपये देऊन पावत्या आणावाव्या, त्याजवरून लिहिले आहे. त्यास तेथें रावजी लेले यास पाचसे व बाबाजी खटावकर यास पाचसे व बापू भिकाजी भिडे यास पाचसे येकूण तिघास पंधरासे रुपये देऊन पावत्या पाठऊन देण्यास आबास व भाऊस आज्ञा व्हावी. स्वारीचा बेत शनवारी +पंचमीस गुहागराहून निघोन चतुर्दसी * * दाहावे रोजी * * जावें असा बेत जाला आहे. खचित समजले म्हणजे मागाहून लिहून पाठऊ. वरकड आज सायंकालपर्यंत यथास्थित आहे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. ताजा कलम पुणियाहून पत्रे डाकेत आली होती ती मागती आपल्याकडे पाहावयास पाठविली आहेत पावतील. सेटजीकडील ही लखोटा तसाच आहे. सरकारची स्वारी पुणियास मार्गसीर्ष वा त्रयोदसी चतुर्दसीस येत आहे. साल गुदस्ताचे हप्त्याचा यैवज आपलेकडील सिलकबंदी जमा धरतात त्यास येसू पवार व विठोजी कारके व गणपतराव परभू व बाजी महिपत व सेकोजी खैर यापैा कोणाकडे किती यैवज थकला याची याद खास रुजूवात करून आधी पाठऊन देवावी म्हणजे समजाऊन त्याप्रमाणें जमा कमती धरतील. याद न आल्यास जमा धरल्यावर मग उपाये नाहीसा होईल. आताच आम्ही याद कशावरून समजावी म्हणोन लिा आहे. तरी याद आली पाहिजे व आबा बाम याजकडे पांच हजार रुपये दिल्हे. पांच हजार मारनिलेकडील वसलातीबा ठेविले. त्यास याद देशमुखाचे विद्यमाने करून पाठवावी म्हणजे मारनिलेसी बोलावयास नीट पडेल. वरकड बंदोबस्त यथास्थित आहे. कामकाजाचा बोभाट नाही. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Balaji Lakshman Salkade and Gopal Atmaram write from Guhagar probably to Sadashiv Mankeshwar, explaining how Bajirao on his visit to that place was inconvenienced for want of furniture at the new palace at Guhagar where he was staying.*

No. 80] *[1815 ?*

श्री

विनंती विज्ञापना. करीमखाची सलतनत तोफा वगैरे मागें थकून राहत गेले ते फौज व पलटणे याणी लुटून घेतले. सडा कोठ्यास गेला. त्यास आपलेकडील हालकरे यांस कोठ्यास आगर जेथे तो असेल तेथे जाणे प्राप्त. सा खुले लाखोटे

+मार्गशीर्ष वा ५ मोहरम १८.

होते, त्यास थैलीत घालून थैलीवर मोहर करून वर बकोरा[1] कोटे येथे आपल्याकडील ब्रापूजीनाा लाड आहे त्याचे नावे लाऊन थैली आपलेकडील हालकाऱ्याजवळ दिल्ही आणि सांगितले की, मार्गात पुसनारच नाही आणि कोणी पुसल्यास कोट्यास जातो म्हणौन सांगून जात जावे. करीमखाचे दब्यौत[2] गेल्यावर थैली फोडून लाखोटे करीमखास द्यावे. यााप्राो त्यांचे केले व सितूकडील वगैरे लाखोट्यांचीहि थैली करून व उज्यनकराचे नावे बकरा लाऊन थैली दिल्ही आणि सांगितले कीं सितूचे दब्यात गेल्यावर थैली फोडून मग पत्रे द्यावी याप्राो केले. कळावे. याचे कारण हेंच कीं, मार्गात कमाविसदार दर माहाली उगीच पुसतापास करितात, तेव्हा हालकाऱ्यानी पाऱ्हाळे कशास द्यावे? साा थैल्या केल्या. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*This letter describes how secret communications used to be sent to Karim Khan and Cheetoo, leaders of the Pindaries, who were in hiding.*

No. 81] [*20-2-1815*

श्री

शेवेसी गोपाल गणेश विज्ञापना ताा छ २१ माहे रौवल पो साहेबांचे कृपावलोकणेकेरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील मजकूर ये संस्थानोहून कुंभरासीयाचे निाा भला माणूस उतर दिसेस गेला. त्याणे मजला पत्र पाा आहे तो माार कार्तिक वद्य ८ निघोण आंतरवेदचे रस्त्याने पाहाडातून अमरसरास[3] आलो. पाहाडी राज्याच्या भेटी होऊन पकाइत करून आलो. रंजितसिंग सीक याची भेट जाली. जितकी खातरीची बोलणी होती तितकी पकी जाली. आणि येथून आटकपार वलिटीवाले मीरन नरशा याजकडे हालकारे रवाना केले आहेत. काबलवाले यांची व रंजितसिंग याची दोस्ती होऊन काबलवाले याचा वजीर फतेखान व रंजितसिंग याची फौज येकटी[4] होऊन कास्मीरखाली केली. येथे पत्रे माघ शुाा ११ तिसरे प्रहरी आली. बहुत खुसी होऊण तोफा जाल्या. पलटणची रंजक जाली. पुढे फौजा मुलतान खाली करावयासी जाऱ्हार. काबलवाले यांचा व रंजित सिकाचा हा करार ठरला आहे. उभयेताच्या फौजा येकट्या करून तांब्रावर जावे या प्रमाणे कुरान-कसमा जाल्या आहेत. आण आम्हास आज्ञा जाली आहे. मागती आम्हास पत्र यावे म्हणजे आमची तयारी आहे. याजकरिता मुदाम हलकारियाची जोडी पाठविली आहे. जर करिता पत्रे आली तरी आमचे बोलन्याची शोभा आहे. नाही तर उठोन माघारी येऊं. आपण

---

1 The name of addressee. 2 Ambush, Concealment.

३ अमृतसर. ४ एकत्र.

आज्यारक्षकाकडील पत्रे पाठवितो म्हणोन बाबाणी करार केला होता, त्यास अद्याप पत्रे आली नाहीत. विस्मरणात गोष्ट आलीसी दिसती. तरी पत्रे पाठवावी. पुणे ग्रामीचीहि पत्रे आली असता बहुतच चांगले आहे. आमचे कराराप्रमाणे इकडील सरदार कायेम आहेत. परंतु खावंदाचा भरोसा येत नाही, यामुले जेथे तेथे कच्चाई पडती. त्यास आतून पुणे ग्रामीचीहि ताकीद आसावी. राजश्री कृष्णाजी नाईक माघारी आले किंवा नाही तेहि ल्याहावे. येथे धारण सात शेर पके आहे. चारा मिळत नाही. हे वर्तमान शटकर्णी न जावे म्हणोन शपत पुरस्सर लिा आहे. येथील मजकूर कुंभरासी काल रात्री लग्नसिद्धि करून आले. आज उदईक तिकडील पत्रे तयार होतील. त्यातील मजकूर काही समजल्यात आला म्हणजे तो मजकूर व हे आले पत्र तेच बाजिनस शेवेसी रवाणा करितो. सिकाचा इरादा कायेवाचे पकेपणे आहे. सालमजकुरी येक दोन कामे याणे थोरली केली. याची जरब पडली. यात आपणाकडून उभयेतास ताकीद व सरस्वतीचा (?) उपराला पुरल्याणे सहजात रूपास येऊन सेवकपणा दिसन्यात येईल, अथवा आपले पत्र तिकडील साधणकरी यास आले तर तितक्यावर तो हुकूम बज्यावील. त्याचे घरचे पत्र पाो आहे, ते पैतेप्रो प्रविष्ट होऊन उतर यावयास आज्ञा जाली पाहिजे. पत्रावर येकवल खाली मी आपले हाते लिा आहे. त्याजवरूण ध्यानास येईल. शेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Gopal Ganesh the writer appears to be an agent sent by Bajirao to some of the powers in northern India to organise them for making a united attack against the English. He sends news from the Court of Ranjit Singh of Lahore and of Kabul and Kashmere, and asks for money. Certain Code-words such as Kumbha-rashi appear to be used herein.*

No. 82][1] *[29-3-1815*

श्री

विनंति उपरी. आपण छ १७ राखरचे पत्र पाठविले ते पावले. श्रेहितानी सुचविले कीं खासा स्वारी राजधानीस यावयाचा समारंभ पाहावयाची इछा गंगाधर शास्त्री याचे चित्तांत बहुत. त्या अनुकाराचे शब्द त्याचे कोठे निघतात. याजकरितां खासा स्वारी येईल तेव्हा समागमे हुजरात वगैरे फौजेचा भरणा आहेच. तथापि पटवर्धन वगैरे पथके कोपरगावाकडे नेमली आहेत त्यात पटवर्धन जातीने खासे

१ पत्ता लिहिल्याप्रमाणें.

हजारपाचशानी कोपरगावी विंचूरकरापासी राहून त्याची वरकड फौज खासा स्वारी समागमे पुण्यास आणिली तरी बाध नाही. खासा स्वारी समारंभाने राजधानीस पोहचल्यावर पटवर्धनाची फौज माघारी कोपरगावास जाईल. स्वारीचा जमाव मातबर असावा म्हणजे शास्त्रीचे समाधान होईल. याआन्वये बोलून स्वामीकडे विनंति ल्याहावी म्हणोन सांगितले. त्याजवरून विनंति लिहिली आहे. खासा स्वारीबरोबर वरकड फौज येतच आहे. पटवर्धन सरलस्कर याची पथके कोपरगावाकडे नेमली, त्यात खासे पटवर्धनानी हजार पाचशानी कोपरगावी राहून त्याची वरकड फौज खासा स्वारीसमागमे यावी. येथे आल्यावर माघारे जातील. गोखले याचे फौजेची तयारी करविली आहे. स्वारी येण्याचे बेतास येक दोन मजली स्वारीत पाठवावयाची आज्ञा आल्यास पाठवीन. हती सूत्रनाला वगैरे स्वारीचा सर्व लवाजिमा बरोबर आहेच. यातून चारणीस वगैरे आन्यत्र स्थली जो सरंजाम असेल तो स्वारी राजधानीस पोहचावयाचे संधीस येक दोन मजला आगोधर स्वारीत येऊन पोहचावा. येथे आसेल त्याची आज्ञा सादर होईल तसी रवानगी करून देईन. गोखले याचे फौजेची तयारी करविली. निपाणीकर याचा जमाव तूर्त येतां दिसत नाही. त्याची रदबदली आलफइस्टीन करितात. अद्याप काही ठरलें नाही. स्वामीकडे विनंति लिहिली, आज्ञा येईल तसा इतला करीन, म्हणोन उतर सांगितले. त्यास पेशजी विनंति लिहिली त्याची आज्ञा सादर व्हावी. विंचूरकर निपाणीकर आकलकोटकर कितुरकर याची पथके पुढे खानदेशात आहेत ती तसीच जेथील तेथे आसावी. रा। नारोपंत आपटे व विसाजीपंत वगैरे हुजरातीचे पथके त्या प्रांती आहेत ती खासा स्वारीबरोबर पुण्यास येऊन स्वारी दाखल जाहाल्यावर माघारी ज्या स्थलची त्या स्थली गेल्यास चिंता नाही. कोपरगावावर पटवर्धन हजारपाचशानिसी व रूपराम याची पलटणे राहून वरकड स्वारीबरोबर फौज यावी. येथे दाखल होताच दुसरे दिवसी माघारी रवानगी करिता येईल. बारा तेरा तेरा दिवसाचा मजकूर आहे. श्रेहितानी सुचविले व शेवकाचेहि मनांत आले त्याची विनंति लिहिली आसे. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter mentions the arrangements to be made for companies of soldiers being sent on attendance of the Peshwa when he enters his capital in procession. This is specially suggested by the writer as Gangadhar Shastri wishes to witness the pageant.*

No. 83] [29-8-1815

श्री

यादी पत्राची रवानगी सुा सीत आशर मयातैन व अलफ सन १२२५ छ २३ रमजान श्रावण वाा ९ मंगलवार पत्रे.

१ तीर्थस्वाा राजश्री नानासाहेब याचे नावे मुख्य पत्र कलमे सुमार ९ येकूण रवाना टेंभुर्णी पत्र.

बनाजी हैबतराव याचे नावे रवाना भागानगर.

१ मुख्य पत्र: तुम्ही छ ९ व छ १० व छ १५ रमजानची पत्रे पुरवण्यासहित पाठविली ती छ १२ छ १६ व छ २१ माहे मजकूर पावली. नवाबाचे सरकारची दिनचर्या आखबार इाा छ २४ शाबान ताा छ १३ रमजानपावेतो पाहाण्यांत आली. तुमचे पत्राची उतरे व इकडील मजकुराच्या पुरवण्या आलाहिदा पाठविल्या आहेत त्यांजवरून मजकूर समजतील. तीाा राजश्री नानासाहेबांची व आमची प्रकृत बरी आहे. गंगाधरशास्त्रीस त्रिंबकजी डेंगले यांणी दगा केला म्हणोन इंग्रजाकडे कोणी समजाविले. परंतु पता मुदा कांही नाही. उगाच आरोप दिसतो. चौकसी होत आहे. येविशी सरकारांत तिकडून सवाल आहे. सत्यमिथ्य कलत नाहीं. रुजुवातीअंती ठरेल ते खरे. येविशी हरदो सरकारांत संशय आले म्हणोन तेथे कोणी गपा उठवितील त्या ऐकू नये. दोही सरकारची दोस्ती मजबूत. त्यांत अशा रकमा निघाल्या तरी छयान होऊन जे होणे ते होईल. परस्परे बाजारी आवया येकून उगेच विचारांत पडाल म्हणोन लिहिले असे. तरफैन सरकारचे दोस्तीचे रस्त्यांत बालाग्र अंतर नाही व व्हावयाचेहि नाही. सरल पूर्ववत दोस्ती चालत आहे म्हणोन पत्र.

१ क्षेत्र राजराजेश्वर येथे श्रीमंत माहाराजांचे सरकारांतून आनुष्ठान आहे. तेथे कोनाराव व मिनाराव नागारडी वगैरे जमीदार मुफसद यांचे पारिपत्यास नवाबाचे सरकारातून जमियत गेली. त्याणी क्षेत्रास उपद्रव देऊन गांवची चिंधीचोली केली. त्याजबराबर आनुष्ठानाचे ब्राह्मणाकडील भांडी वगैरे चीजवस्त गेली. हे वर्तमान राज्याजीस समजताच ब्राम्हणांचा सत्कार उतम प्रकारे करून ब्राह्मणाची चीजवस्त वगैरे काये घेतले ते माघारे द्यावे व पुढें उपद्रव देऊ नये म्हणोन ताकीदपत्रे व चोपदार पाठविले हे तुमचे लिहिल्यावरून

समजण्यात आले. प्रस्तुत श्रावणमासाकरिता क्षेत्रातील ब्राह्मण आले त्याणी मनस्वी गिला केला. आणि पुढे आनुष्टान चालावयास निर्वेध जाले तर चालेल, नाही तर आज्ञा होईल तसे करू म्हणोन ब्राह्मणानी समजाविले. त्यावरून सरकारची आज्ञा जाली की, वकिलास लिहून कारभारी यासी मजकूर करून क्षेत्रास उपसर्ग न लागे ते करावे. त्याजवरून तुम्हांस लिहिले असे. तरी राजे चंदूलाल बाहादूर यांसी, सरकारचे आनुष्टान क्षेत्रात आहे, तेथे उपद्रव हरयेकविशी न लाविता मुफसदाचे पारिपत्य करून बंदोबस्त करावा म्हणजे आनुष्टान निर्वेध चालेल. बंदोबस्त राज्याजीनी करून दिल्ह्याचे इकडे ल्याहावे. त्याप्रमाणे हुजूर विनंती होईल. तिकडून रक्षणाचा बंदोबस्त चांगला जाला तर आनुष्टान चालेल. न जाल्यास आनुष्टान चालणार नाही. येथून रक्षणाची तरतूद आसावी असे तेथील विच्यारे जाल्यास दोनसे माणसे रखवालीस सरकारातून पाठऊन रखवाली करिता येईल. राज्याजीचे विच्यारे नेमात येईल तसे उतर पाठवावे म्हणोन पुरवणी.

१ इंग्रजाकडील सिंपी व सुतार यांजकडे शहरातील आसामींचे कर्ज येणे याजकरिता मुबारूजुदौला याणी सिंपी व सुतार यास बसविले, यास्तव तेथे मझेला पडला ते वर्तमान छ १९ रमजानपावेतो लिहिले ते सविस्तर समजले. पुढे बहुतकरून मिटले असेल. कसे ठरले हे लिहून पाठवावे म्हणोन पुरवणी.

१ चिरंजीव सखाराम चिमणाजी याजकडे सरलस्कर याचा मोकासा आहे. त्या प्रकरणी त्याणी मजकूर समजाविले. त्याणी पुरवणी आलाहिदा असे.

९

१ टेंभुर्णी व नरसिव्हपूर येथील इमारतीचे कारखाने प्रकरणी कलमबंदी पुरवणी आली होती. त्याची उतरे कलमाचे कलमावर लिहून तीच सदरहू पुरवणी वडिलाकडे पाठविली.

६

साहा कागद मिलोन लाखोटा तीा नानासाहेब यांचे नावे करून टेंभुर्णीस रवाना डांकेवर.

¶*Copies of a few letters despatched to Tembhurni, probably to some relative of Sadashiv Mankeshwar. One letter mentions that the murder of Gangadhar Shastri had not affected the relations of Bajirao with the British Government, and adds that an enquiry was being made. Nanasaheb mentioned in the letter appears to be a relation of Sadashiv Mankeshwar.*

No. 84] [21-7-1815

डे. क. नं. १७१

घोरपडे सरकारचे कारकून व माणसे समागमेच वाड्यात आले. तदोत्तर लस्करात सरकारचे दोघे प्यादे व आपला जासूद पाठऊन ग्रहस्त वगैरे काही मंडली आणऊन बिराडाचा बंदोबस्त करून सरकारचा कारकून वाड्यात येऊन प्रेत घेऊन काही मंडली व सरकारचे सिपाईसह नाकेबंदीतून नदीवर पुंडलिकाचे उजवे हाताचे बाजूस दहनविधि करून उज्यडतानी मंडली सारी बिराडास आले. छ १३ रोज आषाढ शुा १५ भृगुवार रोज गुा हजीर वीस कारकून व सिपाई येण्याजाण्याचे नाकेबंदीवर परवानगी दिल्हे. त्याचे काम जाहाले सबब त्यास जावयाचे सांगून त्या कारकुनासमागमे डेंगले याजकडे मोरोपंत व आबा घोरपडे उभयेता होलकराचे वाड्यात जाऊन भेट घेतली. जाहाला मजकूर त्यास आबानी समजाविला होताच त्याप्रा समजाविला आणि सांगितले कीं शास्त्रीबावाचा काल आशा प्रकारे जाहाला. त्यास याची चौवकसी करणे. आपण त्याचे स्नेही व सरकारहि आपण, यास्तव आपणाकडे. त्याचे उतर त्याणी केले की मी आतून बारिक चौकसी करीत आहे, परंतु नाव कोणाचे कशावरून घ्यावे? मुदा काही हाती नाही. तेव्हा हे उभयेता बोलले की शास्त्रीबावाची ही गत जाली. पाठीमागे आपण त्याचे स्नेही व सरकार याजमुले आपणास श्रुत केले व स्नेहाचा धर्म मिलोन मागे करणे हेच योग्य. समक्ष असता भिडेने घडणे ते घडते. त्याचे उतर प्रसंगानुसार परीक्षा समजेल. त्यावर शास्त्रीबावाचे गुणानुवाद व स्नेहभावहि वर्णन करून माहाराजहि बहुत दिलगीर आहेत, आज माहापूजा करावयाचा बेत होता तो राहिला म्हणोन सांगितले. समागमे मनुष्य थोडी, शेपणास माणसाखेरीज बाहेर फिरू नये, तुम्ही कारभार करिता याजमुले मी सांगितले. त्याचे उतर उभयेतानी सांगितले कीं माणसे नव्हती आसा आर्थ नाही. परंतु यात्रेत फार माणसानी यात्राकरीयासी धकाधकी होईल व न जाणो येखादेसमई कटकटहि होईल यास्तव आणीत नव्हते. तसा आपला व श्रीमंताचा स्नेह याजमुले गरजच नव्हती. आमचे दुसमान कोण आहेत याची माहितगिरी आपणास आहे. दंगेकरी करनाटकी होते असे वाटते म्हणोन सांगितल्यावर डेंगले याणी उतर केले की स्नेह खरा, परंतु आकाशाचे कुऱ्हाडीस काय करावे? परभू आहेतच. दुसरे कान्होजी गायेकवाड कर्नाटकात ठेविले आहेत व चेलेहि दुसमान, नांव कोणाचे घेवत नाही, असो. तुम्ही सर्व बंदोबस्त कारखान्याचा वगैरे ठेवावा म्हणोन खातरजमेनी सांगू लागले. नंतर यानी सांगितले बंदोबस्त करणाराची ही गत जाली, तत्रापि आमच्यानी जाला बंदोबस्त केला आहे. आपण माहाराजास

विनंति करून पुणियास शास्त्रीबावाचे चिरंजीव व राजश्री बापू आहेत तेथे जाण्याची आज्ञा देवावी. पुढें क्रिया होणे सबब. त्याजवरून आता माहाराज स्नानसंध्या व देवदर्शन मिलोन दोन प्रहरपर्यंत गाठ पडणार नाही. दोन प्रहर नंतर आज्ञा घेऊन सांगेन. दोन प्रहरी यावे. याप्रो सांगितलेवर येथे येण्यास प्रतिबंध यास्तव पेशजी प्रो आपलेकडील सिपाई द्यावे, त्याजवरून पेशजीचे व आणखी येक सिपाई दिल्हा तो घेऊन उभयेता बिराडास आले. नंतर दोन प्रहरीं मोरोपंत व बापू चिपलोणकर याजकडे तात्या डेंगले याणी लक्ष्मण पाटील याजसमागमे इशारा सांगून पाठविला त्यावरून गेले. तेव्हाही बोलणी सदरहूचे धोरणानेच जाहाले. मोरोपंतानी पुसिलें, जाण्याची सरकार आज्ञा घेतली कीं नाही? त्याचे उतर केले की गुप्त तयारी ठेवावी. मी माहाराजाची आज्ञा घेऊन आपाबरोबर सांगून पाठवितो त्याप्रो निघोन जावे. तुम्ही येऊ नये म्हणून सांगून विडे देऊन रजा दिल्ही. हे वाड्यात आले. नंतर च्यार घटका दिवसास लक्ष्मण पाटील याजसमागमे मोरोपंत यानी सांगून पाठविले कीं आम्ही निरोपाची मार्गप्रतीक्षा करीत आहो. आपा निरोप घेऊन आद्याप आले नाहीत. पुढे कसे करावे? त्याप्रो पाटील मजकूर याणी जाऊन सांगितले. त्याचे उतर सांगावयासी आले की सरकारची आज्ञा घेतली. उदईक कूच करून जावे. त्याप्रो पाटील याणी सांगितल्यावरून मंदवारी प्रात:काली कूच करून सरंजामसुधा बुधवारी प्रहर रात्रीस पुणियास आले. दगेकरी याणी कर्नाटकी तऱ्हेचे चोलणे घातले होते, याजमुले करनाटकी असा भास ज्याणी पाहिले त्यास जाला. परंतु शास्त्रीबावास मारून जातेसमई 'पुरे जाले' हे आक्षरे मराठी भाषेनें बोलले, मग कर्नाटकी असोन मराठी बोलले किंवा मराठे असोन कर्नाटकी वेष हे नकले.

¶*The paper narrates the circumstances under which Gangadhar Shastri was murdered at Pandharpur.*

No. 85] [*15-8-1815*

श्री

यादी पत्राची रवानगी छ ९ रमजान श्रावण शुध्ध ११ मंगलवार आडीच प्रहर दिवस सन १२२५ सीत अशर मयातैन व अलफ. पत्रे.

१ तीर्थरूप राजश्री नानासाहेब यांचे नावे मुख्य पत्र, हैद्राबादेची पत्रे लिहिली आहेत ती आवलोकन करून डांकेवर रवाना करावी म्हणोन.

६ बनाजी हैबतराव याचे नावे.

१ मुख्य पत्र, तुम्ही छ २९ शाबानचे पत्र पुरवण्यासहित पाठविले ते छ २ रमजानी पावले मजकूर समजला. इकडून त्याचे उतरे व

7065

इकडील मजकुराची पुरवणी आलाहिदा पाठविली आहेत. मजकूर समजेल. नवाबाचे सरकारची आखबार छ २० शाबान ता। छ २३ माहे मजकूरची पाठविली ती पाहाण्यांत आली म्हणोन.

१ पुरवणी, श्रीमंत माहाराजांची खासा स्वारी क्षेत्र पंढरपुरास गेली होती. तेथे यात्रा सांग होऊन श्रीचा निरोप घेऊन छ २६ शाबानी कूच जाले ते छ ३ रमजानी राजधानीस आडीच प्रहर दिवसास बुधवारी दाखल जाली. श्रावण मासचा समारंभ साला-बादप्रा। प्रतिपदेपासून पंचमीपर्यंत खिचडी ब्राम्हणास वाटून षष्ठीचे दिवसी रमण्यात खासा स्वारी जाऊन दक्षणेस प्रारंभ करून सप्तमीस आस्तमानी तोफा सोडून समाप्ति केली. ब्राम्हणसमुदाय दक्षणेस पुष्कल आले.

१ पुरवणी राज्याजीनी[1] दोस्तीचे विचारे तुम्हास घराऊ सुचविले हे दोस्तीचे इराद्यास चांगले. परंतु प्रस्तुत येथील क्रम बोलण्याचा चांगला आहे. त्यांत नालीस कधी मारानिलेची आली नाही व दुसरे द्वारे खुलसहि समजला नाही. तुम्ही लिहिल्यावरून ताजूब वाटले. शोध करविला आहे. बोलण्यांत उपयोगी नाहीत व साहेबाची मर्जी असे समजल्यास हुजूर विनंती करितां येईल. कामाकाजांत बोलण्यांत ताडा (लढा) पडून येखादे काम तटावर पडावे असेहि जालियांत नाही. तथापि येथून तेथे उद्गार समजल्याखेरीज तेथे वार्ता कशास निघेल? तुम्ही लिहिल्यापासून त्याच शोधात आहे. याच प्रकारे राज्याजीकडे येथील नूनाधिक समजल्यास दोस्तीचे इराद्याने त्याणी तुम्हांस सुचवीत जावे.

१ कुंजर मारानिले यांचा माझा आति स्नेह. दुसरा विचार नाही. तथापि श्रीमंत माहाराजानी कारभारात वागविल्यास दौलत उमदा च्यार माणसे ममतेतील दौलतीत वागल्यास उत्तमच आहे. माणूस तेथे दौलत कुंजर मनसूफ सरकार लोभातील व पोख्त पहिले वागलेले ते दुसरे रस्त्याने जाणार नाहीत. सर्व कर्णे खाविंदाकडे. जे होणे ते समजोन होईल, राज्याजीनी दोस्तीचे इराद्याने तुम्हांस सांगितले येणेकडून संतोष वाटला.

---

1 Raja Chandulal.

१ श्रीमंत माहाराजास सालगुा जेष्ट मासी कन्या जाली होती तिजला खोकल्याचा उपद्रव होऊन छ ६ रमजानी शनिवारी मागील च्यार घटका रात्री देवआज्ञा जाली म्हणोन.

१ चिरंजीव रा सखाराम चिमणाजी औरंगाबादेस वकिलीचे कामावर आहेत. तेथे गोविंद बक्ष यासी बोलण्याचे मजकुरावरून दुरुस्ती नव्हती. तो आलफिष्टिनसाहेब सहल करावयास तिकडे गेले त्यासी याणी मजकूर केला, परंतु सफाई जाली नाही. तो साहेब मवसूफ वेरुळाहून मांघारे फिरले. त्याजसमागमे चिरंजीवहि पुण्यास आले. माघारे लौकर साहेब फिरले म्हणोन बोलणी तसीच राहिली म्हणोन पुरवणी.

६

७

पत्रे सात ती राजश्री कृष्णराव माणकेश्वर याचे नावे लाखोटा करून टेंभुर्णीस रवाना केला असे.

¶*This paper gives some details of Bajirao's movements and actions. It contains short summaries of letters despatched.*

No. 86] [*8-10-1815*

पो छ १७ जिलकाद
सन सीत आशर

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
वामनरावजी तात्या स्वामीचे शेवेसी

पो त्रिंबक बाबाजी जोसी कृा सा ना विा. येथील कुशल ता छ ५ जिलकाद रोज रविवार पो मुा हुबली येथे सरकारचे फौजेत सुखरूप असो विशेष. आलीकडे आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही तरी येणाराबरोबर पत्र पो आज्ञा केली पा विा. इकडील वर्तमान रा केसोपंत निा पिराजी सोनवणी याजबरोबर पत्रें पा ती पावलीच असतील त्याजवरून श्रुत जाहाले असेल. आलीकडील वर्तमान निपाणकराकडील केरबा सिंदे म्हणून स्वार पायदल घेऊन सरसुभांचे कुमकेस होते. त्याणी आपला जमावसुधा

7067

किलेकरास मिळोन छ २७ सवाली हावेरी पेठेचे मोर्च्यावर येऊन लढाई घेतली. मोर्च्यावर सरकारचे शंभर स्वार व आबदुल वाहाब आरबाची बिरादरीचे लोक होते तेथे मोठी लढाई जाहाली. सरकारचे लोकानी कस्त चांगली केली, परंतु त्यांचा जमाव फार याजमुळे व काटक सरसुभाकडील व कितुरकराकडील निघाले. त्याजमुळे आरब फार जाया जाहाले. मोर्चा सोडून मंगळवार पेठेत आले. दुसरे दिवसी छ २८ रोजी किलेकरी व निपाणकराचा झाडून जमाव पेठेवर आले, तेव्हा काटक लोक झाडून तोंड न घेता मागे सरले ते नीट पेठेतच आले आणि लढाई चालली. सरकारचे लोकाचे मोर्च्यात तोफ होती ती घेऊन लढत गोल बांधून तोफ घेऊन संभाळून निघाले. सरसुभांचे मोर्च्यात जंबुरा होता तो घेऊन ते निघाले, ते वेसीमध्ये जंबुराचे भारकस तुटून तेथेच राहिला. निघाला नाही. त्यांचे लोक पेठ घेऊन बाहेर तल्यात मागे मारीत आले तेथे काटक पलत आसता दाहापाच जाया केले. मग सरकारचे वगैरे स्वारानी तेथे लढाई चांगली दिल्ही. माघारे पेठेत नेऊन घातले ते पेठेतच उभे राहिले. रा। हैबतराव सुभेदार फौजसुधा मागे मौजे आमरगोलास येऊन उतरले. आपण गढीत बसून लोकास आत येण्याजाण्यास आटकाव करू लागले. तेव्हा दुसरे दिवसी लोकानी येक दिवस त्यास धरणे बसून त्याजकडून येकूणतीस हजार रुपयांची जखमान्याबदल व मयतान्याबदल व घोडी ठार जाहली त्याजबद्दल व हात्यारे व दारूगोलीबदल वगैरे सावकारी निशा घेतली. तेच रात्री हैबतराव गावात निजावयास गेले ते मागील दिंडीवाटे रात्री निघोन कोणास न पुसता गेले, आसे प्रात:काली सर्वास समजले. नंतर फौज बहिरबुनगेसुधा हुबलीस आली. येथेहि हुबलीत हैबतराव आहे नाही कलत नाहीं. किल्यात कोणास घेत नाहीत. कुसेगलासहि गेले आसे म्हणतात. तालुक्यात काटकाई उभी राहिली. तमाम जमीदार जमाव करून ठाणी घेऊ लागले. कलघटगीचे ठाणे देसायाने घेतले म्हणून आताच वर्तमान आले. आसे जाहाले आहे. आजपरियंत लोकसुधा चाकरी हल्यां मोर्च्यात कस्त करून केली. सरदार ह्या तऱ्हेचा. निर्फळ जाहाली. असो. आजपरियंत हैबतरायाचे तैनातेस सरकारचे लोकानी व आम्ही चाकरी केली. हाली मारानिले आदश होऊन बसले. पुढे लोकानी व आम्ही कोणाचे हुकमात वागून कोणाची चाकरी करावी येविसीची आज्ञा यावी. जखमान्याबदल यैवज हैबतराव याजकडून लोकानी घेतला तो सावकाराकडेच आहे. येथे आम्ही कोणास देत नाही. मागील जखमान्यांचा पट आकारून पा। आहेच. आलीकडील जखमी व ठार यांची यादी आकारून मागून पो। जखमान्याचे व घोड्याचे आख तेथूनच पडून यावे. त्याजप्रो। करू; अगर जसी सरकारची आज्ञा

7068

येईल त्याजप्रो करू. सरसुभांचे नेमणुकेस सरकारी दोन हजार लोक व सवाशे स्वार आहेत त्याची हजीरी घेऊन रोजमुरा हातावर द्यावा म्हणून पत्र यावे म्हणजे त्यात सरकारचे काम होईल. येक महिन्याचा रोजमुरा ह्या लोकाबरोबर हुंड्या परभाऱ्या याव्या म्हणजे समजेल. सूचना विनंती लिा आहे. बहुत काय लिा कृपा लोभ करावा हे विनंति.

¶*Trimbak Babaji reports to Vamanrao details of fighting at Hubli.*

No. 87] [1816?

श्री

यादी कलमे दीक्षित याणी सदासिवपंत भाऊ याचे विा ठराऊन द्यावी ते येणेप्रोः—

१ श्रीमंत माहाराज प्रातःकाळापासून रात्रपर्यंत काय बोलतात, कोणासी खलबत करितात हे झाडून वर्तमान रोजचे रोज कलवीत जावे.

१ जातीने सरकारचा कारभार करितील त्याची वरदी रोजचे रोज द्यावी.

१ सरकारफौजेचे सरदार यास माहाराज आतून बंदोबस्तास कोठे पाठवितात, व सरंजामास मोघम काय देतात ही बातमी कलवावी.

१ श्रीमंतास पत्रे येतात त्याची उतरे काये देतात हे तावार कलवीत जावे.

१ महिन्याची हजरी लोकांची होत्ये त्यास ब्राम्हण व मराठे व मुसलमान किती याची हजरी समजवावी; व सिपाई यास दरमाहा काय देतात व देनगीत तोडजोड कसी करितात हे कलवावे.

१ त्रिंबकजी श्रीमंतास भेटला की नाही ही बातमी पकी काढून सांगावी.

१ पेंढारी उठले आहेत, यास आश्रय कोणाचे हे कळवावे.

१ आमची खासगत गोष्ट श्रीमंत काय बोलतील ते सांगावे.

१ नागपुरवाले भोसले याचे कारभाराविसी माहाराज काय बोलतात ते कलवावे.

सहरहू कलमे लिहिली आहेत, याची बातमी खरी सांगावी; विद्यमान सदासिवपंत भाऊ. याप्रो ठरावाची याद जाहाल्यास सर्व बोलणी बेताप्रो करार करून द्यावयासी येतील.

¶*Instructions issued to Mor Dikshit for supplying news to the British Resident relating to the doings of Bajirao. Sadashiv Mankeshwar was to ask Bajirao's sanction for supplying the required information to the Resident.*

No. 88] [25-1-1816

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री
बाबासाहेब यासी प्रति

आश्रित मोर दीक्षित मराठे वेदोक्त आसीर्वाद विज्ञापना ऐसीजे. कसबे गुहागर येथील सरकारवाड्यांत पांथस्थ यति व ब्रम्हच्यारी व आथिती व अभ्यागत ब्राम्हण व साधुसंत व दिनांध कृपण समई येतील त्यांस आतृप्ति यथोपपन्न सिधान्नदान व विद्यार्थी भिक्षेकरी समई येतील त्यास चालीप्रमाणें सिधान्न भिक्षा व शुश्कान्न. भिक्षेकरी येतील त्यांस संप्रदायाप्रमाणें शुश्कान्न भिक्षादान व अनाथप्रेतसंस्कार वगैरे धर्मकृत्याबदल सरसालीना नेमणूक अजमासें रुा २००० दोन हजार चांदवड छापी यासी मुदत ह्या माघ शुा १ शके १७३७ युवनामसंवत्सरे ताा पौष वाा ३० शके १७३८ धातानाम संवत्सर येकूण बारमाही बेगमी बदल राजश्री आपाजीपंत आगासे याजकडून देविले ते स्वाधीन जाहाले. मिति पौष वाा ११ गुरुवार युवानाम संवत्सर शके १७३७ मुाा गुहागर तालुके अंजणवेल श्राा होय हे+ विज्ञापना.

¶*Mor Dikshit Marathe acknowledges to Bajirao Peshwa the receipt of Rs. 2,000 sanctioned by way of charity to the poor Brahmans and maimed beggars visiting Guhagar, the native-place of the Peshwa's mother.*

No. 89] [21-5-1817

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री बाबूराव गणेश
कादार क्षेत्र पंढरपूर गोसावी यासी

सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सुरु सबा अशर मयातेन व अलफ. त्रिंबकजी डेंगला कुंपणी इंग्रजबाहादूर याचे कैदेतून पळून बंड करीत फिरतो. त्याची चौकसी करून डेंगला मजकूर याचे ठिकाण लाऊन जिवंत अगर मेला सरकारांत हवाला करून देईल त्याजला बक्षीस दोन लक्ष रुा व हजार रुपायाचा गाव इनाम इंग्रजबाहादर याचे विद्यमाने दिल्हा जाईल. याप्रमाणे खातरजमा राखोन सरकारचाकरी करून दाखवावी. याची पुर्ती चौकसी करून जो त्रिंबकजीस धरून आणून देईल त्याजवर सरकारची सर्फराजी होईल. येविसी कोणी

+ येथून निराळें अक्षर खुद्द मोर दिक्षितांचें.

अनमान करील त्याजवर सरकारची इतराजी होईल. समस्त गरीब रयत ब्राम्हण व मराठे व वाणी व उदमी व परदेसी व मुसलमान व बेरड भील व मांग व रामोसी व रहदार वगैरे जे कोणी त्रिंबकजी डेंगला याचा पता अमुक जाग्यावर आहे असा प्रत्यक्ष सरकारात दाखऊन देतील त्यास पाच हजार रुपये बक्षीस व येक चाहूर जमीन इनाम इंग्रजबाहादूर याचे विद्यमाने पावेल. डेंगला मजकूर याचा पता ठाऊक असोन जर कोणी सरकारांत समजाविण्यास अलस केला असे विदित जाहाले तरी त्याचे पारिपत्य होईल. त्रिंबकजी डेंगला बंडवाला याचे मिलाफी असामी बीताा.

१ बापू गायकवाड शेटफलकर
१ नागोजी वालुंज
१ रविराव सिंदे लोंणीकर
१ माहादाजीपंत नातेपोतेकर
१ तिमापा वडारी
१ गोधाजी डेंगला
१ सयाजी मुळे
१ आपाजी पाा कुरबावीकर
१ निबाजी जाधव फलटणकर
१ महिपतराव डेंगला
१ बापू बारडकर
१ दाजी डफले

१२

येकूण बारा आसामी याचे कुटुंबाची मुलेंमाणसे कैद करून बेड्या घालून बंदोबस्तीने हुजूर पोहोचती करणे व त्याची घरे जमीनदोस्त करून घरातील चीजवस्त सुतलीचे तोड्यासुधा जफ्त करून त्याचा आकार होईल तो जाजती सिबंदी वगैरे खर्च लागेल त्याऐवजी घेणे व त्यांची इनामे वतने वृत्ती असतील त्या जफ्त करणे. या बारा असामी पैाा जे कोणी त्रिंबकजी डेंगला यास धरून आणून देतील त्याचा आपराध माफ होऊन वर लिहिल्याप्रमाणे बक्षीस पावेल. या बारा आसामी खेरीज करून बंडाचे मिलाफी स्वार व पायदळ व कारकून व शागीर्द पेशा वगैरे बंडाची चाकरी सोडून आपलाले घरी येऊन जमीनदार व मोकदमासी रुजू होऊन राहिले असता त्यास बंडाचे मिलाफाचा अपराध माफ केला जाईल. बंडाची चाकरी सोडून आपलाले घरी येऊन जमीदार व मोक-

दमासी रुजू होऊन राहिले असता त्यास बंडाचे मिलाफाचा अपराध माफ केला जाईल. बंडाची चाकरी सोडून न आल्यास वर बारा आसामीचे पारपत्य करावयाचे लिहिले आहे, त्याप्रमाणे याचे पारपत्य करणे. बडाचे मिलाफी गरीब लोक यातून कोणी त्रिंबकजी डेंगला याचा पता लाऊन प्रत्यक्ष सरकारास दाखवून देईल त्यास वर लिहिल्याप्रमाणे बक्षीस पावले जाईल. जाणिजे छ ४ रजब *आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa announces a reward for the capture of Trimbakji Dengle and his twelve accomplices.*

No. 90] [*4-7-1816*

छ २३ साबान

सन सबा

श्रीगज्यानन

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक लाडोजी वरपे कृा विा येसीजे. येथील क्षेम ताा छ ८ साबानपावेतो मुकाम नागपूर येथे साहेबाचे कृपावलोकने करून आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्थित आसे. यानंतर इकडील वर्तमान छ ६ मिनहूस साहेबाचे सेवेसी विनंति लिहिलीच आहे. त्यानंतर पुण्याहून राजश्री सदासिव बापूजी घारपुरे याची पत्रे राा मुधोजी भोसले यास आली ती राा राघो धोंडदेव निाा नारायेणराव वैद्य यानी नेऊन गुजरली. त्याणी वाचून पाहून उतरे प्रत्योत्तरे जाली याचा तपसील माारनिलेनी नारायेणराव वैद्य यास लिहिला आहे तो सेवेसी विनंति करतील. दुसरे राा गुज्याबा गुजर याजकडे रसाला व आरब वगैरे पायेदल होते ते काहाडून घरी बसविले आहे, आण फिरंगी याची दोन पलटणे चाकरीस ठेविले ऐसे ऐकत आहो. त्यास * * रोजमरा दिल्हा ऐसे बोलतात. पुढे काये घडेल तैसी सेवेसी विनंति लिहीन. व राा नारायेण येशवंत चिटनीस यास बोलाऊन तेलंगखेडीस नेऊन ठेविले आहे त्याचे जवल च्यार बारीदार ठेविले आहे. त्याचे जवल कोन्हास येऊ देत नाही. यास कोन्हीकडे जाऊ देत नाही ऐसे वर्तमान आहे व सेनासाहेब याची स्त्री बकाबाई यास कैद केले असे दिसते, आण चंद्रपुरास पाठविणार आहेत ऐसे बोलत आहे. साहेबाचे सेवेसी शृत होये हे विज्ञाप्ति.

¶*Ladoji Warpe sends news from Nagpur about Appasaheb entertaining British regiments in his service and of his keeping Bankabai under arrest.*

No. 91] [12-9-1816

श्री

राजश्री हरबा आबा यांसी प्रति त्रिंबकजी डेगळे रामराम विनंती विशेश. होळकरानें इंग्रजाचा थोरला माणूस मारला सबब आम्हास फासी द्यावया कर्ता मेण्यांत घालून बरोबर पंचवीस गारदी देऊन खाडीचे काठी आणिले. पुढे फासी द्यावा ते समई आम्ही पाहारेकरी यासी बोलिलो की आम्हास मारू नये, जिवंत घेऊन पुण्यास चलावे, मी तुमचे उपकार फेडीन. तेव्हा पाहरेकरी बोलिले की आम्हास सोळा हजार रुपये द्यावे त्यांत पंधरा हजाराचा मोहरा, रोख हजार, येकूण सोळा हजार रुपये पुण्यास जातांच द्यावयाचा हमीदार द्यावा म्हणजे पुण्यास नेतो, या प्रमाणे बोलिले. तों इतक्यामधे हे आपा जोसी तेथे आले. त्यास आम्ही बहुत प्रकारे सांगून हमी दिल्हे की यास जिवंत पुण्यास घेऊन चलावे. पुण्यास जाताच सदरहू सोळा हजार रुपये खुद आम्ही देऊ, दुसरे यासी संबंध नाही. याप्रमाणे जोसीबावानी हमी दिल्ही. हमीदार देतांच रात्रीचा दिवस करून ठाण्याहून आज सहावे दिवसी दिवस मावळतां पुण्यास दाखल जाहालो. हे वर्तमान कोणास न कलता पत्राप्रा सदरहू ऐवजाची तर्तूद जलदीने करून आज प्रहरे रात्रीचे आत जोसीबावाचे हातून पाहारेकरी याचे हाती ऐवज गेला पाहिजे तर आम्ही वाचतो, नाही तर जोसीबावा व आम्ही वाचत नाही. याजकर्ता ऐवज घेऊन जोसीबावा-बरोबर यावे. जोसीबावा बेत सांगतील त्या(प्र)माण करावे. उगीच गलबल करू नये. सांगतील त्याप्रमाणे चालावे. ही जिवासी गाठ आहे. याजकर्ता लिहिले असे. येथून सुटलो म्हणजे आपले फडचा * * न न बापू गोखले याचे लशकरात जाणार. कलावे हे विनंति.

¶*Trimbakji Dengle writes all in his own hand to Harba Aba communicating what measures he had concerted in order to effect his escape from the Thana prison and asking Harba to pay the promised amounts to the guards who helped him to escape. This solves the mystery of Trimbakji's escape on 12th September 1816 from the prison of Thana.*

No. 92] [17-12-1816

श्री

राजश्री त्रिंबकजी तात्या गोसावी यांसी

ॐ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो खंडेराव हुजरे रामराम विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २७ माहे मोहरमपावतो मुाा कोटे येथे येथास्थित असे विशेष. आपल्यापासून निघालो ते मुाा मापर्यंत सुखरूप पावलो. आपण

7073

होळकराचे लस्करात ज्या आसामीसाठी पाठविले होते त्यास त्याचा ठिकाण तेथे लाऊन ठेऊन आलो आहो. तो तुलसाबाईने आपले पाठिसी घातला आहे. मीरखान व बाईचे बोलणे पडले आहे की पाठीचे देणार नाही. याजकरिता पोटिचे मागि(त)ले तर देऊ याप्रो बोलणे जाले आहे. आपल्यास कलावे आणि ज्या कामांचे आपल्यासी बोललो आहो त्या कामाची आपल्यास फिकीर आसावी. आम्ही येथे पुढे महाराजानी ज्या कामास पाठविले आहे त्यासच कामास जातो. पंधरा दिवस तीन वारपर्येत कासीस जाऊन दाखल होतो. बहुत काय लिहिणे. तेथील काम माहाराज्याचे पुण्यप्रतापेकरून होईल चिंता नाही, हे विनंती. वाघ्या चांगला जाला आहे. आपल्यास कळावे.

¶*Khanderao Hujrya writes to Trimbakji Dengle saying that the man, whom the writer was sent to take over, has been given refuge by Tulsabai who along with Meerkhan is prepared to sacrifice anything in protecting the individual.*

No. 93] *[29-12-1816*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री
बाबा साहेब स्वामींचे शेवेसी

विनंती शेवक कासी शिवराम बंदरे कृतानेक चरणी मस्तक ठेऊन सिर साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. किले सातारा येथे श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामी यांजकडील साल मजकुरचा सन सबा अशर मयातैनचे खर्चाबदल तूर्त ११७०० रुा अकरा हजार सातशे चांदवड माहाराजानी पोतापैकी रा। जनार्दन कोंडदेव गाडगीळ पोतनीस यांजकडून देविले ते माझे स्वाधीन जाहाले. मिती पौष शुा। १० रविवासर शके १७३८ धाता संवत्सरे छ ९ सफर सन सबा अशर मयातैन शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. हस्ताक्षर चिंतामण चिटको कारकून निसबत बंदरे.

¶*Kashi Shivaram Bandre passes a receipt to the Peshwa for a sum of Rs. 11,700 received from him for the expenses of the Chhatrapati at Satara.*

No. 94] *[9-11-1817*

श्रीभास्कर

माहाराजाचे शेवेसी कासी शिवराम बंदरे चरणावर मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना. ताा छ २८ जिल्हेजपर्यंत सेवकाचे वर्तमान यथास्थित आसे विशेष. श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याची स्वारी सर्व खाशासुधा व ताई सिर्की

व बया सुरवीन ईसुधा आस्विन वा ३० मंदवारी पाहाटेस आज्ञेप्रो निघोन मौजे ताबवीस मुका(मा)स आलो. तेथून रविवारी मौजे इदोलीस आलो. उद्या वर जाणार. गेल्यानंतर मार मागाहून लिो. आज वर्जवार, सबब राहिले. श्रीमंत माहाराज छत्रपति स्वामी याणी रात्री जागोन लादालाद करऊन, वाटेने मेहनत अवघड जाग्यास उतरून चालल्यामुळे बहुत जाहाली. मर्जी बहुत प्रसन्न जाहाली. रायास संकट ते अम्हास आसी आज्ञा होऊन रायास लिह्यावे की, स्वस्थ असावे. ईश्वर येश देईल. शाहू माहाराज याचे स्मरण करून शत्रूचे पारपत्य करावे. वरदीचा कचा मजकूर राजश्री विसाजीपंत काळोस्कर यास लिा आहे. शेवेसी निवेदन करितील. माहाराजाचे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Kashi Shivaram reports the movements of the Chhatrapati and communicates to the Peshwa that the Chhatrapati is quite friendly to him (the Peshwa) and wishes success to the Peshwa over his enemy.*

No. 95] *[1816?*

श्रीरामचंद्र

साा नमस्कार. करीमखानाबरोबर कारकून व जासूद बातमीस आहेत. त्यास येथून सांगितले आहे की, जोपरयेंत करीमखान धरला गेला नाही तोपावेतो त्याचे बातमीस राहावे. त्याजवरून ते त्याचे बराबर आहेत. करिमखान होळकराचे लस्करात गेला आहे. तेथे जमत चालला आहे. मीरखानाचा आश्रय त्यास आहे. होळकर याणी वस्त्रेहि दिल्ही व कादरबक्ष गेढे (?) काठाकडे जमावानसी होता तोहि त्यास येऊन मिळणार आहे म्हणून वर्धीची पत्रे आली व करीमखा याणे सरकारात विनंतीपत्र व रो भाऊस व माझे नावाचे पत्र पो तेहि सेवेसी पाठविली आहेत त्याजवरोन ध्यानास येईल. मारनिलेकडील वकील येथे खर्च खाऊन बसले आहेत व मारनिलेची पत्रेहि येतात, येविसी जसी आज्ञा येईल त्याप्रो करीन. हे चोरटेभाई याचे बोलण्याचे प्रमाण नाही. आपले लगामी लाऊन ठेवावे यैसेच असल्यास आज्ञा यावी, त्याप्रो नेहमी लगामी लाऊन ठेवीन. आगर पारपत्याविसी आज्ञा आल्यास पारपत्य करावयास (सिध) आहो. सरकार माहालात खाडोली करू लागल्यास पारपत्यास फौज आलीच आहे. मोकाबलाकरिता फौजसुधा रवाना केले आहे. परतु जन्माचे चाकर ज्याजपासी होते त्यासी फिरून पडले. तेव्हा याचा भरवसा येत नाही.

¶*News is given in this letter about Karim Khan and his pursuit.*

No. 96] [9-1-1817

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री बाबा
साहेब स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक कासी शिवराम बंद्रे कृतानेक चरणी मस्तक ठेऊन सिर सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याजकडे व मातुश्री माईसाहेब याजकडे सालाबादी नेमणुकीखेरीज मर्जी खर्चाबा साल मजकुरी येक साला

७०० श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याजकडे
३०० मातुश्री माईसाहेब याजकडे

१०००

येकूण येक हजार चांदवड पोतापौ राजश्री जनार्दन कोंडदेव गाडगील पोतनीस याजकडून आमचे तसलमातीस लिहून देविले, ते स्वाधीन जाहाले. मिती पौष वा। ६ भृगुवार शके १७३८ धातानाम संवछरे छ २० सफर सन सबा अशर मयातैन. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. हस्ताक्षर विसाजी वेकंटेश शेवडे द्वि॥ मशारनिल्हे.

¶*This is a receipt for sums received from the Peshwa for the private expenses of the King and his mother Mai Saheb at Satara.*

No. 97] [24-1-1817

पौ छ १९ रबिलावल
इंदुवासर

श्री

विनंती उपरी माव श्रुा ७ भृगुवारी रात्रौ श्रीमंत राजश्री यजमान स्वामींनी निद्रा केली होती. मध्यरात्रीचे समई येक हुजऱ्या न पुसता आकस्मात बिछान्याजवळ गेला, तो श्रीमंत ज्याग्रत जाले, तो त्याजला पुशिलें की तुझा राबता येथें नसतां तुजला येवढे रात्रौ येथें येण्याचें प्रयोजन काय? त्याजवरून तो चावळून बोलूं लागला, त्याजवरून त्याचे पारपत्य केले. हालीं तो हुजऱ्या राजश्री बापू गोखले याचे स्वाधीन केला आहे. तेथें लोक मनस्वी आवया आणतील; याजकरितां जालें वृत तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. पत्र कोणाचे द्रष्टीस पडूं नये. पाळणपूर झालवाड वगैरे माहालचा मजकूर तुम्ही लिहिला त्याचीं

उत्तरें आगोधर तुम्हास विस्तारें करून पाठविलीं तीं पावलींच असतील. येथील मुख्य जलचरानें पत्र मुंबईस कारकुनाबरोबर पाठविलें आहे. तो सर्व मजकूर तुम्हांस लिहिलाच आहे. तेथें तुमचे नेट आहे व इकडूनहि उद्योग नेटाचाच आहे. तेथेंच ते तुमचे मनोदयानरूप तुमचा फडसा करितील आसें वाटतें. रवाना छ ६ रबिलावल सन सबा आशर मयातेन मंदवार आस्तमान हे विनंती.

¶*The writer makes mention of an entry of a suspicious servant into the Peshwa's room at night.*

No. 98] [*1-3-1817*

मुकाम ग्वालेर

१ आगऱ्यानजीक येमुनेस नावेचा पूल बांधिला व गव्हाचा आटा तयार होत आहे.

१ शीखांकडील वकील जाण्याची जलदी करीत आहेत, सा। दाजी मोरेश्वर याणी अर्ज केला. उत्तर केलें कीं पांच च्यार रोजीं रवाना करूं.

१ इटाव्यास यमुनातीरीं पलटणें आलीं त्यांचे बातमीवर डाक बसविली. वरचेवर वर्तमान आणवितात.

—

३

छ १२ रबिलाखर.

मुकाम नगर

१ घोडनदीस पूल बांधावयाचा कार(खा)ना चालता जाहाला आहे.

१ नगरच्या किल्यांत दरवाज्याचे वाटेंतील पुलास पालथा दादर[+] करविला. आंतील इमारतीची तयारी होत आहे.

—

२

छ १२ रबिलाखर.

ग्वालेर

१ हिंदुराव घाटगे याजकडून बुधसिंग यास दिली आगरा लाहूर येथें पाठविलें.

१ आगऱ्यास च्यार पलटणाची तयारी आहे.

१ ज्यान बतीसाचे वकिलानें खर्चाविशी अर्ज केला. त्यासी उत्तर केलें कीं तुम्हाकडे माहाल मुलूख असतां खर्चाचा किसा सांगता हें काय ? त्याजवरून वकिलानी उत्तर केलें कीं आमचा पैका राघोगडावर गेला याजकरितां अडचण. तरी तुम्हास किल्यावर ऐवज ठेवावयाचें कारण काय ? सर्वांस खर्चास मिळेल त्याप्रमाणें तुम्हास देऊं. माहाल मुलुखपैकी खर्च करावा.

[+] पालथा दादर = draw-bridge.

होळकर.

१ कपुरखांकडून पत्र आलें कीं आम्ही फौजेचा मुकाम करून आहों. कहीक-बाडीची ताकीद केली. पलटणवाले समजाऊन न्यावे. आमचें ऐकत नाहींत. जिनसी तोफखाना लष्करांत आणविला. गंगराडचे किल्यांत नागोरचें ठाणें बसलें.

१ गणेशपंत पिटके महितपुरास गेले होते ते माघारे लष्करांत येऊन भेटले.

१ विंचुरकरांकडील तिळगुळाचीं पत्रें वकिलांनीं आणिलीं.

१ नागपूरचें वर्तमान आले[1] सां तीन दिवस चौघडा बंद होता.

१ मीरखांची व जैपुरकराची लढाई जाहाली.

५

छ १२ रबिलाखरी.

नागपूर.

१ छ १२ रबिलौवलीं मुधोजी भोसले शहरांत दाखल जाहाले. परसोजी भोसले याचें उतरकार्य दानधर्म जाहाला. मनभट उपाद्ध्ये यांणीं गयावर्जनाचें उदक सोडल्यावर काकस्पर्श जाला. इंग्रेज समाधानास आले होते. पंचवीस तीस हजार दानधर्म केला.

१ रामचंद्र वाघ, नागो त्रिंबक व मनभट उपाद्धे यांसी खलबत जाहालें. चंद्रपुराहून नऊलाख रुपये व जवाहीर दाखल जाहालें. सेनाधुरंधर फाल्गुन वद्यपक्षीं दोन लग्नें करणार. तयारी होत आहे.

१ मुधोजी भोसले याणी मायाजाल घालून, इंग्रेज घरांत घालून रघोजी भोसले याची दौलत सर्वस्वें हरण करून दरोबस्त कुटुंबांतील माणसें दाणादाण जाहाली. कोणास जागा राहिली नाहीं. भोसल्याचे घरांत पूर्वीपासून दौलतीचे दोन विभाग भिन्न आहेत, याची पंचाईत होऊन फारखत्यां जाहाल्या, तीन पिढ्या स्वतंत्र सेनाधुरंधर यांजकडे चंद्रपूर, व सेनासाहेब यांजकडे नागपूर, असें असतां हालीचा प्रकार जाहाला, तो शेवेसी लिहिला आहे. सर्वस्वें दौलतींत रक्षणें माहाराजाकडे असें सर्व बोलतात. देखिलें ऐकिलें वर्तमान लिहिलें आहे. कळावे. छ १२ रबिलाखर.

३

¶*This is a summary of news received at Poona from the courts of Indore, Gwalior and Nagpur.*

---

1 Death of Parsoji Bhosle on 1st February 1817.

7078

No. 99] [1-4-1817

नकल

श्री

यादी सरकार दौलतमदार कंपनी इंग्रेज बाहादूर सुरू सबा अशर मयातैन व अलफ छ १ माहे आप्रिल वीसवी मुताबिक छ १२ जावल व ३ रोज वीसची मुताबिक छ १९ रोज या दोन रोजात दोन यादी माहाराजाचे खिदमतीस हाजीर केल्या होत्या. त्यांत विनंति केली होती की माहाराजाकडून नवीन सिबंदी ठेवितात व किले कोटाची तयारी चाली आहे त्या प्रो ज्यारी असल्यास कंपिनी बहादूर याजकडूनहि तैसीच तयारी कर्णे प्राप्त होईल; असे असता तेव्हापासून पुणे मुकामी व जागोजागा जवलपास दूर देशात माहाराजाचे मुलकांत फौज चाकरीस ठेवितात आणि किले कोटाची तयारी ज्यारी चालविली आहे हा मजकूर समजण्यात आला, व बंडाचे सरदार त्रिंबकजी डेंगले होऊन त्याचे फौजेचा जमाव बिनदिकत ज्याजती होऊ लागला आणि प्रसिद्ध होऊन मुलकात बाहेर मैदानात पडले आहेत आणि माहाराजाचे मुलकातील गावगना कमाविसदार वगैरे अधिकारी याणी बंडाचा रोख कोठे आहे त्याची बातमी इकडील सरदार कर्णेलसाहेब यास वास्तविक सांगितली नाही. म्हणोन येक वेल बंड लस्करापासून बच्याऊन गेले आणि येक इंग्रेज सरदार आपले सरकारचे दोस्तीचा मुल्क ऐसे समजोन सडे जात होतो त्याजवर खून करून त्यास ठार केले. या प्रो बंडाने काम ज्यारी चालविले आहे. खानदेशांत बंडाचा जमाव जाला तो घाटाचे अलीकडे येत आहे. तेथे त्या जमावास मिलोन दक्षण दिशेस यावे ऐसा त्याचा इरादा आहे ऐसे दिसोन येते. त्यास माहाराजाचे सरकारातहि तयारीच आहे व बंडाचा फैलावा मोठाच जाहाला. याजकरिता पुणे मुकामी इंग्रजी लस्कर आहे त्याची मजबुदी राखावी, ऐसा पहिलेपासून इतल्ला दिल्हा आहे त्याप्रो हाली नमुदांत आणणे जरूर जाहाले. त्यास त्रिंबकजी फौजेचा जमाव करीत आहे व दुसरे जे कोणी माहाराजाचे हुकुमावरून फौजेची तयारी करीत आसेत ती जलदी करून होऊ न द्यावी यात फाइदा आहे; परंतु इंग्रेजी सरकाराकडून जलदी होत नाही, याचे कारण हेच की कलकत्याहून जबाब आलियावर माहाराज आपले दानाई[1] विचार करोन फिरोन दोस्तीचे विचारावर येतील ही इंज्यानेबाची उमेद आहे. घोडनदीचे लस्करपैकी खडी फौज पुणे मुकामी आणवावी म्हणजे बंडाचा जमाव येथे आला असता त्याजवर चाल्हून जावयास उपयोगी पडेल. जर बंडाचा जमाव येथे न आला आणि दुसरा काही येक लढाईचा इरादा न जाहाला तरी फौज जसी मागे खडकीचे

१ दानाई = शहाणपण.

पुलाजवल राहिली होती तसी कलकत्याहून जवाब येई तोपर्यंत हाली मुकाम करून राहील. जर माहाराज पुणे सोडून बाहेर गेले असता माहराजाचे मनांत लढाईचा डौल आहे असे सिद्ध होईल, त्यास लाटसाहेब याचा जवाब येण्याचे पूर्वी माहाराजानी शहर सोडले असता किंवा लढाई सुरू जाहली असता लाटसाहेब याचे मनांत सल्लुक करावयाचे असेल तत्रापि तो मार्ग बंद होईल. याजकरितां इंज्यानेबाची उमेद ऐसी आहे कीं माहाराजानी शहर न सोडावे व लढाईचा इरादा होऊ न द्यावा. येणेकडून लाटसाहेब याजकडून सुदामत दोस्ती होण्याचा मार्ग बंद होणार नाही.

¶*This an ultimatum from Elphinstone to the Peshwa not to countenance Dengle's revolt, to demobilize his army and to remain in the capital. Breach of any of these terms would be looked upon as a declaration of war.*

No. 100] [*23-4-1817*

डे. कमि. रु. नं. १९७

ता॥ २३ आप्रेल

सन १८१७.

श्री

साहेबाचे सेवेसी आखबारी मा॥र छ ९ माहे जमादिलाखर रोज बुधवार :—

१ रोज मा॥री रात्रीस बापू गोखले व आंताजीपंत मामा व बालाजी लक्षुमण व मोर दीक्षित यासी च्यार घटका खलबत होऊण गोखले यासी फौजेचे खरचाऐवजी पंनास हाजार रु॥ देऊण आज्ञा जाली की, हाजार लोक पौदळ नवे ठेवावे. मग गोखले बरखास्त जाले उपरी, दीक्षित व बालाजी लक्षुमण यासी दाहा घटका रात्रपरयेंत खलबत जाले.

१ छ मा॥री भाऊसाहेबास बोलाऊ रामाजीपंत घाटगे यासी पाठविले. याजवरूण प्रथम साहा घटका दिवसानी भाऊसाहेब आले. यासी दोण प्रहरपरियेंत खलबत होऊण भाऊ गेले.

१ सरकार यानी भाऊविसी बहुत साकर पसरली आहे. वरकांतीचे बोलणे म्हणोण भाऊसहि समजले आहे. त्याजवरूण भाऊसाहेबानी बातमीकरिता तिवे कारकूण व पंचवीस तीस जासूद नवे ठेवले आहेत. कलम.

१ सरकार यानी भोजन करूण नारोबा आपटे यासी बोलाऊण आज्ञ्या केली की, तीणसे लोक पौदळ नवे ठेऊण रायेगडचे बंदोब्रस्तास पावे. कलम.

१ तिसरे प्रहरी बापू गोखले व अंताजीपंत मामा व बालाजी लक्ष्मुमण व मोर दीक्षित व आबा पुरंधरे आले. यासी संध्याकालपरयेंत खलब्रत जाले. कलम.

१ चिंतामणराव पठोर्धण यानी मिरज व सांगलीपरयेंत डाक बसविली. मारानिलेस सरकारची आज्ञ्या आहे की, तुम्ही पठोर्धण मंडली येकदिल आसावे, आनि सरवत्राकडील कारकुणानी आम्हांस नित्य भेटत जावे. कलम.

१ माधवराव रास्ते यानी खजिन्याचे च्यारपाच उंट बरोबर सैंभरपंनास स्वार देऊण आपले माहालात करनाटकात रवाणा केले होते. त्यासी येळूचे मुकामी रात्रीस रामुसियानी लुटूण नेले म्हणोण ऐकिल्यात आले आहे. कलम.

सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter reporting preparations of war undertaken and interviews given by the Peshwa.*

No. 101] [*13-5-1817*

पो छ ६ रजब सन सबा
अशर जेष्ट.

श्री

साहेबाचे शेवेशी विज्ञापना तागायत छ २५ जमादिलाखर रोज भौमवार मुक्काम लष्कर नजीक भोजाखेडी परगणे आकेट. दिनचर्या देवढी राजश्री मल्हारराव होलकर. प्रात:काली स्नान करून श्री मार्तंडाचे दर्शन घेऊन कचेरीत आले. शागीर्दपेशा वगैरे यांचे मुजरे जाहाले, व दरकदार व रतु पाटील, जोती हुजरे व हवालदार वगैरे याचे रामराम जाहाले. विठोबा जोग याजकडे जोती हुजरे व इंग्रजाकडील आकबारनीस जाऊन खलबत जाहाले. नंतर जोग व जोती हुजरे व आकबारनीस दिवाणाकडे जाऊन दिवाणासी खलबत जाहाले, व खंडबा थोरात व नाना गायकवाड व भगोबा रास्ते वगैरे सिलेदार व सेखजी हवालदार याचे दिवाणासी बोलणे जाहाले. इंगल्याकडील वकीलाबराबर पागा आहे त्याचे चंदीची परवानगी जाहाली. त्याचा मुकाम नदी पलीकडे होता तेथें रात्रौ चोराचा उपद्रव जाहाला. सबब आलीकडे येऊन मुक्काम केला. दक्षणीराव वैद्य

यास बोलावणी गेली होती. ते येऊन लष्करांत दाखल जाहाले. दिल्लीस सिंगरुबाचे बेगमीची पलटणे प्राचीन पातशाही चाकर आहेत. त्यास बेगमेचा काल जाहाला. तिचे गादीवर दुसरी बेगम बसली. तिजपाशीं इंग्रजानीं आसबाब मागितला. तो तिणे दिला नाहीं. सबब त्याजवर छापा घालावयास बारा पलटणे गेली. तेहि सावध होते. उभयपक्षीं लढाई होऊन इंग्रजाकडील चार पलटणाचा नाश जाहाला, तेव्हां माघारे आले म्हणोन वदंता आहे. दोन प्रहरानंतर दिवाण व जोग व बक्षी व जोती हुजरे व इंग्रजाकडील आकबारनीस व दरकदार व सिलेदार व पागे वगैरे कचेरीत गेले. नाच सुरू जाहाला. दिवाण व जोग व जोती हुजरे व अकबारनीस बाईकडे जाऊन खलबत जाहाले. माखणलाल जोशी कचेरीत जाऊन रामराम जाहाला. रामदीन याचे निसबतीस दोन पागा होत्या त्या ताल मंडावलेस गेल्या होत्या त्यास रामदीन याणी पत्रे पाठविली कीं तुम्ही निघोन आम्हाकडे येणे. लष्करानजीक येऊन बार काढीत येणे. ती पत्रे जोगांनी धरून दिवाणास दाखविली, तेव्हां सेडगे व ताडे व रामदीन याचा दंगा करण्याचा विचार जाणोन, रामदिनाकडील पागा काढोन हुजरातीत लाविल्या. बखताभाऊ याणीं लग्नाबद्दल मेजवानी केली. खाशा मुदबाखात भोजनाचा बेत होऊन, बाई व मल्हारराव व दिवाण व जोग व बक्षी व फडणीस दरकदार वगैरे भोजनास जाऊन, दोन घटिका दिवस राहता भोजने होऊन सर्वत्रास पानसुपारी दिली. गणेशपंत पिटके यांसही आमंत्रण आले; परंतु गले नाहींत. सदरदीन हवालदार याचे शिरी समाधान नाही. सबब दिवाण व जोती हुजरे व रतु पाटील त्याचे डेऱ्यास जाऊन खातरजमा करून कचेरीत आले. तुलसाबाईनीं पांच महार व पांच महारणीस उडदाचे भाकरीचे भोजन घालून लुगडी चोल्या दिल्या, व खुर्दा दिल्हा. सायंकालची रोशनी होऊन सर्वत्राचे रामराम जाहाले. प्रहर रात्रीनंतर दिवाण वगैरे आपले डेऱ्यास आले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer gives an account of the battle between the forces of the English and the army of Begum Sumru and states that the English were made to retreat. The daily happenings at the court of Malharrao Holkar are also reported.*

No. 102] [*19-5-1817*

श्री

आसीर्वाद उपरी ताा जेष्ठ शुाा २ रोज सोमवार प्रात:काल क्षेम आसे विशेष. अलीकडेस तुम्हाकडोन पत्र येत नाही. इकडोन पत्रें निमसोडकर याचे गाड्यासमागमे पाठविली आहेत त्यावरून कलेल. फिरंगियाचे लस्कर रोज गुाा कासें-

7082

गावांवर आले. गोपालपुरावर आठचार दिवस राहणार. दाहा पंधरा हजार सारे आहे. यैवजप्रा मार रा नानानी लिा आहे. कलेल. चिंतोपंत तात्या-कडील यैवज बाकी तेरासे निघाली ती व बाजीकडील दोनसे पंधराचे दादाकडेस देविती. वर्षासनचे देणे राहिले त्यास निपाणकराचे लोकाकडेस तीनसेचारसे येणे खर्चास दिल्हे ते यावयाचे ते आठ चार दिवसात येणार. टेंभुर्णीहून नानासाो * वास्तू घराचा जाहला. कुंजीर याचा काल वैशाख वाा ७स जाहाला हा मार कललाच आसेल. मामलतीचे दिवस समीप पत्रावली वगैरे चुकोती होणे आहेत, मग स्वारीत नीट पडत नाही यास्तव तुम्ही येऊन बंदोबस्त पुढील बोलणे करावे, आलस होऊ नये. माहुलीकडील मंडली सौ मुलगीस आणावयाचे त्यास भाऊस पुढे लिहून पाठवावे अगर इकडेस ल्याहावे. घोडी माणसे पाठऊ. यास्तव सातान्यास त्याचे घरास कोणी पाठऊन त्यास मार कलवावे. चवदा हजार प्रा मार नानानी लिा आहे कलेल कासार * आणखी पत्र भटानी आणिले. नित्य खटखट आहे. रावजी कारखानीस पंचाईत करू म्हणतात. पत्राप्रो कार्य करावे असे कासारबावाचे म्हणणे आहे. नाही तर माघारे पत्र द्यावे. चहूकडे उभयपक्षी अडचण आहे. कौलगीस पत्र दिल्हे, उतम केले. कौलगी याचे भांडण वाजबी नाही आसे म्हणतात. परंतु उपाय नाही. परिणाम नीट नाही. सारांश तुम्ही लवकर यावे. बहुत काय लिहिणे. पुढील बेत वाड्याचा वगैरे सूचना व्हावी. विशेष काय लिा हे आसीर्वाद.

¶*The death of Baloji Kunjir is reported by the writer of this letter among various other items of social and political nature.*

No. 103] [*27-5-1817*

श्री

यादी अखबारी पत्रातील मजकूर सुरूसन सबा अशर मयातैन व अलफ तागा-यत छ १० रजब.

मुक्काम ग्वालेर

१ राघोगडवाला देवासे येथें दहा हजार रुपये खंडणी मागत होता, तों इतकि-यांत आनंदराव भिमाजी बक्षी याचे बंधु फौज सुद्धां येऊन लढाई घेतली. राघोगढवाला मागे हटोन गेला. बक्षी याणीं दहा घोडी पाडाव आणिली.

१ कलकत्यास एक गोरा मोठा माणूस कैदेंत आहे. त्याणे पत्र विलाइतेतील बादशहास पाठविले कीं, आमची येथून सुटका कराल तरी पैसा व मुलुक सांगाल तो देईन. बादशहानें ते वर्तमान कलकत्याचे गोऱ्यास लिहिले. तुमची चौकशी पक्की असतां कैदवाल्याची अर्जदास्त आम्हाकडे आली

7083

तेव्हां मोठे कामाची चौकशी कशी ठेवाल? त्याजवरून कैदेतील गोऱ्याचे चौकी पाहऱ्यावर पहिले लोक होते ते काढून दुसरे ठेविले. वाड्याची दिवाल ठेंगणी होती ती उंची केली म्हणोन.

१ रामचंद्र भास्कर यासी पिछयार्डीचे विहिरी जवळ खलबत जाहाले.

१ भिवराज गबाजी निसबत चिटणीस याजकडील वकील सीकाचे वकिलाबरोबर देऊन भरतपुरास पाठविले. ते तेथें जाऊन, बोलणे करून, वकिलास घेऊन, भेटीस आले. सीकाकडील वकील सिंगरूप बेगमेकडे जाऊन भेटून इकडे पत्र रवाना केले, आणि लाहूरास गेला म्हणोन.

—

४

१ आमरसरचे सीक देसी गुरुदर्शनास जावयास आले. त्यास दोनशे रुपये दिल्हे.

—

५

मुक्काम लष्कर मल्हारराव होळकर

मीरखा याणी कपूरखा यांस एक लक्ष रुपये सत्वर पाठवणे म्हणोन शफत पुरस्कर पत्र पाठविले आहे. म्हणोन कलम १

मुक्काम मुंबई छावणीतील मजकूर.

१ रणजितसिंग सीक याचे व फतेखान वजीर याचे वैमनस्य पडून परस्परे लढाईचे इराद्यावर आहेत. आज शहाज्यादा कमरान याचाही दुस्मान फत्तेखा आहे. त्यासही सामलात करून घेऊन फत्तेखान याजवर चढाई करून जाणार म्हणोन.

१ विलायतीकडील रयतेवर जलेल जाजती जाहाली म्हणोन तीस चाळीस हजारपर्यंत रयत उदास होऊन, पातशहाजवळ ज्याजती दस्त घेतात ती घेऊं नये, हे न केले तर लढाई करूं याप्रमाणें म्हणोन.

१ छितू पेंढारी यास जाहागीर होती, ती सिंदे याणी काढली, यामुळे निराश्रित जाणोन इंग्रजाचे पलटणावर दगा करणार म्हणोन भय बाळगतात.

१ कटकचे नदी लगत इंग्रजाचे दोन किल्ले होते तेथें कोणी एक सरदार पांच हजार फौज घेऊन येऊन दोन किल्ले सर करून सरदार याणी आपले निशाण चढविले म्हणोन.

—

४

¶*This is a summary of news detailing the activities of the English, the Sikhs, the Pindharis, the Sindhia and the Holkar.*

7084

No. 104] [28-5-1817

श्री

चिरंजीव राजश्री बलवंतराव यांसी आसीर्वाद उपरी. येथील कुशल ता। जेष्ठ सुध १२ रोज बुधवार दोन प्रहरपावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. तुम्ही पुणेकर जासूद याजबराबर पत्र पाठविले ते पावले त्याचे उतर जासुदासमागमेच लिहून पाठविले ते पावले आसेल. हल्ली इमामभाईसमागमे पत्र पो ते हि पावले. मजकूर सर्व कलला. राजश्री त्रिंबकजी डेंगले यास बंडात कोणी खर्चास पोहचते केले म्हणून सरकारात मा।र इंग्रज बहादूर यांजकडोन बातनी समजली त्यावरून सरकार आज्ञा जाहली की याची चवकसी क्षेत्र पंढरपूर येथे साहुकार हुंडीवाले व बडवे वगैरे आदिकरून सर्वत्रास महाद्वारी मेलऊन वेदशास्त्र-संपन्न रा। विठल पाध्ये तात्या व आफटे याजकडील कारकून रावजी कारखानीस आहेत ते व दरकदार गावकरी याचे विद्यमाने पकेपणे चवकसी होऊन जामीन-मुचलके सरकारात पाठऊन द्यावे म्हणून येजमानसाहेबानी आज्ञा केली, त्यावरून आपणाकडील जासूद येथे येताच दुसरे दिवसी सर्वत्र मंडली सदरी लिहिल्याप्र-माणे मेलऊन हुंडीवाले व बडवे वगैरे मेलऊन चवकसी करून सर्वत्रास विचारले. त्यावरून हुंडीवाले याणी वगैरे बडवे याणी मुचलके लेहून दिल्हे व जामीन हुंडी-वाले याणी दिल्हे ते पाठविले आहेत. बडवे वृत्तिवंत, त्यास जामीन परकी कोणी होईना. दोन रोज बहुत घोल पडला. आपणाकडील पत्र निकडीचे त्यावरून जितके कागदपत्र सिध जाहाले तितके रवाना करून दिल्हे आहेत, येऊन पोहचतील. याची यादी आलाहिदा करून पाठविली आहे. बडवे यास जामिनाविशी तगादा केला. बडवे यास बडवेच जामीन प्रथक च्यार चवभाईतील घ्यावे, त्यास तेहि अनमान पडला. कोणी तंव्याचेमुळे होईना. तगादा आहेच. निकडी-स्तव कागदपत्र रवाना जाले. चवकसी माहाद्वारी होत होती तेथे तेथे फिरंगी इंग्रजबहादुर याजकडील कारकून डेंगले याचे प्रकरणी पत्र सरकारचे सिक्याचे घेऊन आले. पत्र कमाविसदार माहालानी व सरंजामी सरदार याचे नावी होती की, डेंगले यास जो पत्ता लाऊन धरून आणून देईल त्यास सरकारतून दोन लक्ष रुपये बक्षीस व जाहागीर येक हजाराचा गाव व अमुक ठिकाणी आहे हा पत्ता जो लाऊन सांगेल, त्यास पाच हजार बक्षीस, चाहूर जमीन येक, वगैरे बहुतेक तपशीलवार पत्र व बारा आसाम्या मिलाफी याचे नावनिसी नातेपुतेकर व नाझरे-कर व डफले वगैरे आहेत याचे पारपत्य वगैरे करावे म्हणून पत्र होते. ते पत्र सर्वत्रास वाचून दाखविले आणि घेऊन गेले. तामसेन कर्णेल म्हणून मुख्य इंग्रज आहे. त्याजपासी हा मजकूर आम्ही हुंडीवाले वगैरे यांची चवकसी करितात ही

बातनी कारकुन याने जाऊन कर्णेल तामसेन यास समजाविली हे खचित आहे. गोपालपूरचे मालावर लस्कर उतरले आहे. मल्यात उपद्रव होतो. कडबा लाकडे नदीपलीकडेस व आलीकडेस दाहा कोसपरियंत राहिली नाहींत. क्षेत्रात प्रथम दिवसी उपसर्ग कडबा वगैरे यास किंचित जाहाला. माहाद्वारी येक पाहरा जवल रखवाली हली हशमी देवळात जाईल याजकरिता रो शामराव व निा माणकेश्वर याचे व माहालानी सरंजामी सरदार याचे नावे आणिला आहे व त्याणी आपले हवेलीचे बंदोबस्त व पाच सिपाई कुडतीवाले आणिले आहेत. गंजी कडब्याचा घालितात. बंगले व छपरबंदी करावयास लागले आहेत. कलावे कडब्याची बेगमी करून ठेवितात. याप्राो मजकूर आहे. बहुत काय लिहिणे हे असीरवाद.

¶*The writer writes news to Balwantrao from Pandharpur about the proclamations issued by the Peshwa offering two lacs of rupees as a prize for any one who would hand over Trimbakji Denglia.*

No. 105] [*11-6-1817*

पौ छ १९ साबान सन
समान आशर आषाढ

श्री

शेवेसी आबाजी माहादेव कृतानेक साा नमस्कार विज्ञापना. ताा छ २९ रजबपावेतो मुाा बल्हारी येथे शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. इकडील मजकूर तर इंग्रज याजकडील दोन पलटणे व एक तुरूप पनास तोफा तुरूप स्वारात तयार जाल्या आहे. येक दोन रोजानी जाणार आहेत, व आणि जेथ जेथ पलटणे आहेत तीहि जमा होणार आहेत. हजार भोई डोल्यास नवे टेविले. आणखीहि ठेवीतच आहेत. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Abaji Mahadeo stationed at Bellary gives an account of the increasing mititary preparations of the English.*

No. 106] [*9-7-1817*

श्री

शेवेसी आबाजी माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ २३ साबानपावेतो मुकाम ब्रल्हारी येथें शेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशष. इकडील मजकूर तर तुंगभद्रा किनारा घाट आहेत त्यास दर घाटास वीस पंचवीस

टोकरे करविले आहेत. आदवानीवर लस्कर जमा होत आहे. तूर्त येथून दोन पलटणे व येक तुरूप व अकरा तोफा गेल्या आहेत. चेनापटन व त्रिचनापल्ली वगैरे येथून पलटणे यावयाची वदंता आहे. सारा जमाव दाहा हजारपर्यंत होणार आहे. कुंभार राज्याची फौज हजार दीड हजारपर्यंत स्वार येणार आहेत. शेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Abaji Mahadeo mentions some of the movements of the English armies in the Karnatak round about Adoni, Trichinopalli and Chenapattan.*

No. 107] [*9-7-1817*

श्री

राजेश्रिया विराजित राजमान्य
राजेश्री भिकाजीपंत आपा व
बापूजीपंत दाजी स्वामीचे शेवेसी

पोष्य आबाजी माहादेव सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २३ साबानपावेतो जाणून स्वकीये लिहीत जावे विशेष. इकडील मजकूर तर तुंगभद्रा किनारा घाट आहेत, त्यास दर घाटास वीस पंचवीस टोकरे करविले आहेत. आदवानीवर लस्कर जमा होत आहे. तूर्त येथून दोन फलटणे व येक तुरुप व अकरा तोफा गेल्या आहेत. चेनापटण व त्रिचनापली वगैरे येथून पलटणे यावयाची वदंता आहे. सारा जमाव दाहा हजारपर्यंत होणार आहे. कुंभार राज्याची फौज हजार दीड हजारपरयेंत स्वार येणार आहेत. बहुत काय लिहिणे. लोभ करावा हे विनंती.

¶*Abaji Mahadeo communicates to Bhikajipant Appa and Bapu Gokhale that the English are concentrating their forces on Advani.*

No. 108] [*19-7-1817*

पौ छ २६ रमजान
सन समान आशर माहुली.

श्री

सेवेसी आबाजी माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ४ रमजानपावेतो मुकाम बल्हारी येथे शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. इकडील मजकूर तर मुरीकोंडा याचे वाटेने सात पलटणे व तीन रजबीट व दोन

तुरूप व येकतीस तोफा व जरणेल याचे नांव कणवई ऐसे नदी उतरून मोगलाचे मुलखात गेले. त्याबराबर कर्नूलकर याची व गुलाम आली बैंगणपलीवाला याची फौज दोन तीन हजार जाणार, ऐसी वदंता आहे. चिथवाडगी व कंपली याचे घाटावर च्यार पांचशें टोकरे जमा केले आहेत. लस्कर आदवानीवर जमा जाले आहे. ते नदीपलीकडे कोपळ बहादरबिंडा याजकडे जाणार आहे. बेंगरुळाहून वगैरे पलटणे तीन व रजबीट दोन आले, ते परभारे गुतीहून आदवानीस गेले. आचलीचे घाटावर नदी उतरायास लागले ते वेळेस प्रथमच दोन टोकरे नदीमधे बुडाले. येक आपसर व पनास साठ गोरा वगैरे काळीं माणसे बुडाली. पुढे लस्कर पंढरपूरचे रोखास जाणार. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer reports the movements of the English troops in the Karnatak.*

No. 109] *[22-7-1817*

पौ छ २६ रमजान सन
समान आशर माहुली

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजेश्री बापूजीपंत दाजी व भि-
काजीपंत आपा स्वामीचे शेवेसी

पोष्य आबाजी माहादेव सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ ७ रमजानपावेतो मुकाम बल्हारी जाणून स्वकीये लिहीत जावे विशष. इकडील मजकूर तर इंग्रज याजकडील मुरींकोंडा याचे वाटेने सात पलटण व तीन रजबीट व दोन तुरूप व येकतीस तोफा व जरणेल याचे नांव कणवई ऐसे नदी उतरून मोगलाचे मुलखात गेले. त्याबराबर कनूलकर याची फौज व गुलाम आली बैंगणपलीवाला याची फौज दोन तीन हजार जाणार ऐसी वदंता आहे. चिथवा-टगी व कंपली याचे घाटावर च्यार पांचसे टोकरे जमा केले आहेत. नदीपली-कडे लस्कर आदवानीवर जमा जाले आहे ते कोपळ बहादरबिंडा याजकडे जाणार आहे. बेंगरुळाहून वगैरे पलटणे तीन व रजबीट दोन आले ते परभारे गुतीहून आदवानीस गेले. आचलीचे घाटावर नदीपलीकडे लस्कर उतरावयास लागले, ते वेळेस प्रथमच दोन टोकरे नदीमध्ये बुडाले. येक आपसर व पनास साठ गोरे वगैरे काळी माणसे बुडाली. पुढ लस्कर पंढरपुरचे रोखास जाणार

व कुंभार राज्याचीहि हजार दोन हजार फौज इकडेस येणार. तुंगभद्रेअलीकडे इंग्रज याजकडील फौज वगैरे काही फार नाही. जेथे जेथे छयावण्या व किले आहेत तेथे कोठे शंभर कोठे पनास लोक ठेऊन झाडून लष्कराबराबर गेले. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*The writer gives in detail the movements of the English troops in Karnatak in the direction of Pandharpur.*

No. 110] [*30-7-1817*

पौ छ १९ रमजान सन
समान आशर माहुली

श्री

यादी मोरो केशव गोरे निा चौधरी याजकडील मजकूर. भागानगरास इंग्रेज आहे त्याणे चंदुलाल याचे विा नवाबासी बोलणे केले की, धोडप वगैरे सतावीस तालुके व सरकार संगमनेर वगैरे गंगथडी मुलूक मोगलाईकडील प्राचीन; त्यास तो मुलूक व किलेसुध्धा आम्हाकडे लाऊन द्यावे आम्ही घेतो. आम्हाबराबर तुमची फौज द्यावी. आसे बोलणे खचित ठरून कागदपत्र तयार होऊन औरंगाबादेस मोगलाई फौजेची भरती होऊन, मोगलाई फौज तीन हजार व इंग्रेज याची पलटणेसुद्धा छ २४ साबानी मौजे भारम पौ पाटोदे येथे मुा आले. कही कबाड वगैरे धूम करितात. त्यास आपले पलटणची भरती असलियास याजला जाब देण्यास चांगले. आधीच पाचसे लोक. त्यात जेऊर वगैरे कामगारी याजकरिता कोण्हाचे हातून सरकारात हा मजकूर कानाव्रर घालून पलटण पौ यैवज सरकारात घेतात तो न घेता पलटणचे भरतीकडे खर्चास देविल्यास दोनहि पलटणची भरती करून, सरकार आज्ञेप्रा चाकरी करूं. हा मानस सर्व पलटणचे लोकासुध्धा माझा आहे. आज तागाईत या पलटणाकडे सरकारचे पाऊण कोट रुा खर्च जाहले. त्याचे सार्थक करावयाची वेळ आहे. त्यास हली लोक आहेत त्याजलाहि खर्चाची आडचण आहे. याजकरिता मोगलाईवाल्याचा मजकूर समजाऊन दोन्ही पलटणची भरती आज्ञा व्हावी.

¶*This news-letter states that the English intended to bring under control the region of the Godavari valley with the aid of the Nizam.*

No. 111] [July 1817?

यादी त्रिंबकजी डेंगळे यास शोध करून याची बातमी सरकारात आणोन पोहचती करावी:—

१ डेंगळे याची बातमी आणून सरकारात पोहचती कराल याजला सरकारातून देणे ते

१ क्षेत्र पंढरपुरी ब्रडवे व सावकार याणी खर्चास यैवज दिल्हा आहे आसा बोभाट सरकारात समजला. याजकरितां बाबूराव गणेश कमाविसदार यास ताकीद होऊन याणी डेंगळे यास यैवज दिला आसेल त्याची चौकसी करून त्यास सरकारात आणून पोहचते करावी येविसी मुलाचा नसावा.

१ फलटणकर जानराव नाईक व डेंगळे याचा सासरा लिंबाजी जाधव याणी मशारनिलेस आसरे देऊन बंड करविले व त्यात सामील होते याजकरिता उभयेता सरकारात आणून तगादा सक्त करा म्हणजे ते डेंगळे याचा शोध लाऊन देतील. या प्रकरणी त्याजपासून मुतलका लिहून घ्यावा.

१ नातेपुते येथील कमाविसदार सदासिव यादव व महादाजीपंत नाझेरेकर हे डेंगळे यास सामील राहून बंड केले आहे. याजकरितां उभयेतास सरकारात आणोन सिक्षा करून डेंगळे याजला आणून घ्यावे.

१ फलटण व नातेपुते येथील लोक बंडास सामील होऊन गेले आहेत व पहिले होते त्याचा शोध करून त्याचे घरात चौकी बसऊन हुजूर पोहचते करावे.

१ बापू गाईकवाड सेटफलेकर हा त्रिंबकजी यास सामील आहे, याजकरिता त्याचे भाऊबंद व मुलेमाणसे कैदेत ठेऊन घरची जफ्ती करावी. सरकारात येऊन समजवावे.

¶*These are Bajirao II's orders to capture Trimbakji Dengle and his accomplices and hand them over to Government.*

No. 112] [1-8-1817

श्री

आखबारी पत्रातील मजकूर सन समान आशर मयातैन व अलफ तागायत छ १७ रमजान.

मुक्काम चिनापट्टण.

१ कटक प्रांती पेंढारी याचा व जमीदाराचा दंगा आहे तसाच आहे.

१ नर्मदेचे किनाऱ्यास पेंढारी याचा जमाव भारी जाहाला आहे.

१ सोलदानाची रेजमेंट व आलेमानी स्वार पटालमो[1] व तुरुप स्वार वगैरे बंगाल्याचे इलाक्यातील दरोबस्त यमुनेचे किनाऱ्यास जमा होणार.

१ या प्रांतीच्या हैदराबादेस व बल्हारीस रवाना जाहाल्या व मुंबईकडील पलटम व रेजमेंट घोडनदीस जमा होणार.

१ मालकं साहेब बंगाल्याहून येथें आले, आणि मसलत ठरवून खुद्द व जनरल इसलाप सिवाय कारनेल मेजर वगैरे सरदार बहुत रवाना जाहाले. जंगी सरंजाम तरतूद दारू गोळी वगैरे बेसुमार जात आहे. याचा सुमार लिहितां येत नाहीं. मुख्य मोहीम कोणावर आहे हे समजत नाहीं. पेंढारी याचे पारपत्यास असी लोकवार्ता आहे.

१ जनरल मालकम साहेब सरदार समवेत बेंगरुळास गेले. तेथून श्रीरंग-पट्टणास जाऊन मैसूरकर राजे यांची भेट घेऊन हैदराबादेस जाणार. तेथील नवाबाची भेटी जाहाल्यानंतर पुण्यास जावे असा हेतु आहे म्हणोन.

१ मैसूरकर राजे याजकडील सहा हजार स्वार जालन्यास गेले.

१ विलाइतीहून चार जहाजे आली त्यांत मजकूर. फरासीस फौज बुनेपाट[2] याचे हताखालील हाली नवे बादशाहा जाले त्याचे हुकुमांत आहे. त्यास हल्ली इंग्रजाचे मनोगताप्रमाणें नेहमी दौड, पंधरा दिवसांत एक मुक्काम नाहीं. यामुळें कांहीं सरदार बिघडले आहेत. कांहीं चाकरी सोडून आलाहिदा उतरले आहेत. समजाविसी होईल असी दिसते.

८

मुक्काम मल्हारराव होळकर.

१ कलकत्याहून दोन साहेब दिल्लीस आले म्हणोन आखबार.

१ मीरखा यास येण्याविसी पत्रे गेली आहेत.

१ गणपतराव दिवाण यांजकडे पंचमाहालची मामलत होती त्याच्या सोड-चिठ्या दिल्या.

३.

मुक्काम घोडनदी.

१ खानदेश प्रांती पलटणावर भिल रामोशी याणी दरवडा घातला. उभयपक्षी खराब जाहला.

१ घोडनदीचे पलटण बदलीचे पुण्यास गेले, तेथील घोडनदीस आले.

---

1 Platoon or Battalion. 2 Bonaparte.

१ घोडनदीपासून नगरापर्यंत पंधरा हात रुंदीची वाट तयार करीत आहे.

१ औरंगाबादेस पांचशें स्वार नवे ठेविले, व हैदराबादेस पांचशें तयार केले.

४

मुक्काम पुणे संगम.

१ अलफइस्टन सिकारीस आलंदीकडे छ १३ रमजानी गेले ते छ १५ रमजानीं माघारे आले.

१ घोडनदीचे पलटण बदलीचे आले ते गारपिरावर उतरले.

२

¶*This is a summary of the news-letters received from Madras, Indore, Ghodnadi and Poona. The main point is that the British are making vigorous preparations to strike at the Pindaris.*

No. 113] [*3-8-1817*

छ १९ रमजान समान
अशर मुा माहुली.

श्री

विज्ञापना ऐसीजे. फिरगी याणी रामचंद्र वाघ यास विचारले, की आम्हास शहरांत आदालत घालावयास जागा द्यावी. तेव्हा याणी उतर केले की, उतम आहे, जागा देतो. ऐसे कबूल करून यावे तित्कयांत तांब्राणी उतर केले की, तुंम्ही वकिली ऐसींच कराल जे आम्हास पाहिजे ते तुम्ही कबूल करिता, तेव्हा वकिली करणे बहुत कठिण आहे. हे कर्म तुमचे नव्हे. आस्तु. जागा आम्हास घेणे जरूर आहे. परंतु येविशी आम्ही लेख कलकत्यास रवाना केला आहे. तिकडून उतर आले म्हणजे जागा घेऊ. येणेप्रो बोलणे जाले. हे वर्तमान वाघानी आपासो यास सांगितले नाही. तेव्हा गुंडोपंत कारकून निा जलचर मुख्याकडे येऊन निवेदन केले. त्याजवरून मुख्याणी आपले ठिकाणी विचार केला की, ठीक नाही. वकिली दुसऱ्यास द्यावी. म्हणौन दोन प्रहर रात्रीस आपणच स्वता पायउतारे घोंगडी पांघरून समागमे येक खिजमतगार व नारायण नांगऱ्या ऐसे त्रिवर्ग जाऊन तांब्रासी सांगितले की, प्राचीन वकैलीचे कामावर होते

ते तुमचे कामकाज उलगडून देत जातील. याप्रा बोलणे होऊन माघारे आले. दुसरे दिवशी राजश्री येशवंतराव आन्या याजला बोलाऊन वस्त्रे वकिलीची दिल्ही; परंतु तांव्राणी आद्याप त्याची भेट घेतली नाही. जे वेळेस आम्ही बोलाऊ ते समई तुम्ही यावे. दुसरे फिरंगी याणी येथे मुदे घातले की, श्रीमंतानी रेवा उतरतीर आम्हास दिल्हे, त्यात तुमचेहि माहाल आहेत, त्याच्या सोडचिठ्या द्याव्या, व पेशजी तुमचा आमचा तह ठरला की, पांच हजार फौज तुमचे तैनातीस देऊ, ते तुम्ही हा कालपावेतो दिल्ही नाही; व तुम्हांकडील लोक आमचे उपयोगी नाहीत. त्यास पांच हजार फौजेचा आकार जो होईल त्याची येकुनात करून यादी ठराऊन द्यावी, व आमची दोन पलटणे चाकरीस आहेत याची नेमणूक तुम्हाकडून लौकर पावत नाही; तर याचीहि येकुनात करून सदरहू तीन्ही रकमाचे पोटात आम्हास माहाल लाऊन द्यावे व शहरात आदालत घालू द्यावी. येणेप्रा मुदे घालून कलकत्यास लेख पाठविला आहे. तिकडून उतर आल्याआन्वय करणार. या बोलण्याचे उतर बाबाकडून होईना. सबब येशवंतराव रामचंद्र याजला वकिली दिल्ही आहे; परंतु तांव्र म्हणोन आहेत की वकिली नारायण पंडित यास द्यावी. येशवंतराव नसावे. याप्रा आहे.

¶*The letter reports the news terms proposed to Appasaheb of Nagpur by the English resident.*

No. 114] [*9-8-1817*

पौ ता १३ आगष्ट
सन १८१७

श्री

हजरत खुदावंदन्यामत सरदार अलीशान
खुदायगा नवाबसाहेब बलबाहादुर याचे खिजमतीस

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बाद बंदगी आदाब तसलिमात कुरनिशात बज्या आऊर दे मारूज मेर सानख आके येथील खैरसाला अखबार देवढी मुा लस्कर नजीक श्रीपंढरपूर तो छ ९ माहे अगोष्ट सन १८१७ इसवी मुताईक छ २५ माहे रमजान सन १२३२ रोज शेनवार पो येथास्थित असो विशेष. तालुके धारवाड येथे नजीक सात आठ कोस कुसगलचा किला आहे तेथे आपले ठाणे बसले म्हणोन येका ग्रहस्ताने सांगितले. दुसरा मार, पंतप्रधान यानी आतून निपानकर याजकडे आकरा लक्षे रुो पो व रो चिंतामणराव आपा पटवर्धन मंडलीस

आठ लक्षे रो दिल्हे व रो बालासाहेब रास्ते याजला साहा लक्षे रो दिल्हे व राजा चेतरसिंग यास च्यार लक्षे रो दिल्हे, आनि सरवत्रास ताकीद केली की दोन महिने-परियेंत स्वस्त आसावे. अतून फौजेची खबरदारी करावी व क्षेत्र मुकामी लोकास बरतर्फी दिल्ही म्हणोन आवाई घातली. परंतु त्यास निमे तलबा घरबसल्या द्यावी, जे दिवसी चाकरीस बोलाऊ तेव्हा हाजर व्हावे ऐसा करार करून वाटी लावले. तिसरा माार, हिंदुस्थानात लढाई होऊन नवे ठाणे बसविले म्हणोन सांगितले. रो भगवतसिंग भयेशे तिकडे लडाईत पडले, सबब त्याची बैको सती गेली म्हणोन सांगितले. चौथा माार, श्रीमंत आमृतरावसाहेब याणी आपले चिरंजीव इनायेक-राव यास कैलासवासी श्रीमंत माधोरावसाहेब याचे वटीत घातला म्हणोन लोकास कलऊन श्रीमंत इनायेक माधो नाव ठेवले. याकरिता त्यानी तिकडे हिंदुस्थानचे राजेरजवाडे मेलऊन घेऊन जमाव करून ठाणे बसवितात म्हणो(न) ऐसे पत्र माहोलीचे मुकामास पंतप्रधान यास पो. त्यावरून श्रीमंतांचे म्हणे पडले की, पहिले कैलासवासी नाना फडनवीस होते तेव्हा श्रीमंत चिमणाजी आपा वटींत घाढून चिमणाजी माधव नाव ठेवले. त्यात हे दुसरे इनायेक माधोराव जाहाले. फार उत्तम जालें. कोन्ही तरी राज्य राखले असता श्रीमंताचेच राज्ये म्हणतील. परंतु नाव राखावे हे कारन. पाचवा माार, आलीबाहादर याचे चिरंजीव समशेर-बाहादर तिकडे कोठे कैदेत होते ते श्रीमंत इनाइकराव जाऊन सोडविले म्हणोन सांगितले. साहावा माार, सातपुड्यात बंडाचाहि जमाव जाहाला आहे आणि इनायेकरायाचे पत्र त्यास आले म्हणोन सांगत होता. सिंदेहोलकरास भरतपूर-वाल्यान दाहा कोटी रो खर्चास दिल्हे म्हणोन सांगत होता. सातवा माार, बहिरापा कालेकर सांगत होता की, पोट साहेबाचे पलटणात रो कुशाबा नाईक किबे याणी पुण्याकडे दोन हजार रो रोकड क्षेत्रीहून घालविली ती मणुशे फलटणा-परियेंत गेले म्हणोन बातमी लागली. पुढे बातमी नाही. आणि पुण्याचेहि पत्र आले की, आपण रोकड पाठविली परंतु आम्हास पावली नाही. तेव्हा ते मणुशे मारले गेले असे दिसते म्हणोन सांगितले. आठवा माार, क्षेत्र मुकामी साहेब देवलोक जाले त्याची कबर बांधावयास शेंभर रो दिल्हे. आज काम सुरू केले. मेसूरवाल्याचे लस्करास येक लाख रो दिल्हे त्याची रसीद काल घेतली होती ती आपणाकडे रवाना जाली आशेल. छ ७ तारखीची अखबार रवाना केली ती येऊन पोहोचलीच आशेल. माार साहेबाचे खिजमतीत लिा आहे, बंदगीस रोशन होय हे अर्जदास्त.

¶*News-letter by Balwantrao Bapuji to Elphinstone giving news of the secret mobilization carried on by Bajirao and others. Bajirao is reported to have distributed funds among his sirdars.*

7094

No. 115] [15-9-1817?

श्री

(पहिला बंद गहाळ) बंद २

ठरले तेव्हा किल्याखाली आरब उतरले, त्यास बोलण्याप्रा पार करतील या प्रो वर्तमान आले तो रा दिनकरपंत नाना पटवर्धन हे पुण्याहून येऊन पोहचले. छ १ जिलकादी दोन प्रहरी रा केसोपंत साठे छ २८ सवाली सायंकाली येऊन पोहचले. आगोधर बातमी पोचवावी तर आमचे जासूद पोटास नाही म्हणोन उठोन गेले. आमचा गडी आहे तो डाक वहात आहे कलावे. छ ३ जिलकादी लोक व निशाण किल्यावर जाणार आहे. तुम्ही लौकर येऊन येथे लस्करात पोहोचावे. आल्यावर नथुभाई सर्व वर्तमान सांगतील कलावे. छ ३ जिलकाद हे विज्ञापना. रा केसोपंत साठे याचे सा पा नथुभाई याचे सलाम बाजत सलाम तुम्ही पत्र दर्शनी होताच निघोन यावे, आल्यावर भेटी अती सर्व विदित होईल. कलावे हे विज्ञापना.

¶*The disturbance at Purandhar is reported in this letter.*

No. 116] [25-9-1817

पौ ता २८ सपटंबर सन
१८१७

श्री

हजरत खुदावंद न्यामत सरदार अली-
शान खुदायगा नवाबसाहेब बल बा-
हादूर याचे खिजमतीत

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बाद बंदगी आदाब तसलीमात कुर-निशात बज्या आउरदे मारूज मेर सानख आके येथील खैर सला अखबर देवढी मुकाम क्षेत्र श्रीपंढरपूर ता छ २५ माहे शेपटबर सन १८१७ इसवी मुताबीक छ १३ माहे जलकाद सन १२३२ रोज गुरुवार पो येथास्थित असो विशेष. काल आस्तमानी माहोलीहून संतू वाणी क्षेत्रास आला. त्याणे सांगितले की पंतप्रधान यांची स्वारी पुण्याकडे गेली. बरोबर पंचेवीस तीस हाजार फौज होती. दुसरा मार गड किले माघारी दिल्हे म्हणौन सांगत होता. तिसरा मार गोखले याचे पत्र रो सिवाजीराव घाटगे टेंभूरणीकर यास आले आहे कीं स्वार काये असतील ते घेऊन येणे. चौथा मार रो माणकोजी सिंदे याचे पत्र गुरसालकर कमाविसदार रो माहादाजीपंत यास आले की काही कामकाज लागल्यास जासूद

पुण्याकडे पो. पाचवा मार माढ येथून गुरसालकर आपाजी पा येथे आला. त्याणे सांगितले की माढ्यात पठाण आहे. ठाणेदार तो दुलेखान याचा आश-विसीच आहे. तेथे बोलत होते की दुलेखानास जखमा चहडल्या आहेत. शेहरास रो केला. चेंदुलाल याजवर गर्दी जाहाली. रो रावरंभा वगैरे सरदार मिळून याणे केली. साहावा मार कर्णेलसाहेब याचे लस्कर सिना नदीचे आलाकडच आहे. नदीस उतार नाही. सातवा मार छ २२ तारखीची अखबार रवाना केली, ती येऊन पोहोचलीच आशल. शेरीरास आराम होत नाही. क्षेत्राची वस्ती. दोन घोडे जवल. मणुशाचा खर्च वैरन गाची पुल्या १६ हरभरे दोन पायेली. प्रजेण फार. कालच आमासा उघडला आहे. आवशेद उपाये करितो. आराम पडला म्हणजे नरसिंव्हपुरास जातो. लस्करावरोबर जायाचे म्हणौन दोन महिने होत आले. घोडे विकत घेतले होते. कलावे मार साहेबाचे खिजमतीत लिहिला आहे. बंदगीस रोशन होय हे अर्जदास्त.

¶*This is another news-report from Balwantrao Bapuji saying among other items that Bajirao proceeded from Mahuli to Poona with his army.*

No. 117] *[26-9-1817*

पैा ताा ३० सपटंबर सन
१८१७

श्री

हजरत खुदावंद न्यामत सरदार
अलीशान खुदायगा नवाब साहेब
बलबाहादूर याचे खिजमतीत

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बाद बंदगी आदाब तसलीमात कुर-निशात बज्या आऊरदे मारूज मेर सानख आके येथील खैरसला अखबार देवढी मुकाम श्रीक्षेत्र पढरपूर ताा छ २६ माहे शेपटबर सन १८१७ इसवी मुताबीक छ १४ माहे जिलकाद सन १२३२ रोज शुक्रवार पो येथास्थित असो विशेष. रो बापू वैद्य सातारकर येथे क्षेत्रात आहे. तो आवशेद प्यावयास येत असतो. त्याणे सांगितले की कोकनातून गडी आले त्यानी सांगितले की कोकनात मोठा हालकलोल जाला आहे की, रो दौलतराव सिंदे यानी पत्र फरासिसास पो होते की पूरवीचे तुमचे आमचे इमानभाक आहे त्याप्रो आता आम्हास संकष्ट आहे याकरिता आपण यावे. त्यावरून फरासीस गोयाचे पलाड सिदीगडास आले.

7096

आहेत, याकरिता कोकनात लोकास धाक पडला आहे. दुसरा मार पंत प्रधान याजकडील जासूद बिडाहून आला तो वैद्यबावाचे बिन्हाडीच वरचेवर मार करून निघाला तो सांगत होता की बिडास च्यार कारकून श्रीमंताकडील फौज ठेवितात. परंतु नाव माहाराजाचे सांगोन ठेवितात. जासूद माहोलीस मोठा जलदीने गेला आनी तोच जासूद सांगत होता की, भोसल्याकडील खटले कोल्हापुराकडे देवास गेले होते ते नागपुरास जात होते ते खटले फौजन लुटून वस्त्राविरहित केले. ते बिडास परतून येऊन राहिले होते. मग बीडवाल्याने काही खर्चास वगैरे दिल्हे. मेसूरचे राज्याचे फौजचा खराबा केला. पाच च्यारशे घोडे बंडवाल्यानी नेले म्हणौन वैद्यबावाजवल जासूद सांगत होता. तिसरा मार जासूद अखबार द्यावयास टप्यावर गेला होता. तिकडून येताना मौजे कुरुडु येथे राहिला होता. तेथे बोलत होते की बारसीस कारकून येऊन बसला आहे. स्वार ठेवितो. चौथा मार माहे शेपटंबर महिन्याचे पगाराबा रसीद जासुदासुधा रवाना केली आहे. जासुदाचे या प्रांती घर आहेत त्यामुले पित्राकरिता बदले देऊन गेले त्याची नावनिसी.

१ माहादू मोहिता पुन्याकडे लक्षुमणसिंग हजारी याचे बरोबर देऊन रवाना केला तो तिकडच राहिला. त्याचा समाचार कलेना जाणौन यादुजी दौंडकर पुन्याकडून सदासिव दौंडकर हली जवल आहे त्याचे खबरीस आला होता तो ठेऊन घेतला. लक्षुमणसिंगास वीस रुा आम्ही येथे खर्चास दिल्हे. दरमहा पौ घेतले ते येथे रुा २८ आठावीस घेऊन तेथच राहिला आणि त्याचे उतरहि कलेना.

१ विठूबा खांडे याचा बदले संताजी बगले भालेवाडीकर.

१ परसराम म्हसके याचा बदल्या केरूजी सुरवसीचा लेक

१ मानाजी वताले याचे बदल सदासिव थोरात आकलूजकर.

नागपुराकडून आज यात्रा आली ते सांगत होते की तिकडे बंडाने मोठा प्रलये केला आहे. आम्ही पार पडून येऊ ऐसा भरवसा नवता. नागपूर सोडोन पावणेदोन महिने जाले. भोसले सिंद्याकडे गेले आहेत. त्यानी नागपुरास पंचेवीस तीस हजार फौज रखवालीस पाठविली आहे. सिंदे होलकर याच्या फौजा येतात म्हणौन आवाई होती. काल दोन जखमी खाटवर होते. बरोबर

च्यार आा चटेकरी होते. भालवणीस गेले कळावे. छ २५ तारखेची अखबार रवाना केली ती येऊन पोहोचलच आशल. मार साहेबाचे खिजमतीत लिा आहे. बंदगीस राशन होय हे अर्जदास्त. कर्णेल साहेबासहि अखबार पाठविली.

¶*Balwantrao Bapuji reports the state of alarm of the people owing to the gathering of war-clouds.*

No. 118] [*27-9-1817*

छ १५ जिलकाद उर्फ भाद्रपद

मास सन समान अशर मयातैन

श्री

चिरंजीव राजश्री चिमणाजी रघुनाथ याचे कुटुंबासुधा सरसालचे खर्चाची नेमणुक भोजनखर्च व धर्मादाय कापड व कारकून आश्रित व शागीर्दपेशा खिजमतगार भोई मशालची प्यादे वगैरे व खाशा चाकरीचे हत्ती घोडे उंट रथ व गाई जनावरे कुल पडले पान इा+ मार्गशीर्ष शुा प्रतिपदा सन सबा मयातैनापासून सालसंमंधे खर्चाची नेमणूक दोन लक्ष रुपये कुंपिणी इंग्रज बहाद्दर यांचे विद्यमानें केली आहे. त्यास इा मार्गशीर्ष शुा प्रतिपदा सन सबा मयातैन तागायत कार्तिक आखेर साल मजकुरी सन सबा आशर मयातैन पावेतो दहा साला वीस लक्ष रुपये नेमणुकेप्रमाणें पावले. हल्ली इा मार्गशीर्ष शुा प्रतिपदा साल मजकूर सन सबा आशर मया तैन तागायत कार्तिक आखेर पेस्तर साल सन समान आशर मयातैन पावेतो कुलबाब खर्चाचे लिहून दोन लक्ष रुपये नेमणूक पैकीं मार्गशीर्ष मास व फालगुन मास मिलोन दोन हप्त्याचे एक लक्ष रुपये पावले. ते वजा करून बाकी एक लक्ष रुपयापैकीं जेष्ठ मासचे साल मजकूरचे हप्त्याचे सुरु सन सबा आशर मयातैन व अलफ रुपये

५००००

पन्नास हजार रुपये छ १० रजबी पावले असेत.

हल्ली इा मार्गशीर्ष शुा प्रतिपदा साल गुदस्त सन सबा अशर मयातैन तागायत कार्तिक आखेर साल मजकूर सन समान आशर मयातैन पावेतो कुलबाब खर्चाचे सालिना दोन लक्ष रुपये नेमणुकेपैकीं मार्गशीर्ष व फालगुन व जेष्ठ मास मिलोन तीन हप्त्याचे दीड लक्ष रुपये पावले ते वजा करून बाकी भाद्रपद मास साल मजकूरचे हप्त्याचे रुपये पन्नास हजार रुपये. ५००००

¶*Bajirao II gives details of the allowance that was assigned for the support of his brother Chimaji Appa, viz. Rs. 2 lacs a year.*

+ इस्तकबील = पर्यंत.

No. 119] **[28-9-1817**

पौ ता ३ आगटोबर सन
१८१७

श्री

हजरत खुदावंत न्यामत सरदार अलीशा-
न खुदायगा नवाब साहेब बाल बाहादूर
याचे खिजमतीत

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बादबंदगी आदाब तसलीमात कुरनिंशात बज्या आऊरदे मारूज मे सानख आके येथील खैर सला आखबार देवढी मुकाम श्रीक्षेत्र पंढरपुर ता छ २८ माहे शेपटबर सन १८१७ इसवी मुताबीक छ १६ माहे जिल्काद सन १२३२ रोज रविवार पा येथास्थित असो विशेष. काल येथे क्षेत्र मुकामी रा धर्माजी प्रतापराव वंजोर बालेघाटकर बंड हे माहोलीस जाऊन पंत प्रधान याची भेट घेतली. त्यावरून वस्त्र देऊन दाहा हजार फौज ठेऊन दसरा दिवालीचे सुमार येऊन दाखल व्हावे म्हणौन हुकूम करून बरोबर गोखले याजकडील कारकून आसामी देऊन व रा दाजीबा ऐतोले बरोबर दिले आहेत. यास पंचेवीस तीस हाजार रुाची हुंडी तूर्त दिल्ही आहे. हाली बरोबर दाहा स्वार आहेत. उदईक येथून घाटावर जाणार. तिकडे जाऊन जमाव करणार. प्रतेक्षे दुसरे बंडच आहे कलावे. दुसरा मार रा टेंभुरणीकर घाटगे सिवाजीराव यानी च्यार पाचशे स्वार जमा केला आहे. दो चौ दिवसा निघोन पुण्याकडे जाणार म्हणौन हालकारा टप्यावर गेला होता तो सांगत होता. तिसरा मार धर्माजी प्रतापराव यानी येथूनच जेथे जेथे स्वाराचे लगे होते तिकडे पा च्यार. आसामीस पत्र देऊन जासूद पुढे रवाना केले. चौथा मार हुंडी खर्चास रा गंगाधर लीलाधर याचे दुकानची तीस हजार. रुाची मुदत सतावीस दिवसाची आहे. त्याचे गुमास्ते येथ आहेत त्याजवर आणली आसे. पाचवा मार रा देवराव बावा क्षेत्रीचे कमावीसदार हे काल पुन्यास गेले. कलावे छ २६ तारखीची अखबार रवाना केली ती येऊन पोहोचलीच अशल. मार साहेबाचे खिजमतीत लिहिला आहे. बंदगीस राशन होये हे अर्जदास्त.

¶*Balwantrao Bapuji writes about an interview between Bajirao and Dharmaji Prataprao of Balaghat on the subject of the mobilising of forces.*

No. 120] *[17-10-1817*

पौ ता २० आगटोबर सन
१८१७

श्री

**हजरत खुदावंद * न्यामत सरदार अली-
शान खुदायगा नबाब साहेब बाहादूर
याचे खिजमतीत**

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बाद बंदगी आदा तसलीमात कुरनिशात बज्या आऊर दे मारूज मेर सानख आके येथील खैरसला अखबार देवढी मुकाम श्रीक्षेत्र पंढरपूर ता छ १७ माहें अकटोबर सन १८१७ इसवी मुताबीक छ ६ माहे जिल्हेज सन १२३२ रोज शुक्रवार पो पो येथास्थित असो विशेष. मिरजचे वाटेकडील जासूद आला, त्याणे बातमी आणली. मिरजस व तासगावास लोक ठेवितात. दसऱ्याचे मोहर्त पटवर्धन मंडली बाहीर निघनार म्हणोन सांगोल्यास जासूदच आला होता. दुसरा मार मिरजकर याची पागा मौजे आरन येथे होती ती मिरजस गेली. सरासरी लाहान मोठे घोडे च्यालीसक होते. तिसरा मार निपानकर दसरा जालियावर आकलीस येऊन उतरनार म्हणौन सांगोल्यास बोलत होते. चौथा मार आनंगराकडील जासूद आला, त्याणे बातमी आणून मौजे येवती येथील पागा मिरजकर याची दसरा जालियावर तिसीक घोडे आहे. ते मिरजस-जाणार आहेत, व मौजे पेणूर येथील सिलेदार मंडलीचे चालीसक घोडे होते. त्यापौ विसीक स्वार मिरजेकडे गेले व विसीक स्वार व पायदल विसीक करवल ऐसे मिलून बारसीवर रो धर्माजी प्रतापराव जमाव करितो, तिकडे गेले व वैरागकर वाणी कोकणात काही जिणस भरावयास गेला होता. जिणस भरून सावताचे वाडकिडोन येत होता. तेथे रो चेतरसिंग राजा याचे लोकानी लुटून घेतले आणि त्या वाण्यास जखमा लागल्या. तो वाणी आपले गावाकडे गेला तो सांगत होता. बारसीस पुन्याकडोन दोन उंट खजिण्याचे भरून बरोबर पंचवीस स्वार व येक कारकून होता. पाचवा मजकूर क्षेत्रीचे तपासनीस व कोल्याची कटकट जाहाली. यामुले दरोबस्त नावा व सांगडी मौजे गुरसाल याजपासी उतारावर गेल्या आहेत. कलावे छ १९ तारखीची अखबार रवाना केली ती येऊन पोहोचलीच आशल. मार साहेबाचे खिजमतीत लिहिला आहे. बंदगीस रोशन होय हे अर्जदास्त.

¶*Balwantrao Bapuji, a news-writer of the English, reports the activities of the Patwardhans of Miraj and the Desai of Nipani.*

7100

No. 121] **[18-10-1817**

श्री

यादी मुा मुंबई ताा छ ७ जिल्हेज सन समान अशर मयातैन कलमें.

१ कलकत्याहून छापणीत मजकूर लेहून आला कीं श्रीमंत पंतप्रधान व इंग्रज या उभयतामधे तह होऊन सिलसिला दोस्ती मुस्तकीम जाहाला हा मजकूर पेशजी लिहिलाच आहे. तह जाहाला त्यांत मुलुख सोडून दिल्हा तो जंजिरे मुंबई खाली लगत आला. येणेप्रो ताा बेलापूर व आळगाव व ताा वसई व कल्याण व सर्व इतर मुलुख दक्षण तर्फ गुजराथ शयाद्रि पर्वताचे घाटापासून ते समुद्रपर्यंत दिल्हा आहे. प्रो जंबूसर व डबई व आमोद व देहजबारे व बाहादरपुरा व सावली ताा गुजराथ हाहि मुलुख सरकार कंपणीकडे लाऊन दिल्हा. सदरहू मुलूखाचा पट आहे त्यावरून किती हा मुलूख जंजिरे मुंबईखाली आला याचा विचार समजण्यांत येऊन येक तालुक्यांत विस्तीर्ण मुलुख आला त्याची बेबुदी होऊन आपला सांभाल होय ते करावेयास काय केले लागेल ते समजण्यांत येईल. हा सारा मुलुख पूर्वी इंग्रजी सरकाराकडे जंजिरे मुंबईखाली होता तो परत तेथील सरकाराकडेस केला याविसी तेथील रयतानी इंग्रजी सरकारची चाल पाहून फार खुशी केली होती म्हणोन.

१ दौलतराव सिंदे याणी फौजेचा जमाव येकत्र करून व लढवाई सरंजाम सुधा तयारी केली आहे आणि तेथील राजेरजवाडे यासहि पत्रे पाठवून त्यासहि सरंजामसुधा तयार केले होत आहे, की विजयादसमीचे मुहूर्ते नर्मदा किनारी सैर्वाही दाखल व्हावे या प्रो येथे बोलवा आहे.

१ बंदर मजकुरी छयापणीत मजकूर छ २४ साबान सन सबात ठरावात आले. जे. सरकार इंग्रज व सरकार श्रीमंत पंतप्रधान या उभयेता दरम्यान भाषणाचा कटाव होऊन आला यैसा जे. ज्याजुबैन दोस्तीचा सिलसिला चालत आला यात विवाड व्हावा, परंतु वसईस तह जाहाला त्यातील कलमबंदी समजुतीत आणावी व दुरुस्त करावी व दोस्तीची तर्की होऊन दोन्ही सरकारच पाहत आहेत त्या प्रो मुस्तकीम व काईम राहावी. आसी आणखी कलमे करून नूतन तह उभयेता सरकारचे दर्म्यान जाहाला हे वर्तमान गोरनर जनरेल कोशलातून आनंदयुग्त जाण करीत आहेत. म्हणोन छ २४ रमजानी छयापणी जाली.

¶*The purport of news published in papers received at Bombay about the negotiations between the English and the Peshwa is given in this paper.*

No. 122] [*24-10-1817 ?*

पौ मिती छ १९ जिल्हेज

श्री

सेवेसी विनंती. दिलीहून सोमवारीं निघालो ते चवथे दिवसीं दोन प्रहरी श्रीमथुरेस आलो. येथून दुसरे दिवसीं निघोन जावे. त्यास चत्रदास महंत डिगेतून फौज च्यार हजारपर्येंत घेऊन पेडारी याच्या उपद्रवाच्या रखवालीकरिता मझ्यावर जावयास आले आहेत. त्याणी आपल्याकडील मुनसीबराबर सांगोन पाठविले कीं, तुमची आमची भेटी होऊन बोलणे जाले पाहिजे. तरी आज जावयाचे न करावे म्हणून. त्यास आम्ही उतर सांगोन पाठविले कीं आम्हास जलदीने गेले पाहिजे, राहावयास आनकूल पडत नाही. त्याजवरून त्याणी फिरोन सांगोन पाठविलें कीं ज्या कामास आपण जातात त्याच बोलण्याकरितां भेटी जाली पाहिजे. मथुरा हीच डीग समजून येक दिवस राहावे. त्यास महंत प्रस्तुत जाटाजवल पेशथणी (?) मुनसी व हे येकचित आहेत. अगत्यवाद बोलण्याचा धरितात. याचे बोलणे न यैकावें तरी न जाणो पुढे कसें आहे. दुसरें सर्वतो-मुखीं महंत कामांत आल्यास फारच चांगले यैसे यैकण्यांत आले. त्याजवरून राहिलों. उदैक याचें बोलणें प्रात:कालीं यैकून दोन प्रहरीं निघोन जाऊ. बोलण्याचा भाव कलेल तो मागाहून लेहून पाठऊं. जरीकरितां बोलण्यांत जीवसा आसला तरी यास बराबर डिगेस न्यावयाचे करूं. जीव नसल्यास कलतच आहे. कृष्णसिंगाच्या सल्यानीच महंतास भेटाविस जाले आहे. यास डिगेस नेणे तरीं त्याच्याच विचारे नेऊ. कलावे. रा छ १३ जिल्हेज बहुत काये लिहिणे लोभ असावा हे विनती.

¶*The writer says how he came to Muttra from Delhi and how he was prevailed upon by one Chatradas Mahant to halt there and discuss with him the same topic for which the writer was proceeding to Deeg. The letter is in connection with the affairs of the Pindaris.*

No. 123] [*4-11-1817*

श्री

आशीर्वाद विनंती उपरी. इंग्रज विपरीतबुद्धीनें पलटणाचा जमाव करूं लागले. पहिल्या प्रो दंगा करावा असें खचित समजलें. पेशजी आपणाकडील पत्रें इकडे नि:सीम लक्षाची आली, त्यावरून सरकारांतूनही आपलेविसीं कसें घडलें तो पर्याय ध्यानांत आलाच असेल. त्या तुमच्या नि:सीमपणाचे लेखावर

सरकारांतूनही याची पेरवी चाललीच होती. सांप्रत छ २४ जिल्हेजी त्याजकडे कितेक मार सांगून पाठविले परंतु त्याची निखालसपणाची चाल येकही दृष्टीस न येई. त्यावरून गोखले विंचुरकर पुरंधरे रास्ते पटवर्धन वगैरे सरदार याजकडील फौज जाऊन त्याजकडील चार काली व येक गोरे याचे पलटण यासी लडाई होऊन दुसरे दिवसी फौजा मुकामास आल्या. आता सरकारांतून येविसीं कमती ठरावयाची नाहीं त्याअर्थी आपण आपले फौजेनिसीं निघोन जेथें सरकार स्वारी तेथें लौकर येऊन पोहोचावे. मार्गात इंग्रजानी अडथळा केल्यास त्यास तंबी करणेंच पडल्यास करावी, आणि निघोन भेटीस यावें. भेटीनंतर जसा नक्षा ठरेल तसें करावयास येईल. निघाल्याचे वर्तमानाचीं पत्रें वरचेवर येत जावीं. येविसींचे मार रा+ जवल बोलण्यांत आले आहेत ते लिहितील व राा खंडो मुकुंद आपणाजवल येऊन बोलतील त्यावरून समजेल.

¶*The letter sends news that hostilities have been declared with the English and asks the addressee (whose name does not appear in this paper) to join the Peshwa with his contingents.*

No. 124] *[5-11-1817*

पाो छ २६ जिल्हेज
आश्विन मास समान
अशर

श्री

विनंति विशेष. छ २५ जिल्हेज गुरुवार लस्करचा मुकाम पुणतांब्यावर आहे तेथेच आहे. पाो दोन साहेब निघोन येथे आले. उद्या निघोन पुण्यास जाणार. मोठालेच कामगार आहेत. पुण्यास काही विचार करावा याजकरिता आले आहेत. सिंदे याजकडील पेंढार वगैरेचा नेट फार आहे. घाटबंदी मोकली टाकून तुम्हाकडे पलटणे आली आसता पेंढार पाठीलाग करितील व सिंदेहि दाटी करावयाचे विचारात आहेत याजकरिता तुमची मर्जी या वेलेस संपादून वेऊन इकडला तंटा तूर्त मिटवावा आणि सिंदे याजकडील गुंता उरकून पुढे पाहावयास येईल; परंतु हालीं तुम्हास उगेच भय दाखवावे, काही नरमाई दाखऊन तंटा मिटवावा हें साहेबांचे मानस फार आहे. तुम्ही नच आइकिल्यास कोरेगावापावेतो लस्कर आणावें. तरी तुम्ही नच आइकिल्यास तुम्हाकडून आगलीक होऊ द्यावी नंतर काय करणे ते करावे. बहुधा सला करावा हे मनात

+ जागा कोरी.

आहे. दोन साहेबाचंया बायका भिलानी धरुन नेल्या पैा येक जिवे मारिली व येक मेली. घाटातून लस्करात जात होत्या तेथे गफलतीने नेल्या. हाली जकाते बोलतात की आम्हास घाबरवावे हे. सर्वांचे मनात आहे. सारे साहेब चिंतातुर आहेत. हे विनंति.

¶*The news of the departure of two Englishmen from Puntamba for Poona for negotiating terms with Sindia is communicated in this letter. The abduction of two ladies by the Bhils is also reported.*

No. 125] *[8-11-1817*

पौ छ २८ जिल्हेज
सन समान अशर
मया तैन

श्रीभवानीप्रो

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नीलकंठराव आबा स्वामीचे शेवेसी

पोष्य बहिरो नारायेण पिंगले सां ना विनंति येथील कुशल ता आस्विन वद्य १४ शेनवार प्रथम प्रहरपावेतो सातारा सुखरूप असो विशेष. इकडील मजकूर [नंतर २ कलमें अनवश्यक म्हणून गाळून]

१ आज पाहाटे येथून श्रीमंत माहाराज सहपरिवारे निघोन वासोटियास गेले. त्यामुळे व आवाई पुणियाहून त्याजमुळे येथे फार गडबड जाहली आहे.
कलम [यानंतर पुढील २ कलमे गाळली] हे विनंति.

¶*Bahiro Narayan Pingle reports to Nilkanthrao Aba the departure of Raja Pratapsinh for Fort Wasota. The writer Bahiro Narayan of this and many subsequent letters was the Peshwa's officer in charge of ammunition (see No. 181).*

No. 126] *[12-11-1817*

श्री

शेवेसी नारो विष्णु कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. काल मंगलवारी इंग्रजाकडील जमयत सिरूरचे छावणीतून कूच करून पुण्याकडे चालि(ली). आम्हास बातमी लागताच गणपतीचे रांजणगावापासी गाठ घातली. दोन प्रहरापासून येक प्रहर लढाई जाहाली. येक घोडा ठार व कांही जखमी, लोक कांही जखमी जाहाले. रसद दरोबस्त घेतली. येक तोफ पाडाव जाहाली. त्याणी लोटून गेले. नजीक त्याचा मुकाम यामुले तेथे उभे राहिलो नाही. कान्यात खिले

मारले. रात्रौ च्यार कोस बाजूस उभे राहिलो. दोन रोज कोणास आंघोल नाही. दाणा बहुत हरभरे वगैरे मिळाले. लुटीत त्याजकडील हरजिनस आला. दोन हजारावर बैल कानानी (लोकानी?) आणले. गावकरी याणी वगैरे लोकानी चोहोकडे नेले. दोन पलटणे च्यारशे तुरूप वगैरे स्वार आहेत. मागे पलटणे आसपास नाही. याचे पाठीवरच आम्ही येतो. या जमेतीमुले हवालदील होऊ नये. अजमासात आहेत. पागेचे बारगिरानी सिलेदार वगैरेनी मेहेनत चांगली केली. मिति कार्तिक शुा ४ बुधवार प्रातःकाल रानात उभे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Naro Vishnu describes an engagement between the Peshwa's force and that of the English and adds that the enemy lost his supplies.*

No. 127] [17-11-1817

श्री

कार्तिक शुा ८ रविवारी इंग्रजासी दुसरी लढाई मातबर जाहाली. उभयपक्षी माणसे जखमी ठार बहुत जाहाली. जंगी सरंजाम त्याचा, आपला थोडा पडला तो पुरा सरंजाम करून मागती लढाई द्यावी अशा उदेशे तोफखाना काढून कूच करून सासवडास येऊन तेथून कूच दरकूच सालप्याचे घाटाने फालक्याचे पाडळीस आलों. पेशजी लढाई जाहाल्याचा मार लिहून गेलाच आहे. ऐसियास इंग्रजानी सर्व दौलतदारांस जाच करून दौलत हरण करण्यात बाकी ठेविली नाही, व सर्वाचे अंतःकरणाचे धर्म कीं श्रीमंत प्रगट जाहल्याखेरीज कोणी धजावत नाही. श्रीमंत प्रगट जाहाले असता सर्वेहि प्रगट होऊन येकसमई पायबंद जिकडील तिकडे लागले असता बंदोबस्त होईल, असा सर्वांचा मनोधर्म येकविचाराचा जाणोन इंग्रजासी लढाई सुरू जाहाली त्यास तरं तुम्ही तेथे बिघाडाचा मोहरा करून लढाईचा प्रसंग घालावा. अवसर पडेल त्याप्रो हिकडेहि कुमक करावी.

सर्वत्रानी येके समई पायबंद लाविल्यावाचून जेरीस येणार नाही. हिंदु धर्म रक्षावयाचा समय जाणोन सर्व हिंदूंनी येक होणे हे हिंदु धर्मास व कीर्तीस योग्य.

¶*This paper describes a severe action that took place between the English and the troops of the Peshwa. The latter sustained a reverse and went towards Saswad with a view to renew the fighting after making better preparations. The writer says that success will not be possible unless the Peshwa comes out boldly to take the lead.*

No. 128] [17-11-1817

नकल

श्री

राजश्री सिदोजीराव नाइक निंबालकर
सरलस्कर गोसावी यासी

आसीर्वाद उपरी. तुम्ही कार्तिक शुा चतुर्थीचे विनंतिपत्र पाा ते प्रविस्ट होऊन मजकूर समजण्यात आला. काल कार्तिक शुा आस्टमी रविवारी सायंकालचे दोन घटका दिवसास पलटणासी व सरकारचे फौजेसी लढाई सुरू जाली, ती आज इंदुवार प्रहर दिवस प्रातःकालपर्यंत आति तुंबल चालली आहे. तुम्ही पत्र पावताच फार निकडीने येऊन पोहचावे. जाणिजे छ ७ मोहरम कार्तिक शुा ९ इंदुवार प्रहर दिवस प्रातःकालचा सुरु समान आशर मया तैन व आलफ मोर्तब.

रा कासी महमद सांडणीस्वार.

¶*Sidojirao Nimbalkar is informed by Bajirao of hostilities having been declared with the English and is asked to join with his forces without delay.*

No. 129] [23-11-1817

श्री

शेवेसी दिनकर रघुनाथ जोग दोन्ही कर जोडून सिरसां नमस्कार विज्ञापना. ताा कार्तिक शुा १९ प्रथकाल घटका दिवसपावेतो वर्तमान शेवकाचे येथास्थित आहे विशेष. सोमवारी दोनप्रहरी इंग्रज आलपिष्ठाण याजकडील येक हलकारा व शेहर पुणे येथील उमेदवार कारकूण, त्याजबराबर याद होती, ती ते दोघे थोरल्या वाड्यापासी आले, तेथे कोन्ही नाही. नंतर गोखले याचे वाड्यात व बालाजीपंत काले व आताजीपंत मामा व कचोपंत मामा याजकडे गेले. तेथे कोन्ही भेटले नाही. तेव्हां इश्रामबाग येथे देवडीवर याद घेऊन आले. त्या यादीत मजकूर कीं कंपीनबहादर शेहरानजीक लस्कर आले आहे. श्रीमंत महाराजाची स्वारी बाहेर गेली आहे. शेहरातील कोण्ही सरकारचे असतील त्यानी येथे बोलावयास यावे ऐसा मजकूर होता. त्याची नकल करून ठेवावी तर याद

मजला देईना आणि जरबेची गोष्ट बोलून निघोन जाऊ लागले; आणि म्हणाले कीं तुम्ही येत नाही तर पुढे कठिण जाईल. त्याजवरून शेहरात देवडीवरील सिपाई गोखले याजकडे पाहावयास पाठविले; परंतु ते कोणी भेटले नाही. तेव्हा मी वा राजश्री बालकृष्ण शास्त्री वाड्यातील आग्नोत्री आहेत त्यास पुसोन नदी-पलीकडे लेणे आहे तेथे गेलो. तेथे आलपिष्टण व दुसरे गोरे च्यार व बालाजी-पंत नातू व गणेश खेत्री व हारेश्वरभाई ऐसे उभे होते. त्यास भेटलो. नंतर आलपिष्टण याणी पुसिले कीं वाड्यात सिबंदी काये आहे? त्यास मी सांगितले की पाहाऱ्याचे वगैरे बंदोबस्त पुरते लोक आहेत. नंतर बालाजीपंत नातू याणी तिही वाड्यात लोक किती आहेत? तेव्हा मी बोलली की वाड्याचे वाड्यात बंदोबस्त पुरते आहेत. नंतर बालाजीपंत नातू याचे बोलणे बहुत जरबेची पडली; आणि वाडे रिकामे करून हत्यारबंद बाहेर काढून द्यावे लागतलि. ही उतरे आलपिष्टण याणी आइकिले, परंतु काही बोलले नाही. हरेश्वरभाई सावकार याजबराबर दोन हालकारे देऊन शेहरातील सावकार व दुकाणदार याणी उदमीयास ताकीद करविली कीं, दुकाणे उघडून कोणी कोठे न जाता श्वस्त आसावे. आम्हाकडून शेहरास उपद्रव होणार नाही. त्यानंतर सायेंकाली च्यार घटका दिवसास दोनशे लोक घेऊन बालाजीपंत व येक गोरा ऐसे आले, आणि सरकारचे लोक बाहेर काढून देऊन आपले पलटणी लोक ठेऊन, बंदोबस्त केला. बुधवारचे वाड्यापासी दोन पाहारे ठेविले. व शुक्रवारचे वाड्यापाशी दोन पाहरे ठेविले. मंगलवारी सायेकालीं बुधवारचे वाड्यांतील (लो)क काढून दिल्हे व शुक्रवारचे वाड्यातलि बालाजीपंत नातू याणी मोजदाद करून कुलपे घालून बंदोबस्त करून काही दाहा पाचे असामी सरकारचे आहेत. बाहेर लोक त्याचे आहेत. बुधवारी सेहरात ताकीद केली की हत्यारबंद आसतील त्यानी बाहेर जावे. सेहरातील बंदोबस्तास हाजार बाराशे मणुश, बालाजीपंत नातू याचे विदेमाणे ठेऊन शेहरचा बंदोबस्त केला. विश्रामबागचे वाड्यात त्याजकडील कोणी आले नाही. आपाजी लक्षुमण हे दोन तीन दिवस विश्रामबागचे वाड्यावरून जात असतात. त्यात सुक्रवारी दोन तीन वेला दिवस व रात्र मिलोन गेले. याप्रमाणे आजपावेतो मजकूर जाहाला तो शेवेसी लिा आहे. आज्ञा आल्यास पुढे जो मजकूर समजेल तो लेहून पाठवीन. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This is apparently a report sent to the Peshwa by Dinkar Raghunath Jog giving an account of how Elphinstone took possession of the Peshwa's capital after his flight.*

No. 130] [About 23-11-1817

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री आपा व बापूस्वामीचे शेवेसी पो दिनकर रघुनाथ जोग कृतानेक सां नमस्कार विनंती विशेष. श्रीमंत माहाराजास विनंती पत्र लिहिले आहे हे प्रविष्ट करून आज्ञा होईल तो मजकूर लिहून पाठवावा. दोन तीन वाड्यात बंदोबस्त इंग्रज याजकडून आहे. विश्रामबागचे वाड्यात त्याजकडील कोणी नाही. त्यास वाड्यातील गीर्दीचे लोक व परदेसी व ब्राम्हण पाहऱ्येकरी आहेत. त्यास याची कसी काय ती आज्ञा लिहून पाठवावी, त्याप्रमाणे होईल. वाड्यातील दीपाचा बंदोबस्त साठे याजकडून होत होता, ते आता येथे नाहीत. त्याचाहि बंदोबस्त करून पाठवावा. कलावे बहुत काय लिा. कृपा लोभ आसो द्यावा हे विनंती.

¶*Dinkar Raghunath Jog in forwarding his letter to the Peshwa (129) reports the arrangements made by the English for the protection of the various palaces in the Poona City after Bajirao had left.*

No. 131] [24-11-1817

श्रीभवानीप्रा

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
आबा स्वामीचे सेवेसी

पोष्य बहिरो नारायेण सां नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल ताा कार्तिक वाा १ अस्तमानपावेतो सातारा येथे सुखरूप असो विशष. श्रुाा १० चे पत्र बागवान भाडेकरी याजसाा[१] आले त्या ताा वर्तमान कलत नाही त्याजवरोन चिंता लागली. सविस्तर लेहून संतोषवावे.

१ गला वगैरे भरून पहिली खेप व दुसरी खेप पाठविली आहे ती पावल्याचे उत्तर ल्याहावे. दारू खंडीभर केली आहे, पाचसात रोजी देतो असे दारूवाल्या म्हणत असतो. पदरी पडली म्हणजे रवाना करितो. पुढे आणखी करवण्याचे कसे ? काा

१ स्वारीचा मुाा येथे जाल्यामुळे गला फार महाग सांगतात. जोरी सवातीन पायली, बाजरी उडीद पावणेतीन पायेली, हरभरे साहा सेर असे सांगतात. माहागाईमुले खंडी दोन खंडी येक रकमेन मिलत नाही असे आहे. येवि(सी) चा विचार ल्याहावा. काा

[पुढील ९ कलमें अनावश्यक सबब गाळलीं आहेत.]

---

१ साा=समागमें.

१ विंचुरकर, खासा स्वारी गोखले याजकडील दोन हजार स्वार, काही पुरंधरे मिलोन दाहा (ह)जारनिसी अज पुणियास पाहाटे निवोन गेले. राजश्री बाबा येथे आहेत. श्रीमंताचाहि मुा गोखले वगैरेसुधां पाडली येथें आहेच. काा

१ इंग्रजाचा पलटणी दोन पुणियाहून येतात ऐसी बाजार अवाई आहे. काा

सदरहू लिावरून ध्यानात येईल. राजश्री बाबा विच्यारीत होते, सिबंदी किती ठेविली आहे व बंदोबस्त कसा केला आहे. मर्जी राहे असे उत्तर केले. खरिदी गला घ्यावयाचा वगैरे मजकूर तपसोल लेहून पाठवावा त्याप्रो घडेल. कलावे बहुत काये लिहिणे, दयालोभ करीत असावा, हे विनंती.

¶*This letter, written by Bahiro Narayan Pingle to Aba Purandare, contains the news that Sardar Vinchurkar, with ten thousand men, had left for Poona. A rumour, that two English battalions have marched from Poona, is also mentioned.*

No. 132] [*26-11-1817*

श्रीभवानीप्रो

राजश्री नीलकंठराव आबा सा ना वि वि. काल अस्तमानी लस्कर श्रीमंत स्वारीसमेत देऊरचे मुा गेले. रा बाबाकडे मी गेलो. विंचूरकर याची पुढे गेली ती माघारी परतली. त्याजमुले लस्करात गडबड होऊन बाबाचे आज्ञेवरून वंदनचे खाली उंट हाती होते (ते) घेऊन पालीचे सुमारे गेलो. त्यास पुण्याकडून पलटणेहि आली. पुलाचे आलीकडे येऊन पोचली असी बातमी. वंदनचे लोक येतील असे दिसत नाही. तरी लोकाची वगैरे जलद जलद हुशारी करावी. कोकणे वगैरे मिलती(ल) तसे ठेवावे. स्वारी बनेल तिकडे जाईल किंवा कसे घडेल न कले. रवाना शुा कार्तिक वा ३ बुधवार प्रात:काल मुा खोलवडी हे विनंति.

¶*Nilkanthrao Aba Purandare is informed of the embarrassment of the Peshwa.*

No. 133] [*27-11-1817*

श्रीभवानीप्रो

राजश्रिया विराजित राजमान्ये राजश्री

नीलकंठराव आबा स्वामींचे शेवेसी

पोष्य बहिरो नारायेण पिंगळे सा ना वि येथील कुशल ता कार्तिक शुा १३ त्रयोदसी गुरुवार पावेतो येथास्थित असे विशेष.

[पुढील ३ कलमे गाळली.]

१ श्रीमंताची स्वारी काल अस्तमानी सरदार सुधा माहुली दाखल जाहली. येथून जाणे राहणे समजत नाही. अज राजश्री आबाकडे दान प्रहरने जातो. त्याजमुळे माहागाई फार पडली. [नंतर ७ कलमे गाळली] हे विनंति.

¶*Bahiro Narayan reports the arrival of Bajirao at Mahuli on 26th November 1817.*

No. 134] [*7-12-1816*

श्री

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक बालोजी सावंत कृतानेक विज्ञापना ऐसीजे येथील क्षेम तागायत छ १७ माहे मोहरमपावेतो मुक्काम नागपूर येथें साहेबाचे कृपावलोकनेंकरून आज्ञाधारकाचे वर्तमाण येथास्थित असे. यानंतर इकडील वर्तमान तर छ १३ मिनहूस साहेबांचे सेवेसी विनंती लिहिलीच आहे. छ १३ रोजी प्रहर दिवस येतां श्रीमंत राजश्री मुधोजी भोसले सेनाधुरंधर निजून उठलेयावर स्नान देवपूजा करून बसले; तो दीड प्रहर दिवस येतां राजश्री गनपतराव विठ्ठल सुभेदार व सीदी आलीखान व राजश्री रामचेंद्र वाघ वेदमूर्त राजश्री मनभट उपाध्ये येऊन बोलत बसले. तों नागपुरापासून पंधरा कोसावर कुही म्हणून गांव आहे तेथून बातमी आली कीं रामकडून चारपांच हजार पेंढारी येऊन तमाम गांव लुटले; व चिनोर म्हणून गांव आहे तेथें पांचसात बायेकानीं जीव दिल्हे; व दोन तीन बायेका ब्राह्मनाच्या धरून मुक्कामावर नेल्या. नंतर आनखी गांव मारीत जाऊन उंबरडची पेठ लुटली. आज करमन्याच्या नदीवर मुक्काम करून आहेत. त्याजवरून सेनाधुरंधर यानीं दोनहजार स्वार व चार पांचशे पायेदल व तीन तोफा पेंढारी याचे मुकाबल्यास पाठविले आहेत. दीड प्रहर दिवस राहतानीं कारभारी आपल्या घरास गेले. रात्रौ दरबार जाला नाहीं. वाड्यातच होते. छ १४ रोजीं चार घटिका दिवस येतां निजून उठले. दीड प्रहर दिवस येता स्नान देवपूजा करून भोज्यन जाले. मागील प्रहर दिवस राहतां गनपतराव विठल यांस बोलाऊन सांगितले, कीं तुम्ही आपले फोज्येत जाऊन उतरावे. त्याजवरून ते तैसेच निघून लष्करात गेले. रात्रौ व ग्रहन लागल्यानंतर वाड्यातच स्नान करून दहा ब्राह्मणास दहा गाई वरती पांच पांच रुपये दक्षेना दिली; व श्रीमंत राजश्री परसोजी भोसले सेनासाहेब सुभा यांनीं पाचा ब्राह्मनास पांच गाई वरती दक्षेना पांच पांच रुपये दिल्ही. कैलासवासी सेनासाहेब सुभा यांची स्त्री थोरली पार्वतीबाईनी दोन गाई वर दक्षेना दहा रुपये दिल्हे; व मदली अंबिकाबाईनीं एक गाई दिल्ही; व बाकाबाईनीं पांच पांच रुपये दिल्हे. छ १५

रोजी फिरंगी भेटावयास येन्हार म्हणून आपासाहेब यांनीं प्रहरदिवस येतां स्नान देवपूजा करून हनमंत खिडकीत बैठक करून आपन व राजश्री नारायेनदास पंडितजी व रामचेंद्र वाव व सीदीआलीखान गनपतराव विठ्ठल वगैरे मंडलीत बसले. तो दीड प्रहर दिवस येता जंकिनसाहेब फिरंगी व लाट साहेब व आणखी चार पांच फिरंगी यैसे चिटमिन साहेबास घेऊन आले. यावर सेनाधुरंधर साहेब यांची भेट होऊन एक घटका बोलणे जाले. यावर आपासाहेब यानीं चिटमिनसाहेब पोशाख सनगे चार व मोत्याची कंठी व शिरपेच दिल्हा. नंतर त्याचेच बराबरीचा एक फिरंगी त्यास ज्वेर येतो त्याजवरून तो आला नवता, म्हणून मुधोजी भोसले यानीं त्याचा पोशाख सनगे चार पैठनी व मोत्याची कंठी व शिरपेच जंकिनसाहेब याच्या हवाला करून दिल्हा. नंतर अत्तर पान दान होऊन फिरंगी आपले डेऱ्यास गेले. नंतर दोन प्रहरी आपासाहेब याणीं स्नान भोज्येन करून निद्रा केली. साहेबाचे शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Balaji Sawant in the court of Nagpur gives an account of how the Pindaris perpetrated indiscriminate atrocities and plundered the territory and adds that Mudhoji Bhonsle has despatched his force to rout them. Appasaheb's interview with the Resident is also reported.

No. 135] [*November 1817*

श्री

विज्ञापना. दापोडीचे रानात पोटाकडील दारू होती त्यास बती स्वारानी देऊन दारूखाना उडविला. गणेशखिंडीचे डोंगराचे उत्तरेस खाली दारूचे घर होते ते उडाले. पंचवीस स्वार नजीक आहेत. नदीचे अलीकडेच होते. हे विज्ञापना.

¶It is reported that the magazine of gun-powder belonging to Col. Ford was set on fire by his troops.

No. 136] [*November 1817*

श्री

शेवेसी विनंती सेवक नारो विष्णु कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. मुा कोरेगांव. आज बुधवारी कोंडापुरीहून इंग्रजाचे कूच जाहलें. आम्ही त्याचे बाजूस रानात होतो तेथून पाठलाग करीत चाललो. तिसरे प्रहरी कोरेगांवीं

आलों. तेथे त्याचा मुक़ाम जाहाला. रा बाबाजीपंत गोखले येऊन पोचले. मदनसिंगहि आले. चोहोकडे उभे आहों. तोफाखेरीज इलाज नाही. उदईक त्याचे कूच होईल. मार्गात तोफासुधा गाठ घातली तर सरकारकाम होईल. बुनगे, बैल, कचरा लस्करात आहे. यामुले हवालदील आहेत. सरंजाम थोडका, घोड्याचा दम होत नाही. खराबी होईल म्हणौन आसपास चालतो. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Naro Vishnu Apte communicates to the Peshwa that the English have marched from Kodapuri and are encamped at Koregaon, and remarks that a fresh supply of artillery should enable him to attack the English.*

No. 137] *[28-11-1817*

श्री

राजश्री जिउबा दादा गोसावी यांसी विनंती विशेष. इंग्रजाचें पलटण आज साळप्याचा घांट चढोन देऊरचे मुकामास आलें. सरकारची फौज कांहीं पाडली-वर व कांहीं घाटाखाली, कांहीं वाईच्या आंगें, कांहीं कोरेगांवावर दो दो कोसाचे छ्याप्यानें उतरली आहे. खांसा स्वारी न्हावी रुईचे घांटानजीक आहे. तुम्ही तेथील कामकाज आटोपांत लौकर आणावें. मौजे असगांव आकुशी चादवडी येथील नागली देशमुखी ऐवजीं किल्यास द्यावयाचा करार गावकरी याणी येथें केला आहे, त्यास सदरहू गावची नागली किल्यास घेऊन जावी व अवांतर गावीही इकडून रोखे देशमुखीचे ऐवजीं जाले आहेत. नागली कमलगडास न्यावी, भात पांडवगडास पाठऊन द्यावें. आज तृतीय प्रहरीं ऐवज उतरण्याविशी लिहून गेलें आहे. त्यास ऐवज उतरला नसल्यास उतरूं नये. दाहा आसामी असगावीं ठेविले, आणखीही पांच आसामी तेथें तीर्थस्वरूप राजश्री दादाकडे चौकीस पाठवावे. बाळा गोलंदाज तीन आसामीनसी पत्र घेऊन तुम्हाकडे आला; त्यास तो आला न आला हें लिहून पाठवावें. दारूवाले तेथें आले ते परत पाठविले. त्यास दारूचे कसे केले तें लिहून पाठवावें. धावडाकडे तगादा करून शंभर गोळे तोफचे पांडवगडास जरूर पाठवावे. रवाना छ १८ मोहरम शुक्रवार, प्रहर रात्र, लोभ कीजे हे विनंती.

¶*Jiuba Dada is informed of the movements of the flying army of the Peshwa and the pursuing forces of the British.*

No. 138] [29-11-1817

श्रीभवानीप्रो

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
आबा स्वामीचे शेवेसी

पो बहिरो नारायेण पिंगले सा ना विनंति उपरी ता कार्तिक वद्य ६ मंदवारपो येथास्थित सातारा येथे असे विशेष. आपण सिपाई याजसा पत्र पा ते पावले त्याची उत्तरे व इकडील मजकूर

[नंतर ९ कलमांचा मजकूर खाजगी सबब गाळला.]

१ इंचूरकर पुलापासी गेले होते त्यास तेथे लढाई होऊन इंग्रजाची पलटणे व तुरकस्वार मिलोन घाट चढून आलीकडे देऊरचे मुा आले. गोखले तेथे होते ते माघारे पाडली कोरेगांवचे सुमारे आले. विंचूरकर माघे पुलाचे सुमारे राहिले म्हणतात. त्याजवरून शाहरात व देशात गडबड मनस्वी होऊन हवा(ल)दिल जाहली. आज पलटणे कोणीकडे येतात किंवा सातारा येतात न कले. इतक्यावर माल येत नाही ऐवज येथून कसा येईल? खरीदीस खर्च होऊन बाकी ऐवज नरसीदास याचे दुकानी आहे [पुढील १२ ओळी खाजगी मजकुराच्या] हे विनंति.

¶Bahiro Narayan Pingle describes a skirmish between the English troops and Vinchurkar's levies near Deur and also the consequent disorder in the adjoining territory.

No. 139] [30-11-1817

श्रीभवानीप्रो

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
आबा स्वामीचे शेवेसी

पोष्य बहिरो नारायेण सां ना वि येथील कुशल ता कार्तिक वा ७ रविवार प्रात:कालपावेतो स्वस्त असे विशष. आपण आनाजी नो याजसो पत्रे पा ती पावली. त्याची उतरे व इकडील मजकूर.

१ राजश्री जनोबाभाऊ व गणपतरावजी व हरबारावजी यास पत्रे पा ती गणपतराव याजकडे माहुलीस पोचती केली. भाऊ काल दोन प्रहरनंतर श्रीमंताचे लस्करात गेले [यापुढील या कलमांतील मजकूर सात ओळी खासगी सबब गाळला. त्याप्रमाणेच पुढील दोन कलमांतला मजकूर.]

१ राजश्री बाबासी मजकूर बोलावयाचे येविसी लिा त्यास श्रीमंत निघोन पुसेसावलीवर गेले होते. आज इंग्रज पलटणे २ तुरुक ९०० असी कोरेगाव पाडलीमधी जाऊन मुा पोचला. गोखले पुढे कोरगांवचे सिवेत आहेत. विंचूरकर वगैरे आपटे मागे कोसी पावकोशी आहेत. काल मुााचे वर्तमान. आज पुढे कसे घडते नकले. श्रीमंत निघोन मिरजेचे सुमारे गेले, सा रा बाबाहि गेले असतील याप्राो वर्तमान. तेव्हा कोणता जाबसाल कसा तडीस जातो. राजपुरीचे भाताचे पत्र घेऊन आपले गणपतराव यानी रा आहे. इंग्रज सातारा येणार म्हणतात त्यावरून येथील ऐवज सप्रे याबाा पाा आहे [पुढील मजकूर खासगी.]

¶*Bahiro Narayan sends news to Aba Purandare about Bajirao's move to Pusesavli and towards Miraj.*

No. 140] [*30-11-1817*

पौ छ २२ मोहरम सन

समान आशेर कार्तिक मास

श्रीभवानीप्राो

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

आबा स्वामींचे शेवेसी

पाो बहिरो नारायेण सां नाा विनंति. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे विशष. वाा ७ रविवारचे पत्र पाा ते पावले लिाा मार समजला. त्याची उतरे व इकडील मजकूर [नंतर ४ लांबलचक कलमांत खाजगी मजकूर नंतर]

इंग्रज याचा मुा काल रहिमतपुरावर गेला. श्रीमंत मिरजेस गेले असे लोक म्हणतात. बापू गोखले याचा काल मुा पुसेसावळीवर गेला होता. विंचूरकर याचा धामणेर बोरगाव सुमारे होते. नारोपंत आपटे काल येथे दोन हजार फौजेनिसी आले आहेत. आतांच निघोन जाणार, याजप्रा वर्तमान आहे. मिरजेचे सुमारे इंग्रज जातो. पुढे मागे सरदार जात आहेत, तेथे मुा होता. सिवार दरोबस्त लुटतात व गावातील वैराणदाणाहि लुटून आणितात. इंग्रजानी रहिमतपूरची खराबी फार केली असे ऐकितो. तेथून पुढे गेल्याचे या घटिकेपावेतो समजले नाही. भाऊ पोतनीस याजकडे सिपाई बातमीस पाा आहे [पुढे मजकूर खाजगी सा गाळला.] हे विनंति.

¶*Bahiro Narayan reports the movements of the English forces and of those of Bapu Gokhale, Vinchurkar, Naropant Nana Apte and other followers of the Peshwa.*

No. 141] [1-12-1817

पौ छ २० मोहरम

श्रीरामलिंगप्रा

विज्ञापना ताा कार्तिक वाा ७ रविवारपावेतो उतम असे विशेष. इकडील मजकूर. ताम्रमुख याचा मुाा माहुलीवर येक सरकारी फौजा असपास आहेत. सातारयावर जाणार आसी दाट आवाई आहे. सारांश त्याची व्याप्ति बहुत जाली. आपले लस्करचे वर्तमान येक लढाई कटी द्यावी असे निश्चय सरदार मंडळीचे आहेत; परंतु येश देईल तेव्हा खरे. श्रीमंत मिर्जे दाखल जाले. आठ हजार फौज जवल. (महादे ?) व येथेहि फौजा वीस पचवीस हजार सुमार आहेत. ताम्रमुख तीन पलटणे सारी फिरत आहेत. बाकी पुण्यावर आहेत. गल्ला वगैरे जिनस झाडून पो आहे. येथे सिलक काही येक राहिली नाही. दारूमात्र बाकीची पाा देतो, आणि झाड्याची यादहि पाा देतो. लोक पो द्यावे म्हणौन आपण लिहिले; परंतु मीच अनुमान म्हराटे लोक शेरा ६ पडू लागला यास्तव ठेविले नाहीत. इतके असून पाहिजे तरी लिहून पाठवावे. लोक पाा देतो हे विज्ञापना.

हो पत्री राजश्री गणपतरावजीस साा नमस्कार विनंती विशेष. राजश्री भाऊ काल निंबावरून गेले. कोरेगावीं श्रीमंत मुकामास गेले. ते आपले वाड्यात गेले. मेजवानी जाली. दोनशे पात्र जाले. वस्त्रे देत होते; परंतु श्रीमंताची आज्ञा जाली कीं, समय आजचा नाही. पुन्हा माघारे येताना वस्त्रे घेऊ. वर माझे आहे. मेजवानीस सर्व मंडळी आली होती. राहाता पौ श्रीमंत पंत व आपा साहेब आले नाहींत. आपणास कलावे. श्रीधरपंत याणी बहुत सीमा केली. लोभ करावा हे विज्ञापना. आम्हास तांदुल पाहिजेत त्यास सरकार खरीदीने सारफेवार पडतील असे पाहिजेत. येविसी येजमानास विनंती करून पत्र यावे. पन्नास साचे जाले म्हणजे जाले. उतर पाा द्यावे हे विनंती.

¶*The writer communicates that the English are encamped at Mahuli and intend to march on Satara. The Sardars of Bajirao, continues the writer, are determined to make a stand against the English.*

No. 142] [2-12-1817

श्री

शेवेसी विज्ञापना माहोलीचे मुकामी बोलणी जाहालीं त्यांत प्रसंगी स्वामीनी व आम्हीं येके ठिकाणी असावें ही मुख्य मर्जी. त्यास सांप्रत तमाम सरदार आपापले जमेतीसुधां येऊन फौजेची जमियत मातबर जमली आहे. सिंदे होलकर भोंसले आपआपले पोख्त सरंजामानिसी कूच दरकूच इकडील फौजेचे रोखें येत आहेत

याप्रो बातम्या आल्या. स्वामीचे समस्त मंडळीसुधां स्वारींत येणे व्हावें असे स्वामीचे मर्जीप्रो सर्व सरदारांचें विचारें आम्ही ठरवून विनंती लिहिली आहे. त्यास स्वारींत स्वामीचे येणे घडलें पाहिजे. येविसीं यमाजी व शेकाजी विनंती करितील. मिती कार्तिक वा ९ हे विज्ञापना.

¶*This appears to be a request sent by the Peshwa to the Chhatrapati to join him with his forces and oppose the English in a united front.*

No. 143] [*4-12-1817*

पौ छ २४ मोहरम

सन समान आसर

श्री

विनंती विशेष. काल मंगळवारी इंग्रजाचे कूच घाटाआलीकडून होऊन पुसेसावलीचे पुढे व जयरामस्वामीचे वडगावचे मधी मुा होता. घाटात रात्रीसच कूच करून जाताना तोफेचा कणा मोडला. ते समई इकडील फौज मागे होती. याणी बाण टाकिले, त्याणे येक मेणा मोडला. येक गोरा ठार जाहाला. काही माणसे मेली, घाबरे जाले. तोफ सुरू जाली. इकडील येक दोन घोडी मेली. गोल बांधून रात्रीस तेथेच घाटात होते. कणा नीट करून पुढे सदरहू मुकामास गेले. विंचूरकर यांचा मुा आउधाजवळ होता. पुढील फौज भूषणगडाजवल होते. सरकारची स्वारीचा रोख पंढरपुराकडे जाला. इंग्रजाचे मुकामास व सरकारचे खासा मुकामास पंधरा सोला कोसाचा तफावत आहे. याप्रो वर्तमान गडबोले याजकडे आले ते लिा आहे. गडबोले याजकडील कारकून, धावडाकडे गोले तोफेचे करार केले, ते आणावयासी गेला. तो आटकाव करून दोन उपोषणे जाली. पाहरियात दिल्हा म्हणून रा पांडुरंगपंत आबा याणी सांगितले. त्यास त्याचे उतर हे गोष्ट खोटी म्हणून केले. आम्ही धावडास यैवज दिल्हा आहे. काम आमचे करीत आहेत. तुमचा कारकून गेला कधी हे ठऊकच नाही. त्याचे म्हणे आम्ही आगाव यैवज दिल्हा आहे. तुम्ही आपले काम करून घ्यावे व आमचेहि करून द्यावे. कारकून आटकावला आहे तो सोडावा येसे बोलले. त्यास हे वर्तमान ठऊकच नाही. शोध आणून सांगतो, म्हणौन उतर केले. सोलसी व तलये व दहीगावचे सिपाई उठोन आले. गाव उज्याड जाले आहेत. जोरखोरे पौ आडतीस रुा मात्र आले. खरसीकडील पाऊणसे आले. तगादे आणखी पाा आहेत. कलावे कृपा कीजे हे विनंती.

¶*The writer describes an encounter between the forces of the Peshwa and a detachment of the English near Vadgaon and adds that Peshwa Bajirao is proceeding in the direction of Pandharpur.*

No. 144] [8-12-1817

श्री

राा कासी सिवराम बंद्रे गाो यासी

सुाा समान आशर मयातैन व अलफ. श्रीमंत राजश्री माहाराज व भाऊसाहेब व आपासाहेब व माईसाहेब यांस आम्हांकडे यावयाचा बेत हिकडून ठरऊन आणावयाकरितां राा नारो विष्णु व विसाजी देवराव यांस पाठविले आहेत. त्यास माईसाहेबसुधां आली असतां जवाहीर व सोने त्यांजसमागमे यावयाचें ते त्यांचे मर्जीप्राो अवघें यावें; व तुमच्या जवळ सिलक आहे ती चाळीस हजार असल ती स्वारीजवल आणावी. माईसाहेब व आपासाहेब न आली तर काही सिलक तेथें राहावी व पांच च्यार हजार रुपये माहाराजासमागमे स्वारीत यावे. माहाराजांनी तुम्हास आणिल्यास व माईसाहेब तेथे राहिल्यास राा राघोबा जोसी यांस तेथे ठेऊन तुम्ही माहाराजासमागमे यावे. माईसाहेबसुधां आल्यास तुम्ही व राघोबानें यावे. राणीसाहेब वगैरे तेथे राहिल्यास तुम्ही आपला कारकून ठेवावा. तेथील खााची बेगमी ठेवावी. माईसाहेब तेथे राहून भाऊसाहेब व माहाराज आले म्हणजे माईसाहेबाच्या व माहाराजांच्या विचारें जवाहीर व सोनें वगैरे जें तेथें ठेवितील तें ठेवावें. जें आणितील तें आणावें. जाणिजे छ २२ मोहरम.

¶*Kashi Shivram Bandre is directed to make arrangements about the royal family at Satara joining the Peshwa and about meeting their expenses.*

No. 145] [8-12-1817

श्री

राा नारो विष्णु आपटे गाो यासी

सुाा समान आशर मया तैन व अलफ. हे दिवस नाजूक, याअर्थी श्रीमंत छत्रपति माहाराज त्रिवर्ग व माईसाहेबसुधां आमचे स्वारीत असले पाहिजेत, हे ध्यानात येऊन, तुम्हास लिाा असे. तरी तुम्ही आपलेकडील नेमणुकी लोकसुधा हे वर्तमान बाहेर कोणास न समजता कूच करून, वासोट्यास जाऊन, त्रिवर्ग बंधू माहाराज-सुधां व माईसाहेब यास घेऊन, वाटेची चहूकडील बातनी हुशारी राखून, जिकडे स्वारीचा रूख होईल तिकडे येऊन रातबिरात करून, लस्करचे मुकामीं लौकर दाखल होणे. हे काम सहस्र कामांत नाजूक; (तु)म्ही सरकारचे विश्वासूक व हे काम करावयाजोगे हे मनात आणून, या कार्यास तुमची योजना केली (असे). यांत

ज्या तऱ्हेने माहाराजाची स्वारी आम्हाजवळ दाखल होय तें करावें. चोहोकडील बातनी वर्तमान नित्यानित्य आणऊन घेऊन, ज्या मार्गें आपली निभावणी होय त्या मार्ग येऊन पोहोंचावे. आणि आपण ज्या मार्गें याल, त्या मार्गाची सूचनार्थ विनंती नित्यानित्य लिहीत असावी. ज्या मार्गें येण्याचे ल्याहाल तीं माणसे बहुत विश्वासूक पाठवीत जावीं जे, त्यांणी हर कोठेहि हे वर्तमान मार्गात न बोलतां स्वारीसमक्षच विनंती करावी. ही पुर्तपणें येणारा मनुश्यास ताकीद असावी. त्याजवळ चिठी दिल्ही असतां हर कोणा परिल्याची गाठ पडली असतां चिठी गिळोन जावी. याप्रो येणार माणसास सांगणे असावे. लिा प्रो च्यारी स्वाऱ्या निघाल्यास उतमच आहे. त्यात माईसाहेबांचे मानस नच निघावे असे असल्यास त्रिवर्गास घेऊन यावे. त्यांतहि फारच आग्रह असल्यास आपा साहेब माईसाहेब यांजवळ राहातील.

¶*Naro Vishnu Apte is instructed by the Peshwa to escort to his camp with utmost care and secrecy the Maharaja of Satara and his brother and to observe utmost caution about his movements.*

No. 146] *[8-12-1817*

श्रीभवानीप्रो

राजश्रिया विराजित राजमान्ये राजश्री
आबा स्वामीचे शेवेसी

पो बहिरो नारायेण सां नमस्कार विनंती येथील कुशल ताा कार्तिक वाा ३० पो येथास्थित असे विशेष [नंतर २ कलमें खाजगी मजकूर गाळला.] नारोपंत नाना आपटे येथे काल अस्तमानी येऊन पोचले. दोन हजार स्वार साा आहेत. श्रीमंताची स्वारी पंढरीवरी आहे. सोलापूरचे सुमारे जाणार असी आवाई आहे. इंग्रज पिलवाचे सुमारे मुाा आहे. भोवते सरदार कोशीं दोन कोशी आहेत. याजप्रो वर्तमान आहे. बापू सिंदे याजकडील दाहजार फौज सुधा काही पलटणे भीमेवर आले आहेत असी वंदता. याजप्रो नारोपंत आपटे काही ऐवज न्यावयास आले आहेत असी बाजारआवाई, मजकूर मागाहून लेहू [नंतर ३ कलमें खासगी मजकुरीची गाळली.] हे विनंति.

¶*Bahiro Narayan informs Aba that the Peshwa is at Pandharpur, that Naropant Nana Apte has arrived to convey treasure and that the English have moved their forces near Pilav with the Maratha Commanders hovering about them at a short distance.*

No. 147] [10-12-1817

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री निलोपंत आबा देशपांडे
स्वामीचे सेवेसी

पो श्रीधर बलाल दामले मुा कों वाई सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा मार्गसीर्ष शुा २ पावेतो यथास्थित असे विशेष. इकडील मजकूर तुम्ही ऐकत असाल व सविस्तर आज ताा राजश्री कृष्णाजीपंत दाजी सांगता कलो येईल. आम्ही उदईक निघोन् लस्करात सातारियास जाऊन चालते होऊ. वासोट्याहून मुख्य ग्रहस्त यास घेऊन जाणार. राजश्री सदासिव माधवराव दीक्षित वाईस हाली आहेत. येथे काही उपद्रव जाल्यास तुम्हाकडे येतील. जागा देऊन चौकीचा वगैरे बंदोबस्त करावा. येविसी माहुलीचे मुाहून भाऊनी तुम्हास त्याजवळ पत्र दिल्हे आहे, व तुमचाहि परिचय आहे. कलावे. आज ताा सर्व सुखरूप आहो. पुलावरचे लढाईत आमचे पागेतील च्यार बारगीर घोड्या-सुधा ठार जाले, व पुण्यावर साहा ठार जाले. वरकड सुखरूप आहों. बहुत काय लिहिणे लोभ करावा. राजश्री कृष्णाजीपंत दाजी यास आपण आणिले आहेत त्याजवरून विनंती जे पेशजीचे प्रकर्णी पेचात आहेत. हाली समय आहे. हरयेक काम सांगोन पेचातून बाहेर काढावे हे तुम्हाकडे आहे. हे विनंती.

¶*Shridhar Ballal Damle from Wai communicates to Nilopant Deshpande that ten horsemen from the troops under his command fell in the battle of Yeravda and further states that he is to proceed to Satara.*

No. 148] [10-12-1817

श्रीभवानीप्रो

राजश्रिया विराजित राजमान्य राजेश्री
आबा स्वामीचे शेवेसी

पो बहिरो नारायेण सां नमस्कार विनंति येथील कुशल ताा मार्गसीर्ष शुा २ बुधवार पो येथास्थित आसे विशेष [नंतर १३ ओळी गाळल्या आहेत] श्रीमंताची स्वारी नरसीपुरास आहे तेथूनहि पुढे गेली म्हणतात. कोणता मार्ग आद्यापपर्यंत समजत नाही. इंग्रजहि माघे माघे आहे. पुण्यातील वर्तमान आपले येजमान खासे याचे वाडियात ज्यलचर दोन असामी येऊन वाडियाची कुलपे काढून

वाडा पाहून मागती माघारे कुलपे घालून गेले. याजप्रो वर्तमान खास आहे. वरकड अधिकोत्तर ल्याहावे असे नाही. आपटे येथेच आहेत. कलावे हे विनंति.

¶*Bahiro Narayan writes to Nilkanthrao Aba communicating the arrival of Bajirao at Narsinhpur, being pursued by the British.*

No. 149] [*18-12-1817*

पौ छ १० सफर सन-
समान आशर

श्रीभवानीप्रा

राजश्रिया विराजित राजमान्ये
राजश्री आबा स्वामीचे शेवेसी

पो बहिरो नारायेण सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। मार्गसीर्ष शुा १० पो येथास्थित आसो विशेष. आपण छ ९ सफरचे व छ ७ सफरचे पत्र पा ते पावले लिा मजकूर कलला, त्याची उतरे व इकडील मजकूर.

[यापुढील १ कलम गाळलें आहे.]

१ दारू व गंधक सोरा सत्वर पाठऊन द्यावा म्हणोन लिा. त्यास दोन बैल भरून सोला मण रो केली आहे, व काल बतीस मण च्यार बैल भरून रवाना केली आहे. येऊन पावली असेल. आणखी दारू तयार होत आहे. गंधक सोरा सिध्ध आहे परंतु ऐवज नाही, याजमुले हस्तगत होत नाही. त्यास ऐवज खरीदीचे आनुमानाने सत्वर पाठऊन द्यावा.

गुा नरसीदास	गुा बालापा
६ गंधक रास	४॥ गंध्रक रास
३॥। सोरा	३॥। सोरा.

याप्रो आज भाव सांगतात. मासले पा आहेत. पाहून कोणत्या मासल्याचा जिनस पाहिजे जरूर किती लेहून पाठवावा त्याजप्रो रा करितो. दारू ही पाचशाची जाली म्हणजे आणखी पाचशाची सही करितो. दारूवाल्यास ताकीद होत आहे तो उतर पाठवावे. पाहिजे तरी घ्यावी, नाही तरी दुसरे गिराईक घेत आहे. पुढे तंटा नको असे म्हणतो.

[यापुढील ५ कलमें गाळलीं गैरलागू व अवांतर मजकुराची.]

१ बातमीचा मजकूर ल्याहावा खरें, परंतु प्रमाण वाटत नाही याजमुळे कसे ल्याहावे. असो. गारदौंडवर श्रीमंताचा स्वारीचा मुा आहे. इंग्रजहि

फलटणाचे सुमारे श्रीपंढरीकडून आला. आज जेजोरीवर जाऊन पुणियास जातो म्हणतात. सरकारची स्वारी पुणियास जाणार असे बाजारआवई. प्रचितगडचे बंड फार माजले आहे. पालीपर्येत येऊन स्वारी करू लागले होती, ती परत आज सातारियास आली. का

सदरहू लिहिल्यावरून ध्यानात येईल. सारांष ऐवज पाठवावा. तुम्ही असले जिनसाचा तोटा म्हणोन लिा, त्यास आपण याद्या त्याप्राो रवाना करीत आलो. पुढे लिा येईल तसेच करिता येईल. बहुत काये लिहिणे, लोभ करावा हे विनंती.

¶*Bahiro Narayan writes to Aba Purandare about the intended moves of the Peshwa and the preparation and supply of gunpowder.*

No. 150] [*18-12-1817*

पौ छ १४ सफर

श्री

१ मेलघाटाहून छ २४ मोहोरमची पत्रे आली त्यांतील मजकूर बिा

१ गोविंदबक्ष याजकडील स्वार पायदळ अंमल बसवावयास येणार ही बातमी उंबरावतीहून आली. पुण्याहून पत्रे आलीं कीं, सरकारची आज्ञा जाहाली आहे. ठाण्याठाण्यास लोक पाठऊन बंदोबस्त (रा)खावा. त्याजवरून ठाण्याठाण्यास लो(क) (पा)ठऊन बंदोबस्त राखून, हुशार आहो. गोविंदबक्ष आले तरी चिंता नाही. मोहरम सफर दु माहीच्या हुंड्या व पट पो म्हणजे इकडील काळजी किमपिहि करू नये. वीस हजार फौजेचा जमाव आला असता डगत नाही. नवे स्वार पायदळ दोन तीनशेपर्यंत ठेविले आहेत. अनखीहि लागेल तसा जमाव करितो. मेलघाटापासोन साठ साठ कोशपर्यंत इंग्रजाचा व गोविंद बक्षी याचा कोण्ही फिरकू देत नाही. हुंड्या सत्वर पत्रदर्शनी पाठवाव्या. दिवसगत लाऊ नये. हुंड्या येण्यास दिवसगत लागली असता येथील सिवबंदीस भरवसा येणार नाही. हेच लोक आम्हास शत्रू होतील असा माार आहे. सह(स्त्र)पत्राचे ठिकाणी हे पत्र मोजून पत्र पावताच हुंड्या सत्वर पो.

१ रमजानचा रोजमुरा सिवबंदीने अडऊन घेतला. दोन उपोषणे सिव-बंदीने घातली. निरुपाय जाणोन कर्ज काढून रमजान दिल्हा.

रमजानच्या पावत्याहि घेतल्या आहेत. राजश्री बापूजीपंत दादा गडबोले याणी सिवबंदीस पत्र लिहिले होते कीं, रमजानचा रोजमुरा कोणासच नाही. तुम्ही मागू नये असे पत्र होते, ते पत्र त्यास दाखविले. त्यास पत्राचे उतर त्याणी सांगितले की, येक रोजमुरा सरकारांत देणे तो पुणियास गेल्यावर हुजूर देऊ. येथे देत नाही. याप्रमाणे उतरे सिवबंदीने करून धरणे पारणे बसऊन रमजान घेतला. (हा) मार सरकारांत कलवावा. ऐवज कर्जाऊ सावकाराचा घेऊन दिल्हा आ(हे). येथे सावकारापासी आता पैसा मिळावयाचा नाही. अडतीवाल्यानी दुकाने आटपिली. आजपर्यंत सावकारी व्यवहार नीट होता. आता दंगल माजून गेली, याजमुळे जेथे तेथे आटपून व्यवहार बंद जाहाले. ठाणी पांच महिने उठविली. याजमुळे व राजे याणी बंड माजविले, याजमुळे मेलघाटची रयत परागंदा जाहाली. भोसले याचे मुलखात गेली. रयतेस धीर भरवसा देऊन आणितो. मेलघाटास महर्गता फार आहे. दाहा शेराची धारण आहे. सिवबंदी जवल पैसा राहत नाहीं. अश्या अवस्था ठाणी पाच महिने उठली होती याजमुळे जाहाली. बरे असो. मोहोरम सफर (दु माहीच्या) हुंड्या मात्र जलद पाठवाव्या. पागेचे (घो)ड्याचा खर्च आम्हासच पाहावा लागला, यास्तव हुंड्याची रवानगी सत्वर व्हावी.

१ मेलघाटचे नेमणुकेस विंचूरकराचे स्वार होते ते स्वार श्रावणमाशीच उठून गेले. त्याचे मोबादला तूर्त नवे स्वार ठेविले आहेत. विंचूरकराकडील स्वार येत असलियास लिहोन पाठवावे. विंचूरकराचे स्वाराचा मार सरकारचे कानावर घालावा.

१ नागपुरास लडाई जाहाली. लढाईची आवाई आली कीं, सात प्रहर लढाई होऊन बारा गोरे ठार जाहाले. गोर मोठेच मेले. तहकीक मार मागाहून लि॰.

१ हरदेहांडे व अशेरीचा किला इंग्रजा(स) सिंद्यानीं दिल्हा. हरदेहांड्यास मात्र अंमल बसला. अशेरकराने गोळी वाजिवली. इंग्रजाचे पलटणचे गल्याचे बैल अशेरकराने नेले.

१ पुण्यांत लढाई जाहाली याजमुळे झाडून चोहीकडे सर्वत्रास हुशारी आली. तमाम जागोजागा हुशार जाहाले. मीरखान नरमदेवर येणार. होलकर इंदुरावर येणार. तमाम फौजा बाहेर निघाल्या. सर्वत्रास हुशारी आली.

१ दारू सिसे खरेदी करून ठाण्याठाण्यास पाठविली आहे, व जवल सिलकेस राखिली.

येणेप्रमाणे कलमे लिहिली आली आहेत.

१ (मेळ घा)टास धारण माहाग व रमजानचा (रोजम)रा सिबंदीने अडऊन घेतला. या * * * * तेथे सिलक नाही व सावकारीहि ऐवज मिळावयाचा नाहीं. रयत परागंदा असी अवस्छा लिहिली आली. त्यास दिवस येक तरेचे पडले. कलेल तसा बंदोबस्त राखण्याविसी लिहितो; परंतु मोहोरम सफर दु माही पट व हुंड्याचा ऐवज देण्याविसी राजश्री विनायकपंत अंणास पत्र द्यावे, म्हणजे पट व हुंड्या रवाना करून देतो. विंचूरकराचे स्वाराचा मार लिहून आला, त्याचे उतर कसे काय पाठवावयाचे ते लिहून यावे. त्याप्रमाणे मेलघाटास लिहितो. अणाचे पत्रांत ल्याहावे कीं, कोणत्याहि गोष्टीचा हिसका न घेता पट व हुंड्या रानडे याजपासी (पाठवा)व्या म्हणजे पट व हुंड्या मेलघाटास रवाना करितो.

¶*The paper gives the purport of letters received from Melghat particularly relating to the probable occupation of the ghat by Govind Baksh, to the payment of troops and to some light skirmishes between the English and the Marathas at Nagpur, Poona and other places.*

No. 151] [*18-12-1817*

पौ छ १३ सफर मार्गसीर्ष
मास समान अशेर.
यादी मार्गसीर्ष शुा १०.

श्रीगजाननप्रा

१ मुंबईस गोन्याच्या बायका व पोरे पाहोचवावयास खडकीहून पलटणचे लोक गेले होते. ते लोक पोहोचऊन आले. नवे लोक काही आले नाहीत. मुंबईस लोकांचा भरणा नाही.

१ दारूगोळी वगैरे सामायन आण्यास हजार बैल लंबाणाचे मुंमईस गेले.

१ पाच लक्षाच्या हुंड्या कलकत्याच्या हरेश्वरभाईस देऊन पुण्यांत भाईपासोन खर्चास ऐवज घेतात.

१ सिंद्याच्ये डाकेच्या थैल्या पुण्याजवल घोरपडे याचे स्वारानी धरिल्या. त्या थैल्या गोरे फोडून पाहाणार. त्याची बातमी हिंदुस्थानची पंधरा दिवसांत आली नाही, याजकरतां पाहाणार व मराठी पत्रात देशावरीच्या खबरा काय लिहितात त्या पाहाणार.

१ अलपिष्ठणाकडे गारपीराहून रसद व रोखीचे बैल भरून जात आहेत. बैलाबरोबर हजार अकराशे पलटणचे लोक आहेत. रसद तेथे पोहोचल्यावर पलटणच्या दोन टोळया करणार.

१ सरकारांत दोन गोरे धरले आहेत. त्या गोऱ्यास सोडऊन आण्याकरिता गारपिरावर गोऱ्याच्या मसलती चालल्या आहेत. प्रथम त्यास बातमी लागली कीं केलंज्यावर आहेत. त्याजवरून पुण्याहून दोन पलटणे पाठवावयाचा बेत करीत होते. तों केलंज्यावर नाहींत कांगोरीवर आहेत असी बातमी लागली. त्याजवरून त्याणी कांगोरीकडे बातमीदार पाठविला आहे. पलटणें पाठविणार होते; परंतु गारपिरावर फारसी लोकांची भरती नाहीं. सबब आठ पंधरा दिवस पाठवीत नाहींत. बातमीदार आल्यानंतर कसा काय बेत करितात त्याचा शोध लागेल. त्यास मोठी चटपट दोन गोरे अटकेत पडले म्हणोन लागली. ते दोन्ही गोरे मोठे आहेत. लाटाचे खालीखालीचे आहेत असा त्याचे बोलण्याचा भाव आहे. त्या गोऱ्याकरितां कोट्यावधि रूपये खर्च करणार.

¶*News of the various movements of the English is reported.*

No. 152] [*26-12-1817*

पौ छ २० सफर

श्रीभवानीप्रा

राजश्रिया विराजित राजमान राजश्री
आबा स्वामीचे शेवेसी

पो बहिरो नारायेण सां ना विनंति येथील कुशल जाणून स्वकीये कुशल ता मार्गसीर्ष वा ३ शुक्रवार त्रितीय प्रहर पावेतो यथास्थित असे विशेष [पुढील ३७ ओळी मजकूर खाजगी.] श्रीपंढरीवर दोन पलटणे वं हजार तुरपस्वार येऊन क्षेत्रातील सर्पण व कडबा कही करून आणितात व पलीकडे गोखले याजकडे माहाल सरंजामी वगैरे होते तेथे आमल बसविला असे म्हणतात. [पुढील ४ ओळी खाजगी मजकूर.] स्वारी नासिकाचे सुमारे गेली. सिरोर कुकडीवर इंग्रजाची पलटणे आहेत. पूर्ववत गोखले विंचूरकर आहेत. पुणे येथील साहुकार व रयेत जाहाडून पळून आपलेले सोईने जात आहे, या प्रा बाजार आवाई बोलतात [पुढील १०।१२ ओळी खाजगी मजकूर] हे विनंति.

¶*The movements of the English forces near Pandharpur and those of the forces under Gokhale and Vinchurkar are mentioned in this letter by Bahirao Narayan Pingale.*

7124

No. 153] [27-12-1817

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री तात्या व बापू व आपा
स्वामीचे शेवेसी

पो सोयरो परशराम सां नमस्कार विनंती. यथील कुशल ता छ १८ मोहरम पावेतो मुा किले वर्धनगड येथे वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील मजकूर काल दोन आसामी रामोसी सालप्याचे घाटाखाली बातमीकरता पा, त्या आज पाहाटी आल्या. त्याणी तोंडजबानी वर्तमान सांगितले की, इंग्रजाचा मुकाम सालप्याचे घाटाखालिता बारव येथे आहे. आपल्याकडील फौज रा नारोपंत नाना इंग्रजाचे पछमेस, त्याचे सेजारी नदीचे आंगास डावे बाजूस धरमाजी वणजारे गोखले याजकडील, इंग्रजाचे उतरेस लोणंदेचे आंगास विचूरकर, पलटणचे दक्षणेस सालप्याचे घाटाखाली रामचद्रपंत सुभेदार, याप्रमाणे फौजा गोल्याच्या टप्याबाहेर पलटनानजीकच आहेत. फौजेचा सुमार सांगण्यांत आजमासे च्यारी तोंडे मिलोण बारा तेरा हाजारपर्यंत आहे. बापूसाहेब सालप्याचे घाटावर मौजे देवरावर आहेत. काल आस्थमानचे च्यार घटका दिवसपरियत लढाईचे तोड नवते. आजहि बातमीदार पो आहेत. वर्तमान येईल तैसे लिहून पाठऊ. येथील किल्यानजीक खेडी आहेत, तेथे चौक्या बसविल्या आहेत. त्या चवकीवर काल दोन प्रहरा श्रीपंढरपूरकर ब्राह्मण माहुलीहून आला, तो पंढरपुरास जाणार. त्यास चवकीवर विच्यारले कीं कागदपत्र काय असतील ते द्यावे. नंतर त्याणे काय कागद होते ते स्वाधीन केले. त्यास वरकड कागद उगेच जाबसाली होते, ते भटजी मार याचे हावाली केलेहि. चिठीचा संवशय आला म्हणोन चिठी घेऊन आपल्याकडे पा आहे. कलावे बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Soyaro Parashram describes how the Peshwa's army has surrounded the English army encamped at Salpa but is avoiding engagement at close quarters owing to the latter's powerful artillery.*

No. 154] [28-12-1817

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
वामनराव तात्या व बापू व आपा स्वामी-
चे शेवेसी.

पो सोयरो परशराम सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ १९ मोहरम प्रथम प्रहरपावेतों किले वर्धनगड येथे वर्तमान येथास्थित असे विशेष. इकडील

मजकूर तर काल छ * मिनहूस प्रात:काली इंग्रजाकडील पलटणे सालप्याच्या घाटावर चालून आली. घाटावर राजश्री रामचंद्रपंत सुभेदार याचे व इंग्रजाकडील पलटणेची लढाई जाली. रामचंद्रपंत सुभेदार यास डावे दंडास गोली लागली. आपलेकडील पाच च्यारशे घोडे व माणसे पडले, व जखमी जाले, ऐसी वदंता आहे. राजश्री नारोपंत नाना आपटे व विंचूरकर वगैरे फौजा पलटणचे मागेच आहेत. पलटणचा मुकाम देवरावर आहे. श्रीमंत राजश्री बापूसाहेबहि देवरा-नजीक येक कोसाचे अंत्राने आहेत. आपण पत्र पाो कीं नीरथडीपासून बातमी राखून बंदोबस्त नीट राखावा म्हणौन आज्ञा आली. त्यास येक दोन वेळा जाजती सिबंदीविसी लिाा त्याचे उतर आले नाहीत. मी तर पनास आा जाजती ठेविली आहे; व आणखी पनास ठेऊन आज्ञेप्राो बातमी व बंदोबस्त ठेवितो. गडकरी याजकडोन किल्याचा व दोही खिंडीचा बदोबस्त ठेविला आहे. किल्यावर सिलकी गला व दारूगोली आगदी नवती याजमुळे तूर्त तीनसे रुपयाचा गला व तीनसे रुोयाची (दारू) खरीदी केली आहे. आज्ञा न घेता इतके सामान सरकार सिलकी केले आहेत. गडकरी याच्या सनदा मोकल्या केल्या आहेत; परंतु त्याचे म्हणणे) की सरकारची सनंद चौकी पाहारा व अलंग * * बंद करून, राजश्री आत्माराम लक्ष्मण याचे आज्ञेत वर्तोन, सरकारचाकरी नीट राखणे. याप्राो सनंद आणवावी. त्याजवरून शेवेसी विनंती लिाा आहे : तर याप्राो किले वर्धन-गड येथील गडकरी याची सनद पाठऊन द्यावी. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Soyaro Parashram describes an encounter that took place near Salpa between the force under Ramchandrapant Subhedar and detachments of the English.*

No. 155] [*28-12-1817*

छ २० मोहरम

श्रीरामलिंगप्रा

विज्ञापना ताा छ १९ मोहरम रोज मंदवारपावेतो उतम आसे विशेष. आपण पत्र पाो ते पावले. लिाा मार कलला. येथून जिनस गल्ला पाो आहे, त्याची आलाहिदा याद आहे, त्याजवरून कलो (येईल.) इकडील वर्तमान श्रीमंताची स्वारी मिर्जेदाखल पावली. देऊरावर गोखले खासे व रास्ते पुरधरे आहेत. फौजा विंचूरकर वगैरे पुलापलीकडे आहेत. पलटणे सालप्याचे घाटा-वर आली आसी आवई आहे. पाच साहा हजार फौजेनिसी देऊरावर गोखले वगैरे आहेत. हे मागे हटले म्हणून ऐकिले. कालपासून त्याची लढाई चालली

आहे; परंतु सरकारी फौज हवालदील. चडाई त्यांचीच आहे. श्री यश देईल तो दिवस खरा. सेवेसी श्रुत व्हावे हे विज्ञापना. दिा लक्ष्मण नाा याचे लोक आा ८ पौ गावा(व)र वसुलास पो आहेत. असाम्या ४ मागून आा १ पो यो ५. विचूरकर याजकडे आसाम्या २ यो सात आम्हाजवळ आा १ यो आठ काल दोन आा २ याचे दिमतीत ठेविले. त्याजप्रौ गनपाबरोबर आा १ पो आहे व येथे नव्या पौ येक आहे हे विज्ञापना.

जोरखोर याचे पोते तेथे आले असेलच. इकडील गावाचे आज उद्या येऊन पोहचेल. कलावे हे विज्ञापना.

¶*The writer gives an account of the battle of Salpa and mentions that the forces of the Marathas have suffered a retreat.*

No. 156] [*December 1817*

श्री

शेवेसी नारो विष्णु आपटे कृतानेक साां नमस्कार विज्ञापना. इंग्रजाचे कूच होऊन नीरेवर येत होता. मार्गात गाठ घातली. पाच च्यार घोडी माणसे जाया जाहाली. त्याजकडील येक गोरा, पाच च्यार तुरूप पडले. तोफेपुढे खराबी फार होऊ लागली. यामुले सरकोन राहिलो. पूर्वेकडे विंचुरकर गोखले याजकडील जमयत आहे. पश्चमेकडे आम्ही आहो. जमयेत बरीच आहे. कत्वार+ फार आहे. निपाणीकर आले आसल्यास आपले त्याचे मिलोन, पाच हजार पायेदल पाच तोफा पाच हजार स्वार पुढे घाटानजीक आले असता सर्वत्र येकदील होऊन, येवढी जमयेत मारली म्हणजे सर्वत्रास चांगले. यात आलस जाहाल्यास परिणाम कठिण. तोफा येणेविसी अनमान होऊ नये. मिति भोमवार. शृत होय हे विज्ञापना.

¶*Naro Vishnu Apte describes an engagement with the English near the river Nira.*

No. 157] [*December 1817*

श्रीपुरंवणी[१] २

१ गोरे अटकेस आहेत त्या गोऱ्यास गारपीरवाल्यानी पत्र लिहून कोणा ग्रहस्थापासी दिल्हे आहे. त्याजपासी पत्र देऊन पत्राचे उतर आणावे.

+ कत्वार = बाजारबुणगे; The baggage and followers of an army. १ पत्र विठ्ठल विनायक याचें.

त्या पत्रात मजकूर की, तुम्ही स्वस्थ असावे. पाच महिनेपर्यंत आम्ही पंतप्रधान याजबराबर लढतो. नंतर तह करू. तुम्ही काही कालजी करू नये. तुमचा खाण्याचा वगैरे बंदोबस्त कसा आहे तो लिहून पाठवावा. याप्रमाणे पत्र येका वरखावर इंग्रजी अक्षराचे आहे. ते पत्र घेऊन तो ग्रहस्त कांगोरीखाली जाणार. त्या ग्रहस्ताने किल्यावरचे गोऱ्यास कागद पोहोचऊन उतर आणून द्यावे, याबा लाख रुपये द्यावयास केले आहेत. अनखी त्या ग्रहस्थास गोऱ्यानी सांगितले की, काढून आण्याचा प्रयत्न चालल्यास प्रयत्न करून काढून आणावे, म्हणजे कोट रुपये व पांच लक्षाची जाहागीर देऊ. याप्रमाणे करार करून त्या ग्रहस्तास रवाना केला आहे. तो ग्रहस्त स्वदेशाचाच आहे. त्यास काही आशा दाखऊन स्वारीत पाठवितो. सारांष त्या गोऱ्याचा बंदोबस्त नीट राखिला असता मोठा उपयोग आहे. त्या दोन्ही गोऱ्यांपासोन सगल्ये मसलतीचा खर्चवेच उगवेल व त्याणी मुलूख घेतला तोहि सुटेल. गोरे मोठे आहेत. बंदोबस्त मात्र नीट असला म्हणजे ठीक.

१ अलपिष्टणाचे नावाने झाडून गोरे येथील हाका मारितात की, मसलत बिघडून टाकलीन. चोहोकडे येकच दंगल माजून गेली. यामुले मोठे हवालदील आहेत. पैक्याचा आटोप आंतून ज्याचे ते आपआपलाले करावयास लागले. त्यासहि समजले की, ही मसलत अटपत नाहीं. असे समजून अधीरपणा न दाखविता आहेत.

१ गोऱ्याचा मतलब की तहाचे बोलण्याचा डौल घालून, कसेहि करून सरकारास हस्तगत करावे. नंतर सर्वत्राचा बंदोबस्त करावा. या मतलबात आहेत.

१ अंजणवेल गोवलकोट घेऊन हपसियास देणार. हपसियाचे लोक कुमकेस दोनशे आहेत. बाणकोटवाल्या व हपसी याची कुमक असे मिलून दोनी ठाणी घेणार.

¶*Vithal Vinayak mentions the attempts made by the English for the release of the two Englishmen Hunter and Morrison who were in confinement at Vasantgad promising high rewards and asks for special and strict measures to be taken regarding their custody. The writer also refers to the differences between Elphinstone and some other English gentlemen.*

7128

No. 158] [December 1817

श्री

विज्ञापना. फिरंगी याचे लस्करांत रोज गुाप्रो तयारी असून कवायत होत आहे. पहिले लस्कर आहे तेथेच आहे. नवे आलें तें त्याचे पूर्वेस नदी आली-कडे नदीचे काठापासून खंडोबाचे देवलापलीकडे गोळीचे मारणीवरून देवला-चेहि पुढें दोन गोळ्यांचे मारणीचे टप्यापावेतों उतरले आहेत. त्याचेहि पुढें पूर्वेस दोन चार गोळ्यांचे टप्यावर तीन राहुट्या देऊन, तेथें दोन तीन कंपिण्या व दोन तोफा आहेत. अजमास वाटतो. असी चौकी आहे. त्याचे उतरेस आणखी येक राहुटी दोन गोळीचे मारणीवर आहे. त्याचेहि उतरेस आणखी येक राहुटी आहे. खडकीचे पुलावरून येकाड दुकाड माणूस वाग आहे. थोड थोड धुकें आहे. अधीक उणे दिसत नाहीच; परंतु धुके निवारण जाले म्हणजे लिहीन. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This letter gives the exact position of the forces of the English probably at Kirkee.*

No. 159] [December 1817

श्रीपुरवणी[१] ३

१ स्वारींतील बातमी घटकेघटकेचीदेखील त्यांस कलत्ये असे बातमीदार स्वारीत आहेत. यादीत मार लिहिला आहे हा मार बाहेर फोडूं नये. वाचून पाहून बंदोबस्त राखणे तसा राखावा. बातमी फुटली असता जो बातम्या सांगतो त्याचा उमट तेव्हाच पडणार. बातमीदार यास दोन रुपयाची आशा दाखविली आहे. यामुले बातमी निवत्ये. आजपर्यंत बातमीसमधे पाचशे रुा लागले.

१ बारीक मोठी बातमी समजेल ती कोणत्ये ठिकाणीहून पाठवावी, याचे टिपण लिहून यावे, म्हणजे त्या टिपणास मार लिहून पाो. टिपण किल्याचे आश्रयाचे असावे. याचे कारण तर कोणाचा भरवसा येत नाही. भलत्याजवल कागद देता येत नाही. विश्वासाचे टिपण असेल ते लिहून पाठवावे. त्या टिपणास चिठी असावी म्हणजे तेथे चिठी दाख-ऊन मार लिहून देत जाऊ.

१ येथे शहरचे रखवालीस रामोसी होते. तेच रामोसी रखवालीस गोरे याणी ठेविले. त्याजवर कारकून रा वासुदेवपंत बर्वे आहेत. बर्वे

---

१. पत्र विठ्ठल विनायक यांचें.

याचेच मारफतीचे बेरड आहेत. बेरडाचे संधान यथास्थित आहे. शहरचा अंमल येका रात्रीत सुरू करावयास येईल. बर्वे यास दोन रुपयाची आशा दाखऊन आशेस गुंतून ठेविले आहेत. त्याचे स्वाधीन बेरडाचे संधान चांगले आहे. येका रात्रीस हजार पाचशे देखील येके ठिकाणी जमावे, असे संधान आहे. याप्रो मार आहे. बर्वे याचे हातचे पत्र पाहिजे असलीयास पाठऊन देतो.

¶Vithal Vinayak wonders how secret news is carried to the English and requests special measures be taken to check the evil.

No. 160] [*1817*

श्री

आखबारी पत्रांतील मजकूर सन समान आशर मयातैन तागायत

मुक्काम मल्हारराव होलकर.

१ श्रीपतपतराव मैराळ दिवाण याणी आपले हाताखालीं कारभारात घेतले होते ते कारभारांत नसावे म्हणोन विठोबा जोग याणी कोट्यानजीक छावणीतून पत्र पाठविले, त्याजवरून त्यास वस्त्रे देऊन लष्करांतून निघोन जाणेविसीं निरोप दिल्हा.

१ भिमाबाई होलकर याची कन्या पांच हजार फौजेनसी खर्गोण प्रांती जाऊन, कमावीसदार याजपासून सातहजार रुपये घेतले, म्हणोन त्याजकडे ताकीदपत्र लेहून रवाना केले.

१ बापूजी सिंदे निसबत दौलतराव सिंदे हे फौजसुद्धां जावऱ्या बडाखाघ्यापलीकडे आले.

१ गोरखे याचा मुलुक इंग्रजानीं काहीं घेतला, तो गोरखे याणी लढाई करून माघारा घेतला म्हणोन वदंता आहे.

१ दिल्लीहून पत्रे आली त्याचे जाब लेहून रवाना जाहाले.

५

मौजे मारडी कर्यात मलवडी येथील पाटील याचे पत्र अपाजीपंत सेवडे यास आले, त्यांत मजकूर कलमे

१ इंग्रजाकडील चटेकरी एक व जासूद एक गावगन्ना चिठ्ठ्या घेऊन फिरतात भेट वगैरे सिधे खर्च पांच साहा रुपयेपर्यंत दरगावीं घेऊन गांवकर यास पुसतात कीं गांवची लावणी व पडीक किती व गांवांत घरें किती व माणसे किती व गुरें व मेंढरे किती हे लेहून देणे म्हणोन उपद्रव आहे.

१ म्हसवडावर शंभर चटेकरी व गोरे आले आहेत. ते मलवडीस जाणार.
१ तोफखान्याचे बैल शेतात देखील सोडून चारितात.

३

मुक्काम पंढरपूर

१ जनरेल म्हणोन सरदार सर्व फौजेस हुकूम करणार तुंगभद्राचे आलीकडे आला. समागमे एक रजेमिट पांचशें लोकाचे बार खाशे व चार पलटणे व चार तुरुब याप्रमाणें आहेत.
१ गोपालपुरावरील पलटणे वगैरे आहेत. त्याणी रोख आपण अहा तिकडील धरावा असा निश्चय ठरला होता, परंतु तुंगभद्रेवरील जनरेल याचे पत्र आले जे, आम्ही येऊन पोहचे तोपर्यंत कूच होऊं नये.
१ एक गोरा व एक कुंपीण रवाना जाली. यास हुकूम आहे जे दरगांवास मुक्काम करून घरें व माणसे व गुरें व मेंढरे वगैरे याची दर्याफ्ती करावी म्हणोन.
१ पन्नास स्वार रसद आणावयास पाठविले. हली पांच कुंपणी व दोनसें स्वार रवाना केले, ते तुलजापुरास दाखल जाहाले.
१ जोगाईचे आंबे इकडे कांहीं पेढार आले म्हणोन वर्तमान आहे.
१ या मुक्कामाहून मंगलवेढेपावेतो दोऱ्या टाकून रस्त्याची मोजदाद करीत आहेत.
१ तुंगा उतरोन कांहीं खटले व बाहीर टोकरयानें उतरत होते ते गंगार्पण जाले म्हणोन वर्तमान.

७

¶*This is a summary of news-letters received from several quarters. They give an account of the activities of the English, the Gurkhas, the Pindaris and Holkar.*

No. 161] [*1817*

श्री

विज्ञापना विशेष. राजश्री आमृतराव बलाल यांजला बोलाऊन नेऊन आज्ञा जाहाली, त्याप्रमाणे मारनिलेनी इकडे सविस्तर मार लिहिला. ऐसियासी कैलासवासी श्रीमंत दादासाहेब यांची सेवा कैलासवासी थोरले मल्हारजीबाबा सुभेदार यानी ऐकनिष्टपणे करून, आज्ञेप्रमाणे वर्तणूक केली. उभयेपक्षीं शरिरें मात्र भिन्न होती, परंतु प्राण येक. आशातऱ्हेने सरकारकामाविसी जपत आले. तसें इकडूनहि स्वामीसी कायावाचामनेकरून आंतःकर्णपूर्वक ते शरीर व हे शरीर

बाहीर = Camp-followers.

मात्र भिन्न. वरकड आवघे येक आहे. यांत प्रतर्णा आसे तर श्रीमार्तंडजीची शफत आसे. ज्यात सरकार कामाचा उपयोग मर्जीचा संतोष तेच निदर्शनास लौकर येईल, ही खात्री पकेपणे आसावी. वरकड विनंती मारनिले करतील, त्याजवरून ध्यानास येईल. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This is an undertaking of full loyalty and devotion to the cause of the Peshwa by the Holkar.*

No. 162] [*1817 ?*

नकल

श्री

गुरुवारी तिफनांवर+ डाकतर जाफरीस[1] यांनी मार कारभारी याचे बोलण्याचा काढला होता. त्यांत आलफईस्टीन व ब्रीके[2] हे उभयताचे चित पुरऊन ऐकत होते. दुसरे (पाटंज[3])र वगैरे इसमे साहा पलटणचे पाहुण्यासुधां आले होते. ते निराळे जेवणाचे खुसीत होते. हे त्रिवर्ग सदरी लिा त्याणी जेवण खोळंबून हाच मार केला. त्यांत डाकतर यांचे बोलण्यात भाव असा पडला कीं पेशजी-पासून या दौलतीत मुसदी वागणार, मोगलाईकडील व श्रीमंताकडील बांहो[४] मोगलाची दौलत या सरकारचे कह्यांत आली असतां नवाब यांची मर्यादाच केली, व संतोषाने उभयपक्षी दौलतीचा सिलसिला चालविला. बदनाम जाले नाहीं. तुम्ही कंपिणीची दौलत खुषकी व तरी मिळोन, मोगल व श्रीमंताचे बेदौलतीपेक्षां मुलकाने कायम असोन, ज्या दौलतीचे दोस्तीमुळें दरोबस्त हिंदुस्थानचे पातशहा-तीस कंपिनीचा नकशा जाला, त्यासीच वाकडा डाग दाखऊन, दौलत खराब करावी असी पावले दाखविता, हे तुमचे कामगारीचे लौकिकास * * * समधे वसली[5] येथून गेले, त्या काळीं सिंदे भोसले यांस जेर केले असतां श्रीमंतास थकऊन कंपणीचे मतलबाचा दस्ताऐवज घेतला नाहीं तो आज तुम्ही करून घ्यावा. असा इरादा करितां या जलदीची चाल बदनामीस कारण दिसते. श्रीमंताचे सरकारची दौलत यांस हिसेदार फार. बखेडा वाढविल्यानें तुम्हास मेहनत व कंपणीचे सरकारास नुकसान याचा विचारच करावा हे लाजम असे. ऐसे ऐकून घेऊन बसले. उतर केले कीं तुम्हास या खोटे बाजाराची माहीत नाहीं, पुढें होईल. येणेप्रमाणे कलम.

¶*Confidential report made to Bajirao II of a conversation which Dr. Jeffreys had at dinner with Elphinstone, Briggs, Pottinger and six others who had been invited for the dinner. The point was the protest communicated by Bajirao through his agent to Elphinstone.*

+ Tiffin. 1 Jeffreys. 2 Briggs. 3 Pottinger. ४ वारंवार. 5 Wellesley.

7132

No. 163] [1817 ?

श्री

सेवेसी विनंती बाबूखान व सेख अबदूलवाहाब वसईकर व मंगळखान साष्टी-कर हे तिघे गोलंदाज तुम्हाकडे पाठविले आहेत; तर बुरजावरील तोफ उतरून याजकडून निशाण मारऊन तपसीलवार लेहून पाठवणे म्हणून पत्री आज्ञा केली. आज्ञेप्रमाणे बुरजावरून तोफ उतरून नदीपलीकडे नेऊन भांबवड्याच्या डोंगरास निशाण लाऊन गोलंदाजाकडून दोन दोन गोळे मारविले. त्यास येणेप्रमाणे गोळे लागले.

बाबूखान वसईकर

१ पहिला गोळा निशाण्याच्या उजवे बाजूस हातावर लागला.

१ दुसरा गोळा निशाणाच्या डोईवरून पलीकडे गेला.

२

अबदुलवाहाब वसईकर

१ पहिला गोळा निशाणापासून हातावर खालता लागला.

१ दुसरा गोळा वितीच्या अंतरे लागला.

२

मंगळखान साष्टीकर

१ पहिला गोळा निशाणाच्या उरावर लागला.

१ दुसरा गोळा निशाणाच्या माथा लागला.

२

येणे प्रामाणे तिघा जणांनी सा बार तोफांचे केले, ते आम्ही पाहिले. सेवेसी विदित व्हावें याकरितां तपसिलें लिहिले आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Three Arab Gunners are tested in their skill of firing guns from the Bhamburda Hill at Poona and their comparative merits are reported in this paper.*

No. 164] [1817 ?

श्री

विज्ञापना. आताच बातमी आली की, मौजे पणदरी इंग्रजाचा गाव किलापासोन दोन कोसावर आहे. तेथे त्याजकडील लोक दोनसे, व तोफा तीन आसे आले

आहे म्हणौन आली. त्याजवरून आताच बातमीस आणखी पाठविला आहे. पकी बातमी आलियावर आपल्याकडे लिहोन पाठवितो. बहुत काय . लिा लोभ करावा हे विज्ञापना.

¶*The writer communicates that the English army with three cannons had arrived at Panadari.*

No. 165] [*1817?*

श्री

पुा राजश्री बालाजीपंत दादा

२

[पहिला बंद गहाळ.]

—नगडपर्यंत दाब बसला. पो नगर हवेली येथील नाईक पाटील काही दाब काही समाधान अशा रीतीने हस्तगत होत आहेत. पांच सातसे कोलवण तयार करून, बराबर च्यारसे माणूस सिबंदीचे देऊन नगर हवेलीचे ठाणे दादरे डोंगरे-नजीक अर्जुनगड कोस ४ येथे बसवावे. तेथून खलवडपवाडी इंग्रजाकडील मारून धूम करावी, हा विचार योजनेत आणिला, आणि करूनच दाखवीन. परंतु सरकारची कृपापत्रें व सरंजामे बेगमी हा अर्थ काहीच दिसत नाही. तेव्हा काय करावे? कठिण रान, इंग्रजाची ठाणी सनिध. मी गरीब बेसरंजाम असे असोन सरकार कामास जिवात्यय+ कर्म करावयासी सादर जालो असतां, दारू गोली देखील मजला न पोहचावी? कांहीं साहित्य उपराला कोण्हीच न करावा? तेव्हा शर्त जाली. दादा, काय लेहू, आसो. श्रीमंताची चाकरी येकनिष्ट करावी हा माझा निश्चय. सर्वेश्वर साक्ष आहे. तरी श्रीमंताचेच पाय मजला तारक होतील. आपण मात्र घडी घडी कृपापत्री सांभालीत असावे. होईल तेथवर साहित्य करावे. नगरकर अथवा दुसरे कोणी दोनसे माणूस व दोनसे रुपयाची दारूगोली हर कोठून खरिदी करून आणवावी. तीन उपोशणे करीन; परंतु दारूगोली वेगल निःकारण मरण प्राप्त होईल. वरकड श्रीमंतास आपण लिहिलेच असेल. आणि फिरोन ल्याहावे. जिकडून साहित्य यैवज देवितील तेथे सनद व हुजरे जातील, तरच कांहीं होईल. येरवी होणार नाही. जोवर माझ्याने होईल तेथवर करीतच आहे. श्रीमंताचे पुण्य समर्थ आहे. तरी अर्जुनगड तालुका उधलोन देतो. मग जे होता होईल ते पाहातच आहे. बहुत काय लिहिणे; लोभ करावा हे विनंती. दारू गोली व लोक आपण कृपा करून काही

+ जिवास अपायकारक.

तरी पाठवावे हे विनंती. इंग्रजाकडील आधिकोतर आढलेल ते ल्याहावे. दोहो चोहो रोजी लोक व कोली खलाडे पवाडीवर रवाना करितो. लस्करची व इंग्रजाकडील बातमी लिहिली पाहिजे हे विनती.

¶*This is a mutilated letter in which the writer requests Balajipant to send ammunition and men to enable him to force the English to withdraw from Arjungad taluka.*

No. 166] *[1817*

श्री

अर्जी संतू टेमगिरे बिन लक्षमण टेमगिरे उमर ४० वा थोरदले पो जुनर ऐसिजे. मी प्रथम कंपनी सरकारची चाकरी शके १७२८ चे साली सन १८०६ पुण्यात संगमावर जासूद डाकेचे होते त्यात नाईक नेमाजी खिलारी होता त्याणे वैरागच्या टप्यावर चाकरीस लाविले.

[येथून पुढें ६ ओळी गाळल्या आहेत.]

१ येक वर्ष हरकारेयात फोड साहेबाचे हुजूर.

१ पुढे मोर दीक्षित वकिली करीत होते, त्यासमई त्याजकडे निरोप अलफष्टेन सोचे तर्फेचा व फोड सो सांगून पाठवीत तो निरोप मी व विठू पाटोला याप्रो दोघे च्यार वर्षे नेत आणीत होतो.

१ पुढे बाजीराव याचा बिघाड व्हावयाचे अगोधर मलकमसाहेब बहादुर हैदराबादेहून पुण्यास आले. त्या समई बाजीराव माहुलीस आले. त्याचे भेटीस मलकं साहेब पुण्याहून म्याणास कात्रजेस घाटाखाली सोडून नंतर वळूपासून घोड्यावर डाकेत आले; ते घोड्याचे डाकेवरून मलकं सो व फोड सो व मोर दीक्षित याप्रो माहुलीस आले. त्याचे पहिले रोजी आम्हा उभयतास माहुलीस फोड सोनी रवाना केले. पुढे माघारे जावे, ते समई मी मलकं सोचे कपडे करावयाचे कामास मला ठेविले.

फोड सोनी आपल्या जवल दिले. द्वादसीचे दिवसी मी कपडे मलकं सोस केले. लागलेच माघारे जावे आसे होते; परंतु ते दिवसी येकादसीमुळे बाजीराव याचे बोलणे जाले नाही. सा ते दिवसी बापू गोखले मलकं सोकडे आले. त्यांची भेटी जाली. नंतर द्वादसीस बाजीराव याची भेट होऊन मेजवानीस खाण्यासच बाजीराव यांचे येथे राहिले. खाण्याचे वेलेस समाधानीचे बोलणे मलकं सो व बाजीराव यांचें जाले. त्या वेलेस कारभारी जवल होते. मोर दीक्षित, चिमणाजी नारायण, रामचंद्रपंत करंदीकर व बाळोबा बाबा हे वगैरे आणखी होते. त्या वेलेस मी व विठू

साहेबाजवळ खाण्याचे समई हजर होतो. मलकं सो हे बाजीराव याची समजूत करीत होते. पुढे श्रावणमासची दक्षणा पुढे आली, त्याकरितां पुण्यासच जावे आगर चिमाजी आपास पाठवावे आसे बोलत होते. बाजीराव यांचे चितास आल्यासारखे जाले नाही; तेव्हा जाबसालात मलकं सोनी बाजीराव यांस जबाब केला कीं माहाराजानी फार दूरवर पाहून कंपनी सरकारसी दोस्ती ठेवावी. आणखी उतर केले की ज्याचे हाती काठी, त्याची म्हैस आसे उतर केले. भोजनोतर जेवण करून डेऱ्यास मलकं सो आले. तेथून बापू गोखले यांचे येथे मेजवानीस गेले. तेथून विंचूरकराचे येथें मेजवानीस गेले.

(यापुढील मजकूर इतिहासोपयोगी नाहीं सबब गाळला.)

¶*Santu Temagire a servant in the Company's Government states that he was present when Malcolm interviewed Bajirao at Mahuli, in order to adjust the latter's differences with the English.*

No. 167] *[1818?*

श्री

अर्जी बापूजी भिकाजी भाव्ये. बाजीराव साहेब सातान्यास गुदस्ता होते, त्या समई भाद्रपद मासी बेटाचे बंगलियात श्रीनिवासराव दिमत गोपालराव रास्ते याचे विद्यमाने अर्ज केला. तेव्हा साहेबानी आम्हास अभय दिल्हे की तुमचे पोटात काय मार बोलावयाचा आला आहे तो बोलावा. त्यावरून आम्ही बोलिलो की पेशजी गंगाधरशास्त्री बावा यास बुरा वखत आला आहे, सावध राहावे; तेव्हा त्याणी सांगितले की ही गोष्ट व्हावेयाची नाहीं. जाहाली असता दोन लक्ष रुपये बक्षीस देऊ. त्याची खातरी बापू मैराल याची दिल्ही असता, शास्त्री बेफाम राहून मयत जाहाला. बापू मैराल ऐवज बाक्षिसीचा न देता, साहेबाजवळ खराब होऊन मेला. पुढे साहेब लोकावर बुरा बखत आला आहे, त्याजवरून साहेबानी श्रीनिवासराव यास हुकूम केला कीं याची खातरी दोन लक्ष रुपयाची करावी, व याची कामेकाजे उलगडून देणेविसी करावी, याप्रमाणे त्या वेलेस केली. नंतर प्रहरभर अवघा मजकूर जाहीर केला; त्याचा आलाहिदा परवाना बारा बंद लिहून ठेविला आहे. इनसाफचे रुईने साहबानी हुकुम केला की बाजीराव साहेब याची व कंपीण बहादुर याची बडी दोस्त बहुत दिवस आहे. त्यांजकडून व्हावयाचे नाही. आमचे दृष्टीस पडत नाही. परंतु तुमचे बोलणे खातरजमेचे आमचे नजरेस कधी पडावे? त्यावरून आम्ही सांगितले की आश्विन कार्तिक मासी नजरेस

पडेल. तेव्हा साहेबानी बुकावर आमचे नाव ठिकाण मुदत लिहून ठेविला. दररोज श्रीनिवासराव दोन वेळा खबर घेऊन जाता, आश्विन वाा ११ साईंकाली फौजेचा घेरा पडला, त्या वेळेस श्रीनिवासराव येऊन बोलिले की कैसे करून बडे साहेब वाचून शतृ पराभव व्हावा; तेव्हा आम्ही श्रीगणपतीस व श्री माहलक्षुमीस नवस केला की बडेसाहेब यास येश येऊन राज्याचे कामकाज व्हावे. साहेब लोक जिवानिसी खुशाल राहावे. ब्राह्मण तपश्वी जागोजागा अनुष्टानास बसले आहेत. ब्राह्मण भोज्यन पाच लक्ष व्हावयाचे आहे. येणेप्रमाणे बहुत प्रयत्न केला आहे. साहेब कृपावंत होऊन आज्ञा व्हावी व बाक्षिसाबदल दरम्यान श्रीनिवासराव यांची हमी आम्हाकडे साहेबानी दिल्ही आहे, त्याप्रमाणे आमची कामेकाजे उलगडून द्यावी व दोन लक्ष रुपये कराराप्रमाणे द्यावे.

¶*Bapuji Bhikaji Bhatye claims from the English a sum of Rs. two lakhs as a reward for the religious invocations which he performed in order that the English might win the war against the Peshwa.*

No. 168] [*December 1817*

श्री

२

राजश्री आबा स्वामीचे शेवेसी

तुमचे कडील डाकेवर पत्र आद्याप आले नाही. राजश्री नारोपंत नाना आपटे येथे परवाचे रोजी रविवारी अस्तमानी दोन हजार फौजेनिसी आले. त्याचा मुाच आहे. श्रीमंत माहाराज छत्रपतिस्वामीस वासोट्याहून येथे घेऊन येऊन पंढरीपूरचे रोके स्वारीत घेऊन जाणार असी बोलतात. काल दोन च्यारसे स्वार वासोट्यास राजश्रीस आणावयास गेले. दारूचा मजकूर आलाहिदा लिहिला आहे त्याजवरून समजेल (नंतर १७ ओळी सुमारे मजकूर दारू संबंधीचा तो गाळला.) हे विनंति.

¶*Aba is informed of the arrival of Naropant Apte at Satara proceeding to Wasota for securing the Raja's person.*

No. 169] [*1817 or 1818 ?*

बंदगी आ की. बडेसाहेब पुणे आपनासी येकलेच भेटनार होते व आताहि येकलेच भेटनार आहेत. माहाराजानी बोलवावे. राजेखानाबरोबर आपन निरोप पाठविला त्याजवरून हा रुका खिजमतीस लिाा आहे हे बंदगी जान जफरीस.

(Signed) J. Jeffreys.

¶*This is a communication from J. Jeffreys referring to an interview with Elphinstone.*

7137

No. 170] [December 1817

श्रीरामलिंग प्रा

राजश्री गणपतरावजी स्वामीस

विनंती ऐसीजे. येथून सिपाई कोरेगावाकडील समाचारास पो. होता तो कुमठ्यास जाऊन आज आला. त्याची व कोणाची गाठ पडली नाही. जलचर देवरावर आला तेव्हाच तुमची बायकामुले निघोन गेली म्हणोन कुमठेकर याणी सांगितले. कोरेगावात घरे जाळली म्हणोन बातमी आली. त्याचा शोध आणिवला. आपला वाडा कायम आहे. बरग्याचा वाडा मात्र जाळला असे गड्याने सांगितले. सत्यमिथ्या ईश्वर जाणे. राजश्री भाऊची काळजी बहुत लागली आहे. कुटुंब घेऊन कोठे गेले कळत नाही. वरचीवर गडी पाठवीत आहे. आपण काळजी करू नये. रा॥ केशवरात्र येथे आहेत. येथेहि आज उद्या जलचर येणार आहेत. येथे सर्व हवालदील आम्ही कोठे जात नाही. कळावे श्री काय करील ते खरे. शुा॥ ७ प्रहररात्र आवसी हे विज्ञापना.

¶*A news-writer reports to Ganapatrao that the English are encamped at Deur and are contemplating an attack on Koregaon where some houses have been burnt by the enemy.*

No. 171] [1-1-1818

श्रीरामलिंग

सेवेसी आंताजी जिवाजी कृतानेक सा॥ नमस्कार विनंती विज्ञापना ता॥ छ २३ सफरपावेतो यथास्थित असे विशेष. केडमखोर येथे सिपाई वसुलास पो॥ होता. त्यास दे(श)पांडे याणी सिपाई यास सांगितले की, तुम्ही तूर्त तगादा केल्यास ऐवज मिळत नाही. आठ च्यार रोज राहा, नंतर सोय होईल; नाही तरी सोय होत नाही. याजवर तू निकड केलीस तरी आम्ही ऐवज देत नाही. आणि किल्यास लेहून मनाईहि आणीत नाही. आठ रोजात सिकस्त करून ऐवज देऊं, याप्रो॥ त्याचे म्हणे पडले. ते सिपाई सांगत आला. त्यास काय ती आज्ञा तेथून होईल तसे करिता येईल. गावकरी यास बेमुलाना तगादा केला तरी खटला सांगतात. युक्तीने घेतला अस्ता देत आहेत. यास जसे नेट असेल तसा वसूल येईल. इकडील वर्तमान तरी पुण्यास गंगाधर शास्त्री याचे चिरंजीवा-कडील फौज दोन तीन हजार आली; व मोगलाईतील दाहा हजार असपास अणिली आहे. तीहि पुण्यास येणार असे वर्तमान आहे. दोन्ही फौजा तामृमुख

7138

याणीच आणविल्या आहेत. नागपूरची तामृमुख याणी पुण्याचीच व्यवस्था केली होती; परंतु त्याणी पुन्हा ठाणे घातले. येक दोन पलटणे कापून काढिली, असे वर्तमान आहे. आपले तेथील वर्तमानहि आल्प लेहून येत असावे. सेवेसी श्रुत होयें हे विज्ञापना.

¶*Antaji Jiwaji writes that the English have brought an army of about thirteen thousand men to Poona.*

No. 172] [*1-1-1818*

श्रीराम

राजश्री गणपतराव स्वामीचे शेवेसी

विनंती विशेष. तुम्ही लस्करची पत्रे कुलमी कोरगावकर याजबरोबर पाा ती पावली. लिाा मजकूर समजला. गोखले याचे चिरंजीव पडले. बायकोने सहगमन केले. इंग्रज याणे कूच करून नगराकडून गंगातिरास जात आहे. गोखले व विंचूरकर व पुरंधरे रास्ते हे वाफगावी होते. तेहि इंग्रज यांचे पाठीमागे नगराकडे गेले. स्वारी नाशकास गेली. ब्राह्मणवाड्याचे घाटचे मुााची पत्रे आली म्हणोन ढमढेरे व पेंडसे व माणकेश्वर वगैरे मंडलीस जाऊन सांगावे. तुम्ही चौकीपाहरा वगैरे बंदोबस्त सांगून आल्याप्राा रात्रंदिवस राखून इकडे मजकूर ल्याहावा. आलस तीलभर न करून, वामन व नारोबास सांगून, हुशारी चांगली ठेवावी. गाफीलपणा असो नये. राा मिाा वाा ९ गुरुवार दीड प्रहर दिवस प्रात:काल हे विनती.

सुभानजी नाईक याचे पनास लोक, व खेरीज मुरारराव व दाहा आा वाईपो किल्यावर जावयाचे ते येकूण हजरी घेऊन, बदोबस्त गस्तीच्या करीत जाव्या. हे विनंती.

¶*This depatch states that the son of Bapu Gokhale died in a battle and his wife committed "Sati". The English, continues the writer, marched towards Nagar.*

No. 173] [*1-1-1818*

श्री

छ २३ माहे सफर सन समान अशर मयातेन मिति मार्गशीर्ष वद्य ९ शके १७३९ ते दिवसी इंग्रजी सरकार यांचे फौजे पैकी मेजर ष्टांटनसाहेब यांचे फौजेपैकी सिपाई आसामी सुाार ६०० घोडनदीहून पुण्यास येता मार्गी भीमातीरी कोरेगाव येथे बाजीराव साहेब यांचे दरोबस्त लश्कर त्याजवर चालून आलें. तेव्हा सारा दिवस लढाई होऊन शेवटी सायंकाली तेवढे लश्करास गावातून बाहेर काढून देऊन शिकस्त केले; म्हाणौन या फतेचे स्मरण राहावयाकरिता, व त्या लढाईत इंग्रजी सरकारचे सिपाई पडले त्यांचा पराक्रम व मर्दुमी पृथ्वीवर महशूर

होण्याकरितां, सरकारातून मौजेमजकुरी ज्ययस्तंभ उंभा करून त्याजवर इंग्रज लोकांची नावें इंग्रजी लिपीत व हिंदू मुसलमान यांची नांवें इंदवी लिपीत याप्रो खोदविली असेत

५ निा तोफखाना.

१ जमाल तांडेल दुईम.
२ गोविंदू लसकर.
३ शेख अमद लसकर.
४ रामस्वामी लसकर.
५ दिसान लसकर.

४९ इलाखा मुंबई सिपाई याचे रजमंट पहिले पलटण दुसरें त्यापैकीं.

१ बापू शिंदा जमादार.
२ गणोजी गोरे जमादार.
३ कनीशिंग हवालदार.
४ ईटमेतर बालमेटर नाईक.
५ सोननाक कमळनाक नाईक.
६ रामनाक येशनाक नाईक.
७ प्रसादसिंग सिपाई.
८ लक्ष्मण बंदोसा शिपाई.
९ बाबू सावंत शिपाई.
१० गोंदनाक मोठेनाक सिपाई.
११ रामनाक येसनाक सिपाई.
१२ लक्ष्मण कुकडा सिपाई.
१३ भागनाक हरनाक सिपाई.
१४ राघोजी मोद्रे सिपाई.
१५ भागोजी वयार सिपाई.
१६ अंबनाक काननाक सिपाई.
१७ खंडोजी सिपाई.
१८ गोपालजी कोंडे सिपाई.
१९ गणनाक बाळनाक सिपाई.
२० भगवानजी इटेकर सिपाई.
२१ सिदू बकसशिंग सिपाई.
२२ सजणाजी पवार सिपाई.

२३ चांगोजी जाधव सिपाई.
२४ बाळनाक धोंडनाक सिपाई.
२५ रूपनाक लखनाक सिपाई.
२६ राणोजी जाधव सिपाई.
२७ बापनाक रामनाक सिपाई.
२८ बालोजी शिग्वान सिपाई.
२९ वीटनाक धाननाक सिपाई.
३० राजनाक गणनाक सिपाई.
३१ अबदुल करसान सिपाई.
३२ सदीशिंग सिपाई.
३३ बापनाक हबनाक सिपाई.
३४ अर्जुनजी चव्हाण सिपाई.
३५ रेनाक जाननाक सिपाई.
३६ सजनाक येसनाक सिपाई.
३७ गणनाक धरमनाक सिपाई.
३८ कोठेखान सिपाई.
३९ देवनाक अंनाक सिपाई.
४० गोपालनाक बाळनाक सिपाई.
४१ हणमंत मातंरसिंग सिपाई.
४२ हरनाक हीरनाक सिपाई.
४३ मनसाराम सिपाई.
४४ अनोजी धारशे शिपाई.
४५ जेठनाक दौनाक सिपाई.
४६ इभ्रम इरेकर सिपाई.
४७ निधानसिंग सिपाई.
४८ गणनाक लखनाक सिपाई.
४९ सुतरसिंग शिपाई.

४९

५४

¶*This is a list of names of persons who suffered death in the battle of Koregaon and whose names were inscribed on the triumphal column raised there in memory of their heroic deaths. The list gives an idea of the composition of caste in British regiments. Most of the soldiers appear to be Mahars by caste.*

No. 174] [1-1-1818

श्री

१ स्वारी श्रीमंत माहाराजाची राजेवाडी जेजुरी नजीक आहे तेथे आली. चाकणचे ठाणे राजश्री त्र्यंबकजी डेंगले याणी घातले. साम्रमुख याजकडील आत लोक होते ते कापून काढिले. स्वारी ब्राम्हणवाड्याचे घाटातून निघोन फुलगाव आपटीचा मुा आहे. नंतर गुरुवारी कूच होऊन फुलगाव पुढे तीन कोश कोरेगाव आहे तेथे फौजा गेल्या, तों तेथे इंग्रजाकडील दीड पलटण व तोफा आल्या. नंतर त्याणी तोफ डागली, तेव्हा सरकार फौजेने चालून घेतले ते गावात सिरले. फौजाहि बेलासिक गावात सिरून दीड पलटण व तीनसे तुरुप स्वार कापून काढिले. त्यात जो खासा होता त्याचे डोसके मारिले. आसे वर्तमान राजश्री तात्या मजमदार याचा गडी आला आहे. कलावे. कलम १

¶*This paper describes the action of Koregaon, in which Bajirao's forces cut down three hundred troops belonging to the British. Trimbakji Dengle is reported to have captured Chakan.*

No. 175] [4-1-1818

श्रीभवानी प्रा

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

आबा स्वामीचे शेवेसी

पो बहिरो नारायेण सां ना विा विा. होलकर याजकडील फौज नसिराबाजेवर दाहा हजार आली आहे. सिंदे याजकडील पेंढारहि येऊन पोचले. नगराचे सुमारे सरदार मागे पुढे होते. याची लढाई होऊन इंग्रजाची पलटणे दोन कापून काढली. याजकडीलहि नाश जाहला. इंग्रज नगरच्या किल्यात सिरला. हेहि नजीक उतरले आहेत. सरकारची स्वारी ब्राम्हणवाडियाच्या घाटापलीकडे गेली होती ती घाटावर आलीकडे आली. त्रिंबकजी डेंगळे दाहा हजार फौजेनिसी व काही पेंढार असे चाकणचे किल्याचे ठाणे बसऊन फुलगावावर आले. नारो विष्णु आपटे पांच हजार फौजेनिसी जेजोरीवर आले. याप्रो डेलाच्या (?) कडियातील वर्तमान ऐकिले ते लिा आसे. दोन च्यार रोजात पुणे दरोब(स्त) पळून जात आहे. निघोन जाण्याविसी सरकारची ताकीद जाली आहे. पुण्यातील इंग्रज रास्ते याचे वाडियानजिक उतरला आहे. येकी जागा तोफा सुधा जमून आहे असे बोलतात. काल लाखोटा पा तो पावला असेल. उतर सत्वर पा. येथून पाचसाहा लाखोटे पा ते पावले किंवा नाहीत व आपलेहि पाचसाहा रोजात पत्र आले नाही, त्यास बोरगावास जाण्याचा मार ल्याहावा. रा मागसीर्ष वा १२ दोन प्रहर लोभ करावा हे विनंति.

सेवेसी सदासिव गोविंद कृा सा ना विज्ञापना. बातमीचा मार रा आबानी चर लिा प्रो रा विनाइकपंत आणानी सांगितला. श्रीमंताची खासा स्वारी घाटावर वोतूरचे मुाचे पत्र आले. फिरंगियाची लढाई जाहाली, दोन पलटणे कापून काढली. होलकर याची फौज नसिराबाजेवर आली आसे वर्तमान मी वाड्यात गेलो तेव्हा आणानी सांगितले. रा नारो विष्णु जेजुरीवर आले. आताच वर्तमान यैकिले की श्रीमंताची स्वारी पुलावर आली. दोन जासूद आले त्याणी सांगितले. हेहि वर्तमान खचित समजले ते मागाहून लिा. सेवेसी पाा श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Bahiro Narayan reports to Aba the movements of Bajirao and of Trimbakji Dengle.*

No. 176] [*4-1-1818*

श्रीरामलिंगप्रा

सेवेसी अंताजी जिवाजी सां नमस्कार विज्ञापना. ताा छ २६ सफर रोज रविवारपावेतो मुा वाई येथे यथास्थित असे विशेष. आपण दशमीचे पत्र पाा ते अताच पावले. इकडील मार बिताा

१ स्वारी श्रीमंत माहाराजाची राजेवाडी जेजुरीनजीक आहे तेथे आली. चाकणचे ठाणे राजश्री त्र्यंबकजी डेगले याणी घातले. ताम्रमुख याजकडील आत लोक होते ते कापून काढिले. स्वारी ब्राम्हणवाड्याचे घाटातून निघोन फुलगाव आपटीचा मुा आहे. नतर गुरुवारी कूच होऊन फुलगावापुढे तीन कोश कोरेगाव आहे तेथे फौजा गेल्या, तो तेथे इंग्रजाकडील दीड पलटण व तोफा आल्या. नंतर त्याणी तोफ डागली. तेव्हां सरकारफौजेनी चालून घेतले. ते गावात सिरले. फौजाहि बेलासीक गावात सिरून दीड पलटण व तीनशे तुरूप स्वार कापून काढिले. त्यात जो खासा होता त्याचे डोसके मारिले. ऐसे वर्तमान राजश्री तात्या मजमदार याचा गडी अला आहे. सेवेसी कलावे.

१ राजश्री माहादाजीपंत भाऊ याणी रुा दिल्हे तेथे माहाल पाो रुो त्यास द्यावे म्हणोन आज्ञा. त्यास आपले उतर येविसीचे आले नाही. भटजी याणी चिठी माघारी घेऊन गेले. भटजी सोयकर नव्हते. रागीट. त्याजपुढे उपाय नाही. चिठी घेऊन गेले. कलम १

१ वसुलाविसीचा मजकूर लिहिला त्यास जोर खोरयात सिपाई गेले आहेत. लोडम (?) खोरे येथेहि गेले आहेत. युक्तीनेच येईल तो वसूल घेतो. अद्यापि वसूल आला नाही. कलम १

१ दहीगावकर येथे आले आहेत. त्याणी पावणे दोनशे रुो आणिले आहेत. त्याचे म्हणणे पडले ते कालचे पत्री लिा आहे. त्यास तगादा आहेच. आपलेकडे गावकरी पाठऊन देतो. कलावे कलम १

१ सोलसीकर याणी पहिला सिपाई घटाई करून माघारी पो (अपूर्ण).

¶*Antaji Jiwaji reports the hotly contested battle of Koregaon, and adds that the revenue is being collected.*

No. 177] *[4-1-1818*

श्रीरामलिंग प्रा

सेवेसी अंताजी जिवाजी सां नमस्कार विज्ञापना. ता छ २६ सफर रोज सोमवारपावेतो उतम आसे विशेष. इकडील मजकूर बिता

१ सरकारचा मुा मौजे वाल्हे येथे. परवाचे दिवसी येक कोरेगावावर लढाई जाली. त्याचा मजकूर कालचे पत्री लिहिलाच आहे. स्वारीचा मुा सालप्याचा घाट उतर आलीकडेस येणार आसे वर्तमान खास आहे. ब्राह्मणवाड्याच्या घाटापासून माघारी स्वारी येण्यास कारण तिकडून च्यार पलटणे आली. त्याची बातमी पकी आली. नंतर कूच होऊन फुलगावच्या मुकामास स्वारी आली. तो पुण्याहून दीड पलटण जात होते. त्याची याची गाठ कोरेगावचे व फुलगावचे मधी पडली. नंतर त्याणी कोरेगावचा आश्रा केला, आणि तोफ डागली. नंतर गोखले, रास्ते वगैरे पायउतारा होऊन पारपत्य केले. त्याजपौ येक तोफ व दोनशे लोक कोरेगावचे वाड्यात सिरले ते मात्र राहिले. येक तोफ व येक पलटण कापून काढिले. कलम

१ स्वारी फुलगावचे मुा आली, आणि पटवर्धन, विंचूरकर व पुरंधरे, नारो विष्णु आसे पुण्यास रा केले. इकडील लढाई गोखले, निपाणी(कर), रास्ते याणी दिल्ही. हे वर्तमान वास्तवीस पत्रच आले. कलम

१ पुण्यास ठाणे घातले म्हणोन बाजारी वर्तमान आले आहे. इंग्रज रास्त्याच्या वाड्यांत आहेत. आज पके वर्तमान येईल ते लिा पाठवितो. कलम १

१ मौजे दहीगाव येथील गावकरी येथे आले होते त्याणी तूर्त रुा ७५ दिल्हे आणि बाकीची तोड करावयास सक्रांत करून येतो म्हणौन गावास गेले. त्याचे गावाकडे बहुत दंगा लस्करचा जाला म्हणून गेले. सोलसीकर याणीहि अमावास्या करून येतो म्हणौन अ्रज पत्री लिा आहे. त्याचे तेथे सिपाई बसविले आहेत. कलावे. तळयेकर याणी मात्र रोखा टाकिला, आणि स्वारीमुळे गावहि जरार केला आहे. कलम

४

येणे चार कलमे लिा आहे. मनन व्हावे हे विज्ञापना.

¶*Antaji Jiwaji in his despatch gives an account of the flight of Bajirao and the battle of Koregaon fought between the English and the Peshwa.*

No. 178] [*5-1-1818*

श्रीभवानप्रा

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

आबा स्वामीचे शेवेसी

पो बहिरो नारायेण पिंगले सां ना विा येथील कुशल ता मार्गसीर्षि वा १३ दोन प्रहर पो येथास्थित असे विशेष. रात्रीं स्वारीचा मुा देउरावर आला होता. आताच पाडलीपर्यंत बीन आली. तेथे मुा होईल अगर माहुलीस लस्कर तेथे राहून सडे येतील असे दिसते. पुलावर इंग्रजाची पलटणे तीन आली. त्याचे पुढे गोखले याकडील रामचंद्र व्यंकटेस आहेत. माघे विंचूरकर जेजोरीचे मुा काल होते. याजप्रो खास वर्तमान आहे. लढाई होऊन येक पलटण सिकस्त जाहाले असे वर्तमान खचित बोलतात. नंतर स्वारी इकडे आली. रा केशवराव आणा वाघ अताच स्वारीत गेले. उदईक रा बाबाकडे भेटीस जातो. रा आन्याबा तेथे आले असल्यास वर्तमान कळवावे. कलावे बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति.

¶*Bahiro Narayan Pingle writes to Aba Purandare communicating Bajirao's movements after the battle of Koregaon.*

No. 179] [*6-1-1818*

श्रीरामलिंगप्रो

सेवेसी अंताजी जिवाजी कृतानेक सा ना विा ता वा ३० मंगलवारपावेतो मुा वाई येथे यथास्थित असे विशेष. इकडील मजकूर तरी स्वारी श्रीमंताची

वा। १४ चतुर्दसीस माहुवलीस आली. बरोबर दाहाहजार फौज आहे. बाकीच्या फौजा जेजुरीवर आहेत. राजश्री त्रिंबकजी तात्या डेंगळे त्रिपुटीवर आहेत या प्रो खास मार वर्तमान आहे. इंग्रज आहेत तेथेंच आहेत. पुढे लढाई जेजुरीचे सुमारे व्हावी असी बोलवा आहे. [जोरखोरे इ. खासगी मजकुराच्या सुमारे २४ ओळी या पुढे आहेत. सबब नकल केल्या नाहीत.]

¶*Antaji Jiwaji reports Bajirao's arrival at Mahuli and his preparations for an engagement with the English.*

No. 180] [*6-1-1818*

श्रीरामलिंग प्रा

सेवेसी अंताजी जिवाजी सां नमस्कार विज्ञापना. ता। मार्गशीर्ष वा। ३० मंगलवार तीन प्रहर दिवस पो उतम असे विशेष. इकडील मजकूर तरी स्वारी माहुलीस आहे. फौजा जेजुरीवर आहेत. इंग्रजहि दिव्याच्या घाटा अलीकडे आला आहे, असे बाजारी वर्तमान आहे. वो राजश्री रामचंद्रशास्त्री व्यास काल आले. त्यास जाऊन वर्तमान विचारिले, व राजश्री भाऊ कोठे आहेत हेहि विचारिले. त्याणी सांगितले श्रीमंताबरोबरच आहेत. सुखरूप आहेत. शेवेसी कळावे, श्रुत व्हावे हे विज्ञापना.

¶*Antaji Jiwaji communicates that Peshwa Bajirao is at Mahuli while his forces are at Jejuri. The English detachments have crossed the pass of Diwa, says the writer.*

No. 181] [*14-1-1818*

श्रीभवानीप्रा

राजश्रिया विराजित राजमान्य राजेश्री आबा स्वामीचे शेवेसी

पो बहिरो नारायेण सां नमा विा येथील कुशल पौष शुा ८ बुधवारपावेतो येथास्थित मुा वागर येथे सुखरूप असो विशेष. शुा ३ पत्रे व पावती वीस बदरियोंची[1] पाा ती येथे काल अस्तमानी पावली. त्याची उतरे व हिकडील मजकूर :–

१ माहुली मुापर्यंत स्वारी आल्याचे वर्तमानाचे पत्रे पाा ती पावली असतील. नंतर प्रतिपदेस प्रहर रात्री गडबड होऊन पालीस स्वारी गेली. द्वितीयेस वाठारावर मुा गेली. त्रितीयेस वांगीवर गेली. चतोर्थीस तुरटीढवलीवर गेली.

---

१ दारूच्या थैल्यांची.

पंचमीस मिरजेवर कौलापुरावर गेली. माहुलीपासून सा। मी वाठारास आलों. काही सरंजाम राजश्री बाबानी आणिवला तो धरने करून घेऊन तुरटी ढवली पावेतो बरोबर होतो. तेथून पुढे मुा गेला त्या दिवसी निरोप घेऊन पंचेमीस बोरगावास रात्री राहून शेष्टीस कराडास सफरे याजकडे येऊन काल अस्तमानी येथे आलो. मागे रा तात्यासो विंचूरकर व गोखले होते ते फिरंगियाचे मागोमाग कराडचे मार्गाने मिरजेस गेले. बोरगावचे सुमारे फौजेची गाठ पडली होती. फिरंगी पंढरीवरील तीन पलटणे व पाचशे तुरुप स्वारीमागे धावतो. मिरजेचे सुमारे गेला. बारा कोशाचा यास त्यास अंतर आहे. दोन चार रोजांत लढाई होईल असे दिसते. सरकारची फौज पनास हजार पावेतो आहे. पिके वगैरे दरोबस्त लुटीत गेले. फिरंगीही गावची तसनस फार करतात. उपाळवे येथे फिरंगियाचा मुा होता. गावचा नाश फार जाहला. गणपतरावजीचा गांव मार +

१ राजश्री भाऊ आम्ही तीन मुा येक जागाच होतो. त्यानी लाखोटा दिल्हा तो पाा आहे, व राजश्री अन्याचा लाखोटा पाा त्यास पावता करवा. दाहा हजार रुा पारगावकर याजकडील परत द्यावे असे ठरले होते. त्यास ते दाहा हजार रुा तुम्हाकडेसच राहावे. पांच हजार रुा आन्याकडे देविले ते देऊ नयेत असे ठरोन बाबानी आलाहिदा आन्यास पत्र लिा आहे ते या लाखोटियात आहे. कलम

[पुढील ८ ओळींच्या कलमांत खाजगी देवघेवीचा मजकूर आहे सबब तें गाळलें.]

१ पुण्याकडील फिरंगी दोन पलटणानिसी पुलाच्या सुमारें आला. मिरजेकडेस पलटणे गेली त्यांत मिलावयास जात आहे असे म्हणतात. तुमचे लाखोटे दोन लस्करचे रो केले. मी उद्या निघोन सातान्यास येऊन आपलेकडे येतो. नंतर भेटीअंती मजकूर समजेल [यानंतर १५ ओळी मजकूर खाजगी क्षुल्लक महत्त्वाचा.] १ दारू मिळल ती घ्यावी. सरंजाम करून जाग्याचे संरक्षण करावे असे आपनास निरोप सांगावा असे बाबानी स्वमुखे सांगितले आहे. काा

१ फौजेत खर्चाची अडचण फार पडली. स्वार रात्रीचे पळून जातात. हवालदील आहेत. फिरंगी सेर आहे. ईस्वर इछेने घडेल ते खरे. भाऊ व हरबारावजी खुशाल आहेत. आमचे कापडचे जमिनीविसी भाऊनी पत्र दिल्हे ते या लाखोटियात आहे. कार्य करणे तुम्हाकडे आहे. कलम

सदरहू लिावरून कलेल. कलावे बहुत काये लिा लोभ करावा हे विनंति.

¶*News of Bajirao's movements in the Southern Maratha Country sent by Bahiro Narayan Pingle, who was in charge of ammunition. The addressee Aba may be Purandare.*

+ समागमे.

No. 182] [19-1-1818

श्रीभवानीप्रो

राजश्रिया विराजित राजमान्ये राजश्री

आबा स्वामीचे शेवेसी

पो बहिरो नारायेण सां नमस्कार विनंती. येथील कुशल तां पौश शुा १२ पावेतो येथास्थित मुा सातारा येथे असो विशेष. सितू तोडकर याजसां राजश्री आन्याबांस राजश्री बावांचा लखोटा व आपल्यांस राजश्री भाऊचा लखोटा व मी आपली पत्रे देऊन पाा आहे तो पावोन उतरे आली नाहीत. मी काल आस्तमानी येथे आलो. सोरा व गंधक येथून रो सदासिव बापू याणी केला तो पोचला असेल. स्वारी निपाणीचे सुमारे आहे. मागाहून आलंपिष्टन दोन पलटणानिसी खानदेशातोन मिरजेचे सुमारे जाऊन पुढील पलटणात मिळाला. त्यास यास सात कोशाचा अंतर आहे. पुण्याकडून येक पलटण वाई सातारा सुमारे येत आहे असी बाजारआवाई बोलतात. निपाणीचे सुमारे लढाई जाहाली असी बाजारआवाई बोलतात. खास समजले म्हणजे लेहून पाठऊ. राजश्री आन्यास भेटून यावे म्हणोन बाबाची आज्ञा. त्याजवरोन वाईस आहेत म्हणोन कळले; त्यास भेटून आपलेहि भेटीस दोन महिने जाले, आपली भेट घेऊन, श्रीचे दर्शन घेऊन मावारे येईतोवर बापूस येथे ठेविले आहेत. सफरे याजकडे हजार रुो चिठी अज पाा आहे. भाऊनी बाबाकडे हजार रुो पाठवावे असी लस्करातोन चिठी दिल्ही ती पटली नव्हती. तीहि आज सफरे याजकडे पाा आहे. दिवसामुळे ऐवज द्यावयास मनुष्यांस संषये येतो. सफरचा सूड करून ठेविला होता. उदईक डाकेवर रुो करितो. डोरलीस कारकून सफरे यांणीं पाा आहे. वसूल होऊन ऐवज आला नाही व बालकोबा तात्या आथणीस आहेत त्याकडे चार हजार रुो चिठी पाा आहे, तिचा जाब परतवला नाही म्हणोन सफरे सांगत होते. कळावे, लोभ करावा, हे विनंती.

¶*Bahiro Narayan Pingle reports that Bajirao is in the vicinity of Nipani and that Elphinstone, with two battalions, is following him, having marched through Khandesh towards Miraj.*

No. 183] [23-1-1818

श्रीभवानीप्रा

राजश्रियाविराजित राजमान्ये राजश्री

गणपतरावजी स्वामीचे शेवेसी

पो बहिरो नारायण व सदासिव गोविंद साा नाा विनंति विशेष. आपण डाकेवर लखोटे सुमार साहा पाा. त्यास स्वारी आज दोन प्रहर रात्रीस निघोन

गेली. बरोबर राजश्री जानोबा भाऊ व आबा सुधा निघोन स्वारीबरोबर गेले. तुम्हाकडील लाखोटे स्वारीचा मुकाम असेल तेथे सिपाई याजबरोबर पाा आहेत. आबा काल बुधवारी प्रहर दिवस पूर्वी येथे आले. जाबसाल काही उलगडले नाहीत याजमुळे अजचे मुाा. गेले. लस्कर पुण्याचे रोके गेले असेत. अदरकीचा घाट उतरून जाणार. इंग्रजाचे पलटणाचा मुाा इंग्रजाचा मुाा काल सिरव्यावर होता. गोखले पिंपरीवर होते. विंचूरकर वगैरे श्रीकृष्णा उतरून पश्चमभागी आगापुरावर मुाा याजप्राो काल अस्तमान प्रहर रात्रीचे वर्तमान. आज कोण कोणाचे कोठे मुाा जातील न कळे. माझे शरी(री) ज्वरांश होऊन कालपासून निजोन आहे. याजमुळे येथे राहिलो कळावे. राा पौष वाा १ गुरुवार प्रहर दिवस लोभ करावा [पुढील पांच ओळी केवळ खासगी मजकुराच्या दागिन्यासंबधीं.]

¶*Bahiro Narayan writes to Ganapatrao reporting the movements of Bajirao•*

No. 184] [*25-1-1818*

तेरीख २९ जानेवारी

सन १८१८ हेरंब?

हुसांव (?)

अजम ऋम आलपिष्ट साहेब व करणेल साहेब इंग्रज भाहादर दाम मोंबत हूं

ॐ अजि दिल येकलास चतुरसिंगराजे सेनासाहेब सुभा सलाम बाजत सलाम उं कीं दिगर खैर खुशी कलमे करीत जावी विशेष. राजश्री बाजीराव पेशवे याणी आमच्या राज्याचा बंदोबस्त करून आम्हास कैदेंत ठेऊन कारभारात करीत आहेत. हाली फौज पाठऊन नाना प्रकारचे उपद्रव आम्हास करीत आहेत व माहाराज छत्रपति यासहि आपले बरोबर फिरवीत आहेत. या प्रकारे आमची आवस्ता आहे म्हणोन पेसजी तुम्हास पत्रें पाठविली होती. त्यास दोन महिने जाहाले. आद्याप उतर व कागदी आले नाही. याजकारितां हाली पत्र पाठविले आहे. तरी या समई आम्हास कुमकेस दोन पलटणें पाठऊन द्यावी म्हणजे इकडून बंदोबस्त करीत येतो. भेटीनंतर बोलणे होऊन तुमचे आमचे विचारे जे करणे तें करावयासी येईल. परंतु लिहिल्याप्रमाणें पत्र पावताच दोन पलटणें पाठवावी येविसी गोविंदराव गाईकवाड पाठविले आहेत. मुखजबानी सविस्तर बोलतील तें समजोन घेऊन पलटणसुधा रवानगी करावी. चितात कोणयेक अंदेशा आणूं नये. राा छ २९ रौवल जादा काये लिहिणे

¶*Chatursing Raji Bhonsle mentions his grievance against Bajirao and applies for redress to Elphinstone and requests him to depute two companies for his help.*

No. 185] [11-2-1818

श्री

विनंती विशेष. पत्र पाा ते पावले लिा मजकूर कलला. झाडे राा गणपतराव याजवल दिल्हे आहेत. आलीकडील झाडा पाठवितो. आधल्या पाा नाही. जोरखोरे व बारामुरे याचा मार लिा तो कलला. यास बाकी किती राहती तीं पाहून लिहितो. डाकेची पत्रे पाठवीत आहे. सातारियात गावात इंग्रज सिरला आसी आवाई वाटेत यैकिली. भोसल्याकडील काही फौज येऊन लस्करात मिलाली. लस्कर माघारे ताथवड्याकडे गोखले, विंचूरकर आले. खासी स्वारी आकलुजेवर आहे. आलीकडे आली आसेल. पत्र गुताड मुाा पावले. येथे भोजन करून पुढे गेलो. राा बुधवार छ ९ राखर दोन प्रहर कृपा कीजे हे विनती.

¶*The writer reports that the English have marched upon Satara and the Peshwa Bajirao is at Akaluj.*

No. 186] [11-2-1818

श्रीरामलिंगप्राा

सेवेसी आताजी जिवाजी साष्टांग नमस्कार विनंती ताा माघ शुाा ६ बुधवार-पावेतो उतम असे विशेष. इकडील वर्तमान साताऱ्यास जलचराचा मुाा आला. किल्यावरून गोली टाकिली नाही. स्वारी नातेपोते, टेबुर्णी नजीक आहे. भोसले सिकस्त जाले. त्याची बायकापोरे पाच हजार फौजेसुधा स्वारीत येऊन मिलाली आसे वर्तमान आहे. बहुशा सर्व व्याप्ति त्याची जाली. आता कोणती गोष्ट होणे हे ईश्वरी इछा. उगीच दुराशा मात्र. आज सलाबत त्यांची आहे. सेवेसी श्रुत व्हावे हे विनंती.

पेशजी सादुलाविसी लिाो आहे व नागली रुाा २९ पंचविसाच्या आसी दोन्ही कामे कृपा करून हे वेलेस केलीच पाहिजेत. रुाो सिध्ध आहेत. रुााविसी कालजी न व्हावी; परंतु आपण खरिदी घेतल्याप्राो त्याजपाौ द्यावी. याचे उतर आगत्य यावे. आबासाो बहुत सावधपणा असावा. दिवस अती परीक्षेचे आले. आपण तरी गल्यात धोंड बाधून घेतला आहे. श्रीने सव(र)क्षण करावा. हे विज्ञापना.

¶*Antaji Jiwaji communicates that the Chhatrapati with his family and an army of 5,000 men surrendered to the English.*

No. 187] [12-2-1818

श्री

विज्ञापना येथील कुशल ता। माघ शु। ७ गुरुवार प्रहर दिवस प्रात:कालपावतो वर्तमान यथास्थित आसे विशेष. फिरंगी याचा मु। कोरेगावाहून मंगलवारी प्रहर दिवसास सातारियास दाखल जाहाला. नंतर त्याच वेलेस नाकेबंदी शहरची करून, लोकास अभय देऊन, किल्यावर चिठी लि। कीं कुपीणबहादर याचा हुकूम किला खाली करून देणे. त्याचे उतर आले की, श्रीमतांची परवानगी पाहिजे. त्याजवर साहेब रागे भरून लस्करात जाऊन च्यार तोफा आणू (न) आमचे घराजवल लाविल्या आणी कुलपी गोले वीसपर्यंत सोडले. इतक्यात किल्यावरी कारकून बोलणार आला. रुमाल फिरऊन तोफ बंद केली. वरला बंदुखीसुधा बारदेखील जाहाला नाहीं. बोलणे होऊन वर निरोप सांगून खाली निरोप सांगावयास यावे इतेक्यात दोन तीनसे पलटणचे लोक दरवाज्यास गेले. प्रहर रात्री वरील लोक खाली उतरून आले. कासीपंत याची बायका व आईमात्र खाली उतरू दिल्ही. चीजबस्त सकाली उतरून देऊ आसा करार केल्यानंतर सकाली बंदी केली. वरले माणूस वर, खाले खाली, आसे केले. काल दोन प्रहरी निशाण आपले बडे लाविले; आणि लस्करच्या तोफा वीस केल्या आणि ते निशाण उतरून भगवे निशाण लाविले. याप्रा। इकडील मा।र आहे. हे वर्तमान परवाच लि। तरी सिपाई नवता. आताच सिपाई भगाजी डाकेवरून आला तेव्हा लि।. आपले-कडील सिपाई शाणा पा। पा।. कोकणा सिपाई पा। नये. नाही तरी आमची येथे काही राहणार नाही. जिनस दोन वेला बैल दोनीं पा। ते येऊन पोहचले आसतील. येैन जिनस पा। नये आसे लि। आले. त्याचे पूर्वीच रवाना केला. कलावे जिनसाची पावती देखील पा। तरी नाव घालू नये. जमाखर्च आसल्यास चिता नाही. आजचा रोख वाईस जाण्याचा बोलतात. या वेलपावेतो मु। आहे. वरला गोला वाजला नाही म्हणोन शहरचा बचाव जाला. कलावे. आद्याप कोणतेहि गोष्टीचा इतबार नाही. सरकार फौजाची बातमी काही कलत नाही. हे विज्ञापना.

¶*This despatch describes how the English took possession of the fort of Satara without any resistance being offered by the garrison.*

7151

No. 188] [18-2-1818

पो छ १३ रबिलाखर
सन समान अशर माघ मास
शके ३९ ईश्वर

श्रीरामलिंग प्रा

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री गणपतरावजी स्वामीचे सेवेसी

पो अंताजी जिवाजी साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल जाणून स्वकीय कुशल ताा माघ शुा १३ बुधवार दोन घटका दिवस अस्तमानपूर्वपावेतो आपले कृपेकरून, यथास्थित आसे विशेष. अलीकडे पत्र येऊन वर्तमान कलत नाही, तरी सर्व मजकूर लेहून येत असावा. इकडील मजकूर तरी राजश्री भाऊ व सर्वत्र मंडळी झाडून येथे राहावयास येणार, आसे आज राजश्री केशवरावजी बोलत होते कलावे. वडील आले म्हणजे लेहून पाठवीन. स्वारी श्रीमंताची सुरापुराकडेस गेली, आसी आवई आज बोलतात. नात्यापोत्यावर इतक्यात होती, पुढे गेली. इंग्रजहि सातान्याहून गेले. ते स्वारीचे दुमदारीवरच गेले. रावजी, काल अती विपरीत आला. सर्वत्र निर्वीर्य जाले. त्यासच सदी आली. आसो ईश्वर कृपा करील तेव्हा खरे. बहुत काय लिहिणे, कृपा लोभ करावा हे विनंती.

¶*Antaji Jiwaji communicates to Ganpat Raoji that Peshwa Bajirao is proceeding towards Surapur and that the English are engaged in circumventing his movements. The writer bewails the evil times.*

No. 189] [20-2-1818

श्री

बारनिसी श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामी सुाा समान अशर मयातेन व अलफ शके १७३९,

१ बाजीराव याचे लस्करांत स्वारी असतां अष्टी वालकीचे मुकामी छ १४ रबिलाकर माघ शुा शुक्रवारीं प्रात:कालचे साहा घटिका दिवसास जर्णेल * * * बहादुर फौजसुद्धां * * * * * म्हणून व आनंदराव बाबर ऐसीं चांगलींच माणसें पडलीं. इकडे गोरे गुंतले, काले त्रुप डावें व उजवें येसें * * * वेळे न मिलोन ढगि आभ्र येतें व संगीना उन्हानी चकाकूं लागल्या येसें दिसों लागलें, तेव्हां आपाजी मागकर बाजीरायाचे म्यान्याजवल येऊन रागें भरला कीं हा समये म्यानांत

बसावयाचा नव्हे, तेव्हां उतरोन घोड्यावर बसिले आणि माहाराज छत्रपति व भाऊसाहेब महाराज व आपासाहेब महाराज यासही घोड्यावर बसविलें, आणि भरधांव घोडा हाकली तों लगट फारच जाला. या त्रिवर्गास पुढें घाल्हून बाजीराव पाठीमागें चालले तों श्रीमंत मातुश्री माईसाहेबमाहाराज भेण्यांत होतीं, तो मेना मागें राहिला. यामुळें त्रिवर्ग माहाराजांनी गलबला करून हात घोड्यास घातले तो मेना येऊन पोंहचला, व यमा बानकर याजबराबर बाजीराव यानी आपला घोडा बसावयास पाठविला. याजवर बसून जलद चालावें सांगितलें, तेव्हां उत्तर केलें कीं आगोधर घोडी मागितली तेव्हां आम्हांविसी दुस्काल पडला होता, आतां या घोड्याचा हासभास नाहीं. मी बसत नाहीं. आपल्याच घोड्यावर बसून येतों. शामराव व बाळाराव रास्ते मागें चालूं लागले. जलद चाला येसे वेगा करूं लागले, तेव्हां माहाराजांनीं पुसिलें हे कोण आहेत. तेव्हां रावोपंत जोसी यानी सांगितले रास्ते आहेत. इतके दिवस मागें चालण्यास कोण्ही नहुतें आतां कोठून आले, येसी बोलिली, त्याजवरून ते तोंड चुकाऊन पुढें गेले. माईसाहेब यास माहाराज त्रिवर्ग पुढें गेले ते दिसेनात. त्याजवऊन रागें भरली कीं तिघाची भेट लौकर करा. ते बाजीरायानी येकून सखू खैरा यास पाठविलें, आणि त्याजबराबर निरोप पाठविले कीं या समई मजवर मर्जी प्रसन असावी. दोन कोश सांभाळून गेल्यावर मी विनंत्या करून सर्व स्वामीचे पुढें ठेवितों. तों त्रिवर्ग महाराज यांची गाठ पडली. तो गर्दीचा समय, घोड्यावर स्वारी करविली, व आपली बायकोस बाजीराव यानीं छिटाचा अंगरखा व पायजमा घालविला व रुमाल बांधाविलाच होता तिजला व ढमढेरी वगैरे दोन तीन बायेका यांस घोड्यावर बसविलें आणि पलावे हेच चालले. तो ज्या बाजूनीं जवळ दिसते तो मार्ग सोडून डावे उजवे पळता वाव नाहीं. नागरट वाटेस लागले त्यांत येक तोफेचा गोला येऊन जवळ पडिला, त्याणी फारच गलबल जाली. पिस्तोल गोल्या येऊं लागल्या; परंतु येकाचेंहि तरवारीचें मेण निघालें नाहीं. या धुमाली व घोड्याचे दलवटींमुलें घोडीं धाऊं लागलीं तेव्हां हिसका व घोडीची ज्या * * भाले आणि इंग्रजाकडील स्वार फारच सनिध येऊन पोहोंचले; तेव्हां श्रीमंत भाऊसाहेब महाराज याणी श्रीमंत मातुश्री माईसाहेब यांस पाठीसी घेऊन शालनाम्याचे हातीं रुमालानी पाठीसीं बांधिली. तेव्हां निली घोडी * * तुरुपानी नेली. घोड्यावरून उतरून बसण्यास संधीस आवकाश पडला ते समई हजार स्वार बाजीरायाकडील होते, ते जलद चलावें बोलले. चालतों हे दिसतें की नाही, उत्तर केले. तो फारच येऊन गोश वाढलें. इतके संधीत बाजीराव लांबले

व जवल स्वारसुधां कोण्ही नाहीं, पलाले. तो गोलींचे टप्यावर समीप आले. पायाचे स्वार यास जवल गोल्या लागून माणसें मरूं लागलीं. राघोपंत जोसी व दाजी कालेसकर उधलला. राघोपंत जोसी पुढें पळावयास लागला, तों त्याचे पुढे गोलीनी येक मुडदा पडला. तो पहातांच पुन्हां यजमान माहाराज स्वामीयाजवल मागें फिरोन येऊन बोलले जे, जवल कोणी उरलें नाहीं. इंग्रज सभोंवते मिलाले. आतां पलूं नये. वेर्थ मरूं नये. घोड्यास हात घालावे. ते समई सरकारपैकीं बलवंतराव व येशवंतराव चिटनीस उभयतां बंधू व भीवराव पोतनीस व केशरकर जवल चालले होते. या-समई जवल आसावें यैसी आज्ञा. पैकीं केशरकर त्या गलबलीत उधलले, चुकले; व पोतनीस यास बाजीरायाकडे जाऊन सांगावे कीं आम्ही सांपडलों, पलू नका, माघारी फिरोन आम्हांस काढून न्यावें, ऐसं सांगोन पाठविलें. त्याणी जाऊन सांगितलें. कपालास बोट लाविलें, परंतु माघारे न फिरले, व फौजही न पाठविली. पोतनीस तिकडेच राहिले. माहाराजावर सात आठसें तुरुप नागव्या तरवारा व पिस्तोल सहीत * * जवल आले, मोठा समय कठिण, तेव्हां तिघा खासीयानी नागव्या तरवारा व येक स्वार निसबत निंबालकर वावीकर व उभयता चिटनीस याणी * * केल्या तो येऊन मिळाले. तेव्हां येका तुरुपास बलवंतराव चिटनीस यास घोड्यावरून उतरून पुढें धावून हाक मारावी म्हणोन सांगितलें. त्याजवरून चिटणीस घोडीवरून उतरोन पुकारा केला कीं छत्रपति माहाराज सातान्याचे आहे. गोली घालूं नका. इतकियांत * * आसामी मेजर दपटीण पांचवे तुराबापैकीं सेख बडेबाबा जमादार व सेख मकबुल यैसे पुढें आले त्यास सांगितलें त्याणी तरवारा आंगाभोंवती फिरविली, आणि घेरा मात्र दिल्हा. मारणें हाणनें बंद केलें. तों खासा मेजर दपटीण येऊन पोहोंचलें. त्याणी राजे सातारकर सचे म्हणून वचन घेतलें, आणि बंदोबस्त केला. यैसी ईश्वर खैर माहाराजाचे पुण्यप्रतापें जाली. समय परम दुर्घट; परंतु पार पडली. तरवार हातच्या घेतल्या ते समई मेजर दपटीण यास दुपटा भारी आंगावर घातला. दोघां तुरुकांस आंगठ्या व शाल नामी रुमाल दिल्हे ते समई जवल असाम्या ठरल्या होत्या बितपासील :—

३ हाती आंबारीचे व चौघड्याचे व खुजे

१ बालासाहेब भोसले चेतरसिंगाचे पुत्र
१ आबाजी
१ पांडोबा वैद्य सिशा बाजीरायाची

३

२ चिटनीवीस आसाम्या

१ नरहर मल्हारराव

१ यशवंत मल्हारराव

२

१ राघोपंत जोसी निसबत बाजीराव

१९ हुजरे वगैरे.

१ गोदाजी	१ जोतीज गताप
१ खंडू सिंदे	१ जोती ढबरे
१ कोंडीं भोसले	१ माहादू सूर्यबंसी
१ बापू जाधव	१ धोंडी घोरपडा
१ विठू जाधव	१ मुरारजी रेणुसे
१ सिनु वालखे	१ धोंडी वानवडीकर भोसले
१ बारगीर निसबत वाटीरकर	१ द्वारकू बायको
१ संक्रु	१ राघू
१ बहिरू	१ इं
	१ आन्या
९	१०

१९

२५

या प्रमाणे पंचवीस असामी व च्यार खासे इतके राहिले. ऐसी गुजरून गेलियावर बिलिमोरसाहेब जर्नेल याचा कारभारी येऊन पावला. तो भेटला. पाहून जाऊन जर्नेल स्मिथ यास कळविलें. सर्वास घेऊन जर्नेल मागें होते त्याकडे मेजर दपटीण चालले. हाती आंबारी व हौदा व चौघडे बगीवरील व दोन हती खुजे मिळून बारा व उंटावरील नौबती दोन येसे आम्हां घोड्यावर बसविले. ते हाती वगैरे आपले म्हणून आपलेजवळ घेऊन स्वारी चालली. आंबारींत माईसाहेब यास बसावें म्हणून मेजर दपटीण यानी विनंती करून बैसविली. खवासी-

7155

यांत भाऊसाहेब महाराज बसले. माहाराज छत्रपतीचा हात धरून मेजर दपटोण चालला. भाऊसाहेब महाराज घोड्यावर यैसे चालले. तों जर्नेल जखमी मेण्यांत होता, तो पुढें आला; मेन्यांतून उतरून टोपी काढून सलाम केला भेटला. नंतर आष्टीवालकीवरच त्याचे तलावर मुकाम जाला. तेथें स्वारी उतरली. बाजीराव वगैरे सर्वांचें खटले लुटले गेले, फार नाश जाला. कांहीं रुपयांचा विषय इंग्रजांस सांपडला. फरासखाना कांही वगैरे लुटीपैकीं सत्रा उंट¹ माहाराजांकडे दिल्हे ते डेरे उभे केले. बिलिमोरसाहेब व त्याचे निसबत बाबाजीपंत व खंडोपंत व बाजीपंत हे उभयतां निसबत मोंगली पठाण हे जवळ समाचारास येऊन, साकरपाणी आणिले. सर्वांनी निरोप घेतले, तों बापू गोखले याचा मुर्दा डोलीत घालून आणिला. तो वोलखण्यास कोण्ही पाठवावें म्हणोन जर्नेल याणी निरोप पाठविला. त्याजवरून नरहरराव चिटनवीस यास पाठविलें, नंतर वोलखले. फक्त आंगरखा मलमलीचा आंगात उरला होता. घोड्यानी तुडविलें त्याणी पायाचें कातडें गेलें, व दोन जखमा होत्या, व आंताजीपंत हजरनीस निसबत गोखले जखमी ऐशा दोन डोल्या माहाराजांपासीं डेन्या-जवल * * * * * * * भन वगैरे कलवितों वेल जाला च्यार घटिका रात्रीस लस्करचे आबाजीपंत याणी अग्न दिल्ही. राघोपंत व पांडोबा निसबत बाजीराव हे जाईनात. अग्न देवत्रणे प्रात म्हणोन देवविली. च्यार घटिका दिवस आस्तमानचा राहता जर्नेल स्मिथ-साहेब व बिलिमोरसाहेब ऐसे डेरियास आले. खुसी वगैरे बोलनें जालें. नंतर काये मर्जी बोलले त्यास इकडून उत्तरें केलीं कलमें

१ तुमची अलपिष्टना आगोधर भेटी जाली. सर्वत्र लाहान थोर पलाले. आमची घोडी लाहान होती यैसे नाहीं; परंतु पूर्व संकेत समजोन तुम्हांस पाहतांच हात घालून उभे राहिलों. त्यास अलपिष्टनाची भेट लौकर व्हावी.

¶*This is a summary of news-letters from the battlefield which describe how Bajirao, in order to escape from the hands of the English, ran away, leaving the Chhatrapati to his own fate in the midst of difficulties. This is an important journal of the battle of Ashti. The paper is printed already in Bhave's* मराठी दप्तर रुमाल *No. 2.*

7156

No. 190] [22-2-1818

पौ छ २४ फेबरवारी मुा
छ १८ राखर

श्रीशंकर

अजम आलपिष्ठण साहेब सर-
लस्कर गोसावी यासी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री आमृत-राव देवाजी मुा किले वितंडगड राम राम विनंती. येथील कुशल ता छ १६ राखर जाणून साहेबाचे मेहरबानेकरून खैरखुसी असे विशेष. किले सुधाग-डाखालीं सरंजाम घेऊन आजम जारनेल प्रात्रसाहेब किला सर करावयास आले. तेव्हा तेथील किलेदार व आम्ही येका धण्याचे, याजकरिता आम्हास कुमकेविसी पत्र आले. त्याचे उतर पाठविले की लोक पा देतो, परंतु आम्हाकडून लोक तीन रोज किला लढत होता परंतु पाठविले नाही. मी साहेबाचे दोस्तीतील आहे. माझा जेष्ट भाऊ तीर्थरूप राजश्री विठलराव दिवाणजी काठेवाडास आहेत, त्यांची व आजम वाकरसाहेब व आजम करनेक रिसदीट बडोद्यातील व आजम बलीटणसाहेब आसिष्टंण व आजम मेकमरुद साहेब कच भुजेस आहेत त्याची मेहेरबानी मजवर आहे व आजम मेकमरुदसाहेब कुंपिणी सरकारचे व गाय(क)वाड सरकारचा सरंजाम घेऊन भूजप्रांत सर करावयास गेले तेव्हा फौजासुधा माझे बंधु व मी साहेबाचे तैनातेस होतो. मजवर सर्व साहेब मेहरबानी करीत आले. पेशजी आजम वाकरसाहेब काठेवाड प्रांती आले होते तेव्हा मजवर फार मेहरबानी करीत होते आणि मी साहेबास वडील म्हणत होतो. तीर्थस्वरूप वेदशास्त्रसंपन्न कैलासवासी शास्त्रीबावा दाजीसाहेब याचे आम्ही चिरंजिवातील. याप्रमाणे माझा वेव्हार आहे. येथे राहावयास कारण श्रीमंत राजश्री पंतसचिव याचे पदरचे वडील च्यार डोयाचे चाकर, तेव्हा कोणी येथे आसावे. परंतु आम्ही कोणी राहात नव्हतो. शास्त्रीबावा याणी परलोक-साधन केला तेव्हा गुजराथेतील पूर्ववतप्रमाणे चालेना, तेव्हा स्वदेसी आजम रिसदिट साहेब याचा हुकूम घेऊन देसी आलो. त्यास दीड वर्ष जाले. सचिव येजमान स्वामींनी आग्रह करून राहविले. वडिलोपार्जित जागा, राहाणे प्राप्त जाले. साल मारी पेशजी मामलेदार गोपाल हरि होते त्याणी गैरराहा वर्तणूक करून धण्याचे मानिना, तेव्हा मजला लोक देऊन पाठविले. येक महिना लढाई होऊन उपरांत किले मारी प्राचीन गडकरी चाकर होते त्याणी फितूर करून आम्हास वर घेतले. उपरांत येजमान स्वामीची आज्ञा जाली कीं तू तेथेच

राहाणे, त्याजवरून मी येथे राहिलो आहे. त्यास साहेबी माझा सांभाल केला पाहिजे. साहेब सचिव याचे संस्थान हे कशात जमा. याणी आपले यांसी तिलप्राय वाकडे नाहीत. पुण्यांत गलबल जाली ते वेलस माहालांत आपलेकडील कोणास तिलप्राय उपद्रव जाला नाही. येविसीची खातरी राजश्री रामचंद्रपंत लिमये व खंडेराव भोसले करतील व सदरी मजकूर लिहिला आहे त्याची खातरी तीर्थस्वरूप राजश्री सखारामभट दादा शास्त्रीबावाचे बंधु आपलेजवल आहेत ते करतील. सारांष माझे सरकारचे जाग्याचा व माझा अभिमान साहेबी मेहरबानी करून करावा. सर्वो प्रकारें साहेब मजला मुरबी आहेत. पत्राचे उतर द्यावयास हुकूम जाहला पाहिजे. बहुत काये लिहिणे कृपालोभ करावा हे विनंती.

¶*Amritrao Dewaji writes to Elphinstone from Vitandgad in Bhor giving details of his own and of his brother's activities in Gujarat. These may throw some light on the history of Baroda and Gujarat.*

No. 191] [*February 1818* (?)

श्री

शेवेसी सखाराम महिपत वाघ मुा गुळुंब सिर सा नमस्कार विज्ञापना ऐसीजे. आज वर्तमान माघारे इंग्रज फिरोन सालप्याचा घाट चढून, वर येऊन मुकाम पिंपोडे धाकटे येथे जाहाला आहे. चंदनासी गोळा गोळी चालली आहे. निमे इंग्रज लोणदावर मुकाम जाला आहे. येथून दिसतो. त्याची बोलवा पुरंधरास जाण्याचा बेत आहे. निमे सडा आला आहे. तोफा घोड्यावरील दाहा बारा आहेत. आणखी बैलाच्याहि दाहा आहेत. किल्यासी त्यासी लढाई लागली आहे. आपण सावधता करावी. मागाहून आणखी बातमी येईल ते लेहून कळवितो. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पत्र रवाना दोन घटका रात्रीस.

¶*Sakharam Mahipat Wagh reports that the English had left Salpa and therefrom intended to proceed towards Purandhar.*

No. 192] [*February 1818* (?)

श्री

विज्ञापना ऐसीजे. आपण पत्र पाठविले ते पावले. लिहिला मजकूर कलला. स्वार पाठविले आहेत म्हणौन लिहिले. त्यास आस्तमानचा दोन घटका दिवस-

+ अक्षर निराळें.

पर्यंत आले नाही. आले म्हणजे लिहून पाठऊ. इग्राजाचे कूच पुरंदर घेऊन इकडील रोखानें जाले. येथे येणार म्हणौन बहुत आवई आहे. वो राजश्री वेणीमाधवाच्यार्य यांचे चिरंजीव यास पाठवावे म्हणौन लिा त्यास आच्यार्य याचे चित्तात यावे आसे आहे. चिरंजीव गड्बडीचे दिवस याजमुळे घरी पाहिजेत, त्यास आपलें पत्र आच्यार्य याणी यावे आसे आल्यास त्यास पाठऊ. चिरंजीवच त्याचे पाठवावे आसे आल्यास त्यासच पाठऊ. पुराणि(क)बावाचे चिरंजीव गावास गेले आहेत. ते आले तरी त्यासच पाठऊ. ते आज न आले तरी पुराणिकबावा उदईक येतील. घराचा मजकूर लिा त्याप्रो करितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. मध पो ती पावली. सेवेसी आनंदराव लक्ष्मण सां नमस्कार विज्ञापना. तिकडे यावयाकरिता चार पाच दिवस येथे आलो. दाजी घोडे देणार आहेत. दिल्यावर येतो. ठिकाणाच्या घेन्यास परवारी असतील, ते फितुरी पके ध्यानात ठेऊन येविसीचा बदोबस्त ठेवावा. अलस होऊ नये हे विज्ञापना.

¶*The writer states that the English have occupied Purandar and now march onwards.*

No. 193] [*4-3-1818*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
निलोपंत आबा स्वामीचे शेवेसी

पो धोंडो विश्वनाथ सा ना विा येथील कुशल ता छ २६ राखरपावेतो जाणोन स्वकीय कुशल लिा जावे विा. श्रीमंत रा आणासाहेब यांस पत्रे देऊन सिपाई पाठविला आहे याजबरोबर तेथून माहीतगार आसामी देऊन पुढे रवाना करावा. किले पालगड व रामगड येथे आज प्रात:काल पासून तोफा होत आहेत. किल्यावर आग लागली ती येथून दिसत होती तेव्हा गेल्यातच आहे. सायंकाल मर्याद वर्तमानहि येईल. अंजनवेलीस इंग्रजाकडील सरंजाम गेला, कठिण आहे. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति.

¶*Dhondo Vishvanath writes to Nilopant Purandare reporting the arrival of British troops against the forts of Pal and Anjanvel.*

7159

No. 194] [11-3-1818

पौ छ २५ आप्रेल सन
१८१८ छ १८ जाखर
सन समान असेर.

श्री

खुदावंत न्यामंत अलेपिष्टीन सो

साहेबाचे खिजमतीस येशवंत बाबूराव तुळजापूर सलाम आकी आम्हाकडील वर्तमान तर रा गनपतराव पानसे तोफखानामे सरंजाम सुधी वये-रागाजवळ सासुरगाव दोन कोसावर आहे. आम्हापासून आठ कोस आहे. फार दंगा मांडला तो लिा पुरवत नाही. आम्ही साहेब चाकरीस फार जपून आहोत, परंतु लस्करचा बंदोबस्त करावा म्हणजे प्राची वाट चालेल. नवाब करार नवाजख याणी पत्र पाठविले ते घेऊन उतर पाा. कळाव. बहुत काये लिाे लोभ कीजे हे किताबद. छ ११ मार्च सन १८१८.

¶*Yashwant Bapurao reports the arrival of Ganpatrao Panshe with his artillery near Sasurgaon and the precautions taken by the writer to meet him.*

No. 195] [19-3-1818

पौ छ २५ आप्रेल सन
१८१८ छ १८ जाखर सन
समान आसेर.

श्री

खुदावंत न्यामद डाकतर ज्याफकरी सो
साहेबाचे खिजमतीस येशवंत बाबूराव

टपा तुळजापूर सलाम आकी. साहेबी बुलेखा नवाब बाहादुर याचे नाव पत्र पाा होते ते पत्र त्यास पावते केले. त्याचे उतर आले म्हणजे साहेबाकडे पाठऊन देऊ. दुसरे, तोफखाना झाडून सोलापुरास गेला त्यापो काही निमे तोफा व पायेदल सोलापुरापलीकडे तीनच्यार कोसावर सिणा नदीवर जाऊन पडला. बाकीचे रा गणपतराव पानसे सोळापुरात राहिले ते कोनीकडे जातील ते न कले. श्रीमंतांचे लस्करातून छ १८ तारखीस दोनसे तीनसे स्वार आले. बहुत खराब होते. त्यास पुसले; त्याणी सांगितले की, आम्ही तोफखान्यास मिळावयास जातो. पुरती बातमी सांगितली नाही. येणेप्रा वर्तमान आहे. सो कळाव. बहुत काये लिा, लोभ कीजे, हे किताबद. छ १९ मार्च्य

¶*News of the movements of the Peshwa's army is given in this letter by Yashvant Baburao.*

No. 196] [26-3-1818

नकल छ २१ जो सानी (?)
सन १२२७ फसली

श्री

वडिलाचे शेवेसी गणपतसिंग कृतानेक सा। नमस्कार विनंती विज्ञापना. ता। छ १९ जाखर येथास्तित प्रातःकाल जाणौन श्वकीये कुशल लेखन आज्ञा केली पा। विशेष. आपणाकडून पत्र छ १८ तारखेस जेवानाबरोबर आले त्यांतील मा।र ध्यानास आले. जेवान पुढे जवल्यास राजश्री सिवप्रसाद याजकडे रवाना केले. आज धारुराहून राजश्री बालदीराम तिवारी यानी टपेवर पत्र आपल नावी व आमची नावी पाठविली. त्यास आम्ही पत्र अवलोकन केले. त्यात मजकूर लि। कीं, गनिमाची फौज घाटाखाले छ १७ तारखेस आली. छ १८ तारखेस आपले तालुकेत रुईचे राणात येऊन मुकाम केले. आसपास आसवल वगैरे गावबगाव कही केली आणि धारूरची बैल बकालाचे घाटाखाले लुटले. याजप्रा। कैफियत लिहिली आणि मागाहूनहि दाहा पंधरा हजार फौज येणार. कोणीकडे जाती हे न कले. या मुकदमेत जरूरीयात पत्र रवाना केले आसेत, पोह्चतील. इकडे हुशारीने आहोत. बातनी वरचेवर ठेऊन आहोत. त्यास जमियेत काही पाठऊन द्यावी. दुसरे उमरावतीहून येक वाणी आला. त्याने जुबानी कैफियत श्रीमंताचे लस्करची सागितली जे फौजसुधा बाजीरावसा। उमरावतीपरियेंत येऊन बारी पलीकडेस मुकाम केला. आसपास कही करण्यास गेले तों फिरंगीयानी बारी धरून राहिले. इंग्रेज बाहादूर याची बाजीरावसा। याची फौजेची नोकानोकी होऊन आपले जागीं आनमान राहिले. दुसरे दिवसी बाजीरावसा। यांची फौजचे कूच होण्याची बातनी इंग्रेजबाहादूर यानी राखून बारीचे तोंड धरून बाजीरावसा। याचा खजाना वगैरे लुटून खराब केला. फौज जिकडील तिकड फरारी जाहली. बाजीरावसा। पाच सातशेहे सवारानसी पलून गेले. याप्रा। वाणी मा।र याने सांगितले, त्याजवरून आपणास इतला लि।. धारुराहून टपेवर पत्र दोन लांजेस आल. लांजेकरानी इकडे पाठविले ते आपणाकडे रवाना केले आसे. पत्र लिहीते वेलेस धारुराहून पत्र आले, त्यात मा।र लि। की मागाहून फौजा वीस. पंचवीस हजार येताती. त्यात सरदार श्रीमंत चिमणाजी आपा व घाटके व निपाणीकर वगैरे ऐसे येतात. त्यास जमियेत काही त्वरित पाठऊन द्यावी. आम्ही आपले ठिकानी हुशारीने आहोत. कदाचित फौजचा रोख कलंबाहून दिसल्यास नवीन लोक ठेऊं. कलावे बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*Ganapatsing sends news of Bajirao's flight to Umarawati and of a brush he had with his British pursuers.*

7161

No. 197] [*29-4-1818*

श्री.

यादी चैत्र वा ८ बुधवार.

१ बालोजी कुंजर याजकडील काही सरंजाम मौजे सरडसाठ येथील कुरणात होता. पलटणे निरापार होताच त्याजकडे जाऊन मिलाला.

१ लस्करचा मुकाम मौजे मांडव येथे आला तेव्हा नाझरे आटपाडी येथील फौज मौजे पार नजीक इटे भालवणी येथे आला.

१ पलटणे नजीक आली तेव्हा फौजेतून निघोन फलटणांत छपून होते व त्याची खास पागा धर्मपुरीवर होती ती मौजे दुधबाव येथे फलटणानजीक आठ कोस घाटमाथ्यावर, ठेविली होती. मंगलवारी ती पागा व दुसरे दोनसे स्वार ऐसे मौजे माळेगाव, अमरसिंग जाधवराव याचे, त्या गावी गेले. आमचे गावचे स्वार आहेत त्याणी खचित बातमी सांगितली. ते स्वार आजच तिकडे गेले. फलटणांत कारभारी निंबाजी जाधव आहेत.

१ निपाणकर व सांगलीकर यांची फौज पेंढार त्यास सामील होणार असी बातमी आहे.

१ पुण्याकडील स्वार फुटकल येतात ते पलटणचा मार्ग सोडून रानातून रात्रीस जाऊन त्यास मिलतात.

१ माहादेवाची यात्रा मौजे लाहासुर्ण पो इंदापूर येथे वद्य प्रतिपदेस दोनसे स्वार येऊन लुटली.

१ तुरुक स्वार व चटेकरी गावोगाव चौकसीकरितां फिरतात परंतु ठिकाण लागत नाही. आपाजी पा कुरबावीकर व बापू कुलकर्णी बरडकर व व वागमोडे फोंडसिरसकर हे त्याचे मिलाफी आहेत.

¶[*Items of news communicating movements of the remnants of the followings of Baloji Kunjar, Nipankar and Sanglikar are noted in this paper.*

No. 198] [*Recd. 1-5-1818*

पो छ २४ माहे जो सानी
सन १२२७ फसली.

वडिलाचे शेवेसी विज्ञापना जे. श्रीमंतांचे फौजेपो पांच हजार लस्कर मौज सुकली ता धारूर व गोयेगाव प्रा आंबाजोगाईचे रानात कजेडी नदीवर उतरले आहेत. त्यांत सरदार येशवंतराव गोकले व विठलराव नाईक ऐसे आहेत

पुढें कूच करून कोणते मार्गानें जातात हे न कले. सिराढोणावरून जातात किंवा कलंबाहून जातात हे न कल. सिराढोणावरून जातात किंवा कलंबाहून जातात हे आदियाप समजत नाही. मागाहून सोनपेथवर फौज आली त्यात श्रीमंत बाजीरावसाो नाहीत. जमियेत भारी आहे म्हणोन वदंता आहे. तह-कीक नाही. बातमीस माणसे पाठविल आहेत. बातनी आल्यावर आपणास टप्यावर पत्र रवाना करून देतो. लस्करचा मार्ग आपले तालुकेतोन पडला, याजकरिता रात्रंदिवस बहुत राखून आहेत. आपणास कलाव हे विज्ञापना.

¶*The arrival of Yashwantrao Gokhale and Vithalrao Naik with their forces at Ambajogai is reported. The writer further says that Bajirao was not seen with the forces that subsequently came and encamped there.*

No. 199] *[1-5-1818*

पाो तरीख ६ माहे मे
सन १८१८ इसवी मुता-
बीक छ २९ जाखर.

कैफियत लषकर बाजीराव ताा छ २४ माहे जमादिसानी.

१ फौज चैंद्रपूर नागपूरचे खालत आहे तेथवर गेली होती. तिकडे इंग्रेज बाहादुर याची फौज आली म्हणून आवई खाऊन माघारे फिरून वरधा नदी नागपूरच थैलीकड च्यार मजली आहे तेथहि इंग्रेज बाहादुर यानी नागपुराहून येऊन गाठ घातली. काही लडाई जाहली. तुरब सवारानी दाटी करिताच फौजेची फुटाफूट होऊन फौज ताराज होऊन त्यास जो मार्ग समजला त्या मार्गे गेले. बाजीराव येका माळावर उभे होते ते पलीकड येक घोड व येक आंगावरील वस्त्रासुधा मात्र गेले. समागमे विंचुरकर व निपानीकर खासे गेले. दाहावीस हजार फौज निभून या देशास आली, त्यात निपानीची व इंचुरकर वगैरे फौजहि आली. आकलकोटकराची फौज काही निघून मांडव प्राोचे ठाण पानगाव येथ मोकाम करून आज करंजाळच मोकामास आले. फौज तेथून सता आठ मजली करून या प्रांतास आले. आपलाले सोईप्राो गेले. बाजीराव याचा सरंजाम व हाती, उंट वगैरे तमाम सलतनत लुटली गेली. आकलकोटकरी खासे या रोख आले म्हणून वर्तमान आहे. त्यास आद्यापि खचित वर्तमान आल नाही. याप्राो वर्तमान आहे. कलम.

7163

१ तोफखाना गुणवनच्या नदीवरून कूच करून पो इंडीस जाऊन मोर्चे लाऊन तेथ चालीसपनास माणस, जीव मारले गेले. लष्करचेहि लोक जाया जाहले. गाव घेऊन लुटून खराब केले. ठाण घेऊन मौजे हिली पो आकलकोट मोकाम करून घासदाणा देण म्हणून तगादा मौजे नागनसूर वगैरे स्वार पाठविले. तेथून कूच करून मैंदरगी व बंडगर तालुका तेथून मोगलाईत येणार यैशी आवई आहे. कलम.

१ निपानीस इंग्रेज बाहादुर याची फौज येऊन दाखल जाहली म्हणून वर्तमान आहे. तहकीक समजल्यावर लिहिणेत येईल. कलम.

येणेप्रा वर्तमान आहे. आणिखी वर्तमान येईल ते लिहिणेत येईल. तोफखानेच वर्तमान इकडून पाठवीत जाऊ. निलेगावकरास ताकीद आसावी म्हणजे वरचेवर आपणास पोंहचत जाईल.

¶*The defeat of the Peshwa's force near Chanda and its subsequent flight is reported in this news-letter. It also refers to some military action in Karnatak near Indi and Nipani.*

No. 200] [3-5-1818

पो छ ६ मे इसवी
मुताबीक छ २९ जाखर
सन १८१८.

श्री

साहेबाचे शेवेशी उमाजी शंकर मुा जेजोरी विज्ञापना. ताा चैत्र वाा १३ प्राथःकाल येथील वर्तमान: श्रीमंत बाजीरावसाहेब यांचे लस्करातून दोन सिलेदार आले. त्यानी वर्तमान सांगितले की, नागपूरचे आलीकडे वीस कोस बाजीरावसाहेब यांचे लस्करचा मुकाम होता. तेथे कुंपणी सरकारचे फौजचा छापा येणार असे समजले. त्याजवर बाजीरावसाहेब यांचे लस्करचे कूच होऊन नागपूरचे सुमार झाडीतून जात होते. बाजीरावसाहेब मेन्यांत बसून चालले तो पुढे खेत, पांच्यार तोफेचे बार जाले व छापा आला असे समजले. नंतर बाजीरावसाहेब मेन्यातून उतरून कुटुंबसुधा घोड्यावर स्वार होऊन पंचवीस तीस हजार फौजेनसी पळाले. मागे पुरंदरे व रामचंद्र सुभेदार व विंचुरकर यांची फौज होती ती माघले माघ पळाली. बुनगे लुटले गेले. तीस पस्तीस हजार फौजसुधा त्रिवर्ग गंगाखेडास अले. तेथून फौज फुटोन लोक आपलाले घरास जावयास लागले, तेव्हा पुरंदरे व रामचंद्रपंत लोकास म्हणू लागले जे तुम्ही घरास जाऊ नये;

बाजीरावसाहेब याजकडे जाऊ. लोक खर्चास मागू लागले तेव्हा उतर केले जे, बाजीरावसाहेब यांचे लस्करात पोहचल्यानंतर तुमचा रोजमुरा देऊन बक्षिसा देऊ. लोकांस खातरी होईना, तेव्हा बाहाना केला किंवा खरे हे न कले. दोन जासूद पत्र घेऊन बाजीरावसाहेबाकडोन अले की, आम्ही फौजसुधां उबरखेडावर आहो, तुम्ही यावे. तेव्हा पुरंदरे व रामचंद्र असे वीसपंचवीस हजार जमेतीनसी उबरखेडाकडे गेले. काही सिलेदार व विंचुरकराची फौज आठदाहा हजार असे फुटोन आपलाले घरास गेले. आम्हीहि त्याबराबर आलो, असे त्यानी वर्तमान सांगितले आणि अज आपले घरास सिलेदार गेले. सुप्याकडून वर्तमान अनविले तेथ माार कीं, इभ्रामभाई जितीकर पलसदेव इंदापूरचे सुमार बंड करून तिकडील गावास उपद्रव मनस्वी देतो व पाटसचे आलीकडे स्वार, चोर, राऊत रागात बेपारियास लुटून मानसे मारामार करून जखमी केले व मानसे मारिले. याप्राा वर्तमान कलल ते शेवेसी लिाा आहे. गंगाखेडास व औरंगाबादेकडे जासूद पाा ते अले नाही. वरचेवर वर्तमान आणून लेहून पाठवितो. शेवेसी शृत्य होये हे विज्ञाति.

¶*News of Bajirao's journey towards Nagpur and his sudden flight back to Umarkhed owing to British troops following him in pursuit, is sent by Umaji Shankar.*

No. 201] [*4-5-1818*

नकल

पाो तारीख १४ माहे मे
सन १८१८ इसवी मुताबिक
छ ८ रजब सन समान असेर मया
तैन व अलफ

रास्ते इलाका अथणी मामलेदारान
जेर्नल तामस मंड्रोल साो यांजकडे
असणार इलाका रास्ते यांचा वकील
बच्याजीपंतास लिहिल कागदाच नकल.

राजेश्रियाविराजित राजमान्ये राजेश्री बच्याजीपंत आपा स्वामीचे सोसी पाो गोविंद वासुदेव साां नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ताा चैत्र वाा १४ येथास्थित असे विशेष. खेमासिंग म्हणून सिलेदार आपले येजमानाजवल चाकरीस होत ते लष्कराहून आल. त्याणी वर्तमान सांगितले जे श्रीमंताची व फौजाची गाठ नव्हती. साहावे दिवसी उमरखेड्यावरी फौजेत श्रीमंत आले. तेथून अलीकडे

आउढा नागनाथचे मोकामास श्रीमंत फौजसुदा आले. आउढाचे मोकामिहून खेमसिंग मजकूर निघून काल येथ बारवे रोजी आला. आपले येजमानसो फोजेंत आउढाचे मोकामेंत आहेत. निपाणीकर व अकलकोटकर राजे लढाई जाहाल तेव्हा फौजेतून निघून गेले ते पुन्हां फौजेत आले नाहीत. निपाणीकराकडील सरजेराव घाटगे कांहीं जमियेतनिसी निपाणीस जावयास आले, त्याच सोबतीने खेमसिंग पंढरपुरापरियेंत येऊन इकड आला. सरजेराव निपाणीकड गेले. अकलकोटकर राजे अकलकोटेस गेले अस जबानी सांगितला, व तोफखानेस मिळावयास सोलापूरच रोखे श्रीमंत येणार असा बोलवी होती म्हणून सांगत होता, सिवनीवर लडाई जाहली, इंग्रेज बाहदूर यांची पलटण व तुरूपस्वार दोनीकडून आले. त्याजवरून श्रीमंत उभयेतां फौज सोडून गेले. विसाजीपंत गोकलेजी पळून झाडींत गेले, तेव्हां फौज उधळून उमरखेड्यास आली. नंतर साहवे रोजी गांठ पडली. येजमान आपले अलीकड च्यारी मजल आले, म्हणिजे निघून जागेवर येणार असें जबानी सांगितले. फौज व श्रीमंत तोफखान्याकड सोलापुराच सुमार येणार, तोफखान्यास मिळून येणार असहि बोलत होते म्हणून सांगितले. यैकिल बातमी समक्ष मी विचारून लिहिल आहे. चैत्र वा। १४ इंदुवासर प्रात:काल हे विनंती.

¶*Govind Vasudeo writes to Bachajipant, a Vakil of Rastia, reporting the news communicated to him by one Khemsing a deserter from Bajirao's army. It refers to the fighting between the Peshwa and the English near Sioni.*

No. 202] *[Received on 5-5-1818*

पो छ ९ माहे मे सन
१८१८ छ २ रजब.

कैफियेत लस्कर.

१ आज आलफ्ते दिवसी दिवसी राजे आकलकोटकर दरशणहलचे मुकामांस आडीच प्रहरा दिवसा आले. दीड प्रहर रात्रौ कसबेस गेले. कलम.

१ बाजीराव यांची व राज्याची फूट च्यारठाणेवर जाली. ते राज्याचे देवलेकड गेले. तेथून सातपुडचे घाटाकड जाणार. समागमे फौज च्यारपांच हजार आहे. इंचूरकर दीड हजार, निपाणीकर पांचशे व होलकराकडील दोन हजार व गोखल्याकडील सुभेदार च्यारपांचश येणप्रो जमियेत आहे. कलम.

१ फौजवर धांदल जाली. ता १० जारीस पांचश लैन व तुरप सवार तीनश होते. धांदल केली. कलम.

१ फौजतून बाहीर व बुनग आल त्याचे पिछ्यावर येक टोली आंबेकडून आली व येक टोली धारूरचे घाटाखालून नजीक हिंगणीवर मुकाम दोनी टोल्याचा जाला. कोणीकड जातात पाहाव. कलम.

१ तोफखानेवाल्यानी आकलकोट प्रांचे हिलीवर मुकाम करून तालुकियात धांदल केले. काही घासदाणा घेऊन तह ठरविला. उदईक कूच करून जेऊरी प्रा आबजलपूर येथे मुकामास जाणार. लस्करात श्रीपतराव बोलणेस गेलेत ते लस्करातच आहेत. लस्करात तोफा सुमारी १४, पायेदल पांचसाहा हजार व सवार दीड हजार व लुटारी, येणेप्रा जेमियेत आहे. कलम.

¶*News about the dissolution of Bajirao's army is reported.*

No. 203] [*5-5-1818*

पो तारीख ६ माहे जून
सन १८१८ इसवी मुता-
बीक छ २ शाबान.

श्री

हजरत खुदावंदन्यामत सरदार अलिशान खुदायगा
नवाबसाहेब बाल बाहादुर याचे खिजमतीत

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बाद बंदगी आदाब तसलिमात कुरनिशात बज्या आऊर दे मारूज मे रसानद आके येथील खैरसला अखबार देवढी मुकाम मगलवेढ नजीक श्रीपंढरपूर ता छ ५ माहे जून सन १८१८ इसवी मुताबीक छ ३० माहे रजेब सन १२३३ रोज शुक्रवार पो येथास्थित असो विशेष.

इकडील मार :

१ पंढरीकडील मार :

१ सातारियाकडील ठाणे रा आबाजी नरहर घेऊन क्षेत्री राहिले होते. हुकूम येताच सिवबंदीचे लोक फलटणाकडे गेले व मोहोलकडील मोहोलस गेले.

१ बडवे यास, ववरी खाली करून देणे, देवाचे वस्त्रआलंकार काये आहे ते लेहून देणे म्हणोन जरब दिल्ही होती. सबब उगेच बसण्यास साहा हाजार रो ठाणेदार याणी घेतले. [पुढील ३ कलमे गाळली.]

7167

१ उतरेकडील वदंता लोक बोलतात, पेंढारी याणी च्यार टोल्या करून चौ दिशेस गेले. सिंदे, जाट, होलकर, राजेरजवाडे येकत्र होऊन श्रीमंतांच्या भेटी जाहाल्या. सिंदे इकडे येतात ऐसी बोलवा उठली आहे.

१ लस्कर पंढरीस येऊन दाखल जाले. सरदाराचे नावाचा शोध घेऊन वर्तमान लिहितो.

[पुढील १ कलम गाळलें.]

१ छं ३ तारखीची अखबार रवाना केली ती येऊन पोहोचलीच आशेल.

१ रो येशेवंतराव पानशे येथे येऊन राहिले आहेत.

[पुढील १ कलम गाळलें.]

१ रो चिंतामणराव आपा याजकडील तेरा स्वार सांगलीकडोन येथे आले.

१ मौजे येतन्हाल येथील कतबा व मौजे होटगी येथील कतबा ऐसे सातारियास रवाना जाले.

सदरहू मार साहेबाचे खिजमतीत लिा आहे. बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त.

¶*Balvantrao Bapuji reports the news received by him from Satara and from the north regarding the movements of the Peshwa and some of his Sardars.*

No. 204] [*6-5-1818*

पो छ १० माहे मे
सन १८१८
इसवी मुताबीक छ रजब

हू

अजम आक्रम इलीफिसतन
साहिब बाहादूर दाम मोहबत हू

ʃ साहेब खुषवख्त मेहेरबान कदरदान नियाजमेदा आजनीयां आजम रंगो वासुदेव सलाम बाजद सलाम आंकी. येथील खैर आफीयत तेरीख छ २९ जाखरपावेतो साहेबाचे येकबालेकरून मुा फलटण येथे खैर आसो. दिगर ठाणे मजकूरचा बंदोबस्त हुकुमाबमोजीब हुशारीने राखोन आहे. बाजीरावसाहेब याचे लस्करावर सरकारचा छापा पडोन उधळली ते आपलाले घरी जीव संरक्षून येत आहे. याचा पर्याय चौकसी करून सातारियांस साहेबास लिहीत आहे. बाजीरावसाहेब याजबरोबर पुरंधरे, आपटे, डेंगले वगैरे सरदार दाहा वीस हजारानिसी पुढ पळोन आवंढ्या नागनाथाचे डोंगरचे झाडीत हाली आहेत म्हणौन वार्ता ऐकण्यात परस्परे येत आहे. याचा पका तलाश करून खिजमतीस

आर्जे तपशीलवार लिहून पाठवीन. बाज़ीरावसाहेब याजबरोबर जानराव नाईक निंबाळकर व निपाणकर आहेत. ज्यादा काये लिहिणे. प्यार मोहबत कीजे हे किताबत.

¶*Rango Vasudeo reports to Elphinstone news from Phaltan regarding what he had heard of Bajirao's flight.*

No. 205] [*9-5-1818*

पौ तेरीख १४ माहे मे

सन १८१८ * * ८ रजब

सन समान असर

श्री

हजरत खुदावंत न्यामत सरदार

अलीशान खुदायगा नवाब साहेब

बालबाहादूर याचे खिजमतीस

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बादबंदगी आदाब तसलीमात कुरनिशात बज्या आउरदे मारूज मे रसानद आके. येथील खैर सला अखबार देवढी मुा मंगळवेढ नजीक पंढरपूर ताा छ ९ माहे मे सन १८१८ इसवी मुताबीक छ ३ माहे रजब सन १२३३ रोज शेनवार पो येथास्थित असो विशेष. इकडील माार

१ पंढरीकडील बातमी

१ पंढरीस रहिमतपूरकर राा जोतीबा माणे निाा निपानकर पंचेवीस स्वार दोन हाती वगैरे सरंजामसुधा पळून आलेला येऊन राहिला आहे.

१ तालुके भोस येथे ठाण्यात सिवबंदी होती त्यास बरतर्फ करावयास लागले आहेत.

१ आपल्याकडील सरंजाम ठाणे बसावावयाकरिता येलापुराकडे नरासिंव्हपुराकडे आले आहेत म्हणौन

१ श्रीमंत पंतप्रधान बंधूच्या भेटी होऊन बारीपार होऊन फौजसुधा गेले म्हणौन पंढरीस बोलवा आहे.

१ पंढरीस बरतर्फी आरब दीडशे दोनशे येऊन राहिले आहेत.

१ या माराची अखबार हजरत जनरेल तामस मडराल साहेबास दाखल केली. आजचा त्याचा मुकाम सोलापूरचे आलाड दोन तीन कोसावर आहे म्हणौन बातमी आहे.

१ छ ७ तारखीची अखबार रवाना केली ती येऊन पोहाचलीच आशल. माार साहेबाचे खिजमतीस लिाा आहे. बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त.

¶*The arrival of Thomas Munro near Sholapur and other items of news from Pandharpur are reported by Balavantrao Bapuji to Elphinstone.*

No. 206] [10-5-1818

तरीख १४ माहे मे सन १८१८
इसवी मुताबीक छ ८ रजब
सन समान असेर

श्री

हजरत खुदाबंद न्यामत सरदार
अलीशान खुदायगा नवाब साहेब
बालबाहादूर याचे खिजमतीस

अर्जदास्ता फिदवी बलवंतराव बापूजी बादबंदगी आदाब तसलीमात कुरनिशात बज्या आऊरदे मारूज मे रसानद आके. येथील खैर संला अखबार देवढी मुा मंगलवेढ नजीक श्रीपंढरपूर ताा छ १० माहे मे सन १८१८ इसवी मुताबीक छ ४ माहे रजब सन १२३३ रोज रविवार पो येथास्थित असो विशेष. इक-डली मार

१ येथे आरब पनास साठ आा येऊन उतरले होते म्हणौन लिा होते, ते काल तोफखान्यास जाऊन मिलाले म्हणौन बातमी लागली. कलम

१ निपानकर याचे तर्फेचे सिलेदार पलून आलेले येथे पंधरा स्वार च्यार उंट येऊन उतरले आहेत.

१ छ ९ तारखीस आस्तमाणी लस्करात अखबार घेऊन गेला होता तो आला. त्याणे बातमी आणली. तोफखाना छ ८ तारखीस दोन प्रहरा रात्रीस सोलापुरास दाखल जाला. आपलेहि लस्कर मौजे देवगावचे वढ्यावर जाऊन उतरले आहे. आपल्याकडील तुरूप तलाव्यास गेले होते, त्याणी किल्यावरून च्यार तोफा डागल्या म्हणौनहि बातमी आणली. तेथून पुढे कचा येक कोस मौजे बाले म्हणौन गाव आहे. तेथील गढी लढाऊ आहे. तेथे पानशे याणी च्यार तोफा ठेऊन जागा बलाकाविली आहे. मोर्चा बदला आहे. लढावयाचा दम बहुत आहे. आणखी किल्यात गावची रयेत देशमुख व देशपांडे शेट्ये माहाजन व बारा हाकदार नेऊन बसविले आहेत. फितूर होईल म्हणौन. आज आणखी अखबार लस्करात पाठविली आहे. काये बातमी येईल ती खरी

१ रोा चिंतामणराव आपा याचे आपल्या लस्करात पंचेवीसक स्वार कारकून भालदार गेले होते ते माघारी आले. कलम

7170

१ आपले लस्करात मौजे पाथरीचे मुकामी नवकर राहावयास मुधलकर घोरपडे लाहान मोठे शेंभरीक स्वार आले आहेत. हजरी घेतली. जामिन मागत होते. साहिबाचीहि भेट जाहाली होती. कलम

१ आपल्याकडील पलटणे हेदराबादकडोन दुरगाकडोन काटेमारडीचे मुकामास आले म्हणौन लस्करात जासूदच आले होते. कलम

१ सोलापूरचे आसपासचे खेड्याचे जमिदार साहेबास येऊन भेटले आणि चटेकरी रखवालीस नेले :—

१ मौजे हिरज	१ मौजे कामथी
१ मौजे देगाव	१ दुसरी कामथी
१ मौजे बेलाटी	१ मौजे वटवट

१ आपल्याकडिल ठाणे बसविले व ताकीद केली :—

१ काशेगाव	१ मासणूर
१ सांगोल	१ बेगमपूर
१ घेरडी	१ बनपुरी

१ किल्यात सोनार गोल्या घडावयास लावले आहेत. मौजे बाल येथपरियेंत झाड होते ते तोडले म्हणौन बातमी आली. जागा मैदान केले. कलम

१ नरखेडाजवल मौजे देगांव येथील घावणे सिलेदार पलून आले. वरात आले आहेत. म्हणौन बातमी आहे. कलम
मौजे कडलास प्रो सांगोले येथील मुसलमान व मऱ्हाटे शे दीडशे स्वार पलून आलेले घरास आले आहे. रा वामनराव आपटे याचे हुजरातीत होते. कलम

१ छ ९ तारखीची खबर रवाना केली ती येऊन पोहोचलीच आसेल.

सदरहू कलम साहेबाचे खिजमतीत लिा आहेत. बंदगीस रोषन होये हे अर्जदास्त.

¶*Balvantrao Bapuji reports to Elphinstone the operations at Sholapur. Some administrative items are also mentioned.*

7171

No. 207] [11-5-1818

तरीख १७ माहे मे सन
१८१८ इसवी मुा छ १२
रजब.

श्री

HONOURED SIR,

साहेबाचे शेवेसी रावजी बालाजी विनंती विज्ञापना विशेष. श्रीमंत बाजीराव-साहेब यांची स्वारी धुलकोटास आहे. धुलकोटास अशरखाली गाव आहे. बराणपुरापुढे बारा कोश बाजीरावसाहेब याचे भेटीस राजश्री येशवंतराव लाड अशरचे किलेदार हे गेले होते व कृष्णराव माधव भुसकुटे सरदार सिंदे याजकडील बराणपुरी असतात याजकडील कारकून व बराणपूरचे सुभेदार याजकडील कारकूण काही सिधा व पोशाक घेऊन गेले होते व लाडानीहि मेजवाणी केली व सूरयाजीराव निंबालकर यावलकर याजला श्रीमंतानी बोलाऊ पाठविले होते, परंतु ते गेले नाही. कारकुनाबराबर काही पोशाक व भोजनाचे सरंजाम पाठविले होते. पुढे श्रीमंत कोठे जातील हे समजत नाही. बराबर सितू पेंढारी व कान्ह्या भिल आहे. कुटुंबास असरीचे किल्यात ठेवणार असी वंदता आहे. मग पाहावे. बराबर फौज सुमारी सात हजार आहे व रामदीनहि आहे. साहेबास कलावे हे विज्ञापना. छ ११ मे सन १८१८ * * * वाजता रात्री.

Honoured Sir,
Your most obedient humble servant,
Rowjee Ballajee.

Kherighaut+
11th May 1818.

¶*Raoji Balaji communicates news of Bajirao having arrived at Dhulkot near Ashirgad whose killedar Yashvantrao Lad, says the letter, gave shelter to the family of the Peshwa.*

No. 208] [11-5-1818

तारीख २१ माहे मे सन १८१८
ईसवी मुताविक छ १६ रजब

श्री

साहेब वाला मुताबीक अलीशान
हनराबल मौट इष्टवारीट इलफिसतन
साहेब बाहादूर सलामत

९ खिजमतीस बालाजी नारायण नातू बाजद सलाम अंके येथील खैरयत छ १२ रजबपावेतो साहेबांच मेहेरबानीचे नजरे करून खैरयत असे. दरीविला मुलीचे

+ खेडीघाट.

लग्न करावयाचे, त्यास साहेबांस अर्ज करून व्हावे ही इछा. परंतु साहेबाचे कदमापासून दूर राहणे जाहाले, यामुळे मेहरबां ग्रांटसाहेब याजवल साहेबाचे खिजमतींत ल्याहावयाविसी अर्ज केला, त्याणी साहेबास लिहिलेच आहे व तर्तूद करण्याविसी मला हुकूम दिल्हा, त्यावरून. वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नीलकंठ शास्त्री थते याचा पुत्र वर निश्चय करून वैशाख वद्य पंचमीस लग्नतिथीचा निश्चय केला आहे. साहेबाचे कदम मुबारख होऊन कार्य सिधीस जाई ते जाहाले पाहिजे. लोखड परसास लागल्यावर सोने होईल की नाही ही कालजी लोखंडास राहात नाही. माझे मनांत काय आहे ती येते वेलेस विनंती केलीच आहे. हे आर्जदास्त.

¶*Balajipant Natu communicates to Elphinstone that he intends marrying his daughter to the son of Nilkanth Shastri Thatte and asks his blessing.*

No. 209] [*12-5-1818*

पौ छ १५ माहे मे सन
१८१८ ईसवी मुताबीक
छ ९ रजब

श्री

हजरत खुदावंद न्यामत सरदार अलीशान
खुदायगा जरनेल तामस मंडरोल
साहेब बालबाहादूर याचे खिजमतीत

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बादबंदगी आदाब तसलीमात कुर्निशात बज्या आऊर दे मारूज मे रसानद आके. येथील खैरसला अखबार देवढी मुकाम मंगलवेढ नजीक श्री पंढरपूर ता। छ १२ माहे मे सन १८१८ इसवी मुताबीक छ ६ माहे रजेब सन १२३३ रोज मंगलवार पा। यथास्थित असो विशेष. इकडील मार.

१ सोलापुराकडील वर्तमान आपल्याकडील दोघे तिघे जासूद दोघे तिघे लष्करात बातमीस गेले ते परतले नाहीत. परंतु तोफखान्याचा पल दरोबस्त स्वार व काही आरब व सिदी व काही गोसाई जखमी केलेले येथ येऊन उतरले आहेत. छ १० तारखीस मोठीच लढाई जाहाली. आवायाहि फार आले. तोफखान्याकडील हजार पाचशे मणुशे ठार जाले. तिकडील सरदार रा। विठल बच्याजी व काकोपंत ठार जाले. आपल्याकडील याणी पेठत जाऊन मोर्चे लावले, त्यामुळे आपल्याकडीलहि बहुत खराबा जाहाला.

प्रहरा रात्रीस काल पटवर्धण याचे वकिलाचे पत्र आले. हजरत जरनेल तामस मंडरोल सो पडले. काही काल बहुतसी लढाई जाहाली नाही. तोफखान्याचे पलामधे आपल्याकडील तुरुपानी दऊड करून सापडले त्यास तोडलेच. मोठी सड[१]ग्धान केली. हजार पाचशे मणुशे जखमीहि केले. ज्याला जिकडे वाट फुटली तिकडे पलाले. याप्राो मार आहे. पुढे काये खबर येईल ती खरी.

१ किल्यात फितूर होईल म्हणोन रा॥ भाऊ गोडबोले व विठलपंत गाडगील या उभयेताचे पायात बेड्या घालून पानशे यानी टाकले आहेत. हाली लढाई चालेली आहे. मोठा दम आहे. किला बलकाऊन रा॥ गणपतराव पानशे याचे हातास गोल्याची जखम जाहाली म्हणौनहि बातमी आहे. आपले लस्कर किल्याचे पोटी पडले आहे. येथे पाो लाग केला आहे.

१ रा॥ दुलेखान आपले लस्करास सामील आले होते तेहि पडले म्हणौन आवाई आहे.

१ रा॥ विठोजी नाईक गाईकवाड पलून आलेला च्यालीस पनास सरंजामानसी पंढरीस येऊन राहिला आहे.

१ आपल्याकडील ठाणे या प्रांतात दरोबस्त बसले. पंढरीस भालवणी आकुलूजेस ठाणे गेले आहे.

१ तालुके भोस येथे आपटे याजकडील ठाणे होते ते जाऊन माणकेश्वर याचे ठाणे बसले. तेथे आपलेहि ठाणे जाणार होते. कलम

१ रा॥ महिपतराव मामा रेवडीकर पलून आलेले पंढरीस येऊन राहिले आहेत. त्याणी सांगितले, जे दिवसी श्रीमंत पलाले ते दिवसी येके दिवसात वीस कोस गेले. जवल खावयास काही नाही. माझे परतालेचे तट्टू येऊन मिलाले तेव्हा आन्न मिळाले. जितके सरदार तितके बरोबर आहेत. दशा सांगता पुरवत नाही. दाहा पंधरा हजार फौज बरोबर आहे म्हणौन सांगत होता.

१ छ १० तारखीची अखबार रवाना केली ती येऊन पोहोचलीच आशल. बातमी लवकर कळवावी म्हणोन लखोट्यास घागरी बांधली आशे. रागास येऊ नये.

सदरहू कलम साहेबाचे खिजमतीत लिा आहे. बंदगीस रोशन होय हे अर्जदास्त.

¶*Balvantrao Bapuji communicates the progress of the siege of Sholapur. He also reports the distressing condition of Bajirao's flight.*

---

1 Marred or spoiled state = शेणसड्याची घाण, अवस्था.

No. 210]　　　　[*13-5-1818*

तेरीख २७ माहे मे सन
१८१८ ईसवी मुताबिक छ १४
रजब

श्री

हजरत खुदावंद न्यामत सरदार अली
शान खुद्दायगा नवाबसाहेब बाल
बाहादूर याचे खिजमतीत

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बादबंदगी आदाब तसलीमात कुरनिशात बज्या आऊरदे मारूज मे रसानद आके. येथील खैर सला अखबार देवर्दी मुा मंगलवेढ नजीक श्रीपंढरपूर ताा छ १३ माहे मे सन १८१८ ईसवी मुताबिक छ ७ माहे रजेब सन १२३३ रोज बुधवार पाो येथास्थित असो विशेष. इकडील माार कालचे अखबारीत लिो. जासूद गेले ते आले नाहीत. त्यास काल प्रहर रात्रीस जासूद आले. त्याणी बातमी आणली. लढाई चालेली आहे. तोफ-खान्याचे दरोबस्त लोक किल्यात सिरले आहेत. आपल्याइकडील लोक पेठत जाऊन मोर्चे लाऊन रेवणीस लागले आहेत. लस्करात हावालदिली नाही. लोक हुशार आहेत. वरचेवर मणुशे पडतात. किला आद्याप जेरीस आला नाही. मणरूपचे आंगून तोफा लावल्या आहेत. कोण पडले कोण राहिले हे कोन्ही लस्करात बोलत नाहीत. पनास पाऊनशे डोल्या जातात येतात. तोफखान्याचे स्वार व पायेदल बाहीर होते त्यास निरोप दिल्हा. त्याचे मावे आपल्या इकडील तुरूप व काही लयेणचे लोक याणी दऊड करून मोठी सडघान केली. दोन तीन कोस मुडदे पडले आहेत. काही पलून गेले. लस्करात याप्रो बातमी आहे. बाहीर व येथे मुखत्यारच पडले म्हणौन लोक स्पष्ट बोलतात. किल्यात येथे वकिलाचे पत्र आले त्यात सरदार पडल्याचे वर्तमाण लिो ती बातमी रो गोविंदपंत बोक याणी येऊन सांगितली त्यावरून ऐकिले ते लिहिणे प्रास जाले. परंतु लस्करातहि बोलतात. ऐसी लढाई कधीच घेतली नाही. उभयेपक्षी मणुशे बहुत मेले. बाजार बातमी तर मणश्वी येतात. रात्री येकाण सांगितले की दुलेखान यास गोली लागली, तेव्हा धोत्रीकडे घेऊन चाले तो वाटेतच काल जाहाला आणि लस्करात तर कोन्ही कोन्हासी बोलत नाही. निवल जाल्यावर खरे खोटे वर्तमाण कलल. दुसरे येकाण सांगितले ज्यानखान जमादार पहिले पानशे याजकडे नवकर होता. हाली त्याजपासी च्यार हजार आरब आहेत त्यास पत्र पाो आहे. तिसरे येंकान सांगितले रो भाऊ गोडबोले पुढे होते त्याणी व

पेठचे शेव्याने फितूर केला म्हणौन आपल्याकडील लोक पेठेत सिरले. गोडबेले आपल्या लस्करात मिलाले. शेव्या यास धरून पानशे याणे तोफचे तोंडी देऊन उडविला. जेऊरचे टप्याकडील वरधी आली. आपल्याकडील येक पलटण * * सिनावर आले आहे व श्रीमंताचे माघे पलटणे होते ते धारुराकडे आले आहेत. कलवि. तासगावकर पटवर्धण याजकडील वकील रा बापू म्हसकर आज येथून आपले लस्करास गेले. छ १२ तारखीची अखबार रवाना केली ती येऊन पोहोचलीच आशल. मार साहेबाचे खिजमतीत लिा आहे. बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त.

¶*Balwantrao Bapuji reports the severe fighting at Sholapur and news from other places.*

No. 211] [*14-5-1818*

नकल.

श्री

मोहर.

यादी किले सोलापूर येथील ठरावाची कलमे. सुा समान असेर मयातैन व अलफ. छ ८ रजब सन १२४७ वैशाख शुा ९ गुरुवार शके १७४० सन १८१८ माहे मे छ १४.

१ किलेदार व दरकदार व कारकून जमादार व सिलेदार बारगीर व बाजे लोक वगैरे आपलाली बायेकामुले कचेबचे चीजबस्त हत्यार पत्यार घोडे तटू बैल गुरे वगैरे सुधा घेऊन जातील त्यास उपसर्ग देऊ नये. पार करून द्यावे. कलम.

१ गणपतराव भाऊ पानसे यास व त्याची चीजबस्त घोडे तटू कारकून मंडळी शागीर्दपेशा झाडून पार करून द्यावे.

१ गावातील कारकून हाजरनीस सिबंदी किल्यांत चाकरीस होते ते किल्यातून बाहेर निघोन गावात व परगावी आपलाले घरी मुललेकर चीजबस्त सुधा राहतील त्यास कौल देऊन हरयेकविसी उपद्रव लागो नये.

१ कौल द्यावयाचे तपसील :

  १ गणपतराव भाऊ यास कौल व पत्रे :

    १ चीजबस्त कारकून व मंडळी सुधा व खासगत पार व्हावयाचा कौल;

    १ पुण्यात जाऊन आपले वाड्यात हरयेक जागा राहतील व त्याचे सरंजामाच्या वगैरे पेशजीप्रमाणे बंदोबस्त करून देण्याविसी अलपिस्तन साहेब यास पत्र.

२

7176

१ विसाजी देवराव किलेदार यास कौल व पत्रे :

१ चीजबस्त मंडलीची व खासगतसुधा घेऊन जाण्याविसीचा कौल.

१ पाछापूरच वतन पेशजीपासून सालगुदस्तपावेतो चालत अल्याप्रो पुढे चालवण्याविसी मामलेदार यासी पत्र.

१ घरची बायेकामुलेमाणसे चीजबस्त व जती व बंदीस ठेविले आहित म्हणोन वर्तमान आहे. येविसी मामलेदार याचे नाव पत्र देऊन मोकले करून स्वाधीन करावे.

१ पुण्यात बाग नवी विहीर खणून केली आहे. आम्हाकडे चालविण्याविसी अलपिष्टनसाहेब यास पत्र द्यावे.

४

१ जमादार व लोक वगैरे यांचे नावे कौल की, ज्यास जेथे सोय पडेल तेथे त्याणी राहिले असता उपसर्ग देऊ नये.

१ गणेश नारायेण जोसी कारकून याचे घर मौज हिडील ता। साळसी येथे आहेत. ते आपले घरी चीजबस्तसुधा जाऊन राहातील. त्यास हरयेकविसी उपसर्ग होऊ नये म्हणोन किले मालवण येथील मामलेदार यास पत्र.

४

सदरहूप्रमाणे ठरून कौलपत्र देऊन गोलागोली बंद जाहाल्यापासून साहा प्रहरात किला हवाला करून बाहेर निघोन जाऊ.

येणेप्रमाणे पाच कलमे.

इंग्रजी हेरफ.[१]

¶*This paper mentions the terms of capitulation agreed to between the British commander and the defenders of the fort of Sholapur, Ganapatrao Panse and Visaji Devrao Deshpande of Pachhapur. The siege of Sholapur was a memorable event of the last Maratha War and has been graphically described in these papers.*

[१ हर्फ; हरफ=अक्षर; लेख.]

7177

No. 212] [14-5-1818

तेरीख १७ माहे मे सन १८१८
ईसवी मुा छ ११ रजब

श्री

हजरत खुदावंदन्यामत सरदार अली
शान खुदायगा नवाब साहेब बाबल-
बाहादूर याचे खिजमतीत.

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बादबंदगी आदाब तसलीमात कुरनिशात बजा आऊरदे मारूज मे रसानद आके. येथील खैरसला अखबार देवढी मुा मंगलवेढ नजीक श्रीपंढरपूर ताा छ १४ माहे मे सन १८१८ इसवी मुताईक छ ८ माहि रजब सन १२३३ रोज गुरुवार पो येथास्थित असो विशेष. इकडील माार लस्करातील आ(व)घा शोध आनविला. त्यास आपल्याकडील

१ सरदार लोक व साहेब लोक व हजरत खुदावंद जरनेल तामस मंडरोले[1] साहेबसुधा खुशाल आहेत. रविवारचे लढाईतच काये लोक पडले ते मात्र पडले. आलीकडे काही (लो)क बहुतशे पडले नाहीत. पाठीसी पेठ टाकून गाव हास्तगत करून कौल देऊन किल्यानजीक जाऊन मोर्चे लावले आहेत. लढाई चालेली आहे. किल्याकडील जमा(व) बाहीर काही नाही. आत पाच साहा हजार लोकाचा जमाव सांगतात. कलम

१ श्रीमंताकडील माार आशेरीस दाखल जाहाले म्हणौन बोलतात. तिकडील पत्र आले ते आपले लस्करात सापडले म्हणौन बोलतात. त्यावरून शे पनास तुरूप कामगारीस जरूर पो म्हणौन बातमी कलली. बाजार आवाई बोलतात की वैशाख आखेरीस आम्ही येऊन पोहोचतो म्हणौन लिा होते. रूमचे पातशाहाकडील तीन दस्ते फौज कुमकेस आली आहे व होलकरा-कडील दोन कंपू सामेल जाहाले आहेत. याप्रा जेण वदंता उठली आहे. कलम

१ राो रामचेंद्र व्येंकटेश सुभेदार तुलजापुराचे पलाड च्यार मजली आले आहेत. सोलापुरास येणार म्हणौन आवाई बोलतात. कलम

१ छ १३ तारखीची अखबार रवाना केली ती येऊन पोहोचलीच आशल. खुशालीचे साहेब लोकाचे वर्तमाण ऐकिले म्हणौन जरूर बातमी पोहोचावी याकरिता लखोट्यास घागरी बांधली आशे. रागास न यावे. कलम

सदरहू कलम साहेबाचे खिजमतीत लिा आहेत. बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त.

¶*This is a news-letter from Mangalvedhe by Balwantrao Bapuji communicating the fighting at Sholapur and the movements of Bajirao.*

1 General Thomas Munro.

No. 213] [Recd. 14-5-1818

तारीख छ १४ माहे मे सन १८१८
इसवी मुा छ ८ रजब.

श्री

खुदावंद न्यामत खुदायेगाण सो आल-
फिष्टीन सो मद्दीलहुल.

सोची खिजमतीस येशवंत बाबूराव टपा तुळजापूर सलाम खुा सलाम आंकी. येथील खैर सला जाणोन साहेबी आपली खैयेर हमेशा लिा गेले पाहिजे. दिगर मार हजरत जरनेर मकुरुर सो याणी छ मारी रात्री सोलापुरावर हला चढऊन पेठ घेतली. मणुसेहि जाया जाले. रा गनपतराव पानसे याजला जखम लागली. घोडाहि पडला. पानसे मार यांचे मणुसे आरब वगैरे फार पडले. जरनेर मकूर साहेब याणी पेठेत येक वाडा बलकाविला आहे. पानसे याचे कडील घोडेस्वार जे श्रीमंताकडील आले ते झाडून पळाले. पानसे मात्र येकला किल्यावर गेला येस बातमी आली. आज तोफखाना सोलापुराबाहेर त्याचा आहे. येणेप्रो वर्तमान जाले ते सोस लेहून पा. सा कलाव हे किताबद.

¶*News about the fighting at Sholapur is sent by Yashwant Baburao to Elphinstone.*

No. 214] [15-5-1818

तेरीख १९ माहे मे सन
१८१८ इसवी मुताबीक
छ १३ रजब.

श्री

हजरत खुदावंद न्यामत सरदार अलीशान
खुदायगा नवाबसाहेब बालबाहादुर याचे खिजमतीत

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बाबूजी बादबंदगी आदाब तसलिमात कुरनिशात बाज्या आऊर दे मारूज मे रसानद आके येथील खैरसला. अखबार देवढी मुा मंगलवेढ नजीक श्रीपंढरपूर तो छ १९ माहे मे सन १८१८ इसवी मुताईक छ ९ माहे रजेब सन १२३३ रोज शुक्रवारपो येथास्थित असो विशेष. इकडील मार :

१ जेऊरचे टप्याकडोन वरधी आली :
 १ आपल्याकडील पलटण आले ती बोलवा तो
  १ पानाचे निंबगावाकडे येक म्हणोन,

१ परांड्याकडे च्यार पलटण व मोगलाकडील दोन हजार फौज म्हणोन बोलवा आहे,

१ पेडगावाकडे तीन च्यार पलटणे म्हणोन बोलवा आहे.

---

१ गोखल्याकडील तीनच्यार हजार फौज मौजे वासीम टप्याचे गावावरून इंदापुराकडे गेले. काही फौज बारसीकडेहि आली म्हणोन बोलवा आहे.

१ रो भगवंतराव नि॥ पिंगले याणी मौजे निंबगाव लुटले. तीनशे स्वार व दोनशे पायेदल होते म्हणोन वरधी आली.

१ दुलेखान याजकडील सरंजाम बांगीवर होता तो कोरटीकडे गेला म्हणोन वरधी.

---

१ तोफखान्याचा पल पंढरीस जखमी वगैरे पायेदल दोनीक हजार व स्वार च्यारपाचशे ऐशे पंढरीस छ १२ तारखीस येऊन राहिले होते.

१ सातारियाकडोन पंढरीस ठाण्याकारिता च्यार कारकून व तीस आ॥ सिपाई छ १२ तारखीस येऊन दाखल जाहाले.

१ प्रथम पंढरीस आपल्याडील ठाणेदार आले होते त्याणी बडव्यास बोलाऊन हुकूम केला. देवाचे डागिणे काये आहेत ते व वस्त्र व मिलकत व श्रीमंताकडोन काये पावत ते व खर्च ऐशे लेहून देणे. बडवे याणी उतर केले, आमचा मुखत्यार आहे तो पुण्यास गेला आहे.

१ हजरत खुदावंद जरनेल तामस मंडरोलसाहेब यासहि अखबार रवाना केली आशे.

१ छ ३ तारखीचे खत व माहे आपरेल महिन्याचे पगारा बा॥ हुंडी रवाना केली ती छ १४ तारखीस येऊन दाखल जाले. मुदत प्रो ऐवज पावेल.

१ सातारियाहून जाहीरनामा. श्रीमंताचे बरोबरची फौज दाणादाण होऊन देसी लोक आपले घरी आले ते व येणार व राहिले त्याची चौकसी गावोगाव करून बातमी कलवीत आसावी व बंडाचे बरोबरचे लोक व मुलूक लुटणार याची बातमी कलवीत आसावी म्हणोन हुकूम आला छ ६ तेरखीस खत रवाना केले ते छ १४ तारखीस दाखल जाले. हुकुमाप्रो करितो. पुण्यास व आमचे नजीक जिल्हेस लस्कर येतील त्यास व सा * * यास कलवावे म्हणोनहि लि॥ आले.

7180

१ रो बामणराव आपटे याची घोडी काशेगावचे ठाण्यात पहेल होती त्यावर आपल्याकडील ठाणे बसले म्हणोन घोडी पंढरीस होती. चंदी आनावयाकरिता मोतातदार मौजे मेलवडीस घेऊन गेला तेथून उधळून ठाण्यात गेली. तेथून ती घोडी सांगोल्याचे ठाण्यास पाठविली. घोडी मातबर होती म्हणोन बातमी कळली.

१ सोलापूरचे लस्करपो दोघे साहेब लोक व पनास पाऊणशे स्वार व च्यारशे साडेच्यारशे बैल व काही सिपाई लोक जाऊन पंढरीस उतरले आहेत म्हणोन बातमी आली.

१ पुण्याकडोन दारूगोलीचे बैल व आपल्याकडील काही सरंजाम दोनतीन कोसावर आले आहेत म्हणोन पंढरीकडील बातमी आली. –

सदरहू कलम साहेबाचे खिजमतीत लिो आहेत. छ १४ तारखीची अखबार रवाना केली ती येऊन पोहोचलीच आशेल. बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त.

¶*The news mainly concerning the dispersion of Maratha armies that Balwantrao Bapuji received through his agents from Jeur, Satara, Pandharpur, Sholapur, etc., is reported by him to Elphinstone.*

No. 215] [*16-5-1818*

तरीख १८ माहे मे सन
१८१८ इसवी मुताबीक
छ १२ रजब.

हुर.

अजम आक्रम हनराबल मौंट इष्टवारिट
इलफिसतन साहेब बाहादुर दाम मोहबत हू

साहेब खुषवख्त मेहेरबान कदरदान नियाजमदा आजनिया आजमेद रंगो वासुदेव सलाम बाजद सलाम आंकी येथील खैर आफियत तारीख छ १० रजबपावेतो साहेबाचे येकबालेकरून मुा कसबे फलटण येथे खैर आसो. दिगर छ ८ रजबचे पत्र पाठविले ते आतांच पावले. हुकूम बमोजीब रो जानराव नाईक निंबालकर याचे वाड्यापुढील पाहारे उठविले. ठाणे व कसबा त्याचे हवाली करणे म्हणोन आज्ञा; त्यास, कसब्याखेरीज ठाणे नाहीं. कसब्यांस वेसी व

गावकुसू आहे. जानराव नाईक आद्याप आले नाहीत. आले म्हणजे हुकमाप्रो करीन. सातारियाहून हुकूम आला जे, निरा नदीस पूल आहे त्याचे बाजूस दक्षणेचे आंगे उचवटा आहे तेथे चौकी ठेवावयाची आहे. त्यास तुम्हापासी सिबंदी आहे त्यापौ पंचवीस आसामी तेथे पाठवावे. त्याप्रो आज रवाना करितो. हुकमाप्रो माहालचा बंदोबस्त येथास्थित आहे. ज्यादा काय लिहिणें, प्यार मोहबत कीजि, हे किताबत.

¶*Rango Vasudev writes to Elphinstone about the return of Janrao Naik Nimbalkar to Phaltan and reports how he was executing the several tasks that were entrusted to him.*

No. 216] [*17-5-1818*

अजम आक्रम हनराबल मौंट इष्टवारिट
इलफिसतन. साहेब बाहादूर दाम मोहबत हू.

ꣽ साहेब खुषवख्त मेहेरबान कदरदान नियाजमंदा आजनिया आजमेद रंगो वासुदेव सलाम बाजद सलाम आंकी येथील खैर आफियत तारीख छ ११ रजबपावेतो कसबे फलटण येथे साहेबाचे नेक नजरेकरून खैर असो दिगर-इकडील मजकूराची विनंती ऐसीजे. रा। जानराव नाईक निंबालकर ठाणे का। मजकूरी आज प्रात:कालचे च्यार घटका दिवसास येऊन दाखल जाहाले. बरोबर सरंजाम स्वार आसामी पन्नास व उट नफर पंधरा व हती नग येक व पडताळाची तटे व शागीर्दपेशाची माणसे त्यात काही हत्यारबंद व काही गुली याप्रो येऊन पोचले. साहेबी हुकूमपत्र छ ८ रजबचे आले ते काल येऊन दाखल जाहाले. हुकूम बमोजिम केल्याचा सविस्तर कालचे पत्री बजिनस आलादा पो आहे त्याज-वरून ध्यानात येईल. सातारियाहून हुकूम आला, जे बाजीरावसाहेब याजबरो-बरची फौज चौतर्फा उधलोन गेली. त्यास तुमचे परगणेयात गावगना झाडा काढून लिहून पो. त्याजवरून गावगना चौकसी करून शोध आणऊन सातारियास लिहून पो आहे. सिलेदार व बारगीर अजमाशे आठशेची टीप परत आली आहेत. ज्यादा काय लिहिणे. प्यार मोहबत कीजे हे किताबत.

¶*This is a news-letter from Rango Vasudeo to Elphinstone, reporting the arrival of Janrao Nimbalkar at Phaltan and that of the dispersed Maratha armies.*

No. 217] [18-5-1818

तारीख २१ माहे मे सन १८१८
इसवी मुताबीक छ १५ रजब

श्री

हजरत खुदावंद न्यामत सरदार अलीशान
खुदायतगा नवाबसाहेब बाळबाहादूर या-
चे खिजमतीत.

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बाद बंदगी आदाब तसलीमात कुरनिशात बज्याआऊरदे मारूज मे रसानद आके. येथील खैरसला अखबार देवढी मुकाम मंगलवेढ नजीक श्रीपंढरपूर ता। छ १८ माहे मे सन १८१८ इसवी मुताबीक छ १२ माहे रजेब सन १२३३ रोज सोमवार पो येथास्थित असो विशेष. इकडील मा।र.

१ रा। इसाजीपंत गोखले च्यालीस पनास स्वार नगारानिशानसुधा छ १६ तेरखीस दाहावे तासी कूच करून पंढरीचे मुकामास गेले. पुण्या-कडे जातो म्हणौन बोलत होते. निघतेसमई रा। चिंतामणराव आपा याची * * * * *

१ हजरत जरनेर तामस मंडरोलसाहेब यास छ १ तेरखीचे मा।राची अखबार व हालीचे मा।राची आखबार लस्करात रवाना केली आशे.

१ रा। गणपतराव पानशे व किलेदार याणी किला खाली करून देऊन काल मौजे डोलच येथे येऊन उतरले आहेत. येथे आज येणार म्हणौन बोलवा आहे.

१ आपले लस्कर व सरदारसुधा काल सिना नदीचे काठी मौजे तिरसांगोलीवर उतरले आहे. आज मौजे करमाल्याचे येथे जाणार म्हणौन बोलत होते. किल्यात दोनशे सरंजाम ठेविला आहे. गावचे देशमुख व देशपांडे पा। शेट्ये यास पागोटे बाधून लाऊन करार देऊन निवाले. दारूगोल्याचे बैल येऊन पोहोचले.

१ छ १६ तारखीची अखबार रवाना केली ती येऊन पोहोचलीच आशल.

सदरहू मा।र साहेबाचे खिजमतीत लि।। आहेत. बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त.

¶*Visajipant Gokhale has gone towards Pandharpur with a few stragglers, reports Balwantrao Bapuji along with the movements of the English and the Peshwa's armies.*

7183

No. 218] *[18-5-1818*

पो तरीख २४ माहे मे
सन १८१८ इसवी मुताबीक
छ १८ रजब.

श्री

HONOURED SIR,

साहेबाचे शेवेसी रावजी बालाजी मुा नरबदातीर सलाम आज विनंती विज्ञापना विशेष. श्रीमंत बाजीराव याची स्वारी धुलकोट बारीस येऊन पडली आहे. बरोबर रामदीन, त्रिबकजी वगैरा सरदार आहेत. आसेरीचे किलेदार भेटीस जाऊन माघारे आले व श्रीमंताकडून येक वकील राजश्री आनंदराव चाळीस स्वारानसी जनराल मालकम साहेबाकडेस गेले. त्याचा मुकाम छ १६ नरबदेवर होता व रास्ते सावदे येथे आहेत. त्यानी ब्रिग साहेबाकडील ठाणे बसू दिल्हे नाहीं. दुसरे वर्तमान काही नाही. सेवका(व)र पहेल्याप्रमाणेच ममता आसावी. बहुत काये लिा हे विज्ञापना.

Honoured Sir,
Your most obedient humble servant,
18th May 1818. Roujee Ballajee.

¶*Raoji Balaji sends news of Bajirao having arrived at Dhulkot and making approaches to Malcolm.*

No. 219] *[19-5-1818*

तेरीख १९ माहे मे सन १८१८
इसवी मुताबीक छ १३ रजब

श्री

खुदावंत न्यामद खुदायेगाण सा
आलफिंस्टीन सो म म दी ल हू ल

खिजमतीस येशवंत बाबूराव रार तुळजापूर सलाम अंकी येथील खयेर जाणून साहेबी आपली खयेर हमशा लिा गेले पाहिजे विशेष. छ १४ तारखीस जरनेर[1] मनरोल साहेबाणी किल्यावर काही लयेन पाठविली होती. आज छ १५ रोजी शनवारी किलेदार व पानसे सिबंदी जासूद प्राथकाली उतरून बाहेर

---

1 General Munro.

निघाले. त्याचे बरोबर साहेबाणी दुलेखान नवाब याचा सर्मजाम देऊन सिनानदीपार करून दिल्हा. लो साहेब किल्यावर जाऊन निशाण चढविले. साहेबाची फते जाली. हे किताबद.

¶*Yashvant Baburao reports to Elphinstone the capture of the fort of Sholapur by Munro.*

No. 220] [*20-5-1818*

तरीख माहे मे १८१८
इसवी मुा छ १६ रजब

श्री

हजरत खुदावंद न्यामत सरदार अली-
शानं खुदायगा नवाबसाहेब बलवा-
हादुर याचे खिजमतीत अर्जे

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बारबंदगी आदाब तसलीमात कुरनिशात बज्याआऊरदे मारूज मे रसानद आके येथील खैर सला अखबार देवढी मुा मंगल-वेढ नजीक श्री पंढरपूर ता छ २० माहे मे सन १८१८ इसवी मुताईक छ १४ माहे रजेब सन १२३३ रोज बुधवार पो येथास्थित आसो इकडील मार

१ रा सरजेराव घाटगे येथे आहेत. त्याणी तिकडोन पळून येतेसमई रा रुद्रापा इंगवला मौजे बनपुरीकर हाहि लस्करात गेला होता. तो याचे सोबतीन वैरागापरियेंत आला. पुढे येका कोसावर रानात चीजवस्त व घोडी १ येक ऐस घाटगे याणी लुटून घेतले. त्याजला म्हणतो तुझी फिरयाद लागेल तिकडे त्यास जावे ऐसे बोलतो. त्यास मासणूर तालुका आपला तेव्हा या गरिबाची दाद कोठे लागती. घोडी त्याचे घरचीहि नाही. त्याणे दुसऱ्याची आरधेलीन नेली होती. त्यास आता भवताली तालुके आपले तेव्हा कितेक प्रकारचे बोभाट पडतील.

१ रा गोपालपंत गाडगील याचा मार लस्करात लिा होता, त्यावरून हुकूम आला की त्याचा शोध करावा तर हुकूम येण्यास आवकाश लागला. ते निघाले मिरजेकडे गेले म्हणौन सोध लागला.

१ रा चिंतामणराव आपा यास पत्र पो म्हणौन लस्करात लिा होते. तेथील लिा आले की आम्ही शोध घेतला तर सांगणारानी सांगितले की

जरी वकिलाचे लिा आले तरी तुम्हास सांगणार नाहींत. बुध्या तुम्ही पत्र आणून लावल्याखेरीज काम चालते होत नाही. याकरिता लस्करात आणखी लिा की पत्र आम्हाकडे पाा. यावर मर्जी.

१ छ १८ छ १९ तारखीचा मार लस्करात लेहून पाठविला.

१ छ १९ तारेखीची अखबार रवाना केली ती येऊन पोहोचलीच आशल.

मार साहेबाचे खजमतीत लिा आहे. हजरत जरनेल साहेबाचा मुकाम कालचा मौजे मुडवचिा होता. आज तावसीचे सुमार जाणार म्हणौन बोलत होते व काही लस्कर सोलापुरादूनच इज्यापुराकडे रवाना जाले. बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त.

¶*Balwantrao Bapuji a news-writer reports to Elphinstone several items of news, referring to Sarjerao Ghatge having plundered Rudrappa, of Gopalrao Gadgil having gone to Miraj and of other persons.*

No. 221] [*About 21-5-1818*

नकल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नीलकंठराव आबा स्वामीचे सेवेसी

पो बालाजी नारायण नातू साा नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ ९ रजब जाणौन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. पेशजी आपले पत्र आले व राजश्री विठलपंत भाऊ याणी आपल्याकडील निखालसतेविसी साहेबाजवळ बहुत खातरजमा केली व आपण राजश्री पांडुरंगपंत आत्रे यास पाा त्याची साहेबाची समक्ष गाठ पडून बोलणी जाली ती त्याणी लिहिलीच आसतील. सर्व आर्थ ध्यानात आणोन फौज येण्याचे पूर्वी आपण हे बोलणे लाविले याणे बहुत चांगले जाले. राजश्री आणा टिलक लस्करातून आले ते आपलेकडे येत आहेत त्याणी हाली (लि)हिल्यावरून कळले. साहेबाचे मनात कोणहास उपद्रव करावा असे नाही. राजश्री गोविंदपंत आन्यास आपण किला खाली करून न दिल्हामुळे उपद्रव * * तोही दूर होईल. कालजी करू नये. किला हवाली करण्यास येक घटकेचा विलंब न करितां खाली उतरोन हवाली करून म्हणजे साहेबाची मर्जीचा बहुत संतोष होईल. याणे पुढे तुम्हासच उपयोग आहे. घर वतन माल वगैरे यास काही येक उपद्रव होणार नाही. पत्रात लिा त्याजवर दृढ निश्चय ठेवावा. कोणतीहि कल्पना घेत बसू नये. राहातेकर याचे वर्तमान

समजलेच असेल. सारांष इकडून वाकड कोणाचे व्हावे ही इछा नाही. कागा आचरण वाकडे व्हावे असे करू लागलीयास मग करावे लागत नाही. आंगग किले हवाली करून आला असता कोणताहि उपद्र(व) न लागतां पुढे राजश्री जनोबा भाऊ आलियावर बोलण्यास बरे पडेल. विस्तारे काये ल्याहावे. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Balaji Narayan Natu writes to Nilkanthrao Aba Purandare suggesting to him a line of conduct to be adopted in furthering his own interests. The fort—says the writer—should be evacuated and handed over to the English. The writer gives him assurances of lenient treatment from the English.*

No. 222] [*21-5-1818*

मोहर लाखेची नकल

श्री

साहेब मेहरबां नीलकंठराव नारायण

सलामत्

ॐ आजी नवाब बाहादूर सलाम आंके दिगर. किले प्रतापगड व मकरंदगड हे दोन किले विंचूरकर याचे तर्फेने आहेत. ते तुम्ही कंपनी सरकारात देणार येविसी बोलण्यास आजम विठलपत बा(बो?)कील व पांडुरंगपंत आत्रे यास तुम्ही पाठविले. त्याचे बोलणे किले कंपनी सरकारात हवाली करितो, परतु काही येक उपद्रव न लगे येविसी पत्र आसावे त्याजवरून लिा आसे. तरी विठलपंत याजबरोबर कंपनी सरकारचे सरदार किले हवाली करून घ्यावयाकरितां रवाना होत आहेत. हे किल्यानजीक येऊन पोहचताच तुम्ही आपली व सिपाई लोकाची चीजवस्त व हत्यारे खासगत आसतील ती घेऊन किल्याखाली उतरोन किले कंपनी सरकारचे सरदाराचे हवाली करावे. बाजीरावसाहेब व त्याचे तर्फेचे लोकाची चीजवस्त आसल ती आफरातफरी न करितां किल्यावर कायम ठेवावी. याप्रो तुम्ही केले म्हणजे तुमचे वतन व माल यास हरयेकाविसी उपद्रव कंपनी सरकारातून होणार नाही. तुंम्ही कुटुंबसुा बेवसवसा आपले घरी राहावे. रा तारीख २१ माहे मे सन १८१८ इसवी मुा छ २१ रजब सुा समान आसेर मयातैन व आलफ

इंग्रेजी हरप लिा आहेत.

¶*Nilkanthrao Narayan is asked to evacuate the two forts Pratapgad and Makarandgad and deliver them to the Company's officers. He is also given assurances of safety and good treatment during good behaviour.*

7187

No. 223] [22-5-1818

तारिख १ माहे सन १८१८

ईसवी मुताबिक छ २६ रजब

श्री

आखबार सुभे खानदेश सरहद मथावार(?) तापी तीर बऱ्हाणपूर येथील वृत. कपतान हाजी साहेब बाहादूर व मीर फजलआलीखा बाहादूर यैसे उभयेता सावधावर आहेत व कपतान ज्यान बिरगसाहिब बाहादूर मालेगावांस मोर्चे लाऊन आहेत. श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब आसेर पलीकडे बोरगांव साता कोसावर आहे तेथे मुकाम करून आहेत. आरबाचे बंड तोरखेडे कोपरेलेकडे होते, ते रेणीसाहेब बाहादूर याणी सिंदखेडे येथे लडाया करून पिटून घातले. ते आमलनेरकर आरब आली जमातदार याजकडे येऊन डांगरी पोची गांवे मारून दोन मुकाम करून लेदिवरून चोपडयाकडे गेले. पुढे श्रीमंताकडे बोरगांवावर जाणार. निंबालकर व पंडित याणी काना भील यांस श्रीमंतास भेटविले. या देशाचे पवार पंडित व भोइटे याचे वकील सर्वाचे श्रीमंतापासी आहेत. मीरफज्ल-आलीखा बहादूर व कपतान हाजी साहेब बाहादूर सावधावर आहेत. मीर-फजलआलीखान याणी नंदुरबार सुलतानपूर येथे मामलतदार येक मुसलमान तुकू पाग्या याचा बारगीर होता तो व येक कारकून जालनेकर देशपांड्या व पांच माणसे यैसे पाठविले. त्यासी मार्गात आरबाच्या बंडासी गाठ पडिली, त्याणी धरून नेले. सेवेसी श्रुत होय. रवाना छ २२ माहे म्ये मुकाम पारोले.

¶*This is a news-letter from Khandesh reporting the movements of Bajirao near Asher and the fighting at Malegaon.*

No. 224] [3-6-1818

तेरीख १७ माहे जून सन १८१८

इसवी मुताबिक छ ११ शाबान

श्री

आखबार सुभे खानदेश सरहद मथावार तापी तीर बऱ्हाणपूर येथील वृत. श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब धुलकोट येथील पाहाडात स्वार पायेदलसुधा आहेत. त्यासुमारे जरनेल दफटीन साहेब बाहादूर आहेत. पेशजी माजील मामलतदार व सरदार त्याचे आहेत त्याणी श्रीमंत या प्रांती आल्यावर वकील त्याजकडे पाठविले आहेत व कपतान ज्यान बिरगसाहेब बहादूर याजकडेहि मामलती या प्रांताच्या करण्याबदल कारकून येऊन करीत आहेत. मालेगाव आद्याप लडत आहे.

मालेगाव व पारोले येथील टप्याचे याद्यावरी (?) चैत्रापासून होणार. याविसीची आज्ञा काये ते जाली पाहिजे. सेवेसी श्रृत होय रवाना छ ३ माहे जून मुकाम पारोले.

¶*News about fighting at Malegaon, of Bajirao's stay at Dhulkot and of the settlement of the country by Briggs, is reported in this letter.*

No. 225] *[9-6-1818*

छ २१ माहे जून सन १८१८
इसवी मुताबीक छ १९
साबान.

श्री

अखबार सुभे खानदेश सरहद मथावार तापी तीर बऱ्हाणपूर येथील वृत: श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब याजकडे जरनेल मालकम साहेब बहादूर याजकडून येक साहेब वकिलीस आले. त्याचे त्याच बोलणे होऊन श्रीमंतानी कूच करून त्याजकडे गेले यैसे पत्र जरनेल दफटीण साहेब बाहादूर याचे पत्र कपतान हेर साहेब बाहादुर यांस आले. त्यात मजकूर होता तो सेवेसी लिहिला आहे. पांचसें स्वार व दोनसे आरब यैसे आसेरकडून येऊन फगन्यावरून मालेगांवाकडे गेले. मालेगांव आद्याप लडत आहे. आहमद आरब व वीस आरब यैसे आपले विलायेतीस गेले. त्यास येक दसकत व येक चकती सुरतेस कपतान ज्यान बिरग साहेब बाहादुर याची देऊन येक हलकारा टप्यापैकी देऊन त्यास पावते करून दिल्हे. मालेगांवचे व येथील टपे यास कावर (?) येथून घेत जावें म्हणोन सांगितले. त्यास सरकारची आज्ञा जिकडे कावर (?) घेण्याची येईल तैसे करू. मीर इकरादआली याणीहि सरकारात लिहिलेच आहे. उतराची आज्ञा जाली पाहिजे. सेवेसी श्रुत होय. रवाना छ ९ जून मुकाम पारोले.

¶*News of Bajirao having surrendered to Malcolm and of the fight at Malegaon is sent by the writer from Burhanpur.*

No. 226] *[11-6-1818*

तेरीख १४ माहे जून सन
१८१८ इसवी मुताबिक छ ८
साबान

श्री

हजरत खुदावंत न्यामत सरदार अलीशान
खुदायगा नवाब साहेब बालबहादूर याचे
खिजमतीत

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बादबंदगी आदाब तसलीमात कुरनिशात बज्या आऊरदे मारूज मे रसानद आके येथील खैर सला. अखबार देवढी

मुा मंगलवेढ नजीक श्रीपंढरपूर ताा छ ११ माहे जून सन १८१८ इसवी मुताबीक छ ६ माहे साबान सन १२३३ रोज गुरुवार पो येथास्थित असो विशेष.

१ पंढरीकडोन दोनशे सिपाई दुरगाकडे जाण्याकरिता सोलापुरास जाऊन उतरले ही बातमी दुलेखान यास समजताच कूचे करून शेहराकडे गेले. दुरगास ठाणे आपले बसले म्हणौन बोलतात.

१ निपानकराचे तालुक्यापौ तीन गावास ठाणे बसले नाही.

१ कोरकब्यात बसले नाही. १ मौजे आरली लढती म्हणौन बोलतात.

१ मौजे केसरगीत बसले नाही.

१ सोलापुराहून येथे कारकून यादी घेऊन राो गणपतराव पानशे याजकडे आला होता. कारन सांगणारेन सांगितले की तोफखान्याचा आसबाब सरजाम याचे मारफातीचा याकरिता त्या यादीवर याचे हातची मोहोरा करून घेऊन जाव्या म्हणौन कारकून आला होता. मोहरा करून घेऊन गेला.

१ राो गणपतराव दादा पटवर्धन येका दो दिवसी सांगलीस जाणार म्हणौन बोलतात.

१ नागपुरकर राजे कैदेत होते तेथून गोंडवान येऊन घेऊन गेले म्हणौन आवाई उठली आहे.

१ हैदराबादेकडील आवाई लोक बोलतात. गोंलकुंड्याचा किला इंग्रज खाली करून मागतात.

१ हजरत मंडरोल साहेब धारवाडाकडे गेले. निपाणीवर दोन पलटणे ठेवले. मिरजकर याचे तालुक्यात वसूल पटवर्धणास देऊ नये म्हणौन ताकीद केली. असे लोक बोलतात.

१ पंढरीस नावावर सरकारची डबी बसविली. नावाडीयास दरमाहा द्यावा असे ठररिले म्हणौन बोलतात.

१ गावगंना कतबे सातारियास रवाना जाहाले त्यात माार आमचे गावचे कोन्ही गेले नाहीत, पुढे जाणार नाहीत. गेले तर सरकारचे गुणेगार.

१ प्रा काशेगाव

१ मौजे मारापूर

१ मौजे तावसी येथील

१ कृष्णाजी माणे गेले होते ते चैत्र आखेरीस आले

१ शेटी निकम बारगिरीचे रोजगारास होता. चैत्र आखेरीस आला त्याचा चिरंजीव गर्दीत गेला आला नाही.

—

२

१ मौजे गुंजेगाव

१ मौजे तनाली

—

४

१ को आहीरवाडी तालुका

१ को आहीरवाडी

१ मौजे हातूर

—

२

१ प्रो सोलापूर

१ को सोलापूर

१ मौजे डोनगाव

१ मौजे तलेगाव

१ मौजे मवाट

१ मौजे मंधर

—

५

—

२

१ छ ९ तारखीची अखबार रवाना केली ती येऊन पोहचलीच आशल.

१ परवाचे दिवसी आस्तमाणी आकलूजकडोन च्यालीस पनास कानडे सिपाई व तिघे कारकून आपल्याकडीलच काल प्राथःकाली आकलकोटाचे सुमार गेले. ठाणे बसवावयास जातो म्हणौन सांगत होते.

१ पंढरीहून लस्करातून च्यार स्वार येथे कर्णेल साहेबाचा निरोप सांगावयाकरिता रो चितामणराव आपाकडे आले होते. कहीचा उपद्रव तालुक्यात होईल म्हणौन कारकून पा होता, सबब स्वाराहाती निरोप पाठविला. आमचे लस्करचा उपद्रव होणार नाही आणि गोपाळपुरावर आमची छावणी आहे त्यास गाव उज्याड, तेथे छेपर घालितो. वैरन मोल घेतली असता देत जावी.

—

मार साहेबाचे खिजमतीत लिा आहे. बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त.

¶*Among the several items of news that Balvantrao Bapuji mentions herein there are some about the activities and movements of the contingents of Panshe, Nipanikar, Munro, etc. The writer also reports the rumour about Appasaheb of Nagpur having escaped from confinement.*

7191

No. 227] [11-6-1818

श्री

जबानी कासी बिन संभाजी जासूद जबानी लिा दिल्ही ऐसीजे. मला सरकारचा लाखोटा किले कांगोरीस देऊन रघोजी येवले व मैराल भाऊ व गुणाजी या त्रिवर्गाने मिलोन पाठविले. ते समई खर्चास रुपये पाच देऊन मला त्रिवर्गानी सांगितले की कामगारी बज्याऊन आल्यावर बक्षीस तुझ्या दैवाने मिलेल ते घेणे व दरमाहा रुपये ८ प्रो पावतील. त्याजवरून मी निघोन किले कांगोरीस साहेबाकडे गेलो. परंतु तेथे कागद पोचून जाबसाल हातास आला नाही. किल्यावर दुधापा होता त्यासी ममता लाऊन तेथे चौकीदार कोण आहेत, वर्तमान कसे, याची चौकसी केली. साहेबाजवल बोलावयाचे जाले नाहीं व कागदहि पोचला नाहीं. कागद पोचवावयाचे संधान दुधाप्यास पंचवीस रुा कबूल करून केले होते. इतक्यात किल्यावर बातमी फुटली. किलेकरी मला मार देऊन चोकसी करणार असे समजल्यावर मी पाहाटेस किल्यावरून निघोन माघारा बिरवाडीहून घाटाखाली अनछत्राजवळ आलो. तो पुढे कांगोरीकर लोक येऊन खिंड धरून बसले होते. त्याणी मला किल्यावर दुधाप्याचे घरी पाहिले होते, साा तेथे अटकाव केला की दुधाप्याचे घरी सरकारची चौकी बसली त्याचा जाबसाल करून तूं जाणे. असे बोलून मग कांगोरीस मला धरून नेले. बेडी घातली. मग गोखले याचे कागद साहेबास वासोट्यास लावण्याविसी आले त्याजवरून साहेबास वासोट्यास नेले. ते समई तेथील कारकुनास मी बोललो जे मलाहि साहेबाबरोबर वासोट्यास लावावे. परंतु मला पाठविले नाही. रागे भरले. त्या ताा मी कैदेत होतो. कांगोरी सरकारात घेतली तेव्हा तेथून सुटून अलो. याप्रो माार आहे. तेरीख ६ साबान सुरु तिसाअशर मयातिन अलफ.

¶*One Kasi Jasood narrates the hardships which he had to suffer on his mission to Morrison and Hunter imprisoned at the fort of Kangori where he colluded with Dudhapya, one of the guards was found out and cast into prison.*

No. 228]. [12-6-1818

श्री

आखबार सुभे खानदेश सरहद मथवार तापी तीर बऱ्हाणपूर येथील वृत. श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब धुलघाटानजीक सातपुड्या पाहाडात होते. जरनेर दफटीन साहेब बाहादूर बऱ्हाणपुरानजीक लालबागावर आहेत. जरनेल मालकीनसाहेब बाहादूर याजकडून वकिलीस येक साहेब आले त्याचे त्याचे

बोलणे होऊन श्रीमंत कूच करून साहेबाकडे भेटीस गेले. मालकीन साहेबाच्या भेटीही जाहल्या. श्रीमंताबरोबर फौज होती त्यास साहेबानी चकत्या देऊन आपले आपले देसीं रवाना केले. ते स्वार काल छ ११ जुनी+ पारोले यावरून गंगथडी-कडे गेले. कपतान बेर साहेब बाहादूर पारोल्यास मुकाम करून आहेत; त्याणी दवड करून स्वारी गेली, त्याणी चकत्या दाखविल्या तेव्हा जाऊ दिल्हे. मालेगांव आद्याप लडत आहे. सेवेसी श्रुत होय. रवाना छ १२ जून मुकाम पारोले.

¶*News is reported of Bajirao having surrendered to Malcolm.*

No. 229] [*15-6-1818*

श्री

हजरत खुदावंद न्यामत सरदार अलीशान
खुदायगा नवाब साहेब बलबाहादूर याचे
खिजमतीत

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बादबंदगी आदाब तसलीमात कुरनिशात बज्या आऊरदे मारूज मे रसानद आके. येथील खैरसला अखबार देवढी मुकाम मंगलवेढ नजीक श्रीपंढरपूर तो छ १५ माहे जून सन १८१८ इसवी मुताबीक छ १० माहे साबान सन १२३३ रोज सोमवारपावेतो यथास्थित असो विशेष मार.

१ गोपालपुरावर साहेबाची तुरबूत[१] चोरानी खोदली होती ते चोर लस्करात धरून आणले आहेत म्हणौन व तुरबुतीस नवे काम लावले आहे म्हणौन येकाने सांगितले.

१ छ ६ तारखीचे खत पो ते छ ११ तारखीस पावले. मार लिहिला की रसीद व याद पाठविली ती पावली. सातारियाहून ऐवज मागऊन घेणे. त्यास हालीचे जासुदासहि बरतर्फी देऊन पंधरा दिवस होऊन गेले. त्याचीहि हुंडी आद्याप आली नाहीच. मागील पौ तर रागे भरून लिा तेव्हा उपाये नाही. हजरत जरनेलसाहेब यास अखबार लिहीत जावे म्हणौन हुकूम आला त्याप्रो अखबार लेहून जतस पो. तेथे कारकून आसला तर त्याच वाटेण रवाना करीत जाऊं. नाही तर पंढरीचे टप्यावर अखबार देत जाऊ. पंढरीस जाण्यास मान नदी मधी आहे तेव्हा नदीवाले

\+ जूनला. १ थडगे, कबर.

पोटास मागतेत तेव्हा जबरदस्ती करून नदी पार होत आसावे तर बोभाट पडून जासुदासहि येखादा दगा होईल. तर येविसी काये हुकूम तो यावा. सातारियासहि लिा आहे.

१ निपाणीहून येक ग्रहस्त येथे आला तो सांगत होता देसाई तर कोठे कोणे गावीच आहेत ; परंतु कारभारी व त्याचे स्त्रीसच बोलणे होऊन ठरले की निपाणीचा किला व बारा गाव घेऊन आसावे. खेरीज वर्षास लाख रुो खर्चास घेत जावे. वरकड तालुक्यात आपले ठाणे बसऊन हजरत जरनेल मंडरोल साहेब धारवाडास गेले.

१ श्रीमंत बाजीरावसाहेब हस्तगत जाले म्हणौन कोन्ही चोरून लपून बोलतात, मग खरेखोटे ईश्वर जाणे. उजागर कोन्ही बोलत नाहीत.

१ रुो गणपतराव दादा पटवर्धण सांगलीस जात होते. त्यास येथील ठाण्यातील रुो गणेशपंत फडणीस या उभयेताचा कारभारसंमधी कजिया लागला आहे. उरूबुरू बोलणे रुो चिंतामणराव आपा याचे होत आसतेत. हे काही बोलत नाहीत. यामुळे त्याचे राहाणे जालेशे दिसते.

१ छ ११ तारखीची अखबार रवाना केली ती येऊन पोहोचलीच आशेल. तूर्त नवल विशेष काही नाही.

१ तालुके मंगलवेढे येथील दोन गावचे कतबे आले. तर त्यात आमचे गावचे कोन्ही गेले नाहीत म्हणौनच लिा आले. त्यात मौजे नंदूर येथे चौकसी करीत पुढे जासूद हालसंगी तालुक्यात गेला. नंदूरकर याणी पत्र येथे फडणिसास लिा. त्याणी कारकूण आम्हाकडे पाठविला. रुो आपासाहेबाचे नावे पत्र आले म्हणजे आपण चौकसी करावी तर येविसी काये हुकूम तो यावा. मौजे भालेवाडी व मौजे डोनज

माार साहबाचे खिजमतीत लिा आहे. बंदगीस रोशन होय हे अर्जदास्त..

¶*News about Appa Desai of Nipani, Patwardhan and the rumoured submission of Bajirao is reported by Balwantrao Bapuji.*

No. 230] [*19-6-1818*

तरीख २७ माहे जुलई

इसवी मुताबिक छ २१ माहे साबान

श्री

आखबार सुभे खानदेश सरहद मथावार तापीतीर बऱ्हाणपूर येथील वृत. श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब जरनेर मालकनसाहेब बाहादूर याजकडे गेले

7194

आणि वरकड सरदार विंचूरकर यास रजा दिल्ही ते दोन तीनसे सरजामासुधा म्हसव्यावर येऊन मुकाम करून छ १७ जुनी आले व पुरंदरेहि मागाहून नसिराबादे-कडे आले. सरंजाम हजारपावेतो समागमे आहेत. साहेबाची दस्कत त्याजसमागमे आहेत. मीर फजलआलीखा याचे चिरंजीव शंभर स्वारानिसी पारोले येथे आले आहेत व कपतान केर साहेब बाहादूर पुरण्याचे स्वार दीड हजारानिसी देवगांव पो बहाल येथे मुकाम करून आहेत व कपतान हेर साहेबहि सरंजामसुधा पारोले मुकामीच आहेत. येथून पेशजी चकत्या सरकारात पाठविल्या ती जोडी मार्गात भिलानी ढोलीगाव पो बाहाल येथे लुटून घेतले. कर्णल मकडोन साहेब बाहादूर याणी होलकर याच्या छड्या दाहा मागविल्या होत्या त्याहि लुटल्या गेल्या व कागदपत्रहि गेले. जरनेल दफटीन साहेब बाहादूर देवलस गांव जालन्याच्या मार्गे गेले. वरकड कपतान ज्यान बिरग साहेब बाहादूर फौज सरंजाम सुधा मालेगावीच आहेत. पुढे आमलनेरावर शह आहे. तिसरा महिना माहावरास होता आला आद्याप मिला नाही व पेशजी मी लिहिले आहे त्याचा हुकूम काये तेहि आज्ञा यावी तैसे करीन * * खावंदच्या चरणावर लक्ष ठऊन आहे. सेवेसी श्रुत होय. रवाना छ १९ माहे जून मुकाम पारोले.

¶*The movements of some of Bajirao's Sardars subsequent to the latter's submission to Malcolm are given by this news-writer. The letter also refers to the raiding activities of the Bhils.*

No. 231] [*23-6-1818*

तरीख २९ माहे जून सन
१८१८ ईसवी मुताबीक छ २२
साबान

श्री

आखबार सुभा खानदेश सरहद मथावार तापीतीर बऱ्हाणपूर येथील वृत श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब जरनेर मालकन साहेबासमागमे नरमदापार गेले. विंचूरकर घाटाकडे दक्षण देशास गेले. त्याचे मागे रा। आबा पुरंदरेहि छ २० माहे जुनी येथे मुकामास आले तेहि दक्षणेकडेच गेले व आबा वानवले यास समाधान नाही म्हणौन पारोले येथे राहिले आहे. आराम जालियावर तेहि देसी जातील. कपतान बीतसाहेब बाहादूर नसिराबादेकडे आहेत. कपतान बेर-साहेब बाहादूर औरंगाबादेकडे गेले व जरनेर दफटन साहेब बाहादूर फरदापुराकडे

गेले. मीर काळूखा बाहादूर पारोले येथे होते ते कपतान ज्यान बिरगसाहेब बाहादूर याणी मालेगावी बोलाऊन घेतले. भिलानी या प्रांती दुंदी केली आहे. सरकारच्या पारोले याचे टप्याचे दोन हलकारे मौजे ढोली पो बाहाल. येथे लुटून घेतले. त्यास मीर फजल आलीखा बाहादूर यास सरकारची चकती आली तर भिलाचा शोध करून धरून आणून वस्तभाव घेतली जाईल. आमचे सांगितल्यावर ते भिलास धरून आणून होलकर याची वस्तभाव आणवीत नाहीत यास्तव सेवेसी लिहिले आहे. सेवेसी श्रुत होय. रवाना छ १३ माहे जून मुकाम पारोले.

¶*The movements of Bajirao after his surrender and the encampments and halts of some Maratha and English generals are given in this news-letter.*

No. 232] [*25-6-1818*

श्री

HONOURED SIR,

साहेबाचे शेवेसी रावजी बालाजी मुाा कसबे रावेर नजीक बराणपूर दोन्ही कर जोडून सलाम आर्ज विनती विज्ञापना ताा छ २५ माहे जूनपावेतो साहेबाचे महेरबानगी करून सुखरूप आसो विशेष. गतवरसी साहेबानी खेडीघाटचे डाकेचा बंदोबस्ताकरिता पाठविले त्या दिवसापासून ह्याच मुलखात बंदोबस्त करून आहे. काही येक दिवस जाले, हजरत ब्रिगसाहेब याजबरोबर उजेनी-पावेतो गेलो होतो. नंतरी येऊन बराणपुरी राहिलो होतो. तेथे डाकेची चाकरी वगैरा बहुत चांगली केली. हजरत ब्रिगसाहेब यानी मेहरबान होऊन छ २ जूनचे दिवसी रावेर माहाल येथील आबल सागितला आहे. तेथे ठाणे घालून बदोबस्त करून आहे व डाकेचेहि कामकाज़ बराणपूरचे करीत आसतो. रावेर बराणपुरापासून साहा कोस आहे. रावेरीहूनच डाक बराणपुरास जाती व इकडून पुन्यास रवाना होती. साहेबाचा पूर्वत ममता आहे तैसीच शेवकावर आसावी. सर्वासी+ साहेबाचे पदरचा आहे. साहेबाची स्वारी इकडेस येणार हे ऐकूण फार आनद जाला. साहेबाचे चेरण कधी पाहीण ऐसे जाले आहे. खेडीघाटाहून बराणपुरास पेसजी राहावयाचे कारण की साहेब लोकाची लस्कर आली त्याज-वेळपासून ते आज ताा इंग्रजी कामकाज डाक रवाना करावयाचे पडू लागले याजकरिता राहिलो होतो. खेडीस काही काम फार नाही. तेथेहि कारकूण

+ सर्वांशीं.

आमचा चुलत बंधु ठेविला आहे. मी साहेबाचे शेवेसी मागेहि फार पत्रे पाठविली. साहेबानी मेहरबान होऊन पत्राचे उतर पाठवावे. बहुत काये लिा हे विज्ञापना.

Honoured Sir,

Your most obedient, humble and faithful servant,

Raver,
near Boorhanpoor,
25th June 1818.

Ravji Balaji,
Poona Post Of......

¶*Raoji Balaji reports from Raver how faithfully he has been serving in the duty assigned to him, of despatching post and providing supplies, etc.*

No. 233] [*28-6-1818*

श्री

आखबार सुभे खानदेश सरहद मथावार तापीतीर बऱ्हाणपूर येथील वृत. श्रीमंताकडून नाना पुरंदरे व आणा ढमढेरे यैसे उभयेता आले ते पुढें देसी आज येथून गेले. भिलाचा उपद्रव येथे बहुत आहे याचा बंदोबस्त व्हावा. राजश्री भया राजेबाहादुर याजकडील आमलनेरकर आरब आली याणी तेरा उपोषणे राजेबाहादुर यास करऊन जबरदस्तीने पासष्ट हजार रुोची चिठी लेहून घेतली. आन आडीचसे आरब नवे याचा तैनातजाबता जबरदस्तीने लेहून घेतला आहे. कपतान केरसाहेब बाहादूर आज छ २७ माहे जुनी धरणगांवास गेले. समागमे च्यार कंपिनी व दोन तोफा, पांचसे स्वार मोगलाई यैसा सरंजाम होता. सपैन पाज [?] आरब श्रीमंताकडून च्यारसे आले ते येथे मुकामास आहेत. त्याजपैकी दोनसे परभारा आमलनेरास गेले व दोसे येथे आले. घोरपडे याचा खिजमतगार पळाला त्याचा शोध आरवी पेाा धुले येथवर लागला. आलीकडे लागला नाही. शोध लागल्यास लेहून पाठवीन. माजील कमावीसदार याजकडे मामलती सांगतात. ते रयेतीस नाना प्रकारें इजा देतात. ढेंगले मोल्हरचे किल्यात आहेत यैसी बातनी यैकिल्यात आली आहे. सेवेसी श्रुत होये. रवाना छ २८ माहे जून मुकाम पारोले.

¶*This is a news-letter reporting dissolution of Bajirao's army. The Arab troubles are also referred to.*

No. 234] *[28-6-1818*

श्री

हजरत खुदावंद न्यामत सरदार अलीशान खुदायगा
नवाबसाहेब बलबहादुर याचे खिजमतीत

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बाद बंदगी आदाब तसलिमात कुरनिशात बाज्या आऊर दे मारूज मे रसानद आके येथील खैरसला अखबार देवढी मुा मंगलवेढ नजीक श्रीपंढरपूर ताा छ २८ माहे जून सन १८१८ इसवी मुताबीक छ २३ माहे साबान सन १२३३ रोज रविवारपाो येथास्थित असो विशेष. इकडील माार :—

१ हजरत कर्णेल बेलसाहेब याचा निरोप आला. राो चिंतामणराव आपा याजपासी जमेत काये आहे व जखमी सोलापुरचे लढाईबदल किती आहेत चौकसी करून लेहून पाो त्यावरून चौकसी केली.

१ राो चिंतामणराव आपा याजकडील जमेत :—

१ घोडेस्वार लाहानमोठे पनास साठ आहेत.

१ स्वारीबरोबरचे परदेसी लोक पनास साठ.

१ खेरीज सिपाई मऱ्हाठे, मुसलमाण, शागीर्दपेशाचे मणुशे पनास च्यालीस आहेत.

१ उंट दाहा पंधरा व हाती येक लंगडा आहे. बाकीचे च्यार हाती व दाहाबारा उंट व पनास पाऊणशे स्वार चिरंजीव त्यांचे सांगलीस गेले तेव्हा बरोबर गेले. उंट शेसवाशे बारडोल तालुक्यात चारनीस गेले आहेत.

१ राो आबा जमखंडीकर किलेदार याचे मारफातीचे खाा घोडे तीनच्यार आहेत व काटक लोक किल्याचे रखवालीस सरासरी शंभरीक आहेत. सिवाये काटक बिननवकर पनासीक आहेत. पहेले नवकर होते व आता शेतबाडी करून आहेत. खेरीज वेसीवरील व चावडीवर व देवढीवर मऱ्हाठे, मुसलमान सरासरी च्यालीसपनास आहेत.

१ खेरीज किल्यात ब्राम्हण मंडली यांचे घोडे आहेत.

१ रामराव काले याचे घरचे घोडे च्यारपाच.

१ बालाजीपंत म्हैसकर याचे तीनच्यार घोडे.

१ कृष्णराव पटवर्धण याचे आठदाहा घोडे.

१ गणेशपंत फडणीस याचे तीनच्यार घोडे.

१ रो गणपतराव दादा पटवर्धण याचे घोडेस्वार तीसचालीस आहेत. सिवाये सिपाई लोक व शागीर्दपेशाचे मणुशे पंचेवीसक आहेत आणि आज सांगलीस जाणार म्हणोन बोलतात.

---

१ जखमी लोक तोफखान्याकडील हाली येथे आहेत:

१ नाईकवाडी याचे दरग्यात आा ८ जखमी आरब आा ६ जमादार याचे नाव प्यारमांा आहेत.

१ गैबीसाहेबाचे दरग्यात आा ८ जखमी, त्यात येक मऱ्हाठा बाकीचे मुसलमाण.

१ काशेगाव वेसीकडील दरग्यात जखमी आा ३.

१ भाड्यान घर घेऊन राहिले तेथे जखमी आा३.

१ धनगर याचे घरी आा २ स्त्रीपुरशे, उभयेतास जखमा. ते येथून लस्करात पंढरीस साहेबाकडे गेले होते. त्याणी यास रो १९ दिल्हे म्हणोन सांगत होते.

---

१ हाली येथे बुधाजी सावत आहे त्याचा भाऊ श्रीमंताचे लस्करात आहे. त्याजकडील वर्तमाण सांगावयास येथे मौजे गारडी येथील पवार लस्करात आहेत त्याचा गडी लस्करातून बारावे दिवसी येथे आला. त्यास येऊन साहासात दिवस जाले. त्याचे भावाचा निरोप सांगोन गेला. लस्करची बातमी सांगितली म्हणोन बोलत होता. लढाई जाली ही खरी. उभयेपक्षी मणुशे पडले. श्रीमंतापासी तीन कंपू आहेत. खेरीज राजेरजवाडे, जाट, सीक वगैरे मिळोन जमेत साठसतर हजार आहे म्हणोन सांगोन गेला.

१ आकळूजकर जंगम येथे परवाचे दिवसी आला तो सांगत होता. वाठारकर निंबालकर याचे दोघे जासूद आमचे मठात उतरले होते ते सांगत होते, श्रीमंतांचे लस्कर आशेरीस सोडोन सत्रा दिवस जाहाले. लढाई जाली खरी. पलटण माघ सरून दाहाबारा कोसावर जाऊन उतरले होते. त्यावर नायेकाणी त्या जासुदास बोलाऊन नेले होते. त्याजला काये सांगितले हे कळले नाही म्हणोन बोलत होता.

१ बाजारी वदता: आपल्याकडील पलटणानी बारी धरून श्रीमंतांचे फौजस आटकाव केला तेव्हा त्याणी जरनेल साहेबासी बोलणे करून, तूर्त बरसातीचे दिवस, उभयेपक्षी दगाफटका होऊ नये म्हणोन पुरंदरे वलीस दिल्हे आहेत. धान्ये माहाग आहे म्हणोन बोलतात.

१ छ २९ तारखीची अखबार रवाना केली ती येऊन पोहोचलीच आशेल.

१ मोगलाई तालुक्यात आपल्याकडील चटकरी ताकीद करितात, वसूल कमावीसदारास देऊ नये म्हणोन लोक बोलतात.

१ माहे मे महिन्याची रसीद पाठविली होती. आपला हुकूम आला, सातारियाहून ऐवज मागऊन घेने. त्यावरून त्यासहि लिा, तो रोजमुरा पावला नाही. हाली माहे जून महिन्याची रसीद सातारियास रवाना केली आहे.

१ तालुके घेरडी व काा करजगी येथील कतबे सातारियास रवाना जाले. आमचे गावचे कोन्ही गेले नाहीत; गेले तर सरकारचे गुणेगार, ऐसेच लिा येतेत.

१ काा करजगी	१ तालुके घेरडी
१ मौजे निंबोणी	१ मौजे भोस
	१ मौजे रड

१ येथून पाव कोसावर काल येथील कुंभार दावेकरी याणी मारला.

१ काल येथे आवजी सिंदे याचा चिरंजीव धोंडी श्रीमंतांचे लस्कराहून आला. त्यास लस्कर सोडोन आज आठरा दिवस जाले. तो सांगतो, हजरत मलकम साहेब याजकडील लहूसाहेब येकटेच येऊन श्रीमंताची भेट होऊन बोलणे होताच श्रीमंत आपले लस्कराजवल येऊन उतरले. ऐशे होताच त्रिंबकजी ढेंगला तर गैबच[1] जाहाला. कोणीकडे गेला त्याचा शोध नाही. दाहा बारा हजार फौज विंचुरकर, पुरंधरे, पंत प्रतिनिधि, आपटे याचा चिरंजीव वगैरे जमेत दरोबस्त देशांत विंचुरापाो बरोबर आलो. पुरंधरे विंचुरकर विंचुरास राहिले. वरकड आपल्या लग्याणी गेले. श्रीमंताबरोबर हजार दीड हजार जमेत गेली. बहुत आपल्या ठिकाणी कष्टी जाहले. इंदुरास छावणीस गेले म्हणोन सांगतो. याप्राो खिचित जाले.

माार साहेबाचे खिजमतीत लिा. बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त.

¶*Balvantrao Bapuji the news-writer reports to Elphinstone various sorts of rumours about the fighting between the Peshwa and the English.*

---

१ गैब=अदृश्य; गुप्त.

No. 235] [2-7-1818

श्री

HONOURED SIR,

साहेबाचे शेवेसी भगवंतरावजी बालाजी मुा ठाणे रावेर नजीक बराणपूर सलाम आर्ज विनंती विज्ञापना. ता छ २ जुलईपावेतो साहेबाचे मेहरबानगी सुखरूप आसो विशेष. साहेब इकडेस येतात हे ऐकूण फार आनंद जाला. आता साहेबाचे चरण द्रिष्टीस पडतील. पेसजी साहेबास मी पत्र पाठविले ते पावलेच आसेल. हली लिहितो जे, नागपुराकडून भोसले याचा कारकूण राजश्री दाजीबा गोविंद येथे येऊन बाजीराव साहेब याजकडील काही आराब व पन्नास स्वार बेरोजगारी होते, त्याजपैकी पन्नास स्वारास व च्यारसे आराब याजला चाकरीस ठेऊन कालच कूच करून भोसले याजकडेस गेला. आणखी च्यारसे आराब व मोलद (?) आहेत याजलाहि घेऊन जाणार आहे, परतु खर्चास नाही सबब तेवडेच घेऊन गेला. साहिबास कलावे. वरकड मजकूर सर्व बरा आहे. हामिशा सेवकावर ममता ठेवीत जावी हे विज्ञापना.

¶*This is a news-letter of Bhagwantrao Balaji reporting that some Arab soldiers disbanded by the Peshwa have been again taken into service by the Nagpur Raja.*

No. 236] [4-7-1818

श्री

आखबार सुभे खानदेश सरहद मथावार तापीतीर बऱ्हाणपूर येथील वृत. कपतान हाजीसाहेब बहादूर व मीर फज्लआलीखा बाहादूर मालेगांवीहून धरणगावी छावणीबदल आले. समागमे शंभर स्वार व येक हाती आहे. त्रिंबकजी ढेगला वण पोचे गांवीं धरून चांदवडांत आणून बेड्या भरून पाहऱ्या कबिल्यासुधा ठेविले आहेत. कपतान ज्यान बिरग साहेब बहादूर मालेगांवींहून कूच करून सोनगिराकडे छावणीस येणार ते दोन मजला त्यासुमारे आले आहेत. आमलनेर-कर आरब बदमस्ती करीत आहे. धन्यास मानीत नाही. धरणे राजेबहादूर याजवर करून आज तीन दिवस जाले, मोठे निकडीच धरणे केले आहे. सेवेसी श्रृत होय रवाना छ ४ जुलाई मुकाम पारोले.

¶*News is sent from Parole of Trimbakji Dengla having been arrested at Wun and kept at Chandwad with his family ; Capt. Briggs is coming to Songir for camping says the report.*

No. 237] *[11-7-1818*

श्री

हजरत खुदावंदन्यामत सरदार अलीशान खुदोयगा
नवाबसाहेब बलबाहादुर याचे खिजमतीत

आर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बादबंदगी आदाब तसलिमात कुरनिशात बाज्या आऊर दे मारूज मे रसानद आके येथील खैरसला. अखबार देवढी मुकाम मंगलवेढ नजीक श्रीपंढरपूर तो छ ११ माहे जुलाई सन १८१८ इसवी मुताबीक छ ६ माहे रमजान सन १२३३ रोज शेनवारपो येथास्थित असो विशेष.

१ नगराहून येथे काल ग्रहस्त आला तो सांगत होता:

१ रास्ते, ढमढरे पुण्यास येऊन दाखल जाले. आपण नगरास आला, पुढे जाणार म्हणोन सांगत होता.

१ श्रीमंताकडील मार तेथे बोलत होते ते सांगितले. विंचुरकर, पुरंधरे रामचेंद्र व्यंकटेश, रामदीण, आपटे ही मंडली जवल आहे. फौज बारा-पंधरा हाजार आहे. सिकाकडील, जाटाकडील राजेरजवाडे याकडील वकील जवल आहेत. सिकास आठ आणे देऊ म्हणोन बोलणे आहे. त्यावर हजरत जनराल मलकम साहेब याचे बोलणे लागले, तुमचा आमचा तह व्हावा. त्यावरून बाजीराव साहेब यांचे बोलणे पडले, तुमचा आमचा आता तह होता दिसत नाही. तूर्त कारन नाही. तेव्हा सिंदे याचे वकील बोलाऊन आणून त्याचे विद्येमाणे तहाचे बोलणे जाहाले. च्यार महिणे बरसातीचे तुम्ही आम्हासी व आम्हा+सी खटला, दगाफटका उभये-पक्षी न करावा. दुसरे, तुम्हासी च्यार आणे देऊ केले त्याचा मुलख तोडून घेऊन तुम्ही आपले ठिकाणी आसावे. त्यावर आपल्याकडील बोलणे पडले, बहुत चांगले. परंतु जेथे तुमचे बारा आणे तेथे आमचे च्यार आणे ऐसे व्हावे हे बोलणे पडले. त्यावरून कलकत्यास पत्र पो आहेत. तेथून हुकूम जाबसाल ठेरून येईल त्याप्रो करावे म्हणोन तह होऊन इंदुरावर किंवा महेश्वरावर श्रीमंतांची छावणी जाली. हजरत जनराल मलकमसाहेब लस्करसुधा येक मजलीवर छावणी करून आहेत. सिंदे याणी सांगोन पो श्रीमंतास की, इंग्रजाचा व आपला स्नेह, त्यापक्षी त्याचा आपला तह व्हावा हे चांगले. सिकासी आपण बोलणे करिता हे ठीक नाही. त्यावरून हा तह ऐसा ठरला. दुसरे आणखी सांगितले, यामधे कैलासवासी श्रीमंत दादासाहेबांचे वख्तास त्याणी आपणास लेहून

\+ मुळांत असें आहे.

दिल्हे होते तो दस्तयैवज माघारी घेतला होता तो व दुसरा दस्ताऐवज आपला त्याजपासी आहे की, राज्यासी दावा ठेवणार नाही, तो व तिसरा दस्ताऐवज टिपूचे राजे आपण घेतले ते समई करार होता, जे टिपू चौथाई खंडणी देत होता ते आम्ही देऊ, ऐसे तिन्ही दस्ताऐवज श्रीमंतापासी आहेत. भोसले, गाईकवाडसुधा तहाचे बोलणे होताच त्रिंबकजी निघोन गेला हेहि सांगत होता.

[नंतर १ कलम गाळले.]

१ पुण्यास प्रथम लढाई व दुसरी लढाई जाली ते समई, कोन्हास लुटीचा माल सापडला व घोडे जणावरे वगैरे आसबाब लुटून घेऊन आलेले ग्रहस्त येथे व बाहीर खेड्यानी आहेत म्हणोन बातमीदार येऊन सांगतात. परंतु त्यास विचारणा करण्याविसी हुकूम नाही म्हणोन बातमीदारास सांगितले. हुकूम आल्यास चौकसी करून लेहून पाठऊ.

१ सातारीयाहून जाहिरनामा आला त्यात मार: बाजीरावसाहेब याणी ढेंगला कैद करून जनराल मलकमसाहेब याचे हावाली करावा हे वर्तमान त्यास समजल्यावरून पळून गेला. तो कोठे जाऊन बंड करील याकरिता कमाविसदार याणी नजीक सरदार आसतील त्यास कलवावे, ढेंगला याजकडे कोन्ही नवकर राहूं नये व सरकार कुंपणाचे दस्तकाखेरीज कोन्ही हात्यार घेऊन फिरो नये व ज्या तालुक्यात राहील तेथील जमीदाराणी बातमी सरकारास कलवावी, न कलविल्यास वतणे, इनामे जप्त होतील. हात्यार घेऊन फिरेल ते सरकारचे गुणेगार, याप्रो आला. त्यास जाहीरनाम्याच्या नकला करून आसपासचे तालुक्याचे कमावीसदाराकडे पाठऊन त्याचे उत्तर आणून ठेविती.

१ छ ९ तारखीची अखबार रवाना केली ती येऊन पोहोचलीच आशेल.

१ आडीच महिणे होत आले, आद्याप खर्चास दरमाहाबदल मिलत नाही. जासूद बाहेर फिरतात त्यास खर्चास तर पो. बरतर्फ जासूद करविले त्यांचाहि दरमाहा पो नाही. बरोबर सातारियास ल्याहावे हे ठीक नाही, त्याजला राग येईल. येथ ज्याचे रुो घेऊन दिल्हे ते मागतात. पर झिला; येथे कैशे करावे? पैशाखेरीज तर चालत नाही.

मार साहेबाचे खिजमतीत लिा आहे. बंदगीस रोशेन होये हे अर्जदास्त.

¶*Balwantrao Bapuji sends news to Elphinstone from Mangalvedha of the movements and negotiations of Bajirao with Malcolm, Daulatrao Sindia and others. Trimbakji Dengle's sudden disappearance from the Peshwa's army and the efforts made by the British authorities to secure him are also alluded to.*

7203

No. 238] [17-7-1818

तेरीख २३ माहे जुलई सन
१८१८ इसवी मुा छ १८ रमजान

श्री

हजरत खुदावंद न्यामत सरदार अलीशान
खुदायगा नवाब साहेब बलबाहादुर
याचे खिजमतीत

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बादबंदगी आदाब तसलिमांत कुरनिशात. बज्या आऊरदे मारूज मे रसानद आके. येथील सला अखबार देवढी मुा मंगलेवढ नजीक श्रीपंढरपूर ताा छ १७ माहे जुलई सन १८१८ इसवी मुताबीक छ १२ माहे रमजान सन १२३३ रोज शुक्रवार पो येथास्थित असे विशेष. इकडील मार

१ त्रिंबकजी ढेंगला किले आमदानगर येथे गेले बुधवारी धरून आणून किल्यास दाखल केला, आज दाहा दिवस जाले. भिलाणी हावाला केला म्हणौन सांगतात.

१ रो रामचेंद्रबावा गोसाई पैठणकर तेरावे तारिखीस क्षेत्रास आले आहेत, बरोबर दस्तक आपले आहेत.

१ रो दाजीबा देशमुख कडेकर येकादसीस क्षेत्रास आले आहेत. बरोबर दस्तक आहे. त्याची गढी आपले सरकारात आली होती. त्याची त्याजकडे दिल्ही म्हणौन सांगत होते.

१ रो नानासाहेब माणकेश्वर तेरावे तेरखीस क्षेत्रास आले. बरोबर पंचेवीस तीस शागीर्द पेशा वगैरे सरजाम आहे.

१ हजरत बडेसाहिब आमदानगराहून पुढे आवरंगाबादेस गेले. आज आठ दिवस जाले. म्हणौन येथे बोलतात.

१ श्रीमंत बाजीराव साहेब उजेणीस आहेत. बरोबर पाच हजार फौज सिंदे याजकडील आहे. खर्चास सिंदेच देतात. कलकत्यास पत्र वकील गेले आहेत. तेथ ठरऊन येईल त्याप्रो करावे म्हणौन सांगत होता.

१ श्रीमंत इनाईकराव साहेब सागरकर बुंधेले याचे काही कारभार प्रकरणात होते, त्यावरून सागरचे ठाणे आपल्याकडे दिल्हे म्हणौन पाच हजार स्वाराची नेमणूक करून घेऊन आपल्याकडे नवकर होऊन आहेत म्हणौन सांगत होता.

7204

१ नागपुराकडोन येक ग्रहस्त आला तो सांगत होता. भोसले ज्या गावीहून काहाडून नेले तेव्हा आम्ही नजीक होतो त्यामुळे आम्हास आडथला जाहाला होता. आम्ही लोंढापरीत होतो. त्यास कलकत्याकडे घेऊन जात होते. त्याचा मुकाम बाजार तल्यावर होता. आमचा त्याचा दीड कोसाचा तफावत होता. पाहारेकरी फितऊन ठेविले होते. बदली येण्याचे सुमारास राज्यास कुडती टोपी घालून बंदुख संगीणसुधा हाती देऊन पाहारेकरी यात उभे करून होते. त्याचे बिछाण्यावर लोड टाकून वर पाघरून घालून मणुशे निजले असे दाखऊन आगोधरच हा बेत करून ठेवला होता तो बदलीहि आली. त्यास रपेट दिल्ही, साहेब निजले आहेत ऐसी इतला करून निघोन गेले म्हणौन सांगत होता.

१ आपण आवरंगाबादेस जाण्याचे कारण येक ग्रहस्त सांगत होता. रा लाला गोविंदबक्ष याचा व आपल्याकडील तेथे साहेब आहेत त्याचा बेबणाव जाहाला म्हणौन गेले. कारन पासष्ट लक्ष रुाचा मुल्खक द्यावा ऐसा खर्च्याचे सालचा करार व मोगलाई पलटणे साहा व च्यार हजार फौज आपले तैनातीस द्यावी. त्याचा रोजमुरा त्याणी द्यावा ऐसा करार. त्या रोजमुऱ्यास हरकत पडती म्हणौन च्यालीस लक्षे रुाचा तालुका तोडून आपल्याकडे करून घ्यावा म्हणौन बोलणे पडले. याकरिता बेबणाव म्हणौन सांगत होता.

१ छ १४ तारखीची अखबार रवाना केली ती येऊन पोहचलीच आशल.

१ पंढरीस मणुशे मरण्याची पटकी आली आहे त्यामुळे नित्ये च्यालीस पणास मणुशे मरतात.

माार साहेबाचे खिजमतीत लिाा आहे. बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त.

¶*Balwantrao Bapuji reports news from various quarters, particularly about Bajirao's movements, the capture of Dengle, the escape of Appasaheb of Nagpur from custody and other topics.*

No. 239] [19-7-1818

तेरीख २४ माहे जुलई

सन १८१८ छ १९ रमजान.

श्री

HONOURED SIR,

साहेबाचे शेवेसी शेवक रावजी बालाजी मुकाम रावेर नजी(क) शहर बराणपूर दोनी कर जोडोन सलाम आदाब आजे विनंती विज्ञापना. ताा छ १९ जुलई

पावेतो साहेबाचे मेहेरबानगीकडून सुखरूप असो विशेष. साहेबाचे शेवेसी च्यार पाच पत्रे पाठविली ती पावलीच असतील. परंतु त्याचे येकाचेहि उतर आले नाही. तरी साहेबी हमेशा पत्र पाठऊन सेवकाचा सांभाल करीत जावा. आम्ही इकडेस आलो त्या समई हजरत ज्याफरीसाहेब याजला आर्ज केला होता की, येवडा दरमाहा आम्हास पुरत नाही. त्याचे उतर साहेबानी दिल्हे की खेडीघाटचे डाकेचा बंदोबस्त करून यावे म्हणजे बडेसाहेबाजवळ आर्ज करून दरमाहा वाढऊ. त्यापुढे साहेबानी आम्हास बोलाविले नाही. इकडेसच ठेविले. काही दिवसानंतर पुढे दंगाहि जाला व हली हजरत ज्याफरीसाहेब पुण्याहून हैदराबादेस निघोन गेले. आता सर्वश्री आमचे खावंद साहेबच आहेत. बराणपुरास साहेबलोक आले गेले त्यांची चाकरी चांगली केली व काही दिवस हजरत कपतान ज्यान ब्रिगसाहेब याचेजवळहि होतो. डाकेचा दरमाहा पुरत नाही सबब ब्रिगसाहेब याणी मेहरबानगी करून रावेरचा आमल सांगितला आहे. दरमाहा रुो ७० केले आहेत. डाकेची चाकरी मीच करितो. डाकेचे चाकरीस कोण्या गोष्टीची खलेल आमचेपासून पडत नाही. जनराल मालकंसाहेबाकडोन कागदपत्र व कट [?] येतात ते आम्ही साहेबाकडे रवाना करतो व साहेबाकडोन मालकं साहेबाचे नावे पत्रे येतात तीहि रवाना करितो. मी साहेबाचे पदरचा याजकरिता जनराल डपटीनसाहेब व मालकंसाहेब आम्हास फार चाहतात. बराणपुरास आले होते त्या समई सर्व कामकाज डाकेचे आमचेच हाते घेत होते. इकडील मजकूर काही नवल विशेष नाही. कितीक बंडे होती त्याचा बंदोबस्त ब्रिगसाहेब याणी केला आहे. बहुत काये लिा हे विनंती.

Honoured Sir,
Your most obedient humble servant,
Rowjee Ballajee,
Post Office Writer.

Boorhanpoor,
19th July 1818.

¶*Raoji Balaji Post Office-writer, who seems to write the last few words in English himself sends news from Burhanpur.*

7206

No. 240] [18-8-1818

तेरीख २० माहे आगस्ट
इसवी मुा छ १६ सवाल

श्री

हजरत खुदावंद न्यामत सरदार आलीशान
खुदायगान नवाब साहेबलबाहादूर
याचे खिजमतीत

आर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बाद बंदगी आदाब तसलीमात कुरनिशात बज्या आऊरदे मारूज मे रसानद आके येथील खैरसला अखबार देवळी मुा मंगलवेढ नजीक श्रीपंढरपूर ताा छ १८ माहे आगस्ट सन १८१८ इसवी मुताबीक छ १९ सवाल सन १२३३ रोज मंगलवार पो येथास्थित आसा विशेष. इकडील मार -

१ रा बापू गोखले याची स्त्री काही येक दिवस तुलजापुरी होती. नंतर श्रावण शुध्ध येकादसीस श्रीक्षेत्र नरसिव्हपूर येथे येऊन राहिले होते. बरोबर पाच स्वार व पडतलाचे पाच तट्टू व येक म्याना, शागीर्दपेशाचे पाच च्यार माणस व आपलेकडील दोन चपरासी ऐसे बरोबर होते. क्षेत्रात त्यांणी हातात बांगड्या घातल्या, कपाली कुंकू होते, गल्यात गलसुरी व मंगलसूत्र होते. त्याचे माणस सांगत होते की आपण खर्चास रुो पनास हजार दिल्हे म्हणौन. क्षेत्रीचे ब्राह्मणानी बाईस विच्यारिले, खाशाविसी बाहेर वदंता उठली हे काय? त्यावरून त्यानी सांगितले, गोष्ट बातल[१] आहे. द्वादसीचे दिवशी कूच करून पुन्याकडे गेले. कलम

१ रा आबा पुरंधरे व नाना पुरंधरे जेजोरीस आले म्हणौन खबर आहे. कलम

[या पुढें ९ कलमें गाळलीं.]

१ गोखले याचे वाड्यात गज्या व तुलया होत्या त्या गोपालपुरावर लस्करात घेऊन गेले. कलम

१ छ १४ तारखीची आखबार रवाना केली ती येऊन पोहोचलीच आसेल. शेरीरास आद्याप आराम पडत नाई. आवशेधपान्यास तीस च्यालीस रुा खराब केले, परंतु ईश्वर आराम करील तो दिवस खरा. सरकार नवकरीवर लक्ष आसले तर लवकरच आराम पडल. कलम

मार साहेबाचे खिजमतीत लिा आहे, बंदगीस रोशन होये आर्जदास्त.

¶*Balwantrao Bapuji the news-writer reports to Elphinstone that the wife of Bapu Gokhale does not believe in the death of her husband and goes about with the marks of a married woman.*

---

१ खोटे.

No. 241] *[13-9-1818*

अर्जी बजनाब फैजमाब हजरत बडे साहेब बाहादूर याचे खिजमतीस

आर्जदास्त फिदवी नारोपंडत आदाबंदगी मारूज मेदारद हकीकत छ ११ रोज माहे जिलकाद पावेतो साहेबाचे कृपेकरून सर गरम आसो विशेष-इकडील वर्तमान तरी मुंबईहून परभू आणि मी पुण्यास आलो. (साहे) बाची भेट संगमावर डेऱ्यात जाहाली. परभूस उदईक बोलाविल होते. ते दिवसी येकादसी होती. लढाईचा बेत जाहाला. लढाईच्या पूर्वी येऊन बातमीचा कागद संगमावर साहेबास प्रविष्ट केला. ते दिवसीची लढाई समात जाहाली. दुसरे दिवसी खडकीच्या पुलावर बातमीचा कागद घेऊन जासूद मी बराबरच आलो. त्या वेलेस साहेबी मजला डेऱ्यात बोलाऊन नेले आसता ग्राटसाहेब यानी उतर केले साहेब हा दरजी आहे. तेव्हा त्याची गोष्ट ध्यानात न आणून मजला बक्षीस देत होते, मी काही घेतले नाही. बाहेर बालाजीपंत नातूस बोलाऊन चौकसी करविली आणि म्हणो लागले जे याचप्रमाणे श्रीमंताकडील व गोखल्या-कडील बातमी डेऱ्यात जाऊन बातमी खचीत आणावी म्हणजे बडेसाहेब बक्षीस देतील आणि कुंपीण चाकरी केली आसता जन्माचे आन्न होईल ऐसे बोलून माझेबराबर जासूद होता त्यास साहेबानी इनाम दाहा रुपये दिल्हे. त्याजवर बातमीच्या कामावर ठेविलेच होते. हे वर्तमान गोखल्यास कलून मजला कैद करून ठेविल होते. पुढे साहेबास यश प्राप्त जाहाल्यावर मुक्त जाहालो हे साहेबाच्या ध्यानात आसलच. आलीकडे पंढरपुरी घरी राहिलो होतो. हे वर्तमान गोखल्याकडील काकोबा परभूला कलून मी बातमी पोहचवीत आसतो ऐसे (म)नात आणून मजला कैद करून आठसे रुपये दंड घेतला. श्रीमता(वर) साहेबाची स्वारी लांब गेली जाणौन सोलापुरावर जरनेल तामस मंड्रोल साहेबापासी बातमीच पत्रे स्वाध्यान केली त्यावरून सतोष जाहाले आणि राजश्री श्रीनिवासराव मामलेदार यास पत्र दिले की हे पंढरपुरी राहातील, यास कोण्या गोष्टीचा उपसर्ग लागू न देणे. याप्रमाणे पत्र घेऊन पंढरपुरास आलो. त्याजवरून साहेबाची कृपा मजवर आहे हे जाणौन कोतवालीच काम मजकड सागितले. नतर आलीकडे ग्राटसाहेब याजकड आमल पढरपूरचा जाहाला तेव्हा रोज वर्दी ज्याप्रमाणे वर्तमान (येईल) त्याप्रमाणे लिहीतच गेलो. परंतु येकहि वरदीच उतर आले ना(ही) * * * ठा चौ रोजात राजश्री श्रीनिवासराव मामलदार याची तह * *

+ चा–

करून राजश्री चिंतो रघुनाथ गाडगील आमलाच्या कामावर पाठविले आहेत. साहेबास कलावे. मी यथून तीस पस्तीस कलमबंदीच्या यादी करून ग्राटसाहेब यास पाठविल्या त्याच्या नकला करून साहेबास आलाहिदा यादी करून पाठविल्या आहेत सेवेसी यऊन पोहचतील. माझा उदयकाल जाहाला म्हणौन साहेबाची स्वारी माघारी परतली. मजला साहेबाच्या पायासिवाय आधार दुसरा नाही. मी सर्वाचा त्याग करून साहेबास शरण आलो, त्यापक्षी माझा आभिमान साहेबास आसावा. मजला आद्यंत मार ल्यावयास कारण नव्हते, परंतु साहेबाचे पदरी मजसारिखे नारोबा हजारो आपले पदरी, तेव्हा माझ स्मरण आहे किवा नाही म्हणौन साहेबास काही तरी खूण पोहचून स्मरणात यावे म्हणौन लिा आहे, तरी साहेबी कृपा करून पत्र ध्यानात आणून उतर देण्याविसी आज्ञा व्हावी. उतर आले म्हणजे मी जनाबेत यऊन हजर होतो. ज्यादा लिहिणेस ताकत नाही हे आर्जी.

¶*Naro Pandit writes to Elphinstone recalling his services in supplying information during the late war and requesting reward. This is a sample of numerous requests from spies which poured before the British officials after the war.*

No. 242] [*17-9-1818*

अर्जी बजनाब फैजमाब[१] हजरत
आलपेष्टणसाहेब बडे साहेब बाहादूर
याचे खिजमतीस

आर्जदास्त फिदवी नारोपंत कोतवाल आदाब बंदगी मारूज मे दारद[२] हकीकत छ १९ रोज माहे जिलकादपावेतो साहेबाचे कृपेकरून रयतसुधा सरगरम आसो विशेष इकडील वर्तमान तरी तपसील :—

१ श्रीमंत बाजीरावसाहेब जनरल मलकमसाहेब बाहादूर याचे विच्यारे पुस्कर्ण तीर्थास गेले म्हणौन आवाई आहे. कलम

१ राजश्री बालाजीराव आमलदार याचा येकांत रोज होतो. गोखल्याच्या कारकुनाबराबर देवास जावे, हर कोठे जात

१ गोखल्याची बायको सासवडी आबा पुरंधरे याजपासी आहे म्हणौन आवाई आहे. कलम

१ राजश्री तात्या मजमदार हे श्रीमंताचे पदरचे, श्रीमंतानी वीस हजार रुपये इंग्रजाचे आनिष्ट व्हावे म्हणौन दिल्हे, आनुष्ठाने करविली ही बातमी

---

१ फैज् म आब = full of generosity. २ मारूज मे दारद् = begs to request (Verma).

आसल्यास त्यावाचून जाऊ नये. काये मसलतीत आहेत हे समजत नाही. विच्यार दिसण्यात नीट दिसंत नाही. साहेबास कळावे. कलम

१ तीन वर्षे गुराची चोरी करून लोकाची घर बुडवीत आसत तो चोर आम्ही गुरासुधा धरून हवाली केले आसता पाटील कुलकर्णी व आमलदार मिळून दोन हजार रुपये आंतस्त घेऊन चोरास पारपत्य न करिता सोडून दिल्हे हे चांगले की काय! साहेबास कळावे. कलम

१ चावडीचा व नाकबंदीचा बदोबस्त व चौकी पाहारा खबरदारीन आहे. कलम

१ मजजवळ सिपाई आा पाच आहेत त्यास आज तीन महिने जाहाले रोजमऱ्यास ठिकाण नाही. पोटास दिल्ह्यावाचून चाकरी कशी होईल! तर रोजमऱ्याचा हुकूम यावा. कलम

१ गावात भाजीपाल्यावर उकाले तेरा आहेत तेणेकडून बागवानास व माल्यास बहुत उपद्रव होतो. इतका उपद्रव श्रीमंताचे वेळेस नव्हता. हली रयतेस सुख देणार साहेब समर्थ त्यापेक्षी याचा बंदोबस्त करावयाचा हुकूम यावा. कलम

श्रीनिवासराव आमलदार यास लागली तेव्हा त्यास तगादा केला. नंतर मजमदार याणी आमलदारास तीनसे रुपये आंतस्त दिल्हे. नंतर मारनिले जरनेल तामस मंडरोज साहेबापासी जाऊन फिरयाद केली की श्रीमंतानी देवळाप्रीत्यर्थ वीस हजार रुपये दिल्हे आसता आमलदार आम्हासी तेटे करून तीनसे रुपये आतस्त घेतले. त्याजवरून यातील आभिप्राय न जाणता जरनेर तामस मडरोल साहेब यानी रुपये माघारी देण्याविसी हुकूम केला. रुपये आमलदारानी माघारी दिल्हे किंवा न दिल्हे हे समजत नाही. ते तात्या मजमदार आमलदाराबराबर येकांत करून कामाची वहिवाट करितात. कलम

१ विठलपेठेतील सेटेपण नसता सेटपण जबरीने आनभऊन पहिल्या सेट्याचे घरदार लुटून आपले घर भरले. पेठेत रयतेवर बहुत झाली करितो. सरकार हुकुमासच मानीत नाही. ही गोष्ट आमलदारास समजाविली, परंतु मनावर घेत नाहीत. याजकरिता साहेबास विनती लिहिली आहे. तर पहिल्या सेट्यास स्थापिले आसता सर-

1 General Thomas Munro.

१ तूर्त फंदफितूर च्यालीस कोसपर्यंत आसपास कोठे नाही. येविसीची बातमी वरचेवर घेत आसतो. कलम

७

कारात नजरहि मिलती आणि रयतहि राजी राहाती. कलम

३

यकूण दाहा कलम सेवेसी लिहून पाठविली आहेत. साहेबी छयान करून हुकूम यावा म्हणजे त्याप्रमाणे बंदोबस्त करीन. मी सर्वाचा वाईट होऊन साहेब चाकरीस हजर जालो, त्यापेक्षा माझा आभिमान धण्यास आसला पाहिजे. ज्यादा लिहिणेस ताकत नाही. हे आर्जी.

¶*This is a report of Naropant Kotwal of Pandharpur to Elphinstone about important events occurring in the city.*

No. 243] [*24-9-1818*

तेरीख २७ माहे सतंबर
सन १८१८ इसवी मुताबिक छ २९
जिलकाद

श्री

साहेब मेहेरबा खुदावंत बालामुनाकिब अलीशान हनराबल मौट इष्टवारीट इबफिसतन साहेब बाहादूर सलमुल्हू ताला

॥ खिजमतीस बालाजी नारायण नातू सलाम बाद सलाम' येथील खैरयत तागाईत छ २२ जिलकादपावेतो साहेबाचे मेहेरबानीने खैर असे. दरिविला मेहेरबा पाटींजरसाहिब व राबीसंन साहेब यांणी पांच गांवच्या सनदा फिदवीचे नावे तयार करून पाठविल्या त्या पावोन बहुत सतोष जाहाला. शेवकाकडून इतकी खिजमत जाहाली नसतां इनाम बहुत मिळाले. फिदवीची उमेद इतकी नवती. या मेहेरबानीचा बयान काय करावा. सेवकाचा प्रतिपाल साहेब करीतच आहेत, परंतु पुस्त दरपुस्त इनाम खाऊन साहेबाचे हकात दुवा मागत जातील हे आर्जदास्त.

¶*Balaji Narayan Natu communicates his profound sense of gratitude to Elphinstone for the inam of five villages so graciously conferred on him.*

No. 244] *[17-10-1818*

त्रिसुद

**Permit the bearer named Narroo Vistnoo Apty to proceed unmolested from Poona to Bajee Row's Camp via Anna Bota, Copergaum, Ankye, Mallygaum, Booranpoor and Ougien, provided he is not accompanied by more than 50 armed Horsemen, 50 Tuttoos of baggage, 5 Camels, 50 armed men and 100 followers. This passport to have effect for three months from this date.*

Poona, 17th October 1818.

¶This is a passport given to Naro Vishnu Apte who was one of Bajirao's trusted officers. The descendants of his family stay at present in Gwalior.

No. 245] *[25-10-1818*

तारिख २५ माहे
आखटोबर सन १८१८ इसवी
मुा छ २३ जिल्हेज

श्री

विज्ञापना येथील कुशल ताा आश्विन वाा ११ पावेतो क्षेम असे विशेष. वद्य अष्टमीस मध्यरात्रौ मुल्याचे आंगास आले आणि वाखा जाहाला; नंतर भोवतालच जागे होऊन जवळ जाऊन आगास आले होते त्यास विच्यारू लागले की तू कोण आहे? येथे यावयाचे प्रयोजन काय? त्याजवरून ते बोलते होऊन म्हणो लागले की मी गंगाधरशास्त्री आहे; मला निरार्थ मारिले. आता मी सूड घेईन. इतके बोलून आंगातील वारे निघोन गेल्यावर सावध जाली. ही अक्षरे ल्याहावयासी मनास संकोच वाटला. दुसरे कोणी आंगास येऊन त्याचे नाव सागितले असेल. यातील काय असेल ते असो. परंतु वरदीप्राा दुसरे वद्य नवमी शनवारी तिसरे प्रहरी राजश्री बापू केलकर येऊन खलबत करून गेले; व तेच दिवसी प्रथःकाली बारा घटका दिवसास वोा राा रघुनाथशास्त्री सहश्रबुधे श्रीमहायात्रेस निघाले. त्यास खर्चास येक सहश्र रुपये हाली सिका ताम्हनात घालून वरती केळीची पाने लाऊन शागिर्दाजवळ देऊन फराळाचे म्हणोन त्याचे घरी पावते केले. त्याजवर वद्य दशमीस राजश्री अणा नगरकर याचे चिरंजीव भाऊ नगरकर बावधनाहून दोन प्रहरा भोजनास आले ते तिसरे प्रहरी खलबतास बसले होते. तितक्यात

---

* मूळ कागदावर याच अर्थाचा मोडीत लिहिलेला दस्तक आहे.

त्याचे तीर्थरूपाचे पत्र मुदाम माणूस घेऊन आला त्याचा जाब लिहून दिल्हा, आणि माणूस रवाना करून दिल्ह्यावर च्यार घटका दिवस राहाता निघोन आस्तमानी बावधनास गेले. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This letter notes a very curious incident referring probably to Bajirao's wife Varanasibai having been possessed by the spirit of Gangadhar Shastri and giving utterance to these words, viz., "I am Gangadhar Shastri; I was in vain murdered and I would avenge the murder." The date of the letter and its receipt are the same : so the letter cannot refer to Bajirao who was then in the north.*

No. 246] [*4-11-1818*

तेरीख ७ माहे नवंबर
सन १८१८ इसवी मुा
छ मार मोहरम.

श्री

हजरत खुदावंदन्यामत सरदार अलीशान खुदायगा
नवाबसाहेबलबाहादुर याचे खिजमतीत

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बादबंदगी आदाब तसलिमात कुरनिशात बाज्या आऊर दे मारूज मे रसानद आके येथील खैरसला. अखबार देवढी मुा फलटण ता छ ४ माहे नवंबर सन १८१८ इसवी मुताबीक छ ४ माहे मोहरम सन १२३४ रोज बुधवार पो येथास्थित असो विशेष. इकडील मार :

[पुढील ८ कलमें मजकूर अवांतर सबब गाळला.]

१ रो बाळूजी पा गुजवटा मौजे झिरपवाडीकर सांगत होता. निपानीहून गडी आला तो सांगत होता. निपानकर याने किल्याचे बंदोबस्तास च्यार हजार पायेदल आरबसुधा किल्यांत ठेऊन जातीन सरंजाम सुधा किलेच्या पालीस बाहेर येऊन उतरला आहे.

१ दीपाजी डांगे पुणेकर मिरजस गेला तो जासुदास सांगत होता.

१ दौलतराव सिंदे याचे बैकोचे बोलणे पडले, आपण स्वस्त बसला, दक्षेनचे राज्ये गमाविले. त्यावर सिंदे याचे बोलणे पडले, श्रीमंतानी आमचे व होलकराचे पारपत्ये व्हावे म्हणोन इंग्रजास आणले. त्यापेक्षा त्याचे कैशे होते हे पाहू. नंतर पाहून घेऊ. त्यावरून बाई सरंजाम घेऊन दखणत येण्यास च्यार मजली आलाड आली आहे म्हणोन सांगत होता.

१ भोसले याजपासी बंगाल्यातील बैका च्यार नग्न आहेत. त्या सामील होऊन म्हणे पडले, आपण इंग्रजासी लढाई घ्यावी. त्याचा दारूगोला तुम्हावर विद्याचे सामर्थे न चाले ऐसें करितो, म्हणोन जवल येऊन राहिल्या आहेत.

१ छ १ तारखीची अखबार रवाना केली ती येऊन पोहोचलीच आशेल. मार साहेबाचे खिजमतीत लिा आहे. बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त.

¶*Balawantrao Bapuji the news-writer supplies Elphinstone with information received from various quarters in connection with the activities of the principal Maratha Sardars. He reports how mortified Daulatrao Sindia feels for not helping the Peshwa in his struggle against the English.*

No. 247] [*2-12-1818*

तारीख ९ माहे दिशंबर
सन १८१८ इसवी मुता-
बीक छ ६ सफर.

श्री.

हजरत खुदावंदन्यामत सरदार अलीशान खुदायगा
नवाबसाहिबलबाहादुर याचे खिजमतीत

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बादबंदगी आदाब तसलिमात कुरनिशात बाज्या आऊर दे मारूज मे रसानद आके येथील खैरसला. अखबार देवढी मुकाम फलटण तो छ २ माहे दुजंबर सन १८१८ इसवी मुताईक छ ३ माहे सफर स १२३४ रोज बुधवार पो येथास्थित असो विशेष. इकडील मार :

१ रामेश्वराकडोन व श्रीव्येंकटेशाकडोन यात्रा आली त्यात भाडेकरी म्हाळू बनगर आला तो सांगत होता. सोजर लोकाचे फलटण दोन कडप्यावर आले म्हणोन तिकडे बोलत होते. तीन वाराची खबर आहे. धारन आठ पायेली धान्ये आहे.

१ हजरत जनराल इस्मितसाहेब लस्करसुधा सोलापुरावरून इज्यापुराकडे गेले व काही मंगलवेढ्यावर लस्कर होते तेहि तिकडेच गेले म्हणोन बातमी आली.

१ श्रीमंत बाजीरावसाहेब भा वो ९ ते दिवसी कोन्ही येका क्षेत्रास जात होते. भरतपुरानजीक किला होता तेथे मुकामास गेले. तो किला सिंद्या-कडोन आपणाकडे होता. सुभेदार पहिलाच होता त्याचे स्वाधीण केला होता. आतून पत्रे सिंदे याणी किलेदारास पाठविले होते, श्रीमंत तेथे

7214

आल्यास मेजवाणीकरिता किल्यावर घेऊन जाणे तो आम्हीहि काही सरंजाम पाठऊन देतो. त्यावरून मेजवाणीस घेऊन गेले. सरंजामहि जाऊन पोहोंचला. त्याणी श्रीमंतास घेऊन गेले. म्हणोन येथे बोलत होते.

[पुढील २ कलमें गाळलीं.]

१ रिजमिटसाहेब बडे लस्कराहून चटेकरी आा ६ व नाईक आा १ यो सात, साहेब लोक आा ७ लस्करात पोहोचाऊन पुण्याकडे जाण्यास काो मारी आले. त्यास बेगारी आा ३ व तट्टू १ आजारी यास दिल्हे. [पुढील ६ कलमें गाळलीं.]

१ छ २९ तारखीची अखबार रवाना केली ती पोहोचलीच आशेल.

१ इज्यापुराकडोन डाकेवर पाकीट मेजर बारनसाहेब याचे नावे छ ३० तेरखेचे आज तिसरे प्रहरी आले. येथील डाकवाल्यानी आमचे हावाली केले. त्याचे म्हणे, आम्हास लस्करची खबर नाही, माघारी लावितो त्यावरून जासुदापासी पाकीट देऊन रातोरात जाऊन पानाचे निंबगावाकडे लस्करची खबर होती तिकडे पावते करावे म्हणोन सांगितले आहे. मार साहेबाचे खिजमतीत लिहिला आहे. बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त.

¶*Balawantrao Bapuji the news-writer communicates to Col. Bail that two detachments of the English forces are encamped at Kadappa, and that Bajirao has occupied the fort of Bharatpur which the Sindia had transferred to the British.*

No. 248] [*11-12-1818*

तेरीख १९ दिसंबर
सन १८१८ इसवी मुा
छ १६ सफर.

श्री

हजरत खुदावंदन्यामत सरदार अलीशान खुदायगा
नवाबसाहेबलबहादुर याचे खिजमतीत

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बादबंदगी आदाब तसालिमात कुरनिशात बज्या आऊर दे मारूज मे रसानद आके येथील खैरसला. अखबार देवढी मुकाम फलटण ताा छ ११ माहे दुजेंबर सन १८१८ इसवी मुताबीक छ १२ माहे सफर सन १२३४ रोज शुक्रवार पोा येथास्थित असो विशेष. इकडील मार :

१ सिंदे याचे लस्करातून हालकारे आा २ रोा हिंदुराव घाटगे याजकडील म्हणोन सांगतात. कागलास जावयाचे म्हणून बोलतात. त्याजपासी सरकारचे

दस्तक इंग्रजी हरप व पारसी हरप, वरती सिका थोर होता. गाल्हरी सोडोन येक महिना जाहला म्हणोन सांगत होते. त्याणी बातमी सांगितली त्यावरून हजरत कर्णेल कणिंगमसाहेब याजकडे हालकारे पाठऊन दिल्हे.

१ सिंदे याचे लस्करात फितूर जाहाला होता त्यामुळें बागेतच खाशे आहेत म्हणोन सांगत होते.

१ ज्यान बतिसी कैदत आहेत म्हणोन सांगत होते.

१ कारभारी रो बाबा पाटणकर व रो हिंदुराव आहेत म्हणोन सांगत होते.

१ कंपू ४ पलटणे पाटणकर याचे दिमतीस आहेत म्हणोन सांगत होते.

१ कलकत्याहून हजरत सिकंदरसाहेब वीस पंचेवीस पलटण घेऊन आले होते परंतु माहामारीचे उपद्रवामुळें मावारी गेले म्हणोन सांगत होते.

१ आपला व सिंदे याचा येकलासच आहे म्हणोन सांगत होते.

१ गोरखीचे राज्याची लढाई जाहाली होती म्हणोन सांगत होते.

१ श्रीमंत बाजीरावसाहेब पोखरनीवर (पुष्कर) होते; बरोबर दोन पलटणे आहेत भरतपुरास काही गेले नाही म्हणोन सांगत होते.

१ भरतपूरकर जाट याची लेक व लाहूरवाले सीक याचा पुत्र सोयरीक होऊन, लाहूरवाले सरंजामानसी भरतपुरास लग्नास येतात. याकरिता आपल्याकडील पलटणे सतरंजे नदीवर आहेत. थोडे सरंजामानसी यावे म्हणोन तट पडला आहे. सांगत होते.

१ होलकर इंदुरावरच पंचेवीस तीस हजार फौजनसी आहे म्हणोन सांगत होते.

१ नागपूरवाल्याची लढाई जाहाली म्हणोन ऐकिले ऐसे सांगत होते.

१ हालकारे याजपासी लखोट्याची थैली व खुले लखोटे ६ होते म्हणोन साहेबाकडे पाठविले.

१ सिंगरूपचे पलटणे भरतपूरावर आहेत म्हणोन सांगत होते.

१ आपल्याकडील पलटणे जागोजाग आहेत म्हणोन सांगत होते.

१	बाजीरावसाहेब याजपासी पलटणे	२
१	गाल्हेरीवर पलटण	१
१	इंदुरावर पलटणे	४
१	यावलावर पलटणे	४
१	मालेगावावर पलटणे	४

सदरहू मजकुराची अखबारी नजीक साहेब आले त्यास लिहो आहेत.

[पुढील १ कलम गाळलें.]

१ कालचा मुकाम जनराल इस्मितसाहेब याचा लस्करसुधा मौजे कन्हेर इसलामपूर येथे आला आहे म्हणोन बातमी आली.

१ आजचा मुकाम मौजे सासवड पाो फलटण येथे कर्णेल कणिगमसाहेब याचे लस्करचा जाहाला आहे.

१ मेजर वानरसाहेब याचे लस्करचा मुकाम नरसिव्हपुरावरच आहे म्हणोन बातमी आली.

१ छ ८ तारखीची अखबार रवाना केली ती येऊन पोहोचलीच आशेल.

माार साहेबाचे खिजमतीत लिाा आहे. बंदगासि रोशेन होये हे अर्जदास्त.

¶*Balawantrao Bapuji the news-writer supplies Elphinstone news received from various quarters in connection with the activities of the Peshwa, the Sindia, the Holkar and the Jat of Bharatpur.*

No. 249] [*12-12-1818*

तारीख १२ दिसंबर मार्गसीर्ष

श्री

यादी अर्ज अनंदराव येशवंत साहेबांचे शेवेसी ऐसीजे. सर ज्यान जनरेल मालकंसाहेब बहादुर यांचे शेवेसी. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब याणी तहाचे कामास पाठविलें त्यावरून साहेबांचे मर्जीनरूप. चाकरी केली. यावर कपितान लौहू साहेब बाहादुर यांचे दरम्यानगीनें जनरेल साहेबानी बोलविले जे, तुमचा बंदोबस्त अगोदर नंतर बाजीरावसाहेबांचा याप्राो हुकूम जाल्यावर शेवकाने अर्ज केला जे. माझे इतमाम लवाजम्यानिसी कंपनीसरकारातून बरदास्त व्हावी. त्यास उतर जाले कीं जो तुमचा मनोदय त्याप्रमाणेच होऊन येईल. नंतर शेवकाकडून चाकरी व्हावयाची ती जनरेल साहेबांचे मर्जीनरूप जालियावर श्रीमंत बाजीरावसाहेब याणी जनरेलसाहेबापासी मजला ठेऊन मंदुसरचे मुकामीहून पुढे रवाना जालियावर साहेबांचे बराबर मोहो छावणीस आलो. त्यानंतर जनरलसाहेबांचा हुकूम जाला जे तुम्ही खुदावंत न्यामत बडेसाहेब बहादूर साहेबाकडे जाऊन पुण्यास असावे. ते समई मी अर्ज केला कीं पुण्यास जावयाविसीचा हुकूम होतो तरी माझी चाकरी साहेबानजीक जाली त्यापक्षी साहेबाचे मेहेरबानगी करून आपणाजवळ ठेवावे. नंतर बोलिले जे, तुमचे बरे होणे असे आहे तर माजा हुकूम मान्य करून तुम्ही बडेसाहेबाकडे जावे आणि तुमचा बंदोबस्त करण्याविसी मी पत्रहि देतो. साहेब तुमची बरदास्त चांगली करतील. त्या हुकुमास मान्य करून इकडे रवाना करितेसमई पुन्हा सांगितले जे तुम्ही कोणेयेकविसी फिकीर करणे गरज नाही. तुम्ही बहुतावर येहसान कराल ऐसा तुमचा बंदोबस्त बडेसाहेब

करून देतील. माझी जबान आजपरियंत दुनियात खाली जाली नाहीं आणि पुढेहि होणार नाही. याप्रो खातरजमा करून बडेसाहेबांचे नांवे पत्र व घोडा व पोशाख व हजार रुपये वाटखर्चास देऊन इकडे रवाना केले. नंतर येथें येऊन दाखल जालेसमई बडेसाहेबांची भेट घेऊन पत्र दिल्हे, नंतर बडेसाहेब बहुत मेहरवान होऊन हकीकत पुसोन ज्या प्रो जनरेल साहेबानी मेहरवानगी केली त्या-अन्वये साहेबानीहि खातरजमा केली आणि सांगितले की तुमचा बंदोबस्त पिं ज ने री त (?) करून देऊ. त्यावर दुसरीया भेटीस खर्चाविसी अर्ज केला तो हजार रुपये मोघम खर्चास दिल्हे. नंतर दीडा महिन्यांचे अवकाशे आमचे लग्नाची स्थंल-योजना होऊन आली, त्यासमई साहेबास अर्ज केला तों दोन हजार रुपये बक्षीस म्हणोन लग्नास दिल्हे. त्यावर राहावयास घरहि दिल्हे. नंतर कर्नाटकप्रांती जलमार्गे साहेबांची स्वारी गेलियावर बेलगांवचे मुकामी जाऊन भेटलो तों धारवाडचे मुकामपावेतों स्वारीबराबर होतों. तेथें पुण्यास जावयाविसीचा हुकूम होऊन पाचशे रुपये मोघम खर्चास देऊन इकडे रवाना केले. पुणे मुकामी स्वारी आल्यावर भेट घेऊन अर्ज केला तों हुकूम जाला कीं तुमचा बंदोबस्त लवकरच होऊन येईल. त्यावर आम्ही स्वस्थ राहून साहेब सान्यावर मेहेरवान होतात त्याअन्वये आपलाहि बंदोबस्त होईल या इराद्यानें दरबारीं येऊन हाजरी मात्र देत गेलो. पुढे बडेसाहेब मुंबईस जातेसमई सांगोन गेले की साहेब तुमचा बंदोबस्त पिंजनेरीत करून देतील. त्यास साहेब मेहेरवान होऊन शेवकांचा बंदोबस्त जनरेलसाहेबाचे व बडेसाहेबाचे मेहेरवानगीनरूप होऊन यावा. साहेबाचे मेहेरवानगीच्या इराद्यावर आजपरियंत खर्च खाऊन कर्जदाराचें पेचांत सांपडलो व दिनचर्याहि लोटणें कठिण. ऐसियास कर्जदाराचे पेचातून काढोन खर्चास देण्याविसी हुकूम व्हावा. हे अर्जदास्त.

¶*Anandrao Yashwant writes to Malcolm requesting him that he should be granted pension for his loyal services in carrying out successfully negotiations about the submission of Bajirao. The writer's surname was Chandavarkar. He was deputed by Bajirao to visit Malcolm and negotiate terms for his submission. (See No. 270.)*

No. 250] *[1818*

श्री

यादी बापूजी भिकाजी भाव्ये याचे बोलणेची कलमे :—

१ साहेबाचे चाकरी पेशजी केली, त्याची अर्जी माधवराव याजकडे येऊन, त्यातील मजकूर विदित होऊन, आमची गरिबीवर नजर होऊन, सदरहु फडशाची आज्ञा होऊन कलमाकलमाची अभय दिल्याप्रमाणे बंदोबस्त करून द्यावा.

कलम

१ साहेबाचे राज्यात फंदफितूर होता म्हणौन अर्ज करावा तर खलबत खान्यात येऊन बोलावे. त्यास साहेबाचे नजरेस पडोन अर्ज केला तरी समक्ष बोलणे होत नाही; त्यास येविसी मदतखर्च ऐवज लागतो. त्यास कांहींच न बोलता राहिले तर येकवेल सरकार राज्यात बखेडा होऊन मसलत खर्चाखाली बहुत पडोन, बंदोबस्त करावा लागेल, अथवा शास्त्रीबावा समक्षता जाहाले हे पाहून मनात भय धरून, सावाचे बरे व्हावे म्हणौन चिंतन करीत बसलो; परंतु आमची कामिकाजे उलगडोन न दिल्ही. तर साहेबाचे वचन आहे, म्हणून आज बारा महिने स्वस्त आहे. राज्य-कारभार अशाश्वत जाणून बहुतावर दया केली. त्यातून किंचित आमचे उपयोगी येकवेल साहेब दिलखुसीनें राज्याचे कामात राहिल्यास होईल; परंतु बखेडा जाहाला तर आमची बोलणी स्मरणात राहाणार नाही; येविसी आमची गाठ पडोन आज्ञा व्हावी. कलम १.

१ करवीरास श्रीमाहालक्ष्मीस दर्शनास आम्ही जाणेचा वगैरे बहुत देवास नवस केले, त्यामुळे जरूर जाणे आहे; येविसी कुटुंबसुधा आज्ञा घेऊन जातो.

२

¶*Bapuji Bhikaji Bhate who worked as a spy or news-supplier to Elphinstone asks remuneration for his services.*

No. 251] [*1818*

श्री

यादी कलमे

१ त्रिंबकजी डेंगले याजकडे सरकारची बाकी बहुत आहे. त्यास डेंगले यास वसंतगडास नेल्यापासून जोपर्यंत मामलती कायम होत्या तोपर्यंत वसूल आला तो व मामलेदाराकडे हबते यावयाचे होते ते व यैवजाच्या चिठ्या आल्या होत्या त्या त्या ज्याच्या त्यापासी राहिल्या आहेत. मामलेदार बहुतकरून घरचेच कारभारी वगैरे आहेत, याची चौकसी करून यैवज घ्यावयाचा. कलम १

१ डेंगले यास वसंतगडास नेले त्याचे पूर्व दिवसी चेवेचालीस हजार येकशे पस्तीस होन घोड्यावर घालून किले ताथवडा येथे निंबाजी जाधव घेऊन गेला. पुढे किल्याची घालमेल जाली त्या समई फलटणास घेऊन जाऊन जानराव नाईक याजपासी दिल्हे, त्या पो च्यार हजार होन फलटणांत साहुकाराकडे मोडले. कलम

१ डेंगले याणी बंड केले त्या समई विंचूरकर याजकडे डेंगले याची जप्ती सांगितली. त्याणी कारकून निंबाजी जाधव याचे जप्तीस फलटणास पाठविला.

त्या समई निंबाळकरानी तीन हजार रुपये दरबारखर्च विंचूरकराचे कारभाऱ्यासी देऊन आमचे वाटेस जाऊ नये व चौकसी करूं नये याप्रो ठराव केला. आणि तेथे येका ग्रहस्ताचे घरी च्यार हजार रुा सापडले ते व अडचा हजाराचे दागिने घेऊन आले आणि कारकून उठऊन आणिला. निंबाजीचे घर वाई नजीक आहे. तेथून दीड हजाराचे दागिने आणिले. कलम

१ डेंगळे यास इंग्रज बाहादर मागू लागले त्या दिवशीं डेंगळे आळदीस गेले होते. दुसरे दिवसी घरी आल्यावर घरातील सोने रुपे व रोकड व कापड हरि भगवंत व श्रीपति जामदारखान्यावर होता याणे व रायाजीपंती घरातून बाहेर नेऊन ठेविले. कोणाचे घरी ठेविले ते समजले नाहीं, रात्रौ काढिले. कलम

१ गंगाधरशास्त्री यास मारिला सबब डेंगल्यास वसंतगडास नेला त्याचे दुसरे दिवसी हरि भगवंत याणी खंडू सिंदा व गंगाजी खाटीक यास किले ताथवडा येथे अटकेस नेऊन ठेविले. कारण शास्त्री याच्या घरी नेहमी बातनीवर होते, हें कोण्हाजवळ बोलतील सबब ठेविले. पुढे किल्याची घालमेल जाली तेव्हा दोघास फलटणास नेले. ते कटकटीस येऊन बोलू लागले की शास्त्री मारिला त्या बातनीस आम्ही होतो म्हणोन तुम्ही अटक करिता. त्यास दाजीबा डफळा याणे मारला. आम्ही बातनीस मात्र होतो. आम्ही लोकांस सांगतो तेव्हा गंगाजी बिडवई जामीन घेऊन मोकले केले. पुढे त्रिंबकजीने बंड केले तेव्हा याजकडे जाऊन त्या समागमे होते. हली गंगाजी राबीण साहेबाकडे चाकरीस आहे. कलम १

१ ताथवड्यास कारकून मुकुंदराव होता त्याजपासी हरिभगवंताचे पत्र दस्तायैवजी आहे व त्यास माहीत आहे. कलम १

१ डेंगले यास धरले त्या दिवसी सरकारची सिलक होती ते हारि भगवंत याणी आटपिली. त्याची चौकसी करून घ्यावयाची.

१ त्रिंबकजीचे मंडलीची जप्ती विंचूरकर याणी केली तो जप्तीचा यैवज सरकारात श्रीमंत येथून निघत तोपर्यंत दिला नाही व श्रीमंतानी मागितला नाही व याणी श्रीमंतास समजाविला नाही. कलम.

१ अमदाबाजची मामलत नारबा ताकटे याजकडे व कर्नाटक हैबती जगथाप याजकडे. त्याजकडे सिलका व धानाले (?) जाल्यावर वसता तसीच आहे. कलम १

सदरहूची चौकसी करून मुदे अंगी लाऊन यैवज न घ्यावयाचा असिलियास आज्ञा जाल्यास करू.

¶*This paper mentions, among other items, some details of the murder of Gangadhar Shastri, the imprisonment of Trimbakji Dengle and his accomplices and the confiscation of their property.*

7220

No. 252] [1818?

श्री.

यादी मणीराम लाला याची कन्या, तिचे नाव राधाबाई. तिसी बाजीराव साहेब याणी लग्न कटारिसी येथाविधि लाविले. त्ये बाईस तीन पुत्र जाले आहेत. बाईचे खर्चास बाजीराव साहेब दरमाहा रुपये १०० शंभर भोजनखर्च खेरीज शागीर्दपेशा वगैरे खर्च जो लागेल तो परभारे सरकारातून देते होते. या प्रमाणें चालत आले. नंतर लढाईचे गडबडीत सिव्हगडाखाली गेली तेथे वित्ताविषय लुटला गेला. नंतर मौजे आगलंबे सुभा पुणे येथे येऊन राहिली. हजरत बडेसाहेब बहादुर यासी पुणे मुक्कामी मुले येऊन भेटली. खर्चाचा बंदोबस्त करून घ्यावा तो साहेबाची स्वारी करणाटकात गेली. अवसर पडला नाही. पुढे लू साहेब याचे कानावर मार कारकुनानी घातला तेव्हा लू साहेब मुकाम मजकुरी बाईकडे आले. भेट होऊन मार समजोन घेऊन बाईची अर्जी घेऊन गेले, ते हजरत चापलीन साहेब बहादुर यास समजाविली. साहेब याणी ती अर्जी आपले चक्तीत घालून बडेसाहेब बहादुर याचे नावे चक्ती लू साहेब याचे स्वाधीन केली. ती त्यानी बाईचे कारकुनाचे स्वाधीन करून कारकुनाबरोबर बडेसाहेब याजकडे पाठवावी म्हणौन सांगितले. त्याजवरून ती चक्ती बाईनी आम्हाबरोबर देऊन आम्हास येथे पाठविले. आम्ही ती चक्ती बडेसाहेब यास दिली. नंतर आज्ञा जाली की याचे उत्तर चापलीन साहेब तुम्हास देतील. त्याजवरून साहेबाकडेस आलो. साहेबानी कृपा करून बाईचा व मुलाचा खर्चाचा बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे.

¶*Radhabai a daughter of Maniram Lala informally married to Bajirao II applies to Chaplin for maintenance of herself and her children. May this Maniram be a relation of Sumersing Gardi?*

No. 253] [1818?

आखबार सुभे खानदेश सरहाद बागलान गिरनातीर. इकडील कैफियत ममईकडून तीन हाती आयेन्याचे भरून कपतान ज्यान ब्रिगसो बाहादर धुल्यास बंगला बांधितात याजकरितां गेले आहेत. चिमा आपासो जे समई हिंदुस्तानात गेले, त्याजला जमेयत पोहचावयास गेली होती, त्याजपौ आडीचसे स्वार मावारी उलटून छ मजकुरी मालेगावी मुकामास आले आहेत. मग पुढे कोणीकडे जातील हे न कले. कपतान ज्यान ब्रिगसो बाहादर याचा मुकाम धुल्यावर आहे. करणेल हासकिसनसो बाहादर याचा मुकाम मैसरंजामसुधा आमलनेर नजीक

आहे. जरनेल दपटीनसाो बाहादर याचा मुकाम मैसरंजामसुधा व आणीकहि फौजा ऐसे बन्हानपूरनजीक मुकाम करून आहेत. दक्षनेतून कोन्ही सो समागमे तीन च्यार हाजार सरंजाम तो १८ रोजी येऊन कासारबारीचा घाट उतरून खानदेश प्रांती कुंजर म्हणोन गाव आहे तेथे मुकामास होते. बन्हाणपुराकडे जाणार म्हणोन वदंता ऐकतो. रोज गुा पान्होळयाची चकती आली ती खिजमतीस पाठविली आहे; पावल. ज्यादा काये लिहिने, मेहरबानगी करावी, हे बंदगी.

¶*News of the movements of the various British Officers stationed in Khandesh is sent by the writer.*

No. 254] [*June 1818*

१ बाजीराव तीनसेनिसी जनरालला जवल गेले.

१ विंचूरकर परत आले.

१ पुरंधरे नसिराबादेस आले १०००.

१ मीर फाजलआलीचे पुत्र पारोल्यास आले १००.

१ केर साहेब पुणे याचे स्वार १५०० कर.

१ बर साहेब पारोले येथे आहेत.

१ येथूनच चकत्या पाा ते जासूद भिलानी लुटले.

१ दफटीण साहेब देवलस गावाकडून जाल्याकडे गेले.

१ रवण साहेब मालेगांवास आहे. अंमलनेराकडे शह आहे.

१ रोजमरा तीन महिने पावला नाही.

¶*The paper mentions Bajirao's surrender to Malcolm and the disbanding of his generals. It also gives the movements of forces under some English Officers.*

No. 255] [3 *June 1818*

एजंट रुमाल ३२

श्री

दरखाघ्नामा जनरेल सर ज्यान मलकमसाहेब बाहादूर याचे श्रीमंत बाजीरावजीसी आहे जे तपसील कलमबंदी :—

१ श्रीमंत बाजीरावजीनी आपणाकरिता व आपले मुतालिककरिता सरकार पुणेची रियासत व जितके हक पादशाहाचे असतील तितुके सोडणेस कबूल व्हावे. जलदीने मलकमसाहेबाचे लस्करास यावे.

२ दुयम कलम श्रीमंत बाजीराव याणी आपले नोकर चाकर बाइका याचे सुध्धा जितुके येतील तितुक्यासहि माहाफिजतीनें लस्कर देऊन मलकम साहेब याणी पाठवितील व हिंदुस्थानी कासी व प्रयाग व आणखी तीर्थेचे जागा कोठे राहावें म्हणतील तेथे याचे खातरीकरिता गौरनर जनरेल याणी कबूल करवितील ते होईल.

१ तिसरे कलम हे गोष्ट श्रीमंत बाजीराव याणी जलदीने करावे. येक दिवसाचे देर न करावे. काय सा। म्हणजे दक्षणचे मुळूकचे आरामी व्हावे. येकाधे त्याचे बायका व इलाखेवाले कोणी माघार होतील तर त्यासहि बहुत खुषी व आरामीकडून येऊन पोचणेस मलकमसाहेब याणी रवाना करितील.

१ चौथा कलम सदरी लिहिल्याप्रा। श्रीमंत बाजीराव याणी खुषीचे तौरेने व बहुत जलदीचे तौरेने कबूल करितील तर अलबता कुंपिणी सरकारातून मदत माष त्याचे इलाखेवालेसुद्धा बुजरुग जे चालवणेस मोकरार करून देतील. मोबलग हे गौरनर जनेरल ठरवितील. तूर्त मलकमसाहेब याणी आठ लाख रुपये सालीयाना उणे होऊ देणार नाही येवढें करवितील.

१ पाचवा कलम श्रीमंत बाजीरावजीनी रपत्यार चांगले येकत्यार केले म्हणोन कुंपिणी सरकारात खातरजमा होईल तर कोणीं जाहागिरदाराकरिता व पुराणे लोक त्या सांघाते खराब जाहले त्याकरिता व आपले खांदानाचे नावावरी काही गाव वगैरे ब्राह्मणभट वगैरे चालत आहे त्या लोकाकरिता पैगाम लाऊन सांगतील तरी अलबता त्याचे खातरीकरिता गौरनर जनरेल याणी मेहेरबानी करितील.

१ कलम साहावा सदरी लिहिल्याप्रा। कबूल करणेस हे खत पोचले बादज २४ घंटेचा वाइदा दिल्हा आहे, तर तितुकेच मलकमसाहेब याचे लस्करात श्रीमंतानी येऊन हजर व्हावे, या कबुल तरी करावे. दोनहि न होता वाइदा चुकेल तरी लढाई नमूद आहे. मागून सवाल जबाब होणार नाही.

६

सदरहू कलमे साहा

इंग्रजी अक्षराची ओल येक असे

¶*Terms of surrender dictated by Sir John Malcolm to Bajirao Peshwa in 1818 and accepted by the latter are mentioned in this paper probably by Anandrao Yashwant (cf. No. 249).*

No. 256] [1818

श्री

यादी मजकूर बोलावयाचा

१ श्रीमंत सौभाग्यवती बाईसाहेब याची प्रकृत बिगडल्यामुले बराणपूरास राहणे जाले, हा मजकूर कलवावा म्हणोन ब्रम्हावर्तास हुजरे पाठविले. तेथून प्रकृत नीट नसिल्यास इकडे येणे प्रशस्त नाही असी आज्ञा आली. त्याजवरून येथे राहून आवषधी उपाय बहुत केले, परंतु ही हवा मानत नाही. त्यास वाईस अथवा पुण्यास राहून प्रकृत नीट जाहाल्यानंतर जावे असे मनात. त्यात आपले विच्यारे तेथील आज्ञेसिवाय निघोन गेले असता तेथे आमचे खर्चाविचाचा बंदोबस्त तिकडून जाल्यास ठीकच आहे, न जाल्यास आपण करून द्यावा.

१ पेशजी खर्चास दिल्हे त्यास देसींहून इकडे येता सिबंदी खर्च व भाडे वगैरे खर्च जाला. पुढे जाण्याचा बेत जाल्यास खर्चाची तरतूद करून द्यावी.

कलम

२

¶*The entry refers to the illness and consequent movements of the wife of Bajirao II. She wishes to return either to Wai or Poona from Burhanpur where she got ill on her journey to join her husband at Bithur.*

No. 257] [1 April 1819

तारीख १ अप्रेल चैत्रमास

श्री

यादी विठलराव गोपाल तांबे यांचा मजकूर. हुजरातीत रामचंद्र गणेश यांचे स्वारीत दोन तीनसे लोकानिसी सरकार चाकरी केली. तेव्हा चवरी अबदागीर व तीन हजार रुपये तैनात जाहली. नंतर बदामीचे स्वारीस च्यारशे लोक होते. उपरांतिक हिंदुस्थानात अलीबहादुर याचे स्वारीबरोबर तीनसे लोकानिसी अर्जुनसिंगाचे लढाईत सर्वापेक्षा कामकाज जाहाले. तेव्हा अलीबहादुर याणी पुण्यास सरकारात नाना फडणिसास वर्तमान लिहून सरकारची आज्ञा आणऊन पागा व पथकाची वस्त्रें दिली. नानाचे हातचे पत्रच आहे. नंतर तेजसिंगाची लढाई वीस हजार फौज गोहडेवर जाऊन हला केला. दोन हजार मनुष्य ठार व जखमी जाहाले आणि हला माघारा फिरला. तेव्हा गोविंदराव बारावकर याचा हती रांगड्यानी नेला. याचकरिता बारावकर व आम्ही लोकसुधा राहून हती आणला

तेव्हा पाच हजार रुा तैनात व पालखीची वस्त्रें आलीबाहादुर याणी दिली. च्यार लोक चांगले बाळगले याजमुले चाळीस हजार रुा सावकाराचे देणे जाहाले. बारा हजार रुपयाचे गांव पागेस व जातीस तिकडे होतें. घरीहून जाऊन दाहा वर्षें जाहाली. याजकरितां अलीबाहादूर यांचा निरोप घेऊन श्रीमंत राा बाजीराव साहेबास व नाना फडणिसास पत्रें घेऊन देसी आलो. पत्रें देऊन पांच वर्षे हुजूर चाकरी केली. खर्चास पावत गेले व वराता दिल्या. काही ऐवज पावला. होळकराचे लढाईचे पूर्वी बोलणी जाहाली. पागेचे खर्च मनश्वी तीस रुा रावती शेरा घेऊन चंदी बारगीर वगैरे खर्च संभाळावा. तेव्हां आम्ही उतर केले, पाचशे रुपयावर बारगीर ठेवावा लागतो तेव्हा कामकाज लढाईत होतें. हलके मनुष्य गरज नाही. असे जाबसाल होऊन अबरू मिलविली ती जाईल असे समजून आट धरून माहुली क्षेत्री घरी राहिलो. ग्राट साहेब सातारियात होते त्याची भेट घेऊन मजकूर सांगितला. श्रीमंतासी आट धरून पंधरा वर्षें घरी राहून खराब जाहालो. शेदोनशे लोकानिसी हती देऊन श्रीमंतास समजेल असे बालगावे. या बोलण्यास जेष्ट मासी दोन वर्षें होतील. ग्राटसाहेबानी आमचा मजकूर बडेसाहेब पुण्यास आल्यावर त्यास लिहिला आणि भाद्रपद मासी ग्राटसाहेबाबरोबर पुण्यास येऊन बडेसाहेबाची भेट जाहाली. बोलणी जाहाली. बडेसाहेब मुंबईस गेले तेव्हा सांगितले, मागे येथे साहेब आहेत हे तुमचा बंदोबस्त करून देतील. त्यास पंचवीस मनुष्य कुटुंबाचे, त्याचा निर्वाह जाहाला पाहिजे, व नित्य सावकाराचे तगादे. वैशाखमासी दोन कार्यें घरी होणार याचा निर्वाह सरकारातून जाहाला पाहिजे.

¶*Vithalrao Gopal Tambe recounts his past loyal services to the Peshwas and says how he remained at home in disgust and then approached Capt. Grant with a request for pension. He prays that his application be entertained and he be given some help for his maintenance.*

No. 258] [*1820 ?*]

जनराल डिपार्टमेंट नामजूर

श्री

श्री सरकार गोवरनेल साहेब बाहादूर

साहेबाचे शेवेसी

आर्जी विनंती शेवेसी बापोजी बिन यशवंतराव लाड मौजे वाठार बुाा प्राो सिरवल कारणे साहेबाचे शेवेसी आर्जी लेहून दिल्ही येसीजे. कैलासवासी येशवंतराव लाड किले आसेर येथील किल्यावरून उतरते समई साहे(बा)नी त्यास वचन दिल्हे

होते की तुम्ही आलिज्याबाहादर दवलतराव सिंदे याचे लस्करात जाणें. जाते वेलस त्यास आज्ञा केली की तुमचा बंदोबस्त आलिज्याहाबहादर करून देतलि. त्यानी करून न दिल्हास आम्ही करून देऊ म्हणून वचन होते. तेथे गालेर मुकामी आलिज्याबादर यानी बदोबस्त करून दिल्हा नाही. आम्ही घरास वाठार मुा आलो. नंतर येशवतरावबाबा वरीसभर होते. नतर त्याचा काल जाला. त्याची आस्ता साहेबापासी बहुत होता की माझा बदोबस्त साहेब करून देतील. त्यानंतर भेट होऊन बंदोबस्त जाला नाही. आता या प्रसगी राजश्री नानाजी निगडे देशमुख येऊन विनंती करतील ती साहेबानी ध्यानात आणून मुले लेकरे मौजे मारी आहेत यास दरसाल खर्चाचा बंदोबस्त करून देणियाविसी आज्ञा व्हावी. आम्हास आधार सर्व प्रकारे पृथिवीपति आपण आहेत. कलेल त्याप्रो बंदोबस्त करून द्यावा. कलावे हे आर्जदास्त

पत्र लिा

हुकूम की नवीन पेन्शन देऊ सकत नाही.

¶*Bapoji Yashwantrao Lad applies to the Governor (Elphinstone) for a pension as promised to his father when he handed over the fort of Asher in April 1819. Yashwantrao died a year after. The Governor replies that no new pension could be allowed. Yashwantrao Lad a Maratha of Wathar was the trusted officer of Daulatrao Sindia in charge of Ashirgarh.*

No. 259] *[3-12-1820*

तारीख ११ माहे दिसंबर
मार्गसीर्ष मुा तिकोटे

श्री

अर्जदास्त रंगो बापूजी आमील पो नंदुरबार सन १२३० फसली ऐसीजे. साहेबी हुकूम केला कीं सन २७ चे सालीं पो नासिक येथें तुमचा मामला होता ते समई मौजे लाखनगांव पो नासिक हा गांव वीस वर्ष चालत नसता तुम्ही सोडिला, त्यास आधार काये ? कशावरून सोडिला हे सांगणे म्हणोन हुकूम केला. ऐशास तेथील हकीकत तरी सन २७ चे सालीं महतपुरची लढाई जाहालियावर कपतान ज्यान ब्रिगसाहेब बाहादुर याचे पत्र उजनचे मुकामीहून मैरालभाऊ यास व मजला बोलावण्याविसी आले. त्याजवरून मी पुणियाहून निघून पुणतांब्याचे मुकामी येऊन साहेबबहादुर याजपासी हाजर जालो. नंतर लस्करचे कूच होऊन औरंगाबादेस गेलो. मी बराबरच होतो. तेथून बाजीरावसाहेब याचा मुलूक सर करण्याचे ठरले. तेव्हा बैजापूरचे मुकामीहून माझी रवानगी फक्त येक जाहिरनामा मात्र पुणियाचा आला तो देऊन केली आणि गंगथडी वगैरे ठाणी बसवावयासी हुकूम जाला. ते समई सिबंदी कोणी मिळेना व कारकूनहि कोणी न मिळेत.

सर्व पेशव्याचे फौजेचा अंदेश घेऊन जमीदार व मोकदम व रयेत कोणी अनकूळ न होई. तेव्हा हरयेक मनुषाची खातरजमा करून मनुषे मेळऊन पो नासिक व पो कुंभारी व पो पाटोदे व सिनर व पो वण व पो दिंडोरी व घाटाखालील पेठ हरसूल राज्याचे येथील ठाणी कायेम करून नंतर किले घेण्याची सुरवात केली. तेव्हा किला हतगड व रामशेज व देहर व बहुला व बाघेरा ऐसे घेतले. नंतर किले कावनई व गडगडा व त्रिंगळवाडी हे तीन किले पेशव्याकडील आमलांत आमचे व्याह्याकडे होते. ते किले हस्तगत होईनात. तेव्हा कलेल त्या रीतीने त्याची खातरजिमा करून भेटीस म्हणोन बोलाऊन आणून धरून घेऊन साहेब-बहादुर याचे जवळ हजर केले आणि तिन्ही किल्यावर ठाणी कायेम केली. या प्रो कितेक किले व माहाल लढून व कितेक फूस लाऊन घेतले. मधेमधे पेशव्याकडील फौजेची व रूपराम चौधरी याचे पलटणाची गांठ पडून तेथे छापा वगैरे घालून साहेबाचे प्रतापे पराभवाते पावविले व लूट तोफा वगैरे सरंजाम सापडला तो सरकार दाखल केला. हे सर्व इप्रेल महिना व मे महिन्याचे दाहा पंधरा दिवस परियेत माहाल घेणे जाले. ऐशास दररोज स्वारी करून किले व ठाणी साहेबाचे प्रतापेकरून घेऊन कायेम केली. तशात मामल्याचे काम दरयाती[१] करून पाहाण्यास व किले घ्यावयास फुरसत येक क्षणाची नाही व मनुष्यें व कारकून कोणी येक ते समई मिळेनात व रयेत लोकहि कोणी जमीदार पाटील वगैरे हजर न होता आंदेशा पेशव्याचे फौजेचा धरून कोणी चाकरहि राहीनात असा समये. त्यात कोन्हासी कौही दिलदिलासा देऊन इनाम बक्षीस कलेल त्या रीतीने मनुष पाहून कबूलहि केली होती. तशात कोणत्या दस्ताऐव-जावर गाव दिल्हा म्हणोन विच्यारले, त्यास सरकारचा जाहीरनामा होता कीं कोणाचे वतनास व इनामास व वर्षासनास व देवस्थानाचे खर्चास व खैरातीस व कोणाचे ज्ञातिधर्मास खलेल न होता सुरलीत चालेल म्हणोन जाहिरनामा होता, त्या आधाराने सर्वांचे मनोधारण करून सरकारकाम चालवावे याजवर नजर देऊन काम चालवीत होतो. कोणी पेशव्याचे फौजेस सामील न व्हावे असा जाहिरनामा, त्यावरून कोणी कोणी मामल्याचे कामात माझा अमूक गांव मजकडे चालत आहे तो माझा मजकडे चालवावा म्हणोन कोणी येत होते. परंतु ते समई त्याची दरयाती करावयासी फुरसत नाहीं. आपणास तर सर्वत्राचे मनोधारन रखून सरकारकाम करून घ्यावयाचे व बंड कोठे न होता ठाणी कायेम करावयाची याजवर द्रिष्ट देऊन वा जाहीरनामाहि पाहून व सरकारहुकूम की तुम्हास कलेल त्या रीतीने ठाणी हस्तगत करणे. त्या हुकुमावर जे कोणी गावचे चालत्या स्वारीत

---

१ समजणूक, चौकशी.

येत गेले त्यास गावकरी यास हतचिठी देत गेलो की हा गाव याजकडे चालूं देणे, असेहि कितेक गावास चिठ्या दिल्या. त्यास लाखनगावकर जाहागीरदारहि आले असतील. त्याणी मजकूर समजाविला असेल. ते समई याजकडे गांव आहे म्हणोन त्याचे सांगितल्यावरून गावचे मोकदमास हतचिठी दिल्ही याप्रो जाहले असेल. परंतु सनद कोणास लिहून दिली नाही व सारा वसूल त्याजकडे पडला असेहि जाले नाही. जर ते समई अगर पुढे आठच्यार दिवसी जमीदार आथवा गावकरी येऊन सांगते कीं हा गांव याजकडे वीस वर्षे चालत नव्हता ऐसे याणी समजाविले असते तर बंद केला असता. ते समई त्याणी सांगितले नाही. पुढे दर्याप्ती करावी तरी माझी बदली जाली. त्यास माझा उपाये काये ? पुढे च्यार महिन्यानी नगराकडे माहाल लागला, तेव्हा आखेर साली दर्याप्ती व्हावी तीहि न जाली. इा पासून दीड मास परियंत वहिवाट होती. नंतर माहाल दुसरीकडे सांगून छोटे साहेबाचे तैनात महिनाभर होतो. नंतर मजला खानदेशात बोलाऊन नंदुरबाराकडे पाठविले. पुढे आगष्ट महिन्यात सरकारचा जाहीरनामा आला की वर्षासिने व धर्मादाव व देवस्थाने व इनाम व धर्मार्थ गाव ज्याचे त्याजकडे चवकशी करून चालू देणे. ऐसे पेशजी मी कामावर होतो ते समई जाहीरनामा आला असता तरी मी चकवसी केली असती. त्या वेळेस जो मामलेदार होता त्यानी चौकसी करावयाची होती आणि चालवावयाचा नव्हता. त्यासहि दोन वर्षें जाली. आता मजला विच्यारिल्यास मजकडे दोष काये आहे ? साल तिगस्ता सन १८१८ नवंबर महिन्यात असेच येक तळेगांव पो नासिक प्रकर्णी पुणियाहून लिहिले आले, त्याजवरून साहेबानी मजला लिहिले होते त्याचेहि उतर वास्तविक होते, ते मी लिहून पाठविले. त्याजवरून साहेब बहादुर याणी पुणियास लिहून पाठविले होते तेहि आपण पाहावे. आमची हकीकत वास्तविक जाली आहे ती साहेबास लिहिली आहे. याउपर हली कोणी साहेबाजवळ गैरवाका समजावीत असल्यास त्याची छयान करणार धणी समर्थ आहेत. मी जिवापेक्षा आधिक श्रम करून सरकारचाकरी बज्याविली आहे. ईश्वर जाणत आहे व खावंदसाहेबास माहीत आहे. तेरीख ३ माहे डिजंबर सन १८२० इसवी हे अर्जदास्त.

¶*Rango Bapuji explains why he allowed the alienation of village Lakhangoan in the district of Nasik. He says he had to work at a time of great stress and turmoil and had hardly time to carry on detailed inquiries. He incidentally refers to the petty skirmishes that he had with the Peshwa's forces in the execution of his job. The early career of the writer who afterwards went to England and spent several years there in pleading the cause of Pratapsing of Satara, will be very welcome to students of history.*

7228

No. 260] [*1820*

श्री

अर्जी गणपतराव पाटील डेंगले व कुसाजी पाटील डेंगले सुा इहिदे असेरीन मयातिन व अलफ. आम्हास आलीशान गौरनर बडेसाहिब याणी मेहरबानगी करून साष्टीहून पांच आसाम्या मातुश्रीसुद्धा मौजे लिंबगाव येथे पोहचून दिल्हे. आमचीं मंडली झाडून कौल दिल्हे नंतर आजपो सर्वत्र येक्या जागी साहेबाचे नेक नजरेकरोन सुखरूप असो. दरम्यान साहेबानी बरखुरदाराची[1] परवर्षी[2] जाली पाहिजे यास्तव अर्जी ऐकोन पुणेतील घरची मोकलीकहि केली. तेणेकरोन तमाम मुलकात जाहीर जाले कीं डेंगले यांचे ठाई मेहरबानगी आहे आसे जाले. त्याजवरोन आजपों मंडलीसुध्धा गुजराण जाली. कुंपणी सरकारातून झाडून अलम याची परवर्षीची बंदोबस्ती जाली, आम्हास मात्र नाहीं याजकरिता कदमास[3] जाहीर करण्याबा पुणे मुकामी येवून हजीर जालो. खावंदाचे नेकनजरे बरखुरदाराची परवर्षी होत आहे. मौजे लिंबगांव ताा कोन्हाळे हा गांव होलकर याजकडून आम्हास प्रापंच खर्चास आहे. त्याच्या सनदा आहेत. तो गाव जप्त कुंपणी सरकारात आहे. त्याची दरयाप्ती करून मोकलीक व्हावी आणि आमची खर्चाची बेजमी जाली पाहिजे. आम्ही सरकारचे फक्त[4] खरेदीचे आहोत. मेहेरबानगी करून बंदोबस्त करोन दिल्हेखेरीज खाविंदाचे कदम सोडीत नाही. साहेबाखेरीज आमची परवर्षी करणार दुसरे कोण आहेत ? खाविंदाची कृपा जाली पाहिजे.

¶*Ganpatrao and Kusaji Dengle, son and brother respectively of Trimbakji express their gratefulness to the Governor for the kindness shown to them and request him that the village Limbgaon granted in inam to them by the Holkar but which was confiscated by the Company should kindly be released.*

No. 261] [*4-12-1821*

पो ४ माहे दसबर
सन १८२१ इसवी
मुकाम नगर

श्री

साहेब मेहेरबान अजम उइलियम
चापलीन साहेब बहादूर कमिशनर
सलाम हू ताला

ℓ आर्जी सोबे विठल नरसी पानवलकर सलाम बादज आंकी येथील खुसी खैरयत जाणौन आसाहेबाचे खुसी लिहून दिल अराम करीत असावे दिगर. कुपणी

१ फळ खाणारा; उपभोग घेणारा. २ पोषण, निभावणी, परामर्ष. ३ पायाजवळ. ४ केवळ, निखालस.

सरकारचा अंमल जाल्यावर चाकरी करावी आणि आपल्या निर्वाहाचा काहीयेक बदोबस्त करून घ्यावा म्हणौन सातारियाहून मेहरबान राबिसन साहेबाकडे आलों. कस्त मेहेनत करून चाकरी केली. कुंपणी सरकारात किती यैवज आला याची माहीतगारी साहेबास जालीच असेल. पेशवे सरकारचे मंडलीसी सर्वांसी आदावत पडली. कोण्हासी सूत राहिले नाही. साडे तीन वर्षे खरेपणाने चालिलो. साहेब लोकाजवल खरेपणाने चाकरी केली असता साहेब मेहरबान होऊन बंदोबस्त करून देतात ह्या लौकिकावर येक रुो कोण्हापासून न घेता ज्या ज्या समई हुकूम होत गेला ते कबूल केले आणि चाकरी बज्याविली ते :—

१ सरकारात यैवज आला त्याचे बक्षीस दिल्हे त्याची व्यवस्था जनोबा आगाशे कुवारी किला घेतल्यावर कैदेत ठेविले होते, सरकारचा येक रुा मजपासी नाही म्हणौन क्रिया करून सुटले. नंतर मजकडे चौकसी सांगितली. मोर जोसी व बापू कडेकर याणी तोंडजबानी जवाहीर आगाशाकडे काही आहे म्हणौन सागितले. आगाशे कबूल न होत तेव्हा फुरसिसाखाली हैराण जाले व उगेच बातनीदार उभे करून जवाहीर लागू करून सरकारात आणिले. त्याचा अजमास करून दीड लक्षाचे पंधरा हजार रुो मजला दिल्हे. त्यापौ त्याच समई जे जे उपयोगी पडले ते साहेबासी रुजू करून साडेतीन हजार रुो त्यास दिल्हे. बाकी साडे अकरा हजार राहिले. पौ जोसी व कडेकर यास सात हजार रुा दिल्हे. साडे च्यार हजार रुा राहिले ते मी घेतले. येविसी कडेकर व जोसी फिर्याद जाले. माझा दस्तायैवज नसता साहेबानी पंचाईत अदालतीत दिल्ही त्यास पंच कोण्ही न मिलत. आज पंधरा महिने जाले याप्रो मजकूर आहे. हली गोडबोले याजबदल साहेबानी पंधरा हजार दिल्हे त्यापौ तिसरा हिसा मी घेऊन बाकी बातनीदारास दिल्हे. याची माहीतगारी मकलाड साहेबास आहे. याप्रों बक्षिसाचे यैवजाची व्यवस्ता. हली मी श्रीमाहायात्रेस जावयाकरिता मौजे भाववडे येथे मुकाम आहे. आपल्या हुकुमासिवाय काही बोलत नाही. कलम

१ किता कलमें

१ पेशवे सरकारची खासी दफ्तरे व तहनामे वगैरे कागद जेथे ठेविले होते ते ठिकाण लाऊन आणून दिल्ही. त्यासमई बक्षीस देऊ म्हणौन करार असता येक पैसा दिल्हा नाही.

१ पुणे सुभा व जुनर सुभ्याचे जुने दर दामाचे व मोजणीचे शंभर वर्षांचे कागद जेथे जेथे होते त्याचे ठिकाण लाऊन आणिले. त्यासमई बक्षीस

देऊ म्हणौन मेहरबान राबिसन साहेब याचा करार असता दिल्हे नाही. कागद मिलाल्यामुले जमाबंदी किती जाली याची माहितगारी राबिसन साहेबास आहे.

१ सालगुदस्ता डाकेतील पत्रे धरावी म्हणौंन हुकूम जाल्यावरून पत्रे धरून मकलाड साहेबापासी दिल्ही. त्याबदल डाकवाल्यास रुा दोनशे हुकुमावरून दिल्हे ते रुो आले नाहीं. कलम

३

१ बक्षीस काय पावले, त्यातून परभारे काय गेले व जोसी कडेकर फिर्याद करितात याची माहितगारी मेहरबान राबिसन साहेबास असता बोलत नाही. म्हणतात की आमचा सिरस्ता बोलावयाचा नाही.

सदरहू मजकूर लिहिला आहे हा खरा आहे किंवा खोटा हे मेहरबान राबिसन साहेबास लिहिले असता सागतील. खोटा जाल्यास साहेबाकडे माझे बोलणे काही येक नाही. पुणे मुकामी विनती करावी तरी साहेबाची स्वारी गेली त्या समई मी राबीसन साहेबाबरोबर होतो. चाकरीची मेहनत मनात आणून मेहरबान होऊन माझा काही बदोबस्त करून देविला पाहिजे. प्रतीक्षा करीत बसलो आहे. यात्रेचे दस्तक देविले पाहिजे म्हणजे यात्रेस जातों. बहुत काय लिहिणे सेवेकावर मेहरबानी असावी हे विज्ञापी.

¶*Vithal Narsi Panvalkar submits this written petition to Commissioner Chaplin for rewarding his difficult services which he rendered to Col. Robinson. The letter explains the nature of the services.*

No. 262] *[4-11-1822*

श्री

यादी खासगत राजश्री त्रिंबकजी पाटील डेंगले याचे घरचे मंडलीची नावनिसीसुाा सलास अशेरीन मयातेन व अलफ छ १९ सफर

खासगत त्रिंबकजी पाा डेंगले

१ पुत्र गणपतराव डेंगले उमर वर्षे अजमासे ९ नऊ

८ स्त्रिया सौवती

१ रखमाबाई उमर वर्षे अजमासे ३९

१ रमाबाई उमर वर्षे अजमासे ३३

१ पार्वतीबाई ,, ,, ३१
१ राधाबाई ,, ,, २९
१ चंद्राबाई मुलाची मातोश्री
उमर वर्षे अजमासे ३२
१ बालाबाई उमर वर्ष अजमासे ३०
१ येमुनाबाई ,, ,, २७
१ मैनाबाई ,, ,, २८

८

३ कन्या सौभाग्यवती

१ साळूबाई उमर वर्ष अजमासे २८ मातोश्री वारली
१ गंगाबाई उमर ,, ,, १८ ,, ,,
१ भागाबाई ,, ,, ,, ११ ,, रमाबाई आहेत

१२

कनिष्ट बंधु कुसाजी पाा डेंगले

१ खासगत कुसाजी पाा डेंगले उमर वर्षे ५०
२ स्त्रिया सौभाग्यवती
१ आण्याबाई उमर वर्ष ३५
१ सावित्रीबाई उमर वर्ष ३०

२

३ पुत्र
१ मल्हारराव पाटील डेंगले उमर वर्ष २५
१ स्त्री सौ लक्ष्मीबाई उमर वर्ष २०
१ कन्या येसूबाई

३

१ कन्या सौ कासीबाई उमर वर्ष १२

७

१९

7232

सदरहूप्रो उभयता बंधूचा परिवार येकत्र आहेत. वेगळे नाहीत. हाली नांदणूक मौजे निंबगाव जाळी तर्फ हवेली प्रगणे संगमनेर येथे वतन पाटिलकीचे तक्षीम चौथी आहे. डेंगले याचे घरे अजमासे १९ आहेत. पाटिलकीचे वतनाची उत्पन्न इनाम बिघे तीस सर्वत्र डेंगले मिळून आहे, तो वडीलपणा ज्याचा आहे त्याजकडे चालत आहे. याखेरीज काडीपेंढी वगैरे नगद येक कवडीसुध्धा काही येक नाही. वडीलपणा काही आमचा नाही. पाटील नावाचे मात्र आहेत. अमदानी कवडीची नाही. वतनी सेते बिघे अजमासे ६० साठ आहेत त्याचा सारा सरकारात देत असतो. याखिरीज कुणबाऱ्याचे सेत जेवा होता त्याचा हिसा सरकारात देत असतो. याप्रा निंबगाव जाली येथील वहिवाट आहे.

१ मौजे निंबगाव तर्फ कोऱ्हाले प्रगणे संगमनेर येथील पाटिलकी निमे त्या गावचे पाटिलकीचे उत्पन्न इनाम बिघे ६० आम्हाकडे आहे. याखेरीज काडीपेंढी व नगदी कवडी येकसुद्धा काही येक नाही. गाव आम्हास श्रीमंत सवाई मल्हारराव होलकर साहेब याणी कुटुंबाचे बेगमीस जागीर करून दिल्हा आहे. त्याच्या सनदा आम्हाजवळ आहेत. गाव लढाई आखर पावेतो चालत होता. हाली, सरकारात नगर तालुक्यात जतीस आहे. याप्रो आमची वहिवाट आहे. गाव अजमासे रुा सात आठशे सरकार पोत्यास वसुलास आहे.

१ खेरीज कुणबिनी तीस व लेकवले वीस याप्रमाणे पोट खर्च आहे. कुटुंब मोठे. याचे पोषणाचा परियाये खाविंदाचे लक्ष्यातच आहे.

२

¶*The paper enumerates the members in the family of Trimbakji Dengle and all his belongings, in the year 1822 when he was undergoing confinement at Chunargad. He died there on 16-10-1829.*

No. 263] *[8-11-1822*

पौ ता ८ नवेंबर सन

इसवी १८२२

तर्जुमा शुद ता १० दिसेंबर

श्री

यादी नीलकंठराव माहादेव पुरंधरे सुा सलास अशरीन मयातैन व अलफ ऐसीजे. साहेबास पाहिले याजवरून पादशाहा अलमगीर पाहिले ऐसे चितात वाटले. आपणापेक्षा अलमगीर काही जास्त नसतील.

7233

आमचे वडलानी दिलीस जाऊन पादशाहा पाहिले. आम्हास सरकार गौरनरीतून बहुत अबरू दिल्ही. याची शरम सरकारासंच असली पाहिजे. पूर्वी रामराव याजपासी हुकूम असाच जाला आहे की तुमचे खावंदाचे खानदानावर नजर आहे, याकरिता खानदानाची शरम फार वाटती. आपले शहनषाईस लाजीम व आमचे खानदानास उचित ऐसाच बयान सरकारची खुषी पाहून करावा हा आमचा स्वधर्म. वर्कड आपले पोटास पुरत नाही अगर अराम जाजती असावा, येविसीचा जिकर हरगीज करावयाची नाही व सरकारास मेहनतहि द्यावयाची नाही. सांप्रत्य आपल्यास सरकारकामामुळे फुरसत कमी याकरिता चितात येते, की येकदा जंजिरे मुंबईस हुजरात हजर व्हावे लागेल. बंदर मजकुरी येण्यास हुकूम असावा. मर्जीस नसल्यास साहेब मेहरबान उलियम चापलनसाहेब कमिशनर बाहादूर याजपासी जाहीर कर्ण्यांत येईल. त्याजवरून साहेब अलीशान इतला करतील. मिति शके १७४४ चित्रभानु नाम संवछरे माहे आश्विन वद्य ९

¶*Nilkanthrao Mahadeo Purandhare extols the power and prestige of the Governor and asks for an interview. The contrast of the former greatness of his family and its present misery is indeed pathetic.*

No. 264] [*1822?*

श्री

ब्रह्मावर्तात बाजीराव सो लग्न करणार त्यास कन्या गणपतराव याची योजिली आहे. ते कोण कोठे राहाणार शोध घ्यावा म्हणौन साहेब याचे हुकूम जाहल होत. त्याचे शोध घेताना गणपतराव भागवत यानी दफ्तरदार सुभा खानदेश हाली नासिकात आहेत, याच कन्या देणेचे निषकरष जाहल आहे, म्हणौन हरिभाऊ देशमुख यास पत्र आल आहे. म्हणौन साहेबास विनंती करावी हे विनंती.

¶*Bajirao proposed to marry more wives at Brahmavarta and settled on the daughter of one Ganpatrao. An inquiry is made about the antecedents of this Ganpatrao Bhagwat. "He was formerly a Daftardar in Khandesh and is at present residing at Nasik," says the letter. Haribhau Deshmukh, mentioned in the letter, was looking after Bajirao's affairs at Poona and was the father of Gopalrao Deshmukh.*

No. 265] [22-3-1823

श्री

अर्जी कुसाजी बिन मल्हारजी पा डेंगले मौजे निंबगाव जाली पो संगमनेर सुरू सलास अशरीन मयातैन व अलफ. कारणे अर्जी लिहून दिली ऐसीजे हुजरून आज्ञा जाली की तुम्ही आपले घर जिंदगीची याद लिहून देणे. त्याजवरून आम्ही आपला हवाल लिहून देतो की, तीा रा त्रिंबकजी पाटील तात्या याजला सरकार कुंपिणी बाहादूर याणी कैद करून साष्टीस नेले ते समई आम्ही निंबगावी होतो. तेव्हा मजला तात्याचा हुकूम आला की निमगावचे जिदगीचा बंदोबस्त करून पुणियास यावे आणि तेथील घरजिंदगीचा बंदोबस्त ठेवावा. तो इतकियात कारभारी मंडलीचेहि बोलावणे पुणियाहून आम्हास आले. तेव्हा आम्ही निमगाव येथील घरजिंदगीचा बंदोबस्त ठेऊन पुणियास आलो आणि येथे दीड वर्ष राहून पेशवे सरकारातून माहाल मुलुख होते त्याच्या सोडचिठ्या देऊन सरकारात स्वाधीन केले आणि घरजिंदगी सांभालून होतो. इतकियात तात्या साष्टीचे ठाण्याहून निघाले. सबब पेशवे सरकार याणी आम्हास कैद करून राजदेहेरचे किल्यास आटकेस ठेविले व तीा सौ. बाया व चिरंजीव गणपतराव यास कैद करून साष्टीस पाठविले व हरदू ठिकाणचे घराची जती करून जिंदगी सरकारात नेली. नंतर पेशवे सरकारची व कुंपणी सरकारची लढाई जाली त्या संधींत आम्हास सोडले. नंतर आम्ही व तात्या लस्करात येके जागा जाहालो आणि पेशवे सरकारचे समागमे उभयता अशेरीचे मुकाम पावेतो होतो. तेव्हा पेशवे सरकारची व खुदावंद मलकम साहेब बहादूर यांची भेट जाली. नंतर तेथून उभयता बंधू सरंजामसुधा मालेगांवचे झाडीत आलो आणि सरंजामास निरोप देऊन तात्या आहीरगावास राहिले आणि आम्हास सांगितले कीं तुम्ही पोहेगावास जाऊन राहावे. त्यावर तात्या धरले गेले आणि आम्ही लपूनच होतो. यावर खुदावंद पाटंजर साहेब यांचा कौल मालजी पाटील याणी आम्हास पाठविला, त्याजवरून खुदावंद पाटंजर साहेब यांची भेट घेतली. साहेब मेहेरबान होऊन घरवाडा बैलढोरे जतीस होती ती मोकली करून आमचे स्वाधीन केली. मागाहून तीा सौ बाया व चिा गणपतराव याजला साष्टीचे ठाण्यातून मोकली केली ती घरास आणिली. सर्वत्र येक जागा होऊन निमगावी घरी राहिलो. नंतर आसाहेबाचे कदमापासी चिरंजीव बापू येऊन पुण्यातील वाड्याविसी अर्ज केला. त्याजवर साहेबानी मेहरबान होऊन घरे व वाडा सोडून दिल्हा. त्यावर खुदावंद न्यामत गौरनर अलपिष्टनसाहेब बहादुर यांची स्वारी मुमईहून पुणे मुकामी आली, त्या वेलेस खुदावंद जनराल इसमिट साहेब यांचे विद्यमाने खुदावंद न्यामत

गौरनर साहेब याची भेट चिरंजीव गणपतराव बापू याणी घेतली. पोटापाण्याचा अर्ज केला. तेव्हा दौलतीचा पर्याय विच्यारिला, त्याचा जाब दिल्हा की दौलत जप्तीत गेली. आंम्ही हलाखीत आहो. खाविंदानी मेहेर करून पोटास दिल्हे पाहिजे. त्याजवर विठलपंत मामा यास अठरा हजार रुा काय बाबे दिल्हे? त्यास जंबुसरचे बाकीबद्दल मामाची घरजिंदगी जप्त करून वडिलानी आणिली होती त्या बाबे अठरा हजार रुा दिल्हे. ते कोणाचे विद्यमाने दिल्हे. त्यास कारभारी मंडली पुणे मुकामी होती त्याणी ठराव करून देविले. त्याची दर्याप्ती हली खुदावंद राबिनसन साहेब याणी कारभारीमंडलीस आगून करितां हरि भगवंत यास परज करून रुा घेतले. इतकियात गौरनरसाहेब याची स्वारी निघाली. समागमे चिरंजीव बापू गेले. मागाहून सयाजी मुळे व महादाजी गोविंद स्वारीत जेजुरीचे मुकामी आले. बयाजी नाईक याचे विद्यमाने सौ बायाचे नावे अर्जी दिल्ही की आमची जिंदगी कुसाजीपत याजकडे आहे ती देवावी, हे चिरंजीव बापूस समजले. त्याजवरून खुदावंद वाटकीण साहेब यांची भेट घेऊन आर्जी दिल्ही की, आर्जी देण्यास मातोश्री बायाचे अनुमत असल्यास आम्ही आपले आपसांत समजूत घालून मातोश्री बायाची व आम्ही आपली पावती आणून हजर करू. या प्रो आर्जी देऊन निमगावी आले. तो दुसरे दिवसी नारबा ताकटे व आपाजी नाईक व सयाजी मुळे व माहादाजीपंत हे आले आणि आम्हास व सौ बायास सांगितले की तात्यास सोडवावयाची अर्जी दिल्ही आहे तर तुम्ही बायास घेऊन पुण्यास चलावे. तेव्हा बापूने उतर केले की तात्या सोडवावयाची अर्जी दिल्ही नाही. जिंदगीची अर्जी दिल्ही आहे. त्याजवरून मंडलीने बापूस लबाड केले व बायाहि म्हणो लागल्या की तुम्हास घरधनी सोडवावयाची आगत्य नाहीं. आम्ही पुण्यास जातो असे म्हणो लागल्या. तेव्हा सयाजी मुळे याजला आम्ही विचारिले की खुदावंद न्यामत गौरनरसाहेब पुण्यास नाहीत व खुदावंद न्यामत वलियन चापलीन साहेब बाहादुरहि पुण्यात नाहीत तेव्हा आम्हास व सौ बायास कोणापासी नेता? त्याजवर त्याणी सांगितले की बयाजी नाईक याणी गौरनरसाहेब याजपासी तात्या सोडवावयाचे बोलणे केले आहे आणि तुम्हास आणावयास पाठविले आहे असे बोलूं लागले. त्याजवरून लाचयार होऊन सौ बायास घेऊन पुण्यास आलो. येथे आल्यानंतर कारभारी मंडळी बायास गैरवाका समजावितात की आधी जिंदगी घ्यावी. नंतर तात्या सोडवावयाचा जाबसाल सरकारात बोलूं, असे बयाजी नाईक व कारभारी याणी बाया(स) समजाऊन जिंदगी मागतात. त्यावर रा दाजीसाहेब घोरपडे आमिरुल उमराव व बयाजी नाईक याणी आम्हास सांगितले, की आम्ही घरगुती सांगतो

त्याप्रो तुम्हास मान्य आहे असे असल्यास तुमची समजूत करू. त्याजवरून आम्ही उतर केले की सौ बाया ह्या बायका व चिरंजीव गणपतराव लहान अज्ञान व तीा तात्या सरकार कैदेत असे संकट आहे. तशांत कारभारी मंडलीने सौ बायांचे बुधीस गैरवाका आणिला, त्यास आम्ही वाटणीची वगैरे वाकडी गोष्ट सांगितल्यास लोकेशानींत दोश. त्यास तुम्ही सांगाल त्या प्रो कबूल. त्याजवरून त्याणी सांगितले की तुम्ही पत्र लिहून द्यावे की जिंदगी कारभारी हरि भगवंत व हरिबा खडेसर याचे स्वाधीन करून, उभयता कारभारी याणी तुमचे व बायाचे इतल्याने कारभार करून प्रपंच चालवावा याप्रो सांगितले. सबब उभयता तिन्हाईत याचे नावे पत्र लिहून दिल्हे असता सौ बायानी घरास चलावे तें न करितां सरकारात जिंदगी देत नाही म्हणोन समजावितात व तीा तात्याची पत्रे दोन आली त्यांत मार की, वरचा बंदोबस्त ठेऊन मुलामाणसाचा सांभाल करून आब जतन करून खुशाल राहावे. आमची कालजी करू नये व कोणी लबाडी करूं लागल्यास त्याचे न आइकता मुलामाणसाचा सांभाळ करून असावे. याप्रमाणे वडिलांची पत्रे येतात, तेव्हा वडिलाची तो आज्ञा याप्रो आहे आणि येथे तो कारभारी मंडलीयास काही येक लाभ होत नाही म्हणोन, सौ बायास गैरवाका समजाऊन बखेडा वाढवितात, त्यावरून तीा तात्यास पत्र सरकारचे इतल्याने पाठविले आहे. वडिलाचा जाब येईल त्या प्रो वर्तणूक करू. या उपर खुदावंद न्यामत तात्याचे पत्राचा जाब येईपर्यंत मर्जी नसल्यास येका महिन्याची मुदत द्यावी, म्हणजे निमगावी जाऊन जिंदगीची याद करून हुजूर आणून हजर करू. जसे खावंदाचे मर्जी असेल त्यास हजर आहो. याजवर कारभारी परस्परे बोलतात की आम्ही प्रथम पासून वेगले आहोत. त्यास आमचे तीा मल्हारजी पाटील याणी प्रथम बाइको केली त्यास काही दिवस जाले. मुले जाली, परंतु जगली नाही. सबब दुसरे कुटुंब केले. त्या मातोश्रीस तात्या जाले. नंतर प्रथम बाइकोचे पोटी आम्ही जालो. उभयता बंधूची लग्ने केली. मोठे जालो. उपरांतिक आमचे तीर्थरूप मृत्य पावले. त्याचे हातचे सावकारी कर्ज देणे होते तेहि नित्यशा तगादा करू लागले. देण्यास ऐपत नाही. सबब तीा तात्या नागपुरास रोजगाराकरितां गेले आणि आम्ही घरी मुले माणसे सांभालून संसार करून राहिलो व काही सावकाराचे कर्ज आदा केले. नंतर तात्या दोन वर्षानी नागपुराहून घरी आले. त्याणी काही आणिले असेल म्हणोन सावकारानी उपद्रव फार केला. त्यास द्यावयास आधार नाही. सबब मुलामनुशासुधा उभयता बंधु परागंदा होऊन पाडेसर येथे जाऊन राहिलो. तेथे शेतपोत केले. परंतु पुरवठ्यास येईना. तितक्यात आमचे कुटुंब गरोदर सबब

वडझरीस माहेरास नेले होते. यावर दोनच्यार महिन्यानी आणावयास, पाठविले तेथे आम्हास आमचे मेहुणे म्हणो लागले की तेथे तुम्हास पुरवठ्यास येत नाही तर येथे तुम्हार (?) शेत करावे. आम्ही उभारणी करू. तुम्ही आपले बंधूचा सला घ्यावा म्हणोन आम्ही तात्यास सला विचारिला की वडझरीकर असे म्हणतात त्याजवरून त्याणी आज्ञा केली की बरे आहे. तुम्ही तेथेच राहावे. आम्ही मागाहून खटले मोडून निघतो. त्यावरून आम्ही वडझरीस राहिलो. मागाहून तात्यानी खटले मोडून मुले माणसे घेऊन निमगांवी आले. नंतर आम्हासही मुलामाणसासुधा नेले आणि सर्वत्रास निमगावी येके ठिकाणी ठेऊन तात्या पुण्यास आले आणि पेशवे सरकारापासी चाकरीस राहिले. नंतर तात्याची प्रथम बाइको माहितगार होती ती मृत्य पावली. हली सौ बाया आहेत यांची लग्ने दौलतीत केली. याजला मागील माहिती नाही व कारभारीहि दौलतीपासूनच आहेत. याजलाहि पूर्वीची माहितगारी काय आहे? * ही आरजी लिा दिली सही. मिति अधिक चइत्र शुा ११ शके १७४५ दस्तुर खुा बापूजी पाटील डेंगले [पत्रावरील शेरा] दस्तायैवजावरून त्रिंबकजीची जिंदगी आहे यैसे मालूम होत आहे. आताच याद द्यावी. न दिल्ही तरी जैसे सरकारचे नजरेस येईल त्याप्राो कराव लागल. दोनी तीनी रोजात मालची पटी न दिल्ह तरी पाहारे ठेवणेस हुकूम होईल. पो छ २२ मार्च सन १८२३ इसवी.

¶Kusaji Malharji Dengle, brother of Trimbakji Dengle, submits an application in which he gives the past history of his family describing at the same time the activities of his brother Trimbakji and the dissensions created by his wives. He prays that he be allowed some time to prepare an inventory of his property. The applicant is informed that an inventory of the property should be prepared at once, otherwise it will be confiscated.

No. 266] *[5-4-1823*

श्री

यादी अर्ज साहेबांचे शेवेसी अनंदराव यशवंत वकील ऐसाजे. आमचे वतन परगणे दिंडोरी येथील देशपांडेपणाचे आहे. त्याविसी आमचे भाऊबंद वतनावर आहेत ते खटले सांगतात. पेशजी पेशवे सरकारचे अमलात रा सदासिवपंत-भाऊ याचे विद्यमाने पंचाईत होऊन हे देशपांडे खरे व वतनावर भाऊबंद आहेत, त्याणी यांचा विभाग यांस द्यावा ऐसे ठहरून आमचे वाद्यांस ताकीदहि जाली की यांचे वतनाचा विभाग यांस द्यावा. इतकियांत दंगा होऊन साहेबांचा अमल जाला. नंतर मोहो छावणीवर सर ज्यान जनरेल मलकंसाहेब बहादूर यांस

येविसीचा अर्ज केला त्यास साहेबानी मेहर्बा होऊन गौरनर बडेसाहेब बहादूर साहेबास आमचे वतनाचा बंदोबस्त करून देण्याविसी बहुत प्रकारे लिहिले. त्याजवरून बडेसाहेबानीहिं या कामाविसी आश्वासन दिल्हे आहे. त्यास हाली साहेबानी मेहेरबां होऊन नगरचे साहेबास येविसी पत्र दिल्हे पाहिजे. हे अर्जदास्त.

अर्जावरील शेरा असा आहे.

देशपांडेपणाचे वतनाचे विभागाविसी तुम्ही जाऊन पाटिंजरसाहेब कलकटर याकडे फिर्याद करा व वाजबी चौकसी होईल. तारीख ९ माहे येप्रल सन १८२३ इसवी.

¶*Anandrao Yeshwant Chandavarkar applies for the settlement of his Vatan of Deshpandeship of Pargana Dindori. The applicant is directed to apply to Pottinger the Collector, for the disposal of the case, see No 249.*

No. 267] *[11-8-1823*

श्री

साहेब मेहरबान मिषवला कदरदान फौज बकष फौज रसाजाब्रीटसाहेब बाहादूर

आर्जी फितव महमदखान जमादार सुा। आर्बा आशर मयातैन व अलफ. कारण लेहून दिल्हा आर्जी आसी जे. आम्ही बडेसाहेबाजवल संगमावर होतो. तेथ बाजीराव याचे हुजरे होत ते फोडून आम्ही साहेबापासी घेऊन आलो. कारण आपली पलटण फितूर येक परभू करीत होते ते हुजऱ्याने साहेबाजवल लेहून दिल्हा. तेव्हा जे दिवसी पुणे घेतल ते दिवसी साहेबानी त्या परभूस फासी दिल्हा. आपले बेटावरील लूट जाहाली तो ऐवज दोन च्यार ठिकाणी गेला होता तोहि आम्ही साहेबास दाखऊन दिल्हा व साहेबानी आम्हास विचारिल की आमचे किताबाचा ठिकाण लावण. तेव्हा तोहि ठिकाण लाऊन दिल्हा व आणून दिल्हा. तेव्हा साहेब बाजीराव याचे मागे लागले. आम्हास बरोबर नेले आणि सांगितल की बाजीराव याचे लस्करचा मुकाम कोठ व सरदार कोण कोठ उतरतील त्याची बातमी आम्हास कळू देत जावी. तेव्हा आम्ही रोज बाजीराव याचे लस्करात जाऊन लस्करची बातमी साहेबास कलवीत होतो. आम्ही आपले प्राणावर काही अस्ता ठेविली नव्हती. साहेबाच्या चाकरी(ची) आस्ता होती. नगरच्या ठाण्यात पाटदरसाहेब होता त्यानी बडेसाहेब यास सागितले की महमदखान आम्हापासी आसू द्या. तेव्हा साहेब म्हणाल की महमदखान तुम्हापांसी ठेवावयाचा नाही. आमचा उपयोगीचा आहे आणि साहेबानी आम्हा दोन च्यार हाजार रुपये इनाम

दिल्हा व दरमाहा रुपये साठ होत ते सर्व लोकास माहीत आहेत. तेव्हा लस्कर फिरत फिरत सातान्यास आल. तेव्हा ग्राटसाहेब व राजश्री बाळाजीपंत नातू हे साहेबास म्हणो लागला की महमदखान आम्हाजवल आसू द्यावा. मग आम्हास यथ ठेविल आणि सागितल की दोनसहे लोक याची हाजरी घ्या. नंतर आम्ही दोनसहे लोक आणूनं ग्राटसाहेब याजपासी चाकरीस राहिलो. ज्याप्रा साहेबानी चाकरी सागितली त्याप्राा केली. दोन तीन ठाणेदारनी लोकाजवल लाच घेतला तोहि साहेबास येऊन कलविला. तेव्हा साहेबानी त्यास चौदा पेष्यापार केले. सबब आम्ही सारे कारकून मडळीस दुशेमान जाहालो. आणिखीहि कारकुनानी व जमादार यानी लाच घेतला तोहि साहेबास कलविल, तेव्हा सारे मंडळी फारच दुशेमान जाहालो. तेव्हा आम्हावर बंदीवानची चाकरी आली. तेव्हा बंदिवान खाणावयास नेल होत तेव्हा दोन प्रहरा आमचे रोज्याचा दिवस म्हणून आम्ही निमाज पढावयासी गेलो होतो. पाठीमागे गावचा वाणी याने चेतुसिग बंदीवानू यासी खारका दिल्ह्या, तेव्हा आम्हास म्हणाल की सरकारात वर्दी काही दिल्ही नाही म्हणोन कुबाड करून माहाराजास कलऊन आम्हास येका जमादार येक वर्षभर परजा(त) टाकिल व ज्या वाण्यान खारका दिल्हा त्या वाणियास दोन च्यार दिवस परजात ठेऊन सोडून दिल्हा. आम्हास ठेप होऊन पधरा दिवस जाहाले, तेव्हा म्हणो लागल की तुम्ही साहेबाजवल फिर्याद जाणार नाही आसा जामीन देणे. तेव्हा जिवाच आस्तेन आम्ही जामनि दिल्हा आणि मग आम्हास सोडून दिल्ह. याची चौकसी साहेबानी करावी. हे आर्जी लेहून दिल्हे सई. मिति श्रावण ९ शक १७४१.

¶*Muhammadkhan Jamadar recounts his past services saying how useful he was to the several officers in giving information from the Peshwa's camps on various occasions, and how he was promoted for the same. He begs an inquiry being made into the harsh treatment given to him by his enemies for allowing some date-fruit being given to Chatursing who was a prisoner under him.*

No. 268] *[15-8-1825*

तारीख छ २९ सन
१८२९ माहे आगष्ट.

श्री.

चिरंजीव राजश्री गणपतराव नारायण श्रीवर्धनकर यांसी यशोदाबाई पेशवे पंतप्रधान आर्सीर्वाद, उपरी. येथील कुशल ताा श्रावण शुा १ पावेतो मुकाम बराणपूर येथे सुखरूप असो विशेष. तुम्हाकडून पत्र येत नाही तेणेकरून काळजी फार लागली आहे की मु(पु)णे मुकामी पावला म्हणोन येथे लोकांची पत्रे आली आणि तुमचे पत्र येकहि आले नाही. त्यास वाटेने काही दगा होतो अथवा

तुम्ही रवाना करीत नाही हे काहीच समजत नाही. त्यास पत्राचे उतर कचा मजकूर लिा पाठवाव. इकडील मजकूर दररोज पत्रे लिा रवाना केली आहेत त्यात मजकूर साकल्य लिा आहे. हाली आम्हांस जैसिंग याजकडून वारंवार ताकीद होते की, आपण शहराबाहर जावे. याप्रो होते. त्यास आम्ही त्यास सांगितले आहे, की आमचे येथून मुंबईस गेले आहेत त्याचे उतर येई तोपावेतो जाणार नाही. परंतु त्याचे येकच म्हणणे आहे. त्यास हाली तुम्हास लिा आहे. तरी कसे करावे याचा विचार पका ध्यानास आणून पत्र कोणे ठिकाणी निघावे याप्रो पत्र अथवा इंग्रजाकडून काही पत्र यावयाजागे तुमच्या भेटी वगैरे होऊन जाले असल्यास तसेच उतर पत्र पावताच यावे. पत्रावर नाव वो रा चिंतामणभट शास्त्री यांचे घालून पता वो रा दादा जोसी याजकडे द्यावे. याप्रो लिा पाठवावे म्हणजे पत्र तरी पावते होईल. येथून येकादोहो दिवसी मुजरद जासूदजोडी रवाणा करावयाचा बेत केला आहे. नारायण जासूद येऊन पावला. कलावे. इकडील फाके दररोज चालले आहेत हे तुम्हास सर्व माहितगारी आहे. पत्री लिा कलवावे ऐसे नाही. सूचनार्थ लिा आहे. तरी सर्वत्रानी एक विचार करून सवाईचे चरणावर लक्ष ठेऊन कार्यसिधता होऊन पत्र लौकर यावे. अनमान करू नये. कलावे. बहुत काये लिहिणे, लोभ करावा, हे आसीर्वाद.

वो धोंडो भिकाजी यास आसीर्वाद. पत्र लौकर पाठवीत जावे. तुम्हाकडील पत्रे येत नाही तेणेकरून कालजी फार लागली आहे. कलावे हे आसीर्वाद.

हा आपत्य परशराम आपाजी जोसी सिरसां नमस्कार विज्ञापना. इकडील मजकूर लिा तरी सविस्तर माार तिकडील लिा पाा. लोभ करावा हे विज्ञापना.

¶*Yashodabai Peshwa writing to Ganapatrao Narayan asks arrangement being made for letters being despatched and replies received. The writer appears to be the pretender of Yashodabai wife of Madhavrao Narayan Peshwa.*

No. 269] [*23-12-1825*

श्री

तारीख छ २३ माहे दिसंबर
सन १८२५ इसवी.

यादी गणपतराव पाटील डेंगले

मौजे निंबगाव जाली सन १२३५ सुरु सीत अशेरीन मया तैन व अलफ

गौरनरसाहेब याजपासी पेणसलाविसी अर्ज केला. त्याणी हुकूम दिल्हा की कमिशनरसाहेबाकडे जावे. त्याजवरून मुंबई मुकामी आसाहेबाची भेट घेतली.

खाविंदी हुकूम केला कीं शंभर रुा दरमाहा पेणसल मुकरार जाले आहे. त्याची सनद विनायत करण्यास हुकूम व्हावा.

१ मौजे निंबगाव ताा कोन्हाळे हा गांव होलकर सुभेदार याजकडून जाहागीर होता त्याविसी गौरनरसाहेब यास अर्ज केला. त्याचा जबाब जाला की आलीषान कमिशनरसाहेब बहादूर याजकडे जावे म्हणजे चौकसी करतील. गावाविसी कागदपत्र आम्हापासी आहेत त्याचे चौकसीविसी हुकूम करणार खाविंद आहेत.

मिा मार्गसीर्ष शुा १०.

¶*Ganpatrao Patil Dengle asks for his pension being sanctioned and the inam village granted to him being released by the Governor.*

No. 270] [*1825-26*

श्री

कुंपणी सरकारास

अर्ज अंनदराव येशवंत वकील सुरू खमस अशरीन मयातेन व अलफ. कारणे अर्ज ऐसाजे. सेवकाने कुंपणी सरकारची चाकरी श्रीमंत माहाराज राजश्री बाबासाहेबाचे व सर ज्यान जनेरेल मलकंसाहेब बहादूर यांचा तहाचा नेम सेवकाचे विद्यमान ठरला. आम्ही चाकरी केली ते मेहरबान लौ साहेब यास माहीत आहे. पुढे मंदुसर मुकामाहून ब्रम्हावर्ताकडे श्रीमंताचा जावयाचा नेम ठरला. समागमे लो साहेब गेले. मावोन जनेरेल मलकमसाहेब महू छावणीस येते समई सेवकास समागमे घेऊन अले. नंतर अम्ही अर्ज केला जे श्रीमंताकडे जावयास आज्ञा व्हावी. त्यास हुकूम जाहाला जे तुम्ही श्रीमंताकडेस जाऊ नये. पुणे मुकामी जनेरेल गौरनर बडेसाहेब बहादूर याजपासी जावे. तुमचे इराद्यानरुप वंशपरंपरा दरमाहा वगैरेचा बंदोबस्त करून देतील. ऐसा हुकूम जाहाला. त्याप्रो आम्ही पुण्यास येऊन पावलो. नंतर गौरनर साहेब याणी हुकूम केला जे श्रीमंताकडील इलाखा[१] बिलकूल न ठेवावे ऐसे बोलिले. पुढे सेवकास दरमाहा दोनशे रुपये पेनसिन ताहाहायात ऐसी सनद करून दिल्ही. त्या वेळेस आम्ही काही अर्ज करावा तर सेवकाने चाकरी केली त्याची माहिती मेहरबान लोसाहेबाखेरीज कोणास नाही त्यापेक्षां लोसाहेब ज्या वेळेस येतील त्या वेळेस आर्ज करू ऐसीया इरादाने आजपो श्रीमंताकडील सिलसिला न ठेवता उगाच राहिलो. हाली लोसाहेब येथे आले आहेत. सेवकाने चाकरी केली ते कुंपणी सरकारा माहीत करितील. त्याजवरून साहेब मेहेरबान होऊन आमचे काम करोन द्यावयाची कलमे बितपसील.

---

१ इलाखा संबंध.

१ कुंपणी सरकारातून दरमाहा दोनशे रुा ची पेनसिनची सनद ताहाहयात करून दिल्ही ते आम्ही व आमचे पुत्रास चालावी ऐसी सनद करून द्यावी कलम १

(शेरा) यैसे कोणासहि जाहले नाही याजकरिता आपणासहि होणार नाही.

१ कुंपणी सरकारातून राहावयास घर विश्रामबागेच्या वाड्यासामोरी कोठीचा वाडा सरकारचा आहे तो आम्हास राहावयास दिल्हा आहे तो वाडा बक्षीस इनामपत्रे करून दिल्ही पाहिजे कलम १

(शेरा) बकषीस मिळणार नाही.

१ सरकारातून दसरेच्या इदाबद्दल पोशाक सर्वत्रास पोहचतो त्याअन्वये सेवकासहि पोहचत असावा. कलम १

(शेरा) नवेसीर हुकूम होणार नाही.

३

सदरहू येकून कलमे सुमारी ३ तीन सेवकास करून द्यावी. सेवकाची मुले लेकरे पुस्तदरपुस्त वौंशपरंपरा कुंपणी सरकारास दुवा देतील. कुंपणी सरकारासिवाये दुसरा अधार नाही. सेवक बहुत लाच्यार कर्जदार जाहाला आहे ऐसियास साहेब मेहरबान होऊन सदरहू तीन कलमे अर्ज केल्याअन्वये करून द्यावयास हुकूम केला पाहिजे. सेवेसी हे अर्जदास्त.

¶*Anandrao Yashwant in return for the loyal services rendered by him to the Company applies for the life pension granted to him to be continued to his son later on and asks for other considerations. His application is rejected.*

No. 271] [*3-3-1826*

अदालत नंबर १७

नकल

तारीख छ ३ माहे मार्च

सन १८२६ इसवी

श्री

खुदावद न्यामत अलीशान मेस्तर ज्यान

ब क स व भां (?) बहादूर आा कालेकटर

सुभे खादेश

अर्जदास्त फिदवी गणपतराव नागेश मामलेदार ताा जामनेर आदाबंदगी तागाईत ताा १८ माहे फेब्रवारी परियेंत साहेबाचे नेक नजरेकरून सरकार

7243

नौकरविर हजर असो. दिगर मार छत्रसिंग राजे सातारकर म्हणोन बोदवडास आले त्यास राजे हे नांव मोठे आणि दस्तक सरकारचें नाही! सबब मारनिल्हे अटकाऊन हुजूर अर्जी पा त्याचा हुकूम नंबर २ चा इनात आला कीं तूर्त त्यास पेटिया देत जाऊन असो देणे. मागाहून हुकूम येईल तसे कर्णे. त्यास सरकार हुकुमाप्रो मारनिल्हेस पेटिया देऊन आजपर्यंत बोदवडास ठेविले आहे. आजपरियेंत मारनिल्हेस अठेतालीस दिवस जाले. दररोज पेटिया व चंदी मिळोन येक रुपया लागतो. येकूण आठेतालीस रुपये खर्च होऊन चुकला परंतु त्याचे बोलणे की मी सर्व सोडून श्रीमहायात्रेस जातो. मजबरोबर च्यार माणसे आहेत ती पेटिया चाकर आहेत. आजवर राहिली आता राहात नाहीत. उठून गेली म्हणजे प्र(वा)सात माझा परिणाम लागणार नाही. यास्तव मजला हुजूर धुल्यास पा द्यावे अगर जाऊं द्यावे असे दररोज बोलून कटकटी करितात. अतित्याई करून, येकयेक दिवस अन्न घेत नाही. यास्तव मार खावंदास कळावा म्हणोन अर्ज लिहिला आहे. हुकूम येईल त्या प्रो करीन. खावंदास जाहीर होये हे अर्जदास्त.

¶*Ganpatrao Nagesh, Mamlatdar of Jamner, reports to the Collector of Khandesh the arrival of Chatursing Bhonsle of Satara at Bodwad and asks for instructions whether he should be allowed to proceed on his pilgrimage. This Chatursingh was a Pretender. The real one died on 15th April 1818.*

No. 272] [*25-11-1829*

नकल

श्री

यादी चिंतोपंत आकबरनीस राजापूर याणी लिा आहे.

१ कारकून चिंतो विश्वनाथ उमर वर्षे ३४ उपनाम लवाटे मूळ राहाणे पुण्यास, बाजीरावसाहेबानी सातारेयाचे बंदोबस्तास स्वार १००० व पायदळ १००० व तोफा २ याप्रो ठेविलें होते. त्यांत हजरनिसीचा दरोगा मजकडे होता. शके १७३९ माघ मासी कंपनी सरकारची पलटणे वगैरे सरंजाम सातारा घ्यावयास आली, त्या वेळेस ते स्वार व पायदळ पळून गेले. मी सातारियात राहिलो. पुढे कंपनी सरकारात सातारा किला सही होऊन काही दिवसानी ग्रांटसाहेब बहादूर आले, तेव्हा मी त्यास जाऊन भेटलो. त्याणी सांगितले कीं तुम्ही सातारियात राहावे. माहाराज छत्रपतिकडील व नोकर लोक बाळाजीपंत नातूसुधा काय वर्तणूक करितात ही आम्हांस दररोज कळवीत जावे, असे सांगून खर्चास दरमाहा पंनास रुपये देऊन गेले. याप्रो च्यार वर्षे केली. पुढे संस्थान माहाराजास

देऊन ग्रांटसाहेब विलायतेस जाऊ लागला तेव्हा मजवल चिठी दिल्ही ती ब्रिक साहेब यास मी दिल्ही. त्याणी सागितले कीं आतां पनास रुपये दरमाहा मिळणार नाहीत, व सातारियात कामहि नाही. तूर्त पंचवीस रुपयें दरमाहा प्रो घेऊन आंबोजी घाटगे याचे राजापुरास जावे. पुढे दरमाहा वाढऊन दिल्हा जाईल. याप्रो सांगितले, त्याजवरून राजापुरास येऊन सात वर्षे जाली; येक दोन महिने कम आहेत. येकूण अकरा वर्षे कंपनी सरकारात चाकरी केली. प्रस्तुत सरकारची मर्जी असेल तिकडे सिध आहे. तत्रापि पुण्यात जर्ज अदालतवाले आगर कालेकटर येकूण सरासरी पुण्यात राहाण्याचा मनोरथ आहे. सरकार पाठवितील तिकडे जाईन.

¶*Chinto Vishwanath, a servant in the Company's Government, states that he was at one time appointed to report the activities of the Chhatrapati, his servants and Balajipant Natu, and requests employment in Poona.*

No. 273] [*17-6-1831*

नंबर ४६

चकती परभारे पुणे हजर
यास पा तारीख ३० जुलई
सन १८३१ इसवी

श्री

पो ता। ७ माहे जुलई सन १८३१ इसवी चकती १२ जुलई सन १८३१

कुंपणी सरकारासी

अर्जी बो। नारो मार्तंड बुंदले. फौजदार सुरु इहिदे सलासीन मयातैन व अलफ अर्जी लिहितो ऐसीजे. पूर्वी श्रीमंत माहाराज राजश्री बाजीरावसाहेब याजपासी नौकरीस राहून हुजूर पागा व पीलखाना व उष्ट्रखान्याचे काम फिदवीकडे काही दिवस पाहात होतो. नंतर आमची तेथे परीक्षा न जाहाली, सबब राजीनामा देऊन ममईस गेलो. नंतर गौरनरसाहेब व नटिंगण जनरेल साहेब व बुढेण साहेब याची भेट घेऊन साहेब यानी मेहेरबानी करून बालकृष्ण परभू याजपासोन बारा मोहरा सुरती देऊन पुण्यास बडे आलपिष्टणसाहेब याजकडे पाठविले. बडे आलपिष्टाणसाहेब याणी बातमीचे काम सांगोन ठेविले. नंतर लढाईचे समयास बडे साहेब यासी लढाईची बातमी नवती तेव्हा ती बातमी आम्ही साहेबास कलविली. तो इतक्यात संगमावरता हला झाला ते समई बडे साहेब यास आम्ही जातीने खडकीस नेऊन पोचविले. त्याजवर आम्ही पुन्हा खडकीस जाऊन साहेबास भेटलो आणि बातमीचे मजकूर सांगत गेलो. या समयांत ग्राटसाहेब

व राबिनसनसाहेब व पाटजर सो व ब्रिकसो व करनेर बरसो व पोटसाहेब बसले असता आलपिष्टणसाहेब यास ग्राटसो याणी समजाविले की हा शकस दरजी आहे. याचे नाव सखाराम राहाणार संगमनेरचा म्हणोन सांगितले. तेव्हा मी दरजी किंवा ब्राह्मण आहे यांची चौकसी ते समई आम्हास ब्रह्मकर्माचा मूलमंत्र पुसोन चौकसी केली. त्याचीही खात्री जाहाली. नंतर आम्ही ब्राह्मण खरे म्हणोन बडे साहेबास नातू याणी सांगितले. मग बडे साहेब यानी ग्राट साहेब यास निषीध करून आम्हास हजार पाचसे रुा बक्षीस देत होते आम्ही न घेतले आणि बोलिलो की या समयास बक्षीस घेत नाही. तुम्ही पुणे सर केल्यावर जे घेणे ते घेऊ म्हणोन पुन्हा बडे साहेब याची सर्फरासी करून घेऊन पुण्यास बातमीचे कामावर आलो. इतक्यात आम्हास भवानी पेठेत बापू गोखले याणी धरून आमचे घरदार लुटून आम्हास कैद केले. नंतर तिसरे रोजी कुंपणीसरकारचा आमल पुण्यास आला. त्या धांदलीत गोखले याचे कैदेतून पलोन पंढरपुरास गेलो. तेथे पुन्हा आम्हास गोखले याजकडील काकोबाने धरून कैद केले व तेथील आमची सर्व जिंदगी लुटून घेतली व दंड घेऊन तेथोन काकोबाहि निघोन गेला. मग सोलापूर मुकामी जनरेल तांबोस मडरोल साहेब आले तेथे आम्ही जाऊन त्याची भेट घेतली आणि त्यास हा पेशजीचा मजकूर समजाविल्यानंतर त्याणी आम्हावर सर्फराज होऊन आमचे हाताने कामेकाजे घेतली व आम्हास बक्षीस देऊन साहेब याणी पंढरपुरास कोतवालीचे कामावर पाठविले. पुढे ग्राटसाहेब साताऱ्याचे कामावर आले तेव्हा पंढरपूर सातारे इलाख्यात आले ते समई आणखी आम्हास हा दरजी आहे असे म्हणोन आम्हास पुन्हा कैद केले आणि आमची जिंदगी नेली. हा मजकूर आम्ही परभारे बडे साहेब यास कलविला. मग ग्राट साहेबास बडेसाहेब याणी लिहून पुन्हा आमचे काम आम्हास देऊन व आमची जिंदगी नेली होती ती देऊन आम्हास पंढरपुरास रवाना केले. त्याजवर मागील आकसामुळे उगीच तुफान बडव्याचे घर जफ्त केले असे करोन आम्हास बडतर्फ करून साताऱ्यास आणिले. तेथे चौकसी करितां तेहि खोटे जाले. मग पुन्हा आम्ही हे वर्तमान बडेसाहेब यास कलविले तेव्हा ज्यान मडोल साहेब यांस बडे साहेबानी हुकूम पाठविला. मग त्याणी पंढरपुराहून आम्हास बलाऊन नेऊन सोलापूरचे कलकटर सो याणी तेथील फौजदारीचे काम सांगितले. त्याजवरहि आणखी अशाच आम्हावर सोद्या लुच्याच्या तुफानी गोष्टी ऐकून दोन च्यार वेळा तहगीर बहाली होत गेली. आम्ही वरचेवर मजकूर बडेसाहेबास जाहीर करीत गेलो. बडेसाहेब चौकसी करून आमचे काम आम्हास देतच गेले. आलीकडे सोलापुरास कामावर साहा

7246

साहेब असता आम्हाकडे फौजदारीचे काम होते. त्यास कामगार लोकानी आम्हावर दुषमानी ठेऊन शाहासाहेब यास समजाविले की फौजदार नारोपंत याणी सिलकेपैकी शेपनास रुा मोबदला केला वगैरे उगयाच तुफानी गोष्टी समजाऊन आम्हास कामावरून आमानत केले आहे. त्यास आजमासे आठदाहा महिने जाहाले. आम्ही तो त्या घुशाने निघोन इतके दिवस पंढरपुरास जाऊन बसलो होतो. परंतु आम्हास शाहासाहेब याचे बलावणे येऊन आमचे काम आम्हास द्यावे ते आद्यापि देत नाही. याजमुले देवाजवलून उठोन हा मजकूर पेशजीपासोन कुंपणीसरकारची नोकरी बडेसाहेब याजवल करोन त्याचा जीव वाचविला व सरकारची लाखो रुपयाची किफायत केली व कुंपणीसरकारची नोकरी बहुत संकटात केली व नोकरी केली याजमुळे इजा बहुत भोगिली व हाली आम्हास उगीच काही कारण नसता कामगार लोकाची दुषमानी आम्हावर त्याच्या तुफानी गोष्टी ऐकून अमानत केले आहे वगैरे सर्व मजकूर इस्तकबील पासोन अर्जी लिहून गौरणरसाहेब बाहादूर यास खबर द्यावी याजकरितां जाहीर केले आहे. तरी खुदावंद मला हकनाक अमानी करून माझा पगार बंद केला आहे त्यास आपण दिनदुनिथेचे मालक आहात. मी अर्ज केला आहे याची चौकशी होऊन फिदवी-वर सर्फराजी करोन आमचे कामावर आम्हास बाहाल करोन अमानत केल्यापासोन पगार सरकारातून येणे तो देविला पाहिजे. माझी जागा सोलापूरची खाली नसल्यास मला जागा नोकरीची दुसरी द्यावी. आम्ही कुंपणीसरकारात मोठ्या आडचणीचे प्र(सं)गास कामे करोन बहुत इजा भोगली आहे, याचीहि चौकसी करावी. आपले राज्य ईश्वराने केले म्हणोन आमची मोकलीक गोखले याचे कैदेतून जाली. नाही तर आमची गत कैसी होती? साहेबबहादुर याणी याचा विचार दिलात पाहावा. आपल्या उपयोगी संकटवेलेस पडलो त्याप्रो आम्हास आबरू मोठी मिलावी ते न होता साहेब लोक मनात न आणिता हलक्या मनुष्याच्या गोष्टी ऐकून आजपर्यंत आम्हास इजा देतच गेल आहेत. खुदावंत येविसी तपास पाहून मला नोकरीची जागा माझे आबरूप्रो मला मिलाली पाहिजे. तारीख १७ माहे जून सन १८३१ इसवी ही अर्जी लिहून दिली सही.

रुजू नारो मार्तंड बुधले फौजदार

¶*Naro Martand recounts his whole life's story, how he entered into the Company's service for supplying secret information of the Peshwa, how he saved the life of Elphinstone when the Poona Residency was attacked, how tales were carried by his enemies to the English officers who thereupon dismissed him from service on several occasions and how he at every time appealed to the Governor and got himself reinstated. Herein also he applies for a similar reinstatement.*

No. 274] [24-12-1831

तर्जेमा जाला असे

यादी दौलतराव घोरपडे आमिरुल उमराव सुरू समान सलासीन मया तेन व अलफ. खुदावंत न्यामत आलीशान आलफिष्टणसाहेब बाहादुर याणी आम्हास पुणे मुकामीहून आवरंगाबादेस मेस्तर सीदेनसाहेब[1] बाहादुर रेजींडट शहर मजकूर याचे खिजमतीत रवाना केले. नंतर त्या साहेबानी राजे गोविंदबक्ष बाधूर यांचे सरकारांत पंधरा घोड्याचा बंदोबस्त करून दिल्हा. सात वर्षे त्याचे तैनातीत चांगली नोकरी केली. ज्या वेळेस मेजर देवीसाहेब[2] बहादुर यांजकडे पांच हजार स्वार स्वाधीन जाले त्या वेळेस देवीसाहेब याणी आम्हास जमादारी दिल्ही. नंतर त्याणी आपले ताबेदारीत ठेविले. पुढे देवीसाहेब सारी जमात आपली घेऊन आम्हास घेऊन लक्ष्मण नाईक याची हाटी वसमत नादेड इकडे माजली होती त्याचे पारपत्याकरिता नेले, तें समई आम्ही बहुत मेहेनत केली. नंतर हाटीवाले लक्ष्मण नाइक भिल याची फार खराबी जाली. हाटी सोडून पळून गेला. नंतर पेंढारी येऊन उपद्रव करू लागले, तेव्हा तीच फौज घेऊन साहेबासुद्धा आम्ही पेंढारी याजवर जाऊन त्यासी लढाई करून त्याचा मोड केला. नंतर ते पळून गेले. त्याजवर त्रिंबकजी डेंगळे सरकारासी बदलून बंड करून फौज धरून उपद्रव करू लागला होता, त्याची फौज गोताळ्याचे घाटाखाली गणेशपूर येथे जमली होती. कनचे (?) घाटापासून वीस कोस ती जागा होती, त्याजवर जाण्या-करितां देवीसाहेब याणी आपली फौज तयार करून आम्हास घेऊन छापा घालावयास गेले. फौज जाऊन त्या फौजेचे नजीक पोहचली तेव्हा साहेबानी फरा बांधून सर्वत्रास जाहीर केली की या प्रसंगी जो कोणी मर्दुमी करील त्याजवर बहुत सरफराजी होईल. तेव्हा आम्ही बरखुरदार पिराजीराव व बापूराव व महंमद हबीबुल्ला दफेदार व शेख मानुला जमादार व येशवंतराव दफेदार व बलवंतराव व हाजी आबदुला मेजर व सेख फतेमहंमद व सरफराजखां जमादार व हैदरखां व दायमखा व आणखी स्वार येकूण पस्तीस स्वार घेऊन डेंगळे याचे फौजेवर उठावणी केली. तेथे फार लढाई जाली. बहुत आसामी त्याजकडील मारले व काही घायाल जाले. त्यांचा मोड केला. लढाईचे समई माझी तरवार मोडली. नंतर आम्ही लढाई सरसी करून आम्ही व पिराजीराव व बंदेअली मुनसी देवीसाहेबाचे, महमद हबीबुल्ला दफेदार व सेख मानुला जमादार व हाजी महमद अबदुल्ला असे बारा आसामी येके जाग्यावर उभे राहिलो.

---

1 Sydenham. 2 Davis.

डेंगल्याचा भाऊ च्यार हजार फौज घेऊन आम्हावर घोडे चालविले. खुद हात्यार चालले. आमचे डोकीवर येकाने तरवार मारली, त्याणे पगडी तुटून डोसकीस जखम जाली. त्या अदमीस आम्ही ठार मारिले व महंमद हाबीबुला दफेदार याणी फार मर्दुमी केली. त्याचे खालचा घोडा ठार जाहाला व त्याजलाहि जखमा जाहाल्या. सर्वत्रानी मर्दुमी करून त्या लोकाचा मोड करून ते पळाले. देवीसाहेब व रनीसाहेब[1] येके ठिकाणी घायाल पडले होते. त्या वेळेस आमचे मनात आले की साहेबास व आपलें लोक घायाल पडले आहेत त्यास संभाळून आपले लस्करात न्यावे. तों डेंगल्याचा पुतण्या चार हजार फौज घेऊन पुन्हा अंगावर आला आणि आमच्या सभोवता घेरा घातला. ते समई पंचवीस तीस आसामी स्वार आम्हापासी येऊन पोहचले. तेव्हा त्याची आमची लढाई खूप जाहाली. त्याची माणसे फार मारली गेली व घायालहि बहुत जाले. तेव्हा डेंगल्याकडील लोक राहिले होते ते पळून गेले. आमची फते जाली. नंतर साहेब लोक व आम्हाकडील काही लोक जखमा लागून पडले होते ते आम्ही सारे सांभाळून आणून गोताल्याचे घाटाखाली डेरा देऊन उतरलो, आणि तेथे मुकाम केला. देवीसाहेब त्या रात्रीस पिराजीराव यास घेऊन आवरंगाबादेस गेले. काही दिवसानी आम्हासहि साहेबानी अवरंगाबादेस बोलाऊन नेले. पिराजीराव व सेख मानुला जमादार व बापूराव हे तिघे आसामी रेणीसाहेब बहादुर यांचे बरोबर होते. डेंगल्याचे स्वारानी त्यांजवर हल्ला केला. लढाई मोठी जाहाली. गनीम यांचा इरादा कीं साहेबास ठार मारावे. परंतु पिराजीराव याणी बहुत बाहादरी केली, आपण जखमी जाहाला. सेख मानुला जमादार याणी फार मर्दुमी केली. तेव्हा पिराजीराव जमादार याणी साहेबास संभाळून लस्करात आले. यास्तव साहेबानी पिराजीराव याजवर मेहेरबान होऊन येक घोडा व येक तरवार बक्षीस दिल्ही. पुढे सारी फौज अवरंगाबादेवर जमा झाली. देवीसाहेब याणी त्या फौजेस बहुत आबरू दिल्ही आणि आम्हास राजे गोविंद बक्ष याजपासून खिलत देविली. देवीसाहेब व सिदनाम साहेब रेजिडंट अवरंगाबादेचे याणी आम्हास हुकूम दिल्हा की तुमचे बाहादारीचे बाबे हुजूर बंदीगानअली[+] व रसलसाहेब रेजिडंट हैदराबाद यास लेहून पाठविले आहे. ईश्वर-सत्तेने रसलसाहेब याचे मारफतीने तुम्हास सरफराजीची खिलत होईल. कलम

१ रेणीसाहेब बहादूर याणी आपले समागमे आवरंगाबादेहून पुण्यास आणिले. येथे आल्यावर आलपिष्टान साहेब बहादूर याची भेट घेतली. नंतर साहेब याणी आमचे बाबे अलपिष्टनसाहेब याजपासी लढाईचे व जागजागी मर्दुमी केल्याचा

---

1 Renny.

+ हें निजामलीचें नांव. तो ता. ६-८-१८०३ रोजीं मरण पावला होता.

7249

हवाला झाडून समजाविला व सिपारस फार केली. तेव्हा अलपिष्ठाण साहेब याणी बहुत मेहेरबानगी केली आणि सरकारात स्वार लोकांची भरती करावयाची होती ते समई आलपिष्ठाणसाहेब याणी आम्हास रिसालदारी दिल्ही व सेख मानुला यास जमादारी दिल्ही व महमद हबीबुला यास दफेदारी दिल्ही व सरफराजखां व येशवंतराव यास दफेदारी दिल्ही व पिराजीराव यास देवीसाहेब बहादूर याणी आपले फौजेत जमादारी दिल्ही व बापूराव यास दफेदारी दिल्ही. ते हैदराबादेहून पुणे मुकामी बंदीगान अली याणी सरफराजीची खिलत राजे चंदुलाल यांचे खत मेहेरबानगीचे व येक जोड पिस्तुलाचा रसलसाहेब यांचे तर्फेचा याप्रमाणे आम्हास मिलाले. पुढे पेशवे सरकारचा व कुंपणी सरकारचा काही बिवाड सुरू जाहला, ते समई अलपिष्ठाणसाहेब व ग्राटसाहेब याणी आम्हास हुकूम दिल्हा की पेशवे सरकारची बातमी आम्हास हरयेक समजावीत जावी. त्या हुकमाप्रमाणे जी बातमी समजेल ती साहेबापासी समजावीत होतो. आलपिष्ठाणसाहेब याणी कर्णेलसाहेब स्वाराचा कमानीन[1] होता त्याचा हुकूम दिल्हा की रांजणगावपरियंत पेंढारीयाचे मोकबल्यास जावे. ते कमानीन साहेब आपली जमेत घेऊन मसीदीचे रांजणगावास पेंढारियाचे बदोबस्तास गेले. आम्ही खबर आलपिष्ठाणसाहेब यास दिल्ही की पेशवे याजकडील फौज आपल्यावर येकादसीचे दिवसी येणार आणि आपल्यावर दगा करणार आहेत. आलपिष्ठाणसाहेब बोलले की कर्णेलसाहेब यास आम्ही गणपतीचे रांजणगावास जाण्याचा हुकूम दिल्हा आणि ते मसीदीचे रांजणगावास कां गेले ? असे बोलून आम्हास हुकूम दिल्हा कीं तुम्ही खुद मसीदीचे रांजणगावास जाऊन फौज सुधा कर्णेलसाहेब यास जलद घेऊन पुण्यास येणे. आम्ही हुकूम देताच निघालो ते कोंडापुरास गेलो. तेथे कर्णेलसाहेब व मर्कलोट[+] साहेब व किमक साहेब भेटले. त्याजला आलपिष्ठाणसाहेब याणी चकती दिल्ही होती ती दिल्ही. त्याणी वाचून पाहताच फौजेसुध्धा कूच करून मावारे फिरले. फौज वाघोलीपर्यंत येऊन पोहचली. तेथे तोफेचे आवाज ऐकू येऊ लागले. कुंपणी सरकारची व पेशवे याचे फौजेसी लढाई लागली हे समजताच आम्ही रातोरात फौजेसुधा पाहाटेस खडकीस येऊन फौजेत पोहचलो. नंतर अलपिष्ठाणसाहेब याची भेट जाहाली व आणखीहि साहेब लोक याच्या भेटी जाहाल्या. तीन रोज लस्करात आनापाण्याची फार तंगचाई होती. सबब आलपिष्ठाणसाहेब याणी हुकूम दिल्हा की तुम्ही कोणाकडेहि जाऊन आनाज अगर जनावरे जे मिलतील ते घेऊन येणे. हुकमाप्रमाणे आम्ही जाऊन लमाणांचा तांडा व मोकली गुरे लस्करात आणिली. साहेबानी पाहून बहुत खुसी होऊन

---

1 Commanding. + Macleod and Camac.

बहुत मेहेरबानगी केली. खूष होऊन बोलले कीं तुमचे स्वारास दरमाहा साठ रुपये पगार मिळेल आणि बरतर्फी कधीहि होणार नाही. कलम

१ पेशवे याणी आमचे बापास व आम्हास बोलणे लाविले कीं कुंपणी सरकारचे फौजेत फितूर करून आम्हाकडे आणावे, या निमित्ये पैका पडेल तो आम्ही देऊ आणि च्यार लक्षाची जाहागीर व च्यालीस हजार फौज याप्रो तुम्हास करून देतो. या कामाकरितां पस्तीस हजार रुपये पाठविले आणि जितका रुपया या कामास लागेल तितका तुम्हास देतो आणि आम्हाकरितां वीस हजार रुपये पाठविले आणि बोलले कीं तुम्हास जहागीर निखालस व सारे फौजेचे सरदार करून देतों. आमचे सरकारात खेरखा तुम्ही करावी आणि इंग्रजी सरकारचें फौजेत फितूर करून आम्हास मिळवावी. याप्रो सारा हवाल आम्ही आलपिष्टाणसाहेब यास जाहीर केला. त्याब्रा हुकूम दिल्हा कीं तुमचे वडिलाकडे रुपये पाठविले आहेत हे घ्यावे व आम्हीहि पाठविले आसता घ्यावे; परंतु आमचे सरकारांत खैरखाने आसावे, तुम्हास वीस हजार रुपये दिल्हे आहेत हे घेऊं नका, तुम्हावर कुंपणी सरकारची सरफराजी होईल आणि मर्तबाहि मोठा होईल व बदर्ताहि तुमची मोठी रोजचे रोज होईल. साहेब्राचा हुकूम ऐकून येक पैसा आम्ही घेतला नाही. कुंपणी सरकारत आजपर्यंत खैरखा करीत आहो. कलम

१ पेशवे सरकार पुणे सोडून बाहेर निघाले तेव्हा आलपिष्टणसाहेब याणी आम्हास हुकूम दिल्हा की तुम्ही शहरची नाकेबंदी करून बंदोबस्त राखणे. त्या हुकुमाप्रमाणें शहरचा बंदोबस्त केला. पेशवे सरकारचे पाठीमागे कुंपणी सरकारची फौज लागली. आम्हीहि समागमे होतो. वीरवाल्यास त्या फौजेची व आपले फौजेची लढाई जाली त्या समई आम्ही बहुत बाहादारी केली. आमचा आसबाब तमाम लुटला गेला. कर्णेल कनिगंम साहेब पेशवे यांचे फौजेत वेन्यांत सापडले होते, त्या समई आम्ही व मेजर मकलोट साहेब सवारासुध्धा कर्णेलसाहेबांची मदत केली. लढाई करून साहेबास आपले लस्करांत आणिले. दुसरे रोजी नीरेचे पुलाजवळ लढाई जाली ते समईहि आम्ही फार मेहनत केली. कलम

१ पेशवे सरकार याणी रसद गला वगैरे मदत सिंहीगडास पाठविली होती, ते समई किला इंग्रेजी फौजेसी लढत होता. आलपिष्टणसाहेब याणी मेजर मकलोट साहेब यास व मजला हुकूम दिल्हा की तुम्ही आपला रिसाला घेऊन जाऊन रसद चालली आहे ती लुटून फडशा करून टाकणे. त्या हुकुमाप्रमाणे आम्ही जाऊन लढाई करून रसद झाडून लुटून फडशा करून टाकिली व किलाही लढाई करून घेतला. कलम

7251

१ पुरंदर किला लढूं लागला तेव्हा पलटण व आम्हाकडील स्वारानी घेरा घातला. तीन दिवस लढाई जाली. नंतर किलेदार मिलाला आणि किला सर जाहला. ते समई लढाईंत आमचे येका स्वाराचा घोडा मयत जाहला. कलम

१ पुरंधराहून पंढरपुरास फौज जात होती त्या वख्ती कर्णेल इस्मीटि साहेब व आलपिष्टणसाहेब व ग्राट साहेब व पाटंजर साहेब व आमचे वडील येशवंतराव व मुनसी महंमद हानीफ व शंभर स्वार तुरपांचे व आणखीहि साहेबलोक होते त्यास श्रीमंताचे फौजेस घेरा घातला ते समई आम्हास खबर लागली, तेव्हा आम्ही व आमचे रिसाल्याचे स्वार व मेजर मकलोटसाहेब याप्रमाणे श्रीमंताचे फौजेवर जाऊन लढाई करून साहेब व तुरुप सारे लस्करांत आलों. नंतर लस्करचे कूच तेथून होऊन नांदली काष्टीवर आलों. तेथे श्रीमंताचे फौजेची लढाई जाली, ते समई आम्ही बहुत बाहादरी केली. नंतर फौजेसुध्धा पुण्यास आलो. नंतर पलटण येक व स्टानिष्टणसाहेब[1] याचा रिसाला घोडनदीहून पुण्यास येत होता त्याजला कोरेगावापासी श्रीमंताचे फौजेने घेरले. लढाई सुरू जाहली. पलटणचे स्वार व लोक फार मारले गेले. ही खबर पुण्यास आली. कर्णेल कनिगंम साहेब व आम्ही व सारे स्वाराचे रिसाले व येक पलटणची कंपणी व आरटिलेरी ऐसे मिलोन स्टानिष्टण-साहेबाचे कुमकेस जात होतो, तो श्रीमंताचे स्वाराची व आमचे फौजेची वाघोली मुकामी लढाई होत होत पुण्यास आलों. ते समई कल्याणसिंग जमादार बाण लागून जखमी जाला व येक घोडा आमचे रिसाल्याचा मारला गेला. कलम

१ साताऱ्याचे राजे याणी पुरंदरचे नजीक येक गाव होता तेथे मुकाम केला होता. ते समई मजला हुकूम जाहाला की तुम्ही राजेसाहेब याचे समागमे आसावे. फिरून दुसऱ्याने हुकूम जाहाला की किले वासोटा याजवर हांटरसाहेब व दुसरा साहेब व राजेसाहेब याचा खटला कैदेत आहेत त्यास कर्णेल पलटणचा ते व तुम्ही मिलोन लढाई करून त्यास आणावे. हुकूमाप्रमाणे आम्ही जाऊन लढाई करून कैदी होते त्यास आणून कर्णेल पलटणचा यांचे सपूर्द करून आम्ही लस्करांत आलो. नरसिंगराव पोल जमादार वासोट्याचे किल्यापासी पन्नास हती श्रीमंताचे धरून आलपिष्टाणसाहेब याचे सिपूर्द केले. पुढे आलपिष्टाण साहेब पुण्यास आले आणि आम्हास हुकूम दिल्हा, की किला जुनर व हाटसर व चावन याजवर तुम्ही जावे. हुकुमाप्रमाणे आम्ही जाऊन किला हाटसरचा घेतला. आन्याबा राहतेकर याणी पांचहजार जमेतसुध्धा चावंडचे किल्यापासी मुकाम केला होता, तेव्हा मेजर मकलोट साहेब व आम्ही शंभर स्वार घेऊन त्याजवर गेलो. तेथे लढाई करून आन्या-

1 Staunton.

बास धरून आणिले आणि त्याचे लस्करात लुटी करून आलपिष्ठाणसाहेब याचे सिपूर्द केली. किला हा (वा ?)सोटाहि लढाई करून घेतला. कलम

१ राजे धर्माजी प्रतापराव बंड जाहाला होता. बिडाचे नजीक होता. आमचे लस्करापासून पस्तीस कोस होता, त्याजवर दौड केली. मौजे डोंगरकिणीवर जाऊन तेथे स्वारांचा छाट करून शंभर स्वार वं मकलोटसाहेब सुध्धा आम्ही जाऊन त्याजवर छापा घातला. त्याची फौज पळून गेली व तोहि पळाला. कलम

१ गारदवडेवर मुकाम होता तेव्हा, कर्णेल कनिंगम साहेब व किमकसाहेब[+] याणी मजला शंभर स्वार बरोबर घेऊन पेशवे याची फौज पंनास हजार होती. यासी मोकबला केला कीं नंतर जर्णेल इस्मिटसाहेब व आलपिष्ठाणसाहेब याणी तोफ फौजेसुध्धा येऊन पोचली. लढाई केली. श्रीमंताची फौज पळाली. त्या रोजी बहुत माल व घोडी वगैरे लटून सरकारात दाखल केले. नंतर पुण्यास आलो. कलम

१ जैतीचा[१] काजी रासीनात बंड जाहाला होता, त्याजवर आम्ही दौड करून त्याजला धरून सरकारात हजर केला. कलम

१ निंबालकर कृष्णाजीराव बंड होता त्याजवरहि आम्ही दौड करून त्याचे पारपत्य करून बहुत खराबा करून तो पळून गेला. कलम

१ बारसीपासून च्यार कोसावर देसाई बंड करून होता, च्यापलीनसाहेब यांचे हुकुमाप्रमाणें त्याजवर दौड करून लढाई करून त्याजला बरबांद केला, तो जातीनिसीं पळून गेला. कलम

१ कितूरची राणी सरकारासी बदलली होती ते समई त्याजवर फौज गेली होती. इसपिलेरसाहेब[२] व आम्ही शंभर स्वार सुध्धा होतो. त्या लढाईत फार मेहनत केली. कलम

१ कोल्हापूर राजे बदले होते तेव्हा इसपिलेरसाहेब व मालेफिनसाहेब[३] व आम्ही आपले रिसालेसुधा त्या कमानात गेलो होतो. कलम

१ कोलापुराकडून कोणी घोरपडा बंड करीत होता तेव्हा इसपिलेर साहेब याजला हुकूम सरकारचा जाहला कीं बंडाचे पारपत्य करणे. ते समई आम्ही आपले स्वारसुधा त्याजवर जाऊन फार मेहनत केली. बंडाची फौज पलाली. घोरपडे यास धरून सरकारात स्वाधीन केला. कलम

+ Camac. १ जिंतीचा. 2 Pritzler. 3 Malfin.

१ उमाजी रामोसी सरकारासी बदलला होता त्या मोकबल्यात आम्ही फार मेहनत केली.आमची खैरखाई इसपिलेरसाहेब यास माहीत आहे. कलम

१ बंदर ममई येथे दरवड्याचा व चोराचा फार उपद्रव होता ते समई मालफिनसाहेब याजवर सरकारचा हुकूम सादर जाला त्याणी आम्हास ममईस बंदोबस्ताकरितां पन्नास स्वार समागमे देऊन पाठविले. खावंदाचे आमबलसे (?) थोडे दिवसात दरवड्याचा व चोराचा बंदोबस्त केला हा हवाला आमचे मेहेनतीचा सरकारास वाकब आहे. कलम

१ आम्ही नवाब निज्याम अलीखां बहादूर यांचे फौजेत राजे गोविंदबक्ष व मेजर देवीसाहेब बाहादूर याच्या हाताखालीं सात वर्षे नोकरी केली व कुंपणीसरकारांत पुणे इलाख्यात स्वारांत येकवीस वर्षे गुजरत आली नोकरी करीत आहो. आमचे रिसाल्यात सरकारकामावर चांगली मेहेनत केली, जखमी जाहाले व घायाल जाले व काही मयत जाले व सरकारातून रिसाल्यात काही कमी स्वार करण्याकरिता हुकूम आला ते लोक बरतर्फ जाले. त्याची व मयत जाले त्याचे कुटुबाची आजपर्यंत मी परवर्सी करीत आहे. जे लोक जखमी जाले व मयत जाले त्याचे लडके बाले आपले बेहेबुदीकरितां उमेदवारीने मजपासी दिवस काढितात. आम्ही दाहा वर्षापासून कर्णेल कलुप व आलपिष्ठाणसाहेब यांचे खिजमतीत आजपर्यंत चालत आहो. सरकारास रोशन आहे कलम

येणेप्रमाणे कलमे लिहिली आहेत त्याजवरून खावंदास रोशन होईल. ता।। छ २४ माहे डिजेंबर सन १८३१ इसवी

सही दौलतराव घोरपडे आमिरुल
उमराव सही खुद.

¶*Daulatrao Ghorpade of Sandur, son of Yashwantrao, submits a detailed account of the loyal and arduous services which he rendered to the British Government in the late war. The writer mentions particularly how faithfully and promptly he obeyed Elphinstone and did many heroic deeds in his behalf. The paper is important as it throws fresh and personal light on many incidents connected with the last days of the Peshwa and the desertions that took place in his army. The paper is original.*

7254

No. 275] [14-5-1836

एजंट रूमाल नंबर ३२

नंबर ४२१

श्री

यादी हरि गोविंद देशमुख सुा सीत सलासीन मयातैन व अलफ. श्रीमंत माहाराज पंत प्रधान यांचे श्री देवघरचे श्रीदेव श्रीक्षेत्र वाई येथे आहेत ते ब्रम्हावर्तास न्यावयाकरितां कारकून पाठविले आहेत. त्याजवर सरंजाम बितपसील :—

१ मेणा भोई समेत
३ डोल्या भोई समेत
५ स्वार असामी
२ उंट नफर
१ कुंपणी सरकारचा पटेवाला
२० सिपाई हत्यारबंद वगैर
६ तट्टू ओझ्याचे

येणेप्रमाणे श्रीदेवाची स्वारी पुण्याहून ब्रम्हावर्तास जात आहे. त्यास मार्गी कोणी मुजाईम न होता ज्या गांवीं वस्तीस राहातील तेथे चौकी पाहारा करून आपलाली हदपार करून देत जाणे म्हणोन रहदारीचे दस्तक देण्याविसी हुकूम जाहला पाहिजे. मिति वैशाख वाा १४ मंदवार शके १७५८ दुर्मुख नाम संवत्सरे

सही हरि गोविंद देशमुख दस्तुर खुद

हुकूम की कलेक्टरसाहेब यांजकडे याद पाठऊन दस्तक आणऊन देवावे. ताा १४ माहे मे सन १८३६ इसवी.

(*Signed*) (*Illegible*)
Agent.

¶*Hari Govind Deshmukh asks for a passport for the family idols of the Peshwa to be taken from Wai to Brahmavarta accompanied by a small party. The writer was Bajirao's agent in Poona, see No. 264 above.*

7255

No. 276] [28-10-1811

पौा छ ७ जिलकाद
सुा इसने अशर
मया तैन व अलफ

श्री

वडिलाचे शेवेसी आपत्यें समान कृष्णाजी नाईक गायेकवाड साष्टांग दंडवत विज्ञापना तागाईत छ १० माहे सवाल मुकाम लस्कर नजीक ग्वालेर येथें बालकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. जैपूरवाले राजे माधवसिंग याचा वडील पुत्र प्रीथीसिंग गादीवर होता तो निवर्तला. ते समई त्याची स्त्री गरोदर होती. तेव्हां प्रीथीसिंगाचा बंधु प्रतापसिंग यास गादीवर बसविलें. गादीवर बसतांच त्याणी वडील बंधुची स्त्री गरोदर होती तिजकडे चवक्या पाठविल्या. नंतर तीस पुत्र जाहाला हें वर्तमान प्रतापसिंगास कळलेस इज्ञ होईल जाणौन, युक्तीणें आईनें पुत्रास मातुलाचे घरीं पोहोचविलें. तेथें नांव राजश्री मानसिंग ठेविलें. सात आठ वर्षाचे होऊन ते प्रांतीं राजश्री माहादजी सिंदे फौजसुद्धां गेले ते समयीं (सिंदे) याजकडे मानसिंग येऊन पोहोचले, तेव्हा स्वारी समागमे मशारनिले होते. ते समयीं जैपूरप्रांतीं गेल्यावर सिंदे याणी * * * मान धरूण ठाणींही कितेक कायेम केलीं होतीं. ती पटाईत भाऊबंदपैकी राजश्री राव राजा याचे * * * * * तेच शेवटीं फौजा माघारीं आल्या. तेव्हां मानसिंगाचे खर्चाचा बंदोबस्त करून देऊन ग्वालेरीस ठेविले. पुढें जैपूरची मालकी त्याजकडेसच होण्याचे अगत्य होतेंच. माहादजी सिंदे देशीं आले, ते समयीं सांगितलें कीं आम्ही देशीहून आल्यावर बंदोबस्त करूण देऊं. देशीं आल्यावर ते इकडेसच मृत्य पावले, त्यापेक्षां कोणतेंहि घडण्यांत न आलें. तिकडे प्रतापसिंग गादीवर होते ते निवर्तले. आण त्याचा लेक राजश्री जगतसिंग प्रस्तुत गादीवर आहेत. हा मजकूर येथें पेशजीपासूण विदित आहेच व हालीं मानसिंग ग्वालेरीस आहेत. त्यांचें बोलणें येथें आले तेव्हां विच्यार पाहातां आज वीस पंचवीस वर्षे जाहालीं. आपले आश्रयां(स) येऊण आहेत; आण सिंदे यांणीं आश्वासन दिल्हें ते कैलासवासी जाहाले. राजश्री आलिज्याबाहादूर यांजकडून कांहीं विच्यार करन्यांत आलाच नाहीं. हलीं मशारनिलेकडून बोलणें आपल्याकडे आले. तेव्हां मशारनिलेचे भेट घेऊन विच्यार पुसला कीं तुम्हांस अनुकूल कोण कोण आहेत. त्याणी सांगितलें कीं राव राजे माचेडीवाले हलीं दाहा पंधरा हजार सरंजामानशीं ते आपले संस्थाणीं आहेत. ते व राजश्री कृष्णगडवाले राजे व मारवाडवाले राजे मानसिंग व पटाईत भाऊबंद सर्व अनुकूल आहेत. त्याचें बोलणें कीं तुम्ही

निघोण आम्हाकडे यावें. आम्ही संस्थाणावर कायेम करून देऊं. याप्रमाणें (बो)लत असतां मशारनिलेचें माणस जें कर्णे तें श्रीमंत साहेबांचे हातूण व्हावें, ऐसे मशारनिलेचें मानस आहे, येविशी (आलिज्या)बाहादर यांस सरकारचें पत्र यावें. * * * * (बंदो)बस्त करूण द्यावा. खुशाल बोहोरा प्रस्तुत जैपुरास कारभार करितो, तेहि अनुकूल आहेत. त्यास फौज पलटणें समागमे * * * कायम करावें. आंतील रहश पाहातां सर्वांचें लक्ष मानासिंगाकडे आहे. बहुतेक आपण आपल्याकडेसच हें काम करूण घ्यावें, म्हणजे इकडे फौजहि परस्परें पोसल. जैपूरचे राज्य आपलें हातीं राहील, तर हें आपल्याकडून फौजेचा विचार न आल्यास याप्रमाणें राजश्री आलीज्याबाहादर व राजश्री बालोजीबावा यांस पत्रें द्यावीं कीं माणसिंग यास संस्थाणीं कायेम करावें. संस्थाणीं कायेम जाले असतां सरकारचा नजराणा पंधरा लक्ष रुपये देतील, व तुम्हास येक लक्ष रूपये अंतस्त देतील. याप्रमाणें त्याचा व आमचा बोलण्यांत करार जाला आहे. येविसी राजे याणींहि खलिता पारसी पत्राचा श्रीमंतसाहेब स्वामीस दिल्हें आहे व आपलेंहि नावें रांगडी पत्र दिल्हें आहे. त्यांचे पत्राचें उत्तर खातरजमेचें यावें. आपण विंचार पाहूण पत्राचीं उत्तरें पाठविलीं पाहिजेत. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. राजश्री बाळोजीबावाचे विचारास हे मसलत आली आहे. पूर्वी यासी व आंबोजी इंगळे यासी बोलणें जालें होतें. बाळोजी बावाचें पत्र आपल्यास आहे. त्यांत मजकूर बारीक बहुत आहे, तो ध्यानास यावा हे विज्ञापना.

¶*Krishnaji Gaikwad writes to Trimbakji Dengle that Daulatrao Sindia should be requested to decide the question of succession to the rulership of Jaipur in favour of Mansing, as he is supported in his object by the neighbouring principalities and is willing to offer 15 lakhs by way of a present.*

No. 277] [*12-11-1811*

पो छ २४ जिलकाद सुा

इसने अशर मया तैन व अलफ

श्री

वडिलाचे शेवेसी. आपत्यसमान कृष्णाजी नाईक गाईकवाड दंडवत विज्ञापना. तागाईत छ २९ माहे सवाल बुधवार मुकाम लष्करनजीक ग्वालेर येथें बालकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलीज्याबाहादर रोज गुदस्त उठोन शौच्याविधि मुखमार्जन करून स्नान केलें. देवघरांत जाऊन देवताच्र्यन व निते दांणें+ होऊन तेथें प्रसाद शेवण करून बाडांत जाऊन भोज्यन जालें. निद्रा होऊन मागील प्रहर दिवस राहातां कचेरीस आले. दरगदार मंडळी

+ नित्य दानें.

मानकरी पागे पथक सिलेदार मंडळी सर्वांचे रामराम जाहले. नंतर आपण व राजश्री गोपाळराव चिटनीस गोकुळ पारख मोरो हरि येकांतीं बसून लोकाचे खर्चाविशी बोलणें जाहालें; व पेंढारी यांचा बंदोबस्त करावयाविशी व गडेकोट्याची सोडचिठीविशी बोलून राजश्री दाजीबा देशमुख यांजकडील पत्र आलें, त्यांतील मजकूर निघाला. श्रीमंत स्वामी साहेबाची मर्जी पेंढारी याजविशी रुष्ट आहे; कारण तुम्ही पेंढारी यांचा बंदोबस्त अद्यापि केला नाहीं. सबब विंचूरकर यांजबराबर जरी पटका देऊण रवाणा केलें. या बोलण्यांत येकांतीं असतां आकबार-आली, तिचा मजकूर त्रिंबकजी पाटील डेंगळे याजला वस्त्रें होऊण बराबर सरंजाम तोफा पंचवीस फौजा सत्राहजार याचा दुमाही फडच्या करून रवाणा केलें. मुकाम लोहोगावावर आहे. याप्रमाणें मजकूर पाहूण कल्पना घेतली. राजश्री बालोजी कुंजेर सात आठ वर्षे राहूण, श्रीमंतास पत्र पाठऊण, त्रिंबकजी पाटील डेंगले बाहेर काढावयाचा वेव्हार याणी केला. याप्रमाणें आंत:कर्णांत पक्तपणें ठसले. हें वर्तमान बावास व मजला समजले. बावा बोलूं लागले. येथील मंडलीनें दोश तुजवर व आम्हांवर ठेविला आहे त्यास कांहीं चिंता नाही. बावाणी काट केला, श्रीमंताचे प्रतापेंकरूण यांचा आपला बोलन्याचा प्रसंग पडला तर जाबसाल होईल. त्यांचा दोश त्यांचे पदरीं घालून दाजीबा देशमुख याणी लिहिले लस्करची वर्धी आपले येथील कची येत आसते, जे करणें तें बहुत विचाराणें करावें. भरतपूरकर जाट याजकडील वकील येथें आला आहे. मुलास कडीं, जडावाची कंठी मोत्याचा सिरपेंच, बिजवरा जडावाचा, आंगडे कुंचडें आलिजाबहाद्दर यांजला वस्त्रें सौभाग्यवती बाईजाबाईस वस्त्रें याप्रमाणें दिल्ही. बावाणी वकिलाची माझी भेट करूण दिल्ही. च्यार घटिका त्रिवर्ग बोलत बसलों. त्याचे ये(ज) मानाचे आंत:-कर्णांत वेव्हार आहे. ते गुहे याचे बोलन्यावरूण ध्यानास आले. रुपया खर्च जाला तरी करावा; परंतु सोबती जबरदस्त पाहातो. सरदार बाहादूर रंजितसिग शीक दिलींत हलीं पातशाहा आहे त्यास मीरखान यांजकडे संधाणें आंतूण परस्पेरें लाऊण ठेविलीं आहेत. सदरहू त्रिवर्ग यांचे वकील येथें आहेत, त्यांची भेट बावाणी करून दिल्ही. सान्हाच वेव्हार आपले सूत्रावर आहे. आपले सूत्रासिवाय हालत नाहींत. बावास वर्तमान कांहींएक समजल्यास ते मजला सांगत आहेत. येथील कारभारी याजविसी आलिज्याबहाद्दर याचे मणांत वांकडें दोन तीन दिवस आलें. आंतूनहि दोन तीन असामी मिलाली आहे. धराधरी होणार. काल दोण घटका रात्रपावेतों शिलेदार पागे याणी बक्षी पागणीस याजसुद्धां सरकारडेन्यास उपासी बसले. आलिजाबहाद्दर याणी कारभारी यास सांगितलें, लोकास समजाऊण रात्रीचे उठऊण न्यावे. एका दो रोजानी खर्चाची सोय करूण

देऊं; इतकें बोलून वाडांत गेले. कारभारी त्रिवर्ग बाहेर आले. तों लोकांचे गवगवे चहूकडून जाले. पानाच्या पट्या आम्हांस देणें म्हणजे आम्ही देसीं जाऊं. मोरो हरि बोलले, येका दो रोजानी तुम्हास खर्चास देऊं. (सुरत)सिंग पाटील बोलला की आमचा जीव आज चालला; तुम्हास येक दो रोजाचे पडले. यैसे बोलोन दुसरीयाची तरवार घेऊन आपले गल्यावर ठेविली. तेव्हां दाहा पांच जणानीं त्याचे हातची तरवार घेतली. सर्वानी एकच गवगवा केला. आमची मुलें माणशें घोडीं खर्चावीन मरतात; परंतु तुम्हांस आमचे दर्द येत नाहीं. त्यास याप्रमाणेंच तुम्हांजवल आपले हातें मरून जाऊं; आणि दाटी धरूण समजाऊण वाटे लाविलें; व आपण आपले ठिकाणी गेले. आज छ मजकूर आलिज्याबहादर याचे तीर्थरूपाचें श्राद्ध होतें. प्रात:काली नित्यनेम सारून श्राध संकल्पविधि होऊन, होम जाहाला. ब्राह्मणास धर्म यथायुक्त करूण दाहा घटिकेंत भोजनें जाहालीं. आज कचेरीस आले नाहींत. कारभार मागील प्रहर दिवस राहातां दोन घटिका बसून, मागती लवकरच गेले. बावानी पत्रें सरकारास व राजश्री सदाशिवपंत भाऊ यांजला लिहिलीं आहेत, हे पावतील. आपण बावास मजविसीं लिहिलें होतें, त्याजवरूण हे लोभ बहुत करतात. चिरंजिवाप्रमाणें ममता ठेऊन वारंवार जवल बोलाऊन घेत आहेत. कामकाज असल्यास मलाच सांगतात. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Gaikwad in communicating the daily happenings at the court of Daulatrao Sindia says that the action of Peshwa Bajirao in sending Trimbakji Dengla with an army and artillery to quell the rebellion of the Pindaris displeased Daulatrao Sindia. Daulatrao holds Baloji Kunjir responsible for prejudicing the mind of Bajirao against him. Krishnaji appears to be Trimbakji's relation and informant residing with Daulatrao at Gwalior.*

No. 278] [*June 1813*

श्री

यादी कृष्णाजी गाईकवाड याजकडून पत्रे आली त्यातील अन्वये सुा सन अर्बा अशर

१ छ १० जमादिलाखर भूपालास मोर्चे लागले. बाहेरील फौज खासा मेल्यामुलें लोक तजावजा. किल्यांत माणसी पोटास तीन पाव आटा व आदपाव दाल देतात. आद्यापवर कायम आहेत. सरकारची फौज नर्मदातीरी यामुलें गोपालराव रघुनाथ नित्य बोलाऊन आणीत होते.

7259

१ छ १२ जमादिलाखर आपा चिटणीस यास सोडून स्मशरु करविली.

१ छ १५ जमादिलाखर आटकेकडील सीक याची कही गेली. त्याजवर शहाकडील वजीर याची स्वारी जाऊन कही वळून घेऊन चालिले, तो सिकास समजतांच स्वार पाठवून कही माघारी आणून शहाकडील दोन आर्डाचशे माणूस मारिले. सिकाची फत्ते जाहाली. उभयतांची तीन चार कोशाची तफावत आहे.

१ छ १८ जमादिलाखर दिल्लीहून अखबार आली त्यातील सुज्यात अल्ली बरुशा लाहुरास आला. रंजितसिंग सीक याणे चार कोटीचे जवाहीर मांगितले ते त्याणी दिल्हे. नंतर बात(द)शहास हत्तीवर आंबारीस बसऊन खवजखान्यांत आपण बसून मोर्चेल वारून फुले उडवीत शहरांत आणून नजर नजराणा जाहला.

¶*This document comprising extracts from letters written by Krishnaji Gaikwad refers to the activities of the Sikhs and the reception of Shah Shuja of Afghanistan by Ranjitsing. An attack on the fortress of Bhopal is alluded to.*

No. 279] [*July 1813*

श्री

यादी कृष्णाजी गाईकवाड याजकडून अखबारी पत्रे आली त्यातील अन्वये सुा सन अर्बा अशर मया तैन व अलफ.

१ छ ९ रजब दिल्लीचे अखबारींतील सुज्यान मुलुक पातशहा लाहुरास आहे त्यांचे कारभारी हुसेनखां व हैबतअली याणी महमूदशा पातशहा याचे वजिरास अटकेकडे पत्रे पाठविली कीं, तुम्ही कूच दरकूच इकडे येणे. लाहूरचा बंदोबस्त आम्ही करितो. ती पत्रें रजतसिंग सीक याणी धरून, पातशहास दाखविली. नंतर सिकानीं कारभारी कैद करून, त्याचे चवकशीस सुजान मुलुक ठेऊन पलटण व पांचशें शीक ठेविले. पातशहाकडे परवानगी खेरीज कोणी जाऊं नये.

१ छ १३ रजब लाहूरचे अखबारीतील रंजीतासिंग याजकडील महकुमसिंग दिवाण व खडकसिंग व शहाकडील वजीर यांची लढाई जाहाली. वजीर सिकस्त होऊन माघारा गेला. तीन हजार मनुष्य पडले. त्याचे मागें खडकासिंग व महकुमसिंग गेले.

१ छ १९ रजब. शहाची फौज आटकेपार गेली. सीक आलीकडील काठीं आहे. शाहाचे मुछदी सात धरिले. ते जिवंतच जाळले.

१ छ १८ रजब. शहाकडील दुराणी वीस हजार येऊन, खडकसिंग यासी लढाई घेतली, तेव्हां दुराणी कचरोन माघारे गेले. खडकसिंग यास येश आले.

१ छ २१ रजब. शहाची व सिकाची लढाई जाहाली. वजीराचा बंधु दोस महंमद याणे उठवणी करून, महकूमसिंग हत्तीवर होता, त्याचे हौद्यास भाला लाविला. ते समई सिकाकडील लोकानीं जलदी करून, दोस महंमद याचे सीर कापिले. छऱ्याचा मार दिल्हा, तेव्हां वजिराची फौज पळाली. येश सिकास आले व इंग्रजाची पलटणे जालवणाजवळ होती त्याणी कूच करून, पाणी पाहून आलीकडे पांच कोशावर मुक्काम केला.

१ छ २९ रजब शहाकडील वजीर कामास आला, त्याचा रणांत शोध केला. वजिराचा ठिकाण लागत नाहीं. पोषाख मात्र सांपडला. इंग्रजाकडील दोन पलटणे आली. दोन हजार बंदुख व तोफा च्यार थोर, व लहान दोन. काळे सिंदीचे पारच आहेत.

१ छ २९ रजब. शहाचा बंधू याचा इमान ठराऊन बागांत कूच करून गेले. वजीर पळाल्याचे वर्तमान काश्मिरास गेले. सा। शहानी आपले चिरंजीवास काश्मीरास रवाना केला. कलम

१ छ ७ रजब सूर्यग्रहणास शृंगी रामपुरास स्वारी गेली. तिकडून येताना इंग्रजी चार पलटणे आठ तोफा घेऊन आले. त्याचे बोलणे बाबाजी पाटणकर याजकडून जाहाले. साडेतीन सनगे देऊन, मेवाडांत कामगिरी सांगितली. इंग्रजाकडील वकील आत्मारामपंत येऊन, स्वारी शृंगीरामपुरास गेली ; तेव्हां मार्गी नुकसान साठ हजाराचे व झांसी, दतिया, जालवन मिळोन चालीस हजार तें भरून द्यावें. त्यास गोपाळराव रघुनाथ याणी उत्तर केले कीं स्वारीस सहा महिने जाहाले. आजपर्यंत भरून मागितले नाहीं. तेव्हां मागावयाचे होते. झासी, दतियाचे नुकसान जाहाले म्हणतात, त्यास घासदाणा सुभ्यानें घेतला असेल तो द्यावयाचा सिरस्ताच आहे.

¶*These extracts from the news-letters written by Krishnaji Gaikwad relate to the fighting between the forces of Ranajitsing and the forces of the Shah of the Duranis at Kandahar. The movements of the English are also alluded to.*

No. 280] *[20-8-1813*

पैवस्ती छ २० रमजान भा सन
आर्बा मुकाम फुलगांव.

श्री

माहाराजाचे शेवेसी. आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गायेकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगले विज्ञापना. तागायत छ २२ माहे साबान मुकाम लस्कर नजीक ग्वालेर येथें सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलिज्याबाहादर रोज गुदस्त प्राथःकालीं उठून, सौच्यविध मुखमार्ज्येन करून, खासगीवाले यांस जेन्माष्टमीचे मखराची व सभास्थाणी स्तंभास बिलोरींची भांडी लावावयाची व बिछायेतीची ताकीद केली. स्मश्रु कर्णे ते रहित करून श्नाण जाले. पुराणश्रवण करून पोशाख घेतला. बारा घटिका दिवस येतां वाड्यांत जाऊन फराल जाला. दोन प्रहराचे अमलांत बंगल्यांत बैठक जाली. कारभारी मानकरी वकील मंडली येऊन दरबार जाले. गोकुल पारख यांसी येक घटिका खलबत जालें. मल्हार भिमाजी बक्षी याणें विनंती केली येकांडे सिलेदार यांची आदा पावती आपण पाहिली आहे. तें मंडल आज रुसून जातें. सबब त्यांजकडे हुजऱ्या पाठऊन, गुरुजीकडे हिशेबास पाठविले. लोक भर हिशेब मागूं लागले. गुरुजी नरवरचे हिशब पुढें सांगूं लागले. सेवटीं तोड न पडला. आटकेकडील वर्तमान शाहा व फत्तेखां वजीर लढाईस आटकेवर येन्हार. त्याजवरूण सिकानें जागोजाग आपला बंदोबस्त करून, त्यांचे फौजेंत दाहा जोडी हालकारे बातमीस पाठविले. कास्मीरवाले जमीदार यास सांगून पाठविलें तुम्हीं कास्मीर खालीं करणें. तुमचे कुमकेस आम्हीं आहोंत. च्यार घटिका दिवस राहातां कचेरींत येऊन, देवाची व कचेरीची चित्राकारी रंग फुलें छतें जागा पाहून, कारभारी मानकरी रामराम करून गेले. आपण बागांत येऊण आपा चिटनीस यासी दोन घटिका रात्र परियेंत भाशन जालें. वाड्यांत जातेसमईं, जिनसीच्या तोफा दोन व पलटनची कंपनी येक दरवाज्यापुढें आणविली. प्रहर रात्र जालियावर गोपालराव रघुनाथ, आत्माराम सिवराम, मोरो हरि, बालाराम भाई गोकुल पारख बक्षी येऊन बिछायेत केली. मानकरी वकील मंडली यांस बोलाऊं पाठविलीं. रोशनाई कारंजी चालू केली. कलवंतिनीचा नाच होऊं लागला. दीड प्रहराचे अमलांत आपण येऊन राजश्री त्रिंबकराव दाभाडे यांजला बोलाविलें. पावणेदोन प्रहरांत नाना गोसावी कीर्तनास उभे राहिले. श्नाण करून देवघरांत गेले. पूज्यनास आरंभ केला. वेदशास्त्रसंपन्न खंडबावा शास्त्री जोशी उपाधे आश्रित मंडली आली. दादा उपाध्ये याणी पूजा सांगून, आर्ध रात्रींचे आमलांत

जेन्मकाल होऊन, तोफा तेरा व चवघडा आदी करून, वाद्यें होऊं लागलीं. उत्तरार्ध पूज्या करून वर आलंकार परिमल द्रव्यें आर्पून नैवेद्य जाला. ब्राह्मणास दक्षिणा देऊन कीर्तनास आले. आडीच प्रहर रात्र परियेंत कीर्तन होऊन, विडे अत्तर गुलाब सर्वांस देऊन उठून गेले. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Naik Gaikwad in reporting the daily happenings at the court of Daulatrao states that the Shah of the Duranis and Fatekhan at the head of a strong army are proceeding towards Attock to oppose the Sikhs.*

No. 281] [*23-8-1813*

पौ छ २७ रमजान
मुा फुलगाव.

श्री

माहाराजांचे शेवेसी आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गायेकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगले विज्ञापना. तागाईत छ २९ साबान मुकाम लस्कर नजीक ग्वालेर येथें शेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. राजश्री दौलतराव शिंदे अलीजाबाहादर रोजगुदस्त प्रातःकाळीं उठोन शौच्यविधि मुखमार्ज्यन जाहालें. राजश्री बाबूराव आंगरे याकडील गोविंदराव आंगरे येथें होते, ते मृत्य पावलें. त्यांचे दहनास येक शेला व पन्नास रुपये संभाजी आंगरे यांजकडे पाठऊन दिल्हे. गुलाबखां मेवाती देवडीवरील त्याचे पुतण्यानें दुसरे मेवाती याचे बायकोशी जबरदस्तीनें बदआमली केली. सौभाग्यवती बायेजाबाई यांणीं आपले देवडीवर बांधोन ठेविला. दोन घटिका दिवस येतां स्नान करून देवार्च्यन जाहालें. पुराणश्रवण करून पोषाख घेतला. आबाजी घाटगे, नाना भोंसले, मल्हार भिमाजी बक्षी शागीर्दपेशा यांचा रामराम जाहाला. कैलासवासी महादजी शिंदे यांची नाटकशाला रहिमान पथरगडवाली उजनीस पेशजी मृत्य पावली. तिजकडील हातणी येथें आणिली. बाळा चोपदार घेऊन आला, तें पाहोन चोपदार मजकूर याजकडे दिल्ही. घाटगे यांसी दोन घटिका खलबत जाहालें. खाजगीवाले याजकडे ब्राह्मणसंतर्पण पांचशेंपावेतों जाहालें. आसामीस च्यार आणे दक्षणा दिल्ही. बारा घटिकाचे आमलांत वाड्यांत जाऊन भोज्यन जाहालें. विडा घेऊन तळघरांत बैठक जाहाली. मोरो हरीस गोकुळ पारख याजकडें येवजाचे तोडीकरितां पाठविलें. गुलमहमद चोपदार यासी आज्ञा करून कीर्तनाच बोलावणीं सर्वांस पाठविलीं. दोन प्रहरां बिछाईत करून कलवंतणीचा नाच होऊं लागला. गोपालराव रघुनाथ रामचंद्र भास्कर आदिकरून दरकदार

मानकरी वकील मंडली शास्त्री पुराणिक जोशी सर्व येऊन सभा जाहाली. लाहोरचें वर्तमान सरदारसिंग तिलोडीवाला लाहोरास भेटीस आला. त्याजला रणजितसिंग सीख येक कोस पुढें जाऊन समारंभानें शहरास घेऊन आले. दोनशें रुपये खैरात केली. उतरावयासी जागा दिल्ही. पांचशें रुपये मेजमानी पाठविली. कासमीर खाली करावयासी तोफखाना व फौज रवाना केली म्हणोन दोन प्रहर दिवस राहातां कीर्तनास येऊन बसले. विडे अत्तर गुलाब होऊन दोन घटिका दिवसास आरती जाहाली. आत्मारामपंत वकील याणी विनंती केली साहेब आज बेहडांतून आले आहेत, ते देवदर्शनास येतात, त्यांस यावयाची आज्ञा केली. देवघरांतून येऊन आपण तळघरांत बसले. रामचंद्र भास्कर यासी बोलाऊन दोन घटिका खलबत जाहालें. दीड घटिका रात्रीच्या आमलांत इस्तेरसाहिब[1] व तार्टेसाहेब[2] यांची स्वारी आली. आपण कचेरीस आले. गोपाळराव यांसी पुढें पाठऊन त्याजला घेऊन आले. आर्धताजीम देऊन, डावे बाजूस बसावयासी जागा घेतली. कलवंतणीचा नाच व रासधारी यांचा तमासा पाहून इंग्रजाणी हाश्य केलें. विडे अत्तर गुलाब घेऊन वसलीसाहेब हैराण आहे ते आगऱ्यास जातात, आम्ही बेहेडांतून दर्शनास आलों होतों, पुन्हां जातों. आज्ञा घेऊन पांच घटिका रात्रीं स्वारी ठिकाणास गेली. मागे ला(लो)काचा रामराम घेऊन आपण वाड्यांत गेले. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Naik Gaikwad communicates to the Peshwa the daily happenings at the court of Daulatrao. Mention is incidentally made of a concubine of Mahadji Sindia named Rahiman Pathargadkar, having died.*

No. 282] [*September 1813*

श्री

यादी कृष्णाजी नाईक गाईकवाड याजकडून सरकारांत विनंतिपत्रे आली त्यातील सारांश माहे रमजान भाद्रपद सन अर्बा.

१ छ ६ रोज मीरखां मेवाडांत गेले; व हत्रसवाले जाठ यास इंग्रेजानीं पत्र पाठविले कीं तुम्ही भरतपूरवाले याजकडेस जाऊ नये. गेले असतां बिघाड होईल. त्यांणी उत्तर केले कीं परस्परे एकमेकांचा उपराला राखीत आलो, तुमचे विचारास येईल तसे करावे.

१ छ ८ रोज होलकराकडील तात्या आलेकर यांचा कारभार बंद होऊन गणपतराव नारायेण यास वस्त्रे होणार. लष्करांत धारण दोन पाइलीची.

1 Strachey. 2 Start ?

१ छ ९ रोज माचेडीवाले व भरतपूरवाले यांचे वकील दिल्लीस होते, इंग्रेजानीं उठवून दिल्हे. पलटणे नवी आली आहेत. उभयतांवर इरादा आहे.

१ छ ११ राजे भरतपूरवाले आपले ठिकाणीं सावध आहेत. रजितसिंग सीख याची फौज मुलतानचे मोईमेस रवाना जाली.

¶*This document mentions among other matters that the English were making preparations against the Jats of Bharatpur.*

No. 283] [*6-9-1813*

पौ छ ३ सवाल आश्विन
सन आर्बा मुा पुणे.

श्री

माहाराजाचे शेवेसी आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गायेकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगळे विज्ञापना. तागाईत छ १० माहे रमजान मुकाम लस्कर नजीक ग्वालेर, येथें सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. राजश्री दौलतराव शिंदे आलीज्याबाहादुर रोज गुदस्त प्रात:कालीं उठून सौच्यविध मुखमार्ज्येन जालें. बाळाजी सख(राम) खाजगीवाले यास ताकीद केली. प्रज्यन्न पडिला. * * * व इद्र पूज्यनाचे ब्राह्मणसंतर्पण तुम्हाक(डे) * * * तें कर्णें. स्वारी बागांत भोज्यनास जाईल. दरगदार मानकरी वकील मंडळी यांस वनभोज्यनास जावयाची ताकीद केली. चांदण्या व कणाता पागांत पाठऊन पाख करावयास आज्ञा केली. ब्राम्हणभोज्यनास नदीतीरीं चांदण्या दिल्ह्या. दरगदार मानकरी वकील हे बागांत जागोजाग भोज्यनास गेले. च्यार घटिका दिवस येतां श्नाण करूण देवताच्येंन जालें. पुराणश्रवण करूण पोशाख घेतला. मानकरी (मानकरी) यांस चोपदार बोलाऊं पाठविले. लक्ष्मणराव मुनशी याणें रंजीतसिंग शीक याजकडील येकवार वाचिली. तिचा मजकूर श्यामसिंग कुपेदान याणें मोहोकमसिंग दिवाण याचे बराबर कामकाज चांगलें केलें. सबब त्याजला वस्त्रें तीण दागिणे जडावाचे, चांदीचे हौद्याचा हात्ती, सोण्याचे सरंजामाचा घोडा, दोण गांव जागीर चाळीस हाजार रुपये दिल्हे; पांच साहा सरदार यांस वस्त्रें देऊण, गौरव बहुत केला. येक सरदार मृते पावला, त्याचें दहण करावयास बेल व चंदन दिल्हा. त्याजकडील कारभारी यांसी बोलाऊन समाधान केलें. त्यास सांगितलें तुमचे सरदाराचे चिरंजिवास वस्त्रें देऊण पूर्ववतप्रमाणें सरदारी चालऊं. महमुदशाहा कंपूवाला याचे वकी-

लास पंचवीस हजार रुपये रोकड व सवा लक्षाची हुंडी दिल्ही. त्याजला मुलतानची मोहीम सांगितली, म्हणोन वर्तमान आहे. कर्णेल ज्यान बत्तिस शाहाडौऱ्याकडे आला आहे. प्रहर दिवस येतां सौभाग्येवती रखमाबाई व बायेजाबाई शिंदे व चिमणाबाई दाभाडे व गंगारूप सालूबाई शिंदे यांची स्वारी बागांत गेली, तेव्हां किल्याची येक तोफ जाली. दाहा घटिकां दिवसां मानकरी-सहित स्वारी बागांत गेली, तेव्हां दोन तोफा जाल्या. ब्राह्मण मंडळीकडे इंद्रपूज्यन होऊन हावण जालें. पांचशे आसामी भोज्यनास आली. च्यार आणेप्रमाणें दक्षणा दिल्ही. दोन प्रहराचे अमलांत माणकरी व राजश्री त्रिंबक-राव दाभाडे यांजसहित भोज्यन जालें. च्यार घटिकां बागांतील झाडें पाहिलीं. कलवंतनीचा नाच जाला. साहा घटिका रात्र होतां बागांतूण स्वारी निघाली तेव्हां तोफा जाल्या. सर्वांचे रामराम घेऊण वाड्यांत दाखल जाले. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Gaikwad in communicating the daily happenings at the court of Daulatrao states that Ranjitsing rewarded his military officers for their glorious achievements.*

No. 284] [*21-1-1815*

श्री

माहाराजाचे सेवेसी आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गायेकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगले विज्ञापना. तागाईत छ ९ माहे सफर मुकाम लस्कर नजीक ग्वालेर येथें शेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलिज्याबहादुर रोज गुदस्त प्राथ:कालीं मुखमाज्र्येन जालें. वेदमूर्ति राजश्री दादाभट शेंडे याणी येऊन सांगितलें. आज गंगारूप येमुणाबाईचें उनाब्धिक श्राध आहे. त्याजवरून यादवराव बिनीवाले यास सांगितलें, च्यार पितर भोज्यनास सांगणें. मुनसीणें येकबार आणिलें. सीकाणें आमरसरचा वाणी सुज्यालमुलुक बातशहाची बेगम पलून त्याचे दुकाणी गेली. त्याजवरून तो कैद केला. त्याचें दुकाण जप्तीस आहे. ते वाणीयाचे पुत्राबराबर सिबंदी देऊन दुकाणचा माल लाहुरास आणावयास पाठविलें. शहांकडील फतेखां वजीर कास्मरास येन्हार. सबब ठिकाणें आटकेस फौज पाठऊन खबरदारी करनार होलकराकडील कुमेदान पलटनीची भरती करावयास उज्यनीस गेला. कांहीं लोक ठेविले ते कर्णेल ज्यान बतीस यास कललें. त्यानें मीरखास सांगितलें तुम्ही येथें कामावर असतां कुमेदान कोन्हाचे परवानगीणें पलटन भरितो. कुमेदानास चवकस केली. त्यानें होलकराकडील पत्र दाखविलें. कुमेदानास तेथून आपले महालीं भरती

उनाब्धिक श्राद्ध = वर्षश्राद्धाच्या आदल्या दिवशीं करावयाचें श्राद्ध.

करावयास काढून दिल्हें. येशवंतराव सिवाजी जावदेकडे आहे. सरंजाम सत्रा तोफा तीन पेव्या पांच हाजार फौज बराबर आहे. त्याजकडे आबाजी सखाराम व मंदोसरवाले आठ कोसावर आहेत. पेढारी याजकडे सरंजाम पाठवावयास येथून पत्र कर्णेलास पाठविलें. तुमचीं दोन पलटनें व जेकबसाहेब याचीं दोन व बक्षी याजला चितोडाकडे पाठवणें. रामदीन निसबत होलकर बंड करीत आहे, त्यास काढून देणें. च्यार घटिका दिवस येतां श्नाण करून श्राधविध जाला. च्यार ब्राह्मणास च्यार रुपयेप्रमाणें येकास शेलापागोटें व येकास धोत्र जोडा येक गोप्रदान दिल्हें. पितर बोलाऊन पावणे दोन प्रहरां भोज्यन जालें. दीड प्रहर दिवस राहातां बाराद्वारी कचेरी जाली. राजश्री बालोजी बावा कुंजीर आले. त्यांसी च्यार घटिका खलबत जालें. त्रयोदसीस कूच करून जावयास सांगितलें. सिलेदार लोकांनी खर्चाचें बोलणें केलें. त्यांस सांगितलें येक दो रोजानें बापू चिटनीस वाड्यांत आलियावर कारभार चालू होईल. गोपालराव रघुनाथ याचा त्रयोदशा जाला. त्याचे येथें कारभारी विच्यारून दोन घटिका दिवस राहातां जाऊन आपले ठिकाणीं गेले. नुरा कुंनडा याजकडे नरवर ठरली. सालगुदस्त ऐसी हाजार रुपये होते. सालमजकुरीं येकलक्ष रुपये ठरून साठ हजाराची निशा सावकारी हली देऊन, चिमणाजी देशमुख याजकडून किला काढिला. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Naik in reporting the daily happenings at the court of Daulatrao Sindia states that the Sikhs have despatched an army to Attock to resist the march of Fatekhan, the Wazir of the Durani Shah, towards Kashmir.*

No. 285] *[9-2-1814*

पौ छ ९ रोवल फालगुन
सन आर्बा

श्री

माहाराजाचे शेवेसी आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गायेकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगळें विज्ञापना. तागाईत छ १७ माहे सफर मुकाम लस्कर नजीक ग्वाल्हेर येथें शेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. राजश्री दौलतराव शिंदे आलीज्याबाहादुर रोजगुदस्त प्रातःकाळीं आठदाहा मानकरी व शागिर्दपेशा याचा रामराम जाहला. च्यार घटिका दिवसा श्नाण करून पोषाख घेतला. बारा घटिका दिवसा भोज्येन जाहलें. हौदाजवल जाऊन मगराचा तमाशा पाहिला. बाहेर काढून मेशाचें मांस त्याजला भक्षावयास दिल्हें. आणाजी

दौंगे हुजरे यांस सांगितलें, मगर खाले पाण्यांत नेऊण सोडून देणें. त्याणें खाटेवर घालून नदीचे डोहांत कामाठी याजपाशीं देऊन सोडविला. हिमतबाहादर जैकमसाहेब ताल्या नांदखले आठदाहा माणकरी आले, त्यांशीं च्यार घटिका भाशन जालें. सदाशिव सखदेव खासगीवाले याणें राजश्री सैनापति येशवंतराव दाभाडे यांचे खर्चाविशई विनंती केली. कारभारी मानकरी वकील मंडळी येऊन कचेरी जाहली. कर्णेल ज्यान बात्तिस साहा कोंसाव्र मुकामास आले म्हणोन त्याजकडील वकील दुर्गाप्रसाद याणें निवेदन केलें. गोपाळराव रघुनाथ, मोरो हरि, गोकुळ पारख यासी च्यार घटिका खलबत पट करावयाविशई जालें. पारख मोरो हरि यांचे बोलणें चैत्र मासीं पट करावा तोपावेतों ऐवज जमा होईल. त्यांचें बोलणें हुताशनीपावेतों यैवज लोकास द्यावा. ऐवजाची तोड सुभा ग्वालेर च्यालीस लक्ष इंग्रेजाकडील हिंदुस्थान यैवजीं दाहा लक्ष माहालीं मामलतदार पंनास लक्ष येकूण येक कोटीचा पट कर्णे, ऐशी निकडीची ताकीद आहे. दिलीकडील येकबारीचा मजकूर रंजितसिंग शीक अमरसराहून लाहुरास आला. महमुदशाहा पातशाहा याजकडील वकील याणें बोलणें केलें, आपण आमचा घरोबा पहिलें चालत आला ते प्रमाणें पुढें चालवावा. आपूण आपसांत येकमेकाची दौलत हरण करावयास लागले तर दुसरा सहजांतच दौलतीस विक्षेप करील, यास्तव दुराग्रह सोडून येकेविचारें चालावें. तुमचा आग्रह आटक न द्यावी, त्यास हें पहिलें आपले करारांत नाहीं. आस्तु. आटकचे मुबदला तुम्हास मुलतानचा किला देवितों; आपण आटक शाहास द्यावी आणि तेथील येथील संस्थाण समेटाण चालवावींत. शीकाणी उत्तर केलें प्रथम तुमचा आमचा करार काश्मीर निमेनिम घ्यावी; त्यावरून तें संस्थान तुम्ही आम्ही मिळोण सर केलें; अखेरीस तुम्ही बोलिल्याप्रमाणें न कर्त्ता दाबादाब केली. तुमचे वचनाची कायेमता न राहिली, तेव्हां आम्ही आटक दाबली. हालीं तुम्हास शाहाणी व फत्तेखां वजीर याणें इकडे पाठविलें; उत्तम आहे; परंतु तुम्हाशीं बोलणें केल्यास त्यांची पकाईत असली तर बोलावयासी येईल, येविशई तुम्ही (तुम्ही) त्यांजला लिहून खचित ठरून उत्तर आणवावें. या उपरी बोलण्यांत अंतर पडलें तर तुम्हांस या पे(क्षां सं)स्थाण जतन कर्णे कठिण पडेल, ऐसें समजून उत्तर आणवणें. त्याजवरून वकिलाचीं पत्रें पिसोरास शाहाकडे व वजीराकडे गेलीं आहेत म्हणोन वर्तमान आलें. सायेंकाळीं रामराम घेऊन दरबार बरखास्त जालें. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Naik in reporting the daily happenings at the court of Daulatrao Sindia states that negotiations have been opened between Ranjitsing and the Vakil of Muhammad Shah.*

7268

No. 286] [14-2-1814

पौ छ १० रोवल सन
आर्बा अशर मया तैन.

श्री

माहाराजाचे सेवेसीं आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गायेकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगले विज्ञापना. तागायत छ २२ माहे सफर मुकाम लस्कर नजीक ग्वालेर येथें शेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलिज्याबहादुर रोज गुदस्त प्राथःकालीं आपा चिटनीस याजला दारकोजीराव पाटनकर याचे समाचारास पाठविलें. तेथें जाऊन मशारनिले आपले रूबरू वैद्याकडून औषध देऊन च्यार साहा घटिका बसले. च्यार घटिका दिवसा श्नाण करून पोशाख घेतला. बारा घटिका दिवसा भोज्यन जाले. गोकुल पारख, मणिराम, गोपालराव रघुनाथ, मोरो हरि, कर्णेल ज्यान बतीस यांजला बोलाविलें; मांडवाचे कचेरीस दरबार जाले. कर्णेल याणे गडे कोटाचे दरी वगैरे जागा सोडविल्या ते सविस्तर निवेदन केलें. किल्याचे नक्ष करून आणिले ते दाखविले. कर्णेल उठून गेलियाउपरी खर्चाच्या पटाचें बोलणें यैवजाविषई जालें. गुरुजीणें लोकांचे हिशेब आकारून आदा पावतीच्या यादी केल्या. त्या आठदाहा आसामीच्या पाहिल्या. आबाजी वाटगे, गोविंदराव खंडागले विठोबा करंडे पंधरा वीस मानकरी यांचे रामराम जाले. कृष्णाजी मोरे याची घोडी सुभ्याबराबर लढाईत पांच सात कामास आली. त्याजला बोलाऊन खर्चाविषई व घोड्यांविषई खातरी केली. तीण घटिका दिवस राहतां कचेरी बरखास्त जाली. दोन घटिका दिवस राहतां देवघराचा मार्ग झाडून बाट लाविलें. केदारजी सिंदे याचे मातुश्रीणे देवास नवस केला होता, आलिज्याबाहादुर यांजला आराम घ्यावा, मी दंडवत करीत देवली दर्शनास येईन, तिजला लुगडें चोली देऊन दोन घटिका रात्रीं नवस पूर्ण केला. मागाहून आपण दर्शन करून आले. होलकराचे लस्करांत बालाराम शेट आगरवाले यांचे येथें लोक धरणें घेऊन बसले. तेथें गंगारूप तुलसाबाई जाऊन थोडे बहुतानें खर्चाचा करार करून धरणे उठविलें. राजश्री मल्हारराव होलकर यांची स्वारी मीरखां याचे येथें गेली. त्यांचे पुत्रास वस्त्रें सिरपेंच कंठी दिल्ही. मीरखां याणें मल्हारराव यांजला वस्त्रें सिरपेंच कंठी हातातील मोत्याचे गजरे हाती घोडा दिल्हा. करीमखां पेंढारी याजविशीं राजश्री राजे जालमसिंग याजला पत्रें पाठविलीं. तुमच्या विच्यारास आलें तर करीमखांची मुक्तता करावी याचे लिहावें. त्याणी उत्तर पाठविलें, सोडून दिल्यास करीमखां लबाडी करावयास चुकनार नाहीं, त्यास सोडूं नये म्हणोनं श्रीमंताची आज्ञा आहे व

आलिज्याबहादुर याचीं पत्रें येतात सोडावयाची मसलत आम्ही सांगनार नाहीं म्हणोन होल्कराकडील वकिलाचे येथे वर्तमान आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Naik in reporting the daily happenings at the court of Daulatrao states that the release of Karimkhan Pindari was under consideration.*

No. 287] [*18-2-1814*

पो छ १७ रोवल फाल्गुन
सन आर्बा

श्री

महाराजाचे शेवेसी अज्ञाधारक कृष्णाजी नाईक गाईकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगले विज्ञापना. तागायत छ २६ माहे सफर मुक्काम लष्कर नजीक ग्वालेर येथें शेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलिजा बहादररोज गुदस्त प्राथःकाली उठून आठदहा मानकरी सदाशिव सखदेव व सखो शामजी यांचा रामराम जाला. चार घटिका दिवसा स्मश्रू करावयास बसले. गवई याचे गायेन करावयास आरंभ जाला. अडीच प्रहर दिवसा तैलाभ्यंग करून स्नान जाले. गोपालराव रघुनाथ मोरो हरि गोकुल पारख येऊन रामराम जाला. चार घटिका भाशन जाले. शणीश्वराचे दर्शनास येथून सात आठ कोस आहे तेथें जावे ऐसे ठरूण मोरो हरि यासी आज्ञा केली. उदईक तुम्ही पुढें जाऊन पाणी पाहून घास लकडी सरंजाम सिध्ध कर्णे. स्वारी सायंकाली येईल. राजश्री सेनापति येशवंतराव दाभाडे याजला सांगून पाठविले, तुम्ही शणीश्वराचे दर्शनास चालावे. भालदार पाठऊन पागे पथके याजला ताकिदे केली. बालाराम सेट गोकुल पारख लष्करांत राहाणार. गोपालराव शणवारी प्राथःकाली मागाहून येन्हार. फरास यास बोलाऊण डेरे राहुट्या बिचोबे बाड बाहेर काढून सिद्ध करावयास आज्ञा केली. तीन घटिका दिवस राहतां उठून वाड्यात गेले. होलकराचे लष्करचे कूच होऊन भानपुऱ्याकडे सहा कोस आले. बापूराव सिंदे व जैयपूरवाल्याकडील फौज यांची लढाई छ ७ मिनहूस होणार म्हणोन वर्तमान आहे. शहाचे मुलकांत दुसरा बातशाहा येऊन खंदारांत लढाई जाली. शहाकडील फौज सिकस्त पावली. हे वर्तमान आटकेहून लाहुरास रंजितसिंग सीक याजपासी आले तें जासुदास सिकाणे विनाम देऊन बोलिले, शहा आम्हास बेबदल जाले, त्यास त्याचे पारपत्ये श्रीगुरूनें परभारेच केले. हे दिल्लीचे एकबारीत वर्तमान आले. छ मजकुरी प्राथःकाली मोरो हरि

शणिश्वरास गेले. स्वारी तयार करावयासी आज्ञा करून स्नान जाले. वाड्यापुढें बिनिवाले उभे राहिले, त्यास सांगितले पुढें चालणे. बिनी पुढें निघाल्याउपरी बाजार व लष्करचे लोक चालिले. प्रहर दिवस येतां फराल जालियावर सेनापतीची व यांची स्वारी निघाली. त्यांचे मागे सौभाग्यवती बायेजाबाई आदीकरून बायांची स्वारी गेली. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Naik states that Ranjitsing rejoiced to know that the Shah of the Duranis was defeated at Kandahar ; the movements of the forces of Holkar are also alluded to.*

No. 288] *[24-2-1814*

पौ छ २० रोवल फालगुन
सन आर्बा अशर मुा नासिक

श्री

*माहाराजाचे सेवेसी. आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गायेकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगले विज्ञापना. तागायत छ ३ माहे रबिलावल मुकाम लस्कर नजीक ग्वालेर येथें शेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलिज्या-बहादुर रोज गुदस्त प्राथःकालीं सदाशिव सखदेव आपा चिटणीस सखो शामजी खासगीवाले याचा रामराम जाला. आपा चिटनीस याणें सांगितले राजश्री हिंदुराव घाटगे याणी चोपड्यास ठाणें बसवायाकरितां सरंजाम पाठविला आहे. तेथें निंबालकर ठाणें देत नाहींत. सबब त्यांची यांची लढाई होते. निंबालकराचीं कांहीं माणशें ठार जालीं. याजकडीलहि जखमी जालीं म्हणोन चोपड्याहून पत्र आलें. त्यास जगदेवराव निंबालकर यांजला बोलाऊन येथें सोडचिटी देऊन पाठवावी म्हणजे ठाणें हस्तगत होऊन, तेथील जमीदार परागंदा आहेत ते येऊन, माहालची आबादी होईल. च्यार घटिका दिवसा श्नाण जालें. कारभारी यासी बोलावणी पाठविलीं. बारा घटिका दिवस येतां भोज्यन जालें. सवा दोन प्रहरा कचेरी जाली. कर्णेल ज्यान बतीस यासी दोन घटिका खलबत जालें. शाहाडौरा व पिंपलोद येथील सोडचिटी कर्णेलपासून घेतली. पेंढारी यास घावयाचा विचार आहे. गोपालराव रघुनाथ यासी खलबत निकालस होऊन, ते उठून नवा बंगला होता तेथें जाऊन, अंबाजी घाटगे यासी दोन घटिका खलबत होऊन, तेथेंच बसून राहिले. मोरो हरि, गोकुल पारख, बालाराम शेट यासी खलबत जालें. मल्हार भिमाजी बक्षी याणें लोकाचे खर्चाविशई विनंती केली. गणपत-राव विंचुरवाले, नारो नरसि मंदोसरवाले, बाळकृष्णराव कोटवाले, गणेश उमाजी

रामचंद्र बाजी निसबत भुसकुटे हे बोलाऊन च्यार वटिका भाशन जालें. सायेंकालीं कचेरी बरखास जाली. बापूराव सिंदे याचा मामला जैपूरवाल्याचा पनास हजार रुपये करार जाला. सिंदे याणी मुलकांत खंडनी घेतली. तो यैवज आकारेल तो मजरा घ्यावा. सिंदे याचें बोलणें पडलें आम्हीं जोतपुराकडे जातों, त्यांजकडे तुम्हीं जाऊं नये. दिलीस सिंग, याची बेगम आली, ते बातशाचे माहालांत जाऊन नजर (नजराणे) दिल्हे. इंग्रेजाचीं पलटनें लाहुरचे तोंडावर लुधान्यास आहेत. त्यांजला इंग्रजाणी ताकीद केली, रात्रंदिवस तुम्हीं सावध आसावें, म्हाणोन येकबारींत वर्तमान आले. शेवेशीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Gaikwad writes that the English have established the camp of their army at Ludhiana and that the army is instructed to remain watchful day and night.*

No. 289] [*25-2-1814*

पौं छ २० रोवल

फालगुन सन आर्बा अशर

मुा नासिक

श्री

माहाराजाचे शेवेसी आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गायेकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगले विज्ञापना. तागाईत छ ४ माहे रबिलावल मुकाम लस्कर नजीक ग्वालेर येथें शेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. राजश्री दौलतराव शिंदे आलिज्याबाहादुर रोजगुदस्त प्रात:काळीं * * * * त मानकरी व शागिर्दपेशा यांचा रामराम जाला. च्यार घटिका दिवसा श्नाण करून बारा घटिकांत भोज्यन जालें. पुण्याकडील वर्तमान नगरवाले व आणिख तनि आसामी सरकारांत धरूण आटकेंत ठेविले आहेत. दीड प्रहर दिवस राहातां कारभारी मानकरी येऊन कचेरी जाली. गोपालराव रघुनाथ मोरो हरि गोकुल पारख यांसी च्यार घटिका खलबत जालें. आत्मारामपंत वकील याणें विनंती केली, आपण इस्तेरची साहेब यांजला बोलाविले होते, त्यांचा आज यावयाचा बेत आहे. त्याजवरून गुल महमद चोपदार बोलाऊं पाठविला. हिरेखान याचें पत्र उज्यनीहून आलें. त्यांतील मजकूर पेंढारी हजार पंधराशे स्वार याणी इंदूर सावेर नवलाई देपालपूर उज्यन येथील गांव लुटून मावारे गेले. मालवे प्रांतीं दंगा बहुत आहे. मार्ग चालू देत नाहीत. याप्रमाणें भुसकुटे यांचे पत्र नवलाईहून आलें. कर्णेल ज्यान बतीस यासी खलबत जालें. त्याजला सांगितलें

+ Stratchy.

माळवे प्रांतीं जाऊन पेंढारी याचा बंदोबस्त करणें. कर्णेल याण विनंती केली पेंढारीजवळ घोडेस्वार आहेत. मजपाशीं तर पायाचे लोक. पेंढारी तीस कोस जाऊन लहबॉर[१] घेऊन जान्हार. पायचे लोकांस तिसा कोसांत तीण दिवस जावयासी पाहिजेत. खरे जुरतीची लढाई घेतल्यास त्यांचें पारपतें करावयास येईल. त्यांत लोकांचे हिशेब चढले. ते खावंदाचे पायाजवळ गेल्या उपरी देण्याचा करार आहे. हिशेब शेवेसी हजीर केला आहे. त्याचे ऐवजाची आज्ञा होईल तेप्रमाणें फडच्या करून आज्ञा होईल तिकडे चाकरी करितील. इतक्यांत वकिलाची स्वारीचें वर्तमान आलें. तेव्हां वकील मानकरी दरगदार यांजला थोरले कचेरींत लाऊन दिल्हें. कचेरीचे दरवाज्यापावेतों गोपाळराव येऊन घेऊण गेले. अर्ध ताजीम होऊन, डावे बाजूंकडे जागा घेतली. येक घटिका खलबत जालें. गोपालराव याणी विचारलें तुम्हाकडील ऐवज अद्यापि येत नाहीं, येथें फौजेचे खर्चास दिल्हा पाहिजे तर ऐवज द्यावा. त्याणें उत्तर केलें आमचीं पत्रें आलीं. ऐवज मागाहूण रवाणा करितों. तो आठ दाहा रोजांत दाखल होईल. विंचूरकर वगैरें (प्रकर्णी) कांहीं इंग्रजाचें बोलणें जालें. येक घटिका रा(त्रीं विडे) देऊन मार्गस्त केलें. शेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Gaikwad gives an account of how Malwa and the territory in the vicinity was being pillaged by the Pindaris. He mentions the visit which the British Resident Strachey paid to the Sindia.*

No. 290] [*28-2-1814*

पौ छ २७ रोवल

सन आर्बा

श्री

माहाराजाचे शेवेसी आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गायेकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगले विज्ञापना. तागायत छ ७ माहे रबिलावल मुकाम लस्कर नजिक ग्वालेर येथें वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलिजाबहादुर रोज गुदस्त प्राथःकालीं उठून श्नाण जाले. प्रहर दिवसा भोज्यन करून स्वारी तयार करऊन दाहा घटिका दिवसा स्वारी बागांत गेली. दीड प्रहर दिवसा सौभाग्यवती बायेजाबाई यांची स्वारी गेली. शागीर्द पेशा मानकरी सर्व लोक बागाचे बाहेर लाऊन, उभयेतां बंगल्यांत बसले. दाहा घटिका दिवस राहातां घोडे बोलाऊन फेरिले. दोन घटिका दिवस राहातां बान आणोन काग, रावे, वगैरे पाखरावर सोडिले. सायेकालीं स्वारी वाड्यांत आली. सदाशिवपंत निसबत सेनापति व मल्हार भिमाजी बक्षी याणी खर्चाविशाई विनंती केली. हुताशणी-

---

१ लहबार = Travelling equipment or train; baggage and followers.

परियेंत थोडे थोडें खर्चास देविलों म्हणोन भाशन करून आंत दाखल जाले. खंदाराकडील वर्तमान दुसरे बातशहाची फौज आली आहे. तिजवर शहाकडील फौजेनें छापा घातिला. कायेमखां, नफरखां व बरखी दोन सरदार जखमी जाले. दाहावीस माणूस मारिलें. पलून च्यार कोस माघारी गेले. शाहाकडील फौजेची फते जाली. रनजितसिंग सीक याणें लाहुरास पाथरवट पांचसातशें आसामी यासी खर्चास देऊन, आटकेस पाठविलें. किल्यासभोवता खंदक पनास हात रुंदीचा पाणी लागे तोपावेतों खणावयाची आज्ञा केली म्हणोम दिलीचे येकबारात आलें. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer supplies news received from Kandahar. Ranajitsing was digging a deep moat round the fort of Attock to defend the place against the Afghans.*

No. 291] [*12-3-1814*

पौा छ ९ राखर चैत्र
सन आर्बा अशर
मुा नासिक

श्री

माहाराजाचे शेवेसी आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गायेकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगलें विज्ञापना. तागाईत छ १९ माहे रबिलावल मुकाम लस्कर नजीक ग्वालेर येथें शेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. राजश्री दौलतराव शिंदे आलीज्याबाहादुर रोजगुदस्त प्रातःकालीं मुखमार्ज्येन जालें. भालदार याजला आज्ञा केली. कारभारी दरगदार मानकरी वकील मंडळी लाहाणथोर रंग घ्यावयास बलावणें. सखो शामजी यांस राजश्री सैनापति येशवंतराव दाभाडे यांजकडे पाठविलें, आपण रंगास आले पाहिजे. भोज्येनास वाड्यांत चालिले पाहिजे. दोन घटिका दिवस येतां श्नाण करून पोशाख घेतला. त्रिंबकराव दाभाडे व सौभाग्यवती चिमणाबाई यांची स्वारी आली. पांच घटिकां दिवसां भोज्येन जालें. भले लोक मानकरी येऊन कचेरींत बसले. गोपालराव रघुनाथ मोरो हरि गोकुल पारख आले. पारख यांसीं दोन घटिकां खलबत जालें. दरगदार वकील मंडळी येऊन कचेरी जाली. कलवंतनीचा नाच होऊं लागला. दीडप्रहर दिवसां कचेरीत येऊन सर्वांचा रामराम जाला. जैकम साहेब याणें विनंती केली पलटणचे लोक रंगास यावयाची आज्ञा जाली पाहिजे. त्याजला बोलावयास सांगितलें. येक येक कंपणी पुढें बोलाऊन त्याजवर रंग दोही हातांकडे

दोन नसका त्यास तोब्या लाऊन रंग घालून वर गुलाल टाकूण विडे देऊन डेन्या-बाहेर लाविले. त्याचें मागें पथकें याजकडील पथकाचे लोक बोलाऊन रंग गुलाल विडे दिल्हे. पागाकडील लोक त्यास याप्रमाणें रंग घालून विडे दिल्हे. नंतर मानकरी यांजवर घातला. सर्वास विडे देऊन दीड प्रहर दिवस राहातां सर्वांचा रामराम घेऊन आपण व दाभाडे वाड्यांत गेले; तिकडे प्रहर दहा घटिका रंग खेलिले. आंगावरील पोशाख भिजले घटका दोन दिवस राहातां स्नाणें जालीं. दाभाडे यांजला पोशाख व चिमणाबाई यांजला लुगडें चोळी दिल्हें. तीन घटिकां रात्रीं भोज्येन करून दाभाडे व बाई यांची स्वारी आपले वाड्यांत गेली. तुकारामबोवाचे उछाहाचे ब्राम्हणभोज्यनास मुक्तद्वार सैनापतीचे येथें केलें. सात आठशें ब्राम्हण भोज्यनास आले. तिसरें प्रहरां व रात्रौ कीर्तन जालें. शेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Gaikwad gives an account of how the "Rang-Panchami" festival was celebrated at the court of Sindia by throwing coloured water upon the assemblage.*

No. 292] [*28-3-1814*

श्री

वडिलाचे शेवेसी. आपत्येसमान कृष्णाजी नाईक गायेकवाड दंडवत विज्ञापना. तागाईत छ ५ माहे रबिलाखर मुकाम लस्कर नजीक ग्वालेर येथें बाळकांचें वर्तमान येथास्थित असें विशेष. राजश्री दौलतराव शिंदे आलिज्या बाहादुर रोजगुदस्त प्रातःकाळीं स्नान करून पोशाख घेतला. गंगारूप बालाबाई देशमुख यांचे येथें पावचालीनें समाचारास गेले. च्यार घटिका बैसोन औषधें दिल्हीं. गोपालराव रघुनाथ यांजला बोलाऊं पाठविलें. त्याजला सामाधान नाहीं म्हणोन वर्तमान आलें. दाहा घटिकां दिवसां वाड्यांत येऊन भोज्यन जालें. स्वारी तयार करून बागांत गेले. दोनतीन दिवस हाजिरी घेऊन घोडीं छ्याट दीडशे काढिलें. त्यांस आणोन उत्तम ध्यानास आले ते पागांत लाविलें; वरकड बागांत ठेऊन पाहन्यासभोवती ठेविलें. दीड प्रहर दिवस राहातां गोकुळ पारख मणिराम मल्हार भिमाजी बक्षी आले. पारखास दोन घटिका बोलणें होतां मोरो हरि कर्णेल ज्यान बत्तीस गणपतराव राजाराम विंचुरकर गणेश उमाजी निसबत भुसकुटे आले. पारख मोरो हरि यासी खलबत जालें. भुसकुटे बऱ्हाणपुरीं मृते पावल्या मागें दत्तविधान घ्यावयासी च्यार मुलें आणिलीं, त्यांत येकास देवी निघोण मृत पावलें, म्हणोन भुसकुटे यांचे वकिलाणें सांगितलें. बलवंतराव देवरीवाले यांची नकल जाली, सबब त्यांच्या कन्येचें मूल दत्त घ्यावें

7275

येविशी पुण्यास सरकारांत नजराणा देऊन वस्त्रें सकारचीं येका दो रोजानें पुण्याहून वकील रवाणा करणार म्हणोन त्यांजकडील वकिलाचे येथें वर्तमान आहे. येक घटिका रात्रीं स्वारी वाड्यांत येऊन दाखल जाली. राजश्री बाळोजीबावा कुंजर यांचा वाखा हरघडीं होत आहे. आठसात दिवस पितेविकार होऊन डावें आंग आगदी जड पडिलें. अन्न चालत नाहीं. शरीर अगदीं शक्तिहीण जालें; त्याजवर वृद्धापकालाची ज्येरा प्राप्त. श्रीसत्तेकरून दिवस लोटतो हा खरा. देहे आवसान चालतें. इतक्यांत स्वामीमाहाराजाचे चेरणीं मस्तक ठेवावयाची इच्छा करून दिवसांतून शत वेळां उदूकार करीत आहेत. शेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Krishnaji Gaikwad writes a daily account of Daulatrao's life and also reports the illness of Baloji Kunjir.*

No. 293] *[4-12-1814*

श्री

वडिलांचें शेवेशी अपत्यसमान कृष्णाजी नाईक गाईकवाड दंडवत विज्ञापना. तागायत छ २१ माहे जिल्हेज मुकाम लस्कर नजीक ग्वालेर येथें बालकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलीज्याबहादूर रोज गुदस्त प्राथःकाली मुख माज्येंन जाले. खासा स्वारी व बाईकडील स्वारीचे लोकास स्वारीची ताकीद जाली. श्नान करून सहा घटिका दिवस येता भोज्यन जाले. भास्कर बल्लाल व उदाजी खटके यानीं येऊन पागाकडील लोकांचे खर्चाविसी विनंति केली. त्यांजला सांगितले पटाचे बराबर तुम्हाकडे खर्चास पावेल. राजश्री येशवंतराव दाभाडे सेनापति यांचे शरीरास समाधान नाहीं. त्यांजकडील वर्तमान आणवावयास हुजन्या पाठविला. मुनसीनें दिलीची एकबार आणली. मटकर्णसाहेब+ याणे डाक बसऊन जर्नेलाकडे जावयास सरंजाम पुढें रवाणा केला. आपन डाकेने जान्हार. पातशाहाचा निरोप जाला. जंबूचे जमीदारानीं उठावणी केली. याजकडे रंजितसिंग सीक याणे फौज पाठविली. आटकवाल्याचे पत्र सिकास आले. शहाकडील वजीर पिसोराहून व काश्मीरवाला सुभा येन्हार; तर येथील कुमकेस फौज आली पाहिजे. सिकाणे उत्तर पाठविले हजरी घेऊन फौजेची रवानगी करितो. तुम्ही वरचेवर वर्तमान लिहीत जावे म्हणोन वर्तमान आले. सौभाग्यवती बायेजाबाई व चिमणाबाई मुलास घेऊन देवी पुजावयास ग्वाल्हेरी पलीकडे एक कोस स्वारी गेली. सरदार याची स्वारी सिकारीस पन्हाराकडे तीन कोस गेली. रामचंद्र भास्कर याजला दोन

\+ Macnaughten.

प्रहरापासून ज्वराचा उपद्रव जाला. मोरो हरि मानकरी वकील मंडळी गोकुल पारखाचे येथें जाऊन कचेरी जाली. सहा घटिका दिवस राहतां बायाची स्वारी आली. च्यार घटिका रात्री एक हरण सिकारींत गोलीनें मारून स्वारी आली. वैधृतीमुले दरबार जाले नाहीं. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Naik communicates that Ranjitsing was mobilizing his forces and intended to post them at Attock to resist the onward march of Fatekhan, the Vazir of the Shah of the Duranis.*

No. 294] [*13-12-1814*

श्री

वडिलांचे शेवेशी आपत्यसमान कृष्णाजी नाईक गायेकवाड दंडवत विज्ञापना. तागायत छ ३० माहे जिल्हेज मुक्काम लष्कर नजीक ग्वाल्हेर येथें बालकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलीज्याबहादूर रोज गुदस्त प्राथःकाली मुखमार्ज्यन जाले. बालोजी कुंजर कूच करून लागले त्याजला सांगून पाठविले आज कूच न करावे, दो चव रोजांत तुम्हास मार्गस्त करितो. त्याजवरून त्यानीं मुक्काम केला. ज्यान बप्तिसाकडील एकबार मुनसिणे आणिली. येशवंतराव सिवाजी हांड्याकडे गेला. करीमखां पेंढारी याचे लोक चैनपूरवाड्या-नजीक आहेत. छितू पेंढारी सत्वासेस आले. इंग्रेजाची व गोरख्याची लढाई आणीख जाली म्हणोन बोलवा आहे. रामपुरानजीक कोणी अख्तर लुधानेवाला आहे, त्याचे पलटण पहाडांत चढून गेले ते गढीतील लोकांस समजताच (ल)ढाई करून आले. वरून तोफा खालन पावचे लोक होऊन मधें पलटण मारले. एक कर्णेलाचे डोके कापून नेले. एक कर्णेल जखमी जाला. लोक भारी फार पडून सिकस्त पावले. त्याचे येथें वर्तमान लढाई जाली म्हणोन मोघम सांगतात. यासुद्धा तीन लढाया लढता सिकस्त इंग्रेजाकडील जाली. या लढाईत इंग्रेजाणी हती बाधला होता तो दारूणे भडकूण पलाला. सेनापतीचे गाठांतील राहुटीवर पाये देऊण गेला तो राहुटींत ब्राम्हन निद्रिस्त होता त्याजवर पाये पडून मृत्ये पावला. शहरांत बैरागी याणे द्रव्ये सांगितले होते तेथें अणा बानड्याचे पागेंतील बारगीर पाठविले. खाणीनें जागा खाली निघालीच सबब तो बैरागी पागाचे चवकीत आहे. शेवेसी शृत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Naik reports a battle between the Gurkhas and*

No. 295] [15-12-1814

श्री

वडिलाचे शेवेसी अपत्यसमान कृष्णाजी नाईक गायेकवाड दंडवत विज्ञापना. तागाईत छ २ माहे मोहरम मुकाम लष्कर नजीक ग्वालेर येथें बालकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलिज्याबाहादुर रोज गुदस्त प्रात:काळीं उठून मुखमार्ज्यन वाड्यांत जालें. राजश्री सेनापति येशवंतराव दाभाडे शहेरांतून स्वारी आली, ते जनानखान्याकडे गेले. तेथें रामराम जाला. मुलाचें वर्तमान विचारिलें, ते हैराण आहे. तोंडास बुडबुडा आणोन नेत्राचें बुबुल वर चढवितें. गोपाळराव रघुनाथ मुरलीधर वकील निसबत जगनाथराम आणीख वैद्ये बोलाऊन औषधउपचार करूं लागले. अडीच प्रहर दिवसा स्नानें होऊन भोज्यनें सर्वांचीं जालीं. गोपाळराव रघुनाथ प्रहर दिवस राहातां आपले येथें स्नानास गेले. मुलाचे समाचाराकरितां कारकून व जासूद दरगदाराकडील व शेटजीकडील व मानकरी याचे हरघडीं समाचार घेत राहिले. दिन अस्तमित सेनापतीकडील बाया शहरांतून आल्या. त्याणी व सौभाग्यवती बायेजाबाई याणीं मुलावरून ओवाळून धर्म केला. खासगीवाले ब्राम्हण पांच सात आसामी यांजला आलाहिदा पांचच्यारशें रुपये धर्म केला. दोन घटिका रात्रीं काहींक आराम होऊन दुग्धपान केलें. इंग्रजाचे व गोरखी याचे तिसरे लढाईत किंकरजनास आठ जखमा जाल्या. सात आठशें तेलंगा व गोरा मारिला. नवीं पलटणें आणीक ठेवित आहेत. चवदा ठिकाणीं लढाईचा इरादा लागला आहे. छ १४ जिल्हेजी शीक लाहुरास येऊन फौजेची तयारी करीत आहे. बालीसाहेब लखनुरवाला नवाबाचे मसलतीनें आहे म्हणोन कलकत्याहून त्याचे बदलीं दुसरा गोरा पाठवणार. दिलीचे आसपास चोरावे जाले. जागजागें वाटावाटा मारितात. याची चवकशी दिलींत गोरा आहे तो करितो. जे राणांत चोरावें वाट मारिली जाईल तेथील जमीदारास आणून शासन करावें, ऐसें दबाव घालीत आहे म्हणोन वर्तमान आलें.

¶*Krishnaji Gaikwad reports the news which reached the court of Gwalior about the fighting between the Gurkhas and the English. The Sikhs at Lahore are reported to be engaged in making preparations for war.*

No. 296] [21-12-1814

श्री

वडिलाचे शेवेशी अपत्यसमान कृष्णाजी नाईक गायेकवाड दंडवत विज्ञापना. तागाईत छ ८ माहे मोहरम मुक्काम लष्करनजीक ग्वालेर येथें बालकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलिजाबहादूर रोज गुदस्त

याजकडे मुनसी दिलीचा एकबार आणिले. जर्णेल साहेब यानें दरबार केले. दिल्लीहून बातशाहाकडून गेले. त्यांत कमलनयन यानें पांच मोहरा दोन घोडे एक हत्ती एकवीस-किस्त पोषाख व जवाहिर नजर केली. अजमगडवाले याणे आक्षा किस्ती दोन घोडे एक हत्ती. अरबज्यान याचा मूल बिनहत्यारा-सिवाये भेटीस येईना. आम्ही सिपाई आमचा बाना ठेऊन येणार नाहीं तेव्हा हत्यारासहित भेटून अक्षा मोहरे दोन घोडे एक हत्ती दिल्हा. बातशहाचा मुका देऊन दोन घटिका बैठक जाली. विडे अत्तर देऊन आपले ठिकाणी बिदा केले. गोरखीयाचे लढाईनें हावालदील आहेत. तिन्ही लढाया चांगल्या मारल्या म्हणोन वर्तमान आहे. दक्षणेत पलटणें होती ते रेवा पलीकडे आली. लढाईस परभारे जात आहेत. चार घटिका दिवस येता श्नान करून दहा घटिका दिवसी भोज्यन जाले. दहा बारा मानकरी वकील बक्षी येऊन प्रहर सहा घटिका भाशन जाले. गोकुल पारख याजला पोटांत दर्द जाले त्याने हैराण आहे. रामचंद्र भास्कर यांचे येथें बंधूचें श्राध्ध जाले. वरकड कारभारी आले नाहींत. दोन घटिका रात्री राजश्री त्रिंबकराव दाभाडे याजला बोलाऊन मीर असदअल्ली यांचे येथें ताज्याचे दर्शनास गेले. तीन घटिका पर्येंत मरसीये ऐकूण स्वारी वाड्यात आली. दाभाडे याजला फकिरीचे वस्त्रे व बाईकडे मोहरा फकरीच्या दिल्या. फराल करून आपले वाड्यांत गेले. वाड्यांतून हुजऱ्या इस्तरची साहेब याचे येथें डाक्तर साहेबास बोलाऊन गेला. त्याणी सांगितले कीं सौभाग्यवती रखमाबाई हैराण आहेत, सबब बोलाविले. त्याणी विचार केला आपल्याकडे बोलाऊ गुलमहंमद चोपदार येत आसतो, अथवा चिठी तरी असावी; त्याजवरून हुजऱ्या माघारी फिरऊन आत्मारामपंत वकील पाठविला. त्याणे वर्तमान सांगताच चौकशी केली तो खासगी बोल्या बाईकरितां हुजऱ्या पाठविला असे सिद्ध जाले. शेवेशीं श्रुत होय हे विनंति.

¶*Krishnaji Gaikwad reports the fighting between the Gurkhas and the English and the illness of Rakhmabai.*

No. 297] [*22-12-1814*

श्री

वडिलाचे शेवेसी अपत्य समान कृष्णाजी नाईक गायेकवाड दंडवत विज्ञापना. तागाईत छ ९ माहे मोहरम मुकाम लस्करनजिक ग्वालेर येथें बालकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलिज्याबहादूर रोज गुदस्त मुखमार्जेने करून मानकरी व मल्हार भिमाजी बक्षी यांचा रामराम जाला. बक्षीणें लोकाचे खर्चाविशंई विनंती केली. त्याज बराबर सखो शामजी यास देऊन मोघम पटा पैकीं माणिराम याजकडून खर्चास देविले ; जातेसमई दौलतराव

देशमुख याणें खर्चा करितां बक्षीस आडविलें. थब्याखालीं आंगावरील शालजोडी व आंगांतील रूदार आंगरखा काढून घेतला. बक्षी आंगवस्त्रानसी मणिराम याचे येथे गेले. मुनसीनें येकबार आणिले. हरसुकलाल कागदी दिलीवाला याचा मुकाम आमरसरास आहे. सुज्यालमलक बातशहा याची बेगम लाहुराहून पुरुशाचा वेस घेऊन गेली, ते आमरसरीं त्याचे भेदानें त्याचे दुकाणी राहिली. त्याणें पुढें काढून दिल्ही ते चबकस करितां वर्तमान रंजितसिंग सीक यास समजलें. त्याजवरून आमरसरचे दुकाणचा गुमास्ता व आणीख येक बायेको येक पठाण बेगमचे भेदांतील धरून किल्यावर चढविली. दुकाण जप्त केलें. +लोणी आस्तर याणें पाहाडास टाकी लाऊन वर्ग केला, तो गोरख्यानी करूं दिल्हा. ...ढ तोंडावर कांही लोक पाठऊन लढाईचा प्रसंग घालून पाठीवर येऊन पुढें पल काढिला. लोणी आस्तर व च्यार पलटणें चढून गेलीं, तेव्हां झाडींतून सभोंवते गोरखे जमले. तरवार चालऊन च्यारी पलटनें पैकीं दोन हाजार लोक मारिला. चौदा साहेब ठार केले. लोनी आस्तर व जखमी बाकीचे लोक पळून तोफा सोडून गेले. जर्णेल याणें दिलीचे वगैरे वकील भेटीस गेले होते, त्यास दिलीस खालीं वाटे लाविलें सांगितलें. मागाहून मटकन साहेब आलियावर तुम्हांस वस्त्रें देतील. आपण मुरादाबादेहून कूच करून कासी रुद्रपूर गोरख्याचें आहे तिकडे गेले. कासीपूर पाहाडाखालीं मैदानांत आहे. रुद्रपूर पाहाडांत आहे. प्रयागाकडे मिर्जापूरचे जिल्ह्यांत रेवामुकुंदपूरचे जमीदाराणी दंगा करून इंग्रंजाचीं ठाणीं उठऊन दिल्हीं. दाहा पांच ठाणीं खालीं जालीं. देसीं घोडनदीवरील पलटणें उमरावतीकडे आलीं. भुपालास आथवा लढाईकडे जाणार म्हणोन वर्तमान. भोज्येन उत्तर अडीच प्रहर दिवसा कचेरी जाली. इस्तेरची साहेब येन्हार त्याजकडे बोलाऊं गुलमंहमद चोपदार पाठविला. दोन घटिका दिवस राहातां बगींत बसून आले. वाड्यांत बगी येतां मेवाती याणी मणा करून उभी केली. मागाहून आंतून परवानगी पाठऊन आंत बगीसहित आले. अर्ध घटिका कचेरीस येऊन मुल गत जाले त्याचे शांतवन करून गेले. बालाजी येशवंत याचे चिरंजिवास पहिले नागपूर वकिलीचे कामास जावयाचीं वस्त्रें जालीं त्याजवर ते जाणें तहकूब जालें. हालीं पुन्हा त्यास साडेतीनसें रवानगीचीं आलीं. दिन आस्तमांत कचेरी बरखास जाली. दोन घटिका रात्रीं स्वारी सेनापतीचे येथें ताज्याचे दर्शनास गेली. दोन घटिका मरसीये एकून पांचवीचे आमलांत वाड्यांत आले. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Gaikwad in communicating the daily happenings at the court of the Sindia gives an account of the reverse which General Ochterlony suffered.*

\+ Ochterlony.

श्री

यादी सरकारांत विनंतीपत्रें आलीं त्यांतील सारांश. सुा सन आर्बा अशर मयातैन व अलफ.

कलमें.

१ कृष्णाजी गायेकवाड याजकडील छ १४ रमजानचें पत्र आलें. त्यांतील इस्तरेची साहेब याणें सिंदे यांसी बोलणें केलें कीं श्रीमंताची आज्ञा जाली आहे. खासगी सरकार व सरंजामी लोक विंचुरकर वगैरे यांचे माहाल तुम्हाकडे आहेत. त्याचा मागील ऐवज आकारेल तो व माहाल ज्याचे त्यास द्यावे. आपले कमाविसदार यास ताकीद करून सोडाचिठ्या देवाव्या; यांत सरकारचा व तुमचें आमचें रहश राहातें. नाहीं तर आम्हास सरकार कामगारी कर्णे प्राप्त आहे. शिंदे यांणीं उत्तर केलें कीं याचें बोलणें मागाहून तुम्हासी करूं. नंतर शिंदे याणीं राजश्री बाळोजी कुंजीर यांसी बोलणें केलें कीं श्रीमंतास तुम्ही आपलें नावें पत्र पाठवावें, आपलें बोलणें इंग्रजाचे वकिलासी न पडावें, सरकारची आज्ञा तुम्हास यावी. तुम्ही आम्हास सांगावें, त्याप्रमाणे तुमचे आमचे विचारें करावयास येईल. शत्रूचे हातें काम घ्यावें हें चांगलें नाहीं. कुंजीर याचें उत्तर. तुम्ही सांगतां तें नीटच आहे; परंतु सालगुदस्तां गडेकोट्याविशी सरकारांत पत्रें पाठविलीं कीं ठाणीं खालीं करून कुंजीर याचे जिमेस करून देतों, हे आम्हास सांगून पत्रें पाठविलीं, असें असतां तुम्ही गैरमार्गाची चाल करून सरकारांत आमचे पदरीं लबाडी आणिली. प्रसंगीं बोलणें बोलतां, अखेरीस आम्हास लबाड पाडून तुम्ही आपली करणी करीतच आहांत. हालीं तुम्ही बोलतां याची खातरी आमची होत नाहीं. याजकरितां सरकारांत पत्र लिहून लबाडी घेणार नाहीं. या प्रमाणें मध्यस्तासी स्पष्टोत्तर जालें.

१ रामचंद्र लक्ष्मण गोखले यांजकडील पत्र तालुके आडुर वगैरे प्रांत कर्नाटक येथील श्रावण वद्य १३ चें आलें. त्यांतील लोकांस माहे साबानचे रोजमऱ्याची वांटणी हातावर करून सूडबंद व पावत्या व जदीदबंदीची शिलक झाडा लिहून शेवेसी पाठविला आहे. सैद मासुम रामपूरवाले पठाण आसामी ४१ बेळगांवीहून तालुके मजकुरीं छ १४ साबानीं पोहचले. हजिरी घेऊन रवाना दिल्हा.

१ नरसिंगराव दत्तात्रय याजकडील पत्र किले लोहोगडाहून आश्विन शुद्ध २ (द्वितीये) चें आलें, त्यांतील मुंबईहून जासूद आसामी दोन रोकड ऐवज

घेऊन पुण्यास येतां बोरघांटांत अर्धे घांटीं चोरट्यांनीं ठार मारिलें. ते चोर धरून ऐवजसुद्धां पाठविले. मजला दर्शनास यावयाची आज्ञा जाहाल्यास दर्शन घेऊन जाईन.

¶This document gives a summary of letters written by Krishnaji Gaikwad in connection with the relations between Daulatrao Sindia and the Peshwa Bajirao.

No. 299] *[1-1-1815*

श्री

माहाराजाचे सेवेसी आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गायेकवाड निसबत त्रिंबकजी डेंगले विज्ञापना. तागाईत छ १९ माहे मोहरम मुकाम लस्करनजीक ग्वालेर येथें शेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलीज्या बाहादुर रोज गुदस्त प्राथःकालीं पागेचे घोडे आणोन चाबुकस्वाराकडून फेरिले. कर्णेल ज्यान बतीस याजला पत्र लिहिलें. हिंदुराव घाटगे याचा आमल जावदेस येशवंतराव सिवाजीकडील होऊं देत नाहींत. तुम्ही घाटगे याचा आमल बसऊन देणे. मुनसीनें येकबार आणिले. मीरखां कृष्णगडाचे जिल्ह्यांत आहे. त्याजकडे मेहताबखां सडा भेटावयास गेला. बापू सिंदे याचा कुवर खटल्यासुधां जैपुरीं जातांना मार्गांत जमीदाराणें धरून नेला. दाहावीस माणश कुवर याजकडील जखमी जाले. यशवंतराव याजकडील मजकूर छितु पेंढारी मशारनिलेजवल गेला. त्याजला कर्णेल याणें आपल्याकडे आणावयाचे बोलणें लाविलें. तो यांजला पातेजत नाहीं. सबब कोटेवाल्याचे विद्यमान्य बोलणें करीत आहेत. रंजितसिंग सीख याणें सरंजाम आटकेस कांहीं पाठविला म्हणोन वर्तमान आहे. भोज्येन उत्तर हिंदुराव घाटगे याची पत्रें आलीं ते पाहिलीं. कारभारी मानकरी येऊन कचेरी जाली. रामचंद्र भास्कर गोकुल पारख यास खलबत केलें. नंतर पारख रामचंद्र भास्कर या उभयेतांचे जालें. बालारामशेट बोलाऊंन त्रिवर्गाचें दोन घटिका जालें. उपरांतीक सरदाराकडे जाऊन, त्रिवर्गांनी खलबत केलें. सौभाग्यवती बायेजाबाई यांचा ऐवज पारखाकडे आहे ते आपला ऐवज व त्यांजकडील लोकांचा हिशब मागतात. जगदेवराव निंबालकर याजकडील जातीची हजिरी आद्यापि घेतली नाहीं. त्याणें खर्चाचें बोलणें घातलें. त्यास दोन लक्ष रुपये देतात. इतक्याणें त्याची समजूद होत नाहीं. त्याचें बोलणें हजिरीविसीं कितेक वेळां आपणांस विनंती केली. आपण हाजिरी न करितां चाकरी घेत आले. ते घोडे माणूस आपले ध्यानांत आहे. ते आन्वयें खर्चास द्यावे. तीन

घटिका रात्रपरियेंत बोलणें करून कचेरी बरखास केली. मागें रामचंद्र भास्कर यासी खलबत करून उठून गेले. शेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Gaikwad communicates the daily happenings at the court of the Sindia mentioning that Ranjitsing was reinforcing his army posted at Attock.*

No. 300] *[4-1-1815*

श्री

माहाराजाचे शेवेसी आज्ञाधारक कृष्णाजी गायेकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगले विज्ञापना. तागाईत छ २२ माहे मोहरम मुकाम लस्करनजीक ग्वालेर येथें शेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलिजा बाहादुर रोज गुदस्त मुखमार्ज्येन जालें. माधवराव ब्रांह्मजी, मल्हार भिमाजी बक्षी आले. दक्षिणे लोकांस कर्जाऊ ऐवज वाटिला. त्याची यादी आणिली ते पाहून उत्तर केलें, रामचंद्र भास्कर याजकडे घेऊन जाणें. इस्तेरची साहेब सिकारीस गेला होता, तो रात्रीं आला. हिंदुराव घाटगे याजला पत्र खासगी-वालेकडून लिहिली. कांहीं खर्चाची सोयेकरून पाठविनार. भोज्यनउत्तर कारभारी मानकरी येऊन कचेरी जाली. गोकुल पारख यासी खलबत च्यार घटिका जालें; रामराव फाळके जगदेवराव निंबालकर याणी आपले खर्चाविषईं बोलनें केलें. फालके साहा लक्ष रुपये हिशब मागतात. निंबालकराचें मोवम बोलणें होत आहे. वरकड सिलेदाराचीं बोलनीं जालीं. आज काल पट दुकाणी जात होता त्यास प्रथम दिवसच आहे. पांच रुपये द्यावयाचे आसले तर द्यावे, नाहीं तर विडे देऊन मार्गस्त करावें. राजश्री बालोजीबावा कुंजर येऊन बोलणे केलें, मला श्रीमंताचे पायांजवल जावयास निकट तीन महिणें परस्थानी आहे. आद्यापि तुम्हीं निरोप देत नाहींत. तेथें श्रीमंताचे मणांत विपर्यास येईल. तेव्हां निरोपाकरितां कितेक दिवस आटकूण राहावें ? मजला दररोज साठ सत्तर रुपये खर्च लागतो हा कोठून करावा ? त्यानी उत्तर केलें कंठी तुम्हांयोग्य नाही. ते तलाशात मोरो हरि आहेत; तजवीज करून दशमीस वस्त्रे देऊन मार्गस्थ करितों. यानी उत्तर केलें वस्त्रें कंठी जैसी असेल तैसीच देऊन वाटेस लावावें. त्यानी आग्रह करून दशमीपर्यंत ठेऊन घेतले. समागमें गंगारूप सालूबाई सिंदे यांजला वाटे लावणार. पारख याणें कर्णेलास पत्र घेऊन लाला दुर्गाप्रसाद वकील निसबत कर्णेल याजपासी देऊन सांगितलें, जलदीनें पत्र रवाणा कर्णे. सायेकालपरियेत सिलेदारमंडल वाटे लाविले. फाळके व निंबालकर याची बोलनी करितां पांच घटिका रात्रीं घरास लाऊन आपण उठून गेले. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Baloji Kunjir who had been on deputation to the court of Sindia requests permission to return to Poona.*

No. 301] [7-1-1815

श्री

महाराजाचे शेवेशी आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गाईकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगले विज्ञापना. तागायत छ २९ माहे मोहरम मुक्काम लष्करनजीक ग्वालेर येथें शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलीज्या बहादूर रोज गुदस्त प्रात:काली मुखमार्ज्यन जाले. मानकरी सखो शामजी मुनसी येऊन रामराम जाला. कलकत्याकडील वर्तमान सावकाराची दोन जहाजे भरून आली आहेत. इंग्रजाणी गोरखी याजकडील देहेरा व न्हाण दोन जागा घेतल्या. त्याजवर गुरखे याची फौज कालसीहून न्हाणचे शहरात इंग्रेज आले होते ते मारीत बाहेर काढून पलविले. देहेन्यास होते त्याणी गोरखी याची जागा पाडून निघोन गेले. हरिद्वाराकडे पलटणे व तोफा जान्हार. इंग्रजाकडील गोरे हरण्यास व मेटातीस जाऊन नवी पलटणे भरतीस लोक पाहूं लागले. त्याणी उत्तर केले, आम्ही जमीदाराजवल बेटी चाकरी केली नाहीं, पुढेंहि आम्हास होत नाहीं, याचप्रमाणें हिंदुस्थानीं सरंजामी यास ताकीद व त्याचे बोलणे आहे. नवी पलटणे भरावयास लोक मिलत नाहीं. जर्णेल करनाल पटाले लुधाणे या जिल्ह्यात आहे. दिल्लीकडे यावयाची आवाई आहे. महमूदशहा बातशहा याची बेगम लाहुराहून सिकाचे जतीतून निघोन गेली. ते लुधिन्यास इंग्रेजाजवल आहे त्याणी बरदास्त करून ठेविली. त्याजवरून रंजितसिंग सीक याचे बोलणे आपले ठिकाणीं इंग्रेज आम्हास सलुखीचे बोलणे करून, आमचे येथून भेद लाऊन बेगम घेऊन गेला. पुढेंही याचा सलुख येसाच उपयोगी पडनार. त्याचे मणातील भाव शहाकडील वकील सलुखीचे बोलण्यास आला, त्यासी सलुख करून गोरखे आणून मिलोण इंग्रजाचे पारपत्य करावे यैसी वदंता आहे. कर्णेल ज्यान बत्तीस उज्येनीनजीक दोहो कोसावर आहे. येशवंतराव सिवेंजी आपले ठिकाणी जावदेस गेला. अंबाजी सखाराम जावद प्रांती दंगा करून पैसा घेत आहे. त्यास मणाई पत्र पाठविले. जावदेचे वगैरे येशवंतराव यांचे माहालास उपद्रव करूं नये. चार घटिका दिवस येता स्नाण करून स्वारी सांगितली. भोज्यन करून राजश्री त्रिंबकराव दाभाडे व आपण घोड्यावर स्वार होऊन, दीड प्रहर दिवस येता स्वारी बागांत गेली. दोन घटिका मागाहून सौभाग्यवती बायेजाबाई याची स्वारी गेली. बागांत जागा पडली तेथें दोऱ्या धरून झाडे लावावयाची तऱ्हाचा नक्षा संतबा ग्रे यास दाखविला. त्याजला उज्येनिस झाडे लावावयास पाठवणार. बालाराम भाई शेट याचे स्त्रीयेसी ऋतु प्राप्त जाला. तिचे फलशोभणाचा समारंभ शटजीचे दुकाणीं जाला. भोज्येन उत्तर सरदाराकडील

आहेर सखो शामजी व बायेजाबाईकडील आहेर बाबा खासगीवाले घेऊन गेले. दरगदार मानकरी वकील पागे सावकार याजकडील आहे. शेला, पागोटे, लुगडी चोलखण प्रमाणे जाले. कलवंतनीचा नाच विडे अत्तर गुलाब सायंकालपर्यंत जाले. सायंकालचे समई बागात तितर व खरगोस याची सिकार करून दिन अस्तमात स्वारी वाड्यात आली. गोपालराव रघुनाथ याजला दोन तीन दिवस जाले. ज्वर कांहींसा येत आहे. तशेच स्नान देवतार्चन करून कचेरीस येत राहिले. चार घटिका रात्री वायूचा उपद्रव होऊन थोर शब्द केला. बोलन्यात तफावत पडला. शेगड्या शेकावयास करून औषध उपचार करूं लागले. माणूश वोलखी व बोलणे कमति पडले. उशःकाली वाड्यांत व दरकदार मानकरी वकिलास समजले. सर्व लहाण थोर आले. सरदाराणीं हुजरे चोपदार जासूद हालकरे नेहमी ठेवून वरचेवर वर्तमान आणवित. प्रहर दहा घटिका दिवस येतां कांहींक आरामसा दिसला. रामनामावली एकसारखी करूं लागले. पुन्हां भ्रम होऊन बोलणे सोडून नामावली चालली. मागील चार घटिका दिवस पावेतो आठ प्रहराच्या आठ मात्रा दिल्ह्या. गोकुल पारख मोरो हरि नेहमी जवल बसले. नवग्रहाची दाणे वगैरे वृशभ गोप्रदानें म्हसी दाणे केली. सायेंकाली मोरो हरि आले. त्याचे मागे पारख गेले. लोकाची दाटी नेहमी आहे. चार घटिका रात्रपरीयेंत राहून, नामस्मरणाचा शब्द हलू येतो. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Gaikwad writes that Ranajitsing was attempting to unite his forces with those of the Gurkhas and of King Mahamud Shah in order to crush the English. The daily happenings at the Court of the Sindia and the illness of Gopalrao Raghunathrao are also reported therein.*

No. 302] [*10-1-1815*

पौ छ २० सफर पौष
मास सन खमस अशर

श्री

माहाराजाचे शेवेसी आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गायेकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगळे विज्ञापना. तागाईत छ २८ माहे मोहरम मुकाम लष्कर नजीक ग्वालेर येथें शेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. राजश्री दौलतराव शिंदे आलीज्याबाहादुर रोजदगुस्त प्रातःकाळीं स्वारी गोपाळराव रघुनाथ याचें येथें गेली. त्याचे चिरंजिवाचे शांतवण खासगी करून येक घटिकानें वाड्यांत आले. स्नान करून साहा घटिका दिवसां भोजन जालें. स्वारी

तयार करून प्रहर दिवस येतां बागांत गेले. दोन घटिकां मागाहून सौभाग्यवती बायेजाबाई यांची स्वारी गेली. बागांतील झाडें पाहून खालीं जागा आहे ते तयार करावयास सांगितलें. तृतीये प्रहरीं बाज घेऊन तीतर वगैरे पांखरांवर सोडिले. सुरतसिंग पाटील याचे गोटांत सौदागार हात्ती विकाऊ घेऊन आला, तो पाहावयास आणविला; पाहून माघारां लाविला. दिन अस्तमित होतां बागांतून स्वारी वाड्यांत आली. मुनशीनें कर्णेल ज्यान बत्तिस याजकडील येकबार आणिलें. उज्यनचे मुकामीं दत्ताचे आखाड्यावर आहे. येथून आज्ञा जाईल त्याप्रमाणें तेथून कूच करणार. इंग्रजाणें गोरख्याकडील संस्थान न्हाणची जागा घेऊन राज्याचे माहालाशी लढत होते. गोरख्याकडील सुभा कालशीहून आला. त्याणें लढाई घेऊन इंग्रेज शेहरांतून मारीत पाहाडाखालीं मैदानांत दोन कोस तलवार करीत नेलें. शेरसाहेब याजला सोला सत्रा जखमा होऊन रणाचें ठायीं राहिला. त्यास फिकरंजनसाहेब टाकून पलाला. फिकरंजीनसाहेबास जखमा जाल्या. साहा कोसांवर जाऊन येक बिलटण उभें करून रात्रीं मुकाम केला. लढाईंत लोक मारिलें गेले, त्याचें वर्तमान अद्यापि नाहीं. इस्तेरची साहेब याचे येथें वर्तमान आलें ते दिवशीं उदास होऊन अर्धरात्रीं भोज्यन केलें. येरवीं पांच घटिका रात्रीं भोज्यन होतें. त्याचे येथून हें वर्तमान निघालें. इकडील डाक खर्चाविण चालत नाहीं. इस्तेरची साहेब शिकारीस गेला होते. ते समयीं विंचूरकरांकडील ठाणेदार याणे भीतरवार व मसुन्यास नेऊन ठाणीं गढींत नेऊन दाखविलीं, म्हणोन वर्तमान आहे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Gaikwad in communicating the daily happenings at the court of Daulatrao Sindia gives an account of the fighting between the English and the Gurkhas.*

No. 303] [*17-1-1815*

श्री

महाराजे सेवेसी. आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गायेकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगले विज्ञापना. तागायत छ ९ माहे सफर मुक्काम लष्कर नजीक ग्वाल्हेर येथें शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलीजाबहादूर रोजगुदस्त प्राथःकाली मुखमार्जन जाले. रामचंद्र भास्कर मोरो हरि आले. यासहित स्वारी गोपालराव रघुनाथ याचे येथें गेली. बापू चिटनीस याचे शांतवन करून वाड्यात आले. अन्नामहाराज सन्यासी जगदेवराव निंबालकर यांचे गोटांत आहे. त्याचे खर्चाचे साहिते न जाले. सबब ते रागास येऊन

पांचचार कोसावर राहिले. त्याजला आणावयास अबाजी घाटगे याजला पाठविले. स्नान करून भोज्यन दहा घटिकांत जाले. सवा दोन प्रहरा कारभारी व राजश्री बाळोजीबावा कुंजीर आले. बावानी मार्गस्त करावयाचे विचारिले. त्याजला सांगितलें तुम्ही उदईक यावे बोलणे करावयाचे आहे. नागपूरवाल्याचे पत्र आले ते वकिलाणे देऊन उत्तर मागितले. त्यास सांगितले तात्या आलेकर होळकराकडील आलीयावर बोलणे करून उत्तर देऊं, म्हणोन तुम्ही आपले पत्रीं लिहिणे, कोटेवाले वकील याणे विनंती केली, उदेपूर व नाथद्वाराचे बंदोबस्ताविषयीं बापूजीराव सिंदे याजला पत्रे दिल्ही पाहिजे. ते चार घटिका रामचंद्र भास्कर गोकुल पारख यास खलबते जाले. गोपाळराव याचे धर्मास दहा हजार रुपये द्यावे असे ठरले. पारखास आज्ञा केली. ऐवज रोकड देणे. चिठी करून गुरुजीचे हातची दरगदार याची चिन्हे होऊन, चिटनिसाचे येथें पाठविली. तात्या आलेकराचा मार्ग लक्ष्यांत आहेत. ते आलियाउपरी मसलत उभी करनार. सायेंकाळीं कचेरी बरखास जाली. न्हणची लाढाई इंग्रेजाची फत्ते जाली ते गोरख्यानीं मारून संस्थान त्याणी आपले घेतले ते लढाईत चौदा साहेब धरून नेले. दोन थोर माणूस होते ते सुटावयाकरितां पांच पांच लक्ष रुपये देऊ लागले; ते न घेतां दोघास गोरख्यानीं गळी दिल्हे म्हणोन बोलवा आहे. जर्णेल लुधाने करनालचे जिल्ह्यांत आहे तो दिल्लीस यावयाकरितां बातशहास सांगून पाठविले. तुम्ही आम्हास न्यावयाकरितां पुढें यावे. बातशाहाचा हुकूम जाला यामागें कोन्हास पुढें गेलो नाहीं, तुम्हास ही यावयाचे नाहीं. तुम्हीच आले तर आपले मर्यादेणे चार सरदाराप्रमाणें खाली बसाल म्हणोन वर्तमान आहे. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Naik communicates that the Gurkhas carried off fourteen English officers as prisoners in the battle of Nahan.*

No. 304] [*23-1-1815*

पौ छ ८ रोवल सन

खमस अशर मया तैन

श्री

माहाराजाचे सेवेसी. आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गायेकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगळे विज्ञापना. तागाईत छ ११ माहे सफर मुकाम लस्कर नजीक ग्वालेर येथें सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलिज्याबहादूर रोजगुदस्त प्राथ:कालीं मुखमार्ज्येन जालें.

पागांचे घोडे चाबुकस्वाराकडून दोन फिरविले. नरवरवाले लोहाराकडून येथें बंदुखा नव्या केल्या, त्याच्या गोल्या लाविल्या. बालोजी कुंजीर यानी बावाजी पाटनकर याचे गोटाकडून कूच केलें म्हणोन हलकारे याणी सांगितलें. त्याजकडे देवजी सांगल्या हुजरे यास पाठविलें. त्याणी सांगितलें पौर्णिमापरियेंत तुमची रवानगी होईल. येका दो रोजाकरितां उतावली करूं नये. तेव्हां लस्करचे पूर्वेस जगदेवराव निंबालकर याचे गोटाशेजारीं येऊन डेरा लाविला. च्यार घटिका दिवस येतां श्नाण करून पोशाख घेतला. भोज्यन करून दीड प्रहर दिवस राहतां बाराद्वारीत कचेरी आली. रामचंद्र भास्कर यासी खलबत जाले. भास्कर बलाल पागनीस याजला पटापैकीं बारा लक्ष रुपये लाऊन घ्यावयाचे ठरलें. गोकुल पारख यानी आक्षेप घेतला त्यांत पांच रुपये कमती करावेत. त्यास सांगितलें पांचच्यार पागाचे लोकांस व येकांडे याजला हिशब बमोजी द्यावे लागेल. वरकड हालके पागाकडे मागाहून आदा विशेष नाहीं. त्याजला पांच रुपये द्यावयाचे यांत कमी करावयाचें नाहीं. च्यार घटिका दिवस राहतां बापू चिटनीस खंडेराव गोपाल नारायणराव कृष्ण त्रिवर्ग आले. त्याजला पटांचा इतेर्थ आहे तो रामचंद्र भास्कर याणी निवेदन केला. पेंढारी कोटेवाल्यास माहाल याणी लाऊन दिल्हे तिकडे दंगा केला आहे. त्याजविसी वकिलाणी विनंती केली त्याजला सांगितले, कर्णेल ज्यान बतीस व आंबाजी सखाराम याजला येविसीं पत्रें पाठविलीं आहेत. सिलेदार मंडल च्यार घटका रात्रपरियेत कारभारी याजला घेऊन बसले. निदान पौर्णिमा जालियावर द्यावयांचा वाइदा करून लोकांस उठऊन लाविलें. कारभारी आपले ठिकाणास गेले. शेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer Krishnaji Gaikwad states that Baloji Kunjir has been permitted to return to Poona within a few days.*

No. 305] *[18-1-1815*

श्री

महाराजांचे सेवेसी आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गाईकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगले विज्ञापना तागायत छ ६ माहे सफर मुक्काम लष्कर नजीक ग्वालेर येथें शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलीज्याबहादूर रोजगुदस्त प्राथःकाली मुखमार्जन जाले. पागाचे घोडे चाबुक स्वार याजकडून फिरविले. मोरो हरि येऊन दोन घटिका बोलनें जाले. माधवराव ब्रम्हाजी यानें निलेबूट हरबऱ्याचे आणिले ते वाड्यांत पाठविले. राजश्री त्रिंबकराव

दाभाडे सिकारीस गेले. मुनसीनें आगऱ्याचे एखबार आणिले. इंग्रेज न्हाणचे लढाईत तोफा व जखमी सोडून पळाले ते आणावयाची हिंमत पुरेना. गोरख्याने सांगून पाठविले, तुम्ही तोफा व खेतातील लोक घेऊन जाणे. गोरखे भारी पडले येविषयीं इंग्रजाणी कौशल करून कलकत्यास पत्र पाठविले, रामगडचा इरादा धरून झाडी तोडीत आहेत. लुधाणे मिरट वगैरे ठिकाणची छावणी सिमरूचे बेगमेस रखवाली करावयास सांगतात. तिणे उत्तर केले मजकडून छावणीची रखवाली होणार नाहीं. तुम्ही आपला मुखत्यार ठेऊन करावी. सिबंदी पाहिजे तर थोडी फार देईन. रेवाडीची छावणी तेथील जमीदारास, व मथुराची रणधरसिंग जाट भरतपूरवाला यास सांगतात. त्यानींहीं याप्रमाणें उत्तर केले म्हणोन वर्तमान आहे. स्नान करून बारा घटिकांत भोज्यने जाले. दाभाडे याजला सिकारींत * * पाठविले. गंगारूप बालाबाई, बाबा खासगीवाले, सौभाग्यती बायेजाबाई आपण च्यार घटिका भाशन जाले. गोरख्याकडील पत्रे हरघडी येतात. पांच चार लढाई इंग्रजाची मारली. तुम्हाकडून उपराला जाला नाहीं. हल्ली त्याकडे तुमचा मुलूक आहे, त्याचा बंदोबस्त तुम्ही करावा; नाहीं तर इंग्रेजास मारून आमची फत्ते जालियावर तुम्ही मुलकाचा इरादा करू तर देन्हार नाहीं. तुम्हा आम्हात खलस पडेल. त्याजवरून येशवंतराव सिवाजी यास बोलाविले, पाहिजे त्याची खातरी व्हावी म्हणोन वस्त्रे सिरपेच कंठी हाती त्याजकडे बहुमाणास पाठऊन आणावे. ज्यान बत्तिस बोलाऊन घ्यावा. आपले फौजेचा बंदोबस्त ठेवावा. प्रसंग पाहून पुढें करावयास येईल. बायेजाबाईचे बोलणे जाले, नागोजी गुंड याजकडे बऱ्हानपूरबाबत वगैरे ऐवज येणे सबब त्याचे येथें पाहारे बसविले. आठ आठ दिवस उपोसित ठेविले. हली वाड्यांत आटकेत ठेविला; परंतु पैशास ठिकाण नाहीं. त्यास काढून द्यावयाचे. यानीं उत्तर केले, तुमचे विचारास येईल तसे करावे. आडीच प्रहर दिवसा कचेरी जाली. रंजक वाड्यांत बजावीत आहेत. तेथें आग्नप्रवेश होऊन बरुद उडाली. कोन्हास धक्का पावला नाहीं. रामचंद्र भास्कर गोकुळ पारख यांसी खलबत जाले. कचेरी बरखास्त केली. गुंड याजला मुलामानसासुधा अंगावरील वस्त्राणे बाईनी मेबती लावून काढून देविले. ते पाई चालता सायेंकाळीं शहेरांत गेली. दाभाडे याची स्वारी सिकारीहून खाली आली शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Gaikwad reports the fighting between the English and the Gurkhas. The apathy of Daulatrao in the Nepal war is also referred to therein.*

7289

No. 306] [14-2-1815

पौ छ २० रोवल सन खमस

श्री

महाराजांचे शेवेशीं आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गाईकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगले विज्ञापना. तागाईत छ ४ माहे रबिलोवल मुक्काम लष्कर नजीक ग्वाल्हेर येथें शेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेषः राजश्री दौलतराव सिंदे आलीजा बहादूर रोज गुदस्त प्राथःकाली मुखमार्जन जाले. मोरो हरि माधवराव गुरुजी यासी चार घटिका सिलेदाराकडील व पागाकडील खर्चाचे बोलणे जाले. गोरखी याचे जिल्ह्यांत कोणी अख्तर न्हानचे संस्थानांतून तीन कोस पुढें घाटावर गेला. तेथें गोरखी यानीं लढाई घेतली. तीन कोस माघारी न्हानचे तलाव-परियेंत मारीत आणिले. माणूस बहुत कट्टा जाहले. रुद्रपुराकडे लढाई जाली. तिकडील घाट इंग्रेजाणी फत्ते करून घेतला. जर्णेल होडर परबल येथें गेला. पुढें आगऱ्यास येन्हार. दिल्लीस जावयाचे ठरले नाहीं म्हणोन वर्तमान आहे. सहा घटिका दिवस येतां स्मश्रु करावयास बसले. दीड प्रहर दिवस राहता स्नान करून पोशाख घेतला. रामचंद्र भास्कर मेरो हरि आले त्यास सांगितले, शेटजीस वराता द्यावयाच्या त्याजविषयीं येथें वकील आहेत, त्याज-कडून शेटजीची खातरी दुकाणी नेऊन करूण देवावी. त्याजवरून कोटेवाले मंदोसरवाले भुसकुटे बापूजी राव सिंदे याजकडील वकिलास बोलाऊन, रामचंद्र भास्कर वकिलास घेऊन, शेटजीचे दुकाणी गेले. तेथें गोकूल पारख यासी बोलणे जाले. पारखजीनें चिठी लिहून बलवंतराव कारकून यास वाड्यात पाठविलें. त्याणे चिठी दिल्ही ते पाहून सेखा शामजी यास बोलणे करून दुकानी पाठविले. चार घटिका बोलणे जाले. ऐवजाविशी वकीलाणी खातरी केली; परंतु रुबरू वकील पारखजी याचे बोलणे व्हावे असे ठरून आपले ठिकाणी गेले. बापू घारपुरे नागपूरवाले श्रीधर सदाशिव येशवंतराव सिवाजीकडील आले. त्याजला सांगून पाठविले, आज कचेरी नाहीं, तुम्ही जाणे. बुगाजी जामदार यास ताकीद केली. दोन पोशाख बसंती रंगाचे रंगवून ठेवणे. दोन घटिका लोकास हाश-विनोद करून, दोन घटिका दिवस राहता वाड्यात गेले. शेवेशी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Gaikwad reports the fighting between the English and the Gurkhas and narrates the doings of Daulatrao Sindia.*

7290

No. 307] [22-2-1815

पैवस्ती छ २९ रबिलोवल सन खमस
अशर माघ मास

श्री

माहाराजाचे शेवेसी आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गायेकवाड निसबत त्रिबकजी पाटील डेंगले विज्ञापना. तागाईत छ १२ माहे रबिलौवल मुकाम लस्करनजीक ग्वालेर येथें शेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. राजश्री दौलतराव शिंदे आलिज्याबाहादूर रोजगुदस्त प्रात:काळी मुखमार्ज्येन करून या(द)वराव बिनीवाले यास सांगितलें, भोजनास तेरा पितर सांगणें, माहादजी शिंदे यांचे श्राद्ध आहे. कर्णेल ज्यान बाप्तिस याजकडून थैली आली. पेंढारी दरजमातदार यास सांगितलें आडीच लक्षाची जागीर तुम्हास देवितों; दीड हजारानें चाकरीस असावें. पेंढारी यांनीं उपद्रव करूं नये. तें त्यांचे विचारास न येतां कूच करून मल्हारगडाकडे गेले. रामदीन निसबत होलकर मेवाडांतून माळवे प्रांतीं खाचरोदचें राणांत येऊन च्यार गांव लुटिले म्हणोन वर्तमान आहे. मदुबेग यानें दोन बगीचे घोडे सजविले, ते बगीस जुंपून आणिले. बगी फेरून पाहिली. साहा घटिका दिवस येतां श्राण जालें. उपाध्ये दादा शेंडे व रावजी शेंडे खंडबावा शास्त्री पंचवीस तीस ब्राम्हणमंडळी आली. श्राद्धसंकल्प होऊन पिंडाजवल दक्षणा येक मोहोर उपाध्ये यास दोन मोहोरा वीस गोप्रदाणें याची दक्षणा दर पांच रुपयेप्रमाणें तेरा ब्राम्हणाची पादपूज्या केली. त्यास दर पांच रुपयेप्रमाणें दक्षणा दिल्ही. शिरमंडळी यांस पांच च्यार रुपयेप्रमाणें भूयसी पांच रुपये दिल्हे. पितर बोलाऊन सवादोन प्रहरां भोज्येन जालें. बाळाराम भाईशेट यांचे येथें लष्करचे वाणी यांजला भोज्यन जालें. रामचंद्र भास्कर मोरो हरि दरगदार वकीलमंडळी त्याचें येथें गेली. जर्णेल मथुराहून फत्तेपुरास गेला. गोरखीयाचे जिल्ह्यांत गोरखे इंग्रेज यांची लढाई देहेन्यावर जाली. इंग्रेजाची शिकस्त होऊन हाजार बाराश माणूस ठार जालें. आंतरवेदांतील लोक खेडी वगैरे माहालचे ठेऊन लढाईस पाठविले होते, त्यांस पुढें करून मारविलें. लढाईतून जगून आले ते घोडीं व हातीयारें सोडून पळून गेले. भरतपूरवाला जाट रणधीरसिंग याणें डेरा बाहेर केला. जर्णेलाचे भेटीस जान्हार म्हणोन वर्तमान आहे. मानकरी व बाळोजी कुंजीर आले. बाळोजीबावा यासी येक घटिका बोलणें होऊन आपले ठिकाणीं गेले. मानकरी यासी च्यार साहा घटिका भाशन होऊन खाली तोता याजकडे येऊन सायेंकालपरियेंत तिरंदाजी जाली. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer reports the war between the English and the Gurkhas. The movements of the Pindaris and the daily happenings at the court are also mentioned therein.*

No. 308] [24-2-1815

पौ छ २० रोवल फालगुन
शुा १ सन खमस अशर

श्री

माहाराजाचे शेवेसी आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गायेकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगळे विज्ञापना तागायत छ १४ माहे रबिलावल मुकाम लस्करनजीक ग्वालेर येथें शेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलिज्याबहादुर रोज गुदस्त च्यार घटिका रात्रीं उठून स्वारी सांगून श्नाण केलें. पोशाख करून दोन घटिका रात्रीं स्वारी निघाली ते चुनीलालचे बागांत गेली. तेथें लोक उभे करून बारा पंधरा स्वाराणें सिकारीस गेले. येका घटिका दिवस येतां सौभाग्यवती बायेजाबाई यांची स्वारी बागांत गेली. स्वयंपाकाची तयारी करविली. राजश्री त्रिंबकराव दाभाडे यांची स्वारी साहा घटिका दिवस येता भोज्येन करून आंत्रीकडे सिकारीस गेले. आलिज्याबहादुर यानी प्रहर दिवसा दोन खरगोस मारून बागांत पाठविले. पावणेदोन प्रहरा बागांत येऊन भोज्यन जालें. प्रहर दिवस राहातां स्वारी सिकारीस गेली. गोकुळ पारख याचे येथें मोरो हरि जाऊन दोन घटिका बोलनें करून, पारख व मोरो हरि रामचंद्र भास्कर यांचे येथें आले. पटाचे खर्चाचें बोलणें करून, सायेकाली आपले ठिकाणी गेले. सिकारीहून स्वारी परभारें आपले बागांत दोन घटिका दिवस राहातां आली. बाईस वर्तमान समजतां त्यांची स्वारी या बागांत आली. जर्णेलचे भेटीस इस्तेरची साहेब येथून गेला, त्याची भेट किरावलीस जाली. त्याचे विद्येमान्य धवलपूरवाला राजा भेटला. येकवीस मोहार नजर केली. आक्रा किस्त पोशाख येक किस्त जवाहीर दोन घोडे दिल्हे. भरतपूरवाला जाट करावलीचे मुकामीहून भेट घेऊन गेले. जर्णेल कूच करून छ १२ मिनहूस आग्र्यास गेला म्हणोन वर्तमान आलें. कर्णेल ज्यानबतीस नाहारगडानजिक आहे. दोस महमद पेंढारी मृते पावल्याचें वर्तमान त्यास गेले. त्याजवरून कर्णेल याजबरोबर त्याचा भाऊ व पुत्र आहे त्याचे येथें जाऊन दोघांस शेले तिवटे देऊन घटिका शतवन केलें. च्यार कपणी च्यार तोफा दोन रिसालदार दोस महमदचें बुनगें आणावयास भेलशाकडे पाठविनार म्हणोन पत्र आलें. उमरावतीकडे पलटणें होतीं ते भुपालास आथवा गोरखी याचे लढाईस जावयाचा इरादा होता. ते पलटणें पावलागडाकडे गेली म्हणोन वर्तमान आहे. स्वारी बागांतून दोन घटिका रात्रीं आली. सरकारची फौज पंचवीस तीस हजार तीन पलटणें तोफखाना याप्रमाणें सरंजाम त्रिंबकजी पाटील डेंगळे याचे बराबर देऊन, या प्रांतीं पेंढारी याचे पारपत्यास रवाना करनार. त्याजवरून

7292

येथील सरदारास विचार पडत आहे. फौज रेवानजीक येतां कलज्यावरी आसली ते वर्तमानावरून येथें कितेकाचे माणस सरकार चाकरी करावी, फौजेचा मार्ग लक्षीत आहेत. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Gaikwad reports the anxiety felt by Daulatrao at the news that the Peshwa was fitting out an expedition under Trimbakji Dengle to crush the Pindaris. Dost Muhammad, a leader of the Pindaris, is reported to be dead.*

No. 309] *[25-2-1815*

पौ छ ३ राखर सन
खमस अशर मया तैन

श्री

मांहाराजाचे शेवेसी आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गायेकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगले विज्ञापना. तागाईत छ १९ माहे रबिलावल मुकाम लस्करनजीक ग्वालेर येथें शेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलिज्याबहादुर रोज गुदस्त मुखमार्ज्येन जालें. गंगारूप बालाबाई देशमुख सितोले याणी राधाकृष्णाच्या मूर्ती केल्या. त्याचें लग्न आरंभिले. वेदमूर्ती बालंभट बाईकडील आश्रित याजकडे कृष्णाची मूर्ति दिल्ही. राधेची मूर्ति आपण ठेविली यासंमधें बाईस गडगेनर आलिज्याबहादुर याणी केले. वाड्यासभोंवती जागा नीट करून रोशनाईस तारांगणें व आतसबाजी केली. नदीस आगाडीवर डेरा देविला. जर्णेल आगरेनजीक तासगंज येथें मुकाम आहे. तोफ येक थोरली पडले आहे, ते पाहावयास गेले. तिचें तोंड व लांबी मोजून वजनाचा आजमास विच्यारिला. आठ दाहा मुकाम तेथें होणार. कर्णेल ज्यान बतीस याचे लस्करांत बक्षीकडील सिलेदाराने बाहेर जाऊन येक बाइको लुटली. ते लस्करांत कर्णेलाकडे आली. त्याणे चवकस करून तो स्वार ठिकाणी लाऊन आणिला. तीन लाकडें रोऊन त्यास सिलेदार बांधून बाइकोचा लहंगा व सोन्याची गरशेली नेली होती, ती त्याचे गल्यांत बांधिली. घोडे पागेस लाविले. करीमखां व दोस्त महंमद व छितु पेंढारी या त्रिवर्गास दरजमादारास आडीच लक्षाची जागीर द्यावी, त्याणी दिडा दिडा हाजाराणें चाकरी करावी. येशवंतराव सिवाजी याजकडील प्रगणें जावद हिंदुराव घाटगे यास देऊन, ठाणें बसवावयास कर्णेलास आज्ञा होती, ते राहित करून त्यांचे त्याजकडे जावद ठेविली. पेंढारी मान्य करीत नाहींत. कुंभेलनेराकडे सादडीचे जिल्ह्यांत आहेत. तिकडे नजीक बासवाडा आहे. येशवंतरायाचे आसऱ्यावर आहेत. गंगाधर विठल मंदोसरवाले बोलणें करितात म्हणोन वर्तमान आहे. च्यार घटिका दिवस येतां श्राण करून, पोशाख घेतला.

सौभाग्यवती बायेजाबाई बालाबाईकडे व चिमणाबाई शहरांत सेनापतीचे मातुश्रीस आणावयास गेल्या. प्रहर दिवस येतां बालाबाईची स्वारी वाद्येघोश करीत मिरवत आली. सेनापति मातुश्री सहित दीडा प्रहरा आले. बायाकडे कलवंतनीचा नाच व श्राणें जालीं. सवा दोन प्रहरां बालाबाईकडील व सेनापतीकडील मंडली-सहित भोज्यन जालें. रामचंद्र भास्कर, मोरो हरि, भास्कर बलाल पागनीस, बालोजी बावा कुंजीर आले. गोकुल पारख याजला बोलाऊं पाठविलें. त्याज-कडून कारकूण बलवंतराव आला. त्यानें सांगितलें. शेटजीकडील श्रीजीचा पुजारी येसोवा सोरटी उज्यनकर याची कन्या जयराम पांडुरंग फरासखाणे याचे पुत्रास नेमिली. तो आज आपले येथें येऊन चवघाचे साक्षीणें निश्चये होणार म्हणोन येणे होत नाहीं. दोन घटिका पागनीस मोरो हरि रामचंद्र भास्कर यासी बोलणें होऊन मंडली दरगदार वकील पारखाचे येथें गेली. साक्ष विडा जाला. बालाजी सखदेव यांचे चिरंजिवाचे लग्न जालवणास माधवराव याचे कन्येसी करावयास गेले. रामचंद्र भास्कर याचे चिरंजिवाचा शरीरसंमध गोपालराव रघुनाथ याचे कन्येसी करावा, हें उभयपक्षीं येक मास बोलणें. हलीं तो शरीर-संमध चिटनिसाकडून रहित जाला. सबब रामराव विठल श्रीगोंदिकर याचे कन्येचें बोलणें ठरलें. रामराव याणें देसी आपले घरीं पत्र पाठऊन मुलें मणुश बोलाविली ते आलियावर लग्न होणार. च्यार घटिका रात्रीं श्रीजीची मूर्ति श्रीमंत पूज्या करून नदीस डेरा दिल्हा तेथून मिरवत घेऊन आले. जानवसा पोतनिसाचे गोटांत डेरा दिल्हा. बाईची स्वारी प्रहर रात्रीं वस्त्रें दागिणें घेऊन आपले वाड्यांत गेली. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶The writer states that Pindari leaders Karimkhan, Cheetoo, and Dostmuhammad are offered Jahagirs by the English to win their friendship. The daily happenings in the court are also mentioned including the marriage of the images of Krishna and Radha.

No. 310] [*27-2-1815*

पौ छ ३ राखर सन खमस

फाल्गुन

श्री

महाराजांचे शेवेशी आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गाईकवाड निसबत त्रिंकबजी पाटील डेंगले विज्ञापना. तागायत छ १७ माहे रबिलौवल मुक्काम लष्कर नजीक ग्वालेर येथें शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री दौलतराव सिंदे आलीजाबहादूर रोज प्राथःकाली मुखमार्जेन केले. माधवराव गुरुजी मोरो हरि फडनीस आठ दहा मानकरी येऊन रामराम जाला. मोरो हरि बोलणे करून

आपले घरास गेले. मुनसीनें सांगितले जर्नेल तासगंजास आहे. नामी जागा आहेत. तेथें व किल्ल्यास जाऊन जागा पाहतात. जागजागे छावण्यातील गोरे सर्व त्याजपाशीं जमा जाले आहेत. लाहुरास रंजितसिंग सीक याजकडे शहाचा वकील आहे. त्याचे यांचें बोलणे सलुखीचे होऊन, जावयास निरोप मांगितला. त्यास उत्तर केले चार दिवस राहून आम्हाकडील वकील घेऊन जाणें. तूर्त त्यास ठेवून घेतले म्हणोन एखबार आली. सौभाग्यवती रखमाबाई व बायेजा-बाई व चिमणाबाई यांची स्वारी गंगारूप बालाबाई याचे येथें लग्नाचे समारंभास गेली. चार घटिका दिवस येता स्नान करून दहा घटिकांत भोज्येन जाले. कारभारी याजला बोलावणी पाठविली. बालाराम भाईशेट गोकुल पारख आले. यासी त्यासी बोलणे जाले. कारभारी वकीलमंडली मानकरी येऊन कचेरी जाली. प्रगणे पानव्याहार प्रांत मालवे येथील जमिदाराची घरे संभाजी आंगरे याणी लुटली. सबब ते येथे मोरो हरि याचे विद्यमाने भेटून आपले वर्तमान जाहीर केले. मोरो हरि यांचे कर्ज आंगरे याजकडे देसी जावयास्तव घेऊन त्यास हप्तेबंदीनें महाली ऐवज लावून दिल्हा तो न पावला, त्याजवरून प्रगणे मजकूर व नेवरी व राजगड हे तीन महालची जफतीची यादी सनंदा करावयास केली. तेथील ऐवज मोरो हरि याजकडे रदकर्जी आंगरे याजबद्दल लाऊन दिल्हा. बालोजीबावा कुंजीर आले त्यांचे खानगीबाबद खर्चास पंधरा हजार रुपये व आपा जगताप व सितोले येकूण पंचवीस हजाराच्या चिठ्या करून दिल्ह्या. गंगारूप सालूबाई सिंदे देसी जात आहे त्याचे खर्चास सत्रा हजार व त्याजबराबर दहा बारा असामी लग्नास आली आहे त्याचे खर्चास कमजादा वीसहजार रुपयेच्या चिठ्या जाल्या. रामचंद्र कृष्ण सिवराम हरि (ना)तू याचे नांवें झांसीचे संस्थानची वस्त्रे कृष्णाजी आत्माराम याजपासी दिल्ही. कृष्णराव याचे नांवें पंचवस्त्रे सिरपेच कंठी घोडा त्याचे कारभारी कदीम गोपालराव त्यास साडेतीन वस्त्रे मुलाचे मातुश्रीस पातल शालजोडी काढून ठेविली. खानगी करनार आहेत. नागपूरवाल्याचे व होलकराकडील रविशंकरमणाचे तील आले. ते थैल्या वकिलाणी आणोन दिल्ह्या. त्याची उत्तरें घ्यावयास चिटनीसाकडे सांगितले. रामराव फालके आमृतराव सिंदे वगैरे येक दोन सिलेदार यांचे कबज्यात चिठ्या करून दिल्ह्या. तुवार घार प्रांतीस चोर दोन धरिलें ते सुभ्याणे येथें पाठविले. पुन्हा चोरास सुभ्याकडे लावून दिल्हे. त्यास पत्र लिहिले याची चवकशी करून पारपत्य कर्णे ते करावे. दोन घटिका रात्रीं कचेरी बरखास जाली. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Gaikwad in communicating the daily happenings at the court of Gwalior reports that friendly relations have been established between the Shah of Kandahar and Ranajitsing.*

7295

No. 311] [28-2-1815

पौ छ ९ राखर सन
खमस अशर मया तैन

श्री

माहाराजाचे शेवेसी आज्ञाधारक कृष्णाजी नाईक गायेकवाड निसबत त्रिंबकजी पाटील डेंगळे विज्ञापना. तागाईत छ १८ माहे रबिलौवल मुकाम लस्करनजीक ग्वालेर येथें शेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. राजश्री दौलतराव शिंदे आलीज्या बाहादूर रोजगुदस्त प्रात:काळीं मुखमार्जेन जालें. मोरो हरि गुरुजी सखो शामजी पांच सात मानकरी येऊन रामराम जाला. मोरो हरि यांसीं येक घटिका बोलणें जालें. येशवंतराव शिवाजी याची व कर्नेल ज्यान बत्तीस याची लढाई भूपालाचे जिल्ह्यांत जाली. तेथें येशवंतराव याची शिकस्त होऊन कर्णेलाकडे लूट गेली, ते लिहून गंगाधर विठल मंदोसरवाले याजकडे दिल्ही; ते यादी येथें आली. कमजादा चाळिस लक्षाचा अजमास आहे, तो कर्णेलाकडून देवावा म्हणोन लिहिलें आहे. गोरखी याचे जिल्ह्यांत न्हाणहून इंग्रेज बारा पंधरा कोस चोर मार्गानें चढून गेले. ते गोरखीयास समजतां फौज पाठविली, त्यांनीं मारीत माघारीं आणिले. दोन गोरे च्यार सुभेदार बेच्याळीस लोक धरून घेऊन गेले. माणूस फार ठार जालें म्हणोन वर्तमान आहे. साहा घटिका दिवस येतां स्मश्रु करावयास बसले. सौभाग्यवती रखमाबाई, बायेजाबाई व सेनापति याजकडील सर्व बाया गंगारूप बाळाबाई देशमुख यांचे तेथें श्रीजीचे लग्नांतील समारंभास गेली. गोकुळ पारख यांचें घरीं शिलेदार मंडळपैकी भोज्येन करावयाचें राहिलें होतें त्यांस भोज्येनास बोलाविलें. साहा घटिका दिवस रांहातां तैलाभ्यंग करून श्नाण केलें. पोषाख घेतला. सायेंकाळपरियेंत मानकरी लोंकास बोलणे हाशाविणोद जाला. खाली तो त्याकडे मानकरी यानी रोशनाईखालीं तिरंदाजी केली. च्यार घटिका रात्रीं बाळाबाई यांचे येथून बायांची स्वारी आली; नंतर उठून जनानखाण्यांत गेले. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer Krishnaji Gaikwad gives an account of a battle between Yashwantrao Shivaji and Col. Jean Baptiste in the district of Bhopal. The daily happenings at the court of Gwalior and the activities of the Gurkhas are also mentioned.*

7296

श्री

१ वद्य १३ रविवार. नित्या नेम जालियानंतर ग्राट आले आणि सांगितले की, माहाराजानी जसे पाहिजे तसे करावे बागा किनई व पुसेसावळीच्या. नंतर भिकाजीपंत पाईचे लोकाचे काम करीत आहे तो लोक घेऊन येईल त्यातील निवडून घेणे लोक शंभर. नंतर पंचाइती प्रकर्णी बोलले की फिर्याद माहाराजानी सर्वाची ऐकावी. पंचाईत पंच करीतच आहेत. स्वार रिसाला दुसरा येणार आहे. त्यास माहाराजानी बारगीर शंभर ठेवावे. ते माहाराजानी नावे योजून याद करावी. आम्ही बालाजीपंतास ठेऊन दोन तीन महिने वसूल मुलकी पाहून येऊ. माहाराजानी आता दोन तीन महिनीयाने वाईचा वसूल वैवाट जाऊन पाहावी. पुढले साली सारी पाहावी. नंतर बोलिला की आमचे साहेब लोकासी आपण कोणतीहि गोष्ट बोलू नये. त्याप्रमाणे आम्हीहि बोलणार नाही. कुसाजी माहाडीक यानी बंड चतरसिंग प्रकर्णी धरून आणले, सबब ग्रांटानी कंपिणी सरकारातून ठराऊन आणिले वर्षासन रुा १५००. नंतर बापू सुभेदार बोलला की परवा वरये येथील माहार मारले. त्याचा मुदा आपले तोडाने मी मारले असे बोलिला नाही म्हणत असता, चवघाचे सईने मारले ऐसे येते, सबब मारला. म्हराठे लोक यानी पूर्वी इजा दिली असे बोलतात सबब काम न सांगावे, ऐसा ग्रांट बोलिला. नंतर रात्रौ भोजन करून निद्रा जाली. कलम.

[18-10-1819

१ वद्य चतोर्दसीसह आमावाश्या सोमवार नित्यानेम करून ग्रांटास पुसली ती कलमे रुकाराची आमचे मरजीची बीाा

१ स्वार शंभर पागेचे ठेवणे पोटी कलमे बीाा

१ जमादार येक ठेवावा	२ दफेदार
१ कारकून	२ पनासात निशान व दोन प्राा
२ भालदार	

येकूण आठ.

१ पायचे लोक निवडून घेणे शंभर, त्यात जमादार गुलाम हुसेन व कारकून येक व ताशा, मरफा, निशाण. कलम.

१ माईसाहेब व भाऊसाहेब व आपासाहेब याणी पाईचे लोक ठेऊ नयेत व ज्याप्रमाणे स्वार स्वारीचे वेळेस लागतील ते वेळेस देणे. कलम.

१ आम्ही ग्रांटास सांगितले की माईसाहेब व भाऊसाहेब व आपासाहेब या तिहीतून बऱ्यावणे जाले तर जाणे. तो बोलिला की जाईन, परंतु काय बोलावयाचे ते माहाराजानी कलवावे. कलम.

१ माईसाहेब व भाऊसाहेब व आपासाहेब यास येक बाग द्यावी व कुरण येक प्रमाणे व खासगीस लाख रुा पा द्यावे. कलम.

१ बालाजीपंतास दसरियाचा पोशाख याची सनगे ५ पाच प्रमाणे लावली आहेत. ग्रांट बोलिले की साडेतीचा संप्रदाय, पाच का? मग आम्ही बोलिलो की तुम्ही मेजवानी केली ते वेळेस विठोबास सनगे पाच दिली सबब आम्ही दिली. ग्रांट बोलिले की विठलपंत दिवाण आपले. कंपणीचा कारकून बालाजीपंत सबब साडे तीन. आम्ही बोलिलो की वाईट वाटेल सबब. मग बरे म्हणोन बोलले. नंतर आम्ही बोलिलो की बालाजीपंतास आम्ही आबदागीर किंवा पालखी चोपदार चवरी दिली तरी कसे? ग्रांट बोलिले की इंग्रजी चाकरास देऊ नये. आम्ही बोलिलो की वाईट लागेल विठोबास दिली आस्ता सबब. ग्रांट बोलिले की मी बोलतो की मजला चवरी आबदागीर, पालखी द्यावी, माहाराजाचेंहि मनात आहे, परतु न देणे. मी बोलावेसे नाही व प्रथक मेजवानीहि करू नये. कलम.

१ कंपणी सरकारचे मुलकात जी वतने चालत आहेत तसी माहाराजाकडे चालतील. मग पुढे लाटाकडून तहनामा होऊन आला म्हणजे मग पुसून घेणे येईल. यांप्रमाणे तुलजापूर व जेजोरी आमचे राज्याबाहेर सबब. कलम.

१ सेखमिरा आमचेकडे येईल किंवा कुंपिणी सरकारकडे? ग्रांट बोलिले की फार दिवसाचा चाकर माहाराजाचा सबब येईलसे वाटते; मग पाहावे. कलम.

१ आमचे तीर्थरूप याचे तेरावे दिवसी भूमिदान रुा २०० दोनशाचें उदक सोडले आहे. ग्रांट बोलिले की सारा बंदोबस्त जाला म्हणजे देता येईल.

१ बापू कानूचे काम हस्तगत होऊन आणवावे लेहून. बरे म्हणोन ग्रांट बोलिले.

१ विठलपंताची तयनात रुा ६०० व पालखी बाा १०० पुढे मेहनत केली अस्ता बगावयास येईल रुा ३००, येकूण दर महा रुा १०००. कलम.

१ बलवंतराव भोसले याना इतलाकी स्वार व जातीची तयनात रुा ९०० होईल.

१ बलवंतराव चिटणीस यास तैनात सध्या रुा २००, मेहनत केली तरी १००, येकूण रुा ३०० ·

¶*These are some of the extracts from Pratapsinh's diary mentioning important occurrences in his daily life during the period February to October 1819. They also refer to various points discussed by the Raja with Capt. Grant regarding officials and stipendiaries serving under him.*

No. 2] [*7-7-1819*

"छत्रपति प्रतापसिंह याचे रोजनिशींतील उतारे."

रोजनिसी राजमंडळ सुाा आशरीन मया तैन व आलफ

१ छ १३ रमजान रोज बुधवार प्रात:काली उठोन स्नानसंध्यादि नित्ये क्रम होऊन खोलीपुढे कचेरी जाली. वामन गोसावी याणी सतार वाजऊन दाखविले नंतर निद्रा जाली. त्रितीये प्रहरी ग्राटसाहेब याणी बलवंतराव चिटणीस यास बोलाऊन नेले आणि प्रतिनिधिपद कधी कोणते कारकीर्दीत जाले, पद जाले त्याचे नाव व घालमेल कसी हे पुसिले. प्रल्हाद निराजीस राजाराम कारकीर्दीस चंदीस पद जाले, ते परशराम त्रिंबक प्रतिनिधिपर्यंत लेहून घेतले. सन शक लेहून घेतला. नंतरी पुढे आणखी घालमेली आहेत. बलवंतराव बोलले त्याचे उत्तर केले. पुढील व वरगुती आद्यापि पाहात नाही. तूर्त आमल प्रतिनिधींनी बागा फार चढविल्या वगैरे कारण आहे तितके पाहातो. पुढे प्रतिनिधि कारकीर्द आम्हापासी लागली आहे. नंतर प्रश्न केला की, पूर्वी तुमचे वडील याणी माहाराजाचा घोडा पडिला तो वोढून काढिला. बहुत बहुत कामे केली, बहुत खुसी आहे आम्हास, आणि हाली माहाराजाचा घोडा[१] पडिला तो तुम्ही का काढिला नाही. उतर केले की, आम्ही जवल नव्हतो. यैसे विनोदाचे बोलणे जाले. नंतरी प्रश्न केला की, बाबती व सरदेशमुखी

---

१ या संभाषणाच्या आधी पंधरा दिवसापूर्वी प्रतापसिंह महाराजांचा घोडा पडल्यामुळें त्यांचा पाय दुखावला होता त्याला अनुलक्षून हा विनोद केला आहे.

व मोकासा, चौथाई व सावोत्रा, जाहगीर ही वाटणी कसी आहे; आमल कसा घेतात व स्वराज्ये हे काये, याचा आर्थ, मायेने काये ? याचे उतर केले जैतापुरी दादा चिटणीस लेहून पुर्जे कागद व माहिती शोध करून आणऊन समजाऊ. तसेच आष्टप्रधान यास वेतन काय ? नख्त पोहचत होते की सरजाम वगैरे हे कसे हे लेहून आणावे. सांगितले बरे आहे. उतर केले तो आताच चिठी लेहून आणा बोलले. नंतरी फर्मान पादषाहाचे साल सन कोणतें, किती वर्षे जाली ? त्याचे उतर केले की पारसनीस मुनर्सी आहेत त्यास माहिती दखल आसेल. त्यास बोलाऊन आणा बोललेवरून आबा पारसनीस आणिले. त्याणी उतर केले, पत्रे फारसी फर्मान किल्यांवरी आहेत. आणून पाहून सांगतो. नंतर जुनी पत्रे याच्या नकला करून नेल्या होत्या त्या आणिल्या. ठेवाव्या बालाजीपंतासी बोलले. त्याचे उतर बालाजीपंतानी[१] झिडकाऊन केले की, तात्या आभ्यंकरापासी द्या. हे ग्रांटानी यैकून, ये क्या बात म्हणून बलवंतराव यासी बोलले. नकला आणिल्या बहुत खुसी जाली. बरे जलद आणिल्यात. रुमाल सोडून त्यात बांधून ठेवाव्या सांगितल्यावर बालाजीपंत उगेच राहिले. नंतर सांगितले उद्या लौकर यावे.

[8-7-1819

१ छ १४ रोज गुरुवार

नंतर बलवंतराव चिटणीस यास ग्रांटाकडील बोलावणे आलेवरून गेले. दाखला निवडून आणिला, पुसिले. आद्यापि जैतापूरच आला नाही परंतु आमचे मनात माहीत आहे ते बोलू परंतु मुकरर नव्हे, लिहिले येईल ते खरे. बरे आहे. तुम्हांस काल सांगितलें किती, फार सुस्तावा केला. फार नाकारी गोष्ट केली. चिंता नाही. तों फडणीस आले. जे बोलो हेच फार करून लिहिले येईल. त्यावरून लिहिले यादीवर दाखवावे वरून, सरदेशमुखी दाहा रुपये व बाबती आठ रुपये व चौथाई मोकासबाब पचवीस रुपये व साहोत्रा साहा रुपये यो येकूणपनास रुपये व येकावन रुपये जाहागीर यैसे आहे. परंतु चाली येक प्रकारच्या नाहीत. जसा जेथे अमल जबरी तसा साठच्यालिसी घेतला. मोगलाच्या जबरीत च्यालीस देऊन साठ घेतात यैसे तरेने चालले. येक दस्तूर का

---

१ नातू.

चालला नाही. फार फिकीर आहे. कोणी पुरा माहीत बुढा आहे की नाही शहरात, बोलले. नंतर आबा पारसनीस बोलले बुढ्यास काये माहित, आमल का बुढा होना. नंतर बालाजीपंत बोलले जे आमात्येपंत याचा कारकून सदासिव भगवंत आहे त्यास आणवावे. कागदपत्र बहुत माहिती त्यास आहे व त्याजवल आहे त्याजवरून त्यास बोलावणे पाठविले. नंतर स्वराज्य हे काये, याचा आर्थ काये, आमल काये, पुसिले. त्यास उत्तर चिटणीस याणी केले, दरोबस्त आपला अमल जाला त्यास स्वराज्ये म्हणतात. यावरी बालाजीपंतानी वाद घातला की आसे नव्हे. आमल काये सदोबा येईल तो सांगेल. नंतरी ग्रांटानी पुसिले की मोकासा याचे माईने आर्थ काये ? त्याविसी बहुत वेल उठोन वह्या काढून आर्थाचा शोध केला. परंतु आर्थ बसला नाही. नंतरी प्रल्हाद निराजीस प्रतिनिधी कोणते साली जाली, त्याची हिजरी सालानी किती साले जाली, साल कोणते आले हे पुसोन लेहून दिल्हे. नंतर सदासिव भगवंत आले. त्यास पुसिले. त्याणी आनन्वित सांगितले. चौथाईत बाबती वगैरे व स्वराज्यात चौथाई. नंतरी याद फडणिसापासून लेहून देविली, की इतके दाखले कागदपत्र आणून दाखवावे. त्याजवरी सदोबा फडणिसानी बोलले आमचे रुमाल सारे तुम्ही वाड्यात नेले, आम्ही काये दाखवावे ? मग याद घेऊन उठोन गेले. ग्रांटानी जा सांगितले. आबा पारसनीस याणी सनदेची सालची मेलवणी करून दिल्ही. नंतरी सरदेशमुखी आमल जुना की नवा पुसिले. चिटणीस याणी उतर केले, जुना सिवाजी माहाराजापासून आहे. जुना आहे तरी फर्मानात नवीन करून दिल्हे. तुम्ही जुना म्हणता, यास आधार काये बालाजपंत बोलले. त्याजवरून जुनी याद फर्मान आणावयास गेले. त्यात लिहीले की सरदेशमुखी चौथाई साधले त्याचे फर्मान करून आणावे. त्याजवर कल्पना बालाजीपंतानी घेतली की, साधेल म्हणा साधले आसे म्हणू नका. मात्रा धवर द्या, लवरी देऊ नका. यावरी वाद बहुत जाला. ग्रांट बसून बोलले, बहुत आछा लढते. यापूर्वी फर्मानेचे राजाराम सिवाजी याणी आपले वतन सरदेशमुखी लोकास दिल्हा, पत्रे करून दिल्ही, ते चालते आणि नवीन कसे होईल ? साधन समये आला, तेव्हा फर्माने करून मात्र घेतले इतकेच आसे जाले. नंतर खाना खावयास गेले. दरबार बरखास्त केला. आज आला याहून उद्या लौकर या, चिटणीस फडणीस यास सांगितले, नंतर गेले. उभयता निघोन वाड्यात आले. माहाराजास वृ(त) निवेदन केले.

7329

[9-7-1819

१ छ १५ रोज शुक्रवार ग्रांट याकडेस विठलपंत फडनीस व बलवंतराव चिटणीस गेले. जाऊन बसले. यादी वगैरे दाखले आणिले विच्यारिले. आद्यापि आले नाही. हे बहुत काम नाकारा सुस्ताई. याणी सरकारकामे कसी निभतील बोलले.

फर्मान पादशाई आणवा बोलल्यावरून वाडियातून आणावयास पाठविले. तो कागद किल्यावर आणावयास माहाराजानी जामदार पो ते वृत ग्रांटास फडणिसानी सांगितले. नंतरी आपले लिहिण्यास गुंतले. गलबल करू नये बोलो नये म्हणून लिहावयास लागले, नतरी फडणीस बसून कंटालून उठोन खाली आले. मागे बलवंतराव बसून कंटाळून उठोन आले माहाराजास वृत निवेदन केले. नंतरी किल्यावरील कागदपत्र सर्व आले. फर्माने देऊन आबा पारसनीस व जामदार पो तो ग्राट खाना खावयास उठोन गेले. पारसनीस परत आले. फडणीसहि मागते आले. वरकड कागदपत्र माहाराजानी पाहून माफजादीने बांधून ठेविले. मल्हारराव चिटनीस यास जैतापुराहून आणविले ते येऊन पोहचले. नंतरी फडणीस व उभयेता चिटणीस व दाजीबा उपाधे व खासे बसून येकांत जाला. मजुमदार याकडील कारकून दफ्तरदार जुने केशवराव आगटे याणी आणून भेटविले. नजर करविली व सदासिव भगवंत त्याणी रुमाल त्याचे होते त्यापो कागद निवडून काढिले. नंतर माहाराजानी आज्ञा केली जे, कागद ग्रांटास दाखऊन न ठेविता माघारे आणणे. आणि न्याहाल त्याची यादी लेहून सेरा मारून घेऊन जाणे. यावरून यादीस लेहून सेरा मारून दोन यादी सदासिव भगवंत याणी नेहल्या. नंतर कचेरी बरखास जाली. फडणीस याणी चिटणिसास सांगितले जे उद्या लवकर ग्रांटानी दाहा वटका दिवसास बोलाविले. लौकर जावयाचे करावे.

[10-7-1819

१ छ १६ रोज शनवार बलवंतराव चिटणीस व विठल पंत फडणीस उभयता ग्राटाचे वाड्यात गेले. सरदेशमुखी व बाबती वगैरे जुने दाखले व आष्टप्रधान याकडे जिल्हे हे काये व त्याची तैनात काये व सरजाम किती व नख्त काये पावत होते वगैरे प्रस्न केला. दादा चिटणीस जैतापूरचे आणविले तेहि पाठविले.

नंतरी बोलणे जाले. नंतरी आष्ट प्रधान याची तैनातीची याद दाखविली तैनात होन

१३०००	प्रधान	१००००	सुमंत
१२०००	आमात्य	१००००	न्यायाधीश
१००००	सचिव		पडितराव यास सरंजाम गांव आहेत
१००००	मंत्री		
१५०००	प्रतिनिधि	९०००	सेनापति
		१००००	राजआज्ञा.

याप्रो दाखविली व सरंजाम व इनामगाव काही नख्त पावत होते, ते हिशेब यादी दाखविली. सरदेशमुखी व बाबती वगैरे चौथाई जाहागीर वगैर प्रांताप्रांती सारखी चालु नाहीं. जेथे जसी चाल पडली तसी साठ च्यालसी, जसी जबरी पडली तसा अमल उगवला, यैसे बोलणे जाले. नंतरी सरदेशमुखी व चौथ हा अमल पूर्वीपासून नव्हे, म्हणणे फर्मान आणिले त्यापासून आहे. त्याजवरून राजारामसाहेब याणी वतनपत्र चिटणीस यास चेऊल प्रांतचे खासा स्वामीचे वतन ते तुम्हास दिल्हे आसे म्हणून होते ते दाखविले. फर्मान यास वर्षे येकसे च्यार जाली व या पत्रास वर्षे येकसे चोवीस जाली. तेव्हा पूर्वीचे दोनी आमल खरे व सिर्के यास मावळ प्रांती सरदेशमुखीची पत्रे सिवाजीमाहाराज याणी दिल्ही तसेच चौथाई मोकासे सिवाजी माहाराजानी दिल्हे आहेत वगैरे बोलता, ग्राट याणी उतर केले पूर्वीचे खरे. फर्मान उगेच साधनपर करऊन आणिले, यैसा निश्चये होऊन पूर्वीचे खरे जाले. नंतर येशवंतराव पोतनीस यास बोलाऊन आणून बोलले. जिल्हा याचा यैवज कसा येत होता वगैरे यादी पाहिल्या. बोलला यास कमाविसदार मोठे मातबर याजकडेस प्रांत ठेविलें, आमल सांगितला, त्यास जिल्हा म्हणावा. जिल्हा याचा माइना असा होतो. स्वारी सिकारी होईल त्यास सरकारी दरखदार आहेत. खर्च होईल तो जमा जमेल ती पाहून बाकी राहील ती सरकारात यैवज जमा करावा. सचिव याजकडे पीलखाना खर्च सांगितला तो जाऊन बाकी सरकारात द्यावे. तसेच प्रातिनिधीकडे पागा व मुदबाख खर्च, आसेच सर्वाकडे माहालचे हिशेब द्यावे, यैवज जमा पोत्यास करावा, किले याजवर दरखदार व सरनोबत वगैरे हवालदार हुजूरचे, हुजूर बंदोबस्त माहाल मात्र जिमेस यैसे होते. पुढे शाहू माहाराज समाप्त जाल्यावरी ज्याचे हातात ते जिल्हेदार होऊन मालक जाले. पुसणार कोणीच नाही. येकमेक सर्व

7331

लाजिमदार वशाले. कोणास कोणी पुसावे? याप्रो जाले. सर्व समजल्यावर दादा चिटणसि यास निरोप दिल्हा. विडे आतर गुलाब देऊन नंतर गेले. सदासिव भगवंत याणी याद आणून दाखविली. सन लागला नाही. वरी सन लागला कागद आहेत. दाखवितो बोलले. वर वेऊन या सांगितले. नंतर खाना खावयाचा वेळ जाला. निरोप दिल्हा सर्वास आणि आपण गेले आणि उद्या लौकर यावे सांगितले.

[11-7-1819

१ छ १७ रोज रविवार बलवंतराव चिटणीस यास बोलावणे आलेवरून ग्रांट याजकडेस गेले. बालाजीपंत ग्रांट बसले होते. येण्यास इतका उसीर का केला? जलद येत जावे सांगितले. माहाराजाची खुसी वगैरे पुसिले. काये करितात बोलले. नंतर प्रश्न केला. सिवाजी माहाराजाचा तहनामे वगैरे साधनी कागद काही जुने आहेत पुसिले. त्याजवर उतर केले, की रायगडास औरंगजबाचा वेढा पडिला. किला घेऊन शाहू माहाराज कबिले सर्व धरून नेले. संभाजी माहाराजास धरून नेले आणि मारिले. नंतर यास नेले तेव्हा मालमालियेत दौलत कागदपत्र सर्व पादशाहाचे हस्तगत जाले. राजाराम मात्र सडे पळून निवाले त्याजमुळे जुना कागद तहनामे राहिले नाही. येक सावताचा तहनामा होता तो बाजीराव रघुनाथ याणी सावंताचे तंट्यात पाच च्यार वर्षात पाहावयास म्हणून बाजीराव याणी आम्हांपासून नेऊन कार्य होताच जवाहीरखान्यात नेऊन ठेविला, परत दिल्हा नाही. तेथे शोध होऊन यावयाजोगे आसालियास शोध करावा. आछा बोलले. नंतरी इग्रजाचा व शाहू माहाराजाचा तहनामा पूर्वी सिवाजी माहाराजाचा तहनामा रायगडी जाला, त्याचा उधार आणून लिहिला तो काढून नकल दाखविली. हा सिवाजी माहाराजाचा तहनामा काय? नव्हे शाहू माहाराजाचे वेळेचा आहे. परंतु पूर्वीचा उधार आला आहे उतर केले. नंतर शाहू माहाराज येथे कवी दिलीहून आले, शक वगैरे व बालाजी विश्वनाथ दिलीस गेले ते येकटेच किंवा आणखी सरदार होते बराबर व मुख्तियार कोण हे विच्यारिले. बखर काढून शक व वर्तमान येकून लिहून ठेविले. नंतर नारायेणराव याजकडे नकल इंग्रजी यादी उतरावयास दिल्हा त्या तयार जाल्या की नाही पुसिले. येक दोन रोज लागतील. उमजाऊन नारायेणराव यास दिल्हे, परंतु तयारीस दोन रोज लागतील. बरे आहे बोलले नंतर सदासिव

भगवंत जुने काही कागद यादी दाखविल्या. रोज गुदस्त त्यास शेक सन नव्हता, आहेत ते यादी दाखवितो बोलले ते घेऊन आले. त्याजवरून बालाजीपंतानी कानावर घातले, त्यास उतर केले वरता बोलाऊन याद घेऊन ठेवावी. आता खाना होणार वेल जाली. उद्या पाहू व बखर वगैरे कागद उद्या पाहू. बोलोन खाना खाण्यास उठले. उद्या लौकर यावे बालाजीपंतास व बलवंतराव यास सांगून उठले.

[*15-7-1819*

१ छ २१ रोज गुरुवार प्रात:काली उठोन स्नानसंध्या देवतार्चन करून खाली कचेरी जाली. नंतर विठलपंत फडणीस येऊन येकांत जाला. बलवंतराव चिटणीस यास बोलावणे पाठविले होते ते येऊन पोहचले. केशवरावहि येऊन पावले. आज्ञा जाली की, फडणीस सारे कागदपत्र येकंदर आहेत तो बस्ता साराच नेत आहेत. ग्रांटाकडे तुम्ही व आबा पारसनीस फडणिसाबराबर जाऊन यावे. यावरून बलवंतराव याणी पुसिले की कागद सारेच नेण्याचे कारण नाही व दिलात संषये आथवा कारण तूर्त काये पडले आहे! त्याजवर उतर केले की कारण काहियेक नाही. गंजिफा पुन्हा चालवा व काये आहे ते सारेच पाहणार बोलले. कागद ठेऊ नका सांगितले. फडणीस याणी बस्ता उपटून ग्रांटाकडे गेले. मागोन बलवतराव चिटणीस व आबा पारसनीस निघोन गेले. ग्रांटानी पत्रे पाहण्यात बादशाहाचे पत्र सिवाजी माहाराजास आलेले केशरी पंज्याचे थोरले ते आबा पारसनिसापासून वाचऊन यैकिले. वरकड हिंदवी पत्रे पेशवेसुधा येकंदर बालाजपिंत याणी पाहिले. सरदेशमुखी फर्मानापूर्वी होती काय वगैरे पुसिले. त्याचा मजकूर बोलले. फर्मानातील दोन कलमे पुसिली. किले साहा यास आठ हाजार रुपये सिबंदीखर्चास द्यावे, बारा हजार पाहिजेत हे लिहितात. यातील कसे? आठ काय? बारा काय? पेशकसी बेरजेच्या हिशेबास मिलत नाही हे कसे? त्याजवरून आबा पारसनीस यास बोलाविले. त्यास पुसिले परंतु अक्षराचा मतलब न जुले. आक्षराचा आर्थ होतो परतु मतलब कसा तो निघत नाही. याची दरियाफ्ती करून उतर करू बोलोन ग्राटाकडे आले. नंतर ग्राटानी सांगितले की सारे कागद बस्ताच येथे ठेवणे. नकला करून घेऊन पाहून नंतर घेऊन जावे. आबा पारसनीस याणी दाहावे घटकेस येत जावे. आमचा मुनसी व ते याणी चवथे मजल्यावरी बसून जलद तयार करावे. किती दिवसात तयार कराल पुसिले. पधरा दिवस लागतील बोलले. बरे आहे. यावर फडणिसानी आग्रह केला की

कागदपत्र येथे कश्यास ठेवावे? पारसनीस आपले घरी बसून तयार करितील अथवा वाडियात करितील, मुनसीस सागावे. त्याजवरून रागास. आला, इतका संशय का? पाहिजे तरी आम्ही हर बस्त्यावर मोहर करू आथवा तुम्ही करा. इतके दिवस ठेऊन काये केले व पुढे ठेऊन काये करणार! आम्ही उतरून बुकात छापून विलायेतेस पाठऊ. तेथून ठरेल तरी तुमचा उपयोग. यैसे बोलले. नंतरी आग्रह करीत होते. आबा पारसनीस याणी सांगितले फडणिसास की आता आग्रह करू नये. हा मजकूर बलवंतराव यास माहित नाही. बारनिटाकडे होते. तेथून आल्यावर कागदपत्र सारे ठेवण्याविसी आग्रह करून बलवंतराव बोलो लागले. ग्राटानी तोंडाकडे पाहिले. काय म्हणून पुसिले. तो आबा पारसनीस याणी सुचविले की आसा मजकूर जाला, तुम्ही आग्रह करून फल नाही. नंतर बालाजीपंतानी सरदेशमुखी वतन नव्हे आसे ग्रांट यास सांगितले आणि बुकात लिहविले. सरदेशमुखी पहिली नव्हे हा रिंगा चाललाच होता. नंतर ग्रांट खाना खावयास उठिले. सर्वास निरोप जाला. वाडियात येऊन पावले. सर्व वृत निवेदन केले. नंतर फडणीस याणी सांगितले की पारसनीस याचे संमतानी ठेविले कागद. नंतरी च्यार घटका रात्रीस फडणिसाचा निरोप घेऊन गेले. नंतरी बलवंतराव व आबा पारसनीस व चिंतोपंत व दाजीबा उपाध्ये व खावंद बसून येकांत जाला. त्यातील मजकूर. कागदपत्र सारे गुंतले, त्यात इंग्रजप्रकर्णी राजकारणाचे पूर्वीचे कागदपत्र सारे पेशव्याचे व इकडील उतराच्या नकला वगैरे व आणखी कितेक कागदपत्र जुने हिंदवी सारे गुंतले. द्रिष्टी पडावयाचे व न पाडावयाचे हे काढून आणावे. त्यास आबा पारसनीस लिहावयास जातात तेव्हा युक्तया निवतील तितके काढून आणावे यैसे ठरले. दादा चिटणीस यास पत्र व मेना जैतापुरास आणावयाकरिता रवाना केला. बारनेट प्रश्न पुसिल्याचे उतर माहीतगारीने करण्यास विचार करावा याकरिता आणावयास पाठविले.

[17-7-1819

१ छ २३ रोज शनवार प्रात:काली उठोन श्नान करून देवघरात गेले तो विठलपंत फडणीस येऊन येकांत जाला. बलवंतराव चिटणीस यास बोलाविले. बालाजीपंत याणी ग्रांट यास सांगितले की फडणीसासी बोलोन माहाराजास पुसावे की आणखी कागदपत्र काये आसतील ते सारे दाखवावे. आणखी कागदपत्र काये आसतील आसा संषये वाटतो. माहाराजापासी आथवा चिटणिसापासी आसतील. पुर्ता शोध करावा. त्याजवरून फडणीस

यांणी वर्तमान सांगितलेवरून महाराजानी सांगितले काहीयेक कागद नाही. बलवंतराव तुम्ही उतर करा. त्याजवरून बलवंतराव याणीहि उतर केले की जे होते ते कागद दिल्हे आहेत. बखर दिल्ही यापरता साधनी कागद नाही. त्याजवरून फडणीस यास आज्ञा जाली की बालाजीपंत यास सूचना करून तुम्ही ते येथेच यावे. समक्षच बोलणे होऊन नंतर ग्रांटास कलवावे. त्याजवरून बालाजीपंतास घेऊन फडणीस आले. माहाराज, फडणीस, चिटणीस, बालाजीपंत बसून तावदानाचे खोलीत बोलणे जाले. आदौ स्वाभाविक पावसाच्या वगैरे गोष्टी जाल्या. नंतर फडणीस, चिटणीस उठोन बाहेर आले. बालजीपंत व येजमानाचे बोलणे जाले. नंतर फडणीस यास हाक मारून आत बोलाविले. सवेच चिटणीस यास हाक मारून आत बोलाविले. माहाराजानी सागितले की, आमचे मनात संशये आसता तरी सारे कागद पेशव्यासुधा तुमचे पूर्वीचे राजकारणसुधा कशास देतो? दोस्ती जाली तेथे संशय काही नाही. जे होते ते कागद दिल्हे. यापरते कागद नाहीत. तिलगूल वगैरे किरकोल कागद असतील ऐसे बालाजीपंत बोलले. माहाराजानी उतर केले की दिल्हे यापरते नाही. आलीकडील तिलगुलाचे वगैरे कागद येत ते कासीपंत बंदरे नि॥ बाजीराव याणी वाचून दाखऊन आपले जवल ठेविले. नंतर बालाजीपंतांनी बलवंतराव चिटणीस यास पुसिले की तुमचे दफ्तरी काही आणखी आहेत? त्याजवरून बलवंतराव याणी उतर केले की, जे होते ते पुण्यात तुम्हांस दाखविले. नकला तुम्ही करून घेतल्यात. हालीहि नकला दिल्ह्या. बखर होती तीहि दिल्हीच आहे. यापरता साधनी आम्हाजवल नाही. त्याजवरून त्याणी उतर केले की, आणखी येखादे समई निघालियास नीट नव्हे. यावर उतर केले की, नाहीच मग निघतो कश्यानी. नंतर बालाजीपंत माहाराजास बोलले की, सारे कागद पाहून छाप्यात छापून विलायतेस जाईल. सर्वास माहाराजाचा पराक्रम राज्ये वगैरे जाहीर होईल. याकरिता करितात व ग्रांटाचे लक्ष माहाराजाचे ठिकाणी फार. आसा दुसरा साहेब कोण्ही नाहीं. वारंवार माहाराजाची कालजी वाहणें व माहाराजाचा बंदोबस्त चांगला व्हावा, आपणास येश यावे हेच चितात. याजवर माहाराजानी उतर केले की, कागदपत्रावरी व सनदेवर काये आहे? आम्ही दोस्ती केली मेलविली त्याअर्थी जे देतील ते आमचे, आधिक उणे काही म्हणावयाचे नाही. तुम्ही हिंदु आहा पाहिजे ते करा. आमचे मनात आधिकउणे वाटल्यास तुम्हापासी बोलू. त्यापासी काही बोलावयाचे

नाही. बलवंतराव चिटणीस व चिंतोपंत भाटे व बापू माहाडीक होते. जुने गोष्टी पेशवे याचे वरी राज्य चिटणीस याणी घातले हे माहाडकानी काढिले वर चिटणीस याणी उतर केले की, ताराऊ साहेब याचा पूर्व द्वेष शाहू माहाराजाकडेस मिलाले तो धरून मारावे, प्राण घ्यावा हा संकल्प; व रामराजे यास कैद केले तेव्हा माहाराजाचा लक्ष साडोन यास मिलावें हा धर्म नव्हे; व पूर्वील द्वेष सर्वास मारावे पारपत्य करावे हे धरिले. याणी राज्य बुडविले आणि दुसरेवर दोष ठेऊन फल काय? माहाराज बोलले आता याचे कारण काय? नंतरी निद्रेस गेले. नंतर फडणीस ग्रांटाकडे गेले होते तथून दादा चिटणीस यास बोलावणे ग्रांटाचे सांगण्यावरून पाठविले. जाऊन पोहोचेत तो ग्रांट खाना खावयास गेले, गांठ न पडली. नंतरी त्रितीय प्रहरी कचेरी तावदानात जाली. मंडली सर्व आली. नंतरी आबा पारसनीस ग्रांट याजकडून आले. त्याणी वर्तमान सांगितले की, जुनी बुके नाना प्रकारची काढून वाचून दाखविली आणि बोलले जे, आम्हापासी लिहिले आहे यास व चिटणीस याणी बखर लिहून दिल्ही यास मिलत नाही. माहाराजाची बढाई करून लिहिले आहे. लटके आहे व सर्व राज्य दिलीपासून मोजावयाचे आहे व सिवाजी माहाराजास जरीपटका निशाण कधी पादशाहानी दिल्हे वगैरे पुसिले. पहिले सिवाजी बंडच होते, पादशाहाचे देणे नव्हे, व गादीवर पादशाहा बसले नव्हते व मूल होते तेव्हाचे संत्र+ ते आहेत, थैसे कितेक बोलले. ते वृत सांगितले. नंतर माहाराजानी चिटणीस यास सांगितले की जे पुसतील माहीतगारी ते बखर दिल्ही या आधारावरच धरून बोलावे. जे पूर्वीपासून माहीत आहे ते असे आहे. मग तुमचे लिहिले असेल ते खरे म्हणावे. आग्रह करू नये. जबरदस्तापुढें आग्रह करून कामाचा नाही व आग्रह करून सिध्ध करून फल होते असे नाही. होणार ते होईल. व कागद आणखी आहे पुसतील तरी नाही म्हणावे. हे दोन जाबसालानी उतरे करावी. रिकामा विच्यार विवंचना घोर करून लभ्ये नाही. समये परत्वे होय म्हणत असावे.

[*19-7-1819*

१ छ २९ रोज सोमवार प्रात:काली बलवंतराव चिटणीस यास ग्रांटानी बोलावणे पाठविलेवरून गेले. येकटेच ग्रांट होते. प्रश्न केला की, गदाधर प्रलहाद यास प्रतिनिधि दिल्ही किती वर्षे होती व बालाजी विश्वनाथ आंगरे याजवर मुल्हक घेण्यास गेले तेव्हा प्रतिनिधि

+ हा शब्द लागत नाही. सतंत्र, स्वतंत्र

परशरामपंत होते किंवा गदाधर प्रल्हाद होते? प्रतिनिधि मोठे पद वरिष्ठ आसता प्रतिनिधि मनसब्यावर का न गेले? बालाजी विश्वनाथच का गेले? प्रतिनिधि नाकारे प्रल्हाद निराजी म्हणून किंवा परशरामपंत कैदेत होते किंवा मोकले. याचे उतर सांगितले की याचा शोध मितिवार लागणे. घरी कागद पाहून करितो. त्याजवर ते बोलले आणखी कागद कोणते? बखर येथे आली. त्याचे उतर केले की ज्यावरून तयार केली त्याची टाचणे आहेत. त्याजवर पाहून मिति वार लागेल न लागले पाहून सांगतो. बरे आहे बोलले. दुसरा प्रश्न चंदरराव मोरे हे पातशाई चाकर किंवा बंड होते? व बंड बुडऊन राज्ये घेणे कारण काय? व त्याचे बापाचे नाव काय? हाहि शोध करून उतर केले. दादा चिटणीसाहिं मागून गेले. त्यास पानदान देऊन निरोप दिल्हा.

[23-7-1819

१ छ २९ रोजे शुक्रवार ग्रांटाचे वाडियातून नारायेणराव इंग्रजी लिहिणार याणी माणूस पाठविले की, बलवतराव चिटणीस यास सांगावे जे, ग्रांटसाहेब याणी काही तुम्हांस पुसोन ल्याहावयास सांगितले तरी यावयाचे करावे. हे वृत येजमान स्वामीस कलविले. आज्ञा जाली की उतर सांगून पाठवावे. ग्रांटसाहेबाचे बोलावणे नाही. त्यास तुम्ही येथे यावे, नंतरी समजून घेऊन माहाराजाची आज्ञा घेऊन सांगणे आथवा तेथे येणे तसे करिता येईल. यावरून नारायणराव येथे आले आणि सांगितले की, बखर इंग्रेजींत उतरावयास सांगितली आहे. तुम्हांस बसऊन जेथे आशंका येईल तेथे विचारून लिहीत जावी सांगितले. माहाराजाचे वाडियात बसून तयार करावी सांगितले. ग्रांटाकडे बखर दिल्ही ती ज्याजवरून लिहिली तेच चिटणीसाजवल आहे. त्याजवरून उतरावे सागितले. सिवाजी माहाराजाचे पलीकडील आसेल तेहि ल्याहावे सांगितले. त्याचे उतर केले, आमची पैवस्ती सिवाजी माहाराजापलीकडे नाही. माहीत कशावरून आसावे? नंतर कचेरी बरखास होऊन रात्रौ भोजनास स्वारी बसली. यावर फडणीस चिटणीस यास आणखी पुसावे. जुने कागदपत्र साधनी माहाराजाचे आसलियास पुसावे दाखवावे. नाही म्हणून मग निघालियास नीट नव्हे. तसेच तात्या जोसी यापासी काही आसलियास व आमात्यपंताकडे आसा शोध करावा. त्याजवर उतर केले की मजूमदार आम्हासी नीट बोलतील, उतर करितील हे अपणास माहीत आहे. तात्या जोसी याकडे कागदाचा संमंधच नाही. चिटणिसास

पुसती. त्याजवरून तात्या जोसी याचे घरी आलो त्यास पुसिले. त्याणी सांगितले आम्हाजवल कारण काय? आमचे पोतदारीचे साधनाचे आहेत याप्रो जाले. नंतरी बखर लिहून दिल्ही त्याची टाचणे प्रती आसतील त्यावरून इग्रजी उतरऊन द्यावे. शक, साल लागेल तितके लावून द्यावे आज्ञा झाली. नंतरी निद्रेस स्वारी गेली. फडणीस चिटणीस यास घरी जाण्यास निरोप दिल्हा.

[25-7-1819

१ छ २ रोज रविवार ग्रांट आले. फडणीस चिटणीस जवल होते. जुन्या तसबिरा आणऊन पाहिल्या. त्याजवर संन शेक सापडेल हा आंदेशा यामुळे बराबर दौत व पराच्या लेखण्या घेऊन आले. तो तसबिरावर सन शक नव्हताच. नंतर बलवंतराव चिटणीस यास पुसिले. चंदराव मोरे मारले त्यास का मारिले? बंड होते? पातशाहाचे नौकर नव्हते की होते, समजून द्यावे व त्याचे बापाचे नाव काय? त्याजवरून सांगितले की, त्याचे बापाचे नाव ठिकाण लागत नाही. मुलाचे व भावाचे व दिवाणाचे नाव ठिकाण आहे. मारले वगैरे मजकूर बखरीत आहे. त्याजवर उतर केले, रडतोंडीचे घाटात मदत केली सिवाजीस, आसे आमचे बुकात आहे. तुम्ही बखरीत का लिहिले नाही हे समजले. काये कसे म्हणून माहाराजानी पुसले. त्याजवर ग्रांटानी उतर केले की, सिवाजी माहाराजास मदत केली. उपयोगी पडले, त्यास मारिले राज्ये लोभे, तेव्हा हारामखोरी माहाराजाकडे येईल याकरिता लिहिले नाही. याजवर बलवंतराव चिटणीस याणी उतर केले की मदत केलीच नाही. केली आसती तर लिहितो. परंतु केलीच नाही म्हणोन लिहिले नाही. साहेब म्हणतात त्यास त्या वेलेचे नव्हे, आम्ही पाहिले नाही. वडिलानी जे लिहिले ते खरे म्हणोन आम्ही मानतो. वरकड आम्हास दखल काय? त्याणी का लिहिले नाही खरे-खोटे त्यांचे ते जाणेत. नंतर शाहू माहाराजाचा कुतरा त्याचे वर्तमान पुसिले की कुतरे यास पालखी दिल्ही. त्याणी वाघ मारला तो कोणत्या डोगरात? कोणते रानात? तीथ वार संव शेक काढून दाखवा. बखरीत असेल ते खरे उतर केले. नंतर रामरावणयुध्धाची तसबीर पाहिली. त्यास बोलले जे हे सर्व लटके, कोण्ही पाहिले आहे? लबाड सर्व. नंतर तसबिराचे मागे पारसी लिहिले होते. वाचावावयास आबा पारसनीस यास बोलाऊन वाचविले. बैतां[१] होत्या. नंतर पुसिले की मुसलमानात व

१ कविता, सूक्ति.

आमच्यात नवी बुके शास्त्र करितात. हिंदूत आहेत काय? तुंम्हास काही शास्त्र संस्कृत समजते काये? काही म्हटले काये? म्हणून आबा पारसनिसास पुसिले. थोडे थोडे म्हटले बोलले. नंतर शास्त्र करणार कोणी आहेत, काय पुसिले वरून आबा बोलले, गोपालशास्त्री व रामाशास्त्री आहेत, करितील, म्हणताच आम्हाकडे पाठवा बोलले. माहाराजानी उत्तर केले त्यास नवे करावयास येत नाहीं. जुने वाचतात म्हणून उडविले.

[26-7-1819

१ छ ३ रोज सोमवार प्रात:काली उठोन बलवंतराव चिटणीस व खासे बसून खोलीत खलबत जाले. त्यात विनंती केली की ग्रांटापासी बूक आहे. ते नारायणराव इंग्रजी लिहिणार त्याजवल दिल्हे आहे. बखरीस यास रुजू पाहून खास चौकसीने होईल ते इंग्रजी ल्याहावे. त्यास त्या बुकात माहाराणाजी याचे नाव कसालेचा माहाराजाचा वंश आसे लागले आहे. त्याविसी नारायेणराव पुरसीस करितात. आपला तरी राणाजीचा वंष. त्याणी आसी लबाडी मांडली आहे याचे कसे? यावरून येजमानानी आज्ञा केली की, आपले आहे ते लिहून द्यावे. पुरवणी तुम्ही कागदोपत्री करावी. नंतर स्नानसंध्या देवतार्चन आटोपून खोलीपुढे येऊन जगदेवराव जाधव यास बोलाऊन आणून चतुरसिंग+ उदेपूर व जयपुरास गेले, तेथे जेवणे वगैरे कसे जाले हे वृत पुसिले. त्यास ते तेथे नव्हते. नंतर आणा डबिरास आणऊन पुसिले. त्याणी सांगितले की येथास्थित जाले. वंषावलहि मिलविली. त्याची परवानगी घेऊन काढऊन लाविली. नंतर लिहून मजकूर आणानी सांगितले आणि बापू कान्हो फडणीस चतुरसिंगाजवल कारभारी होते. हाली पुण्यास. त्यासहि पत्र जासूद रवाना केला की माहीतगारी लिहून पाठवणे. नंतर पाये सेकून फराल करून निद्रा केली. नंतर स्वारी त्रितीय प्रहरी श्रीकृष्णेश्वरास जाऊन येऊन भोजन केले. बखरींतील मालुमात वाचऊन पाहिली. चिटणिसानी विनंती केली, आज्ञा तसी पुरवणी कागदोपत्री व बोलून करितो, परंतु सरकार व फडणीस याणी मदतीस आसावे. नाही तरी आम्हास काये आसे म्हणू नये, बरे प्रातच बोलणे म्हणून. नंतरी बलवंतराव चिटणीस निरोप घेऊन जैतापुरास गेले. नंतर तावदानात बसून पाये सेकून भोजन केले. उपरांतिक निद्रा जाली.

+ महाराजांचे चुलते चतुरसिंग भोसले स. १८०५-०८ च्या दरम्यान उत्तर हिंदुस्थानांत फिरत होते.

7339

१ छ ७ नंतर विठलपंत फडणीस आले. त्याणी नीलकंठशास्त्री व ग्रांट याचे बोलणे शास्त्राचे हिंदूचे चालीचे याजवर दूषण देऊंन बोलले. याणी उडऊन देऊन उतर केले ते वर्तमान सांगितले. आबा पारसनीसहि तेथे होते सांगितले.

१ छ ८ नारायणराव इंग्रजी बखर उतरतात त्याचा निरोप आला जे जुनी टाचणे बखर कशावरून केली ती द्यावी. त्याजवरून वही जुनी व टाचणे पत्रके वगैरे द्यावयाची आज्ञा जाली यावरून दिल्ही.

[11-8-1819

१ छ १९ बुधवार माहाराज सुटले होते. रास्त्याची लढाई जाली. शहर लुटले तेव्हाची माहाराजास याद आहे? नाही+ सांगितले. फडणीस चिटणीस तेव्हा किल्यावर होते सांगितले. याद ज़ाबता माहाराजानी दरखदाराचा लिहिला तो ग्रांटास दिल्हा. बखरीचे वर्तमान चिटणिसास पुसिले. इंग्रजी लिहिणे चालले की नाही? चालले आहे सांगितले. बखर केली परंतु सारी माहाराजाची बढती चांगलीच लिहिले. येखादे वेलेस वाईट चालले आसते तरी लिहिले नाही. तेव्हा संषय येतो. सारेच चांगले आसते आसे नाही. त्याजवर चिटणिसानी उतर केले की, चांगले जाले ते चांगले लिहिले, वाईट जाले ते वाईट लिहिले आहे. संभाजी माहाराजाची वर्तणूक चांगली जाली नाही सर्व बुडविले ते लिहिले आहे. सिवाजी महाराजाची चाल चांगली जाली ती लिहिली आहे. नंतर महाराजास सांगितले कीं शिवाजी महाराजानीं तरवार केली बहुत थोर नाव जाले. आपण आकलेनी थोर नाव करावे. मेहनत फार फार करावी. राज्य आलेवरी होणार नाही. थोडे दिवस उरले, मेहनत फार फार करावी. फडणीस चिटणीस मर्जीजोग बोलतील. स्पष्ट बोलणार नाहीत. माहाराजानी मनात आणून वागावे.

[15-8-1819

१ छ २३ रोज रविवार चतुरसिंग हिंदुस्थानात गेले तेव्हा जोतपूर, ज्यैपूर, उदेपुराकडे गेले असतील. तेथे राणाजी आपण येक याचे कसे जाले ते वृत बापू कान्हो फडणीस बराबर होते ती माहीतगारी लिहून आणविली. ती याद आली. ती व जगदेवराव जाधव याणी याद दिल्ही ती पाहून त्याजवरील कलमे उपयोगी निवडून काढून चिटणीस याकडून तयार करविली.

+ टीप—धाकटे शाहूची व पेशव्यांची लढाई स. १७९८ त झाली.

[23-7-1819

शके १४७ प्रमाथीनाम सवछरे सुा अशरीन मयातैन व अलफ माहे रमजान छ रोज ता माहे सवाल छ रोज ऊर्फ श्रावणमास मुा सातारा.

१ शुा २ शुक्रवार नंतर काही तसबिरा दाखविल्या त्या पाहून ठेवल्या. नंतर बोलला की मी मागेन त्या समई पाठऊन द्याव्या म्हणजे ममईस लाऊन देऊन. उतरून घेऊन त्या मावाऱ्या आणवितो. आणिक बोलिले की मुसलमान लोकानी तारीफ फार करून किताब लिहिली ती लबाड फार. हिंदूचे लिहिणे निमे खरे व निमे खोटे याप्रमाणे आहे. नंतर बादशाहाची नावे याची याद खुदब्यात लिहिणे आहे ती घेतली, ती पाहिली. त्याजवर हिंदु शक व पातशाही शक व कोणी पातशाहाने राज्य किती दिवस केले याप्रमाणे घेतली. ग्रांटानी व इलपिस्तनानी लाटास लिहिले की माहाराजाचे मनात सातारा किला नीट करावा. त्यानी उतर पाठविले की करावा. त्यातच लिहिणे की तेथे माहाराज कैदेत होते मग माहाराज याची मरजी का किल्यावर? किल्याचे नाव पहिले हुकेबैन हिंदूनी नाव सातारा ठेविले. शहराचे नाव शाहूनगर.

[25-7-1819

१ शुा ४ रविवार नित्य नेम करून तदनंतर भाऊसाहेब म्हाहुलीस जाऊन आले. बखर पहिली मूल शाहीचे पोरास वाचावयास दिली होती, ती पोरांनी पाहाऱ्यातून उतरून घेण्यास नेली होती ती चवकसीने आणली. नंतर दोन प्रहरी भोजन जाले. नंतर ऐकिले की इग्रजी बुकात लिहिले की सिवाजी राजे याचा वंश भोसाई म्हणोन उदेपूरकर यानी ठेविली तिचा वंश याप्रमाणे लिहिणे.

[6-8-1819

१ श्रावण वद्य १ भ्रुगुवार श्रावणी करून नित्यानेम सारून बालाजीपंतास बोलाविले होते ते कोडब्याचे बागेत गेले होते. नंतर ग्रांट बोलिले की लाव जाहाजे गेली तेव्हा ही धुरूची डबी+ जाली. तिकडील माणसानी केली तेव्हापासून आहे. ती माणसे मेली परतु त्याबराबरचे कुतरे आहे. तदनंतर बापू कानूचे पत्र आले की 'चतरसिंग जयपुरास व जोतपुरास मी उदेपुरास गेलो होतो. तेव्हा तिही जागे चतरसिंग गेले त्यानी चतरसिग याची मान्यता करून बोलले की सातारा व हे संथाने येकच म्हणोन राणाजी व चतरसिग येका गादीवर बसले. नंतर लेहून रात्रौ भोजन करून निद्रा जाली. कलम.

+ ध्रुवाची डबी=Mariner's Compass=होकायंत्र.

[15-8-1819

१ वद्य १० रविवार नित्यानेम करून ग्रांटाकडे असल याद बापू कानूकडून आली ती चतरसिंगबावा जेपुरास व मारवाडवाले याची भेटी होऊन वंशावळप्रकर्णी तपासिलाची आली ती दिली. ती समक्षच स्वाधेन केली.

¶*The above extracts from Pratapsinh's diary range over a period of five or six weeks and refer to the method and regard for truth and accuracy of Captain Grant Duff in collecting and verifying information about the history of the Marathas, a task which it seems from these papers, he had set before himself from the beginning of his appointment at Satara as Resident in 1818. Many knotty points were freely discussed and referred for explanation to Pratapsinh and his officials. How papers were traced and placed at the disposal of Grant is well illustrated in these papers, which certainly possess an interest of their own.*

No. 3] [*1820?*

श्री

सुभा धारवाड. सवाल.

कुणबीण व गुलाम प्रकर्णी सवाल.

१. किती जात पौ गुलाम बंदी आहेत?

ब्राम्हणखेरीजकरून वरकड इतर जातीचे गुलाम बंदी आहेत ते दुसऱ्याचे घरी ताबेदारी राहातात. धेड मांग यांत मात्र गुलाम बंदी बहुतकरून नाहीं. कारण की, त्या जातीचे मनुष्य इतर ऊंच जातीचे घरी राबावयास उपयोगी नाही सबब.

२. छिनाल्यात अथवा युध्धात धरिले ते, व आपराध केले ते, कर्जदारीत आले ते, व दुष्काळात खरिदी केले ते, व आपणच विकून घेतले ते, ऐसे लोक गुलाम होत आहेत किंवा नाहीत? यात जे गुलाम होत आहेत तो सरकारचा जाहालियास कैसे, लोकाचा जाहालियास कैसे? त्यानी जातीवार करण्याची चाकरी काम काय? देशमर्यादा करून उत्तर ल्याहावे.

बहुत करून या प्रांती पुरुषास गुलामगिरी प्राप्त होत नाही. आपले घरच्या कुणबिणीच्या पोटचा असल्यास गुलाम होतो, अथवा लाहान मूल क्षामात खरेदी केल्यास होतो. लस्करातून व छिनाल्यातून व कर्जदारीत किंवा आपराधाने व आपण विकून घेतले हे काही गुलाम बहुतकरून होत नाही. गुलाम झाले त्याणी घरचे काम जे हुकूम करतील ते, घोड्याची खिजमत व आपली खिजमत, घर सारवणे धुणे वगैरे जे काम पडेल ते व शेतकामसुधा करावे. बासनबर्तन

मांजणेसुधा. कुणबीण होणे ते छिनाल्यांत सापडल्यास क्वचित कोठे सरकारवाले कुणबीण करीत होते. लढाईतहि धरतात. दुष्काळात विकत घेतात. क्वचित आपणहि विकून घेतात. परंतु कर्जदारीत व आपराधात कुणबीण होत नाही. कुणबिणीने काम घर सारवण, भांडी घासणे धुणे धुवावे, शेतकाम करावे, गुराची चाकरी करावी व हरयेक पडले काम धणी हुकूम करील दलण कांडणसुधा करावे. येखादा धणी आपल्या इष्काकरितांहि ठेवितो. सरकारांत जाहाल्यासहि आसेच व लोकाचे घरी आसल्यासहि आसेच. परंतु बंदीची जात उंच आहे तरी बहुत करून नीच घरी राहात नाही. उंच घरी नीच जातीची राहिल्यास आपल्या नीच जातीच्याप्रो काम करावे. कदाचित उंच जातीची नीच जाती मुसलमान वगैरे याणी घेतल्यास जातिभ्रष्ट होऊन नीच जातीप्रो राहाती. हे बहुतकरून नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत चाल आहे.

३. छिनाल्यास बंदी करीत आहेत त्यास शास्त्र आहे किंवा जुलमाने बंदी करितात आणि कोणत्या जातीची जाहालिया बंदी होती? तिला विकतात किंवा नाही?

शूद्र वगैरे नीच जातीची छिनाल्यास सापडली असतां, तिच्या भ्रतारास, आगर तिजला दंड द्यावयास सामर्थ्य नसल्यास, विशेष प्रसिधीच्या ग्रहस्ताची नसल्यास, क्वचित कोठे येखादा मक्तेचा मामलदार कुणबीन करून कोठीत ठेऊन कोणास देत होता अथवा विकीत होता. यास शास्त्र नाही. जुलमाने कुणबीण करितात. शास्त्रांत कुणबीन करावी आसे नाही. काही दंड काही प्रायश्चित्त आसे आहे. त्यांत दंडायैवजी कुणबीन करतात जुलमाने.

४. लढाईत जबरदस्तीने धरतात किंवा सलुकाने दुसऱ्यास देतात? दोघेहि गुलाम. सारख्यात अधिकउणे आहे की काय?

१ ऐन कलम

२ लढाई जाल्यावर राज्यानें आपले देशास जाऊन पावल्यावर या गुलामास विकीत आहेत की नाही? कदाचित विकल्यास कोणते रीतीने विकितात?

३ येक राज्याने दुसरे राजाच्ये लोकास धरिल्यानंतर अमूक यैवज खंडणी देतो म्हटल्यास सोडण्यास मुखत्यार आहे की नाही?

३

लढाईत कोणी पुरुषास धरीत नाहीत व गावगना लुटीचे समईहि कोणी पुरुषास धरीत नाहीत. गावगना लुटीचे समई बायकास अगर मुलीस मात्र

धरून आणितात. परंतु सलुकाने देत नाहीत. बायका व मुली लुटून आणिल्या त्या कुणबिणी होतात. त्यास देशी अल्यावर विकतात. पुरुष कोणी सलुखाने बोलीकरिता देतात अथवा मातबर पाहून बोली धरून आणितात. हे काही गुलामासारखे नव्हेत. बोली धरून नेल्यास देशी गेल्यावर विकीत नाहीत. बोलीच्या खंडाचा यैवज आल्यावर सोडतात.

५. जो अपराधामुळे गुलाम होत आहे तो कोणत्या आपराधाने गुलाम होतो व कोणत्या जातीचा?

१ ऐन कलम.

२ आपराधाने जो गुलाम होत आहे त्याचे पुत्रपौत्र गुलाम होतात की काय? दुसरे तऱ्हेने जाहालेला गुलाम व हा गुलाम मध्यम जातीत सुधा नून्याधिक्य काय आहे? जसे असेल तसे ल्याहावे.

कोणत्याहि आपराधामुळे गुलाम होत नाही, तेव्हा त्याचे पुत्रपौत्र गुलाम कोठून होतील? गुलाम होतो तो कुणबीन ज्याचे खरीदीची अगर लुटून आणिलेली आथवा कोणी ब्रक्षीस दिल्हेली आसेल तिच्या पोटी होईल तो मात्र एकच पिढी त्या घरचा गुलाम होय. त्याची जात जी त्याचे आईची जात तीच त्या गुलामाची जात होय.

६ व्यभिचाराशिवाय दुसरा आपराध् केला ती बायको कुणबीण होत आसे की नाही?

दुसऱ्या अपराधाने कुणबीण होत नाही. लुटून आणिल्यास मात्र होतात आथवा दुष्काळात आईबाप वगैरेकडून खरेदी केल्यास होतात कदाचित व्यभिचारामुळे होतात.

७ कर्ज घेणाराने देणाराचा गुलाम जाल्यावर त्यास सिक्षा करण्यास किंवा चाकरी घेऊन कर्ज फेडून घेण्यास मुखत्यारी आहे की नाही? अगर ता+उमर पुत्रपौत्र गुलामगिरी करितात की केसे? यात स्त्री पुरुष असल्यास नूनाधिक्य जे असेल ते लिहावे.

१ ऐन.

२ कर्जात चाकरी करीत आसता मृत्य पावल्यावर त्याचे पुत्रपौत्राने चाकरी करून अगर कर्ज वारण्यास व मालकाने घेण्यास उभयेतांस मुखत्यारी आहे की नाही?

+ तहाउमर = जन्मभर.

कर्ज घेणार गुलाम होत नाही. कोणी चाकरी करून फेडतात त्यास सिक्षा नि:कारण नाही. त्याजकडून चाकरी घेऊन कर्ज फेडून घेण्याची मुखत्यारी बहुतकरून साहुकाराची नाही. कुळाचे राजीने चाकरी कबूल केल्यास होती. कर्जात ताउमर पुत्रपौत्रादी गुलामगिरी करीत नाहीत. पुरुषहि नाही व कर्जातहि स्त्री कुणबीण होत नाही. कर्जात चाकरी करीत असता मृत्य पावल्यावर त्याचे पुत्राने बहुतकरून चाकरी करीत नाही व गुलामगिरी तर नाहीच. क्वचित कर्ज मात्र कोणी पुत्र वारतो व त्याचे पुत्रावर साहुकाराची मुखत्यारी चाकरी घेण्याविसी चालत नाही. रो मात्र मागावे, दिल्यास घ्यावे.

८ सरकारास बाकी देणेबाबत गुलाम होत आहेत की नाही ? अगर जाहाल्यास दुसरे गुलामाबरोबर याची योग्यता की कमजाजती?

सरकारच्या बाकीत गुलामच होत नाहीं, मग दुसरे तऱ्हेचा गुलामाबरोबर कोठून असेल ?

९ कोणते लोक आपल्या पुत्रास आगर कोणास दुषकाळांत अगर यखादे समई विकितात की नाही ? कोणी लोक दुसऱ्यास विकले ते देशमर्यादास विरुद्ध जाल्यास शिक्षा कोणी करावी? आशाकडून यैवज माघारा घेऊन गुलामास सोडावे की नाही? जो विकतो तोच गुला(म)गिरी करण्याचे योग्य आहे की कैसे आणि विकलेल्या शक्शास[१] यैवज द्यावा तरी त्राण नसल्यास गुलाम आणि खरेदी करणारानी काय करावें ?

शूद्र वगैरे नीच ज्ञातीचे मुलास दुष्काळात वगैरे त्याचे आईबाप विकतात. देशमर्यादेकरून विरुद्ध पडल्यास सिक्षा कोणी करावी? ज्ञातीवाले याणी आपणहि करावी व सरकार सांगूनहि करवावी. आशाकडून यैवज परत घेऊन मुलास अगर मुलीस सोडितात. यैवज देण्यास त्राण नसल्यास उभयतानी काय करावे? सोडणार माकूल माणस आहे तरी तो बिनपैक्यानें सोडतो अथवा ज्ञातीचे लेकरू ज्ञातीत यावे सबब मूल जाले नाही तोपर्यंत मुलीस ज्ञातीवाले पैका वरगत करून देऊन सोडवितात, आगर मुलीचे मायबापाचे वारस सोडवितात आणि लग्न लाऊन देतात. गुलाम तर या प्रांती खरेदी विकरी फारसी होत नाही.

१०. दुष्काळात अगर यखादे समई खरेदी केले त्याचा पैका हरकोणी ज्यातीवाले याणी आणून दिल्हे असता मालिकाने सोडून द्यावयास मुख्त्यारी आहे की नाहीं ?

सोडावयास मुख्त्यारी आहे.

---

१ शकस, शखस = माणूस.

११ कोणत्या गुलामास ऐवज घेऊन सोडावे, कोणत्यास नाही. चौवे न्यातीवाले यांची भीड पडली असता जातीचे लेकरू जातीत जाते म्हणोन सोडावे. कुणबिणीस मूल जाल्यावर कोणी सोडऊन नेत नाही.

१२. ऐवज घेऊन सोडिल्यानंतर तिचा पुत्र गुलामगिरीत असावा किंवा नाही? त्याणे गुलाम होत नसल्यास कोणते तऱ्हेचा पुत्र गुलाम होतो?

कुणबीण आपले घरी आल्यानंतर पुत्र जाहाला तर त्या कुणबिणीस सोड दिल्ही अथवा विकली तिचा पुत्र दाहा वर्षावर आहे तरी सोडते अगर विकते वेलेस करार असेल तसे करावे. त्या गुलामाचा पुत्र तो पुढे केवल गुलामगिरीमधी राहात नाही.

१३ ताउमर गुलामगिरीस कबूल केला ते आपले लेक आणि समंधिकास बदली देतो म्हटले असतां त्यास सोडावयाचे आहे की नाही?

बहुतकरूनं सोडावयाची चाल आहे.

१४ गुलाम पळून गेल्यास किती वर्षाचे आंत सापडल्यास मालीक मुक्त्यार व किती वर्षानंतर नाही? जातीपैकी कमजाजती असल्यास ल्याहावे.

जेव्हा सापडेल तेव्हा मालीक मुक्त्यार आहे. परंतु बहुत वर्षे जाहाली, त्याचे खाणे वगैरे परभारे होऊन तो थोर जाहाला याजमुळे भरपूर मुक्त्यारी चालत नाही. नीच ज्ञातीस त्याचे भोजन वगैरे न जाहाल्यास जातींत फरक नाही. कुणबीण असल्यास भोजनात संपर्ग जाहाला नाही व स्त्रीत्व प्राप्त जाहाले नाही तोपर्यंत जातीत कमी नाही.

१५ गुलामास दुसऱ्याचा माल हरयेक निमित्ये मिळतो त्यात आपले धण्यास त्याणे किती हिसा द्यावा? कोणी तरी मरत्येसमई आपले माल पौ अमूक गुलामास रो द्यावे म्हणोन वशियतनामा लिहून दिल्हा असतां त्या खावंदाच्या मालास वारस हा होतो किंव्हां किती मालास होतो. २. अदालत कोडतात फिर्याद करणे व वकिली व पंचाईत अशा कामास गुलाम मुक्त्यारी करितो की नाही? असे काम न केल्यास कोण ते काम करीत आसे? ३. गुलाम मेल्यास त्याचा वारस कोण? ४ मालिक पाहिजे तेव्हा सोडावे म्हटल्यास गुलामाने धण्यास सोडू सकत आहे की नाही? मालिक जिवंत असता मर्त्येसमई गुलामास सोडचिठी देऊन मुक्तता करितो की नाही? मुक्तता केली असता मालिकाचे लेकास व गुलामाचे लेकास काही इलाखा आहे की नाही?

गुलामास माल मिळाला तो बहुतकरून त्याचा धणी घेत नाही. कलम १. धण्यानी अमूक रोविसी वसियतनामा[1] गुलामास लिहून दिल्यास तितक्या रोचा मालक गुलाम होईल. साऱ्या मालास मालक होणार नाही. शूद्रात वगैरे वारस दुसरा नसल्यास हा वारस साऱ्या मालास होईल; परंतु पोटचा असल्यास. कलम २. आदालतीत फिर्याद करणे व वकिली करणे, यास हा ल्यायक असल्यास मुखत्यारी करितो. गैरल्यायक असल्यास घरसंसार खिजमतगारी वगैरे करितो. ३. गुलाम मेल्यास वारस धणी होय. ४. मालिकाने पाहिजे तेव्हा सोडावे म्हटल्यास घडेल. परंतु गुलामाने धण्यास सोडू लागल्यास धण्याची मर्जी, गुलामाची मुखत्यारी नाही. ५, मालक मरतेसमई गुलामास सोडचिठी देऊन मुक्तता करतो की नाही? मर्जी अल्यास सोडचिठी देऊन मुक्तता करतो. मुक्तता केल्यानंतर धण्याचे पुत्रास व गुलामाचे पुत्रास काही इलाखा[2] नाही.

१६. येका गुलामास धण्यानें सोडिले असता पुन्हा हरयेक अफतीमुळे गुलाम धण्याकडे आला असतां धणी गुलामगिरीत ठेऊन घेत आहे की नाही? किंवा बोलावणेच जरूर? नाही जर बोलावणे केले तर पहिल्याप्रो असावे की काही अधिक उणे आहे?

सोडिले असता पुन्हा आल्यास ठेवितो तो पुन्हा पहिल्याप्रो राहातो. अधिक-उणे नाही.

१७. लोकाच्या गुलामास सरकार सोडवील की नाही? जर सोडवील तर सबब कोणत्याने सोडवील?

बहुतकरून सरकार सोडवीत नाही. जर सोडवील तर काही गैरअन्यायाने अगर जब्रीने गुलामगिरीत आणिले आसल्यास सोडवील.

१८. गुलामाचा लेक मालिकाचे घरी आपले बापाप्रो आसतो की नाही? किंवा काही तफावत आहे?

इमानी आहे तो बापाप्रो असतो. परंतु मालिकाच्या घरी आसल्यास बापाप्रो आसतो. परंतु बिघडून बाहेर गेल्यास मग काही नसतो.

१९. धण्याने केव्हा तरी इरादा केल्यास विकू सकत आहे की नाही?

कुणबिणीच्या पोटचा आहे त्यास धणी येखादेसमई विकू सकेल. परंतु गुलामास विकू सकेल. केवल गुलामाचे पुत्रास विकू सकणार नाही.

२०. गुलाम शिपाईगिरीचे काम कधी तरी करू सकत आहे वा नाही?

करू सकत आहे.

---

१ मृत्युपत्र. २ संबंध.

7347

२१. येका गुलामानें दुसरा गुलाम खरेदी करतो की नाही ?

खरेदी केला असता त्याणे काही द्रव्य मिळविले ते आपल्या धण्यास काही द्यावयाचे आहे की अगदी देऊ नये ?

गुलामाजवळ पैका असल्यास दुसरा गुलाम खरेदी करीत आहे. जो खरेदी केला त्याणे पैका मिळविल्यास आपल्या खावंदास त्यातून काही देत नाही.

२२. गुलामाचे कर्जास अथवा गुलामानें तकसीर+ केल्यास धणी जबाबदार आहे की नाही.

धणी कर्जासहि जबाबदार नाही व तकसीरीसहि जबाबदार नाही.

२३. कुणबिणी व गुलामाविसी पहिल्या चालीस व हालीच्या चालीस कमजाजती आसल्यास लिहावे.

पहिली चाल धणी मुखत्यार. हालीच्या इंग्रजी सरकारच्या सिरस्त्यामुळे कोठे कोठे फिर्याद अगर नाबनावामुळे बहुतकरून धण्याचा जोर कुणबीण व गुलामावर चालत नाही.

२४. धण्यावर गुलामानें मुखत्यारीने फिर्यादी करू सकत आहे की नाही ?

पहिली चाल आसी होती की धण्यावर गुलाम वा कुणबीण फिर्याद करीत नवती. हाली कोठे क्वचित फिर्यादी करतात.

२५. गुलाम म्हातारा जाल्यास अगर काम न करीसा जाहाल्यास मालिक सोडीत आहे की मारून टाकीत आहे की नाही ? ते न केल्यास आणखी काय करितो ? गुलामास धण्यानें कोणत्या प्रकारे अन्नवस्त्र देत नाही ?

म्हातारा जाल्यास ल्यायक धणी आहे तो घरबसल्या अन्नवस्त्र पोचवितो परंतु सोडून देत नाही. बदमस्तीनें काम न करीत तर जेरबंदीने मारितो. चांगल्या रीतीने न वागल्यास घालऊन देतो, परंतु जिवानिसी कोणी मारीत नाही. सोडून देण्याचा प्रकार तरी गुलामाने बदमस्तीने काम न केल्यास आगर चोरी करू लागल्यास आगर धण्यास त्याचे पोषणास सामर्थ्य नसल्यास, इतक्या प्रकारे धणी गुलामास सोडून देत आहेत.

२६. गुलाम व कुणबिणीसिवाय दुसऱ्या स्त्रीस विवाह केल्यानंतर तिचा पुत्र गुलाम होतो की नाही ? गुलाम जाल्यास कोणाचा होत आहे आणि कुणबिणीस दुसरे कोणी मुखत्यार षक्स याणे लग्न करून घेतले आसतां तिचा पुत्र गुलाम होत आहे की नाही ? जाहाल्यास कोणाचा गुलाम होत आहे ? आणि गुलाम व बंदी दोघेहि लग्न न करितां दुसऱ्याची सोबत केल्यास त्याला पुत्र जाहाल्यास कसे ? सदरीअन्वये काही तफावत आसल्यास तेहि ल्याहावे.

+ अपराध.

विवाह जाल्यानंतर तिला पुत्र जाला तो गुलाम म्हाणोन होत नाही. पुत्र मालकच होतो. कुणबिणीचे लग्न जाले आसता तिला पुत्र जाला तो काही गुलाम नव्हे, ज्यासी लग्न लागले त्याचा पुत्र होय. कुणबिणीने दुसऱ्याची सोबत केलीन, लग्न जाले नाही ; पुत्र जाला तो ज्याची सोबत केली त्याचा पुत्र नव्हे, कुणबिणीच्या मालकाचा गुलाम होय. गुलामाने दुसऱ्या स्त्रीसी सोबत केली, लग्न जाले नवते, त्यास पुत्र जाला तो गुलामाचा नव्हे. जिच्या पोटी उत्पन्न जाला तिचा पुत्र होय. याप्राो

२७. राखेचा पुत्र गुलाम होतो की नाही ?

त्या पुत्राची जात मात्र गुलाम. परंतु ज्या पुरुषापासून उत्पन्न जाला त्या पुरुषाचा गुलाम नव्हे. तिचा पुत्र, त्यास मालक तो नव्हे ; ती मालक.

२८. येक जमीन येका गुलामास पोटाकरितां दिल्ही. त्या जमिनीचा मालक दुसरे ठिकाणी गेला. त्या समागमे गुलाम जातो की नाही ? अथवा त्या जमिनीस मालक दुसरा कोणी अला तरी ती जमीन आपण करून आसतो की कसे ? दुसरे गुलामास व या गुलामास काही तफावत असल्यास ल्याहावे.

मालक दुसऱ्या ठिकाणी गेल्यास गुलामास बरोबर नेण्यास अगर शेतावर ठेवण्यास मुखत्यार मालक होय. मालक गुलाम नव्हे. कदाचित ठेवल्या जमिनीस मालक मिरासदार दुसरा आल्यास बहुतकरून हा गुलाम ती जमीन सोडणार नाही. इनाम असल्यास तो जफ्त होऊन दुसरा सरकार आगर इनामदारच दुसरा आल्यास मुखत्यारी नव्या इनामदाराकडे आगर सरकारात जमीन आसल्यास सरकारकडे. परंतु गुलामाच्या धण्याचे हुकमाप्राो गुलामाने वागावे. शेतजमीनवाला गुलाम व घरकामकरी गुलाम, दोघांत फरक नाही.

२९. वाटेत वारस कोणी नसता जे मूल सापडले ते ज्यास सापडेल त्याचे गुलाम होतो किंवा दुसऱ्याचे ?

ज्यास सापडले त्याचे अगर पाळण जो करील त्याचे गुलाम. याखेरीज तिसऱ्याचे नाही.

३०. सापडल्या मुलास सरकारने किंवा हरकोणी ठेविल्यानंतर वारसानी वोलखल्यास किती दिवसाचे अत आल्यास सोडावे ? न सोडावे किती रोजानंतर ? आणि मुलाचे तमाम समंधीक अले तरी सोडावे किंवा आईबाप अले तरी सोडावे कसे ? मुदतीच्या आत वारस आल्यास पोटखर्च काय घेऊन सोडावे ?

मुलीस मूल होई तोपर्यंत सोडवितात. मुलास थोर होई, पंधरा वर्षाचा होई तोपर्यंत सोडवितात. मुलाचा कोणीहि वारस आगर ज्ञातीवाला आला तरी सोडावे. पोटखर्च घेऊन सोडविण्याचा मार, कालदेशवर्तमान पाहून, चौघे रदबदली करून, जातीचे लेकरू जातीत जावे हेहि मालकाच्या मनातून, काही त्यायकीवर द्रिष्ट देऊन, पोटखर्च पौ निमेनिम अजमासे सुमार पाहून घेऊन सोडून देतात.

¶*The paper contains a detailed inquiry into the practice of indigenous slavery in the Deccan. The paper is of great social importance.*

No. 4] [*21-9-1821*

श्री

जाहिरनामा सरकार दौलत मदार कंपनी इंग्रज बाहादर सुाा इसने अशेरीन मया तैन व अलफ. तमाम ब्राम्हण लोकास जाहीर व्हावयाकरिता लिहिणेत येत आहे जे:— कुंपणी सरकारची मर्जी आहे की या मुलकात ब्राम्हण लोक बहुत आहेत. विद्या पढून पंडित व्हावे म्हणून, ऐशास शहर पुणे येथे विश्रामबागेचा वाडा पाठशालेस नेमून विद्या पढवणेस शास्त्री वैदिक वगैरेस नेमिले आहे. विद्या पढवणे पढणेचा वगैरे तपसील:

१ पाठशालेत विद्या पढवणेचा तपसील.

८ शास्त्र

१ वैयाकरण

१ अलंकारशास्त्र काव्यदेखील.

१ न्यायशास्त्र

२ वेदांत

१ अद्वैत

१ द्वैत

२

१ वैद्यशास्त्र

१ ज्योतीष

१ धर्मशास्त्र

८

7350

३ वेद

१ ऋगवेद

२ यजुर्वेद

१ आपस्तंभ

१ माध्यांदिन

―――

२

―――

३

―――

११

याप्रमाणे विद्या पढवणेस वैदिक शास्त्री यास नेमिले आहे, त्याणी पढवितील.

२ पढणार लोक जितके येतील तितक्यास विद्याभ्यास जे पाहिजे ते पढवावे. विद्या वाढावयाकरिता अनुत्पन्न पाहून पढणार शंभर विद्यार्थ्यास सरकारातून दरमाहा रूपये ५ प्रो खर्चास पोटाकरिता मिळेल.

३ विद्या पढणेस लोक जे येणार ते आस्विन सुध २ चे दिवसी सर्वत्रानी दफ्तरचे वाड्यामध्ये दाहा घटिका दिवसास प्रात:काली हजर व्हावें. ज्यास जे विद्या अपेक्षा आहे ते पढवणेस नेमणेत येईल. सुध ५ दिवसापासून पढवणेस प्रारंभ होईल.

४ पढवणार व पढणारसुधा वर्तणूक करणेस विद्याअभ्यास अधिकोतर जसे जसे करितील तसे त्यास दक्षणा अधिक मिळेल. न्याय ज्योतिष वैद्यशास्त्रास जाजती दक्षणा मिळेल; म्हणोन ऐसे वर्तणूक करणेविषई कितेक कलमाची याद निराली लिहिली आहे, त्याप्रमाणे वर्तणूक करणेत यावे.

येकूण च्यार कलमे लिहिली आहेत. तारिख २१ माहे सतंबर सन १८२१ इसवी मुतावल छ २३ जिल्हेज.

¶*A proclamation is issued that a Sanskrit Pathshala will be opened at the Vishrambag Palace and the Brahmins are asked to take advantage of the same.*

No. 5] [*5-10-1821*

१५-१०-१८२०—५-१०-१८२१.

"छत्रपति प्रतापसिंह याचे रोजनिशींतील उतारे."

शके १७४२

आश्विन शुद्ध १३ शुक्रवार शके १७४२, १९-१०-१८२० खेडचे बागेतून येताना विनंती केली संत्रीनें, इंग्रजाचे लषकरचा येऊन बोलला कीं खेडचे बागेत बैरागी

होता तो लष्करात फिरावयास गेला तो इंग्रजाचे लषकरात गाई मारताने पाहिले. मारणार यास बोलला की गाई मारू नको व जरा रागेहि भरला. सबब बैरागी यास मारणार याणी पाहाऱ्यात बसविला. हेहि खंडू सिंदे याचे हातून लिटिल साहेब याजकडे सांगून पाठविले की येथे गाई मारणे हे नाही. कंपिणी सरकारचा हुकूम व लागले तरी बाहीरून आणावे असे ग्रांटास पुसले. ते बोले व त्याणी हुकूम दिला की जो मारील त्यास धरून आणावा म्हणजे पारिपत्य करू. त्यावरून ज़ान लिटिल साहेबाकडे सांगून पाठविले. त्याणी सांगितले की बंदोबस्त करून सोडवितो. हा मजकूर खंडू सिंदे याने कळविला.

मार्गसीर्ष शुा १४ शनवार शके १७४२, ९-१२-१८२० विठोबाचे व ग्रांटाचे बोलणे जाहाले ती कलमे. तात्या आभ्यंकर व बलवंतराव चिटणीस व कृष्णराव हे पयेका खातात व कोणाचे म्हाराजाचे म्हणजे काम चांगले करावेसे नाही. पयेका मेळवावा हे म्हाराजास ठाऊक आहे किंवा नाहीं? विठोबा बोले की ठाऊक आहे. मग ग्रांट बोलले की ठाऊक असून माहाराज का चवकसी करून ठेऊ नयेत? व माजे हुकुमनाम्यात आहे की आसी माणसे माहाराजानी ठेऊ नये याजकरिता बहुत चवकसी करीत नाही. मग ग्रांट बोले की विठलपंत तुम्ही व माहाराजाचे काम म्हाराजा करतील परंतु मग कोणी नाही. कृष्णराव ठेवणे नाही. परंतु हे पुण्याचे लोकास व चितपावनास दाबाकरिता ठेवणे. येशवंतराव सरसुभेदाराचा पयेका खाणार नाही, परंतु कंपिणी सरकाराची जरब लबाडकीची दाखऊन जरब ठेवील मग चांगला आहे हा बेत त्याचा ठेवावा. दाजीबा सरसुभेदार चांगला आहे परंतु कसा करील हा भरवसा नाही व म्हाराजाचे जवल चिंतोपंत भाटे आहे तोहि पयका खातो.

माघ वद्य ३ सोमवार शके १७४२, (१९-२-१८२१.) हाली कंपिणिसरकारात साहेबलोक कामगार आहेत व शाहाणे असे कोणी नोहते. हाली मध्ये हे तीन आधिक, आलपिष्टण व मंड्रूरसाहेब+ व हल्ली जो लाट कलकत्यास आहेत. पहिले साहेबलोक होते त्याणी सरकारी काम करावे व आपणहि पयेका मेलवावा जावे. चार वर्षाचे मागे आलिपिष्टणपासी जे रसूल साहेब होता त्याचे वडील भाऊ त्याचे नावे रसूलसाहेब हे नवाब हाद्राबाजवाले याचेकडेस कंपिणीसरकारातून वकिलीस होते. त्याणी कार्य केले की नबाबाचे मर्जीने आपले काम संभाळून आषआराम केला व केले तरी चिंता नाही, परंतु मेहनत केली नाही. पयेका मेळऊन बारा पंधरा लाख रु. मेळऊन गेले. त्याणी पहिले साहेबाचे चाली प्रो केले. याप्रो ग्रांट बोले समक्ष.

ग्रांट बोले की गुजरातीचे रयेतपासून फार पैका घेतात. बंदोबस्ती कडक नीट नाही कंपणीसरकारचे साहेब लोकाकडून. मग आमी बोलो. नानाफडणीस म्हादजी

+ Munro.

सिंद व निजाम अलीखान हैदरखान आसे जरी शाहाणे तालीवार आणिक फार होते, तरी मुलकाचा बंदोबस्त हाली कंपीनी सरकाराप्रो नहोता. ग्रांट बोले हे खरे परंतु हे शाहाणेच होते. कलम

फाल्गुन वा। ३० सोमवार शके १७४२, २-४-१८२१

ग्रांटाची गाठ पडली तेव्हा ग्रांट बोले की बाजीराव फार लबाड आहे. त्यास मालकणसाहेब किंवा आलिपिष्टणसाहिब या दोघांतून येकाची गाठ पडली, सबब नेमणूक इतकी जाहाली. आमची आथवा कोणते साहेबाची गाठ पडली आसती तर फार कमी करिते नेमणूक. या प्रो ग्राट समक्ष बोले. कलम

चैत्र शु। ७ सोमवार शके १७४३, ८-४-१८२१

रामजन्म होऊन मग घोडी फेरून मग आलो. वाटेस पलटणचे साहेब दोघे आले, वाड्यातील बेत पाहिला. पाचवे पलटणचे मेजर त्याजपासी असतो. आपण तिकडे येत जावे व फारच बोले भाषणे दोस्तीने व बोलले की आम्हास नाच हिकडले मुलकाचा चांगला लागतो, येक वेला दाखवणे; व आम्हासहि विषयेयास[1] बायेकू पाहिजे. जर पैका आसता तरी लग्नच केले आसते. नाही सबब दुसरेया बायेका पाहिजेत. मग गेले. कलम

२-४-१८२१

विठोबापासी येका चपरासियाणे कलविले की कासीपंत बंद्रे पाटेस चोरून ग्राटाकडे जातात, बातमी आमची कलवितात. कलम

२९-४-१८२१

विठोबापासी पारगावकर सावकार पालीत राहात असतो. त्याणे येऊन कलविले की वॉरणसाहेब व येशवंतराव सरसुभेदार हे चवकसीर आले होते ते वेलेस पारगावकर याणे आपले घरी वारणसाहेब आणला. पानसुपारी देऊन गेले ते वेलेस त्याची घरची कुणबीन ईस नलात बोलाऊन पंचवीस रुा दिल्हे. तिचे संगे बदकर्म केले हे विठोबानी कलविले. जबर, कोणी बोलावे, सबब बोले नाहीत.

३०-४-१८२१

विठोबानी कलविले की साहेब लोक शहरात येऊन रस्त्याने माणसास कमची मारतात व बुगी कलावंतीन इच्या पोरी आहेत त्याजला बोलावीत होते आसे आहे. त्यास ताकीद करावी याप्रो म्हाराजानी सांगितले. मग ग्रांट बोले की करनेलसाहेब यास ताकीद करून ताकीद करवितो. याप्रो ग्रांट बोले म्हणून विठोबानी कलविले. कलम

---

[1] इस्कास.

७-५-१८२१

बायकास परस्परे घरात पुरुषाने आथवा बायकास बायकानी दस्तुराप्रो रागे भरले आथवा दाब दिल्हा तरी याजवर बायका जीव देतात, त्या बायकोचा मुरदा नागवा करून झाडास टांगावा. पुढील इंद्रियात काही खोऊन ठेवावे म्हणंजे आबरूस भिऊन बायका फार जीव देणार नाहीत. याप्रो जाहिरनामे करावे म्हणजे दस्तुर ठीक चालेल. परंतु ग्रांट बोलिले की आदालतीत सर्व मंडलीचे देखत हे कलम बोलणे म्हणजे सर्वास चांगले दिलात आले तरी जाहीरनामा करावे. कलम.

¶*These are a few extracts from a year's Diary kept by Pratapsinh, in which are reported conversations that took place between him and Captain Grant the Resident. The topics discussed are various and interesting, and relate to social and administrative matters. The reflections cast on society and customs prevalent in those days will be found instructive.*

No. 6] *[6-10-1821*

श्री

यादी पाठशाले प्रकर्णी कलमे सुरू संन इसने अशरीन मया तैन व अलफ सन १८२१ इसवी माहे अकटोबर ऊर्फ मोहरम अश्विनमास

१ हिंदुलोकाची आबादी व खुषी ठेवावयाचा इंग्रजी सरकारचा सांप्रदाय पहिल्यापासून आहे. यास्तव माहाराष्ट्र दक्षणेचे मुलकास विद्या पढावयाकरिता व ब्राह्मण ज्ञातीत अध्ययन पूर्वीपासून चालत आल्याप्रमाणें होत असावे याजकरिता गौनर साहेब बाहादर याणी विद्या कायम राहावयावर नजर ठेऊन शहर पुणे येथे पाठशाला चालवावयाचा निश्चय केला असे.

२ सदरहू हुकूम अमलात आणण्याविषई कमिशनर बाहादर याणी पाठशालेस आरंभ ६ आकटोबर तेरखेस करून दक्षणेस थोर ब्राह्मण विद्यान आहेत त्यापैकी अध्ययन सागण्यास गुरूची नेमणूक केली.

३ वैदिक

१ ऋग्वेदी विठलभट फाटक

२ यजुर्वेदी

१ आपस्तंब शाखा माहादेवभट

१ मध्यंदीन मेघश्याम पाठक

२

३

७ शास्त्र

१ वैयांकर्ण
१ अलंकार नाटक अनंताच्यार्य
१ न्याय रावत्राच्यार्य
१ धर्मशास्त्र
१ ज्योतिष
१ वेदांत रांघवाच्यार्य
१ वैद्य

—
७

—
१०

सदरहू दाहा आसामीपैकी येक मुख्तसर शास्त्री केले आहेत व याशिवाय गुरूस मेहेनत भारी होईल सबब चिंतणिका सागणारहि् मुकरर केले आहेत.

३ हर कोणी संभावितांचे पुत्र विद्याभ्यास करण्याची उमेद ठेऊन पाठशालेस येतील त्यास काही खर्च न लागता अध्ययन सागण्याची परवानगी होईल. परतु विद्याभ्यासाची बहडती होण्याकरिता सरकारातून शंभर विद्यार्थी यांस हर येकास दर माहा पाच रुपये पोटगीबद्दल दिल्हे जातील व सदरहू शंभर विद्यार्थी याची हरयेक विद्येस दाहा विद्यार्थी याप्रो नेमणूक होईल.

४ सरकारचा मनसबा असा आहे की जे गरीब लोकाचे मूल विद्याभ्यास करणार परंतु त्यास घरी पोषण करावयाचे सामर्थ नाही असे जे असतील ते ठेवावे. गुरूनी मेहेनत केली असता जे तरबेत होतील, गुरूची मेहनत व्यर्थ जाणार नाही असे असावे. त्यांची परीक्षा पाहावी. दाहा वर्षापासून अठरा वर्षांचे उमरीपर्यंत असतील आणि विद्येत प्रवेश जाला असेल ते ठेवावे, म्हणजे गुरूनी मेहेनत केल्याचे व विद्यार्थी याणी अध्ययन केल्याचे स्वरूप होईल.

५ गुरूस उतम प्रकारची नेमणूक केली आहे. त्यास त्यांचे काम हेच आहे की, विद्यार्थी यांस अध्ययन सागोन त्यांची वागणुकीची चौकसी करीत असावे व हरवख्त त्यास चागला बुध्यीवाद सिकवीत असावे. गुरु सरकारचे इलाकेदा[२]र असे समजून हिंदुधर्माविसी यकाधे वेळेस कारण पडेल तेव्हा शास्त्रार्थ सरकारातून पुसतील त्याचे उतर गुरूनी वास्तविक

---

१ हा शब्द खोडला आहे. २ तांबेदार.

देत असावे. सरकारातून गुरूवर इतबार ठेविला आहे त्यापेक्षा जे काम ज्यास सोपिले आहे त्याची निभावणी खातरजमेने करून आपले लौकिकाची वृध्धी होईल ते करीत असावे म्हणजे त्याचे भूषण कमिशनर बाहादर सरकारांत जाहीर करतील. चाल सोडून चालल्यास तेहि जलदीने सरकारांत समजेल हे त्यांचे मनात असावे.

६ विद्यार्थी जोपर्यंत पाठशालेत कायद्याप्रो वागून आपले अध्ययनाची अभिवृध्धी करीत जातील त्यास पोटगीची नेमणूक करून दिल्ही आहे ती त्याचे अध्ययन पुर्ते होइतोपर्यंत निर्वेध चालेल; परंतु जरकरिता दर्म्यान गैरकायद्याची वर्तणूक किंवा गुरूचे हुकुमाचा अपमान अथवा आपले अध्ययनास आलस्य ऐसे वास्तविक समजोन आल्यास बाहेर काढून दिल्हे जाईल, व कोणी विद्यार्थी यास आपले विद्येची अभिवृध्धी होईना तर वर्ष दोन वर्षे त्याची परीक्षा पाहून त्याची बुध्धी अध्ययनात न चाले तरी पाठशालेतून मौकूफ केले जाईल.

७ वर्षास येक वेल पाठशालेचे चौकसीस सरदार लोक येतील. ते विद्यार्थी लोकाची परीक्षा मोठे मोठे विद्वान ब्राह्मणाचे हातून करवितील. त्यात जे चांगले नजरेस येतील त्याची सिपारस होऊन दक्षणेसमई प्रतिष्ठा उतम होईल. वेदशास्त्रामध्ये जे हिंदू लोकानी पाहावयाचे असेल ते त्याणीच पाहावे. यासिवाय आणखी चौकसीची कलमे असतील ती सरदार पाहातील. पाठशालेत विद्यार्थी राहातील त्याणी अध्ययन किती वर्षानी संपूर्ण करावे याची मर्यादा,

१ जे विद्यार्थी अठरा वर्षाचे वयाचे आहेत त्याणी सात वर्षात विद्या करावी.

१ जे विद्यार्थी सत्रा वर्षे सोला वर्षे वयाचे आहेत त्याणी आठा वर्षांत विद्या करावी.

१ जे विद्यार्थी पंधरा वर्षे चौदा वर्षे तेरा वर्षे वयाचे आहेत त्याणी नऊ वर्षात विद्या करावी.

१ जे विद्यार्थी बारा वर्षे अकरा वर्षे दाहा वर्षे वयाचे आहेत त्याणी दाहा वर्षात विद्या करावी.

४

येणेप्रमाणे नेम केला असे. त्याप्रो ज्याचे त्याचे वयाप्रो विद्या संपूर्ण जाली म्हणजे पोटगीची नेमणूक मौकूफ होईल, परंतु दक्षणा त्यांचे योग्यते-

प्रो सरकारांतून ठरेल ती पावत जाईल. ज्या विद्येत त्याचा परिश्रम जाला असेल त्यासारखे सरकारातून कामकाज कारण पडल्यास सागितले जाईल.

८ विद्यार्थी याणी कोणतेहि विद्येचा अभ्यास करावा. त्याविसी सरकारांतून कोणताहि नेम होऊन येणार नाही. परंतु पाठशालेत विद्यार्थी शंभर त्यापैकी सतर शास्त्राकडे, तीस वैदिक याप्रो येकूण दाहा शाला. येकेके शालेस दाहा दाहा विद्यार्थी असावे. इतका नेम सरकारांतून जाला. विद्यार्थी यास यातून जी विद्या पाहिजे ती पढावी, परंतु धर्मशास्त्र व ज्योतिषशास्त्र व वैद्यशास्त्र याचा उपयोग वारंवार सर्व लोकास आहे, याजकरिता याचा अभ्यास अधिकोतर करून जे चागले होतील त्यांची प्रशंसा होऊन बक्षीस मिळेल.

९ पाठशालेची व्यवस्था मुख्य सर शास्त्री व दुसरे गुरू याजकडे सोपून दिल्ही. त्याणी आपलाले कामाचा बंदोबस्त ठेवावा. सरकारांतून तो बंदोबस्त पाहू लागल्यास हिंदुधर्मास विरोध दिसेल. याजकरिता पाहाणार नाही. शास्त्री व गुरू पाठशालेत विद्यार्थी याचे वहिवाटीकरिता चकनामे करितील त्याप्रो गुरूनी व विद्यार्थी याणी वागत असावे. त्यात ज्याकडून काहीयेक अतर पडेल त्यावर सरकारची गैरमर्जी होऊन पाठशालेतून मौकूफ होईल.

१० राघवाचार्य रामानुजण थोर विद्वान जाणोन पाठशालेत मुख्तसर केले आहेत. ते गुरूवर व विद्यार्थी यावर व शालेचे इलाखदार यावर हुकूम करितील व वाईटबरे गुरूपासून किंवा सिष्यापासून काय जे होईल ते सरकारात जाहीर करितील. याकरिता सर्वांनी त्यांचे हुकुमात वागत असावे.

११ पुस्तके हाली सरकारांत आहेत ती दरोबस्त पाठशालेंत विद्यार्थी यास विद्याभ्यास करण्यास ठेविली जातील. यासिवाय आणखी पुस्तके लागतील ती समजवावी म्हणजे छापिले पुस्तके कलकतेहून आणऊन पाठशालेत दिल्ही जातील.

१२ पाठशालेस विश्रामबागचा वाडा नेमून दिल्हा आहे.

१२

येकूण कलम बारा व तारीख छ ६ अकटबर मुा छ ९ मोहरम सन १२३१ फसली.

¶*Organisation of a Sanskrit College at Vishrambag, Poona, by the Bombay Government is detailed in this paper. The number of pupils was to be one hundred.*

7357

No. 7] [1821 ?

श्री

यादी पुण्यात दप्तरात आथवा दुसरीकडे शोध हरकोठे करून लिहावयाची कलमे येणे प्रो :—

१ माहादजी सिंदे हिंदुस्थानातून पुण्यात आले तेसमई दिलीहून पातशाहाकडून वजिरात श्रीमंताचे नावे करून खिलत व फरमान आणिले व सिंदे याणी नायबी आपले नावे करून खिलत व फरमान आणिले म्हणौन ऐकितो, त्यास त्याचे असल कागद असल्यास त्याच्या नकला व कैफियत लिहून यावी.

२ माहादजी सिंदे याणी येतेसमई तीन कोट रुपयाची वरात दिलीहून पातशाहाची हैदराबादकर नवाब याजवर आणिली त्या वरातेची नकल असल्यास व कैफियत लिहून यावी व त्या वराते पौ अदा काही जाला असल्यास त्याची कैफियत.

३ खर्ड्यांचे स्वारीची लढाई मराठे व मोगल यासी जाली ती कशाकरिता जाली.

४ खर्ड्यांचे लढाईचा तहनामाची नकल.

५ खर्ड्यांचे लढाईत बतीस लक्षाचा मुलूक नवाबाकडून मराठे याजकडे आला ते माहाल कोणते व तो मुलूक पुन्हा नवाबास दोन तीन वर्षांनी परत दिल्हा तो कोणत्या कारणावरून दिल्हा? तेसमई कारभारी कोण होते ? कोणाच्या विचारे दिल्हा ?

६ सरदेशमुखी बाबती वगैरे स्वराज आमल बेदर वगैरे प्राती श्रीमंताचा होता तो अमल मसीरन मुलूक पुण्यात होते ते सुटले, त्याणीं कुमकेस फौज आणिले ते समई अमल सोडला, त्या वेळेचा तहनामा आसल्यास त्याची नकल व त्यासमई कारभार कोणकोणाचे विद्यमाने ठरले ही कैफियत.

येकूण साहा कलमे दर्याफ्त होऊन कैफियत पुणे दफ्तरातून हर कोठून शोध करून. लिहून.

¶*Instructions are issued apparently by Raja Pratapsinh to secure papers relating to the grant of Nayabship to Mahadji Sindia, the battle of Kharda and the subsequent treaty concluded between the Marathas and the Nizam. It appears these papers were meant for Grant Duff who was collecting sources for his history.*

7358

No. 8] [5-4-1822

हुा

जाहीरनामा सरकार दौलतमदार कंपनी इंग्रज बाहादूर तमाम लोकांस महशूर व्हावयाकरिता लिहिलें जाते जे:—सरकार श्रीमंत माहाराज छत्रपतिसाहेब राजे सातारा यांसी कंपनीसरकारांतून राज्य देऊन तहनामा जाहाला, त्या वेळेस असे ठरल होते कीं मुलकाचे आबादी व बंदोबस्ताकरिता व माहाराज व त्याचे अहलकर+ लोक बंदोबस्ताचे कामास वाकब व्हात्रयाकारितां काही दिवस मुलकाची वाहिवाट माहाराज यांचे नावाने व माहाराज याचे मसलतीने इंग्रजी सरकारचे सरदार करितील. यास हाली माहाराजाचे सरकारातून दरोबस्त वहिवाट आजपासून होत जावी आसे ठरले. त्यावरून उलियम चापलीन साहेब कमिशनर बाहादूर याणी सातारेयास येऊन माहाराजचे दरबारात मोठे सरदार व जाहगीरदार वगैरे सारे लोक जमा होऊन राज्याची वहिवाट माहाराज याचे सरकारात सुपूर्द केली असे. तरी सरदार व जाहागीरदार लाहानमोठे जे माहाराजाचे इलाख्यात आहेत, त्याणी व तमाम रयत वगैरे हरयेक लोकानी, माहाराज यांचे सरकारचें लक्ष ठेऊन त्यांचे हुकमात वागत असावे. मोठे सरदार व जाहागीरदार याणी आपलाले यादीप्रमाणे वागावे. माहाराजाचे सरकारातूनहि या लोकास हुकुम देते वेळेस यादीप्रा़ो देत जातील. सर्वांनी जाहीरनामा समजोन वागत आसावे. जाणीजे तारिख ५ येप्रिल सन १८२२ इसवी मुा छ १२ रजब सुा इसने आशरीन मयातैन व अलफ.

¶*This is the company's declaration announcing the installation of Raja Pratapsinh.*

No. 9] [19-7-1822

श्री

यादी विश्रामबागचे वाड्यांत पाठशाला घातली आहे त्यास वहिवाट करण्याची कलमे शके १७४३ चित्रभानु सवत्सरे.

१ न्यायशास्त्र
१ अलंकार
१ ज्योतिषी
१ वैयाकर्ण
१ धर्मशास्त्र
१ द्वैतवेदांत

+ कारकून.

१ आश्वलायन
१ आपस्तंब
१ वाजसनी

यासी गुरू व उपगुरू व विद्यार्थी याचा येण्याचा वगैरे बदोबस्ताची कलमे.

१ गुरू दोन घटिका दिवसास येतील. त्याणी आठा घटिकानंतर जावे. पांच घटिका दिवसास येतील त्याणी अकरा घटिकानंतर जावे. सर्वांनी सवा दोन प्रहरास यावे ते सध्येस जावे.

१ उपगुरूनी प्रातःकाली यावे. दाहा घटिका दिवसानंतर जावे. सवा दोन प्रहरा यावे ते सध्येस जावे.

१ विद्यार्थी याणी प्रातःकाली यावे. दाहा घटिका दिवस आला म्हणजे जावे ते सवा दोन प्रहरा यावे ते संध्येस जावे. नंतर रात्रौ भोजन करून यावे ते दाहा घटिकापर्यंत पढावे. ज्याची घरी पढावयाची सोय आहे ते रात्रीस न आल्यास चिंता नाही.

१ गुरूनी अनध्यायाचे दिवसी विद्यार्थी यास पढऊं नये.

१ सर्वास घरी विवाहादिक कार्य असता आचार्यास पुसोन जावे.

१ ग्रामांतरांचे गुरू व उपगुरू व विद्यार्थी आहेत त्यांच्या घरीं अत्यावशक कार्य उत्पन्न जाले आसतां घरास जाण्याची परवानगी आचार्यानी देत असावी.

१ शालेपैकी कोणी आजारी जाहाला तरी सरकारातून वैद्य पाठऊन औषधाचा व पथ्यापाण्याचा बदोबस्त व्हावा.

१ आजारी बहुत दिवस जाहाला तर त्याची अवधि कोठपावेतो त्याची सरकारातून परवानगी सांगावी.

१ गुरू उपगुरू विद्यार्थी यांची नित्यात येण्याजाण्याची हजिरी गैरहजरी कारकुनानी लिहीत असावी आणि सायंकाली राघवाच्यार्य यास दाखवावी.

१ हजिरी गैरहजिरी नित्यानी समजलीयावर निमित असून गैरहजर किंवा कशामुळे ते राघवाच्यार्य याणी पाहून ताकीद करीत आसावे.

१. विद्यार्थी यांचे अध्यायनाची परिक्षा वर्ष किंवा साहा माहन्यांनी होत असावी. गुरूनी पहिले परिक्षेस अध्यायन जाले ते लिहून ठेऊन दुसरे परिक्षेस अध्यायन किती जाले हे गुरूनी समजोन नंतर राघवाच्यार्य याणीहि पाहून अध्यायन अमुक व्हावे परंतु कमी जाले याविसी सागत असावे.

१ विद्यार्थी यांची परीक्षा पहिली जाल्यावर दुसरी परीक्षा होईल त्या वेलेस अध्ययनाची चौकसी होईल व तिसरे परीक्षेस ज्या विद्यार्थीयास अध्यायन सागण्याची मेहेनत करून व्यर्थ असे समजलियास त्याविसी सरकारांत कानावर घालून हुकूम होईल तसे करावे.

१ गुरूनी कोणास वर लिहिल्याप्रो यावयास न होय आणि प्रातःकाली दाहाचे बारावे घटकेस येऊन सायंकाली जावे.

कैलमे सहि राघवाचार्या
मिा श्रावण शुध्ध १

¶*Rules and regulations for the Sanskrit College at Vishrambag are herein announced.*

No. 10] [*3-10-1822?*

श्री

अर्जी दते दीपविजय कविराज विनंती ऐसी की:—हे वंशावली घेऊन छेत्रपति राजे यांजकडे सातार्‍यास जातो, त्यांस साहेबानी कृ(पा)ळू होऊन गिरांडसाहेबास चकती करून द्यावी कीं राजे यांची भेट करून द्यावी आणि माझी बरदास्त होईल, चकती द्यावयासी आज्ञा व्हावी हे विनंती.

¶*Deepvijaya Kaviraj going to meet the King with the genealogy of his family requests a letter of introduction to Resident Grant from Governor Elphinstone.*

No. 11] [*3-10-1822*

ताा ३ आकटोबर सन १८२२

श्री

साहेब आलीशा गौरनर म्साहेब
बाहादूर

यासी उदेपूरकर कुळगुरु उपाध्ये दीपविजये कविराज दुवा सलाम आंकी दरीविला. उदेपुराहून साहेबाची किर्त आइकून आलो. दरशण घ्यावे ही इच्छा फार आहे. हुकूम होईल त्या वेळेस हाजर होईन. श्रीमन माहाराज छत्रपति याची वौंशावळ आहे. भेटीअंती विदित होईल हे दुवा. मिती आस्विन वाा ५ रविवार.

¶*Deepvijaya Kaviraj a family priest of the Rana of Udaipur requests the Governor to grant him an interview.*

---

१ या पुढील मजकूर बालबोधींत आहे.

No. 12] [21-10-1822

पौ ता। १ माहे नवेंबर सन १८२२

श्री

साहेब मेहरबान करम फर्माय दोस्ता ह(नं)-
राबल मौट इस्टुवार्ट इलफिष्टन साहेब
गवरनर बाहादूर सलामत

अजदील येखलास माधवराव अनंत बाद सलाम. अंकी येथील खैरयत जाणून आपली शादनामी हामेशा कलमी करीत आसावी. दरीविला आंसाहेबानी तारीख ९ आकटोंबरचे खत रवाना केले तें पावलें. जंजिरे मुंबईस हाली छापखान्यात माहाराष्ट्र भाषेत पंचोपाख्यान बालबोध लिपीत यंत्रे करून बुके वाचावयास तयार केली आहेत. हा चमत्कार आवलोकनात यावा म्हणौन बुक पाठविले आहे, स्वीकार होऊन मनन व्हावें म्हणून लिहिले ते कलले व बूक पाठविले ते पावले. त्याचा स्वीकार करून बहुत खुषी हासल जाहाली. ज्यांचा जसा महजब त्या रीतीनेच त्यांचे संरक्षण करणे ही बुंजुर्गी खुदाने आपल्यास दिल्ही आहे. हारवख्त आपले दानाईची याद होते. हार हामेषा खत रवाना करून मेहरबानगीची तरकी करीत आसावें. रा छ ९ सफर जियादा काय लिहिणे प्यार महबत कीजे हे किताबत.

¶*The letter mentions Panchopakhyan as being the first book that was printed at Bombay in the Devanagari types. Madhaorao Anant Raste thanks Elphinstone for a copy of the book having been sent to him.*

No. 13] [1-1-1824

श्री

विज्ञापना विशेष. कालीचे दिवशीं रोजिट साहेबानी सांगितलें कीं तीा नारायणरायापाशीं शिंदे यांचे बखैरीचे कांहीं बंद राहिले आहे व शिवाजी राजे यांची सगली बखैर राहिली आहे, ते लष्करांत पत्र पाठऊन आणवावे. हर दोनही बखैर मेस्तमारीस साहेबाचा आहे. ते इथें छ ६ जनवारीस येऊन येथील खटल्याचा उलगडा करून घेऊन छ ९ तारखेस निघून विलायतेस जाणार आहेत. त्यास त्याणी हे दा(दो)नही बखैर मागितले तेव्हा त्यास द्यावें लागेल याजकरितां आणवावें म्हणोन सांगितलें. याजकरितां विज्ञापना पत्र लिहून घेतलें आहे कीं सदरी शिंदे याचे बखैरीचे बंद आहेत नाहींत याची तपशीलवार याद

---

१. थोरवी. २ शहाणपणा. + लेखन.

अलाहिदा लिहून पाठविली आहे, ते पाहोन बंद नाहींत याचा शोध करून त्यात बंद जितके असतील तितके व शिवाजी राजे याची बखैर संपूर्ण दोनही लौकर पाठऊन देतसे करावें. कां म्हणाल्यास साहेब मवसुफानी बखर आणविणेविशीं पेशजी येके वेळां सांगितलें होतें; परंतु बालकाचे स्मरणांत राहिलें नाहीं. याजकरितां कालीचे दिवशी फार रागें भरला. यास्तव शिंदे यांचे बखैरीतील कांहीं बंद व शिवाजी राजे यांची संपूर्ण बखैर दोनीही लौकर पाठऊन देतसें करावें अगर बखैर इथेंच ठेविली असल्यास कोठें ठेविलें असतील तें सर्व लिहिण लिा पाठवीतसें करावें. विशेष लिहिणेस बालक शक्त नव्हे हें विज्ञापना.

मिति मार्गशीर्ष शुद्ध १० बुधवार शके १७४६ तारिख छ १ माहे जनवरी सन १८२४ इसवी.

¶*The writer probably, a clerk in the Residency at Satara, asks some Satara official to return the few sheets of a bakhar of Sindia and a full. bakhar (Chronicle) of Shivaji Raja, which belonged to Mr. Morris and which were given by him to Narayanrao. As Morris was going back to Europe the papers were immediately needed for being returned to the owner.*

No. 14] [*1825*

श्री

जाहीरनामा सरकार दौलतमदार कंपणी इंग्रज बाहादुर सुा सीत अशरीन मयातैन व अलफ. कचेरीचे कामात व अदालतचे कामात तरबियेत लोक हुरमतवाले+ मिलण्याची अडचण आहे, म्हणौन गौरनर कौसलात जाहीर जाले. त्यास सरकारचा इरादा ऐसा आहे की दक्षण व खानदेश नवे मुलकात चिनापटण व गुजराथ वगैरे मुलकातील व दिगर इलाखेतील लोक तलाष करून आणावयाचा नाही; याजकरिता ज्या सुभ्यात राहाणार त्या सुभ्यातच सरकारी कामावर मुकरर करावे म्हणौन, ऐसियास पुणे सुभ्यातील उमेदवार व हुरमतवाले लोकास मालूम होणे बदल कलमी केले जाते जे:—

१ ज्या तेरखेस कमिषनर साहेब पाठशालेत जातील, त्या तेरखेचे इतला केले जाईल. ते दिवसी शालेतील किवा दुसरी खुषबाष उमेदवार वगैरे लोक ब्राह्मण जातीतील किंवा हुरमतवाले मराठे जातीतील अथवा मुसलमान जातीतील सर्वांनी दुसरे कलमात लिहिल्याप्रमाणे मुंबईस जाणारे लोक

+ अब्रूदार.

जमा व्हावें; कारण की उमेदवार हिशेबात व धर्मशास्त्रात व सारेचे कामात व हरयेक भाषेत तयार व्हावयाजोगे बुध्धिमान असतील त्यास मुकरर करून मुंबईत कपतान जरवीस साहेब यांची शाला आहे तेथे रवाना केले जाईल. ते साहेब पैमायषीचे+ काम व जमाबंदी वगैरेचे हिशेब कितेब व अदालत प्रकर्णी वहिवाट व रिवाज सिकतील त्याचे देखरेख करितील. येणेकडून उमेदवार लोकपैकी जो कोणी दोन तीन सालात मेहनत केलिया सरकार काम करावयाजोगा पुरा तरबियेत होईल, नंतर कपतान जेरवीस साहेब ज्या कामात जो तयार जाहाला असेल, त्यास त्या कामाची तरबियेत जाल्याची पत्रे देतील; म्हणजे मुंबई इलाखेतील मुलकात सरकारकामावर कलकटर साहेब अथवा ज्यडज्य साहेब यांचे इखलासाचे रीत मुकरर केले जातील, तेथे त्याची हुशारी बमोजीब पुढे बढती होत जाईल.

२ सदरहूप्रमाणे हरकोणी उमेदवार जेरवीस साहेब यांचे शालेत राहणेकरिता सिध्ध जाहाल्यास पाठशालेतील मुख्तसर शास्त्री यांजकडे जाऊन आपले नाव व गाव व जात व उमर किती असणेचे सांगावे म्हणजे ज्या रोजी त्याची परीक्षा व्हावयाची असेल त्या रोजी बोलावणी केली जाईल.

३ मुंबईत हरयेक आसामीचे पोटाचे बेगमीस दर महिना आठ रुपये सरकार खर्च करितील.

४ मुंबईस जाणार मुलाचे वडिलास हेच खातरजमा आहे की मुलास मुंबईस पाठवणेकडून काही भय नाही. सरकार कृपाळु होऊन त्याचे चालचलण चांगली असावयाकरिता सरकारातून येक उतम जागा राहाण्यास योजना केली आहे. तेथे काही येक उपद्रव होणार नाही; व ज्या जातीचे असतील त्यास त्या त्या जातीचे नौकरहि ठेऊन देतील. याखेरीज ब्राह्मण वगैरे सदरी हरयेक जातीस त्या त्या जातीचे रिवाजाप्रमाणे कपतान जेरवीस साहेब बंदोबस्त राखितील.

येकूण कलमे च्यार.

¶*This is a Government notification asking for Brahmins and others of high castes to come forth and offer themselves for Government service. The selected candidates will be kept under training in land-survey, accountancy, etc., in a school conducted by Captain Jervis and will be appointed in the Collector's and the Judge's offices. They will receive a stipend of Rs. 8 p.m. while under training.*

\+ Land-survey.

श्री

जाहीरनामा सरकार दौलतमदार कंपणी इंग्रजबाहादर सुा सीत असरीन मयातैन व अलफ. तमाम लोकास जाहीर होण्याकरिता लिहिले जाते जे:—या तेरखेपासून दक्षण जिल्हेचे आदालतीत जडजसाहेब किंवा रिजस्तर साहेब आथवा अमीन व मुनसफ हे फी घेतल्यासिवाय अर्ज्या घेणार नाही; त्याचा दर व तपसील येणेप्रमाणे.

बेरजेचे तेरीख

फी घेणेचे	
८–	येक+ रुपयाचे अर्जीस
८=	येक रुपयावर दोन रुपयेपावेतो १ २
।•	दोन रुपयावर पाच रुपयेपरियत २ ५
॥•	पाच रुपयावर दाहा रुपये परियत ५ १०
१	दाहा रुपयावर वीस रुपये परियत १० २०
२	वीस रुपयावर तीस रुपये परियत
३	तीस रुपयावर च्यालीस रुपये परयत
४	च्यालिस रुपयावर पनास रुपये परयत
५॥	पनास रुपयावर पाऊणसे रुपये परयंत
७	पाऊणसे रुपयावर शंभर रुपये परयंत
१०	शंभर रुपयावर दीडसे रुपये परयंत
१३॥	दीडसे रुपयावर दोनसे रुपये परयंत
२०	दोनशे रुपयावर तीनशे रुपये परयंत
२५	तीनशे रुपयावर च्यारशे रुपये परयत
३०	च्यारशे रुपयेवर पाचशे रुो परयत
४०	पाचसे रुपयेवर साडेसातसे रुो परयत
५०	साडेसातसे रुपयावर हजार रुो परयत
६०	येक हजार रुपयावरी साडे बारासे परयत

+ संख्यादर्शक शब्दांचे खाली ती ती संख्या अंकांत नमूद केलेली आहे.

7365

७०	साडेबारासे रुोवरी पंधरासे पर्यंत
८०	पंधराशे रुपयावरी दोन हजार पर्यंत
९०	दोन हजार रुपयावर पंचवीसशे रुो पर्यंत
१००	पंचवीस शे रुपयावरी तीन हजार रुो पर्यंत
१२५	तीन हजार रुपयावरी च्यार हजार रुोपर्यंत
१५०	च्यार हजार रुपयावरी पाच हजार रुोपर्यंत
२००	पाच हजार रुपयावरी साडे सात हजार रुोपर्यंत
२५०	साडे सात हजार रुपयावरी दाहा हजार रुोपर्यंत
३५०	दाहा हजार रुपयावरी पंधरा हजार रुोपर्यंत
५००	पंधरा हजार रुपयावरी पंचवीस हजार रुोपर्यंत
७५०	पंचवीस हजार रुपयेवरी पनास हजार रुोपर्यंत
१०००	पनास हजार रुपयावरी येक लाख रुोपर्यंत
२०००	लाख रुपयावरी जाजती असल्यास.

येणेप्रो इनसाफास ख्वाहीश असणार लोकानी फी देऊन अर्जी गुजरावणेचे आहे.

¶*This is a Government notification announcing the charges of court fees fixed for suitors for suits of various amounts.*

No. 16]

श्री

यादी गजरा नाइकीण इजला कुणबिणी पोरी विकत घेता त्याचा दस्तुर पुसता त्याणी सांगितले ते :—

बिा

१ वणजारी बेपारी पोरी घेऊन येतात त्याजवळून आम्ही खरीदीस शंभर दोनसे तीनसेपर्यंत गरजेवर घेतो. काळा दुकाळात रुपया दोन रुपये पाच दाहासहि घेतात.

२ पोर कोणते जातीची, म्हणजे बेपारीस पुसतो की ही पोर कोणते जातीची; व पोरीसहि पुसून सयद, सेख, मोगल, पठाण असी सांगितल्यावर शोध करून घेतों.

३ पोरी लाहानहि उमरीच्या वीस वर्षाचे उमरीपर्यंत घेतों.

४ घरात कामकाजास पाहिजे तर तीस च्यालीस वर्षपर्यंतहि घेतात.

५ कोणी एक हिंदूची पोरी असून मुसलमानीन बाटली असी जाल्यास तिलाहि घेतो.

६ ज्या जवळून पोरी विकत घेतो त्याजवळून खरेदीखत सरकारास जाहीर कोतवालचावडीस रुजू करून जकात देऊन घेतो.

७ आपले जवळ पोरी असतात त्यातून कोणी उपयोगी नाही असे जाणून तीस दुसरेयास विकतो. व भारी किंमत येत असल्यास देतो.

¶*This is a statement of Gajara Courtezan which shows how the traffic in female slaves was carried on.*

No. 17]

२

[पहिला बंद गहाळ.]

३ काळामुळे व राजक्रांतीमुळे आईबाप भाऊ वगैरे पोरी स्वदेशांत व विदेशांत जाऊन विकतात. त्याजवळून जो घेतो तो बटीक म्हणून करितो. तो दार आहे तोपर्यंत तिजला अन्नवस्त्र देऊन काम घेतो. नादार दान जाला म्हणजे तो दुसऱ्यास खेरदीस देतो.

४ अमुक वर्षाची बाइकोस विकावी, किंवा विकत घ्यावी असा नेम नाही.

५ कुणबिणीस पोरगा पोरगी होतात त्यास यजमानाची मर्जी आसल्यास पोरीचे लग्न करून देतात; नसिले तरी तिलाहि बटीक करितात; व पोरगा होतो त्याचे लग्न करून यजमान कामकाज घेतो. पुरुषास विकीत नाहीत. अन्नवस्त्र आहे तोपर्यंत त्यास द्यावे, नाही तरी सोडून देतात, किंवा तो गुलाम कामाचे उपयोगी नाहींसा जाला तरी सोडून देतात.

६ कुणबिणीस विकितात तेव्हा पाचसात वर्षाचा पोरगा अगर पोरगी असल्यास आईबरोबर ज्यास विकत देतात त्याचे घरी जाते. मोठी असल्यास मुलगा आहे तरी विकीत नाही; मुलगी आहे तरी घरी ठेवितो, अगर निराली विकितो.

७ दुसऱ्यास कुणबीण विकितात. त्यास जो विकतो तो अमुक रुपये घेऊन बनाम+ कुणबीन सडी किंवा पोरगी असे लेहून इचा कोणी वारीसदार उभा राहिला असता, त्याचा जाबसाल आपण करून म्हणून लेहून चावडीस रूजू करून हासील घेत होते.

+ नांवानें.

८ कोणाची कुणबीण असोन तिचा सोयरा पैकेकरी असला, किंवा तिणे पैका मेळविला असतां मालकच राजी जाहला तर पैका देऊन सोडचिठ्ठी घेऊन गावात कसब करून राहातात.

¶*This is another paper which gives information about the manner in which the mode of life of female slaves and their progeny was determined.*

No. 18] *[1830*

श्री

अर्जदास्त ते दीपविज्य कविराज विनंती ऐसी जे. चितोड उदेपुरचे सिशोदे राणे व शाहू छत्रपति भोसले सिशोदे राजे त्याचा कुलगुरु वंशावल्या आहो. याचे वडील राजे चितोड उदेपुराहून निघोन शके ११२६ चे साली दक्षण देसी आले, तो वडील राजे पूर्वीपासून यांची आदिउत्पत्ति वंशावली घेऊन उदेपुराहून आलो आहो, ती साहेबास दाखवावयास मानस आहे; त्यास आज्ञा असावी हे विनंती.

¶*This document shows that the family of the Chhatrapatis of Satara descended from the distinguished royal Rajput family of Chitore and Udaipur. The genealogy of the Udaipur family was brought to Satara for Pratapsingh's inspection by Kaviraj Deepvijaya.*

No. 19] *[18-10-1830*

पान २४.]

" छत्रपति प्रतापसिंह यांचे रोजनिशींतील उतारे. "

पेटा वाई येथील मामलेदार याचे पत्र तेरिख १६ आगटंबर सन १८३० इसवीचे आले त्यात हसील: उमाजी नाईक रामोसी हा नदीपलीकडे साकुर्डी येथे होता. त्यावर कंपणीसरकारची स्वारी येऊन उमाजी नाईक व भोज्या रामोसी आा धरून घेऊन जाऊ लागले, तो त्याचा जमाव येऊन त्यास सोडऊन घेऊन गेले. साहेब लोकास जखमा लागल्या आहेत. रामोसी यांचा जमाव डोंगरात आहे. याप्रो पत्र विनायेक कासिनाथ शेखदार याचे आले.

¶*The fight of Umaji Naik, a famous Deccan robber, with English troops and his escape are reported in this extract from the diary.*

पान ६१.] *[15-11-1830*

राबीसन बोले, दोघेहि बोले, विलायेत जावे म्हाराजानी. पाच लाखात होईल. भाडे १०००००, बाकी खर्च शहरी व बादशा वगैरे ४०००००.

आम्ही बोलो की, न यावे आसे नाही; परंतु पैका पाहिजे. व बाकी दिकत नाही व नाही म्हणे आवघड व गेले तरी चिंता नाही. येक धर्मास आवघड. येताना प्रायश्चित घेऊ. मुलूक पाहिलासे होऊन इंग्रेज साफी हा फायदा व कामे जाहाली काही तरी बरेच आहे.

¶*Robinson proposed to Pratapsinh to visit Europe. The cost he said should not exceed 5 lacs of Rupees. The Raja put forth the difficulty of caste but realized the advantages of travel.*

पान ६२.] [*16-11-1830*

नाशककरानी ब्राह्मण पाठविला हरिबा मोहिते विद्यमाने की नव्रा करून देणे. आमी ज्ञाती सुध्धा व शास्त्राधार पहिला आहेच. हाली ग्रंथासुध्धात पार आहो हुकूम येईल तेव्हा. पेशवे गेले, गफलत जाहाली. सबब भरवसा या मुलुकचे ब्रम्हणाचा नाहीं, हे मनी ठेऊन ठरले प्रो कारनाटकी किंवा हिंदुस्थानीं आला, नाही न म्हणता देणे. लेहून पाठवणे ठीक आहे. चालीवर नजर ठेऊन वाकडे न बोलता आपण होऊन बोले. सबब गोड आसे केले.

¶*A good Brahman was required at Nasik. A Karnataki or Hindusthani one could be preferred as the Deccani Brahmans could not be trusted. This is an extract from the diary.*

पान ७६.] [*26-11-1830*

डाकतर की, आलिपिष्टन गेले ते वेले बालाजीपंत नातू ब्राह्मण आसून बोला तुम्ही जाता, माजा दात्रा इकडील ब्राह्मण करिता (त.) मग खातरी केली गवरनुरानी. मग राहिला. नाही तरी नातू जात होते. तेव्हा म्हाराजाचा व इंग्रेजी द्वेष पका ब्राह्मणाचा आहे हे इंग्रेज मनी आले. देवीने केले काम.

¶*An extract from the diary. Balajipant Natu was extremely afraid of his position at Satara when Elphinstone left. He was even prepared to accompany Elphinstone to England. The English knew how Pratapsinh hated the Brahmans.*

पान ८०.] [*27-11-1830*

बालाजीपंत नातू ब्राह्मण को(क)णस्त आसून भेतो. इंग्रेजास मिला म्हणून द्वेष. आम्हास तरी थोड राज दिले व बामनी बुडाली ते आमी आलो इंग्रजीकडे सबब. आसे सारे हिंदु व ब्राह्मण फार (मिल?) मराठे हाली परभू खटले* * * * * हा द्वेष मनी.

¶*Pratapsinh says that Balajipant Natu is afraid not because he is a Brahman, but because he serves the British cause against his own community.*

पान ८८.] [2-12-1830

जनरेल इस्मितसाहेब यास आम्ही सन्मान्य पत्र दिल्हे आहे. तत्रापि आणखी आमचे मनात आसे आहे की, राबिसन साहेब याणी इंग्रजी सरकारास ल्याहावे की, माहाराज सरकारची मर्जी असी आहे की, जनराल इस्मित साहेब याणी आम्हास ल्हढाईचे प्रसंगात बाजीराव यांचे लस्करात आसता गरदी वेळे बच्याव केला. मोठी तारीफ आहे. व आमचे हरयेकविसी उणे दिसू न दिल्हे. मरजी ठेविली. हा त्याचा मोठेपणा फार आहे. त्यास याजकरितां हाली ते विलायतेस जातात त्यास हनराबल कोर्ट डरकटर यास लिहिले जाऊन इस्मित साहेब यांजवर विलायतेस मेहरबानी जाली म्हणजे त्याविसी आम्हास संतोष होईल. आणि आम्ही आसे जाणू की, कंपनीसरकारची व इकडील सरकारची दोस्ती आहे. त्याजमुळे आमचे सांगितल्यावर त्याजवर मेहरबानगी केली आसे जाणू; म्हणजे ती मेहरबानी इकडीस संतोषास कारण आहे. हरगोष्टीविसी ते साहेब फार ल्यायक आहेत हे महशूर आहे. इकडील व त्याचा सहवासहि बहुत दिवस होता त्याजमुळेहि आनुभवास आले आहे. त्याचे बरे होण्याचे आम्ही हमेशा च्याहात आहो. ते आले म्हणजे नेहमी आम्हास स्मरण राहील. सदरहूप्रो राबिसन साहेबानी आम्ही व आपले साहेब आसता बालाजीपंत किबे हास्ते वाचून दाखविले. बरे आहे, देतो बोलले पत्र. खुषी आहे. व इंग्रजीकडे यादहि पाठवितो. उतर आणवावे.

¶*Pratapsinh expresses in his diary the very high regard he entertained for General Smith who had given shelter to the Raja's family when Bajirao ran away.*

पान ९४.] [9-12-1830

नारू कासकर याजवल हाटसाहेब बोलत होता दवलतखान रिसालेदार. हासील की, ग्रांटानी मुलूक दिला ते वेळे जमाबंदीचे आठरा लक्ष. तेव्हा खर्च इतका नाही, तेव्हाचे आसतील सिलक आसे आम्हास लोक बोलतात आसा साहेब बोले. हे दोवे बोले की, इंग्रेजी राज्य येवढे आसून तुम्ही कर्ज व खर्च कमी करिता व ग्रांटानी जमाबंदी केली ती येक साल जालेचे पुढे कधी चौदा कधी तेरा कधी आठ नऊ दाहा व बारा आक्रा. कमी खर्च करीत नाही, तेव्हा कोठील? मग उगेच राहिला. परंतु हासील. आसे आपले लोक कलविणार नसता व दरसाल इंग्रेजी वकील जमाखर्च पाहातात तसे होते. कोणाचा भरवसा नाही. आपले सर्वास ठावे आहे लिहिलेप्रो. सबब आसी चाल ठेविली ही ठीक आहे दाखवणे जमाखर्चाची व वागणे आसेच ठेवावे, सबब लिहिली कलमे.

¶*Pratapsinh complains in his diary that although Captain Grant estimated 18 lacs as revenue from the territory of the Satara Raja, the yearly income has since much dwindled. It has never exceeded 14 lacs and has gone down to even eight.*

पान १२१] [23-12-1830

कंपिनी सरकारची याद १४३ आखची आली तेरीख १७ दिसंबर सन १८३० इसवीची, त्यात हसील. विलायतेस पादशाहाचे सांनिध्य हिंदुस्थान वगैरे मुलकाचा आहवाल वगैरे लिहून सर्वास जाहीर करावयाची पंच मंडळी आहे. त्याणी येक बूक छापून त्याजवर माहाराज सरकारचे नाव लिहून माहाराज सरकारास नजर पाठवावयाकरिता दिल्हे. ते बूक विलायतेस सेक्रटारी म्हणजे चिटणीस आहेत त्याणी माहाराज सरकारात त्या बुकासमागमे येक पत्र लिहिले आहे. ते पत्र व बूक थोर आहे व दुसरे येक लाहाण बूक, त्यात कितेक पातशाहा वगैरे लोकानी त्या पंचमंडळीचे कारखान्यात सालीना खर्च देतात त्याची नावे व जमा-खर्च वगैरे लिहिले आहेत. बूक व त्या कामाची क्यामेटी जाहालेली त्याबदल येक छापलेला कागद याप्रो च्यारी येथे आले ते सातार मुा नारायणराव रैटर आहेत त्याजवल दिल्हे आहेत. ते त्यातील इंग्रजी लिहिलेले आहे मजमू माहाराज सरकारात निवेदन करितील यास्तव त्याचे हवाली केले आहेत. व थोरले बुकात काही पारसीहि छापलेले आहे. यास इन्दाबतू नामे येक मुसलमान काबील त्याणे बहुतेक मुल्क पाहून तो विलायेतस गेला. त्यात कितेक मुलकाचा आहावाल त्याणे पाहून तो माराहि त्यात छापला आहे.

¶*A book was presented with a covering letter to Pratapsinh by the British Ministry containing various accounts and subjects; being in English, Pratapsinh gave the book and the papers to Narayanrao writer for translating them. This is an extract from the Raja's diary.*

पान १२३.] [24-12-1830

गायेकवाडाचे इंग्रेजास मिळून गायेकवाडास बुडविले. इंग्रेजानी बाहादरी केली. दोन लाख नेमणूक केली. जबरी केली. गायेकवाड चाकर आसून इंग्रेजी वकिलासी मिळून तो मारला गेला. कडीस बडुदे गायेकवाडपासून साठ कोसावर. ज्याने कचेरीत मारला त्यास धरला. कबूल न जाहाला. माजे मनास वाटले मारला, त्याला इंग्रेजानी तोफेचे तोंडी दिला. कशास्तव केले हे न बोला. हा हिया मोठा. आशी बातमी आली. परंतु खरे पुढे समजेल तेंव्हा पके लिा. हाली चाकरमाने यास मात्र दहशत की, इंग्रेज पैका देतील, बच्याव करतील, परंतु मारला जाईल. सबब ह्यासी वाकडे चालू नये आसे मनी आले येवडे मात्र हासील साधले. बाकी काही नाही. याप्रो मनी भाव आला तों लिहिला आहे. वाचून चालावे सबब लिहिले जाईल. परंतु आसे करतील त्यास वाकडे होणे पाहून कोलापूरवाले आसी चाल नसता त्यावर जबरी. देवी करील ते खरे.

¶*Pratapsinh writes in his diary that he received news of a certain person of the Gaikwads of Baroda having joined the English and ruined the Gaikwad, for a paltry gain from the English.*

पान १४६.] [5-1-1831

जिमिसनसाो बोलले की, शाहजी चांगला आहे, परंतु तुळजाबाई त्यास फार फिसाद सिकिवती. सबब रसिदंट याणी आम्हास लिाे की, बाईस तिचे माहेरी पोचऊन खर्चापुर्ते द्यावे. परंतु दोन महिने वाट पाहून ती चाल नीट न दिसे तरी बाईस पोचऊन देऊ असें बोलले. केसरी भो मुळाजवळ असतो तो फिसादी फार असे सांगितले. त्यावरून बोलले खरे आहे.

¶*Pratapsinh writes in his diary thus : Jameson spoke to Pratapsinh that his brother Shahji was a good fellow but was being misdirected by Tuljabai.*

पान १६९.] [23-1-1831

वाई पेठ्याचे मामलेदाराकडील दोनसे येकहतर व सतर आखची दोन पत्रे आली त्यात हसील. उम्या रामोसी पुरंधरकर याजकडील आहे. आजमासे पनाससाठ पांडवगडचे डोंगरात आले आहेत व उम्या व भवाण्या दोनसे आसामीसुधां मांढर-देवाचे डोंगरात होते. त्याणी गावकरास मारामार केली. त्यांचे पाठलागास सचिवाकडील लोक व पनास आसामी संत्रीसुधां कपतान बेटसाहेब गेले. यांची व रामोसी यांची गोळागोळी जाहाली. त्यात दोन आसामी संत्रीस गोळीच्या जखमा लागल्या व रामोसी पो हेटकरी येक धरिला. काल साहेबानी येथे मुकाम करून आज पाहाटे भोराकडे गेले.

¶*News of trouble caused by Umaji Naik near Wai is extracted from the Raja's diary.*

पान १८६.] [9-2-1831

म्हराठे मुले शाळेत विलायतेस जाणे कसी बुधि आहे ही पाहाविली. दिले उतर न जावे आसे नाही जावे तरी कारण आहे तरी जावे, आसे पर्याय तेथील मंडळीचे मनात ब्राह्मणाचे की ही पोर आसून आसी जाहाली, तेव्हा ब्राह्मण आता वाडत नाहीत व बुडवितील व हारिसिंग आमचे हाताखाली त्याचा द्वेष की, माधव-राव ब्राह्मण आसून (अक्षर लागत नाहीं). म्हराठ्यास सिकवितो हे दाखऊन फसलो. आमी आसे मनी दावा येईलसे नोव्हतो. परंतु आसी ब्राह्मण चाल. आमचे ज्ञातीविसी साहेब लोक यासी लगत आमची नसावी हेहि मन फार ब्राह्मण लोकांचे, हे हारिसिंगाने बातमी कळविली. मग काम न पडले हाऊसने सिकवावे लिहिले कोणी व नका सिकऊ तरी न ऐकावे. सबब हारिसिंगाचे हाते माधवराव लिहि-विले की तुम्ही मुलास सिकविले ते विलायेत जाणे. जबाब लिहिले यावरून खुष मरजी तुम्हवर जाहाली. सबब माजे दिलात आले ते लिहिले. लिहिणार व

सरकार व मुले गोडी आसे (स)बब लिहिविली पत्रे. आपला मरातब न व्होवा सबब मला सिकऊ नका म्हणतात आसे मनी येईल सबब तोड केली आसी बोलणारास न वलख देता लिहिले. (बरेंच ठिकाणीं अक्षर नीटसें लागलें नाहीं.)

¶*These reflections of Pratapsinh on the advantages or otherwise of Maratha boys going to England for Education, are entered in his diary.*

पान २२०.] [26-3-1831

मामानी आपली मुलगी लिहिण्यास घातली व मुलगाही आहेच. परंतु मूल घातली हे ठीक न केले. आमचे मनी होते व चांगले सबब जो मामाची तारीफ केली व मुलीस काही देऊ. गोड वाटेल व सर्वा सांगू आसे करणे व कोणी सिकविले आहे? परंतु शालेस नको. आपले घरी सिकवावे, बायेका सबब.

¶*Khanderao Shirke's daughter was sent to school for education—a course which Pratapsinh disapproved, as he mentions in his diary.*

पान २२१.] [26-3-1831

विलायतचे इंग्रज बादशाहाचे एकंदर बावन आसामी वजीर आहेत. त्याणी प्रथम सर्वानी विच्यार ठरविला की, बादशाहाचे खासगीकडे सालिना येक कोट सवा लक्ष रुपये जातात त्याचे हिशेबाची तपशलिवार याद द्या, आसे ठरऊन मुख्य वजीर वसली साहेब याणी या मजकुराची याद बादशाकडे पाठविली. त्याणी जबाब दिल्हा की, पेशजी माजे भाऊ गादीवर होते ते वागले त्याप्रमाणे वागू. याद देणार नाही. याजवर बावनापौ प्रथम या विच्यारात आसून पुन्हा बादशाहाचे बोलण्यास मिळून निराळे जाहाले व चोवीस आसामी वसलीसुधा निराळे जाहाले. तेव्हा वसलीनी सांगितले की, याद दिल्हास चिंता नाही; असे असता माजे बोलण्यावर विश्वास नाही त्यापेक्षा मी काम करीत नाही. याजवरून बादशाहानी आठावीसपौ साहेबास मुख्य विजिरीचे काम सांगितले आणि वसलीकडील काडले व चोवीस आहि कामातून निघाले. या आन्वये मजकूर राबिसन साहेबाकडून कलला. तेव्हा यावरून असे दिसते की, पेशजी बाजीराव कामावर आले तेव्हा नाना फडणीस काम नको म्हणाले. परंतु बाजीराव याणी नानाची बहुत तऱ्हेने खात्री करून प्रमाण दाखऊन काम करावयास लाविले. पुढे नानासारखे (अ)क्षार काढून चिथ्या तारखा करू लागले हे त्यास समजताच काम सोडले. याप्रमाणे हिंदुसारखा चालीत व्यत्यय होण्यास प्रारंभ जाहाला असे दिसते, व वसलीनी काम सोडावयाचे कारण असे दिसते की, पुढे वागणुकीस काही सवशय असेल यामुळे असे केले.

¶*Duke of Wellington's removal from the Prime Ministership by the King of England is discussed by Pratapsinh in his diary. His remarks are ingenious.*

पान २३४.] [13-4-1831

उमाजी रामोसी बंड प्रकर्णी इंग्रेजाकडील आबा जोसी यास सांगितले की, इकडून बातमीदार पुरंदराकडे पाठविला होता त्याणे भिकाऱ्याचे सोंग घेऊन डोंगरात गेला. तेव्हा रामोशानी पाहून हा आजारी समजून डोंगरातून उचलून पार करून दिल्हा. याआन्वयें त्याची सावधगिरी आहे व पद्या मारल्यामुळें या सरकारचा भरवसाहि त्याला नाही. व इकडील साहेबसुधा त्याला बातमी कलती यामुळे तो लौकर हाती लागण्याचे आवघड आहे. यानंतर उम्याचे जमातीतील येक रामोसी नऊदाहा कोसावर येऊन निरोप पाठविला की, मला हुकूम होऊन बच्याव जाहाल्यास मा हाजार होईन. हाहि मजकूर जोसी यास कलऊन त्यास येण्यास सांगितले. व निरोप घेऊन जी माणसे पाठविली त्यास सांगितले की, तो होऊन आला तर. आणावा म्हणजे त्याचे बच्यावाविसी पाहाता येईल. न आला तर तुम्ही धरून आणावा. याप्रो सांगून ते पाठविले होते तो त्यास आणताना वाटेत साताऱ्यानजीक इंग्रजाकडील लोकानी धरून नेला व बरोबर माणसे होती त्यासहि मारहाण केली. हे समजल्यावर पुन्हा जोसी यास बोलाऊन सांगितले की, असे होऊ लागल्यास या कामाचा उद्योग कसा होईल? आगोदर पद्यावरून उम्याचा भरवसा गेलाच आहे व हे वर्तमान कलल्यावर आगदीच जाईल. आता वर्तमान बातमीदार कसे कलवितील? इकडून राबिसन साहेबाचे सांगण्यावरून येत्न चालविला होता, परंतु पुढे या मजकुराचा ठिकाण लागणे आवघड आहे. हा सारा मजकूर साहेबास लिहून पाठवावा म्हणोन जोसी यास सांगितले.

¶Pratapsinh mentions in his diary some of the measures he suggested for the arrest of Umaji Naik.

पान ३०९.] [28-6-1831

उम्याचा भाऊ कृष्ण्या हजर जाहाला तो बोलला, उम्याची साहा महिने गाठ नाही. इनसाफ करित आसल्यास मुदा घालावा. नाही तरी सचिवाचे हदेतील वतन व इकडील हदेतील सोडावे म्हणजे गेल्या बंगल्यात उम्या हजर होईल. नाही तरी जे करणे ते करावे. खर्चास देत होते, घेतले नाही. उम्याचा भाऊ आण्या आम्हापासी बोलला, आभये देत आसल्यास उम्या हजर होईल. साहेबास कलविले. उतर केले, वचन द्यावयाचे नाही. उम्या इकडील सिपाई वगैरे लोकास बोलतो, तुम्ही आमचे आंगावर येऊ नये. तुम्हाकडे काही नाही. तुमचे वाटे जाण्याचे नाही. त्याचे कारण दिसते, सचिवाकडे व इंग्रजाकडे इनाम जमिनी आहेत, इकडील हदीत काही नाहीत सबब. आसे आसून साफ इकडे

7374

बोलणे वाकडे नाही व उपद्रव नाही. ते व्हो. परंतु उपद्रव लावला फार र्‍येतेस पलता पलता. हे बोलणे आगाव खरे आहे.

¶*Negotiations for the capture of Umaji Naik are carried on with his brothers Krishnya and Apya, and are mentioned by Pratapsinh in his diary.*

No. 20]

पान १३ [*11-10-1832*

गवरनर सा॑ बोलले माहाराज विलायतेस कधी येणार. उत्तर जाले हली या खर्चास ऐवज नाही. पुढे खर्चाचे मानाने पाहू. ग्राट सोने जमाखर्चाचा बोवारा केला, त्यात दरसाल येक लाख रु॑ राहावी आसे केले होते; परंतु हाली वसुलाचे मानाने खर्चासच कमी येते. कारण धारण स्वस्त व लोकास रोजगार नाही, सबब. सदरहू ता॥ मा॥र ॥१॥ +पैका पाहिजे खरे आहे खास व वाटणे कोण करितो. व मनहि मोडले. कोठवर वागावे जंपून, सबब आसे बोलो. देवी करील ते खरे. च्यार पाच वर्षे पाहू. मगहि ही तोड निदानी करू. कारण लाभ तारि नाही तरी गरज नाही, हे मनी भाव कलमे.

पान १३ [*11-10-1832*

गवरनर बोलले माझे मनात माहाराजासी फार बोलावयाचे आहे; परंतु हिंदुस्थानी भाषा येत नाही. आणखी बोलले आलुपिष्टन मालकम वगैरे सरदार याणी सांगितल्याप्रोच माहाराजाचे मुलकी इनसाफ इमारत रस्ते वगैर बंदोबस्त फार चांगला आहे. ॥१॥ +किती तारीफ तरी येक दिवस आपले कामास सोडणे घटका नाही. आसे मतलबी गोड लबाड खास हा सेरा भाव कलम.

¶*Report of Pratapsinh's interview with the Governor, who asked him when he was proceeding to England, is reflected upon in this extract.*

No. 21]

पान १३८ [*4-2-1833*

बडोदेकर गायकवाड याणी म्हराटे ज्ञातीत फितूर करून काही मंडळी शरीरसंमध करण्याबद्दल लोभ दाखऊन फितऊन नेहले तेविसी बोलणे जाले. ते कुणबी आसता, आमचे ज्ञातीचे लोक फितऊन नेहतात आणि बाटवितात. ते आपले ज्ञातीत मुखत्यार, आमचे ज्ञातीत पडावयाचे कारण नाही, येविसी

+ येथून पुढें स्वतःचें अक्षर आहे.

बहुत बोलणे जाले. हा बंदोबस्त कंपनीसरकारातून व्हावा. त्यावरून साहेब बोलले याद पाठवावी. सबब स्मरणार्थ याद पाठविली. त्यात हासील, हिंदुशास्त्र व वहिवाटीत आपले ज्ञातीत सोयरीक करावी, दुसरे ज्ञातीत करू नये ही चाल आहे. आलीकडे कुणबी वगैरे पैकेकरी होऊन या ज्ञातीत फितूर करून बाटवितात. हे जाहाल्यास धर्म राहाणार नाही. ज्याचे ते आपले ज्ञातीत मुखत्यार, हे आसता कुणबी या ज्ञातीत फंद करितात. त्यास येविसी क्षेत्री आपले ज्ञातीचा बंदोबस्त करितील; परंतु याप्रो काही इकडील हदीत व कांही कंपनी सरकारचे वगैरे हदीत त्याचा बंदोबस्त कंपनी सरकारानी केला पाहिजे; म्हणजे कंपनी सरकारचे मोठेपणास व इकडील लौकिकास नीट. बाजीरायाचे कारकीर्दीस सिर्के माहाडिक यात काही खटले पडले, तेव्हा आमचे आम्हीच आपले ज्ञातीत बंदोबस्त केला. हली इंग्रजी दोस्ती आणि कुणबी आसे करितात. इंग्रजी सरकार कोणाचे ज्ञातीस अटकाव करीत नाहीत, आणि हे लोक जवल पैका फार जाहला म्हणून आसे करितात. इंग्रजी राज्य मोठे; परंतु सारे साहेब लोक तालिवार आसे नाही. आपलाले दैवाने वगैरे गरीब तालिवार आहेत; परंतु ते साहेब लोक पो जातीचा कायदा सोडून करू लागल्यास बंदोबस्त होतो. मडम लोकानी फिर्याद केल्यावरून, काले मडमेचे आवलादीचे लोकास मोठे काम मिलू नये, त्याजवरून त्याचा बंदोबस्त केला. त्याप्रोच इकडील बंदोबस्त इंग्रजी सरकारास कर्णे प्राप्त, न केल्यास इकडे बहुत लांछन आहे. या लोकानी आपले मुलकाची सरहद सोडून इकडील व कंपनीचे मुलकातून या ज्ञातीत फितूर कर्णे नीट नाही. त्यास या ज्ञातीपैा त्याणी जे लोक नेहले ते इकडे पोहोचते केले म्हणजे पुन्हा आसे कोणी करणार नाही. हिंदुस्थानात सिंदे वगैरे कुणबी लोक त्यासहि याप्रो ताकीद जाली म्हणजे तेहि आसे करणार नाहीत. सदरहूप्रो जबाब आल्यास ल्याहावे. कमज्यास्त जाहल्यास रासिदंट याची समक्ष गाठ पडल्यानंतर ठरविण्यात येईल. याप्रो याद स्मरणार्थ पाठविली आसे. ॥१॥ ज्ञातिविसी काही दाखला आमचे व राजकारण व परहाद व ज्ञात मुक्त्यारी सबब अटकाव न व्होवा व बाजीराव वेले जाहाले तुम्ही आसून होय व मडम दाखला देणे, तुम्ही आडवे न यावे. मग मुक्त्यारी म्हणे कसे चालल.

¶*The attempts made by wealthy families like the Gaikwads etc., to effect marriage connections with high Maratha families by offering them money and thus to produce an intermixture of castes are condemned by Pratapsinh who reports them to the Resident and requests him to support the ancient religious customs. This is an extract from his diary.*

No. 22]

पान १३९-१४० [5-2-1833

गायकवाड हा कुणबी आसून मराठी ज्ञातींतील काही लोकास पैक्याची लाळूच दाखऊन फितऊन नेहले आणि बाटविणार याजकरिता येथे आवघी मराठमंडळी जमा करून त्याजपाो चिमणापा सिर्के कुटरेकर हली गायकवाडाचे प्रकर्णास मूळ; सबब त्यास सांगितले तुम्ही ज्ञातींत नाही. आज साताऱ्याबाहेर जावे. या प्राो सांगून ज्ञातींतून काढून लाविले. आपाजीराव मोहिते याचे चिरंजीव गेले; सबब त्यास ज्ञातीबाहेर म्हणून सांगितले. त्याणी जाऊन बाटल्याचे आगोदर चिरंजिवास घेऊन आले तरी ज्ञातींत घेऊ आसे सांगितले. त्यास सरकारातून नेमणूक दरसाल २०० रुपये होते ते मंना केले. रावजी सिर्के डेरवणकर गेले त्याचे चिरंजीव येथे होते त्यास लाऊन दिल्हे. त्यास सरकारातून नेमणूक रुपये होते ते मना केले. राघोजीराव मोहिते याचे बंधु गेले, त्याजबाा त्यास सांगितले तुम्ही आपले बंधूस बाटल्याचे आगोदर आणल्यास तुम्हास ज्ञातीत घेऊ; बाटल्यानंतर घेणार नाही. आसे सांगून त्यास काढून दिल्हे. त्याची आसामी स्वारात होती ती मना केली रुपये ३००. बाबाजी सुर्वे यास तुरपाचे पागेत आा १९२ रुपये सिधासुधा मना केले. त्रिंबकराव आहिराव याचे चिरंजीव गेले सबब आहेरावाची आसामी दरमाहा ३० प्राो ३६० होती ती बाद घातली. पायदल पाौ रावजी मोहिते हे गेले त्याचे कमी ८४ जाले. याो १२४६ बारासे [सेचालीस]कमी जाले. बाकी सारे माहाडिक सिरके भाो वगैरे मंडळीस सांगितले कीं आम्हापासी रोजगार मिळावयाचा नाहीं. भीक मागून ज्यास आपली ज्ञात संभाळणे आसेल त्याणे साफ बोलावे. ज्यास जाणे असेल त्याणे आज जावे. आटकाव नाही. व जे आसामी गेले त्याचे घरी जेवावयास कोणी जाऊ नये व त्याचे घरी लेकी बहिणी दिल्या असतील त्यास आपले घरी आणू नये. याप्राो सांगितले. नंतर आवघ्याने रुकार दिल्हा की याप्राो कबूल आहो. कोठे जाणार नाही. ॥१॥ +सोमवार तारिखेस लिहिला आहे. सेरयातील भाव कलमे हासील कलम

¶*Pratapsinh mentions in his diary that he has excommunicated some persons for having lost caste by contracting marital connections with the Gaikwad family and has stopped their allowances. The bigoted orthodoxy of the Raja's mind is herein clearly visible.*

\+ येथून पुढें स्वतःचें अक्षर.

No. 23] [*15-5-1833*

पान २२१.

आमरसिंग सिरके कुटरेकर याचे चिरंजीव आबा गायेकवाडाकडे जाऊन सोयरीक केली. सबब त्याजवर ज्ञातीनी वाळीत टाकिले. त्याचे बंधु बाल्याबा नागपुराहून आमरसिंगाचे पत्र सरकारात व खंडेराव मामा यास घेऊन लग्नाकरिता आले. त्यास ज्ञातीनी सांगितले की तुमचे बंधूनी लिहून दिले होते की गायकवाडाची सोयरीक करूं तरी कासीत मात्रागमन केल्याचे पातक, आसे आसून सोयरीक करून बाटले व आणखी मंडलीहि फिताऊन नेहली. त्यास आमरसिंगाने येथे येऊन ज्ञातास रूजू व्हावे म्हणजे होणे ते होईल. ते न आल्यास तुमची वागणूक ज्ञातीत होणार नाही. त्यावरून रावजी सिर्के बोलले आम्ही नागपुरास लिहिले. वडिलाचे पत्र आले कीं नागपुर मुा येजमानानी सांगितले, तुमचे आबा सिर्के वगैरे मंडळी बडोद्यास गेले ते इकडे आणवावे व देसी मंडळी आसेल ती आणवावी, याकरिता आमचे येणे तिकडे व्हावयाचे नाही. तुमचे लग्नाचे बनून आल्यास करून यावे; नसल्यास निघून यावे. यावरून सातार मुा सरकारानी क्षेत्रिय ज्ञातमंडळी जमा करून विच्यारिले की आमरसिंग याचे चिरजीवानी आसे केले. त्यावरून नागपुरास याद पेशजी पाठविली आहे की आमरसिंग याणी येऊन ज्ञातीस रुजू व्हावे आणि बोलावे; तोपर्यंत तेथे यासी ज्ञातीत वागू देऊ नये. ज्ञातीत जे यास वागवितील ते यासारखेच, तेव्हा तेथे सदरहूप्रो जाल्यास ठीक; नाही तर सारे नागपुरवाले क्षेत्रिय ज्ञातवाले यासी वागणूक करू नये आसे होईल, तेव्हा कसे करावयाचे असा सवाल केला; व सरकार बोलले की आम्हीं बोलतो, परंतु कदाचित आम्हीच तुम्हातून जाऊन तिकडे मिलालो तर कसे? तेव्हा ज्ञातवाले मंडळी बोलली नागपूरवाले आसोत अगर सरकारहि आम्हातून गेले तत्राप ज्ञातीविषई आमची खंबीरी आहे. जी याद आमरसिंग याजबाो पेशजी गेली त्याजविसी आमची खंबीरी आहे. आम्हास ज्ञातीचे जाबसालाविसी ज्ञातिधर्म सोडून साफ वागावयाचे नाही. ॥ १ ॥ +नागपूर बदले तरी ठीक हा निश्चये. जाणारानी जावे. जाऊन बाहेरून खेलला तरी, धाकाकरिता बोलो की मग ज्ञातीत आबरू घेऊन जाईन; व ठरलेले लेहून ठेविले. खासगी रुमालात कपाटात व बक्षीजवल व सर्वांनी पतकरले व हे होणे कठिण, परंतु कोण काये म्हणतो किंवा ठरलेविसी दंम व आमी गलो तरी कैसे ठरले प्रो यावरून धाक जाणावा की इतपरयत येका ठरलो, बेबदल होणे कठिण सबब आसे केले व मुलजमा केली की माहिती पुढे चालावी.

\+ येथून पुढें स्वतःचें अक्षर आहे.

व गोडीबदल जेवण विडे विलायेची दिली व सर्वास कलऊन साळूबाईस पोटवण लुगडे चालीचे सनगे व पत्र की ज्ञातीविसी ठरऊन कलवावे; व सरकारमरजी होणे म्हणे तरी हिकडीलविसी मरजीने वागावे म्हणजे आम्हास म्हाराजाजवल विनंती करणे नीट पडेल, आसी गोडी दाब व लोभ भाव ठेऊन केलें. हासील भाव खर्च करणे तरी केला पाहिजे; परंतु आधिक होऊ दिला नाही. आजून कलमे भाव कलम.

¶*Pratapsinh writes in his diary some observations as to the marital connection between Shirke and Gaikwad not allowed by the convention of the community and also to the consequent ex-communication of the former.*

No. 24] [*22-10-1833*

पाहटे उठून नाहण होऊन नित्यानेम करून पोषाख केला. आज काम सुटी सा। न पाहिली. कारकुन मुछदी सरदार मानकरी शागीर्द पेशा घर मडली खासे व आपासाहेब व जाहागीरदार लोक पौ रामराव डफले आजारी सबब न आले. बाकी जाहगीरदार अकलकोटकर सुध्धा आले. फौज स्वार १५०० सिबंदी २००० किता घोडी १००० पायदल २००० व शागीर्द पेशा २००० पालख्या २५ म्याने २५ हती ३० रयत लोक २५००० अजमासे व इग्रजी पलटणचे लोक ५०० तोफा २ व गवरनर सालमजकुरी आले नाहीत व प्रथम देवीदर्शन घेऊन रेडा मारला. नंतर स्वारी सीमाउलंगनास चालू जाहाली. लोक मुजरे जाले. व इंग्रजी वकील लाडविक साहेब सालाबादीप्रमाणे सामोरे येऊन वगैरे साहेबलोक स्वारी परतली तेव्हा निरोप घेऊन गेले, व इग्रजाकडील पलटणी लोक व तोफा सलामी केली. तोफाचे बार व रायराव इकडील तोफाचे बार व पायदल लोकाचे बार स्वारी येताना व जाताना याप्रमाणे स्वारी सीमा उलंगनास जाऊन वाड्यांत आली. श्रीदेवीचे दर्शन घेऊन सतका नारळ विडे धान्य वाहाऊन प्रदक्षणा करून नंतर आत खासे मंडलीकडे जाऊन सोने देऊन सतके होऊन विडे दिल्हे. खासे बायकानी वोवालिले. बाली अगठी काढली व सतके परस्परे होऊन नंतर कचेरीस एक दरबार सालाबादीप्रमाणे जाला. सोने आपटे याचे व नजराणे इरादेप्रमाणे मोहरा पुतळ्या होन रु॥ केले. नंतर त्याच वेलेस ललित देवाचे दरसालप्रमाणे होऊन प्रसाध नारळ घेतले. खारखानदार दरकदार वगैरे कारकून किरकोल मंडली मानकरी पो पाहून वजा व जाहागीरदार यास क्षिरापद व नारळ इराद्याप्रमाणें दिल्हे. येकूण कलमे ३५ पाहिली. देवीकृपेने सारे पार आहे.

¶*This is a description of the way in which the Dassara was celebrated by Pratapsinh at Satara as entered by him in his diary.*

No. 25] [1-2-1834

पो तेरीख १७ जून १८३४.

श्री

माहाराज सरकारास ग्रांटसाहेब बाहादूर यांणी तेरीख २९ डिजंब्रर सन १८३३ चे पत्र मौजे इंडीग येथून लिहिले त्यातील मजमून.

१ माहाराजाचे पत्र व त्याच (स)मागमे दाजीबा जोसी याचे पत्र या प्रो दोनी पत्रे पावली.

१ माहाराजास पेशजी पत्र पाठविले त्यानंतर राबिसन साहेबाची व आमची येथे भेट जाली. दोन दिवस होते. सातारा प्रकर्णी फार बोलणी जाली आणि जागिरदाराविसी मार आम्ही बोलिलो आणि येविसी माहाराजाची मर्जी काय हे त्यांस विच्यारिलें. त्याणी सांगितले की माहाराजाच्या मर्जीप्रो बदोबस्त करून दिल्हा आहे.

१ माहाराजाच्या लिहिण्यांत फलटणचे जागिरीविसी काही माार आहे असे वाटते, परंतु अद्याप येविसी माहाराजाचा काय मनोदये हे पके समजले नाही व अलफष्टेन साहेब यासहि माहाराजाचा काय मनोदय हे समजले नाही. यास्तव येविसी काही मारची माहिती माहाराजास अपेक्षा असल्यास कलली तर वास्तविक असेल ते लिहून पाठऊ व अलफष्टेन सोहि वास्तविक माार असेल तो लिहून कलवितील.

१ जागिरदार लोकांकडे ठरावाच्या यादी दिल्या त्या ज्याच्या त्यास वेगळाल्या दिल्या आहेत. त्या कशाकरिता की काही बखेडा पडू नये व सर्व नित्याप्रो चालावे, याकरिता ठराव यादी जाल्या आहेत. या करार यादीविसी आमचे अनुमत पूर्वी होते, हलीहि आहे. त्यात भाव की ज्याप्रो इंग्रजी सरकार व माहाराज सरकार तहनाम्याप्रो परस्परे चालतात त्याप्रोच जागिरदाराचे करार यादीप्रो माहाराजानी जागिरदारासी चालावे व जागिरदारानी माहाराजासी चालावे.

१ सातारियाचे मुलकातील खासगी सरंजामी जागिरदार आहेत तो सरंजाम त्यांस यावतजीव चालेल, नंतर माहाराज सरकाराकडेस येईल असे आहे असे आम्हांस वाटतें. या प्रकर्णी माहाराजास याद आम्ही दिल्हीच आहे, परंतु हली पकेपणी स्मरणात राहिले नाही.

7380

१ जमाबंदी कसी होत चालली म्हणोन माहाराजानी लि॥ त्यांच्यात्रिसी या कागदात मी फार लिहीन तर या कागदात जागा पुरणार नाही. त्यास जमा कमी जाली तर खर्च कमी करून बरोबर राखावें.

१ आम्हास वाटते की हिंदुस्थानची आबादी लौकर होईल, त्याबरोबर माहाराजाच्या मुलकाचीहि सोई सोईनें आबादी होईल.

१ आम्हास व अलफष्टेन साहिबास माहाराजानी शब्द लाऊन लिहिलें असो. आम्हास टपका लिहिला असता आम्ही योग्य आहो.

१ सातारियाचे बरे व्हावे म्हणोन जी मेहनत मी घेतली ती मेहनत असी की माझा खासगत सातारा असता तरी इतकी मेहनत मी घेतली नसती.

१ आमचा आहवाल खासगत आम्ही लि॥ होता व आमच्याचप्रो बडेसाहेब ही गरीब आहेत म्हणोन लि॥ होते. त्यात्रिसी माहाराजानी लि॥ की असे लि॥ ठीक नाही. त्यास आम्ही लिहिले होते की बडेसाहेबांनी चाकरी फार दिवस केली, तत्रापि त्यास पेनसन मिलत नाही. हे लोक पेनसन मागतात आणि त्यास मिलत नाही तेव्हा त्याचे वरली फिर्यादी करवत नाही व मलाही पेनसन नाही. जखम लागल्यासिवाये अगर बहुत वर्षे चाकरी केल्यासिवाये पेनसिन मिलत नाही. मलाही पेनसन नाहीं हे कशासाठी लिहिले कीं माहाराजाच्या उमेदीचे समाधान व्हावे, म्हणोन लिहिलें.

१ माहाराजास स्मरण असेल की आपली खासगत हकीकत लिहून पाठवा म्हणून लिहिले होते. त्याजकरिता सर्व हकीकत लिहून पाठवीत असतों. ते असे समजून लिहितो की जसे पेशजी मी दरवाज्यावरील धाकट्या बंगल्यात बसून बोलत होतो व जुन्या वाड्यात बसून बोलत होतो, तसीच खासगत भाषणे बोलतो आहे असे समजून लिहिले आहे.

१ माहाराजकू कबु तखतपर कबु खलबतखानेमे कबु काहा हम दोस्तीसे कबु दो बातकी सलामी बोल तेथे कबु दस बात चूप आपनी गपसप बी बोलतेथे. आदतसे आलबत लिखने च्याहिये लेकीन माहाराजकू मालूम है के खुशामतकी बात मेरा दस्तूर नही.

१ कबु माहाराजका घुसा बी मेरे उपर बहुत हुवा होयगा. लेकिन माहाराजने आपने दिलकू पूछना की किस्के करनेसे अछा हुवा. आव माहाराज दुष्मनसे खुशामतसें और बडा आदबसे च्याहाता नयी ईस हूरतके दोस्तीकी खलबत हमने किया नयी.

१ खोटेपणा जो आहे तो त्यांत वाईट होते त्यांस इंग्रजींत वोपन फो (open foe) म्हणतात.

१ आम्हीं हिंदुस्थानी व मराठी भाषा विसरलों. आम्हास फार आवघड जाते की दुसऱ्याच्या मनात यावयास व दुभाषास समजावयास अवघड जाते.

१ माहाराजाच्या मनांतील गोष्ट लिहावयास आम्हास कठिण पडते.

१ माहाराजाचे लिहिण्यातील व दाजीबाच्या लिहिण्यातील अभिप्राय समजावयास अवघड जाते.

१ आम्ही माहाराजास लिहून पाठविले होते की आम्हीं कधी कधी लंडन शहरास जात असतो.

१ मेस्तर काकबरनसो[1] साहुकार यास लिहून पाठविले आहे, या मुलकातील जिनस माहाराजास काही पाहिजे असल्यास सवाई किंमतीच्या किफायतीने ते खरेदी करीत असतात. आम्हीं खरेदी केल्यापेक्षा सवाई किंमत त्याचे खरेदीस कमी पडली. ते आपली आडत मात्र सिरस्तेप्रमाणे घेतात.

१ पेशजी सामान काही कॉकबरनसोनी खरेदी करून पाठविले होते ते माहाराजास पावले. आम्ही खुसी जालो.

१ आम्हीं पूर्वी त्यास खरेदीस पैका पाठविला तो ज्याजती जाला त्यापैा सिलक बाकी राहिली ती आमचे हातात आहे.

१ तुमचे लोक जाणतात की आलफष्टेनसो यास गवरनर जनरल करून पाठवितील असे वाटते, परंतु ही गप मात्र आहे. आमची खात्री आहे कीं सांप्रत ते जसे आहेत तसेच राहाण्याची त्याची इच्छा आहे.

१ आगीचे गलबत चालू जाहाले म्हणजे बोलावणे, आम्ही त्या मुलकास येऊन च्यार महिने सातारियास राहावे असी इच्छा आहे. ते समयी डुकराचे सिकारीस चांगला घोडा घ्यावा.

१ जितका मार राबिनसनसाहेबानी सांगितला तो यैकून समाधान जाहले.

१ राबिसनसाहेबानी सांगितले की माहाराज वारंवार आमचे स्मरण करीत असतात. हे ऐकूण फार संतोष आम्हास वाटला व राबिसनसाहेब बोलले त्यावरून पत्राचा अभिप्रायही समजला नवता परंतु तोहि समजुतीत आला.

१ ती पत्रे लिहिणाराचे अक्षर आम्हास माहीत जाले की आमचे दोस्त नारायणराव याचे अक्षर आहे. चिटणिसाचे बखरीचा तरजुमा त्याणी आम्हास

1 Cockburn.

करून दिला आणि आम्ही जाणतो की ते फार चांगले योग्य मनुष्य आहेत. माहाराजाची चाकरी निष्ठेने करीत असतील. सरकारी रिवाजाचा कागद लिहिण्याची पद्धत व खासगी कागद लिहिण्याची पद्धत वेगळी आहे. त्यास त्यास फार फरक आहे तो त्याणी माहाराजांस विदित करावा.

१ आम्ही इच्छा करितो की माहाराजास भेटावें व थोडेसे लिहीत जावे जोपर्यंत हयात आहे तोपर्यंत.

१ करनेल लाडउइकसाहेबास फार विच्यारले म्हणोन कळविले पाहिजे.

१ करनेल लाडउइकसाहेब हे अलफिष्टेन साहेबास अगर आम्हास जागिरदार प्रकर्णी मार समजावितील तर तो मार समजावयास काही चूक व्हावयाची नाही.

१ मेस्तर मारीससाहेबाची प्रकृत चांगली नाही हे ऐकून दिलगीर आहे. ते माहाराजाचे स्नेही आहेत. ते सिकारीच्या घोड्यावरून पडले तेव्हा माहाराजानी त्यास हात देऊन उठविले आणि त्यास चांगले केले ते विसरणार नाहीत.

१ जे कोणी जुनी मंडली आमचे स्मरण करीत असतील त्यांस पुसले म्हणोन कलविले पाहिजे.

१ येशवंतराव मृत्य पावले हे ऐकून फार वाईट वाटते. ते आलसी व रागीट होते, परंतु अकलवान होते.

१ हे पत्र लिहीत होतो ते समयी न्यूजपेपरात पाहिले त्यात शपटबरपर्यंत सातारियांत पाऊस नाही त्यामुले फार वाईट वाटते, परंतु नंतर पडला असेल असी इच्छा आहे.

काकबरन कंपनी याणी माहाराजास लिहा आहे की ग्राटसाहेबानी पत्र पाठविले आणि लिहा त्यावरून हा कागद १ फेबरवारी सन १८३४ रवाना केला आहे. माहाराजानी काही आज्ञा केली असतां आम्ही संतोषाने काम करू.

¶*This is a Marathi translation of Captain Grant Duff's very interesting letter from England to Raja Pratapsinh of Satara. The letter evinces the high regard the writer entertained for the Raja.*

No. 26] [1-7-1834

तरजुमा केला
१ जुलई १८३४.

यादी उदेपूर वगैरे लग्न प्रकर्णी कलमें :

१. शिवानंद शास्त्री यांस उदेपुरास पत्रे देऊन पाठविले होते. त्यांची उतरे व ब्राह्मण मंडलीची पत्रे घेऊन आले, त्याच्या नकला रसिदंटसाोकडे दिल्या व राणाजीच्या तसबिरा आणिल्या त्या दाखविल्या आहेत.

२. मुलीस नवरे पाहावयासी शास्त्री यास सांगितले. त्याणी राणाजीचे भाचे १ व कन्येचे पुत्र १ व येक शरीरसमंधी येकून तीन नवरे पाहून पत्रिका आणिल्या. पौ येकाचे वये लाहान व येकाचे पत्रिकेस बनत नाही. येक कन्येचा पुत्र आहे त्याची पत्रिका मिलते.

३. उदेपूरचे लग्न करावयाचे जाल्यास कलमे :

१. खर्च सात लक्ष रुपयेपर्यंत लागेल त्याची तजवीज.

१. हिंदुस्थानात व दक्षणेत इकडे पहिली चाल असी होती की, सरकारांत लग्न जाले आसता मुलकात इनामदार वगैर याजवर येकसाला वसुलाची लग्नपटी करावी असी चाल होती. त्याप्राो पटी करावी असे गवरनरसाो ठरल्यास येक वर्ष गेल्यावर दुसरे वर्षी लग्न करावे म्हणजे कर्ज होणार नाही व हालीचे जमाखर्चात पाहून करीन म्हटल्यास मुष्कल. कदाचित लग्नपटीची सला गवरनरसाहेबाची न जाल्यास मग आमचा वसूल आहे यातूनच तजवीज करून करावयास येईल. परंतु त्यासहि येक वर्ष गेल्यावर दुसरे वर्षी होईल म्हणजे ऐवजाची तोडजोड होऊन लग्न व्हावे लागते सबब.

२. उदेपूर प्रकर्णी ठरल्यास उदेपूरचे लोक व समारंभास चंदावरकर वगैरे येतील त्यासमागमे स्वार सिबंदी लवाजमा असेल त्यास दस्तके द्यावी लागतील ती कलमे :

१. चंदावरकर समारंभास बोलवावे असे इंग्रजी सरकारचे सल्यास आल्यास चंदावरास कोणी पाठऊं. ते आले तर ५००० मनुष्याचे दस्तक द्यावे लागेल.

१. उदेपुराहून नवऱ्यासमागमे जमाव ३००० व ते राणाजीचे आप्त सा राणाजीचे भाऊ वगैरे कोणी समागमे येतील तो लवाजमा १००० याप्रमाणे दस्तक द्यावे लागेल.

१. देऊळगावकर जाधवराव व पवार हे इंग्रजी सरकारचे सल्यास आल्यास बोलवावे लागतील. आगोधर त्याकडे कोणी पाठऊ. ते आले तर ६०० मनुष्याचें दस्तक दिल्हे पाहिजे.

३

याप्रों दस्तकाचा आजमास आहे. गवरनरसाहेबाच्या मर्जीस सला असला तर तिकडे कोणी पाठऊ व किती सरंजामानिसी ते येतील हे खास समजेल.

४. उदेपूर प्रकर्णी गवरनरसाहेबाची सला आली तर दोन वर्षे लग्नाचा अवकाश करावा लागेल. कारण की, खर्चाचे यैवजाची तरतूद व्हावी लागली व सिवानंद शास्त्री यांस पुढे पाठऊन क्षत्रिय ज्ञातीचे चालीप्रमाणे येकताटी खाणे होण्याचे ठरऊन, त्याचे पत्र आले तर ज्ञाती पौ काही मंडली तिकडे पाठऊ. येकताटी खाना जाला म्हणजे लग्नाचा होईल. यास वर्ष दोन वर्षे आवकाश आहे.

५. मार्गसीर्ष मासी मुलीचे लग्न करू ते समयी यावे म्हणोन गवरनरसाहेब यासी रुबरू बोलण्यात आले होते. त्यास उदेपूरचे ठरल्यास दोन वर्षे आवकाश पडेल आणि गवरनरसाहेब जाणार; तेव्हा मार्गसीर्ष मासी गवरनरसाहेबानी यावें; त्या महिन्यात आपासाहेब माहाराज व बलवंतराव राजे भोसले सेनापति याचे लग्न करू. त्या समारंभास पाच साहा दिवस लागतील.

६. उदेपूरचे करू नये असे ठरल्यास मग पेशजी गवरनरसाहेबासी रूबरू बोलल्याप्रो इकडील मंडलीतच मुलीचे लग्न करू. ते समयी गवरनरसाहेबानी मार्गसीर्ष मासी यावे. शुध पक्षी मुहूर्त नेमिले आहेत. कदाचित विटालसी-पणाचा अटकाव पडल्यास मार्गसीर्ष वा पक्षी करू. तोपर्यंत गवरनरसाहेबानी महरास अगर सातारियास राहावे. मुहूर्तसमयी येथे यावे. आल्यानंतर लग्न समारंभात सूचनेप्रमाणें यावे लागेल. केवळ भेटीप्रमाणें दोन रोजात होणार नाही. आठ दाहा दिवस समारंभास पाहिजेत. येविसी आगाव समजले म्हणजे तयारी खबर मार लिहून पाठऊ.

७. गवरनरसाहेबाचे येणे, लग्नाचे दिवसात आवकाश नसल्यास दसऱ्यास यावे. कारण की गवरनरसो जाणार सा.

7385

८. मुलीचे लग्नसमारंभास साहेब लोकानी यावे :

१ गवरनरसाो
२ जरनेल चीप
३ रसिदंट
४ पुण्याचे कलक्टर
५ सदरलेन साहेब
६ न्यून साो
७ अडरसन साो
८ करनेल ब्रूक, सोलापूरचे कमांडिंग.
९ मारी साो
१० वाथीन साो
११ निसबट साहेब
१२ जिमीसन साो
१३ बडे साो.
१४ वार्डीन साो
१५ समसीन साो

याप्रमाणे जसे गवरनर सााचे युक्तीस येईल त्याप्रो त्यास बोलाविता येईल.

९. उदेपूर प्रकर्णी आमच्या मुलीविसी सला न आली आणि न होय तर पुढील जून महिन्यात सिवानंद शास्त्री यांस उदेपुरास पाठऊ. राणाजीस पत्र देऊ. येकताट होत आसल्यासी काही क्षत्रिय ज्ञातमंडली पाठऊ. येकताट जाले तर इकडील मंडलीच्या मुली तिकडे व तिकडील मंडलीच्या मुली इकडे परस्परे लग्ने होण्याचा सिलसिला ज्यारी ठेऊ, जसे नागपूरचे मंडलीचे घरी आहे तसे.

१०. सदरहू प्रो गवरनरसाहेबाच्या समजुतीत यावयास रसिदंटसाहेब याचा सला आल्यास येथून कोणी गवरनरसाोकडे पाठवावयास येईल.

१०

उतम सला कोणती हे कळावे. इकडून कोणतीहि अडचण नाही. असी सला तरी कोणास पुसावी ? असे अकलेचे लोकहि नाहीत.

¶*This is a draft containing Pratapsinh's proposals and arrangements regarding the celebration of the contemplated marriage of his daughter with a relation connected with the family of the Rana of Udaipur. These proposals were to be submitted to the Governor for his approval through the Resident.*

No. 27] [*July 1834*

राणाजीस पत्र. मसुदा

श्री

विशेष सिवानंद शास्त्री इकडून ज्ञातीप्रकर्णी मााराकरिता पाठविले ते दर्शन घेऊन परत आले. त्याणी ज्ञातीप्रकर्णी शास्त्रार्थाचा मार व या वंशांतील असे पूर्व स्मरून बहुता दिवसी इकडे शास्त्रीस पाठविले येणेकरून आनंद जाला. हा

मजकूर व आपली सुखरूपता व पूर्ववंशपरंपरा चालीप्रो लोभयुक्त आसीर्वाद सांगून पाठविला ते सर्व श्रवण होऊन भेटीतुल्य लाभ होऊन संतोषाभिवृद्धि आसी जाली की, जसे नंदीग्रामी जो भरतास आनंद तद्वत जाले ते पत्री कोठवर लिहावे ? इकडून पत्र न गेलेवरून चित उद्विग्न फार जाले म्हणून शास्त्रीस भाव सुचविले. त्यास चिताचा धर्मच तसा आहे. आपल्याविसी उत्कंठा व्हावयाचीच. परंतु पत्र न गेले तोहि मार शास्त्री याणी प्रत्योतर केलेच आहे. शरीर-समंधाविसी माराचे सहजी भाव शास्त्रीबावापासी बोलण्यात आला की, इकडील शरीरसमधीयास कन्या द्यावी व करावी त्यास वडिलाचे आज्ञेबाहेर काये आहे ? इकडील मंडळीची तिकडे व तिकडील इकडे व्हावे हे मनोदय इकडीलहि आहे. आज्ञा जाली ती नीटच जाली. या देशचे ब्राम्हणाचा द्वेश कर्माविसी आहे ते नीट करून लिहून कलविता येईल. नंतर तिकडून लिा येईल तसे करिता येईल. उदेपूरचे विस्वासु ब्राम्हण आश्रित आसतील त्याप्रो वैदिक कर्म चालवावयाजोगे व मंत्रशास्त्री आनुष्ठानी व जोतिसी मुहूर्त वगैरे सागणार यैसे इकडून लिहिले येताच रवाना होय असे जाले पाहिजे. इकडून खलिता रवाना जाला त्यावरून मर्जीस नीट न वाटल्यावरून हली पत्र लिहून नंतर लिहिले येईल तसे इकडून लिहिता येईल.

आबाजी राजे सिरके व वोसंपन्न सितळप्रसाद शास्त्री, सिवानंद शास्त्रीके बडेभाई व येसरसिंग व बळदी यैसे पाठविले आहेत. इकडील सुखरूपता कलवितील.

¶*This is a draft letter to the Rana of Udaipur regarding the contemplated marriage of the daughter of Pratapsinh with the former's relation.*

No. 28] *[13-10-1834*

[छत्रपति प्रतापसिंह रोजनिशी पान नंबर ४]

हरि त्रिंबकपंत कोणी लुच्या याणे मुंबईहून तुफानी पत्र लिहून डाकेतून पाठविले ते पाहून सेनापतिहाते रसिदंट लाडविक यास दाखविले. त्यात हसील की अदालतीचे साहबाबरोबर कोल्हापुरास आमची रवानगी जाली. तेथून परत आल्यावर गवरनर दापोडीस आले; सबब तसेच पुढे गेलो तो आज्ञा जाली की इंदूर देसी जावे. ते समई बहुत येत्न केला की राजश्री बालासाहेब भोसले व गोविंदराव दिवाण किंवा रवलोजी लिंगोजी कासकर यातून कोणाची तरी येकांती भेट होईल, त्याजपासी नवल विशेष समजाऊ; त्याद्वारे माहाराजास निवेदन होईल; परंतु भेटीचा योग जाला नाही; आणि आदालतीची मंडळी निकडीने बानकोटास गेली तेथे फुरसत पाहून हे पत्र लिहिले आहे. त्यास हलीचे कायदे

7387

विदितच असतील. हे पत्र येकांती आपण उभयेता व बालासाहेब पाहून मनास आल्यास येत्न त्वरेने करावा तरी पुढे बहुत उपयोगी पडेल. त्यास मुंबईत डाकतर इसमिटण सो आहेत याचा अत्यंत श्नेह करून घेणे. पत्री लिहितो त्याप्रो साध्य करून घेणे. तो मार रघुनाथ राम जोसी वैद्य हे साहेबाचे कारभारी लोभातील आहेत, याचे हातून परिस्फुट न होता कार्य होईल. त्यास सरकारानी येक पत्र साहेबास पाठवावे की तुमचे कारभारी याचे कारण आहे. त्यास साताऱ्यास पाठवावे. यात वर्कड आदालतीचे साहेबाचे वगैरे इष्टत्व आनायास होईल. वैद्य यास कोलापुरकर छत्रपति नेणार, त्याचे पूर्वी मुदाम कारकून पाठवावा. हा उद्योग कोणासच कळू नये. आपले बुधीनेच लिा म्हणून पत्र ल्याहावे. याप्रो सरकारचे नावे पत्र; व सेनापतीचे नावे लिा त्यात की बुबासाहेब माहाराज याचे पत्र तुमचे लाखोट्यात भिडले ते येकांती माहाराजास उभय बंधूस समजाऊन त्वरेने करून घ्यावे व गोविंदराव दिवाण यास नमस्कार सांगावा. याप्रो. ॥ १ ॥ कलम.

¶*Extracted from the diary. A treasonous letter was received through post by Pratapsinh and was handed over by him to Resident Lodwick.*

No. 29] *[27-10-1834*

पान १७

जोतपुरचे लाहानसे राज्यास जिंकावयास इंग्रज तयारी करितात असे नाही; परंतु मध्यभागी काही मोठे प्रकर्ण आहे. जेनेकरून सिंधुनदी स्वाधीन होईल आणि रंजितसिंग व सिंधी लोक व रूसचे दरबारास येकदाच धका बसेल व रूसाचा हिंदुस्थानासी संबंध तुटेल. कारण जोतपूरचा मुलुक घेतल्याने त्यास दुपट अवघड पडेल; व विलायेत व इरानाहून खबरी येतात की शाहासुज्याचा मुलुक घेण्यास रूस लवकर येण्याची तयारी करितात; व इरान येक वेल आटोपले म्हणजे लवकरच हिंदुस्थानावर रूस येऊ लागतील. ॥१॥ विलायतेहून येऊ न देणे हे न लिहिले तेव्हा सारी भुलताप व आता जाहाले तेव्हा जोतपूर हाती लागणे कठिण आहे; व होलकराचे मोघम लिहिले, परंतु जडच लिहिले आहे; व आसे जागोजागी छयावनी आसी न उठू दिलियातहि लक्षण चांगले दिसत नाही. आता मोड जाहाला तरी हे प्रकरण मिटेलसे नाही. पाचसात वर्षात काही तरी ठरते. आम्हासारखे गरिबास आवघड आहे. देवी सर्व काम दये पार करील. बाकी आधार नाही; व बुधी नीट ठेऊ. प्रज्यापालन व स्वधर्म व इंग्रजासी वाकडे न राहणे.

¶*Russian invasion against India through Afghanisthan is alluded to by Pratapsinh in this extract from his diary.*

No. 30] [14-10-1834

(छत्रपति प्रतापसिंह रोजनिशी पान नंबर ६.)

सरहदी प्रकर्णी गवरनर यास पत्र लिहिले त्याचा तरजमा करणेविसी रसिंदट याजकडे दिल्हे गेले; मागील वहीवर बार केले आहे. ते विसी आज रसिंदट लाडविक येथे आले. तेव्हा बोलले की गवरनरास माहाराजानी पत्र थोडक्यात फार चांगले लिहिले व मजकूरहि माहाराज सरकारचा खराच आहे; व आमी आलो; परंतु वार्डीन याने कौंसलात बेवकुफीने किंवा आदावतीने लिहिला आसेल तो आसो; परंतु लबाडीचा माार लिहिला व कौंसलातून मागील कागदपत्र पाहून हुकूम करावा तो न पाहता गाफलगिरीने वार्डिनाचे लिहिण्यावरूनच लिहिले. त्यास हली मी नहरास गवरनराकडे पत्र बरोबरच घेऊन जाऊन माार समजावीन. नंतर सरकारमर्जीप्रोाच होईल यात दिकत नाही, कारण माार खरा आहे. सबब; * * * * * * * * परंतु सरहदीविसी मात्र लागलेच होणार नाही. थोडे दिवसात होईल. मी कंसलात जाईन ते वेलेस उतर येईल. याप्रोा बोलले ॥१॥

कौसलात इतकी गाफलगिरी व सुस्ती होण्याचे कारण पुढे होणारासारखी बुधी होती, आसा भाव दिसतो, व धाकहि नाही. कोणी पुसेल सबब वारडिनास वाकडे वाटले तरी आता * * * * करा म्हणज जाहाले हा कलम भाव. व वारडिन लिहितो की ही चुरस या रसिदंट लोकाची आहे. तहनाम्यात जे लागले तेच सरहाद आसे भाव मनी आले का असे हे कोण बोलतो जबरेस.

¶Resident Lodwick promises Pratapsinh to put the treasonous letter of the previous day before the Governor at Mahableshwar writes Pratapsinh in his diary.

No. 31] [31-10-1834

पान २१

रसिदंट लाडविक याजकडे आज किल्यावर गेलो होतो तेथे बोलणे जाले ती कलमे हासील भाव कलम:

१ विलायतेस बादशापासी कारभारीमंडळ होते पहिले, त्याची घालमेल तेथील रयतेनी केली; आमची चाल देसची आहे आसी खबर आहे; परंतु आसी घालमेल व रयेत बेराजी राहाणे नीट नव्हे; व आसे आहे की इछा तृप्त जाली म्हणजे तितका शोध ठेवणे व पहिले बेताप्रोा वागणे होत नाही. याजवर इकडून उतर आले कीं पुढे आसे कांही व्हावयाचे आसले म्हणजे त्याप्रोा बेगुमाणपणा वगैरे

7389

होते, त्याजवर रसिंदट बोलले खरे आहे. बाजीराव याचे खाऊन आसे बोलत होते, वाकडे त्याप्रो जाहाले. सेवटी आम्ही बोलो सरहाद व हा दस्तआवज प्रो करणे. नवा आणून देऊन हे तुम्हाकडे व ब्राह्मण लोकाचे मनी सरवोपरी नाही. येथील चागल खरे आहे व मी जाणून आहे लाडविक बोले. कलम.

५ राजे व बादशा याणी दुसऱ्याचे स्वाधीन हुकूम ठेविला म्हणजे सदरहू विलायतेचे वर्तमान लिा त्याप्रो होते; व शाहू माहाराजानी पेशव्याचे स्वाधीन हुकूम केला याजमुळे येवढे थोरले राज्यास धका बसला. तो हुकूम आपले घरात ठेविला आसता तर, आजपर्यंत राज्यास धका बसला नसता. इकडून उतर केले की शाहू माहाराजानी पेशव्याचे स्वाधीन हुकूम केला नव्हता, व विश्वासावर गेले हिंदू धरमाने; परंतु त्याणी बेइमानी केली; व दुसऱ्यापासी हुकूम न ठेवणे हे खरे आहे. फौज व खजिना व हुकूम व इनसाफ या च्यार गोष्टी राजा व बादशा याणे आपलेजवल ठेवाव्या याप्रो सांगितले.

¶*Pratapsinh's conversation with Lodwick is reported in this extract and refers incidentally to the usurpation of power by the Peshwas.*

No. 32] [31-10-1834

पान २३

८ किल्यावर रसिदंटाकडे गेलो ते वेलेस त्याणी नाना फडणिसाची गोष्ट काढली. त्यात बोलले की नाना फडणीस फार हारामी होता. तो इंग्रजासी संमध न ठेवण्याविसी फार हुशारीने वागत असे; व तो म्हणत होता की इंग्रजापासी लेखात वगैरे थोडेहि गुंतू नये. कारण त्यांची चाल, थोडेसे सापडले म्हणजे दाबीत दाबीत व गुंतवीत गुंतवीत साऱ्यावर हात घालितात. याजकरिता प्रथमच त्यासी संसर्ग ठेऊ नये आसे म्हणत आसे; व आमची चालहि याप्रोच खरी आहे. या रीतीने वेतले; व तो फार शाहाणा आसे; परंतु प्रकृत थोडी खोटसल होती, व तलेगावचे लढाईचे वेलेस आमचे लोकास बहुत करून इकडील माहितगारी नव्हती आणि सिकस्ती होऊन आमचे लोकाची आबरू फार कमी जाली ॥१॥ यामुळे हुशार होऊन हा पेशवेयावर दावा उगविला; व बाजीराव

मी उतर केले की खरे;

परंतु ते वेले आसे होणे हे पापाचे हाती धरले म्हणजे येश येणे कठिण आसे आमचे शास्त्री आहे. हे खरे ते बोले; खरे आहे. कलम.

¶*Conversation between Pratapsinh and Lodwick is reported in this extract in which Lodwick pays a compliment to Nana Fadnis for his shrewd political sense.*

No. 33] [15-11-1834

पान ३२

२ आलपिष्टन साहेब याचे पहिले पत्र आले त्यात आहे की वर्कड संस्थानिकात कमती न दिसता व पेशव्यानी ठेविले होते त्याप्राो न होता व तहनाम्यात आहे की माहाराजाचे खानदान पुरातन हे जाणून बंदोबस्त करून दिल्हा जाईल. याजवरून शाहू माहाराज आस्त जाहाल्यावर आलीकडे ताराबाई आईसाहेब व रामराजे माहाराज यांची कारकीर्द व बाजीराव वसईस जाण्याचे पूर्वी स्वतंत्रपणे वागत होते तेथपर्यंत आलीकडे वसईहून आल्यावर इंग्रजी सरकारची जरब, होती या भयामुळे इकडील वागणुकेत पहिली सिस्त राहिली नाही; सबब वसईपर्यंत इकडील सरकारचा मगदूर व वागणुकेचे वहिवाटेचे कागदपत्र पाहून त्यात व हलीच्यात कम जाजती कोणते आहे हे इंग्रजी सरकारात बोलावयाचे कारण पडल्यास बोलावयाकरिता निवडून ठेविले काकी+ खानदानाप्राो दिल्हे [1]सुटवाल व वरकडाहून कमी न दिसता, तरी सिंदे नवाब होलकर बावीकर गायेकवाड नागपुरकर लढाई जाहाली हासील मुलूक किती दिला व मालियत इकडे जिकीर ठेविली किंवा बाहादारी कलम जाहागीरदार हे मोडावे हारयेकाला इंग्रेजी सला, आसे भावना नकलकाराचे बोलणे; परंतु पेशवे जसे चालवीत होते ते व हे इंग्रज कलमे कमी आधिक कलली; आधिक आहे तरी कलली नाही तरी न कलली याप्राो केले आहे. मनात कलम भाव हासील कलम भाव मनचा.

¶*This extract refers to the relations between Pratapsinh and the English as enunciated by Elphinstone in a letter to him.*

३ शास्त्रीमंडळ पाौ शास्त्र जाणत्यास कोणी शास्त्रनिर्णय विच्यारिला आसता येथार्थ सांगावा. लोभाने किंवा भयाने किंवा पुसणाराचे मर्जीनरूप सांगू नये. ज्या ज्ञातीस जे विहित व बहुत ग्रंथाची समते असा सांगावा व याप्राा आपण पाहून दुसरे विद्वानाचे समत घ्यावे. याउपर विपरीत शास्त्रार्थ सांगितला आसता त्यास निर्णयाचे सभेत बोलाऊं नये व त्याचा शास्त्रार्थ ऐकूं नये. असे लोकाची सरकार गरज ठेवणार नाही. याप्राो जाहीरनामा करविला. ब्राह्मणाने दहशात व भये ही जावे सांगणाराचे व लबाडासहि आसे फितूर कलवणे की महाराजाची मरजी गेली आसे फितूर लोक आहेत; सर्वास जाहीर कलले हेहि ठीक जाहाले व आमी यामुलेच बोलत नाही; ज्ञाती कलम समत पुसत नाही. कलम भाव हासील लिहिला आहे कलम.

+ सिकत (स्त). १ येथून पुढें अक्षर स्वतःचें.

४ ब्राह्मणपैकी जे मद्य मांस भक्षण करतील त्याजकडे मुदेसुद दोष लागू जाहाल्यास शक्ति पाहून दंड घ्यावा.

¶*The king gives in this extract instructions regarding the way in which justice should be imparted in strict compliance with the Shastras.*

No. 34] *[28-12-1834*

पान ७४

रसिदंट तहनाम्यातील कलमाविसी बोलले. तहनाम्यातील कलमे सरकारची खरी आहेत व आसे होऊ लागल्यास तहनामा कशास पाहिजे. ही कलमे गवर-नराचे दिलात खरी आसी आली; परंतु विलायतेचा हुकूम हली असा आहे की लढाईखेरीज घेणे व आपले हुकमाने मुलुक देणे हे या गवरनराकडे नाही. हे कलकत्याचे गवरनराचे हुकमासिवाय नाही; परंतु हली गवरनराकडे मुंबईस मी जातो. तेथे गेल्यानंतर हा सारा मार समजाऊन सरहदी प्रकर्णी व जाहागीर-दार प्रकर्णी बंदोबस्त होये आसे होईल.

¶*The king writes that the Resident proposed to go to Bombay in connection with the disputes over boundaries between him and the Jahagirdars. A difference also arose over the terms of the original treaty.*

No. 35] *[2-12-1834*

पान ४८

+लग्नपत्रे डाकेवरून पोहचती करावयाकरिता रसिदंटाकडे उदेपूर व चंदावर व करवीर ही तीन पाठविली. त्याजपौ दोन थैल्या इकडून निरोपाप्रो रवाना केल्या. करवीरकराविसी किबे हाते सांगून पाठविले की करवीरकरानी इंग्रजीत लिहिले होते की सातारकर आमचे आप्त नव्हेत. आसे ते लबाड मनुष. त्यास कदापि लग्नचिठी माहाराजानी पाठऊ नये आसे आमचे विच्याराास येते. नंतर सरकार मर्जी आसे सांगून पाठविले. ॥१॥ ठीक म्हणून सांगितले व करविरास पत्र लिा होते ती थैली परत घेऊन ठेविली याप्रो केले. कलम.

¶*Pratapsinh sends invitations to Udaipur and Tanjore for the marriage ceremony of his daughter but does not send one to Kolhapur as the king of that place disowns any relationship with Satara.*

+ हें लग्नपत्र प्रतापसिंहाची कन्या गोन्याबाई इचा विवाह रघुनाथराव गुजर याचे पुत्राबरोबर झाला त्या समारंभाबद्दल आहे.

No. 36] [*15-12-1834*

पान ९७-९८

३ गवरनर क्ष्यार यास पत्र सरहदी प्रकर्णी वगैर ल्याहावयाचे, त्यात ल्याहावयाचे की, हे पत्र पाठविले आहे, येविसी जुने माहितगार बालाजीपंत नातू आहेत यास साहेबानी मुंबईस बोलाऊन विच्यारिले म्हणजे दरोबस्त जुनी माहिती कलवितील व पत्र सदरहु लिहिण्याचा मसुदा रसिदंटानी बालाजीपंत किबे हाते लिहून दिल्हा. त्यात काही इकडून शोध घातला तोहि रसिदंटानी पुन्हा इंग्रजीत लिहून घेऊन, ठीक आहे म्हणून मसुदा पाठविला किबे हाते. त्याप्रो ल्याहावयाचे त्यात कलमे :— बिाा

१ आलपिष्टनसो विलायतेस जावयाचे पूर्वी इकडून त्याजला पत्र लिहिले होते त्यात माार की तहनाम्या प्रो जे जाहगीरदार इकडे लागले त्याप्रकर्णी कितेक कलमे संशयात्मक आहेत, ती तुम्ही उलगडून द्यावी म्हणौन लिहिले होते, त्याचे उतर समजून आलपेष्टन याणी ते समई पाठविले त्याची नकल हाली पाठविली आहे. त्यास आपले जाणे विलायतेस होण्यापूर्वी आलपिष्टन याणी इकडे लिहून पाठविले त्याप्रो आपण इकडे ल्याहावे.

२ हा माार इकडील ज्यास माहितगिरी आहे त्यास ल्याहावे; परंतु ते या मुलकात आसले तर ल्याहावे. त्याचे मागे कोणास ल्याहावे येविसी इलपिष्टन साहेबाचे पत्र आले, त्यात कोणास ल्याहावे येविसी सला आला होता की जे कामावर आसतील त्यास ल्याहावे. ते समजून चालतील.

३ तहनाम्याप्रो जाहागीरदार बेवारस जाहाल्यास ती दौलत या सरकारात यावी आसे इकडून बोलणे आहे, व जाहागिरीची वहिवाटहि हालपर्यंत इकडील हुकमानेच होत आहे.

४ तहनाम्यासमागमे याद आहे त्यात दरोबस्त मुलुक अकलकोटकर, सचिव, डफले, सेखमिरा, फलटणकर निंबालकर वगैरे कलम साफ असा शब्द लिहिला आहे, तो कशासाठी की इकडील मुलकाप्रोच त्या जाहागिरी आहेत, याजकरिता तो शब्द लिहिला आहे.

५ जाहागीरदारास वस्त्रे या सरकातूनच जाली आहेत व नजराणा व चाकरी या सरकारातच घेत आले.

६ हाली पंतसचिव आहेत यास दतक घेतेसमई त्याजकडून चाकरीबदल ऐवज ठराव करून घ्यावयाचा तो या सरकारातून दरसाल घ्यावयाचा ठरला. दतक घेतेसमई इंग्रजी सरकारचे पत्र सचिव यास आले, त्याची नकल पाठविली आहे त्याजवरून कलेल. याच आन्वये आकलकोटच्या जाहागिरीची दखलगिरी इकडेच आली आहे.

7393

७ सेखमिराची जाहागीर तहनाम्यात लागू नव्हती, परंतु तहनाम्यासमागमचे यादीत त्याचे नाव दाखल केले. कारण की ते या सरकारचे जाहागीरदार सबब यास व पुढें इंग्रजी सरकारची पत्रेहि आहेत.

या अन्वये कितेक संशयाची कलमे आलपिष्टन याणी उलगडून दिल्ही. त्यास आपण या मुलकातून जावयाचे पूर्वी इकडील सरकारासी लेख आहेत त्या प्रकर्णी ही सर्व कलमे उलगडून द्यावी म्हणजे पुढें दिकती पडणार नाहींत. जे कामगार इंग्रजी सरकारचे येतात ते गैरवाकब आसतात. ते तहनाम्यातील इकडील मुलखाचे कलमाविसी दिकती काढतात, सबब उलगडून दिल्हे पाहिजे. ॥१॥ वारसा आसे लिहिले आमी म्हणजे बाकीवर नाही आसे होते. सबब ही आक्षरे गालली; मागील पुढील कागदास व बोलण्यास आटकाव न व्होवा सबब कले भाव लिहिला.

¶*These are a few extracts from Pratapsinh's own diary in which he states clearly the terms agreed upon with Elphinstone, especially in connection with his powers over the Jagirdars about which a keen dispute had arisen.*

No. 37] [*22-12-1834*

पान ६६-६७

२ पेशजी गवरनर सो लिहिले होते की मी विलायतेस जाणार व मला खर्चहि फार होऊन कर्ज जाले. त्यास माहाराजानी माझे दोन रथ आहेत त्याजपौ येक आथवा दोनी विकत घ्यावे. येविा माहाराज सरकारातून ते वेलेस उतर जाहाले होते की आम्हास लग्नाचा वगैरे जाजती खर्च जाहाला, त्यास हली सोय नाहीं. याजवरून याप्रो गवरनरास लिा होते. येविसी हली उतर आले आहे की माहाराजानी माझे रथ घेतले आसते त्याजपेक्षा हे उतर माहाराजानी केले याजवर मी फार संतोष जाहालो. कारण जमाखर्च पाहून कर्ज न होता व्येवस्थेने माहाराज चालवितात ही फार चांगली चाल, याजवर फार खुसी जाली असे लिा आहे, आसे रसिदंटानी सांगितले. ॥१॥ यातील भाव आपलेकडून जवाब गेला तो लौकिकात खाली पडला आसे दिसू नये व जातीचा थोरपणा की आपले बोलण्याप्रो केले नाही म्हणून वाकडे वाटले नाही. गुणच घेतले व आपला आयत्र छ पावला.

¶*The Governor requested Raja Pratapsinh to purchase from him his two landeaus as he was sailing home. The Raja had the boldness to decline the Governor's offer on the ground of having incurred heavy expenses on the occasion of his daughter's marriage and of his unwillingness to incur more. The Governor while mortified at being refused, compliments the Raja for the scrupulous economy he observes in the management of his raj.*

No. 38] *[22-12-1834*

पान ७०

२ बालाजीपंत नातू यास पत्र जरनेल स्मित याचे लस्करात आसता पाठविले. त्यात पेशजी व इकडील मनोरथ सर्व सांगोन नरहर मल्हार चिटणीस पाठऊन आलपिष्टन यास मजकूर कलऊन, इकडील ऊर्जित व्हावे, दोस्ती वडावी आसे बोलून वचन घेऊन आले. त्या भरवशावर स्वस्थ होतो; परंतु आम्हास बाजीरायानें लस्करात आणिले. त्याजवर आलपिष्टन व तुम्ही सातारियास गेला, तेथे फडणीस व खंडेराव सिर्के यासी बोलणे होऊन, वचन पके जाले ती वर्दी येऊन पोहचली. त्या संकेताप्रो संधि पाहून जनरेल स्मित याचे लस्करात मिलावयाकरिता बंधु मातुश्री सुा उभे राहून जरनेलास नाव सांगून भेटलो. त्यांस सांगितले आलपिष्टन याची भेट जलद करावी. करितो म्हणून बोलले. याउपर साहेबास बोलून साध्य जे करणे ते करावे. ॥ १ ॥ तुम्ही आपले से ना ही आमी आलो व याप्रो आलिपिष्टण पत्र तुमचे इमानावर ठेवले तेहि सर्वापेक्षा कमी देऊन नीट वागले आसता आसे तेव्हा विलायतेस येक वेला व भरवसा इंग्रेज चालीचा पका समजला सबब केले तरी होईल. परंतु लाडविक सरहद कायेत केलीयावर करणे सबब दाखविले.

¶Pratapsinh records in his diary a past incident,—how he was taken by Bajirao in his army and how he sought an interview, with Elphinstone through General Smith.

No. 39] *[17-1-1835*

पान ८९

२ गायकवाडाचा जावाई कदम गिरवीचा आपले गावी आला त्याजबरोबर सिपाई आले त्याचा जमादार हुजूर दर्शनास आला होता. कारण त्याचा भाऊबंद या सरकारात सिबंदीत चाकरी आहे, सबब त्यास भेटावयास आला होता तो क्षत्रिय ज्ञातीचा कछवा आहे. त्याणे विनंती केली की आमचे घराण्यापैा कोणी पुरुष चाकरी करिता कोठेहि गेला तरी सातारा माहाराज किंवा उदेपूर राणाजी किंवा कछवा राजा या तिहीखेरीज कोठेच मुजरा जमीनीस हात लाऊन करावयाचा नाहीं आसा शिरस्ता आहे, व घराण्यांतील हुकुमहि आहे. मी गायकवाडापासी चाकरीस आहे, परंतु ते कुणबी लोक सबब रामराम मात्र करितो, मुजरा करीत नाही. आम्हास या लोकानी लाखो रुपये दिल्हे तरी यांची सोयरीक करणार नाही; व याणी आम्हा लोकाची मुलगी मागितली आसता तरवारीसी प्रसंग पडेल. दौलतराव सिंद्याने रामपूरेवाले कछवे यास मुलगी मागितली होती; त्याजबद्दल कछवे फार

+ एथून अक्षर प्रतापसिंहाचें अत्यंत गिचमीड.

खराबीस आले; व पाच वर्षे लढत होते; व काही मुलुकहि सिंद्यानी घेतला, परंतु मुलगी दिल्ही नाही; व आम्ही आपले ज्ञातीस पोशाख करून ढाल तरवार लाऊन जेवावयास बसावयाची चाल आहे वगैर ज्ञाती प्रकर्णी बोलला. सरकारची व आमची ज्ञात येकच आहे. नंतर त्यास विडे दिल्हे, व आपले ज्ञातीचा सबब त्यास व त्याचे बरोबर दुसरा त्याचाच भाऊबंद होता या दोघास सेलापागोटी पंचवीस रुो प्रमाणे दिल्हे. + ज्ञाती बाटणे व हालके हिंदुस्थानास जात्रे समजात्रे व राजवाडे लोकात लौकिक जावा, सबब खर्च केला सनगे वाो. सदरहू प्रो मनचा भाव लिहिला. कलम.

¶*This entry mentions the family conventions of a certain Kachhva Kshatriya of Northern India of making salute and marriage relations with none but the Satara and the Udaipur ruling families.*

No. 40] [*1-1-1835*

पान ७६

१ लग्नाकरितां पुण्याची ब्राह्मण मंडळी काही बोलाविली होती. त्यास पुण्यात इंग्रजींतून दक्षणा सालाबादीची आहे, यास चिंतामण दीक्षित चितपावन याणे सातारियास आले याचा द्वेष मनात,—इकडून बोलाविले तरी न आला, द्वेष मात्र—आणून त्याचे दक्षणेस आटकाव करविला. तेथे बालाजीपंत नातू होते त्याणीहि सांगितले, कीं या ब्राह्मणास लग्नाकरिता माहाराजानी नेहले ठेवले होते व याप्रो येथून लाडविक रसिदंटाचे लिहिणे पुण्याचे साहेबास पाठविले. नंतर त्या ब्राह्मणास दक्षणा मिळाली. यावर हा भाव मंडलीस सर्वास जाहीर जाहाला आहे. देवी कृपेने ठीक जाहाले, की हे आसे कारण नसता द्वेष करता ते व्होऊ नका; नास तरी सरसाक्षी व दस्तऐवज करील,—तरलल बुडवण्याविसी बोलणे जागा, इंग्रेज दाखला सबब भाव लिहिला; हा कलम भाव.

¶*Brahmins invited from Poona on the occasion of the marriage of the Raja's daughter were prevented from receiving Dakshina at Poona by Chintaman Dikshit. They were allowed to receive it through the intercession of Lodwick.*

No. 41] [*6-5-1835*

पान १८८–१८९

२ विलायतेहून पत्र आले त्यातील मजकूर कोर्ट डरकतरातून पत्र आले की गौवरनर क्लार गेला व याचे नावे पत्र आले की माहाराज सरकारचे मुलकाचा बंदोबस्त व दौलतीचा व आदालतीचा व शालेचा वगैरे हरयेक बंदोबस्त चांगला

\+ येथून हस्ताक्षर प्रतापसिंहाचें. १ येथून हस्ताक्षर प्रतापसिंहाचें.

आहे व याची खुशी फार वाटली असे लाडविक साहेब याणी सांगत होते व कर्ज करीत नाहीत, व खर्चहि ठीक आहे, व माहाली जाणे, जमाबंदीस जाणे हे रयेत हावालास ठीक आहे व मेहनत हुशारी व याविसी विलायेतेत फार खुषी वाटली. दरसाल हावाल वकिलाने गवरनरास लिहीत जावे. त्याणे विलायेतेस लिहिणे, +सबब भाव लिहिला की देवीने ठीक केले, व एखादे वेळे लिहिणे जागा जाहाली, ही खुषी वाटली; परंतु फार जपून वागवणे व आकल देऊन देवी कृपेने पार आहे.

९ कोर्ट डकतरातून पत्र आले की जाहागीरदाराविसी माहाराज सरकारचे सरहादीतचे व आमचे हादीत जे मुलुक आसेल तो आमचा, हे कोर्ट डकतर याणी लिहिले. यावरून हे गौरनर याचे पत्र खरे नवे आसे दिसते. कोर्ट डकतर याणी लिहिले हेच खरे. गौरनर याचे हे लिहिणे बाद. ॥१॥ +दमाने केले सबब हे जाहाला नकशा लौकिक राहून; दाबाने नाही तरी आवघड व वकिलास व कोणी जाला तरी बोलणे जागा की तुम्ही जबरे आसून करता. पुढे आसे होते तो-ही लिहिले सबब ठीक जाहाले. कलम.

¶*The purport of two despatches from the Court of Directors about the good administration of Pratapsinh and of the boundary dispute between him and the Jahagirdars is recorded in these two entries.*

No. 42] [*13-4-1835*

पान १९७

३ सिवानंद शास्त्री पोषाख देऊन उदेपुरास पाठविले, ते पोषाख राणाजीस पाऊन त्यास फार खुशी त्याची याद आली. त्याजवरून इकडेहि फार खुशी जाली. +राणाजीने ठीक केले; व दर कारणास नीट जाहाले. पुढे देवी करील ते खरे. हा भाव कोलापुरावर व इकडील ब्राह्मणावर दाबोण सेवटास नेहणे. देवी कृपा. कलम.

¶*Pratapsinh writes in his diary that he sent robes of honour to Udaipur, which were gladly accepted.*

No. 43] [*17-7-1835*

पान २००

तंजावरास आपा भट वालिंबे पाठविले होते. तेथून परत रोजगुा आले त्याप्रकर्णी मजकूर. ९ लग्नाबाा पोशाक आणखी कोणास पाठविले. याणी

+ येथून हस्ताक्षर प्रतापसिंहाचें.

सांगितले उदेपुरास व येथे पाठविले. उदेपूरचे वंर्तमान साधन केले हे कसे विचारले, ते ऐकून फार संतोष जाला, फार चांगले केले म्हणोन. करवीर नागपूर हे आपले घराण्यातील, यास पोशाक पा़ा की काये? भटजी बोलले करवीरकर हे कोकणस्ताचे नादाने फार वागतात व वागणूक येक प्रकारची, सबब तिकडे पत्र पाठविण वगैर मार्ग नाही. त्यावर बोलले की चालच तसी, बैदाच जाला आहे. कोणी येथे आकलकोटाची गोष्ट काढली. खासे बोलले ते आपले मंडळीतील नव्हेत. प्रीतभाव व करवीर नीट चाल नाही सबब न पाठविला. आपलेवर प्रीतभाव व उदेपूरपर्यंत पैगाम आपली वोलख ठेविली हे भाव

९ वेदकर्माचा मजकूर ठरला आहे ते भटजीनी सांगितले. येजुर्वेदोक्त कर्म क्षेत्रियास उक्त तोच शिरस्ता उदेपुरी, तसे सातान्यात वगैरे आपले ज्ञातीत होणार; ते बोलले. येथे रुगवेदोक्त आम्ही करितो; परंतु सातान्यास उदेपुराप्रो होऊ लागल्यास त्याची वाक्ये वगैर इकड लिहून पाठवावी, त्याप्रो आम्ही करीत जाऊ, असे लोभयुक्त बोलले व आसे कमजास्त कर्णे जाले तर प्रायाश्चित घेऊन आम्ही करीत असतो आसे बोलले. हे+ वैद्य करमे आमी करीत आसता मुख्य जागा ठरेल तरी हे टाकू. वचने लिहिणे हा डाव; परंतु आपले खरे आहे तेव्हा ठीक; परंतु मरम काये की शास्त्र वचन आहे तरी एकू, नाही तरी मात्र ऐकणे नाही. कलम भाव.

१० श्रावणी वगैरे ब्राह्मण व ते येक सभेत बसून सहतंत्र करितात. ब्राह्मणास गाइत्री व क्षेत्रियास सावित्री आसा शास्त्राप्रो क्रम आहे. ॥ १ ॥ हा+ वरणधर्म जाणतो न जाणतो हे पाहिले; परंतु ठीक आहे, उतर कलल हा कलम भाव. कलम.

११ आप मंडळीचा वगैर सर्व झाडा लिहून दिल्हा. आपली वंसावली लिहून दिल्ही. + ही जात निरमल पहिलेपासून ते आहेत. वगलेले टाकले आहेत. हे निरमल चाल भाव दाखविला, आमचे मनी दिकत न यावी सबब.

¶*The above entries refer to the inter-relationship between the Bhonsle families of Kolhapur, Nagpur, Tanjore and Satara and to the Raja's attempts to get his sacraments performed in accordance with the Vedic rites.*

No. 44] [*20-7-1835*

पान ३०३-३०४

३ लाडविक रसिदंट याणी बालाजीपंत किबे याजबरोबर निरोप सांगोन पाठविला की बाबाजी सुभेदार याणे नूसपेपरात गैरवाका मार वलगना वगैरे छापविला,

+ येथून अक्षर प्रतापसिंहाचें.

तेविसी माहाराजानी मनात काही वाकडे आणू नये. कारण नूसपेपरवाल्याची चाल की कोणी काही छापविले तरी ते छयापीत असतात. त्याप्रो खरे मानू होते आसे नाही. ॥ १ ॥ इकडून उतर सांगून किबे बरोबर पाठविले की त्याचे शुभ व अशुभ या दोहीचेहि मनात आणणे गरज नाही. आपली चाल नीट आसून दुसऱ्याने वाईट म्हणाल्यास ते मनास आणावयाची गरज काय? इकडे काही येक मनात नाही. याप्रो सांगून पाठविले आहे. याँ लाभाची खुशी व गेलियाची दिलगीर नाही. ईश्वराखेरीज कोणाची गरज नाही. ॥ १ ॥ त्याचे मनात याद पाठवितील ही निकड किंवा रुबरू बोलणे; व छयापले उलट तरी वाकडे, गवरनरास पत्र लिहिले तरी वाकडे, खटले व खात्री केली की आसे होतेसे नाही, हा भाव.

¶*Lodwick asks Pratapsinh to pay no heed to the adverse criticisms appearing in a newspaper. Pratapsinh writes in his diary that he does not mind what others write or say about him.*

No. 45] [*25-8-1835*

लिा अगस्ट २५-१८३५

इंग्रजी पत्राचा तरजमा नकल

श्री

माझे परम मित्र माहाराज

स्काटलंड देशामधे मुा ईडन या नामेकरून गाव आहे तेथे आगष्ट तारीख २५ सन १८३५ पावेतो सुखरूप आसे विशेष. आपली सुकी(र्ति) व उतम नामना मेळविली आहे, श्रवण करून मला संतोष वाटला तो पत्री दर्शविता येत नाही; व ज्या गोष्टी आलीकडेस माझ्या श्रवणी आल्या आहेत तेणेकरून तर फारच हर्ष जाहाला. लॉर्ड उलियम बेनटिक कलकत्याचे गवरनर जनराल नुकतेच हिंदुस्थानांतून विलायतेस आले आणि आमच्या ऐकण्यात आसे आले आहे की गवरनर जनराल साहेबानी आपले थोरपणाची उतम प्रकारे करून वाखाणी केली व बोलले की श्रीमंत माहाराज आपले रयतेला बहुत सुंदर आणि योग्य आहेत, आपले राज्य मोठ्या दक्षतेने आणि उदारत्वेकरून चालवितात व आपला देश सुरक्षित राखिला आहे. इतके आसून कंपनी सरकारासी आकृत्रिम श्नेह करून मिळून आसतात. याजप्रो मी सदोदित आपेक्षा करितो की जे जे उतरोतर गवरनर जनराल तिकडे येतील त्याणी आपली स्तुति बादशाहापासी करावी, जीपासून मला जलमवर समाधान होईल.

उत्पन्नाला दर हालका लाऊन वसुलात कमती पडली म्हणोन आपल्यास वाईट व कठिण वाटले त्याचे मी आश्चर्य केले नाहीं. कारण कीं हे गाऱ्हाणे सर्वत्र

+ येथून अक्षर खाशांचें.

पृथिवीवर सारखेच जाहाले आहे. परंतु मला खरा भरवसा आहे की हिंदुस्थानदेश इतर दुसरे देशापेक्षा फार लौकर सुधारेल व हे गाऱ्हाने चुकेल. इकडेहि तसेच आहे * का मी जरी तीन हाजार पाचसे बिघ्यांचा विभागदार आहे आथापि मजकडेहि तोच प्रकार आहे व आमच्याहि देशापासून रागड ? देशपर्यंत लोक हीच हाक मारतात. मला वाटते की मी काही महिनेपर्यंत आणखी आपणापासी असतो तर आपले साहयाने खर्च वगैरे उत्पन्नानुसार न्यायाने आणि सर्वत्र समता राखून कमी मानावर बसवून दिल्हे असते, आसे की सर्व सरकारचे कामदार कचेरीकडील किंवा लढाऊखात्याकडील जे असतील ते आपआपले स्थानासी योग्य असले तर जो बंदोबस्त किंवा वेवस्था नेमून दिल्ही ती पाहून संतोष्ट राहातील. सारे रास्त राज करणारे आहेत तितक्यालाहि प्रथम आपले खा जे आयत खर्च असतील तेवढे तोडिले पाहिजेत.

जेव्हा माझे पाहाण्यात गोष्ट आली की आपण मजविषई आणि ज्या आगेम्य गोष्टी मनुष्यास पूर्वी कळून यावयाच्या नाहीत आशा विशई मेस्तर आलपिष्टन साहेब यास काही समजाविले, तेव्हा मला वास्तविक वाइट वाटले हे की उगीच वृथा किंवा निंदा करावी या उदेशाने सांगतो असे नाही, परंतु आसे जाणोन की सातारा देश माझा खासगत असता तर इतके अगत्ये केले नसते, परंतु आपले देशाचे सर्वकाळ हित व्हावे म्हणोन इतके लिहिले आहे.

माझे पके लक्षात आहे की आपण माझ्यावर पूर्ण भरवसा ठेविला आहे आणि जे आंतर आपले आभिप्रायांत पडते ते ते दुसरे कोणत्याहि गोष्टीपासून नाही; परंतु जे लोक माझे श्नेहातले नसतील आणि आपले शत्रु असतील त्याचे भाषणेकरून कदाचित पडले असावे. इतका दुरंदेसी जरी आहे तथापि मला तसले ग्रहस्ताची नावे दाखऊन द्यावयास किमपि कठिण पडणार नाही आणि मी आझुनहि त्यास बज्यावतो आहे की त्याचे कृत्याविशई मला जितकी माहितगारी आहे तितकी त्यास नाही असो. याविषई आपली पकी खातरी आसावी की मजकडून श्नेहांत किंवा लक्ष ठेवण्यात तिळभर अंतर पडावयाचे नाही. मला पूर्ण भरवसा आहे की जे मी आपणास विस्वासाने सांगेन किंवा उपदेस्टीन त्याचा आपण आपमान करावयाचे नाहीत.

आपले श्नेही आलपिष्टन साहेब यासी येकवेळ वर्षापूर्वी दुखण्यापासून आरोग्य जाहले होते, परंतु पुन्हा विक्रातिस्थ आहेत, त्यास दोन वेळा गवरनेल जनरालचे जाग्याची नेमणूक मिलत होती, परंतु त्याणी शरीराचे असमाधानामुले स्वीकारिले नाही. असो ही गोष्ट आपली हितावह जाहली नाही आसे माझे लक्षांत येते, परंतु ते कोणे समई तिकडे येतील आसा भरवसा दिसतो.

7400

सांप्रत लारड आकलंड यास गौरनेल जनराल लॉर्ड विलयम बेंटिक याचे जाग्यावर नेमणूक मिलाली आहे, ते आपले विशई इकडे परत येऊन खबर देतील त्यापासून मला हार्ष होईल तो आपणास लिहिण्याविषई आनमान करणार नाही. वरकड मजकूर येथास्थित आहे. आम्ही सर्व मंडली इकडे सुखरूप आहो व मोठ्या आदरेकरून आणि परम लोभाने आपला सर्वकाळ मित्र आहे

सही मेस्तर ग्रांडफ.

ता। सांप्रत बैठा पगार किंवा पेनासिल असी गोष्ट कोठेहि नाही. कोणतेहि सरकाराच्याने पेनसल चालवीत नाही. क्वचित कोठे फार दिवसाचा अवल विश्वासिक चौकसीने उतरलेला मनुष असल्यास ती गोष्ट आलाहिदा आहे.

¶*This is a Marathi translation of Grant Duff's letter to Raja Pratapsing of Satara.*

No. 46] [*12-11-1836*

पान ११

बाल्याबापासी लाडविक साहेब हालीचे तुफानी प्रकर्णी बोलले, कीं संत्री लोक याणी मजपासी कलविले असते तर मी माहाराजाकडे कलऊन मग काये करणे तसे केले असते; परंतु पलटणचे सो लोक यास कलले, तेंव्हा मला मधे ठेविता येत नाही. त्यात हालीचे साहेब लोक आलपिंष्टन सो वगैरे ते वेलेचे साहेब लोका-प्रमाणे नव्हेत. याचे मनातून दुसऱ्यास बुडऊन आपले सरकारचा फायेदाच करावा हे आसते; व येथील चौकसी होऊन उलबी साहेब वगैरे गेले. हे प्रकर्ण गौरनर साहेबानी येथेच काये ते ठरविले म्हणजे नीट होईल; नाही तर त्याचे मनात माहाराज विलायतेस पाठवितात हा राग आहे व हेहि जाले आहेच. यास्तव त्याणी कलकत्यास हलीचे चौकसीचे प्रकर्ण लिहिणे तर तेथून कसे ठरून येईल व काये होईल याचा नेम समजत नाही. व या कामाचे कसे लेहून येईल हेहि कलत नाही. ॥ १ ॥ यातील भाव व हासील की केले हे आपल्यावर येऊ नये, सबब साफी वाटण्याकरिता हे बोलणे; परंतु मनातील बाहेर पडले व साहेब लोक दिवसेदिवस आसेच फायेदा करणारे यावयाचे; तेंव्हा यांची अस्ता धरून तरी उपयोगी काये, हे अगोदरच समजून याद दिल्ही. त्यातच लिंहिले आहे की घ्यावयाचेच आसल्यास घ्यावे. इकडून वोड नाही.

¶*Lodwick's interview with Balyaba Senapati is reported in this extract of the diary. The Resident says that the present-day English officials do not possess the broad and liberal outlook which men like Elphinstone and others had of old.*

No. 47] *[28-3-1837*

पान १०४-१०९

१ रसिदंट बोलले, गवरनराचे मला लिहिणे आले त्यात डाकतर मिलन साहेब व दुसरा साहेब यास माहाराजानी भेटीस व मदतीस बोलाविले की काये; इकडून उतर, तो आलपिष्टनसाोपासून दोस्त, इकडील आहावाल इंग्रजी सरकारात कलविणेकरिता बोलाविले होते.

२ साो बोलले, रसिदंटाखेरीज दुसरे साहेबाचे हाते केल्यास पाचवे कलमाप्रो बर्बाद होईल आसे गवरनराने लिा आहे. त्यास विलायतेहून जबाब येई तों स्वस्थ असावे ही आम्ही सला सांगतो; नाही तर आसे काही जाले तर राज्य जाईल व माहाराजाची आबरू ती आमची आबरू. इकडून उतर, इंग्रजी सरकारात इकडून बोलण्यास काही दिकत नाही. पाचवे कलम परराज्याविसी आहे. इंग्रज सरकारातच बोलण्यास दिकत नाही. इतक्यावर इंग्रजी सरकारची मर्जी. इंग्रजी सरकारात कळावे म्हणोन साो लोकासी बोलली आसता, आणि पाचवे कलमाचा आंदेशा ठेऊन राज्य घेतल्यास इंग्रज सरकारची मर्जी; परंतु आम्हास इंग्रजी सरकारात मजकूर कलवणे प्राप्त; व इंग्रजी सरकारचे लाहानमोठे जाहागीरदार व इकडील जाहागीरदार परभारे मुंबई व पुण्यास बोलतात, त्यास पाचवे कलमाची शहा नाही आणि इकडे मात्र येती व पेशजीपासून कारण लागल्यास गवरनरसाो यासी रसिदंट ब्रिकसाो याचे वेलेस इलपिस्तानसाोसी व राबिनसनसाो याचे वेलेस मालकंसाोसी इकडील कामगार जाऊन बोलत होते ते वेलेस हा पाचवे कलमाचा आंदेशा आला नाही, आणि हली येतो त्यास हे कलम जबरदस्तीचे आहे.

३ साो बोलले, माहाराजानी कलकत्यास अगर विलायतेस जे कांही ल्याहावयाचे असेल ते आम्हाकडे द्यावे; आम्ही पाठविण्यास तयार आहो; परंतु माहाराजानी दुसरे साो लोकाचे हाते आगर दुसऱ्या कोणाचे हाते लिहून पाठऊ नये. इकडून उतर. हलीचा मुकदमा पडला ते वेलेस ते दोन साो लोक व तुम्ही येक येकूण तीन आसाम्यानी चौकसी केलीं; आणि समजला आसे विच्यारिले तेव्हां आम्ही बोलली की कच्या नकला करून पाठवाव्या म्हणजे दिलात येईल. त्यास कागदाच्या नकलाहि दिल्हा नाहीत, व चौकसी जाली हे तुमचे दिलात कसे आले हेहि समजाविले नाही; तेव्हां खरे खोटे कसे समजेल? आमचे माणसाकडून गैरवाजबी जाले आसे इनसाफाने दिसल्यास आम्ही पारपत्य करू, आसे बोलली आसता व इकडून सांगूनहि पाठविले की साहेब पुण्यास जाते वेलेस

साहेबानी भेटून जावे तेहि न भेटता निघून गेले. त्यावरून आम्हास आंदेशा आला, व आम्ही उगीच बसावे तरी कलकत्याचे व विलायतेचे अधिकारी आम्हावर शब्द ठेवितील की आसा मजकूर जाला आसता आम्हास का कलविला नाही, आसा ठपका ठेवितील; मग जवाब काय द्यावा; व तिकडून येखादी गोष्ट टपक्याची, हुकूम आल्यास, पुढे आम्ही इतला केल्यास बोलतील की आम्ही ठरून पाठविल्यावर तुम्ही बोलता. त्यास आता ते कसे फिरेल? नाही तर साहेबानी येक याद पाठवावी त्यात आसा मजकूर लिहिण्यात यावे की कलकत्याहून व विलायतेहून जबाब माहाराजाचे खातरेचा आल्यास ठीकच आहे, नाही तर पुढे माहाराजानी जसा इतला कलकत्यास व विलायतेस साहेब लोकाचे आगर दुसरे कोणाचे हाते करावा तोपर्यंत आम्ही सला देतो. याजवर उगेच राहावे, आसा दस्तयैवज साहेबानी आम्हाजवल द्यावा म्हणजे जबाब येई तोंपर्यंत स्वस्थ बसतो. आसे आसून आम्हास बोलू नका म्हणता, त्यास विलायतेस व कलकत्यास इतला करणे प्राप्त, व तुम्हास आंदेशा कशावरून आला, व येथे आम्ही कैदेदाखल आहो याजकरिता आम्हास तुम्हापासी येणे प्राप्त आहे, आणि दोष नसता दोष लाऊन घेणे आम्हास आसे कर्तव्य नाही.

४ रसिंदट बोलले, हली मोकदमा जाला याची शहा गोविंदराव याजकडे आहे; माहाराज आपलेवर का वोढून घेतात? माहाराजाचा फायदा व्हावा हे आमचे मनात आहे; व चिंतो महिपत याणे आर्जी विलायतेस पाठविली त्याचे उतर आले की नाही? ॥ इकडून उतर की गोविंदराव याची संखा तुमचे मनात काय आली आसेल ते न कले; परंतु इकडे मनात काही नाही; व हालकी माणसे दुस्मनी, त्याचे सांगणेवरून शंखा घेणे ठीक नाही. कुशास बहादारी देऊन, त्यास आसामी व बक्षीस देऊन कुशा चाकरी करणार वगैरे त्याच्या चालीच्या जबान्या दिल्या व त्याचे घरी संत्री येणे जाणे होते ऐसे ऐकण्यात आहे, व बाब्या भाो याचे बायकोचे बहिणीचा नवरा, त्याणे चोरी केली सबब त्यास फासी दिल्हा हा द्वेष मनांत; हे कोणाकोणापासी बोललाहि होता. त्याच्या जबान्या रुजवाती चौकसीत साहेबाकडे करविल्या, परंतु त्याणी ते वेलेचा मार समजला आस्ता म्हणजे नीट दुषमनांनी केले त्याचे खरे मानणे हे कसे? बाबाजी सुभेदाराचा जबाब विलायतेहून येतो आणि आम्हास मात्र पाचवे कलमाची आडचण; इतके आम्हास मगदूर ठेवीत नाही, याजवरून येकतर्फी आसे दिलात येते.

५ साो बोलले विलायतेचे केले नसते तर हे जाले नसते हे पूर्वी बोललोच आहे, व जाणाराचे नाव काये? इकडून उतर जाले की हे तुम्ही दाहावीस वेला बोलला

7403

हे आमचे दिलात फार आहे. विलायतेचे योजनेपूर्वी तुम्हास विच्यारिले, बदोबस्त खलेलीचा किती दिवसात व मुदत किंवा वहिवाट आहे तसी चालावी; नाही तर विलायेत कलकता कर्णे प्राप्त हे गवरनरासहि कलविले; परंतु काही न जाले, सबब विलायत योजना केली, यास्तव मनात आले आसेल ते करण्यात परक्यासी नाही, इंग्रजी सरकाराचीच आहे, यात पाचवे कलमाची सबब दाखऊन कर्णे आसल्यास मर्जी.

६ सो बोलले माहाराज आकलवान आहेत, परंतु आपासो व सेनापति व दिनकरराव याचा सला घेत जावी; नाही तर माहाराज दिवाणे आसे लोक बोलतील. याजवरून उतर जाले की जे वेलेस आमचा व इंग्रजी सरकाराचा तहनामा जाला ते वेलेसहि आम्ही कोणास सला पुसला नाही व पुढेहि पुसावयाचे कारण नाही; व आमचे इंग्रजी सरकारात बोलावयाचे आसेल तेथे बोलू; व वेडेपणा तहनामा घेतला नसता तर कशास व हरवेले आसे का बोलता?

७ आजपर्यंत दोही सरकारची दोस्ती बखलस[1] चालली. आडचण कधीपासून आली येविसी पहिलेपासून दोस्ती बेखलष; परंतु आलीकडे च्यार पाच वर्षापासून व्यत्यय इंग्रजी कामगाराकडून येत चालले. त्यात हली असा मोकदम उत्पन्न केला कीं इंग्रजी सरकारनी आमचे वाजबी देखील समजाविले आस्ता ऐकू नये आसे केले, तेव्हा दुसरा यापरता मोकदमा तरी कोणता राहिला? सबब इकडून गवरनर व कलकता विलायतेस समजोन देणे प्राप्त आहे. याबा हे (शिक्षा) जाली तरी सोसून घेणे व दोस्ती सा जातीनेहि कर्णे आसल्यास समजून देणे प्राप्त. परंतु दोष नसता दोष लाऊन घेऊन कोणतेहि कर्णे हे इकडील दिलात नाही.

८ रसिदंटसो यास सांगतो कीं तुम्हास कांही मजकूर समजोन देणें जाहाला तर येक कलम समजुतीत येण्यास च्यार घटका लागतात, तेव्हां दिलात येते; व लिहून कलऊ म्हटल्यासही किती ल्याहावे. सा हली सो लोक यास जाहीर करून द्यावे व त्याबरोबर आणखीहि दोन साहेब लोक इंग्रजी सरकारातून परिनिष्ट साहेब व समजदार आले तरी चिंता नाही. व याप्रो विलायतेहून व कलकत्याहून सो लोक आले तरी नीट इंग्रजी सरकारची दोस्ती आहे, सा ज्या रीतीने मजकूर जाहीर होईल त्या रीतीने करणे प्राप्त आहे.

९ ज्या गोष्टी बोलण्यात व कलविण्यात आले आसे, त्या बोलण्यात आले, आसे आम्ही म्हणाल्यास खरे मान्य होत नाही, हेच कारण हलीचे कलमावरून व वहिवाटीवरून दिसते. सा लिहिले आहे. हरवेले रसिदंटसो याचे बोलण्यात

---

१ बे-खलश = बिनदिक्‍त.

येते की बरबादीचे पाचवे कलमाप्रो होईल, आसे गवरनर साहेबाचे लिहिले आले म्हणतात; तेव्हां गवरनर साहेबानी समजोन न घेता म्हटल्यास हे कलम जोरावारीचे आहे. आम्हास केव्हां तरी इंग्रजी सरकारात हेच बोलणे बोलावयाचे; दुसरे काय बोलावे!

१० सयद मीर याचे हातून काय होणार? माहाराज मोठे, तेव्हा मोठे साहेब कोणी केला आसता तर नीट आसे रसिदंट पेशजी व हली बोलले; व त्याजवरून दुसरे साहेब लोक बोलणार केले. त्यास हली आसे बोलतात की साहेब लोक का केले, तेव्हा लाच्यारी आहें.

११ त्रिवर्ग साहेब बंगल्यास आसता स्वारी गेली होती, तेव्हा संत्रीचे म्हणे रसिदंट माहाराजास बोलले होते कीं कलकता विलायतेस नेहू. येविसी समक्ष विचारिता रसिदंट बोलले की बोललो नाही, व मला माहीत नाही. संत्री लवाड आहेत. संत्री खुणा सांगतात येविसी चतरसिंग तोतयाने चाकरीचे माणसे फितऊन, त्याजपासून सिकून ज्या कोणास खुना माहित नाहीत त्या देखील सांगत होता. त्यास संत्रीचे चालीच्या रुजुवाती करून दिल्ह्या. आसे आसता खरे मानणे व रसिदंटाचेच रुजवातीस खोटे व संत्रीनी तुफान बोलणे कारण गुरु व छावणी बाा द्वेषाने बोलतात हे ज्यानी ऐकिले त्या व संत्रीचे माहितगार लोकाच्या रुजुवाती जबान्या दिल्ह्या आहेत. आसे लोकाचें खरे कसे मानावे हे रसिदंटाचे कलमावरून इनसाफ मनात येईल.

१२ दसऱ्याचा पोशाख रसिदंटास कलऊन पाठवावयाचा सिरस्ता नसतांही सला घेऊन पाठविला व त्यास सांगितले होते की गवरनर विच्यारतील तेव्हा सर्व आहावाल कलवावा; परंतु पोषाख घेतला नाही व माणसाची गाठ देखील पडली नाही. इकडील माणसाची गाठ न पडे तेव्हा साहेब लोकाचे हाते बोलणे आले.

१३ माहाराज आपले हातपाय तोडून घेणार आसे दिसते आसे रसिदंट बोलले. त्यास उतर जाले की येकपक्षी समजून तसे बोलणे व लिहिणे व इनसाफी न ऐकणे व करण्यात वगैर काही हुरमत राहिली नाही. चपराशाइतका मगदूर राहिला नाही ही गोष्ट बिनतोड आहे.

१४ इकडून तहनाम्यात व लेखात व्येत्यय आसल्यास सरकारची चाल नाही व आसे इकडे साधनहि कोणते हे मनात न येता व इंग्रजी सरकारचे आज कोणते गोष्टीने कमी नाही हे मनात न येता, इंग्रजी सरकारातून तह-लेखात

व्यत्ययाचा उपक्रम वार्डिन याणे समजाविले ते मनन करिता आणिले हे कारण नसता तिकडून जाले व हलीहि तिकडून येतात. उलगडा होत नाही; नेम समजत नाही, सबब विलायतेस पाठवणे केले. येविसी बोलण्यात येते की विलायतेचे केले नसते तर आसे जाले नसते, आसे जोरावारीचे कधीहि बोलणे प्राप्त.

१९ शाहू माहाराज आलीकडे इकडून इंग्रजी सरकाराखेरीज दुसरीकडे दोस्तीची रव्वासा[१] पटविली नाही. सर्व भरवसा इंग्रजी सरकाराचे दोस्तीवर. त्याला हे आसे निमित्य जाले तेव्हा येविसीची साफी जसी होईल तसी इंग्रजी सरकारचे घरी बोलून केली पाहिजे हेच दिलात आहे.

येकंदर मजकूर लिहिला आहे त्यास कागदपत्र व इनसाफ व चाल व प्रसंग न पाहाता गैरचालीचे हालके माणसाचे खरे मानूण येकतर्फी दिलात येऊ लागल्यास जबरदस्तीचे आहे. याजकरिता गौरनर कौसल व कलकता व विलायतेस कोठें पाठवणे आसेल तेथे ही याद मराठी लिपीची नकल ठेऊन आसल हीच आसी इंग्रजी तरजमा करून पाठवणे जाहाल्यास आक्षरशाहा होऊन त्या तरजम्याबरोबर ही हिंदवी याद जावी.

¶This is an important extract from Pratapsinh's Diary defending his position against charges brought against him and proposing to despatch his own agent to Europe to explain his grievances to the Home Government. The dispute started with the doubtful meaning of the fifth clause of the treaty of installation.

No. 48] *[29-3-1837*

पान ११३–११७

रासिदंट लाडऊक साहेबाकडे तारिख २३ मार्च छ १९ जिल्हेज नंबर १९९ ची याद इकडून गेली. नंतर त्याणी सेनापति यास बालाजी कासी किबे याचे हातून निरोप पाठऊन बोलाविले. त्याजवरून तारिख २९ रोजी सेनापति व सेनाकर्ते गेले, तेथे बोलणी जाली ती:— कलम.

१ साहेब बोलले गवरनर साोचे पत्र मोकले आले आसा कायदा नाही. हे मगरुरीसारिखे दिसते व मी वाचून पाहिले. सेनापति बोलले तुम्ही वाचून पाहाणेकरिता मोकले पाठविले. थैली करून पाठविली तर तुम्ही फोडून वाचून पाहणार सा आसे केले. ते बोलले काही कलमे कलमेवारी आहेत, व काही कलमे पेशजी लिहिली तीच पुन्हा लिहिली, याणे मजकूर फार जाला. याचे कारण दिसत नाही, त्या कलमाचा तपसील.

---

१ चाल, रीत

१ माहाराजानी दोन साहेब लोक चौकसीकरिता आले होते त्याजपासी जबानीच्या नकला हिंदवी करून मागितल्या. त्याणी देतो म्हटले, परंतु दिल्या नाहीत हा मजकूर ठीक आहे.

२ साहेब बोलले. चौकसी त्याणी केली त्याल खरेखोटे हे कांही माहाराजास कलविले नाही हे कलम चांगले आहे.

३ माहाराजानी त्यास पुन्हा भेटीस बोलाविले, परंतु ते न भेटता गेले हेहि कलम चांगले.

४ साहेब बोलले इंग्रजी सरकारसी दोस्तीची ख्वाहिष आहे, दुसरी कांही दिलात नाही; व शाहू माहाराजापासून दोस्तीचा सिलसिला आहे हे कलम फार चांगले.

५ टपका न घेता कोणतेहि जाल्यास नीट नाही. तरी टपका घेऊन कर्तव्य नाही, येविसी इंग्रजी सरकारात आम्हास बोलणे प्राप्त म्हणून लिहिले हे कलम चांगले आहे.

३ साहेब बोलले गोविंदराव याजवर शहा आहे, याजकरिता मी माहाराजास बोलो की येक हात गुंतला, दुसरा हात तोडून घेऊ नये; कारण येक वेल चौकसी जाली यात येक हाताचा उलगडा जाला. पुन्हा माहाराज मिलन साहेबास बोलण्यात घालतात तेव्हा दुसरा वाद उत्पन्न होईल, या भावाने मी बोलो. याजवर सेनापति बोलले, तुमचे बोलणे माहाराजास कशावरून समजेल, याबदल जबान्याच्या नकला मागितल्या. तुम्ही म्हणाला की सुभेदार लोक याणी क्रिया केली, त्यास ती गोष्ट खोटी कसी होईल? तेव्हा आम्ही बोलो आम्हास साफ खोटी वाटती. कारण पूर्वी हे सुभेदार मजकडे सिवानंदशास्त्रीचे पत्र घेऊन आले तेव्हां लाखोटा फोडून माझे हतात दिल्हा; तेव्हाच आम्ही बोललो की कर्नेलसो देखील आमचा लाखोटा फोडीत नाहीत आणि तुमचे कारण काय? तेव्हा ते सुभेदार लोक बोलले की आमचेहि पत्र त्यात होते सा फोडिला. त्यानंतर पाव घटकेने बोलले की आमचे कांही येकांती बोलावयाचे आहे. आम्ही बोललो कीं येकांती बोलावयाचे आमचे काय कारण आहे? मेजरसोचे पत्र आणले म्हणजे काय तुमचे बोलणे किंवा काम करून देऊ. तेव्हा संत्री लोक पुन्हा बोलले कीं ते कांही नाही, आमचे येकांतीच बोलावयाचे आहे. आम्ही त्यास बोलली की आम्ही तुम्हासी येकांती बोलावयाचे नाही. नंतर विडे आणून दिल्हे ते वेलेस आर्धली हावलदार आणखी पाचच्यार आसाम्या होते, हे आपणाकडील सुभेदार लोक याची आम्ही येकांती बोलली आसतो, तरी आसेच तुफान होते, व आसे लोक तुम्हाकडील येऊ द्यावे तरी आंसी आडचण, न येऊ द्यावे तरी येऊ न दिल्हे ही आडचण, त्यास आसे लोक घरात घुसून लोकाचे घर फार बुडवितील; तेव्हा या लोकाची आम्हास शफेत

देखील प्रमाण नाही; व आंतू धारया हा तुमचे लस्करात राहणार व तुमचे सुभेदार व धारया तुम्हास सांगतो ते तुम्हास खरे वाटते; व पेशजी ग्रांट सो याचे वेळेस आमरसिंग सुभेदार होता ते वेळेस चतेरसिंग याचे बंड जाले होते तेव्हा मजपासी बोलला की या बंडास तुम्ही सामील व्हा म्हणजे माहाराजाचे राज्याचा आर्धा हिसा मिळेल. त्यासहि आम्ही बोललो की ही गोष्ट तुम्ही आम्हापासी बोलू नका. तुम्ही आपला पाहारा करा. तेव्हा आसी जी माणसे त्याचे खरे कसे मानावे? व कोणते वेळेस काय करतील व काय बोलतील आणि क्रियाहि करितील हा सत्यपणा कशावरून वोळखावा ?

४ साहेब बोलले, आम्ही चौकसीचे वेळेस माहाराजास व तुम्हास आंतस्त इषारा केलाच होता की हे सुभेदार आमके दिवसी माहाराजाकडे आले व माहाराज काम कोणते करीत होते व मंडळी कोण कोणं जवळ होती आसा त्याचा इषारा केला हे लिहिण्यात ते वेळेस का न आले. याजवर उतर. हे कायदे इंग्रजी सरकारचे कामगारास माहीत आम्हास काय माहीत. फंदफितुराचा त्याचा मुदा पता व दस्तैवजानिसी खरा साबूत जाल्यास ते कलम मात्र आम्हास समजते.

५ साहेब बोलले माहाराजाचे वाकडे मी आपले समोर करून घेणार नाही, परंतु माहाराजाचा दील आमचे ठिकाणी नाही. त्यास आमचे मागे काये होणे ते होऊ. इकडून उतर सेनापतीने केले की मर्जी साहेबाची.

६ साहेब बोलले, आम्ही माहाराजासी बोललो की आपासो व सेनापति व दिनकरराव यांची सला माहाराजानी घेत जावी. कारण येखादे वेळेस आकलेस कमज्यास्त होते; सा मी आसे बोललो. सेनापति बोलले मर्जी.

७ साहेब बोलले, यादीत पेशजी मजकूर लिहून गेलेला आहे, सा या मजकुराचे माझे नजरेस येत नाही. सेनापति बोलले आपण यातील जी कलमे तरजुमा करून पाठवावयाची आसतील ती पाठवावी; परंतु आमची हीच याद हिंदवी नकल ठेऊन हीच आसल पाठवावी. त्यावर सो बोलले, दोनतीन रोज पाहून मग तुम्हास बोलाऊ. मग काय करणे ते करू.

८ उदेपूरची येक दोन पत्रे वाचून पाहिली, आणि बोलले की मी सारे वाचून पाहतो.

९ सो बोलले, बाबाजी सुभेदार याचे कलम मी बोललो तेहि लिहिले. याणे मजवर लबाडकी यावी आसे लिहिले. त्यास हे आमचे सरकारात कलल्यास नीट नाही. सेनापति बोलले यातील हासील की आशा हलके माणसाचे देखील दाद लागती या परियायान लिो.

१० सो बोलले; मिलन सो वगैरे कोणी बोलणार केले आसता पाचवे कलमाप्रो होईल की कसे? सेनापति बोलले की बाळाजीपंत किबे आपले आहेत; आणि त्याचे हुकुमात मला वागावयास सांगितले; आणि त्याणी मजवर जुलूम केला; आणि मी तुम्हापासी फिर्याद केली, तरी मी परक्यापासी गेलो आसे होते की काये? तेव्हा याजवर पाचवे कलमाचे कसे? याजवर त्याणी काही उतर केले नाही.

११ सो बोलले, स्वारी प्रतापगडास कधी जाणार? आणि गेल्यावर गवरनराची भेट जाली म्हणजे ठीक; नाही तर माजूरपणा येतो. त्याणी न घेतल्यास माझोरपणा त्याजकडे. उतर कानावर घालून कलऊ.

१२ त्याणी सारी याद किबे याजकडून वाचून अर्थ समजोन घेतला, त्याची उतरे केली. जी समजली नाहीत, त्याची उतरे काही केली नाही.

¶*This is a report entered by Pratapsinh in his diary, of a conversation between Resident Lodwick and the Senapati on the memorandum submitted by Pratapsinh. Lodwick approved some of the articles in the memorandum and disapproved of the defiant attitude towards the Governor, entertained by Pratapsinh.*

No. 49] [*3-4-1837*

पान १२०

सदरी मजकूर लिहिला ते वेलेस रसिदंट लाडऊक याचे व सेनापति व सेनाकर्ते याचे आणखी बोलणे जाले, ते बोलणे तेडीचे फारच बोलले. बुडेल म्हणून वगैरे; व येविसी रंगोबाकडे सांगून पाठऊन, निरोप आणऊन, व याचे जसे ठरेल तसे.

१ मिलन सोची खबर पकी आणावी की याद तुम्हाकडे गेली आसली तरी न घेणे खास आसे. त्यास तुमचा पकेपणा कसा आहे हे कळावे म्हणजे याद माघारी आलेली, घेत नाहीत सा। ठेऊ. आणि येथे बोलू की मिलणाकडे याद पाठविली त्यास तुम्हाकडून कसी मजबुती कसी आहे हे पुसून येणेकरिता नरसोबास पाठविले; व याप्रोच दलवी याजकडील कर्णेल यास हे विच्यारून यावे आसे सांगितले.

२ उदेपुरास रघुनाथसिंग याजबरोबर पत्रे गेली त्याची उतरे आली सिवानंद शास्त्रीकडे. ती खुद सरकारास व आपासाहेब माहाराजास व सेनापतीस आसी तीन ती रसिदंट याजकडील कारकून किबे याजपासी सेनापतीकडून दिल्ही, आणि सांगितले कीं यात फितूर वगैरे आहे किंवा काय हे पाहावे, आणि असल पत्रे

7409

पाहिजेत तर रसिदंटाकडे ठेवावी. नकला इकडे पाठवाव्या. त्याजवरून किबे याची चिठी आली सेनापतीकडे ती आपासाहेबाकडे आहे. पाहिली म्हणजे उतर जाण वगैरे पाहून मग.

¶*This is another conversation between Lodwick and the Senapati reported in the diary. Pratapsinh wished to ascertain if Dr. Milne was firm in his assertions and whether he would undertake to report the true facts to the Government and mediate with them on behalf of the Raja.*

No. 50] *[4-4-1837*

पान १२१

सेनापती व सनाकर्ते रसिदंट लाडऊक सो याजकडे जाऊन बोलणे जाले ते कलमे ब्रिा

१ बालाजीपंत किबे सेनापतीकडे सकाली येऊन बोलले की पंधरा कलमाची याद घेऊन साहेबानी आपणास बोलाविले आहे. उतर की बारावर दोन वाजता येऊ.

२ गेल्यावर सो बोलले की हली याद कलमे गाळून पाठविली ती ठीक आहे; परंतु येके ठिकाणी आसे आहे कीं ही इंग्रजी सरकारची जबरदस्ती आहे व कांही खाऊन मरावे आसे शब्द माहाराजास आसू नयेत; व याणे गवरनर सोसहि घुसा येईल. सेनापति बोलले की आम्ही जो मजकूर लिहून याद पाठवावयाची ती पाठविली. तुम्हास इचा तरजुमा करून पाठवावयाची आसल्यास पाठवावी नाही तर माघारी पाठवावी. त्याजवर सो बोलले पाठवितो.

३ सो बोलले की या यादीतील अर्थ काये? उतर जाले की या यादीत हसील इतकेच की तुमचे दोन सो कमिशने होऊन आले होते, त्याणी परभारे चौकसी केली आणि जबान्याच्या नकला देतो म्हणून बोलले ते दिल्ह्या नाहीत; व भेटून जातो म्हटले तेंहि भेटले नाहीत, व मजकूर कांही कलला नाही; यास्तव ही चौकसी येकतर्फी आसी शाहा आमचे व माहाराजाचे मनात आहे; व लिहिले गेले म्हणता, त्यास येकतर्फी समजुतीबरहुकूम आल्यास त्याप्रो चालावे आसे म्हणाल; मग तुमचे हली काये; याजवर सो बोलले हे खरे आहे. याजवर सेनापति बोलले, याकरिताच आगोधर आम्ही तुम्हास बोलतो. ऐकिले तरी ठीक; नाही तर गवेर-नरापासी बोलू. त्याणी न ऐकिल्यास लाटापासी बोलू. त्याणी न ऐकिल्यास कोर्ट डरकटर्ज्य याजपासी बोलू. त्याणी न ऐकिल्यात पादषा सरकारात बोलू आणि समजूत देऊ. याजवर सो बोलले ठीक आहे. परंतु आम्ही माहाराजाचा मजकूर समजून देण्यास सिध्द आहो; व माहाराजाना जबान्याच्या नकला कमिस-नानी दिल्या नाही, भेटले नाही, ही साक्ष मी देईन.

४ सेनापति बोलले गवरनर याचे भेटीविसी पोषाखासारखे न व्हावे व तेथे नेऊन फसऊ नये. तसेच आसल्यास कारण नाही आसे मनात आहे. याजवर सो बोलले, येविसी याद पाठविली आसता चिंता नाही; आगर समक्ष येऊन बोलून ठरऊ.

¶*This is an extract of Pratapsinh's Diary reporting a conversation which Balvantrao Senapati had with Resident Lodwick. Pratapsinh had submitted a memorandum of 15 articles in which he asserted that he was unable any longer to bear the persecution and would rather like to put an end to his life. The Resident objected to this language. The Prince replied, what else could he do, if the enquiry against him was all an* ex parte *affair and if he was not to be given a chance to explain himself.*

No. 51] [*22-5-1837*

पान १४७

बालाजीपंत नातू आज आले. सामोपचारी बोले वगैरे ता :—

१ गोविंदराव प्रकर्णी मााराविसी बोलो, की सर्व तुम्हास माहीत आहेच. याजवर ते बोलले, इनसाफाचे रुईने पाहाता इंग्रज सरकारानी केले हे गैरवाजबी आहे. बाकी आपलेकडून जाहाले हेच कायम कर्णे, जबरदस्तीने पाहिजे ते ठीकच आहे आणि इनसाफानी लागू असल्यास गवरनरानी करावयास आवघड नवते आसे बोलले. याजवर त्यास सांगितले कीं इकडून बोलणार डाकतर मिलन साहेब केले आहे, तेविसी बलवंतराव चिटणीस मा‍ार कलवितील, इतकेच सांगितले; आणि बलवंतराव यास सांगितले कीं जो मा‍ार सांगावयाजोगा आसेल तोच सांगावा व जो तसाच आहे तो सांगावयाचे कारण नाही आसे त्यास सांगितले. नंतर खुषी करिता बोललो की आम्ही पाचवडास येऊ. यांजवर नातूनी विनंती केली कीं मी पुढे बुधवारी जाऊन तरतूद करीन. नंतर स्वारी यावी ठीक आहे आसा हुकूम जाला. नातूचे सिध्याचा व चंदी वगैरेचा बंदोबस्त ठेवणेविसी कामगारास हुकूम दिल्हा व नातूस सेख खानमहमद याचे जागिरीबाा याद आली तो मा‍ार सांगितला. ते बोलले यादी किती आल्या तरी आपले बोलणे तहनाम्या-खेरीज दुसरे नाही.

¶*This is a report of a conversation between Pratapsinh and Balajipant Natu ; the former offering to visit the latter at his home at Panchwad and the latter accepting the offer after he had time to make arrangements for reception.*

No. 52] *[11-6-1837*

पान १६३-१६८

सो बोलले ते ही जितकी आम्ही सक्ती वगैरे दोन तीन वर्षांपासून केली हे आमचे सरकारानी मला लिाखेरीज मी केली नाही; परंतु ती गोष्ट आता येथे मुंबईत मला बोलावयाचे कारण नाही, मी विलायतेस गेलेवर पाहीन ॥१॥ यावर जबाब सरकारातून जाला तो. तुमचे दिलात पके आसावे की या गोष्टीचे इनसाफाविसी आम्ही इंग्रजी सरकारासी कसे बोलतो हे तुम्ही ऐकून केलेले ते वेलेस ग्रांटसो व इलपिस्तन व राबिनसन सो यासहि लिहू; परंतु पके दिलात ठेवावे की हे कृत्य संत्री लोक याणी केले हे खास आम्हास माहीत आहे; परंतु आजपर्यंत आम्ही काहीहिं बोललो नाही; कांकी तुम्हास खरे वाटेना. सा व ते चौकसीचे वेलेस बोलली, की कुस्या व संत्री व घारया वगैरे चालीचे आहे; आणि तुम्ही आमची चाल मनात आणीत नाही आणि बोलता व विलायतेस आम्ही पाठविणार हा घुसा तुमचे मनात येऊन खरे न वाटले. जबरदस्ती पुढे उपाय काय? आता मात्र या इनसाफाची साक्ष तुम्हावर घालू ती खरी असी बोलावे; नाही तरी आम्हाकडे लबाड येईल. नंतर लाडऊईक बोलले की हे पके दिलात ठेऊन याप्रो बोलेन; व बोलले की संत्री व कुस्या बेकूब आहे. नंतर सरकारानी उतर केले की यास्तव लाहान मनुष्याचे कधी खर मनू नये; व गौरनर सुधाहि रागास आले तत्रापि या कामाचा सेवट लागला नाही. तेवेलेस आमचे बोलणेची खंबेरी व चाल व जुबानी कुसव्हा निघाला तरी परत फिरणार नाही; व खांदानीचे चाली व लोभावर न ठेविता व इंग्रजी सरकारचे ऐकणार नाही. हे कृत्य तुम्हास दोन वर्षांनी समजले. नंतर फार खूष लाडविकसो होऊन बोलला की हे करावे.
कलम

३ रसिदंट याचे बोलणे वावीनसो फार चांगला. त्याचे मनात माहाराजाचे स्वहित व चांगले करावे हेच आहे, व त्याचे माझे बोलणेहि जाले. कलकत्याचा हुकूम वावीनसा याजवर येईल. माहाराजानी नरमच आसावे, हे दोस्तीस्तव सांगतो. ॥ १ ॥ याचे उतर वोवीनसो याचे प्रकर्ण पहिल्या कलमातच लिा आहे.
कलम

४ रसिदंट बोलले जे इकडून लिा गेलेने त्याची दरयाफ्ती कलकत्यास फार होती. त्यास हा हुकूम त्याजवरच आलासा वाटतो. सरकारनी उतर केले की आमचे बोलणाराकडून काही समजले नाही व कलकतेवाले याजवर सर्व राज्यभार आहे, तेव्हा त्यास सर्व पाहाणे प्राप्त. त्यानी वर लिा आसेल; व त्याणी पाहिल्याल नीट नाही; येपक्षा आम्हास विलायतेस सुधा पाहणे प्राप्त.

५ रसिदंट बोलले जे कलकत्यास व विलयतेस कोणी बोलणार पाठविला हें करण्यात फायदा आहे हे माझे नजरेस आले नाही. सरकारी उतर. तुम्ही येथे लेखाप्रमाणे करीत नाही सा इतके करणे प्राप्त.

६ रसिदंट बोलले जे छापखान्यातून आमचेविसी विपरीत अर्थ छापला व पंधरा कलमाचे आली होती ती नूसपेपरातील आर्थ त्यात नाही. मग माहाराजाचे कारकून याणी याद दिल्ही किंवा कसे बोलली असेल ते असो ॥१॥ याजवर सरकारी उतर. इकडल मार्ग व चाल माहीत नाही (अक्षरें लागत नाहींत) ? बोलण्यावरच सर्व मतलब माहीत होतो आसे नाही; व सेनापति सेनाकर्ते याजवर माझी खातरी आहे. तुमचे मागे दुसरे सा यासी बोलावयाचे नाही व तुम्हाकडेहि उदईक येऊन तुमची खातरी करतील व मीहि परवाचे रोजी दसहाराबा माहुलीस जाणार, तेव्हा तुम्हास व मडमसा यास बंगल्यास येऊन मजकूर सांगीन व तुम्ही जेवावयास तुम्ही व मडमसा यावे नंतर येऊ बोले.

¶*This is an extract of the diary recording a conversation between Pratapsinh and Resident Lodwick. The former proposed to send his ambassador to England conveying his protest against the action of the India Government. The Resident tried to dissuade the Raja from sending his ambassador to England.*

No. 53] *[21-6-1837*

पान १७७

रोज गुा सेनापति रसिदंट वोवन साहेब याजकडे गेले होते, तेव्हा त्याणी जातीने आपली मंडळी बाहेर घालविली, नंतर बोलणे जाले ते :—

१ सेनापति बोलले सरकारी सांगणे नाही, मी बोलतो. साहेबाचे म्हणण्यात संत्री फार दिवसी चाकर. लबाड कसे बोलतील. त्यास आमचे चाकर तीन तीन पिढ्याचे आसून चोऱ्या लबाड्या करितात, व संत्री मजकडेहि येकांती बोलण्यास आले होते. त्यास मी सांगितले कीं ब्रिगिट मेजराची चिठी आणावी म्हणजे ऐकू; व सिवानंदशास्त्रीने मालेगावाहून डाकेत लाखोटा आमचे नावे पाठविला तो सुभेदाराने परभारा फोडला; तेव्हा सुभेदाराचे मनात तुफान आहे आसे वाटले, व सुभेदारानी आपले पलटणचे तोफखान्यात विस्तू ठेऊन त्याजवर तुफान आणिले यात त्याला नफा कोणता? यास माहाराजाचे मनात इनसाफाने पदरी पडल्यास चिंता नाही. त्याजवर ते बोलले, गवर्नर कसे करील ते कलेना. सेनापतीने उतर केले की इनसाफ न केल्यास गवनरावर फिर्याद करून आपली काळोखी काडणे प्राप्त. याजवर ते बोलले गवरनर जुलूम करील आसे वाटत नाही.

कलम

२ गोविंदरायाचे घरी संत्री गेले ही गोष्ट खरी की खोटी? याणी उतर केले कुशाचे घरी संत्री मनसबा करणार तोच साक्ष; व घान्या सुभेदाराचे बिऱ्हाडी राहणार व चोर, व दोन संत्री फितविल्याने काय होते, हे माहाराजास कलत नाही की काये हे पाहावे. इंग्रजी सरकारची दोस्ती इकडील चाकराच्या तसद्या किती सोसून केली ती आसे कर्ण्यासाठी केली की काये हे पाहावे.

३ रोजगुा समक्ष बोलणे जाले त्याचा तरजमा स्मरण धरून केला हा फार संतोष जाला म्हणून सेनाकर्ते याजबरोबर रसिदंटाकडे सांगून पाठविले की तुम्ही समजून घेऊन लिहिले याणे च्यार वर्षाचा सीण गेला. ते बोलले मजकडे हेच आहे, माझे हातून उपयोग होईल तितका करीन. येथे राहाणे माहाराजाकरिता आहे.

¶*This is a report of a conversation between the Senapati and Resident Ovans. Pratapsinh complained about the Subhedar-Major who carried false reports against the Maharaja and who therefore deserved to be punished. The Resident assured the Senapati of his full sympathy and services in the interest of Pratapsinh.*

No. 54] *[15-7-1837*

पान १९६-१९७

बाल्याबा व दिनकरराव मार बोले वोवन साहेबासी तो ता व याद यावी तो ता, कलमे बोले ती कलमेच यादीत लिहून याद नंबर २७ ची इकडून पाठविली, त्यात इकडून सेनापति व सेनाकर्ते यास रसिदंट साहेब याजकडे पाठविले ते बोलले, त्यास उतर जाले की याप्रो यादी द्यावी. त्याजवरून कलमे लिहिली आहेत :—

१ प्रथम बाजीराव याचे लस्करातून फक्त इंग्रजी सरकारचा बादशाई चालीचा भरोसा व दोस्तीचीच इछा धरून इंग्रजी सरकारचे लस्करात आलो. फक्त पूर्वीचे इशाऱ्यावर इंग्रजी सरकारचा भरवसा दोस्तीवर नजर ठेऊन येणे जाले. बाजीराव वगैरे लोक पुरे चालीचे रीतीचे भरवसा देत आसता त्याचा भरवसा धरिला नाही.

२ पुढे तहनामा इंग्रजी सरकारानी केला त्या वेलेस ठरावाची कलमे कमजाजती काही न बोलता फक्त दोस्तीवर नजर देऊन इंग्रजी सरकार समजदार आहेत, सर्व समजोनच कर्णे ते करितील हा पूर्ण भरोसा ठेऊन जो तहनामा लाट साहेबाचे लिहिणेचा दिल्हा तो ठेविला.

३ हली वीस वर्षे दोस्तीवरच नजर देऊन चालविले आहे. फक्त दोस्तीची ख्वाहिष व पेशजी इंग्रजी सरकारची नेक नजर होती त्या वेलेस हलीचे मोकदम्याप्रो कोणी काही समजाविल्यास येऊन पुसोन इकडील मनुष्य असल्यास इकडे चौकसी करून समजण्यात येत होते. परभारे आसलियास नाही किंवा आहे हे सागणे होताच, परभारें असलियास तिकडील तिकडे चौकसी करून निराकर्ण करून घेऊन इकडे पुन्हा पुसत नव्हते. नेक नजर होती तोपर्यंत आसे चालले होते. हली आलीकडे पाचच्यार वर्षे तसे काही दिसण्यात न येता कमजाजती होत चालले. हलीचा तूर्त मोकदमा असा होत आहे. त्यास इंग्रेजी सरकारची नेक नजर होती तोपर्यंत कोणतेहि लोकास फिरयाद करावी हे मनात वाटत नव्हते ; व इकडूनहि आसे चालीचे आढलले ते तेच वेलेस ब्रिकसाहेब याचे वेलेस हवाली करून दिल्हे आहेत. आसे चाल इकडून ठेविली आसतां हली इंग्रजी सरकारची नजर नीट नाही आसे समजल्यावरून सेकडो पाहिजे ते रचना करून, कोण काय करील व बोलेल तो नेम नाही. हाजारो इंग्रजी सरकारचा डोला दिसेल तसे बोलतील. आमचे आम्हास देखील डोळा पाहून बोलणे सुचणे आवघड, तेथे दुसऱ्याचे काय ल्याहावे ? फंद फितूर पाहाणें त्यास इकडील लाहान मोठे हिंदु लोक जे आहेत, ते इकडील दुषमानी किंवा दोस्ती कसी आहे ते इंग्रजी सरकारास वाकबच आहे. त्यास बारीक नजरेने पाहिल्यास लाखो रुपये कोणास दिल्हे, किंवा फौज ठेविली आसे आसल्यास वाजबी गोष्ट आहे. नेक नजर आहे तर आमचे बोलणे भांडणे होते. तशी नजरच दिसत नाहीं त्याअर्थी भाडण नाही ; व पेशजी आमचे नोकर लोक गाईकवाड भोसले व पेशवे वगैर होत त्याणी काय उद्योग केला ? सर्वश्च आपणच हाती होते ते यख्त्यारी शाहू माहाराज आलीकडे करून इजाच दिल्ही. हली इंग्रजी सरकारानी दोस्तीने जे केले, त्याजवरच दील ठेऊन चालविले होते. ते त्यास हली तसी नेक नजर दिसत नाही, संशयेच दिलात वाटतो, त्याअर्थी हली जे इंग्रजी सरकारानी हवाली केले आहे ते इंग्रजी सरकारानी सांभालावे. माहाल मुलुक व वहिवाट पाहावी. हाली मोकदमा जो चालविला आहे हा नसावा. ज्या लोभासाठी संशये ते जिकडील तिकडे घ्यावे म्हणोन सदरी लिहिले आहे, तेव्हा कोणती आडचण व बेहुरमत आसू नये. इकडून फक्त दोस्तीची गरज आहे. लोभावर नजर नाहीं. ज्या वेलेस भरवसा वाटून इंग्रजी सरकारानी आपले दौलती प्रो इकडील सरकारचे दौलती संपादतील आसे नजरेस वाटेल, तेव्हा इकडूनहि पाहाण्यास नीट आहे.

येकूण तीन कलमे लिहिली आहेत. छ १२ राखर ता। १६ जुलई सन १८३७ इसवी. याप्रो याद रेसिदंट वोबीन साहेब याजकडे पाठविली.

¶*This is the substance of a memorandum submitted by Pratapsinh to Resident Ovans reported in this extract of the Diary. Pratapsinh complains that the British Government do not now entertain for him the same regard and affection which were shewn at the time when he deserted Bajirao and came over to join the British in 1818.*

No. 55] [*16-7-1837*

पान १९८

आज बाल्याबा व दिनकरराव मोहिते रसिदंट वोविन सो। याजकडे याद सतावीस नंबरची रोज गुाचे तेरखेस बार केली ती घेऊन गेले होते. ती याद दिल्ह्यावर साहेब बोलले, गोविंदराव याचे वेलेस याद दिल्ही त्यास व यास काय फरक आहे, किंवा भाव येकच आहे. सेनापतीनी उतर केले कीं त्यापेक्षा यात जाजती आहे. ते आता या सरकारावर कोण कसी आदावत घेईल न कले; व हली घेतच आहेत; तरी हे इकडील खानदानीस नीट नाहीं. सबब जे इंग्रजी सरकारानी दिल्हे ते घ्यावे; व हली जो क्रम चालला आहे तो महकूब व्हावा. कारण इंग्रजी सरकार जबरदस्त जाणून सर्व लोक आम्हावर आदावत घेतील तरी हे या मातबरीस नीट नाही. याजवर साहेब बोलले ठीक जाहे. मी याप्रो गवरनराकडे लिहितो; परंतु महकूब कर्णे मला परभारे करिता येत नाहीं. सबब हुकम आणऊन महकूब करीन; व जबाब यादीचा येईल तोहि कलवीन.

¶*Conversation between Senapati Balyaba and Resident Ovans is reported. The Resident finds fault with Pratapsinh for defying the British authority but promises to forward his representation to Government.*

No. 56] [*17-7-1837*

पान १९९.

बालाजीपंत नातूकडून व आबा पारसनीस व राघवाचार्य व कासीपंत बंद्रे हे ता। १७ सोमवारी बोलले की आबा माहाडीक वगैर इंग्रजी सरकारात कबूल जाले आहेत; आणखी पुषकल मुदे तयार करतील, त्यास सारे लोक कबूल होतात, आणि येकटे माहाराजानीच कबूल केले नाही, तर साऱ्यास खोटे करून येकट्याचे खरे कसे होईल ? त्यास माहाराजानी मजपासी येकीकडे इतकेच म्हणावे की, आम्हास माहीत नाही, परंतु मंडळीकडून जाहाले आसल्यास महकूब करावे, म्हणजे सारे मिटते. व गोविंदराव याची चौकसी केली त्यास माहाराज बोलले की चौकसी खोटी केली, त्याजवरून राग येऊन गवरनर व कौसलवाले व लाडविक इतक्यानी प्रतिज्ञा केली आहे की हे माहाराजाचे आंगी न लाऊ तर

आम्ही पाण्यांत बुडऊन घेऊ, आसी त्याची प्रतिज्ञा आहे. त्यास आणखी त्यांजपासी पुषकल मुदे आहेत; व नवे उभे करणार, आणि माहाराज चौकसी करावी आसे बोलत होते. त्यास हे मांहाराजाची रूजुवात करून, चौकसीने माहाराजाचे पदरी मुदा घालून माहाराजापासून लिहून घेतात हे खास आहे. याजकरिता सदरी लिाप्रो माहाराजानी बोलावे. याजवर इकडून उतर केले, की तुम्ही लोकाचे घराभोवते संत्री उभे करून, बायका मुलादेखतां घेऊन जाऊन, जरब देऊन, तुम्हास काले पाण्यावर पाठऊ व ज्यानतलक ठेऊ, आसी जरब देऊन पाहिजे ते बोलतील व खोव्या रचना करून साधने तयार केली. आता आम्ही चौकसीत बोललो आसता कसे निभेल ? हे मंजूर नाही. नंतर आणखी ते बोलले इतके करण्याचे कारण मिलोन माहाराजानी विलायेत व कलकत्यास खोटे केले म्हणून लिहिले, त्याजकरिता तो मुदा उडविण्याकरिता हलीचे साबूत करून माहाराजापासून लिहून घेतात.

¶Balajipant Natu and others advised the Maharaja to confess to the charges brought against him : but he refused to agree to this advice or do anything that was against his conscience.

No. 57] [*23-7-1837*

पान २०२

वोविन साहेबासी बोलो कलमे तो ताा. इंग्रजी सरकारची व या सरकारची दोस्ती येकच आहे. याजकरिता इकडील हुरमतीस कमी न पडावे. हे ठीक नाही. आम्हीच मंडळीसुद्धा बंगल्यात येऊन बसतो; व काल सेनापति आले होते त्याणी मिलन साहेबाविसी बोलले त्याप्रोच आहे. साहेबाचे व सेनापतीचे बोलणे ज्या तारखेस जाले त्या तारखेपासून काही येक नाही व तुम्ही पाहिजे तर शोध ठेवा ॥ १ ॥ साहेब बोलले याविसी काही आंदेशा नाही; परंतु या प्रकर्णाचा रस्ता कसा कर्ण्याचा माहाराजाचे दिलात आहे ? इकडून उतर. इकडील चाल व वागणूक कसी आहे ती पाहून कर्णे आसेल तसे करावे. यास रस्ता तो हाच व आता साफ चालावयाचें, जिद्[1] करावयाचे नाही आसे इकडील नजरेस येते. साहेब बोलले ठीक आहे. माहाराजाकडून याद याप्रो आली म्हणजे मी गौरनर-साहेबाकडे पाठवीन. हुकुम येईल त्याप्रो कलवीन. मला हुकुमाप्रो कर्णे प्राप्त. नंतर स्वारी परत आली. मग सदरहू मजकुराची बोलण्याची इकडून जालेयाची याद नंबर ३२ ची लिहून पाठविली ॥ १ ॥

¶Pratapsinh's conversation with Resident Ovans is reported in this extract. The latter asked the former to put down what he had to say on paper and promise to forward the same to Government.

---

१ जिद = निकड, निकर, भांडण.

7417

No. 58] *[2-7-1840*

नकल.

श्री

शेवेसी विनंती. शेवक रंगो बापूजी चरणावर मस्तक ठेऊन विज्ञापना. ताा छ २ जौवल मुाा ताा २ जुलई सन १८४० इाा परियंत मुाा शहर लंडन येथे सुखरूप असो. यानंतर मी मुंबईहून निघालो तो सरकार हुकुमाप्रमाणे ताा ३० जून आषाढ शुाा १ मंगलवारी प्रात:काली पावलो. नंतर कपतान राबट कोगन साहेबाची भेट घेऊन नंतर दुसरे कोणी दोस्ताच्या भेटी तेच दिवसी घेऊन नंतर आपले मंडलीचे बिराडास संध्याकाली आलो. दुसरे दिवसी कामाची सिस्त कसी चालली ती संकळित समजून घेतली. त्यात कंपणी बोलण्यावरून कागद छयापून बुके पारलमेंटात द्यावी असा हुकूम जाला आहे. श्रीमंत राजेश्री सेनापति-साहेब कैलासवासी जाले व सरकारास या संकटात हे दुख जाले. ईश्वर खऱ्यामागे अनेक तऱ्हेच्या अडचणी आणून क्लेश होत गेले हे कलोन शोकार्णवी जालो. असो; ईश्वराची मर्जी. खावंद सरकार धैर्यवान समर्थ, तेथे विनंती काय लिहूं ? सारांष, इंग्रजी सरकार अवल इनसाफी आहेत. श्री येश घेऊन सरकारी काम शेवटास नेणार समर्थ आहे. मंडलीपासी खर्चास नाही. मी येताना काही तजवीज व्हावी तो वेल वैरियावर देखील नसावा असे जाले. येथील खर्च कसा निभेल ? खर्च तरी भारी. ईश्वर कसे निभावील हा मात्र मोठा घोर आहे. मी मात्र प्रेत्नेकरून या मुकामी येऊन पावलो. परंतु विस्तारे विनंती लिहिण्यास लाच्यार. सरकारापासी तरी पैसा नाही. येथे आहो त्यास तरी पोटास अन व आंगास वस्त्रे पाहिजेत. यातून कोणी परत जावे कोणी राहावे असे कोणी दोस्त याचे म्हणण्यात. परंतु अलियाणे जावे तरी पैसा नाही. राहाणे तरी खावयास पैसा नाही. आम्हा सर्वत्र मंडलीचा व मीर अफजलअलीसुद्धा खर्च दरमाहा अजमासे तीन हजार परियेत लागतो. मग शेपनास कमजास्ती काय होतील ते असो. तेव्हा बारमाही तोड लागणे. येथे तरी स्वदेश नव्हे. खेरीज कोडत कागद छापणे वगैरे हाहि खर्च मोठा आहे. खर्चाची तरी अडचण म्हणोन कोणी जावे कोणी राहावे जाले तरी जनांत मात्र कार्य न होता, बोलणार उठोन गेले आले हा दुर्लौकिक होणार. अशा अडचणी अनेक प्रकारच्या आहेत. तेव्हा मति कुंठित आहे. मंडलीपासी तरी या महिन्याची बेगमी होईल न होईल असे आहे. हा मजकूर या समई सरकारास मी न ल्याहावा, परंतु तजवीज निघाली पाहिजे. करणारानी तर पैशाची पुरवणी न व्हावी, माणसे पोटास न

मिले तेव्हा उठोन येतील. म्हणोन असा प्रसंग सरकारावर गुजरला. ईश्वर कसी आबरू राखील ती न कले. आज्ञोतर आले पाहिजे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Rango Bapuji who along with four others was deputed to represent the Raja's grievances to the Home Government writes him from London about the extreme straits to which the party has been reduced for want of funds.*

No. 59] [*2-7-1840*

नकल.

श्री

शेवेसी विनंती. शेवक येशवंतराव राजे सिरके व भगवंतराव विठल व चिटकोजीराव सुर्वे व रंगो बापूजी याणी चरणावर मस्तक ठेऊन कृतानेक विज्ञापना. ता। छ २ जौवल मु॥ ता। २ जुलई सन १८४० इ॥ आषाढ शु॥ ३ गुरुवारपरियंत स्वामीचे कृपेकरून मु॥ शहर लंडन प्रा॥ इंगलिस्थान येथे सुखरूप असों. यानंतर विनंतीची कलमे :

१ लेडिन हाल स्त्रीट् येथे ईस्ट इंडिया कंपणी मालक मंडली प्रापेटर जमून जनराल कोर्ट वर्षातून च्यार व्हावयाचे त्याप्रा॥ जनराल कोर्ट जाल्याचे दर्शऊन चेरमन बोलले. जनराल कोर्ट जाहाले, यांत सांगावयाविसी आम्हास हर्ष आहे कीं, कुवईन इकटोरिया प्रं+च्य आलबर्ट याजला जाहाले. यांत सांगावयास आपलेकडील बहुमानपत्र कुवईन म्हणजे राणी बादशा सरकारास पाठवावे की, तुम्ही आमचे खावंद. तुम्हास ईश्वरानी हमेशा सुखी राखून आयुष्य फार द्यावे आणि तुम्ही रयतेचे पालण चांगले करावे. तसेच प्रापेटर यासहि त्याच पत्रात लिहावे म्हणोन बोलले. त्याजवरून सर्वत्र कंपनी मालकानी रुकार दिल्हा. ठीक आहे बोलले.

२ चेरमेन् ता। ६ मे रोजी जनराल कोर्ट जाहाले त्या वेलेस कंपनी मालक यांचे बोलणे जाले की, सातारियाचे राज्याचे प्रकर्णी जे कागद असतील ते सारे कागद आम्हा मालकांचे पुढे ठेवावे आणि आम्हास दाखवावे. त्याजवर उतर जाले की, सातार प्रकर्णी कागद आहेत ते पाहावे. परंतु कागद फार आहेत सा। असे करितो की, येथे जी मालकांची कोठडी

+ Prince.

आहे त्यात हे सारे कागद ठेवितो. नंतर ज्या मालकाचे मर्जीस येईल त्याणी पाहिजे तेव्हा येऊन कागद पाहात जावे. असे बोलून कागद पाठीमागे आगोधरच आणून ठेविले होते ते पुढे आणोन दाखविले. ते कागद दोन वोझी असतील. असो. त्यानंतर डिसुमेंच(?) बोलले, हे कागद छापविले पाहिजेत. तेव्हा चेरमेन बोलले की, छापावयाचे तुम्ही म्हणता. परंतु इतके कागद छापण्यास दोन हजार पवंड म्हणजे वीस हजार रुपये लागतील. याजवर बोलणी मालकांची डरेकटर यांची दोन तर्फेची बहुत जाहाली ती लिहिली नाहीत. त्यांत डरेकटर यांची कागद न छापण्याबदल बोलणी फार जाहाली. नंतर सर्वांचे विच्यारे ठरले की, साताऱ्याचे कामाविसी येथून लिहिणी गेली व इंडिया म्हणजे हिंदुस्थानातील गौरमेंट यांच्या मिनोटी[1] म्हणजे कागदपत्र आले व आणखी कसकसे जाहाले असेल तो वगैरे हासील मजकूर घेऊन छापावे. याप्रमाणे ठरले आहे.

३ मुंबईहून मजुरदार लोक यास कंपणीचे कामगार याणी मोरिस या मुलकात पाठविले. त्याजवर जबरी जाहाली. हे वर्तमान बोभाट प्यारलेमेंटपरयंत गेला. हे वर्तमान डरेकटर याजला समजले, त्याजवरून त्याणी सदरहू मजकूर मालक कंपणीस समजाऊन त्याचे विचारास आणून देऊन ठरले की, प्यारलमेंटास उतर अर्जी द्यावी. त्याजवर चेरमेन म्हणजे बोरड कंत्रोल बोलले त्याजवरून मालक ज्याचा तो आपलाला विच्यार बोलूं लागले. त्यातील हासील की, इंडियाचे रयतेस इंडियातच ठेवावे. इंडियात जमिनी खाली पडसर फार आहे. त्या जमिनी परमुलकात माणसे न पाठविता त्याजला देऊन त्यांचा बंदोबस्त राखावा. मोरीस या मुलकांतील लोकहि बोलतात की, आमचे आम्ही मजबूद असता हे लोक इकडे आणावयाचे कारण नाही वगैरे. येविसी बोलणे तकरार फार जाहाली. त्यात इंडियाचे लोक दुसरे मुलकात पाठवावे हे बोलणे मालक कबूल करीत नाही असे आहे.

ता। २३ जून सन मजकूर रोजी प्यारलमेंटांतील मेस्तर हूम साहेब याणी बोर्ड कंत्रोलचे मुनिमास विचारिले की, तुम्हास सातार प्रकर्णी मजकूर पेशजी विच्यारिला ते वेळेस तुम्ही सांगितले की, सातारप्रकर्णी कागद मी देईन. त्यास हा वेळपरियंत कागद का येऊन पावले नाहीत? त्याजवरून

[1] Minutes.

बोर्ड कंत्रोलचे मुनिमानी उतर केले की, ते कागद डरेकटर याणी आपले कंपणी मालकास तयार करून दाखविले आहेत. आपणासहि पाहावयाचे असल्यास मोशन म्हणजे सर्वादेखत हुकूम करावा म्हणजे कागद हजर करीन. त्याजवर मेस्तर हूमसाहेब याणी जबाब दिल्हा की, उदईक हुकूम करीन. नंतर ता॥ २४ मिनहू रोजी मोशन केले आणि बोर्ड कंत्रोल यास ते कागद आणून देण्याविसी हुकूम केला. त्याजवरून सदरहू बोर्ड कंत्रोलचे मुनीमानी कबूल करून कोर्ट डरेकटर यास हुकूम सांगून पाठविला की, हौसाफलॉर्ड व हौस कामन या दो जागी कागद द्यावयास तुम्ही बुके छापवीत आहा. त्यास आणखी जाजती बुके मालक वगैरे यास देण्यास दोन हजार छापावी म्हणोन हुकूम दिल्हा. सदरहू बुके छापणीचे काम चालले आहे.

५ ता॥ ३० जून रोजी राजश्री रंगो बापूजी व रावजी बापाजी माणसेसुधा मु॥ मजकुरी सुखरूप येऊन पावली. खावंद सरकारचे चरणप्रतापे सर्वांच्या भेटी होऊन सर्वत्र येक जागी राहून येक विचारे चालत आहों. येविसीं येकंदर अंदेशा नसावा. सारांष सरकार शेवा घडावी हीच निष्ठा आहे. त्या प्रमाणे श्री शेवटास नेईल ही विनंती आहे.

६ माहाराज सरकारची खासगी दौलत व कारखाने वगैरे सर्व माहाराज सरकारचे माहाराज सरकारात असावे व सेनापतिसाहेब यास रस्त्यात आडऊन तसलमात यैवज येणे म्हणोन त्या ऐवजात दागिने वगैरे घेतले त्याजविसी व त्याचे खासगीची पगाराविसी यादी ता॥१ जून रोजी कोर्ट अफ डरेकटर याजकडे दिल्ह्या व सदरहूप्रमाणे ता॥ १९ मिनहूस बोर्ड कंत्रोल याजकडेसहि दिल्ह्या. त्याचे उतर अद्यापि आले नाही व सदरहू यादी दिल्ह्या त्याचे तरजुमा होताच नकला हुजूर पाठऊन देऊ.

६

येणेप्रा॥ साहा कलमे लि॥ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

सही—येशवंतराव राजे सिर्के.

सही—भगवंतराव विठल.

¶*This is a letter sent by Yashwantrao Shirke, Bhagwantrao Vithal and Rango Bapuji from England to King Pratapsinh, giving news of the Satara case which was being reported to the Court of Proprietors.*

7421

No. 60] *[4-7-1840*

इंग्रजी पत्राचा तर्जुमा नकल

श्री

मेहेरबान दोस्ता डाकतर ज्यान मिल्न साहेब मुा
मुबई सलम हू

दिगर तुमचे पत्र ता। २९ अप्रेल संन १८४० रोजीचे आले ते पावोन संतोष जाहाला. ऐसेच निरतर पत्र पाठऊन वर्तमान कलवीत असावे. यानंतर इकडील मजकूर येणेप्रमाणे.

१ तुम्ही आपले खासगीचा मजकूर लिहिला तेविसीचा तपसील आम्ही तुम्हास पुढील आगबोटीतून लिहून पाठऊ. मेस्तर फारकिसनसाहेब याची व आमची भेट जाहाली नाही. कारण त्याचे मुा येथे येक दोन रोज लंडन मुकामी होते, परतु मला असे दिसते की तुमचे कामाचा उलगडा अद्याप जाला नाही.

२ दुसरी खुष खबर की राजश्री रंगो बापूजी लंडन मुकामी ता। २७ जून सन १८४० रोजी सुखरूप येऊन पोहोचले. ते गरीब बिच्यारे त्याजला खर्चास नाही, त्याजमुळे मालव्यास होते त्यास पत्र लिहून नोराचा पतकर आम्ही घेतला आणि त्यास येथे आणविले व माहाराजाविसी अथवा त्याचे लोकासी हाच आमचा देण्याघेण्याचा पहिला व्यव्हार, हे आपले ध्यानात असावे. मेघडलीन साहेब यास लवरपुल येथे तुमचे पत्र आले होते की माहाराज सरकारचे लोक आले आहेत, त्यास खर्चास द्यावे व आम्हासही याप्रमाणेच लिहून आले होते. बरे आहे ते बिच्यारे गरीब वकील लोक निराश्रित येथे आले आहेत त्यास खर्चास दिल्हे पाहिजे; अथवा आप-आपल्यात वरगणी काढून त्यास खर्चास पोचवावे. कोणीकडून त्यास खर्चाची सोय केली पाहिजे व माहाराज सरकारचे मोकदम्याविसी मदत करणार ते पूर्वीचे साहेब लोक आहेत. त्याखेरीज दुसरेहि साहेब लोक अनकूल होत चालले आहेत. मोकदम्या प्रकर्णी कागदपत्र दाखवीत असतो. पारलमेंटात मोकदमा नेण्याची तजवीज केली आहे, परतु कागद आद्याप छापले नाहीत. त्यास ते कागद छापविण्याबदल येक महिन्यावर दिवस लागतील. सबब हाली पारलमेट बसले आहे यास ते कागदपत्र पोहोचतील असे दिसत नाही. परंतु प्रापरायेटर याचा विच्यार असा आहे की राणी सरकारास अर्जी देऊन मोकदम्याचे तपासणीविसी कमेटी मागावी असे आमच्या ऐकिण्यात आहे.

३ मोकदम्या प्रकर्णी मुबईस गवरमेटचे कागदपत्र जे आले ते आम्ही सर्व पाहिले आहेत. त्यात असी काही नालस्त लिहिली आहे की ते आपले मनी मानसीहि नसेल. तुमचा व बोबरसाहेब हे कपणी सरकारचे नोकर असून माहाराज सरकारास सला दिल्ही हा त्याजवर गुन्हा आणिला. त्याजवरून असे दिसते की मुबई सरकारचे कवसलदार माहाराज सरकारचे राज्य बुडविण्याचे तजविजीत फार असावे. या मोकदम्या प्रकर्णी कागद कोणाचे द्रिष्टीस पडू नयेत याजमुळे फार बंदोबस्त ठेविले असतील व उलबीसाहेब सकटतार व आणखी साहेब अंतस्त मसलत देणार आणि मेस्तर फेरीस साहेब व त्याची मंडली कौसलदार माहाराज सरकारचे राज्य बुडविण्याबदल फार मेहेनत करीत आहेत असे नजरेस येते. तुम्ही मोठे फजितखोर असी तुमची नालस्ती लिा आहे व तुम्हा आम्हास लोभ दाखऊन मोकदम्याचा पुरावा करण्याबदल इकडे आमची रवानगी तुम्हीच केली आहे असेहि लिहीले आहे. या सिवाय तुमचे नालस्तीचा विस्तार फारच लिहिला आहे तो आम्ही तुम्हास पुढील आगबोटीत लिहून कलऊ. करणेल वोविन साहेब आम्ही पाहिले नाही, परंतु त्याचे लिहिण्यावरून आमचे नजरेस असे येते की ते मनुष फार नादान आहेत. त्याणीहि तुमची व आमची नालस्ती फार लिहिली आहे. असा नालस्तीचा मार अंतस्त लिहितात. येविसी आपल्यास बंदोबस्त केला पाहिजे असे लिहिणार आहेत ते कसे हे इकडे सर्वाचे दिलात आणून देऊन मेस्तर बोबर साहेब याणी चाकरी सोडली हे बरे जाहाले. कारण की ते जर आज कपणी सरकारचे ताबेत असते तरी आज जसे आपण बोलून जबाब विच्यारतील. आपले पेनसनची सा ते लिहितात परतु बाच्याई सरकारचा काईदा सबल आहे. त्याचेनी आपले पेनसीन बंद करवत नाही ही खात्री ठेवावी. सही राबट कोगन

ताजा कलम. कारणेले सिमीस साहेब यास दरेकटरची जागा जाहाली आहे व पुढे जंदरल राबटरसंन साहेब यास कोर्टडरेकटरची जागा मिलेल. सर च्यारलस फारबस त्याविसी मदत करीत आहेत. राबटसाहेब सर चारलस साहेबास पत्रे पा ती त्याजकडेस दिल्ही.

येणे प्रो मजकूर लिा आहे त्याजवरून कलेल
लंडन ता ४ जुलई १८४०

¶*This is a Marathi translation of a letter by Robert Cogan to Dr. John Milne—regarding the help he was rendering to Raja Pratapsinh's envoys and his efforts to obtain justice from the Home Government.*

No. 61] [9-9-1840

पौ तेरीख ९ शेपटबर १८४०

नं. १९९

श्री

यादी सरकार श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति राजमंडळ हुजूर सातारा सुरूसन इहिदे आर्बैन मयातैन व आलफ. हाली विलायतेहून तीर्थस्वरूप राजश्री प्रतापसिव्ह माहाराज यास पत्रे त्याजकडील वकिलाची वगैरे येतात त्यापैकी हाली तीन पत्राच्या नकला सापडल्या त्या या यादीबरोबर पाठविल्या आहेत. त्यास उमेद व बदसला देण्याचे आद्यापि पहिलेप्रमाणे काम चालत आहे ते या नकला पाहिल्यावर समजण्यात येईल. त्या नकला बितपसील.

१ रंगो बापूजी याचे पत्र तारीख २ जुलई सन १८४० चे त्याची.

१ येशवंतराव सिर्के व भगवंतराव विठल व चिटकोजीराव सुर्वे व रंगो बापूजी याचे पत्र तारीख २ जुलई सन १८४० चे त्याची.

१ राबट कोगन साहेब याचे पत्र डाकतर ज्यान मिलन साहेब मुकाम मुंबई यास तारीख ४ जुलई संन १८४० लंडणाहून इंग्रजी पत्राचा तरजुमा मराठीत त्याची.

येकूण नकला पाठविल्या आहेत १२ रजब मुा तारीख ९ सपटंबर संन १८४० इसवी

¶*Covering letter to copies of letters addressed to Pratapsinh from his agents in England intercepted by the new Raja and submitted to the Resident.*

Index to Selection No. 42

Papers referring to Pratapsinh, Raja of Satara

(Figures denote numbers of pages)

A

Aba Parasnis—supplies Grant Duff with copies of important old papers for his history 18, 19, 20, 23, 24, 30 ; 106-107.

Administration—Beginnings of British, training of clerks 53-54 ; scale of court fees 55-56.

Akalkot—Raja of—12.

Amarsing Shirke—excommunicated by Raja Pratapsinh 68.

Anandrao Kesharkar—12.

Appa Bhat Walimbe—deputed to Tanjore by Raja Pratapsinh to secure uniformity of social practices 88.

Appajirao Mohite—excommunicated for having lost caste by intermarriage 67.

Appasaheb Shahji—Pratapsinh's brother—his illness 6 ; his allowance 16 ; 94 ; 98 ; 114.

Auckland Lord—succeeds Bentinck as Governor General 91.

Aundh—Pratinidhi of—12.

B

Babaji Subhedar—publishes defamatory news about Raja Pratapsinh 89 ; 93 ; 98.

Babaji Surve—excommunicated by Raja Pratapsinh 67.

Bajirao Raghunath Peshwa—his family being escorted to Brahmavarta 10 ; 43 ; 63 ; 66 ; 80 ; 81 ; 85 ; 104.

Balajipant Kibe—clerk in the Residency 88 ; /96 ; 99.

B—*contd.*

Balajipant Natu—2, advises the Maharaja to dismantle his forts 3 ; 5 ; 7 ; 9 ; his income 11 ; 12 ; 15 ; 16 ; his overbearing manner 18 ; 23 ; 24 ; asks the Raja to shew to Grant all papers to help him to write an authentic history 25 ; stands in mortal dread for helping the English against his own people 59 ; 83 ; 85 ; 86 ; 101 ; asks the Raja to plead guilty to escape punishment 106-107.

Balaji Vishvanath Peshwa—22 ; his expedition against Angria referred to 27.

Balwantrao Chitnis—14 ; his stipend 17 ; questioned by Duff on various points of Maratha history 18-23, 24 ; explains how most of the documents of Shivaji's time perished when Raigad was sacked by the Mughals 22 ; 24 ; refutes the charge that his family was responsible for making the Peshwa powerful 26 ; 27 ; 28 ; 29 ; 30 ; suspected of embezzling government money 42 ; 101.

Balwantrao Senapati *alias* **Balasaheb Bhonsle**—1 ; his stipends 17 ; 91 ; 96-99 ; 100-101 ; pleads the Raja's innocence against the charge of seducing English troops 103-104 ; 104-106 ; his death 108.

Bapu Kanho—16 ; 29 ; 30 ; 31.

Bapu Mahadik—starts a discussion that the Chitnis were responsible for making the Peshwa all powerful 26.

Barnett—11 ; 14 ; 24.

Bhagwantrao Vithal—Raja's agent deputed to England 109 ; 114.

B—*concld.*

Bhausaheb (Ramchandra)—the Raja's younger brother 16.

Bhor—Sachiv of—1, 12.

C

Chandrarao More—27 ; 28.

Chhatrasing Bhonsle—his ashes being sent to Benares 2, his sojourn at Jaipur and Udaipur 29, 30, and respectful treatment he received from the Rajas 31.

Chimanappa Shirke—Kutrekar—excommunicated for having lost caste by intermarriage 67.

Chintopant Bhate—7 ; 42.

Chitkojirao Surve—109 ; 114.

Clare Lord—Governor of Bombay 83-84.

Cockburn—supplies the Raja with fancy articles from England 73.

D

Dajiba Mahadik—1.

Dajiba Upadhye—2 ; 20.

Daulatrao Sindia—reported to have been refused a Kachhava bride 85.

Deepvijayji—Family priest of the Rana of Udaipur 51, 52, 58.

Dinkarrao Mohite—94, 98 ; 104 ; 106.

E

Education—opening of a Pathashala at Poona 40-41 ; subjects taught and encouragement to students 44-47 ; rules and regulations for the school 49-51.

Elphinstone Mount Stuart—Governor—2 ; expresses satisfaction at the progress of the Maharaja's education 4 ; his appointment

E—*contd.*

as Governor of Bombay reported 7 ; tries to recover money secreted by Bajirao and his ministers 6, 9 ; reported to be visiting Satara 10 ; 42 ; starts a school at Poona 44 ; 49 ; directs printing of books in Dev nagari script 52 ; 72 ; 85 ; his ill-health prevents him from accepting the Governor Generalship 90 ; 91.

F

Ferris—113.

G

Gadadhar Pralhad—27.

Gaikwads of Baroda—their connections with high caste Marathas denounced by Raja Pratapsinh 66.

Govindrao Mahajani—Raja's Diwan—suspected of trying to seduce English troops of the Satara Residency 93, 97, 101, 104 ; 106.

Grant (Duff) Captain—Resident at the Court of Satara—asks the Maharaja to keep a daily record of his work 1 ; his solicitude for training the Maharaja in the administration of his State 2, 3, 4, 6, 7 ; punishes the sentries for rioting 8 ; 9 ; collecting material for his history 10 ; his salary 11 ; draws up the paper defining the relations between the Raja and his Jagirdars and also the treaty between the Raja and the Company 12-13 ; 14 ; 15 ; 16 ; makes detailed inquiry in respect of several historical topics 17-32 ; 42 ; 43 ; his letters inquiring about the Raja's welfare from England 70-73 ; 89-91.

H

Hart—60.

Hume—interests himself in the Raja's case 110.

Jagdevrao Jadhav—29, 30.

Jagdevrao Patankar—prohibited from visiting Pratapsinh 5.

Jodhpur—78.

K

Kashipant Bandre—suspected of espionage by the Raja 43; asks the Raja to plead guilty to satisfy the Governor 106-107.

Khanderao Mama Shirke—68.

Kharda—Battle of—48.

Kolhapur—Prince of—disowns any relationship with the Satara branch 35; 88.

Krishnarao—suspected of embezzling Government money 42.

Kusaji Mahadik—granted an annual allowance for capturing Chhatrasing's Pretender 15.

L

Lodwick—Resident at Satara 69; 73; 78; 79; 80; 85; 86; 87; 88; assures the Raja of his favourable consideration in presenting his case 91; charges the Raja with infringement of the articles of the treaty 92-96, 96-99; 100-101, dissuades the Raja from sending his agent to England 102-103.

Lytton—11.

M

Madhavrao Rastia—receives the first printed book in Marathi 52.

Mahadji Sindia—48; 52-53.

Mai Saheb—Chhatrapati's mother—2; 6; 16.

Malcolm, Sir John—settled 43.

Malharrao Chitnis—invited to Satara to explain to Grant Duff intricate points of Maratha history 20; explains the true nature of Chauth and Sardeshmukhi and clears up several points 21-22; 27.

M—*contd.*

Morris—73.

Munro, Thomas—42.

Milne, Dr.—92; 99; 100; 107; 112.

N

Nana Fadnis—his shrewd political sense praised by Lodwick 80.

Narhar Malhar Chitnis—despatched by Pratapsinh while in the Peshwa's custody to negotiate with Elphinstone 85.

Nilkanth Shastri—29, 30.

Nizam, the—48.

O

Ovans—Resident—starts inquiry into the Raja's attempt to seduce the troops 102, 104, 106; his unscrupulous character 113.

P

Parashurampant Pratinidhi—27.

Pralhad Niraji—first Pratinidhi—19.

Pratapsinh—Raja of Satara—celebrates the Dassara with pomp 1, his initiation into the administration of the State under the direction of Captain Grant 2, 3; declines to raze ancient forts in his State 3; declares his loyalty for the Company 4; sends seasonal greetings to Elphinstone and Smith 5; 6; learns of the appointment of Elphinstone as Governor 7; resents highhanded conduct of the English sentries 8; his large charities to Brahmans evoke the President's disapproval 9; learns of the capture of Ashirgad by the English 10; learns to read and write 10; notes down an earth-quake 1 and other uncanny happenings 11; 19; concludes the treaty with the Company 12; his Dassara cele-

P—*contd.*

Pratapsinh—Raja of Satara—contd.
brations 13; proclaimed Raja in his territory 14; being initiated into the administration 15, 16; unwilling to leave papers with Duff 23; 24; 26; his anxiety to confirm his descent from the Sisodia family 29; requests Grant to prevent cow-slaughter in the Residency 42; compares the rule of the Company with the effete administration of Nana Fadnis 43; asks Grant to stop the improper conduct of the soldiers 43; receives the reins of Government from the Company 48; discusses with Resident Robinson a visit to Europe 58-59, 65, hates Brahmans 59; expresses appreciation of the services rendered to him by General Smith 60; his revenue dwindling 60; 61; his views on the education of Maratha boys 62-63; complimented by the Governor for his excellent administration 65; condemns intermarriages between high caste Marathas and low caste Kunbis 66, 67, 68; celebrates Dassara 69; Duff's affectionate regard for him 70-73; thinks of contracting his daughter's marriage with a Udaipur prince 74-77; his talks with Lodwick 78-80; his differences about the interpretation of the treaty with the Company 81-84; 85; his bigotry 85-86; complimented by the Court of Directors for his good administration 87; his ideas about caste superiority, etc., 88; observes cordial relations with Grant Duff after his retirement 89-91; defends himself from charges of sedition brought against him 92-96, 96-99, 99-100; complains of the *ex parte* inquiry against him 100-101; 102-103; complains of unfair treatment by the English 104-106; pleads his implicit trust in the English as a proof of his innocence 104-106; refuses to plead guilty to the false charges preferred against him 106-107; sends agents to England to plead his case 108-113; his letters from England intercepted and delivered to the Resident 114; receives letters from Duff 70-73, 89-91.

R

Raghavacharya Ramanujan—appointed Head Teacher of the Sanskrit college at Poona 47; 106.

Raghojirao Mohite—excommunicated by Raja Pratapsinh 67.

Ramraja—26.

Ramasing—appointed Kotwal of Satara 7; his appointment disapproved by Grant 9.

Rango Bapuji Gupte—Raja's agent deputed to England—writes about his difficulties in England 108-109, reports to the Raja his exertions in moving his case before the Court of Proprietors 109-111; 112; 114.

Ranjitsing of Punjab—78.

Raoji Shirke Derwankar—excommunicated by Raja Pratapsinh 67.

Robert Cogan—108; writes about the Raja's Vakils and his own efforts to obtain justice for the Raja 113; 114.

Robinson—Resident at Satara—advises the King to visit Europe 58-59, 72.

Russel—Resident at Hydarabad—42.

Russia—threatens an invasion on India through Afghanistan 78.

S

Sadashiv Bhagwant—20; 21; 23.

Sambhaji Chhatrapati—30.

Sayyad Mir—Raja's agent to England—95.

Shahu Chhatrapati—reference to his favourite dog 28.

Shaikh Mira—16.

Shivaji Chhatrapati—11; Grant Duff's careful inquiry into the details of his administration 21, and career 26-32; 51, 52, 53.

Shivanand Shastri—deputed to Udaipur by Raja Pratapsinh to secure a prince of Rajput blood for his daughter 74-77; 87; 99.

Sindias of Gwalior—their connections with high caste Marathas, censured by Raja Pratapsinh 66.

S—*contd.*

Slavery—Detailed inquiry into the practice of indigenous slavery 32-40; 57-58.

Smith—General—5; the Maharaja's appreciation of his services to his family 60; 85.

T

Tanjore—Raja of—receives a deputation from Raja Pratapsinh 88.

Tarabai—her struggle for power referred to 29.

Tatya Abhyankar—18-19; 42.

Trimbakrao Ahirrao—excommunicated by Raja Pratapsinh 67.

U

Udaipur, Rana of—receives robes from Pratapsinh of Satara 87.

Umaji Naik—notorious Deccan robber—fights his guards and effects his escape 58; his raids near Wai 62; eluding the police 64.

V

Vithalpant Mahajani—his appointment as Diwan to the Maharaja 1; 2; 4; 5; 7; 9; 12; his monthly stipends 16; 20; 21; 24.

W

Wardin—79.

Warren, Mr.—43.

Wellington—Duke of—63.

William Chaplin—announces the Raja's installation 49.

Willoughby—113.

Y

Yashwantrao—his death 73.

Yashwantrao Sarsubhedar—42; 43.

Yashwantrao Shirke—reports to the Raja how his case was proceeding in England 109-111; 114.

MO-I Bk Ca 21—17

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

४३

पेशवे—सामाजिक व धार्मिक

[किंमत—२ रुपये २ आणे किंवा ४ शिलिंग]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी.ए.

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३४

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि
जबाबदारी सरकारावर नाहीं.)

Selection 43

THE SOCIAL AND RELIGIOUS MATTERS UNDER THE PESHWAS (1727-1797)

The majority of the documents hitherto published have been of a political character. From time to time, however, papers throwing fresh light upon the social and economic condition of the country, and upon religious and judicial matters, have been discovered: these were set aside for separate publication and are here presented under the following heads: (*a*) Religious, (*b*) Social, (*c*) Judicial.

(*a*) *Religious.*

Documents grouped under this head cover a wide range of subjects—the settlement of caste disputes, the erection and maintenance of temples and ghats, the endowment of religious institutions and other matters of a similar nature. One remarkable fact to which attention is drawn is that the Peshwas' outlook was by no means confined to the Deccan. As the Maratha power extended over northern India, the Peshwas, who, like all Hindu rulers, considered themselves Supreme Heads of all religious matters, were anxious to introduce reforms into countries where orthodox practices had been suffered to fall into neglect under Muhammadan rule. The Shravana-masa Dakshina and other Brahmin charities, the rigid enforcement of caste-rules, grants towards religious ceremonies for averting small-pox and other epidemics, pilgrim-taxes, vows and sacrifices, are only a few of the topics illustrated in the following selected documents.

(*b*) *Social.*

It is almost impossible to draw a hard and fast line between religious and social matters, and the papers arranged under this heading refer mostly to questions of caste, marriage and divorce, conversion, witchcraft and miscellaneous topics of a similar kind. It is interesting to learn that the sale of intoxicating liquors was entirely prohibited under the Maratha *Raj*. The passport system, which we are inclined to look upon as a modern invention for the annoyance of travellers, was in vogue: a Brahmin resident in Janjira complains that he is unable to attend a religious function in Poona without a permit from the Sidi! Female servants were not allowed to leave their masters unless formally discharged: a similar condition of semi-servitude, it will be remembered, obtained in medieval England.

(c) *Judicial.*

These papers will be found particularly valuable for the study of the administration of Hindu law under the Peshwas. Capital punishment was only inflicted under martial law and in cases of treason and rebellion : it was not inflicted in cases of ordinary murder. In this respect, Hindu custom compares favourably with the savage penal code of eighteenth century England. Cow-killing on the other hand was regarded as a heinous crime ; and it is interesting to note that the " benefit of clergy" was extended to Brahmin offenders, who got off lightly as compared with members of the lower castes. Civil suits are chiefly concerned with questions of adoption, division of property, maintenance of widows and similar topics. Moro Hari Bhave is responsible for a large number of letters communicating decisions pronounced by Ramshastri : he is apparently the latter's Shirastedar. It is disappointing that no fully reported cases decided by Ramshastri have so far come to light in the archives of the Daftar.

हू

दस्तक अजरख्तखाने कोट जंजिरे राजपुरी ताा ठाणेदारान व चौकीदारान व रहदारान अहद प्राा सिवर्धन तहद ठाणे माहाड व ठाणे पोलादपूर बिदानंद के सुा समान असरीन मया व अलफ. रावोपंत अदकारी प्राा सिवर्धन वगैरा हे घाटावर बाजीराव देसमुख याचे मुलाचे मुंजीस जात असेत अदमी ७

वस्ती सिवर्धन	वस्ती प्राा दिवे
१ माइले अदकारी	१ बाबाजी त्रिंबक देसाई
१ आपाजी कुलकर्णी	१ संकराजी गोविंद कुलकर्णी
१ त्रिंबकपंत महाजन	—
१ विस्वनाथ वर्तक	२
१ सावित्री देसाईण	
—	
५	

येकूण अदमी सात घाटावर मुंजीबद्दल जात असेत, तर जाऊ देणे. फेर तिकडून येतील यास येऊ देणे व ब्राम्हण सिवर्धन व दिवेपैकी च्यालीस पनास लग जातील त्यास जाऊ देणे. येतील यास येऊ देणे. राहामध्ये मुजाहीम[1] मना होणे पाा हुजूर राा * * * माा जबानी गंगाजी जाधव अफराद राा छ १७ माहे जमादिलावल मोर्तब सुद.

¶*This is a permit of the Sidi of Janjira granting a free passage to some persons attending the thread ceremony of the Peshwa's son. Without such permits, it seems, people could not travel freely in those days.*

No. 2] [29-6-1735

श्रीशंकर

श्रीमंत माहाराज राजमान्य राजश्री बाजीरावजी
व राजश्री चिमाजी आपा स्वामीचे सेवेसी

...ध्ये सदासिव नाईक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम आशाड ... पावेतो सहकुटुंब सुखरूप आसो उपरी. स्वामीही कृपा करून पत्र

---

१ रस्त्यांत हरकत.

पाठविले ते पावोन परम समाधान जाहाले. वाचून बहुत संतोष जाहाला. माहाराजाही घाट व ब्रह्मपुऱ्याविसी लिहिले. त्यास, येथील वर्तमान: येथील अधिकारी यानी जरासंद घाट बांधावयाचा आरंभ केला. त्यानी हकिमीमुळे सर्व सामान बंद करून आपले काम चालविले. आणखी कोणास मसाला मिलाला नाही. तेणेकरून सर्वांची कामे बंद जाहाली. घाटासाठी स्थल नागेशाचा घाट बांधावा येसा निश्चये केला आहे. आपल्या घाटाच्या पूर्वेकडे वीरेश्वराचा घाट आहे. त्याच्या पूर्वेकडे नागेशाचा घाट आहे. परंतु बहुत ब्राह्मण तेथे स्नान करणार नाही काये निमित्य म्हणाल, श्रीमनकार्णिका सनिध याकरितां तो घाट बांधावा हे चित ठारत नाहीं. ब्रम्हपुऱ्याविसी लिहिले तरी येके स्थली ब्राह्मणपुऱ्या बांधाव्या तरी चितायोग्य स्थल हातास येत नाहीं. फुटकर ब्रह्मपुऱ्या पाच घेतल्या आहेत. किता येक रुपये ३६००, किता येक रुपये ३००० किता एक रुपये १२००, किता येक रुपये २२५०, किता येक रुपये ७५०, येणेप्राणे घरे घेतली आहेत. मातुश्री आल्याउपरी चिरंजीव बाबूजीच्या विचारे करणे ते केले जाईल. दशासमधीचे (दशाश्वमेधीचे) स्थल श्रीअद्वैतानंद स्वामीस करून दिले. घाटसुधा घेतले. घाटाचे माथा हवेली जीर्ण होती ते घेऊन नवे बांधोन स्वामीस स्थल दिले आहे. येकून रुपये खर्च ४४०० जाहले आहेत. भूमि राहिली आहे, त्यास रुपये दोन अडीच हजार लागतील ते दाहा सन्यासी राहत येसे स्थल होईल. परंतु त्यास काम यावरसी लाविले नाही. पुढे काम लावीन. यावरसी येक काम सिध केले. वृधकालासनिध जमीन बिघे अडीच विकत घेतली तेथे बाग केली. येक सहश्र पात्रे होत येसे स्थल बांधणार. यावरसी पाचसे पात्रे होत येसे स्थल सिध केले. पाचसे केली व आणखी वृक्ष लाविले. आणखी स्थल करणे आहे. सामानाचा अटकाव जाहाला म्हणून सेवटास गेले नाही. कार्तिकाउपरी काम लाऊन सिध करीन. रावजी गावात बाग आपल्या घरापासून जवली आहे. श्रीयात्रेस लोक येतील त्यास राहावयास जातील तेव्हा राहतील. येके दिवसी सहश्र भोजन कोणी करील तर स्थल आहे. हे वर्तमान उभयता चिरंजीव व मातुश्री येईल तेव्हा सर्व निवेदन केले जाईल. पत्री काये म्हणून ल्याहावे? यावरसी गोविंदपतास लिहोन वीस रुपये पावते पाहिजे. आपण जिवंत आहे तो स्वामीचा धर्म कासीत विचारास येईल करीन. स्वामीचे छत्र ब्राम्हण २५ येक पैसा दक्षणा उत्तम भोजन पाच अन माधोकरी यासी या खेरीज मी धर्म करितो. तीन ब्रह्मपूजा ब्रा दिल्या. चिरंजीव आबाजी व भिऊबाईच हस्ते येक ब्रम्हपुरी दिली. धर्म स्वामीचा आहे. मज धर्माचे अगत्य नाही. श्रीमध्ये देह सुटला

मोक्ष आहे. सर्व पुण्य स्वामीच्या पदरी पडो. मातुश्रीस राजमार्गे पाठविली. आपल्या पुण्यकरून उतम प्रकारें यात्रा होऊन तुम्हाजवली पावतील. हे पुण्य कोणास येईल? रावजी येथे धर्म तुमचा होतो त्या पुण्यकरून हा लोक उत्तम आहे. परलोकी येथे येऊन मुक्त होईल त्यास संदेह नाही. द्रव्य बाईच्या यात्रेस एक रुपया लागेल त्याची बेजमी करून पाठविली पाहिजे. बहुत ल्याहावे तरीं आपण सर्वज्ञ आहेत हे विनंती.

¶Sadashiv Naik father of Babuji Naik who on behalf of the Peshwa was superintending the building of ghauts, temples and dharmashalas at Benares gives an account how the work was progressing.

No. 3] *[11-1-1739*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी १

आज्ञाधारक लक्ष्मण विस्वनाथ कृतानेक सां नमस्कार विज्ञाति. येथील वर्तमान ता। पौश सुध त्रयोदसीपावेतों सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर भिकाजी जाधव वस्ती मौजे सदापूर ता। नाणेमावल या गांवीं पंधरा साले आहे. त्यास निंबा पाठारा वस्ती मौजे भाजे ता। मजकूर या गांवीं दोन वरसें होता, त्याणें आपली मुली भिकाजी जाधव यास सदापुरी लेकास दिली. लग्न जाले. त्यास पाच साले जाली. भिकाजी जाधव याचे कुल उतम नाहीं, म्हणोन निंबाजी पाठारा याचे बायकोने वेदमूर्ति राजश्री वीरस्वरभट याजवल फिराद केली. त्याणी येक रुपया मसाला करून सा मइनियानी सेंड+ आणून द्यावी ती दिली नाहीं. त्या उपर मागती मसाला येक रुपया घेतला आणि निरोप दिल्हे. त्याउपर मागती दोन रुपये मसाला करून मारूं लागले, तेव्हां तो फिरादीस आम्हाकडे आला कीं मुलीची काडी मोडून भटजी मागतात, मजला मारितात याचा सोध करणे. त्याचा सोध केला, त्यास ये प्रांतीं त्याचे जावई सदापूर ता। नाणमावलचा पाटील खंडोजी खराडा सोयेरिक आहे. सुभानजी जाधव त्याचा भाऊ चुलतभाऊ म्हणतो व त्याचा दुसरा जावई मौजे वाकी ता। चाकण येथे आहे. ये प्रांती तो दुसरे सोईरे नाहीत. को पुणे येथे आहेत. तीन पिढा पुणेयांत जाल्या. भिकाजी जाधव याची वस्ती मात्र नाहीं. हा काडी तो मोडून देत नाहीं. बायको तो वेदमूर्तीजवल जाऊन भर घालते, त्यामुलें ते तो यास

\+ लेखी जबानी.

कष्टी करितात. ते तपस्य, त्याजवल आमच्यानें तो बोलवत नाहीं. त्याजबद्दल आपणाकडे पाठविला आहे. याचे मोझे पुणियात आहेत. तो मोझा आपणाकडे पुणियात देतो म्हणून सेवेसी पाठविले आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्त. याचा करीना मनास आणून आज्ञा करणार स्वामी समर्थ असेत. याचा निर्वाह होईल त्या प्रो वेदमूर्ति राजश्री वीरेस्वरभट यास पत्र देऊन भिकाजी जाधव याची मुक्तता होइ ते केले पाहिजे. हे विज्ञाप्त.

¶*Lakshman Vishvanath requests Chimaji Appa for an injunction prohibiting Vireshwar Bhat Karve from obtaining a divorce for the daughter of Nimbaji Pathara married to the son of Bhikaji Jadhav.*

No. 4] *[31-8-1743 ?*

श्री

सेवेसी विनंती. वेदशास्त्रसंपन्न राजश्री जनोबा उपाध्ये संनिध राजश्री स्वामी यांस वेथा परम कठिण. काल समीप प्रवर्तला आहे. याची लेक बाजी विठल देशपांडे यांची सून प्रस्तुत पुण्यास आहे. तरी बाजी विठल यास ताकीद करून जनोबा उपाध्ये याचे लेकीस जलदीने पाठवणे म्हणोन आज्ञा. ऐशास देशपांडे यास ताकीद केली, परंतु ती छ २१ रजबी बुधवारे अस्पर्श जाली. तैसीच रवाना करावी तरी मार्गी टोकन्यावर उतरावे लागते. तिजला टोकन्यावर बसावयास कार्यास नये. याजकरिता छ २४ मिनहू शनवारे चौथे दिवसी उपाध्ये याची लेक व जावई निगणार आहेत. ताकीद निक्षूण केली आहे. हे विज्ञापना.

¶*This letter informs how a woman in courses had to postpone her journey to her dying father's place as she could not be admitted to the ferry boat plying across the river which had to be crossed.*

No. 5] *[12-12-1750*

श्रीशंकर

श्रीशंभु सिखरी राजश्री महिपतराये कवडे याच्या विहिरीचा कारखाना चालतो, ते काम तात्र्डतोब होऊन येत नाहीं. सदैव कामात खलल होते. तर बडवे व पातरूट व लोणारी यांस ताकीद करून श्रीचे काम सत्वर होऊन ये ते. करावे. आपणास

7428

विहित आहे. धर्मकृत्याचें काम. त्याचे साहित्य करावें ते तो नाही. नस्ता उपद्रव करणे योग्य नव्हे. ते गोष्टीने पुनरपि बोभाट न ये ते करणें.

१ साबाजी बाजी घाटगे

१ नागोजी झुंझारराव घाटगे

यैसी दोघांस दोन पत्रे देवावी.

पाा हुजूर राा रुबरू छ २३ मोहरम सन इहिदे खमसैन.

¶This letter requests orders for supplying labourers in connection with the building of a well at the shrine of the Shambhu Mahadeo Hill.

No. 6] *[24-1-1756*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यासी

श्रीमंत सद्गुणनिधान कृपाविधान प्रतापवरिष्ठाभिधान निरंत भगवदनुसंधान सावधान. श्नो माहाराव जसवंत निंबालकर दंडवत विनती उपरी येथील क्षेम ताा छ २१ राखर * * * ज निजानंद लेखन कीजे विशेष. कृ पत्र संक्रमाणाचे तिल शर्करायुक्त पाठविले ते पावोन परम समाधान जालें. कितेकानीं या तिळाचे लावण्य पाहून तिलोतमाच्या लावण्याचे मूळ हेचं तीळ असतील ऐसे मानिले. अस्मत् चितानें कृपा श्नेहमये जाणोन आवडीनें शर्करासहित सेवितां रसनेस गोडी व चितास प्रतिक्षणी अभिवृधि लक्षणी श्नेहवशता प्राप्त जाली, तो विस्तर लिहिणियाहून विशेषतर असे हे विनंती.

¶Janoji Nimbalkar acknowledges the receipt of Sankrant greetings from the Peshwa Nanasaheb.

No. 7] *[26-11-1758*

श्रीचिंतामण

सेवेसी शंकराजी केशव सां नमस्कार विज्ञापना. राजश्री मल्हार राम (घारपुरे) पेठ शुक्रवार याचे पुत्र यानी कालापा जईन वाणी पेठ मजकूर याचे येथे चव घटका रात्री येऊन सोनाराचा प्रतिपक्ष धरून निरापराधी ब्राम्हणास मारावे, सोनाराने उगेच असावे, श्रीमंताची आणशेफत द्वाहीं दुऱ्हाई देत असता याणी बदमस्ती करून माणसापासून मारावे, हा काहीं ब्राम्हणाचा स्वधर्म नव्हे, हे वर्तमान सर्वास श्रुत्य केल; परंतु त्यासीं काही होत नाही म्हणोन स्वामी समर्थ आहेत म्हणोन श्रुत्य केल. इतरानी अन्याये केला तरी स्वामी सिक्षा लवकरीच

करितात. मातबरानी बंदमस्ती केली तरी पारपत्य करू नये, तेव्हा श्रीचा अवतार स्वामीच आहेत. घारपुरे याची बदमस्ती दूर होत नाही. तेव्हा आमचे पारपत्य करवणार स्वामी समर्थ आहेत. कारण काये तरी मातबराचा बोभाट राजद्वारी का आणिला म्हणोन पारपत्य केल तऱ्ही आम्ही राजी असो. त्याचे पारपत्य येक सभा व धर्मसभा याचे साक्षीने न्याये होईल तेव्हा त्याच्या वंशाचे पारपत्य श्री व ब्राम्हणच करवितील. मृत्यलोकी कोण्ही सामर्थ्यवंत घारपुरे याची बदमस्ती दूर करणार नाही ऐसा सिधांत न्याये शास्त्रमते जाला हे प्रमाण भृत्य होय. हे विज्ञापना. कार्तिक वद्य ११ श ८०

¶*Shankaraji Keshav lodges a strong protest to the Peshwa against the highhanded behaviour of the son of Malhar Ram Gharpure, whose deeds are mentioned as unbecoming a Brahmin.*

No. 8] *[12-5-1764*

श्री

हरिराम व नंदराम फघडे वगैरे खरगोणबतीसीकर याणी कुकसीकर दोघे ब्राह्मण, पिरजादे याचे सिश व त्याचे मार्गाने चालत होते. माणसे मेलिया-नतर अग्निदहनादि संस्काररहित, यैसे शंभर वरसे करीत आले होते, म्हणौन ज्ञाति बाहेर होते, त्यास गतवर्षी नंदराम याणी पंगतीस घेऊन बसला. ज्ञाति लोकास न पुसतां व शास्त्रोक्त प्रायश्चित न देतां आपले सगे सोईरे पंनास घरासी तल करून बसला आहे. ज्ञाति लोक म्हणतात त्याचे आईकत नाहीं. अनाचार प्रवर्त जाहाला आहे. त्यास पूर्वत ज्ञातिबाहीर करून आपण प्रायश्चित घेऊन सर्व ज्ञातीने यकत्र भाजेन करावे म्हणौन मल्हारजी सुभेदार यास पत्र १

शत वर्षे यावनी मार्ग आचारला असता त्यास शास्त्र न पाहाता त्याचे ज्ञाति लोक हरिराम नंदराम यानी आणीक पनासा घरानी मिळोन त्यास पंगतीस घेतला. त्याचे आणीकहि ज्ञातीचे ब्राम्हण आहेत ते या गोष्टीस मान्य नसता या पनासाच घरानी तड करून आनाचार वर्तले आहेत म्हणौन विदित जाले. त्यावरून तुम्हास पत्र लिा आसे. तरी काणव ज्ञातीचे ब्राम्हणावेतरिक्त दुसरे ब्राम्हण नागर वगैरे जे शास्त्रासंपन्न आसतील त्यास हा शास्त्रार्थ पुसोन शास्त्रमते निवडेल त्याप्रो हरिराम नंदराम वगैरे पनास घरे तड जाला आहे त्यांस वर्तत्रणे.

7430

शास्त्रमार्गाने वर्तावयाचे न ऐकत त्यास सख्तपणे सांगोन शास्त्ररीतीने चालवणे. म्हणौन मल्हारजी होलकर यास सदरहू प्रो पत्र देणे.

छ १० जिलकाद वैशाख आर्बा सितैन.

¶*Hariram, Nandram and some other Brahmins had without proper sanction readmitted to their caste two persons who were following Mohammedan practices for about a hundred years in the past. The Peshwa asks Malharrao Holkar to consult learned Brahmins in this connection and deal necessary punishment to Nandram and other Brahmins for their irreligious behaviour.*

No. 9] [*18-5-1765*

श्री

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधि ताा दताजीसेट बिन कृष्णाजी सोमवंसी कासार देशम्हेत्रे माहाजन दफत कासार व समस्त कासार प्रा कराड व माहालानिहाय सुाा खमस सितैन मया आलफ. तुम्ही हुजूर किनईच्या मुकामी विदित केले जे, जातीचे आपले जातीचे घरी लग्नकार्य होतात त्याची वरात कलसासमेत देवदर्शन होऊन जानवशाचे घरास मिरवत जातात, यैसे पूर्वापार चालत आलें आहे. यैसे आसता आलाकडे काा मजकूरचे वाणी यानी कजिया करून सातारियास जाऊन राजश्री विसाजी दादाजी याकडून मसाला रुा १०० शंभर आपणावरी करून नेले. त्यानी तहकिकात करिता वाणियासी पुसिले की, ये गोस्टीचा जाबस्वाल काय तो सागणे. तेव्हा वाणी जाबसाल देईनात आणि वादासहि उभे राहीनात. तेव्हा आपणास सागितले जे, तुमचे हातून सेटे माहाजन येऊन ये गोस्टीचा जाबस्वाल करीत असले तरी आणवणे, नाहीतरी आम्ही हुजुरून मसाले करून आणऊ. त्यास तुम्ही आर्ज केला जे, मी वतनदार, आपलीकडून आतर पडो देऊ नये. येक वेल मीच सेटे माहाजन यासी पत्र लिहोन पाठवितो, उतर येईल तदनरूप जे करणे ते करावे, म्हणौन बोलिलो; आणि आपण सेटे माहाजन पाा कुलकर्णी यास पत्र पाठविले. त्यावरून सेटे माहाजन याणी समस्त दैवे[१] वाणी लिंगाईत यासी बोलाऊन आणून विचारिले की, वादास उभे राहाणे किंवा कासाराची समजाविसी करून घेऊन येणें! त्यास त्याणी उतर दिल्हे जे, तुम्ही आम्हास वडील व त्यासहि वडील आहा, तर त्यास घेऊन येणे. कासाराची

१ The caste collectively or assembled.

वरात कलससहित उभे पेठेतून मिरवायाचा कजिया जाहाला तरी यातिनिर्णय पूर्वीपासोन चालत आले आसेल त्याप्रमाणे पत्र करून देणे. यैसा करार समस्तापासोन होऊन सेटे माहाजन व कुलकर्णी सातारियासी येऊन आपली समजाविसी करून आले. येतेसमई चिमणगावी कैलासवासी येमाजीपंत आणा होते त्याची भेटी घेतली. सविस्तर वृत निवेदन केले. त्याणी चौकसी मनास आणून यातिनिर्णय ग्रंथ पाहोन सागितले की, कासार सोमवंसी यांची वरात कलसासहित मिरवावयासी आडथला नाही. यैसा निश्चयरूप शास्त्रमत बोलोन आपणास वस्त्रे देऊन सेटे माहाजन याचे हाती देऊन गावास लाऊन दिल्हे. गावास आलियानंतर सेटे माहाजन यानी आपले समस्त दैवाचे नांवचे पत्र करून दिल्हे आहे. त्यावर लिंगाईत समस्त वाणी यांच्या साक्षी आहेत. काजीची मोहर आहे व कुलकर्णी याचे बिकलम व सेटे माहाजन याचे निशाने आहेत. समाकुल पांढरीच्या साक्षी आहेत. वाणियाचे नावनिसीवार पत्र द्यावें. यास्तव जिल्हेकडील आमलदार व हुजूर मामलतीकडील आमलदार व देशमुख व देशपांडे व सेटे माहाजन व पाटील कुलकर्णी व समाकुल पांढर यैसे समस्त पेठेमध्ये बैसोन वाणियासी सांगितले, की तुम्ही आपलें पत्र नावनिसीवार करून देणे. ते बोलिले की, शास्त्राआधार असेल त्याप्रा आम्ही वर्तावे, कासारानीहि वर्तावे. यैसे हरदूजणाही बोलोन निश्चय केला आणि शास्त्रआधारे वर्तो, न वर्तो तर दिवाणचे गुनेगार म्हणौन कतबे दिल्हे. त्यावरी श्रीभैरव याच्या देवालयात सुभेदार व हुजूर मामलेदार व देशमुख व देशपाडे व सेटे माहाजन पाटील कुलकर्णी समाकुल पाढर यैसे समस्त ब्राम्हण सिस्ट वेदशास्त्रसंपन्न यास विचारिले की, वाणी याचा व कासाराचा जातिनिर्णये कैसा आहे? याणी कैसे वर्तावे पाहून सांगवे, म्हणौन बोलिले. यावरी त्याणी शास्त्रार्थ पाहोन, यातिनिर्णयाचा शोध करून, आपणास पत्र करून दिल्हे जे, कासार सोमवौंसी क्षेत्री व ब्रम्हक्षेत्री याची वरात कलसासहित उभे पेठेतून मिरवावी. ये गोष्टीविसी शास्त्रमते किमपि गुता नाही. त्यावरून समस्त वाणी यानी नावनिसीवार आपले पत्र करून दिल्हे आहे की, तुम्ही आपली वरात कलसासहित उभे पेठेतून मिरवीत न्यावी यैसे वाणियानी पत्र करून दिल्हे आहे. त्यावर दफातवार व समाकुल पांढरीच्या साक्षी आहेत. यैसियासी दिवाणचे पत्र करून द्यावे म्हणून विनती केली. त्यावरून सिस्ट ब्राम्हण यानी ज्ञातिनिर्णयाचा शास्त्रार्थ पाहोन समस्त दैव वाणी लिंगाईत याची समक्षा पुरऊन हे पत्र तुम्हास करून दिल्हे आसे. तरी तुम्ही आपले जातिजमाताचीलग्ने करून वरात कलसासहित उभे पेठेतून मिरवीत देवदर्शन होऊन आपले घरास जात जावे. याउपरी तुमचे ज्ञातिची

वरात वंशपरंपरेने मिरवावयाचा संशय राहिला नाही. सुखरूप वंशपरंपरेने वरात मिरवणे. जाणिजे छ २७ जिलकाद निदेश समक्ष

बार सुरु सुद बार

¶*Shriniwas Pandit Pratinidhi issues an order establishing the right of Kasars to take their marriage processions accompanied by Kalash (an ornamented pot of water) to a temple. This right was disputed by another caste, the Lingayat Vanis of Karhad.*

No. 10] [*9-2-1769*

पौ छ ४ सवाल

तिसा.

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री

शास्त्रीबावा स्वामींचे सेवेसी

विद्यार्थी मलोजी जाधवराऊ कृतानेक दंडवत विनंती. येथील कुशल ताा माघ शुध्ध ३ त्रितीया येथास्थित असे विशेष. पुरुषाकडील तीन, स्त्रीकडील चार हें करावे किंवा न करावे, याचा शास्त्रार्थ कलला पाहिजे. यास्तव हे पत्र आपणास लिाअसे; तरी शास्त्रार्थलेखन केला पाहिजे. पिढ्या ताा:

पुरुषाकडील	स्त्रीकडील
१ मूळ पुरुष सुभेदार	१ मूळ पुरुष सुभेदार
१ सटवोजी जाधवराव पुत्र.	१ कन्या फिरंगुबाई.
१ जोत्याजी जाधवराव नातू वर	१ त्याची कन्या बुगाबाई
	१ त्याची कन्या वधू
३	४

याप्रमाणे असेत. कर्तव्य न कर्तव्यतेचें शास्त्रार्थ येईल त्याप्राा वर्तणूक केली जाईल. विशेष काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶*Maloji Jadhavrao requests Ramshastri to decide whether a marriage of the grandson from the male line of Pilaji Jadhav with the great granddaughter from the female line of the same person, was allowed by the Shastras or not.*

No. 11] [11-5-1771

पो छ २९ मोहरम

इहिदे सबैन.

श्री

सेवेसी बापूजी माहादेव सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ २२ मोहरमपर्यंत येथास्थित आसे विशेष. पत्र पाठविले ते पावले. खंडो शामराज याचा लेक निंबाजी खंडेराव याणे येऊन निवेदन केले की, माझी बाइको गुदस्ता प्रसूत जाहाली. त्या सोयेराचा लोप मोरो बावाजी याचा लेक सखो मोरेश्वर याणे करून श्राधी पंक्तीस ब्राह्मणाबरोबर भोजन केले व श्रीस आभिशेक करून नैवेद्य दाखविला. त्याजवर हाली आमची भावजइ म्रत्य पावली. तिच्या सुतकाचा लोप करून सर्वास स्पर्श केला आणि बापूजी माहादेव याचे घरी आहेर केला म्हणून निवेदन केले. तर सखो मोरेश्वर यास आणून त्याचे आंगी सदरहू आपराध लागू जाहाले म्हणजे आत:पर त्यास गावात कोन्ही पंक्तीस घेऊ नये अगर भोजनास त्याचे घरी जाऊ नये. याप्रमाणे गावकरी यास ताकीद करून सखो मोरेश्वर यास हुजूर पाठवणे म्हणून आज्ञा. येसियास खाडे व समस्त ब्राह्मण यास बोलाऊन आणून याजदेखता सखो मोरेश्वर यास पुसिले. त्यानी येणेप्रमाणे सांगितले जे, आपला बाप मेला त्याचे सुतक खंडो शामराज याणे धरले नाही यामुळे आपणहि सुतक धरले नाही येसे बोलला. गंध आक्षता लाविल्या. आमचे घरी पाटील कुलकर्णी आहेर करावयास आले. त्याचा मूल मागून येऊन बसला. त्याउपरी खंडो शामराज याणे येऊन गलबल केली. त्यास आम्ही स्नान करून मग साडे करावयास गेलो व कुलकर्णी खाडे मजकूर याणेहि स्नान केले. समस्त ब्राह्मण बोलले जें, आपली आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तनूक करू. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Bapuji Mahadev explains to the Peshwa the conduct of one Sakho Moreshwar in not observing the period of pollution on account of birth and death, and solicits Peshwa's orders in the case.*

No. 12] [21-9-1772

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री

पाठकजी यांसी

विनंती उपरी. सिवाजी उतरा कोष्टी वस्ती काा पुणे याणे रामजी गायकवाड कुणबी वस्ती काा मजकूर यांची कंन्या आपले लेकास करून पाट लाविला.

त्यास रामजी गायकवाड म्हणतो की, सिवाजीने आपण जातीचा कुणबी ऐसे सांगोन माझी कन्या आपल्या लेकास करून पाट लाविला. पुढे सिवाजी मजकूर जातींचा कोष्टी यैसे आपणास कळले. यास्तव आपली कन्या देत नाही म्हणून व सिवाजी कोष्टी म्हणतो की रामजी गायकवाड याची कन्या आपल्या लेकास करून पाट लाविला तेव्हा आपण जातीचा कोष्टी ऐसे सांगितले होते; परंतु त्यास साक्ष कोणी नाही म्हणून, याप्रो हरदोजणाचा कजिया लागोन मनसुफी सरकारांत पडिली त्यावरून अपणास लिहिले आहे. तरी येविसीचा विचार शास्त्रता करून लहून पाठवावे. रा। ख २३ जमादिलाखर सुा। सलास सबैन मया अलफ बहुत काये लिहिणे.

¶*One Sivaji Utara of the weaver caste got his son married to the widowed daughter of Ramaji Gaikwad, Kunbi by caste. The latter discovering that his new relatives did not belong to his own caste refused to send away his daughter to her new home when she was claimed by her husband. The affair is referred to the learned opinion of one Pathak who seems to be well versed in Shastras, to declare an authoritative opinion on the dispute.*

No. 13] *[22-9-1772*

पौ छ २१ साबान नकल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये
राजश्री शंकराजी केशव स्वामी
गोसावी यासी

पोष्य माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहित जाणे विशेष. वो रो दिनकर जोसी सिनरकर याची घरची कुलबीण बनाम राजी हे सिनरातून पळोन गेली, यासी सा सात वर्षे जाली. तिचा तलास करितां हालीं बाळोजी कदम माजी हवालदार किले त्रिंबक याचे घरी पुण्यांत सापडली. आपण मागो लागलों त्यास तो म्हणतो की कुनबीन चुकारी किले मजकुरी आली, ते आमचे तसलमातीस सरकारातून लेहून मात्र दिली आहे. तिजला सेर देऊन चाकरी घर्ीं करिते. त्यासी आमचे तसलमात दूर करऊन पत्र आणून कुनबीण घेऊन जाणे यैसे बोलतो, म्हणून वेदमूर्तिने विदित केले. त्याजवरून पत्र सादर जाले असे; तरी किले माारी बंदी सिलकेस हिसेबीं उतरली आहे, तेथे या कुनबीणीची रुजुवात पाहोन बाळोजी कदम याकडील तसलमात दूर करून भटजीची बटीक भटजीस देवणे. फिरोन बोभाट येऊ न देणे. जाणीजे छ २४ जाखर सुा। स[लास] सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Orders to restore a female slave to her former owner are issued to Shankaraji Keshav by Peshwa Madhavrao.*

No. 14] [*30-5-1777*

श्री

गैरआदा तूर्त दोन महिने करावी.

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य
राजश्री नारो माहादेव गोसावी
यासीं

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा सबा सबैन मया व अलफ. समस्त कुंभाराची वधूवरें घोड्यावर बसवावयाचा करार करून कुंभारापासून नजर गांवचे ऐन तनख्यास दरसदे अर्धा रुपयाप्रमाणे घ्यावयाचा करार सन सलास सबैनात जाहाला आहे. त्यास ताा कर्यात मावळ येथील गावगंनाचा यैवजं येणे ते बाा देणे प्यादे व जासूद यांचे रोजमरे याचे वाटणी पौ मोघम रुो

१३५॥. प्यादे दिाा हरिसिंग व बुधसिंग चाकणकर.
१०० जासूद जथे हाय निाा दफ्तर येकबेर्जी यास.

२३५॥.

येकूण दोनशे साडिपस्तीस रुाा देविले असेत; तरी सदरहु प्रो आदा करून पावलियाचे कबज घेणे. जाणीजे छ २२ राखर. आज्ञा प्रमाण.

¶*A decision allowing the potter caste to use a horse for carrying the bride and the bridegroom in a marriage procession is referred to n this paper.*

No. 15] [*1777-1778*

श्री

दिाा बाो लक्षुमण बिन अवचितराव देशमुख प्राा सगमनेर सुाा समान सबैन मया व अलफ. कारणे साहेबाचे सेवेसी लेहून दिल्हा कतबा यैसाजे. धांदरफलकर कवडे देशमुख याची मूल प्रीतिराज देशमुख सेलके प्राा मजकूर हे शंकरराव देशमुख याचे चुलते याचे लेकास देऊ केली. मागणी जाली. त्याजवर चौहू वर्शानी सोइरिक मोडली. कशामुले मोडली हे आपणास ठाऊक नाहीं. मागणी जाल्यावर प्रतिकूल उभयेपक्षी जाल्यास सोइरिक मोडती, याप्रमाणे आमचे कुली चाल आहे. आमचे सात पुस्त पाट लागला नाही. शंकरराव याचे चुलते भवानजी देशमुख यांची आई पाटाची, त्याचे पोटचे याप्रमाणें खरे करून देऊ. न देऊ तर दिवाणचे गुन्हेगार. हा कतबा लेहून दिल्हा.

बिाा आपाजी दत्तात्रय देशपांडे प्राा वाई कराड.

¶*One Deshmukh explains why he had to cancel the marriage proposal made with another Deshmukh.*

No. 16] [23-3-1782?

श्रीरेणुकावरद

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नारायण दीक्षित बापट
गोलपकर यासी प्रति

स्नेहाभिलाषी गोविंद कवीस्वर नेवासकर यांचे अनेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष. आमचा वृध्धापकाल जाला. पोटी संतान राहिले नाही. जीर्ण बहुत जालो. यास्तव चतुर्थाश्रम संपादून श्रीमाहुली संगमी जलसमाधिस्त होणार म्हणोन आम्हाजवळ श्रीरामचंद्राच्या मूर्ति आहेत त्यांचें पूजन व उछाहा आम्ही करीत होतो तो चालला पाहिजे. यास्तव तुम्ही थोर ब्राह्मण तुम्हास दिल्याने सर्व पूजन उछाहादिक चालेल ऐसे पाहोन तुम्हास श्रीरामचंद्र देवतार्चन दिल्हे असे. तुर्म्हा अग्निहोत्रादिक षट्कर्मे पारंपर्य चालवितां, तैसाच रामनवमीचा उछाह चालविल्यास चालवावा. आमचें वर्षासन रुपये तीनशे नेवासे येथे चालत आहेत, ते तुम्ही श्रीमंताजवळ पुसोन आपणाकडे करोन घ्यावे. धर्मसंस्थापक आहेत, तुम्हाकडे करून देतील. बहुत काय ल्याहावे हे साष्टांग नमस्कार. शुभकृत नाम संवत्सर चइत्र शु रामनवमी

येये भूमिभुजः स्वधर्मनिरताः क्षोणीतले भाविनो
बद्ध्वा हस्तयुगं दृढं सविनयं तान् याचतेऽसौ कविः ।
नो धर्मो मम भूमिपाः प्रभवतामेवास्ति धर्मः सताम्
काले भाविनि भावुकैः करुणया संरक्ष्यतां सर्वदा ॥ श्री ॥

¶*Govind Kavishwar entrusts his idols of Ram and their worship to Narayan Dikshit, being very old himself and wishing to end his life by drowning at the sacred confluence of Mahuli.*

No. 17] [13-5-1787

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
रामचंद्र सिवाजी स्वामी गोसावी यासी

पो माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष. विरापा रोकडे वाणी वस्ती कसबे सोलापूर याणी हुजूर विदित केले की, माझे बापाची माऊसबहीण नागावा लाहान होती, तेव्हा काल पडला ते समई देशांतरास गेली. ती मैरालास आमचे जातीचा वाणी होता त्याचे घरी जाऊन राहिली. तिचे लग्न जाले नसता दोघे लेक

वाण्याचे पोटचे जाले. याची नावे वेकापा व सैदापा. ऐसे दोघे मूल घेऊन पुन्हा सोलापुरास आली. त्या दोघांची लग्ने नागावाचे वैवाटीप्रो जाली. जातीत त्याचे हातचे पाणी कोन्ही घेईनात. तेसमई गोतास मी शरण जाऊन पाणी घ्यावयास आधिकारी केले. त्याप्रों पाच साहा वर्षे चालले. त्याजवर माझे घरी लग्न होऊ लागले ते समई हकिमास तिने गैरवाका समजाऊन पंक्तीस अन्न-वेव्हार करावा म्हणौन लग्नास अडथला केला व हाली माझे लेकीचे लग्नाची योजना केली आहे त्यास अडथला करितात की आम्हास पंक्तीस घ्यावे. येविसी आज्ञा जाली पाहिजे म्हणोन, त्याजवरून हे पत्र तुम्हास सादर केले असे. तरी वेकापा व सैदापा बदआमलापासून उत्पन्न जाले. त्यास जातीत घेणे ती गोताची रजावंदी व सरकारची आज्ञा पाहिजे. हे येकीकडे ठेऊन विरापा वाणी याचे बापाचे माऊसबहिणीचे लेक आपल्यास जातीत घ्यावे म्हणतात. याचे घरी लग्नप्रयोजनास दुराया देतात. यांचे कारण समजोन हरदूजण लबाडी करीत असतील त्यास ताकीद करून विरापासी कजिया व लग्नास अडथला करू न देणे. वाजबी असेल ते करणे. जाणिजे छ २४ रजब सुा सबा समानीन मया व अल्फ बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa orders that no hindrance should be offered to Virapa Rokde performing his daughter's marriage. His aunt and her two illegitimate sons should be warned accordingly.*

No. 18] [25-1-1792

२ माहाल जामदारखाना रोजकीर्द
स्वारी राजश्री पंतप्रा सुरु इसने
छ ३० माहे जोवल

खर्च सनगे येकूण आंख
सिमगा खर्च सालगुा सन इहिदे तिसैनात वाडियांत खेल करविले त्याची बिदाई रा याद चिठी छ २८ मोहरम कापड आख

९८७॥

ता ज्याचे ते वगैरे सनगे येकूण आंख

मानसिंग जोहरी आख गोविंदा इंदुलकर आख
९० ७९

7438

ताा खुद सनगे आख
४८ तिवटे २ दर २४
२ खादी पो ·॥·

९० रु. २॥

बापू सिंपी आख
२९
ताा गोविंदा इंदुलकर शेले
साधे रुजू गोलदार
१६ प्राा १
९ प्राा ·॥·

२९ १॥

सुभाना राऊल आख
२९
ताा खुद
२४ गोलदार
१३। १०॥।

२४ २
१ खादी पो ·।·

२९ २।·

भवानी बाबाजी आंख
४०
ताा बालाजी अनंत केलकर
तिवट १ आंख
४०

संतू वाणी आख
२९
ताा बालाजी आनंत केलकर
कारकून सिलेदार

ताा खुद सनगे आख
९७॥। तिवटे
३१। २६॥

९७॥। २
१७। गोलदार
१२॥। प्राा १
४॥ प्राा ·॥·

१७। १॥

३॥

७९ रू.
सिदू राऊल आख
३७॥
ताा खुद
३९। तिवटे
२०। १९

३९। २
२। खादी पो ·॥÷

३७॥ २॥÷
राणोजी सिंपी आख
२९
ताा बालाजी अनंत केलकर तिवट
१· येाा आख
२९

हरि माहादू आख
४०

ताा बालाजी आनंत केलकर
तिवट १ आख
४०

२२। गोल्दार १
२॥। तिवट ०

२९ १

राणू बेल्या आख
४०

ता। बालाजी अनंत केलकर
१४॥ तिवट ·।·
२९॥ लुगडे १

४० १।

तुल्या सोंगाडी आख
२९

ता। बालाजी आनंत केलकर
लुगडे १ आख
२९

गरभया आख
२९

ता। बालाजी आनंत केलकर सनगे
येकूण आख
२ जोट ८≡
२३ खण
२॥ ३ ३ ३
३॥ ३ ९ ०

२३ ७

२९ ७८≡

सिदू बेलसरकर आ

ता। बालाजी आनंत केलकर गो
दार १ यो आ
२

माहादू गुराखी आख
३०

ता। बालाजी आनंत केलकर
सनगे आख
११॥। तिवट १
१९ धोत्रजोडी १
३। खादी पो ·॥।÷

३० २॥।÷

बाला बहिरू आख
२९

ता। बालाजी आनंत केलकर तिवट
१ आंख
२९

होना गवली आख
४०

ता। बालाजी आनंत
२६॥ लुगडे १।·
१३॥ जोट १

४० १॥-

रामा गवंडी आख
२९

ता। बालाजी आनंत केलकर
२४। गोलदार १।·
·॥।· सेलाजोट ८÷

२९ ·॥÷

[या पुढील बंद ३ याचे सुरवातीचा मथला तोच आहे पण थोडा फरक आहे सबब घेतला तो व त्या खालील खर्च मागील बंदावरून पुढे चालू]

माहाल जामदारखाना स्वारी राजश्री पंतप्रधान खर्च छ ३० माहे जोवल सिमगा खर्च सालगुदस्ता सन इहिदे तिसैनात वाडियांत खेल करविले त्याची बिदाई कापड — रोजकीर्द सुरु इसने — आख

गंगू पोव्या — आख २०

ता बालाजी अनंत केळकर ताफ्ता कद ।=

आख २०

गंगू भोरकर — आख २५

ता बालाजी अनंत केलकर आख

२५ ताफ्ताकद ॥

० लंग

२५ ॥

बेल्या धोंड्या आख ५०

ता बालाजी आनंत लुगडे पो ।

आंख ५०

शेवगावकर — आख २५

ता बालाजी आनंत लुगडे पो ८=

आंख २५

लहरी मुकुंदा — आंख २५

ता बालाजी आनंत

१८ खण

१५ प्रा ४ दर ३॥।

३ प्रा १

१८ ५

२ ताफ्ताकद ८=

५ गजनी ८≡

२५ ५।÷

मोव्या — आंख २०

ता बालाजी आनंत

१२ ताफ्ता कद ।

८। सकलाद नारंजी गज ॥ दर १६॥

२०। — सनंग । गज ॥

धोंडी सिंपी — आख ४०

ता बालाजी आनंत ताफ्ता कद ॥।

आख ४०

7441

सदासिव पेठकर आख
२०

ता बालाजी आनंत सकलाद
गज १। दर १६॥ प्रो आख
२०॥=

भवई आख
२५

ता बालाजी आनंत लुगडे
प्रा ८= आख
२५

माणकू मैराला आख
२०

ता बालाजी आनंत केलकर लुगडे
पैठणी
८÷
आंख
२०

नारोबा सिंपी आख
२०

ता बालाजी आनंत लुगडे प्रो ८÷
आख
२०

भोरकर आख
२५

ता बालाजी आनंत लुगडे प्रो ८÷
आंख
२५

धावजी परीट आख
२०

ता बालाजी आनंत केलकर आख
३ ताफताकद ८÷
१७८÷ गज वार गज
१६॥ सकलाद गज
१

॥÷ मखमल गज
८॥

१७८÷ दर २७

२०८÷ १८॥
सनंग गज
८÷ १८॥

हरिसिंग आख
२५

ता बालाजी आनंत केलकर लुगडे
पो ८– आख
२५

जोगेसरी गोसावी आख
५०

ता बालाजी आनंत लुगडे
प्रो ।• आख
५०

तेरीज येकंदर		सनगे यां आंख
३००	तिवटे	११।
१३७॥	सेले गोलदार	७॥
७७	लुगडी	२॥
४१	खण	१=
१६।	जोट	१।
१०२	ताफ्तेकद	२८÷
९	गजनी	८≡
१९	धोत्रजोडा	१
२४०	लुगडे यां	१
८॥	खाद्याप्रां	२८=
९४२॥		४०॥=

४९॥≡ गजवार गज

४९।= सकलाद गज २॥।

॥÷ मखमल गज ८॥ तसू

४९॥≡	२॥।॥

९८८।≡	सनगे	गज
	४०॥=	२॥।॥

¶*The above is a list of the dresses and presents which the Peshwa distributed to his players and bards in the Holi festival of 1791.+*

No. 19] [16-9-1794

नकल

श्री

ताा येसी कुणबीण धनगरीण सुाा खमस तिसैन मया व अलफ. तू पेशजी सरकारात बटीकपणा करून होतीस, त्यास हाली तूं सोड मागितलीस त्याजवरून तुजला सोड दिल्ही असे. तरी हरयेक जागा पोट भरून सुखरूप राहाणें. तुजला सरकारातून हरयेकविसी तोसीस लागणार नाही. जाणिजे छ २१ सफर मां

¶*This is a certificate of manumission given to a female slave of the shepherd caste. She is allowed to go and earn her livelihood.*

+ ह्या जमाखर्चाच्या नोंदीत कांहीं शाहिरांचीं नांवें आलीं आहेत, त्यावरून त्यांचा काळ समजून येतो.

No. 20] [2-3-1797

श्री

यादी भोजनांस आमंत्रणे करावयाची मंडली मिा फाल्गुण शुध ४ गुरुवार

१ बापू गोखले
१ अंताजीपंत मामा गद्रे
१ रामचंद्रपंत सुभेदार
१ विठ्ठलपंत पटवर्धन
१ आपाजीपंत सेवडे
१ विनायेकपंत धागरेकर
२ सदासिवपंत बापू व
बाबाजी कोडविलकर
१ बाबाजी रास्ते
१ धोंडो * * *
भागवत
१ बापू भिडे
१ चिंतामणभट खेर
१ नारोपंत नाना आपटे
१ जिवाजीपंत हवालदार
१ धोंडोपंत लिमये
१ बालाजीपंत आगाशे
२ बापूभट व मोरोपंतभट
१ वासुदेव सिवराम जोसी
१ गणेशपंत साठे
१ भिकाजीपंत वाघ
१ आणा वाघ
१ बापू गडबोले
१ वेंकाजीपंत जोसी
१ वासुदेवपंत मामा मराठे
१ बालाजीपंत मामा मराठे
१ बापूजीपंत मराठे

१ मोर दीक्षित नाना
१ नारायण दीक्षित
१ भयासाहेब
१ नारायणराव हशमनीस
१ बहिरोपंत सहस्रबुधे
१ धोंडोपंत नाना साने
१ नारोपंत नाना गुरुजी
१ धोंडोपंत दादा जोसी
१ रावजी देशमुख मंडलीसह
१ आणा देशमुख
१ सदासिवपंत दादा मोडक
१ बाबा ठोंसर
१ केशवराव वाघ
१ भाऊ भिडे ताथवडकर
१ जनोबा आगाशे
१ भास्करपंत कोलटकर
१ भाऊ लिमये
१ आन्याबा लिमये
१ जिवाजीपंत आपा जोसी
१ जनार्दनपंत जोसी
१ तात्या गोरे
१ राघोपंत तात्या जोसी
१ आपाजीपंत आगाशे व
सदासिवपंत दात्ये
१ दाजीबा जोसी
१ गणेशपंत सोमण

१ यज्ञेश्वरभट बापट
१ बापू कवडी

२९

१ पांडुरंगपंत खरे

१ बापू खाडिलकर
१ बापू मेहेंदळे

२८

१ भिमाजीपंत काथवटे

¶*This is a list of persons invited by Bajirao II for dinner.*

No. 21] [*1800-01*

श्री

यादी घरपटी माफ आसामी येकंदर पेठ रविवार कसबे पुणे सुा इहिदे मयातैन व अलफ

४७॥	फकीरचंद
७९॥	इमाम मुलाणा
६	विसोबा नाा सराफ
३६	हरिभक्ति
२५	कृष्णाजी भैरव थते
१५	जिवबा नाा वाकडे
१४	महिपतराव प्रल्हाद
९	बालकृष्णशास्त्री
१०	गंगा विष्णु वैद्य
१०	धोंडोबा आपा पुरंदरे
१७	विसाजी कृष्ण बिनीवाले
१२	रंगोबा नाा वानवले
२९१	
५०	वर्षासन श्रीव्यंकटेश देवांस नैवद्य नंदादीप.
३४१	

¶*This is a list of persons who were exempted from the house-tax at Raviwar Peth, Poona.*

No. 22] [*22-12-1748?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायेत छ १२ मोहरमपावेतों स्वामीचे कृपावलोकनेकरून या प्रांतीचे व सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. रा येशवंतराव येरूडकर यांजविसी स्वामीनी दोन तीन आज्ञापत्रें पाठविलीं त्यात सारांश अर्थ, मोकासी येक दोघे सरदार येऊन येरूडकराची समजावीस करून नेऊन पंक्तीपावन करावे. हे निक्षूण राजश्री बालाजी चंदरराव व राजश्री बाजीराव बेलोसे व समस्त लोक मोकासी यांस निक्षूण सांगोन उतर पाठविलेंत नाही; दिसगत काये म्हणोन लाविली? मातबर माणसास फेन्यात पाडावें हें उतम नाहीं. तरी चौघे मोकासी पाठऊन यास नेऊन पंक्तीपावन करणे म्हणोन आज्ञापत्र सादर जालें. त्यावरून यांस बहुत प्रकारें सांगितलें. त्यास हे म्हणतात की, आम्हास हुजूर जावयास निरोप द्या. त्यास सांप्रत राजश्री बाजीराव बेलोसे व कितेक मोकासी अरमारावर स्वारीस गेले आहेत ते येतांच अरमारची व किल्याची बंदोबस्त करून मोकासी सरदार राजश्री बालाजीराव व बाजीराव देखील सेवेसी येऊन पावतील. आज्ञे-प्रमाणे वर्तणूक करतील. व स्वामीनी लिहिले कीं उतरास दिसगत लागली. त्यास पहिलीं पत्रें छ ४ जिल्हेजची सादर जालीं ती छ २ मोहरमी पावलीं. तीं इतके दिवस मध्यें कोठे राहिली होती हे न कले. येथे आलीयावर समस्त मोकासी लोक जमा करून आज्ञेप्रमाणे सांगितलें. त्याणी उतर दिल्हें कीं, फाल-गुनमासी हुजूर जाऊन. आतांच जाऊ तर खावंदाची आज्ञा हुजूर यावयाची नाही. गोव्ये याची आवाई स्वामीनीच आज्ञापत्रीं लिहिली होती याजकरितां अखेर माघ मासापावत यांस राहून घेतले. फालगुन निघताच राजश्री बालाजी-राव व बाजीराव व समस्त मातबर माणूस मोकासी सेवेसी येतील. स्वामीनी आज्ञापत्रीं लिहिलें की, मोकासी लोक पंक्तिपावन न करीत तरी त्यांचे भाऊबंद सोइरे धाइरे आहेत त्यांजकडून पंक्तीपावन केले जाईल. त्यास जे स्वाम् करितील ते होईल. यांस येथे गुंता जाला तो स्वामी सेवेमुले जाला. यास येथे निक्षूण सांगावयाचे ते आज्ञाप्रमाणे सांगितलें. यांची बोली कीं, ते बाइको गोताचे स्वाधीन करावी. मग आज्ञेप्रमाणे तिची विल्हे होणे ती होईल; अथवा ते बाइको येरूडकराचे स्वाधीन न कारावी व गोताचे हातीं न द्यावी. तिसरें जागा असों द्यावी आणि येरूडकरांस वसईस आज्ञा करून पाठवावे. येथेंच पंक्तिपावन

आज्ञेप्रमाणे करितील अगर कल्याणास पाठवावे, तेथे जाऊन पंक्तिपावन करितील. सिंदी बाइको मात्र प्रस्तुत हे सेवेसी येत तो पावेतो उभयेताकडे न द्यावी यैसे करावे. हा निश्चये होऊन आला म्हणजे येरूडकरास पाठवावे. आज्ञा होईल तेथें पंक्तिपावन करितात. यांचा हा विचार आहे. स्वामीस कोणी विदित करितील की यांत शंकराजीपंतास यांचा अगत्येवाद आहे. तरी मजला दोनी सारिखे म्हणोन मी पहिलेपासून स्वामीस लिहीतच आहें. सारांश दोनी स्वामी रक्षितील. ते बाइको उभयेतांचे स्वाधीन न जाली म्हणजे हे रजावंद आहेत. येरूडकरास पंक्तिपावन करितील. सेवेसी विदित जाहलें पाहिजे म्हणोन लिहिलें असे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshao explains to the Peshwa why he had to delay the execution of the Peshwa's orders for admitting back into the community one Yeshwantrao Yerudkar.*

No. 23] [*1767-68?*

श्री

शेवेसी बखतनाथ बैरागी कानफाटे विज्ञापना ऐसी जे. गोंधली व डौरे गोसावी या उभयेतांचा सूरसंबलाविसी कज्या होता. त्यास श्रीमंत कैलास-वासी नानासाहेब व भाऊसाहेब याणी मनास आणून डौरे गोसावी याणी संबल वाजवावा ऐसा ठराव करून डौरे याजपासून हरकी रुा ५००० पांच हजार करार करून गोविंदराव चोरघे यास जामीन सरकारांत घेतले. डौर गोसावी याणी गोविंदराव मजकूर यांस आपले नावाचे कतबे पाच हजाराचे दिल्हे. पुढे कर्जहि गोसावी याणी वारिले. कतबे सोडऊन आणिले. ते कतबे गोविंदराव मजकूर याणी पालिती लाऊन चोरून नेले आणि सरकारचे बोथाटी बारदार घेतले की आपले रुा गोसावी याजकडे आहे ते वसूल करावयास म्हणौन घेतले ; आणि बोथाटीबारदार व आपण मिलोन मुलकात डौरे गोसावी यांजवर पटी करू लागले ते आजपर्यंत करीतच आहेत. सतावीस हजार रुा याच्या पावत्या आपणाजवल होत्या, त्या पिराजी माली तलेकर व गोपालजी काले याणी पावत्या व घर ऐसे स्वारी घालून लुटून नेले. आलीकडे दोन वर्षे सतावीस हजाराखेरीज वसूल जाहाला आहे आणि हालीहि करीतच आहेत. याजकरितां स्वामीनी कृपाळु होऊन याची चौकसी केली पाहिजे. सदरहू रुपये पोत्यास आले असिले तरी पावती देविली पाहिजे. नाही तरी गोविंदराव वगैरे यासी

हुजूर आणऊन चौकसी पाहून हाली मुलकात रुो वसूल करितात, याची ताकीद करावी व वसूल जाले रुा याची चौकसी करणार स्वामी समर्थ आहेत. हे विज्ञापना.

¶*Bakhatnath Bairagi (Kanphate) makes a complaint against one Govindrao Chorghe for exacting from the Daure Gosavis money which had already been paid to him.*

No. 24] [?

तालीक.

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेबाचे
शेवेसी

विनंती सेवक हरि उमाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता॥ छ २ सवालपावेतो आपले कृपेकरून येथास्थित असो विशेष. आपले आज्ञेप्रमाणे नासिकास आलों. ब्राम्हणाचा तट मोडावा त्यास उभयतां तटाचे ब्राम्हण सर्वाच्या भेटी सभ(भ्य) आहेत त्यांच्या घेतल्या. बहुताप्रकारे प्रार्थना केली, परंतु धाकट्या तटाकडील विश्वनाथभट भातोंडीकर याचे तिघे पुत्र आहेत त्यास थोरल्या तटाकडील ब्राम्हणांनी धरून मारामार केली, सिबंदी ठेऊन धामधूम करितात, धाकट्या तटावर चढून जातात. दादंभट बील व विश्वनाथ भातोडकर यांस विनंती केली. त्याणीं उतर केले की जे सरकारची आज्ञा ते आम्हास सिरसा. परंतु थोरल्या तटाचे ब्राम्हण, त्यास बहुता प्रकारे सांगितले परंतु त्याच्या ध्यानांत येईना; आणि हकमाची गुडगा याकरितां बापूभट भानोशे व जगंनाथभट झिटे व रंगभट वैद्य व त्रिबकभट शुक्ल व वासुदेवभट भातोंडीकर यैसे त्याचा आग्रह फार. सरकारातून राऊत आले त्याणी सिबंदीचे प्यादे धरून हुजूर आणावे. त्याजवरी कमाविसदाराची स्वारी जाऊन प्यादे धरून दिल्हे नाहींत. चौघे प्यादे धरून नेले. राऊताकडील घोडे जखमी जाले. आम्ही आपला वकूब जितका होता तितका खर्च केला परंतु ना आयकत. आम्हावरी चाढाई करून आले तेव्हां आम्ही कोणता उपाय करावा? समक्ष आलियानें निवेदन करीन. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Umaji reports to the Peshwa an altercation between the two parties of Brahmins at Nasik which they continued in defiance of his orders.*

No. 25] [24-8-1772?

पौ छ २७ जमादिलावल.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक महादाजी नारायण सा नमस्कार विज्ञापना. ता छ २४ जमादिलावलपावे(तो) स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर हुजूरचे आज्ञापत्र सादर जाले तेथें आज्ञा कीं, नरहरि रनाळेकर याजला येवनानी पानपथातून धरून नेऊन भ्रष्ट केले. तो दाहाबारा वर्षे त्यांतच राहून येवनमय जाहला असतां त्याजला पैठणास कांहीं ब्राम्हणानी शुध केला. येविसीचा कजिया हुजूर पडला होता तेव्हां वैदिक व पंडित यांची सभा करून शास्त्रता मनास आणितां दाहाबारा वर्षे येवनमय जाला त्याजला शुध्ध करावयाची अर्हता नाहीं, शुध केला हे अयोग्य, याप्रमाणें ठराव होऊन ज्यानी शुध केले त्या ब्राम्हणास बहिष्कार पडला होता. त्यापैकीं बहुतेकांनी प्रायेश्चित घेऊन शुध जाले. बाकी चालीस पनास आसामी अत्याग्रहे प्रायश्चित न घेत यामुळें बहिष्कृत राहिले होते ते हली पैठणी मोगलाकडील कमाविसदाराची हिमायत करून जबरदस्तीने आपली व शुध ब्राम्हणाची पंक्ति करून येकाकार केला आहे म्हणोन हुजूर विदित जाहालें, त्यावरून हे पत्र सादर केले असे. तरी पैठणकर ब्राम्हण असल्यास त्याजला ता अमदानगर येथे पंक्तीस न घ्यावें. याप्रमाणें सर्व ब्राम्हणाचे घरीं ताकीद करणें म्हणोन आज्ञा. त्यास हुजूरचे आज्ञेप्रमाणें तालुके मजकुरीं सर्व ब्राम्हणांस पैठणकर ब्राम्ह पंक्तीस न घेणे म्हणोन ताकीद केली. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadaji Narayan executes the Peshwa's order regarding the excommunication of the Brahmins of Paithan who admitted back into their caste one Narhari Ranalekar who being converted to Islam after the disaster, of Panipat, lived as a Mohammedan for about ten years.*

No. 26] [1750?

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक सिवाजी बलाल चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती. ता छ ४ रमजानपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून किले मिरजेचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विज्ञापना ऐसीजे. येदां या प्रांतात नापीक जालें. त्यास दिवाणचा रुपया तो वसूल जाला पाहिजे. रुपया वसूल करून पुढें लावणी

संचणी व्हावी, ऐसियास इटे व भालवणी खानापूर तासगांव व सावलज येथून चोरीचा उपद्रव मुलकांत बहुत होतो. इच्यामध्यें राजश्री भगवंतराऊ त्रिंबक यांचे खासगत कोठीस बैल सा उमगले. त्यास बैलाविसीं लिहून पाठविले तर तपसील लिहीत. बैल वलखून नेटी लाविले तेव्हां साहापैकी चार बैल सोडिले. तसेंच सावळजेत उधो वासुदेव होते त्यांचा उपद्रव चोरीया होऊ लागला. अजनीचे बाजारकरी वाणी याचे कापडाचे दींड नेले. माग सावळजेस लागला. जाबसाल करीनात. मग लोक पाठऊन ठाणे सावळजेचे घेतलें. तऱ्ही तासगांव खानापूर येथील उपद्रव चुकत नाहीं. तसेच कोल्हापुराकडील चोरीचा उपद्रव होऊन गुरें घोडी गेलीं त्याचा दागदूम लाऊन ज्यांचे घरी गुरें उमगलीं त्यांचे आंगी लाऊन लिहून पाठविलें परंतु जाबसाल होत नाहीं. दुसरे ज्यादुगिरी माणसें कोल्हापुराकडील तमाम नदीपलीकडे व मिरज प्रांतात गांवगना फिरतात. माणसें धरून नेतात. उबरे पुजतात. त्यामधें गरोदर बाइकास तों उपद्रव फार. कसबा कवठे येकंद प्रां॥ मिरज येथील तेलियाचा मूल वीस पंचवीस वर्षांचा भुलऊन धरून नेला. हे वर्तमान मिरजेस येतांच नदीपलीकडील गावखेडीयास दबाव घातला जे, करवीरपावेतो बोभाट पडावा. याकारितां मुलकांत धमकावणी घातली तेव्हां तेलियाचा मूल अदृषगतीकरून सुटून आला. त्यास वर्तमान पुसिलें त्यास तो सांगतो कीं, कोल्हापुरास राजवाडियाचे पाठीमागें घर आहे. त्या वरांत पंनास पावणासे माणसे आहेत. कांही किरस्तांव व कोरवी व फलटणदेसची माणसें व पांच गरव्हार बाइका त्यांतून येक बाइको बालंत जाली. त्या माणसास खायास हरभरे टाकतात व उसाची पेट टाकतात. मांदणी+ दोन पाणियानी भरून ठेविली. तेलियाचा मूल दोन दिवस त्या येमालयांत होता तो पलून आला. कितेक वर्तमान सांगतो ते लिहितां पुर्वत नाहीं. सिरालेकरांनी येक मांग जादूगीर धरला तो त्यांही सुलावर दिल्हा. आकलखोपेस जादूगीर मांग धरिला याजवल माणसांच्या सावा[१] व मांस व सेंदूर तांदूळ हिरवे पिवळे ऐसा मुदा समेत धरला तो येथें आणून खोडियांत घालून ठेविला. याप्रा॥ मुलकांत उपद्रव मांडिला. रानांत आऊतकाठीस येकटदुकट माणूस जावयास भिते. येविसीं आज्ञा करावया स्वाम समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The practice of witchcraft which was rampant in the province round about Kolhapur and which resulted in several thefts and harassment of women and children is reported to the Peshwa. The writer also records some concrete instances and traces and describes the home of sorcery at Kolhapur from which it originated. The paper throws some light on the superstitious nature of the people of those times.*

+ मांदणी = मोठ्या तोंडाचा उंच डेरा. स्त्रीलिंग. १ सावा स्नायू.

No. 27] [Before 1795

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
परशराम रामचंद्र स्वामी गोसावी यांसी

पो माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणें विशेष. समस्त सुतारांचा बारा बलुत्यामध्यें वडीलपणाचा मानपान सुदामत चाल(त) असतां कोठे कोठे नवीन दिकत करितात ती करूं नये. सुदामत बाराबलुत्यामध्यें सुतारांचे वडीलपण चालत आल्याप्रो चालवावयाचा करार करून देऊन• नजरेचा ऐवज सुतार वगैरे ज्ञात खूम तीन यांजपासून सरकारांत घ्यावयाचा करार केला. त्यास तुम्हाकडील सरकार कमाविसीचे माहाल व फुटगावदेखील दुमाले येथील कमाल बेरजेवर दर सद्ये

१ सुतार बलुत्यांत श्रेष्ठ सा
•॥• लोहार
•॥• परीट

२

येकून दोन रुो प्रो सरकारांत घ्यावयाचा करार करून हे सनद सादर केली असे. तरी सदरहूप्रो तिही खुमापासून ऐवज बसूल घेऊन शंकराजी बली खिजमतगार हुजुरून पाठविला आहे याचे मारफातीने ऐवज सरकारांत पावता करणें.

¶*This is a sanad ordering collection of a tax from and restoring the right of precedence to the carpenter caste over the other eleven castes practising different crafts in a village.*

No. 28] [Time of Peshwa Madhavrao I

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री बाळाजीपंत नाना
मुा सगमनेर यासी

९ सुभचिंतक संभुपुरी गोसावी मठ मौजे तळगांव उत्तम त्रिकाल आशीर्वचन उपरी. येथील कुशल ता माघ वदे १ जाणोन स्वकीय आपले कुशल लिा असले पाहिजे विशेष. गीरनामे पाच सात हजार या देशांत आले आहेत. आम्हास रनाळीयाहून आमचे पुरीनामी याने पत्र लिहिले आहे की, नासकावर पुन्हा पुरीनामियावर येतात. परगणे परगणियात पाटल जमीदार हमीद यास

धरून परगणीयाची खडनी घेतात ऐसे आहे. आम्हाकडे येणार, त्यास इकडे आलियावर त्याचे आमचे युध्य होईल. आसपासचे गाव वगैरे धूम होईल. मग येश अपेश तर इश्वरास्वाधीन आहे. परंतु मुलकात धूम होईल याकरितां आपणांस विनंती पत्र लिहिले आहे की, तमाम किलेदार व जमीदार व मुलकी लोक यांसी आपण ताकीद पत्रे पाठवावी की, गीरनामे बारी उतरू न पावेत. श्रीमंतास पत्रे ल्याहावी तर ते दूर राहिले. आम्हास आपन श्रीमंताचे जागे आहेत. तर सर्व बंदोबस्त करून पाठवला पाहिजे. आम्ही कांही तळगांव जिता मेल्या सोडून जात नाहीं. याकारितां आपन सर्व प्रकारे आमचे अरिष्ट निरसन क(रणा)र आपन आहेत. श्रीमंताकडोनहि बंदोबस्त आपनच करून घेणार आहेत. हे जागा तीर्थरूप कैलासवासी महंत बनसीपुरीबावाचे आहे याकरिता लिा आहे. सर्व प्रकारे आसरा भरोसा आपलाच आहे. तर राजश्री आपाजी हरि वगैरे मातबर सरदार जे आहेत त्यास साहित्यपत्रे द्यावी. कळले पाहिजे. व गंगथडी व खानदेश येथील गीरनामी यास ताकीदपत्रे की, पुरिनामीयाचे मठास उपद्रव दिधलियावर सरकारात मठ तुमचे लुटले जातील. तर त्यास माघारे वाटे लावावे. ऐसे करनार आपन आहेत. विशष काय लिहा आशीर्वचन.

सेवकांकित त्रिंबक काकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विशेष. लिखितार्थ माहाराजानी परिसावी. विज्ञाति हेच कीं हा मठ पूर्वपासून राजमान्य आहे. यांची साहेता माहाराज करणार समर्थ आहेत. या प्रांतीं मुजफरजंग व किलेदार वगैरे पागा आहेत त्यास हजूरचे व आपले ताकीदपत्रें पाठविलिया यांचे रक्षण होईल. यानंतर आपले मर्जीस जे येईल ते करणार आपण समर्थ आहेत. बहुत काय लिहिणे हे विज्ञाति.

¶*The letter refers to the mutual struggles between the two sects of the Gosavis—the Giri and the Puri. The writer, a Puri Gosavi, informs Nana Fadanis of the possible attack of the Giris on the Puris of Nasik and requests him to stop it.*

No. 29] [?

श्री

बालाजी धोंडदेऊ कुलकर्णी मौजे पेठ पारगाव ता। खेड सरकार जुनर याने कलवांतिणीसमागमे गमन व भोजन व मांसभक्षण व सुरापान केले, यामुळे पतित जाला व यामुळे याचें समस्त भाऊबंद आपांक्त जाले म्हणून हुजूर ब्राम्हसभा

करून धर्मशास्त्रमते यांस प्रायेछित द्यावयाचा निर्णय करून पूर्वांग प्रायेछित यास देऊन प्रिथवी प्रदक्षण तीर्थश्नानें करावयाची आज्ञा केली आहे. प्रदक्षणेस व तीर्थश्नानास पाठविला आहे. हा श्रीपुन्यक्षेत्रीं येऊन वास करून श्रीगंगेची तीर्थश्नाने करील [अपूर्ण]

¶*Penance is enjoined upon Balaji Dhondo Kulkarni of Pargoan for having lived with and taken meat and wine in the company of a prostitute.*

No. 30] [*1750-60* ?

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक मोराजी सिंदे नामजाद जंजिरे रेवदंडा चरणावरी मस्तक ठेऊन दंडवत विज्ञापना. ता। छ २९ माहे रजबपावेतों सेवकाचें व जंजिरे मजकुरचें वर्तमान येथास्थित असे विशेष. ठेवणे याचा मजकूर. गुणाबाई ब्राह्मण बाइको टाकीच्या वाडीत राहात्ये इणे येऊन सांगितलें कीं, नारोबा परांजप्या वस्ती वाडी मजकूर याची बाइको रखमाई येके दिवसीं सहज माझ्या घरास बैसावयास आली होती. तिजला पुसिलें कीं, तुझे डोले काय म्हणोन दुखतात? त्याजवर ते बोलिली कीं, आधीच डोले आपले अशक्त आणि आजी दोन च्यार दिवस जागरण होतें तेणेकरून बहुतच दुखतात. त्याजवर पुन्हा मी तिजला पुसों लागल्यें कीं, जागरणास कारण काय? त्यास तिणे उत्तर दिल्हें कीं, दाहापांच जण मिलोन सारी रात्र आपल्या घरीं जागतात आणि म्हणतात कीं, कोठें ठेवणे आहे तें काढावें. ऐसी तजवीज करीत असतात, यामुलें आपल्यास जागरण जाहालें. व याउपरी येका दोहो दिवसीं रखमाई व मी व आणीक बाइका ऐशा मिलोन देवदर्शनास गेलों होतों. त्यास येतेसमईंहि तिजला मागती पुसिले जे, तूं आज बहुत कष्टीसी कां? तेव्हा रखमाईने म्हाणिलें कीं, काली रात्रीस दाहा पांच जण आपल्या घरीं मिलाले. त्याणी मजकरवीं तलणवलण वगैरे पूजासामग्रीचें साहित्य करविलें आणि वाडींत जाऊन ठेवणे घागर एक काढून आणिली. त्यांत मोहरा व पुतल्या व सोन्याच्या सांखल्या ऐसे होतें, याप्रमाणे सांगीतले. यावर तिजला मी बोलिल्यें कीं, मोठ्याने बोलो नको. त्याजवर बोलिली की, मजला सारी रात्र जागरण जाहालें यामुलें दोन घटिका झोंप अधिक लागली याकरितां घरधनी याणीं मारिले व जीवेच मारीन ऐसे दबाविलें. यावर मी बोलिले कीं, आतां तुम्हास बाइकास काय उणे? द्रव्य सांपडलें; येक म्हणतां पांच मिलतील. येणेप्रमाणे इणे मजपासी सांगितल्यावर मी साक्षेप पुरस्कार वाडींत जाऊन पाहिलें तों वाडीच्या

देवाची पूजापुष्पें व ठेवण्याची खांच दृष्टीने देखिली. सदरहू प्रमाणें हकिकत गुणाबाई इणे सेवकाजवल सांगितली. त्याजवरून नारोबा मजकूर यास बोलाऊन आणिले आणि बहुत चौकसीने पुरसीस केली, परंतु कबूल न होय. याकरितां याचे बाईकोस पुसावयास्तव भला माणूस चौकस पाठविला. त्यास ताकीद केली कीं, तिजला सांगणे कीं नारोबास सदरेस बैसविले आहे व गुणाबाईहि गेली आहे. त्याणी ठेवण्याचे सर्व वर्तमान विदित केलें. त्यास तुम्ही जाहाली हकीकत खरीच सांगणे व गुणाबाईजवलही काय बोलिली ते सांगणे. सदरेस नेल्यावर तुझी आबरू राहणार नाही म्हणोन. त्यास तिणे सांगितले की, ठेवणे म्हणजे काय हे मजला काहीं ठाऊक नाहीं व गुणाबाईजवल [या खालचा बंद गहाळ] वाडी-तील ठेवणेयाचा मजकूर गुणाबाईने विस्तारें विदित केला तो मनास आणितां साक्ष मोझ्यानें त्या ठिकाणचा मुदा पुरला नाहीं आणि हे सिंपुलवाडीच्या ठिकाणा-ची हकीकत साबूत जाहाली आणि टाकीच्या वाडीच्या मजकुराचा थाक लागत नाही. येकली गुणाबाई मात्रच सांगत्ये. दुसरा कोण्ही साक्ष मोझ्या मनास आणितां पुरत नाहीं. येणेप्रमाणे जाहाली हकीकत राजश्री नारो विठल हुजुरून रोजमरा वाटावयास आले होते यांच्या मारफतीने मनास आणून तहकीकात केली असे. येणेप्रमाणे सेवेसी विदित व्हावें याकरितां लिहिलें असे व येविषईची आज्ञा काय ते करणार स्वाम धनी आहेत. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Moraji Sindia reports to the Peshwa the findings of an inquiry he made about the alleged discovery of a hoard by one Naroba Paranjpe.*

No. 31] [?

श्री

याद. जंजिरे जयदुर्ग येथें पर्वतवासी स्वयंभू प्राचीन स्थान आहे. तेथें पांच लिंगे आहेत. त्यांतील पश्चिमेकडील येक शकल परदेशी येऊन हातानें उखळून नेले. त्या वेळेस व सांपडावयाचे वेळेस दृष्टांत पुजारी यास होऊन ते लिंग आणिले म्हणोन लिहिले. व शास्त्रमते स्थापना करावी किंवा जली निमग्न करावे, जसी आज्ञा होईल त्याप्रमाणें करूं. त्यास जर लिंगाचे शकल खपली निघाली आहे असे असल्यास शास्त्रमते शकल तुकडा असल्यास जलमग्न करावे. तथापि देवाचा दृष्टांत होऊन सांपडले त्यापक्षां फिरोन प्रार्थना करून दृष्टांत जर जेथील तेथें तुकडा लावावा आणि लिंग सचंत्रच एक स्थळी बसवावयाजोगे सगळेच आहे असे आसल्यास शास्त्रताच स्थापना करावी असे आहे. दोही प्रकारचे करणे जाले तरी अर्चाशुद्धि केलीच पाहिजे.

¶*The letter refers to the removal and also the reinstatement of one of the five lingas at Jaydurga (=Jaygad).*

No. 32] [?

श्री

श्रीमत् सेवेसी दंडवत विनंती उपर. आग्निकवतुकांची दोन झाडें राहिलीं आहेत. पर्जन्यातिवृष्टीमुळें वाळतात व चातकन्यायेची नगारियाचें निजभक्ष मागतात. अजी आज्ञा जालियां देवढीपासीं येऊन उभी राहातील हे विनंती.

¶*This is a mysterious letter, concealing the meaning in a literary conundrum.*

No. 33] [1741-61 ?

श्री

विशेष. सैदसादात व षेखसला पीर का। पुणे यांचे ताबूद मोहरमच्या महिनियांत फिरायाचा पूर्वी परस्परे कजिया होत होता. त्याजवरून तीर्थस्वरूप कैलासवासी आपा स्वामीनी का। मजकूरचे रहवासी याचे साक्षीने, मुलअयाम दस्तूर लेहून घेऊन निवाडा केला, यादी ती लिहून दिल्ही त्याप्रो। चालत असतां गुदस्ता षेखसलावालियानी सैद सादातवालियासी कजिया केला. परस्परे जंग होऊन जखमी जाहाले म्हणून विदित जाहाले. ऐशास तुम्ही तेथे असतां ज्यांचा अन्याय त्यास शिक्षा न केली. अपूर्व आहे. साल मजकुरी उभयता पिराकडील पिरजादियास बोलाऊन ताकीद करणे की, जो मार्ग आपा स्वामीनी करून दिल्हा त्याप्रो। उभयेतानी चालणे, त्यास अंतर जाहालियास पारपत्य होईल, ऐसे स्पष्ट सांगणे.

याजमध्ये कमबेज करणे असेल ते करून तुम्ही ल्याहावे अथवा आम्हापासी पाठवावे, त्याप्रो। लिहिले जाईल व जिवाजीपंतासहि येक पत्र या प्रो।.

¶*The paper refers to a dispute regarding the tazias of Said Sadat and Shaikh Salla of Poona.*

No. 34] [*King Shahu's regime.*

गजानन

सेवेसी आनंदराऊ सोमवंसी विज्ञापना यैसी जे. साहेबी कृपाळु होऊन पत्रे देविली पाहिजेत हे विज्ञाप्ति.

विठल सिवदेव यासी पत्र की, आनंदराऊ सोमवसी यासी खटखट करिता व त्याचे कलवातिनीस उपद्रव

मथुरा नायेकीन मनाजी गुणिजन यासी कौल की, तुम्ही आनंदराऊ सोमवंसी याजपासी आहा तैसी आसने

7455

करिता तर ते नायेकीन याजपासी पाच सात वर्षे आहे, तर तिसी तुम्हासी मतलब काये? याउपरी याचे कलत्रातिनीस उपद्रव न करणे. येविसी फिरोन बोभाट येऊ न देणे. याजपासी आहे तैसी आसेल म्हणऊन पत्र.

तुम्हासी कोन्ही उपद्रव करणार नाहीं. तुम्हासी कोन्ही उपद्रव करील त्यासी हुजुरून ताकीद केली जाईल. तुम्ही जैसी आहा तैसी आसने म्हणऊन पत्र येक.

दोनी पत्रें देणें.

¶*Anandrao Somvanshi requests King Shahu for an injunction against Vithal Shivdeo prohibiting him from harassing his (writer's) concubine by name Mathura.*

No. 35] *[1750-61?*

छ २७ जमादिलाखर

श्री

चिरंजीव राजश्री भाऊ यांसी बालाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. मौजे जानोरी पा दिंडोरी येथील पाटिलानी रामजी पा याची आई भुताळी म्हणोन मारली त्याजवरून पाटील मजकुरास पुण्यास आणून चोकसी केली. त्यास भोवर गावानीहि सागितले कीं ती भुताली खरी, परंतु पाटिलानी सरकारचे आज्ञेखेरीज मारिली. त्याची गुन्हेगारी करार करून रामजी पा याचा बेदावाहि करून दिल्हा व समजाविसीचाहि प्रकार केला होता. त्यास रामजीस कोणी फिताविले त्याजवरून रामजी तेथे लस्करात गेला आहे. येविसी राजश्री बालाजी माहादेव याणी पत्र लिहिले तेच पाठविले आहे. तरी रामजी मजकूर यास ताकीद करून गावचा गावी पाठऊन द्यावा. समजावीस निघाली आहे त्याप्रो समजावे. येणेप्रो करून पाठवावे. जानोरीचा हिसेब कितेब रा आपाजी अनंत याजकडे होता, तो बालाजी माहादेव याणी घेऊन लिहिले आहे. तेच पत्र पाठविले आहे, त्याजरून कलेल. रा छ २४ जमादिलाखर हे आसीर्वाद.

¶*This paper refers to a woman having been put to death by the Patils of Janori, they having suspected her of witchcraft.*

No. 36] [?

श्री

विनंती उपरी, बाजारांतील कलालाची दारू मना करणे म्हणोन लिहिले, त्याजवरून आज ताकीद करून भट्या मना करवितो. कळलें पाहिजे. हे विनंती.

¶*Orders are issued prohibiting sale and manufacture of liquor.*

No. 37] [28-3-1800

श्री

यादी गोटगस्ती विा आपाजी जनार्दन छ २ जिलकाद शुक्रवार. रामनवमीचे उछव सालाबादप्रो सालमजकुरी आहेत.

१ तुलसी बागात
१ मेरालपंत पेठ सुक्रवार
१ नरसिंगराव मांडवगणे
१ त्रिंबकराव आंबीकर निा फरासखाना
१ दिनकरराव देशपांडे पुणेकर
१ हिरोजीराव पाटणकर
१ बाजीराव पाटणकर पेठ नारायण
१ हैबतराव शंकर परभू
१ जनार्दन गोपाल लघाटे
१ कृष्णाजी नाईक थते
१ जयेरामबावा गोसावी रामदासी
१ मालोजी घोरपडे

१२

¶*This is a list of persons celebrating the Ramnavami festival at Poona.*

No. 38] [30-4-1772

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
याप्रति

आश्रित कुपाशास्त्री वास्तव्य उमामहेश्वर संनिध कुंभकोण आसीर्वाद विनंती उपरी. आम्ही वैद्यक पढलो नसतां करीत होतो. त्यास सरकारांतून आज्ञा

जाहाली जे, वैद्यक करू नये आणि कोणासहि औषध देऊ नये. हे गोष्ट आम्हास मान्य आहे. अत:पर कोणास औषध देऊ तरी सरकारचे (गु)न्हेगार. वैद्यक करणार नाही. मिति शके १६९४ नंदननाम संवत्सरे चैत्र कृष्ण त्रयोदसी.

उपरी[१] लिखितं यत्तत्सत्यमेव एतद्विषये शपथपूर्वको निश्चयोस्ति.

साक्षी

बालकृष्ण शास्त्री

जानार्दन शास्त्री गाडेगिल:

नृसिंह शास्त्री

काशीनाथ शास्त्री दिवेकर:

ज्योतिर्विन्महादेवांतर्वाणि

सहस्रबुध्युपाव्हय गोविंदभट गोचरोयमर्थ:

¶*Kupashastri of Umamaheshwar submits to the order of the Peshwa restraining him in the practice of the physician's profession as he had not studied the science of medicine. This shows that quackery in medicine was prohibited.*

No. 39]

श्री

राजश्रिया विराजित राजमा(न्य)
राजश्री नारो त्रिंबक तालुके जं-
जिरे विजयदुर्ग यांसी

प्रति रामशास्त्री आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लिहित गेले पाहिजे विशेष. गणेश विठल गोखले यांचा व बलमानी गोगटे याचा भुताचा कजिया होऊन हुजूर पुण्यास बलमानी गोगटे यांची मुलेमाणसे आणिली. त्यास उभयेताचे बंधू सरकारची पत्रे व कलमझाडे याची याद घेऊन गेले की, माहास्तानी ज्याग्रुतस्थले दाहा गावी पर माहाली देवाचे प्रसादी कलमझाडेप्रो पुसोन जो निवाडा होईल तो हुजूर लेहून पाठवणे म्हणौन सरकारची आज्ञा जाहाली असतां ते तुम्ही न करिता देवाचा प्रसाद न घेता भगताचे शब्दे पडथले करून बलमानी गोगटे याचा भाऊ अटकेत ठेविला म्हणौन वारंवार हुजूर बलमानी फिर्याद होतो. तरी हे न करिता पेशजी सरकारचे आज्ञेप्रमाणे सुभाचा कारकून व सिपाई देऊन उभयतांचे समक्ष परमाहाली ज्याग्रुतस्थानी कलमझाडेप्रो प्रसादी पुसोन निवडून लवकर रवाना करणे. वारंवार हुजूर

---

१ या पुढील मजकूर व साक्षी बालबोध असून त्या निरनिराळ्या वळणाच्या आहेत.

बोभाट आल्याने उतम नाही. बलमानीयाची मुलेमाणसे आजी साहा महिने श्रमी होतात. ब्राह्मण कुटुंबवछल आहे तरी लवकर निवडून हुजूर रवाना करणे.

[या पत्राच्या मागे खालील मजकूर आहे :]

[31-1-1761

यादी गिरमाजी लुमाजी उपनाम मुले जोसी काा सिनर याची दाईजण सौ राधाबाई ही अपुत्रिक होती. तिणे सती निघते समई आपले घर मनभट उपासनी याचे बाप बाबदेवभट यांसी दान दिल्हे. त्यास वृतीचे घर आम्हा दाइजाच्या समताविना जावयास दान घ्यावयास आव्हे नाही, म्हणून गिरमाजीचा व मनभट याचा कजिया होऊन मनसुफी हुजूर आली. त्यास कसबा मजकुरी बीनवारीस जागा सरकारातून देविली, तेथे गिरमाजी लुमाजी याणी घर बांधोन घावे, त्या घरात मनभट याणी नादावे, आणि हे घर या दाइजाच्या हवाला करावे. याप्राा हरदोजण सरकारातून करार होऊन समजले. त्याप्राा हरदो जणाकडे सरकारची नजर रुपये:

गिरमाजी लुमाजी मुले याजकडील रुा ७५	मनभट उपासनी २५

येकूण शंभर रुा सरकारात पोता पाठविले आहेत, जमा करून चिठी देवावी. छ २३ जाखर सुाा इहिदे सितैन मया आलफ.

¶*Two cases, one involving the practice of sorcery and the other the gift of a house by a woman, are decided in this paper addressed by Ramshastri to Naro Trimbak of Vijayadurga.*

No. 40] [?

श्री

तीर्थस्वरूप राजश्री तात्या वडिलांचे सेवेसी

अपत्य भागोजी पाटील वाळुज चेरणावर मस्तक ठेऊन साा दंडवत विज्ञापना. ताा छ १ रोखरपावेतो वडिलाचे असीरवादे करून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. अम्हाकडील वर्तमान तर श्रीसतश्रृंग देवी गडावरील, तेथे माघ वद्य चेतोर्दसीस मागील च्यार साहा घटका दिवस राहातानी अंगातोन आग्नीच्या ज्वाला निघोन शरीर कवच्यासुधा दग्ध जाहाले आणि रुधिराच्या धारा मस्तकातून पाचच्यार निघोन चेरणापरियंत वोघल आले. अराधी ब्राम्हण गडावर होते त्याणी ज्वाला पाहून धावले, तो देवीजवल अग्नि तो कोठे नाही. हे

आघटित चेरित्र पाहून अश्चिर्य भासले. ऐसी गोष्ट कधी जाली नव्हती म्हणीन पुज्यारी वगैरे बोलतात. काही संकटाखेरीज हा वेव्हार जाला नाही म्हणोन म्हणतात. नासिककर ब्राम्हण वगैरे अर्च्या करावयास आणविले आहेत. शेवेसी वर्तमान श्रृत व्हावे म्हणोन विनंती लिा आहे. व नासिककर ब्राम्हण वगैरे वृध वृध बोलतात की, लंकेस श्रीरामचंद्रजी जाऊन रावणाचा पराजये होणार तेव्हा श्रीकालिका देवीचे अंगातून रुधिर निघाले होते; पुढे रावणाचा पराजय जाला ऐसे पुराणांतरी आहे. शेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*A supernatural phenomenon, namely, the appearance of flames and streaks of blood from the idol of the Goddess Saptashringa, is reported in this letter by Bhagoji Patil, Walunj.*

No. 41] *[1761-72*

तालीक.

श्री

राजश्री हैबतराव निंबालकर

गोसावी यासी

ॐ सकलगुणालंकरण आखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जावे विशेष. पुणेकर सिंपी याचा व सासवडचा सिंपी याचा गंगाजी सरवंद्या सिंपी याचे गोतपतीविसी कजिया लागोन मनसुफी हुजूर पडली आहे. त्यास सासवडकर म्हणतात की, गंगाजी सरवद्या सिंपी याने पदरेपदर निरालियासी सोइरिका करून निरालियांत वर्तणूक पुणेकर सिंपी यानी निरालीयाकडील सोइरिकासुधा पुणियात गोतपत करून जातीत घेतला. परंतु याप्रमाणें निरालियासी पदरेपदर सोइरिका करून वर्तला असल्याची गोतपत करून जातीत घ्यावयाची चाल नाही. पुणेकर सिंपी यानी अनुचित केले आहे म्हणौन. त्याजवरून पुणियाचे सिंपी यास आणून पुरसीस करिता त्यानी निवेदन केले की, गंगाजीप्रमाणे निरालियांत पदरेपदर सोइरिका करून वर्तले, ऐसे सिंपी गोतपत करून जातीत घ्यावयाचा सिरस्ता आहे. बालोजी व गोदजी लालगा सिंपी याने मानवतात निरालियासी पदरेपदर सोइरिका केल्या आणि त्यात वर्तला त्याची गोतपत लिंगणूकर सिंपी यानी वरकड पेठाचे सिंपी यास कलोन केली आणि जातीत घेतला. त्याप्रो सुरलीत जातीत वर्तावे. याप्रमाणे जेथे लोलंग्याचे साइरिका जाल्या आसतील त्या पेठकरी याचे मुखे लिंगणूकराही खरे करून दिल्हे म्हणजे आम्ही गंगाजीस घेतला तो प्रमाण

याप्रो विदित करून कतबा लेहून दिल्हा. त्याप्रो सासवडकर सिंपीहि मान्य होऊन लेहून दिल्हे. त्याजरून दोघे सासवडकर सिंपी व दोघे पुणेकर सिंपी सरकारचे जासुद्रासमागमे रवाना केले आहेत. तरी लोलंगा मजकुरी निरालियात वर्तोन त्यासी सोइरिका केल्या होत्या, त्याची गोतपत तुम्ही केलीत आणि सुरलीत जातीत सोइरीक करून वर्तवितात की काय हा मजकूर लेहून पाठवणे. गोतपत जालियावर लोलंग्याच्या सोइरिका जेथे जाल्या असतील त्या पेठकरी याची व सासवड सिंपी याची रुजुवात करून लोलंगीयाणे पदरेपदर निरालियाची सोइरिका केल्या त्या सोइरिका सुधा लिगणूरकराही लोलंग्याची गोतपत केली हे वर्तमान दुसरे पेठकरी यास कलोन त्याणी लोलंगियासी सोइरिका केल्या थैसे जाले आहे की काये? हे त्या पेठकरी याचे मुखे खरे करून लेहून पाठवणे. रा छ १२ साबान. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa asks Haibatrao Nimbalkar to institute an inquiry into the dispute of two tailor families with regard to their marriage connections and report his finding on the questions offered for settlement. See No. 54.*

No. 42] [*8-2-1748*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील तागायेत छ १९ माहे सफरपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून या प्रांतीचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. विशेष. राजश्री आपजीराव खानवीलकर यांची बहीण वधू आहे. त्यास राजश्री नरसिंगराव घाटगे यांस देऊ केली आहे. माघ मासीं लग्न आहे. याजकरितां येथून निरोप घेऊन सेवेसी आले आहेत. लग्नास जावयाची आज्ञा स्वामीनी दिली पाहिजे. व राजश्री तुलाजी आंगरे यांसी सोइरीक जोरावारीने करणार होते. त्यासीं शरीरसंम(ध) हे कसे करितील? त्याणी बलात्कारे करून सोइरीक न्यावी हा अर्थ योजिला होता. याजकरितां मौजे खानावली(हू)न याचे कबिले व यांचे निसबतीचे कबिले वतनी गाव सोइरिकेचे कजियामुले टाकून घाटावर आले. त्यास सांप्रत राजश्री तुलाजी आंगरे हुजूर येतील त्यास याजविसी आज्ञा होऊन पूर्ववतप्रमाणे याची स्थापना वतनावर होये तो अर्थ करणार स्वाम समर्थ आहेत. कैलासवासी राव स्वामीनी यांस वचन दिल्हे होते कीं, राजापूर प्रांती पुरातन गाव इनाम व मोकासे

7461

असतील ते मनास आणून प्रसंगोचित पूर्ववतप्रमाणे करून दिल्हे जातील ऐसें वचन दिल्हें होतें. हे स्वामीचे पदरीं आहेत. स्थापना करणार स्वाम खावंद आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshao requests the Peshwa to grant leave to Apajirao Khanvilkar enabling him to proceed for the marriage of his sister whom he has betrothed to Narsingrao Ghatge. The writer further requests the Peshwa not to listen to the proposal of Tulaji Angria who wanted to marry the girl against the wish of her brother.*

No. 43] [*20-10-1758*

श्रीशंकर

यादी रुद्राक्षाचा अंगरखा गुा बोहरी सुा तिसा खमसेन मया व अलफ

नख्त खंडित रुो	कापड आख
८५	२०
पंच्यासी रुो देणे	वीस आख देणे

छ १७ सफर सन तिसा

चि * *

¶*Rupees 85 are paid as the price for a coat made of rudraksha beads probably for the Peshwa to wear.*

No. 44] [*12-9-1765?*

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री
रामशास्त्री बावा यांसी

प्रति समस्त ब्राम्हण उभयक्षेत्र श्रीकृष्णावेणीसंगम साष्टांग नमस्कार उपरी. येथील क्षेम तागाईत भाद्रपद बहुल द्वादशी जाणून स्वकीये लिहीत असिलें पाहिजे विशेष. कैलासवासी गमाजीबावा यांस सातारा देवाज्ञा जाहाली, त्यास दहनास श्रीतीरास घेऊन आले. दहन मंत्राग्नि करून जाहालें. तदोत्तर किनईहून राजश्री वासुदेवबावा व मोर फाटक आले. उत्तरकार्यास त्याणीं आरंभ करून कर्म चालीस मोर फाटक याणीं लाविलें. त्यास येजु शाखेचीं उत्तरकार्यें पूर्वी पासून आजिपर्यंत होत आलीं, परंतु कोणी कणिकेचे पिंड केले नाहींत आणि आजि हे क्रियेस कणिकेचे पिंड कां करितां म्हणून आम्ही उभयक्षेत्रींचे ब्राम्हणांनीं पाठक यांसी विचारिलें. तेव्हां मोर पाठक यांणीं उत्तर दिल्हें कीं, गमाजीबावा यांस मंत्राग्न परशाखोक्त केला, येदंनिमित्य कणिकेचे पिंड करणें लागले, आणि

कोणी विचारता होईल तर त्यास शास्त्रार्थहि समाजऊन देऊं. त्या वेळेस राजश्री मेरुराव श्रोत्री यांणीं मोर पाठक यास पुशिलें कीं, कैलासवासी रावदादा यांचे उत्तरकार्यें जाहालीं, त्या समयीं तुम्ही होता आणि वेदशास्त्रसंपन्न राजश्री वामन पाठक होते परंतु ते समयीं कणिकेचे पिंड जाहाले नाहींत. कैलासवासी आणाची स्त्री चिमणगावीं वारली तिचें उत्तरकार्य तेथेंच जालें; त्या वेळेस वेदमूर्ति राजश्री लक्षुमण पाठकजी होते तेव्हांहि कणिकेचे पिंड न जाहाले, आणि तुम्ही हा प्रकार आरंभून कणिकेचे पिंड करितां; बरे थोर आहां! तोच द्वेष चित्तांत धरून सातारियांतील व प्रांतींचे आपले शाखेचे ब्राह्मण मेळऊन संमत करून मेरुरायाशीं कज्या आरंभिला कीं, तुम्ही ऋग्वेदी ब्राह्मण यांस श्राद्धीं सांगतां तें न सांगावें, यांकडून रुद्राभिषेक न करवावा. ऐसा निश्चय कराल तर तुमचे घरास भोजनास येऊ, नाहीं तर येणार नाहीं. तेव्हां रायांनीं प्रतिउत्तर केलें कीं वडिलांपासून चालत आलें आहे ती चाल आमचे वस्तु मोडून नूतन चाल आपणांकडून घडणार नाहीं. पूर्वीं ऋग्वेदी ब्राह्मण श्राद्धास सांगतों व रुद्राभिषेकास सांगतों त्याप्रमाणें सांगू. यैसे ऐकोन मोर पाठक बहुत रुष्ट होऊन किनईस श्रीमंत भवानराव प्रतिनिधि यांकडे जाऊन वर्तमान निवेदन केलें. त्या समयीं त्यांचे घरीं लग्न होतें. तेव्हां आक्षेप श्रीमंतांसी केला कीं, उभयक्षेत्रींचे ब्राह्मण आले आहेत यांसी देकार न द्यावा आणि यांचे पंक्तीस भोजन करूं नये. तेव्हां श्रीमंतांहीं पाठकास उत्तर केलें कीं हे गोष्ट आम्हांस उचित नाहीं. त्यांस देकार देऊं आणि त्यांचे पंक्तीस आपण भोजन करूं. तुम्ही आग्रह करितां तर तुम्ही गेला तर पुरेल. ऐसें उत्तर ऐकोन पाठक रुष्ट होऊन गेले. च्यार दिवस लग्नांत नव्हते. मग बच्यंभट व आणखी चौघांहीं येजमानांस विनंती करून पाठक यास आणिलें. तेथें काहीं न चालिलें. मगहि इकडे येत्न करून पाहात होते, परंतु कोठें त्यांचे-सारिखें न चाले. याकरितां पुणियास जाऊन आपले शाखेचे ब्राह्मण यांस हें वृत्त निवेदन करून त्यांचे शाखेचे ब्राह्मणांचें पत्र पाठविलें आहे कीं तुम्हीं महद् अन्यायी आहां, तर पत्रदर्शनीं स्वार होऊन येणें. त्यावरून रावजी पुण्यास येणार आहेत. तेथें आल्याउपरी त्यांचे शाखेचे ब्राह्मणांचा व त्यांचा बोलीचा प्रसंग होईल. ऐशियास पाठकांहीं कणिकेचे पिंड करविले म्हणून आमचे उभये क्षेत्रांच्या संमतेंकरून त्यासी रायांनीं बोलीचा प्रसंग केला, यामुळें हा कलह प्राप्त जाहला आहे. यास्तव उभय क्षेत्रांस रायाचा अभिमान आहे. त्यास आपण तेथें प्रसंगीं आहेत, तर त्यांचे शाखेचे ब्राह्मण आहेत त्यास आपण बोलाऊन आणून विचारावें कीं, ऋग्वेदी ब्राह्मण यांणीं आपले घरीं अन्नग्रहण न करावें, आपण त्यांचे घरीं न करावें. ऐसा त्याचा निश्चय होत असेल तर करून

7463

श्रीमंतांचे विद्यमानें संमतपत्र करून देतील तें घ्यावें म्हणजे गोष्ट आम्हांस व रावजीस मान्य आहे. नाहीं तर लटकें कुपेंच करून रायास हारीस आणूं म्हणतील तर सर्व प्रकारें आपण रायाचा अभिमान धरून त्याचा शह प्राप्त न होय तो अर्थ केला पाहिजे. पत्राचें उत्तर पाठवणें, सर्वज्ञांप्रति विशेष काय लिहिणें हें नमस्कार.

¶*[Some discrepancy in the funeral ceremony of Gamajibawa is discussed in a memorandum addressed by the Brahmins of Mahuli to Ramshastri. Gamaji Yemaji Mutalik of Karad died in 1764.*

No. 45]

वतनपत्र समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री माधवराव पंडित प्रधान ता। नागोराम भागवत गोत्र कपि सूत्र अश्वलायन सु॥ सबैन मया व अलफ शके १६९१ विरोधी नाम संवत्सरे. तुम्ही हुजूरला कसबे पुणें येथील मुकामी विदित केले की आपण स्वामीशेवा एक निष्टपणें बहुत दिवस केली, त्यास स्वामीनी कृपाळु होऊन कसबे वामुरी ता। राहुरी पा। संगमनेर सरकार मजकूर येथें सदशिव पेठ नवी आपण श्रमसायास करून वसाहत केली. तेथील सेटेपणाचे वतन नूतन आपणास करार करून देऊन चालविले पा। म्हणोन, त्याजवरून मनास आणिता तुम्ही राज्यातील पुरातन सेवक यास्तव तुमचे चालवणे आवश्यक जाणून तुम्हावर कृपाळु होऊन कसबे मजकूर येथे सदशिव पेठ नवी तुम्ही श्रम सायास करून वसाहात केली तेथील सेटेपणाचे वतन नूतन मरकारातून तुम्हास करार करून देऊन वतन समधें हक दक मानपान बि तपसील.

कि॥

१ भुसार कैली हरजिन्नस
दर गोणीस दर गाड्यास
ll= ll॥·

— येणेप्रमाणें दर बैली निटवे व गाड्यास आधोली.

१ किराणा वजन पक्के हर जिनस
दर बैली वजन दर गाड्यास
ll॥· ll३॥

कि॥

१ तेली याजपासून
ll।· दर घाण्यास दर आठवड्यास पावशेर तेल्याचे मापे.
lll२। बिछायेती दुकानदार येतील त्यास व बाजारकरी याजपासून दर घाण्यास आठवड्यास.

१ चांभाराचे दर दुकानास जोडा एक दरसाल.

दर बैली अदसेर व गाड्यास साडे-
तीन सेर प्रों.

१ डाका घालील त्याजवळून नारळ
व विडा.

१ तांबोळी याजपासून दर बैली पान
सुमार १०० व दरदुकानास दर-
रोज सुमार १३ तेरा प्रो.

१ सेट्याचें दुकानास व घरास वेठबे-
गार व घालपटी नाहीं.

१ पाती शेट्याची.

१ माळवे सर्वे वजन पके.

ऽ। दर गाड्यास दाहा शेर
ऽऽ१ बैलास एक शेर
ऽऽ१ मेवा द्राक्ष वगैरे आणितील
त्यास दरबैली एक शेर प्रमाणे.
" निंबें वगैरे दर बैलास पंचवीस.
" मोकळी भाजी बचक
" आंबे दर बैलास दाहा.

---

१ पाट लागेल त्यास शेला विडा.

१ गोंधळास विडा, वाटी, ऊस, फुले.

१ बाजारचे वाणी याजपासून दर
आसामिस दर अठवडा सुपाऱ्या
सुमार दोन.

१ झेडेपटी वर्षाभऱ्या.

१ वैरणी विकावयास येईल त्याजपा-
सून पुले

१५ दर गाड्यास पंधरा.
५ काबाडास पाच.
१ वोझ्यास एक.

२१.

१ साली कोष्टी दर मागास दरसाल
पासोडीस नग ।।· निमे.

१ गुडाखुवाल्यापासून दर दुकाने
तंबाखु दोन चिलमे दर अठवड्यास

१ दुकानदार व पालकरीवाणी याज-
पासून दर आसामीस दर सणास
गूळ पावसेर.

१ पेठेतून भुसार भरून जातील त्यास
दर गोणीस रुके ऽ२ दोन.

१ धनगर दर दुकानास चवळे एक
वर्षाभऱ्हा.

"खाटकापासून दर आठवडा
दर आसामीस मास ऽऽ।· पावशेर.

१ पेठेंतील घर जागा व मिरासपत्रें
केल्यास सेट्याची साक्ष घालून दर
सेकडा रु. पाच शेल्याबद्दल.

१ दीपवाळीस वाणी उदमी याणे
दर आसामीस भेट रु. १ एक.

१ दंड फुरई शेट्याचे मारफतीनें
चुकवावी.

१ पेठेंत सेट्याचे आधोलीनें व धड्यानें
माप व्हावे.

१ बाहेरील वाणी उदमी येतील
त्याजपासून जीवन पाहून वासीला
घ्यावे.

१ सुत व रेशीम व कापड व जर-
मीना दर सेकडा ऽ= चवल.

१ जोगी राऊत याचे मागास नवार
वगैरे जिन्नस सेट्याचे घरास लागेल
तो त्याणी अंगमेहनत करून बिन-
मजुरी विणून घ्यावा.

---

1 A coarse blanket square and small.

१ पेठेतील मान.

१ पोळ्याचा बैल.
१ होळीची पोळी.
१ सणाचे वाजवणे.

१ लाकडे विकावयास आणतील त्याजपासून.

५ दर गाड्यास पांच.
१ दर मोळीस एक.
२ दर काबाडास दोन.

१ पाथरवटापासून जाते दर आसामीस वर्षभरा.

१ सरकारचा सीरपाव.

१ पेठेत जिन्नस विकावयास वाणी उदमी बिछायेती वगैरे येतात त्याचा निरख चौधे उदमी मिळून सेट्याचे मारफतीने करावा.

१ शेट्याचे घरचे गुरूढोर मरेल त्याचा चर्+सा शेट्याने घ्यावा.

१८ अठरा कलमें.

पेठेंत दुकानें दोन तुम्ही बांधिली आहेत ती सेटेपणाकडे दिल्ही असेत.

१ वारषिक जिन्नस पाहून घ्यावे.

१ खीस्ती व सराफ.
१ बोहरी.

२

सदरहू असामीपासून.

१ खत्री याजपासून शेला वर्षभरा एक सारे.

१ साळी मोमीन सारे याजपासून वर्षभरां पागोटे एक.

१ सारे हजाम वर्षभरा लुगडे एक.

१ नकाशावर दाखला शेट्याचा असावा, आकार होईल त्यास दर सेकडा रु. १ एक.

१ सलतनगार याणी शंभर सागली विकल्यास एक साग[१]ल घ्यावी.

१ गावकुसु दर असामीस चार गज मुकरर करून घ्यावे निमा शेट्याचा

१ अठरा दुा बारा बलुती याणी जीवन माफक कामगारी सिरस्तेप्रमाणें करावी.

२३

एकोन तेवीस कलमें.

येणे प्रमाणें हकदक मानपान व दुकाने दोंन वतनसमध्ये करार करून दिल्ही असेत, तरी शेटेपणाचे वतन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अनभऊन सुखरूप राहाणें.

¶*Peshwa Madhavrao fixes the claims of Nagoram Bhagwat for establishing a market place at Wamuri.*

१ बोकडाचें कातडें सं. छाग छागल. + कातडें.

7466

No. 46] [?

श्री४

पुरवनी साहेबाचे शेवेसी

जयेपुरी श्रावक लोकानी श्रीसदासिवाचे पिंडीस उपद्रव दिल्हा त्याजवरोन राजे-माधोसिंगजी यानी श्रावक लोकास बहुत उपद्रव देऊन पंधरा लक्ष रुपये दंड ठर-विले. बहुत सज्या दिल्ही. श्रुत जाले पाहिजे. साहेबाचे शेवेसी विज्ञाती.

¶*Raje Madhosing punishes the Jains with a fine of 15 lakhs of rupees for defiling the idol of Sadashiva.*

No. 47] [?

श्रीप्रो

दखनचा दिवा मालवला: हिरा हारपला कसा गुपित घाला केला रावसाहेबाला: येक छेत्र करून गेले मांधवराव थरथरां कांपत होते यासि उमराव बसविले हस्त-नापुरी बाछाव दादांसी मोकले राज करावे तुटली आउक्षाची दोरी नाही उपाव मरतेसंमई बोलविले नारायणराव: चाल: दादासि मिळुन आसावे द्वैत मनि नसावे येकछत्री राज करावे असे फार फार विनिविले राव दादांला नारायणराव तुमचे वोटीत घातला १ राव गेले सातार्‍यासी राज्यापासी सिके रोखे वस्त्रे दिल्हे नारायनरायासी आले वाजवित चववडे शेहर पुण्यासी कूच करून लौकर गेले नाशकासी बाइची बुद्धि ऐकुनि निमित्य त्यासी मग ठेऊन जती केलि फार दाद्रासी थोर केली बदोबस्ती देतिं घस्तीवरते घस्ती पुल बाधून करून वेवस्ती नकस काम लाविले हुकुम जाले पुढे कोट बांधणार होते शेहर पुण्याला २.

¶*A contemporary copy of the Ballad of the murder of Narayanrao. Unfortunately it gives the first two stanzas only. It, however, gives some new readings and hence will be useful to students of ballad poetry.*

No. 48] [?

नकल

श्री

श्रीमंत सर्वज्ञतम राजश्री बाबा-

साहेब यांजप्रति

शुभेछुक कृष्णशास्त्री नासीककर यांचे आनेक असीर्वाद उपरी. येथील वृत तागाईत पौष वा। १३ परियंत आपले कृपेकरून सुखरूप असो। विशेष. आपल्यास

रविसक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले आहेत. स्वीकार करून प्रविष्ट जाल्याचे उतर आले पाहिजे. नंतर क्षेत्री मैत्राणी यांचा आन्नवेव्हार वगैरे पूर्वीपासून सांप्रदाय कसा चालत अला आहे याचे वृत सरकारांत लिहून आणविले आहे म्हणोन कमाविसदार याणि समजाविले. त्यास हे क्षेत्र चौ युगाचे येथे व आन्यंत्र श्रीवाराणसी क्षेत्रप्रभृता रामेश्वर परियंत द्वापार युगापासून आन्नवेव्हार नाही ऐसे असता क्षेत्री वेदमूर्ति राजश्री रामभट दादा घारपुरे व नारायेणभट इयांटे या उभयतानी सांप्रत आन्नवेव्हार आरंभिला आहे. यास काय विशेष शास्त्र आढळले असेल ते असो. परंतु रूढि सर्वत्र ऐसी नाही. बहुत काये लिहिणे हे[१] आशीर्वाद.

¶*Krishna Shastri Nasikkar gives his opinion with regard to the question of interdining with the Maitranis.*

No. 49] [*7-2-1776?*

श्री

विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. राजश्री माहादजी शिंदे याचा मानस मराठे मातबर घरंदाज यासी गोतपत करावी व तनपुरे पाटील राहुरीकर याची कन्या मागतात. त्याणे मूल पलविली. त्याचे घरी चौकी बसविली आहे. मराठे सरदार रोज येऊन ये विसीचे काय ते आम्हास सांगा म्हणतात. येवि-सीचा मार लिहिला तो कलला. त्यास हा प्रकार सरकारातून व्हावयाचा नाही. राजीमंताचा प्रकार ज्याचा त्याचा आहे. बलात्कारे होणार नाही. तुम्ही लोकास समजाऊन सागितले, उतम आहे. खातरजमा * * तनपुरे याचे घरी चौकी बसविली आहे त्याविसी व लोकास पत्रे येतात येविसी त्यास वाईट न वाटे गोड दिसे असा प्रकार करितो. तुम्ही लौकर कूच करून जावे म्हणजे गोतपत सहजच राहिली. रा छ १६ जिल्हेज हे[+] विनंती.

¶*Sakharam Bapu (probably) to Haripant Phadke in the matter of Mahadji Sinde desiring to have matrimonial alliance with high-born Maratha families.*

No. 50] [*1-10-1777*

श्री

प्रभुवर्य श्रीमंत राजश्री रावसाहेब यांसी प्रति रामशास्त्री आसीर्वाद विनंती. तागाईत छ २८ साबानपावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. सदाशिवभट

---

१ या पुढील मजकूर बाळबोधींत आहे. नकल तत्कालीन. + 'हे विनंती' हे शब्द सखाराम बापूंच्या हातचे आहेत यावरून सदर पत्र बापूनें हरिपंतास (?) लिहिलें आहेसें दिसतें.

सिंत्रे गुदस्तां तोतयाकडे जाऊन श्राधाचें अभिश्रवण करून त्याचें पंगतीसहि बसले. परंतु याचा विचार पाहातां, हे वैदिक भोले; राजकी व्यव्हार यांस ठाऊक नाहीं, यामुले ही गोस्ट त्याजला घडली. यैशास, ब्राम्हण वैदिक उतम बहुत दिवस श्रमी जाले. त्याचे प्रायश्चिताविसी चिंचवडच्या देवाचे पत्र हुजूर आले. हुजरून मंत्र्युत्तम राजश्री नानाकडे पाठविलें. ते पाहून मुंडणादि पूर्वांग उत्तरांगसहित च्यांद्रायणे च्यार, येकून प्राज्यापत्ये बत्तीस, दर प्राज्यापत्ती येकसहस्त्र, तिल होम प्राो बत्तीस सहस्त्र तिल होम ब्राम्हणद्वारा करावा, याप्राो यादी मंत्र्युत्तम राजश्री नानाकडे पाठविली. त्यांचेहि विचारास आली. त्यावरून सदरहूप्राो प्रायश्चित्त त्यांजकडून करऊन शुध्ध करावे म्हणोन चिंचवडच्या देवास सरकारचे पत्र पाठविले आहे. श्रुत होये+ हे विनंती.

¶*This letter refers to a learned Brahmin who is to be purified, by the performance of certain religious rites, from the social pollution which he suffered on account of his having dined with the pretender of Sadashivrao Bhau.*

No. 51] [*15-3-1780*]

श्री

आज्ञापत्र राजश्री पंत प्रधान ताा लालखान व मलिकखान व पीरखान व दाऊदखान व लाला वस्ती मौजे देवठाण परगणे सिरसाले सुाा इहिदे तिसैन मया व अलफ. राव्रू वगैरे चारेण[१] याणी तुम्हांपासून कुलबिणी म्हणोन खरिदी करून, ताज्या बराबर कोकणांत पेणचे बंदरीं नेऊन, ब्राह्मणास वगैरे लोकास विकीत होते; परंतु त्या गर्ती बायका असें पेणचे जकाते यास व हुजूरचे गाडदी तेथें होते त्यांस कळलें. त्याजवरून त्याणी बायका व चारण यास सरकारांत आणून हवालीं केल्या. त्याची चौकसी करितां बायकाचे जबानींत लिहिलें घडलें कीं आम्हांस चारणानी फिताऊन नेलें, आणि विकीत होते. त्याजवरून चारणास पुसतां त्याणी लेहून दिल्हें कीं आम्हीं लालखान व मलिकखान वगैरे देवठाणकर याजपासून खरीदी केल्या आहेत ते दाखऊन देतों; म्हणोन त्याजवरून हे आज्ञापत्र सादर केलें असे; तरी येविसीची चौकसी करावी लागते. सबब दलाईत आसामी २ दोन पाठविले आहेत, याजबराबर देखत आज्ञापत्र हुजूर येणे. जाणीजे छ ७ रबिलावल आज्ञाप्रमाण.

¶*The Peshwa issues summons to Lalkhan and others of Deothan to appear before him in connection with a case of sale of some females as slaves who were respectable married women fraudulently enticed away from their homes.*

+ येथून पुढील अक्षर बालबोधींत रामशास्त्र्यांचे हातचें. १ धान्य, मीठ वाहून नेणारे लोक.

7469

No. 52] [16-6-1780

श्रीयोगेश्वरी

वेदशास्त्रसंपन्न राजसभास्तंभि-
भूत राजेश्री रामशास्त्रीबावा या प्रति

समस्त ब्राह्मण क्षेत्र अंबजोगाई नमस्कार विनंति उपरि. आपण राजेश्री सदाशिव नागनाथ याचे कन्येचे विवाहविषई अंम्हास पत्र लिहिल किं, वेदमूर्ति शेषभट व विठ्ठलभट या उभयतास श्रीयोगेश्वरीचे देवालयांत घालून शपथपूर्वक त्यांपासून लेहून घेऊन पत्र पाठवण. त्यावऱ्हुण अंम्ही समत ब्राह्मण व राजेश्री व्यकटराव निसबत सरकार मिळून उभयता मशारनुलेस श्रीयोगेश्वरीचे सान्निध नेउन सदाशिव नागनाथ यांचे पुत्र व त्यांचे गोत्रज लक्ष्मणपंत पाथरकर मिळून श्रीचा अंगारा व पुष्पें त्या उभयताचे मस्तकि घालुन विवाहसंबंधि वर्तमान पुसलें. त्यास त्या उभयता ब्राह्मणानि अंम्हा क्षेत्र मजकूर ब्राह्मणास लेहून दिधल त्याच पत्राचा मजकुर लिहिला तो या प्रमाणें: समस्त ब्राह्मण क्षेत्र कसबे अंबजोगाई स्वामिचे सेवेसि शेषभट उपाध्ये व विठ्ठलभट्ट कसबे मजकुर विज्ञापना ऐसिजे. वेदशास्त्रसंपन्न राजेश्री रामशास्त्री व श्रीमंत पंतप्रधान यांची पत्रें सदाशिवपंत पाथरकर यांचे कन्येचे लग्नाचे उद्येशे तुम्हा ब्राह्मणास अलि त्यावऱ्हुण सरकारचे कारकूण व समस्त ब्राह्मण मिळून अंम्हा उभयतास देविचे देवालयांत घालून शपथपूर्वक पुसल व सदाशिवपंताचा पुत्र व लक्ष्मणपंत पाथरकर यानि देविचा अंगारा पुष्पें आपले मस्तकि ठेविलि त्या वऱ्हुण अंम्ही अपले सत्यसुकृत बोलिलो किं अनंतगावि पाथरकर मजकुर याचे कन्येचे लग्न अपणास ठाऊक नसता नारो बावाजि यान अंम्हा उभयतास फलशोभन आहे म्हणुन बोलाउन अनंतगावास नेले तेथ अपणादेखता सरकारचे प्यादे याचे हति मुलिस उचलुन पाटलाचे घरास नेल. अंम्हासहि प्यादे यांचे हत धकाबुकि करूण बलात्कार नेल. लग्न लावा म्हणो लागले. त्यांस लग्न समय नाहि ऐस अंम्हि बोलिलो अस्ता बलेकडोन लावा ऐसे म्हणितले. त्यास वधुवरें अस्नात असता देवप्रतिष्ठा व नादिश्राद्ध कन्यादान न कर्ता गणपतिपूजन करूण उदकेकडोन मधुपर्क केवल केला. विवाहलग्न मंगलाष्टक म्हणोन लाविले. सवेच विवाहहोम व ग्रहप्रवेशनि होम लाजादि साहित्य रहित केला करूण साडे केले. अंम्ही वधुपक्षिच कोण्हि नहीत. लग्न साडे सर्व कर्म सहा घटिकेत उर्किल. हे जाहाल वर्तमान श्रीयोगेश्वरी व समस्त ब्राह्मण राजेश्री व्यंकटराव यांचे साक्षीण अपल सत्यसुकृत स्मरोण सांगोन हेच पत्रारूढ करूण हे पत्र लिहून दिधल असे. हे शेषभट उपाध्ये व विठ्ठलभट सदरहु लिहिल. सहि विकलं लक्ष्मण भट डुबर्गे शके १७०२ शार्वरिनाम

संवत्सरे ज्येष्ट शुद्ध १२ अपल्या लिहिल्याप्रमाणें लिहिल असे. या पत्रापूर्वि श्रीमंत पंतप्रधान यांचा नावें शेषभट यांचे बोलिल्याप्रमाणें पत्र एक व जमेदाराचा नावे शेषभट व विठलभट यानि लेहुन दिधल पत्र[१] एक, ऐसि दोन पत्रें तेथें आलि. त्याउपरी शोध करूण हे पत्र लिहिल असे. श्रुत होईल. विशेष काय लिहिन हे विनंति

शके १७०२ ज्येष्ट शुद्ध १५
समस्त ब्राह्मणाचि साक्ष.

गोविंदभट उपाध्ये देव.
साक्ष माणिकभट व्यास
सोयरंभट जोषि कास्यप गोत्रि
अमणभट जोसि भारद्वाज गोत्री पत्र प्रमाण साक्षे लक्ष्मण दिगबर जोसी
सदासीवभट जोसी भारद्वाज गोत्री
साक्ष राजेश्व(र) पाठक
साक्ष गोपाल पाठक
रामभट जोसी
लक्ष्मण जोसि भारद्वाज गोत्री
सोयरंभट जोसि भारद्वज गोत्री लक्ष्मणभट डुबगे जोसि
गोपाळभट्ट शकुने
घनश्यामभट जोसि
बाळंभट जोसि. का.
पत्राप्रमाण साक्ष देवभट जो.
सारंगधर घनवटे
उमाभट जोसि का
कृष्णशाम गोसावी.

साक्ष विश्वंभर गोस्वामि देवालयांत उभयता बोलिले सदरहुप्रा त्यास साक्षी आपा गोस्वामी
अंनताचार्ये साक्ष गुरू गोसावि शेषभट अंबेकर
वसुदेवाचार्यें अंबकर
संमत आचार्य नारायणस्य संमत मुद्गल कऱ्हाडि
संमतमिदं यदुपति आचार्यस्य गदाधर अंबेकर
नारायणभट पिंगळे
नरसोबा कऱ्हाडीकर
रामचंद्र कऱ्हाडीकर
केशवभट कुर्म
वासुदेव दामोषण
वरंभट पिंगले
काशिभट्ट पिंगले
साक्ष विसोबा गोसावि शकुने
साक्षि नागोबा अयाचित

¶*The Brahmins of Ambejogai submit an affidavit of two Brahmins Sheshabhat and Vithalbhat in which they deny on oath that the marriage of the daughter of Sadashiv Nagnath was performed by them according to religious rites.*

---

१ सबंध पत्र बालबोधींत असून साक्षीदाराच्या सह्या निरनिराळ्या वळणाच्या आहेत.

No. 53] [19-11-1780

नकल

श्री

यादी सदासिव नागनाथ याणी हुजूर विदित केले की, मौजे अनंतगाव प्रा आंबेजोगाई येथे आपण कुटुंबसुधा राहात असतां सिंव्हस्तविधीस गंगेस गेलो. घरी कुटुंब व कन्या वधू होती. त्यास केसो बावाजी कुलकर्णी मौजे मजकूर याणें दाहा प्यादे व शेषभट उपाध्ये व विठलभट जोसी कसबे मजकूरचे येसे अनंतगावास अस्तमानी आणून आपले घरी मारामार करून जबरदस्तीने मूल उचलून पाटलाचे वाडियात नेऊन श्नान. मधुपर्क देवकप्रतिष्टा नांदीश्राध सप्तपदी इत्यादिक काहीच विधि न करितां मंगलाष्टकें म्हणून मंगलसूत्र बांधून चव घटिकांत मूल सोडून दिल्ही. ते दिवसी पाटलाचे घरी सुतक होतें म्हणौन. त्याजवरून केसो बावाजीस मसाला करून आणावा तो तोच पुणियास आला होता. त्याचा पता सदासिव नागनाथ याणे लाऊन सरकारांत विनंती केली. त्याजवरून केसो बावाजीस धरून आणून पुरसीस करितां त्याणें सांगितलें कीं, सदासिव माहादेव गडबोले कमावीसदार याणी आपलेबराबर प्यादे व ब्राह्मण देऊन लग्न केलें. त्याजवरून केसो बावाजीस कैदेत ठेविला. आनंतर त्याणें आपला आप्त जमिदाराकडे पाठविला. तेथे शेषभट व विठलभट याणी जमिदारास लिहून दिल्हे कीं, लग्न विधिपूर्वक जालें. त्या पत्रावर साक्षी पंचवीस आहेत. तें पत्र दाखल्यास केसो बावाजी याणें आणिलें. त्याजउपरी सदासिव नागनाथ याणे समस्त ब्राह्मणाचे नावें येकूण चालीस आसामीचे समतीचें पत्र सरकारांत आणिलें कीं, लग्न विधिपूर्वक झालें नाहीं. जेथें लग्न करावयास गेलें तें घर शूद्राचें, सुतकी होतें म्हणून लिहिलें व तुम्हा समस्त ब्राह्मणास सरकारचें पत्र गेलें होतें त्याचे उतर पसतीस ब्राह्मणाचे समतीचें आले की, शेषभट व विठलभट या दोघांस श्रीयोगेश्वरीचे देवालई व्यंकटराव निसबत नवाब जोरावारजंग यांचे गुजारतीनें शपथ घालून पुसतां त्याणी लिहून दिल्हे कीं, लग्न समय नव्हता व वधुवरांस श्नान नसतां देवकप्रतिष्टा, नांदीश्राध्ध, कन्यादान न करितां मंगलाष्टकें म्हणून मंगलसूत्र बांधून मूल सोडून दिल्ही म्हणून साक्षीपूर्वक तुम्ही लिहिलें. त्यावरून

7472

पाहातां विध्युक्त लग्न जालें नाहीं असें सिध होऊन हे पत्र लिहिलें असें. तरी सदासिव नागनाथ वर योजील त्यासी लग्न विध्युक्त करावें म्हणून पत्रें :

१ समस्त ब्राह्मण क्षेत्र आंबेजोगाई

१ जोरावरजंग जागीरदार दिा नवाब निजाआलीखान

—

२

१ सदासिव नागनाथ याचे नावे की, तुझे कन्येचे लग्न यथाविधि जालें नाही म्हणून समस्त ब्राह्मण क्षेत्र. आंबेजोगाई याचे पत्र आलें त्यावरून हे पत्र सादर केले असे. तरी वर योजून मुलीचें लग्न करणे म्हणौन, वरील अन्वयें.

—

३

सदरहू आन्वये तीन पत्रें संमत

छ २१ जिलकाद सुाा इहिदे

समानीन कार्तिक मांस.

¶*The Peshwa issues authority to Sadashiv Nagnath to revoke the first marriage of his daughter as it was not performed according to strict religious injunctions and to celebrate again the marriage of his daughter with a fresh bridegroom of his choice.*

No. 54] [?

तालीक

श्री

श्रीमंत प्रभुवर्य राजश्री

रावसाहेब यासी,

प्रति रामशास्त्री आसीर्वाद विनंती. ताा छ १२ जिल्हेजपावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष. पत्र पाठविले ते प्रविस्ट जाहालें. सासवडकर सिंपी व पुणेकर सिपी याचा जातीचा कजिया आहे त्याचा फडशा जाहाला नसता गंगाजी सरवद्या सिंपी चांगले सिंप्यासी सोइरीक करितो, लग्न होते, म्हणून कलले. तरी गंगाजीचे लग्न होऊ न द्यावे म्हणोन आज्ञा त्यास, आज्ञेप्रो येविसीचा बंदोबस्त केला. श्रृत होय हे विनंती.

सदरहूप्रो जाब निंबाजी गाडे खिजमतगार सरकार याजवल दिल्हा असे व सरकारचे पत्रहि याणेच आणिले.

¶*Ramashastri executes an injunction of the Peshwa in a case of the tailors' dispute awaiting decision. See No. 41 above.*

No. 55] [13-3-1782

नकल

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री पाठकजी यांसी

विनंती उपरी. जिवाजी नारायेण अडगरे कुलकर्णी कसबे बावडे प्रो इंदापूर याचें बोलणें कीं, आपले आजे भगवंत तुकदेव यास पुत्र लक्ष्मणपंत व नारोपंत. या उभयतांचे मातुल गोपाळ सिवाजी बोकील जमदग्नि वत्सगोत्री पंचप्रवरी यास लक्ष्मणपंत भाचे दत्तक दत्तविधान करून दिल्हे असतां त्याच गोत्रीं आनंदराव लक्ष्मण याणी शरीरसंबंध केले म्हणोन त्याविसी आनंदराव लक्ष्मण याचा व जिवाजी नारायेण अडगरे याचा कजिया लागोन मनसुबी हुजूर पडली आहे. त्याची चौकसी होऊन फडशा न होता आनंदराव लक्ष्मण याने गैरवाका समजाऊन आपले मुलीचे लग्न करण्याविसी परवानगी घेतली आणि ते मूल बावाजी मल्हार तटू जमदग्नि वत्स गोत्री याचे बंधूस देऊन लग्न केले. सबब जिवाजी नारायेण याने फिर्याद केली. त्यावरून उभयतांचे कजियाची चौकशी होऊन फडशा होये तोंपर्यंत तुम्ही कोणासी शरीरसंबंध न करणे म्हणोन गुदस्तां बावाजी मल्हार तटू यास ताकीद केली. यास्तव तैसेंच आजपर्यंत राहिले आहेत. त्यास हाली बावाजी मल्हार तटू याणी विनंती केली कीं आपल्या मुली उपवर जाल्या, त्यांची लग्नें करावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणोन. त्यास उभयतां अडगरे याचे कज्याचा फडशा सत्वर होत नाहीं. परंतु मुली उपवर जाल्या त्यांची लग्ने केलीच पाहिजेत, येविसींचा शास्त्रार्थ मनास आणून मुलींचीं लग्ने कोणी करावी किंवा न करावी हे लिहून पाठवावें. सुा इसने समानीन मया व अलफ छ १९ जावल.

¶*The marriages of the daughters of one Bawaji Malhar Tatu were prohibited by order of the Government as his brother happened to be married to a girl of the same Gotra and the case came before the justice of the place. A request is made by Bawaji Malhar that he could no longer postpone the marriages of his girls and that he be allowed to perform them.*

No. 56] [9-9-1781

नकल.

श्री

वेदमूर्ति राजश्री बाळंभट

साळवेकर क्षेत्र वांई यांसी

प्रति रामशास्त्री नमस्कार विनंती उपरी. गंगाधर सोवनी हा सखाराम केशव निसबत तोतया याकडेस गेला व त्याजवळ शागीर्दीस राहोन महिनाभर त्याचे

पंक्तीस भोजन केलें. यास्तव त्यास प्रायश्चित चांद्रायण नेमून येथे पंचगव्य देऊन पादचाली कृष्णा स्नानास पाठविला आहे. तरी कृष्णा स्नान व दाहा सहस्र गायत्री जप व ब्राह्मणभोजन करऊन शुध्ध करावा. रा छ २० रमजान सुा इसने समानीन मया व अलफ. बहुत काय लिहिणे ?

¶*Penance is prescribed to one Gangadhar Sovani for having dined with the Pretender.*

No. 57] [*1777*

नकल बालंभट सालवेकर

श्री

यादी गंगाधर सोवनी हा सखाराम केशव निस्बत तोतया याकडेस गेला व त्याजवल शागिर्दीस राहोन महिनाभर त्याचें पंक्तीस भोजन केला. यास्तव त्यास प्रायश्चित्त चांद्रायण नेमून येथें पंचगव्य देवून पादचारी कृष्णास्नानास पाठविला आहे; तर कृष्णास्नान, दाहा सहस्र गायत्री जप व ब्राह्मणभोजन करून शुद्ध करावा.

¶*Penance is enjoined in the case of Gangadhar Sohoni for dining with the Pretender of Sadashivrao Bhau.*

No. 58] [?

पाो छ २४ रजब.

श्रीगणराज

राजश्री कृष्णाजीपंत दिवाणजी साा नाा विनंती उपरी. कागीनेल्या प्राती ब्राम्हणाची बायको लस्करांत आली ती आठ दाहा दिवस लस्करांत मराठ्याचे राहुटीस होती. मराठ्याचे घरची भाकर घेऊन येक दिवस खाली, याप्रमाणे येथें वडिली सांगितले. त्यास ब्राम्हणाची तिचें माहेर देवगिरीस आहे यास्तव हली तुम्हाकडे पाठविली आहे ; तरी बाहेर हिला कोणाचे घरी दोन दिवस ठेऊन निराले जेवावयास द्यावे आणि हिचा सासरा व बाप कोठे आहे त्यास लिा पाा त्यास आणऊन त्याचे हवाली करावी. पुढे याप्राो होऊ नये असे सागावे. हिला हाली राा राघोपंत मामास सागून त्याजकडील दोन माणसे देऊन पाा आहे, राा छ २३ रजब हे विनंती.

¶*Parsharam Ramchandra Patwardhan writes to Krishnajipant that a certain Brahmin woman was discovered in the camp, who lived in the hut of a Maratha and ate bread offered by him. The addresee is asked to find out her relations and entrust the woman to them.*

No. 59] [1788

पुणें जमाव रु. नं. ७७६

कागद नं. 56078

श्रीमंत रा पंतप्रधान साहेबाचे सेवेसी

ꣿ आज्ञाधारक देशमुख व देशपांडे पाा इंदापूर दंडवत आा साा नाा विाा यैसीजे. मौजे वडेपुरी पाा मजकूर येथील पाटीलकी देवकर करीत आहे. देवकरासी नरसोजी नाईक नवरा कजिया करीत आहे की मौजे मजकूरची पाटीलकी आपली आहे म्हणोन हरदोजणाचा कजिया हुजूर पडला आहे. त्याजवरून साहेबी आज्ञा केली की पूर्वील पाटीलकीचा मजकूर कैसा आहे तो सांगणे म्हणोन आज्ञा केली. त्यास मौजे मजकूरची पाटीलकी नाथ नाईक नवरा याची आहे त्यास नाथाने समाध घेतली. याजवर तान्हाजी पाा नाईक नवरा गावावर होता, तो पाटीलकीचे वतन सोडून गेला. मौजे मजकूरी नाईक नवरियाचे कोन्ही राहिले नाही, आणि त्याची निसबतहि कोन्ही गावावर नाही. तेथे वेतनसंबंध जमेदाराचा आहे. म्हणौन रामाजी व बाजी देवकर पाटीलकीवर उभे राहून पाटिलकी करू लागले. रताजी व त्याचा लेक सिवाजी व बाजी देवकर याणे मौजे मजकुरची पाटिलकी निर्वेध केली. त्याचे दाखले पाा माारी महजर जाहले आहेत त्या महजरावर रताजी व बाजी देवकराचे दाखले आहेत ते दाखले लिहिले असत.

१ शके १५७७ मनमथनाम संवत्सरे मौजे पलसदेव येथील कुलकर्णाचा महजर जाहला आहे त्याजवर बाजी देवकर मोकदम मौजे वडेपुरी यैसा दाखला आहे. कारकीर्द माहाराज राजश्री सिवा(जी) राजेसाहेब.

१ कसबे बावडे येथील पाटील भाऊ भाऊ भांडले होते, त्याचा महजर जाला आहे त्याजवर दाखला देवकर पाा मोकदम वडेपुरी यैसा आहे. कारकीर्द उमाजी संभाजी राजे भोसले, सुरू इसने सितैन

१ शके १६०७ क्रोधीनाम संवत्सरे हणमंतराव.

No. 60] [?

श्री

पत्रे निाा नारो मोरेश्वर :—

जनार्दनपंत यांस पत्र की, रामाजी आनंत यांची कन्या माारनिलेच्या पुत्रास द्यावी, गोत्र घटित पाहून निश्चये करोन लग्ने देखील काढिली, यैसें असतां गिरमाजी

शंकर व लक्षुमण दामोदर याणी इसकील काढिली कीं पूर्वी शरीरसंमंध याचा जाला तो सप्रवरी आहे. यासी सरीरसंमंध न करणे. यैसी इसकील काढोन शरीरसंमंध मोडिला. तरी यांचे मनास आणून सप्रवराचा दोष यांजकडे नसिला तरी त्यास ताकीद करोन याची सोयेरीक यांजकडे देवणे. आणि हरदोजणास आणून फजीत करणें की, यैश्या गोष्टी करावयासी प्रयोजन काये आहे? तरी याची तहकीक करोन विल्हे लावणे. येकगोत्री याचा शरीरसंबंध जाला यैसे ते म्हणतात. तरी मनास आणून यांजकडे दोष न लागे तरी सोयेरीक देवणे १

सदरहू प्रा गोविंदपंतास पत्र.

¶Orders are issued to Naro Moreshwar and Govindpant that the objections raised by Girmaji Shankar and Lakshman Damodar to the marriage of Ramaji Anant's daughter be carefully examined and the ceremony be allowed to proceed, should the objections prove false.

No. 61] [?

नकल

श्री

स्वस्ति श्रीमन्निखिलवसुधामूर्धावतंस श्रीकृष्णातीरस्थलीभयेतविराजित समस्त-ब्राम्हणसमुदायेणानां सकलगुणकृपापारंगत राजेश्री गोविंदपंत नाना प्रभुवर्य सिरोमणि प्रति अनेक असीर्वाद उपरी. येथील क्षेम येथापूर्व असे. यानंतरी राजश्री राजोबा डांगे पंढरपूरकर याची स्नुषा माहेरास वडगांवास आली होती. तेथ बापू पाठक पुराणिक याच्या पुत्राने तिसी विभिच्यार कर्म करून तीस गर्भधारन जाले. हे वर्तमान तिच्या भर्तारास विदित जाले तेव्हां आपले स्त्रीस पुसिले की, हा गर्भ कोण्हापासून निर्माण जाला. तिने नामग्रहण बापूभटाचे पुत्राचें घेतलें. येसे श्रवण करून तिचा भर्तार बापूभटापासी जाऊन बोलला कीं, तुमच्या पुत्रानें माझी स्त्री भ्रष्ट केली, मी या स्त्रीचा त्याग करितो, माझे लग्न करा. तेव्हा लोकापवादास्तव गुप्तरुपे रुपये आठशत राजोबाचे पुत्रास दिल्हे लग्नानिमित्य. तदनंतर दैवात् जारिणी गर्भवती स्त्री मारिली किंवा आपमृत्याने मेली हे सर्व ईश्वर जाणे. हें कृत्य मृत्युपर्यंत झालियावरी बापूभट व त्याचे पुत्रानी राजोबाचे पुत्रास निग्रहत्राटणबंधन योगादि करून रुपये ते द्यावे हा उपाय केला. परंतु रुपये न येत येसे जाणून कर्जरोखा लिहून घेऊन ठेऊन ते समई सोडून दिले. पुनरपि राजोबाचे पुत्राची गांठ न पडे येस जाले. मग मार्गी संधि साधून उभयेता पुत्रास नेऊन कोंडोन ठेवलें. हें वर्ष येक झालें. ते उभयेता

मृत्य पावले की गडकिल्यावर घातले न कले. राजोबा वडगावास बापू पाठक याजकडे जातो. पुत्रांचे वर्तमान पुसतो. बापू पाठक उतर देतो, आम्हास कांही विदित नाही. हे कृत्य श्री उभयतीरी समस्त ब्राह्मणास विदित आहे. बहिस्कृत करावे तर सर्व द्रव्याश्रित राज्यसेवक. ब्राह्मणास ब्राह्मण्यविचार नाहीं, आपण धर्मपरायेण ; राजोबा अनाथ, याचे पुत्राची मुक्तता होये, बापू पाठकास धर्मशास्त्रोक्त सिक्षा कीं, गर्भिणीवध आणि ब्राह्मणनिग्रह हे माहाप्रायेश्चित्तसमयेस माधवमिताक्षरी हेमाद्रिनिबध्धमतेकरून घडेल. येतद्विषई विज्ञापनापत्र लिहिले ते अक्षरशा अवलोकन करून राजोबास संकटातून काढावे. विशेष सुज्ञशिरोमणि प्रति काये लिहिणे हे विज्ञाति.

¶*This is a representation, probably from the Brahmins of Wai, to Govindpant to render justice to one Rajoba Dange. His daughter-in-law was defiled by the son of Bapubhat Pathak and the father and the son were shielding themselves behind Government officers whom they had bribed.*

No. 62] [*1790-91*

श्री

यादी रामचंद्र मेलगिरी दिमत पागा राजजी दिघे सुा इहिदे तिसैन मया व अलफ. मशारनिल्हे तिगस्ता भाद्रपदमासीं पागेचे ठाण्यांतून पुण्यास येते समई मौजे धामारी ताा पाबळ प्रांत जुन्नर येथें श्रीविठोबाचे देवालयी रात्रीस राहिले. पाहाटेचे प्रहर रात्रीस निघोन पुण्याचे मार्गे येत होते तेव्हां गांवापासून बाणाचे टप्प्यावर चोरानीं छुटले. यावर माघारे गांवांत येऊन आरोळी केली. तेव्हां गांवकरी चौघे मिळोन मशारनिल्हेजवळ आले. तेव्हां लुटल्याचे वर्तमान गांवकरीयाजवळ सांगितले. यावर मशारनिल्हेचा माणूस घेऊन गांवकरी चोरी जाहाली त्या जाग्यावर गेले. तेथें पाहातां दोन घोडी चरत होती. तेथें आसपाशी शोध करितां पांवशा कुलंबी याचे मलईत कंठाल व कागदाचा रुमाल सुद्धा सापडली. ते व घोडी घेऊन मशारनिल्हेची माणसे व गांवकरी गांवांत आले. रामसिंग व तात्या कुलकर्णी व तावजी हंबीर हे पुढें रामसिंगाचे बैल व आपले राणू डफल व बाल्या पोरग्या याणें चारावयास नेले होते, त्याचे शोधास गेले. गांवकरी गावात आल्यावर माग काढावा तरी गांवचे रखवालीचा बेरड पेशजीच पलोन गेला होता. त्याजवर रामचंद्र मेलगिरी घोडी व कंठाल घेऊन पुण्यास आले; आणि सरकारांत चोरीचे वर्तमान विदित केले. तेव्हां गांवकरी यांस हुजूर आणून मनास आणिता रामचंद्र मेलगिरी गांवांत वस्तीस राहिले, तेव्हां जागले मागावे ते मागितले नाहीं. प्रहर रात्रीस निघाले. वाटाड्या मागितला नाहीं; परंतु मी निघालो तेव्हां

कुणबीयाणे बैल सोडून माझे आगे मागें जात होता त्याची व चोराची गांठ पडली म्हणोन मशारनिल्हेनीं सांगितले. त्याजवरून बैलक्याची चौकशी करितां राणू डफल बैल सोडून गेला होता, त्यास हुजूर आणून पुरसीस करितां त्याणें सांगितले कीं, मला दोघे गांवचे मांग रखमा व माहाद्या भेटले; त्याणी मला दाबिले तेव्हां पलोन बैल घेऊन आपले मलईत गेलो. तेथें मागाहून रामसिंग व तावजी हंबीर व तात्या कुलकर्णी हे बैलाचे शोधास आले. त्याजवल हरदूजण मांग भेटले, हे वर्तमान सांगितले. मग तिघे निघोन गांवांत गेले, याप्रमाणें राणू मजकूर याणे सांगितलें. यावर मांग व रामसिंग वगैरे तिघे यांस हुजूर आणून,. मांगास पुरसीस केली. त्याणी केंदूरचे मांगानीं व बेरडानीं चोरी केली म्हणोन लिहून दिल्हे. त्याजवरून केंदूरचे मांग आणिले. यावर धामारीचे मांग म्हणू लागले कीं आम्ही त्याची आदावतीनें नांवें गावकरी यांचे सांगण्यावरून लिहून दिल्ही. तेव्हां फिरोन मांगास पुरसीस करितां रखम्या बोलिला कीं, दावमाळी-याची मका खंडून घेतली होती, तेथे माल्यावर राखीत होतो, ते रात्रीस गांवांत बोंब जाहाली हे कशाची म्हणोन दाव मालीयानें मला जागें करून विचारिले. तेव्हां दाव मालीयास हुजूर आणून पुरसीस केली. तेव्हां दावमाली बोलला कीं आपण रखम्यास हाक मारिली नाहीं. रखम्यानें मला हाक मारली की गांवांत गलबला कशाचा? तेव्हां लांडग्याचा गलबला असेल असे मी बोलिलो; व माझी मकाहि मांगाने घेतली नाहीं याप्रमाणें लेहून दिल्हे. त्याजवरून रखम्यानें चोरी करून दाव माल्यास जागे करून बोलिला असे संभवते. त्यास सारांश पाहतां गांवकरी चोरीत होते नव्हते याचे निखालसे करावे तरी मांग * * * खरी आहे म्हणतात. परंतु गांवकरी आपण यांत नाहीं म्हणोन लिहून देतात, आणि तेव्हां गांवकरी याजकडेची चो (री) चा संबंध दिसत नाहीं. चिंचोलीचे पत्रात कुमक करावी असे आहे. मांग तरी निखालस चोरांत होते असे राणूस आढलले आणि त्याणी यांस दाबिवले असे राणूचे म्हणणे आहे आणि ते समई दुसरेयाजवल बोलला आहे त्या पक्षीं मांग चोरीत होते हे जाणौन रामचंद्र मेलगिरी यांस वस्तवानीं काय गेली ते खरे लिहून देणे म्हणोन सांगितले. त्याजवरून त्याणी अजमासे किमती घालून साडे चारशे रुपयाची सनगे व नख्त मुद्रा गेली म्हणोन सांगितलें; परंतु अजमासे जुन्या व नव्या सनगाच्या किंमती घातल्या त्याचे प्रमाण काय? सबब मोहघम चोरीचा ठराव: ३५० रुपये

तपशील

१५० रखम्या व माहाद्या मांग याणी द्यावे; व अगोधर चोरी भरून द्यावयाविसी माली जामीनहि दिल्हा होता.

२०० गांवकरी याणीं द्यावे; सबब की, मांगच चिंचोलीस गेले होते त्याणी गांवचे कामकाज करावे याबद्दल संत्या मांग यास आणावयास रखमाजी व लक्ष्मण डफल व बाल्या माली हे तिघे गेले. तेव्हां मांग मजकूर बोलिला कीं सरकारचा आरोप कांहीं चोरीचा आला होता, म्हणोन पांच सहा महिने सरकारांत पेचांत होतो. त्यास आदा मसाला वगैरे पडला तो देऊन सुटून आलो, त्यास कुमक करावी त्याजवरून गांवांस नेऊन चौघांचे विचारे कुमक होईल ते करूं म्हणोन चिंचोलीकरास त्रिवर्ग गांवकरी याणी लिहून दिल्हे. सबब गांवकरी याणी द्यावे मांग नादान बजित जाहाले सबब रुपये १५०

५० रामसिंग व तावजी व राणू डफल व तात्या कुलकर्णी यास चोरीचा मजकूर समजला असतां चौकशी करावयांस कारकून गेला त्याजवल मजकूर सांगितला नाही सबब रुपये

२००

३५०

¶ *A case of dacoity is enquired into and a report made with the fines imposed upon the culprits.*

No. 63]

श्री

सेवेसी विनंती यैसीजे. राजश्री खंडो नारायेण देसपांडे पेण याचे लेकीवर तिचे दादलियाने आरोप ठेऊन अपंगत केली. त्यासी आम्ही मावलात ते वर्सी होतो त्यास तीन वरसे जाली. आम्हास काही ठावकेच नाही. सांप्रते यैकतो की, कुलाबियासी राजश्री सोइरोबा याजकडे याचा विचार पडला होता. त्यासी याही पस्ट उत(र) केले की, श्रीमंत राजश्री (गोविंद)राव बाबा चिटनीस व महिपतराऊ यैसे पुणियासी आहेत तेच आज्ञा कारतील ते सर्वास माने आहे. यासी सांप्रते रा। खंडो नारायेणाची लेक पणवलीचे मुकामी श्रीमत राजश्री रामाजी माहादेव सुभेदार (याज)कडे गेली. त्याजवरून पेणचे ग्रहस्तास आज्ञा केली जे, तीस पर्वीपावन करणे. त्यासी ते ग्रहस्त स्वतंत्र अपखुद आहेत त्याही माने केले. आम्हास

पेणेचे हवालदाराचे कारभारी राजश्री केशोपंत याही बोलाऊन पाठविले. त्यासी मूल पाठवितो आमच्याने चालवत नाही यैसे सागोन पाठविले. त्याजवर दाहावीस मानूस पाठऊन द्वाही दुऱ्हाई[1] देऊन सदरेस घेऊन गेले. त्यासी आम्हास सांगितले की, आवघे ग्रहस्ताहि माने केले याजप्रमाने तुम्हीहि माने करणे. त्यासी आम्ही उतर केले की, ते ग्रहस्त आपखुद श्वतंत्र आहेत. आमचे वडील श्रीमंत गोविंदराऊ बावा व महिपतराऊ याचे आज्ञेखेरीज आमचयाने माने करवत नाही. यैसे उतर करितांच आम्हास बोलिले जे तुम्ही सुभेदाराकडे कल्याणास जाणे. याजवरी आम्ही उतर केले की, मूल जाईल, जाबसाल करणे तो करील. त्यासी त्याही आम्हासच अतिशयेकरून तुम्हीच जाणे. आम्हास डोलीखेरीज जावत नाही. डोली तो येथे मिलत नाही. त्यासी पुढे तरणखोपाहून हाजीर बेगारीचे डोलकर देववितो. त्यास आम्ही तेहि माने केले. घरास जाऊन वोढना, बिछयाना, सोवले घेऊ. त्यासी घरास जावयासी दरकार नाहीं, परभारेच * * * दे देऊन लाऊन दिल्हे. त्यासी बसत उठत अदकोस पाऊण कोस जमीन गेलो. तेथे उबासा आला. तेथे बैसलोच आहे तो मागाहून मानूस पाठऊन फिरविले ते परभारा घरास आलो. पुढे पंत काये करितील हे न कले. यैसा विचार आहे, ते श्वामीस लिहिला आहे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The letter refers to a case of ex-communication of the daughter of a certain Deshpande of Pen and the attempts made by the father of the girl to remove the ban.*

No. 641

श्री

तीर्थरूप राजश्री दादा मुा पुन
वडिलाचे सेवेसी

बालके गोविंदराव सिंदे देशमुख प्रा कुडाल चरणावर मस्तक ठेऊन सिर साष्टांग दंडवत विज्ञापना. ता भाद्रपद वा ३० पावेतो सर्व मंडली सुखरूप आको विशस. यानंतरी गावचे वर्तमान तरी जाणू गावडा धनगर याचे लेकीचा मुहुतर श्रावण मासी लाविला. त्यास मौजे मजकुरी पूर्वीपासून आपले मोकाशाचे चिठीने गावातील मुहूर्त लागत आले. त्याप्रो हालीहि केले. ऐसे आसता हाली रो सदासिवपंतानी खानशाचा (?) आमल करून भाद्रपद मासी आले, त्यानी मौजे आखाडे येथे मुहूत लावावयास आमची चिठी का नेहेली नाहीत म्हणून

---

१ प्रतिबंध.

मुकदमावर मसाला रुा २ दोन व जोसीभट याजवर मसाला रुा २ दोन व जाणू गावडा याचे बायकाचे डोईवर दगडी देऊन रुा ४ च्यार घेतले व जिल्हेदारहि याप्रोच घेईल ऐसे म्हणतो. गावी धनगर उपद्रवामुले परागंदा होतात. पूर्वीपासून जिल्हे खानशाची चिठी मुर्हुतास वगैरे कधी येथे आणली नाही. याचा बंदोबस्त करून धनगर मजकूर याचा मसाला माघारा दिल्हा तर बरे; नाही तर गावांतून जातात. कलावे सेवसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*One Janu Gawada of the goat-herd caste performed the marriage of his widowed daughter with the usual permit of the Mokasi of the place. But the new Government officer fined the persons involved in the ceremony for not having taken his permit. The Deshmukh of the place enters his protest against this innovation and requests that the fines be paid back.*

No. 65]

श्री

श्रीमंत राजमान्य राजश्री मोरो कृष्ण

पिंपुटकर यांसी आश्रित

लक्षुमण जोसी आशीर्वाद विशेष. येथी (ल) क्षेम तागाईत वैशाख शुध द्वादशी पर्यंत सुखरूप असों. यानंतर एक दोन पत्रें पाठविलि परंतु प्रतिउत्तर त्यांचें आलें नाहि. याकरितां चितास संतोष वाटत नाहि तर ऐसें न करणें. आलेया मनुष्याबराबर सविस्तर वर्तमान पत्रिं लिहोन पाठवित जाणें. श्रीचे दृष्टांत एक दोन झाले ते कैसे झाले यैसेच म्हणाल तर पिशाचे येथें जात नाहि. हरीहरेश्वरी जातात, १ देवतार्चन करित होतो तेथे दीप आणून कुमारीं लाविला. "आतां ऊठा" यैसी बोलिलि. २ या उतरी सप्तचंडी ज्येष्ठ मासीं समाप्त होईल सूज्ञाप्रति विस्तार बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद

यानंतर तुह्मी ब्राह्मण सांगितला होता. तो तिन मास लावला. त्या उपरी त्याचे मातुश्रीस बहुत बरें वाटेनासें झालें या (क) रीतां त्यास दुर केल्यानंतर पनरां दिवशीं फिरउन त्यास लावावा एशास आहे, तुमचा चित्ताचा विचार काय असेल तो लिहोन पाठवणें त्या सारीका त्यास अथवा तुह्मीच करावा दुसरा ला का चे लिहोन पाठवणें हे आशीर्वाद.

¶*Lakshman Joshi writes to Moro Krishna about a dream that was revealed to him by his deity.*

+ सबंध पत्र बालबोधींत असून आहे तसेंच छापलें आहे.

7482

No. 66] [*About 1810?*

श्रीकांसी

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवसी

विनंती शेवक भिकाजी अनंत पटवर्धन दोनी कर जोडून चरणावरी मस्तक ठेऊन कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा आश्विन शुाा १० पावेतों मुकाम श्रीक्षेत्र येथें श्रीचे व माहाराजांचे कृपेकरून सेवकांचे वर्तमान येथास्थित असे विशेष. साल मजकुरीं पर्जन्य पुनर्वसु सरता चरण येक रोज व पुष्य सरता चरण दोन रोज त्यावर गोकुळअष्टमी जाहाल्यावर दोन दिवस ऐसे सिंपणे पाऊस पडले. त्याणे कांही पेरे जाहाले; परंतु सेतें चांगली जालीं नाहीं. त्यावर आश्विन शुाा ६ पर्यंत बिंदुमात्र नाहीं. तेणें करून दिवसेंदिवस महर्गता, इंग्रजाची सख्त ताकीद असतां होत गेली. हाली श्रीनें कृपा करून सप्तमीपासून आजपर्यंत सुवर्णवृष्टि केली, तेणेकरून धान्य स्वस्थ होत चाललीं. त्याचे भाव सरस निरस जिनसः—

षष्ठीपर्यंत महर्गता जाहलिया कालचा

१	तांदुळ बारीक	ᐤ।	ᐤ।१
१	ताा मध्यम	ᐤ।२	ᐤ।३
१	ताा मोठे	ᐤ।६	ᐤ।८
१	दाल तुरी	ᐤ।६	ᐤ।७
१	गहू	ᐤ।६	ᐤ।८
१	चणे	ᐤ॥.	ᐤ॥२
१	जव	ᐤ॥.	ᐤ॥२
१	मूग	ᐤ॥.	ᐤ॥१
१	उडीद	ᐤ॥२	ᐤ॥३
१	पकीचिनी	ᐤᐤ३	ᐤᐤ४
१	चिनी	ᐤᐤ५	ᐤᐤ६
१	साल साकर	ᐤᐤ७	ᐤᐤ८
१	खड साकर	ᐤᐤ८	ᐤᐤ९
२	मीठ	ᐤᐤ५	ᐤᐤ७
१	तेल गोडें	ᐤᐤ५॥कडू	ᐤᐤ४॥

पर्जन्य पडल्यावर
(११॥ पायली १) (१३ पायली)

१	ताा बारीक	ᐤ।४	[illegible]
१	ताा मध्यम	ᐤ।७	ᐤ।८
१	ताा मोठे	ᐤ॥.	[illegible]
१	दाल तुरी	ᐤ॥२	[illegible]
१	गहू	ᐤ॥८	[illegible]
१	चणे	ᐤ॥।.	[illegible]
१	जव	[illegible]	[illegible]
१	मूग	[illegible]	[illegible]
१	उडीद	[illegible]	[illegible]
१	पकी चिनी	[illegible]	[illegible]
१	चिनी	[illegible]	[illegible]
१	साल साकर	[illegible]	[illegible]
१	मीठ	[illegible]	[illegible]
१	तेल गोडें	[illegible]	[illegible]
१	तूप	[illegible]	[illegible]

१ तूप	८८२॥।	८८३	१ गूळ	८।४	८।६
१ गूळ	८।४	८।६	१ मकाणें	८८५	८८६
			१ दूध दहीं	८॥।	८॥७

येणेप्रमाणें आहेत. तांदुलाचें पीक गेलें व मूग उडीद तुरीचेही कमी; पुढेपर्यंत पर्जन्य पुरल्यास गहूं जव चणा वगैरे होतील. येथें सरकारच्या हवेल्यास फाटक-बंदीची बोहेरी रयेत बरोबर लाविली. दरमाहा प्रा ।= प्रमाणें हवेलीस येणे-प्रमाणें देणे लागतें. त्यास म्हणोन पाहिलें सोडीत नाहीं व भोसले, सिंदे, होलकर याचे कारकुनाचा आदरमान करितात, तसा माझा राखीत नाहीं. कारण त्याचे या प्रांतीं दबाव भारी व वर्षास साहित्य पत्रें खलीते येतात. गोष्ट तों थोडी परंतु मान आहे. वकिलास ताकीद होऊन त्याची चकती आलियास उत्तम. येथे हरघडी लाहान मोठी गोष्ट पडते. नांवाप्रमाणें घडोन आल्यास संतोष, न आलियास अपकीर्ति. सूचनार्थ विनंती लिहिली आहे. गोष्ट सरकारची मर्जी ...ेल तसें होईल. यानंतर येथे भाद्रपद मासीं येके रात्रींत दोन तारे पडले, बाजा-... आग लागली व धरणीकंप जाहाला; तो गया, प्रयाग, लखनौ फरकाबाद ...पर्यंत घडी आर्ध घडीपर्यंत जाहाला. कासींत येक देवल जीर्ण होते ... दोन च्यार हवेल्यास दरजा+ जाल्या. लखनौत दाहापाच हवेल्या पडल्या ...ल्यास दरजा जाहाल्या. या प्रमाणे कोठे कोठे जाहालें. गंगेचे पाणी ...चरे हाडबडलीं, हे मजकूर दोन च्यार पत्रीं पेषजी विनंती लिहिली ...ल, न पावतील याकरितां हालीं विज्ञापना लिा आहे. त्यावर ...तारा पडला, व येक रोज गर्जना विपरीत जाहाली, सेवेसी कलावें ... आहे. राजश्री राघो रामचंद्र सरकारचे तिरस्थलीस आले त्याविसी ...त्रास खर्चास पैसा नाही, याविसी दोन च्यार वेल विनंती लिा व ...जुर आहेत, विनंती करीत असतील तेथें मी काय लिहूं? समय ... लिहिणें याचें प्रयोजन नाहीं. सुविता जाल्यावर आपण ...ीं. आपण होऊन छत्र घातलें प्राचीन नव्हे. शेवेसीं श्रुत

... Patwardhan gives from Benares the rates of several ... ibes some curious incidents occurring in the north, e.g., ... meteors, etc.

+. दरजा = भेगा.

No. 67]

श्री

श्रीमत् राजश्री नानासाहेबाचे
सेवेसी

सेवेसी आज्ञाधारक अर्जूनजी हवालदार पेठ विज्ञापना यैसी जे, साहेबी पेठेमधे विहीर खाणितली. त्यास त्याचे उद्यान[1] करावे ते केले नाही. याकरिता आम्हास लागीर[2] होऊन पाये गेले; पागूल जाहालो. च्यार मुले माणसे हैरान. उपासी मरतात. कर्ज गोसावी वगैरा कर्जदार मिळोन दोनसे रुपये जाहाले आहेत. ते रोज उठोन धरण बैसतात. आमचे पोट भरेना तरी वडिली साहेबाच्या आमचे चालविले तैसे आगत्ये धरून चालवण. मजला साहेबावाचून दुसरी गत नाही. यैसी कारकून आम्हापासी वसघस करितात. काये निमित्य की, हरयेक खर्चवेच होतो त्यास मुदईगिरी[3] माझी जे, धण्याचे हित ते करा म्हणतो. यामुले मी नसावा यैसे त्याचे चिती. तरी बरे त्याची वादपूस करणार साहेब धणी आहेत. मी तो बुडालो आहे. साहेब मेहरबानगी करून चाकराचे ऊर्जित करतील, कर्ज वारतील, माणसात घालतील तरी सेवक पदरीचा आहे. नाही तरी समुली बुडालो. याचे अभिमान धन्यास आहे. विशेश काये ल्याहावे? साहेब धणी मायेबाप आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*One Arjunji Havaldar, who is possessed and maimed, solicits maintenance from the Peshwa. The writer attributes his disability to the fact that the necessary religious ceremony was not performed after the completion of the excavation of a well at Peth.*

No. 68] [1734 ?

श्रीजेयति

अपत्यें सा। नमस्कार विनंती. राजश्री स्वामी माघी यात्रेस प्रतिपदेनंतर स्वार होऊन येणारसे राजश्री अंबाजीपंताचे पत्र आलें. आम्हासहि राजश्री श्रीजवल आलियावरी येणेस लिहिले आहे. वरकड साहित्याविसीं लिहिलें त्याजवरून वेठ्याचे रोखे करून साहित्याविसीं सर्वास ताकीद केली आहे, करीत आहो. सेवेसी विदित व्हावें म्हणून लिहिलें असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Balaji (Nanasaheb) informs his father that the King is proceeding to Jejuri for the Magh gathering of pilgrims and that the writer is also asked to meet the King at that place.*

---

१ उद्यान = उद्यापन. २ लागीर = पिशाचबाधा. ३ मुदईगिरी = दावेदारी.

No. 69] [1751 ?

॥ श्री त्रिंबकेश्वर ॥

वेदशास्त्रसंपन्न श्रित्रिंबक नाशिक
क्षेत्रस्थित ऋग्वेदि व तैत्रीय व
वाजसनि व कात्यायन व सामवेदि
व अथर्वणवेदि समस्त ब्राह्मण याप्रति

विद्यार्थी बाळाजि बाजीरावपंत प्रधान साष्टांग नमस्कार विनंति उपरी * * * * * सर्व कर्मानुष्ठानंतर आशिर्वादमंत्र य * अनुक्रम * ई ऋग्वेद मत्रोतर तैत्रिय व वाजसनियाहि परस्परे कलह * * त्यामध्ये मारामार केली. त्यानंतर ऋग्वेदप्रभृति स(म)स्त ब्राह्मणाहि समापत्र केले जे, वाजसनि याशि अंन्नव्यवहार न करावा ऐसे समापत्र करून काहीं दिवस चालत होते. त्यानंतर रा। भाऊसाहेब श्रियात्रेस आले. त्यास वर्तमान विदित जालियावर समस्त ब्राह्मण बलउन पूशिले कि तट किंनिमित्य केला आहे. त्याहि पूर्ववृतांत सांगितला ऐसा जे, क्षेत्रामध्ये प्रयोजन जाले तेव्हा ऋग्वेदि याहि मंत्र म्हणला. मग तैत्रिंयाहि मंत्र अरंबिला. म्हणउन वाजसनियाहि मारले. ऐसे वर्तमान सांगितले. त्याजवरून रा। भाउसाहेबाहि ऋग्वेदि व अपस्तंब व वाजसनि समस्त ब्राह्मणास अज्ञा केलि जे, अह्मि श्रियात्रेस आलो आहो. येथे सर्वाचे पूजन करावे लागते यास्तव तुम्ही समापत्रे केलि ति आम्हाजवळ ठेवणे. यात्राविध करून पुण्यास जाऊ तेथे स(म)स्त ब्राह्मण त्रिंबकर येणे. श्रावणमासि सर्व देशिचे ब्राह्मण सर्व शाखाध्यायि येतिल तेथे निश्चय मंत्राचा होईल तो करून देउ. तदनरूप वर्तणुक करणे. त्यास समस्त पुण्यास आलेत. मग येथे सभा केलि. सभासद ब्राह्मणाहि श्रिभागवत व विष्णुपुराण व चरणव्युहु व अनेक ग्रंथ विचारणा करून एकवाक्यता पाहून व श्रिकाशिप्रभृति यावद्रामेश्वरपर्यंत मध्यगत थोर थोर क्षेत्रि समस्त माहाराष्ट्र व तैलंग व कानडे व द्राविड यामध्ये सर्व शाखाध्यायि याचि येकत्र सभा जाली असता प्रथम मंत्र ऋग्वेद व द्वितिय मंत्र तैत्रियशाखा तदनंतर वाजसनिय व कात्यायन त्यानंतर सामवेदि व अथर्वणवेदि मंत्र एसा क्रम शास्त्रनिश्चित अनादि शिष्टाचार आहे. त्याप्रमाणे श्रित्रिंबकेश्वरी व ना(शिक) क्षेत्रि समस्ताहि मत्रपाटक्रम म्हणत जाणे. या(विसि) समस्तास पत्र (पा)टविले असे. येणेप्रमाणे वर्तणूक करणे. याविषयी जे अन्यथा करतिल त्यास शास्त्रविचारे शासन होऊन येईल.

¶*The Peshwa communicates to all the Brahmins of Nasik and Trimbak the decision of the conference held at Poona regarding the priority to be observed in reciting the Vedic hymns by the Brahmins of various sects.*

---

१ सबंध पत्र बालबोधींत आहे. नकल मुळाबरहुकूम आहे.

No. 70] [16-4-1756

श्री

राजश्री कमाविसदार वर्तमान
व भाव प्रांत पुणें गोसावी यांसीं

श्री बाळाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद व नमस्कार. सुा सीत खमसैन मयां व अलफ. श्रीमार्तंड जेजूरी येथील यात्रेस वगैरे बारमाही कर बसतो. कलम :

१ देवद्वारचा कर
१ खुंटफेलीचा हासील व भेट
१ बगाड व जावळ
१ खोडाबेडी
१ तर्थीचा कर
१ भंदी
१ डांका
१ बकरकसाई

८

येकून आठ कलमे याचा कर सालमजकुरीं माफ केला असे; तरी सदरहू आठ कलमाचा हासलि व कर साल दरसाल येकंदर न घेणे. बार जाणिजे. छ १९ रजब.

¶*An order of the Peshwa abolishing the eight different cesses which were till then levied on the pilgrims visiting Jejuri.*

No. 71] [9-9-1757

श्री

आश्रित जनार्दनभट ढेरे अग्निहोत्री विज्ञति यैसीजे : आपल्यास माहायात्रेचे ब्रह्मस्व[१] जाले आहे. माहाराज ब्राह्मणाचे छत्र आहेत यास्तव विनंती केली आहे; तरी राजश्री मेघःशाम बापूजी व गोपाळराव बापूजी याचे तालुकियांत गावगना संभवना करून देविलिया ब्रह्मस्व परिहार होईल. स्नानसंध्या स्वस्थचितेकरून चालेल. हे विज्ञापना.

सन समान छ २४ जिल्हेज.

---

१ कर्ज.

7487

हजार रुपयेपर्यंत शिवाय सरकार यैवजी साधून भटजीस देणे, आर्स गोपाळराव बापूजीवर सनद द्यावी. देणे:

छ ७ मोहरम सन समान सनद लिहिणे.

¶*Sadashivrao Bhau allows a grant of one thousand Rupees to one Janardan Bhat Dhere in order to free him from his debts.*

No. 72] [*9-3-1759*

श्रीशंकर प्रो

राजश्री नानासाहेब

राजश्री भाऊसाहेब

श्रीमंताचे सेवसी

विनंती जानो माणकेश्वर कुलकर्णी काा वाघोली प्राा वाई विज्ञापना यैसीजे. आपली मूल वधू पाचा वरशाची होती. तिजला भोजननिमित्य माहादाजी सिधनाथ मेढेकर याने अपले घरास नेली. मग तेथून रानात श्रीरामस्वर याचे देवालई मुलीस नेले. बायेका तिघी विधवा व भट माभळस्वरकर यानी नेऊन अमंत्रिक पिशाच लग्न लाविले. ते समईच आपण जाऊन त्या ब्राम्हणाच्या गळा पडलो. तो भट आपण घेऊन वाईस गेलो. मग तेथील ब्राम्हणानी ष(ब्द) ठेऊन दंड घेतला. त्याजपासून अम्हास पत्र (ले)हून देविले व क्षेत्रस्थानीहि अपले पत्र दिध(ले) की, आल्या वरास मूल देणे. ती दोन्ही पत्रे घेऊन पुणियास आलो. तीं पत्रे श्रीमंत यासी दाखविली. त्यानी रो शामराव अंबाजी यास आज्ञा केली की, शोध पाहून विनंती करणे. त्यावरून रो शामराव यानी शोध पाहून माहादाजी सिधनाथ याजपासून येजिदपत्र घेतले. हे तिन्ही पत्रे श्रीमंत यानी ध्यानास अणून राजश्री येमाजीपंत अन्ना व शास्त्री व जोतिसी यासी विचारले. चतुस्ट करून शोध पाहून परवानगी रो नारोपंत प्रचुरे यासी सागितले की, अल्या वरास मूल देणे. यैस पत्र देवयाची आज्ञा करविली. सेवसी श्रुत होय.

येणेप्रमाणे पत्र द्यावयाची परवानगी राजश्री भाऊ साहेबानी सागितली आहे तरी सदरहू प्रो पत्र द्यावे.

लिहिणे

छ ९ रजब सुाा तिसा खमसेन फाल्गुन.

¶*Jano Mankeshwar applies to the Peshwa for an order cancelling his daughter's marriage, performed by the Pishacha (i.e., irreligious) form, and granting him permission to celebrate the marriage of his daughter, with another bridegroom, according to proper forms and rites. The order applied for was issued.*

No. 73] [4-4-1760

छ १९ साबान-
-सन सितैन

श्री

सेवेशी विज्ञापना ऐसीजे. स्वामींनी कृपा करून आज्ञापत्र पाठविले, तेथे आज्ञा की श्रीभवानी तुळजापूर येथे श्रीदेवीजवळ नगारखाना घालावयाचा नवस केला होता त्यास हली श्रीजवळ नगारखाना ठेऊन चालता करावा म्हणोन आज्ञा केली. त्यास आज्ञेप्रमाणे शहरीहून नगारची व नौबतखानियाचा सरंजाम आणोनं स्थलाची योजना आज्ञेप्रा करून चालता करितो. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. छ १७ शाबान.

¶*The Peshwa is informed of the drummers being employed in the temple of Bhavani at Tuljapur, as instructed by him.*

No. 74] [16-5-1761

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री विसाजी कृष्ण व हरि
गोपाळ गो यासीं

सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार सुा इहिदे सितैन मया व अलफ. सरकारांत हेणमगाईचे[1] प्रयोजन आहे. तर हणमगाई चांगल्या चारपांचसेपर्यंत घेऊन येणे. तुमचे लस्करांत लुटीची गुरे येंदा पुष्कळ आली आहेत. कांही गाई त्यातून काही मिळवाव्या फुकट; येणेप्रो करून चारपाचसे गाईचा भरणा येऊन पोहचेसे करणे. जाणिजे छ १० सवाल.*

¶*The Peshwa orders Visaji Krishna and Hari Gopal to send some 400 to 500 cows.*

No. 75] [29-3-1763

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री व्यंकटरामशास्त्री स्वामीचे सेवेसी

विद्यार्थी रघुनाथ बाजीराऊ नमस्कार विनंती. उपरी, चैत्र वद्य अमावास्येस सूर्योपरोगसमई[2] गोदानें वगैरे येणेंप्रा धर्मादाव करावा:

शंभर गोदानें गाय व साहित्य व दक्षणा दर गोप्रदान मोईन रुा पर्वकाळीं येक ब्राम्हण स्वतंत्र लाऊन कुशेंकरून ग्रहण सुटे तों-

---

१ मोठाड गाई. २ सूर्यग्रहण.

चालीस ४० प्राा येकून रुपये चार हजार, त्यात गाई मिलतील तितक्या घेऊन गाईच द्याव्या. थोड्या. बहुत कदाचित न मिळत तरी चालीसप्राा रुपये घ्यावे. बहुधा गाईच घ्याव्या. कलम १.

मंडलेश्वर अथवा प्राा कसरावद येथील जमीन येक चाहूरभर उतम ब्राम्हण पाहोन उपरागसमई दान देऊन रुपये १०० दक्षणा द्यावी.

पर्यंत जितकीं स्नानें होतील तितकीं करवावीं. त्याचा विधि:[१] कुशोसि कुशपुत्रोसि ब्रम्हणा निर्मितः पुरा ॥ त्वयि स्नाते स च स्नातो यस्येदं ग्रंथिबंधनं ॥ मज्जयेदष्टवारं तु स्वयमंते समाचरेत् ॥ याप्रमाणें करून दक्षणा नेमणुक रुा ५०.+ येणेप्राा करावें.

चैत्र शुध द्वादसीस हाच मजकूर लिहोन कासिदजोडी पाठविली आहे. धुमधामेकरितां पावेल न पावे याजकरितां दुसरी जोडी रवाणा केली आहे. कलावे.

येणेप्राा कार्य करून उतर पाठवावें. जाणीजे. छ १३ रमजान, चैत्र शुध पूर्णिमा भौमवार. बहुत काये लिहिणे, हे विनती.

¶*Raghunathrao sends instructions to Vyankatramshastri about the religious charities and observances to be carried out in connection with the solar eclipse falling on 13th April 1763.*

No. 76] *[16-2-1764*

पो १६ साबान सन आर्बा.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी

विनंती. सेवक रामाजी माहादेव मेाा साष्टी चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १३ माहे शाबानपावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र सादर जालें तेथें आज्ञा की, साष्टी कल्याण प्रांा कर्नाला विजयेदुर्ग सुवर्णदुर्ग या तालुकियांत ब्राम्हण आश्रित आहेत त्यांस सरकारांतून वर्षासनें व गांव इनाम राज्याभिवृध्यर्थ दिल्हे असेत. त्यांही आपलाले घरीं अनुष्टानें शत्रुपराजयार्थ करावी. खासा स्वारी कर्नाटक प्रांते जाली आहे. तरी याप्रों वेदमूर्तीस सांगोन अनुष्टानास प्रारंभ करवणें म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रों ब्राम्हणवृंदास सांगितलें. स्वामीचें अभीष्टअभिवृध्धी-

---

१ येथून + अशा खुणेपर्यंत मजकूर बालबोधींत आहे.

चिंतन निरंतर श्रीचे चरणारविंदी प्रार्थनाविशीं तत्पर आहेत. त्यामधें, प्रस्तुत हे आज्ञा सेवकानें दर्शविली. तेण्हेकरून वेदमूर्तीस संतोष होऊन शत्रुपराजयार्थ अनुष्टानें आरंभ केलीं आहेत. सरांश, स्वामीचें पुण्य अगाध आणि भूदेवांचे आसीर्वाद; तेणेंकरून शत्रु पादाक्रांत होईल. +सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Ramaji Mahadev writes to Peshwa Madhavrao that the latter's instructions regarding performance of certain rites in order to invoke divine aid to destroy the enemy, will be duly carried out.

No. 77] *[22-1-1766*

पौ छ २२ रमजान सन

सित

श्री

विज्ञापना स्वामीनी छ १० साबानचे पत्र पाठविले ते छ २० मिा पावोन बहुत संतोष जाहाला. लिहिले वर्तमान सविस्तर कलले. बैरागी हिंदुस्थानातून विष्णु व गणपतीची मूर्ति घेऊन आले. मूर्ति फार चांगल्या याजकरितां घेतल्या. गणपतीस तुमचे नावची अक्षत लाविली. विष्णु मूर्ति फार चांगली त्यास लहानसे देऊल बाधून पुष्पवटिका करावी असे मानस. याजकरितां जाग्याविसी राजश्री गोविंदपंत तात्यास पत्र लिा. त्याणी आपली जागा दिल्ही तर उतंम. नाही तर बालाजीपंत ठोसर याचे सेजारी जागा आहे त्यापौ जागा लिा प्राो लावी रुदीची परवानगी घेणे. गोविंदराव तात्याचे विद्यमाने पुसावे, म्हणौन पत्री आज्ञा केली. त्यावरून तात्यास पत्र दाखविले. त्याणी तेच क्षणी सांगितले जे, मी आपली जागा देत नाहीं. तेव्हा श्रीमंतास त्याजकडूच विनंती करविली. परंतु जागा द्यावयाची मर्जी नाहीं. तात्यानी सांगितले जे, तो लकडखाना नव्हे. रिकामी जागा लकडखान्यास लगती मात्र आहे. परंतु जाग्याची परवानगी जाली नाही. मग लटका आग्रह कशास करावा? स्वामीनी लिा की, उतर लवकर पाठवणे. त्यास येथे उतर याप्राो जाले. दुसरे स्थलीं जागा योजावी. येथे लिहिल्याने परिणाम नाही. आपली इछा देवस्थापना करून पुष्पवाटी करावी. त्यास तेथेच येकाधी जागा च्यार रुा पडले तर देऊन घेऊन करावे. आपली इतकी निष्ठा आहे तर भगवंत जागाहि मर्जीजोगती योजून देईल. येथून परवानगी होत नाही कलावे. राजश्री गोविंदराव तात्यानी श्रीमंताचा निरोप त्रयोदसीस घेऊन गेले. त्याचे घरी लग्न याजकरिता परभारे वाईस जातील, तेथून कोल्हापुरास जाऊन मग पुण्यास येणार. कलावे. श्रीमंत राजश्री दादा फडनीस यास पांच सात रोज लस्करांत ताप आला. येदा फारच शरीर

गलाटले. याजकरितां निरोप घेऊन टोक्यास गेले. पंधरा दिवस टोक्यात आपल्या वाड्यांत राहून मग पुण्यास येणार. कळावें. गणपतीचे मूर्तीस माझे नावे अक्षत लाविली. त्यास माझे चितांत फार दिवस गोष्ट होती. स्वामींनी सफल केली. स्वामीचे पाय द्रिष्टीस पडल्यावर मूर्तिहि पाहीन. वरकड वर्तमान यथास्थित असे. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

रखमाजी जगथाप याची जागा आपण मागत होते असे येथे श्रीमंतास कोणीं सांगितले. त्यावरून आपल्यास पत्र जागा न घेण्याविसी गेले म्हणौन ऐकिले. त्यास सरकारचे जाग्यासिवाय निर्वेध उदंड आहेत. तेथेच पाहून कर्तव्य ते करावे. गोविंदराव ठाकूर यांचे ओंकारेश्वराजवल ते जागा विकणार असे येथे ऐकिले. मर्जीस आल्यास ती जागा बरीच आहे. कोणती योजनेत येईल ते लिहावे. हे विज्ञापना.

¶*Haripant writes to Nana Fadnis about the idols, one of Vishnu and the other of Ganpati, purchased from the Bairagis by the addressee. The subject of securing good site, in Poona, for building a temple for the idol of Vishnu is discussed by the writer. This may be the origin of Belbag.*

No. 78] *[14-4-1766*

श्री

यादी रामचंद्र बाबाजी सेणवी यानी गैरराहा वर्तणूक केली आण प्रायेश्चित्त सरकार आज्ञेसिवाये घेतले. सबब हुजूर आणून नजर करार केली. सुा सीत सितैन मया व अलफ. रूा

१५०० तूर्त
१५०० वैशाख सुध १ हवाला साहुकारी द्यावा.

३०००

तीन हजार रुपये येणेप्राा करार करावे. छ ४ जिलकाद सन सीत चैत्र

¶*Ramchandra Babaji Shenavi pays a fine for performing penance without government sanction.*

No. 79] *[22-1-1769*

श्रीशंकर

श्रियाविराजित राजमान्य
राजश्री अपा स्वामीचे शेवेसी

पो बाजी विठल कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ. १२ रमजान पौष वद्य १ मुा मोट जाणून स्वानंदलेखन करीत असिले पाा विशष.

मकरसंक्रांतीच्या पर्वकालाकरिता श्रीगंगास्नानास ब्रह्मावर्त क्षेत्रात गेलो होतो. दाहा रोज क्षेत्री क्र(म)णा करून काल शनवारी येथे आलों. तीर्थस्वरूप कैलासवासी याचा घाट क्षेत्री आहे परंतु तेथे दीप कोणी लावीत नाही, मग आर्च्या होण कलतच आहें. चितास येईल तो उ(त)रतो, त्याजमुले जागा जाया होती. प्रस्तुत फिरंग्यानी तेथे सोरा वगैरे जिनस त्या जाग्यावर ठेविली होती. मुख्य स्थली सोरा ठेविला होता. पूजनास देखील जागा नवती. घाटाजवल राहिलो होतो. फिरंग्याचा प्रकार पाहून त्रास आला. उपाय नाही. तेव्हा त्याचा कारभारी बोलाऊन त्याजला युक्तीनेच सांगून कोठी तेथून काढून दुसरे घाटावर नेवविली; तेव्हा पूजनास जागा जाली. आम्ही होतो तोपावेतो आर्चा दीप चालला. मोकली जागा आसल्यास सर्व पूजन करितात. गुंतल्यावर पूजन होत नाही. आसा प्रकार जाला आहे. घासीराम ब्राह्मन तेथे पूजन करितो. याजवल श्रीमंत रावजीच्या हातचे पत्र आहे त्याची नकल पा। आहे. ते पाहून याचा दरमाहा चालता करावा. याचे घर घाटाजवल आहे. पूजन करितो याजकरितां समागमे आणून श्रीमंताकडे पा। आहे. पत्र श्रीमंत राजश्री रावजीस लि। आहे. आपण सांगून याचा दरमाहा चालता करावा. आमचे विचारे देशस्त योजून त्याजला दरमहा करून नेहमी तेथे पूजनास ठेवावा. श्रीगंगेचे पूजन चालल. वडिलांचे आर्चन होईल. सालिना काही तरीं तेथे खर्च व्हावा यांत उतम आहे. रावजी ज्ञासी प्रांते आहेत. आस्या प्रसंगी आंतर न व्हावे म्हणून लि। आसे. घासीराम ब्रा। याजला सनद प्रा। दरमा नेमून द्यावा. दुसरा विचार लि। तो उतम आहे. युक्तीस पडल तो करावा. आम्ही च्यार वेल तेथे गेलो. तो आसाच प्रा। म्हणून लि। आसे. सेवेसी कलावे. बहुत काय लिहिणे, कृपावृधि करावी, हे विनती.

राजश्री वेंकटराऊ आपा स्वामीचे शो। सा। नमस्कार विनंती उपर. लि। परिसोन कृपावृधि करावी. सनद राजश्री आबाचे हातची त्याजवर मोहर चौकुटी आहे. त्याची नकल पा। आहे. घासीराम नित्य घाटावर आसतो. पूजन तऱ्ही करितो. याचा दरमाहा चालता करावा. रिकामे न पाठवणे. हे विनंती.

¶*Baji Vithal reports probably to Appa Mehendale the dilapidated condition of a bathing ghat constructed at Brahmavarta to commemorate Balavantrao Mehendale and requests that the allowance for worship granted to one Ghasiram Brahman may be continued to him.*

7493

No. 80] [2-3-1772

मसुदा

श्री

सेवेसी बालाजी जनार्दन कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २६ जिलकादपावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष. छ २ जिलकादचे पत्र सादर जाहाले तेथे आज्ञा की, शके सोलासेत्र्याणव फालगुन मासी गुरु कुंभरासीगत होतो. शके पच्याणवामध्ये गुरूचा रासीभेद होत नाही. त्यास या वर्षाचे नाव काय? या वर्षी शुभकार्यादिक कर्तव्याकर्तव्य विचार पंडित व ज्योतिसी मेळऊन निर्णय करून वाक्यसहित सविस्तर लेहून पाठवणे म्हणून आज्ञा. त्यावरून सरकारचे वाड्यात पंडित व ज्योतिसी यांची सभा केली. त्याणी विचार करून निर्णयपत्र ठराविले तेच बजिनस स्वामीकडे रवाना केले आहे त्याजवरून निवेदन होईल. सांराष अर्थ पाहाता या वर्षाचे नाव लुप्तसंवत्सर नव्हे. अधिवत्सर आर्यसिधांत, सूर्यसिधांत, ब्रह्मसिधांत या ग्रंथावरून येत नाही, परंतु ग्रहलाघवाचे स्फुट गतीने मात्र अधिवत्सर येतो. त्यास येविसीचा निषेध नर्मदोतर देसी दक्षिण देसी वि[वा]हादिक मांगल्य कार्ये केल्यास प्रत्यवाय नाही. श्रुत होय.

¶*Nana Fadnis reports the decision of an assemblage of Brahmans and astrologers regarding the name and the aspects of the particular Samvatsar year of Saka 1693.*

No. 81] [7-6-1775

पौ छ १० राखर सन
सीत सबैन.

श्री

राजश्री गोविंदराव मोरे हवालदार
व कारकून किले सिंहगड गो यासी

॥ अंखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री माधवराव नारायण प्रधान आसीर्वाद नमस्कार. सुा सीत सबैन मया व अलफ. तुम्ही विनंती पत्र पाठविले ते पावले. श्रीअमृतेश्वर वास्तव्य किले मजकूर याचे अर्चेचे पूर्णाहुतीसमई तोफाची सरबती केली म्हणौन लिहिले ते कळले. जाणिजे छ ८ राखर.

¶*The Peshwa writes to Govindrao More approving his action of firing guns at the time of the worship of Amriteshwar at Sinhagad.*

No. 82] [3-8-1775

पौ छ ६ जाखर

सीत सबैन

श्री

सेवेसी जनार्दन आपाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता छ ९ जाखरपावेतो येथास्थित असे विशेष. श्रावणमासची दक्षणा रमण्यात काल शष्टीस प्रारंभ केला तो आज तिसरे प्रहरी दिवसास यथासांग समाप्त जाहाली. ब्राह्मण आा २८९८१ येकूण सेरा सरासरी २८—॥। रुा ६११०८ येकसष्ट हजार येकसे आठ रुा लागले. याजखो वाडियातील दक्षणेचा अजमास दक्षणा जाहाली व व्हावयाची ते पूर्वी लिहून पाठविले आहे. त्यापैकी रमण्यांत दोनसे दोन आसामीस बेवीससे सत्रा रुा वाटले ते सदरहू बेरजेत आले आहेत. बाकी वाड्यातील दक्षणा व्हावयाची ते येका दो दिवसी पुर्ती जाहाल्यावर मागाहून लिहून पाठवितो. रमण्यातील दक्षणेचे पत्रक तपसीलवार आलाहिदा पाठविले आहे प्रविष्ट होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Janardan Appaji informs the Peshwa that Rs. 61,108 were distributed among 28,981 Brahmans on account of the Dakshana of the month of Shravan.*

No. 83] [23-7-1775

पौ छ २९ जावल

आषाढ मास

श्री

शेवेसी जनार्दन आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता २४ जावलपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. श्रावणमासची दक्षणादेखील खुर्दा खिचडीचा सुधा सवा लक्ष रुपयामध्ये वांटावी म्हणौन वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामशास्त्री यांजवल आज्ञा जाहाली आहे. त्याअन्वये दक्षणेचा बेत वाड्यांत व रमण्यात वाटावयाचा केला. येणेप्रमाणे रुो

६००००. वाडियांत सिष्ट ब्राह्मणांस

४०८८० बा गुा आा २१२९ दर ३८॥ प्रमाणे रुो ८१७६०

पौ निमे साल मागी दक्षणा

१९१२० जाजती सालमारी रमण्यांत थोडी दक्षणा द्यावयाची
याजकरितां चांगले ब्राह्मण पाहून ल्याहावयाचे केले
आहे आा १८७५ दर सरासरी १०

६०००० ४०००

च्यार हजार ब्राह्मणास वाडियांत दक्षणा द्यावयाची केली आहे.
त्याचा अजमास सदरहूप्रो दर सरासरी १५

११००० किता

७५०० खुर्दा खिचडीचा अजमासे
१५०० दुखणेकरी बाा गुाा २४८३ पैकी सालमाारी
१५०० चिंचवड व थेऊर व वाई वगैरे पैकी सालमाारी
५०० गंगापूर वगैरे

११०००

५४००० रमण्यांत ब्राह्मण गुदस्ता प्रोच होतील साा अजमासे आा ३१००० योा सेरा सरासरी रुो १॥। प्रमाणे. साल गुदस्तां दर आसामीस सेरा रुो ४८≡॥ प्रो पडिला होता, त्याचा निमे सेरा साल मारी असावा, त्यास साक्षर ब्राह्मण वाडियांत जाजती ल्याहावयाचे केले, साा सेरा सदरहूप्रोा पावणेदोन रुपयाचा पडतो.

१२५०००

येकूण सवा लक्ष रुपयात दक्षणां वाटण्याचा बेत सदरहूप्रो धरिला आहे. परंतु रमण्यांत दक्षणा थोडी दिसेल त्याजकरिता दुसरे पर्याय

किता पर्याय रुो

४०८८० वाडियांत सिद्ध ब्राह्मण
२१२५ बाा गुाा
१००० जाजती साल मारी

३१२५

दक्षणा गुदस्तां सवायेकवीसशे ब्राह्मणास दिल्ही आहे.

४०८८० वाडियांत गुदस्ता प्रो ब्राह्मण २१२५
रुो ८१७६० पौ निमे
११००० किती खुर्दा वगैरे
७३१२० रमण्यांत गुदस्ता प्रो ब्राह्मण साा अजमास ३३००० सरासरी सेरा रुो २८≡।

१२५०००

7496

त्याचे निमे ऐवजातच सद-
रहू ब्राह्मणास दक्षणा वाटावी
ते.

११००० किता खुर्दा वगैरे

७३१२० रमण्यांत ब्राह्मण गुदस्ता
प्रोच होतील सा अजमासे
आा ३२००० यो सेरा
सरासरी २।॥

१२५०००

येकूण तीन पर्याय सदरहूप्रमाणे योजिले आहेत. स्वामीस कलावे म्हणौन लिा आहे. मर्जी असेल तसे उत्तर पाठवावयाची आज्ञा जाली पाहिजे. आज वाडियात दक्षणा मुहूर्तेकरून वो राजश्री नाना फडके यासी अडीचशे रुपये दिल्ही. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa is requested to approve one of the three methods, proposed by Janardan Appaji, for distributing Rs. 1,25,000 as Daxina to the Brahmans in the month of Shravan.*

No. 84] [*30-7-1775*

पैा छ २ जाखर सीत
सबैन आषाढ[1] मास

श्री

शेवेसी जनार्दन आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १ जाखरपर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रावणमासची दक्षणा सवा लक्ष रुपयांत व्हावी व वाड्यांतील व रमण्यातील दोन्ही ठिकाणचे ब्राम्हणाचे शेरे येथून लेहून पाठविल्याप्रमाणे पडावे. त्यास वाडियांत दक्षणा होत आहे त्याचा शेरा भारी पडतो हे काय? रमण्यांतील शेरा आधीच कमी आहे आणि वाड्यांत दक्षणा अधिक पावली म्हणजे रमण्यांतील शेरा कमी होईल. यास्तव राजश्री रामशास्त्री यास पत्र लिहिले आहे व तुम्ही लिहिल्याअन्वये समजाऊन सांगोन बेताप्रमाणे दोन्ही ठिकाणी दक्षणा येथास्थित होऊन सर्व सवा लक्षांत आटोपे असे संभालून करणे म्हणून स्वामीचे पत्री आज्ञा. त्यास ब्राम्हणाची दक्षणा वाड्यातील व रमण्यांतील याचे शेरे पुरंधराहून लेहून आल्याचे अन्वये पडावे. वाडियांत अधिक

---

१ श्रावण पाहिजे. हस्तदोष दिसतो.

शेरा पडतो तो पडू नये, दोन्ही जागा दक्षणा येथास्थित होऊन आज्ञेप्रमाणे सर्व सवा लक्ष रुपयात आटोपले पाहिजे. येविसीचा मार राजश्री शास्त्री यांस समजाऊन सांगितला. त्यास साक्षर ब्राम्हणास सर्वास दक्षणा वाडियांत व्हावे असे करून सवा येकतीसशे ब्राम्हण पहिली नेमणूक जाहाली आहे त्याजखेरीज आणखी हजार ब्राम्हण वाडियांत लेहून दक्षणा द्यावयाची केली आहे. मग विद्वान ब्राम्हण रमण्यांत जावयाचा विरळा राहील. त्यास येक दरवाजा शास्त्री यांचा व आणखी येक असे दोन दरवाज्यास साक्षर ब्राम्हणानी जावे. तेथे परीक्षा घेऊन तीन च्यार रुपयेपावेतो साक्षरास द्यावे. वरकड दरवाज्यास येक रुपया दोन रुपये याप्रमाणे शेरा बसऊन सर्वास दक्षणा द्यावी. वाडियांत दक्षणा च्यार हजार ब्राम्हणास होईल. तो ऐवज वजा करून बाकी ऐवज राहील तो रमण्यांत सदरहू शेऱ्याप्रमाणे वाटावा आणि स्वामीनी लिहिल्याप्रमाणे सर्व सवा लक्षांत आटोपावे असे शास्त्री यांचे विचारे जाहाले आहे. छ मारी खिचडीस ब्राम्हण १९९१४ येकूणीस हजार नऊसे चवदा जाले. साल गुदस्ता १९५२९ येकूणीस हजार पाचसे येकोणतीस जाले होते. तीनसे पच्यासी जाजती जाले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Janardan Appaji explains the distribution of Rs. 1,25,000 as Dakshina to the Brahmans at Poona in the month of Shravan.*

No. 85] [*1-8-1775*

पौ छ ४ जाखर
श्रावण मास.

श्री

सेवेसी बालाजी राम कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ३ जाखरपावेतो येथास्थित असे विशेष. वाड्यात दक्षणा द्यावयाची नेमणूक पहिली गेली आहे. त्याहून जाजती ब्राम्हणास दक्षणा वाड्यात देणार ती रमण्यांतच वाड्यांतील प्रतीप्रमाणे द्यावी म्हणजे चांगले दिसेल, याप्रमाणे करावे. साक्षर ब्राम्हणास तीन च्यार रुा दिल्ह्याने ठीक दिसणार नाही. याजकरिता समजून करवणे. दक्षणा देणार व जवल बसणार याची नावनिसी साल गुाची आहे त्याप्रो नारो आपाजी याचे जागा जनार्दन आपाजी वरकड गुदस्ताप्रो, याप्रो करावे म्हणौन आज्ञा. आज्ञेप्रो राजश्री जनार्दनपंत दादा सुधा राजश्री शास्त्रीबावासी बोलून आज वाड्यात दक्षणा वाटावयाची मना करून येक हजार ब्राह्मण

लिहिलेले राहिले. त्यास उदईक रमण्यांतच दक्षणा नेमल्याप्रो द्यावयाची केली. काही थोर थोर पंडित व काही आश्रित यांची मात्र दक्षणा व्हावयाची आहे. त्यांची हाजिरी वाड्यात घेऊन रमण्यातील ब्राम्हण सुटल्यावर मग यास दक्षणा द्यावी याप्रो केले आहे. रमण्यात याजखेरीज आणखी थोडे बहुत वैदिक येतील त्यास दशग्रंथी यास साहा व पंचग्रंथी यास च्यारपाच व दूरस्थ दोन तीन वरकडास येक कदाचित दोन याप्रो नेमणूक केली आहे. सदरहू येक हजारापौ दोन च्यारसे ब्राम्हणास कोण्हास दाहा पंधरा वीस पंचवीस चालीस याप्रो दक्षणा नेमलेली आहे, त्याप्रो रमण्यात पावेल. वरकडास पधतीप्रो पावेल. दक्षणा वाटणार व जवल बसणार याची नेमणूक आज्ञेप्रो जाहाली. राजश्री भीवराव पानसी यांस लवकर येण्याविसी आज्ञा जाली पाहिजे. आज रमण्यांत खिचडीस ब्राम्हण ,जाहाले त्यांची यादी आलाहिदा पाठविली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Balaji Ram reports that Dakshina will be distributed to Brahmans according to instructions from Purandhar.*

No. 86] *[2-8-1775*

पौ छ ९ जाखर गुरु-
वार प्रात:काल

श्री

शेवेसी बालाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ ४ जाखरपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष श्रावणमासचे दक्षणेस रमण्यांत प्रारंभ आज वीस घटिका दिवसा नंतर जाहाला. त्यास अस्तमानपर्यंत आा ५५७० पंचावन्नशे सतर आसामीस दक्षणा पांच दरवाजे मिलोन जाहाली. त्याचे शेऱ्याची यादी आलाहिदा पाठविली आहे त्याजवरून निवेदन होईल. याजखेरीज वाडियांत दक्षणेचे आंख पडोन नावनिसविार नेमणूक जाहाली. देखील वाड्यातील हरकारे व वाई थेऊर चिंचवडचे मिलोन रुा

५३९२७ वाड्यांत दक्षणा वाटिली व वाटावयाची

३५५९४ वाटिली आा २७८६

१८३३३ वाटावयाची पंडित व आश्रित वगैरे आा

५१४

अजमासे रुा

५३९२७ ३३००

7499

१०३३९ वाड्यांत दक्षणा द्यावयाची केली होती ते रमण्यातं वाटणी होत आहे आा ७२३ यो

६४२६६ ४०२३

याप्रो दक्षणा जाहाली व व्हावयाची. याजपुढे रमण्यांतील शेरा होईल तो दोन दोन प्रहराचे अंतराने आज्ञेप्रो लिहून पाठवितो. वो राजश्री शास्त्रीबावा सागतात त्याप्रो चालत आहे. मी सेरा वाढऊ नये येविसी वरचेवर रात्रंदिवस घडी घडी सांगत राहातो. सेवेसी श्रुत व्हावे हे विज्ञापना.

¶*The paper contains a report regarding the distribution of Dakshina.*

No. 87] [*2-8-1775*

श्री

सेवेसी बालाजी राम कृतानेक सा नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता छ ४ जाखरपावेतो येथास्थित असे विशेष. श्रावणमासची दक्षणादेखील खिचडीचा खुर्दा दोन लाख रुपयांत वाटावी, जाजती करू नये म्हणौन सरकारचे पत्रात राजश्री नारोपंत नानास आज्ञा आहे. येविसी वो राजश्री शास्त्रीबावासहि पूर्वी सांगितले आहे त्याअन्वये येथे जाहाले पाहिजे. त्यास शास्त्रीबावानी वाड्यात दक्षणा कालपावेतो बावन हजार तीनसे येकुणीस रुो वाटले. आजहि दोन तीनसे पावेतो ब्राम्हणास आश्रित सुधा दक्षणा व्हावयाची आहे, ते चालीस लागली आहे. आज वाटणी होते यास अजमासे अठरा वसि हजारपावेतो लागतील. याजवेगल चिंचवड व थेऊर व गंगापूर व वाई व यवतेश्वर व दुखणेकरी मिलोन पंधरा हजारपावेतो पाहिजेत. त्यास रमण्याखेरीज नवद हजार रुपयाचा अजमास होईलसा वाटतो. तेव्हा येक लक्ष दाहा हजार रुा बाकी रमण्यात वाटायास राहिले. त्यास ब्राम्हण अजमासे तीस हजार होतीलसे वाटते. त्यास च्यार रुपयांचा सेरा रमण्यात पाडावा असा बेत घालून दिल्हा आहे. त्यास च्यार रुो सेऱ्याचा बेत धरला आहे. या अजमासे सवा लाख रुा पाहिजेतच. याजवर चहूचा बेत घातला आहे याहून जाजती होईलच. तीन रुपयांचा बेत धरल्यास कदाचित सवा लक्षांत आटोपेल, असे दिसते. त्यास स्वामीची आज्ञा तर दोन लक्षाची, याजकरिता मी राजश्री नारोपंत नानास व शास्त्रीबावास बहुता प्रकारे सांगितले आहे. सेरा त्याणी पहिल्याने घालून दिल्हा होता त्याचा अजमास त्यास समजाविला आणि सेरा उणा कराविला. याहूनहि कमीच सेरा धरावा म्हणौन सागत असता त्याची मर्जी की, फार कमी केले, आता उणे करावयाचे

याच सैन्याने दोन लक्षांत करू म्हणतात. परंतु पंचवीस जाजती
ऌसे दिसते. सेन्याची यादी आलाहिदा पो आहे. सेवेसी श्रुत होय हे
ा. मीहि वरचेवर सेरा वाढऊ नये म्हणौन सागतच आहे. हे विज्ञाप्ति.

laji Ram gives the estimates of money required for being distributed the Brahmans as Dakshina in the month of Shravan.

88] [Recd. 10-4-1777

पौ छ १ रोवल सुा
सबा सबैन चैत्र मास.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक राणोजी बलकवडे ताा जयेदुर्ग चरणावरी मस्तक ठेऊन विज्ञापना. ताा छ २७ माहे सफर पावेतो सेवकाचे व जंजिरे मजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र छ ५ मोहरमचे सादर जाहालें ते छ २७ सफरी प्रविष्ट जाहालें. तेथे आज्ञा कीं, ताा उदेरी येथील ब्राह्मण तोतया पतित याचे संसर्गी आवसिष्ट राहिले, त्याचे प्रायेश्चिताची वेवस्था कलमें बितपसील:

साक्षात पंक्तीच्यांस

येकवल पंक्ती जाली त्यासी मुंडणपूर्वक चांद्रायेण १

बारावे पंक्तीपासोन मासपर्यंत येकवीस दिवसपावेतो पंक्ती जाल्या असतील त्यास मुंडणपूर्वक दोन च्यांद्रायणे व येक प्राज्यापत्य कलम १

येका मासापुढें दोन च्यांद्रायणे व येक प्राज्यापत्य यावरें आधिक प्रतिमासी येक येक प्राज्यापत्य याप्रो- आठ महिने ज्यांसी पत्की जाली असेल त्यास तीन च्यांद्रायणे मुंडणपूर्वक कलम १

बहुत वेला, दुसरे पंक्तीपासून ज्यास पंक्ती जाल्या असतील त्यास मुंडणपूर्वक च्यांद्रायेण व दर पंक्तीस येक येक प्राज्यापत्य आधिक याप्रों नवे पंक्तीस दुसरे चांद्रायेण येकूण दोन चांद्रायणे कलम १

कलमे ४

7501

श्राधाच्या ब्राम्हणास

क्षणपूर्वक पिंडश्राधी जेवले त्यास मुंडणपूर्वक तीन च्यांद्रायण पूर्वांग-उतरांगसहित. कलम १

अभिश्रवण करून इष्टपंक्तीस जेविले त्यास मुंडणपूर्वक येक च्यांद्रायेण व तीन प्राज्यापत्ये. कलम १

ब्रम्हार्पण श्राधी क्षण घेऊन त्यास मुंडणपूर्वक पूर्वांग उतरां दोन च्यांद्रायण. कलम

अभिश्रवण मात्र केले इष्ट प जेविले नाहीत त्यास मुंडणपूर्वक प्राज्यापत्ये. कलम

कलमें च्यार सदहूप्रो येक वेल घडलें असेल त्यास. याप्रों दरपंक्तीस करावें कलम १

श्रावणी ज्याणी केली त्यास

आच्यर्यत्व ज्याणी केलें त्यास हुजूर पाठवणें. आज्ञा करणें ते केली जाईल. कलम १

समागमें ज्याणी श्रावणी केली असेल त्यास मुंडणपूर्वक अर्धच्यांद्रायण येकूण प्राज्यापत्ये च्यार. कलम १

कलमे

२

सदरहूचे प्रायेश्चिताची वेवेस्ता प्राज्यापत्यें प्रत्यम्नाये

सुवर्ण प्रत्यम्नाये रुा
९० उतमपक्ष मासे ४०
२९ मध्यमपक्ष मासे २०
१२॥ कनिष्टपक्ष मासे १०

रजेत प्रत्यम्नाये रुा
४ उतमपक्ष मासे ४०
२ मध्यमपक्ष मासे २०
१ कनिष्टपक्ष मासे १०

तीर्थ प्रत्यम्नाये तीर्थयात्रायोजन येक. येकूण मासे च्यार. कलम १

जप प्रत्यम्नाये गायत्री जप दाहा सहस्त्र. कलम १

येणेप्रों प्रत्यम्नाये च्यार प्रकारचे शक्तीनसार योजावे. आठ प्राज्यापत्ये म्हणजे येक च्याद्रायण होते. प्राज्यापत्य प्रायेश्चितास ब्राम्हणभोजन तिहींहून उणें नसावें. तरी सदरहूप्रो प्रायेचित देवणे म्हणौन आज्ञा. ऐसीयासी ता

मजकूरचे ब्राम्हणास ताकीद करून जंजिरे मजकुरीचे ब्राम्हणास ताकीद करून जंजिरे मजकुरीं आणविले आहेत. चौकसी करून प्रायश्चित द्यावयायोग्य ज्यापासून कर्म घडले असेल त्यांस आज्ञेप्रो प्रायेश्चित देवितो. सेवेसी श्रुत होय हे. विज्ञापना.

¶*This is an order prescribing the various forms of penance to Brahmans who contaminated themselves by dining and living with the Pretender.*

No. 89] [*0-6-1786*

यादी श्रावण मासची दक्षणा रमण्यात देणार व जवळ बसणार सुा सबा समानीन मया व अलफ

दरवाजा पहिला

दक्षणा देणार	जवळ बसणार
१ बाळाजी जनार्दन	१ भिकजोसी पंचनदीकर
१ बापूभट सिंत्रे	१ त्रिमंगळाच्यार्य
१ भास्कर दीक्षित कर्वे उपाध्ये	१ नीलकंठ जोसी व्येव्हारे
१ कासिनाथ शास्त्री	१ माहादेव दीक्षित आबटे
	१ बापू पाठक

दरवाजा दुसरा

दक्षणा देणार	जवळ बसणार
१ रामशास्त्री	१ रामचंद्र दिक्षित बोक
१ माहादेवशास्त्री	१ विद्याधर जोसी
१ सदासिव दीक्षित कर्वे उपाध्ये	१ सदासिवभट नानल
१ जगनाथभट ढेकणे	१ वासुदेव जोसी चिपलोणकर
	१ हरिदीक्षित दात्ये
	१ चतुर्भुज देव
	१ गंगाधर दीक्षित गडबोले

दरवाजा तिसरा

दक्षणा देणार	जवळ बसणार
१ आमृतराव विश्वनाथ	१ कृष्ण दीक्षित रानडे
१ सदासिव दीक्षित दात्ये	१ बाबूभट लेले
१ जयवंतराव येशवंत पानसी	१ बाजी जोसी श्रीवरधनकर

१ बालंभट कर्वे उपाध्ये
१ बालजोसी मालगुंडकर

१ चिंतामण शास्त्री काणे
१ गंगाधरभट विध्वंस
१ रामजोसी रोडे
१ बापू जोसी चापेकर

दरवाजा चौथा

दक्षणा देणार	जवल बसणार
१ दाजीबा फडके	१ त्रिंबकशास्त्री
१ लक्ष्मणराव रास्ते	१ रामभट निजसुरे
१ सदासीवभट सित्रे	१ रघुनाथ जोसी सातारकर
१ बालंभट थथे	१ विनायेक दीक्षित गुढगेकर
—	१ ———————
४	—

¶*The names of persons and parties who distributed Dakshina to Brahmans at the several entrances of the enclosure are given in this paper.*

No. 90] *[18-10-1788*

पौ छ २१ मोहरम सुाां
समान

श्री

सेवेसी आपाजी राम सहस्त्रबुध्ये कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तां छ १७ मोहरमपावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी राजश्री केसोपंत व गोविंदपंत याचे पत्री फर्कोबादेचे जासुदा- विसाचा मजकूर व जबानीची नकल पाठविली. याचे उतर कचे वर्तमान राजश्री गोविंदपंत याणी लिा आहे. पुण्यांत जबानी लिहून दिल्हे तैसे येथे काहीच जाहाले नाही व त्याचेबो माणसे व पत्रहि मागहून कोणाचे नवते. वरकड श्रीमंतांची स्वारी कुंभारीस व कचेश्वरी देवदर्शनास जात येत आहेत. छ १९ रोजी कोपरगावचे बागेत उभयता श्रीमंत वगैरे मंडली झाडून आवलीभोज्यनास गेले. तेथे येक संन्याशाचे सोंगाने आंगातून भोज्यनास आला. समय पाहून भोजनास घेतला तो त्याचे चिन्ह काही ब्राम्हणाचे नवे. सोंगसे दिसोन आले. मग समय भोज्यनाचा याजकरिता पंगतीभेद करून पात्र ठेविले. भोज्यनास बसला तो चित्रावली घातल्या नाही. त्याजवरून पुसो लागलो तो मौन्य जाहला. काही बोलेना. मग भोज्यनोतर बाा माणूस देऊन घेऊन आलो. चौकसीकरिता

कानास चाप लाविले व जेरबंद मारिले. तो कबूल जाहला की, मी कोष्टी मौजे लासणगांव पो चांदवड येथील पोटाकरिता सोंग केले. त्याजवरून त्यास बिडी घालून ठेविला आहे. व श्रीमंतसुधां झाडून मंडली संसर्ग दोश जाहला म्हणून येक दिवस उपोशण करून छ १७ रोजी प्रात:काली पंचगव्य घेऊन भोजन केले. हाली त्याची चौकसी करावयाकरिता मौजे लासणगावी माणसे पाठविली आहेत. नंतर काय चौकसीने ठरेल ते स्वामीस लिहून पाठवीन. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram Sahasrabudhe reports how a man, weaver by caste, got entrance into Bajirao's residence and dined with him and his brother saying that he was a Brahman. He was subsequently punished for this.*

No. 91] *[13-4-1795*

श्री

आपल्य हरीचे सिर सा नमस्कार विज्ञापना. तागाईत चैत्र वा ९ सोमवार ावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष. आक्षेत्रितीयेच्या उदकुंभाची याद लस्क-त आहे. श्राधाचा दाखला नाही तो लिहून पा म्हणोन लि. त्यास सन सैनापासून सन आर्बा तिसैनपावेतो शोध केला; परंतु आक्षेत्रितीयनिमित्य श्राधखर्च ऐसा दाखला निघाला नाही. वैशाख मासच्या कीर्दी एक दोन सालाच्या पाहिल्या व श्राधाखर्चाचा * * व धर्मादायाचा व मोघम खासगत खर्चाचे आवर्जे पाहिले; परंतु दाखला कोणत्याहि सालात निघाला नाही. उदकुंभाचे दाखल्याची याद पेशजी पाठविली. आक्षत्रितीयेनिमित्य खर्चास नख्त व वस्त्रें मानकरी व सिलेदार व सुभे लस्कर व स्वारिया सरकारकून यास काय ावत असेल ते लेहून पा म्हणोन लि, त्यास श्रीरंगपटण स्वाऱ्याच्या दोन ादी पेशजी पा आहेत त्याखेरीज काही राहिले नाही; व मुकामीची साले सन ्सने व सलास व आर्बा तिसैन तीन सालात पाहिले, परंतु पावल्याचा ाखला नाही.

¶*The writer says he is unable to trace the list of previous expenses incurred or the anniversary rites of the Akshatritiya day.*

---

o. 92] *[15-9-1795*

श्री

यादी आनंदराव गोपाल जोसी याचे वाड्यांत बाजीराव मोरेश्वर भावे कुटुंबसुध्धा ्तात. त्यास बाजीराव मोरेश्वर याची कुणबीन होती ती जातीची चांभारीण

समजली. न समजता पूर्वी चार महिने संसर्ग तिचा घडला. सा प्रायश्चित्त मारनिलेस व त्याचे घरी बिऱ्हाडास राहातात त्यास. सुरू सीत तिसैन छ १ रबिलोवल. प्राज्यापत्ये.

४८ ब्राह्मणास दर आा
२४ स्त्रियास दर आा
२४ लाहान मुले उपनीत सोळा वर्षापूर्वी असतील त्यास दर आा
४ शूद्रास दर आा

नरहर गोपाळ यास मध्ये भीत आहे. परंतु येक कूप; जलादि संसर्ग घडला सा त्यांस व त्याचे विभागांत राहातात यास आनंदराव गोपाळ यास सांगितले आहे तदर्थ लिहिले अन्वये करावे.

पंधरा दिवसाचे आत संसर्ग ज्यास घडला असेल त्यास संसर्गानरूप योजून द्यावे.

¶*This paper mentions punishments assigned to the members of the family Bajirao Moreshwar for having entertained in service a maid servant of the shoe-maker's caste.*

No. 93] *[0-7-1797]*

श्री

यादी दक्षणा श्रावण मास
रमण्यांत सुाा समान तिसैन

सन सलास खमसैन, रमण्यात दक्षणा जाहाली नाही. शहरांत खबूतरखान्यांत व विष्णु विश्वनाथ व हरि दामोदर व बाबूराव देवस्थले यांचेवाड्यात वाटली.

सन खमस खमसैन

१ दरवाजा पूर्वेकडील विा राजश्री नाना

१ विा राजश्री भाऊ

सन आर्बा खमसैन

१ दरवाजा पूर्वेकडील वोढ्याजवळील विा राजश्री नाना

१ दरवाजा पूर्वेकडील मधील वि राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ

१ दरवाजा पूर्वेकडील देवसंनिध विा राजश्री माधवराव

१ दरवाजा पश्चमेकडील विा राज भाऊ

१ विा राजश्री विश्वासराव
१ विा राजश्री माधवराव
१ विा राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ
—
५

सन सीत सितैन
१ दरवाजा उतरेकडील विा राजश्री राव
१ दरवाजा पूर्वेकडील विा राजश्री दादा
२ दरवाजे दक्षणेकडील
१ विा राजश्री रामचद्र गणेश व कृष्णराव बलाल
१ विा राजश्री माधवराव विश्वनाथ व चिंतो अनंत
—
२
—
४

१ दरवाजा पश्चमेकडी(ल) विा राजश्री भाऊ
१ दरवाजा पश्चमेकडील विा विश्वासराव
—
५

सन सीत खमसैन
१ विा राजश्री नाना
१ विा राजश्री भाऊ
१ विा राजश्री दादा
१ विा राजश्री विश्वासराव
१ विा राजश्री माधवराव

¶*The paper gives the names of persons who distributed Dakshina at the several entrances, in previous years, near the Parvati hill, in the month of Shravan.*

No. 94] *[16-9-1803*

श्रीगजानन

॥ श्री जगदंबा प्रसन्न ॥ गौब्राह्मणप्रतिपालक ॥
॥ श्रीमंत बाबासाहेब मुख्य प्रधान ॥ ॥
॥ शुभचिंतक बाळ जोसी ममदापुरकर वेदो ॥
॥ कृ आसिर्वाद विनंति विज्ञापना प्रश्नोत्तर ॥
॥ येशवंतराय होळकर याचे दिवस पूर्वाप्रमा ॥
॥ णे नाहित आवधि आश्विन वद्य १४ पासून ॥
॥ आज्ञेप्रमाणे चालतिल मार्गशीर्ष श्रुद्ध ७ ॥
॥ परियंत श्रीमंत जे आज्ञा करतिल त्याप्रमा ॥

7507

॥ णे चालेल श्रीमंत कृपाळू होउन आज्ञा क ॥
॥ रतिल ते मान्य करिल आमृतराव हास्त ॥
॥ गत मार्गशीष वद्य १३ परीयंत होईल पुढे ॥
॥ होळकरास मोहिम सागतिल त्याप्रमाणे जा ॥
॥ उन स्वामींचे आज्ञेप्रमाणे कार्यसिध्धि करून ॥
॥ जिकडे माहाराज रवणा करतिल तिकडे जा ॥
॥ यिल यास आवधि पौष वद्य ९ व माघ शुध्ध ७ ॥
॥ पासून भोसले होळकर व सिंदे श्रीमंताचे ॥
॥ आज्ञेप्रमाणे वर्तुन इंग्रेजाचे पाराभव मा ॥
॥ घ वद्य ९ पासून चैत्र वद्य १३ परीयंत इंग्रेजाचा ॥
॥ पराभव होऊन ते आपल्या देशास जाति ॥
॥ ल निर्वेध गौब्राह्मणप्रजापाळन स्वाम क ॥
॥ रतिल येणेप्रमाणे मानोदय सिध्धिस श्रीज ॥
॥ गदंबा नेईल श्रीमंतानि राजदर्शन साता ॥
॥ रयास जाऊन घ्यावे मित्ति आश्विन शुध्ध १ ॥
॥ शके १७२९ हा वेदोक्त आशिर्वाद ॥

¶*This is an astrological forecast regarding the political situation given by one Bal Joshi of Mamadapur. He refers to the plans of the Peshwa, the Holkar, and the English and predicts the triumph of the former over the other two. The result, as we know now, was quite the contrary to what was predicted. Bajirao apparently relied more on the help of the stars than on his own efforts in retrieving his fallen fortune.*

No. 95] [*About 1790?*

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामींचे सेवेसी

मुकुंद मानभाव विनंती उपरी. आपला गुरु होता तो मृत्य पावला. त्याचे आपण दोन च्यार सिश होतो. तेव्हा चौघानी करार केला की, चौघामध्ये येकास पट देऊन गुरूचे स्थानी बैसवावे. तेव्हा चौघाचे मते गुरुस्थानी चक्रपाणी यासी बैसविले. परंतु गुरूची देवपूजा आहे ती चक्रपाणी मानभाव यास देत नाहीत. आमचे मार्गाचे लोकानी सांगितले परंतु मानीत नाही. तरी

कृपालु होऊन कृष्णोबा व गोंदोबा मान(भाव) यासी ताकीदपत्र द्यावे की, देवपूजा चक्रप्राणी मानभाव याचे स्वाधीन करणे. म्हणून पत्र द्यावे.

¶*Nana Fadnis is requested to issue orders that the idols and the necessary implements be restored to one Chakrapani Manabhav who had succeeded to his Guru's seat.*

No. 96] [*1741-61 ?*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री

भाऊ स्वामी गोसावी यासी

आश्रित गोपीनाथ दीक्षित आनेक आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखणआज्ञा केली पाहिजे विशेष. आपली आज्ञा घेऊन आलो ते सुक्रवारी वाईस दाखल जाहालो, तो येथे अधान पूर्वांग प्रयाह जाहाले होतें. आपण अलियावर प्राधान सिध करून रविवारी अधान सिध करविली. पुढे आन्वारंभणीया व दर्शपूर्णमास होत तोंपर्यंत वेदमूर्ति राजश्री कृष्णंभटानी राहून घेतले. श्रोती कितीयेक ग्रंथ वाचून घ्यावयासी प्रारंभ केला आहे. याची आस्था व भक्ति पाहून राहिलो. आधान आपल्या कृपेने उतम प्रकारे जाहाले. आपणास कलावे म्हणून लिहिले आसे. पूर्वी गवडे सरकारचे रवाना केले त्याबरोबर आपणास आसीर्वादपत्र पाा होते, ते आणास पावलचे आसेल. सूज्ञे अलमतिपल्लवितेनेत्याशी :

¶*Gopinath Dikshit writes to Bhausaheb about the performance of certain rites.*

No. 97] [*1778*

राजमंडळ सुाा समान सबैन

नवस खर्च ञाा ताा पौ रुपये

२

झडती तसलमात पौ

ताा जनार्दन गोपाल कारकुन सिलेदार पौ मााानिले याणी हरि बलाल याचे लस्करात कापड जलदीने जाऊन पोहोचावे म्हणून देवास नवस बेटेन केला होता त्यास नख्त रुाा

२

¶*This refers to the fulfilment of a vow made to some deity for the safe arrival of clothes at Haripant Phadke's Camp.*

7509

No. 98] [Before 1729?

श्री

राजश्री बाजीराऊ पंडित
प्रधान गोसावी यासीं

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री कान्होजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन केले पाहिजे. यानंतर आपण पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन सविस्तर कलों आले. वेदमूर्ति राजश्री कासी उपाध्ये व संगमेश्वरकर जोसी याचा कजिया आहे, याकरिता उपाध्यास पाठऊन दिल्हे पाहिजेत म्हणोन लिहिलें. यैशास उपाध्याचे मुखे च्यातुर्मास पुराणश्रवण होत असतें. पुराणश्रवण च्यातुर्मास जाहाल्यावरी पाठऊन देऊन. जाणिजे रा छ २९ जिल्काद. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa ordered into his presence Kasi Upadhya to give evidence in a dispute between him and the Joshis. He is informed by Kanhoji Angria that the priest has been engaged for expounding the holy scriptures during the four monsoon months and may not leave his place till then.*

No. 99] [1740-61]

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

पोष्य अंताजी नारोयंण+ साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ २९ रमजानपावेतो येथास्थित असे विशेष. मौजे करंदी ताा चाकण या गावी श्रीभगवतीचे देऊल बहुता दिवसाचे आहे. ते जमिनीत गडदले आहे. ते रा नारोजी कडू उघडणार. तरी तुम्ही दोघे प्यादे रखवालीस देणे म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रमाणे दोन प्यादे मौजे मजकुरी पाठविलें होते. त्याणी देउलाचा पाया खणला, परतु तेथे काही नाही. नारोजी कडूचे पत्र आले तेच सेवेसी पाठविले आहे, त्याजवरून विदित होईल. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Antaji Narayan writing to the Peshwa reports about fruitless exploration of the relics of a building which, it was alleged, contained an idol of a goddess.*

+ फडणीस; सदाशिवराव भाऊचा सासरा.

No. 100] [1720-40 ?

श्री

श्रीमदतुलधिषणवैभवोपार्जित
साम्राज्यलक्षण लक्ष्मीरक्षण दंडि-
तोदंडदोर्दंड गोब्राह्मणप्रतिपालक

श्री बाजीराव बल्लाळ प्रधान पंत याप्रति आश्रित मुकुंदभट्ट तथा ज्योतीभट्ट माहवलीकर याचे अनेक त्रिकाल वेदोक्त आशीर्वाद उपरी: तुमचा निरोप आला होता की श्रीहनुमंतास अन्ना उपोषणे करा. यास नव उपोषणे झाली. यास देवापाशी प्रार्थना करून प्रसाद मागितला. त्यास कार्यसिद्धि करितो म्हणून उत्तम मस्तकीचा प्रसाद दिल्हा. या देवाजवळ अति हटनिग्रह कार्यास येत नाही. नाना प्रकारीचे भय दाखवितो आहे. यास दाहा ब्राह्मण मिळोन प्रार्थना केली. त्यास दृष्टांत जाहाला की उपोषण करून शेवा करू नका. आपली मनकामना जे असेल ती पूर्ण करितो. अशास तुमची आज्ञा जाप्रमाणे होईल त्याप्रमाणे वर्तणूक करू. त्यास दाहा, दाहा प्रकारीचा गोष्टी सांगतील ते आपण चितावर न घेणे. या देवाजवळ आपला भावार्थ असो देणे. कार्यसिद्धी जाहाली असाच निश्चय असो देणे. देवाची पूजासामग्री पाठऊन देणे. केशर, कस्तुरी, मोगरेल, अतार, बुका, कापूर, उदकाड्या, इतकी सामग्री पाठऊन देणे. यास बापोजी मोरा खासबारदार, सांगता कळो येईल. या पत्राचे प्रतिउत्तर सत्वर पाठवणे. सूज्ञाप्रति बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद.

¶*Mukund Bhat of Mahuli requests Bajirao to send articles for the worship of Hanumant who had been pressed for granting Bajirao's desires and who had assured him success.*

No. 101] [1740-61 ?

श्रीरामचंद्र प्रसन्न

श्रीमंत हरिभक्त परायेण राजमान्य
राजश्री भाऊ गोसावी यांसी

प्रति खंडोबा गोसावी वो देहू. अनेक असीर्वाद उपरी. येथील क्षेम जाणोन आपलें स्वस्तिक्षेम लिहावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. श्री-तुकोबादेव याचा उच्छाव फाल्गुन वद्य पंच्यमी आहे. त्यांसी वरसास गावकरी वेट बेगारीस येऊन साहित्य करीत होते. आणि यंदा आपण गाव तकूब केलें. याजकरितां कामाकाजांस कोण्हीं येत नाही. बरें; आम्हांस मोहछावाची निकड

7511

येऊन लागली आहे. त्यांसी पूर्वापार तुमचे वडील साहित्य करीत आले आहेत. आणि तुम्हीहि सांभाल करीतच आहा. परंतु येदांच मोहत्छावाचे साहित्य तुम्ही केले पाहिजे. मोहत्छाव जाला म्हणजें भेटीस येऊ. भेटीनंतर सर्व वर्तमान विदित होईल. सुज्ञाप्रति फार काय लिहिणे ? गावकरियांसी मोहत्छावचें साहित्याविसी ताकीदपत्रें अगत्यरूप पाठऊन दिली पाहिजेत. आणि आपणहि कांही साहित्य करणे. ज्याप्रमान श्रीमंत कैलासवासी आपा सांभाळ करीत गेले त्याचप्रमान आपनहि कराल. बहुत काये लिहिणे हा आशीर्वाद.

¶*Khandoba Gosavi asks for the Peshwa's help for the annual festivities in honour of Tukarambuwa, the writer's grandfather.*

No. 102] *[About 1755.*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री भाऊ
स्वामी यां

प्रति शुभचिंतक बलकर्णगीर गोसावी असीर्वचन विज्ञापना. येथील क्षेम ता। जेस्ट वद्य १३ मुकाम सिरोंज. आपल्या कृपावलोकने येथास्थित असे विशेष. महंत श्री ज्वालागीरबावा यांची आपले आज्ञेनरूप रा। लक्ष्मण शंकर यानी सेवा केली. त्यास त्यांचा का(ल) जाल्या * * * * * * आपल्या गुरूस समागमे घेऊन श्री स वास्तव करावयासी गेले. नवाब मनसूरअलीखा वजीर यांसी बलवडसिंग राजे कासीकर यांचे विद्यमाने देवघेव जाला. त्यास दैवयोगे वैशाख वद्ये येकादसीस श्रीमधे महंत समाप्त जाले. आम्ही ये प्रांते सिरोजे होतो. काही शिष्यसमुदाय बावासमागमे कासीत होता. तेथील गुंता नवाब वजीर याचा पुत्र सुज्यायेतदौला यांजकडे आहे व राजे बलवंडसिह यांजकडेहि आहे. तो उगऊन घेतला पाहिजे व श्री मध्ये बावा समाप्त जाले, त्यास त्यांचा भडारा करावा लागतो. यास्तव येथून समुदायानसी कासीस जावयाचा उदेश आहे. हे सिध्धीस पावणे ते आपल्या कृपेने पावल. महंतावर सर्व प्रकारें माहाराज पंत प्रधान स्वामीची व आपली कृपा होती म्हणून चालत होते. त्यामागे हा वेव्हार चालणे पूर्वे(व)त प्रा। कृपा होईल तेव्हा चालेल. आपल्याविना आम्हास दुसरे नाही. येविषई माहाराज राजश्री पंत प्रधान स्वामीस विनंती पत्र लिहिले आहे. साहित्यपत्रे नवाब सुज्यायेतदौला व राजे बलवंडसिंग यासी पाठवावयाविषई अज्ञा करावी कीं, ज्वालागीर गोसावी याचा वेवसाये तुम्हांकडे असल तो व याची वस्तभाव कासीत असल ते यांचे

शिष्य बालकर्णगीर गोसावी कासीत आले आहेत यांच्या स्वाधीन करणे. याप्रा पत्रे सादर जालिया तेथील कार्यभाग संपादून असीर्वचन द्यावयासी दर्शनास येतो. तदनंतर मठाच्या * * * * * * स्थली होईल त्या स्थली वास्तव करून असीर्वचन देऊ. आसीरवचन वचने * *

¶*Balakarna Gir Gosavi writes to Bhausaheb requesting the addressee to restore him his Guru's belongings at Benares.*

No. 103] [*December 1746*

सुा सबा आर्बैन

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान

खर्च खाो मुा

नवस खर्च

परभारे रत्नशालेपैकी

छ १९ जिल्हेज श्रीगणपति रांजणगांव विाा सौ गोपिकाबाई याच्या डोल्यास पीडा जाहाली सबब द्रिष्टीचा नवस केला. राा बचाजी विश्वनाथ ताा रामाजी विश्वनाथ बरवे सोन मासे ६=

छ १८ जिल्हेज श्रीदेव जेजुरी सौ उमाबाई राा रामाजी विश्वनाथ सोन्न तोले

६= द्रिष्टी

१॥ पालणा व बेया (?)

१ पालणा राा रामाजी विश्वनाथ

॥ बेया राा चितो विश्वनाथ

१॥=

रु

तेरीज येकंदर परभारे पौ सोने

वजन तोले तोले

१॥।१

¶*The fulfilment of a vow for curing the eyesore of Gopikabai is narrated in this extract of the Peshwa's accounts.*

No. 104] [20-12-1749

सुा खमसेन

राजमंडळ

स्वारी राजश्री पंत प्रधान

खर्च खाा मुाा नवस खर्च

रत्नशालपैकी

छ २० मोहरम छ ९ रोजी चिरंजीव राजश्री विश्वासराव व राजश्री माधवराव यांसी देवी आल्या. त्यास रसानगी व ताा बाळू पलांडा घडीत गुाा खंडोजी जड्या प्रतिमा देवीच्या २ येकून सोने वजन तोळे २॥

¶*Two small gold images of a deity of the epidemic are given as gifts for the cure of small-pox from which Vishvasrao and Madhavrao were suffering.*

No. 105]

मध्वनाथस्वामी

श्रीशंकर

श्रीमंत माहाराज राजेश्री दादासाहेब

स्वामीराजाचे सेवेसी

विनंती आज्ञांकित बापूजी आनंत मुकाम शहर आवरगाबाद. सिरसाां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर श्रीहरिभक्त परायेणे माहराज श्री याचा उछाव कसबे सेंदूरवादे येथे मार्गशीर्ष पौर्णमेचा होत आसतो. स्वामीचे हातचे देव स्थापित आहे. तेथेंहि तिथिप्राा उछाव होत आहे. आता स्वामीचे नातू वेदशास्त्र वेदोक्त राजश्री त्र्यबकाच्यार्ये आहेत. त्याचे हाते उछाव शतशिष राजश्री आमृतरायजी करवितात. त्यास स्वामीचे देव जासुदपुरियात श्रीमाहादेव आहेत. तेथिल तपसलि रायजीनी लिहिले आहे त्याजप्रााच आहे. त्यास माहाराज श्रीशंकर उपासक आहेत हे पूर्ण जाणून रायजीनी राजश्री त्र्यंबकराव पाठविले आहेत. त्यास याचा हेत परिपूर्ण करून दाहा ब्राह्मणाचे अन्न करून दिल्हे पाहिजे. देणार धणी समर्थ आहेत. श्रीनाथजीकारिता राजश्री विठल सुंदर याणी पाणी तीन कोसावरून नळ बांधून आणून दिल्हा आहे. त्यास या स्थली माहाराजानी दाहा ब्राह्मणाचे अन्न करून दिल्हीयाणे थोर कीर्त आाणि सःतपात्री

7514

जाणून ब्राह्मणास हर्ष करनार धणी समर्थ आहेत. सर्व मजकूर राजश्री रायेजीनी लिहिले आहे त्याजवरून विदित होये. सेवेसी श्रुत्य होये हे विज्ञाप्ति.

¶*Bapuji Anant flatters the religious sense of Dadasaheb and requests him to grant an allowance sufficient to feed ten Brahmins at the Shiva's temple at Shendurvade.*

No. 106] [*11-10-1741*

राजमंडळ

सुा इसने आर्बैन

स्वारी राजश्री पंत प्रधान
खर्च खा मुशाहिरा

नवस खर्च
पोतापैकी रुपये

माहे राखर

२ छ १४ रोज श्रीमार्तंड जेजुरी विा मातुश्रीबाई पादुका २ येकूण रुपे रुपये भार २ यो रुपये भारभार

माहे रबिलोवल

२॥ छ ४ रोज राजश्री रघुनाथपंतास व जनार्दनपंतास देवी आल्या आहेत सबब नवस सेखसला मलिदा विा मातु(श्री) कासीबाई

३ छ १६ रोज सैद सादत पीर कसबे पुणे राजश्री सदासिवपंतास देवी आल्या होत्या ते समई कंदोरी नवसिली होती ती केली सबब

१ नजर पिरास
२ खुर्दा फकिरास वाटावयास

५॥

माहे सफर

१ छ २९ रोज श्री देव कुरकुंब राजश्री सदासिवपंतास देवी आल्या होत्या सबब विा भिऊबाई नेत्र २ येकून नख्त बा खाजी रेखोजी जासूद जथे लिंगाजी नाईक

माहे साबान

३३६ छ ११ रोज देणे श्रीवेंकटेश राजश्री सदासिवपंतानिमित्य सोन्याचा पालणा करून यैसा नवस केला होता तो सोन्याचा पालणा केला. सोने वजन तोले २४ दर १४ पालणा मातुश्रीबाईनी समागमे नेला.

तेरीज येकंदर रुपये

३३६ माहे साबान

२ राखर

१ सफर

५॥ रोवल

३४४॥

¶*This paper gives the expenses incurred in fulfilling the vows to certain deities including Pirs for allaying the effects of small-pox of Raghunathrao, Janardanpant and Sadashivrao Bhau.*

No. 107] [*About 1786 ?*

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री समस्त
ब्राम्हण क्षेत्र श्रीत्र्यंबकेश्वर यांसी

प्रति रामशास्त्री नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. नरहरि रनालकर ब्राम्हण भ्रष्ट होऊन यवनमय जाला. त्यास प्रायश्चित्ताचा आधिकार नाही असे असतां शामाचार्यप्रभृति काहीं ब्राम्हण पैठणकर यानी प्रायश्चित्त देऊन पंगतीव्यवहार केला. ते गोष्ट यथास्थित न जाली. यास्तव नरहरीचा चुलतभाऊ नारो येशवंत याजकडून त्याचा घटस्फोट करऊन प्रायश्चित्तार्थ श्रीत्र्यंबकेश्वरच्या दाहा कोसाच्या एकसे येकवीस प्रदक्षणा नेमून क्षेत्रास पाठविला आहे. याने तेथे नित्य गंगास्नान करून श्रीच्या प्रदक्षणा कराव्या-याप्रो करऊन प्रदक्षणा जाल्यावर पत्र देऊन पाठवावा.

¶*Penance is prescribed by Ramashastri to one Naro Yeshwant for having dined with his cousin who was reconverted to Hinduism without religious sanction. The penance prescribed for the man was to go round the temple of Tryambakeshwar a hundred and twenty-one times, each trip being a distance of 20 miles.*

No. 108]

श्री

विनंती उपरी. जंगम रुद्राचे आवर्तन करीत होता तो आपणाकडे पा. त्याचे पारपत्य केले असेल अगर करावयाचे ते होईल. वाणी, ज्याणे अभिषेकपात्र धरिले होते, तो ते समई पळाला; सापडला नाही. शोध केला तेव्हा आज तीन

रोज जाहाले तो सापडला. त्याची चौकसी मनास आणिता, जंगम कशाची पूजा सांगतो हे मला ठाऊक नाही. पूजा देवाची मला सांग. इतके बोलिलो. इतकियात ब्राम्हण त्या मार्गे आले त्याणी आईकून जंगमास धरून नेला. वरकड ब्राम्हणाचे कर्म करवितो हे काही आपणास ठऊक नाही. रुद्राभिषेक हे आपणास ठाऊक नाही. त्यास वाणी अटकाऊन ठेविला तो आजारी आहे. याजकडे अन्याये विशेष दिसत नाही. वाणीयास हगवण लागली, मरतो. त्यास जावयास निरोप द्यावा की कसे? वाणी तर म्हणतो की, पूजा मात्र सांगतो म्हणून बोलिला. त्यास हा काये सांगतो हे काही मला कलले नाही असे वाणी म्हणतो. आपण शास्त्रीबावास विनंती करून उतर पाठवावे. उतर आलियानंतर वाणी सोडून देऊ. गरीब केवल नामुराद+ आहे. हे विनंती उपरी. वाणी बाहेरील आहे. गावचाहि नव्हे. घरदार पुणियात नाही. खेपकरी. हगवणहि लागली आहे. येविसीचे उतर आले पाहिजे हे विनंती.

साधेल ती गुन्हेगारी घेऊन जंगम मजकुरास सोडून द्यावा. याप्रमाणे सदरहू चिठीचे उतर बावाचे नावे दिल्हे.

¶*A Jangam and a Bania were caught in the act of performing Rudra Abhisheka for which they were not eligible by their caste. Order is sought in this paper for releasing the Bania who, inquiries showed, was comparatively innocent and suffered terribly from dysentery.*

No. 109] [*1740-61 ?*

छ ४ सवाल.

जाबसुद,

श्री

पुा तीर्थरूप राजश्री नाना ताा
राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. श्रीत्रिंबकेस्वर व श्रीहरिहेस्वर व श्रीमोरेस्वर व श्रीजेजुरी येथें हुजराती अनुष्ठाने चालत आल्याप्रमाणे येथून पुढे आणीक वरीसभर चालवावयाची राजश्री स्वामीनी आज्ञा केली. यैशास श्रीत्रिंबक व जेजुरी व मोरेस्वर या तिन्ही स्थलीं येथून ब्राह्मण जातात, तसे जातील. परंतु श्री हरिहरेस्वरीं स्वामीकडून जातात तसे जाऊन वरीसभर येथून पुढे अनुष्ठान चालवावें. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*The Peshwa is requested to send Brahmans to Harihareshwar for certain rites being performed at the shrine of that place.*

+ निरिच्छ; मुराद=इच्छा.

No. 110]

॥श्री॥

शास्त्रार्थ लक्ष्मणभट्ट बावल्याने जंगमास रुद्राध्यापन केले. यास दंड, अध्यापनप्रयुक्त जें द्रव्य मिळविले असेल त्याचा त्याग करवून तितकाच राजदंड घ्यावा. त्यास विशेष प्रायश्चित्त वर्षपर्यंत यवोदन भोजनपूर्वक ब्रह्मचर्यव्रत उक्त आहे. ते तर त्यास घडनार नाही. त्याचा प्रत्याम्नाय नवति ९० गोदान कल्पावीं. आनखी हे उपपातक होय. तत्प्रयुक्त उपपातक सामान्य प्रायश्चित्त समुच्चयहि एक चांद्रायण पाहिजे. त्याचा प्रात्याम्नाय आठ गोदाने कल्पून एकून अष्टाधिक नव * * * ९८ गोदाने होतेत. तेणेकरूण शुद्धि होईल हे लिहिले. परंतु यांत कर्त्याची शक्ती पाहून न्यूनाधिक कल्पना आपण केली पाहिजे. अनखि जो जंगम रुद्राध्ययन करीत होता त्यास दंड.

द्यूतं समाह्वयं चैव यः कुर्यात् कारयीत वा ।
सर्वांस्तान् घातयेद्राजा शूद्रांश्च द्विजलिंगिनः ॥

हे मनुवचन याची व्याख्या द्विजलिंग उपवीत वेदपाठादि ।

हे पाहता वधच उक्त आहे. परंतु वधतुल्य सर्वस्व हरणादिक विटंबना दंडचिह्न काही करावे ऐसे भासतें हे विनंति ॥

कर्तास द्रव्यशक्ती नसेल तरि प्रायश्चिताचे पूर्वांगेंकरुण श्रीगोदावरी यात्रेस जाऊन श्रीब्रह्मगिरीस तीस ३० प्रदक्षिणा व श्रीहर्षाचा दोन प्रदक्षिणा करूण उत्तरांगे करावी हे अष्टनवति गोदानाचा प्रत्याम्नाय लिहिला असे हे विनंती.

¶*This is a decision of a case in which a Brahman was charged with giving lessons in Rudra to a person of the Jangam sect.*

No. 111]

श्री

समस्त देशपांडे पा सुपे यास पत्र की, मोरो रामचंद्र देशपाडे पा मा़र यानी नारो भानजी कुलकर्णी मौजे भाकरवाडी पा दाभाडी याची लेक नवरी करून लग्न केले. ते मूल बटकीचे पोटची खरी जाली. यामुळे मोरो रामचंद्र यास व त्याचे भाऊबंद दशरात्र त्रिरात्रीचे अधिकारी सुपे व बारामतीस राहतात त्यास सर्वास प्रायेश्चित द्यावे लागते. प्रायेश्चिताचा निछये करून क्षेत्र वाई येथील

१. सर्व पत्र बाळबोधींत.

पत्रे दिल्ही आहेत. तरी तुम्ही समस्त दशरात्रीचे व त्रिरात्रीचे अधिकारी वाईस जाऊन ब्राह्मण सांगतील त्याप्रमाणे प्रायेश्चित घेणे म्हणून पत्र द्यावयाची आज्ञा जाली.

¶*Order is issued enjoining penance on all Deshpandes of Supa because one of them, Moro Ramchandra, accepted a bride who happened to be an issue of a female slave*

No. 112]

श्री

...पांडे याच्या घरी लग्नांत अगर बोभाट होयेस्तवर आठादाहा रोजात कोण कोण जेवले याचा शोध मनास आणता, स्वगोत्री भाऊबंद व अगांतुक मात्र जेवले. त्यासी भाऊबंदास प्रायेश्चित्त घेतच आहेत. अगांतुकाचा कोठे ठिकाण नाही. त्यासिवाये अन्यत्र गोत्री व सहवासी लोक परकी कोन्ही जेवले नाहीत. येणेप्रो शोध केला असे.

हा मजकूर वाईकराचे पत्री ल्याहावयाची आज्ञा जाली आहे.

¶*The paper refers to the punishment meted out to those who happened to dine with the Deshpandes of Supa referred to in the preceding letter.*

No. 113]

श्री

पूर्वी येक वेल पत्र दिल्हे होते ते गमावले म्हणून दुसरेयाने दिल्हें.

याादी राजश्री गणपतराव रास्ते यांजकडील कारकून नारो त्रिंबक उंबराळकर यास भ्रम जाला ते समई त्याने शूद्रान्न भक्षिले. पुढे सावध जाल्यावर प्रायश्चित देवऊन शुध्ध केला. उपरांत मागती भ्रम होऊन बाहेर जाऊन येक मासपर्यंत शूद्रान्न भक्षिले. पुन्हा सावध होऊन आनुताप होऊन शरण आल्यावर पुर्वांग प्रायश्चित्त करऊन क्षेत्रीं ब्रह्मगिरी हर्षाच्या बारा प्रदक्षणा नेमून तुम्हाकडे पाठविला आहे. याजकडून आपले विद्यमाने नेमल्याप्रो बारा प्रदक्षणा करऊन केल्याचे उतर देऊन यास पाठवावा म्हणोन समस्त ब्राह्मण क्षेत्र त्रिंबक यांसी पत्र. १.

¶*This is a letter to the Brahmans at Trimbak asking them to do some purificatory rites in the case of a Brahman, Umbralkar, Raste's clerk, who, in a fit of insanity, took food prepared by Shudras.*

No. 114]

श्री

राजमान्येयाविराजित राजेश्री
बाळाजीपंत मामा व राजेश्री अंताजी-
पंत स्वामीस

प्रति माहादाजी राल व खंडभट जोसी पाबळकर आसीर्वाद उपर. तुम्ही पत्र पाठविले त्याजवरून ब्राह्मणाचा तलाश केला, परंतु ब्राम्हण उतम न मिले. त्यास हे ब्राह्मण अपस्तम उतम तेलंग पाच जण पाठविले आहेत. त्यास दर ब्राह्मणास अधेली द्यावी लागते. त्यास तुमच्या चितास आले तर हे ब्राह्मण ठेऊन कार्यसिधि करणे. याजला दक्षणा देणे. चितास न आले तर याजला आज्ञा देणे. कळले पाहिजे हा आसीर्वाद.

¶*Five Telangi Brahmins are sent for some religious function to Balajipant and Antajipant.*

No. 115]

श्री

विज्ञापना विशेष. ब्राह्मण अजमासे:

६८०० पहिले दरवाज्यास	१८०० तिसरे दरवाज्यास
२१०० दुसरे दरवाज्यास	१३०० चवथे दरवाज्यास
	१३५० पाचवे दरवाज्यास
८९००	४४५०

१३३५०

येकूण तेरा हजार तीनशे पनास अजमासे जाहाले. शेरा दशग्रंथी ब्राह्मणास नऊदाहा, पंचग्रंथी पाचसाहा, बाकी दोन तीन च्यार येणेप्रो शेरा आहे. ब्राह्मण पहिल्या दरवाज्यावर दाटी आहे. बाकी दरवाज्यावर ब्राह्मण नाही. बरचेबर येतात ते दक्षणा घेतात. वरकड बंदोबस्त आहे. कळावे, बहुत काय लिहिणे, हे विज्ञापना.

¶*The paper mentions the different amounts of Dakshina distributed to the Brahmans according to their attainments in learning.*

No. 116]

श्री

सेवेसी विज्ञापना. पागेत गोसावी जोगी बैरागी वगैरे कंगाल यास दक्षणा द्यावयाची आज्ञा. त्यास हे जात थोडकी; परंतु कंगाल बायेका बहुत जमा जाहाल्या आहेत, त्यांचीच दाटी फार. त्यास ब्राह्मण बायकाखेरीज करून इतर कंगाल आहे त्यास दक्षणा द्यावयाची आज्ञा होईल तरी देऊ. कंगाल भिकारी रांडाची दाटी फार. ते राहिल्यामुले गोंगाट फार पडला आहे. यास्तव भिकाऱ्याबरोबर भिकारणी बाइकांची दक्षणा दिल्यास ब्राह्मण बाइकांची मात्र दक्षणा राहील, ते उद्या होईल. आज्ञा होईल त्याप्रो करू हे विज्ञापना.

[याचें उत्तर]

पुरुषांची बायकांची दक्षणा येक जागा देणे ठीक पडणार नाही. तुमचे मते बायकास दिल्यास चिंता नाही, सेवटास जाईल, असे असल्यास कंगाल बायकास द्यावी. उद्या ब्राह्मण बायकास द्यावी. हे विनंती.

¶*Peshwa's orders are communicated in this paper about the distribution of alms among Brahman and other poor women.*

No. 117] [Before 1761?

श्री

श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

पो श्रीपतराऊ बापूजी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २० जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेकरून (य)थास्थित असे विशेष. स्वामी(नी) पत्र पाा ते प्रविष्ट जालें. श्रीनारायण व मोरेश्वरीं अनुष्टानास ब्राह्मण घातले आहेत. त्याचे साहित्य न्यून्यपूर्ण सर्व मनास अणून उतम रीतीनें साहित्य होये ते करणे म्हणून आज्ञा. यैसियास स्वामीनी दोही स्थलींच्या अनुष्ठानाचे साहित्य पूर्वी नेमून पाठविलें त्याप्रा सामग्री फाटी पान पत्रावल याप्राा करून दिल्हे. पुढेहि जोपर्येत अनुष्टान चालेल तोंपर्यत साहित्य आज्ञेप्राा होईल. श्वैपाकास भांडी मेलऊन देणे म्हणून स्वामीनी आज्ञा केली होती. त्यास आठा चौ रोजाचे कृत्य नव्हे जे, भांडी मेलऊन द्यावयास कार्यास येतील. हे अनुष्टान नेहमी यास मेलविल्या भांड्याने चालेल अगर कोण्ही देईल यैसे नाही. याकरिता नारायेणाचे देउलच्या ब्राह्मणास हंडा, घागर घरची दिल्ही. वरकड अवघी नवीच घेऊन दिल्ही तैसीच मोरेश्वरच्या साहित्यास भांडी हंडा घागर देखील

अवघी नवीच घेऊन दिल्ही. ब्राह्मणास अस्तरणास दोही स्थली जाजमे न(वी) करून दिल्ही. मोरेश्वरी गवली संनिध (हो)ते यामुळें दुधाचे आनकूल जाले. नारायणाजवल गवली नाहीत. दुधाचे साहित्य तर पाहिजे याकरितां म्हैस विकत येऊन देऊन दुधाची बेगमी करून दिल्ही. म्हसीचे निगेस नेहमी माणूस दिल्हे आहे. अनुष्ठानास पात्रें स्वामीचे आज्ञेप्रा। दिल्ही. आज्ञेखेरीज आणखी मागितली आहेत तीहि अनकूल करून देऊन अनुष्ठान समातीस पावल्यावर भांडी जाजमे, म्हैस सरकारांत जमा होईल. नारो दादाजी यास ताकीद करून शाख-भाजीची बेगमी नित्य करविली आहे. पुढे वरचेवर दोही स्थलीचा परामर्ष करीत जाऊन साहित्यास परामर्षास अंतर होणार नाही. सेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विनंती.

¶*Shripatrao Bapuji informs the Peshwa Nanasaheb of his having executed the orders about certain religious rites at the temples of Narayan and Moreshwar having been performed.*

No. 118]

श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये राजश्री
विठलपंत मामा स्वामीचे सेवेसी

पोष्य सखाराम सदासिव सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ २९ जिलकादपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. मैत्राणी प्रकर्णी येथून पत्रे घेऊन पाठवण्याविसी आपण लिा। होते. त्यास मध्ये पत्रे देण्याविसी तेथील पत्राचा हिस्का घेतला होता त्याचा मजकूर लिहिला आहे. परंतु हाली युक्तीने ग्रामस्ताचे व राजश्री आन्या गोसावी याचे पत्र घेऊन पाठविले आहे. सरकारचे नावे ग्रामसमंध्ये पत्र लिहावयाची त्याची चाल नाही याजकरिता राजश्री तात्याचे नावे त्याणी दिल्हे आहे. ग्रामास्तांचे पत्र सरकारचे नावेचे आहे. वेदशास्त्रसपन्न राजश्री बाळाशास्त्री झाबरे याचे पत्र मागाहून घेऊन पाठवितो. वो। राजश्री रामभट दादा पोचोन मैत्राणी प्रकर्ण उपस्थित जाहाले असल्यास ग्रामस्तांचे पत्र सरकारचे नावे आहे ते श्रीमंतापासी पंडित शास्त्री ज्या समई बसत असतील ते वेलेस मर्जी सुप्रसन्न पाहून पत्र द्यावे. संस्कृत आहे ते वाचून पाहात अशा संधीस द्यावे. मागे रामशास्त्री याचे कारकीर्दीत मैत्राणी याचे प्रकर्ण पडोन ग्रामण्य जाहाले होते तेव्हा मैत्राणी यास मसाले सरकारातून होऊन ज्याणी भोजने व फराळ केले होते त्यास प्रायेश्चि(त) दिल्ही आहेत. त्या प्रकर्णी कागदपत्र आहेत

तेथे प्रसंग पडून करण लागल्यास त्याच्याहि नकला घेऊन पाठऊ. तूर्त ते कागदपत्र येथे नाहीत. तेथे पाहिजे असा प्रसंग पडल्यास ते कागदपत्र पाठवण्याविसी निक्षूण पत्र पाठवावे म्हणजे ज्यापासी आहेत त्याजकडून घेऊन पाठऊ. परंतु सारांश घारपुरे याची बाजू शेर न होई आणि मैत्राणी याजपासून दोन रुा उत्पन्न होत असे जाहाले पाहिजे. सदरहू दोन पत्रे राजश्री सखारामपंत देशपांडे याचा गडी गेला त्याजबरोबर पाठविली आहेत. पोचल्याचे उतर पाठवावे. भिलांचे बंदोबस्ताकरितां स्वारी दीडशे लोक व दाहाबारा स्वार नवे ठेऊन राजश्री लक्ष्मण गोपाल व रंगो मोरेश्वर यास पाठविले आहेत. सरसुभ्यांची सनद येईसी असल्यास घेऊन पाठवावी म्हणजे भिलांचा बदोबस्त होऊन दोन रुा उत्पन्न होऊन सर्वावर दाब राहून काम होईल. युक्तीस आल्यास करावे. वरकड मजकूर मागाहून लिहून पाठवितो. बहुत काय लिहिणे, लोभ करावा हे विनंती.

¶*This paper refers to some social dispute regarding the Maitrani Brahmans.*

No. 119] [?

छ ११ जिलकाद.

श्री

यादी आत्मानंद सरस्वती स्वामी अंध कासीस रवाना केला आहे. त्यास राहावयासी स्थल, सरकारची हवेली मंगळगौरीचे घाटी आहे, तेथे येक खोली स्वामीचे सोईस पडेल व ठेवावी येविसी पत्रें :

० रामचंद्र भट को(ल)टकर

१ धोंडो खंडाजीस

सदरहू प्रो येक पत्र देणे

¶*The Peshwa makes arrangement for the lodging of a blind ascetic at Benares.*

No. 120] [*Before 1758*

श्री

यादी वेदशास्त्र रा। गोपीनाथभट घुले वास्तव्य श्री वृंदावन यांचे वृंदावन क्षेत्री दररोज रुा १ पूर्वीपासून सवाई जैयसिंग याणी करून दिल्हा होता; प्रस्तुत

चालत नाही. यासी सुरजमल जाटास पत्र आसावे कीं, दर रोज रो चालवणे म्हणोन पत्र यास देणे व सरकारची सनद वर्तमान भावी कमाविसदाराचे नावे देणे.

¶*Raghunathrao orders that a letter be sent to Surajmal Jat, asking him to continue the allowance of a Rupee per day to Gopinathbhat Ghule which was originally granted to him by Sawai Jaisinh.*

No. 121] [*Before 1740*

श्रीसोमेश्वर[१]

श्रीमंत राजश्री बाबा

यांप्रति शिवरामभट्ट वेदोक्त आशिर्वाद उपरि. श्रीचा प्रसाद दाळिंब येक पाठविले आहे तें घेतलें पाहिजे विशेष. श्रीदेवाचें वर्तमान, काम कार्याविषयीं बहुत श्रमात आहे. ईश्वर तुम्हास प्रेरणा करील तेसमयीं तुम्हि देवाचें कार्य करून द्याल हें सत्य आहे. सर्व कर्ता ईश्वर आहे. देवानें तुम्हास निर्माण केलें आहे किं तुमच्या हातें बहुत देवाब्राह्मणाचीं कार्यें होविं. येश तुमचा पदरीं सर्व प्रकारें पडेल आम्ही सर्व प्रकारें निरंतर तुमचें कल्याण श्रीदेवापासिं इछित आहो. कितेक वर्तमान माहा(दा)जि सागतां विदित होयील हे आशिर्वाद.

¶*Shivrambhat Chitrav entreats Bajirao Ballal to bestow some aid upon the temple of Someshwar.*

No. 122]

श्री[२]

तीर्थस्वरूप गंगाजान्हवि-
समान मातुश्री ताई वडिलांचे
शेवेशि

अपत्ये लक्ष्मणाने चरणावर मस्तक ठेउन साष्टांग नमस्कार विनंति. येथिल वर्तमान आश्विन वद्य पंचमीपर्यंत वडिलांचे आशीर्वादेकरून वाराणसिमध्यें समस्त सुखरूप असो विशेष. वडिलांकडून बहुत दिवस पत्र येउन वर्तमान कळत नाहि तर वर्चेवर आशिर्वादपत्र पाठऊन सांभाळ करावा. आमचे वर्तमान तर काशिस्थ ब्रह्मणाशि परस्पर कलह लागला आहे. एका पक्षाकडे आम्ही आहो, दुसऱ्या पक्षाकडे बाळकृष्ण दीक्षित आहेत. परंतु त्याचा पक्ष कम आहे, का म्हणाल, तर पूर्वेकडे अंबष्ट आहे त्याचे घरि यज्ञानिमित्त ब्राह्मण गेले होते, यास ब्राह्मणानि जातिबाहिर केले होते. त्यास बाळकृष्ण दीक्षित प्रयश्चित्तावाचुन

+ यापुढील मजकूर राघोबाच्या हातचा. १ सर्व पत्र बालबोधींत. २ सबंध पत्र बालबोधींत आहे.

7524

घ्यावे ऐसा निश्चय केला. तेव्हा सर्व जाति मीळोन सम्मत केले तेव्हा त्याचा पक्ष उणा पडला. आता तव त्याचे वस्तु काहि करवत नाहि परंतु तो द्रव्यवान. द्वेष आम्हाकडून नाहि. परधर्मस्थापक जे ब्राह्मण त्याचे कागदावर आम्ही सम्मत घातिले म्हणउन आम्हाशि द्वेष. आम्हास पक्ष आपला आहे. आमचि चिंता आपणास आहे. हे वर्तमान साकल्य यात्रकरू दादाप्रमुख सांगतिल तेव्हा साकल्य कळेल. वडिलांहि वारंवार पत्र पाठउन सांभाळ करावा. येथील काहि वस्तवानि लागलि तर सांघोन पाठवावि; पाठवित जाउ. आशिर्वादपत्र पाठउन लेकराचा सांभाळ करावा. बहुत काय लिहिणे हे विनंति.

¶*Lakshman writes to Kashibai mentioning a dispute among local Brahmans in Benares and the consequent differences that had arisen between the writer and Balkrishna Dikshit.*

No. 123]

पा छ १९ रबिलोवल

श्री

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक विसाजी रघुनाथ मो कुसलंब पा जामखेड चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता छ १० रबिलवलपावेतो राजपागेचे व सेवकाचे वर्तमान क्षेमरूप आहे. पागेत रोग सिरला. त्या रोगाचे नाव कोण्हास कलत नाही. पागेचा वैद्य व घोडके जे कोण्ही वोशधे सांगतात तीहि देतो. परंतु उतार पडत नाही. नेमणूकपैकी घोडी व सिगरे १२ आजतागाईत मयेत जाहाली. नवी सिगरे पांच सा मेली. त्याच्या माना उफराट्या होऊन मेली. प्रस्तुत खंडोबा झाडाच्या आंगीं येऊ सांगतो की, तुम्ही येथे राहिल्याने पागेची घोडी मारीन, ऐसे पष्ट रामाजी भगवंत केसकर यांच्ये गुाने म्हणतो हे वर्तमान लिहिले आहे. पागेस दुसरा जाग्याची आज्ञा थडीस होऊन येईल. येथे घोडी ठेवलियाने खराब होतील. रोगाचे वर्तमान संकरापा धर्णे सांगता कलो येईल. पुढे घोडीयासी कडबा पाहिजे. गवतावर घोडी जीव धरीत नाही. आपण सातारियासी गेलियावर सेवेसी येतो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Good many horses belonging to a cavalry regiment stationed at Kusalamb fell victims to a disease which could not be diagnosed and the reason was sought in the displeasure of God Khandoba. The writer Visaji Raghunath solicits Nana's permission to have the horses removed to some other place.*

No. 124] [2-2-1768]

श्रीविद्याशंकर

श्रीमत्परमहंस परिव्राजकाच्यार्यवर्य येमनियमासनप्राणायाम-प्रेत्याहारध्यानधारणसमाध्यष्टांगयोगानुष्टानानिष्ठतपश्चक्रवर्त्यनाद्य-विछिन्नगुरुपरंपराप्राप्तषड्दर्शनस्थापनाच्यार्यऋष्यशृंगपुरवराधी-श्वर् श्रीमच्छंकराच्यार्यान्वयसंज्याताभिवन श्रीविद्याशंकर-भारतीस्वामीकरकंजोद्भव श्रीविद्यानरसिंहभारतीस्वामीकृत नारायणस्मरणानि

सकलगुणालंकरण हरिगुरुभक्तिपरायण राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री मोरो हरि परमभक्तोत्तम याप्रति विशेषस्तु. तुमचे कल्याण चिंतित छात्रसभासमवेत श्रीनिकट आदीमठ संखेश्वरी राहिलों असों. अत्रत्य कुशल माघ सीत पौर्णमा भोमवारपर्यंत येथास्थित जाणून स्वकीये स्वाभ्योदय लेख-नाभिप्रायें चित प्रमोदवीत असिलें पाहिजे. तदनंतर करविरीं मठसंस्थानास राजपत्नीकडील उपद्रव जाहाला तन्मुले तो मठ त्याग करून अत्रस्थानी अगमन जाहालें. मावें मठीचे द्वारी चौकी बसऊन मठी कारभारी ठेविले होते त्यास प्रतिबंध करून ठेविले. संस्थानिची खेडियासी वराता करून रुपयाचा उपद्रव केला. यास्तव श्रीमंतास व तुम्हास सर्वत्रास आसीर्वादपत्रे प्रेषिली त्यावरून श्रीमंतानी श्रीमन्मातुश्रीस विनंतीपत्रें लिहून पाठविली जे धर्मसंस्थान आपले राज्यातील, त्यास उपद्रव होऊ न द्यावा. ऐसे कितेक सामोपचारें लिहिले वरून अंतर्यामीचा अर्थ शुध नसतां बाह्यात्कारें मात्र वरचेवरी पत्रें पाठवीत होती. परंतु मठीची चौकी अथवा कारभारी यासी प्रतिबंध केल्याची मुक्तता न करितां बोलाऊ पाठविलें तेव्हां त्याचे चिताची पक्वता नाहीं. गेले नंतर पुनरुक्त तोच प्रकार येऊन घडेल हा निश्चये जाणून करवीरचे पुण्यतिथीचा समारंभ अत्रस्थळींच करावा या अर्थे सर्व साहित्याची सिधता केली तों दुसरे दिवसी महोत्छहास प्रारंभ होणार तों पहिले दिवसीं राजश्री राणोजी सिंदे यास मातुश्रीनी पाठविलें. त्याही करवीर मठास येऊन महोत्छह संपदावा याअर्थे मातुश्रीचे विनंतीपत्र घेऊन येऊन बहुत अग्रह केला. तो ग्रहस्त पूर्वीपासून संस्थानिचे ममतेतील, परंतु त्याचे अज्ञेत वर्तणार तेव्हा तेथील भरवसा कांही नाही. अवकाश पाहता येक दिवसाचा उरला. यास्तव राजश्री बाबुराव दादाजी यासी लेहून पाठविलें. त्यानी आपणाकडील कारकून पाठविले. त्याचे व राणोजी सिंदे याचे बोलणे करारमदार होऊन करविरास जावयाचा निश्चय केला. यानंतर रातोरात करवीर मठास जाणें जाहालें. करवीर मठीची चौकी प्रतिबंध अवघा

मुक्त जाहला. च्यारी दिवस महोत्छह सांग संपादिल्यानंतर अत्रस्थळीचा महोत्छह करणें होता याअर्थें स्वारीचा सरंजाम सिध करून निघणें जाहालें. तो इतकियांत पुन्हा दिवाणची चौकी येऊन मठीची द्वारे बंद करून देव देवार्चन, कोठी, बाडेंभाडें व उंटे कोठीचे बैल सर्व अडथळून पाहिले. गमनासदेखील प्रतिबंध ऐसा विचार जाहाला. सारांश, राणोजी सिंदे मध्यस्त होते म्हणून त्यानी महत्प्रयेत्न करून सडेनिसी तेथून कडेस काढून दिले. वरकड सरंजाम सर्व प्रतिबंधात पडिला आहे. देवदेवार्चन नसता राहिलो आहों. स्वारीचा सरंजामहि नाहीसा जाहला. हे वृत आपणास कलावे जाणून लिा असे. परस्परेहि कललें असेल अथवा कलेल. या गोष्टीचा अभिमान आपणास पूर्ण असावा. याची पैरवी ध्यानात अणून जेणेकरून संस्थानिचे कार्य होऊन आपणास येश किर्ति सपादन होये तो अर्थ करणार सूज्ञ असा. आपण मठीचे व देवब्राह्मणाचे साभिमानी याआर्थें पूर्वोक्त संविस्तर आर्थ पत्री लेख करून पाठविला आहे. तो चितात अणून सस्थानिची ममता धरिल्याने श्रयस्कर आहे. सूज्ञाप्रति विशेष काये लिहिणें? आपणाकारणे साक्षत नारीकेल फलप्रसाद पाठविला आहे. स्वीकारणार सूज्ञ आसा. आज्ञेयमुल्लुसति

¶*Shankaracharya Narasinh Bharati seeks relief against the high handed action of the Regent-queen of Kolhapur who with promises of safety beguiled him to Karvir to perform the annual celebrations; but on their conclusion made the Swami a virtual prisoner and stationed guards around his place of residence. The Swami through the mediation of influential persons like Ranoji Sindia got himself released but had to leave behind all his belongings. He makes an appeal to Moro Hari the Head Clerk of Ramshastri to set the affair right.*

No. 125]

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री अमृतराव यासी

प्रति रामशास्त्री आसीर्वाद उपरी. वो संपन्न राजश्री माहादेवशास्त्री साठे यांची योग्यता शास्त्रांत आणि तपश्चर्येंत उत्कृष्ट आहे हे जाणून किल्यास पाठविले आहे; तरी तेथे किल्यास राहून स्नानसंध्या करितील; तरी भोजनाचे पृथक साहित्य करून द्यावे. ज्या ठिकाणीं स्नानसंध्येस बसतील तेथे निपरुद्रव स्थल करून द्यावे. ब्राम्हण बहुत योग्य आहेत. बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद.

¶*Ramshastri asks Amritrao to allow every facility at the fort of Purandhar to Mahadeo Shastri Sathe, a Brahman of great learning.*

No. 126]

नकल

सदरहूअन्वये पत्र व सरकारची
यादी लिहून दिल्ही छ ९ जिल्हेज.

श्री

वेदशास्त्र सपन्न राजश्री समस्त
ब्राह्मण तालुके आजणवेल यांसी

प्रति रामशास्त्री नमस्कार विनंती उपरी. विसाजी रघुनाथ वैद्य माहाजन आंजणवेल तालुके मार यानी विदित केले कीं, आपले चुलतभाऊ विठल अंनत वैद्य यांचे घरी गोपाळ बहिरव सान्या होता. त्याचा व्रतबंध सान्याचें गोत्रीं त्याचे बंधूनें केल्यावर त्याचें लग्न धमार्थ विठल अनंत यानी केलें. उपरांत मृत्य पावले. त्यांची क्रिया सान्या मार याणे केली. इतक्यावरून त्यांचा पुत्र म्हणऊ लागला. परंतु दत्तविधान जाले नाहीं. याजमुळें त्याजकडील क्षयवृध्धी होत आल्या त्या आपण न धरिल्या. येविसी त्याचा व आमचा कजिया लागोन मनसुबी हुजूर पडिली आहे. त्याचा फडशा जाला नाहीं. प्रस्तुत गोपाळ बहिरव याचा पुत्र वारला, त्याची क्रिया वैद्यांचे गोत्री करून विठल अनंताचे त्रंईस मेलिवणार. त्यास आम्ही आमचे गोत्री क्रिया करूं नये. म्हणौन अडथला केला. त्यावरून क्रिया राहिले असतां कसबे गुहागरचे वगैरे ब्राह्मण मिलोन वैद्यांचे गोत्रीं क्रिया करऊन सपिंडी करणार. त्यास मनसुबीचा फडशा जाला नसतां न व्हावी व गोपाल बहिरवास आणऊन मनसुबीचा फडशा करवावा. येविसीं आज्ञा जाली पाहिजे म्हणौन. त्यास विठल अनंत वैद्य यानी गोपालास दत्तपुत्र घेतला न घेतला येविसीची चौकसी हुजूर होणे असतां गोपालाचा पुत्र वारला, त्याची क्रिया वैद्याचे गोत्रीं करावी हे ठीक नव्हे. यास्तव गोपालास हुजूर आणविला आहे. मनसुबी होऊन शास्त्रता ठरेल त्याप्रो करावयास येईल. तोंपर्यंत गोपालानें नैवेद्य वैश्वदेवादिक व्यवहार चालऊं नये. व त्याचे घरी ब्राह्मणानी पंक्तिव्यवहार करूं नये. वैद्यांचे घरी व्यवहार चालत आल्याप्रो चालेल त्यास कोणी दिकत करूं नये.

¶*Ramshastri informs the Brahmans of Anjanvel of a temporary injunction issued by him in a certain religious dispute between the families of Vaidya and Sane.*

7528

No. 127]

श्री

आसीर्वाद उपरी. तुळजापुरी गुजराथी तपश्वी आहे. त्याची भेटी घेतली. त्यासी काही कार्यप्रकर्णी बोलणे जाहाले. त्यास हा अर्थ कार्य करितो, तदनंतर काय देवता संतुष्ट खर्च होईल तो द्यावा. सर्व प्रयोग बावाचे सिधी आहे. त्यास याचे उतर येजमान स्वामीस कलऊन बावास तेथपरियेत न्यावयाचे आगर आहेत तेथेच उद्योग, हा विचार समजोन उतर यावें म्हणजे त्यास लिहून पा हा आसीर्वाद.

¶*The paper refers to a Gujarathi ascetic possessing some mystic powers.*

No. 128]

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य

राजश्री शास्त्रीबावा स्वामीचे शेवेसी

विद्यार्थी जोती गोपाळ माहाभागवत सां नमस्कार विनंती येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. श्रीपांडुरंगाच्या स्थापना ते प्रांतीहून करीत इकडे हे प्रांती आलो. मार्गी पेठ येवले परगणे पाटोदे येथे आलो. तेथीलहि गावकरी आनकूल जाले. देवाल्य बांधून दिल्हे. त्यावरून श्रीची स्थापना तेथे केली. येक वर्ष जाले. आम्ही जनस्थानी येऊन राहिलो. आमच्या मागे राजश्री बापाजी गोसावी पुन्यस्तंबकर पेठ मारी राहातात. त्यांचे तेथे संस्थान व्यंकटेशाचे आहे. त्यास त्यानी आमचे संवस्थानाकडे समारंभ विशेष पाहून तेथे आमचा ब्राह्मण होता त्यासी नाना प्रकारे कज्या करून श्रीपांडुरंगाच्या मोर्ती स्थापिल्या होत्या त्यांचा उछेद करून घेऊन गेला. देवाल्य पाडीत होता तें गांवकरी यानी राहाविलें, कोणाचे यैकेनात. तदनंतर आम्ही येथून सिध्य पाठविले त्यांच्या स्वाधीन मोर्ती केल्या. पुन्हा स्थापनेचा आरंभ करतांच मारामारी करून मोर्ती नेल्या. राजश्री सिवाजी विठल विंचूरकर याजकडील कमाविसदारानी व राजश्री रामचंद्रपंत आंबीकर याजकडील कमाविसदारानी बहुता प्रकारें सांगितले परंतु यैकिले नाही. तेथे यज्जूशाकी मडळी आहेत. सर्वत्र मिळोन मारामारी करितात. आम्ही स्थापना करून त्याचा उछर्ग केला. तो देव सर्वाचा आहे. आम्हास काही आभिमान नाही. परंतु स्थापनेचा उदेग कोण्ही करीत नाही. याकरितां आपणास लिहिले आसे. तर हा मार मनास आणून स्थापना करावी. मारनिलेस तेथे नेऊन चौकसी करावयाची आसली

तर करावी. नाही तर कमाविसदारास ताकीदपत्रे द्यावी. हरयेक प्रकारे देव स्वस्थानी बसतील यैसे करावे. स्वराज्यांत यैसे कोठे जाले नाही. आम्ही येथे पचवीस ब्राह्मण उपोशण करून श्रीरामचंद्रजीसंनिध पंचवटीमध्यें स्नानसंध्या करून आहों. स्थापना जाल्यावर पारणे होईल. आपण धर्मकृत्याचे ठाई सादर आहेत. त्याहावे यैसे नाहीं. सूचनार्थ लिा आसे. आपल्यास कर्तव्य तें करावें. श्रीचा प्रसाद नारेळ व बुका पाठविला आहे, तो घ्यावा. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनती.

¶*A dispute between Joti Gopal and Bapaji Gosavi is referred to Ramshastri. Joti Gopal with the help of the people of the locality erected a temple to God Pandurang at Yevale. The presence of the new temple was disliked by Bapaji Gosavi, the owner of the older temple of Vyankatesh, who with the use of force removed the idols in the new temple and hence the dispute.*

No. 129] [*16-6-1753?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

पोा बापूजी श्रीपत कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जेष्ठ बहुल प्रतिपदा मंदवासरपर्यंत स्वामींचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामींनी पत्र पाठविले तेथे आज्ञा जे जेष्ठ मास अर्धा होवयास आला, अद्यापि पर्जन्य पडत नाही; मुलकात पर्जन्य पडोन पीक जाले पाहिजे याकरितां सेंपनास रुपये वेचून मोरगांव व आणखें स्थली ब्राह्मण अनुष्टानास घाल्हन पर्जन्य वृष्टि होये ते गोष्टी करणे म्हणून आज्ञा. यैसीयास स्वामींचे आज्ञेप्रमाणे मोरगावी व आणखी अनुष्टानायोग्य स्थल ब्राह्मणाच्या विचारे मनास आणून ब्राह्मण अनुष्टा-नास घाल्हन प्रारंभ करवितों. पुढें फळदाता ईस्वर आहे. कसबे पुण्यामधे दोन महिने मुकाम आहे तेथे लवणशाखेची बेगमी असली पाहिजे. तर हिरवे आंबे राजश्री विसाजीपंताचे घरी नेऊन पावते करून लवणशाख घालवणे म्हणून आज्ञा. यैसियास या प्रांते कोठे अंबराई आहेत यैसे नाही. त्याहीमधे कोठे दाहापांच झाडे आहेत तेथे हिरवे आंबे अद्यापि कोठे राहिले आहेत यैसे नाही. स्वामींचे आज्ञे-प्रमाणे प्रत्न करून जे मिळतील ते पुण्यास राजश्री विसाजीपंताचे घरी पावते करितो. पिराजी खानाजी जासूद यास दीड रुपया स्वामींने देविला तो आज्ञेप्रा प्रविष्ट केला. शेवेशी श्रुत जाले पाहिजे हे विनंती.

¶*Bapuji Shripat writes to the Peshwa that he would obey his instructions and engage Brahmans to perform religious ceremonies to propitiate gods that the belated rains may come down to save the crops.*

No. 130]

पौ छ ६ जोवल

श्रीत्र्यंबकेस्वर

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक नारो दामोदर साष्टांग नमस्कार विनंती. ता छ १८ जमादिलवल पर्यंत स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री पंत (प्रधान) [येक ओळ फाटली आहे.] श्रीकुशावर्ताचा व श्री * * * रव्य ज्योतीलिंग यांचा उतम रीतीने बंदोबस्त चालवावा यैसी आज्ञा मजला करून ठेविले. ब्राह्मणाविरहित अन्यत्र जात स्त्रिया आदिकरून दर्शन मात्र दरवाजियाबाहेरून घ्यावें. ब्राह्मण स्नान करून जाईल त्याणी देवास स्पर्ष करावा. वोवलेयाने ब्राह्मणानेहि सिऊं नये. श्रीची अर्च्या त्रिकाले चालवावी. तैसेंच देवाजवल तडी तापडीयासी (अपूर्ण)

¶*Naro Damodar writes to the Peshwa communicating the arrangements in connection with visits to the chief temple of Shiva at Trimbak.*

No. 131] [14-8-1761

मोहरम श्रावण सुा इसने

जानो मल्हार देशपांडे पाा फलटण यांचा व बाबूराव सखदेव देशपांडे पाा मजकूर यांचा कजिया होऊन परस्परे मारे जाहाले; त्यात आपाजी चिमणाजी देशपांडे याचे हाते तरवारेची जखम लागोन शामराव सखदेव देशपांडे मृत्य पावले; व आपाजीचा भाऊ बाजी चिमणाजी यांस शामराव याच्या हाते तरवारेची जखम लागोन मृत्य पावला. सबब आपाजी मजकूर बहिशकृत जाहला होता. तो पेशजी हुजुर येऊन ब्राह्मसभेस शरण आला; तन्मुले धर्मशास्त्रमते ते तुलापुरी श्रीभीमातीरी पूर्वांग प्रायश्चित संकल्प करऊन आपाजीस श्रीकाशीयात्रादि उतर मानस व शेशुबाध+ रामश्वेरआदि दक्षणमानसयात्रा नेमिल्या, त्याप्रो दोन्ही यात्रा आपाजीने करून यात्रा जालियाचे दाखले सरकारात रूजू केले. त्यावरून उतराग प्रायश्चित तुलापुरी करऊन आपाजीस शुध केले असे. अत:पर कसबा फलटण येथील ब्राह्मणास ताकीद करून आपाजीचे घरी ब्राह्मणभोजन करऊन उपरांत याचे घरी ब्राह्मणाचे व्यवहार पूर्ववतप्रो करवीत जावे. जाणीजे छ १३ मोहरम बहुत काय लिहिणे.

¶*Penance is inflicted by way of punishment upon Apaji Chimnaji Deshpande for having murdered Shamrao Sakhdev Deshpande in a scuffle.*

\+ सेतुबंध.

7531

No. 132] [2-8-1764

पैवास्ति छ ३ सफर

सुा खमस सितैन.

श्री

सेवेसी विज्ञापना. मोरो अनंत व चिमणाजी बल्लाल खोत मौजे वाटद तर्फ सेतवडें सुभा राजापूर याचा व कवठेकर याचा खोतीचा कजिया आहे. त्याची मनसुफी पेशजी वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामशास्त्री यांणी मनास आणिली. त्यासी शास्त्री पक्ष धरून मनसुफी करितात. त्यास दुसरेयाकडे सांगावी म्हणोन मोरो अनंत व चिमणाजी बल्लाल यांणीं विनंति केली. त्यावरून स्वामींनीं मनसुफी राजश्री शंकराजी केशव याजकडें सोपून शास्त्री याजकडील सब्या साक्षीचे कागद वसईस पाठवावें, येविशी शास्त्रीबावास पत्र दिल्हें. त्यावरून येविशी शास्त्रीबावांनीं पत्र लिहिलें आहे ते बजिनस जासूद घेऊन स्वामीकडें गेलेच आहेत. येथून पत्र गेलें त्यावर विनंति अणीख सारखी आहे तें चौकशीस येथें पाठविलें तेंच पत्र बजिनस पाठविलें आहे. पाहून आज्ञा करणें तें करावी. हें विज्ञापना. शास्त्रीबावा पक्ष धरून मनसबी करणार नाहीत. यास्तव त्याजकडेंच करावयाची आज्ञा करावी. हें विज्ञापना.

¶*Nana Fadnis pleads to the Peshwa on behalf of Ramshastri who has been charged with favouritism by plaintiffs in a case pending before him.*

No. 133] [29-5-1765

पौ छ २१ जिल्हेज

सन खमस सितैन.

श्री

पुा राजश्री बालाजी जनार्दन

स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी. राजश्री बापू सखाजी याचे घर किल्ले पुरंदरास आहे ते गडकरी यांनी फोडिले व सासवडास रोखे केले आहेत. कितेक आवाडाव करितात म्हणोन कळले, त्याजवरून विसाजी केशव व गडकरी यांस पत्रें पाठविली आहेत ती ठेवणे. तुम्ही तेथून पत्रे त्यास पाठवणे, कदाचित् हुजुरच्या पत्राचा उजूर करितील तरी येथून पाठविली आहेत ती पत्रे किल्यास पाठवणे. सारांश मारनिलेचे घर फोडून वस्तभाव नेली असेल ते झाडियानसी याचे घरीं ठेवणे. सासवडास रोखे केले असतील ते मना करवणे. कोणेविसी आवाडाव न करीत

ते करणे. येविसीचा बंदोबस्त उत्तम प्रकारे करणे. जाणिजे छ ८ जिल्हेज सुा खमस सितैन मया व अलफ. सारांश ज्या गोष्टीनें ते उपद्रव न देत ते करणे. किल्यास चौक्या द्याव्या. याविसीं आब्रा हशमनिसास पाा आहेत. तरी ते सविस्तर सांगतील. किलोकिल्याचे लोक जमाव करून चवक्याची तर्तूद जरूर जाली पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Nana Fadnis is asked to make inquiries and return all the articles carried from the house of Bapu Sakhaji by the Kolis on the fort. Pickets also are ordered to be placed on the fort.*

No. 134] [*7-11-1765*

पौ छ २१ जावल सुरू
सीत सितैन कार्तिक मास.

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री शास्त्रीबावा स्वामीचे सेवेसी विद्यार्थी सखाराम भगवंत सां नमस्कार विनंति उपरी. नेरकराकडे बाइको मारल्याचा आल आहे. त्यास बहुत दिवस ब्राम्हण पेचात आहेत. आपणास तरी श्रीमंत पुण्यात होते याजमुळे फावले नाही. या उपरी कृपा करून येथान्याये मुक्तता होईल ते करावे. लग्नकार्य चौलकर्म तटले आहे. आज्ञा करावी. बहुत काये लिहिणे. लोभ आसों दीजे हे विनंती.

¶*Sakharam Bapu requests Ramshastri to look into the case of a Brahman— charged with the murder of his wife and to release him if it is consistent with justice.*

No. 135] [*30-1-1769*

पो छ १२ सवाल
बाा येमाजी प्यादा.

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसांवी यासी

विनंती. उपरी, तुम्ही पत्र पाठविले तें पावलें. चेना हिरेतरास याचा मजकूर लिहिला तो कळला. त्यास तो अपराधी आहे. त्याचा उजवा हात तोडणे. राा छ २१ रमजान सुा तिसा सितैन मया व अलफ. +बेडी घालून किल्यावर ठेवणे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa orders that the right hand of Chena Hiretaras, a criminal, should be cut by way of punishment.*

No. 136] [15-4-1769

नकल

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नारायेणराव बलाल यासी. माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. मौजे प्रवरासंगम पो (ने)वासे येथील ब्राम्हणानी व पाटील याणी हुतासेनीचे दिवसात फाल्गुण मासी टोकेकरासी कलह करून वो राजश्री धोंडभट खरे याचा पुत्र जीवे मारला, याजमुळे आपराधी; सबब मौजे मजकूर येथील त(ल)नची कसर व सरदेशमुखीचा आमल सरकारातून ब्राम्हणाकडे चालत आहे तो व मुकासा बाबतीचा आमल पवाराचा सरंजाम आहे तो, त्याणी आपले तर्फेन ब्राम्हणाकडे इनाम दिल्हा असल्यास तो देखील व ब्राम्हणाची वतने जोसी कुलकर्णी व धर्माधिकारीण व क्षेत्रसमधे येजमानकृत्य येणेप्रमाणे ब्राम्हणाकडील वतने व मोकदमीचे वतन सरकारात जप्त करून सदरहू समधे आकार होईल तो सरकार-हिशेबी जमा करणे. जाणिजे छ ७ जिल्हेज सुा तिसा सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*The Peshwa asks his brother Narayanrao to confiscate all rights and Vatans of the Brahmans and Patils of Pravarasangam who during the Holi festival quarrelled with the inhabitants of Toke and put to death a Brahman youth.*

No. 137] [20-12-1769

पो छ ११ रमजान सबैन.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बालाजी
जनार्दन स्वामी गो यांसी

पो माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. वेदमूर्ति राजश्री दादोबा लोहकरे याचे सेतात डेरे जाहाले सबब सेताची तसनस जाली आहे ते तुम्ही मनास आणून त्याचा ऐवज देणे. रा छ २१ साबान सुा सबैन मया व अलफ. +बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa orders compensation being paid to one Dadoba Lohakare for the loss he suffered on account of the Peshwa having encamped in his field.*

No. 138] [9-3-1772

श्री

यादी बलराम मणीराम कनोर्जा ब्राम्हण वास्तव्य आमदानगर याणे ब्राम्हण कर याचे स्त्रीचा अभिलाश करून फिताऊन घरास आणिली म्हणून फिर्याद हुजूर जाहाला. त्याची चौकसी पाहाता अपराध सदरहुप्रमाणे याजकडे शाबूत जाला; सबब बलरामाचे घरचा वितविशय सरकारात जप्त करून याजला किले सिवनेरीस आटकेत ठेविला होता. त्यास ब्राम्हणाची बाइको बलरामाने आणिली ती त्याचे घरी मृत्य पावली. याजकरिता वितविशय रुपये यकोंणीसशे वगैरे वस्तभाव जप्त आहे ते ब्राम्हणाच्या लग्नाकरिता ब्राम्हणास देऊन बलरामापासून सरकारांत गुन्हेगारी रुपये

२००० रुपये

* बलरामाकडे दोन हजार रुपये गुन्हेगारीचें करार केले, याची निशा दीडा महिन्याचे मुदतीची चांगली घेऊन व हजीर जामीन घेऊन अटकेतून मोकला करावा. येणेप्रमाणे पूर्वी वस्तभाव सरकारात आली आहे. त्यासिवाये दोन हजार रुपये सदरहू मुदती प्रो घ्यावे. येणेप्रो करार करावे

छ ४ जिल्हेज इसने फाल्गुन.

¶*Fine and punishment are herein imposed on one Balram, a Kanoja Brahmin, for abducting a Brahman woman.*

No. 139] [17-6-1772

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नारायणराव बलाल यांसी माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. मल्हारजी पारखा चाकर सरकार याणी विदित केले की, माझे बायकोसी चांदू गुरव जात होता सबब त्यास मी जिवे मारला. हा अन्याय मजला सरकारातून माफ केला. असे असता सुभाहून कमावीसदारानी (माझे) सेत व मळा घर गुरे ढोरे वस्तभाव जप्त केली आहे, ते मोकली करून माझी मजकडे देविले पाहिजे म्हणून. त्याजवरून हे पत्र तुम्हास लिहिले असे. तरी मल्हारी मजकुराची वस्तभाव गुरेढोर जप्त केली आहे ती मोकली करून याची यास देणे. सेत मला याचा याजकडे चालविणे. रा छ १३ सफर सुा इसने सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें हे आसीर्वाद.

¶*Madhavrao Ballal orders the release of the property of Malharji Parkha which was confiscated by the Kamavisdar though he was given a pardon for the murder of a Gurav who had an illicit connection with his wife.*

No. 140] [1772?

श्री

सेवेसी नारो यशवंत रनाळकर विज्ञापना. आमचा चुलतभाऊ नरहरि पानपताचे गर्दीत जाऊन यवनमय होऊन अकरा वरशे राहिला. तिकडून आलियावर शामाच्यार्यप्रभृति व ब्राम्हण पैठणकर याणी प्रायश्चित्त देऊन पंक्तीव्यवहार केला ते सर्व भहिषक्रुत जाहाले. आम्ही पाच सात वरशे भहिषक्रुत राहिलो. नंतर मकाशकर ब्राम्हणास व रो यादवराव भागवतास विनंती केली कीं, आम्हांस मुक्त करावें. यावरून त्यानी स्वामीस विनंती लिहिली. त्यास आज्ञा जाली की, नरहरीचा घटस्फोट करऊन दायादास प्रायेश्चित योजन देऊन शुध्ध करावे, आज्ञे प्रमाण घटस्फोट करऊन प्रायेश्चितार्थ श्रीत्र्यंबकेश्वराच्या आकरा आकरी प्रदाक्षिणा नेमिल्या. त्यास मी व आमचा चुलतभाऊ आनाजी वेकाजी उभयतां क्षेत्रास जाऊन नेमिल्याप्रमाणें प्रदक्षणा करून धोंडो महादेव याचे साक्षपत्र घेऊन सेवेसी आलों. नरहरीचे स्त्रीची विनंती केली की, तिचे कसे करावे; त्यावरून आज्ञा जाली कीं, कृष्णातीरी बाईस तिचाही घटस्फोट करावा. त्यास येविसी पत्रे अधिकारी यास व क्षेत्रस्तास की, येथानशक्ती घटस्फोटाचा विध उरकोन पत्र देऊन पाठवावा म्हणोन पत्रे २

Naro Yashwant informs Ramshastri that he has executed his orders regarding the penance in connection with the unauthorised reconversion of his cousin Narhari who was converted to Islam at Panipat and who remained in that faith for eleven years. The writer requests the addressee to issue orders for granting divorce to the wife of Narhari.

No. 141] [10-12-1774

पौ छ ६ सवाल

मार्गसीर्ष मास.

श्रीरामचंद्र

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री सखामपंत स्वामी

गोसावी यासी

पो सदासिव चिमणाजी सचिव नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशललेखन करीत आसिले पाहिजे विशेष. वेदमूर्ति राजश्री रामभट जोसी कसबे कडे याचा व कसबे मजकूरचे धर्माधिकारी याचा कजिया लग्नपत्रिकेचा आहे. येविसी उभयता पुरधरास आले आहेत. त्यास प्रतिष्ठानी

व मातबर ठिकाणी जोसी आहेत आणि धर्माधिकारीहि आहेत. तेथे लग्नपत्रिकेची चाल असेल त्याप्रो उभयेतानी वर्तावे येसे पत्र का मजकूरच्या जमिदारास व गावास व धर्माधिकारी यास यो तीन ताकीदपत्रे दिल्ही पाहिजेत. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*This paper refers to a dispute between the Joshi and the Dharmadhikari of Kade regarding the enjoyment of a certain religious right.*

No. 142] [*19-5-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री मोरोपंत यांसी

प्रति

रामशास्त्री आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. बापूजी नाईक तांबवेकर याचा जेष्ट सापत्न बंधु होता त्याचे लग्न जाहालियावर सातवे दिवसी मृत्य पावला. त्याची स्त्री विधवा हाली वीस बावीस वर्षाची आहे. तिचा व तिच्या सापत्न सासूचा न पडाव यामुले विभक्त निघाली. तिच्या योगक्षमाचा विचार बापूजी नाईक न करीत. यास्तव पुण्यांमध्यें स्वकीय ग्रहस्त व मुछदी याकडे बहुतांचे घरी फिरली. त्याणी सांगितले असता नाईक मानिले कोणाचेहि न ऐकत. तेव्हा तिणे येथे येऊन सांगितले की, आपणास आश्रये नाही. आन्नवस्त्रे न मिले. आपल्या लग्नात कंपेश दीड हजार रुपयाच्या वस्ता आपणावर होत्या त्या सापत्नसासूने काढून घेतल्या आहेत; तरी मनास आणावे. यावरून बापूजी नाईकास आणून ताकीद केली असतां न ऐकत. तेव्हा निक्षूण सांगितले की, तुम्ही मातबर असोन जेष्ट बंधूची स्त्री शहरात फिरते, तिच्या आंनावस्त्राचा निर्वाह करीत नाही, याकरिता सरकारात गुन्हेगारी देऊन तिच्या योगक्षेमाचा बंदोबस्त करणे व वस्ता काये घेतल्या असतील त्या तिच्या तीस देणे. त्यास आंनावस्त्राबदल दरसाल रुपये १२५ सवासे देतो म्हणोन कागद लेहून दिल्हा. वरकड फडशा आज करितो, उद्या करितो म्हणून दिवसगतीवर घालून वेदमूर्ति रा बालभट थते याजबरोबर पुरंधरास गेले आहेत. तेथे त्याविषयीं बालभट रदबदली करून गुन्हेगारी मना करवणार व वस्ताचा निर्वाह होणे तो टालाटालीवर टाकणार तरी ते गोष्ट ऐकावयाची नाही. गुन्हेगारी घ्यावयासी योग्य आहेत व त्यांची भावजय निराश्रित; तिचाहि वस्ताचा फडशा व्हावा लागतो, यास्तव निक्षूण ताकीद व्हावी म्हणून राजेश्री बापूस व रा नानास तुम्ही सांगावे. रा छ १८ रबिलावल सुा खमस सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे +हे आशीर्वाद.

¶*Maintenance is granted in this paper to a widow and her ornaments restored to her by Ramshastri the Chief Judge of the Maratha State.*

No. 143] [7-9-1775

श्री

यादी बेरड वगैरे पारपत्याचे.
सुा सीत सबैन मया व अलफ.

थोर अन्याई दरवडेकरी

१ भवान्या बेरड सुपेकर
१ नागु बेरड जेजुरीकर दाद्याचा बाप.
१ सुलताना पवार वा बतीस सिराळे.
१ आप्या बेरड आळंदीकर
१ हुसेनखान वा नूरखान
१ बाबाखान वा भिकनखान
१ लक्ष्मण खोमणा वा जेजुरी मैराळजीचा लेक.

७

सात असामीपैकी भवान्या व नागु यास हतीच्या पाई बांधोन मारावे. बाकी पांच आसामीची डोकी मारावी. येणेप्रमाणे.
छ ११ रजब भाद्रपदमास
सन सीत सबैन.

मध्यम येकेक वेळ दरवड्यास बराबर गेले होते.

१ म्हाकोजी सिंदा वा पाटण
१ जान्या बिन रखमाजी जगथाप
१ येसू बेरड वावापूरकर

३

तीन असामीचे डावा पाय उजवा हात या प्रमाणे तोडावे. येणेप्रमाणे

कनिष्ट अन्याई

१ कृष्णा भोसला
१ माया न्हावी
१ मैराळजी खोमणा

३

ता

१ न्हावी डोक्या बेरडांच्या करून बेरडाजवळ दोन तीन वरसे होता.
१ कृष्णा भोसला नवा चाकर एक महिन्याचा दरवड्यास गेला नाही.

१ भैराळजी पाा याचा पुत्र दरवड्यात गेला होता तो थोरल्या अन्यायां-कडे लिहिला आहे. हा गेला नाही.

—

३

तीन असामीचे उजवे हात तोडावे. येणे प्रमाणे.

¶*This is a list of offenders and the cruel punishments that were meted out to them ; some were to be trampled by elephants, some to be beheaded and the rest were to have parts of their bodies lopped off.*

No. 144] [*13-5-1776*

पौ छ २९ रोवल
सीत

श्री

विनंती सेवक धोंडो बाबाजी कृतानें (क) साा नमस्कार विज्ञापना. ताा छ २४ रोवलपरयंत सेवकाचें वर्तमान यथास्थित असें विशेष. पुण्यामध्यें कसब्यांतील कसाबानें गाई मारिली आणि मास विकलें हे वर्तमान फिरस्ते प्यादें यासी कळलें. त्याणी चाहुडीस सांगितलें, त्याजवरून कसाब धरून आणून चौकसी करितां जंगली कसाब याणे आपले घरची काल्हवड दोन बर्षाची होती तीं छ १९ रोवल बुधवारी तिसरे प्रहरी जमाल कसाब पडोंसी यासी बलाऊन आणून तो व आपण मिळोन दोघानी मारिली, आणि मांस वाटून घेतलें. त्यापौ काही विकलें किरकोंल मुसलमानांस; काही खादलें; व कांही घरी त्याचे होतें त्या सुधा धरून आणून मुद्यानसी शाबूत करून त्याचें हाती चिमोटे खिलऊन पाई बेड्या घालून अटकेंस ठेविले आणि हे वर्तमान राजश्री जनोंबादादा यासी व राजश्री शास्त्रीबावास सविस्तर वर्तमान समजाविलें. आज्ञा होईल त्याप्रमाणे त्याचें शासन करितों. हे वर्तमान सेवकास काल कळलें तेव्हा जलदीनें धरून आणून चौकसी केली आणि जालें वर्तमान सेवेसी श्रुत करावे एतदविसी विनंती लिाा आहे. दुसरें वर्तमान नारायेणपेठेमध्ये बोडकी द्राविडीण ब्राह्मण म्हातारी राहात आहे. तिचे घरी दारूचे भरलें सिसे वीसपंचवीस सांपडलें व बकरे याचें मास यैसे सापडलें. ते मुद्यासुधा चावडीस धरून आणिले. चौकसी करितां ती म्हातारी दारूचा

उदीम करिते. कोणाची नावे सांगत नाही; व ती रांड भिकारीण आहे. पैशास उत्पन्न नाही. दारू मात्र सांपडली, इतकेच मात्र जालें. गावांत पाप बहुत होऊ लागलें. याचे शासन यथास्थित घडल्यास श्रेयस्कर. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Dhondo Babaji reports to the Peshwa two cases : one of cow slaughter in the Kasaba Peth, Poona, and another of illicit sale of liquor by a Dravid widow in Narayan Peth.*

No. 145] [*Date of receipt 20-6-1778*

पौ छ २४ जावल

सुा तिसा सबैन

श्री

त्रिंबक धारप याण करमरकर याची मूल पळून नेऊन लग्न लावीत होता, त्यांतलि जोसी व त्याचा चुलतभाऊ हे दोघे वाड्यात होते त्यास शहरात फिरऊन दंवडी पिटून असे फिरोन कोणी न करी असे लोकास कळऊन तोफखान्यात आटकेस बिडीखेरीज ठेवावे आण फुटाणे गावात भीक मागून खावे. याजप्रो वो राजश्री शास्त्रीबावाची आज्ञा जाली आहे हे विनंती.

¶*Ramshastri punishes a relative and another accomplice of a man who forcibly carried away a girl and attempted to marry her.*

No. 146] [*13-2-1781*]

पौ छ २२ रावल सन

इहिदे समानीन मया व

अलफ फालगुन मास.

श्री

वेदशास्त्रसंपन राजामान्य राजश्री

शास्त्रीबावा स्वामीचे सेवेसी

विद्यार्थी त्रिंबक कृष्ण मुकाम अंजणवेल कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. तागा(ईत) माघ वद्य पंचमीपावेतो क्षेम असो (वि)शेष. तालुके मजकुरी ब्राह्मण ग्रहस्त * * (बं)धू आहेत. त्यास वडील बंधूस पुत्र(सं)तान आहे. धाकट्या बंधूस पुत्रसंतान (नाही). याजकरिता त्याणे लेकीचा लेक घ्या * से केले. त्याजवरून वडील बंधु याणे सागि(त)ले की, लेकीचा लेक व

परगोत्री घेऊ नये, आ(प)ली दाहा पाच घरे भाऊबंदाची आहेत त्यातू(न) पुत्र आगर श्वगोत्री यातील पुत्र मेलऊन देतो, ऐसे वडील बंधु याणे सांगितले व चौघे भाऊबंद यांही सांगितले. ते गोष्ट त्याणे अमान्य करून आपले भाऊबंद व जोसी उपाध्ये धर्मादिकरी कोणी न येत, तेव्हा इतर गावचे परतालुक्यातील पाच सात ब्राह्मण दौहित्रपुत्राचे विधान करावयासी मेलविले. * * * वडील बंधु याणे आणशपत त्यास घा(तली) की, आपले भाऊबंद श्वगोत्री यातलि पुत्र देत असता अशास्त्र वर्तणूक विधान कराल तरी तुंम्हास गाईब्रह्मणाची शपत आहे. यप्रमाणे शपत घातली असतां अमान्य करून विधान केले. त्या मुलाचे, दोहित्र आणि अंन्यत्र गोत्रीचा, त्याचे उपनयेन अगोधर दोन महिने जाहाले. समावर्तन व्हावयाचे होते. तेव्हा तो ब्रह्मच्यारी (अ)सता विधान केले. त्याचे उपनयेन जा(हाले) तेव्हा त्याचा बाप संनिध असता अन्य(त्र) गोत्री याणे उपन्ययेन केले. याप्रो च्यार * * * श कर्मे त्याजकडे असोन उपनयनी गो(त्र) उच्यार येक जाहाला असता लग्नसमई दु(सऱ्या) गोत्राचा उच्यार करून लग्न केले. या(स्त)व उभयताची मनसुबी येथे आली आहे (या)-जकरिता आपणास विनंती पत्र लिा आहे. * * शास्त्रमते याचा परिणाम काये, मुला(ची) गत काये, कोणा गोत्रास वर्तावे, याचा (निर्ण)य व ज्याणी ऐसी कर्मे केली त्यास प्राये(श्चि)त काये ते शास्त्रार्थ मनन करून ल्याहावयासी आज्ञा जाली पाा. बहुत काय लिहिणे, कृपा लोभ करावा, हे विनंती.

¶*Opinion of Ramshastri is sought by Trimbak Krishna in a case of adoption which had apparently taken place in contravention of the provisions of Hindu law.*

No. 147] [*27-10-1793*

पौ छ २१ रावल सन
आर्बा सितैन अश्विन मास

श्री

सेवेसी केशवराव जगनाथ साा नमस्कार विज्ञापना विशेष. केदारी मांग वस्ती मौजे कल्याण घेरा किले सिंहगड याचे घरी येशा व आंबऱ्या मांग वाा मौजे किकवी ताा खेडेबारे हे च्यार महिने येऊन राहिले होते. त्यास तिघा मांगानी छ १० रावली मोगरवाडीचे रानातून गुरातील धोंडजी करजवणा याची गाये काली धरून आणोन कल्याणचे रानात दिवसास बांधोन ठेऊन सायेंकाली तिघाजणानी सुरा व कुऱ्हाड विले व वह्याने जिवे मारिली. त्याचे चौकसीस

---

१ सोडमुंज.

किले मारीहून सिपाई व कल्याणकर पाटील व बेरड पाठऊन जाग्याचा थांग मोघामदऱ्यात लागला. सा कल्याणकर माहाराचे घरातील झाडे घेऊन मांगाचे घरात गेले तो केदाऱ्या मांग याचें घरात मास सापडले, मुदा लागला. सा घर जप्त करून तिवे मांग किल्यास आणून जबानी घेतली तिची नकल सेवेसी पो आहे. मांग खोड्यात घालून आटकेत ठेवावे यैसे रा हणवंतराव सालवी हवालदर याजकडे सांगोन पाठविले. खोड्यात घालावयाची परवानगी हवालदार न देत. तेव्हा आमचे कारकुनाने सदरेपुढे खोडा आणऊन त्यात घालून बंदोबस्ताने ठेविले. त्याचा आपराध थोर आहे. त्याचे पारिपत्य चांगले जाहाले म्हणजे सर्वत्र जागा दहशत पडेल. पारिपत्याविसी आज्ञा करणार स्वाम समर्थ आहेत. किल्यास हली हशमी येतात त्यास खोडाबिडी घातली पाहिजे. सुभ्याकडून हवालदार यास सांगोन पाठऊन घालावी, ही किल्यातील चाल हवालदार सांप्रत यैकत नाही. किल्यास कारकून कामकाजास ठेऊन मी स्वामींचे चरणाजवल आहे. किल्यावर येके जागा सुभा व हवालदार, तेव्हा परवानगी दुतर्फा चालते. येक तर्फा सांगता न ये. हवालदार यैकत नाहीत. नित्य कटकटीसी संमंध. यास्तव हवालदार किल्याचे उपयोगी नाहीत. स्वामींनी परभारे सबनीस, फडनीस व च्यार सरदार हुजूर हशमी यास बोलाऊन आणून समक्ष चौकसी करावी. कामगारीचे सिपाई घालवावे, नाही तरी परवानगी बंद करीन यैसे हवालदार बोलले आणि आश्विन वा ९ सोम्यवारी दिा कासी बलाल निा हुजूर हशम याचे लोकाची परवानगी दरोबस्त बंद केली. रानात लाकूडफाटे वगैरे आणावयासी दरवाज्याखाली जाऊ देत नाहीत. याप्रो दुसरी च्यार पथकाची परवानगी बंद करणार. तेव्हा तूर्तच बखेडा पडेल. बंदोबस्ताविसी दिसगतवर न गेले पाहिजे. लोकाचा गरगशा पडला आहे. यास्तव विनंती मान्य करून सत्वर उलगडा जाहाला पाहिजे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa is advised to mete out heavy and deterrent punishment to some Mangs charged with the heinous crime of deliberate cow-slaughter.*

No. 148]

नकल

श्री

चिरंजीव राजश्री परशरामपंत नाना व विठलपंत देसाई यासी दादो हरि व वामनाजी हरि आसीर्वाद उपरी. साष्टी व मुंबईकर कसाब देशांतून गाई हरदू

ठिकाणी विकावयास न्यावयाची मनाई सरकारांतून आसतां चोरून नेतात. त्याची चौकसी हुजुरून आनंत नाईक आणजुरकर यास सांगून पत्र दिल्हे आहे. त्या पत्राप्रों प्रांत वसई येथील नाकेबंदीची चौकसी नाईक मजकूर करील त्यास करू देणें व तालुके माारपौ नाकेबंदीस सिपाई पेशजी राजश्री दादा गद्रे यांचे कारकीर्दीत दिल्हे आसतील त्याचा दाखला पाहून त्याप्रों सिपाई नाकेबंदीचे चौकसीस नाईक मजकूर याचे गुजारतीने पेशजीची वहिवाट समजोन नेमून देणें. हे काम सरकारचे; नाकेबंदीवर गाई जाऊ न पावेत आसा बंदोबस्त जरूर करावा. यांची वरचेवर खबरदारी करावी. रा छ ३० सफर बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*This is a letter to officers in the Konkan to help Antaji Naik Anjurkar in the measures he would devise to prevent cows being taken away by the butchers of Bombay and Salsette.*

No. 149] [*3-6-1781*

पौ छ २९ जाााखर

इसने जेष्ट मास

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राज-
मान्य राजश्री गणेश विश्वनाथ
गोसावी यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुाा इहिदे समानीन मया व अलफ. हरिसिंग सिलेदार दिाा राजश्री आनंदराव भिकाजी हे लग्न करावयाकरितां निरोप घेऊन घरास गेले. त्यास पहिली बायेको, तिचा त्याग पंधरावास वर्षापासून केला, उपरांतिक दुसरे लग्न केले. तिजला दोन मुले होऊन मृत्य पावली. सबब तिसरे लग्न करावयास गेले. तेथे पहिले बायकोचा भाऊ गोविंद राम तुम्हापासी चाकरीस आहे त्याणे तुमचेजवळ समजाविले की, पहिले बायेकोचा त्याग केला. याजकरितां तिणे अपघात करून प्राण दिल्हा. याप्राो गैरवाका समजाऊन हरिसिंग याचे लग्नास आडथला करून मााारनिलेस अटकाव केला आहे म्हणून विदित जाले. त्याजवरून हे पत्र तुम्हास सादर केले असे. तरी हरिसिंग याचे लग्न होऊ देणें. पहिली बायेकोने जीव दिल्हा; त्यास, तिचा

त्याग पंधरावीस वर्षे हरिसिंगाने केला असल्यास लग्नास आडथला करावयास प्रयोजन नाही. ताकीद करून लग्न करू देणे. जाणिजे छ १० जमादिलाखर आज्ञा प्रमाण.

¶*One Harising abandoned his wife and got himself married a second time. Upon the demise of his second wife he arranged another marriage when he was arrested by Ganesh Vishvanath as it was represented to him that the first wife of the said Harising had committed suicide as a result of her abandonment. Ganesh Vishvanath, however, is ordered by the Peshwa to release Harising and allow him to marry a third wife as he cannot be held responsible for the death of his first wife whom he had deserted some twenty years back.*

No. 150]

श्री

श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक केसो भिकाजी हवालदार ताा तुगाड व कारकडा कृतानेक साा नमस्कार विज्ञापना. ताा छ २२ जमादिलाखरपावतो सेवकाचे वर्तमान व ताा मजकुरचे वर्तमान येथास्तित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र की, ताा मजकुरी मुसलमान गोवध करितात आणि तुम्ही खबरदारी केली नाही म्हणून आज्ञा. त्यास ताा मजकुरी आपल्यास आढलले नाही. पुढे स्वामीचे आज्ञप्रमाण, चौकसी करून वर्तणूक करून. हे विज्ञापना.

¶*Keso Bhikaji reports to the Peshwa that there are no cases of cow slaughter by Mahomedans at Tugad and that he will prevent such a practice if there be any in future.*

No. 151]

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री समस्त
ब्राह्मण कसबे सेवगाव यांसी

प्रति रामशास्त्री नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहावें विशेष. माहादेवभट जोसी मौजे कडजलगाव पाो सेवगाव याणी विनंती केली कीं, आपले बायकोन आपला दायाद ब्राह्मण विठल जोसी यांसी माल्याकरवी जिवें मारिलें, सबब मी व माझें दायाद बहिष्कृत आहेत. मजला न कलतां माझें बायेकोनें दुष्ट कर्म केलें. स्वामीनी कृपा करून अम्हां सर्वास दोषानरूप प्रायश्चित्त

द्यावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणौन ऐशास, माहादेवभट जोसी याचें बायेकोनें बुध्धीपूर्वक विठल जोसी यासी जिवें मारविले. यास्तव तिजला प्रायश्चित्त द्वादशाब्द पूर्वोत्तरांगसहित संकल्प करावा, मग कासीयात्रा रामेश्वरयात्रा करून स्वग्रामी येऊन उतरांगें करावी. इच्या प्रायेश्चित्ताचा संकल्प केल्यानंतर माहादेवभट जोसी व यांचे दायादास संसर्गानरूप प्रायश्चित देऊन शुध्ध करावें. याप्रमाणें मुंगीकर समस्त ब्राह्मणास पेशजी पत्र लिा होतें. परंतु तें पैठणकराचे ग्रामण्यातील शरीरसंबंधी यास्तव तुम्ही लिहिल्याअन्वय प्रायश्चित्त देवऊन याची शुध्धता करावी. बाइकोस श्रीकासी रामेश्वर यात्रा नेमिली होती. परंतु स्त्री जाती, याजकरितां श्रीत्र्यंबकेश्वरच्या प्रदक्षणा नेमून पत्र दिल्हे आहे. याप्रा पत्र उगऊन द्यावें.

¶*Ramshastri asks the Brahmins of Sevgaon to execute the penance enjoined upon one Mahadeo Bhat Joshi whose wife had put to death a Brahmin. A more rigorous Prayaschitta is also enjoined upon the woman for the crime of murder she committed.*

No. 152] [*After 1772*

श्री

अपत्याचे सां नमस्कार विज्ञापना. काली मंगलवारी तिसरे प्रहरी श्रीमंत राजश्री शास्त्रीबावाजवल राजश्री त्रिंबकपंत वर्तक व रा विठलपंत परभुणे यांणी नेहरा व ढमाला याचे खुनाचें कजियाबाबत कागद समजावयासी आणिले, सिवाजीपंतासहि नेले होतें. त्रिंबकपंतानी मजकूर मुखवचने सारा सांगोन बोलिले कीं, श्रीमंत राजश्री बापूस्वामीसहि सविस्तर निवेदन केलें. तेव्हां त्याणी आज्ञा केली जे, मालजी पाटील ढमाला व नेहरे बापलेक दोघें व गारगोटा या चौघाची सेवटची पारपत्ये करावी. यावितरिक्त दुसरे करावयाचे नाहीं. तेव्हां आपण बोलिलो कीं, मालजी पाटील पुष्टिपत्र देता, परंतु कलागत जाली त्यांत नव्हता. सेवटचे पारपत्यायोग्य नव्हे, येसे बोलिलो. तेव्हां त्याजपासून गुन्हेगारी घ्यावी आणि तिघांचीं पारपत्येच करावी, याप्रों सांगितले. त्यास पारपत्ये करावयाची मखलासी सांगावी, तेव्हां सिवाजीपंतानी बावाजवल उतर केलें कीं, विठलपंत रानडे मनसुबीकडे आले होते, ते वेलाचा हा मजकूर, तेव्हां कडुसाहून कमाविसदाराची बखर आली होती. त्यामध्यें नेहरे याचे सेवटचे पारपत्य करावें येसे दिसले नाहीं. त्यावरून बावानी ते बखर त्याजकडून काढऊन वाचून पाहाविली. सिवाजीपंत बोलिले त्याचप्रों होतें. तेव्हां त्या बखरीस त्रिंबकपंतानी दोष ठेविला.

त्यावर बावानी उतर केलें कीं, सेवटची पारपत्यें करावयाची बापूची आज्ञा. तेव्हां तुम्ही व तात्या व आम्ही उदईक तिसरे प्रहरी बसोन साऱ्या सख्या व कागदपत्र पाहून मग पारपत्याची मखलासी करावयासी सांगों; याप्रों बोली होऊन उठोन गेले. त्यास आजी तिसरे प्रहरी ठराव होऊन मखलासी होताच उदईक त्याप्रो पारपत्ये करितील; यैसा मजकूर दिसतो. त्यास मागे कजियामुळें पिसालानी दोन खून केलें व आणखीहि कोठे कोठे जाले, त्याची माहितगिरी वडिलास आहेच. परंतु कैलासवासी रावसाहेबी सेवटीची पारपत्यें त्याची केली नाहीं. गुन्हेगारी घेऊन मुक्तता केल्या. याप्रों असता याच गरिबांची पारपत्ये सेवटीची करावी, यैसी आज्ञा जाली म्हणतात. याचा शोध करून गरिबाचे प्राण वांचत येसे जाल्यास गुनेगारी जीवनमाफक देतील. हे विज्ञापना.

¶*The writer states a certain murder case in which Dhamale and Neheres were involved and says how it was being tried by Ramshastri. He moreover requests that death punishment should not be executed in the case but rather heavy fines should be exacted as was done by the late Peshwa Madhavrao in similar cases.*

No. 153]

मसुदा

श्री

वेदमूर्ति राजश्री समस्त ब्राह्मण
मौजे साखरी पो भामेर यांसी

प्रति रामशास्त्री नमस्कार विनंती उपरी. गोविंदभट साखरीकर याने पेसजी मौजे चांदोरीस दाहा वर्षांची ब्राह्मणाची कन्या तिच्या वस्ता घेऊन जिवे मारिली. त्या दोषास्तव गोविंदभट यासी येथे दोषानरूप प्रायश्चित्त योजून पूर्वांग करऊन प्रायश्चित्तार्थ कासीयात्रेस पाठविला. यात्रा करून हालीं आल्यावर उतरांग करऊन शुध्ध केला असे. याजकडून सवासे ब्राह्मण भोजन करावयाचा संकल्प करविला, त्यापैकी याने चालीस ब्राह्मण भोजन येथे केले. शेष राहिले ते तेथे करऊन यास पंक्तीपावन करावे.

¶*This paper refers to penance assigned by Ramashastri to one Govind Bhat of Sakhri for having murdered a Brahmin girl.*

7546

No. 154] [13-2-1795

पौ छ २२ रजब सुा
खमस माघ

श्री

श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक सदाशिव केशव साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १९ माहे रजबपावेतो स्वामींचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. गिरजी ब्राह्मणीण बायेको इणे सुलताना सिकलगर येवन यासी बदकर्म केले, सबब तिचा घटस्फोट करून किले सिदगड प्रांत कल्याण भिवंडी येथे अटकेस ठेवा-वयास बराबर गाडदी दिमत तोफखाना च्यार असामी देऊन रवाना केली असे. किले मजकुरी अटकेस ठेऊन पोटास सेर सिरस्तेप्रमाणे देत जाणे म्हणून छ ९ माहे मजकूरची सनद सादर जाली व गिरजी येथे पावली, त्यावरून आज्ञेप्रमाणे किले मजकुरी पाठऊन पोटास सेर देऊन अटकेस ठेविली असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*A Brahmin woman was imprisoned in a fortress for committing adultery with a Mohammedan.*

No. 155]

श्री

पुा चिरंजीव हरीपंतास आशीर्वाद उपरी. कवठेकराचे मनसुबीचा फडशा थेऊरचे मुकामी जाला. त्याप्रमाणे कवठेकरास निवाडपत्र द्यावयाचे, यादीवर येथें करंजेचे मुकामी श्रीमंताचे देणे जाले. हरखी गुन्हेगारीचे यादीवर करार तरी पहिला जालाच होता. हली निवाडपत्रें होत आहेत. परंतु भडसवळेकर खोटे असून लढाई करितात, याजकरितां अटकेत पुण्यांत आहेत, त्यास रा सिवाजीपंत मिरवणकर व कवठेकरापैकीं कोण्ही तेथे असतील त्यांणीं श्रीमंत शास्त्रीबावापासीं फिर्याद होऊन त्याजला सख्त तगादा होऊन गुन्हेगारीचा निकाल पडे ऐसे करावे. सिधा सरकारचा खाऊन त्याजला राहावयास काय होते? याजकरितां सिवाजी-पंतास हा कागद दाखवावा. सिधा पीठ दाळीचा असावा. +बावा स्वामीची आज्ञा परभारी घेवऊन धोंडोपंत कोतवालाकडून तगादा करून लिहिलें येईल तर घ्यावें. भोईराजास पालखीस तूर्त राहावयास जागा कोठे केलीत? भवानजी

+ येथून अक्षराचें वळण निराळें.

देशमुख सेजारी याचे पुत्रानी येथें मान्य केलें. परंतु महिनाभर तेथें देतील तर पाहावें. नाहीं तर आणखी योजावी. सौ ठमा सुखरूप पावलियाचे उत्तर लेहून पालखी लवकर पाठवणे. बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद.

¶*Moro Hari writes to Haripant that the dispute between Kavathekars and Bhodsavalekars has been decided in favour of the former and that, therefore, the fine due from the latter should be recovered as early as possible.*

No. 156]

श्री

चिरंजीव राजश्री हरिपंत यासी प्रति मोरो हरि आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता। छ २३ रमजान मु॥ करजे लस्करांत जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. राजाराम आपाजी देशपांडे प्रांत विज्यापूर याचे सरकारात काही जरूर जाबसालाचे प्रयोजन आहे, तरी लस्करांत रवाना करणे. ते पुण्यात महादसेट वीरकर याचे वाड्यात राहतात. मागे कोल्हारचे देशमुखीचे जाबसालाकारितां आम्हाकडे येत असत. त्याजला आणावयास राऊत दोघे रा। तुळजाजी निबाळकर याणी पाठविले आहेत. याचा त्याचा कजीया आहे. राजारामपंतास ठाऊक आहे. सध्या मनास आणावयाची आज्ञा जाली आहे. वाजबी असेल ते दरबारी निवडेल. लवकर येत यैसी ताकीद करावी. बहुत काय लिहिणे हा आशिर्वाद.[१]

¶*Moro Hari requests Haripant to issue summons to Rajaram Apaji Deshpande of Bijapur asking him to appear in a certain case instituted against him by Tuljaji Nimbalkar.*

No. 157]

श्री

चिरंजिव हरिपंतास आशीर्वाद उपरी. पालखी पुण्याहून आणिली, त्याच दिसीं त्या भोयास दूर कसे करावें म्हणून सातारा भोई साडेसहा रु॥ बारमाही मिळत होते ते ठेविले नाहींत आणि याचा पदाजी नाईक बोलिला कीं, एका दो रोजा बोली करूं. तूर्त चाकरी घ्या. त्यावरून तुम्हासुधां आकरा रु॥ दिले. आजी याणी निवतेसमयीं आडविले. रोजमरा द्या नाही तर जातो म्हणून निरोप घेऊन चालिले. यास्तव तुम्हास पत्र लिहिलें आहे. हे फजिती कामाची काय?

+ पत्र मोरो हरि, रामशास्त्री याच्या शिरस्तेदाराचें.

१ रामशास्त्री याचा शिरस्तेदार मोरो हरि याचें पत्र.

नवजण भोई तुमच्या चित्तास येतील ते बळकट पडले काम सिरस्तेप्रमाणें करीतसे ठेऊन आकरा रुा वजा घेऊन बाकी रोजमरा तेथे देणे. नाही तर आम्हावर चिठी देणे. वाकोजीस आणून फजीत करणे आणि कोतवालाकडील अथवा वाकोजी-कडील तुमच्या विचारे होतील ते ठेवणे. नाही तर मोघम च्यार दिवस पुणेस येऊ तो ठेवणे. फजिती काय निमित? बंदोबस्त करावा हे आशीर्वाद.+

¶*Moro Hari requests Haripant to supply the palanquin-bearers and to remove the inconvenience caused by their absence.*

No. 158]

पौ छ १३ रमजान

श्री

चिरंजीव हरिपंतास प्रति मोरो हरि मुकाम जेजुरी आशीर्वाद उपरी. ताा सोमवार संध्याकाळपर्यंत मुकाम मजकुरी सुखरूप असो विशेष. तुम्हापासून पुण्याहून निघालो ते दिव्यास संध्याकाळी आलों. तेथून आज प्रात:काळीं जेजुरीस आलों. श्रीचे दर्शन घेऊन प्रदोषामुळें येथेंच राहिलों. लष्करचे कूच होऊन पुढें दहा कोशावर गेले. उदईक मंगळवारी विसा कोशाची मजल करून कृष्णातिरी साताराजवळ जाणार ऐसे आहे. आम्ही उदईक लस्करात जाऊ ऐसें म्हणत आहो. हलालखोर अद्यापि आला नाही. यास्तव मुदाम महार पाठविला. रुपया आधीक आगळा पडिला तरी कबूल करून सिरवळचे वाटेनें सत्वर लस्करांत ये ऐसे करणे. खोळंबा पडेल. लौकर पाठविणे. हे आशीर्वाद.

¶*Moro Hari informs Haripant of his own movements and those of the army. He further asks him to send without delay one sweeper.*

No. 159]

छ २७ राखर

श्री

सेवेसी विज्ञापना विशेष. राघो नारायेण लवाटे व भिकाजी केशव या उभयेतांचा कजिया. भिकाजीपंताचे स्त्रीस भिकाजीपंत विमलास असतां सिवीगाल केली. त्याजवर भिकाजी केशव आपले घरास गेले, तो त्याचे बाइकोने वर्तमान सांगितले. त्याजवर श्रीआचार्ये स्वामीसन्निध भिकाजी केशव येऊन प्रार्थना केली कीं, राघो नारायेण अधर्मी, मद्येप्राषनी, याचे पारपत्य होत नाहीं. तू धर्मस्थापक

+ अक्षरावरून लेखक मोरो हरि रामशास्त्री यांचा शिरस्तेदार असावा.

आहेस माझें गान्हाणे आइकोन पारपत्य करावें एसे बोलले. तों तेथे वेदमूर्त राजश्री माहाद जोसी थोर शिष्ट ब्राह्मण वैदिक व जोतिसी व पुराणवितपन्न व याज्ञिक चतुर्विद्या जाणते कुंडमंडपसिध करीत होते त्यानी श्रवण केलें. त्याजवर भिकाजी केशव यांस वृत्त पुसिले. त्यानी सांगितले. त्याजवर दुसरे दिवसीं वज्रगडी रामाजी माहादेव लवाटे राघो नारायेण यांचे चुलतबंधु विभक्त बहुत वर्षे आहेत त्यांचे बंधु माहायात्रेहून आले त्यानी मावंदे केले. तेथे ब्राह्मणसमुदाव जाहाला. राघो नारायेण यांस पंगतीतून सर्वांही मिलोन उठविलें. त्यावर तिसरे दिवसीं रावो नारायेण लवाटे सेवकाजवल येऊन वर्तमान सांगितलें व सर्व ब्राह्मणसमुदायास शृत जाहालें. त्याजवर राघो नारायेण सेवकाजवल बजीद बहुत जाहाले. त्यास उतर दिल्हे कीं, तुम्हास बहुत वेला सांगितले व बहुताही सांगितले कीं मद्यप्रासन करू नका. हे गोष्ट पुढें प्रणामास जाईल. परंतु त्यानी ना आइकलें. सेवट उपहास जाहाला. मग समस्त ब्राह्मणमंडली च्यार शत ब्राह्मण कल्याण भिवंडी व जुनर, राजापूर, त्रिंबक, नासिक, वेरूल, प्रभास क्षेत्र व वसई व लोहगड अस्टागर येथील समुदाय प्रतिष्टेकरितां जाहाला होता, त्यास राघो नारायेण याजविशीं बहुतां प्रकारें सांगितले. पुढें त्याचे वर्तणुकेनरूप प्रायश्चित्त यौजावें हा विचार व्हावा. राघो नारायेण आपले स्त्रमुखें थोर थोर ब्राह्मणाजवल जाऊन बोलले कीं मजवर अनुग्रह करावा. त्यास ब्राह्मण बोलिले कीं तुम्हापासून जे अपराध जाले असतील त्याप्रमाणें सर्वांचे मतें होईल आणि तुम्हास निश्चयपूर्वक अनुताप जाहाला असला, पुन्हा दुराचरण न करा ते गोष्ट प्रत्येहास आलियावर प्राश्चित्त होईल, ऐसे भाशण ब्राह्मणानी केले. पुढे सिधांत व्हावा तों राघो नारायेण येथून निघोन गेले. त्याजवर सर्व ब्राह्मणानी समतपत्र केलें हे सविस्तर वर्तमान सेवेसी निवेदन असावें याजकरितां सेवेसी लिहिलें आहे. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*This letter refers to an inquiry into the misconduct of a Brahman who was addicted to drinking and who was asked to give up his practice and perform penance.*

No. 160]

पौ छ १९ जिलकाद

श्री

सेवेसी. कासी बलाल सा। नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता। छ १८ जिल्कादपावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष. विसाजी बाबाजी देवरुखे पुणेकर येथे यात्रेस आले होते. ते रुगवेदी ब्राह्मणाचे घरी उतरले

तेथे आच्यारी यानी स्वयंपाक केला आणि त्या ग्रहस्ताचे बायेकानी वाढिले. याप्रमाणे दोनसे ब्राह्मण जेवले. मग समस्त ब्राह्मण मिलोन येक समापत्र केले की पूर्वापार देवरुखे याचा व आपला आनवेव्हार नसता ब्राह्मण जेवितात तरी आथपर रुगवेदी व येजुरवेदी व कोकणस्त कराडे याणी कोणी देवरुखे यांचे घरी जेऊ नये. येसे केले असता दोन च्यार दिवस जाह्ले. मग समस्त मिलोन आले आणि म्हणो लागले की समापत्र केले आहे हे फाडून टाकावे. मग आम्ही बोललो की समापत्र जाहाले आहे हे उतमच आहे. फाडून टाकावयाचे प्रयोजन नाही. येसे बोलत असता समस्तानी फारच येलगार केला तेव्हा आम्ही बोललो की तुमच्या चितास येईल ते करा. आम्ही काही पत्र फाडावयास परवानगी देणार नाही. जाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. फार करून पत्र फाडवत नाही. सेवेसी श्रुत होणे हे विज्ञापना.

¶*Brahmans of all divisions were present at a dinner when the wife of a Devarukha Brahmin served food. A complaint was lodged about this against the Brahmans of the place who thereupon met together and signed a deed that food should not be participated with a Deorukha. After some days they changed their mind and desiring to have the deed destroyed approached the officer in whose charge the papers had been placed. The officer did not consent to the proposal.*

No. 161] [*3-6-1765*

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक सतू कुटा वस्ती भोगूर प्रो नासिक हली वस्ती को पुणे. आपण लेहून दिल्हे ऐसिजे. माझी बायको पलऊन विठू सेणवी याने नेली. बावड्या किल्यात ठेवली. तिचे ठिकाण आपण लाविले. त्यास स्वामींनी राजश्री वेंकाजीपंत पोतनीस यास पत्र दिल्हे. त्याजवरून त्यानी आपली पत्रे देऊन तिकडे मला रवाना केले. मी आपली बायको घेऊन सातारियास आलो. राजश्री वेंकाजीपंत पोतनीस माझी बायेको माझे स्वाधीन करीत नाहीत. सरकारचे पत्र घेऊन ये म्हणतात. तेव्हा तुझी बायेको तुझे स्वाधीन करीन म्हणतात. येविसी साहेबी सरकारचे पत्र दिल्हे म्हणजे मी आपली बायेको घेऊन येईन. बायेकोस हाटकले मारले तरी यास जामीन मल्हारी कापशा खिजमतगार चाकर

सरकार सदू कुटा याने आपले बायेकोस जिवे मारले तरी यास जामीन आपण आसो. तिची जाब करू. सुा खमस सितैन मया व अलफ. छ १३ जिल्हेज जेष्ठ मास शके १६८७ पार्थेव नामसंवसरे.

¶Satu Kuta traced his kidnapped wife to Bawda and by means of a Government permit got her removed to Satara where she was taken in charge by Venkaji Potnis, a Government official, who refused to deliver her to the husband unless a letter to the effect was produced. Satu prays the Peshwa that his wife be restored to him and promises that he would do her no harm.

No. 162]

श्री+

यादी पत्रे :

१ वासुदेव दीक्षित यास पत्र की, व्यर्थ आतताई ब्राह्मणाने तुफान निर्मूल करून सेषाद्री शास्त्री याजवर ब्रह्महत्येचा आरोप केला हे गोष्ट अपूर्व आहे. या गोष्टीत आपले बंधूनीहि मन घालून त्यास अपांक्त म्हणून कासीत गोष्ट केली. हे गोष्ट सर्व प्रकारे अयोग्य. आपले तर्फेचा आसेल त्याने जे कर्म करावे ते पुर्ते तहकीक करून जे कर्तव्य ते करावे. त्यास आपण त्यास लिहून हे ग्रामण्य वारे ते करावे. शेषाद्री शास्त्री याचे रितीस आपणहि माहीत आहेत. विस्तार काय लिहीणे. राजद्वारी जे श्रेष्ठ ब्राह्मण राहातात त्यासी बाहेरील ब्राह्मण ज्यास श्री इछेने न्यून धन पावते तो कष्टी, दानाधिकारी असतात त्यावर लटकेच

१ बालकृष्ण दीक्षित यास पत्र की लटके तुफान घेऊन तुम्हाजवळ कोणी सागितले की, शेषाद्रीशास्त्री यांनी ब्रह्महत्या केली. त्यास श्रेष्ठ ब्राह्मण योग्य असता हे गोष्ट या पासून कसी घडेल ? हे पुर्ते तहकीक न कर्ता त्यास वालीत घातले म्हणून वर्तमान आवगत जाहाले. ऐसीयास आपण त्यास ताकीद करून याचा मिथ्या अभिशाप दूर होऊन सन्मानपूर्वक याची समजाविसी होय ते करावे. स्पष्ट दोष याजकडे तिलमात्र नसता यासी ज्याने लटके तुफान घेतले असेल त्याचे पारपत्य करणे.

१ कासीचे राज्यास पत्रकी याजकडे दोष नसता लटका अभिशाप आणिला असेल त्याचे पारपत्य करणे.

+ सबंध यादी नानासाहेब पेशव्यांच्या हातची.

रागे भरतात. त्या गोष्टीवर प्रमाणबुध्दी करून तहकीक दोष केला नसता त्यास वाळीत घालणे योग्य नव्हे. आपण नीट समजून त्यास ल्याहावे.

¶*The Peshwa writes in his own hand to Vasudeo Dikshit and his brother and the King of Benares asking them to remove the ban of excommunication imposed on Sheshadri Shastri who was wrongly supposed to be guilty of having put to death a Brahman.*

No. 163]

श्री

विष्णु केशव पळसुले देसाई ताा राजापूर याणी हुजूर विदित केले की, मौजे आसोले वडद ताा मजकूर हा गाव वतनी खोती आमची. त्यास आलीकडे पंचवीस तीस वर्षे विष्णु अनंत घाटे कोतापूरकर यास चालवणुकेस आम्ही गाव दिल्हा. त्याणी वतन आपल्यास जिरावे म्हणोन भुते घालून आमचे घर(ची) (माण)से मारिली. भुते त्याची खरी म्हणोन त्याचे आमचे समक्ष पडथली निवाडा जाहाला. त्याजवरून ब्राह्मणानी त्याजला वाळीत घातले आणि गावची खोती सुभाहून अमानत केली आहे. त्यास गाव कदीम आमचा. येविसी प्राचीन पत्रे भाऊपणाचे विभागाची वगैरे आपणापासी आहेत ती व भुते त्याची खरी जाली त्याची सुभाची बखर आहे ती साहेबी मनास आणून गावची खोती माझी मजकडे चालवावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणौन विनती करून सदरहूप्राो पत्रे दाखविली ती मनास आणून हे पत्र सादर केले असे. तरी प्राचीन विभाग पत्राप्राा गावची खोती देशमुखाकडे तूर्त चालवणे. पेस्तर हरदोजणासमक्ष निर्वाह मनसुबीचा करून ज्याचा गाव होईल त्याचे हवाला केला जाईल म्हणोन गंगाधर गोविंद याचे नावे चिटनिवीसी पत्र

१

छ २४ सवाल खमसैन.

¶*This paper refers to a dispute between two parties regarding the enjoyment of a Khoti Watan in which one party is alleged to have practised witch-craft against the other.*

No. 164]

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री

शास्त्रीबावा स्वामीचे सेवेसी

विद्यार्थी त्रिबकराव सदासिव पुरंधरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा माघ शुध शष्टीपावेतों स्वामीच्या आसीर्वादें करून येथास्तित असें विशेष. खडोबा व मुधोबा बेलसरे जेजोरीकर व मोरोबा बेलसरे याचा भाऊपणियाचा कजिया फार दिवस आह. त्यास आम्ही स्वामीस विनंती केली की, उभयेताचे वाजबी मनास आणून विल्हे लावावे व याचप्रमाणे सखारामपंतानीहि विनंती आपल्यास केला आहे. सरकारातूनहि वाजवी करावे, म्हणून आपणाकडे उभयेतास पाठविले. स्वामीनी दोघाचे मनास आणून दोघासहि वालीत शास्त्रमतें घातलें. त्यास राा कोनेरपंत येकबोटे आमचे घरी येऊन आम्हास म्हणाले की, तुम्ही सखारामपंतानी शास्त्री यासी भीड घाळून गैरवाजबी मोरोबास वालीत घालविले. आम्ही म्हटले की, शास्त्रीबावा कोणाची भीड यैकत नाहीत. त्यास वाजबी असेल तसे करणे आणि तुम्ही आसें का म्हणता ? तेव्हा कोनेरपंत बोलले की, शास्त्रीबावाच म्हणतात की, नाना पुरंधरे व सखारामपंत यानी आम्हास भिडेस घातले, म्हणून वालीत मोरोबास घातले असे कोनेरपंतानी आम्हास म्हटले. त्यास हे वर्तमान स्वामीस कलावे म्हणून लिहिले आहे. आपण परनिष्ट सर्व प्रसिध आहे आणि कोनेरपंतानी आम्हास येऊन याप्राा म्हटले. कलावे. याचे उतर स्वाम पाठवितील त्याप्राा कोनेरपंतास सांगू. बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे. आमची विनंती येविषी कसी होती हे स्वामी जाणत आहेत. हे विनती.

¶*Trimbak Sadashiv denies the charge of pressure having been brought to bear upon Ramshastri with respect to a decision in a case of excommunicati[on] of Belsares.*

No. 165]

श्री

सेवेसी कृष्णराव अनंत कृतानेक साा नमस्कार विज्ञापना. ताा छ १४ जमादिलौवलपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. बाबाजी विष्णु प्रभुणा माहुलीकर याणे ब्रह्महत्या केली. सबब त्याचे घर जप्त करून मोजदाद केली त्याची यादी व विष्णु नरहर याचे स्वाधीन वस्तभाव केली त्याची यादी कारकुनाबरोबर पाठऊन

देणे म्हणोन आज्ञा, त्यावरून रा। विठल तुकदेव कारकून याजबरोबर मोजदादीच्या यादी पाठविल्या आहेत. सेवेसी येऊन पोहचतील. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnarao Anant sends the lists of the property, of Babaji Vishnu, which was confiscated as a consequence of its owner having committed the murder of a Brahman.*

No. 166] *[28-8-1752?*

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

पो। श्रीपतराऊ बापूजी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशलें ता। छ २९ सौवालपर्यंत येथास्थित असे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले. तेथे आज्ञा जे, मौजे देलवडी ता। पाटस या गांवावर राजश्री स्वामींनी चोरीच्या घोड्याबाबत आठसे रुा घातले. त्याची पटी पाटस तर्फेवर करून देणे म्हणून आज्ञा. यैसियास पाटस तर्फेवर घोड्याच्या मागाच्या व चोरीच्या अदावली सा। गुा। व साल मजकुरी मिलोन च्यार पडल्या. पहिल्याने मागाडी आले त्यानी गांवगन्ना पैका घेतला, चोरीची आदावल केडगावावर घातली, त्याची पटी गावगना बसली. दुसरे मागाडी आले, त्यानी पैका गावगना घेतला, चोरीची अदावल खंडावर घातली. तिसरे मागाडी आले त्यानी गांवगंना पैका घेतला, चोरीची अदावल देलवडीवर घातली, त्याची पटी हाली करून द्यावयाविसी आज्ञा जाली आहे. हाली चौथ्याने मागाडी आले त्यानी गावगन्ना पैका घेतला आणि दौंडेवर आदावल घालून गेले आहेत त्याची वाट काय होईल ते पाहावे. सारांश या प्रकारे पाटस तर्फेवर दंगा जाला आहे. पाटस तरफ दूर येकीकडे याकरितां मागाडी माग काढून तिकडेच जाऊन पैका मनास येईल तसा घेऊन सेवटी चोरीचीहि अदावल येथेच घालितात. त्याच्या पद्या तेच तरफेवर घालीन म्हटल्यास निभाव जाला पाहिजे आणि अदावल येती ते येकावरील घालीन म्हटल्यास गावहि वाचला पाहिजे. याकरितां पांचा तरफांत मागाड्यानी जातां जातां वाटेस गाव लागेल तेथील पैका घेतला आहे आणि जे गांव अगदी चुकलेच आहेत त्याजवर देलवडीच्या अदावलीची पटी करून द्यावी लागते. तरी येविसी राजश्री अंताजी नारायण यांस पत्र पाठविले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*Shripatrao Bapuji complains to the Peshwa about the repeated levies which had fallen on the inhabitants of tarf Patas during the current and the preceding years. These were a peculiar sort of punitive levies which were recovered from the inhabitants of a village, who were collectively held responsible for a theft, the actual perpetrators of which could not be traced beyond that village.*

No. 167]

श्री

सेवेसी लक्ष्मण सिदनाथ विज्ञापना ऐसीजे. येथील वर्तमान ता। छ ६ जिल्हेज-पर्यंत स्वामीचे कृपादृष्टीकरून येथास्तित आसे. यानंतर मालेगाव कसबे खेड येथें बापूजी कातोरा कुणबी राहातो. त्याच्या घरास काल मध्यरात्रीस आग लागोन घर जलाले. त्यास त्याचा येक लेक व येक मुली ऐसी दोवे माणसें जलोन मृत्य पावलीं व पंधरा वीस गुरें अगदीं जलोन मेली व आणिखी येक दोवें माणसें भाजलीं आहेत. बाकी राहिलीं मुलें माणसें जीव मात्र घेऊन बाहेर निघालीं. दाणादुणा वस्तभाव जलोन सत्यानास जाला. त्यास बापूजी मजकूर आजी प्रात:काली मुरदे घेऊन गावांत आला त्यास सारे गांवकरी जमा होऊन दोनी मुरदे घेऊन स्वामीपासीं यावयास सिध जाले आहेत. आणि गावानें दहशत घेऊन गाव तजावजा[१] जाला आहे. अक्षत्रितीयेचे दिवसी पेठकर मालेगांवास येऊन आउतें धरिलीं. तें वर्तमान गांवकरी यांस कलतांच सारेच कसबे मजकूरचे सिवेस गेले आणि पेठकरांस बोलावयास माणसें पाठविलीं. त्यास तानाजी कोली याचा लेक व चौगुला व माली ऐसे तिघेजण गांवकरी याजपासी आले. त्यास गांवकरी याणीं तिघा जणांस पुसिलें कीं, मालेगावास आउते का धरितां? आणि जुने मोडून नवें कां करितां? त्यास कोली बोलिला जे, करितो आणि फिरोन करावयाच्या तलासांत आहे, ऐसे बोलिला. मग गांवकरी बेदील होऊन गांवास आले आणि जाला करीना आम्हापासी सांगितला आणि सेवेसीहि त्याणी लिहून पाठविला. त्यास काल आदितवारी दुपारां फिरोन का। मजकूरच्या सिवारांत वाहातीच्या सेतांत (आउते) धरिली आणि रात्रीस घरास आग लागली याकरितां गावकरी यास संदेह निर्माण जाला आणि गांव तजावजा जाला. याकरितां गावकरी दोनी मुरदे घेऊन स्वामीपासी येत आहेत. जाले वर्तमान सेवेसी कलावें याकरितां लिहिलें आसे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Lakshman Sidnath reports to the Peshwa that a house of one Bapuji Katora was set on fire which resulted in the loss of two lives. He also reports the consequent dread that it spread amongst the villagers who were themselves proceeding to the addressee.*

---

[१] घाबरे.

7556

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

नंती सेवक रामचंद्र नारायण साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ माहे रबिलवलपावेतो सेवकाचें व तालुके सिवनेरचे वर्तमान येथास्तित असे शेष. काा नारायेणगाव येथे ब्राह्मण स्त्री विधवा सकेश होती. तिणे वैशाखमासी कासारासी विभिच्यारकर्म नारायेणगावी करिता कमाविसदारानी धरिली. कासारास आटकेत ठेऊन ब्राह्मण स्त्रीचे घर अनामत करोन तिजला गावाबाहेर काढोन दिल्हे, ते शहर जुनर येथे येऊन राहिली. येथे सिंप्यासी अकर्मावर धरिली. मनास आणिता आवंतर पूर्वी कितेक कर्मे जाली म्हणून कबूल आली. त्याजवरोन शहर मजकुरचे ब्राह्मण शिष्ट मिलऊन जाले वृत सर्वांनी मनन करोन तिचे पोटी दोन पुत्र मुंजी जालेले आहेत. येक आठ र्षाचा व येक सा वर्षाचा आहे. यास्तव सर्वा सिष्टाचे मते ते स्त्रीचा घटस्फोट करोन मुले ब्राह्मण्यात ठेवावी म्हणून सेवेसी विज्ञाप्ति लिहिली असे. येविसी आज्ञा कर्तव्य ते करणार स्वाम समर्थ आहेत. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramachandra Narayan reports to Dadasaheb a certain case of adultery of a Brahman woman and the punishment to be inflicted on her.*

No. 169]

श्री

राजश्री जावजी गौळी गोसावी
यांसी

रामराम विनंती उपरी आजी तुम्हांकडील लोक याणी मेटांत जाऊन तमाम वाडियानी ब्राह्मणाची घरे लुटिली. गुरें वस्तभाव आवघी नेली व ब्राह्मणांस क्षते देखील केली. ते ब्राह्मण सारे येऊन आमच्या व रा हरिपंतांच्या डेरियासी गवगवा आरंभिला आहे. आम्ही घाट उतरलिया तागाईत कोणा ब्राह्मणा काडी-इतका उपद्रव दिल्हा नाही. आणि आजी तुंम्ही आम्ही सारे सरदार समीप असतां लस्करांत परम आन्याय जाला आहे. ब्राह्मण रक्षात्रे येविसीं खावंदाची आज्ञा कोणे प्रकारची ते सर्वत्रांस विदितच आहे. उदैकहि याप्रमाणेच कर्तव्यता असेल तर तैसेच ल्याहावे. आम्ही परिछिन तिकडे येणार नाही. तरी

तुम्हाकडील पनास राऊत व येक शाहाणा माणूस कारकून ये
जागा जागा राऊत उभे करून निक्षूण ताकीद करणे.
ब्राह्मणाची गुरे ढोरे वस्तभाव आणिली असेल ते तहकिकात करू
ज्यास त्यास द्यावी. गुरे तोडावितील तरी कार्याची नाही
असतील ते आणवावी. ब्राह्मणाचा बोभाट सहसा कार्याचा नव्हे
विस्तारें ल्याहावेसें नाहीं. रा। छ १० जावल हे विनंती.

¶*This is a complaint against some horsemen who harrassed the Brahm of the place where they had encamped. The addressee is requested to tak severe steps against them.*

No. 170]

श्रीभवानीशंकर

माहाराज राजश्री भाऊ
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक पांडुरंग दामोदर कृतानेक सेवेसी साष्टांग दंडवत प्रा। विनंती. ता। छ १९ माहे जमादिलावलपरयेंत स्वामीचे आशीर्वादेकडून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. मुसलमान चाकर वाघोजी ढमढेरे याजकडे खासदार चाकर आहे. त्याचे बायकोजवळ धुलोजी कोल्या धणनगर जानोजी ढमढेरे यांजकडे चाकर आहे हा जात होता. दोघांचे सूत्र बहुत दिवस आहे. यैसें असतां येक दिवस मुसलमान आपली बाइको घेऊन पळून जात होता. त्यास धुलोजी कोल्या याणें धरून आणून मुसलमानास काठ्यांचा मार देऊन कुस्त[1] करून बहुत कायां केला आहे व त्याचे बाइकोचे पाई आपले घरामधीं येक रात्र [2]चामोटे खिळून ठेविली होती. दुसरे रोजी दोन प्रहरा घरामधी चाकराकरवी बाइको नाक कापून गावाबाहीर लाविली. ते दिवसी बाजार होता, आंम्ही चावडीवरी बैसलो होतो. आम्हां हुजूर रांड बाहीर नेऊ लागले. आमचे द्रिस्टिीस पडिली-यावरी वेसीमधीं उभी करून हकीकत पुसिली. ते आपली हकीकत मुलापासून सांगू लागली. ते तकरार पांडुरंग कुलकर्णी यास लेहूं सांगितली. तो सेवकाचे बोले लेहिना. पाटिलास बोलाऊ पाठविले त्यास तेहि कोण्ही न येत. बाइको येक रात्र गांवात होती. दुसरे रोजी प्रात:काली गांवातून बाहीर गेली. यैसे वर्तमान गांवात जाहाले आहे. सेवेसी कळावे म्हणून लिहिले असे. गांवात

---

१ पाठ चांगली मऊ करणें. 2 a leathern shackle to confine the hand or foot.

…ाही. बेकैदी जाहाली आहे. सेवकाचे कांही चालत …)लामी जाहाली आहे. बेकैदी केली त्याचे पारपत्य व …रपत्य जाहाले तरी गांवात धण्याचे भय लागेल येैसें …य करणार स्वामी धणी समर्थ मायेबाप असेत. सेवेसी होये हे विज्ञापना.

हे विज्ञापना.

¶*Pandurang Damodar reports to Bhausaheb the happenings in a certain …lage particularly the harrassment of a Mohammedan and his wife by …uloji Kolya, both servants of Dhamdhere.*

…o. *171*] [*1738-39*

श्री

रामभट उपाध्या कसबे तळे सुा तिसा सलासीन मया अलफ. कसबे मारचे उपाध्यपणांचे कायदे उपाध्याकडे :

सभादीप पहिला उपाध्याचा. दुसरा आला तरी जोसियाचा, बहुत आले तरी उपाध्याचे असेती. कलम १

भुवनेश्वरी शांतीचे तिनी कलश उपाध्याचे असेती. १

किल्यावरील ब्राह्मण व परभु यांचे घरचे उपाध्यपण उपाध्याचे आणि अशुभाचे उपाध्याचे. कलम १

वैतरणी धेनु व उत्क्रात व मोक्ष उपाध्याची असे. कलम १

सोमव्रती उपाध्याची असे. १

पुण्याहवाचन उपाध्याचे, देखील कलश दोनी कलम १

देवाजी पूजा व सहस्त्रनाम उपाध्याचे असे. कलम १

कथापुराणांचे विसी उपाध्या भांडत नाही. कलम १

चंडिकेचे नवरात्र उपाध्याचे असे. १

नव कलमे उपाध्याची
असे. सुमार ९

¶*This is a decision regarding the perquisites of the priest* (उपाध्या) *of Tale.*

7559

Index to Selection No. 43

Social life under the Peshwas

(Figures refer to the numbers of letters.)

Subjects as well as individuals have been indexed.

A

Abaji Naik Joshi—2;

Adoption—146.

Adultery—61; 154; 168.

Amrutrao Raghunath—94.

Amrutrao Vishvanath—89.

Anandrao Somavanshi—34.

...Vagh—20.

...arayan Fadnis—99.

... Mama Gadre...

...haye—20...

...na... ...n—

... after

B—*contd.*

Balaji Bajirao Peshwa—35; abolishes cesses on pilgrims 70; presents a band to the temple of Bhavani at Tuljapur 73; 74; 93; 109; 117; directs the performance of religious ceremonies for the advent of rain 129.

Balaji Dhondadeo Kulkarni—penance enjoined for lewd practices 29;

Balaji Janardan alias Nana Fadnis—77; 80; 89; 123; 132.

Balkrishna Dikshit—162.

Bapu Gokhale—20;

Bapuji Shripat Chitrav—129.

Bhiubai—sister of Bajirao Peshwa—2;

Brahmin Community—factions about reciting the Vedas 69; 71; Shravan Dakshina 82; 83; 84; 85; 86; 87; 93—factions at Benares 122; 126; 134; disputes about interdining among its various sub-castes 160; Peshwa's solicitude for its welfare 169.

C

...arpenter Community—its precedence over ...other castes in the village community ...ecognised by Government 27;

...te—institution of—rules, regulations and ...putes—8, 12, 17, 22, 25, 41, 48, 49, 54, ...58, 60, 63, 92.

...i Appa—2; 3;

...anbhat Kher—20;

...hter—144; 147; 148; 150;

D

...y punishment meted out 143.

...avan—mode of its distri... ...84, 85, 86, 87, 89, 93, 115.

D—*contd.*

Dajiba Phadke—89.

Dattaji Krishnaji Kasar—defends the right of his community of taking marriage-procession with a Kalash 9;

Dinkar Joshi Sinnarkar—his slave restored to him after seven years 13;

E

Earthquake—66;

English—Their defeat predicted by a soothsayer 94.

F

Fakirchand—21.

G

Gamaji Mutalik—discrepancy in his funeral ceremony 44.

Gangadhar Sohoni—penance enjoined for dining with the Pretender 56, 57.

Ganga Vishnu Waidya—21.

Gopikabai—wife of Peshwa Balajirao—fulfils a vow for being cured of an eyesore 103.

Gopinath Dikshit—96.

Gosavis—certain rights of the Daure Gosavis recognised. 23; factions among their sub-castes—Giris and Puris 29; 102.

Gosavi, Daure—23;

Govind Kavishwar Nevaskar—16;

Govindrao Chitnis—63;

Govind Shivaram Khajgivale—77;

Gujarati Ascetic—his mystic power 127.

H

Haripant Phadke—77.

Hariram—a Brahmin of Kukshi—pun irreligious practices 8;

Hona Gavli—a Court bard—18;

I

Illegitimate progeny—its status 17;

J

Janardan Appaji—makes arrangements to distribute Shravan Dakshana 82, 83, 84, 85, 86, 87.

Janardan Gopal Laghate—37.

Jangam—punished for performing a Rudrabhishek 108, 110.

Jaswantrao Nimbalkar—6;

Jayaram Gosavi Ramdasi—37.

Joti Gopal—seeks redress against the forcible removal of the idols in his temple of Pandurang at Yevale 128.

Jotyaji Jadhav—10.

Justice—prostitution: light sentences on Brahmin offenders 29; murder 35 131; mutilatio of criminals 135; 1 dacoity 1 151; 152; 153.

Kanh pr hin m

Ka

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

४४

ऐतिहासिक घराणीं

[किंमत—१ रुपया ७ आणे किंवा २ शिलिंग ६ पेन्स]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी.ए.

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३४

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल को[redacted]
जबाबदारी सरकारावर नाहीं.)

Selection No. 44.

KAIFIYATS AND GENEALOGIES.

This selection brings together the genealogies and accounts of about 80 historical families constructed by putting together various sources which are too numerous and too minute to be specified. It may be noted that Forrest and Parasnis have already published the Kaifiyats and genealogies of some of the more leading families : but with the advance of research many more names and families of historical repute have come into notice, and this renders desirable some means of tracing them and their connections with accuracy. This compendium of 80 more families will, it is hoped, facilitate further research and study. The following are the contents of the Kaifiyats (I) :—

1 Anyaba Rahatekar.
2 Anandrao Babar.
3 Anandrao Malhar Tanjavarkar.
4 Khatik Kumaji Baloji
5 Krishnarao Narayan Joshi.
6 Krishnasha of Jawhar.
7 Krishnaji Dabhade.
8 Khanderao Ganesh Odhekar.
9 Khando Gomaji Purandare.
10 Gangadhar Govind Bhanu.
11 Ganesh Shamraj Subhedar.
12 Chandrarao More.
13 Anandrao Gopal Supekar.
14 Trimbakrao Sonavani.
15 Daulatrao Lad Watharkar.
16 Naro Moreshwar Bhagwat.
17 Ramaji Yadav Bhovalkar.
18 Naro Ganesh Ok.
19 Pandurang Abaji Kale.
20 Parvatibai Kolhatkar.
21 Bachaji Vishvanath Khandekar.
22 Lilaram Narasinha Deshpande.
23 Bahiro Narayan Pingale of Pratapgad.
24 Balaji Raghunath Patwardhan.
25 Bajirao Subhanji Rananavare.
26 Mir Sadatulla Khan, Kiledar of Trimbak.
27 Mir Sahadat Tulakha.
28 Morshet Karanje.
29 Rangarao Vinayak Purandare.
30 Ravirao Sindia.
31 Ramchandra Nilkanth Page.
32 Yeshwantrao Bhonsle Sakhrikar.
33 Ramchandra Vyankatesh Gune Kalekar.
34 Lakshman Santajirao Dhaybhar.
35 Vithal Chintaman Punekar.
36 Khanderao Raste.
37 Vishvasrao Bhaskar Gokhale.
38 Vyankatrao Shivaji Marathe.
39 Sadashiv Shamrao Koregaonkar.
40 Sadashiv Raghunath Gadre.

II—Genealogies.

1 Anandrao Gopal Supekar.
2 Abaji Raghunath, Chitnis to Sindia of Gwalior.
3 Avji Kavde.
4 Ichharampant Dhere.
5 Krishambhat Kashibhat Rajarshi.
6 Konher Trimbak Ekbote.
7 Ganesh Narayan Dhadphale.
8 Chapaji Tilekar.
9 Janu Bhintada.
10 Janardan Appaji Erande.
11 Chahuji Naik Chihve of Purandar.

II—Genealogies—contd.

12 Tukaram of Dehu (Saint).
13 Trimbak Hari, Subha of Supa.
14 Dhondo Mahadeo, Senakarte.
15 Narasingrao Dhaygude.
16 Naro Anant Parchure.
17 Parashurampant Pratinidhi.
18 Pilaji Jadhavrao.
19 Prayag Anant Phanse.
20 Prataprao Gujar.
21 Baji Bhivrao Rethrekar.
22 Babaji Vithal Karkhanis of Purandar.
23 Balaji Kate, Deshmukh.
24 Manakeshwar Dhaygude.
25 Mahadaji Krishna Joshi.
26 Moropant Pingale.
27 Yeshwantrao Potnis.
28 Ragho Lakshman Purandare.
29 Ramchandra Ganesh Kanade.
30 Ramchandra Damodar Ambikar.
31 Shankaraji Malhar.
32 Shamji Govind Takle.
33 Shamrao Ambaji Kirkole.
34 Santaji Somvanshi.
35 Gopalbhat Barve.
36 Hari Ballal Phadke.
37 Bapuji Bhimsen Parasnis.
38 Mahadajipant Rajmachikar.
39 Naro Gangadhar Mujumdar.
40 Vishvanathpant Behere.
41 Gadadhar Pralhad Pratinidhi.
42 Hande, Deshmukh.

येकून च्यार गाव सरंजामास लाऊन देऊन आणखी नख्त ऐवज पोत्या पौ रोजमुरा याप्रो नेमणूक करून दिल्ही. पुढे काही वर्षा(नी) शके १७१२ चे साली धारवाडास टिपूबराबरचे लढाईत नारायणजी बाबर पडले. त्यांचे बंधु आनंदराव बाबर, आमचे तीर्थरूप, यांस वस्त्रे पागेची देऊन सदरहू सरंजाम चालविला. पुढे जातीच्या तैनातीत मौजे किकली रुो चोविसे पावणेपाच तीन आणे आकाराचे श्रीमंत राजश्री बाजीराव सोा याणीं देऊन बाकी तैनात रोख पोत्यातून देत होते. त्याप्रो चालत असता दरम्यान त्रिंबकजी डेंगले याचे व आमचे वैमनस्य होते यामुले त्याणी जबरदस्तीने आमचा सरंजाम घेतला. तेव्हा श्रीमंतास आर्जे आम्ही बहुत तरेने केला त्यावरून सदरहू गावची मोकलीक करून द्यावी आसे श्रीमंतांचे मनात वागले आणि जातीचे सरंजामाचे गावाऐवजी रोख साहा हजार रुो घेत जावे म्हणोन परवानगी जाली, त्याप्रो पावत आले. आणी ठाणे जालिहाल तालोके बदामी येथील ठाण्याचे बंदोबस्ताचे काम आमचे वडील अनंदराव याजकडे सांगितले आणि सदरहू सरंजामाचीहि मोकलीक करून देतो म्हणोन बोलिले. परंतु मोकलीक होण्यास दिवसगत लागली. नंतर पुन्हा श्रीमंतास विनंती केली, त्याजवरून सदरहू गावची मोकलीक करून द्यावी असी परवानगी जाली; तो इतकियात पेशवे सरकारचे व कंपणीसरकारचे बिघाड होऊन लढाई जाली. पुढे आष्टी येवतीचे लढाईत आमचे वडील पडले. नंतर पेशवे यांचे राज्याचा बंदोबस्त कंपणीसरकारनी करून दरोबस्त सरदार लोकांचा बंदोबस्त केला ते वेलेस आम्ही पेशजी प्रो सरंजाम आगर आमचे वडिलांचे नांवें पेशवाई आखेर साहा हजार रुो सालीना देत होते त्याप्रो चालवावे म्हणोन आर्जे केला. परंतु सरंजामाची मोकलीक जाली नाही व जातीस तैनात साहा हजार रुो नख्त चालत होते त्याप्रो चालविले नाहीत. ऐसियास, आमचे बंधू च्यार व आम्ही, येकून पांच बंधू व पुढे चिरंजीव असा कुटुंब मोठे आणि खर्च तर चालत नाही. याजकारिता सरकारास अर्ज आहे. तरी सदरहू सरंजाम व नख्त साहा हजार रुो सालीना नेमणूक याप्रो आमचे आम्हाकडेस पुत्रपौत्रादि वंषपरंपरेने चाले असी तजवीज करणे हे सरकाराकडेस आहे. ताा २७ नवंबर सन १८४३ इसवी

सही—नीळकंठराव बाबर दस्तुर खुद.
सही—नारायेनराव बाबर दस्तुर खुद.
सही—जगदेवराव बाबर दस्तुर खुद.
सही—भहिरजी बाबर दस्तुर खुद.
सही—परबतराव बाबर दस्तुर खुद.

¶*This is a family history of Anandrao Babar presented by his descendants.*

7563

No. 3] [11-11-1829

पो तारीख ११ नवंबर स. १८२९

इसवी.

श्री

अर्जी मल्हार अनदराव सुा सलासीन मयातैन व अलफ. त्याहावयास कारणे जे कुपणी सरकारचा व श्रीमंत राजश्री बाजिराव साहेब याचा तह वसईचे स्वारीस जाहाला तेव्हा वकीलीचे बोलणे सरकारतर्फन्य कुपणीसरकारात आमचे वडील कैलासवासी आनंदराव मल्हार याणी बोलीवे याप्रो ठराव होऊन शके १७३८ पावेतो आमचे वडिलानी कुंपणी सरकारचे काम इमान्यइतबारे केले. नंतर त्याचा मृत्यु जाहाला. त्याजवरून मेहेरबान आलपिष्टंन साहेब याणी आमची मातुश्री वाल्होबाईचे नावे पेनसीन सालिना रुा ५०० पाचसे करून दिल्ही. नंतर शके १७४२ या सालात मातुश्रीचा आत:कालसमये आला तेव्हा मेहेरबान बडे साहेब याचा हुकूम घेऊन आम्हास दतपुत्र घेतले. नंतर मातुश्री मृत्य पावली. पेनसीन बंद जाहाली. घरची चीजबस्त होती ती आजपरियेत मोडून खाली. हली प्रपंचास उत्पन्न काही नाही. वडिलानी कुंपणी सरकारची नवकरी फार दिवस केली आहे. पदरचे जाणोन अर्जी लिहिली आहे तरी साहेबानी मेहेरबानी करून पेनसीन करून देऊन बदोबस्त केला पाहिजे.

¶*Malhar Anandrao represents that his father Anandrao Malhar served the last Peshwa and was present on his behalf during the negotiations of the treaty of Bassein. He begs that his father's pension should be continued to him.*

No. 4] [10-9-1828

पो तारीख १७ सपटंबर

स. १८२८ इसवी

श्री

साहेबाचे खिजमतीस कुमाजी वाा बाळोजी खाटीक काा वोडे हली वाा शेहर पुणे पेठ सोमवार सुा तिसा आशेरीन मयातैन व आलफ. तसलीमात बंदगी आर्जी करितो ऐसाजे. मेहरबान विस्टूरसाहेब फाकडे याची रसद नाना फडणीस व धोंडोपंत निरचुरे याणी घाटबंदी करून रस्त बंद केली ते वेळेस साहेबानी माझे बापास कौल देऊन आभय दिल्हें की, तुम्ही बकराची रस्त पोहचवावी. त्यावरून आम्ही तीन वेळ साहेबास रस्त पावती केली. चौथे खेपेस पेशवे

सरकारात कोण्ही चाहाड जाला. त्यावरून लोहोगडाहून पांच सातसे माणूस येऊन आमचा माल बकरी बुध सुमारी २५०० आडीच हाजार लुटीस गेली. व किल्यावर माझे बापास नेऊन डोके मारू लागले सबब खंडाबाा रुपये ३५० साडितीनसे दिल्हे. या बाबे पेशजी मुबईस बडे साहेबास आर्ज केला. हुकूम व्हावा तो माझी आई मृत्य पावली याकरिता घरी निघून गेलो. हली साहेब मेहरबान होऊन माझा माल लुटी गेला व खंडाबाा रुपये पडले ते देणार साहेब खुदावंत आहेत. मी गरीब माझी मुले माणसे आन्नाविण उपवासी मरतात याकरिता साहेबाचे कदमापासी फार दिवस खराब होत आहे. त्यास कृपाळु होऊन माझी नुकसानी भरून देविली पाहिजे. ही आर्जी लिाा दिल्ही. सही तारीख १० माहे सपटंबर सन १८२८ इसवी. निाा कातर

¶Butcher Kumaji applies to Governor Elphinstone that he may be re-imbursed for the loss of 2,500 goats which his father sustained during the time he was in the service of the Company.

No. 5] *[20-11-1843*

डे. क. रु. १९९

श्री

यादी केशवराव कृष्ण जोसी सातारकर सुाा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ. आमचे तीर्थरूप कृष्णराव नारायण जोसी ऊर्फ तात्या जोसी याचे वडील पूर्वीपासून शाहु माहाराज याचे पदरचे सबब पेशवे सरकारातून नवाव टिपू सुलतान बादर याजकडील वकिलीचे काम होते व पंतप्रतिनिधि याचे दौलतीचा कारभारहि होता. असी पेशवे सरकारातून वडिलाचे हातून मोठी मोठी कामे योग्यतेनरूप घेऊन शके १७०० सालात सोलापूर तालुक्यातील तीन गाव मौजे तिरे व मौजे उले व मौजे सिदखेड येकूण तीन गांव दाहा हजार रुपयाचे दिल्हे ते पुढ बाजीरावसाहेब याणी विनाकारण गांव जप्त केले. नंतर कुपणी सरकारचा आमल जाल्यावरी गांव सोडविण्याविसी अर्ज केला तेव्हा महरबान अलपिष्टन साहेब बादर याणी आमची खानदानी पूरवापार कागदपत्रांवरून पाहून पेशवे सरकारहि चालवीत आले. त्याजवरून पेनसीन सालिना च्यार हजार रुपये करार करून दिल्हे. नंतर वडिलाचा काल जाल्यावरी आमचे नावे तेच पेनसीन करार करून दिल्हे. ते सरकार हली मेहरबानी करून देत आहे. परतु आम्हास दोघे पुत्र येक शंकरराव याची उमर वर्ष १२ दुसरे बाबूराव

याची उमर वर्षे १० व आमची उमर ३० वर्षे त्यास आमचे पुत्रास दुसरा आधार गुजारा चालण्यास काहीच नाही. याजकरिता सरकारानी मेहरबानी करून गाव अगर पेनसीन पुस्त दर पुस्त करून देऊन चालविले पाहिजे. तारीख २० माहे नवंबर सन १८४३ इसवी दस्तूर लक्ष्मण बापूजी पाचवडकर निा केशवराव कृष्ण जोसी.

¶*Keshavrao Krishna Joshi prays that the pension that was granted to his father Krishnarao Narayan Joshi and which he was enjoying after him be made hereditary.*

No. 6]

डे. क. रु. ९१

श्री

कृष्णशाहा राजा जवारकर. त्याच्या बाइका दोन येक अंबाई राणी वडील धाकटी मोहनी राणी. अबाई राणीचा लेक कुवरजी. मोहनी राणीस पुत्र नाही, परतु तिणे दतपुत्र घेतला त्याचे नाव पटणशा. त्यास कृष्णशाहा मेल्यावर विसाजी केशव वसईचे सुभेदार याणी अंबई राणीला धरून वसईस आणिले. पेशव्यानी कुवरजीला वसईस पालखी व सरदारी दिल्ही. मग पुण्यास पेशवे याचे हुकुमाने तहनामा जाहाला. मोहनी राणीचा दतपुत्र पटणशा याला राज्यावर काईम केले. परंतु इतक्यामध्ये मुलूक कुवरजीचे स्वाधीन केला. कुवरजी मेल्यावर त्यास कोणी संतान नाही. पटणशा राजा होता तो मेला. त्याला तीन पुत्र वडील विक्रमशा, दुसरा यशवतराव तिसरा माधवराव. प्रौ विक्रमशा याला सरकारातून राज्याची परवानगी जाली, परंतु कुवरजीची बायको गौराई राणी याणी सरकारची परवानगी घेऊन येशवतराव विक्रमशाचा भाऊ यास दतपुत्र घेतले. येशवतराव मुलकाचा कारभार करीत होता. गोराई राणी मेल्यावर येशवतराव राजा जाला. तो मेला. आता दोन वर्षे जाली. त्याची बायको रमाबाई.

¶*This paper mentions several members of the family of Krishna Shah of Jawhar.*

No. 7] [*3-10-1843*]

आक्टोबर १७२० १/२

बारामतीचें युद्ध —बंद रास दोन

श्री

यादी माधवराव दाभाडे चऱ्होलीकर शेना बारासहश्री सुा आर्बा आर्बैन मयातैन व आलफ. सन १२९३ फसली सरंजाम संपादन केला त्या मूळ

पुरुषाचे नाव सरंजाम कोणे साली मिळाला त्याची तारीख व हली सरंजाम वगैरे काय चालत आहे व अवरस पुत्र याचे नाव व उंबर वर्षे याची तुम्ही आपली कैफियत लिहून देणे म्हणौन सरकारातून सांगितले त्याजवरून येविसीची कैफियतीची कलमे खाली लेहिली आहेत ती बीा.

१ सरंजाम वगैरे संपादन करणार मूळ पुरुष आमचे पणजे कृष्णाजी दाभाडे व त्याचे चुलते थोरले खंडेराव दाभाडे तलेगावकर याणी श्रीमंत शाहू माहाराज छत्रपति याजपासी येकनिष्ठेने शेवा केली व मोठे पराक्रम करून कामकाजे केली त्याजवरून शाहू माहाराज याणी सरंजाम कोट पाऊणकोट रुपयाचा देऊन खंडेराव दाभाडे आमचे निमेचे वडील घर यास शेनापतीचे पद दिल्हे व आम्हांसहि दुसरे पद सेना बारासहश्रीचे दिल्हे. सरंजाम वगैरे दिह्याचे साल राजशेक शके २० पासून शके २९ परयंत, देऊन सनदापत्रे दिल्हे ते कागदपत्र दंग्यात काही गेले. आमची मोठी दौलत होती ती त्र्यंबकराव दाभाडे व पेशवे याचे वैमनश्व आल्यामुळे लढाई होऊन त्र्यंबकराव दाभाडे लढाईत कामास आले तेव्हा दरोबस्त दौलत पेशवे यानी आटोपली. त्या अलीकडे आम्हांकडे सरंजाम वगैरे चालत आला त्याची बेरीज अजमासे पस्तीस हजाराची आहे. त्याचे माहाल व गाव होते त्यापौ काही राजपत्रे राजशक ३७ पासून आलीकडील आहेत. त्याच्या नकला हाजर केल्या आहेत. [पुढें पत्रांचा तपशील गाळला आहे.]

१ आमची वंशावळ

० खंडेराव दाभाडे तलेगावकर शेनापती थोरले त्याची वंशावल त्याजकडून लिहून येईल सबब दखल बंद

१ कृष्णाजी दाभाडे आमचे पणजे

यासी पुत्र

१ सोमाजी दाभाडे वडील	१ खंडेराव दाभाडे आमचे आजे धाकटे
१ यासी पुत्र कृष्णाजी दाभाडे	१ यास पुत्र बाबूराव दाभाडे
१ योसी पुत्र बलवंतराव दत रुजू मल्हारराव	१ यासी पुत्र माधवराव दाभाडे खुद आम्ही आमची उंबर वर्ष ५९ यासी
३ सदरहू त्याने आपले यादीत लिाा दिल्हे आहे.	

7567

० मल्हारराव वडील उंबर वर्षे १३ दत कृष्णाजी दाभाडे आमचे चुलते यांस दिल्हा आहे.

१ बलवतराव धाकटे उंबर वर्षे ९

¶*This paper gives the genealogy of the second or Charholi Branch of the Dabhade family, which rose to prominence during Shahu's regime.*

No. 8] [*1844*

श्री

यादी हकीकत राजश्री खंडेराव गणेश बोढेकर इनामदार मौजे बोढे पो नासीक वगैरे सुा संन आर्बा आर्बेन मयांतैन व अलफ. आमचे मूळ पुरूष सिवराव शंकर हे सिलेदारीने श्रीमंत बाजीराव बलाल पेशवे याजपासी होते. तेव्हा हे सिपाई भालेकरी नामांकित, यास्तव श्रीमंताची मर्जी सुप्रसन्न होती. उपरांत दाभाडे यासीं विरुध्द येऊन लढाई लागली ते समई उदाजी पवार यांचे बंधु आनंदराव पवार हे दाभाड्यापासीं नोकरीस होते. त्यासी बोलणे करून श्रीमंतास आणून भेटविले. नंतर दाभाडे याचा मोड जाहाला. उपरांत श्रीमंताची मर्जी खूश होऊन, आनंदराव पवार याचे दिवाणगिरीचे काम सिवराव शंकर यास सांगून आनंदराव पवार याचा काल जाहाला. त्यांचे पुत्र येशवंतराव पवार सरदारीचे काम पाहू लागले; तेव्हा पुढे काही दिवसानी पवाराचे सरदारी पौ पो आगर व पो सुनेल हे दोनी माहाल सिवाजी शंकर यांस श्रीमंतानी सरंजामास लाऊन दिल्हे. उपरांत सिवाजी शंकर याचा काल जाहाला. नंतर त्याचे जेष्ठ पुत्र रंगराव हे सरदारी करीत होते. ते वेलेस कुंभेरीचे मुकामी जाटाचा छापा पडून रंगराव मारले गेले. नंतर त्रिंबकराव सिवदेव सरदारीचे काम पाहू लागले, ते समई सरकारची चाकरी करून बाराशे राउताचे सरंजामास मालवे प्रांती वगैरे माहाल लाऊन दिल्हे.


येणेप्रमाणे वैवाट खंडेराव त्रिंबक याचे नावे चालली. पवाराचे दिवाणगिरीचे काम माधवराव सिवदेव करीत होते. त्याचा काल जाहाल्यावर पवाराचे सरदारीचा बखेडा जाहाला. सरदार मूल लाहान वगैरे राज्यांत बखेडा श्रीमंत राघोबा दादामुळे जाहाला. उपरांत त्याचा बंदोबस्त होऊन दौलतीचे बंदोबस्त चालिले,

त्यावेळेस आमचे तीर्थरूपांचे नावे दिवाणगिरीची सनद होऊन कारभार रंगराव आपानी केला, तो शके १७२१ पर्यंत चालिला. पुढे पवारांचे दौलतीमधे येजमान लाहान, च्यार माणसे बखेडेखोर मिलाले, त्याचा बंदोबस्त आपा पाहू लागले, याजमुले यजमानाचे आपाचे वाकडे आले. हुजुरांतून बंदोबस्त व्हावा ते न होई. कारण पुण्यातहि कारकिर्दी फिरल्या. बैदा पडला, हा समय पाहून यजमानानी तंटेबाजी करून आपास कामाहून काढिले. नंतर तीन वर्षे तसेच होते. उपरांत श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब याची भेट पुणे मुकामी येऊन घेतली. तिकडील पवारप्रकर्णी मजकूर विदित केला, तेव्हा आज्ञा जाली की तुम्ही तूर्त येथे आम्हाजवल आसावे. तुमचा बंदोबस्त करून देतो, पुढे पवार प्रकर्णी बंदोबस्त सोईसोईने करून द्यावयास येईल. असे बोलून जातीस तैनात पांच हजार रुपये व स्वारांचे नेमणुकेबाबद तीस हजार येकूण पस्तीस हजारांचा सरंजाम रंगराव आपाचे नावे करून दिल्हा; त्याची वैवाट शके १७३९ पर्यंत चालली.

¶*This is the family account of the Odhekars, the Diwans of Dhar, submitted by Khanderao Ganesh.*

No. 9] [*1816*

घ. ५०६



१ दाजी गोमाजी मृत्यु पावले [शीत अशर मयातैन]

१ तैनात जाबता राजश्री खंडो गोमाजी सुा इसने आर्बैन मया आलफ

नख्त रुपये शिवाय कापड आख

२५००

१ [सन इहिदे सबैन मया व अलफ नंतर खंडो गोमाजी याचें नांव आढळत नाही यावरून तो यानंतर वारला असवा]

१ यादी बाळाजी खंडेराव व दाजी गोमाजी व रामराव मैराळ याजकडे आसाम्या वगैरे सुा खमस सबैन मया व अलफ

१०४६८॥ बाळाजी खंडेराव याजकडे

१०४०० माारनिलेकडे पागा आहे त्याचे सरदारीचे वेतन रुाो

६६०० कदीम

३८०० इजाफा स्वारी हिंदुस्थान [वगैरे

३७०० दाजी गोमाजी याजकडे भिकाजी सिंदे याचे पागेची मजमू आहे. त्याचे वेतन सालिना रु.

२९०० कदीम

२७०० नख्त

२०० कापड आख ९००

८०० इजाफा स्वारी हिंदुस्तान

३७००

९४४८—। रामराव मैराळ याजकडे

[पुढे तपशील]

यादी पागा दिमंत खंडेराव बलाल पुरंदरे सुा तिसा तिसैन मया व अलफ मौजे हा गाव दरोबस्त तीाा कैलासवासी खंडो गोमाजी आपले आजे यास बाा मुाा तैनातेत सरकारांतून दिल्हा, त्यास पन्नास वर्षे होत आली. खंडो गोमाजी यांचा काळ झाल्यानंतर आपले तीर्थरूप बाळाजी खंडेराव याचे नावे पेशजीप्राो तैनातीचा करार होऊन गाव सरंजाम चालत आला. हाली मौजे मजकूर हा गांव बाळोजी कुंजीर यांस सरकारातून देवितात. त्यास वडिलानी सरकार चाकरी येकनिष्टपणे बहुत दिवस केली. श्रीमंत कृपावंत होऊन आजपर्यंत चालविले. प्रस्तुत गावची घालमेल होत आहे. त्यास आपले वडिलानी स्वामीशेवा येकनिष्टपणें केली व आपणहि करावयास उमेदवार आहो. त्रिपुरुषांत सरकार शेवेव्यतिरिक्त अन्योपार्जना केली नाही. यास्तव स्वामीनी कृपावंत होऊन मौजे मजकूर हा गाव पेशजी चालत आल्याप्राो चालविणार. स्वामी धणी समर्थ आहेत.

१ यादी सिवानंद बीन सहजानंद उपनाम पुरंधरे गोत्र भारद्वाज सूत्र आश्वलायेन वास्तव मौजे सिदनमट्टू पाा चितापूर

छ २८ रजब माघ मास

7570

१ यादी आनंदीबाई कोम रावो लक्ष्मण पुरंदरे कसबे सासवड सुाा समान समानीन मया व अलफ कलमे

१ आमचा नातू महिपतराव लक्ष्मण सालमजकुरी मृत्य पावला. त्याच्या स्त्रिया दोघी आसता पोटी संतान नाही. त्यास धाकटी स्त्री उमाबाई यास पुत्र दशाहातील यात्रा यासमधे नजर होो ८०००१

१ महिपतराव याची जेष्ठ स्त्री मथाबाई

¶*This is the genealogy of another Purandare family of Saswad.*

No. 10] [*10-3-1826*

दप्तरात दाखला पाव्हा
तारीख १० माहे मार्च सन
१८२६ इसवी.

श्रीगजानन

सरकार कुंपणी इंग्रज बाहादूर

आर्जी रघुनाथ श्रीधर भानु वस्ती मौजे आंबेगाव सन १२३५ फसली, कारणे अर्जी लिहून दिल्ही ऐसीजे. आमचे वडील गंगाधर गोविंद भानु याजकडे सरकारची कामे तालुके विजयेदुर्ग व नवलगुंद व किले लोहगड येथील सबनिसी होती. सबनिशीचे तैनातेत मौजे मजकूर हा गाव दरोबस्त होता. श्रीमंत माधवरावसाहेब कैलासवासी जाल्यानंतर श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब याणी वडिलाकडील कामे दूर करून आमचे वडिलास सिंदे याचे हवाली केले. च्यार लक्षाचे भरण्याकरिता तसदी बहुत केली त्याजमुळे मृत्य पावले. नंतर सिंदे याजकडील पलटणे व फौज लोहगड घ्यावयासी आली, याजमुळे आम्ही मुलेमाणसेसुधा पलोन उरणास गेलो. मागे आंबेगाव येथील वाडा सिंदे याजकडील लोकानी चीजबस्त जराबाजरासुधा लुटून नेले याजमुले खराबी बहुत जाली. पुढे तीर्थस्वरूप नाना फडणीस कैलासवासी जाल्यानंतर लोहगड किला सरकारात घेतला तेसमई आम्हाकडून सबनिसीचे काम दूर केले. सबनिसीचे तैनातेत गाव होत तो दूर केला. आमचे बदीस्तीची सेते मौजे सिंदगाव व

आंबेगाव येथील आहेत त्याचा सारा खंडेराव रास्ते याजकडून ठरऊन घेतला ते पेशवाई आमलापावेतो चालला त्यात सदासिव माणकेस्वर याणी जबरीने दोन तीन साले वसूल घेतला. पुढे साहेबाचे आमलापासून सेताचा वसूल रुपये पावणे नवण्याव रुा तीन आणे घेतात. त्यास प्रपंचाचा निर्वाह होत नाही म्हणौन साहेबास अर्जी लिहीली आहे. साहेबी मेहरबान होऊन उपजीविका चालविली पाहिजे हे अर्जदास्त.

¶*Raghunath Shridhar Bhanu, a descendant of Gangadhar Govind Bhanu, gives his family history and requests the Company Officer to renew the allowance granted to him by the Peshwa but stopped by Sadashiv Mankeshwar.*

No. 11]

श्री

यादी माधवराव गोपाल व रंगो केशव व विश्वासराव रघुनाथ नामजाद सुभेदार प्रा मावल सुा आर्बा आर्बैन मयातैन व आलफ. आमचे निपणजे याचे वडील हरिपंतपरियेत विज्यापूरकर पादशाहांचे पदरी आसोन त्याजकडे किला सिरवल येथील होता. तो किला श्रीमंत छत्रपति सिवाजीमहाराज याणीं घेतला ते समई किल्यांत आमचे वडील आसोन त्यांनी ते समई ज्यवामर्दीने लढाई करून हरिपंत ठार जाले. हे समक्ष माहाराजा पाहोन त्याच किल्याचे काम त्याचे पुत्र शामजी हरि ते आमचे निपणजे यास सागितले व दुर्गादेवीचे काळाचे वगैरे आतीने मुल्लख व किले बेचिराख होऊन बंडे जाली. सा सिरवल येथील किला व बारा मावले व किले त्या प्रांचे सुभा आमचे वडील शामजी हरि यास वतनी सुभ्याचे काम सागोन किताब सुभा नामजाद प्रा मावल म्हणौन व सिकेकटार आमचे वडिलाचे नावे व सुभे आमल वगैरे बाबती व वेतन व पालखीस गाव * * * * व सुभ्याकडे दरखदार वगैरे लवाजम आमचे वडिलास नेमून दिल्हे. नंतर आमचे वडिलानी श्वामी आज्ञेप्रा फौज ठेऊन मोठे प्रयत्नानें बंडे माडली व रयेत जमा करून मावल प्राची वसाहात करून मुल्लख भर रकमेस आणोन आमचे वडील छत्रपति यांचे राजधानीचे आरंभापासून श्वामीशेवा करीत आले व त्या प्रसंगी जे लोक उपयोगी आले त्यास देणे आमचे वडिलानी दिल्हे ते आमचे सिक्याचेच आहेत. ते हली सरकार चालवीत आहेत व त्याप्रा वहिवाट वगैरे कायदे आजपरयेत आमचे वडिलानी नेमून दिल्याप्रा चालत आहेत व ते काम सुराक्षित त्याजपासून आम्ही पाचवे पुस्त परयेत चालत आले. कलम

सदरहू आमचे नेक चालीवरून आमचे पणजे गोविंद सामराज सुभेदार यास श्रीमंत छत्रपति यांजकडोन श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब थोरले व नानासाहेब पेशवे याणी मागोन घेऊन पूर्वीचे काम निभाऊन नवीन कामे हिंदुस्थान प्रां किले ग्वाल्हेर वगैरे माहालचे बदोबस्ताचे पंचवीस तीस हजार फौजेचे सरजामानिसी सांगोन * * * * ते श्वामीकार्यतत्पर आसता सरकारश्वाऱ्या लाहोर व सोनपत व पथरगड वगैरे जाल्या. त्या प्रसंगी आमचे वडिलानी फौज व ऐवज मोबदलानिसी सरकारमदत केली व सोनपतचे श्वारीतून राजेश्री नाना फडणीस व खेरीज सरदार वगैरे लोक तजावजा होऊन आले त्याचा बंदोबस्त ग्वालेर मुकामी आमचे वडिलानी ठेऊन त्या लोकास इतमामपुरस्कर देसी पावते केले व तदेसीचे संस्थानी जाट वगैरे लोकासमागमे हामेशा लढाया जाल्या. त्या प्रसंगी ऐवजाबद्दल वगैरे सरकारांतून मदत न जाली. याबद्दल जातीवर मोबदले जाले बंदल आमचा ऐवज सरकारात बहुत घेणे जाले. पैकी सरकारातून ऐवज आदा होऊन आमचे फाजील सरकारातून येणे रुा दाहा आकरा लक्ष राहिले. याप्रो आमचे वडिलाकडून मदती होत गेल्यामुळे पेशवे सरकारातून मेहरबानगी दिवसेदिवस ज्यास्त होऊन हिंदुस्थानचे कामे वगैरे आमचे वडिलापरयेत चालत आसतो. शके सत्रासे दोन यातीचे साली आमचे आजे रघुनाथराव सुभेदार वगैरे मंडली गोहदकर जाटाकडोन कुंपणी सरकारचे लढाईत कामी येऊन ग्वाल्हेरचा किला वगैरे कामे गेली व जिनगीची तजावजा होऊन फक्त बायकामुले झासीकर याणी देसी पोहचविली. नंतर राजश्री नाना फडणीस व माहादजीबावा सिंदे आमचे बंदोबस्ताविसी सरकारांत बोलता आज्ञा जाली जे तूर्त मुले लाहान पुढे त्याचा बंदोबस्त पूर्ववत केला जाईल. तोपरियंत छत्रपति स्वामीकडोन सुभा वगैर कामे चालतच आहेत व पेशवे सरकारातून * * * * चालत आहे तो व याचे फाजील सरकारात आहे त्याऐवजीं दरसाली रुपये पंधरा हजार पावतील याप्रो आमचा बंदोबस्त करून दिल्हा आणि हिंदुस्थानचे काम सिंदे याजकडे सांगितले. नंतर तो बंदोबस्त आम्हास गाव व फाजिलाबदल रुपये करून दिल्हे ते रुपये आम्हास नाना फडणीस याचे आखरपरियेत सुरक्षित चालत आले. नंतर बाजीरावसाहेब याचे काजकीर्दीत व्यत्यय आले ते बितपसील :—

कलमे

१ मौजे रामपूर हा गाव संसार बेगमीस होता तो आमचे च्यार पुस्त चालत आला तो व फाजिलापैकी रुपये देत होते ते आमचा मागील

7573

सिलसिला न पाहतां नाना फडणीस याचे वगैर लोभातील जाणौन बीतकसिर बंद केले. कलम

१ छत्रपति याचे देणे वतनी सुभे आमल व पालखीचा गांव वगैरे सदरी लिहिले ते पांच पुस्त आम्हापरयेंत चालले आसतां कुपणीसरकारचे लढाईपूर्वी तीन च्यार वर्षे आपाजी निंबालकर वाठारचे वगैर कारभारी सचिव याचे दौलतीत पेश होऊन सचिव यास कैद केले आणि आपण मुखत्यारीने वागो लागले. त्यास आमचे वडील आनकूल न जाहाले बदल त्या आकसाने त्याणी धटाईने सदरहू कामास वित्यय आणौन वहिवाटू लागले आणि घर वगैरे जिदगीवर उपराले केले. ते समई पेशवे सरकारात आमचे वडील अर्ज करिता निंबजालेकर त्रिबकजी डेगले याचे वसिलेदार म्हणौन दाद न लागो दिल्ही. बेबंद जालीबदल आमचे वडील मुलें माणसे घेऊन परागंदा जाले. नंतर काही दिवसी सचिव कैदेतून सुटून निंबजालकर याचे पारपत्य जाले. ते समई आमचे काम आम्हाकडे यावे तो कुपणीसरकार व पेशवे सरकारचे लढाईचे हगाममुळे आमचा बंदोबस्त न होता ते काम सचिव वहिवाटितात.

—

२


तारीख ३ माहे दिजंबर सन १८४३ इसवी

सही विस्वासराव रघुनाथ नामजाद
सुभा प्रा मावले दा खुा

¶*Madhavrao Gopal, Rango Keshav and Vishvasrao Raghunath recount their family history, how the Subhedari of Shirval was conferred on their ancestor by the Padshah of Bijapur, how he suffered death in a battle with Shivaji who was pleased with his bravery and continued the same Watan to his son, who settled the province and administered it ably, advanced big loans to the Peshwas on various occasions. His son Govind Samraj was an esteemed servant of the Peshwa and rendered succour to the fugitive army after its defeat at Panipat. The writers complain how their family Saranjam—Gohad etc. was wrested from them by Bajirao and asks for redress. The genealogy of the family is attached.*

7574

वंशवेल



+ गोविंद शामराज सुभेदार यास रामचंद्र गोविंद नांवाचा मुलगा होता असें तत्कालीन अस्सल पत्रव्यवहारावरून दिसतें. या रामचंद्र गोविंदाचा उत्तरेच्या राजकारणांत वारंवार उल्लेख येतो.

फडपोशी रु. नं. १४५

याद़ी वंशावळ चंद्रराव मोरे जावळीकर यांची जबानी अमृतराव बिन भीवराव मोरे

मूळपुरुष चंद्रराव मोरे यांसी पुत्र ५

- कृष्णराव
  - यशवंतराव
    - * कृष्णराव
  - मानसिंग+
    - आनंदराव (दत्तक)
      - भीमराव
        - कमळोजीराव
        - मानसिंग
        - संताजीराव
        - आनंदराव
        - अमृतराव
- हणमंतराव
  - सिदोजीराव
  - संताजीराव
    - यशवंतराव
    - आनंदराव दत्तक दिल्हे मानसिंगराव यांस.
- गोविंदराव नकल
- कमळाजीराव नकल
- यशवंतराव नकल

संपादकीय टीप.—वरील नकल सातारा महाराजांच्या दप्तरांतील फडपोशी दप्तर रुमाल नंबर १४५ यांतून घेतली आहे. आडव्या बंदावर एकाखालीं एक घेतलेलीं नांवें वर वंशावळीच्या रूपांत दाखविलीं आहेत. या वंशावळींतील पहिला मानसिंग मोरे–हा शाहूचा सेनापति असून तो स. १७२१ च्या सुमारास वारला.

नंतर त्याचा सरंजाम मुलगा आनंदराव याजकडे चालला. आनंदराव स. १७६७ च्या पूर्वी वारल्यावर त्याचा पुत्र भीवराव याचे नांवें असामी चालली. भीवरावाचा मुलगा कमळोजी पेशवाई अखेर हयात होता, अशी माहिती कागदांत मिळते.


चंद्रावाचा नातू यशवंतराव हा पुढील वंशावळींत दाखविलेला मूळ पुरुष असावा.

* कृष्णराव यशवंतराव याचा पुत्र यास पुढें लग्नाचे बायकोचा वंश नाहीं. दुसरे बायकांचा वंश आहे.

¶*This and the following tables of the family of the Mores would be found useful in constructing a history of that family, as it gives several names and their relationship about the year 1827.*

श्री

वंशावळ भगवंतराव बिन हैबतराव मोरे पाटील मोकासी मौजे साईकडे पो। कोळे प्रांत कराड. मूळ पुरुष यशवंतराव मोरे



+ या नांवांखालीं 'हजीर आहे', असा शेरा आहे. सदरहूप्रमाणें मूळ पुरुषापासून ह्यापो विस्तार आहे. जे वडील मेले ते स्वामीकाजी मेले याचा तपशील:—

१ कृष्णराव बिन यशवंतराव याणी आपले काळ्कीर्दीस पांचगांव मोकासा व इनाम जमिनी व पाटीलकी मौजे मजकूरची खरीदी घेतली. गाव मोकासा जमिनी श्रीमनमाहाराज कैलासवासी शाहूराजे छत्रपति याची सेवा करून मेळविले त्याच्या सनदा आहेत.

१ याची बायको रखमाबाई खासी होती तिचे पोटी संतान नाहीं. दुसऱ्या आमच्या मातुश्री दोघी होत्या त्याचे पोटी आमचे वडील—

१ बुधिवंतराव	१ सोनजीराव व मुकुंदराव
येकीचे पोटी येकच	येकीचे पोटी

हे दोघे मुले रखमाबाईने थोर करून वीषवर्ष कारभार केला. मग दौलतीचे काम करू लागले. नंतर बाईचा काळ जाहाला. तिला साडीचोळी श्रीपतरायापासी जमीन ८१० मौजे मारूळ येथे मिळविली ती आद्यापि चालत आहे.

१ आमचा वडील मुकुंदराव बिन कृष्णराव याणी कृष्णरायाचे थडे बांधावयासी रा। श्रीपतराव पंतप्रतिनिधि याजपासून जमीन मिळविली ती आद्यापि चालत आहे. ते मुकुंदराव माारनिल्हे रा। भाऊसाहेब पेशवे यांजबाार पाणपथावरी पडले.

१ आपाजीराव बिन बुधिवंतराव यांणीं तादुळज्याचे लढाईत दादासाहेबापासी पडले.

१ दामाजीराव बिन सोनजीराव हे स्वामीकाजी बोरघाटचे लढाईत पडले.

१ रखमाजी बिन सोनजीराव हे बदामीचे लढाईत तोफेच्या गोळ्यानें उडाले.

१ सोनजीराव बिन कृष्णराव हे श्रीरंगपट्टणचे मुलुखगिरींत मेले.

१ आमचा घोडा होळकर याचे लढाईत रा। बाजीराव सा। याचे लढाईत पडला.

या प्रमाणे स्वामीकाजी आमचे वडिलांनी देह खर्चिले आहेत. आमचे मोकाशाचे गांव व जमिनी व पाटिलकी कृष्णरायापासून आज चार पांच पिडी अनभवीत आलों. यांत कोण्हाचा वितला इलाखा नाही.

१ कृष्णराव याचे पुत्र

१ बुधिवंतराव याचे पुत्र

१ दाजीराव याचा पुत्र

१ बुधिवंतराव हजीर आहे.

सदरहू पांच पिडी वडिलांचे वडिलांपासून अनभवीत आहों.

+ असें अक्षर आहे.

[22-6-1827

श्री

7580 यादी भगवंतराव बिन हैबतराव मोरे मोकासी पाटील मौजे साइकडे ता। कोळे प्रांत कराड सु।। सन समान आशरीन मयातैन व आलफ. वंशावळ बितपसील

- मूळ पुरुष यशवंतराव
  - कृष्णराव
    - बुधिवंतराव
      - आपाजीराव पानपतावर बुडाले नकल जाहाली
      - हणमंतराव
        - दाजीराव
          - बुधिवंतराव
    - मुकुंदराव
    - सोनजीराव
      - हैबतराव
        - भगवंतराव
      - सुभानराव
        - महिपत
        - आनंद
        - भाऊराव
        - नानाराव
      - दामाजीराव
      - रखमाजी
      - माधवराव
        - गणपतराव

सदरहूप्रमाणें आमचे मूळ पुरुषापासून आज ता। विस्तार आहे. यांत स्वामीकाजी आमचे वडिलांनीं व आम्ही देह झिजविले, व खतम जाहाले तपशील:—

२०

कृष्णराव मारनिल्हे याणी पांचगाव मोकासा राजपत्र व इनामजमिनी राजपत्री व मौजे साइकडे मा।र येथील पाटीलकी खरेदी घेतलीयाचे दाखले सनदा व दुमालपत्र व वहिवाटीचे पत्रे व पाटीलकीचे महजर करून घेतले ते आम्हापासून

गफलत करून चोर घालून आमृतराव मोरे याणे नेले त्याची चौकसी करून कागदपत्र माघार साहेबानी घेऊन सरकारांत ठेविले आहेत. मूळपुरुषापासून गावमोकासा व इनाम व पाटीलकीची वहिवाट आम्हीच करीत असतां नवीन खटले आमृतराव मारनिल्हे यांणीं करून खराबा केला आहे. याची चौकसी करणार धणी दीनदयाळ. हे वंशावली लिहून दिल्हे सही. मिति जेष्ट वा १३

हा व्यंकोबा सोनार जोतिष कुळकर्णी
मौजे फोडसिरस पा दहिगाव.

No. 13] *[16-10-1843*

श्री

यादी जनार्दन नीलकंठ व गोपाल अनंदराव सुपेकर दिा पुरंदरे सन १२५३ फसली. आम्ही माहाराज छत्रपति यांच्या शेवा केल्यावरून छत्रपति व पेशवे सरकार यांचे आज्ञेवरून पुरंदरे यांचे तैनातीस मुतालीक दिवाणगिरी आम्हा दिल्ही. त्याप्रमाणे आमचे वडिलानी दिवाणगिरीचे काम केले. त्याबाो वेतन पुरंदरे यास तीन लक्ष रुपयांचा सरमजाम पतकाचे खर्चास होता त्यापो आम्हास सरकारचे तैनात जाबत्यापो दाहावीस हजार रुपये पावत होते व * * * सदरी लिहिलेले गाव आम्हाकडे सन १२२७ लढाईआखर चालत आले. पुढे कुंपणीसरकारचा आमल जाहाला तेव्हा आम्ही आपले बंदोबस्ताविसी याद देऊ लागलो. तेव्हा श्रीमंत आबासाहेब पुरंदरे यानीं आम्हास सांगितले की, आम्ही आपले व सर्वत्राचे बंदोबस्ताविसीं कुंपणीसरकारात याद दिल्ही आहे, त्यात तुमचे नाव दाखल केले आहे. आमचे बंदोबस्तावर तुमचाहि बंदोबस्त होऊन येईल. त्याजवरून आम्ही प्रथम याद दिल्ही नाहीं. अबासाहेब यास सरकारातून साठ हजार रुपयाचा सरमजाम दिल्हा तेव्हा अबासाहेब याणी साठ हजार रुपयाचे अन्वये आम्हास खर्चास देऊन परामृष करीत आले. त्यानंतर आबासाहेब कैलासवासी जाले. पुढे त्यांचे चिरंजीव माधवराव नीलकंठ पुरंदरे याणी आपला सरमजाम चालविण्याविसी कुंपणी सरकारास अर्ज केला. त्या यादीत आमचे नाव पूर्ववत-प्रमाणे दाखल करून आम्हास वरास जाण्याचा निरोप देऊन तोंडजबानी सांगितले की, तुमचा बंदोबस्त आमचे बरोबर होऊन येईल, ते वेळेस तुम्हांस सूचना करू. ऐसे सांगितल्यावरून आम्ही घरास गेलो. पुढे लोहाड मुकामीं बायांचा व नवीन कारभारी यांचा व पुढे यजमानसुध्धां बंदोबस्त जाला. आणि यादीत आमचे नाव लिहिल्याप्रमाणे आमचा बंदोबस्त जाला नाही. कारण नवीन कारभारी यांचा

7581

देखील करून दिल्हा. त्यांजवरून असे वाटते की, नवीन कारभारी याणीं आमचे नावावर आपलाले बंदोबस्त करून घेण्याकरिता आम्हास भरवश्याची थाप देऊन आमचे नाव अजीच गाळले. तेव्हाच आम्ही सरकारांस अर्ज करावा, परंतु आमचे तीा मयत जाले या कारणाने तसेच राहिले. त्यास, पुरंदरे यांचे पदरी आमचे बराबरीचा कोणी नाही व आमची मातबरी कोणत्या रीतीने व आम्हांस सरमजाम काये व छत्रपति व श्रीमंत पेशवे सरकार आम्हांस कसे मानीत आले, हे सर्व कागद आमचेपासी आहेत. ते सरकारानी पाहिले म्हणजे ग्वाचित सरकारास वाटेल की, ही गोष्ट चुकून राहिली व खांदानीचा मजकूर सरकारास रोशन होईल. व पेशवे सरकारचे दप्तरचे दाखल्यावरून पुरंदरे याजकडे ऐसी पंच्यैसी वर्षे चाकरी करून पुस्त दरपुस्त लढाईत उपयोगी पडत गेलो. व टिपू सुलतान याजवर सरकारानी आम्हास पाठविले त्याप्रमाणे ती श्वारी सर करून सदरी सरमजाम व गांव लिहिले, याखेरीज टिपू सुलतान यानी पाच हजार रुपयाचे गाव इनाम करून दिल्हे. तेव्हा आमचे वडिलानी विच्यार केला की, पेशवे सरकार यानी आपल्यास काही कमी केले नाही. सा। ते गाव ब्राम्हणास आगृहर करून देऊन पत्रे करून दिल्ही, ते प्रमाणे त्याजकडे चालत आहे. त्यास पेशवे सरकार हे आमचे पुस्त दरपुस्त बंदोबस्त करीत गेले आणि हाली पुरंदरे यांचे कारभारी यानी आपलाले बंदोबस्त करून घेण्याकरिता अजी आमचे नाव गाळून आपले कार्य संपादन केले. त्यास ही गोष्ट चुकून राहिली असी खात्री सरकारानी कागदपत्र पाहिली म्हणजे होईल. याजकरिता सरकारास अर्ज केला आहे. तरी आमचेपासी सरकारचे कागद आहे ते व पेशवे सरकारचे दप्तरचे दाखले पाहून बंदोबस्त प्रथम करून द्यावा. आगर पुरंदरे यांचा बंदोबस्त जाला आहे त्याअन्वये त्यानी आमचा बंदोबस्त करून द्यावा आणि सदरी लिहिलेले गाव लढाईआखर आम्हाकडे चालत आल्याप्रमाणे आम्हाकडे चालवावे. कारण लढाई जाल्यादिवसापासून सरकारचा पैसा येकदिखील मिलकत नाही. आणि कुटुंबाची माणसे तीसच्यालीस; दुसऱ्याचे कर्ज बहुत जाले. त्यास, या संकटातून काढण्यास सरकारावाचून वाली नाहीं. त्यास मेहरबानी करून बंदोबस्त करून देविला पाहिजे.

आमची वौशावळ:

संपादन करणार, हरि गोपाल व आनंद गोपाल.

१ हरि गोपाल, यास पुत्र
१ बलवंत हरि, यास पुत्र
१ नीलकंठराव बलवंत, यास

१ आनंदराव गोपाल, यास पुत्र
१ गोपाल आनंदराव, उमर वर्षे ६०
हली जिवंत.

7582

१ जनार्दन नीलकंठ, यास
पुत्र च्यार व त्यांची उमर ४९
१ गणेश जनार्दन, उमर २९
१ खंडेराव, उमर २०
१ रामराव, उमर १८
१ लक्ष्मणराव, उमर १०

४

येकूण वौंश व याखेरीज कुटुंबाची माणसे आहेत. त्यांस आम्ही कुटुंबवछल, सा। बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे. ता। १६ माहे आगटंबर सन १८४३ इा.

सही: जनार्दन नीलकंठ व गोपाल आनंदराव
दस्तुर जनार्दन नीलकंठ.

¶*This is a family history and genealogy of Anandrao Gopal Supekar Deshpande presented by his descendants Janardan Nilakanth and Gopal Anandrao.*

No. 14] [*27-11-1843*

श्री

यादी त्रिंबकराव बिन माहादजी सोनवणी चाबुकस्वार दिमत हुजूर पागा नि॥ पेशवे सरकार सुा आर्बा आर्बैन मयातैन व आलफ. आमचे वडील श्रीमंत सवाई माधवरावसाहेब याजपासी होते. ते श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब कोपरगाव मुकामी होते, त्यास घोड्यावर बसावयास सिकविण्याकरिता कोपरगावी सरकारातून पाठविले. तेथे जाऊन श्रीमंत बाजीरावसाहेब यास घोड्यावर बसावयाचा अभ्यास कराविला आणि तेथेच नेमणुकेस होते. श्रीमंताची स्वारी पुण्यास राज्यावर आली, त्या समई आमचे वडील बराबरच होते. नंतर स्वारी होलकर दंगा जाहाल्यावर वसईस गेली. बराबरच वडील होते. तेथे सरकार आज्ञेप्रो कामकाज करून पागाचे घोड्याचा बंदोबस्त राखीत होते. त्याजवर वसईहून स्वारी पुण्यास आल्यावर आमचे वडिलास जातीचे तैनातेबदल गाव सुा सीत मयातैन शके १७२७ सन १८०९ सनदा करून दिल्हा तो गाव इग्रजी आमल होणेपावेतो आमचे वडिलाचे नावे चालत आला. पुढे मेहेरबान आलपिस्तन साहेब बाहादूर गौरनर याणी सर्वांचे बंदोबस्त केले ते

समई मी व आमचे वडील ब्रम्हवर्तास स्वारीबरोबर गेलो तेथे होतो. तेथे आमचे वडिलास देवआंज्ञा जाहाली. नंतर श्रीमंताची आज्ञा घेऊन पुण्यास आलो

ता। २७ नवंबर सन १८४३ इा

सई माहादाजी रघुनाथ ठोसर मेहेरबान ज्यान वारडीन-साहिब बाहादूर याचे हुकुमाने सई केली असे दस्तुर खुद.

¶*Trimbakrao Mahadji Sonavani, a Maratha by caste, mentions the loyal services of his father as a riding master to Bajirao II and the gift of a Saranjam conferred on him by the Peshwa.*

No. 15] [*24-11-1843*

श्री

यादी दौलतराव बिन संताजीराव लाड मौजे वाटार बुा। पो। सिरवल सुा। आर्बा आर्बैन मयातैन व आलफ. आमचे पणजे कैलासवासी व्यंकटराव लाड हे श्रीराजा शाहू छत्रपति याजपासी चाकरीस राहिले. पुढे हरहमेशा लढाईचे कामात बहुत वेला मर्दुमी करून शेवा येकनिष्ठपणे केली. त्याजवरून छत्रपति याणी मौजे भिलवडी येथील मुकासा व किले चंदनवंदन येथील हावाला हा आधिकार दिल्हा. त्याप्रो। वहिवाट चालत असता दरम्यान आमचे पंणजे व्यंकटराव, माहाराजांची आज्ञा घेऊन, मुलालेकरेसुधा श्रीमाहायात्रेस गेले तो तिकडेच त्यांचा काल जाला. त्यांचे चिरंजीव जानोजीराव हे आमचे आजे देसी यऊन श्रीमंत कैलासवासी नानासो। पेशवे यास भेटून, पूर्वी छत्रपतिकडोन मुकासा व गला नेमणुकी वगैरे चालत आल्याची विनंती केल्यावरून, पूर्वी चालत आल्याप्रो। चाळविण्यासी सनदा जाहाल्या. परंतु ते कागदपत्र दंग्याधोप्यात गाहाळ जाले. परंतु काही आलीकडील कारकीर्दीतील कागदपत्र आम्हापासी आहेत ते बिा। :

* * * * * * * * *

येणेप्रो। सरंजाम व नख्त पोतापो। दरमाहा रो। १०० शंभर चालत आसता, दरम्यान त्रिंबकजी डेंगले याणी काही आदावतमुळे सरंजामाकडे चालत होते त्याचे वसुलास हरकत केली. सा। पुन्हा श्रीमंतांचे कानावर घालून बंदोबस्ताची आज्ञा घेतली. परंतु त्या संधीत कुंपिणीसरकारची व पेशवेसरकारची लढाई होऊन, कुंपिणीसरकारातून सर्व पेशवे यांचे पदरचे मंडलीचा बंदोबस्त जाहाला. त्याजबरोबर सरकारनी आमचा सरंजाम बाहाल न करिता, तीनसे रो। सालीना

पेनसन छ १ ज्यानेवारी सन १८२० रोजी करून दिल्हे त्याप्रो साल दरसाल सरकारातून यैवज मिलत आहे. परंतु त्याजवर निर्वाह होत नाही. आमचे बरोबरीचे माणकोजी सिंदे कोपर्डेकर व दौलतराव बापू घ्राटगे वगैरे याजकडे जातीस सरंजाम चालत होता त्याप्रमाणे नख्त नेमणूक सरकारानी चालविली आणि आमचे सरंजामाचे उत्पन्न वगैरे न पाहाता तीनसे रुा करून दिल्हे. यास्तव आमचा अर्ज असा आहे की, पेशजी पेशवाईत चालत आल्याप्रो, कागदपत्र, सनदा वगैरे पाहून, आमचे आम्हाकडे चालविणेंविसी तजवीज जाली पाहिजे. आम्हास उमर वर्षे साठ व आम्हास पुत्र च्यार; त्यात वडील आनंदराव, यास उमर वर्षे च्यालीस. व सदरहू तीनसे रुपये पेनसिनासिवाये दुसरे उत्पन्न कांही नाही, यास्तव पुढे मुलालेकरासुधा निर्वाहा हुर्मतीने[१] व्हावा येविसी कृपा करणार खावंद समर्थ आहेत. तारीख १ जिलकाद माहे नवंबर

सही: दवलतराव लाड दस्तुर खुद.

¶*Daulatrao Lad submits an account of his family saying that a saranjam was granted to his great grandfather by King Shahu for his loyal services and that the same saranjam was continued for a long time by the Peshwas. The writer adds that the annual pension of Rs. 300 granted to him by the Company in return for the saranjam is quite inadequate and therefore prays for an increase of the same.*

No. 16] [*17-9-1843*

नंबर १२८९

श्री

यादी नारो मोरेश्वर भागवत व्हा पुणे पेठ शनवार घर खासगत सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ. आमचे आजे कैलासवासी धोंडभट भागवत यास पेशवे सरकारातून सरंजाम होता तो पेशवे सरकार अखेर चालला. पुढे कुपणी सरकारचा अमल जाल्यावर रघुनाथ धोंडदेव याचे नावे सरंजामाबा सोळासे रुपये सन १८१९ साली मुकरर केले ते सन १८२१ पर्यंत चालले. पुढे तें मृत्य पावले आणि बंद जाले, तेव्हापासून आम्ही सरकारास अर्ज बहुत केले; परंतु कांही बंदोबस्त जाला नाहीं. सा हली आम्ही आपला मार सरकारास जाहीर करतो.

१ आमचे आजे कैलासवासी धोंडभट भागवत यांस श्रीमंत कैलासवासी सवाई माधवरावसाहेब याणी बोलाऊन नेऊन सांगितले की तुमची कन्या श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब यास द्यावी. असे सांगितल्यावरून कन्या श्रीमंत

---

१ अब्रूनें.

बाजीराव साहेब यास दिल्ही. सके सत्रासे साहा साली लग्न जाले. नंतर कैलासवासी रावसाहेब याणी कैलासवासी नाना फडणीस यास सांगितले की भागवत यास पुणे मुकामी आणून त्याचा बंदोबस्त चांगला करून द्यावा. त्याजवरून तैनात जाबता सालीना रुपये तीन हजार व कारकून आा १ व सिपाई आा ६ व घोडी दोन असी नेमणूक करून पुणे मुकामी आणून राहाण्यास वाडा सरकारातून देऊन ठेविले. त्याप्रो शके १७१७ पर्यंत चालले. रावसाहेब कैलासवासी जाल्यावर श्रीमंत बाजीराव साहेब गादीवर आले. नंतर कैलासवासी नाना फडणीस याणी विनंती करून दोन हजार ज्याजती तैनात व कदीम तीन हजार येकूण पाच हजार रुपये करून दिल्हे त्याप्रमाणे पोताहून पावत होते. नंतर बाजीराव साहेब याणी नख्त तैनात पावत होती त्याबाा व कारकून शिपाई व घोडी याबाा येक हजार रुपये ज्यास्ती ठराऊन साहा हजार रुपयाचे गाव देहे तीन लाऊन दिल्हे.

पुढे कुंपिणी सरकारचा अमल सुरू जाल्यानंतर सर्व सरदार व आप्तमंडली व दरकदार वगैरे सर्वांचे बंदोबस्ताची तजवीज होत होती ते समई आमचे आजे धोंडभटजी यास देवआज्ञा जाली. पुढे रघुनाथ धोंडदेव याचे नावे सोळासे रुपये करून दिल्हे. त्याप्रो अजमासे दोन वर्षे चालले. पुढे ते मृत्य पावले आणि बंद जाले.

¶*Naro Moreshwar Bhagvat laments that the pension of 1,600 granted to his uncle by the Company has been stopped since his death and prays for its renewal and in support of it mentions the claims for his saranjam based on the high relation subsisting between his family and that of the Peshwa, the daughter of his grandfather having been married to Bajirao II in the year 1784.*

No. 17] [*2-10-1822*

ए रु. १९

तारीख २ अगटोबर सन १८२२

श्री

अर्जी श्रीपत रघुनाथ भोवालकर काा वोतूर प्रांत जुनर सुाा सलास अशेरीन मयातैन व आलफ. आमचे वडील रामाजी यादव यास पुत्र चौघे, पैकी माहादाजी राम याचे नकल, बाकी पुत्र तिघे, त्यापौ (आ)म्ही खडो राम याचे नातू व महिपत मल्हार केशो राम याचे नातू व धोंडो राम यास पुत्र नाही. सबब त्यानी परगोत्रीचा

सदासिव जयराम तटू कुलकर्णी का नारायणगावकर याचा मूल दत घेतला. त्याचे नाव गोपाल धोडदेव ऐसा त्रिवर्गाचा वंश आहे. येकवटपणा असता सरकारांतून धोडो राम याजकडे नबाब बाहादूर याजकडील वकिली होती, याजमुले सरंजामाचे गाव दोन दिल्हे ते चालतच होते. व मोगलाईतून बी(ड) प्राचा गाव मौजे राजापूर जाहागीर सोहनक दिल्हा तोहि चालतच असता धोडो राम याची नादनूक तेथच होती. तेथून इकडील सरंजामाचे गावची वगैरे वहिवाट करून सर्वत्राचे चालवीत होते. धोडोराम याचा काल जाहालियावर गोपाल धोडदेव सरंजामाचे गावची वहिवाट करून वडिलाप्रो पूर्ववत चालवीत असता श्रीमंत बाजीराव साहेब यानी दोन्ही गाव जफ्त केले. तेव्हा गोपाल धोडदेव राजापुरी व आम्ही मोगलाईत कामाकाजामुले मुलामाणसासुधा होतो. गावी केशो राम होते. त्याजपासी सरंजामाचे गावच्या सनदा वगैरे कागदपत्र येकवटणाचे वेलेचे होते ते त्याचे नातू महिपत मल्हार यानी सरकारात वडिलाचे वेलेच्या (स)नदा वगैरे कागदपत्र दाखऊन गोपाल धोडदेव याचे नावे गावची मोकलीक करून घ्यावी ते न करिता धोडो राम संमधी आपमतलबाचा मजकूर गैरवाका समजाऊन दोन गाव पौ मौजे माहारण ताा वोतूर प्रांत जुनर हा गाव आपले नावे मोकला करून घेतला. पुढे आम्ही गावी आलो. महिपत मल्हार यासी गावसंमधी माार पुसला, त्यानी सागितला. तेव्हा आम्ही बोलिलो की गावचे उत्पन्न तुम्ही व आम्ही उभयेतानी घेत जावे. गोपाल धोडदेव येतील ते काली त्यास हिशाप्रो देऊ. ऐसे बोलणे जाल्यावरून त्यानी सागितले की, दरबार खर्च यैवजी गाव सावकारास लाऊन दिल्हा आहे. सावकाराचे रदकर्ज जाहाले म्हणजे वडिलोपार्जित गाव यामुले येथाविभागे गावचे उत्पन्न घेत जाऊ ऐसे बोलणे जाहाले. नंतर सावकाराचे रदकर्ज * * जाहाले आणि सनदेअन्वये साहेबाची सोडचिठीहि जाहाली. त्या तागाईत आम्ही आपले विभागाचे उत्पन्न गावचे मागत असता आम्हास देत नाही. जबरीने गावचे उत्पन्न दरोबस्त महिपत मल्हार नेतात. त्यास साहेबी कृपाळु होऊन येविशई दरयाफ्ती होण्यास हुकूम होऊन आमंचा हिसा आम्हास ताकीद करून देविला पाहिजे. साहेबासिवाय आम्हास त्राता कोन्ही नाही.

¶*Shripat Raghunath Bhowalkar submits his Kaifiyat and says how the inam was granted to his father Ramaji Yadav and how it was appropriated by one Mahipat Malhar (one of his family). The writer requests that instructions should kindly be issued to Mahipat Malhar asking him to allow the writer his share in the watan. The paper supplies useful family history of Dhondo Ram Peshwa's agent at the Nizam's Court.*

+ A Grant of rent-free land for subsistence.

7587

No. 18] *[6-5-1851*

मेहेरबान येज्यंटसाहेब बाहदूर जिल्हा दक्षण यादी नारो गणेश बोक राहाणार कसबे वरसई प्रा सांकसे जिल्हा ठाणे व शहर पुणे पेठ बुधवार घर खा कारणे याद देतो ऐसीजे. आमचे चुलते राघो हरि हे पूर्वी पेशवे सरकारचे दप्तरांत कामावर होते. मर्द माणूस हुशार पाहून पागापतकांची सरदारी दिल्ही. व ते वारले. त्यांचे कनिष्ठ बंधु येसाजी हरि यांचे नावे सरकारानी पागापतकांची सरदारी चालविली. लाहानमोठी कामे यथाशक्त्या घडली. नंतर कितूरचे लढाईत खासे येसाजी हरि व फडणीस गोविंद हरि करमरकर सरकारकामास आले. उभयेतांसहि पुत्र नाही. यामुळे उभयेतांचे बंधूंचे नावे इनाम जमीन बिघे ४५ पंचेतालीस साडेच्यारसे रुो आकाराची करून दिल्ही ती विगो

३०० जमीन बिघे ३० गणेश हरि बोक याचे नावे

१५० जमीन बिघे १५ चिमणाजी हरि करमरकर याचे नावे

४५०

येणेप्रो आकाराची नेमून दिल्ही ती आजपरियंत चालत आहे. आमचे चुलते येसाजी हरि लढाईत गुजरलेनंतर कनिष्ठ बंधु गणेश हरि म्हणजे आमचे तीर्थरूप यांचे नावे पागापतकांची सरदारी दिल्ही, ती पेशवाईआखेर चालत होती पागेकडे गाव पाचच्यार होते * * * * * * * * *
हा गांव साहा हजारांचा लढाईआखेर चालत होता. नंतर सरकारानी गाव घेऊन नेमणूक दर सालीना रुो १५०० पंधराशे सन १८२० इसवी सालापासून चालू केले ते सन १८४६ पावेतो जिल्हा पुणे येथील खजिन्यांतून मृगसालास येकवेळ पावत आले. नंतर आमचे वडील गणेश हरि हे ता २० मे सन १८४७ साली वारले. त्यांस पुत्र दोघे. वडील हरि गणेश हे तीर्थरूप असतांच अगोधरच दोन वर्षे वारले. त्यास पुत्र येक. त्याचे नाव विष्णु हरि. याचे वय सुमारी पंचवीस वर्षाचे आहे. व आम्ही नारो गणेश दुसरे. आमचे वय सुमारी चालीस बेतालीस वर्षांचे आहे. व आम्हासहि पुत्र आहे. याप्रों आम्ही व आमचे पुतणे विष्णु हरि याचे मातोश्री सुा सर्वत्र येके ठिकाणींच आहोत. वडील गणेश हरि वारिले, त्यांचे पाठीमागे हयात तारखेपरियंत आम्हांस सरकारानी ऐवज दिल्हा. पुढे आमचे मुलाबाळांचे चालवणे सरकाराकडेसच आहे. आम्हांस सरकारचे कदमासिवाय आश्रय नाही. सबब, अजपरियंत वडिलांचे सरकारानी चालविले त्याप्रोच चालऊन प्रतिपाल करणार सरकार समर्थ आहेत. व आम्हांस येक पुत्र, त्याचे नाव धोंडो नारायण. याचे

7588

वय सुमारी बारातेरा वर्षाचे आहे. ऐसियास, आमचे पुतणे विष्णु हरि व आम्ही सर्वत्र येके ठिकाणीच आहोत. यास्तव पूर्वीप्रमाणे नेमणूक आमचे नावे सरकारानी चालविली असता आम्ही आपसांतील खिशांचा बोभाट सरकाराकडेस येऊ देणार नाही. ही याद लिहून दिल्ही, सही ता। ६ माहे मे सन १८५१ इसवी.

सही :—नारो गणेश वोक यांचे तर्फे
कारकून नारो चिमणाजी करमरकर.

¶Naro Ganesh Ok recounts the loyal services rendered to the Peshwa by his uncles Ragho Hari and Yesaji Hari who were given a saranjam in return. The saranjam was taken over by the Company and a pension of 1,500 Rs. was sanctioned. The writer prays that the same pension should be continued to him and his brothers jointly.

No. 19] *[9-10-1843*

श्री

यादी पांडुरंग आनाजी काले शहर पुणे पेठ बुधवार सन १२५३ फसली कारणें. आमचे तीर्थरूप आबाजी माहादेव काले हे श्रीमंत दादासाहेब पेशवे याजवल चाकरीस सु॥ सबा सबैन ११७७ शके १६९८ सन ११८६ फसली या साली राहिले. त्यास श्रीमंतानी हे काम करणारे हुशार व इमानी असे ध्यानात आणोन तोफखान्याचे कामाची म्हणजे तोफा वोतणे व दारू तयार करणे व पलटणची तयारी इत्यादिक आभ्यास व्हावा याजकरिता श्रीमतानी इंग्रजसाहेब लोक नौकर या कामाकरिता ठेऊन त्यांचे हातून सर्व विद्याभ्यास करविला. नंतर श्रीमंताबरोबरच तलेगाव वगैरे प्रसंगात होते. तेव्हा याचे दिमतीस पलटणचे काम असून लढाई दिल्ही आणि तसेच श्रीमंताबरोबर मुबईस व सुर्तेस गेले. नंतर सुर्तेस रक्ताचा व आग्नीचा पाऊस पडला व वारा मोठा सुटून घरे उडाली. त्यासमई तेथेच होते. पुढे श्रीमत दादासो कोपरगावी शके १७०५ सु॥ आर्बा समानीन ११८४ सन ११९३ फसली साली आल्यानंतर आमचे वडिलास हरिपंत तात्या फडके याजबरोबर गादीचे चाकरीस राहाण्याविसी पाठविले आणि सांगितले की आबा काले याणी आम्हापासी बहुत इमानेइतबारे येकनिष्ठेने शेवा चाकरी केली. विश्वासुक आहेत. याजविसी बालाजी जनार्दन फडणीस यास सागून याचे उत्तम प्रकारची योजना व्हावी. त्याजवरून फडणिसानी थोडे लोक याचे दिमतीस देऊन श्रीमंतापासी हुजूर राहाण्याची योजना केली. पुढे बदामीचा किला घेण्याकरिता पेशवे सरकारातून फौज नाना फडणीस याचेबरोबर

7589

नेमली, त्यात आमचे वडिलाची योजनाहि केली. त्याणी किला घेण्याचे कामात बहुत मेहनत व सिपाईगरी करून आपले लोकासुा आघाडीस वाढून हला केला. त्या प्रसंगांत गोलीची जखम तोंडावर लागली. तेव्हा किला सर जाल्यावर आमचे वडिलाचा मोठा सत्कार करून चौरी आबदागिरी इत्यादिक मोठेपणाचा दरज्या वाढविला व निसबतीचे लोकाचा शेरा चौदा रुा करून आम्हांस तैनात हजार रुा खेरीज शागीर्दपेशा वगैरे करून दिल्हे. शके १७०८ व ते वेलेपासून श्रीमंत सवाई माधवराव सो याचे संनिध म्हणजे जेथे श्रीमंताची स्वारी काही कारणपरत्वे परवतीस वगैरे ठिकाणी गेल्यास तेथे चौकीपाहारे व पलटणी लोकाचा बदोबस्त आमचे वडिलानी जाऊन करावा याप्रो वहीवाट सवाई माधवराव अखेर चालली. पुढे श्रीमंत राजश्री बाजीराव सो राज्यारूढ जाल्यावर त्याणी आपले वडिलाचेपासी शेवाचाकरी केली व मर्द माणूस आसे ध्यानात आणोन आम्हास कामे सांगितली ती बीा व त्या कामाबद्दल व खासगी खर्चाबा पावत होते ते बीा

१५०००० शहर पुणे येथील चौकीपाहारा व गस्त वगैरे बंदोबस्ताचे काम होते. त्यास खर्च शहरचा वसूल व जकाती का ऐवज व वराता मिलत होत्या ते सदरी

७५००० शनवारचे वाड्यातील चौकीपाहारे सुा दरवाज्यावरील बंदोबस्ताचे काम होते त्याबा खर्चास वरातावर मिलत होते ते सदरी रुा

३००००० सिवाय दुसरे पलटणचे लोक व आरब व हेटकरी वगैरे लोकावर जाबता ठेऊन काम घेणे त्याचे बा खर्चास मिलत होते ते वरातावर वगैरे देत होते ते सदरी रुा

३३६००० खासगी पलटणे दोन गाड्याची होती त्याजबा ऐवज वराता व सरंजाम मिलोन पावत होते ते व बाणदार पलटणात बा

६१९५५।।। वराताचा ऐवज रुा

२७४०४४। सरजाम गावगना वगैरे फिरकोल जतीचे गाव फुटकल याजवर मिलत होते ते रुा

३३६०००

५०००० तोफखाना श्रीमंत दादासो याजका भांवड्याचा होता त्याजबा खर्चास वराताचे येत होते ते सदरी

१४२०९ खासगींचे तैनातेस पालखी व आबदागीर शागीर्दपेशा वगैरेचे खर्चाबाा पावत होते ते बीाा

१२०९ पालखी आबदागीर मिळोन येकसाला आड मिळत होते ते वराता वगैरे

२०९ पालखीचे सामान व आबदागीर

१००० भोई यास रोजमन्याबाा येकसाल

———

१२०९

१२००० जातीचे तेनातेस

० कुपणीसरकारातून वकील मालीट सोचे पुढे करणेल पालरम व कर्णेल कलोष वगैरे जे बेटावर येत होते त्याची भेट होणे असल्यास आबाचे इतल्याखेरीज होत नवती. याचा दाखला इंग्रजी बुकावरून असेलच व वोतूरच पलीकाा स्वदेशाच्या पाा भिलाचा तीन बाऱ्याचा बंदोबस्त लोक पाठऊन तहनामे करून चौकश्या केल्या असा बंदोबस्त केला आहे. त्यात लढाई वगैरे जाली. पुढे नाना फडणीस वारल्यावर वाड्यात आरब होते त्यासी व होलकर याचे आरब होते त्यासी लढाई करून पुढे बाहेदारी देऊन कारकून जमादार देऊन पुण्याबाहेर काढून दिल्हे. कलम

येणेप्राो कामे करीत होते. सबब सिवाय कामकाज मुख्यत्वे पाहाणे असे सागून जातीस तैनात सालिना बारा हजार रुो व पालखी आबदागीर शागीर्द-पेशाची नेमणूक करून खर्चास देते होते ते सदरीं साहावे कलमात लिाा आहेत. सदरहूचे कागदपत्र सरकारी व आमचे घरचे असे सर्व दाखले दप्तरात हाली कायम आहेत. ते सरकारानी पाहिले म्हणजे खात्री होईल. व पुढे श्रीमंत बाजीराव सो याजकडून आबास खर्चास नख्त जामदारखान्यातून आमचे रुजब्यासारखे हजार नऊसे रुो देऊन सरबर चांगली ठेविली होती. नंतर सन १८१८ इसवी साली कंपणी सरकारचा आमल जाल्यावर मेहेरबान आलपिष्टण साहेब याणी पेशव्याचे मंडळीचा बंदोबस्त केला त्यात आम्हास सालीना साहासे रुो पेनसीन करून दिल्ही. त्यापौ निमे आमचे धाकटे बंधु यास हिसा द्यावयाचा सरकारानी ठराव केला त्याप्राो आजपरियेंत वहिवाट चालली आहे. त्यास सांप्रत याखेरीज दुसरे काही उत्पन्न बिलकूल नाही.

आमचे वय पचावन वर्षे व आमचे बंधूचे वय आठेचालीस वर्षे बंधूचे नाव रघुनाथ आबाजी काले. ताा ९ आकटबर सन १८४३ इाा

ताजा कलम पांडुरंग आबाजी काले याचे चिरंजिवाची नावे बीाा

१ चिंतामण पांडुरंग वय २९	रघुनाथ आबाजी याचे पुत्र
	० मृत गणेश रघुनाथ
१ लक्ष्मण पांडुरंग वर्षे २०	१ विनायक रघुनाथ वर्षे २२
१ माहादाजी पांडुरंग वर्षे १८	१ विष्णु रघुनाथ वर्षे २०

¶*Pandurang Abaji Kale gives his Kaifiyat describing in what great respect his father Abaji Mahadeo Kale was held for his military experience by Dadasaheb who after his retirement recommended him to Nana Fadnis. Abaji was subsequently sent to invest the Badami fort, where he displayed great valour and captured the fort, receiving a wound in the fight. In later times the personal protection of Sawai Madharao was entrusted to him. He managed the artillery department very efficiently. Bajirao II also valued his services and allowed him his former remuneration. Upon the disruption of the Peshwa's kingdom he was granted a pension by Elphinstone. The applicant prays for an increase of the same.*

No. 20] *[30-8-1844*

श्री

यादी राजश्री पुरुषोत्तम भास्कर व लक्ष्मणराव कृष्ण कोल्टकर, वाा कसबे पेण तालुके साकसे सुाा खंमस अर्बैन मयातैन व अलफ. आमचे पणजे कृष्णाजी मोरेश्वर कोल्टकर याणी आपली कन्या श्रीमंत कैलसवासी सदाशिव चिमणाजी ऊर्फ भाऊसाहेब पेशवे यास दिल्ही. त्यांचे नाव पार्वतीबाई. नंतर पेशवे सरकारांतून कैलासवासी नानासाहेब यांणी याजला स्वास्थ्य तैनात येकुंणपनाशे रुपये व आसाम्या अकराशे बासष्ट रुपयांच्या व तीन गाव बेचार्लीसशे साडेसत्रा रुपये आकाराचे व भात पांच खंडी व इनाम मळा मौजे सापोली येथील पंच्यवीस रुपये उत्पन्नाचा व दस्तक साहाशे बैलांचे याप्रमाणे करून दिल्हे तें आमचे पणजे जिवंत होते तोपर्यंत त्यांचें नावे सरकारानीं चालविले. पुढे त्यांचे वडील पुत्र म्हणजे आमचे चुलत आजे गणपतराव कृष्ण यांचे नावे सरकारानीं चालते केले.

नंतर सन आर्बा समानीन आषाढमासीं गणपतराव कृष्ण व लक्ष्मण कृष्ण हे उभयतां विभक्त जाहाले, ते समई गपणतराव कृष्ण यांणी घर जिनगी आटोपून दौलतीस कर्ज फार होते सबब उत्पन्नांत आपला कांही येक वाटा ठेविला नाहीं. त्याजवरून लक्ष्मुमण कृष्ण यांणी सरकारांत विनंती करून आपले नावे सदरहू स्वास्थ्य नेमून घेतले. त्याची याद सरकारची कैलासवासी नाना फडणीस यांचे करारात्ची आम्हाजवळ आहे. याखेरीज दुसरे कागद पत्र होते ते आमचा वाडा शके १७६२ सन १८४१ सालीं दग्ध जाहाला त्यात दरोबस्त जळाले. सदरीं लिहिलेले यादीप्रमाणे श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब यांचे कारकीर्दीत सन खमस मयातैनपावेतो चालले. पुढे सदरहू उत्पन्नापौ कांही कमी करून पेशवे सरकारचे कार्कीर्दीअखेर नेमणूक येकूणतीसशे रुपये व भात खंडी पांच व सापोली येथील मळा पच्यवीस रुपये उत्पन्नाचा व

तीन आसाम्या पांचशे बावीस रुपये उत्पन्नाच्या याप्रमाणे चालत आले.

१ पुरुषोत्तम भास्कर कोलटकर यास

१ वडील पुत्र मोरेश्वर पुरुषोत्तम उबंर वर्षे २४ चोवीस

१ मधले पुत्र लक्ष्मण पुरुषोत्तम उंबर वर्षे १९ येकूणीस

१ कनिष्ट पुत्र गोविंदा उंबर वर्षे ३ तीन साडे तीन

१ लक्ष्मणराव कृष्ण कोलटकर यास पुत्र येकच त्यांचे नाव गोपाल उंबर वर्षे ३ तीन साडे तीनपावेतो

सदरहूप्रमाणे वंश आहे. मिति श्रावण वद्य ३ शुक्रवार सन खमस आर्बैन मयातैन व आलफ. तारीख ३० माहे आगष्ट संन १८४४ इसवी.

सही पुरुषोत्तम भास्कर कोलटकर
दस्तुर मोरेश्वर पुरुषोतम कोलटकर

सही लक्ष्मणराव कृष्ण कोलटकर
दस्तुर मोरेश्वर पुरुषोतम कोलटकर

¶*Purushottam Bhaskar Kolhatkar and Lakshman Krishna Kolhatkar mention how the Kolhatkar family was connected with that of the Peshwas and how a saranjam was therefore granted to them. They mention the several divisions in their saranjam and attach a genealogy of their family at the end.*

कृष्णाजी मोरेश्वर कोल्हटकर का। पेण

- पार्वतीबाई=सदाशिवरावभाऊ.
- गणपतराव
- लक्ष्मणराव
  - भास्कर
    - पुरुषोत्तम
      - मोरेश्वर

No. 21]

येविसीचा इंग्रेजी दाखला पाठवावा म्हणौन हुकूम. छ २२. — नकल नं. ९४.

जवाब लिहिले आहे
जवाब गेल.

श्री

यादी त्र्यबकराव बच्याजी खांडेकर सुरु सबा अशरीन मयातैन व अलफ आमचे तीर्थरूप कैलासवासी बच्याजी विश्वनाथ खाडेकर यांस नागपुरकर भोसले याचे दौलतीतून श्रीमंत कैलासवासी थोरले रावसाहेब याणी आणून जातीस तैनात नख्त पाच हजार रुपये व मौजे करजविहिरे ता वाडे हा गाव व हती-पालखीचा खर्च चालवून फौजा देऊन कामकाज घेत होते. त्यांस पुत्र दोघे. त्यांत वडील सदाशिवराव, धाकटे आम्ही. वडील सदाशिव बच्याजी सबब शिरस्ते-माफक तैनात व गाव त्याचे नावे वडिलाचे मागे करून शेवा करीत होतो. लढाई-अखेर गाव व तैनात चालली. पुढें कुंपिणीसरकारचा अमल जालियावर मौजे मार हा गाव मात्र आमचा आम्हाकडे सर्वाबराबर चालविला. त्याचा उपभोग बंधु व आम्ही मिळोन सालगुदस्ता पावेतो साठ वर्षे केला. गुदस्ता बंधूची आमची कटकट लागली सबब समजूत होय तोंपावेतो गांव सरकारात अमानत ठेविला. आमची समजूत जाहाली. त्या संधीस बंधूस देवाज्ञा जाली. बंधूस पुत्र आमचा पेशवे याचे कारकीर्दीत दत्त दिल्हा. त्याचे नाव अमृतराव सदाशिव ते व आम्ही मिळोन गांव सोडून घेण्याविसी अर्जी केली. परंतु कमिशनर

चापलीन साहेब बाहादूर याणी गाव आम्हास न देता पेनसील दोघास तीनसे रुपये करून दिल्हे यांत गुजराण होत नाहीं. फार पेचात आहे याविसी अर्जी करितों.

¶*Trimbakrao Bachaji Khandekar recounts his family history, how his father Bachajipant was called to service by Madhavrao I from Nagpur Durbar and how in return for loyal service a village and some other honours were conferred on him, how the same village was allowed to stand in his name by the Company but was taken back by Commissioner Chaplin who sanctioned a pension of Rs. 300 to the writer and his son. The writer applies for more monetary help as he finds it difficult to meet his expenses from the pension.*

बच्याजी विश्वनाथ

सदाशिव	त्रिंबक
अमृतराव दत्तक	(अमृतराव-दत्तक दिला सदाशिवरावास)

No. 22]

श्री

येजंट साहेब जिल्हा दक्षण

यादी सिवराम नरसिंव्ह व रामराव नारायेण देशपांडे पो सिरवल सुा आर्बा आर्बैन मयातैन व आलफ सन १२५३ फसली. कारणे यादी दिल्ही ऐसीजे. आमचे तीर्थरूप कैलासवासी नरसो तुकदेव ऊर्फ बज्याबा सिरवलकर हे पेशवे याचे पदरचे मुछदगिरीचे काम व फौज व आराबाचे काम सरकारातून होते. श्रीमंत माधवराव साहेब हे कैलासवासी जाल्यावर आमचे वडील कैलासवासी नाना फडणीस याचे कृपेत वागू लागले. नंतर गादीवर श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब आले. आमचे वडील नानाचे पक्षीचे सबब श्रीमतानी कैद करून किले चावंड येथे सोळा वर्षे ठेविले आणि आमचे घराची व वतनाची व इनाम गावची जप्ती केली. घर लुटले. सन समानात श्रीमंतानी आमचे वडिलास किल्यावरून सोडून कसबे नासिक येथे राहावे, असी आज्ञा जाली. तेथे श्रीमंताची भेट जाली. ते वेळेस वतनाची मोकलीक करून घेतली. इनाम गाव पुणियासी गेल्यावर सोडून देतो याप्रमाणे आज्ञा जाली. स्वारी पुणियासी

7595

येऊन श्रीपंढरीस गेले. तेथून आल्यावर आश्विन मासी लढाई होऊन कुपणीसरकारचे राज्य जाहले. ते वेळेस खुदावंत आलपिष्टण साहेब बाहादूर यासी मजकूर साकल्य कलविला. त्याणी हुकूम केला की याची तजवीज होईल. हाली कुपणीसरकारातून तुम्हास शंभर रुपये दरमाहा पेनसीन पावेल. त्याप्रो दरमाहाचे दरमाहा पावत होते. वडील मृत्य पावल्यावर मातुश्रींचे नावे वीस रुपये जाहले ते पावत होते. मातुश्री मृत्य पावली नंतर बंद जाले. आमचे वडिलानी पेशवे सरकारात कारभार व फौजेचे काम नाना फडर्णास आखरे होई तोपरयेंत केला. श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब याणी आमचा नाश फार केला त्यामुळे बहुत खराबीत येऊन हाली बायकामुले यासी अन्न खावयास नाही. याप्रमाणे आमचा हावाल जाला आहे. तारीख २७ माहे नवंबर सन १८४३ इसवी.

सही सिवराम नरसिंह देशपांडे
प्रो सिरवळ दस्तूर खुद
सही रामराव[1] नारायेण देशपांडे
पो सिरवल दा खुद

¶Shivaram Narsinha recounts the past history of his family. His father Bajaba Shirvalkar served the Peshwa and Nana Fadnis, but on the accession of Bajirao, he fell into displeasure and was kept a prisoner at fort Chavand for sixteen years. Later on he was released and was given back his watan. Before his inam was restored to him war broke out between the English and the Peshwa. After their success the English granted him a pension of Rs. 100 per month which was discontinued after his death. The writers, sons of Bajaba, pray for some monetary help.

No. 23] [*3-10-1843*

श्री

यादी बहिरो नारायण पिंगळे पेशवे सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ सन १८४३ इसवी.

१ आमचे वडिलास प्रतापगडचा किला वंशपरंपरे दाखल सिवाजी माहाराज याणी दिल्हा. त्यापासून चालत होते. पुढे पेशवाई ऊर्फ मुख्य प्रधान हा अधिकार गेला तत्रापि किला माहाराज सरकारचे तर्फेने मातबर राहावी

---

१ बज्याबाचा भाऊ नारो तुकदेव याचा मुलगा. Deshpande of Shirval.

म्हणौन चालविला होता. त्याची वहिवाट वर्षे १२० येकशे वीस जाहाली. उत्पन्न रुपये ४०,००० च्याळीस हजाराचे होते. खेरीज माहाराज सरकारचे खजिन्यातून पावत होते. तो किला सन समान सितैनात लढाई होऊन रामाजी माहादेव याचे विद्यमाने पेशवे सरकारानी घेतला. नंतर थोरले माधवराव साहेब याणी आमचे चालविण्याबद्दल आमचे वडील माधवराव नारायण व नारो आपाजी व रघुनाथ धोंडदेव यास सन तिसा सितैनचे साली सरंजाम वगैरे नेमणूक करून दिल्ही ती बेरीज

५००० सरंजामास गाव देहे सुमारी ६

४००० इतलाख खजिन्यातून रुा

१००० इनाम राजपत्री

२४० यापूर्वी चालत होते ते

१ आम्हास उत्पन्न चालत आहे

७५ आसाम्या चाकरीच्या

१२० श्रीमाहाबळेश्वरचे संस्थानाकडील आसामी

२०० श्रीभवानी किले प्रतापगड येथील संस्थानाकडील आसामी

३२०

पैकी वजा कारकून चाकरीवर असतात त्यास भोजन खर्च व वेतन

९५ १५०

२४५

बाकी रुा

१२६

तारीख ३ माहे

अगटंबर सन १८४२ इसवी. आश्विन शुध १०

शके १७६५

सही बहिरो नारायण पिंगळे पेशवे.

¶*Bahiro Narayan Pingale submits a statement about his family regarding the administration of the fort of Pratapgad which was assigned to his ancestor by King Shivaji but which was subsequently taken over by the Peshwa Madhavrao I and a Saranjam granted instead. The writer mentions the Saranjam.*

7597

[1843

श्री

यादी बहिरो नारायण पिंगळे पेशवे याची वंशावळ सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ शके १७६५ सन १८४३ इसवी.

मूळपुरूष मोरो+ त्रिंबक यासीं पेशवाई अधिकार जाहाला त्यांस पुत्र

१ पहिले निळोपंत, मोरोपंत वारल्यानंतर याचे नावे पेशवाईचा अधिकार जाहाला

१ दुसरे बहिरोपंत, निळोपंत वारल्यानंतर यासी पेशवाईचा अधिकार जाहाला.

१ येशवंतराव

—

३

बहिरोपंत याचे पुत्र. आपाजीराव यास पुत्र नारायणराव यास पुत्र बहिरोपंत उमर वर्षे ९० यास पुत्र

१ पहिले पुत्र दत्तोपंत उमर वर्षे २२

१ दुसरे पुत्र आनंदराव उमर वर्षे ७

येशवंतराव यासी पुत्र गोविंदराव यासी पुत्र

१ पहिले धोंडोपंत.

१ दुसरे रघुनाथराव.

१ तिसरे नारायणराव

—

३

नारायणराव यासी पुत्र

१ पहिले धोंडोपंत

१ दुसरे माधवराव.

धोंडोपंत यासी रघुनाथराव यासी पुत्र नारायणराव उमर वर्षे

¶*This paper gives the genealogy of the Pingale family whose first representative Moropant, was Shivaji Peshwa.*

No. 24] [13-10-1843

श्री

यादी बाो बाजी बलाल व राघो बलाल पटवर्धन सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ कारणे याद लिहून दिल्ही ऐसीजे. आमचे तीा कैलासवासी बालाजी

+ गोत्र हरित, सूत्र आपस्तंभ.

रघुनाथ पटवर्धन हे श्रीमंत बाजीराव साहेब पेशवे सरकारजवळ कोपरगावास होते. शके १७१८ चे पौषात पुणे मुकामी आल्यावर सरकारातून जातीचे सरंजामास पंधरा हजाराचे गांव शके १७१९ चे सालात दिल्हे होते व त्रिंबक सरसुभ्याचे काम व बागलाणाचे काम व सरकार खास जिलीबीचे काम व कोरीगडची मोहीम किला सर करण्याचे काम सागितले. तो रास्ते याजकडून किला सर जाल्यावर ते कामहि सांगितले. नंतर आमचे तीाा शके १७२६ पौष शुाा ५ मृत्य पावल्यानंतर तीन वर्षे सरजाम चालविला. पुढे आम्ही लहान होतो आणि आमचे कारभारी व चुलते दिनकर रघुनाथ पटवर्धन हे आम्हास वडील याचे व सरकारचे काही बनण्यात फेर आलामुले गाव शके १७२९ चे आखेरीस जप्त जाले. यानंतर श्रीमंत माहाराज म्हणो लागले की मुले लाहान आणि कैलासवासी बालाजीपंत हे आमचे बंधुवत आहेत. त्याचे चिरंजीव ते आमचेच चिरंजीव आहेत. त्याचे चिरजीव मोठे जाल्यावर त्याचे चालवण्यास आम्हास आशक्य नाही. नंतर पुढे आम्ही नेहमी स्वारीस व सरकारवाड्यात जात होतो. त्यानंतर काही बदोबस्त व्हावा तो कुपणीसरकारचा आमल जाहाल्या * * आम्ही कुपणीसरकारास आर्ज केला. * * * सरकार याणी पाचशे रुपये पेनसीन * * * करून दिल्हे ते आजपावतो पावत आहे. त्यात आमचे कुटुब व मुले २ व आम्ही व आमचे वडील बधू व त्याचा मुलगा व नातू कुटुंबे उभयताची व सापत्न मातोश्री व सिवाय चाकरीचे माणसे आहेत. त्यास इतक्या पेनसीनाच्या बंदोबस्ताने गुजारा होत आसे नाही. त्यास साहेब मेहरबान होऊन वंशपरपरा प्रपच्याचा खर्चाचा बदोबस्त करून देविण्यास सरकार समर्थ आहेत. तारीख १३ माहे आगटवर सन १८४३ इसवी

सई राघो बलाल पटवर्धन दस्तुर खुद

ताजा कलम आमचे वडील बंधूचे बाजी बलाल पटवर्धन याचे उमर ५० वर्षे धाकटे बधू राघो बलाल पटवर्धन उमर वर्षे ४५ सापत्न मातोश्री भागीरथीबाई पटवर्धन उमर वर्षे ५०

कन्या दोन वर्षे उमर ११ व दुसरी ३ पुतणे नारो बाजी पट(व)र्धन उमर वर्ष २३ नातू वडील बंधूचा उमर वर्षे ३.

¶*This is a family account of Balaji Raghunath Patwardhan, who served in the Peshwa's suite and who died on 6th January 1805. His son Ragho Ballal submitted this genealogy of his family.*

7599

No. 25] [20-6-1724

यादी बाजीराव बिन सुभानजी रणनवरे मौजे राख कर्यात सासवड जिल्हा पुणें कारणे आर्जे करितो ऐसीजे. आमचे वडिलास श्रीमन्माहाराज छेत्रपति स्वामी याणी आमचे आजे मानाजी रणनवरे राजश्री माहादाजी गणेश आजहात देशमुख प्रा वाई याजकडील जमावाचे मधे सिलेदारीची शेवा करीत होते. उदाजी चव्हाण याचे झुजात कडेगावचे मुकामी सिपाईपणाची शर्त करून स्वामीकार्यावर ठार पडले यासबबे जमीन इनाम देऊन इनामपत्रे आमचे वडिलाचे नावे करून दिल्ही [राज्या. शके ५१ क्रोधीनामासंवछर आषाढ शुध दशमी मदवासरे] [राज्या. शके ४९ च्या पत्रांत "मानाजी रणनवरे दिा रा कानोजी भोसले"]

¶*Bajirao Subhanji Rannavare writes of an inam granted to his grand-father Manaji by King Shahu for his services in a fight against Udaji Chavan at Kadegaon where he lost his life.*

No. 26] [12-8-1829

पौ तारीख २८ सपटबर सन १८२९
इसवी

श्री

यादी मीर साहादत तुलाखान व मीर मुबारक तुलाखान इनामदार मौजे येडगाव ताा आले प्रांत जुनर सुाा सलासीन मयातैन व अलफ. आमचे पंजे मीर आनवरुलाखान हे निजामनमुल्लख याचे दौलतींत राहून त्रिंबकची किलेदारी केली. त्याचे पुत्र मीर सयदुलाखान याणीहि त्रिंबकची किलेदारी केली. नवाब नासरजग व हिदायेत मोहिदीखान व सलाबतजंग याचे दौलतीचे गर्दीत श्रीमंत पेशवे याचा जोर बहुत. कोन्हीकडून मदत नाही. तेव्हा सोडचिठी मुखत्यारीची मीर आनवरुलाखान याणी आणून पेशवे यासी वेलभंडार घेऊन आपली नेमणूक करून घेऊन किला नानासाहेब पेशवे यास सफुर्द केला. त्याची तारीख सन सबा खमसैन मया व आलफ वेळेस रावेर माहालात खानदेशात सरजामास दिल्हे. आलीकडे मीर आनवरुल्लाखान याचे पुत्र मीर सफीयुलाखान याचे वेलेस बाजीरावसाहब याचे आमलात बिगरसंदी खानदेशचे गाव सुभ्यानी जफ्त केले. येडगाव मात्र इनामी राहिलो. मीर साफियुलाखान याचे पुत्र मीर आनवरुलाखान व त्याचे पुत्र आम्ही मीर साहादत-

तुलाखान व मीर मुबारकतुलाखान इनामी गाव आजपरियेंत चालत आहे. आमचे हरवख्त काम येजंटसाहेबाकडे पडत आहे. याजकरिता आमचे नाव पटात आसावे. त्यास खावंदानी मेहरबानगी करून दुसरे नंबरास लिहिण्यास हुकूम जाहाला पाहिजे. तारीख छ ११ माहे सफर.

[सही फारशी]

¶*Mir Sadatulla Khan mentions in this paper the names of his ancestors who held the post of the Killedar of Trimbak.*

No. 27] [*1843*

श्री

यादी मीर साहादत तुलाखा व मीर मुबारकतुलाखा इनामदार मौजे येडगाव तर्फ आळे प्रांत जुनर सन १२५३ फसली कारणे आमचे खानदानीचा पूर्वापार मार कंपनीसरकारास जाहीर होण्याकरिता लिहितो की, दिलींत जाहागीर बादशाहाचे व त्याचे पुत्र शाहाजादा याचे वेळेस आमचे आठवे पिढीचे मूळ पुरुष उतम कुळीचे सइयद इराख मुल्कातील सावे शहरचे राहाणार नवाब मीर महमद बाकर नाव अजमखा ऊर्फ इरादतखा बाहादर म्हणोन बादशाही किताब याणी मोठमोठी सरकारी कामे करून किताब व बादशाही सरदारी व वजिरी मिळविली. नंतर त्याचे पुत्र आमचे सातवे पिढीचे पूर्वज मीर इसाक इरादतखा याणी शाहाजाहा बादशाहा व आलमगीर बादशाहाचे वेळेस मोठमोठी सरकारी कामे केली. नंतर त्याचे पुत्र आमचे साहावे पिढीचे मूळ पुरुष मीर मुबारकतुलाखा इरादतखा याणी आलमगीर बादशाहा व महमद फरूखशा बादशाहा याचे वेळेस मोठमोठी सरकारी कामे केली. नंतर त्याचे पुत्र आमचे पाचवे पिढीचे मूळ पुरूष मीर हिदायतुलाखा नाव होषदारखा बादशाही किताब याणी मूळची चालत आलेली सरदारी व किताब संभाळून आलमगीर बादशाहाचे पुत्र बाहादुरशा बादशाहाचे वेळेस सरकारी मोठमोठी कामे केली. नंतर महमदशाहा बादशाहा हे तखतावर बसले, त्याचे साहावे साली आमचे पूर्वज मीर हिदायतुलाखा व हलीचे हैदराबादवाले नबाब नामरूदवला याचे चौथे पिढीचे पूर्वज आसबजाहा असे बराबर दक्षणेत आले. नंतर काही दिवस दक्षणची दिवाणगिरी केली; व फार दिवस अवरंगाबाद येथें राहिले. पुढे हिजरी सन ११५७ साली हक जाहाले. याप्रमाणें आमचे च्यार पुरुषानी मिळऊन दीडशे वर्षेंपरियंत सरदारी चालविली * * * * त्यानंतर आलीकडे आमचे पणजे मीर आनवरुलाखां याजकडे त्रिंबकचा किला होता, तो श्रीमंत बाळाजी बाजीराव पेशवे याणी घेऊन संन संमान

खमसैन मया व अलफचे साली मौजे येडगाव इनाम देऊन सनद दिल्ही * * * * नंतर आनवरुलाखा वारले. पुढे आमचे आजे मीर सफीउलाखा याणी सन समान सितैन मया व अलफ साली सनदा आपले नावे श्रीमंत माधवराव बलाल पेशवे याजपासून करून घेतल्या * * * * श्रीमंत बाजीराव रघुनाथ पेशवे याचे कारकीर्दीत दिवाणगिरीचे काम बाळोजी कुंजराकडे जाले; त्याणी बहुत लोकाचे नाश केले त्यांत आमचे कुटुंब बेगमीचे गाव विनापराध जप्त केले. * * * *

¶Mir Sahadatulakhan and Mir Mubaraktulakhan—inamdars of Yedgaon submit their family Kaifiyat, recounting the loyal services rendered by their ancestors to the several Emperors of Delhi and the inam obtained from the Peshwa for surrendering the fort of Trimbak. The writers complain that their inam was confiscated by Baloji Kunjar, the Peshwa's Diwan.

No. 28] [*1844*

श्रीसांभप्रा

यादी त्रिंबकशेट बिन सदासिवशेट पाटील करंजे मोकदम मौज. सिक्रापुर तर्फ पाबळ सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ. कारणे याद देतो ऐसीजे. आमचे पणजे मोरशेट करंजे हे सातार मुकामी व्यापार करून होते; व माहाराज छेत्रपति सरकारात देववेव होती, त्यामुळे माहाराज याणे बालाजी विश्वनाथ यास वस्त्रे दिल्ही, ते समई मोरशेट करंजे यास पेशवेयाचे हावाली केले. तेव्हापासून सातार मुकामी व पुणे मुकामी व स्वारीत जे समई जो ऐवज लागेल तो पेशव्यास द्यावा म्हणोन माहाराज सरकारची आज्ञा जाहाली त्याप्रमाणे ऐवज पेशव्यास देऊन, वराती लाऊन घेत जाव्या असी वहिवाट चालली. तो दमाजी थोरात याणी हिंगणगावास पेशव्यास आटकाविले. ते वेळेस आमचे वडलांनी मदतगिरी करून लाखो रुपयाचे हावाले घेऊन बालाजी विस्वनाथ यास मुक्त केले. त्यामुळे पेशवे सरकारास मोठा उपकार जाहाला असे सरकारचे मनात येऊन श्रीमंत कृपाळु होऊन आमचे वडील आजे धनशेट करंजे याचे नावे जातीस सरंजाम वगैर करून दिल्हा.

यासिवाये सरकार तर्फेणे आनखीहि कामे सांगितली. गुजरात सुटलीनंतर आमदाबादचा सुभा आमचे आजे घनशेट करंजे याजकडे सांगितला; व देसी आल्यावर हिकडीलहि गावमामले सांगितले; व पुणे मुकामी मंगळवार पेठ

याची वसाहत करणे म्हणून श्रीमंत याणी सांगितले, त्यावरून आमचे आजे घनशेट करजे याणी केली. सबब श्रीमंताणी तेथील शेटेपना करून दिल्हा, व जकातीचेहि काम सांगितले.

¶*This is a family account of Morshet Karanje, a Maratha banker, whose family still exists practising that profession at Satara.*

No. 29] [*10-10-1828*

श्री

यादी वंशावळ रंगराव विनायक पुरंधरे इनामदार वास्तव्य को सासवड याची मिा आश्विन शुा २ शके १७५० सर्वधारीनाम सवछरे

मूळ इनाम संपादित पुरुष राघो+ लक्षुमण पुरंधरे यास आवरस पुत्र

१ लक्षुमण रघुनाथ यास पुत्र २ दोघे आवरस

१ बापूजी लक्षुमण वडील यास पुत्र नाही

१ महिपतराव लक्षुमण धाकटे यास पुत्र दत दिल्हा.

२

१ रगराव महिपत यास पुत्र आवरस

१ विनायक रंगनाथ यास[१]

१ मातुश्री आनंदीबाई

१ स्त्री सगुणाबाई

१ पुत्र रंगराव दत हाली आहेत.

सदरहूप्रमो पुरुष वंशज आसेत. दस्तुर बाळाजी हैबतराव हारकारे मिा मार

¶*This is a genealogical account of Ragho Lakshman Purandare.*

No. 30] [*21-11-1843*

श्री

यादी संताजीराव बिन अनंदराव व सखोजीराव बिन मानाजीराव व जाणराव बिन बजाजीराव सिंदे रविराव मौजे सुकलोणी ता सांडस प्रां पुणे सुा आर्बा आर्बैन मयातैन व आलफ. आमचे वडील तुकोजीराव सिंदे रविराव हे औरंगजेब

\+ राघो लक्ष्मण मल्हारराव होळकरांचे पदरीं होता. हें घराणें होळकराचे पदरीं होतें.

१ मृत्यु महामारीच्या विकारानें ज्येष्ठ शु. ४ शके १७५० रोजीं सासवड येथें.

पातशाहा याजपासी चाकरीस बहुत दिवस होते. त्याजवळ कामकाजे बहुत वेळा केली. त्याजवरून पातशाहा यांची मर्जी बहुत संतोष होऊन सरदारी वाढऊन नगारा निशाण पालखी व फौजेचा सरंजाम देऊन त्याणी चालविले. पुढे औरंगजेब पातशाहा मयत जालियावर तुकोजी सिंदे रविराव हे मृत्यु पावले. पुढे विज्यापूर येथील पातशहा यांणी तुकोजीराव सिंदे रविराव यांचे नातू दुसरे तुकोजीराव होते त्यास बोलाऊन नेऊन सरदारीचा बंदोबस्त करून दिल्हा. नंतर काही दिवसानी छत्रपति सिवाजी माहाराज सातारकर यांणी राज्याचा बंदोबस्त केला. ते वेळेस तिसरे तुकोजीराव व मानाजीराव सिंदे रविराव यांस बोलाऊन नेऊन हुजूर चाकरीस ठेवून बंदोबस्त करून देऊन चालविले. पुढे शाहू माहाराज यांणीहि उतम प्रकारे सरदारी चालविली. नंतर पुढे श्रीमंत बालाजी विश्वनाथ सो पंडित प्रधान पेशवे याजबराबर लढाईचे प्रसंगात आमचे वडिलानी जवामर्दी बहुत केली. हे श्रीमंतांनी पाहून बहुत संतोष होऊन मौजे लोणी येथील मोकासा आमल आमचे वडील मानाजीराव सिंदे रविराव यांस देऊन सनद छ ३ माहे सफर सुा आशरीन मया आलफचे साली करून दिल्ही त्याप्रमाणे वहिवाट चालत आली. नंतर पुढे निज्यामआली मोगल याची व श्रीमंत रघुनाथ बाजीराव पेशवे यांची लढाई राक्षसभुवनावर जाली तेथे श्रीमंतांची स्वारी हतीवर बसली होती त्याजला मोगलाचे फौजेने वेढा घातला, त्या समई आमचे वडील संताजीराव बिन मानाजीराव व सुभानराव बिन मानाजीराव सिंदे रविराव व आणखी सात असामी सरदार ऐसे नव असामीनी कस्त मेहेनत जवामर्दी करून श्रीमंतास हातीसहित काढून आणिले. त्यावरून श्रीमंताची मर्जी बहुत संतोष होऊन मौजे सुकलोणी हा गाव दरोबस्त बाा मुाा ऐवजी जाहगीर देऊन सनद छ २६ रबिलावल सुाा सलास सितैन मयातैन व आलफचे साली करून दिल्हा व हती बक्षीस आमचे वडिलास दिल्हा. खेरीज जामदारखान्यातून नख्त जातीच्या तैनाती व स्वाराचा रोजमुरा व पालखी देऊन बंदोबस्त करून दिल्हा. त्याप्रो गावची वहिवाट आमचे वडिलाकडेस निर्वेध चालत आली. आलीकडेस श्रीमंत राजश्री बाजीराव सो पेशवे गादीवर बसलियावर गावची वहिवाट व नख्त रोजमुरा पोत्याकडील याप्रो चालत आले. पुढे कारभारी यांचे व आमचे बनेना असे जाले, तेव्हा त्याणी अदावत करून कुसुराने मौजे मार येथील जप्ती केली तिची मोकलीक व्हावी म्हणोन आम्ही श्रीमंतांस आर्जहि केला. परंतु आमची दाद घेऊन गावची मोकलीक केली नाही. नंतर पुढे पेशवे सरकारची व कंपणी सरकारची लढाई होऊन बिघाड जाला. ते वेळेस कंपणी सरकारचे लोक कोरेगांव व लोणी येथे वगैरे आणखी गावी होते ते श्रीमंतांची फौज आली म्हणोन

आदमासे शंभर लोक पलटणांचे व नौकर लोकहि सारे आमचे गावी जमा होऊन आम्हास बोलिले जे, हे वेळेस आमचा बच्याव करावा, नाही तरी आम्ही दरोबस्त मारले जातो ऐसे बोलिले. त्यावरून आम्ही त्यास गावात आश्रय देऊन बंदोबस्त ठेवला तो इतकियात श्रीमंतांची फौज आली. त्यासी कंपणीसरकारचे लोकांचा बच्याव होण्याबद्दल बदलून गोष्ट सांगितली. सरकारचे लोकांचा बच्याव बहुत तरेने केला. श्रीमंतांची फौज निघोन गेलियावर मेहेरबान जनराल इसमिट सो बाहादूर यांची स्वारी गावी येऊन सदरहू मजकूर समजले. सरकारचे लोकानी त्यास जाहीर केले त्यावरून त्याची मर्जी बहुत संतोष होऊन सन १८३० इा ताा ११ नवंबर रोजी आम्हास त्याणी आपले सरटिपिकिट बिलाइतेस जातेसमई लिहून दिल्हे आहे. दरम्यान श्रीमंताचे राज्याचा बंदोबस्त कंपणीसरकारानी केला ते वेळेस आमचाहि बंदोबस्त होऊन गावची मोकलीक व्हावी, परंतु आम्ही गैरमाहीत व कंपणीसरकारचा अमल जालियावर आम्ही गावी नवतो. श्रीचे यात्रेस गेलो होतो. तेथोन आलियावर सो मबसूफ यांची पुणे मुकामी येऊन भेट घेतली आणि सदरहू मजकुराचा आर्ज केला, परंतु बंदोबस्त जाला नाही. याजकरिता हली सरकारास अर्ज आहे. तरी कंपणी सरकारचे नेकनामीची कीर्ति सर्व राज्यात प्रसिद्ध आहे त्यापेक्षा आम्हावरहि मेहेरबानगी करतील. कारण आम्हास उपजीविकेस दुसरे उत्पन्न काही नाही. गुजारा तर चालला पाहिजे याजकरिता कृपा करून मौजे लोणी येथील जाहागिरीचा अमल आमचा आम्हाकडे चालत आला आहे, त्याप्रो गावची मोकलीक होऊन आम्हाकडेस चाले असी तजवीज कर्णे सरकाराकडेस आहे. गावच्या सनदा व वंषावलीचे झाड व जनराल इस्मिसो बाहादूर यांणी कंपणीसरकारचे नामांकित सरदार जे असतील त्याणी आम्हावर मेहेरबानी करीत असावी म्हणोन सरटिपिकिट आम्हास दिल्हे आहे त्याचीहि नकल यादीबरोबर सरकारास पाहण्याकरिता दिल्ही आहे. पाहण्यात येऊन आमचे चालविण्याविसी मेहेरबानी करून बंदोबस्त होय ते केले पाहिजे. ताा २१ माहे नवंबर सन १८४३ इा.

सही: संताजी बिन आनंदराव सिंदे रविराव दाा खुद.

सही: सकाजी बिन मानाजी रविराव सिंदे दाा संताजीराव.

सही: जानराव बिन बजाजीराव सिंदे रविराव दाा खुा

¶*The Ravirao Sindias of Sukloni submit their family Kaifiyat recounting the past glories achieved by some of the illustrious persons in their family from the times of Aurangzeb down to those of the Company.*

7605

No. 31] [27-10-1843

नंबर १५७२

श्रीगणराज

यादी नीलकंठराव रामचंद्र पागे सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ. आमचे आजे कैलासवासी नीलकंठराव रामचंद्र व तीर्थरूप रामचंद्रराव नीलकंठ याणी पेशवे पंत प्रधान याची सेवाचाकरी येकनिष्टपणे करून जवा मर्दुमीने लढाया घेऊन सरंजाम व इनाम वगैरे मिलविले.

बुंदेलखंड वडगई प्रांत हिंदुस्थान येथे बखेडा जाला. सबब तेथील बंदोबस्ताकरिता वीस हजार फौजेचा हुकूम श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब याणी सांगून कैलासवासी नीलकंठराव रामचंद्र याची रवानगी केली. * * * * कैलासवासी नीलकंठराव रामचंद्र मुलकी जाऊन फौज मिलऊन येक लढाई घेऊन काही बंदोबस्त केला, व काही राहिला तो येक दोन लढाया घेऊन करावयाची उमेद होती; परंतु येकायेकी आजारी होऊन नीलकंठराव रामचंद्र मयेत जाले. वडिलाने सरंजाम वगैरे संपादन केला त्यास अजमासे शंभर वर्षे होत आली.

¶*Nilkanthrao Ramchandra mentions his loyal and brave services to the Peshwa in the wars in the North.*

No. 32] [1843

श्री

यादी रामराव बिन येशेवंतराव भोसले साकरीकर प्रा खानदेस सुा आर्बा आर्बैन मयातैन व आलफ. आमचे वडील कैलासवासी कालोजी बीन सोमाजीराम भोसले हे छेत्रपति शाहु माहाराज सातारकर याजवल चाकरीस राहिले. नंतर हामेशा लढाईचे प्रसंग पडत गेले. त्यात आमचे वडील यानी जवामर्दीचे कामे वहुत वेलां केली. त्यात मोगलाकडील पठाण पंचवीस हजार फौज घेऊन माहाराजासी लढाईचा प्रसंग करावा म्हणोन येऊन, सातारियापासून पाच कोशावर येऊन मुकाम केला, ते वेलेस माहाराजाचा फौजेचा जमाव कमी होता. पठान याची फौज पंचवीस हाजार यामुलें माहाराज फार दिलगीर जाले; आणि आमचे वडील कालोजीराव यास बोलाऊन पुसले की शेत्रु भारी आहे, याचा विचार कैसा करावा? त्यावर कालोजीराव यानी फार तरेन माहाराज याची खात्री करून पैजचे विडे घेतले की आजचे लढाई करून शेत्रूचा पराभव करितो. नंतर सरकारची आज्ञा घेऊन, सरंजाम सिध करून पठाण याची लढाई करून त्याचा मोड करून पठाण यास जिवे मारिले, हे माहाराजानी पाहून बहुत संतोषे

होऊन सरंजाम येक लक्ष रुपायाचा दिल्हा. * * * * त्या दिवसापासून कालोजी भोसले याचे मागे आम्ही सरवत्र भाऊ याजकडे वहिवाट श्रीमंत रा। बाजीराव साहेब पेशवे याचे आमलातहि चालत आले; दरम्यान शके १७३६ साचे साली त्रिंबकजी डेंगले यांनी सरकार परवानगी नस्ता सदरहू माहालची जप्ती केली. * * * * यावर कंपनीसरकारानी राज्याचा बंदोबस्त केला, ते वेलेस आमचे चुलत बंधु रा। नारायेणराव बिन गिरजोजीराव व त्रिंबकराव बिन पिरोजीराव व येशवंतराव बिन मालोजीराव व आम्ही ऐसे च्यार आसामी व पिराजीराव बिन मानाजीराव व कलसिंगराव बिन महिपतराव ऐसे पुने मुकामी येऊन साहेब बहादुर याची भेट घेऊन सरंजामाची मोकली करून द्यावी म्हणोन यादी देऊन कागदपत्र संदा दाखविल्या, परंतु सरंजामाची मोकलीक अद्याप करू न दिल्ही; आण सरकारातून पेनसिनी ताहायात सालिना करून दिल्ह्या. * * * *

¶*Ramrao Yeshvantrao Bhonsle of Sakri recounts how his father Kaloji led a very successful attack against an army of the Nizam near Satara and how the King being pleased by this act of bravery conferred a Saranjam on him worth about a lac. Later on the Saranjam was confiscated by Trimbakji Dengle. The writer prays for the restoration of the confiscated Saranjam.*

No. 33] [*24-12-1843*

श्री.

यादी राजश्री रामराव व्यंकटेश गुणे

सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ सन १२५३ फसली. आमचे पणजे बालाजी जनार्दन यास श्रीमंत माहाराज छत्रपति यानी श्रीमंत पंत मंत्री यांची मुतालकीची असामी करून दिल्ही. त्यास पुत्र रामाजी बलाल व लक्ष्मण बलाल व धोंडो बलाल व बापूजी बलाल व कृष्णराव बलाल असे होते. त्यास असाम्या व सरंजाम पेशवे सरकारातून होता व इनाम पंत प्रतिनिधि याजकडून होता. व रामाजी बलाल यांस भोसले याजकडील वकिलीचे काम होते व त्यांचे नावे सरकारातून सरमजाम गाव दोन व प्रतिनिधि याजकडून इनाम गाव दरोबस्त येक व वकिलीसमंधे वेतन खेरीज होते. व लक्ष्मण बलाल श्रीमंत नानासाहेब व भाऊसाहेब यांचेजवळ होते, ते प्रानिपतावर श्रीमंत भाऊसाहेब यांजवर गर्दी जाहाली त्या वेलेस त्यांजबरोबर गेले. व कृष्णराव बलाल यास पायगुडे यांचे पागेची असामी दिवाणगिरीची होती. तिची तैनात नक्त

शो १६९१' व धोंडो बलाल यांचे नावे, आमचे पणजे बालाजी जनार्दन मृत्य पावल्यानंतर, श्रीमंत पंत मंत्री याजकडील मुतालकीची असामी होती ती मारनिल्हे यांचे नावे जाहली; ती पुढे त्यांचे पुत्र जगनाथ धोंडदेव याचे नावे चालली. * * * * * * * *
* * * * * * * * * *
पुढे रामाजी बलाल मृत्य पावल्यानंतर त्यांचे पुत्र सदासिव राम यांचे नावे चालत आले. पुढे सदासिव राम मृत्य पावल्यानंतर आमचे आजे बापूजी बलाल यास पुत्र व्यंकटराव बापूजी याचे नावे सरंजाम वगैरे सरकारातून करार करून दिल्हा. त्याजवर व्यंकटराव बापूजी राजश्री हरिपंततात्या फडके याजबरोबर कर्नाटकचे स्वारीस गेले तेथे मृत्य पावले. त्याजवर मामूलप्रा आमचे नावे सदरहू सरंजाम वगैरे येकंदर चालत आला त्याचा ता:
* * * * * * * * * *
* * * * * * * * * *
येणेप्रा आम्हाकडे चालत होते; त्याप्रा चालू आहे व गैरचालू याचा ता सदरी लिहिला आहे. व आम्हा उभयेतास पेसन शो ६०० सालीना चालू कुंपणी-सरकारचा अमल जाल्यापासून आहेत. * * * * *
* * * * * * * * * *

तारीख २४ दिशंबर १८४३ इसवी.

सही: रामचंद्र व्यंकटेश गुणे कालेकर दस्तुर खुद.

¶*Ramchandra Vyanktesh Gune submits his family Kaifiyat recounting the services of his great-grand-father Ramaji Ballal and his brother Lakshman Ballal. The writer gives a list of the Saranjams granted to his family by the King and mentions the pension granted to him by the Company in return for a portion of the Saranjam taken back.*

No. 34] [*1843*

श्री

यादी लक्ष्मणराव बिन संताजीराव धायबर पाटील मोकदम मौजे सिक्रापूर तर्फ पाबल सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ. आमचे निा पंजे संताजीराव धायबर याणी श्रीमंत माहाराज सिवाजी राजे छत्रपति याजपासी लढाईत बहुत कामेकाजे केली, त्याजवरून माहाराज कृपालु होऊन पतक शेंभर स्वाराचे देऊन सरदारी दिल्ही, व त्याचे व जातीचे खर्चाबद्दल खानदेश प्रांती व देशी मिळोन आकार रुपये ३२००० चे गाव व माहाल दिल्हे (* * * *)

पुढे ते काहीं दिवसानी निवर्तले. त्याचे पोटी पुत्र वडील तानाजीराव व धाकटे सुलतानराव या उभयताचे नावे पेशजीप्रमाणे सरंजाम बाहाल होऊन सरकारातून चालविले. पुढे ते निवर्तले. सुलतानराव याचे पोटी पुत्र वडील संताजीराव व धाकटे प्रतापराव व तानाजीराव यांस पुत्र सटवाजीराव; त्यापैा संताजीराव व सटवाजीराव या उभयेताचे नांवे सरंजाम पेशजीपासून चालत आल्याप्रमाणें चालविले. पुढे ते शके १७३४ साली उभयता मृत्य पावले. नंतर शके १७३९ साली श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब याणी जप्ती केली ते वेलेस आम्ही हिंदुस्थानात दवलतराव सिंदे सरकार याजपासी चाकरीस होतो, तेथे सरंजाम जप्त जाहला. * * * * पुढे कुंपणीसरकारचा आमल शके १७३९ साली जाहला. नंतर आमचे चुलते प्रतापराव व आमचे दुसरे चुलते सटवाजीराव याचे पुत्र भवानराव उभयतां कुंपणी सरकारास भेटले. तेव्हा सरकारातून प्रतापराव याचे नावे सरजामाबदल रुपये सालीना १००० हाजार जातीस करून दिल्हे व भवानराव याचे नावे पाच हजार रुपयाचा सरंजाम मौजे उछेदगाव प्रो जेंबुसर हा दिल्हा; तो गाव सन १८३३ साल पावेतो चालला. * * * * आमची वौशावल आहे ती बिा:—

१ भवानराव याचे पोटी पुत्र बलवंतराव बिन भवानराव याचे वय १९.

० लंग

१. प्रतापराव याचे नातू गोविंदराव याचे वय २०

१ आमचे बंधु कासीराव याचे पुत्र गोपालराव याचे वय २७

१ आमचे पुत्र माधवरांव याचें वय २९

¶Lakshmanrao Santajirao Dhaybhar submits his family history describing how the Saranjam was granted by Shivaji to the writer's ancestor for his loyal services, how later on it was confiscated by Bajirao and how under the Company's regime his cousins received a pension and a Saranjam. The writer gives his genealogy.

No. 35] [*11-11-1844*

श्री

यादी विठल चिंतामण पुणेकर वकील व माहादाजी चिंतामण पुणेकर निा गोखले सुा खमस आर्बैन मयातैन व अलफ. श्रीमंत कैलासवाशी धोंडों बळाल व बापूसाहेब गोखले याणी शके १७१९ चे सालापासून आमचे तीर्थरूप कैलासवाशी चिंतो त्रिंबक व चुलते माहादाजी त्रिंबक यास साडेसातशे स्वाराचे पथकाची

नेमणूक करून देऊन आपणाजवळ चाकरीस ठेविले. पुढे धोंडजी वाघ याचे लढाईत माहादाजी त्रिंबक यास जखम लागोन ठार जाहाले. पुढे चिंतो त्रिंबक याचे नावे पतकाची नेमणूक चालत आली. आलीकडे आम्ही वयाने थोर जाहाल्यावर नवीन दुसरे पाचशे स्वाराची नेमणूक बापूसाहेब याणी करून देऊन चालविले. त्याचा तपसील सरसालास स्वाराचा रोजमुरा खेरीज करून नेमणुका तीर्थरूपसुद्धा बितपसील रुो

८९०० चिंतो त्रिंबक यास नख्त * * * * * *
* * * * * * * * * * *
४००० विठल चिंतामण पुणेकर यास नख्त रुो
३००० महादजी चिंतामण पुणेकर यास.
४०० कारकून निा होते आा २ दर सालीना रुो २०० प्रो पावत होते.

१६९००

येकूण सदरहू नेमणुका करून दिल्याप्रो पावत आले. नंतर शके १७३९ साली श्रीमंतांची व कंपणीसरकारची लढाई मौजे आष्टी नजीक श्रीपंढरपूर येथे जाहाली. त्या लढाईत विठल चिंतामण यास गोलीची व तरवारेची अशा दोन जखमा लागल्या. याजमुळे पतकाची अफरातफरी जाहाली. नंतर कंपनी सरकारचा आंमल जाहालियावर गोखलेसाहेब यांचा सरंजाम जप्त जाहाला. पुढे सरकारानी पेशवे याजकडील सरदार लोक यांचे बंदोबस्त केले त्येवेलेस बापूसाहेब यांचे कुटुंब श्रीमंत यमुनाबाईसाहेब यास गुजाऱ्याकरिता काही जाहागीर व इनाम गाव सोडले. नंतर बाईसाहेब याणी आम्हास बलाऊन आणून सांगितले की, पेशजी तुम्हास येजमानसाहेब याजकडून बहुत पावत होते. हाली इंग्रजबाहादूर याणी आम्हास नेमणूक करून दिल्ही त्यात आमचा गुजारा होणे कठिण. परंतु, तुम्ही आमचे बहुत उपयोगी पडत आला, तेव्हा तुमचे चालवणे अवश्य. यास्तव तुम्ही आमचे जवळ राहावे. तुम्हास सालीना नेमणूक पावेल बितपसील रुो.

१२६७ विठल चिंतामण पुणेकर यास कंपणी सरकारात वकिलीचें काम व सौंस्थान राममंदिरची वहिवाट इनाम गाव देवाचे खर्चास देऊन सांगितली त्यास सर सालीना नेमणूक रुो

६०० माहादाजी चिंतामण यास कर्नाटकातील सरंजामी गावचे देखरेखीस ठेऊन त्यास सरसालीना नेमणूक रुो.

7610

-३०० कारकून निा होते ते आा २ दरसालीना रुो १९० प्रो रुो

२१६७

येकूण येकवीसे सदसष्ट रुपयाच्या नेमणुका करून दिल्हा त्याप्रो पावत आल्या. पुढे शके १७६३ वैशाख वद्य शष्टीस श्रीमंत यमुनाबाईसाहेब मृत्य पावली, सबब त्याजकडील सरंजाम व इनाम गावची जप्ती सरकारातून जाहाली. यामुळे आमच्या नेमणुका बंद जाहाल्या. याजकरिता सरकारास अर्ज आहे की, आम्ही गोखलेसाहेब यांचे पदरी नोकरी नेकीने केली व त्याजकडूनहि सदरहू लिहिल्याप्रो नेमणुका पावत आल्या आहेत. त्यास आमचे कुटुंबाची माणसे तपसील:

* * * * * * * * *

* * * * * * * * *

येकूणपंचवीस मनुष्ये कुटुंबाची आहित त्यास उपजीविकेस आधार नाही. फार हलाखीत आहोत. याजकरिता सरकारानी गुजाऱ्याचा बंदोबत कृपा करून करून दिल्हा पाहिजे. श्रीमंत यमुनाबाईसाहेब गोखले यांचे नाव यजिंटीचे पहिले प्रतीत होते. दुसरे आणखी सरदार लोक पुरंधरे व निपाणीकर व आंगरे व कितुरकर व दुसरे प्रतीतील मेहेंदळे व ढंढरे व माणकेश्वर वगैरे सरदार लोक मयत जाहालेत त्यांचे पदरचे माणसांची गुजाऱ्याची तजवीज सरकारानी केली आहे. त्यास आम्हावरहि सरकारानी मेहरबानी करून आमचे गुजाऱ्याची तजवीज सदरहू नेमणुकावर लिहिल्याप्रो चालऊन केली पाहिजे. मिा कार्तिक शुा १ शके १७६६ क्रोधीनाम संवत्सरे सन १८४४ इा.

सही : विठल चिंतामण पुणेकर वकील
निा गोखले दस्तुर खुद.
सही : माहादाजी चिंतामण पुणेकर
निा गोखले दस्तुर विठल चिंतामण.

¶*Vithal Chintaman and Mahadeo Chintaman who were in the service of Bapu Gokhale appeal to the Deccan Commissioner for monetary help and in support of their claim they give their family history saying that their father served Bapu Gokhale with his squadron, that he suffered wounds in the fight against Dhondji Wagh, that after Bapu Gokhale the remuneration was continued by his wife Yamunabai but was stopped after her death in May 1818. Raoji Vithal and Shankar Vithal Punekar were recently in Baroda service.*

7611

श्री

यादी विश्वास खंडेराव रास्ते सुा आर्बा आर्बेन मयातैन व आलफ सन १२५३ फसली. आमचे खानदानीची कैफियत वगैरे लिहितो जे, विज्यापूर पातशाहा कारकीर्दीत आमचे वडील मौजे वेलणेश्वर तर्फ गुहागर तालुके आंजनवेल येथे वतन खोती व माहाजन व इनामदार असोन सावकारी व्यवहारहि करीत होते व कोकणचे रसदेचा कारभारहि करीत होते. उपनाम मूळचे गोखले परंतु रास्त चालीच्या व्यवहाराहून रास्ते आसे नांव चालू जाले. पुढे श्रीमन्माहाराज शाहू राजे छत्रपति यांजवळ सातार मुकामी आमचे पूर्वज्याचे पाचवे पुरुष हरबाजी नाईक व त्यांचे कनिष्ट बंधु भिकाजी शामराज हे हली बलवंतराव माधव रास्ते यांचे चवथे पुरुष त्या उभयतानी माहाराजांची कृपा संपादन केली आणि माहाराजाजवळ तिसरे बंधु सदासिव शामराज कामावर ठेऊन कसबे वाई येथे माहाराजानी जागा दिली तेथे घरे बांधून हरबाजी नाईक व भिकाजी नाईक राहिले. व्यवहार सावकारीचा करीत होते. पुढे श्रीमंत नानासाहेब पेशवे यांस भिकाजी नाईक यांची कन्या गोपिकाबाई माहाराजानी देविली. नंतर श्रीमंतानी धोंडो हरबाजी अमचे चवथे पुरुष व त्याचे बंधु विठल हरबाजी व कृष्णाजी हरबाजी या त्रिवर्ग बंधूस मौजे असवली व मौजे पळसंडी नजीक वाई व मौजे नांदगांव तालुके राहुरी हे तीन गांव दिल्हे. आमचे वडिलांचा गांव नांदगांव इनामी हाली आम्हाकडे चालत आहे व श्रीहरिहरेश्वराचे देवालय वाई येथे आमचे पणजे धोडोबा नाईक याणी बांधिले, त्यास श्रीचे खर्चास श्रीमंतानी आठशे रुपये आजमासाची जमीन व पेठेचे उत्पन्न अजमासे रुपये दोनशे येकूण अजमास येक हाजार रुपयाचे इनाम दिल्हे व श्रीमंत पंत प्रतिनिधि याणी दोनशे रुपये अजमासाची जमीन श्रीकडे इनाम दिल्ही. येकूण बाराशे रुपयाचे इनाम कसबे वाई येथे श्रीकडे खर्च पडोन आमचे आम्हाकडे चालत आहे. पुढे आमचे आजे नीलकंठराव धोंडदेव यास बापू रास्ते असे म्हणत असत ते कर्नाटकात गेले होते. तेथे त्यास नबाब हैदरनाईक याणी पेशवे सरकारचे मनुष्य म्हणौन कितियेक दिवस प्रतिबंधांत ठेविले व पुढे श्रीमंत माधवराव बलाल पेशवे याणी हैदरनाईक याजकडून जबरीने आणौन आपलेजवळ ठेविले. खर्चवेचास सरकारातून देत होते. त्यास पुत्र दोन, वडील विनायकराव, कनिष्ट आमचे तीर्थरूप खडेराव तात्यासाहेब. पैकी विनायराव घरीं वाईस होते व काही दिवस परशरामभाऊ पटवर्धन यांजबरोबरहि होते. आमचे तीर्थरूप खंडेराव तात्यासाहेब यांस श्रीमंत माधवराव नारायण पेशवे यांचे कारकीर्दीत नाना फडणवीस याणी सरदारीची वस्त्रे देऊन पटणचे स्वारीत हरिपंत

तात्या फडके यांजबराबर दिल्हे : स्वारास व जातीस तैनात हुजुरून पावत होती व पटणचे स्वारीहून परत आल्यावर दरबारचे कामकाज नाना फडणवीस घेत होते. याप्रमाणे श्रीमंत माधवराव नारायण पेशवे यांचे कारकीर्दी आखेरपर्यंत चालले. नाना फडणीस याणी श्रीमंताची खात्री केल्यावरून पुढे श्रीमंत बाजीरावसाहेब राज्यावर आल्यानंतर त्याणीहि वसई सरसुभा व मुतालकीची सिकेकटार सन इसने मयातैन व अलफ सन इा १८०१ या सालात दिल्ही व हापसी जंजिरेकर याणी कोकण प्रांतात बखेडा केला त्याचे बंदोबस्ताकरिता हुजुरून फौज देऊन रवाना केले. याप्रमाणें तेथील बंदोबस्ताचे कामावर असता पुणे मुकामी सलास मयातैनात म्हणजे सन १८०२ इसवी येशवंतराव होळकर येऊन लढाई जाली तेव्हा श्रीमत बाजीरावसाहेब यांची स्वारी कोकणात गेली. नंतर माहाडाचे मुकामी खंडेराव तात्यासाहेब यास बोलाविले. त्याजवर तात्यासाहेब यांचे मदतीने स्वारी वसईस गेली. तेथे पेशवे सरकारचा व कंपनीसरकारचा तह होऊन श्रीमंत बाजिराव साहेब पुण्यास आले तेव्हा तात्यासाहेब यासहि बरोबर आणिले. अशा संकट प्रसंगात हारवक्त सरकार चाकरी बरहाक केल्यामुळे वसई सरसुभा चालत होता, तो कायम ठेऊन आणखी शहर पुणे येथील कामकाज व विजयदुर्ग व लोहोगड, विसापूर हे किले मुलूकसुद्धा व जंबूसर सरसुभा वहिवाटीस हावाली केले व साठ हजार रुपयाचा सरंजामाचा मुलूक मुकरार करून देऊन सनदा करून दिल्ह्या. नंतर बाबूराव फडके याणी बंड केले होते त्याचाहि बंदोबस्त तात्यासाहेब याणी केला. त्याजवर शके १७२८ चे साली सन १८०६ इसवी अंगरे सरखेल कुलाबेकर याजवर घरकल्हामुळे तंटा होऊन बाबूराव अंगरे वजारतमाब सवाई सरखेल याजला भाऊबंद याणी पदच्युत कर्ण्याचे अरंभून युध्ध प्रसंग आला ते वेळेस अंगरे याणी तात्यासाहेब यांजकडे वकील पाठऊन या प्रसंगास आमचे संरक्षण करावें असे बोलणे केल्यावरून श्रीमंत बाजीराव साहेब यांची आज्ञा घेऊन फौजसुधा कुलाब्यास जाऊन आपले पदरचे लाखो रुपये खर्च करून बाबूराव अंगरे यांचे शत्रूचे पारपत्य करून त्यांस संस्थानी कायम केले. याजमुळे त्याणी पाच हजार रुपयाचे इनाम जातीस व सिवाय पदरचे मंडळीचे नावे इनाम दिल्हे व माणिकगड किला चवदा हाजाराचे गांव सुध्धा व श्री सांबाचे उछाहाकडे मौजे नावाडे व खैराणे हे दोन गाव अजमासे पांचशे रुपयाचे दिल्हे. येणेप्रमाणे आमचे तीर्थरूप याणी श्रीमंत बाजीराव साहेब यांचे संकटसमई मोठे साहसाची कामे केली व अनेक प्रकारे उत्पन्न जालेली लाहान मोठी बंडे मोडून श्रीमंतास स्वस्थपणा जाहाला. त्या अवसरात श्रीमंताजवळचे खुशामती अर्जवी बोलणारे

लोकानी आमचे तीर्थरूपाचे वैभवाचे हेव्याने कंपनीसरकारासी दोस्ती ठेऊन आमचे तीर्थरूप वागतात असे श्रीमंताचे मनात वागऊन वाकडेपणा आणिला. तेणेकरून त्या समयास आमचे नुकसान इतके जाले की दरोबस्त मामले व सरदारी सरंजाम वगैरे श्रीमंतानी परत घेतले. त्या वेळेस श्रीमंताचे व आमचे तीर्थरूपाचे दरम्यान कंपनीसरकार पडून परस्पर खटले तुटक केले. येविसी दाखले कंपनी सरकारात असतीलच व आमचे तीर्थरूपाची आबरू कसी होती याबाबे कर्णेल कलुष साहेब रिसदेंट याचे सरटिफिकिटातहि मार आहे. त्याची नकल या यादीबराबर दिल्ही आहे. आमचे तीर्थरूपानी पेशवे सरकारची चाकरी कसी इमानेइतबारे केली येविसी ग्राउंड डफ साहेब याचे बखरेत भाग ३०।३१ या दोन भागात थोडासा मजकूर लिहिला व कंपनीसरकारचा आवल आमल होताच तारीख ११ फेब्रुवारी सन १८१८ इसवीत मेहरबा(न) आलपिष्ट-साहेब याणी जाहीरनामा लाविला त्यातहि लिहिले आहे. त्या जाहीरनाम्याची नकल यादीबराबर पाठविली आहे. नंतर तात्यासाहेब यांस सन अशर मयातैन व अलफ सन १८०९ इसवी या साली देवआज्ञा जाली. त्याजवर आंगरे सरखेल याणी आमचे वडील बंधु गोपालरावजी यासी तंटा केला सबब उभयताची लढाई किला माणेकगड येथे जाली. नंतर मुंबैचे गवर्नरसाहेब बाहादूर यांस मार समजविल्यावरून त्याणी गोपालरावजी यांस पत्र लिहिले की खटला करू नये. उभयताचा ठराव पुण्याचे रसिदेंट साहेब करतील. त्याजवरून मेहेरबान अलपिष्टन साहेब बाहादूर रसिदेंट याणी अंगरे याचा व आमचा मजकूर समजून घेऊन किला माणिकगड अंगरे यास सरजामसुद्धा परत देविला आणि पाच हाजार रुा नक्त मुंबैसरकारचे मार्फतीने गोपाळरावजी यांस पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने द्यावयाचा ठराव करून त्याप्रमाणे त्यास पावत गेले व पेशजीचे पाच हजार रुा याचे गांव खुद आम्हास दिल्हे व पदरचे मंडळीस गाव देऊन सदरहू इनाम चालविणेविसी कंपनी सरकारची दरम्यानगत आहे. पुढे पेशवे सरकारचे राज्य कंपनीसरकारात आले. पेशवे सरकार व कंपनीसरकारचा बिघाड होऊन लढाई जाहाली, ते समई आमचेकडून कंपनी सरकारास द्रव्यद्वारे वगैरे मदत जाली त्याचे दाखले आमचे व राजश्री बालाजी नारायण नातू युध्धप्रसंगी आमचे तर्फेने पुढे हरयेक कामात वागत होते. कंपनी सरकारातून मुकाम चिंचवली इलाखा सातारा येथे आम्हांस पोषाख सिरपेच वगैरे देऊन व आमचे तीर्थरूपास पेशवे सरकारातून जो सरजाम चालत होता त्यापौ अजमासे बतीस हाजारांचा सरजामाची मोकलीक केली. त्या सरजामाची वहिवाट आम्हाकडे कंपेश येक साल चालली. आमचे तीर्थरूपानी कंपनी सरकारात राजश्री बालाजी नारायण

नातू वकिलीचे कामावर हामेशा ठेविले होते. त्याप्रो आंम्ही लाहान अस्तां त्यास तैनात वगैरे देऊन वकिलीचे कामावर वगैरे ठेविले होते. कंपनीसरकारचा अमल जाल्यावर येक वर्षानिंतर त्यास सरकारातून इनाम व पेनसीन मिळोन चोवीस हजार रुपयाचे दिल्हे आहे. आम्हांस सरजाम दिल्हा होता तो परत घेऊन तारीख १ माहे ज्यानेवारी सन १८२० पासून साहा हाजार रुपये सालीना पेनसीन करून दिल्हे ते आजपर्यंत चालत आहे.

¶*This is an account of the family of Khanderao Nilkanth Raste submitted by his son Vishwasrao.*

No. 37] [*5-10-1843*

श्री

यादी राजश्री विश्वासराव भास्कर गोखले सुाा आर्बा आर्बैन मयातैन व आलफ. आमचे चुलते कैलासवासी विसाजी राम गोखले व आमचे वडील भास्कर राम हे पूर्वी धोंडो बलाल गोखले, म्हणजे [redacted] यांचे चुलते, हे फौजसुध्धा करणाटकात श्रीमंत सवाई माधवराव साो पेशवे याचे कारकीर्दीत श्रीमंत नाना फडणीस याणी बंदोबस्ताकरिता ठेविले त्याजपासी स्वार पायदळ सुध्धा चाकरीस होते. धोंडोपंत यांची व धोंडजी वाघ निाा टिपू सुलतान याची लडाई होऊन धोंडोपंत सरकार कामास आले. माग बापूसाो गोखले यांचे नावे सरदारीची वस्त्रे पेशवे सरकारांतून जाली. नंतर इंग्रज बाहदूर याची दोस्ती करून मदतीस दोन पलटणे आणून फौजसुध्धां बापूसाो याणी लढाई देऊन धोंडजी वाघ याच्चे पारपत्य केले. नंतर येशवंतराव होलकर पुणे मुकामी येऊन श्रीमंताबरोबर लढाई घेतली. ते समई श्रीमंत वसईस निघोन गेले आणि कंपणीसरकारासी दोस्ती करून होलकर याचे पारपत्य व्हावे या इराद्याने कंपणीसरकारासी बोलण्यात आणून मेहेरबान वलसली साहेब बाहदूर याची नमणूक कंपणी सरकारांतून जाल्यावर होलकर पुणे सोडून उतर देशात गेले. नंतर श्रीमंत वसईहून पुणे मुकामी आले व वलसलीसो पलटणेसुध्धा पुणे मुकामी दाखल जाले. त्याजबरोबर बापूसो गोखले सरकार आज्ञेवरून फौजसुध्धा आले. पुढे होलकराचे मागे वलसलीसो गेले त्याजबरोबर बापूसाो यांची नेमणूक पेशवे सरकारातून जाली. ते समई बापूसाो यांचे फौजेचा कारभार व चाकरीचुकरी आमचे चुलते व वडील करीत होते. ती स्वारी फते होऊन गाईलगडापासून माघारे पुणे मुकामी आल्यावर गोखले यांसी, श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधि यांचे व पेशवे सरकारचे वयसनस आल्यामुळें, त्यांचे बंदोबस्तास नेमले. तेथे पंताची लढाई होऊन खाशास जखम लागून पंत हस्तगत जाले. त्यांचा मुलूक चवदा लक्षाचा सरकारजमेत आणिला व पंताकडील किले प्रचितगड व वासोटा, कागोरी

वगैरे लढून घेतले. नंतर बापूसाो पुणे मुकामी राहून सुरापुरावर बेरडाचे पारपत्यास आमचे चुलते व वडील गेले व भिल वगैरे बंडाचा बंदोबस्त आज्ञेप्रमाणे करून पारपत्ये केली. हे श्रीमंत राजश्री बाजीरावसाो यांचे दिमत आमचे चुलते व वडील याणी लढाईचे काम सुरापूर व भिल वगैरे बंडवाले यासी करून पारपत्ये केली हे जाणून प्रथम सरदारी आमचे चुलते विसाजी राम गोखले हे वडील व आमचे तीर्थरूप व आणखी तीन चुलते हे कनिष्ठ आसे पाच बंधू यांत सरदारी विसाजी राम वडील सबब त्यांचे नावे स्वार २०० व पायदल २०० येकूण च्यारसे आसामी सरकारात ठेऊन खेरीज जातीची नेमणूक पाच बंधूंची शागीर्दपेशासुध्ध आलाहिदा. नावनिसीवार यादी करून देऊन हुजूर ठेविले. पतक सरकार आज्ञेप्रो कामकाजाकरिता जात येत होते. पुढे पेशवे सरकारचा व कंपणी-सरकारचा बिघाड होऊन लढाई सुरू जाली ते वेळेस पेशवे सरकाराबरोबर फौजसुध्धा होते. ते समई पंढरपुरनजीक श्रीमंतांचे फौजेवर छापा पडल्यावर श्रीमंत उधळून गेले. ते वेळेस आमचे तीर्थरूप भास्कर राम हे मेहरबान आलपिष्टण साो याजला पुरंधर मुकामी येऊन भेटले. तेव्हां सर्व बंदोबस्ताचा वगैरे मजकूर बोलण्यात येऊन आमचे चुलते विसाजी राम याचे नावे पत्र फौजसुध्धां निघोन येण्याविसी ताा १४ मार्च सन १८१८ इा रोजी पाठविले. त्यातील हसील की, बाजीरावसाो याणी कंपणी सरकारासी बिघाड केला त्याकरितां सरदारांचे नुकसान व्हावे आसी कंपणी सरकारची खायेष नाही. आ मेहेरबानाचे येणे जाले आसता बहुत खुषी आहे व ताा ९ माहे आप्रेल पावेतो येऊन पोहोच-ल्यास जातीचा व फौजेसुध्धा बंदोबस्त कंपणीसरकारातून होईल त्याची याद आलाहिदा करून दिल्ही आहे त्याप्रमाणे चालेल. याप्रमाणे पत्र व याद आल्यावरून आपले खावंदास सोडून कंपणी सरकारचे वचनावर व ठरावाचे यादीवर भरवसा ठेऊन कंपणी सरकार कराराप्रो पुस्त दरपुस्त चालवितील आसा विश्वास ठेऊन श्रीमंतापासून निघोन पंढरपूर मुकामी पाच साहा हजार फौजसुध्धा येऊन सरकारास जाहीर होण्याकरिता पत्र पाा. ते पत्र पाहून त्याचा जाब ताा १० मे सन १८१८ इाचे मितीचा पाठविला त्यांत मजकूर की, बराबरची फौज जिकडील तिकडे रवाना करून तुम्ही घरखटल्यानसी पुणे मुकामी येऊन दाखल व्हावे. त्याप्रमाणे खासगत स्वार व पायदल सुध्धां पुण्यास दाखल जाले. नंतर दोनसे स्वार व पंनास पायदल सरकारात ठेऊन, जातीस नेमणूक २५००० पंचवीस हजार रुा पाच बंधूस करून, येकंदर ठरावाची याद फौजसुध्धां १०१८०० येक लक्ष आठरासे रुपयाची करून दिल्ही होती. त्याप्रमाणे दोन वर्षे चालत आले. नंतर स्वार व पायदळ दूर करून पांच बंधू मिलोन जातीस सरमजाम

7616

करकमभोसे माहाल रुो ३५००० पस्तीस हजारचा ठराऊन दिल्हा. त्याप्रमाणे आजमासे दोन वर्षे चालला. पुढे शेके १७४३ साली आमचे चुलते विसाजी राम गोखले मृत जाले, ते वेलेस पस्तीस हजाराचा सरमजाम सरकारात घेऊन विसाजीपंतदादा यांचे चिरंजीव रामचंद्र विश्वनाथ सुध्धां पांच आसामीस १०००० दाहा हजार रुो सरमजामाऐवजी पगार करून दिल्हा. त्याप्रमाणे पगार ज्याचे त्यास पावत गेले. पुढे आमचे तीर्थरूप याणी सरकारांत हरयेकविसी सरकार किफायतींची कामेकाजे करीत आले हे सरकारचे लक्षांत वागून, आमचे तीर्थरूपास मेहेरबान आलपिष्टण साहेब बाहदूर याणी विलायेतस जातिसमई पूर्वीचे २०००. दोन हजार रुो नमणूक होती त्याखेरीज १००० येक हजार रुो जास्त करून दिल्हे. ते समई हा पगार सतत चालेल आसे बोलण्यांत होतें. त्याआन्वये कौंसलचा हुकूम आहे. त्याप्रमाणे नेमणूक आमचे वडील शेके १७६० साली मृत्य पावले तोपावेतों पावले. पुढे पगार बंद जाला. त्यास सदरी मजकूर सरकारांत कामेकाजे करून सरकार लक्षाप्रो वागणूक केली. आमचे वडिलांचे नांव दुसरे प्रतीत होते व त्याच प्रतींत मेहेरबान मलकमसाहेब गवरनर याणी माझे नांव दाखल केले आहे. परंतु आम्हांस पगार नाही व इनाम, वतन वगैरे काही येक नाही. याजकरितां बहुत खराबीत आहोत. तो मजकूर व पूर्वील खानदानीचा मजकूर जाहीर होण्याकरितां ही याद गुजराणिली आहे. तरी सर्व मजकूर खावंदानी दिलांत आणून मेहेरबानी करून आमचे वडिलास सरमजामी पगार होता त्याप्रमाणे माझे नावे करून देणार खावंद आहेत. मेहेरबान आलपिष्टणसाहेब बाहदूर यांची पत्रे व ठरावाची याद येकूण तीन कागदाच्या नकला सरकारांत पाहण्याकरितां या यादीसमेत दिल्हा आहेत. आसल पाहावयाची मर्जी आसल्यास हजर आहेत. सारांष, आमचा बंदोबस्त करून देणार खावंदासिवाये दुसरा कोण आहे ? सर्व आधार साहेबाचा आहे. तारीख ९ माहे अगटंबर सन १८४३ इसवी.

सई: विश्वासराव भास्कर गोखले दस्तुर खुद.

¶*Vishwasrao Bhaskar Gokhale gives an account of his family and the services rendered by his father and uncle to the Peshwa Bajirao and to British officials. This family deserted Bajirao early and joined the English. They were near relations of Bapu Gokhale the famous supporter of Bajirao. The genealogy works out thus :—*

रामचंद्र गोखले

- विसाजीराम (मृ. श. १७४३.)
  - रामचंद्र
- भास्करराम (मृ. श. १७६०.)
  - विश्वासराव (कैफीयतीचा लेखक)
- आणखी तीन

No. 38] [21-8-1822

ए. रु. १९

पो २३ माहे आगस्ट

सन १८२२ इसवी मुकाम पुणें

श्रीराम

आब कुच बदोबस्त होनेका

पहिलेई होगया आबकुच होनेका नै.

अर्जी वेकटराव सिवाजी व घन:शाम दादाजी मराठे ऐसीजे. आम्ही श्रीमंत बाजीरावसाहेब याचे स्वारीबराबर होतो. बापूसाहेब गोखले पडल्यानंतरहि दोन तीन मजला स्वारीसमागे होतोच. स्वारीतून माघारे आल्यावर राजश्री बालाजीपंत दादा नातू यांस सातान्याचे मुकामी भेटून कोल्हापुरास श्रीदेवीचे दर्शनास गेलों. तेथून यात्रेस गोकर्णास गेलो. पुढे मातुश्रीस समाधान नव्हते म्हणोन घरी राजापूर प्रांती आलो. तेथे मातुश्रीचा काल जाहाल्यामुळे येक वर्ष व्रतस्थ घरी राहून वर्षश्राद्ध जाहाल्यानंतर निघोन पुण्यास साहेब मेहरबान बडेसाहेब यांचे भेटीकरितां आलो. तो बडे साहेब मुंमईस गेले. आमची भेट जाहाली नाही. आम्ही श्रीमंत नानासाहेब व भाऊसाहेब याचे कारकार्दीपासून पेशव्ये सरकारचे पदरचे. आमचे वडील दादो हरि व वामनाजी हरि याजकडे न्यायाधिशीचे वगैरे कामे सरकारांतून बहुत वर्षे होती. सरकारांतून तैनात नेमणुका चालत आल्या. प्रांत वसई व कल्याण वगैरे मुलुकहि आम्हाकडे होता. खर्ड्याचे साली श्रीमंताची आज्ञा जाहाल्यावरून औरंगाबाद प्रांतची आम्ही ठाणी घातली. त्याजवर अवरंगाबादचा सुभा पांच हजार फौजेनिसी तोफासुद्धां आम्हावर जालनापूरचे मुकामी चालून आले तेव्हां त्यांच्या आमच्या लढाया होऊन ते सिकस्त होऊन आम्हासी तह करून माघारे अवरंगाबादेस गेले. इत्यादि व पेशवे सरकारांत कामेकाजे बहुत केली त्यामुळे बाजीरावसाहेब लोभ करीत होते. येशवंतराव होलकर, दक्षणेस आले तेव्हा श्रीमंतानी मसलत विचारिल्यामुळे आमचे वडील दादो हरि यानी होलकरासी लढाईचा प्रसंग करू नये, समेट करून त्यासी रहस्य संपादावे ऐसे सांगितले, तें त्यांचे चितास आले नाही. लढाई होऊन श्रीमंत वसईस गेले. तेथून पुण्यास आल्यावर श्रीमंत अमृतराव साहेब व होलकर याचे आम्ही मिलाफी असा आरोप आम्हावर ठेऊन होलकर व सिंदे याजकडे वगैरे कोठे आम्ही जाऊ नये, याप्रमाणे जामीन आम्हास बापूसाहेब गोखले घेऊन त्याचे स्वाधीन केले. त्याजवर गोखले याचे द्वारे आमचे तैनातेचा बदोबस्त सालिना तीन हजार रुपये करून चालविले. त्याखेरीज नवीन सवाशे रुपये दरमाहा श्रीमंताचे खासगी

पोत्याकडून पावत होता. याप्रमाणे सरकारांतून निर्वाह होत गेला. कंपणीसरकारांतून सर्वांबराबर आमचा बंदोबस्त व्हावा परंतु आम्ही ते वेलेस नव्हतो सबब राहिला. याजकरिता हाली साहेबांस अर्ज की साहेब धनी खावंद आहेत. आमचे पदरी खर्च मोठा, निर्वाह चालत नाही, यामुळे पुण्यात आमची गुजराण होत नाही. यास्तव साहेबी मेहरबान होऊन आम्हावर कृपा करून आमचे चालविले पाहिजे. मिति भाद्रपद शुद्ध पंचमी शके १७४४ चित्रभानुनाम सवत्छरे

¶Venkatrao Shivaji and Ghansham Dadaji Marathe recount the services rendered by their ancestors to the Peshwa both in the judicial line and on the field. They add that they were taken to be the accomplices of Holkar and Amritrao and handed over for service to Bapu Gokhale with some remuneration. The writers ask for their remuneration being continued.

No. 39] *[22-12-1843*

श्री

यादी व्यंकटराव व रामराव श्रीनिवास कोरेगावकर सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ. आमचे वडील आजे शामराव आंबाजी हे सरकारचे पदरचे. पूर्वी पुरंधर वगैरे कोकणचे किल्याचे कामावर होते. तेव्हा कैलासवासी नानासाहेब पेशवे याणी श्रीमंत कैलासवासी थोरले शाहू माहाराज याजपासून पुरंधर किला आपले खासगीकडे मागून घेऊन घेऊन आमचे वडील कामगार चागले विश्वासुक म्हणौन मागून घेतले. त्याजकडे पुणे सुभ्याचे व किल्याचे काम होतेच तेव्हा पुणे सुभ्यास पाच हाजार रुो नेमणूक व इनामगाव जातीस व श्रीव्यंकेटशाचे उछाहास असे दिल्हे ते चालत होते. पुढे शाहू माहाराज कैलासवासी जाहाल्यानंतर इकडील प्रांतीचे बंदोबस्तास आमचे आजे यास पाठविले ते समई पूर्वी उत्पन्न चालत होते ते चालऊन आणखी नवीन सुभा प्रां वाई इलाखा सातारा येथे पाच हजार रुोची नेमणूक करून देऊन कसबे कोरेगाव पौ हुजूर मामलयाचा अमल लाऊन दिल्हा व आसाम्या व स्वार व गाव वगैरे उत्पन्न करून दिल्हे. त्याप्रो दोन माहाली पुस्त दरपुस्त अजे शामराव अंबाजी व चुलते सदासिव शामराव व श्रीपतराव बापूजी व गंगाधर शामराव व तीर्थरूप श्रीनिवास शामराव असे पाच पुरुषपर्यंत निर्वेध चालले. त्याचा दाखला बाा सरकारी बेहेडे करार जाहालेले व पत्रे वगैरे बीाा

८०१६९ शामराव आबाजी व सदासिव शामराव मारनिलेचे चिरंजीव व श्रीपतराव बापूजी प्रा पुणे सुभ्याचे बहेड्यास २०२५७। रुो पौ वजा परभारे आसाम्याची चाकरी करून व खासगीचा लवाजमा व पालखी वगैरे शागीर्दपेशासुा १२६५४। रुो बाकी संसारकुटुंबाचे बेजमेस सरकारातून करार करून इनामगावसुधा दिल्हे ते रुा

५६७५ प्रा वाई सुभा येथे नेमणूक व दरखी असाम्या दोन मुजुमी व सबनिसी

५००० ऐन नेमणूक

५२५ मजुमी

१५० सबनिसी

———

५६७५

———

१३६९१।

या प्रो दोन माहाली उत्पन्न उत्पन्न मौजे बालेवाडी ता हवेली हा गाव कैलासवासी शाहू माहाराज याणी दिल्हेला व नानासाहेब याणी कुटुंबाचे बेजमीस असाम्या व इनामगाव ... ... श्री देवाचे उछावास असे दिल्हेले चालत होते. त्याप्रो सरकार दफ्तरी दाखले आहेत. असे असता बाजीरावसाहेब याणी आपले कारकीर्दीत आम्हाकडे काही गुन्हा नसता आमचे सारे उत्पन्नाची वाताहात करून वाई सुभ्याचे नेमणुके पौ अडीच हजार रुो ठेविले ते कोरेगाव येथील पेशजीप्रो कोरेगाव येथील आमलाप्रो दिल्हे. ते वेळेस बाजीरावसाहेब याजपासी बहुत प्रकारे अर्ज केला परंतु दाद लागली नाही. निरोपाय जाणून आमचे तीर्थरूप घरी येऊन राहिले * * * * * * अलीकडे आमचे तीर्थरूप सन १८३८ इसवी साली मृत्य पावले * * * तारीख २२ दिजंबर सन १८४३

सही व्यकटराव व रामराव श्रीनिवास हस्त आक्षर रामराव श्रीनिवास

¶*Vyankatrao and Ramrao Shrinivas of Koregaon now surnamed Kirkole Diwan submit a Kaifiyat of their family recounting how their ancestor Shamrao Ambaji was appointed in charge of Purandhar by King Shahu and Peshwa Nanasaheb, what remuneration the family received in return for its service and how it was deprived of all that without its fault. This family is connected with Shripat Bapuji.*

7620

[दुसऱ्या याच घराण्याच्या कैफियतींतून]

*   *   *   *   आमचे पणजे यास इनामी व सरजामी वेतन चालत होते. आमचे पणजे यास पुत्र.

१ वडील सदासिव शामराव त्यास पुत्र नारायणराव सदासिव मयत. त्याचे पुत्र विष्णु नारायण व सखाराम नारायण

१ आमचे आजे जीवनराव शामराव त्यास पुत्र महिपत जीवनराव मयत त्याचे पुत्र आम्ही [गंगाधर महिपत व दाजी महिपत]

१ श्रीनिवास शामराव यास पुत्र व्यकटराव श्रीनिवास व रामराव श्रीनिवास

¶*This is another genealogy of Vyankatrao Shrinivas of Koregaon.*

No. 40]   [*Recd. 1-11-1822*

पो १ नवंबर सन १८२२

तर्जुमा छ

श्रीलक्ष्मीप्रा

यादी अर्जी सदासिव रघुनाथ गद्रे सुा सलास अशेरीण मयातैन व अलफ. आम्हावर श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब याची राजकारणामुळे इतराजी होऊन सोळा वर्षे किले सिंहिगड येथे अटकेत होतो. सरकार कंपिनीबाहादुर यासी बिघाड होणार सबब, आम्हास किल्यावरून काढून मोकळे करून स्वारीबराबर घेतले. आठ महिने स्वारीबराबर कसाला भोगला. आमची घरेदारे, श्रीमंताची स्वारी वसईहून पुणे मुकामी आल्यावर, आमचे कबिले घरातून बाहेर काढून, सदासिव माणकेश्वर याणी घेतली. दौलत असबाब सर्व बरबाद[1] जाहाली. लाच्यार जालो. फकरुद्दीन हुसेनखान मुनसी याची आमची इंग्रेज कंपिनीबाहादुर याचे राजकारणावरून दोस्ती, आम्ही मदारुलमाम नाना फडणीस यांचे, सबब श्रीमंताचे दिलात खलेश[2] आम्हावर हरयेक बहाणा ठेऊन नजरबंद करावें हा मतलब समजल्यावरून आम्ही दौलतराव सिंदे याचे घरी मदारुलमाम साहेब याचे हमराह[3] नजरबंद जाहालो, ते वख्ती खंड पडला तो देऊन, बाकी काही चीजवस्त वगैरे व त्यास कामास पडले बडेखान नेक माणूस त्याजपासून बेमानपणा होणार नाही, इंग्रेज कंपिनीबहादुर याचे नौकर, त्याजवर पेशवे साहेब याचा दस्त चालणार नाही,

---

१ नष्ट.   २ किल्मिष.   ३ बरोबर.

हा अंदेशा दिलात आणून, जवाहिर सोने रुपे कापड, वगैरे कागदपत्रसुधा त्याजवळ ठेव ठेविली. त्याचे भाईबंदास दखल व बयाजी नाईक यासहि माहूम. आम्ही नजरबंद जाहाल्यावर फकरुदीन हुसेन याजवर पेच येऊन ते कैदेत पडोन तेहि तमाम जाले. त्याचे छोटे भाई निज्यामुदीन हुसेन हैदराबादेस होते ते बडोद्यास गेले. ते नेक होते तेहि मृत्यु पावले. आम्ही त्याजपासी ठेव मागावयाचा उपराळा करावा तर आम्ही कैदेत, कबिले अज्ञान, पदरचे कारकून अफरातफरा परागंदा जाहाले, नाइलाज; पुढे श्रीमंताचे स्वारीतून उबरखेडाहून पायउतारा बडोद्यास गायकवाड याजकडे कर्ज येणे व ठेवीचा ऐवज खानमजकूर याजकडे येणे सबब तेथे गेलो. अजम रिसदेट कर्नेल साहेबाची मुलाकात घेऊन हकीकत जाहीर केली. त्याणी दीलदिलासा देऊन आमचा वाका साहेबास पुणे मुकामी लिहून पाठविला. साहेबाचा हुकुम देसी रवाना करण्याचा जाहाला; त्याजवरून त्याणी देसी रवानगी केली. खानाकडील मजकूर त्याचे छोटे भाई अजम कमालुदीन हुसेन स्वारीत महूवर होते त्यास पत्रे पाठविली. त्याणी दाद दिल्ही नाही. गायकवाड याजकडे ऐवज येणे त्याणीही काही दिल्हे नाही. साहेब मेहरबान होऊन लोकाकडे येणे ते व घरेदारे वगैरे देतील ही उमेद धरून देसी आलो. साहेबानी फक्त तीन हजार रुपये सालीना पेनसेन पेटिया करून दिल्हे. त्यात गुजारा होत नाही. त्यासिवाय सालीना हजार दोन हजार रुपये कर्ज होत आहे; व मागील देणेदाराचा पेच कर्जदारी निकड करितात. घरदारे सुटतात, त्याची रोहोपोहो करून तुमचा फैसला करतो असे सांगून आजपावेतो दिवस काढले; आता देणेदार मानीत नाहीत. साहेब मेहरबान होऊन आमची याद करून हकीकत पुसतील ही उमेद फार होती; परंतु नसिबाचे कंबख्तीने साहेबास याद होत नाही. आमचा दीन बदीन जैफीचा[1] दिवस लोकाचे देण्याचे पेचातून निघोन, साहेब देतात, त्यात गुजारा करून दुलयेदारीची हदपार करून, खुदाची बंदगी करावी हा दिलात हेत प्राप्त होऊन अर्जी लिहिली आहे. साहेबासिवाय दुसरे जाणत नाही. साहेब गरीब जवानदर्द जाफर मालक खावंद आहेत. राज्यातील लोकाचे साहेब चालवितात त्यात कसाले[2] गुजरले असेहि आहेत; परंतु आम्हावर कोणे तऱ्हेने कसेकसे गुजरले, आम्ही ज्याची चाकरी केली ती कशा नेकीने केली, ही छान साहेबी करून बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे, तर आमचा परिणाम लागतो; नाही तर नाइलाज गोष्ट आहे येविसीची कलमे :

१ आमचा वाडा व पागा बाग वगैरे दरोबस्त वस्तवानी कागदपत्रसमेत सदासिव माणकेश्वर याजकडे आहेत, ते आमचे आम्हास द्यावे. श्रीमंतानी

---

१ वार्धक्याचा. संकट.

कैदेतून सोडून स्वारीबराबर घेतल तेव्हा वाडा तुमचा तुम्हास देऊ, बक्षीस केले नाहीत असे बोलण्यात आले, परंतु अवकाश पडला नाही म्हणोन तसेच राहिले. साहेबाचे पदरी पडलो.. साहेब मालक खावंद आहेत. मेहेरबान होऊन आमची घरे वगैरे वस्तवानीसमेत आम्हास देवावी, म्हणजे आम्ही कलेल तसी व्यवस्ता करून, देणेदाराचे पेचातून मुक्त होऊ. कलम

१ वाडा देण्याविसी तूर्त काही दिरंग असल्यास आम्हास तर देणेदाराचा पेच भारी; त्यासी दुसरी गोष्ट सांगावयाची नाही. त्यास साहेब मेहेरबान होऊन दाहा हजार रुपये पेनसेन देतात; यासिवाय बक्षीस, आमची लाच्यारी जाणौन देऊन देणेदाराचे पेचातून काढावे; साहेब दर्द जाणून मेहेरबानी करीत आहेत. आम्हावर करून शेवा चाकरी घ्यावी. साहेबाचे म्हणवितो. कलम.
१

१ फकरुदीन हुसेनखान याजकडे ठेवीचा ऐवज जवाहिर वगैरे येणे येविसी त्यास ताकीद करून, आमची तोडपाड ठाणी आम्ही लाच्यार सबब रुपयाचे आठ आणे घ्यावयास साहेबाचे मारफतीने राजी. कलम
१

१ आमचे कर्जवाम होलकर गायकवाड वगैरे लोकाकडे येणे; त्यास ताकीद होऊन आम्हास देवावे व गणेश गोविंद भिडे याजकडे आमचा ठेवीचा ऐवज येणे. त्याणी आम्ही किल्यावरून सुटोन आल्यावर पत्र लिहून दिल्हे ते आम्हापासी आहे. कलम
१

अर्जीची लिा आहेत. मेहरबानी करून बंदोबस्त करून देणार साहेब खावंद आहेत.

¶Sadashiv Raghunath Gadre, a banker of Poona, who was persecuted by Peshwa Bajirao because he was a relation of Nana Fadnis, submits this petition to the British authorities requesting an increase in his pension and the restoration of his property which was deposited with Fakruddin Hussein Munshi in the service of the British at Poona.

1

गोपाल **[सुपेकर देशपांडे.]**

- हरि
  - बलवंत
    - हरि
  - माधव
    - गोपाल
  - कृष्ण
    - नीलकंठ
- आनंदराव
  - गोपाल
    - गोविंद गोपाळ
      गंगाबाई.

2

चिटणीस निा सरकार माहाराज सिंदे आलिजाबहादर

रघुनाथ मल्हार कुलकर्णी निगडीकर

[उपनाम निगडीकर गोत्र भारद्वाज सूत्र आश्वलायन कुलकर्णी मौजे निगडी ॥ मौजे चिखली तो। उमरज प्रांत कराड.]

- आबाजी रघुनाथ
- कृष्णराव
  - गोविंदराव
  - नारायणराव
  - माधवराव
- गोपालराव

.3

आवजी कवडे

- महिपतराव
  - अमृतराव
  - हैबतराव
  - माधवराव

महिपतराव कवडे इंग्रजी अमलात
गुरसाळ्याकडे गेला.

मौ। गुरसल पो। करकंब.

7624

4

इच्छारामपंत ढेरे गोत्र वसिष्ठ सूत्र आस्वलायन

- इच्छारामभट बिन शंकरभट ढेरे
  - रामचंद्र
  - हरि
    - रंगो
    - वामन
    - विनायक
    - माधव
    - पांडुरंग.

5

कृष्णंभट बिन कासीभट

- कृष्णंभट बिन कासीभट
  - रामचंद्रभट
    - गोपाळभट
      - गोविंदभट
        - गोपाळभट
  - त्रिंबकभट
    - नारायणभट
      - वासुदेवभट
        - श्रीपतभट
          - आत्मारामभट.
      - त्रिंबकभट
        - बालकृष्णभट
      - केशवभट
        - ०

कृष्णंभट बिन कासीभट राजऋषि सूत्र आश्वलायन ज्यामदग्न वच्छ गोत्र धर्माधिकारी कसबे पुणे प्रां मजकूर.

6

एकबोटे–वंशावेल

१ रामाजी सिवाजी याचे पुत्र गुंडो रामाजी

१ बालाजी गोविंद यास पुत्र त्रिंबक बलाल व सदासिव बलाल

१ विठल गिरमाजी व केसो गिरमाजी

१ कोन्हेर त्रिंबक यास पुत्र चौघे

- नारो
  - नरसिंगराव
- रंगो
  - व्यंकटराव
- त्रिंबक
  - नरहर
    - दादो नरहर
      - राघो दादाजी
- चिटको
  - नारायण

7

धडफळे

गणेश नारायण

- अनंत
  - जगनाथ
- नीलकंठ
  - कल्याण
- चिंतामण
  - लक्ष्मण

8

चापाजी टिळेकर हुजऱ्या

संभाजी पाटील टिळेकर

- चापाजी
  - हणमंता
    - अमृतराव (पेशवाई अखेर)

9

जानू भिताडा

महिमाजी

कानोजी	जानू (पानपत)	माहादजी
मायाजी	मायाजी[१]	
	बहिरजी	

10

अंताजी आपाजी व जनार्दन आपाजी व चिटको आपाजी व हरि आपाजी उपनाम येरंडे गोत्र अत्रि सूत्र अश्वलायन कुलकर्णी मौजे परखंदी व मौजे सेपूरजन बुा निमे व मौजे खानापूर निमे समत हवेली प्राा वाई

जनार्दन आपाजी एरंडे

त्र्यंबकराव जनार्दन

11

चिन्हे किल्ले पुरंदर

चाहूजी नाईक


चिमाजी नाईक

कोंडाजी नाईक

येसाजी नाईक

नारोजी	सिवाजी.

१ कानोजीचा मुलगा मायाजी यास जानूजीनें दत्तक घेतलें. याबाबतींत आशेर मयातैन अलफमध्ये चौकशी होऊन दत्तक कायम केला.


तुकारामबुवा
देहू
२ नारायण
२ माहादाजी
३ उधव गो
३ गणेश गो
३ गोविंद
३ आबाजी
४ खंडेरावबाबा
४ त्रिंबक
४ पिलाजी
४ हरजी
४ घनश्याम
४ सजणाजी
४ गोवदास
४ पांडोबा
४ भगवंत
४ विठोबा
४ महादेव
४ मुकुंद
४ जैराम
५ घनश्याम
५ रामचंद्र
५ राघोबा
५ रामचंद्र
५ जगन्नाथ
५ शिवराम
५ राजाराम
५ अमृतराव
५ दाजीबा
५ कान्होबा
५ रघुनाथ
५ अन्याबा
५ गोविंद
५ श्रीधर
५ बासुदेव
५ रामकृष्ण
५ पंढरी
६ अत्याबा
६ नामदेव
६ विठोबा
६ दामोदर
६ सखाराम
६ बज्याबा
६ विठोबा
६ एकनाथ
पंढरीनाथ
६ भाऊ

13

सुपे सुभेदार

- हरि
  - त्र्यंबक ऊर्फ बाजी ?
    - आनंदराव
      - जिवाजी आनंदराव
  - बाजी ?

14

धोंडो महादेव (सलास सितैन मया व अलफ)

- धोंडो महादेव
  - कोंडो धोंडो सेनाकर्ते (सलास समानीन मया व अलफ)
    - गोविंदराव
    - रामचंद्र

आनंदराव सखदेव सेनाकर्ते
यास सकवारबाईचें पत्र आहे.

15

नरसिंगराव जनार्दन धायगुडे

- नरसिंगराव जनार्दन धायगुडे
  - हरबाजी नरसिंगराव
    - नारो हरि

7629

16

नारो अनंत परचुरे

- नारो अनंत परचुरे
  - त्र्यंबकराव
  - बापूजी
  - विठल
  - आनंदराव
  - गोपाळराव ?
    - कासीराव
      - रामराम

17

परशरामपंत प्रतिनिधि

- परशरामपंत प्रतिनिधि
  - कृष्णराव
    - गंगाधरराव
      - भवानराव
        - परशरामपंत हाली आहेत
    - आमृतराव
      - कृष्णराव
    - त्रिंबकराव
      - भगवंतराव
        - आबाजीराव
          - भगवंतराव विशालगडास हाली आहेत.
    - यशवंतराव
    - सिवरामपंत
  - श्रीपतराव ०
  - सदासिवराव ०
  - जगजीवनराव ०

¶*Here is a list of the members of the family of the Pratinidhis. The original list is presented here in a table for easy reference.*

18

पिलाजी जाधवराव

- सटवोजी जाधवराव
  - जोत्याजी जाधवराव वाडीकर
    - लाडोजी
      - नर्मदा=गणपतराव गायकवाड बडोदे
  - सुभानजी वाघोलीकर
    - संभाजी
      - भवानजी
      - पिलाजी
      - सटवाजी
    - मलोजी
      - बलवंतराव
      - नारायणराव
      - लक्ष्मणराव
      - भाऊ

19

प्रयाग अनंत फणसे गडकरी किले सातारा

- अंताजी प्रयाग
  - जोती अनंत

20

गुजर—वंशवेल

- १ प्रतापराव
  - २ खंडेराव
    - *
  - २ जगजीवन स्त्री कासीबाई
    - *
- १ सिवाजी
  - २ सयाजी
    - ३ सिदोजी

21

वंशवेल रेटरेकर देशस्थ ऋग्वेदी.

- भिवाजी
  - बाजी
    - बापूजी
      - नारायणराव
        - नकल
      - गोविंदराव
        - नकल
    - गंगाधर
      - माधवराव
        - रामचंद्र
          - बालकृष्ण
      - त्रिंबकराव
        - नारायण
        - वासुदेव
        - कृष्ण
    - मल्हार
  - चिमणाजी

22

बाबाजी विठल कारखानीस किले पुरंधर (समान आसरीन मया व अलफ)

- विठल दादाजी
  - दादो विठ्ठल
  - रामचंद्र विठ्ठल

महिपतराव व्यंकटेश

23

काटे देशमुख

- बाळाजी काटे
  - धर्मोजी
    - शामराज (शहाजीचे वेळेस)
      - बावाजी
      - मानसिंग
        - धर्मोजी
        - रघूजी
  - संभाजी
    - माहाजी

24

माणकेश्वर धायगुडे

- त्रिंबकराव माणकेश्वर [पंचवीस हजार फौजेचा सरंजाम] [शाहू महाराजांचे हुजरातीस चाकर इहिदे खमसैन]
- चिमणाजी माणकेश्वर [आठ हजार सरंजाम]
  - माणिकराव
    - अमृतराव
  - माधवराव
    - बलवंतराव
  - रामराव
    - चिमणाजी

(आर्बा समानीन मया व अलफ)

25

माह्दाजी कृष्ण जोशी चासकर

- कृष्णराव
  - रामचंद्र
    - नीलकंठ
      - माधवराव
        - कृष्णराव
- रामचंद्र [संपादन करणार]
  - नारो रामचंद्र
    - ०
- बालाजी
  - अमृतराव
    - गणपतराव
  - परशराम
    - सिवाजी
      - परशराम
      - कृष्ण
      - गोपाल
  - मेघश्याम
    - माधवराव
      - रामचंद्र
  - बालाजी
    - नकल

26

मोरोपंत पिंगळे—वंशावेल

- त्रिंबकराव
  - मोरोपंत
    - नीलकंठराव
      - ०
    - बहिरोपंत
      - आपाजीराव
        - नारायणराव
          - बहिरोपंत ऊर्फ आबासाहेब (इ. स. १८४३ त हयात)
    - येशवंतराव
      - गोविंदराव
        - रावोपंत
        - धोंडोपत
        - नारोपंत
          - धोंडोपंत
          - माधवराव

27

- यशवंतराव पोतनीस
  - विठ्ठल यशवंत
    - भिवराव विठल

7634

28

राघो लक्ष्मण पुरंदरे दिा मल्हारजी होळकर.

- भास्कर
  - विसाजी
    - गोमाजी
      - भैराल
        - रामराव
          - कृष्णराव
      - खंडो
        - मल्हार
          - नानाजी
          - सखाराम
          - चिंतो
          - विनायक
      - लक्ष्मण
        - राघो लक्ष्मण
          - लक्ष्मण राघो
            - बापूजी
            - महिपतराव
    - काशी
      - रामचंद्र
        - लक्ष्मण
          - आनंदराव
          - शंकराजी
          - रामचंद्र
    - गिरमाजी
  - त्रिंबक +

29

रामचंद्र गणेश कानडे

वेदमूर्ति गणेशभट बिन केशवभट कानडे गोत्र शांडिल्य मौजे सोनोरी ता कऱ्हेपठार प्रा पुणे येथे इनाम राज्याभिषेक शके ९१ फाल्गुन शुध्ध ६.

- गणेश केशव कानडे
  - रामचंद्र गणेश
    - माधवराव रामचंद्र.
      - रामचंद्र माधव (दत्तक)
        - गणपतराव
          - माधवराव

+ हा अंबाजी त्रिंबक पुरंदरे याचा पूर्वज.

7635

आंबेकर—वंशवेल

दामोदर

- १ रामचंद्र
  - २ विठल
    - ३ रामराव
    - ३ सदासिव
      - ४ कृष्णराव
  - २ दाजी
    - नारायण
      - ४ बापूराव
      - ४ दाजीराव
  - २ गोविंद
    - ३ रंगराव
    - ३ हरिपंत
      - ४ विनायक
      - ४ सदासिव
      - ४ यशवंतराव
  - २ माधव
    - ३ रामराव
      - ४ चिंतोपंत
      - ४ बालकृष्णपंत
      - ४ मार्तंडराव
      - ४ वामनराव
  - २ आनंद
    - ३ रामचंद्र
      - ४ गोपालराव
      - ४ बापूराव
      - ४ गोविंदराव
  - २ महिपत
    - ३ रंगराव
    - ३ विठलराव
- १ बाजीराव
  - २ आपाजी +
    - ३ बलवंतराव
      - ४ धोंडो बलवंत

\+ आपाजी बाजीराव हे मल्हार तुकदेव पुरंदरे याचे जावई, मुलगी मथुराबाई.

31

शंकराजी मल्हार
- कृष्णाजी
  - जगन्नाथ

} पेटा अंबाड

32

बाबूराव मल्हार बर्वे याच्या पदरचा **शामजी गोविंद टकले** निजामाकडे वकील

गोविंद
- शामजी
- क्ष
  - लक्ष्मण
    - अमृतराव

मल्हारराव भिकाजी बर्वे, बाबूराव मल्हारचा नातू व अमृतराव लक्ष्मण टकले हे पेशवाई गेल्यानंतर औरंगाबादच्या इष्टेटीबद्दल भांडत होते.

33

शामराव आंबाजी किरकोळे (कोरेगांवकर)
[सबा सितैन मया अलफ माघमास मृत्यु]

- सदाशिव
  - नारायणराव
    - शामराव
      - *or*
      - सखाराम?
    - गोविंदराव
    - विष्णु
    - आनंदराव
- जीवन शामराव
  - महिपत
    - गंगाधर
    - दाजी
- श्रीनिवास शामराव
  - व्यंकटराव
  - रामराव

34

सोमवंशी

संताजी

- प्रतापजी
- आपाजी
- रामराव
- तुकोजी
  - सुभानराव
  - माधवराव
- बाजीराव
- साखरोजी

35

गोपाळभट बर्वे

- लक्ष्मीबाई=गणेश गोपाळ
  - जानकीबाई=रघुनाथराव
  - कृष्णराव
  - गोपाळराव
- गोविंद गोपाळ=शिऊबाई
  - बाजीपंत बर्वे

36

१ तैनातजाबता निा **हरि बलाल फडके** सुा सीत समानीन मया व अलफ खासा जातीस व पुत्र पुतण्ये मिळोन सालिनादेखील पालख्या वगैरे साल मजकुरापासून रुा

४५०००

तपसील

३३५९०	खुद हरि बलाल		
४४४६	मोरो बापूजी पुतण्ये पालखीसुधा		
१३२८.	नारो आबाजी पुतण्ये		
३६०	धोंडो बलाल बंधु		
५२७६	पुत्र		रुा
		५०००	चिंतामण हरि देखील पालखी
		२७६	रामचंद्र हरि
४५०००			

[पुढे तपशील]

१ यादी हरि बलाल याजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम सुा तिसा सबैन मया व अलफ स्वार ७५० साडेसातशे दर राऊती सालिना रुा ३०० तीनसेप्रमाणे रुा

२२५००

सदाशिव नारायण व बापूजी बल्लाळ व आनंदराव भिकाजी उपनाम फडके गोत्र अत्रि सूत्र आश्वलायन वास्तव्य कसबा गुहागर यांसी तिसा सितैनांत नूतन इनाम द्यावयाचा करार केला. छ १० रावल तिसा चैत्रमास

बालंभट फडके

- बापूजी
  - मोरो
- आबाजी
  - गंगाधर
  - नारो
- हरि
  - रामचंद्र
- धोंडो

37

पारसनीस

बापूजी भीमसेन
|
कृष्णराव बापूजी (सीत सितैनात मृत्यु)
|
नारायणराव कृष्ण
|
भगवंतराव नारायण (सबा समानीन)

१ भास्करराव पारसनीस दिा हुजारत

पेठ्ये.

१ त्रिंबकराव विश्वनाथ व माधवराव विश्वनाथ हे दोघे भाऊ विभक्त झाले (छ ६ जामादिलोवल कार्तिक) [खमस सितैन]

- त्र्यंबकराव
  - विश्वासराव
  - कृष्णराव ? (समान सबैन)
- माधवराव
  - पांडुरंग
  - मोरेश्वर माधवराव [तिसा सितैन]

१ अमृतराव विश्वनाथ यास साल मजकुरी सरंजाम दिल्हा

१ कृष्णराव त्रिंबक पेठे मृत्य पावले सबब (इसने समानीन मया व अलफ)

7639

38

राजमाचीकर व पेशवे

राजमाचीकर व पेशवे हे ह्या एकाच घराण्याच्या दोन शाखा होत हें पुढील वंशावलीवरून सिद्ध होतें. उपनाम भट गोत्र गार्ग्य सूत्र आश्वलायन देशमुख मामले दंडा राजपुरी.

महादजीपंत
- नारोपंत
  - माहादाजी
    - नारोपंत
      - त्रिंबकपंत
        - नारोपंत
          - रामराव
            - त्रिंबकराव [ह. इ. स. १८३०]
            - रामचंद्र [ह. इ. स. १८३०]
- सिवाजीपंत
  - विश्वनाथ सिवाजी
    - बाळाजी विश्वनाथ

39

खरसीकर प्रभुणे

नारो गंगाधर ऊर्फ आयाबा मुजूमदार हा मौजे लोणी पाा सुपे (लोणी भापकर ता. भिमथडी जि. पुणें) येथील कुलकर्णी उपनाम प्रभुणे. याचा भाऊ विनायक गंगाधर. त्याचा मुलगा चिंतो विनायक. विनायक गंगाधरासंबंधीं विशेष माहिती मिळत नाही. हा इ. स. १७४८ च्या सुमारास वारल्यानंतर त्याचा हुद्दा व उत्पन्न चिंतो विनायकाच्या नावे झाले. दिाा हुंजरात व राणोजी पवार विश्वासराव यांजकडील विश्वासराईच्या सरंजामाची फडणिसी

7640

चितोपंताकडे चालत होती. यासंबंधांत मौ. खरसी ता॥ कुडाळ प्रांत वाई या गांवाशी या घराण्याचा संबंध आल्यामुळें मुळचे 'प्रभुणे उपनाम मागे पडून खरसीकर' नावानें हे ओळखू लागले. यांचा वंशवेल असा

- दादाजी
  - गंगाधर
    - विनायक
      - चिंतोपंत
        - धोंडोपंत
          - चिंतोपंत
        - रघुनाथ
          - बलवंतराव
            - हैबतराव
          - विनायक
          - चिंतोपंत
          - रामचंद्र
      - बाबूराव
        - मोणकोपंत

40

विश्वनाथपंत बेहरे गोत्र बाभ्रव्य सूत्र आश्वलायन मुकादम ता॥ हातखंबे प्रां॥ राजापूर, ता॥. रत्नागिरि पुरातन वतनदार कसबा माजगांव ता॥ केळे यांस सलास समानीनांत पेशव्यांनीं २८ गांवची मोकदमी दिली.

- अंताजी
- गणेश
  - आबाजी गणेश +

+ यास बाप मृत्यु पावल्यावर सीत तिसैनांत नेमणूक झाली.

41

गदाधर प्रल्हाद प्रतिनिधिची वंशावळ [नगर जमाव रु. नं १९४३].

यांचा पूर्वज अनंतभट्ट त्रिंबकेश्वर गांवीं राहात असे. यास निजामशहा, मलिकंबर, शाहाजी व शिवाजी यांजकडून इनाम जमीन एक चाहूर चालविली. त्याच्या सनदा धामधुमींत नष्ट झाल्या तेव्हां गदाधर नारायण अग्निहोत्री यानें राज्याभिषेक शके १३ सालीं संभाजी माहाराजांस भेटून नूतनपत्रें करून घेतलीं. बहुधा हा रायगडचे वेळ्यांत शाहूबरोबर मोगलांचे हस्तगत होऊन त्याच्याच बरोबर त्याची सुटका झाली. पुढें शाहूनें त्यास आपला प्रतिनिधि नेमिलें. गदाधर प्रल्हाद मरण पावल्यावर तें पद कांहीं-काल नारायणभट याजकडे चाललें. पुढें प्रतिनिधिपद परशुराम त्रिंबकास परत दिलें तेव्हां शाहूनें महादाजी गदाधर यास अमात्यपद दिलें तें शाहूच्या मृत्युपावेतों त्याजकडे चाललें. रामराजानें अमात्यपद शिवराम रामचंद्र अमात्य यास दिलें. गदाधर प्रल्हाद हा काश्यप गोत्री देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, औरंगजेबाचे कैदेंत शाहूच्या सेवेस होता. प्रल्हाद निराजी म्हणून जो राजारामाचा प्रतिनिधि होता त्याचा या गदाधर प्रल्हादाशीं कांहीं संबंध नाहीं.

- अनंतभट
  - वासुदेवभट
  - हरिभट
  - नारायणभट
    - (वंशज) प्रल्हाद
      - गदाधर
        - महादजी
        - जगन्नाथ
          - आनंदराव
      - भटंभट
        - हरभट
          - बापूभट
            - दादंभट
      - नारायण
        - मल्हार
          - गदाधर
          - नारो

हयात खमस खमसैन मया व-अलफ

7642

दाजीराव बिन अमृतराव हांडे देशमुख यांणी ही वंशावळ सन १२३९ फसली (इ. स. १८२९) सालांत दिल्हे

नक्कल.

१ मूळ पुरुष देवरा हांडे
यांणी पातशाहाची पिछाडी मारली व मालकावर वार केल बब देशमुखीचे वतन दिल्हे यास पुत्र १

२ दादजी यास पु

३ देवराऊ — ३ हरजी पुत्र

४ स पुत्र रावोजी — ४ दादजी पुत्र

५ वराव यास पुत्र — ५ येशवंतराव पुत्र २

६ दादजी — ६ राजजी यास पुत्र — ६ हरजीस पुत्र १

७ लिलोजी पुत्र ४ — ७ मानकोजी यास पुत्र २ — ७ जाखोजीस पुत्र २

८ नानाजी — ८ सखोजी — ८ सुलतानजी — ८ सुभानजी पुत्र ३ — ८ जानराव यास पुत्र १

९ ोहनराव — ९ तुळजाजी — ९ राणोजी — ९ सिदोजी नकल — ९ आनंदराव — ९ तुळजाजी — ९ सटवाजी यास पुत्र ५ — ९ आनंदरा यास

१० मृतराव — १० देवराव — १० सुरसिंगराव — १० भागवतराव — १० विठलराव — १० येशवंतराव — १० रामराव — १० महिपतराव — १० खंडेराव — १० ना

Index to Selection No. 44

Some Historical Families

[Figures refer to numbers of letters. Only the letters have been indexed. For a list of the genealogies see the introductory note.]

A

Aba Kale—a trusted servant of Bajirao II—his services and genealogy 19.

Ambojirao Babar—founder of the Babar family—2.

Anandrao Babar—his family history 2.

Anandrao Gopal Supekar Deshpande—family history and genealogy 13.

Anandrao Malhar—rewarded for negotiating the treaty of Bassein between the Peshwa and the English 3.

Anandrao Pawar of Dhar—8.

Anyaba (Parashuram Khanderao) Rahatekar—his saranjam and the subsequent pension granted to him by the company 1.

Apajirao Budhiwantrao More—killed at Rakshasbhuvan 12.

Arthur Wellesley—37.

B

Baburao Angria—36.

Bachaji Vishvanath Khandekar—family history 21.

Bahirji Babar—killed at Panipat 2.

Bahiro Narayan Pingle—descendent of Moropant Pingle—reports the administration of Pratapgad in his family for over a hundred years and its transfer in the regime of Madhaorao Peshwa 23.

Bajaba alias **Narso Tukdeo Shirvalkar**—his early rise and subsequent fall 22.

Bajirao Ballal Peshwa—seduces Anandrao Pawar to leave his brother on the eve of the battle of Dabhai 8; 11.

Bajirao Raghunath Peshwa—2; 3; his policy of persecuting Nana's adherents incidentally alluded to 5, 10, 11, 22, 40; 16; 24.

B—*contd.*

Balaji Bajirao Peshwa—his capture of Trimbak fort referred to 26, 27.

Balaji Khanderao Purandare—9.

Balaji Janardan alias **Nana Fadnis**—his success in cutting off the enemy's commissariat at Talegaon referred to 4; 10; 11; 16; 19.

Balaji Narayan Natu—36.

Balaji Raghunath Patwardhan—his family account 24.

Balaji Vishvanath Peshwa—his release from the custody of Damaji Thorat referred to 28.

Baloji Kunjir—9; 27.

Bapu Gokhale—his early alliance with the English 37; 38.

Bhikaji Shamraj Raste—36.

C

Chandrarao More of Jawli—his genealogy 12.

Chinto Trimbak Punekar—in the service of Bapu Gokhale—his family account and genealogy 35.

D

Dado Hari Marathe—his services to the Peshwa recounted to establish the claim of his family for a pension 38.

Daji Gomaji Purandare—9.

Damajirao More—killed in the battle of Borghat 12.

Damaji Thorat—28.

Daulatrao Lad of Wathar—15.

Dhanshet Karanje—28.

Dhondbhat Bhagwat—gives his daughter in marriage to Bajirao II and is rewarded with a liberal allowance 16.

D—*contd.*

Dhondji Wagh—37.
Dhondo Harbaji Raste—36.
Dhondopant Gokhale—uncle of Bapu Gokhale—his death in the fight with Dhondji Wagh referred to 37.
Dhondopant Nitsure—4.
Dhondo Ram—Peshwa's vakil to the Nizam—17.

E

Elphinstone—3.

F

Fakruddin Hussen Khan—Munshi to the Resident, Poona—40.

G

Gangadhar Govind Bhanu—died as a result of his persecution by Bajirao II and Daulatrao Sindia 10.
Gopikabai, wife of Balajirao Peshwa—36.
Govind Hari Ok—18.
Govind Shamraj Subhedar—the rise of his family and its subsequent history 11.

H

Harbaji Naik Raste—36.
Hari Gopal Supekar Deshpande—family history and genealogy 13.

K

Kaloji Somajiram Bhonsle—his services to Shahu Chhatrapati recalled 32.
Kamaluddin Hussen—40.
Khanderao Ballal Purandare—9.
Khanderao Dabhade Senapati—7.
Khanderao Nilkanth Raste—his services to the Peshwa and family history 36.
Khanderao Trimbak Odhekar of Dhar—8.
Khando Gomaji Purandare of Saswad—9.

K—*contd.*

Krishnaji Dabhade—nephew of Khanderao Dabhade Senapati—his family history recounted 7.
Krishnaji Harbaji Raste—36.
Krishnaji Moreshwar Kolhatkar—secures a liberal allowance on the marriage of his daughter with Sadashivrao Bhau—his genealogy 20.
Krishnarao Narayan Joshi—his meritorious services recognised and a liberal pension granted to him 5.
Krishnasha of Jawhar—6.
Kumaji—a butcher—asks compensation for losses suffered while trying to supply the English with meat about the time of the battle of Wadgaon (1779) 4.
Kuvarji—son of Krishnasha of Jawhar—6.

L

Lakshman Ballal Gune—brother of Ramaji Ballal—killed at Panipat 33.

M

Madhavrao Ballal Peshwa—23, 27.
Madhavrao Narayan Peshwa—16.
Madhavrao of Jawhar—6.
Mahadaji Sonavani—riding master to Bajirao II—14.
Mahadaji Trimbak Punekar—in the service of Bapu Gokhale—died fighting Dhondji Wagh 35.
Mahadji Sindia—11.
Manaji Rananavare—killed in a battle with Udaji Chavan and rewarded with inam land 25.
Manaji Sindia Ravirao—of Loni—rewarded for his bravery by Balaji Vishvanath 30.
Mansing More Senapati—his genealogy 12.
Mir Anwarulla Khan—his surrender of fort Trimbak to Nana Saheb Peshwa recalled 26, 27.
Mir Mubarak-tullakhan of Yedgaon—27.

M—*contd.*

Mir Sahadat-ulla-khan of Yedgaon—submits his family history 27.

Moropant Pingle—Shivaji's Peshwa—his genealogy 23.

Morshet Karanje—his family account 28.

Mukundrao Krishnarao More—killed at Panipat 12.

N

Narayanji Bahirji Babar—killed at Dharwar fighting with Tipu 2.

Nijamuddin Hussen—40.

Nilkanth Ramchandra Page—his services to the Peshwa recounted 31.

Nilkanthrao Dhondo Raste—36.

P

Parvatibai—wife of Sadashivrao Bhau—20.

Patangshah of Jawhar—6.

R

Ragho Hari Ok—18.

Ragho Lakshman Purandare—9; his family account 29.

Raghunath Bajirao alias **Dada**—8; 19; escapes being made a prisoner at Rakshasbhuvan by the bravery of Ravirao Sindias of Loni 30.

Raghunath Shridhar Bhanu—10.

Rakhmajirao More—killed at Badami 12.

Ramaji Ballal Gune—Peshwa's vakil to the Bhonsles of Nagpur—his family account 33.

Ramaji Yadav Bhowalkar—17.

Ramchandra Vishvanath Gokhale—receives a pension from the English 37.

Rangrao Shivdeo Odhekar—killed at Kumbheri 8.

S

Sadashiv Mankeshwar—40.

Sadashiv Raghunath Gadre—a Poona Banker—relates his harassment by Peshwa Bajirao Raghunath and asks for monetary help from the Governor 40.

Sadashivrao Bhau—20.

Sadashiv Ram—son of Ramaji Ballal Gune—33.

Sadadshiv Shamraj Raste—36.

Sakhaji Sindia of Loni—helps the English troops against the Peshwa 30.

Santaji Anandrao Sindia of Loni—helps the English troops against the Peshwa 30.

Santajirao Dhaybhar of Sikrapur—his services to Shivaji 34.

Santajirao Manajirao Sindia of Loni—his bravery in the battle of Rakshasbhuvan 30.

Shamji Hari Subhedar of Mawal—11.

Shamrao Ambaji Kirkole—his services and genealogy 39.

Shivaji Chhatrapati—capture of Shirval referred to 11.

Shivrao Shankar Odhekar—his rise and appointment as Diwan to Anandrao Pawar of Dhar recounted 8.

Shripat Bapuji Kirkole—39.

Sonjirao More—killed at Seringapatam 12.

Stuart, Capt.—4.

Subhanrao Sindia of Loni—his bravery in the battle of Rakshasbhuvan 30.

Sultanrao Dhaybhar—34.

T

Tanajirao Dhaybhar—34.

Trimbakji Dengle—2; 11; 15.

Trimbakrao Dabhade Senapati—his defeat and death referred 7, 8.

Trimbak Shivdeo Odhekar—8.

Tukoji Sindia—Ravirao—his rise under Aurangzeb 30.

U

Udaji Pawar—8.

V

Vikramsha of Jawhar—6.
Visaji Ram Gokhale—his services to the Peshwa 37.
Vithal Chintaman Punekar—wounded in the battle of Ashti 35.
Vithal Harbaji Raste—36.
Vyankatrao Bapuji Gune—killed in an action in the Karnatak 33.

V—*contd.*

Vyankatrao Lad—15.

W

Wamanaji Hari Marathe—his services to the Peshwa recounted 38.

Y

Yashwantrao Holkar—attack on Poona referred to 36, 37, 38.
Yashwantrao of Jawhar—6.
Yesaji Hari Ok—18.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

४५

मराठशाहीचा कारभार

[किंमत---२ रुपये ७ आणे किंवा ४ शिलिंग ६ पेन्स]

संपादक---गो. स. सरदेसाई, बी.ए.

गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३४

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि
जबाबदारी सरकारावर नाहीं.)

Selection No. 45

Documents Illustrating Maratha Administration

In this concluding volume are presented papers selected from many different sections of the Peshwas' Daftar with a view to illustrate the various aspects of the Maratha administration in general. In addition is published some useful information that was garnered by the various members of the staff during the four years they spent in examining the Daftar. Some of the information was incorporated in the previous Selections, but there still remained many items of historical value referring to individuals, dates, places and events of various kinds which have now been arranged and presented in this volume. Though more or less disconnected, these details serve to clear up many obscure episodes and will consequently be welcomed by students of history. The contents of this selection are arranged under the following 54 items :—

1–2 Administrative arrangement of the Mawal territory .. .. (p. 1–13)

3 Colonization of the district of Khatav .. (p. 13–21)

4 Sardeshmukhi of Malavdi .. .. (p. 21–23)

5 Departments of Raja Shahu .. .. (p. 23–28)

6 Management of fort—Sinhagad .. .. (p. 28–42)

7 Management of fort—Purandar .. .. (p. 42–70)

8 Budget estimate for the shrine of Baneshwar .. (p. 71–73)

9 A statement of the village accounts of Supa .. (p. 74–76)

10 Military and civil establishments of Sakharam Bapu .. .. (p. 76–79)

11–37 Extracts from the Peshwas' Diaries, 1742–1781 .. (p. 79–108)

38–40 Accounts of Nana Fadnis .. .. (p. 109–115)

41–42 The siege of Pathargad and Etawa, 1772 .. (p. 116–124)

43–44 Heads of cash accounts .. .. .. (p. 124–128)

45–53 Papers dealing with the administration of Justice & Police .. .. .. (p. 128–149)

54 Some historical personages .. .. (p. 150–157)

No. 1]

The following is a list of the Mawals and the villages contained in them, together with the names of the Deshmukhs and the Deshpandes who were appointed to look after the territory. The number of villages and their revenue in hons during the Nizamshahi regime of Malik Ambar are given; these will be useful in studying old revenue arrangements. The paper bears no date but the writing shows that it belongs to Shivaji's time.

[आरंभीचा मजकूर गहाळ.]

समत मुरुबदेऊ अमला[1] फैला
निजामशाही माहाल २

तो वेल्हवडखोर

तो —गुजन मावले

समत * * * आमला फैला
निजामशाही

तो नाने मावल १

तो पोन मावले १

समत कोंढाणा आमला फैला
निजामशाही ता खेडेबारे माहाल १

मामले पाली तो कोरबारसे समत
कोरी किले १

समत रोहिडा आमला फैला
येदीलशाही तो रोहिडखोरे माहाल

येणेप्रमाणे कदीम निजामशाही व येदीलशाही चालत होते. बाजेदे[2] चंदरोज सिवाजी राजे भोसले यानी मुलूक जफत करून सुभे मुलूकगिरीचे केले.

---

१ अमला फैला = ताबा. २ बाजत चंदरोज = कांहीं दिवसानंतर.

सुभा मावले वर घाट

१२ मावले

१ नाने मावल
१ पोन मावल
१ पौडखोर
१ मुठेखोर
१ कानदखोर
१ गुजन मावल
१ वेल्हवड खोर
१ हिरडस मावल
१ रोहिडखोर
१ कोरबारसे
१ खेडेबारे

११

१ ताम्हणखोर

१ प्रा। पुणेपैकी देहे[1] ९६
३६ ता। कर्यात मावल

सुभा जाउली.

१ प्रा। माहाड
१ ता। बिरवाड
१ तु(कु?) डाल
१ नाते
१ विन्हेर

४

सुभा राजपुरी

१ ता। निजामपूर
१ ता। गोरेगाऊ

२

(अपूर्ण)

प्रा। चाकण ऊर्फ इसलमाबाद अज देह ६४

मवजे ६२ कसबे २
का। चाकण का। इंदोरी

येकूण दस्तूर निजामनमुलकी होनू
दर होनास रुपये ३॥। यो

तनखा रुपये

देसमुख कदीम देसपांडिये
सालोखी हाली कडू

१ देह = गांव.

7646

[येथें गांवाच्या नांवाची यादी आहे ती गाळली आहे.]

प्रा सुपे देह ४२

मवजे ४१ — कसबा व पेठ २

का। सुपे — पेठ याकुदपूर

येकूण दस्तूर निजामनमुलकी
होनू दर होनास रु-
पये ३।।। यो तनखा रुपये

देशमुख कदीम कांटे फिल्हाल[1] खान वालाशान सरफराज खान — देशपांडये कदीम मुग्तबोद फिलहाल बुचके

[गावांचीं नांवें गाळलीं.]

कार्याती बारामती देह २२

[गावांचीं नांवें]

कार्याती सासवड देह १०

[गांवांचीं नांवें]

प्रा सिरवल देह ४०

देसमुख निगडे — देसपांडे आंगापूरकर
नाईकवाडी———

सैद मुसलमान तकसिमा ३ येकूण घरे १० — सोनवणी तकसिमा २ घरे २ — पानसारे काले

सेगर धणगेर तकसिमा २ यो घरे २ — नावडकर ता। १ यो। घर १

वाल्हेकर माहार ता। १ यो घरे १ — मुंचाल ता। १ यो घर १

१ फिल्हाल = सध्या.

तनखा रुपये

४००००

मोल[1] सायेर[2] रुपये

३४१८० ५८२०

[गावांचीं नांवें गाळलीं.]

प्रा फलटण देह ८४ वजा

गाव मोडिले ४

१ नेपत पलण १ मिठवडी

१ तो(?)हपूर १ कोथले दहीगाव

कर्यातीखाले गेले.

बाकी देह ८०

यासी देसमुख वे देशकुलकर्णी

देसमुख निबालकर

देशकुलकर्णी कदीम मुक्तबोध बुचक्यासी भाडत असतां हाली बुचके काशेब गोत्री देसकुलकर्णीस मुतसरफ आहेत.

[गावांचीं नांवें गाळलीं.]

तपे नानेमावल देह

८८

येकूण रकम मलिक आंबरी

यैन महसूल खेरीज महसूल

टके टके

३०००० २०००

ता

फुकमात टके सेल बैल

१००० शाहाणा निा ठाणगे

वाटाव निा पोतदार

सरदे(श)मुखी

भाते निा ठाणगे

कदीम देसमुख जंगम देसकुलकर्णी परभू

ता गरतड देसमुख देह

००

---

१ सारा, जमीनमहसूल; २ जकात.

ता। तुला परभू दसपांडे देह	ता। माहादाजी विश्वनाथ पाफिला देसपांडिया देह
२२	२२
[गावांचीं नांवें]	[गावांचीं नावें]
देसाई येवले मौजे आवंढे बु॥ मोकदम व इसापती	सरखोत गायेकवाडी मौजे काबरे मोकदमी व इसापती

ता। दलवी देसमुख देह ४४

ता। हरि त्रिमल खिरा देस-पांडिया देह	ता। कृष्णाजी राम देसपांडिये देह
२२	२२
[गावांचीं नांवें]	[गावांचीं नांवें.]
देसाई कालोखे मोकदमी व इसापती मौजे डोगरगांऊ	सरखोत कडू मौजे कुन्हावडे मोकादमी व इसापती

ता। पोनमावल देह८०

ता। धारे देह ४३	ता। सिंदे ३७
तुगी मावल [गांवें]	तुगीमावल [गांवें]
जवल खोरे [गांवें]	जवलखोरे [गांवें]
वलकी खोरे [गांवें]	वलकीखोरे [गांवें]
पोनमावल [गांवें]	पोनमावल [गांवें]
देसकुलकर्णी सिवणेकर देसाई—	देसकुलकर्णी सिवणेकर देसाई तुपे कढधेकर मोकदमी व इसापती
साठे मौजे साठे साई इसापती व मोकदमी; दुरगे मोकदमी मौजे वेतले	

ता। पौडी खोरे देह ८०

ता। गिन्हरे देह ४०

तावले मुतशरफ देसमुख ढमाले
व देसपांडे परभू

कदीम देसमुख दलवी
अर्जोजी राऊतराऊ व राघोजी
राऊतराऊ ढमाले देसमुख

ता। देसपाडये
विसाजी बाजी मल्हारजी निमे
येकून निमे
बाजी परभू व समेत भाऊबंध देश-
पांडिये
जोसी रायेरकर अत्र गोत्री

[गांवांचीं नांवें]

ता। ताम्हणखोरे कदीम खोडगे
हाली ढमाले देह १२

कदीम देसमुख खोडगे

देसकुलकर्णी फु-
लाजी व रघोजी
जोसी रायेरकर आ-
त्र गोत्री रुगवेदी.

येकूण मलिकअंबरी रक्कम

ताबल मुतशरफ देसमुख ढमाले
व देसपांडिये फुलाजी परभू

[गवांचा तपसिल]

ता। कोरबारसे कदम दलवी हाली
ढमाले देसमुख राघाजी राऊतराऊ

देसकुलकर्णी दिघे वसिस्ट
वसिस्ट गोत्री रुगवेदी देह
२८

जोसी कारकर काशप गोत्री देसाई पाठारे सो मुलापूर
रुगवेदी

[गांवांचीं नांवें]

ता। मुठेखोरे कदीम वांजळे हाली
गंभीरराऊ मारणे देसमुख व देस-
कुलकर्णी कदीम सातपुते हाली
विसाजी व सखोजी परभू देसकुल-
कर्णी देह
१८

जोसी रायेरकर आत्र गोत्री
रुगवेदी

रकम मलिक आंबरी.

[गांवांचीं नांवें]

ता। मोसेखोरे देह
रकम मलिक अंबरी
ता। पासलकर देसमुख

बाजी येसवंतराऊ आठगावकर
[गांवांचीं नांवें]
खेलोजी व धर्मोजीराऊ
[गांवांचीं नांवें]
कृष्णाजी गंगाजी व सिवजी
आबडकर

[गांवांचीं नांवें]

साबाजी येसवंतराऊ
[गांवांचीं नांवें]
विठोजी दादाजी सूर्याराऊ

[गांवांचीं नांवें]

सदरहू पासलकराचा कारभारी
पोलेकर अज वतन मोकदमी
मौजे मोसे बुा

ताा कड जैतजी त्याचा लेक भिकाजी

[गांवांचीं नांवें]

ताा निवगणे चादजी त्याचा लेक बरवाजी

[गांवांचीं नांवें]

ताा कानदखोरे देसमुख मरल
व देशकुलकर्णी परभू देह ३३
कदीम देसमुख गुरव

[गांवांचीं नांवें]

ताा गुंजण मावल देह ८४
हाली कमाविश देह
७९

देसमुख सलेंबकर
किाा घर निमे देह ४०

देसकुलकर्णी मेकूल
भारद्वाज गोत्री

वडील विठोजी हैबत-
राऊ त्याचा लेक संताजी

हैबतराऊ त्यास लेक २
१ महिपतराऊ
१ चंदरराऊ

किाा घरनिमे

बालाजी नाईक * * * * त्याचा लेक नागोजी
नाा त्याचा लेक दत्ताजी नाईक देह ४०

यासी गावगना

ताा भुतोंडे मावल

[गांवांचीं नांवें]

ताा वांगिणी

[गांवांचीं नांवें]

ताा सिवापटण

[गांवांचीं नांवें]

ता। वेल्हवड खोरे देह ३२

देसमुख डोहर

देसपांडे हाली मुतसरफ भारद्वाज गोत्री.

[गांवांचीं नांवें]

ता। खेडेबारे रकम टके ५००००
दर होनास टके १० येकून होनू ५०००
दर होनास रुा ३।।। यो १८७५० यासी तनखा दिा जकाती
रुो २०००० नावनिसी जामिदार

देशमुख कोडे नाईकवाडी

देशपांडिये नऱ्हेकर अत्रगोत्री

[गांवांचीं नांवें]

पा। खटाऊ तजकर कानू
बाजे उजूहाती

ता। बेगारी राबते अडपाला वा चर्मना सालाबाद बेदरी पातसाई असता विजापुरास पातशाई आली. पिडिया ६ ईसफ इसमाईल इभराईम आली इभराईम याणी मोकासा दिला वजीर कारकीर्दी

१ सिलेदार, २ मुगटखान, ३ अडबोजी, ४ येसवतराऊ, ७ मोकरबखान पडिया ३, ८ बाबूरुमीखान, ९ यैनान मुलूक, १० बाबूरुमीखान, ११ फताबीन मुलुक, १२ गालीबखान तारखान, १३ चपू (?) सलबतखान, १४ आमानरू, १५ मोकरबखान खुर्द, १६ बाबीखान, १७ येसवतराऊ, १८ खेराऊ साठे १९ आमानरू तिमाजी, २० नजर बाहादूरखान, २१ देवनाक, २२ वणगोजी, २३ खरोऊ, २४ सलबतखान, २५——, २६ मुधोजी, २७ शाहाजी, २८ आबरखान इतुकिया वजिराच्या कारकीर्दी चालिला.

The regimes of these officials are explained on pages 14 onward.

देसमुख १ खलनाक २ गोखो पा। ४ सेडेलायेनाक ५ हरिजी ६ (चा) पाजी ७ लाखोजी, ८ सूर्याजी ९ हरिजी १० लाखोजी सूर्याजी ११ बाईजी हरिजी १२ चापाजी

इतुकिया देशमुखाचे कारकीर्दी चालली आसती
नफर रा आडपाला वा वैल

वैले[1] तरफ

	अजी	रा	अ
कसबा	४	२	२
कोट * *	३	२	१
पुसेगाव	२	१	१
नेर	३	२	१
इसापूर	३	२	१
खातगाऊ	३	२	१
नारवणगाऊ	३	२	१
नादड	२	१	१
आभेरी	२	१	१
कोकदाले	२	१	१
नायेगाऊ	२	१	१
भोसर	२	१	१
लोणी	२	१	१
वडोर	२	१	१
कुमठे	२	१	१
कुरुली	३	२	१
	४०	२७	१३

खोलील[2] ताा

	अजी	रा	अ
दरूज	४	२	२
वडोज	३	२	१
कातरखटाऊ	३	२	१
येनकूल	२	१	१
पिपरी	२	१	१
नडवाहाळ	२	१	१
बनपुरी	२	१	१
पलसगाऊ	२	१	१
वारपुडी	२	१	१
पेडगाऊ	२	१	१
वाकेस्वर	२	१	१
माडवे	१	१	०
तडवले	१	१	०
हिंगुणे	१	१	०
दालमोडी	१	१	०
डाभेवाडी	१	१	०
येलमरवाडी	१	१	०
	३२	२०	१२

No. 2] +

पाा खटाऊ
वैसावली

तजकरे कानू

वैसावली पाा फलेटणी विलायेती देसमुख हाततट खात होते. दुर्गादेवीच्या दुकला आलेकडे श्रीसके १३१८ वरुसे धातानाम संव-

1 Cultivated. 2 Not-cultivated ?

+ अस्सल कागदांचे लहान लहान तुकडे असून त्यांचा अनुक्रम नीटसा लक्षांत येत नाहीं.

7654

११

छरे पासूनू सक १५७७ मन्मथ-
नाम संवछरे

१ उफाडे ब्राम्हण पूर्वी होते

तिमाजी	गोविंदपंत
हरि क्रुस्णु	जनोपंत

३ त्यावरी चोथे मराठे

हरिजी	माऊजी
होनोजी	मालजी

२ त्यावरी मणेरे मराठे होते

केऊजीराजे	हरिजीराजे
मालजीराजे	देऊजी

४ त्यावरी निबालकर

बाजीराजे	वणगोजी
१	२
हवजीराजे	वणगोजी
थोरले ३	पुत्र४ **
जानोजी अ-	१ बजा(जी)
सकर त्याने	१
देसमुखी घे-	१ मुधोजी
तली आबर-	१ मलजी
खानाचे कार	——
किर्दीसी	४

हाली मुधोजीचे
फर्जंद
१ जगेदेराऊ
१ ———
१ बजा(जी)
———
३

पूर्वी अथर्वेदी याचे देसकुलकर्णे दुर्गादेवींच्या दुकला तागाईत पडिली रोटी रुगेदी खाताती. मिरासी आथर्वेदी. त्यांचे चौरासी ८४ कुलकरर्ण वा जोतीस चालत होते. दुर्गादेवीचे आलेकडे भोगवटा जाहाला नाही पूर्वी वृती आथर्वणाचे बैसती (अपूर्ण)

7655

दर हजारे ८५।॰

सदरहूप्रमाणे कमावीस चालत होती. चौरासी खाटाऊ मोकासा बेदरीहून चालत होता. पा॥ कराड ठाणे हाते. त्यावरी दुर्गादेवीचा दुकाल पडिला. श्रीसके १३१८ वरुसे धातानाम छवछरे तीस वरुसे दडकारर्ण पडिले होते. मुलीकीचे लोक तमाम मेले. विलायेतीस बेरड जाहाले. परगणे खटाऊ भूपतराऊ बेरड त्याणे दुर्ग बाधिले. पुडाई करून तमाम पुडावा विलायेतीस केला. त्यावरी दादो नरसिह अथर्वेदी बेदरासी जाऊनू नेबगैबती[1] करून माहालासी आला. तव बेरड भूपतराऊ त्याणे मुलूक काबीज केला होता, त्यावरी दादो नरसिह त्याणे नामजादी आणऊनू बेरड परगदा केले. बेरडाचे जथे ३ होते वा बालमरी येक हो तेथे दुर्ग बाधोन पुडावा करून आसती. ते परगदा करून बेरड विद्यनगरासी जाऊनू राजासी भेटले तेथे तरवाल जाहाले. सकल नाक कैकाडे पनाला पा॥ मा॥ वा विलायेतीचे बेरड परगदा जाहाले. विलायेती काबीज केली. विलाये[ति]सी बारा सालांचा कौल तमाम विलायेतीस दिला. पा॥ खाटाऊ दुकला आंधी देसमुख हरताळ होते ते दुकले मरोन गेले. गावगणाचे पटेल वा रयेता तमाम मरोन गेलीया मिरासी कोन्ही नाही. देसकुलकर्णी दुकलाकरिता वराड गायेवलासी गेले होते. तो मिरासीस टाकून आला. बेदरासी जाऊनू नैबगोबती करून आला व जुना मिरासी यास जागा नाही. तमाम विलायेती उदवसत व लोक धारूरूहून रवलनाक फडतरा वा गोदले पा॥ लावड रतनसेटी तेली. (अपूर्ण)

(पा॥ खटाऊ) हाक लाजिमा
सुा॥

गाव कुलकर्णी

मौजे वडौज दुर्गादेवीचा दुकला पलकडे अथर्वण ती घरे २५ होती. दुकाल अवरसण पडिले वरुसे १२ ती घरे बुडाली. दुकला आलेकडे इजइदी पैदा जाहाले. मारून मवालेसी आले. त्याचा मूल पुरूस चागोबा. आंबाचे ला(व)णी केली, म्हणऊनू आंबकर नाव पडिले. चांगोबासी पुत्र ३

येक घर मलेवाडी कर्यातीस गेले	येक घर नरसोबाचे वाडीस व्यापार करीत आसती.	केसोबाचे घर वडोजेसी आले. त्याचे पुत्र नामाजी नेमाजी मरोन गेले. केसोबाचे घर बुडाले.

१ नेबगैबत=वरिष्ठाच्या गैरहजिरींत त्याचें काम करणारा दुय्यम अधिकारी.

केसोबा चुल(त) भाऊ मिरजेमधे होता त्याचा पुत्र पिलोबा वडोजेसी आला. त्याचे पुत्र ४

मौजे पलसीस व नासी मलवडीकर आले.
१. नागोजी २ लिंगाजी
३ आबाजी ४ विठोजी

१ गोदोबा २ आतोबा
३ मुरोबा ४ बाळू

हे कुलकर्ण चालवीत आसती पूर्वी अथर्वणाचे कुलकरणें जोतीस रवा केला तरी जितितील.

[पाठीवर इतर मजकूर]

पा। खटाऊ

तजकर कानू
सु।।

No. 3] [*13-9-1686*

पा। खटाऊ
सर सदर

यासी पूर्वे कानू बेदर पातशाही बेदरी पातशा करीत होता ते वख्ती दुर्गादेवीचा दुकळ पडिला श्री शके १३१८ वरुशे धातानाम संवछरे सन ८०६ बारा वरुशे अवर्शण पडिले. मुलूक खराब होऊन मजरा पडिले. वरुशे वीस वसाहाती नव्हती. त्यावरी बेदरीहून पादशाही तुटली इसीफ पातशा विज्यापुरास येऊन तख्ती बैसला श्री शके १३३८ वरुशे दुर्मुखी नाम संवत्छरे सन ८२६ इसीफ पातशाही करू लागला ते वख्ती दादो नरसिह आथर्वेदी विद्यानगरीस गेला होता तो मुलकास अला. मुलूक खराब देखोन मामुरीबदल विज्यापुरास गेला. पातशाहास भेटोन पा। कऱ्हाड तेथील प्रांतीचे मुलुकीचे वसाहती करून मामूर करावे यैसे कबूल करून आले. ते वख्ती कराडाखाली हवेलीपासून ५२ परगणे वोढत होते. त्यानी पा। यास येऊन मोकदम देसमुख व रयता यैसे आणून मुलूकास कौल दिला.

भागस्थल बाब

महसूल

राजभाग मुखोपाप्रमाणे केले करीत होते

राजभाग १ प्रज भाग २

राजभाग लाजिमे

सेख?	सेल
वोसगी?	फकिराणा
तफेरी	वानवला
बावास मुठी	मापारी
खले उगट	कोठार साठवण
चलेकरी	चुबडी

तकट बाा जमावर्क

प्रजभाग लाजिमे

डाके कया सेल पाटी

दिवाणे घ्यावे

येकून बाा वाज केले बाा जमावर्क

यैन माप देाालाजिमे कसर जिनसाना

येणेप्राा कमाविस चालिले कारकीर्दी ३

१ सिलेदार साले २० २ मुगटखान साले १९

३ आडबोजी साले २०

येणे प्राा सदरहू कारकीर्दी चालत होते त्यावरी खाने अजम मुकरबखान वजीर हुकुमतपन्हा त्यासी मुकासा अर्जानी जाहाला. भात भाग कमावीस करीत असतां १२/१९ सालें जाहालीं. पेस्तर ते सालीं सुकवे पडिले. राजभागची बेरीज कमतर दिसोन आली. त्यावरी खान मशारनुलेने देसकासी हुजूर बोलाऊन भागस्थल भातभाग कमाविस दूर करून सिस्त देखिली कडबाण नख्त याती पटिर्या+ ९ येकून बेरीज

नकद

होनू १३४९ खुर्दा टके १८९००

+ पटी=कर.

7658

यैन जिनस

वजन टकबंदी चाली सिरस्ता　　　　सुमार १९४

•|||•　　　　　　　　　　　　　　　ता।

•|||•　घिऊ (?)　　　　　　८८ कांबले

•|• सूत　　　　　　　　　　८९ बंकरे

　　　　　　　　　　　　　२१ सेल बैल

———

१९४

यासी ता। बाबत्रार

जरबाब खाने		सरनोबती होनू	३९
अलाही खुर्दा टके	१८९००	जर बाब कुलकर्णी होनू	७०
सर खेली टके	३२०‿—	कबूलाती होनू	८४०
जर बाब सुभराती टके ८०		पाये पोसी होनू	४००‿—
मोईन　फर्मासी		सेल बैल सुमार सर	२१

वजनी　　काबल ८८

•||• तूप　　बकरे ८९

•|• सूत

———

•|||•

येकून दर चा टके ४० महसूल टके दर चा। टके

अवल मैले[1] हुरे[2] मला १　　　　जिराती दर चात्रे

दरमलेस बिगे　　　　६२०　　टके ९०‿—

आबी ६७ हुरा ६१३

‿—मला १ यासी महसूल नख्त

टके ३०‿—

यैन जिनस

वजन चालिसी　कैली अठसेरी

‿—•||• लसण

६=||• कांदे　‿—‿||• मेथी

———　　　‿—•|• मोहरी

६३　　　　———

　　　　　‿—•|||•

१ मला=Land that is being irrigated.　२ हुरा=Varkas land used for grazing.

काली अवट दस्तास[१] दर टकेस रुका १
प्राा जमा करीत होते.

सदरहू महसूल व नख्तयाती काली आवट तरकारी येणे प्राा कमावीस चालिले.
कारकीर्दी मुकासाई ताा

१ मोकरबखान पिढिया ३ येकून साले ८० —— कारकीर्दी १
२ येसवंतराऊ कोली
३ यैनान मुलूक
४ खाने बाबूराव १
५ बाबू रुमीखान खुर्द १

येणेंप्राा सदरहू कारकीर्दी चालत होते. त्यावरी खाने अजम बाबूरुमीखान याची दौलत काढून खाने आजम फत्यान मुलूक हुकुमत वजीर त्यास मुकासा जाहाला. त्यानी दोनी च्यारी वरीस सदरहूप्राा कमावीस केली. त्यावरी खाने अजम देसकीस तलब करून हुजूर बोलाऊन दस्त अमल पुसिले. त्यानी हजीर केला दस्त अमल खातिरेसी आणून रजा फर्माविले कीं, महसूल व नख्तयाती व काली अवट तरकारी कुलबाब मख्ता दर चावरे बेरीज होनू

मले हुरे जमीन अवल दर चावरे
अबी दर चाा होनु ६० —— हुरा जमीन दर चाा होनु ३०

जिराती दर चाा होनू
तरफ वरील दर चाा होनू २५ तरफ खालील दर चाा होनू १७॥
बरड रामेश्वर उपल दर चाा होनू १२॥

ते वख्ती खुर्दा दर होने टके ६ प्रमाणे होता.

ते वख्ती देसकास बाबे जमा करून दिल्हे. महसूल नख्तयातीपैकी मजुरा देऊन बाकी उरले ते जमा करून घेवे येणेप्राा तह करून कमावीस करीत आसतां ते वख्ती बेलेकटीचे कानू नव्हती. प्रजपटा होता त्याचे खोती कर्दे खोत

नरसो बलाल १ हारि बलाल १

---

१ दस्त=Tax.

सदरहू प्रा कमावीस कारकीर्दी.

१	फत्यान मुलूक	२	गालीबखान तारखान
३	चपू सलाबतखान	४	अमानत खालसा
५	मोकराबखान	६	बहिरीखान निजामशाही
७	येशवंतराऊ कोली		

इतुके कारकीर्दीस सदरहू प्रा चालिले. त्यावरी वजारतमाब रविराऊ साठे त्यासी मुकासा जाहाला. त्याणी सदरहू प्रा च्यारी पांच साले कमावीस केली. खोत प्रजपटी उभामार्गेचा कमावीस करीत असतां बेरीज कमतर येऊ लागली टका वसूल नव्हे म्हणौऊन नफर मजकूर पलोन गेला. त्यावरी हरिजी देसाई व त्रिठल हरि देसकुलकरणी व लखमनाक देसचौगला यास बोलाऊन रजा फर्माविले की जकातीचा खोत पलोन गेला त्या नफरास कौल घेऊन हांजीर करणे. नाही तरी प्रजपटी याची सिस्त करून देणे. त्यावरी खोत मा हाजीर नव्हे. उभामार्ग प्रजपटा त्याची तक्षीम तालुक विलायेती मजकुरी रयता कुलबाब जकाती प्रजपटा सिस्त करून दिली होनू २००.

बाबे जमा दर सदे होनू २॥. देसाई ॥।

देसकुलकर्णी	मोकदम	कुलकर्णी
॥	॥।	॥

त्यावरी तेच वख्ती बेलेपटीचे फर्मान सादर जाहाला. मग बेलेकटी व प्रजपटा दोनी बाबा याची सिस्त चावराणा करून दिली, महसूल नख्तयाती सदरहू खेरीज पटिया २

प्रजपटा १ बेले कटी १

सदरहू पटिया करून घेतलिया त्यास कारकीर्दी चालिले

१	रविराऊ साठे	२	आमानत
३	नजर बाहादूरखान	४	देवनाक बर्गी
५	वणगोर्जी निबालकर	६	रविराऊ लोबटे
७	सलाबतखान कुतुबशाई		

सदरहू इतुके कारकीर्दीस चालिले. त्यावरी खाने अजम अंबरखान त्यास मुकासा आर्जानी+ जाहाले. त्यानी दस्त आमल खातिरेसी आणिला. ते वख्तीं प्रजपटा व बेलेपटी दोनी बाबाची तक्षीम करून घेतली. तेणेप्रा

+ प्राप्त.

कमावीस होत होती. त्यावरी मा। तिमाजी भास्कर पेसवे त्यानी दौलतेचे फर्मान आणिले ते वख्ती देसकास हुजूर बोलाऊन हुकूम फर्मावला की आजी साहेब मोहीमसीर आहेत, तरी मोहीमपटी होनू १५०० पटी करून देणे. त्यावरून पटी करून दिली. येक दोनी साले महसूल नख्तयाती खेरीज पटिया ३ बेलेपटी १ प्रजापटा १ मोहीमपटी १ ऐसे कमावीस चालिले. त्यावरी खाने आजम आंबरखान साहेब स्वारी करून मुलुकास आले. त्यानी दस्त आमल खातिरेसी आणून महसूल नख्तयाती खेरीज पटिया ३ ऐसे दोनी वरिसे कमावीस पाहिली. मग खान साहेबी हुकूम फर्मावला की, महसूल नख्त व बेलेपटी व प्रजपटा व मोहीम पटी येकून कुलबाब जमिनेवरी चावराणा करून देणे म्हणौऊन हुकूम, हुकूमप्रमाणें कुलबाब कुलकानू महसूल नख्त मले हुरे चावराणा बाधोन दिल्हे बिता।

मले हुरे दर चावरे होनू

आबी दर चा। होनू	हुरा दर चा। होनू
१२०‿—	६०

जिराती जमिनेस दर चावरे

३० तरफ वरील
 २५ यैन मा।
 ५ जाजती पटिया

२२॥ ता। खालील
 १७॥ यैन मा।
 ५ जाजती पटिया ३

१५ डोगर रान रामेश्वर दर चा।
 १२॥ यैन मा।
 २॥ जाजती पटिया
 १५

यैन जिनस देखील महसूल नख्तयाती व जाजती पटिया ३ ‿—दो तरकारी कुलबाब कुलकानू खंडिले सदरहूप्रा।

येणे प्रा। जमिनेस धारा बांधोन कुलबाब कुलकानू बांधोन दिल्हे. त्यास कमावीस केली पिढिया ३

१ अंबर अबरखान	१ हुसेनी अंबरखान	२ याकूब अंबरखान
१	१	१

येकूण वरिसे ६० मुकासा खादला व कमावीस सदरहूप्रा। केली आरां (?) गाऊगंना.

7662

[एक बंद गाहाळ.]

येणेप्रमाणे अंबरखान साहेबास मुकासा पिढिया ३ ऐकून साले ६० होता. कमावीस करून मुलूक आबादानी होऊन सदरहू प्रा कमावीस केली. त्यावरी अंबरखान साहेबांचा मुकासा बरतरफ होऊन खानखाना येकलासखान यासी मुकासा जाहाला. त्याचे कारकुनानी १०॥१२ वरुसे बर निसबत अंबरखान याप्रा कमावीस केली. त्यावरी खानखाना येकलासखान त्यावरी दिवाणींचे हाला जाहाली. तो जिवे मारिला. त्यावरी दिवाणे पा मा आमानत फर्माविले. येक वरीस आमानत होते. त्यानीहि पेसजीप्रो कमावीस केली. त्यावरी मागती येकलासखानाचा लेक खवासखान त्यास नावाजून त्याचे मुकासे त्यास दिल्हे. त्याबराबरी पा मा मुकासा जाहाले. ७॥८ वरिसे सदरहू प्रा कमावीस केली. मुलूक मामूर होता. त्यावरी खवासखान साहेबी सेख महमद मुसलमान त्यास सर हवाला देऊन पाठविला. त्याने पंच माहाल दो माण कमावीस करू लागला. पा मास पेसजीचे कमावीस दूर करून आपण कमावीस केली

आल पाणी आबी हुरा दर जिराती दर चा

बि॥०॥= यो ६ सा होन ७९ तरफ वरील ता खालील

४० ३०

रामेश्वर

[20-10-1676

दफात

येणेप्रा धारा बाधोन रयेतांचे माथा बेरीज ठेविली ते रयतेपासून गुरे, ढोरे, वस्तभाव विकून येक वरीस रयतेने जमीन लागली होती तेणेप्रा दिली. दुसरे वरिसी मुलूक खराब पडिले. ७॥९ गाव वसाहाती जुजुबी होती. ते दुसरे वरिसी तेणेप्रा कमावीस केली. मग कुल परगणा व बाजे माहाल दो माण खराब जाहाला. हे खबर हुजूर मालुम जाहाली. त्यावरून त्याचा सर हवाला दूर करून आणिक कारकून पाठऊन विलायेती मामूर करविली, परंतु विलायेतीस गनीम सिवाजी भोसले याचे लस्कर येऊन धावणीया करून रयेतांची गुरे ढोरे नेऊ लागले. त्याकरिता रयेतहि नाहीसी जाहाली. जुजुबी विलायती लागो लागली, त्यास मनास आलेसारिखे पैके घेऊन लागले. यैसे असतां सिवाजी राजे भोसिले यानी स्वारी करून पा मास आले. खवासखान इदलशाई याचे

Muzaffar Khan Gardi—sentenced to death for an attempt on the life of Bhau Saheb 25.

N

Nagojirao Ghatge of Malavdi—4.
Naro Dadaji—54.
Naro Damodar—12.
Naro Khanderao Ghorpade—54.
Naro Mordeo—Potnis to Purandare—54.
Naro Ramchandra Devasthale—54.
Naro Shankar—41.

N—contd.

Naro Trimbak Rajmachikar—congratulated for his bravery at Underi 26.
Naro Tukdeo 54.
Narsingrao Ballal Mandavgane—54.
Narso Moreshwar—envoy from the Raja of Sonda to the Peshwa—54.
Nilkanth Mahadaji Purandare—his marriage 16.
Nilo Keshav Majmudar—54.
Nimbaji Bhaskar—agent of Bajirao II—54.

P

Pandurang Dadaji—54.
Parashuram Ballal—54.
Parsoji Bhonsle Jintikar—5.
Pathargad—siege of 42.
Pilaji Jadhav—12.
Purandar—details of the establishment of 7.

R

Ragho Anandrao Dhotre—54.
Raghoba—birth of a son 29.
Raghoji Karande—26.
Raghoji Rautrao Dhamale Deshmukh—1.
Ragho Malhar Diwanji—54.
Raghopant Godbole—48.
Raghunath Ballal Korde—54.
Raghunath Ganesh Koshe—Peshwa's envoy to the Nizam—54.
Rajaji Thorat—5.
Rajaram Govind Wable—54.
Ramaji Mahadeo Biwalkar—26.
Ramaji Malhar Chitnis—54.
Ramaji Nagesh—father of Appaji Ram, envoy from Haidar—54.
Ramchandra Jadhav—25.
Ramchandra Khanderao—in the service of Vyankatrao Narayan—54.
Ramchandra Malhar *alias* **Ramchandra Baba**—54.
Ramdaspant—20.
Ramgad—captured 14.

R—contd.

Ramraja Chhatrapati—his entry into the city 19.
Ram Shastri—Chief Judge—48.
Ranamastkhan—3.
Rangrao Shivdeo Odhekar—killed in the siege of Kumbheri 54.
Rasalgad—captured 14.
Raybhan Bhonsle—5.
Renako Anaji—54.
Rudraji Khanderao—in the service of Fatesing Bhonsle—54.
Ruhella Khan—3.
Rustumrao Jadhav—5.

S

Sabaji Bhonsle—5.
Sabaji Raut—5.
Sadashiv Ballal Waidya—54.
Sadashiv Chimnaji *alias* **Bhau**—receives dresses from the King 15; attempt on his life 25.
Sadashiv Kanho Jamenis—54.
Sadashiv Keshav Date—48.
Sadashiv Malhar Bawle—in Sindia's service —54.
Sadashiv Naik, Raja of Sondha—16.
Said Lashkar Khan—14.
Said Muhammad—15.
Sakharam Bhagwant Bokil—7; his military charge 10; 13; 25.
Sakho Vithal Nyayadhish—5.
Samsher Bahadur—16.
Santaji Jadhavrao—5.
Santubai Mahadik—daughter of Raja Shahu—54.
Satvoji Jadhav—13.
Sayaji Gaikwad—25.
Shahaji—1.
Shahaji Kate—5.
Shahu Chhatrapati—his allotment of State revenue 5; recovers from illness 12; his ashes sent to Benares 19.
Shaikh Mira—5.
Shamji Govind Takle—54.
Shamji Mahadeo Chitnis—54.

S—contd.

Shankaraji Dattatraya—Peshwa's envoy to the Nizam—54.
Shankaraji Keshav Phadke—30.
Shamraj Kanho Chitnis—54.
Shiubai Gadekar—24.
Shivaji Chhatrapati—his administrative arrangement of the Maval territory 1.
Shivaji Jadhavrao—5.
Shivaram Narayan Thatte—48.
Shivrao Shankar Savanurkar—54.
Shrinivas Narasinha—26.
Sidoji Ghorpade—presented with dresses 16.
Sinhagad, Fort of—details of its establishment 6.
Sultanji Babar—42.
Supa, Pargana of—assignment of its revenue 9.

T

Tarabai—19.
Tatya Deshpande—48.
Trimbakeshwar—shrines—their repairs 25.
Trimbakji Powala—5.
Trimbakrao Parchure—48.
Trimbakrao Shivdeo—41.
Trimbak Vinayak—23.
Tubaji Anant—54.
Tukoji Ingle—5.
Tulaji Angria—7; his captivity 32; 34.

U

Udabai—Malharji Holkar's daughter—35.
Udaji Katkar—5.
Umabai—wife of Sadashivrao Bhau—19.
Underi, island of—captured 26.

V

Venkaji Shivdeo—54.
Visaji Keshav Lele—25.
Visaji Krishna—27.
Vishnu Sadashiv Gadre—his genealogy 54.
Vishvasrao Ballal—his thread investiture ceremony 18.
Vithal Baburao Deshpande of Supa—54.
Vyankatrao Bhagwantrao Chandavarkar—54.
Vyankatrao Krishna Khatavkar—son of Krishnarao Khatavkar—54.
Vyasrao Anant—son of Antaji Mankeshwar—54.
Vyasrao Chintaman Divakar—son of Chinto Krishna—54.

W

Wanagoji Nimbalkar—2.
William Wake—16.

Y

Yadav Prabhu Parasnis—5.
Yadavrao Pralhad—Vakil—54.
Yeklaskhan—3.
Yesaji Krishna Chitnis—54.
Yesaji Malhar Korde—54.

MO-III Bk Ca 24—23

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

अनुक्रमणिका.

		पान
	निवेदन	३
	साधन ग्रंथांची यादी	४
	दप्तराची वर्गवारी व संख्या	५
	प्रास्ताविक माहिती	७
	प्रकरण १.—पेशवेदप्तराचा पूर्वेतिहास.	
१	सन १८१९ मधील पेशवे दप्तर	९
२	इनाम कमिशनची हकीकत	१२
३	इतिहाससंशोधनार्थ पूर्वी झालेले प्रयत्न	१३
४	'हिस्टॉरिकल रेकार्डस् कमिशन'	१६
५	मुंबईसरकारकडून झालेलें इतिहाससंशोधनाचें कार्य, सन १९२९ ते १९३३	१६
	प्रकरण २.—मराठी दप्तराचें सविस्तर वर्णन.	
६	शाहू दप्तर	१९
७	पेशव्यांच्या रोजकीर्दी	२०
८	प्रांत अजमास	२६
९	पागा व पथकें	२७
१०	चिटणिसी दप्तर	२८
११	आंग्रे दप्तर	२९
१२	सातारा महाराज दप्तर	२९
१३	जमाव दप्तर	३२
१४	कर्नाटक व सोलापूर दप्तर	३४
१५	इनाम कमिशन चौकशीचें दप्तर	३५
१६	परत करण्याचे कागद	३५
१७	हाल (ब्रिटिश) अंमलाचे कागद	३७
१८	डेक्कन कमिशनर व एजंट दप्तर	३७
१९	अमानतदारांच्या वह्या	४०
२०	माजी अमलाचे कागद...	४१
२१	जकात व हक्क कमिशन दप्तर	४१

प्रकरण ३.—इंग्रजी दप्तर.

२२	सोळा फेरिस्तें	४२
२३	पुणें रेसिडेन्टाचें दप्तर	४३
२४	रत्नागिरी व कुलाबा फाईलें	४५

प्रकरण ४.—इतिहाससंशोधकांकरितां नियम वगैरे माहिती.

२५	इतिहाससंशोधनाकरतां निवडलेल्या कागदांचे रुमाल.	४६
२६	चिटणिसी कागदांच्या पारसनीस याणीं केलेल्या नकला.	४७
२७	फार्शी कागद व ताम्रपट	४७
२८	संशोधकास मार्गदर्शक सूचना	४९
२९	दप्तर तपासणीचे नियम	५०

प्रकरण ५.

३०	एलिनेशन ऑफिसांत चालणारे कामाबद्दल सर्वसाधारण माहिती.	५१

परिशिष्ट.

१	अभ्यासकाकरितां निवडलेले कागद	५५

निवेदन.

'एलिनेशन ऑफिस, पुणें' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या ऑफिसांत कोणत्या-प्रकारचें दप्तर आहे, ह्याची ही मराठींत मार्गदर्शिका करण्याची परवानगी दिल्याबद्दल—

(१) मुंबई सरकारचे,

(२) मे. डब्ल्यू. डब्ल्यू. स्मार्ट, आय्.सी.एस्., J. P., कमिशनर सो बहादूर, मध्यभाग, पुणें,

(३) मे. एम्. ए. फणसे, बी. ए., माजी रेव्हेन्यू असिस्टंट कमिशनर, मध्यभाग,

(४) मे. हाईम एस्. इसराएल, बी. ए., J. P., रेव्हेन्यू असिस्टंट कमिशनर, मध्यभाग, पुणें.

यांचे मनःपूर्वक आभार मानले पाहिजेत. मूळ पुस्तक 'Hand Book to the Records in the Alienation Office, Poona' ह्या नांवाचे इंग्रजी-मध्यें रा. सा. गो. स. सरदेसाई यानीं प्रसिद्ध केलें आहे. इंग्रजी मार्गदर्शिका तयार करण्याचे कामीं प्रस्तुत भाषांतरकर्त्यांचा रा. सा. सरदेसाई यांना उपयोग झाला. विशेषतः दप्तरांतील विभागांची आकडेवार माहिती पुरविण्याचें काम प्रस्तुत लेखकां-पैकीं रा. गुरुजी याणीं केले. इंग्रजी हँडबुकाचे हें मराठींत भाषांतर आहे असें म्हटलें असतां चालेल. पण मराठींत भाषांतर करतांना इंग्रजींतील कांहीं मजकूर थोडक्यांत आणला आहे व ज्या इंग्रजी मजकुराची मराठी वाचकास गरज नाहीं असें वाटलें तो गाळण्यांत आला आहे; मात्र असें करतांना महत्त्वाचा व जरूर तो भाग त्याचे महत्त्व कमी न होतां राहील याबद्दल खबरदारी घेतली आहे. त्याप्रमाणेंच इंग्रेजी पुस्तकांत असलेल्या आकड्यांच्या व इतर किरकोळ चुका या मार्गदर्शिकेंत दुरुस्त करण्यात आल्या आहेत. तसेंच या ऑफिसमध्यें कोणतीं सरकारी कामें चालतात, कामाची पद्धत कशी आहे व इतर किरकोळ माहितीहि जास्त दिली आहे. अशा प्रकारची 'एलिनेशन रेकॉर्डची' मराठींत मार्गदर्शिका असावी अशी फार दिवस भासत असलेली उणीव आतां भरून येत आहे याबद्दल सर्वास संतोषच वाटेल.

हरि रामचंद्र गुरुजी,
रेकार्ड कीपर, एलिनेशन ऑफिस.

एलिनेशन ऑफिस,
तारीख १ माहे जून सन १९३४.

विश्वनाथ गोविंद दिघे, रीडर,
हिस्टॉरिकल रीसर्च ऑफिस, पुणें.

साधन ग्रंथांची यादी.

1. Selected correspondence on the Poona Daftar, 1856.
2. Colonel Etheridge's Narrative of the Inam Commission, 1873.
3. Note by A. C. Logan, Commissioner, 1905.
4. Report by Mr. A. M. T. Jackson, 1907.
5. Historical Records Commission Proceedings, Volumes 3-13, 1921-31—
   (A) Minutes of meetings in each volume.
   (B) Papers read before the Commission—
      (1) A note on Maratha Historical Records and their publication, by Parasnis, Volume III.
      (2) Maratha Historical Records by Mr. R. K. Randive, Volume VI, January 1924.
      (3) Note on the Peshwa's Records and their historical value with a few extracts from Chitnisi letters, by Parasnis, Volume VII.
      (4) Some notes on the records in the Poona Daftar, by Principal Rawlinson, Volume VII.
6. Introduction to the Peshwa's Diaries by Justice Ranade.
7. Foreword to the selections from the Peshwa's Daftar, by Sir J. Sarkar, Government Central Press, Bombay.
8. Hand-book of the Bombay Records, by A. F. Kindersley.
9. Hand-book to the records of the Government of India, by A. F. M. Abdul Ali.

पुणें दप्तरांत असलेल्या रुमालांची वर्गवारी व संख्या ३४,९७२

मराठी[1]	इंग्रजी	पर्शियन[2]	गुजराती[3]
२७३३२	७४८२	२९	१२९

मराठी दप्तरांत खालीलप्रमाणें विभाग आहेत.

१	शाहु दप्तर १७४९ पर्यंत	५६ रुमाल
२	पेशवे दप्तर १८१८ पर्यंत	८१३० ,,
३	आंग्रे दप्तर १८४० पर्यंत	७६१ ,,
४	सातारा महाराज दप्तर १८१८ ते १८४८ ...	३८६७ ,,
५	जमाव दप्तर	७८६४ ,,
६	कर्नाटक दप्तर	२४६१ ,,
७	सोलापूर दप्तर	८८२ ,,
८	इनाम कमिशन चौकशी	१८८९ ,,
९	ब्रिटिश (हाल) अंमलचे कागद	७५६ ,,
१०	माजी अंमलचे कागद	४०५ ,,
११	हक्क कमिशनचे दप्तर	१०३ ,,
१२	जकातसंबंधीं	१५८ ,,
		२७,३३२.

वरील अनुक्रम नं. २ (पेशवे दप्तर) यांत खालीलप्रमाणें पोटविभाग आहेत :—

१	रोजकीर्द	७८०
२	घडणी	७७१
३	जाबसाली	२९
४	प्रांत अजमास	५२९७
५	पागा	६९४
६	पथके	२६८
७	चिटणिसी	२६७
८	तुटके अपुरे	२४
		८१३०

१. सन १२१४ सालीं छापलेल्या फेरिस्तांत व सन १५०५ सालीं लोगन यांनीं केलेल्या यादी-मध्यें व या यादीमध्यें फरक आहे.

२. याखेरीज 'खाजगी परत करण्याचें दप्तर' म्हणून विभाग आहे. 'त्यांत या लिपीचे आणखी कागद आहेत.

३. याखेरीज जमाव वगैरे विभागांत या लिपीचे आणखी कागद आहेत.

वरील अनुक्रम नं. ९ ब्रिटीश (हाल) अंमलचे कागद यांत खालीलप्रमाण पोटविभाग आहेत:—

१	पैमाश दप्तर	३९६
२	इतिहासाचे कामीं निरुपयोगी	१६
३	डेक्कन कमिशनचें दप्तर	१७१
४	सरदारांचें एजंट दप्तर	६९
५	अमानतदारांच्या वह्या	१०४
		७५६

प्रास्ताविक माहिती.

पुणें येथील 'पेशवेदप्तरा'सारखें महत्त्वाचें व उपयुक्त जुनें दप्तर दुसरीकडे क्वचितच सांपडेल. पेशवाई गेल्यानंतर मे. एलफिन्स्टन सो यांनीं ह्या दप्तराचा बचाव केला व तें सुरक्षित राहणेसाठीं 'डेक्कन कमिशनर' चे स्वाधीन केलें. सन १८२७ मध्यें डेक्कन कमिशनरची जागा कमी झाली व हें दप्तर 'सरदारांचे एजंट' यांचे ताब्यांत गेलें. त्यांचेकडून सन १८४५ मध्यें 'इनाम कमिशन'-कडे आलें व सन १८६३ मध्यें इनामकमिशनची कामगिरी संपल्यावर हल्लींचें 'एलिनेशन ऑफिस' अस्तित्वांत येऊन या ऑफिसकडे हें दप्तर सोंपविण्यांत आलें. सदर दप्तर हल्लींच्या दगडी इमारतींत सन १८९० सालीं आलें. यापूर्वी तें शहरामध्यें नाना फडणवीस यांचे वाड्यांत होतें.

सध्याची इमारत घडीव दगडाची दुमजली आहे. सदर इमारतीमध्यें मोठ्या ८ व लहान ४ खोल्या आहेत. सर्व दप्तर लोखंडी शिड्यावर ठेवलेलें आहे. इमारतीच्या मध्यभागीं ८० फूट उंच असा मनोरा असून त्यावर लोखंडी टाकी आहे, ती नेहमी पाण्यानें भरलेली असते. सदर व्यवस्था आगीच्या प्रतिकारार्थ आहे. 'रेकॉर्डमध्यें' विजेचा अगर साधा दिवा लावण्यास मनाई आहे.

ह्या रेकॉर्डसंबंधीं अशी एक समजूत पसरलेली आहे कीं सदर रेकॉर्डचा बराच भाग वाळवी, कसर वगैरेमुळें नाश पावला आहे व त्याबद्दल वेळींच खबरदारी घेतली नाहीं तर जास्त नुकसान होण्याचा संभव आहे. ही समजूत निराधार आहे. सदर दप्तर ब्रिटिशांच्या ताब्यांत आल्यापासून सर्वभक्षक काळापासून होणाऱ्या स्वाभाविक नाशाखेरीज कोणतेहि प्रकारें दप्तराचा नाश न होईल अशी शक्य ती काळजी घेण्यांत येत आहे.

ह्या ऐतिहासिक संग्रहाची तपशीलवार मार्गदर्शिका असणें जरूर आहे. 'इंडिया ऑफिस रेकॉर्डस'ची ज्याप्रमाणें मे. फॉस्टर यांनीं पद्धतशीर फेरिस्तें व सूचि केली आहे त्याप्रमाणें ह्याहि दप्तरास फेरिस्तें व सूचि असणें जरूर आहे. परंतु दप्तराचा प्रचंड विस्तार व सध्याची बदलण्यास कठीण अशी मांडणी लक्षांत घेतां सर्व विभागांचा समावेश होईल अशी विस्तृत उपयुक्त मार्गदर्शिका तयार करणें अत्यंत जिकीरीचें काम आहे व त्याला अवधीहि भरपूर पाहिजे. सबब या छोट्या मार्गदर्शिकेमध्यें दप्तरांतील पेशवाईकालीन म्हणजे सन १७१३ ते १८१८ या शतकांतील ऐतिहासिक विभागाचीच प्रामुख्यानें चर्चा केली आहे. ह्यापूर्वी ह्या दप्तरासंबंधीं लोगन व जॅकसन यांनीं विचारपरिप्लुत रिपोर्ट लिहिले आहेत.

ते एलिनेशन ऑफिसच्या कामाच्या दृष्टीनें, त्यांत इतिहास-अभ्यासकांस दप्तरा-संबंधीं पाहिजे ती माहिती मिळत नाहीं. ही उणीव अंशतः तरी भरून निघावी या हेतूनें ही मार्गदर्शिका तयार करण्यांत आली आहे. मूळ दप्तर कसें होतें, त्यांत भर कसकशी पडत गेली, वेळोवेळीं ऐतिहासिक संशोधनार्थ काय प्रयत्न झाले व सरकारनें नेमलेल्या इतिहास-संशोधन-कार्यालयानें (Historical Research Office) सन १९२९ ते १९३३ मध्यें काय कामगिरी बजावली याचाच या मार्गदर्शिकेमध्यें प्रामुख्यानें विचार केला आहे.

प्रकरण १ लें.

पूर्वेतिहास.

१ इ. स. १८१९ मधील पेशवे दप्तरः—

पेशव्याबरोबर शेवटची लढाई झाल्यानंतर मराठी राज्य इंग्रजांचे ताब्यांत आलें त्या वेळीं एलफिन्स्टन सा यांनीं आपले असिस्टंट मि. मॅक्लिआड यास नाना फडणवीस यांचे वाड्यामध्यें व शहरांत इतर ठिकाणीं असलेले पेशव्यांचें दप्तर ताब्यांत घेण्यास सांगितलें. त्याप्रमाणें मि. मॅक्लिआड यांनीं दप्तर ताब्यांत घेतलें व गोविंदपंत तात्या दप्तरदार व गणेशपंत पेंडसे यांचेकडे दप्तर तपासून सालवार लावण्याचें काम सोंपविलें. त्या वेळीं तयार केलेली दप्तरांची यादी उपलब्ध आहे व त्यावर तारीख १९ माहे एप्रिल सन १८१९ आहे. पेशवे दप्तराची ही पहिली व महत्त्वाची यादी असल्यामुळें व त्यावरून पेशवेदप्तराचा विस्तार कसा व किती होता हे समजण्यासाठीं ती येथें दिली आहे. सन १८३९ मध्यें अमानतदारांच्या ताब्यांत हें दप्तर दिलें त्या वेळीं पूर्वींचीच व्यवस्था होती. त्यांचे ताब्यांत हें दप्तर सात वर्षें होतें. ह्या मुदतींत त्यांनीं दप्तरांची वर्गवारी, निवड व त्यावर चिठ्ठ्या वगैरे लावण्याचें काम केलें. त्यानंतर मि. गोल्डस्मिड सो यांचे ताब्यांत दप्तर होतें. इनाम कमिशनचे वेळेस सर्व दप्तरांची नवीन व्यवस्था केली व तीच व्यवस्था थोड्या फार प्रमाणांत अद्याप अस्तित्वांत आहे.

नाना फडणवीस यांचे वाड्यांत असलेल्या पेशवे दप्तराची गोविंदराव तात्या दप्तरदार आणि श्रीनिवासराव व गणेशराव पेंडसे यानीं तारीख १९ माहे एप्रिल सन १८१९ ची तयार केलेली यादी:—

रुमाल	साल.
११८	सुा सलासीन दशक (इ. स. १७३० ते १७३९)
२६६	सुा आर्बैनचें दशक (इ. स. १७४० ते १७४९)
४७८	सुा खमसैनचें दशक (इ. स. १७५० ते १७५९)
१८९८	,, सीतैनचें दशक (इ. स. १७६० ते १७६९)

२८३१	सुा सबैनचें दशक (इ. स. १७७० ते १७७९)
२९९१	,, समानीनचें दशक (इ. स. १७८० ते १७८९)
६७२	,, तिसैनचें दशक (इ. स. १७९० तें १७९९)
८,६८१	

३००३	महालवार रुमाल
	२४६२ वाड्याच्या मागील चौकांतील शिड्यांवरील रुमाल
	८० सरंजामबाबत
	२९७ कीर्दीचे
	४४ सालवार हिशोबाचे
	१२० पुढील चौकांतील पेटींतील अदमासें
	३००३

हे रुमाल इ. स. १७९३ नंतरचे आहेत

९७६४	सालवार लावणेचे
२३०	चालू दप्तर सुभेवार लावणेंचे
१७६७८	

९६६७	सदर रुमालांपैकीं खालील रुमाल तपासून त्यांचीं फेरिस्तें तयार केलीं तें :—
	११८ इ. स. १७३० ते १७३९
	२६६ ,, १७४० ते १७४९
	४७८ ,, १७५० ते १७५९
	७५६ ,, १७६० ते १७६९
	९३६ ,, १७७० ते १७७९
	२४६२ मागील चौकांतील

८०	सरंजामाबाबत
५९७	कीर्दीचे
४४	हिशोबी
२३०	चालू दप्तर
५६६७	

१२०११ तपासून फेरिस्तें तयार करणेंचे

११०२ इ. स.	१७६० ते १७६९
१७९५ ,,	१७७० ते १७७९
२५५१ ,,	१७८० ते १७८९
६७९ ,,	१७९० ते १७९९
१२० पेटींतील	
३७९३ सदर	
१९७१ हशम व कोठीबद्दल	
१२०११	

सदर रुमालपैकीं

६२४७ सालवार लावले	
५७६४ ,, लावणेचे	
१२०११	

१७६७८ रुमालपैकीं

११९१४ सालवार फेरिस्त तयार केले	
५७६४ वर्गवार करणेंचे	
१७६७८	

ता. १५ सप्टेंबर १८१९ रोजीं मि. मॅक्लीआड यांनीं दप्तरासंबंधीं रिपोर्ट केला. त्यांत ते लिहितात कीं:—

"नोव्हेंबर १८१७ मध्यें पुणें घेतल्यावर निरनिराळे ठिकाणीं दप्तर सांपडलें, तें फार अव्यवस्थित होतें. परन्तु त्या वेळची एकंदर परिस्थिति विचारांत घेतली असतां इ. स. १७२९ ते १८१७ मध्यें लढाई सुरू होई-

पर्यंतचे सुमारे ८८ वर्षांचें काळाचें दप्तर बरेंच पूर्ण आहे. सदर ८८ सालांतील इ. स. १७५७ ते १७६३ चे सातवर्षांचें दप्तर निजामानें पुण्यावर हल्ला केला त्या वेळीं जाळलें गेलें. ह्या सात वर्षांपूर्वीचे २७ वर्षांचें दप्तर बरेंचअंशीं व्यवस्थित आहे. याचे पुढील सुमारे ३२ वर्षांचे म्हणजे १७९६ मध्यें बाजीराव गादीवर आले त्या वेळपर्यंतचे–विशेषत: १७७४ पासून नाना फडणविसाची कारकीर्द सुरू झाली त्या वेळेपासून–दप्तर जवळ जवळ परिपूर्ण आहे. परंतु रावबाजीच्या २१ वर्षांचे कारकीर्दींतील दप्तर बरेच अंशी अपूर्ण आहे."

वर दिलेल्या दप्तराचे यादीवरून कोणते कागद जळाले हें समजण्यास मार्ग नाहीं. सर्व पेशवे दप्तर जळण्याचेऐवजीं नेमके सातच वर्षांचें दप्तर कां जळावें याबाबतींत कांहीं तरी गैरसमजूत असावी असें वाटतें. ह्या सात वर्षांतील पुष्कळ कागद हल्लीं सांपडतात व ह्या सात वर्षांच्या रोजकीर्दी देखील उपलब्ध आहेत. मि. मॅक्लीआड नंतर ह्या बाबतींत लिहिणारांनीं त्याचेंच अनुकरण केल्यामुळें दृढ झालेली ही गैरसमजूत दूर करणें बरें. दप्तरांत पुष्कळ खिंडारें आहेत खरी, परन्तु ती मि. मॅक्लीआड यांनीं सांगितल्याप्रमाणें इ. स. १७५७ ते १७६३ मधील सात सालची नव्हेत.

२ इनाम-कमिशनची हकीकत:—

'पेशवे दप्तर' म्हणून हल्लीं प्रसिद्ध असलेलें दप्तर हा ब्रिटिश अमदानीचे पूर्वीचा मोडी लिपींतील कागदांचा एक प्रचंड, जुना संग्रह आहे. ह्या दप्तरांत मराठी राज्याचे हिशोब व रजिस्टरें व इंग्रज अंमलदारांनीं जमविलेले गांवाचे व जिल्ह्याचे जुने हिशोब आहेत. ह्यासंबंधीं एलफिस्टन सो म्हणतात कीं—पेशवेदप्तरची माहिती असलेल्या लोकांस त्यांनीं बोलावून आणले व जुनें दप्तर जमा करण्याचे कामीं त्यांची नेमणूक केली. सन १८४३ मध्यें मि. गोल्डस्मिड सो यांचे अध्यक्षतेखालीं दक्षिण महाराष्ट्रांतील इनामांची चौकशी करण्याकरितां एक कमिटी नेमली. ह्याच कमेटीचे पुढें कांहीं दिवसांनीं इनामकमिशनमध्यें रूपांतर झालें व त्यास खानदेश, महाराष्ट्र व दक्षिण महाराष्ट्र भागांतील इनामांची चौकशी करण्याचे अधिकार देण्यांत आले. सन १८५२ च्या ११ व्या आक्टानें सदर इनामकमिशनला सनदशीरपणा प्राप्त होऊन मि. हार्ट 'इनाम कमिशनर' यांस इनामकमिशनचे कामासाठीं लागणारे, सर्व जुने हिशोबी कागद, व्यवस्थित राहणेंसाठीं जेथें जेथें असतील तेथून आणवून आपले ताब्यांत घेण्याबद्दल अधिकार देण्यांत आले. इनामकमिशनचें काम इ. स. १८५७ पर्यंत जोरांत चाललें व पुढें इ. स. १८६३पर्यंत जुजबी चालू होतें. त्यानंतर 'समरी

सेटलमेंट' कायदे पास झाले. हे कायदे म्हणजे सन १८६३ चा २ रा व १८६३ चा ७ वा हे होत. सन १८६३ चा २ रा कायदा ज्या प्रदेशांची सन १८५२ चे ११ व्या कायद्याप्रमाणें चौकशी झाली त्या प्रांताकरितां असून ह्याखेरीज इतर प्रांताकरितां सन १८६३ चा ७ वा कायदा आहे.

इनाम कमिशनचे इ. क. दक्षिण भाग (दक्षिण महाराष्ट्र व सोलापूर) व इ. क. उत्तर भाग (महाराष्ट्र व खानदेश) असे दोन विभाग असून दक्षिण भागाचे मे. गोल्डस्मिड, हार्ट, मॅन्सन व कॅ. गार्डन हे सभासद होते व उत्तर भागाचे कॅ. कौपर मे. डॉडस् व ग्रिफिथ हे सभासद होते. कॅ. कौपर याची सभासद म्हणून प्रथमतः सन १८५१ मध्यें नेमणूक झाली व सन १८६१ मध्यें दोन्ही शाखांचे मुख्याधिकार त्यांस प्राप्त झाले. इनाम कमिशनच्या कामाचे यशाचा बहुतेक वाटा कॅ. कौपर यांच्या मेहनतीस व हुशारीस द्यावा लागेल.

निरनिराळे ठिकाणाहून बहुविध प्रकारच्या जमा केलेल्या दप्तराचें संपूर्ण वर्गीकरण करणें हें फार अवघड काम होतें. मागाहून दप्तरांत बनावट कागद बाहेरून मिसळले जाऊं नयेत म्हणून प्रत्येक कागदावर शिक्के केले आहेत. सदर शिक्के आंकड्यांचे व अक्षरांचे असून ते प्रत्येक दिवशीं बदलून केले आहेत. वर सांगितल्याप्रमाणें इनाम कमिशन स. १८६३ मध्यें बंद झालें व ह्या सालचे २८ आगस्टपासून इनाम कमिशनचें काम त्या वेळचे 'एलिनेशन ऑफीसर' कडे सोपविण्यांत आले. ह्याप्रमाणें इ. स. १८५७ चे बंडाचे काळापर्यंतचें जुनें दप्तर सध्यांचे 'एलिनेशन ऑफिस'करितां बांधलेल्या इमारतींत सन १८९० मध्यें आलें. एकंदर दप्तरांत ३४,९७२ रुमाल आहेत. (२७३३२ मराठी+७४८२ इंग्रजी+२९ पार्शिअन+१२९ गुजराथी) कॅ. कौपर व मे. गार्डन यांनीं इ. स. १८५२ ते १८६० मध्यें दप्तरची जी व्यवस्था केली होती तीच विशेष फरक न होतां अद्याप चालू आहे. यासोबत जोडलेल्या दप्तराच्या वर्गीकरणावरून दप्तराची व्यवस्था कशी आहे व दप्तरांतील कागद पहाणारास कोठें काय पहावें लागेल ह्याचा अंदाज येईल. प्रत्येक विभाग अगर पोट-विभागाचे मराठी छापील फेरिस्त आहे. त्यायोगें या दप्तरांत काम करणारे माहितगारास कागद लवकर सांपडण्यास फार मदत होते. परंतु ऐतिहासिक कामाकरितां कागद सांपडण्यास ह्याचा फारच थोडा उपयोग होतो.

३ इतिहाससंशोधनार्थ पूर्वी केलेले प्रयत्न :—

ऐतिहासिक दृष्ट्या दप्तराची तपासणी करण्याची आवश्यकता इनाम कमिशनच्या वेळेपासून सुचविण्यांत आली व त्यांसंबंधीं अनेक योजनाहि मांडण्यांत आल्या, पण

एक ना अन्य कारणानें यांपैकीं कोणत्याच योजनेस दृश्य फल आलें नाहीं. कै. न्या. रानडे, न्या. तेलंग, तसेंच डॉ. भांडारकर यांचे प्रयत्नामुळें रा. ब. वाड यांनीं दप्तरांतून कांहीं निवडक उतारे काढून ते प्रसिद्ध केले. मि. लोगन इ. स. १९०९ मध्यें कमिशनर, मध्यभाग, असतांना या विषयास पुन्हां चालना मिळाली. त्यांनीं दप्तराचें माहितीचें एक टिप्पण तयार केलें. सदर टिपणामध्यें त्यांनीं खालीलप्रमाणें उद्गार काढले आहेत:—"विचारांतीं मला असें वाटतें कीं, निर-निराळ्या तऱ्हेच्या व निरनिराळ्या ठिकाणांहून जमा केलेल्या हिशोबाच्या कागदा-संबंधीं आतांपर्यंत त्याचे ढोबळ फेरिस्त करण्याशिवाय विचार झालेला दिसत नाहीं. सदर कागदपत्रांचा चिकित्सापूर्वक अभ्यास केल्यास न्या. रानडे यांनीं मराठ-शाहीच्या अंतर्गत कारभारासंबंधीं लिहिलेल्या छोट्या पुस्तकांत ठिकठिकाणीं भर घालतां येईल व इतर ठिकाणीं माहितीचे अभावीं झालेले प्रमाद दुरुस्त करितां येतील." सरकारी ठराव नं. ६०९९ तारीख २७ जुलै १९०९ वरून नेमण्यांत आलेल्या कमेटीनें अशी शिफारस केली कीं सदरहू दप्तराची ऐतिहासिकदृष्ट्या पहाणी व तदनरूप व्यवस्था करण्याकरितां एका अंमलदाराची नेमणूक करावी. परंतु मि. लोगन व सरकार यांनीं सदर दप्तराचें वर्गीकरण व फेरिस्तें करण्याकडेच जास्त भर दिला ऐतिहासिकदृष्ट्या संशोधन करून दप्तरची मांडणी करण्याकडे लक्ष दिलें नाहीं. याचें कारण त्या वेळीं जुन्या कागदपत्रांची उपयुक्तता व ऐतिहासिक महत्त्व जाणण्याइतकी मराठी इतिहाससंशोधनाची प्रगति झाली नव्हती.

ह्या बाबतींत सध्याची मार्गदर्शिका ही एकाअर्थीं मि. लोगन यांनीं केलेल्या महत्त्वाच्या टिपणाची सुधारलेली आवृत्तीच असें म्हणण्यास हरकत नाहीं. सदर टिपण ३० वर्षांपूर्वी केलेलें असल्यामुळें त्यांत आतांपर्यंत झालेल्या फेर-बदलाचा समावेश करणें जरूर होतें. लोगन सोचें टिपण व सदर सूचि ह्यांमध्यें मुख्य फरक हाच कीं टिपण हें निव्वळ दप्तरचे सरकारी कामाकरितां तयार केलें गेलें व मार्गदर्शिकेचा हेतु ऐतिहासिक दृष्ट्या दप्तराचा उपयोग व्हावा हा आहे.

दप्तराची शास्त्रशुद्ध मांडणी करून जिज्ञासूस तें पहातां यावें हा हेतु सरकारच्यापुढें सारखा घोळत होता; पण येवढ्या मोठ्या दप्तराची व्यवस्था लावण्याचें काम अवघड व तसेंच फार खर्चाचें म्हणून लांबणीवर पडत गेलें. सन १८८६ मध्यें पेशव्यांच्या रोजकीर्दीतील महत्त्वाचा भाग छापून काढावा अशा-तऱ्हेची एक योजना मि. रॉबर्टसन यांनीं सरकारपुढें मांडली ती तारीख २२ फेब्रुवारी १८८६ मध्यें मंजूर झाली व रा. ब. गणेश चिमणाजी वाड, एलिनेशन ॲसिस्टंट, यांनीं पेशव्यांची रोजकीर्द व सातारा आणि पुणें दप्तर ह्यांतून सुमारे ३२ खंड

होतील इतके उतारे तयार केले. हे खंड १८९७ मध्यें प्रसिद्धीकरितां डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीकडे देण्यांत आले. त्या सोसायटीनें १३ खंड प्रसिद्ध केले. पैकीं ९ खंड रोजकीर्दीचे, १० वा कैफयतीचा, ११ वा सनदा व पत्रें, १२ वा तह व करारनामे, आणि १३ वा निवाडपत्रासंबंधीं आहे. शेवटचा भाग १९१४ मध्यें छापला व राहिलेले अप्रसिद्ध खंड एकत्र करून रा. पारसनीस यांनीं पेशवे दप्तरांतील सनदापत्रांतील माहिती व निवडक कागदपत्र (सरंजाम याद्या) ह्या मथळ्याखालीं आपल्या मासिकांत प्रसिद्ध केले.

वरीलप्रमाणें जे उतारे प्रसिद्ध झाले तेवढ्यानें सरकारचें समाधान झालें नाहीं. व त्यांनीं २२ मे १९०६ रोजीं प्राच्यविद्याविशारद मि. जॅकसन यांची नेमणूक एलिनेशन ऑफिसांतील दप्तराची तपासणी करून पेशवेदप्तरासंबंधीं जंत्री (Calendar) तयार करण्याचे कामावर केली. त्याप्रो त्यांनीं २९ मे १९०७ रोजीं माहितीपूर्ण व ऐतिहासिकदृष्ट्या संशोधनास उपयोगी अशातऱ्हेचा अहवाल सरकारास सादर केला. त्यावरून अस्सल कागदपत्रावरून मराठ्यांचा इतिहास तयार करण्याकरितां हें दप्तर किती उपयुक्त आहे हें त्यांना पटलें असें दिसतें. सदरहू अहवालांत ते म्हणतात "कीं,–हिंदुस्तानांतील दुसऱ्या कोणत्याहि सरकारापाशीं पुणें दप्तर इतकें महत्त्वाचें व तद्देशीय भाषेंत लिहिलेलें दप्तर नाहीं. हिंदुस्तानच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला हें दप्तर पहातां यावें अशी व्यवस्था करणें हें सरकारचें कर्तव्य आहे असें मी समजतों." सरकारास जसजशी पैशाची व योग्य माणसाची अनुकूलता होईल त्याप्रो १८१८ च्या पूर्वीच्या सर्व कागदपत्रांची जंत्रीच्या रूपानें प्रसिद्धि करावी अशी त्यांनीं सरकारास शिफारस केली. इतिहासाचा अभ्यास करणाराला जंत्रीमधून विशेष कारणाशिवाय अस्सल कागद न पहातां काम भागावें असा जंत्री करण्याचा हेतु होता. ह्यानंतर थोडेच दिवसांत मि. जॅकसन यांचा अमानुष रीतिनें खून झाला नसतां तर त्यांचे प्रयत्न खास सफल झाले असते.

ह्यानंतर महायुद्ध सुरू झालें व हा विषय कांहीं दिवस बाजूस पडला. ह्या काळांत रा. राजवाडे, खरे, पारसनीस इत्यादि संशोधकांनीं ऐतिहासिक महत्त्वाचे कागद खाजगी घराण्यांतून मिळवून ते प्रसिद्ध करून मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनामध्यें मोठीच भर टाकली. याप्रमाणें मराठी इतिहासासंबंधीं सर्व हिंदुस्थानांत विशेषतः निरनिराळ्या विश्वविद्यालयांतून जिज्ञासा उत्पन्न झाली. सन १९११ मध्यें पुणें येथें 'भारत-इतिहास-संशोधन मंडळ' नांवाची संस्था स्थापन झाली. तिनें महाराष्ट्रांत इतिहाससंशोधनाचें कार्य चालू ठेविलें आहे.

४ हिस्टॉरिकल रेकॉर्ड्‌स् कमिशन :—

ह्या झालेल्या सार्वत्रिक जागृतीला हिंदुस्तानांतील इलाख्यांचे प्रमुख शहरीं भरणाऱ्या 'हिस्टॉरिकल रेकॉर्डस् कमिशन'च्या वार्षिक बैठकींमुळें विशेष प्रोत्साहन मिळालें. ह्या बैठकींत पेशवे दप्तरासंबंधीं अनेक वेळां चर्चा झाली. त्यांत प्रसंगोपात्त सर जदुनाथ सरकार, प्रि. रॉलिनसन, रा. ब. पारसनीस, प्रो. पोतदार, तसेंच कमिशनचे इतर कांहीं सभासद प्रामुख्यानें भाग घेत. ह्या वादविवादाचा योग्य तो उपयोग झाला. हिंदुस्तान सरकारनें मुंबई सरकारकडे इतिहासाकरितां पेशवे-दप्तर-संशोधन कार्य सुरू करण्याबद्दल तगादा लावला, त्यामुळें खर्चाच्या रकमेची तरतूद होतांच मुंबई सरकारनें १९२९ मध्यें काम सुरू केले.

४ जानेवारी १९२१ रोजीं 'हिस्टॉरिकल रेकॉर्डस् कमिशन'ची मुंबईस बैठक झाली त्या वेळीं रा. ब. परसनीस यांनीं ह्या दप्तरासंबंधीं महत्त्वाचा व बोधप्रद माहिती असलेला एक लेख वाचला. त्यामध्यें ते लिहितात कीं, "पुण्यांतील पेशवे दप्तर हें मराठी इतिहासास अत्यंत उपयोगी अशा साधनांचें भांडार आहे. हें जाणून या दप्तरांत लॉर्ड रे यांचे कारकीर्दीत न्या. तेलंग व न्या. रानडे यांनीं प्रवेश मिळण्याबद्दल खटपट केली. त्यानंतर डॉ. भांडारकर व न्या. रानडे यांसारख्या सर्वमान्य विद्वानांना मुंबई सरकारनें आपण होऊन कांहीं सवलती दिल्या. न्या. रानडे यानी डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीच्या तर्फे मला विनावेतन काम करण्यास सांगितलें. त्याला मी लागलींच कबुली दिली व दप्तरांतील चिटणिसी कागद पहाण्यास परवानगी मिळाली. ह्या कागदांपैकीं सुमारें १०००० कागद विशेष महत्त्वाचे म्हणून मी निवडले. ह्याखेरीज दप्तरामध्यें ऐतिहासिक माहिती असलेले हजारो कागद आहेत व मुंबई सरकारनें कांहीं खंड छापून प्रसिद्ध केले ही गोष्ट सांगण्यास मला आनंद वाटतो."

५ मुंबई सरकारकडून झालेलें इतिहाससंशोधनाचें कार्य [१९२९ ते ३३]:—

'हिस्टॉरिकल रेकॉर्ड्‌स् कमिशन' व इतर सद्गृहस्थ यांनीं वेळोवेळीं केलेल्या विनंतीप्रो सर्व दप्तरांची संपूर्ण पहाणी करण्याचे मुंबई सरकारनें ठरविलें व त्या कामावर रा. सा. गो. स. सरदेसाई यांची निवड करण्यांत आली. कामास सुरवात जून १९२९ मध्यें झाली व १९३३ मध्यें हें काम समाप्त झालें. एकंदर कामास रुो ४०,००० चे वर खर्च झाला. इतकें मोठें जुनें दप्तर दुसऱ्या कोणत्याहि प्रांतिक सरकाराजवळ नाहीं. त्यामुळें सर्व दप्तराची पाहणी करून पुढें कोणतें धोरण आखावयाचें यासंबंधीं बराच खल होणें साहजिक होतें. दप्तराची तपासणी होण्यापूर्वी हें धोरण ठरविणें अप्रयोजकपणाचें झालें असतें. दप्तरांतील कागदपत्र

तपासतांना दप्तरांतील विभाग, पोटविभाग कोणत्या तत्त्वावर केले आहेत, निर-निराळ्या विभागांत कोणत्या प्रकारचे कागद मिळतात हें लक्षांत येतांच रा. सा. सरदेसाई यांनीं आपलें धोरण निश्चित केलें. दप्तरांतील सर्व रुमालांतील सर्व कागदांची आकडेवार जंत्री किंवा याद करावी अशी एक सूचना होती. प्रत्येक कागदांतील मजकूर सारांशरूपानें येईल अशी ३९००० रुमालांची जंत्री तयार करावयास पन्नासचें संशोधक जन्मभर खपून सुधां हें काम पुरें होणें मुष्किलीचें. जंत्रींत (Calendar) पत्रांतील महत्त्वाचा मजकूर सारांशरूपानें दिलेला असतो व यादींत (Hand-list) नांवनिशीवार त्रोटक गोषवारा मात्र असतो. प्रत्येक कागद साद्यंत छापणें हें फार कष्टाचें व खर्चाचें काम आहे. जंत्रींत आवश्यक व महत्त्वाचा मजकूर वगळला न गेल्यामुळें अभ्यासकाची कुचंबणा होत नाहीं व खर्चाचीहि बचत होते. याबाबत इंग्लंड व वेल्स येथील सार्वजनिक रेकॉर्डसंबंधीं रॉयल कमिशननें असें ठरविलें कीं यादी ही अभ्यासूस अपुरी पडते व जंत्री तयार करणें हें अवघड, खर्चाचें व दीर्घ कालाचें काम आहे. पेशवे दप्तराची यादी तयार करावी म्हणून घोषणा करणाऱ्यांपैकी कोणीहि एवढ्या मोठ्या दप्तराची यादी तयार केल्याचें एकहि उदाहरण दाखल्यादाखल दाखविलें नाहीं. 'इंडिया ऑफिस'मधील हस्तलिखित कागदांचें फेरिस्तच (Catalogue) आहे, यादी अगर जंत्री नाहीं. तरी अशा तऱ्हेची यादी अगर जंत्री तयार केली असती तरी अभ्यासकांस त्यापासून फारसा फायदा झाला नसता; कारण पुण्यास येऊन कचेरीचे वेळमध्यें दप्तर पाहिल्याशिवाय नुसत्या जंत्री अगर यादीवरून त्यांचें समाधान होणें कठीणच आहे. तसेंच मोडी न जाणणाऱ्या इतर प्रांतांतील लोकांस अशा प्रकारची जंत्री, सूचि, अगर हस्तलिखित बोटखत यापासून दृश्य फायदा झाला असतां असें वाटत नाहीं.

सर्वच दप्तराची याद (Hand-list) किंवा जंत्री (Calendar) करणें अव्यव-हार्य ठरल्यावरून रा. सा. सरदेसाई यांनीं दप्तरांतील निवडक पत्रव्यवहार प्रसिद्ध करण्याचें ठरविलें व चिटणिसी दप्तरांतील सुमारे १०००० निवडक पत्रें विषयवार एकत्र करून तीं ४३ भागांत छापलीं. प्रत्येक विभागांतील कागद शक्यतोंवर तारीख-वार लावण्यांत आले आहेत. प्रत्येक कागदाचा सारांश इंग्रजींत पत्राखालींच देऊन प्रत्येक विभागाला छोटीशी इंग्रजी प्रस्तावना जोडली आहे. प्रस्तावनेचा उद्देश पत्रांतील नवीन मुद्द्यांचें विवेचन करण्याचें नसून सामान्य रूपानें नवीन काय माहिती आहे याचे दिग्दर्शन करणें हा होय. तसेंच इतर विभागांची योग्य ती कल्पना येण्यास इतिहाससंशोधन कार्यालयानें सर्व दप्तराची चांचणी केली व तिच्या आधारानें प्रस्तुतची मार्गदर्शिका तयार केली आहे. जमाव, प्रान्त

अजमास, रोजकीर्दी इत्यादि विभागांत कोणत्या प्रकारचे कागद येतात याची स्थूल कल्पना येण्याकरितां त्याचे दोन भागहि (नं. ३१,४९) प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. जमाव, प्रांत अजमास, रोजकीर्दी या कागदांचें स्वरूपच असें आहे कीं, वेगवेगळ्या अभ्यासकांनीं आपल्या विषयास अनुलक्षून दप्तरें पहावीं. सर्वच कागद छापणें खर्चाचें आहे व त्याचा अभ्यासकास फारसा उपयोगहि होणार नाहीं.

प्रकरण २ रें

मराठी दप्तराचें सविस्तर वर्णन.

६ शाहू दप्तर :—

पेशवे दप्तराचा पहिला भाग म्हणजे शाहू दप्तर होय. यांत शाहूराजाचे कारकीर्दीतील (१७०७ ते १७४९) कागद आहेत. बाळाजी विश्वनाथ यास पेशवेपद याच्याच कारकीर्दीत प्राप्त होऊन तें पुढें बाळाजी बाजीरावाच्या कारकिर्दीत वंशपरंपरागत झालें. इतर अष्टप्रधानांच्या बाबतींतहि हें वंशपरंपरेचें तत्त्व हळहळू दृढ होत गेलें. शाहूदप्तरामध्यें ५६ रुमाल आहेत. रा. ब. वाड यांनीं त्याचें चांगलें संशोधन करून त्यांतील निवडक उतारे रोजनिशीच्या १ ल्या भागांत प्रसिद्ध केले, त्यावरून ह्या दप्तरांत कोणकोणते विषय आहेत ह्याची कल्पना येते.

सदर ५६ रुमालांची इतिहाससंशोधन कार्यालयानें पुन्हा तपासणी केली व कांहीं जास्त कागद निवडून काढून प्रसिद्ध केले. शाहू दप्तरांत येणाऱ्या नांवांची छापील सूची एलिनेशन ऑफिसमध्यें आहे; परंतु त्यावरून इतिहासाच्या अभ्यासकास फारशी मदत होत नाहीं. ५६ रुमालांची विषयानुक्रमणिका खालीं दिल्या प्रमाणें आहे :—

८	रोजकिर्दीचे
१	बिनसाली किर्दी
१	वतनें दिल्ह्याची खतावणी
१	इनामाबद्दल खतावणी
१	इनाम व धर्मादाय वगैरेची खतावणी
१	पंतप्रधान, सचिव व प्रतिनिधी
१	कारखानीस, सेनाकर्ते, सेनाखासखेल व पागाबद्दल
१	राजाज्ञा, पंडितराव, सुमंत, न्यायाधीश, मंत्री, पंतअमात्य व शिर्के.
२	फत्तेसिंग भोंसले
१	हशम लोकांबद्दल
६	लष्कर, सरलष्कर व दिमतीचे लोकांबद्दल
१	सेनाकर्ते यांजबद्दल
१०	देहझाड्यांचे—पुणें, सातारा, नगर, कोंकण, मावळ, विजापूर, खानदेश, वऱ्हाड, गुजराथ वगैरे
१	किल्यानिहाय

२ खाजगीबद्दल
३ सनदपत्रांच्या याद्या व सनदांच्या नकला वगैरे
१ पोतासंबंधीं
३ जमाखर्चाच्या खतावण्या.
१ महाराज व आईसाहेब महाराज यांस आलेलीं पत्रें व किरकोळ कागद
६ किरकोळ जाबसालीं वगैरे कागद
१ पत्रें लिहिण्याच्या यादी व गांवचे हिशेब
१ अष्टप्रधानाबद्दल हकीकतीचे तक्ते

५६

हें दप्तर जरी लहान आहे तत्रापि ऐतिहासिक महत्त्वाची पुष्कळ माहिती ह्यांत आहे व बहुतेक उपयुक्त माहिती प्रसिद्ध झाली आहे.

७ पेशव्यांच्या रोजकीर्दी :—

१८१९ मध्यें पेशवे दप्तर म्हणून हातीं आलेल्या दप्तरांसंबंधीं माहिती वर आली आहे त्याचे पोट-विभाग खालीं दिल्याप्रो आहेत :—

१	रोजकीर्दी	७८०
१	घडणी	७७१
३	जाबसाली	२९
४	प्रांत अदमास	५२९७
५	पागा	६९४
६	पथके	२६८
७	चिटणिसी कागद	२६७
८	तुटके कागद	२४
		८१३०

पहिल्या पोट-विभागांत रोजकीर्दी असून त्यांना पेशव्यांच्या रोजकीर्दी म्हणतात. हें दप्तर व ह्याचाच घडणी म्हणून जो भाग आहे तो, हे दोन्ही ऐतिहासिक दृष्टया फार महत्त्वाचे आहेत. ह्या रुमालांना 'डायरी' असें म्हणण्यांत येतें. ही संज्ञा अन्वर्थक नसून रोजकीर्दीचे इंग्रजी भाषांतर दिसतें. ह्या रोजकीर्दीत फक्त पैशाचाच जमाखर्च नसून इतर बाबींसंबंधीं पेशव्यांच्या खुद्द हातून किंवा त्यांचे मुतालिकामार्फत रोजच्या झालेल्या व्यवहाराची ही नोंद आहे. प्रत्येक दिवसाच्या आरंभी 'राजमंडळ रोजकीर्द स्वारी पंतप्रधान' असा मथळा आहे.

ह्याचा अर्थ राजदरबारांतील मुख्य प्रधान यांचेकरवी झालेली रोजची देवघेव असा होय. छत्रपतींच्या इतर प्रधानांच्याहि ह्याचप्रमाणें रोजकीर्दी असतील पण त्या ह्या दप्तरांत नाहींत; प्रतिनिधीच्या रोजकिर्दीचे मात्र अशा तऱ्हेचे कांहीं रुमाल उपलब्ध आहेत. पेशवे रोजकीर्दीचे रुमाल सन १७१९ ते १८१७ म्हणजे ९८ वर्षांचे आहेत. सदर दप्तरांत पेशव्यांच्या हातून झालेल्या पैशाच्या प्रत्येक व्यवहाराची नोंद आहे असे कोणीं समजूं नये. ह्याप्रमाणें आणखी निरनिराळ्या रोजकीर्दी असण्याचा संभव आहे पण त्या कोठें आहेत हे कळण्यास मार्ग नाहीं. पेशवाईनंतर ब्रिटिशांच्या ताब्यांत राज्य आलें त्या वेळीं जें कांहीं दप्तर जमा करण्यांत आलें त्याची तपासणी करून इनाम कमिशनच्या वेळीं तें व्यवस्थित लावलें गेलें. दप्तरांची मूळ मांडणी कायम राहिली नाहीं, त्यामुळें पूर्वी कशी व्यवस्था होती हें कळण्यास मार्ग नाहीं. रोजकीर्दीतील जमेचे व खर्चाचे बंद सरकारी कामाचे सोयीसाठीं निरनिराळे करण्यांत आले आहेत. पेशव्यांनीं दिलेल्या इनाम जमिनीच्या सनदांची ज्यांत नोंद आहे असा दफाता म्हणून भाग जमेच्या बंदांत आहे. ह्याचा उपयोग इनाम कमिशनचे वेळीं एकादी सनद खरी अगर बनावट आहे हें ठरविण्याचे कामीं फार झाला. रा. ब. वाडांनीं प्रसिद्ध केलेल्या विभागांत ह्या दफात्याचे बरेच उतारे प्रसिद्ध झाले आहेत.

जमेचे व खर्चाचे बंद निराळे केल्याबद्दल दोन शब्द सांगितले पाहिजेत. मि. गोल्डस्मिड यांनीं प्रथमतः या प्रचंड दप्तराचे महत्त्वाचा व बिनमहत्त्वाचा असे दोन विभाग संदर्भाचे सोयीसाठीं पाडण्याचें सुचविलें. ह्याबाबत गोल्डस्मिड लिहितो,— "विभक्तीकरणाची विशेष जरूर जर कोणत्या भागाकरतां असेल तर तो रोजकिर्दी व घडणी होय. पेशव्यांचे रोजकीर्दीचे पोता, खासुदगी आणि दफाता असे तीन भाग आहेत. ह्यांपैकीं कोणतेहि दोन एका कागदावर नाहींत; पण एका दिवसांत झालेला व्यवहार मात्र एके ठिकाणीं आहे. पोता ह्याचे जमा व खर्च असे दोन पोट-विभाग आहेत व ते निरनिराळ्या कागदावर आहेत. जमेच्या भागांत इनाम दिल्याचा, खालसा केल्याचा व परगणें मक्त्यानें दिल्याचा उल्लेख असल्यामुळें हा भाग फार महत्त्वाचा आहे. खर्चाचे भागांत तिजोरींतून भोजन, कापडचोपड, वस्त्र, कागद, धर्मादाय, हुजरातचें देणें इत्यादि खर्चाची तपशीलवार माहिती असल्यामुळें ते फार महत्त्वाचे नाहींत.

"खासुदगी विभागांत सरकारनें कर्ज वारण्याकरितां, नोकरवर्गाचे तैनातीकरितां, निरनिराळ्या संस्थानिकांकडून, तद्देशीय अंमलदारांकडून, अगर इतरांकडून येणाऱ्या सरकारी वसुलाबाबत दिलेल्या वरातांची नोंद आहे. पोता विभागांतील जमेच्या भागाचा ज्याप्रमाणें संदर्भाचे सोयीसाठीं उपयोग होतो त्याप्रमाणें ह्या भागाचाहि होतो.

"रोजकीर्दीच्या ज्या भागांत इनाम देणें, खालसा करणें, गांव प्रांत यांचे मक्ते देणें, वसुली कामगारांच्या नेमणुका करणें वगैरेची नोंद असते त्यांस दफाता असें म्हणतात.

"खर्चाचे बंद हा रोजकीर्दीतील ⅔ भाग गैरमहत्त्वाचा होय व हा निराळ्या बंदावर असल्यामुळें तो निराळा करून बाजूस ठेवणें सोईचें आहे. त्यायोगें संदर्भ पाहाण्याचें काम सोईचें होतें.

"चढणी म्हणजे रोजकीर्दीतील निरनिराळ्या मथळ्याखालीं आलेल्या भागाचें वर्गीकरण अथवा खातेउतारा होय."

वर सुचविल्याप्रो कामाचे अगर संदर्भाचे सोयीसाठीं मूळ व्यवस्था मोडून जमेचे व खर्चाचें बंद कायमचे निराळे करण्यांत आले. त्यायोगें एखाद्या गोष्टीची तारीख, मथळा, जागा ह्यांसंबंधीं नक्की माहिती समजणें अवघड झालें.

सध्यां जरी जमेचे कागद स्वतंत्र लावले आहेत तरी इतिहासाच्या अभ्यासकाला थोडेसे कष्टानें जमेचे व खर्चाचें बंद एकत्र करून संशोधन करितां येईल. कांहीं वेळा रोजकीर्दीच्या एका रुमालांत कित्येक दिवसांचा व महिन्यांचा व्यवहार नोंदलेला सांपडतो, तर कित्येक वेळेला लग्नसमारंभ किंवा कामगारवर्गाचें देणें असा एकच मोठा व्यवहार पुरता मांडावयास अनेक रुमाल लागतात.

रोजकीर्दीचे ७८० रुमालांची ढोबळ मानानें खालीलप्रो वर्गवारी आहे:—

(१) १८७ रुमाल—(१ ते १८७) पेशवे व त्यांचे कांहीं सरदारांचे जमेचे बंद.

(२) ७६ रुमाल—(१८८ ते २६३) पुष्कळसे सरदारांचे व कांहीं पेशव्यांचे जमेचे बंद.

(३) २७९ रुमाल—(२६४ ते ५४२) नं. १ संबंधीं खर्चाचे बंद.

(४) २३८ रुमाल—(५४३ ते ७८०) नं २ संबंधीं खर्चाचे बंद.

———

७८०

नं. १ मधील १८७ जमेचे रुमाल व नं. ३ मधील २७९ खर्चाचे रुमाल यांचें नांववार फेरिस्त नाहीं; पण नं. २ मधील जमेचे व नं. ४ मधील खर्चाचे बंदाचे नांववार फेरिस्तें आहेत, तीं खालीलप्रमाणें:—

नं. २ मधील नांववार यादी—

१.	स्वारी	हरि बल्लाळ फडके	५ रुमाल
२.	,,	चिंतामण पांडुरंग	६ ,,
३.	,,	रामचंद्र गणेश कानडे	९ ,,
४.	,,	गंगाबाई	२ ,,
५.	,,	त्रिंबक विश्वनाथ पेठे	२ ,,
६.	,,	गोपाळ गोविंद पटवर्धन	१ ,,
७.	,,	गणेश विश्वनाथ बेहेरे	५ ,,
८.	,,	महादजी अनंत बेहेरे	१ ,,
९.	,,	हरिराव पांडुरंग, पांडुरंग व केशो गोविंद ...	१ ,,
१०.	,,	रघुनाथराव दादा, आनंदवल्ली ...	२ ,,
११.	,,	किरकोळ निरनिराळे सालचे ...	१६ ,,
१२.	,,	बाजीराव रघुनाथ यांचे खाजगी हिशोब ...	१८ ,,
१३.	,,	मोघम पेशवे यांचे	८ ,,
			— रुमाल ७६

वर दिलेले दुसरे बाजीराव यांचे अठरा रुमालांपैकीं १० रुमाल त्यांचे स्वत:चे हस्ताक्षराचे व सोनेरी, रुपेरी वर्ख लावलेल्या कागदावर लिहिलेले आहेत; व राहिलेले ८ रुमाल हे त्यांच्या रोजकीर्दीच्या नकला आहेत. हिशोबाच्या पहिले १० रुमालांत कांहीं गूढार्थक नोंदी आहेत. त्यांतील कांहीं उतारे भाग नं. २२ पानें १४५ ते १५९, यांत छापल्या आहेत व त्याच भागाचे प्रारंभीं एकाचें छायाचित्र दिलें आहे.

चौथ्या विभागांतील २३८ रुमालांचें खालीलप्रमाणें वर्गीकरण आहे:—

३. पांडुरंग गोविंद व विसाजी कृष्ण.
२५. हरि बल्लाळ फडके.
२१. गणेश विश्वनाथ.
१९. त्रिंबकराव विश्वनाथ.
२६. रामचंद्र गणेश कानडे.
९९. खुद्द पेशवे व त्यांचे स्वारीबद्दल.
३४. चिंतामण पांडुरंग पटवर्धन.

१. कृष्णराव बळवंत मेहेंदळे व जनार्दन अप्पाजी.
१. जनार्दन व नारो अप्पाजी.
१. विनायकराव बापू व अमृतराव.
१. परशराम रामचंद्र पटवर्धन.
१. गोपाळराव गोविंद पटवर्धन.
१. सदाशिव चिमणाजी व रामचंद्र गणेश.
१. महादजी अनंत बेहेरे.
१. केसो गोविंद.
१. रूपराम चौधरी गार्दी.
२. चिंतामणराव पांडुरंग पटवर्धन.

२३८.

ह्या वर्गीकरणाचा अभ्यासकास फारसा उपयोग होत नाहीं. याची खरी मदत सरकारी कामाकरितां कागद लवकर सांपडण्यास होते. रा. ब. वाड यांनीं प्रसिद्ध केलेले रोजकीर्दीचे ९ भाग जमेच्या बंदापैकीं आहेत. शेवटचे ३ भाग म्हणजे रोजकिर्दीचे रु. नं. १८८ ते ७८० त्यांनीं पाहिलेले दिसत नाहींत. सबब फक्त जमेच्या बंदांतून निवडलेले नमुनेदार वेंचें म्हणून वाडांचे भाग समजले पाहिजेत.

ह्या कागदांत पैशाचे व्यवहार असून शिवाय वराता, हुंड्या वगैरेची नोंद आहे. दागिने, पोशाख, घोडे, हत्ती, फळफळावळ इत्यादि पेशव्यांस आलेल्या नजराण्यांच्याहि नोंदी आहेत. शिवाय रणांगणांत गाजविलेल्या शौर्याबद्दल दिलेलीं बक्षिसें, जखमी लोकांस औषधें, लढाईत मरण पावलेल्या लोकांचे वारसाच्याहि तरतुदी, पीलखाना वगैरेच्याहि नोंदी आहेत. जय मिळाला असतां, सणाचे दिवशीं अगर दरबारचे वेळीं आलेल्या नजराण्यांची नांववार नोंद केलेली आहे. महत्त्वाच्या प्रसंगाचा नक्की काळ कोणता हें ठरविण्यास, तसेंच निरनिराळ्या प्रसिद्ध व्यक्तींच्या मुक्कामांचीं स्थळें निश्चित करण्यास ह्याचा अभ्यासकास फार उपयोगी होईल. लग्नासारख्या सामाजिक विषयाचें तपशीलवार वर्णन यांत आहे. उदाहरणार्थ—मस्तानीचा मुलगा समशेरबहादर याला मुलगी कोणी दिली याची माहिती या रोजकीर्दींत लग्न तारीख काढली कीं सांपडते. पेशवे दप्तरांतील निवडक कागदपत्र नंबर २२ च्या भागामध्यें याची नीट कल्पना येण्याकरितां कांहीं उतारे दिले आहेत. तसेंच पहिले माधवराव यांनीं आज्ञा केल्याप्रमाणें रामचंद्र गणेश याच्या हुकमतीखालीं सन १७६९-७३ मध्यें उत्तर हिंदुस्तानांत झालेल्या स्वारीचे तपशील उदाहरणा-

दाखल भाग २९ मध्यें दिले आहेत. तथापि ह्याप्रो सविस्तर तपशील पेशव्यांच्या सर्व महत्त्वाच्या स्वाऱ्यांचे सांपडत नाहींत. पेशव्यांनीं स्वतः केलेल्या हालचाली अगर त्यांच्या हुकमानें झालेल्या निरनिराळ्या सेनानींच्या हालचाली याचाहि खुलासा पुष्कळ ठिकाणीं होत नाहीं. ह्या किर्दींत, अंबाजी त्रिंबक व त्याचा मुलगा महादाजी अंबाजी पुरंदरे, त्रिंबकराव पेठे व हरिपंत फडके याजसारख्या विश्वासु सेनापतींच्या दिमतीखालीं निरनिराळ्या वेळीं झालेल्या स्वाऱ्यांचे सविस्तर हिशोब आहेत, पण महादजी शिंदे अगर मल्हारराव होळकर यांच्या स्वारीचा उल्लेख कोठेंहि नाहीं. कदाचित पेशव्यानें पुण्याहून नेमून दिलेल्या सेनानींच्या हुकमानें त्यांच्या हालचाली होत असाव्या. सन १७५८-५९ मधील दत्ताजी शिंदे यांच्या दिल्लीच्या स्वारीचे अथवा सन १७६०-६१ मध्यें सदाशिवराव भाऊच्या पानपतच्या मोहिमेचा उल्लेख व वर्णन असलेले रुमाल नाहींत, परंतु रघुनाथराव यांनीं केलेल्या आरंभींच्या स्वाऱ्या, सन १७६०-६१ मध्यें पेशवे नानासाहेब यांनीं केलेल्या उत्तरेकडील स्वारी, यांचे उल्लेख आढळतात. कित्येक महत्त्वाच्या बाबींचे तपशीलवार उल्लेख आहेत, पण खुद्द शनिवारवाड्या-संबंधीं एकहि महत्त्वाची नोंद नाहीं. तसेंच पुण्यांत व पुण्याबाहेर झालेल्या व्यवहारांत कसा काय फरक करण्यांत येत असे याचा बोध होत नाहीं. पुण्यांत व पुण्याबाहेर झालेल्या व्यवहाराच्या खात्रीनें निरनिराळ्या किर्दी असल्याच पाहिजेत. ह्या रोजकीर्दीसंबंधीं जॅकसननें प्रदर्शित केलेलें मत मननीय आहे. तो म्हणतो की, "जमेपेक्षां खर्चाच्या स्वरूपावरून एकाद्या सरकाराची नीट कल्पना येते. एखादे सरकार सुधारलेले अगर रानटी आहे, प्रगमनशील आहे अगर पुराणमतवादी आहे हें तिजोरींत आलेला पैसा सरकार कोणत्या कारणीं लावतें ह्यावरून ठरवावयाचें असतें. ह्या रोजकीर्दीवरून इतर धार्मिक, सामाजिक, आर्थिक वगैरे बाबीवरही प्रकाश पडतो." हें दप्तर चालू उपयोगाचे असल्यामुळें अभ्यासकास कचेरींत बसूनच त्याचा श्रमपूर्वक अभ्यास केला पाहिजे व काढलेले कागद जागच्याजागीं नीट ठेवावे लागतील.

'घडणी' दप्तराच्या पुरवणी भागामध्यें रोजकीर्दींतील जमेच्या व खर्चाच्या नोंदी नांववार दाखल केलेल्या आहेत. सुप्रसिद्ध व्यक्ती, सरदार घराणीं, त्यांच्या सरंजामांत वेळोवेळीं सरकारांतून होणारे फेरबदल याची माहिती या ठिकाणीं एकत्र आल्यामुळें हा भाग अभ्यासकास चांगलाच उपयोगी पडेल व यांत येणाऱ्या सरंजामदारांच्या नांवावरून त्यांच्या वंशावळी तयार करितां येतील.

ह्या ७७१ रुमालांचे शेवटीं २९ रुमाल जाबसालीं म्हणून होते. त्यांतील कागद चिटणिसी दप्तराप्रो असल्यामुळें ते निवडून काढून वर्गवारी

करून नवीन चिटणिसी दप्तरांत त्यांचा समावेश केला आहे. ह्यापैकीं बरेंच कागद नवीन छापलेल्या भागांत प्रसिद्ध करण्यांत आले.

८ प्रांत अजमास–५२९७ रुमाल :—

पेशवे दप्तराचा हा एक मोठा भाग आहे. ह्यांतील कागद जमाव (ह्याचें वर्णन पुढें दिलें आहे) दप्तरासारखे आहेत. प्रांत अजमास या नांवावरून कागदांची साधारण कल्पना येईल. प्रांतवार होणाऱ्या वसुलाचा अंदाज यांत आहे. तुळशी-बागवाले व सुप्याचे सुभेदार यांचेकडील दप्तराची ह्यांत भर पडल्यामुळें दप्तराचा विस्तार मोठा झाला आहे. ह्याचे खालील प्रांत विभाग आहेत:—

जिल्हा पुणें	५८३
,, खानदेश	२४५
,, सातारा	४७१
,, नगर	५०६
उत्तर कोंकण	२०१५
दक्षिण कोंकण	९६९
गुजराथ	११६
मोगलाई	१८७
हिंदुस्तान	२०५
एकूण	५२९७

यामध्यें कर्नाटक व सोलापूर यांचा समावेश नाहीं. त्याचें निराळें वर्णन पुढें दिलें आहे.

ह्या दप्तराची बारकाईनें तपासणी करण्यास वेळ नसल्यामुळें याची थोडीशी चाचणी केली. मराठशाहीच्या वेळीं गांव, तर्फ, प्रांत, किल्ले व देवस्थान वगैरेची कशी व्यवस्था होती याची कल्पना येण्यासाठीं पुरंदर व सिंहगड किल्ल्याचे व बनेश्वर देवस्थानचे तपशीलवार व साद्यंत अजमास पे. द. नि. का. च्या ४५ व्या भागामध्यें प्रसिद्ध केले आहेत. तसेंच त्या काळची ग्राम-व्यवस्था व १८ कारखानें कसे होते हें समजण्यासाठीं या विभागांतील तेहि कागद प्रसिद्ध केले आहेत. ह्याच्या योगें पेशवाईकालीन पुष्कळ गोष्टींवर प्रकाश पडतो. एकंदर इमारती, किल्ल्यांची दुरुस्ती, कामगारांचें वेतन, दारुगोळा, धान्यसामुग्रीचा सांठा, कैदी व त्यांचे पोटगी वगैरेचा खर्च, जमा कोठून आली, खर्च कोणत्या रीतिनें झाला याची यावरून चांगलीच कल्पना येते.

तसेंच मुलकी कारभार, जमा व खर्च, कर व त्यांची वसुली, इमारती व त्यांची दुरुस्ती याची व्यवस्था कशी चाले हें गांवांचे व प्रांतांचे कागदावरून स्पष्ट होतें.

प्रांत अजमास ह्या विभागांतील कागद बहुतेक हिशोबी आहेत. त्याचा काळजीपूर्वक अभ्यास करणाराला मराठशाहींतील बरीच माहिती मिळते. ह्यांत येणाऱ्या माहितीवरून गांवाची व देशाची स्थिति व सरकारच्या आर्थिक परिस्थितीचा अजमास येईल. जमावदतराप्रो यांतही क्वचित सनदा, महजर, निवाडे वगैरे सांपडतात. जमावदतराचे व याचे कागद एकाच प्रकारचे आहेत. प्रांत अजमास हे पेशव्यांचें दतर होय व जमावदतर इनाम कमिशनचे वेळीं प्रांताचे अधिकारी, व देशमुख देशपांडे या लोकांकडून जमा केलेलें आहे. रा. ब. वाड यांनीं प्रसिद्ध केलेले भाग पाहतां हें दतर त्यांनीं पाहिलेलें दिसत नाहीं.

हिंदुस्तानच्या प्रांत अजमासाचे २०५ रुमाल आहेत. त्यांत उत्तर हिंदुस्थानांत मराठी राज्याचे विशेषत: पेशव्याचे अमलाखालील प्रांतांचे व गांवांचे कागद आहेत. त्यांतील रुमाल प्रांतवार व प्रसिद्ध व्यक्तींच्या नांववार लावले आहेत. ह्या रुमालांत खालील तपशील मिळतो:—(१) ताळेबंद (२) खंडणी (३) अजमास (४) घडणी(५) गांववार बेहेडे (६) सन १७२० ते १८१० रोजकीर्दीच्या नकला. यांत उ. हिंदुस्थानांतील खालील प्रांतांचा मुख्यत: उल्लेख आहे–(१) ओच्छां (२) दुआब (३) भांडेर (४) रेवामुकुंदपुर (५) खिलचीवाडा (६) झांशी (७) गढामंडळ (८) दातिया (९) सिरोज (१०) मकडाई (११) कोटा (१२) गणोर (१३) कुरुक्षेत्र. तसेंच शिंदे, होळकर, पवार, सुरजमल जाट व रजपूत संस्थानें ह्यांच्या मुलखाचा अनेक ठिकाणीं उल्लेख आहे. पेशव्यांच्या रोजकीर्दींत उत्तरेकडे वावरणाऱ्या अंताजी माणकेश्वर, हिंगणेबंधु, बळवंतराव धोंडदेव, शिंदे, होळकर, नारोशंकर, विश्वासराव लक्ष्मण, सदाशिव रामचंद्र इत्यादि प्रमुख सरदारांचींहि नांवें आढळतात. शेवटचे नं. २०१ तें २०५ रुमालांत रोजकीर्दींतील सन १७२०, १७३०, १७४०, १७५०, १७६०, १७७०, १७८०, १७९०, १८०० व १८१० ह्या सालांतील रोजकीर्दींत आलेल्या दफात्यांच्या नकला आहेत.

९ पागा व पथके लष्कर (६९४+२६८):—

पागा दतर हें पेशवे दतराचाच एक पोट-विभाग आहे. ह्याचे ६९४ रुमाल असून ते कांहीं सालापुरतेंच आहेत. घोडदळ व पागा याबाबत पेशवे सरकारांतून झालेल्या खर्चाचे हिशोब यांत आहेत. घोडे सरकारी मत्ता असून ते अंमलदाराच्या दिमत दिलेले असत व ह्या खात्याच्या खर्चाकरितां जमीन तोडून

दिलेली असे. ह्यांत घोड्याची रोजची चंदी वैरण त्याचा लवाजमा व त्यावरील नोकरांचा पगार वगैरे बारीकसारीक गोष्टी सुद्धां दिल्या आहेत.

पथके.—या सदराखालीं २६८ रुमाल आहेत व सैन्याबाबत केलेल्या खर्चाची यांत नोंद आहे. या सदरांत घोडदळ, पायदळ व तोफखाना यांचा समावेश केलेला आहे. या दप्तरांतील बरेच कागद रोजमुऱ्यासंबंधीं आहेत. ह्यांत आलेलीं कांहीं महत्त्वाचीं नांवें उदाहरणादाखल खालीं दिलीं आहेत.

अल्ली बहाद्दर	नागोराम
बाळाजी बाजीराव	रामचंद्र हरि
बाजी बल्लाळ	रामराव पाराशर
भवानजी तापकीर	राणोजी शिंदे
दारकोजी निंबाळकर	संताजी मोरे
गोविंद हरि पटवर्धन	सेखोजी आयतोळे
कृष्णसिंग	शहाजी भापकर
महिपतराव कवडे	शहाजी भोसले
म्हाळोजी मुठे	शिवाजी भोईटे
मानाजी पायगुडे	विठ्ठल शिवदेव
मानाजी शिंदे	विसाजी केशव
नरसिंगराव निंबाळकर	विसाजी कृष्ण

लष्करी इतिहासाच्या अभ्यासकांस ह्या दप्तराचा बराच उपयोग होईल.

१० चिटणिसी दप्तर:—

इतिहाससंशोधनाचें मुख्य साधन पत्रव्यवहार (चिटणिसी कागद) होय. इनाम कमिशन चौकशीचे वेळीं ह्याची ९९ पोतीं बांधून बाजूस ठेवलीं होतीं. त्याचेच पुढे २६७ रुमाल तयार केले. सरकारी रोजचे चालू कामांत हे कागद लागत नसल्यामुळें हें दप्तर बाजूस ठेविलें होतें. रा. ब. पारसनीस यांनीं त्याची प्रथमत: तपासणी केली. त्यांसबंधीं ते लिहितात कीं "ह्या दप्तरांत मराठशाहींतील अंमलदारांनीं राजकीय बाबतींत लिहिलेलीं निरनिराळ्या काळची पत्रें आहेत. ही गोष्ट रा. ब. वाड यांनीं सरकारचे निदर्शनास आणली व सरकारनें 'डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रॅन्सलेशन सोसायटी' कडे हें काम सोंपविलें. ह्या सोसायटीतर्फे काम करण्याची संधि मला मिळाली व टाकाऊ म्हणून बाजूस काढलेल्या कागदांपैकीं सुमारें १०००० कागद मी निवडले. ह्यांतील माहिती फार महत्त्वाची असून ती विश्वसनीय व अनेक ऐतिहासिक प्रसंगांवर नवीन प्रकाश पाडणारी व स्पष्टीकरणास उपयुक्त अशी आहे." रा. ब. पारसनीस यांनीं केलेल्या

संशोधनाची माहिती पुढें देण्यांत येईल. येथें एवढें सांगितलें म्हणजे पुरें कीं, प्रकाशित झालेल्या ४५ भागास मुख्य आधार या चिटणिसी दप्तराचा आहे आणि यांतूनच कागद निवडून कारकीर्दवार लावून त्याचे नवे रुमाल अभ्यासका-करतां तयार केले आहेत. (पहा २६ पान ३९) ह्या दप्तरांत ऐतिहासिक माहिती पुष्कळ आहे. संशोधन करणारास हे कागद म्हणजे माहितीचें भांडारच होय.

ह्या खेरीज २४ रुमाल तुटके कागदांचे म्हणून आहेत. त्यांचें वर्गीकरण करणें अवघड असल्यामुळें ते निराळे ठेवले आहेत. परंतु स्वस्थपणें अभ्यास करणारास या अपुऱ्या कागदांमधून सुद्धां ते नीट जमविल्यास कांहीं माहिती मिळण्याचा संभव आहे.

येथें दुसऱ्या महत्त्वाचे भागाचें वर्णन पुरें झालें.

११ आंग्रे दप्तर:—

आंग्रे दप्तराचे ७६१ रुमाल आहेत. सन १८४० मध्यें पश्चिम किनाऱ्यावरील आंग्रे यांचे राज्य खालसा झाल्यावर हें दप्तर इकडे आणलें असावें. ह्या दप्तराचा विस्तार जरी मोठा असला तरी यांला ऐतिहासिक महत्त्व विशेष नाहीं. ह्यांत खतावण्या व प्रांतवार हिशोब असून याचे २ विभाग आहेत—

१ रोजकीर्द (रुमाल १ ते ४९७) १७९८-१८४०.

२ प्रांतवार हिशोब ४९८ ते ७६१.

प्रांतवार हिशोबांत चेऊलप्रांत, माणिकगड, नागोठणें, अवचितगड, कालोस, कादळे, सुवर्णदुर्ग व रेवदंडा या प्रांताचा उल्लेख आहे. सर्व दप्तर सालवार लाविलेलें आहे—

(१) रुमाल १ ते १३० रोजकीर्दी १७९८ ते १८४०

(२) „ १३१ ते ५७६ हिशोब १७४५ ते १८४०

(३) „ ५७७ ते ६२१ „ निरनिराळ्या खात्याचे

(४) „ ६२२ ते ७६१ „ आंग्रे प्रांताचे

ह्या हिशोबाचा बारकाईने अभ्यास केल्यास एका काळीं बलाढ्य असणाऱ्या या मराठा घराण्याची घसरपट्टी कशी होत गेली हें उत्तम तऱ्हेनें निदर्शनास येईल.

१२ सातारा माहाराज दप्तर:—

ह्या दप्तराचे ३८६७ मराठी रुमाल आहेत व सातारा रेसिडेन्सी रुमाल म्हणून १५० इंग्रजी रुमाल आहेत. प्रतापसिंह व शहाजी या दोन राजाच्या कारकीर्दीचे सन १८१८ ते १८४८ ह्या कालांतील हें दप्तर होय. सन १८४८ मध्यें सातारचें राज्य खालसा झाल्यावर हें दप्तर पुण्यास आणल्याचें दिसते. मराठी ३८६७ व इंग्रजी १५० रुमाल ह्यावरून सरकारी पत्रव्यवहारा-मध्यें त्या वेळीं ह्या दोन भाषेचें प्रमाण किती होते हें दिसून येईल. इतिहासाच्या दृष्टीनें याचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास सातारच्या ३० वर्षांच्या मराठी अमदानीचा

बराचसा इतिहास तयार करतां येईल. यांतील बरेच कागद नित्याचे रोजच्या कारभारासंबंधीं आहेत; वरिष्ठ ब्रिटिश सरकार व सातारचे राजे यांचे राजकीय संबंधाचा यांत फारच थोडा भाग आहे. यांतील बहुतेक कागद जमाव दप्तरामध्यें असलेल्या जमाखर्चाचे कागदाच्या स्वरूपाचे आहेत. मधूनमधून ऐतिहासिक महत्त्व नसलेलीं, आलेलीं व गेलेलीं पत्रें आढळतात. कांहीं महत्त्वाची माहिती क्वचित ठिकाणीं आढळते. उदाहरणार्थ नंबर ४४ च्या दप्तरांत दक्षिणेंतील प्रसिद्ध दरवडेखोर उमाजी नाईक याची हकीकत व शेवटीं त्याला कसा पकडला याची माहिती मिळते. रेसिडन्सी दप्तर ५१ मध्यें प्रतापसिंह महाराजांबाबत रंगो बापूजी वगैरे मंडळींनीं केलेल्या महत्त्वाच्या पत्रव्यवहाराच्या नकला आहेत. या प्रकारणाचे बारकाईनें संशोधन केल्यास महाराज प्रतापसिंहास पदच्युत करण्यांत आलें त्या प्रकरणासंबंधींची जास्त माहिती उपलब्ध होईल. ह्या प्रकरणसंबंधी पत्रव्यवहाराचे आणखी दप्तर असण्याचा संभव आहे, परंतु ते दप्तर येथें नाहीं. ऐतिहासिक अभ्यासास महत्त्वाचे असे प्रतापसिंहाच्या रोजकीर्दीचे रुमाल यांत आहेत व ते बाजूस काढून अभ्यासूसाठीं तयार केलेल्या नवीन विभागांत ठेवले आहेत. या मोठ्या दप्तराचें पूर्ण तपशीलवार फेरिस्त नाहीं, परंतु उपलब्ध असलेल्या फेरिस्तांत खालील प्रो माहिती आहे :—

१	खाजगी	१३३
२	गांवचे हिशेब (पेटेवार)	४७४
३	रोजकीर्दी	७७२
४	हुजूर हुकमाच्या तारखा	२८
५	महाराज हुकमाच्या रोजकीर्दी	१८
६	दफात्यांची खतावणी	१३
७	आवक जावक	७०
८	पेटेवार अर्ज	२१
९	इंग्रजी हुकमाच्या नकला	३
१०	पैमाश कागद	६३५
११	जमाबंदी–मुलकी साऱ्याबद्दल	११५
१२	,, –कबुलायती	११९
१३	जमिनीचे कुळवार हिशोब	९४
१४	पायदळ, तोफखाना	२८८
१५	निंबाळकर फलटण	११४
१६	अक्कलकोटकर	४१

१७	जत–करजगी–डफळे	६५
१८	देवस्तान चौकशी	५४
१९	सिद्धेश्वर कुरोळी	२१
२०	विठोबा पंढरपूर	४
२१	महाबळेश्वर	६
२२	शिवेबद्दल तक्रारी	१९
२३	अर्ज	२५
२४	पेटेवार वसुली (तफावतीच्या चौकशीची)	१००
२५	खानेसुमारी	४
२६	सरंजाम	६
२७	तगई	६
२८	अनामत सिल्लक	९
२९	१० व २० सालच्या खतावण्या	४
३०	जमीनाच्या तंट्याचे हिशोब	८
३१	मुलकी शिलकीचे	१८
३२	किरकोळ	१६
३३	उघड चौकशीचे १ पोष्टासंबंधीं २ वजनेंमापें ३ इमारती ४ कृष्णेचा पूल ५ यवतेश्वर ६ कोरेगांव नजीक पळसी ७ सकवारबाई उटेकर	२४४
		३५४७
३४	बिनफेरिस्तचे	३२०
		३८६७

पहिल्या नंबरांत खाजगी म्हणून दाखल केलेले १३३ रुमाल हे ऐतिहासिकदृष्टया फार महत्त्वाचे होत. याचें जास्त वर्गीकरण खालीलप्रो :—

१ तालेबंद ३७

१ खुद्द महाराजाचे

२ शहाजी अप्पासो

	३ भाऊसाहेब	
	४ थोरल्या राणीसो	
२	खतावण्या प्रतापसिंह–शहाजी	२०
३	श्रीभवानी–प्रतापगड	४
४	डफळे–जत	३
५	निंबाळकर फलटण	१
६	रामदासस्वामी परळी	१
७	देऊळगांव शिरपूर	१
८	हजऱ्या	२
९	अक्कलकोटकर	३
१०	देशमुख इंदापूर	८
११	बलवंत मल्हार चिटणीस	१
१२	खाजगी दिनचर्या	१
१३	जुन्या कागदाचे फेरिस्त	४
१४	शिंगणापूर, केदारेश्वर, वडगांव व इतर देवळासंबंधीं, पागा, कलावंतिणी, दसरा, सरकारी मोहरा, नेमणुका, पेन्शने, प्रभुप्रकरण, रेसिडेंट, पैमाश वगैरे, फेरिस्ते, पेश्व्यांचे कागद, गायकवाड, मंत्री, मेहेंदळे, राजोपाध्ये, प्रतिनिधि, शिरके, ठकार, शिंदे, घोरपडे वगैरे सरदारासंबंधीं	७
१५	हुजूर हुकूम	१८
१६	आवक जावक बारनिशी	२२
		१३३

१३ जमाव दप्तर :—

सर्व दप्तरांत मोठा व गुंतागुंतीचा असा जर कोणता भाग असेल तर तो जमाव हा भाग होय. इनामचौकशीकरितां इनामकमिशनला दिलेल्या अधिकारान्वयें बाहेरून जमविलेलें हें दप्तर आहे. सबब हें दप्तर व पुण्याचें पेशवे दप्तर हीं निरनिराळीं दप्तरें होत. देशमुख, देशपांडे वगैरे गांवचे व मौजेचे वंशपरंपरेचे वतनदार लोकांनीं वतनी जमिनीबद्दल हक्क शाबितीकरितां पुराव्यादाखल कागदपत्र हजर करण्यास फर्माविलें त्यावरून सनदापत्रें, जमिनीचे हिशोब, निवाडपत्रें वगैरे कागद कमावीसदार महाल-जमेदार लोकांनीं हजर केले व इनाम कमिशन चौकशीचे वेळीं त्यावर शिक्के करून ठेविले. मि. लोगन या दप्तरासंबंधीं लिहितात :— "ब्रिटिश अंमल सुरू झाल्यानंतर

गांवचे अधिकारी व महाल-जमेदार लोकांनीं त्यांच्याजवळ असलेले जुने हिशोब वगैरे असलेले कागदपत्र अजिबात छपविण्याचा प्रयत्न चालविला होता. पण इनाम कमिशन चौकशीचे वेळीं हे सर्व हस्तगत करण्यांत आले, त्याबरोबर हिंदुस्थान प्रांताचे हिशोब, तसेंच कोंकण व संस्थानांतील हिशोब सुद्धां त्या प्रांताचे जुने अधिकारी महाल-जमेदार लोकांजवळ सांपडले. तसेच सनदापत्रें वगैरे कागद आपले हक्काचे शाबितीकरितां ज्या त्या लोकांनीं हजर केले. खानदेशाखेरीज घाटाचे वरील जिल्ह्याचे सन १८४३ ते १८५७ मध्यें चौदा वर्षांत जमविलेले सुमारें ७८६४ रुमाल म्हणजेच जमाव दप्तर होय. (बंडाचे वेळीं जमावाचें काम बंद झाल्यामुळें खानदेशाचें दप्तर यांत नाहीं).

खालीलप्रमाणे ह्या दप्तराचें हल्लीं वर्गीकरण केलें आहे:—

नगर व नाशिक	२८६९
पुणें	१८०९
सचिव	३८
खानदेश	१४६
कोंकण	५६७
गुजराथ	८३
सातारा	१९९१
मोगलाई	२९०
हिंदुस्थान	७१
	७८६४

सोलापूर व कर्नाटक तसेंच गुजराथी लिपीचे ३०९ रुमालांचा ह्यांत समावेश केलेला नाहीं.

हें दप्तर विशेषेंकरून प्रांतवार, तर्फवार व मौजेवार लावलेलें आहे. मौजे अक्षरविल्हेवारीनें लावले आहेत. त्यामुळें ही व्यवस्था समजल्यास कागद सांपडण्यास फारशी अडचण पडत नाहीं. ह्याशिवाय किल्ल्याचे व प्रसिद्ध व्यक्तींचे कागद निराळे आहेत. मौजेवारीचे दप्तरांत फक्त जमिनीचे हिशोब आहेत. सरंजामदार व त्यांचे घराण्यांचा इतिहास व अशा तऱ्हेचे कागद नांववार लावले आहेत. उदाहरणार्थ; मलवडी गांवांतील जमिनीची माहिती पाहिजे असल्यास मलवडी गांवचें दप्तर पहावें लागेल व मलवडीचे घाटगे घराण्याचे माहितीकरितां घाटगे यांचे नांवचें दप्तर पहावें लागेल. किल्ल्याची व्यवस्था, त्याचें संरक्षण वगैरे-बद्दल माहिती त्या त्या प्रांताच्या किल्ल्याच्या विभागांत सांपडते. प्रत्येक

गांवचे कागद एकत्र असून त्याचे माजी अंमल व हाल अंमल असे दोन भाग केले आहेत; पण या पुढें जाऊन हें कागद सालवार अगर विषयवार लावण्याचा प्रयत्न झाला नाहीं. सबब जरूर असलेल्या कागदाकरितां बरेचसे रुमाल शोधावे लागतात.

ह्या दप्तरांतील अर्ध्यापेक्षां जास्त रुमालांची जुजबी तपासणी इतिहाससंशोधन कार्यालयानें केली; परंतु ह्यांत विशेष राजकीय माहिती मिळाली नाहीं व काम थोड्याच वेळांत संपवावयाचें असल्यामुळें राहिलेले रुमाल तसेच ठेवण्यांत आले. ह्या दप्तरांतील कागदाचे स्वरूपाची कल्पना येण्याकरितां यांतून सुमारें १०२८ कागद निवडले आहेत व ते ४ रुमालांत अभ्यासकाकरितां तयार केलेल्या नवीन विभागांत ठेविले आहेत. अशा प्रकारचे निवडक कागद ३१ व्या भागामध्यें नमुन्यांदाखल छापले आहेत. श्रमपूर्वक व चिकाटीनें ह्या दप्तराचा अभ्यास करणारास हें जमावदप्तर म्हणजे गुप्तभांडार वाटेल यांत नवल नाहीं; कारण केवळ पुण्याचेंच नव्हें तर पेशवाईतील खेडोपाड्याचे हरएक प्रकारचे या हिशोबी कागदांतून जुने प्रवासाचे मार्ग, किल्ले, कबरी, देवालयें, जुनी मापण्याचीं साधनें, मुलकी वसुलाची पद्धति, जुने कर, तसेच पूर्वीचे कामदाराचीं कामें, वगैरेबद्दल खडानखडा माहिती मिळते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक जीवनाचा विश्वसनीय आराखडा काढण्यास यासारखें दुसरें साधन नाहीं. ह्या दप्तरांत जुन्यांत जुना कागद १९ वे शतकाचे शेवटचा आहे. श्री. मावजी व पारसनीस यांनीं प्रसिद्ध केलेल्या सनदा, पत्रें वगैरे कागद हें याच विभागांतील शितोळे देशमुख व पुण्याचे देशपांडे ह्यासंबंधीचे आहेत. मि. जॅकसन, हे तारीख २९ जून १९०७ रोजीं लिहिलेल्या आपल्या रिपोर्टांत म्हणतात कीं—जमावदप्तराची कसोशीनें पाहणी होणें जरूर आहे; कारण बाळाजी विश्वनाथाचे पूर्वीचे कागद ह्या दप्तरांत मिळण्याचा संभव आहे. पेशवेदप्तरांत १८ वे शतकाचे शेवटचे ९० वर्षांचे कागद मिळतात, १७१९ चे पूर्वीचे त्यांत मिळत नाहींत हें सर्वश्रुतच आहे. इनामकमिशननें जमा केलेल्या दप्तरांत बहुतेक हिशोबी कागद आहेत तथापि त्यांतील काहीं कागद जुने व महत्त्वाची माहिती असणारे आहेत. ह्या दप्तरांतील कागदांचे माजी व हाल अमल असे दोन विभाग आहेत. यांपैकीं माजी अंमलचे विभागामध्यें शिवकालीन तसेंच विजापूर व नगरच्या पादशाहीचे वेळचे कागद मिळण्याचा संभव आहे.

१४. कर्नाटक सोलापूर दप्तर :—

ह्या दप्तराचे कर्नाटक २४६१ व सोलापूर ८८२ रुमाल आहेत. कर्नाटक म्हणजे हल्लींचे धारवाड व बेळगांव जिल्हे होत. दप्तराच्या इतर विभागाप्रमाणें

कर्नाटक व सोलापूरचे जमाव, प्रांत अजमास असे वर्गीकरण न करितां सर्वच कागद एकत्र आहेत. आणि यांतच इनाम-कमिशन-चौकशीचे रुमाल असल्यामुळें खिचडी झाली आहे. वर्गीकरणाचें दृष्टीनें हा मोठा दोष आहे खरा. असें होण्याचें कारण म्हणजे या भागांत इनाम-कमिशन-चौकशी प्रथम सुरू झाली व त्या वेळची मांडणी तसीच आजतागायत कायम ठेवण्यांत आली आहे. कर्नाटक व सोलापूरसंबंधीं जमाव, इनाम-कमिशन-चौकशी व पेशवेदप्तर हे तीनहि भाग एकाच फेरिस्तांत एकत्र आहेत. इतर ठिकाणीं शोधण्याची जरूर नाहीं. हे कागद जमीनदार, लहान लहान संस्थानिक व देशमुख देशपांडे यांचेकडून जमविले आहेत. कर्नाटकांतील वंटमुरी, कित्तूर, बेलवडी नवलगुंद, सिरसंगी इत्यादि छोटे संस्थानिक व वीरशैव लिंगायत या धार्मिक पंथांचा इतिहास या रुमालांत विखुरलेला आहे. परंतु या विषयाच्या अभ्यासकाकडून जोंपर्यंत कागदांची तपासणी झाली नाहीं. तोंपर्यंत यासंबंधीं अधिक निश्चित लिहितां येत नाहीं. हल्लीं कागदांच्या संशोधनाकरतां जरूर त्या सवलती दिल्या जातात, सबब कर्नाटकांतील संशोधक त्याचा फायदा घेतील अशी आशा आहे.

कर्नाटक दप्तरमध्यें वर नमूद केलेल्या २४६१ पैकीं ५१७ रुमाल निरुपयोगी म्हणून निराळे ठेविले आहेत. ह्याचे फेरिस्त नसल्यामुळें ह्यांत ऐतिहासिक महत्त्वाचे कागद आहेत कीं नाहीं हें समजण्यास मार्ग नाहीं. तथापि ह्यांत हिशोब व जुन्या घराण्याच्या बखरी कैफियती—विशेषतः लिंगायत समाजाच्या प्रसिद्ध घराण्यांची महत्त्वाची माहिती—मिळण्याचा संभव आहे.

१५. इनाम-कमिशन-चौकशीचें दप्तर :—

ह्या दप्तरांत १८८९ रुमाल आहेत पैकी ३५१ उत्तरभागचे, ९२० मध्यभागचे व ५०५ परत करण्याचे म्हणून आहेत.

ह्या तीन भागांतील कागद रोजचे सरकारी कामास लागतात व त्यांत ऐतिहासिक महत्त्वाची माहिती फारशी नाहीं. क्वचित् ठिकाणीं वतनासंबंधीं दिलेल्या कैफियतींमधून प्रसिद्ध घराण्याची माहिती मिळण्याचा संभव आहे. 'परत करण्याचे' म्हणून जें दप्तर आहे त्यामध्यें ऐतिहासिक माहिती मिळते व त्याचें संशोधन होणें जरूर आहे.

१६. परत करण्याचे कागद :—

ह्या दप्तरांत ५०५ रुमाल आहेत. ज्याचे त्यास शेवटीं परत करण्याचे उद्देशानें हें कागद वेगळे ठेवण्यांत आले व बहुशा मालकांनीं मागणी न केल्यामुळें दप्तराचा एक भाग होऊन बसले. या रुमालाचें काळजीपूर्वक संशोधन केलें तेव्हां त्यांत

बरीच ऐतिहासिक माहिती असल्याचे दृष्टोत्पत्तीस आले. ह्यांत पानिपतोत्तर काळापासून बंडाचे वेळेपर्यंतची प्रसिद्ध घराण्यांची खाजगी व इतर माहिती आहे. क्वचित् ठिकाणीं शितोळे व पुण्याचे देशपांडे यांच्या रुमालांत शिवकालीन कागदहि सांपडतात. ह्यांतील बरेच कागद निवडून पेशवेदप्तरांच्या ३१, ४४, भागांत प्रसिद्ध केले आहेत. ह्याचे कच्चे फेरिस्त तयार केलें आहे व ज्या कांहीं प्रसिद्ध घराण्याचे कागद मिळतात अशा घराण्यांची कांहीं नांवें पुढें दिलीं आहेत.

ह्या दप्तरांतील रुमाल नं. ४९०-५०५ सन १८०० ते १८२५ मधील सातारा, पुणें, यांचेसंबंधीं चाललेल्या इंग्रजी पत्रव्यवहाराचे आहेत. हे कागद जेथून आणले तेथें परत करण्याकरितां ठेविले असावेत. तसेंच सुमारे ३० रुमालांमध्यें बरेच पर्शियन कागद आहेत व त्याचे ऐतिहासिक दृष्ट्या संशोधन होणें जरूर आहे. त्या रुमालाचे नंबर येणेंप्रमाणें:—

१९, ३५, ४७, ५५, ९९, १४९, १५१, १८२, २३४, २८०, ३२५, ३३१, ३३३, ३५२, ३८२, ३८३, ३९२, ४३३, ४३६, ४६१, ४६५, ४७६, ४७९, ४८०, ४८३, ४८५ ४८९, रु. नं. ४७६ व ४८९ यांत निव्वळ पर्शिअन कागद आहेत तसेच रु. नं. ३२९, ३३६, ३७७, ४८७-८८ यांत कांहीं गुजराथी कागद असून नं. ४८७ त कांहीं कानडी कागद आहेत. नाना फडणविसाचे हिशोब १९, २२९, ४२५, ४६६, पेशव्याचे हिशोब ४०२, ४१९.

रुमाल नंबर ३२७ व ४५३ यांत शितोळे यांचे कागद आहेत व त्यांत शिवकालांतील कांहीं माहिती मिळण्याचा संभव आहे. ह्या रुमालांची पहांणी करून कांहीं कागद बाजूस काढून ते अभ्यासाकरितां नवीन तयार केलेल्या विभागांत ठेविले आहेत. त्यांचे नंबर ४८।४९ व ५१ ते ५३ असे आहेत. ह्यांत खालील घराण्यांची माहिती आहे :—

१ अन्याबा राहतेकर, २ काळे, ३ कुलकर्णी, ४ खंडो महादेव, ५ गोळे, ६ चाफाजी टिळेकर, ७ चिटणीस (सातारा, पुणें), ८ जोशी चासकर वगैरे, ९ तुळसीबागवाले, १० दाभाडे, ११ चिंचवडचे देव, १२ देशपांडे (पुणें, जुन्नर व शिवापुर), १३ शितोळे देशमुख, १४ नाना फडणीस, १५ निंबाळकर, १६ पानसे १७ पिलाजी जाधव, १८ पुरंधरे, १९ पेशवे २० प्रतिनिधि, २१ फडके, २२ बिवलकर, २३ बाळोजी कुंजीर, २४ बोकील, २५ भागवत, २६ मंत्री, २७ मैराळ, २८ मुजूमदार २९ राजेबहादूर, ३० रास्ते, ३१ सदाशिव माणकेश्वर, ३२ सखाराम भगवंत, ३३ विंचूरकर, ३४ हिंगणे.

१७ ब्रिटिश अमदानींतील दप्तर :—

ब्रिटिशांनीं हा प्रांत जिंकल्यावर मुलखाची आबादानी करण्याकरतां जे कायदे-कानू केले, उपाय अमलांत आणले, त्या बाबतच्या कागदपत्रांस हें नांव देण्यांत आलें. त्याचें वर्गीकरण खालीलप्रमाणें:—

१ पाहाणी खर्डे व पैमाश	३९६
२ इतिहासाचे निरुपयोगी	१६
३ डेक्कन कमिशनर	१७१
४ सरदारांचे एजंट	६९
५ अमानतदारांच्या वह्या	१०४
एकूण	७५६

पहिल्या विभागांतील—पैमाषीचे २१९ रुमाल व पहाणी खर्ड्याचे ७७ ह्यांत सन १८२८ ते १८३५ चे दरम्यान प्रिंगलसो यांनीं केलेल्या पहाणीचे कागद आहेत. सन १८२८ मध्यें जमिनीवरील वाढत्या करांमुळें महाराष्ट्रांतील शेतकरीवर्ग अगदीं जेरीस आला सबब हे जमीनमहसुलाचें ओझें हलकें करण्या-करितां प्रिंगलसो यांची पहाणीचे कामावर नेमणूक केली. त्यांचें काम ७ वर्षें सतत चाललें, पण तें पायाशुद्ध नाहीं असें दिसून आलें. तेव्हां १८३५ मध्यें तें रद्द करून मि. गोल्डस्मिड व ले. विंगेट यांचे देखरेखीखाली नवीन पहाणी सुरू झाली. या दोघांनीं १८३६ मध्यें काम सुरू केलें ते कागद सर्वे व सेटलमेंट ऑफिसमध्यें आहेत. प्रिंगल यांचे कागदांची चांचणी रा. सा. सरदेसाई व त्यांचे मदतनीस यांनीं केली त्यांत त्यांना रोजमुऱ्याचे निमतान्याचे वगैरे प्रारंभींचेच कागद आढळले. ऐतिहासिक महत्त्वाचे कागद मिळाले नाहींत. या कागदांत तत्कालीन आर्थिक परिस्थितीची माहिती मिळण्याचा संभव आहे.

दुसरे विभागांतील सोळा रुमाल बहुतेक रा. ब. वाड यांनीं निवडून बाजूस ठेविले आहेत व ते नांवाप्रमाणेंच निरुपयोगी आहेत.

१८ डेक्कन कमिशनर व एजंट दप्तर :—

पेशव्यांचें राज्य गेल्यानंतर ब्रिटिश अदमदानीस सुरवात झाली व जिंकलेल्या मुलखाची व्यवस्था करणेकरितां चार कमिशनरची नेमणूक करण्यांत आली. कृष्णानदीचे दक्षिणच्या मुलखावर मि. चापलीन, भिमा ते चांदवड मुलुखावर मि. पार्टिंजर, खानदेशावर कॅप्टन ब्रिग्ज व कॅप्टन राबर्टसन यांची पुणें व सातारा, याप्रमाणें नेमणुका झाल्या. ह्या चौघांचा हुद्दा डेक्कन कमिशनर म्हणून होता व त्यांना एलफिन्स्टनच्या धोरणानुरूप काम पार पाडावयाचें होतें. लोकांशीं मिळतें घेऊन दक्षतेनें काम करण्याची

ह्यांची पद्धत असलेमुळें ब्रिटिशराज्याबद्दल लोकामध्यें आदर वाढला. सन १८१९ मध्यें एलफिन्स्टनची गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली व त्याचे मुख्य कमिशनरचे जागीं चापलीन यांची नेमणूक झाली. एलफिस्टन यांनीं एक प्रश्नावली काढली व त्याला उत्तरें मिळविण्याबद्दल सर्व कमिशनरना सांगितलें. त्यांनीं नेटानें काम करून महाराष्ट्रांतील लोकांच्या सामाजिक, आर्थिक व धार्मिक परिस्थितीबद्दल माहिती मिळविली. ह्यांपैकीं कांहीं भाग 'पेशवेकालीन पंचायत' म्हणून मि. फ्रँक्स यांनीं लिहिलेले पुस्तकांत प्रसिद्ध झाला आहे. सन १८२७ मध्यें कमिशनरी अमल कमी झाला व जिल्हेवार अंमल सुरू झाला. पुणें येथील कमिशनरची जागा 'दक्षिणेंतील सरदारांचे एजंट' याजकडे आली. ती जागा पुणें येथील 'डिस्ट्रिक्ट जज्ज' यांजकडे अद्याप आहे. सन १८२७ ते सन १८४९ पर्यंत पेशवे दप्तर 'सरदारांचे एजंट' याचे ताब्यांत होतें व त्यांचेकडून मि. गोल्ड-स्मिड—ज्यांची पुढें इनाम-कमिशनर म्हणून नेमणूक झाली—त्यांचे ताब्यांत आलें. वर्गीकरण करण्यासाठीं सन १८३९ ते १८४२ सुमारें सहा वर्षे दप्तर अमानतदार यांचे ताब्यांत होतें.

डेक्कन कमिशनरनीं सात वर्षांत जमा केलेलें दप्तर 'डेक्कन कमिशनरचें दप्तर' म्हणून निराळें ठेविलें आहे.

ह्या दप्तरचें, तसेंच एजंट दप्तरचें, त्या काळचें इंग्रजी दप्तर आहे. ब्रिटिश अमलाचे आरंभीं कचेरींतून बरेच काम मराठींत चालें, पण पुढेंपुढें कचेरींतील कामांत मराठी भाषा मागें पडत चालली ही गोष्ट दप्तरांतील मराठी व इंग्रजी रुमालांचे प्रमाणावरून दिसून येते.

'सरदाराचे एजंटाचे' ६९ रुमालांपैकीं रुमाल नं. १७ ते २० मध्यें ऐतिहासिक प्रसिद्ध घराण्याच्या कैफियती आहेत.

ह्या दोन भागांतील इंग्लिश फाइली ५०८ व १०३४ आहेत. 'डेक्कन कमिशनर' व 'सरदारांचे एजंट' यांचे मराठी रुमाल व इंग्रजी फाइली मिळून (५०८+१०३४+१७१+६९) १७८२ पुडकी आहेत. हे सर्व दप्तर ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचें आहे.

सन १८१८ ते १८२६ सालचे १७१ रुमालांमध्यें इनाम, सरंजाम, कर, धर्मादाय व जावक पत्रांच्या बारनिशा वगैरे कागद आहेत. अभ्यासकाचे माहितीकरितां त्याचें खालीलप्रमाणें वर्गीकरण केलें आहे:—

पहिले साठ रुमाल जिल्हेवार आहेत.

(१)	सुभा पुणें	१—८
(२)	महालवार	९–१३

(३) सुभा नगर १४–३४
(४) सुभा खानदेश ३५ ते ५८
(५) ,, कोंकण ५९ ६०

रु. नं. ६१ ते १७१ पैकीं कांहीं महत्त्वाचे रुमाल खालीलप्रमाणें :—

(१) बारनिशी रुमाल जावक ८२
(२) खानेसुमारी १२०
(३) प्रसिद्ध इसमांचीं पत्रें १२४
(४) बातमीपत्रें १२५
(५) श्रावणमासदक्षिणा १२६
(६) सामजिक चालीरीतीसंबंधीं सवाल जबाब १३६–१३७
(७) गोषवारे १४१–१४८
(८) करासंबंधीं १४९–१५४
(९) सरकारकडे केलेले अर्ज (इनामाबद्दल व बक्षिसांबद्दल) १५५–१५७
(१०) जाहीरनामे व पत्रे. १६५
(११) जिनसांचे निरख १६९
(१२) किरकोळ १७०–१७१

सदरप्रमाणें एजंट दप्तरचे ६९ रुमालांबद्दल खालीलप्रमाणें माहिती आहे :—

१ सरंजाम पेन्शन
२ सन १८२२ चा निजामाशी तह
३ कमिशनरची रोजनिशी (१८१८ ते १८२४)
४ जातीसंबंधीं दफे
५ पेशवेदप्तरांतील नकला
६ साहोत्रा पंतसचिव
७ मागील कारकीर्दीचे कागद
८ कैफियती
९ मोरो विठ्ठल यांनीं निवडलेले राजकीय महत्त्वाचे कागद
१० एजंटांनीं केलेले निवाडे
११ लोकांनीं सरकारांत केलेले अर्ज
१२ सरदारांचीं नांवें व त्यांस दिलेले पोषाख वगैरे
१३ श्रावणमासदक्षिणा
१४ हजऱ्या

१५ सातारा व कोल्हापूर राजाशीं केलेले तह
१६ किरकोळ
१७ फेरिस्त वगैरे
१८ जाती व दत्तकाबद्दल

हीं दोन्हीं दप्तरें इतिहाससंशोधन कार्यालयानें तपासलीं. त्यामध्यें अव्वल इंग्रजींतील सामाजिक स्थितीवर बराच प्रकाश पाडणारी माहिती मिळते. त्या वेळच्या जाती, चालीरिती, धार्मिक समजुती व न्यायदानपद्धतीसंबंधीं माहिती या दप्तरांत आहे. ब्रिटिशांनीं पुण्यास काढलेल्या संस्कृत पाठशाळेसारख्या नवीन संस्थांची पूर्वपीठिकासुद्धां यांत पहावयास मिळते. साताराचे राजे प्रतापसिंह यांचे-संबंधीं कांहीं कागद ह्यांत आहेत. ह्यांतील कांहींच कागदांचें प्रकाशन करण्यास सवड झाली नाही. ब्रिटिश लोकांची एखाद्या विषयाची चौकस व शोधक बुद्धि, लोकहिताची तळमळ, त्याकरितां कायदे करणें, जाहीरनामे काढून प्रजेला आपल्या धोरणाची ओळख करून देणें ही दृष्टि या दप्तरांतील प्रत्येक कागदांत दिसून येते. त्या काळच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणारास हीं दप्तरें उपयोगी वाटतील.

पारसनीस यांनीं 'कैफियती व यादी' म्हणून प्रसिद्ध केलेला भाग हा या विभागांतील माहितीवरून तयार केलेला आहे. संस्थानिक, सरदार, इनामदार व बडे लोक यांना आपआपल्या घराण्याचे हिशोब व हक्कास पोषक असे कागद-पत्र हजर करण्याबद्दल सांगण्यांत आलें. त्यांचेकडून आलेल्या माहितीचे व कैफियतीचे कागद 'सरदारांचे एजंट' चे नं. १७-२० या रुमालांत आहेत. पारसनीस यांनीं सर्व कैफियती छापल्या नाहींत, कांहीं निवडकच छापल्या. राहिलेल्या कैफियतीहि महत्त्वाच्याच आहेत. हल्लीं प्रसिद्ध केलेले ४४ नंबरचे भागांत यांतील कांहीं प्रसिद्ध केल्या आहेत.

१९. अमानतदारांच्या वह्या :—

ब्रिटिश अमदानीचे प्रारंभीं जुनें दप्तर जमा होऊन त्याचा विस्तार वाढूं लागला, तेव्हां दप्तर व्यवस्थित राहून त्याचें योग्य रक्षण व्हावें व लोकांचेंहि दप्तराबाबत समाधान व्हावें या उद्देशानें मुंबईसरकारनें तारीख ४ सप्टेंबर १८३५ मध्यें सरदारांचे एजंटाचे देखरेखीखालीं पुण्यांतील सद्गृहस्थांची कमेटी नेमली, त्यांस अमानतदार म्हणून म्हणतात. त्यांनीं नोव्हेंबर १८३५ पासून तारीख ४ एप्रिल १८४२ पर्यंत काम केलें. त्यांनीं सुमारे $\frac{2}{3}$ दप्तरांचीं फेरिस्तें तयार केलीं. परंतु त्यांचा पाहिजे तसा उपयोग होत नसल्यानें काम बंद करण्यांत आलें. अमानत-दारांनीं तयार केलेल्या फेरिस्ताचे व टिप्पणाचे १०४ रुमाल निराळे ठेविले आहेत. त्यांचा ऐतिहासिक दृष्ट्या उपयोग नाहीं.

२०. माजी अंमलाचे कागद :—

ह्या नांवावरून या विभागाची नीटशी कल्पना येत नाहीं. हे रुमाल पेशवेकालीन खरे, पण पुण्यास असणाऱ्या पेशवेदप्तराशीं याचा संबंध नाहीं. सन १९०४ मध्यें इलाख्यांतील सर्व कलेक्टरांना बंडाच्या पूर्वीचे व ब्रिटिश अंमलापूर्वीचे कागद 'एलिनेशन ऑफिस' मध्यें पाठविण्याबद्दल लिहून गेलें. त्याप्रमाणें जिल्ह्यांत सांपडलेले पुष्कळ जुनें व उपयुक्त दप्तर येथें पाठविण्यांत आलें. तें सर्व स्वतंत्र ठेवण्यांत आलें आहे. वरील हुकूम अद्याप अंमलांत आहे व त्याप्रमाणें असलें जुनें दप्तर अद्याप 'एलिनेशन ऑफिस' मध्यें येतें. त्याची जिल्हेवार वाटणी खालील प्रमाणें :—

२९९ मराठी				गुजराथ १०६	
रत्नागिरी	९२	धारवाड	२	३	भडोच
विजापूर	४२	महाड	१	१	अहमदाबाद
पुणें	३	उरण	२	१०२	सुरत
अहमदनगर	१०	पनवेल	८७		
बेळगांव	१	अलिबाग	१०		
ठाणे	३	खानदेश	४१		
सोलापूर	१				

२९९ + १०६

एकूण रुमाल ४०५

या रुमालांची थोडी चांचणी केली. ऐतिहासिक उपयोगी अशी फारशी यांत माहिती नाहीं.

२१. जकात व हक्क कमिशन :—

थळभरीत, थळमोड, मिरासपट्टी, मोहतर्फा, बाजरबैठक, वगैरेसारखे कर कांहीं खाजगी लोक गोळा करीत असत ते सरकारनें १८४४ मध्यें बंद केले. त्यामुळें या लोकांचे किती नुकसान होतें तें पाहून त्यास भरपाई देण्याचे चौकशीकरितां मे. रोज व रॉबर्टसन यांची नेमणूक सन १८४९ मध्यें झाली. यानीं दिलेल्या हुकुमाचीं १० बारनिशी बुकें आहेत. एकंदर रुमाल १०३ आहेत त्यांत इतिहास-उपयोगी माहिती नाहीं. त्याचप्रमाणें जकातीचे १५८ रुमाल आहेत त्यांतहि कांहीं नाहीं.

येथपर्यंत मराठी दप्तराच्या ऐतिहासिक विभागाचें विवेचन झालें.

प्रकरण ३ रें.

इंग्रजी विभागाची माहिती.

२२. सोळा फेरिस्तें :—

इंग्रजी रेकार्डचीं दप्तरें नसून त्याच्या फाईली आहेत. याचे मि. लोगन यांनीं १६ विभाग केले आहेत. यांतील बहुतेक दप्तर 'इनाम कमिशन' चौकशीबद्दल आहे. त्याशिवाय मध्यवर्ती असलेल्या जागीं रेकार्डमध्यें ठेवण्याकरितां कांहीं दप्तर आलें. १६ फेरिस्तांपैकीं नं. १, २, ३, ४, ११-१४ यांत निरनिराळ्या इनाम-कमिशनरनीं केलेल्या कामाची माहिती आहे व फेरिस्त नं. ५, १०, १५, १६ ह्यांत मागाहून आलेल्या दप्तरसंबंधीं माहिती आहे :—

फे. नं.	१ मे. हार्ट व एथरीज यांचें दप्तर	१२०२
,,	२ व ३ मे. हर्न यांचें दप्तर	३७५
,,	४ रंगो भिमाजी यांचें दप्तर	३३
,,	११ मे. पेस्तन जहांगीर उत्तर भागचे सेटलमेंटसंबंधीं (विषयवार लावलेले.)	४४१
,,	१२ कॅप्टन गॉर्डन यांचे रेकॉर्ड	१४२७
,,	१३ मि. ग्रिफिथ	१३४३
	एकूण—	४८२१

	१४ एलिनेशन व सरदारासंबंधीं कमिशनर, मध्य भाग, यांचे कडील दप्तर	(१८१८-१८८७)	८४४
	९ सरदारांचे एजंटाचें दप्तर	(१८२६-१८४९)	१००९
	१० डेक्कन कमिशनरचें दप्तर	(१८१७-१८२६)	९०८
	५ सातारा रेसिडेन्सीचें दप्तर	(१८१८-१८४८)	१५०
	६ पुणें रेसिडेन्सीचें दप्तर	(१७८६-१८१८)	२६
	१५ रत्नागिरीहून आलेल्या जुन्या फाईली	(१८२१ ते १८३७)	५२
	१६ कुलाबा—सदर	(१८४०-१८४४)	१२
फे. नं.	७ छापील बुकें		
	८ नकाशे (फोटोझिंको ऑफिसास परत केले.)		
	मोकळे कागद		६०
		एकूण	२६६१
		कुल बेरीज	७४८२

फे. नं. १ याचे २ भाग आहेत. पहिल्या भागांत इनाम कमिशननें केलेले फैसले गांववार लाविले आहेत व दुसरे भागांत विषयवार किरकोळ फाइली आहेत. फे. नं. २ मध्यें किरकोळ कागद विषयानुक्रमानें लाविले आहेत. फे. नं. ३ यांत इनाम कमिशनचे फैसले गांववार लाविले आहेत. फे. नं. ४ यांत मुख्यतः ता. नरगुंद-मधील वर्षासनाच्या फाइली आहेत व त्या अक्षरविल्हेवार विषयानुक्रमानें लाविल्या आहेत. फे नं. ५, ११ यांतील फाइलीहि विषयानुक्रमानें लावल्या आहेत. फे. नं. १२ यांतील फाइली विषयवार अगर सालवार लाविलेल्या नाहींत. प्रत्येक फाइलीच्या नंबरापुढें थोडक्यांत विषय दिला आहे त्यामुळें एक फाइल शोधण्याकरितां सर्व फेरिस्त धुंडाळावें लागतें. नं. १३ याचे, इनामकमिशनचे गांववार फैसले, वर्षासन सरंजाम, हक्क, कमिशन व किरकोळ कागद असे भाग आहेत. फे. नं. ९ यांत सरदारांच्या एजंटाचें दप्तर असून त्यांत निरनिराळ्या इसमांच्या माहितीचे कागद आहेत ते अक्षरविल्हेवार लाविले आहेत. फे. नं. १० यांत ५०८ फाइली आहेत. यांत कमिशनर व इतर ब्रिटिश अंमलदार यांचा सन १८१७ ते १८२६ चे दरम्यान झालेला पत्रव्यवहार आहे. यांतील सर्व पत्रांचीं छापील फेरिस्तें आहेत. त्यावरून ब्रिटिश अमदानीचे प्रारंभींची ऐतिहासिक उपयोगी माहिती मिळण्याचा संभव आहे. फे. नं. १४ ह्या फाईली मध्यभागचे कमिशनरच्या 'एलिनेशन ऑफिस' मध्यें सन १९०८ चे सुमारास आल्या. ह्या फाइली सरकारी चालू कामास लागणाऱ्या आहेत. यांत ऐतिहासिक माहिती नाहीं.

फे. नं. ५ यांत सातारा रेसिडेन्सीच्या १५० फाईली व १८१८ ते १८४८ च्या इंग्रजी आवकजावक बारनिश्या आहेत. तसेंच भोर, औंध, फलटण, अक्कलकोट, जत, शेखमिरा, वांई हे त्या वेळीं साताराचे राजाचे मांडलिक असल्यामुळें त्यांचे संबंधींचे त्या कालचे कागद यांत असणें संभवनीय आहेत.

२३. पुणें रेसिडंटचें दप्तर :—

फे. नं. ६ यांत पुणें रेसिडन्सीच्या फाइली आहेत. त्याचे आवक व जावक असे दोन भाग आहेत. त्याच्या नकला हिंदुस्थानांतील निरनिराळ्या दप्तरखान्यांत असण्याचा संभव आहे, अगर पूर्वी होत्या असे मानण्यास जागा आहे. ह्यांतील मुंबई सरकारास लिहिलेल्या पत्रांच्या प्रती मुंबई सरकारच्या सेक्रेटरीएट-रेकॉर्डमध्यें आहेत असे मि. किंडर्स्ले यांनीं मुंबई सरकारचे रेकॉर्डचे माहितीपुस्तकाच्या पान ६० वर 'पुणें रेसिडेन्सी आवकजावक पुस्तकें सन १७९८ ते १८१९ सालच्या फाईली ९५ (३४+६१)' असा उल्लेख आहे ह्यावरून दिसतें. वास्तविक पाहिलें असतां मुंबई व पुणें येथील फाईली एकमेकांस पूरक आहेत, व दोन्ही मिळून पुणें रेसिडेन्सीचा पत्रव्यवहार होतो. तसेंच पुण्याहून कलकत्यास लिहिलेलीं अस्सल पत्रें 'इंपिरियल रेकॉर्डमध्यें'

मिळण्याचा संभव आहे. ह्या फाइलींतील कागद ठिकठिकाणीं फाटला आहे, शाई उडून गेली असून कसरीनें भोकें पडल्यामुळें मुंबई व कलकत्ता येथें असलेल्या नकलाच्या साहाय्यानें रुजवात घेऊन सर्व पत्रव्यवहार व्यवस्थित लावणें जरूर आहे.

'पुणें रेसिडेन्सी' चे इंग्रजी रेकॉर्ड सन १७८६ ते १८१८ पर्यंतचें आहे. यांतील ऐतिहासिक कामाचे कागद टाइप करून त्याच्या १३२ फाइली तयार केल्या आहेत. याशिवाय किरकोळ कागदांचीं ४२ पुडकीं आहेत. त्यांचा ऐतिहासिक दृष्टया उपयोग नाहीं. यांतील जावक बारनिशींत मॅलेट, पामर, बॅरी, क्लोज व एलफिन्स्टन वगैरे रेसिडेंटांचीं पत्रें व रिपोर्ट आहेत. आवक फाइलीमध्यें गव्हर्नर-जनरल व दुसरे अमलदारांनीं पुणें रेसिडेंटास लिहिलेलीं पत्रें असून शिवाय पुष्कळ महत्त्वाचे खालिते–निजामचे रेसिडेंट, शिंदे, नागपूरचे भोसले, दिल्लीचे पादशहा, उत्तर हिंदुस्थान, म्हैसूर दरबार यासंबंधीं बातमीपत्रें, निझाम दरबार, काबुलचा झामनशहा, वगैरे महाराष्ट्राबाहेरच्या महत्त्वाच्या राजकारणाबद्दल पत्रव्यवहार आहे. या अस्सल समकालीन पत्रव्यवहारावरून १८ व्या शतकाची अखेर व १९ व्या शतकाचा प्रारंभ यांतील अनेक घडामोडीचे दुवे जोडतां येतात.

सन १७८० चे पुढील मराठी पत्रव्यवहार पेशवेदप्तरांत फारच तुटपुंजा व त्रोटक आहे. कारण यानंतरचा पेशवाईचा महत्त्वाचा पत्रव्यवहार नाना फडणिसाच्या मार्फत झाला व तें सर्व दप्तर मेणवलीस गेलें. त्यामुळें मराठी इतिहासांत पडणारीं खिंडारें या इंग्रजी रेसिडेन्सी रेकॉर्डवरून भरून काढावीं लागतील. या दप्तरांत खालील विषयावर भरपूर माहिती आहे:—निजामदरबार संबंधीं बातमी पत्रें, गायकवाड प्रकरण, लॉर्ड कार्नवालिसनें टिपूचा केलेला पाडाव व तत्पूर्वीचे कारस्थान, महादजी शिंदे यांच्या रजपूतांवर स्वाऱ्या, दौलतराव शिंदे, शिंदे बाया व लखबादादा यांची आपसांतील यादवी, वसई-लढाईची पूर्व-पीठिका, यशवंतराव होळकर याच्या हालचाली, मेटकाफची दिल्ली दरबारांतील कारवाई, रजपूत संस्थानाशीं चाललेल्या वाटाघाटी, जेंकीन्स याची नागपूर दरबारांतील कामगिरी, व शेवटचें इंग्रजमराठे युद्ध. थोडक्यांत या रेसिडेन्सी रेकॉर्डीत पुणें दरबाराइतकीच तपशीलवार, महत्त्वाची विश्वसनीय अशी निजाम व दौलतरावसंबंधींहि माहिती आहे.

फे. नं. ७ यांत छापील पुस्तकें व मुंबई सरकारचे रेकॉर्डमधून निवडून काढलेले छापील भाग आहेत. यांत कांहीं पुस्तकें ऐतिहासिक माहितीचीं आहेत.

फे. नं. ८ यांत नकाशे होते ते फोटोझिंको ऑफिसांस परत केले, आतां कांहीं राहिले नाहींत.

फे. नं. १९ व १६–यांत रत्नागिरी व कुलाबा जिल्ह्यांतून आलेल्या जुन्या कागदाच्या फाइली आहेत. ह्या दप्तरांपैकीं फे. नं. १ ते ४–९–११ ते १४ ह्यांतील कागद ऑफिसचेच नेहमीचे कामाचे आहेत. सबब बाहेरचे लोकांस ते पाहण्यास मोकळीक नाही. परंतु फे. नं. ५–६–१०–१५ व १६. यांतील ७४८ फाइली व छापील पुस्तकें लि. नं. ७ मधील यांत अभ्यासकास माहिती मिळण्याचा संभव आहे.

२४. रत्नागिरी व कुलाब्याच्या फाइली :—

फे. नं. १९ मधील ९२ फाइलीची थोडी चांचणी करण्यांत आली. त्यावरून या फाइलींत मालवण, विजयदुर्ग, बाणकोट वगैरे ठिकाणीं असलेले रेसिडेंटचा सावंतवाडी, बावडा, कुलाबा वगैरे ठिकाणीं असलेल्या मराठी संस्थानिकाशीं झालेला पत्रव्यवहार सांपडतो. आरंभीं सर्व पत्रव्यवहार पुणें येथील रेसिडेंट मार्फत चाले. परंतु १८१६ चे सुमारापासून पुढें मुंबई सरकारकडे परभारे होत असे.

रत्नागिरी फाईलीपैकीं नं. १७ ते २० यांत सन १८२३ व १८२४ सालचे कागद आहेत. अव्वल इंग्रजी मुलखांत स्थिरस्थावर करण्याकरितां अमलांत आणलेल्या उपायासंबंधीं हा पत्रव्यवहार आहे. यांत थोडीफार ऐतिहासिक माहिती मिळण्याचा संभव आहे.

मालवण फाईल मं. ३९ मध्यें रत्नागिरीच्या कलेक्टरचा व खेड्याचे कलेक्टरचा असे परिश्रमपूर्वक तयार केलेले दोन रिपोर्ट सामाजिक व आर्थिक परिस्थितीसंबंधीं आहेत. याचा अभ्यास केल्यास श्रम फुकट जाणार नाहींत.

मालवण रेसिडेन्सी फाईल नं. ४० ते ४९ यांत १८१६–१८१७ मधील सावंतवाडी प्रकरण येतें. ब्रिटिशांनीं संस्थानच्या कारभारांत चालविलेल्या ढवळाढवळीविरुद्ध राणी दुर्गाबाईनें जोराची उठावणी केली. मिठागरें, कर, दरोड्याचा बंदोबस्त, सार्वजनिक कामें याबाबत संस्थान व इंग्रजी मुलुख यांमधील अनिर्णित मर्यादा हें वादाचें कारण होय. या प्रश्नावर एल्फिन्स्टननें दिलेला अखेरचा निर्णय पाहिला असतां त्यावरून त्याची मुत्सद्देगिरी व निर्णायक बुद्धि दिसून येतें. फा. नं. ४२–४९ यांत सातारा येथील रेसिडंट ग्रँट डफ व एलफिन्स्टन् यांचे दरम्यान विजयदुर्ग व पश्चिम किनाऱ्यावरील इतर किल्ले हस्तगत करण्याबाबत झालेला पत्रव्यवहार आहे. तसेच फा. नं. ४८ यांतील नं. ७/१८/२०/२१ हे चार महत्वाचे खलिते म्हणजे जनरल माल्कमनें बाजीराव पेशवे शरण आल्यासंबंधींचा गव्हर्नर-जनरल साहेबाशीं केलेला पत्रव्यवहार होय. या पत्र व्यवहारांत ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची माहिती मिळतें. या फाईली त्यावेळी गुप्त पत्रव्यवहार म्हणून जरी बाजूस ठेवल्या होत्या तरी पुणें रेसिडेन्सी रेकॉर्ड फाईली व ह्या फाईली यांत फरक नाहीं.

प्रकरण ४ थें.

इतिहास संशोधकांकरितां माहिती नियम वगैरे—

२५. इतिहास संशोधनाकरितां निवडलेल्या कागदांचे रुमाल :—

वरील विवेचनावरून पेशवे दप्तरांपैकीं कोणता भाग ऐतिहासिक उपयोगाचा आहे ह्याची साधारण कल्पना येईल. दप्तराचा बराच भाग फक्त सरकारी कामास लागणारा आहे. तसेंच दप्तर बरेंच मोठें असल्यानें अभ्यासकास बरीच अडचण पडते. सर्व दिवसभर खपून पुष्कळदां अभ्यासकास डोंगर पोखरून उंदीर मिळाल्यासारखें होतें. कचितप्रसंगीं कांहींच हातीं लागत नाहीं. रा. सा. सरदेसाई व त्यांचे साहाय्यकारी यांनीं ऐतिहासिक स्वरूपाचे कागद एकत्र करून अभ्यासकाकरितां निराळे रुमाल तयार केले आहेत. या दप्तरांत ह्याशिवाय उपयोगी ऐतिहासिक कागद नाहींत असें म्हणणें धाडसाचें होईल. या दप्तरांतील चिटणीसी व जाबसाली विभागांत जास्त ऐतिहासिक माहिती मिळते. दुसरे विभागांतून काढलेल्या कागदांच्या नकला करून ते जागच्याजागीं ठेवून दिले. २६७ चिटणीसी दप्तरांतून ३०००० कागद ऐतिहासिक माहितीचे निवडले व त्याचा स्वतंत्र विभाग तयार केला आहे.

चिटणिसी दप्तराची मूळ संख्या कमी केली नाहीं. त्यांतील ऐतिहासिक उपयोगी पत्रव्यवहार निराळा काढल्यामुळें त्याचा आकार लहान झाला आहे. त्यांतील कागदांचा आणखी चिकित्सापूर्वक अभ्यास केल्यास त्यांत थोडीफार माहिती मिळण्याचा संभव आहे. निवडून काढलेल्या ३०००० कागदांची फेरतपासणी केली व त्यांतील उपयुक्त वाटलेले कागद ४५ भागांत प्रसिद्ध केले आहेत. छापून प्रसिद्ध करण्यालायक नाहींत असे कागद पेशव्यांच्या कारकीर्दवार लावले असून तेहि ह्याच स्वतंत्र विभागांत ठेवले आहेत. ह्यांत प्रसिद्ध न केलेले थोडे कमी महत्त्वाचे असे कागद आहेत. जमावदप्तरापैकीं कांहीं कागद निवडून जमावदप्तरांत कशाप्रकारचे कागद आहेत याची कल्पना येण्याकरितां बाजूस ठेविले आहेत. तसेंच एका दप्तरामध्यें सातारच्या चिटणिसांनीं लिहिलेल्या अपुऱ्या बखरी व कांहीं जुनी अपुरी बाडें आहेत. जुनीं वर्तमानपत्रें, जंत्र्या, शकावल्या, ताम्रपट वगैरेचीं दप्तरें याच विभागांत ठेवलेलीं आहेत. त्याची यादी शेवटच्या परिशिष्टामध्यें दिली आहे.

२६. पारसनीस यांनीं केलेल्या नकला :—

मागें सांगितल्याप्रो रा. ब. पारसनीस यास चिटणिसी दप्तर पाहाण्याची व त्यांतील ऐतिहासिक उपयोगाची माहिती काढण्याची परवानगी मिळाली होती. त्यांनीं १८९६ ते १९२६ स्वतः मधूनमधून येऊन व स्वतःचे खर्चानें दोन कारकून ठेवून सुमारें २२६२ कागदांच्या नकला करून ठेवल्या; परंतु पुढें पारसनीस यांचे इतर व्यवसाय वाढल्यामुळें त्यास इकडे लक्ष देतां आलें नाहीं. या नकला तपासून रा. स. सरदेसाई यानीं १९२९ मध्यें याची खालीलप्रमाणें वर्गवारी केली—

३१	बाजीराव पहिले
९८१	बाळाजी बाजीराव
४४०	माधवराव बल्लाळ
४२६	माधवराव नारायण
७८४	बाजीराव दुसरे
२२६२	

या कागदांतील उपयुक्त भाग छापून प्रसिद्ध केला व बाकीच्या नकला कांहीं अपुऱ्या व कांहीं चुकीच्या अशा आढळल्या त्या तशाच ठेविल्या आहेत.

२७. फार्शी कागद :—

याबद्दल डॉ. महमद नाझीम, एम्. ए., पीएच्. डी. (कॅंटब), पुराणवस्तु-संशोधक, पश्चिमभाग, या खात्याचे असिस्टंट सुपरिंटेंडंट लिहितात, "पर्शियन दप्तराचे दोन भाग पडतात. (१) सन १७३० ते १८२९ चे दरम्यान पेशव्यांच्या परदरबारीं असलेल्या बातमीदारांनीं लिहिलेलीं पत्रें व (२) एका राजानें दुसऱ्यास अगर प्रांताचे सरसुभ्यास लिहिलेलीं पत्रें. यांतील सर्वांत जुनी पत्रें म्हणजे १७ व्या शतकाचे अखेरीस औरंगजेबाचे हुकुमानें दक्षिणेंतील सुभ्यास लिहिलेलीं पत्रें होत. या फारशी पत्रव्यवहाराचे विभागांत, हैदराबाद, इंदूर, कोटा, भोपाळ, दिल्ली, लाहोर, ग्वाल्हेर, नागपूर वगैरे संस्थानिक व विशेषतः मध्यहिंदुस्तानांतील राजाचे आपसांतील कलह व पेंढाऱ्यांच्या हालचालींसंबंधीं माहिती आहे. तसेच भोपाळ व होशंगाबाद येथील बातमी देणारीं सुमारें २०० पत्रें आहेत. त्याचा भोपाळ संस्थानचा एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीचा इतिहास लिहिण्यास चांगलाच उपयोग होईल." या कागदांचीं ३१ दप्तरें आहेत व मराठी दप्तरांत मधूनमधून फार्शी कागद आहेत.

हे फारशी दप्तर फर्ग्युसन कॉलेजांतील ऊर्दू व फार्शीचे अध्यापक प्रोफेसर वर्मा यांना तपासण्याची संधि मिळाली. त्यासंबंधीं ते म्हणतात—ह्या दप्तरांतील

ऐतिहासिक महत्त्वाचे कागद म्हणजे पेशव्यांच्या परदरबारचे वकिलाकडून त्यांना आलेली अखबार अगर बातमीपत्रें होत. यांतील बातमी विश्वसनीय व तपशीलवार आहे. हीं पत्रें शिकस्ता पद्धतीनें म्हणजे तुटक व लपेटदार लिहिलीं असल्यामुळें वाचण्यास कठीण आहेत. ह्यांतील पत्रें मुख्यत्त्वेंकरून खालील राजकर्त्यांकडून आलेलीं आहेत. दौलतराव शिंदे, राणा झालिमसिंह, सवाई जगतसिंग, रघोजी भोसले, मुन्ताझीम बहादूर, रणजितसिंग लाहोर, जसवंतराव व मल्हारराव होळकर, तुळसाबाई होळकर, नवाब अमीर उद्दौला, महमद अमीरखान, दरबार ए मौला, दिल्ली बादशहा, अण्णाजी, दिवाण, नवाब वझीर-उल-मुमालिक. तसेंच ह्या दप्तरांत उज्जनी, भोपाळ, हुशंगाबाद, बऱ्हाणपूर, मलकापूर, खानदेश येथील बातमीदाराकडून आलेलीं पत्रें आहेत. या दप्तराच्या विभागांतील १८१६/१७ च्या पत्रावरून ब्रिटिशाविरुद्ध किती जोरदार कारस्थानें चाललीं होतीं व त्यांतून लॉर्ड हेस्टिंग्स व त्याचे सहकारी यांनीं धूर्तपणानें व मुत्सद्देगिरीनें मार्ग कसा काढला हें दिसून येतें.

फर्मानें—या दप्तरांत मोंगल बादशहा व अदिलशाही राजांचीं निरनिराळ्या सुबक मोहरा व सोनेरी अक्षरांचीं फर्मानें आहेत.

इतर कागदपत्र—खाजगी परत करण्याचीं दप्तरें म्हणून असलेल्या विभागांत सुमारें १००० बातमीपत्रें प्रो. वर्मा यांनीं निवडून काढलीं. त्यांची सर जदुनाथ सरकार यांनीं निवडलेल्या पर्शियन दप्तरांत भर पडली. तसेंच दस्तकें, परवाने महजर, जमिनीची खरेदी व विक्रीपत्रें ह्यांत सापडतात. तसेंच कांहीं हस्तलिखित अपुरे कागद या भागांत आहेत.

ताम्रपट—ऐतिहासिक महत्त्वाचे ताम्रपट एलिनेशन ऑफिसमध्यें बरेच आहेत असा पुष्कळ लोकांचा समज आहे. परंतु एलिनेशन ऑफिसमध्यें देवनागरी लिपीमध्यें २, कानडी लिपींत १, व पर्शियन लिपीमध्यें १ असे फक्त चारच ताम्रपट आहेत. पहिल्या २ ताम्रपटांची भाषा अशुद्ध संस्कृत असून ते चालुक्य राजा सत्याश्रय पुलकेशी याचेसंबंधीं आहेत. कानडी ताम्रपटाबद्दल डॉ. फ्लीट यांनीं असें लिहिलें आहे :—

'ह्या ताम्रपटाचा महिना भाद्रपद शके संवत् ११०७ (सन ११८९) आहे. यांत नमूद केलें आहे कीं ह्या प्रांताचे (बागेवाडी तालुका) लोक मनगोळी येथे जमा झाले व त्यानीं बम्मीशेटी नांवाचे व्यापाऱ्यास करांपैकीं कांहीं भाग तोडून दिला'

वाडांच्या प्रसिद्ध झालेल्या सनदा व पत्रें यांतील पान ८ वर पुरंधरचे चिव्हे यास बेदरच्या राजानें इनाम दिल्याबद्दल जो ताम्रपटाचा उल्लेख आहे तो ताम्रपट-नसून त्याची नक्कल आहे. मूळ ताम्रपट उपलब्ध नाहीं. पर्शियन ताम्रपटा-बद्दल प्रो. वर्मा लिहितात :—

'विजापूरचे महमद आदिलशहा यानीं फाजील अबझुलखान यास लिहिलेलें फर्मान आहे. त्याची ताा १० रजब १०६३ हिजरी (२८ मे १६५३) असून त्यांत कोट येथील जिजाप्पा नाईक यास इनाम जमीन दिल्याचा उल्लेख आहे'.

२८. संशोधकांस मार्गदर्शक सूचना :—

रा. सा. सरदेसाई व त्यांचे साह्यकारी यांना वेळेचें बंधन असल्यामुळें त्यांनीं अतिशय महत्त्वाचे कागदाकडेच लक्ष पुरविलें. याशिवाय ऐतिहासिक महत्त्वाच्या पुष्कळ बाबी आहेत. त्याकडे या दप्तरांत पुढें काम करावयास येणारांनीं लक्ष देणें जरूर आहे.

१. चिटणिसी कागदांचे २६७ रुमालांपैकीं फार महत्त्वाचे असे कागद निवडून काढून प्रसिद्ध केले. याचा अर्थ बाकीचे कागद कमी महत्त्वाचे आहेत असा नव्हे. त्यांची निवड करून ते पेशव्यांच्या कारकीर्दीवार लाविले पाहिजेत. ज्या अभ्यासकास वेळ असेल त्यानें श्रम करून हें काम जरूर करावें.

२. पेशव्यांच्या सर्व रोजकिर्दीचें सार काढून प्रसिद्ध करणें शक्य झालें नाहीं. सन १७६१ पर्यंतच्या कांहीं रोजकिर्दीची चांचणी करून त्याचे उतारे प्रसिद्ध केले आहेत. हें काम करणें विशेषत: १७६१ चे पुढील सालची पहाणी करणें जरूर आहे.

३. घडणी दप्तरमध्यें प्रसिद्ध घराण्यांची, तसेंच सामाजिक व आर्थिक महत्त्वाच्या विषयासंबंधीं माहिती मिळेल.

४. ऐतिहासिक दृष्टया इंग्रजी फाईलांची पहाणी आतांपर्यंत झाली नाहीं. त्याची थोडी चांचणी केली त्यावरून अभ्यासकानें थोडे जास्त श्रम केले तर त्या श्रमाचें चीज होण्यासारखी माहिती मिळेल.

५. गुजराथी ५४९ रुमालांमध्यें गुजराथच्या इतिहासाचे अभ्यासकास माहिती मिळण्याचा संभव आहे.

६. दप्तरामध्यें उपयुक्त माहिती जागोजाग विखुरलेली आहे. त्यावरून प्रसिद्ध विद्यमान अगर दिवंगत घराण्यांची माहिती मिळेल. दप्तराच्या साहाय्यानें मराठी संस्थानिकांना आपापल्या संस्थानचा इतिहास सजवितां येईलच. पण

त्याशिवाय मराठशाहींत ज्यांनीं पराक्रम गाजविले, लढाया मारल्या, राज्यें जिंकिलीं, अशा कितीतरी प्रसिद्ध व्यक्तींच्या वंशजांना अभिमानानें जतन करितां येईल अशी कितीतरी सामुग्री एथें आहे; मात्र याचें संशोधन करण्यास मेहनत, व चिकाटी पाहिजे.

या दप्तरांतील ऐतिहासिक संशोधन करणारास खालील दप्तरांचा विशेष उपयोग होईल.:—

(१) शाहू दप्तर. (२) चिटणीसी कागद. (३) पेशवे यांच्या रोजकीर्दी व घडण्या. (४) साताराम्हाराज-दप्तर, प्रतापसिंहाची रोजनिशी. (५) खाजगी परत करण्याचे कागद. (६) इंग्रजी फाईली. फे. नं. ५।६।१०।१५।१६.

२९. दप्तर तपासणीचे नियमः—

सरकारी ठ. नं. २८०६ ता॥ २ नोव्हेंबर १९२१. या ठरावानें कमिशनर, मध्यभाग यास 'एलिनेशन ऑफिसमधील' दप्तर पहाण्यास परवानगी देण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. अशी परवानगी जो अभ्यासक दप्तराचा योग्य रीतीनें उपयोग करील त्यालाच फी न घेतां देण्यांत येते. यासंबंधीं नियम येणेंप्रमाणें :—

१ कमिशनर, मध्यभाग, यास इतिहासाचा अभ्यास करणाराला या दप्तरची तपासणी करण्यास परवानगी देण्याचा अधिकार आहे. त्याप्रमाणें कोणाहि अर्जदाराला परवानगी नाकारण्याचाहि अधिकार आहे.

२ सरकारच्या हितास बाध येईल असे कागद पहाण्यास अगर त्याची नक्कल करण्यास परवानगी मिळणार नाहीं.

३ अर्जदारानें त्याला किती दिवस परवानगी पाहिजे हें नमूद केलें पाहिजे व त्यास ती मुदत वाढविणें जरूर पडल्यास पुन्हां अर्ज करून मागणी केली पाहिजे.

४ इतिहासाचे अभ्यासकास अडथळा आणण्याचा सरकारचा हेतु नाहीं; तथापि बसण्यास जागा व देखरेख करण्यास लागणारीं माणसें मर्यादित असल्यामुळें चालू परिस्थितींत ६ पेक्षां जास्त अभ्यासकास एका वेळीं परवानगी देतां येत नाहीं. यापेक्षां जास्त सवलती देण्याच्या प्रश्नाचा सरकार विचार करीत आहे. हल्लीं प्रसिद्ध झालेली सामुग्री सामान्य अभ्यासकांस पुरेशी आहे.

टीप :—वरील नियमाखेरीज सदर बाबतींत सविस्तर नियम केले आहेत, त्याची प्रत अर्जदारास परवानगी देतेवेळीं पुरविण्यांत येते.

प्रकरण ५

३०. ‘एलिनेशन ऑफिस’ संबंधीं सर्वसाधारण माहिती :—

दप्तराची व्यवस्था कमिशनर, मध्यभाग, यांच्याकडे सोपिविली असून प्रत्यक्ष देखरेख त्यांचे “रेव्हिन्यू असिस्टंट कमिशनर” यांचेकडे असते. ऑफिसास अहोरात्र दोन शिपायांचा पाहारा असतो. ऑफिसांत बाहेरील माणसास येण्याकरतां व दप्तर वगैरे पाहाणें झाल्यास त्यासाठीं कमिशनर सो अगर त्यांचे असिस्टंट यांची लेखी परवानगी घ्यावी लागते.

एलिनेशन ऑफिसमध्यें कोणत्या प्रकारचें दप्तर आहे याचें विवेचन आतांपर्यंत केलेंच आहे. याशिवाय येथें नक्त नेमणुकीचीं जिल्हेवार रजिस्टरें, इनाम गांव व जमिनीबद्दल तालुकेवार रजिस्टरें व सरंजामाबद्दल सर्व इलाख्याचें एकच रजिस्टर दप्तर आहे.

येथें खालीलप्रमाणें कामें चालतात :—

(१) मुंबईइलाख्यांतील सर्व प्रकारच्या नक्त नेमणुका व सरंजामाबद्दल फेरफार मंजूर करणें.

(२) मुंबई इलाख्यांतील इनाम गांवें व जमिनीबद्दल फेरफार मंजूर करणें.

(३) इनाम, सरंजाम चालविणें, खालसा करणें बाबत देखरेख करणें व त्याबाबत अपीलें वगैरे पाहाणें.

(४) दप्तरांतील कागदांच्या नकला देणें.

(५) नकला व इतर सरकारी काम छापणें.

(१) उत्तर, दक्षिण व मध्यभाग अशा इलाख्यांतील तीनहि भागांतील नक्त नेमणुका व सरंजामाबद्दल फेरफार, कमिशनर, मध्यभाग, यांनीं मंजूर केल्याशिवाय रक्कम आदा करण्यांत येत नाहीं.

(२) वर सांगितल्याप्रमाणें तीनहि भागांतील इनाम जमिनी, गांवें वगैरेबद्दल फेरफार इकडे कळविले जातात.

(३) जिल्ह्याचे कलेक्टर यांनीं इनाम गांव, जमिनी, सरंजाम व नक्त नेमणुका यांस नांवें दाखल केल्याबद्दलचे हुकुमाविरुद्ध अपीलें इकडे येतात. तसेंच उत्तरभाग व दक्षिणभाग कमिशनर व मुंबईसरकार यांचेकडून इनामाचे बाबतींत वादग्रस्त प्रश्नाबद्दल जुनी माहिती विचारण्यांत येते.

(४) इनामकमिशन चौकशीचे वेळीं इनामदार वगैरे लोकांनीं दिलेल्या कैफियती, वंशावळी, तसेच त्यासोबत हजर केलेलीं सनदापत्रें वगैरे कागद, तसेंच दप्तरांतील रोजकिर्दीवरून सनदा व हिशोब वगैरे कागदांच्या नकलाबद्दल मागणी येते. ह्या नकला छापून दिल्या जातात व त्याकरितां लहानसा छापखाना ठेविला आहे.

एलिनेशन ऑफिसमध्यें हा छापखाना १८८६ पासून आहे. ह्यांत लोकांनीं मागितलेल्या नकला व सरकारी कामास लागणारे महत्त्वाचे कागद वगैरे छापिले जातात. छापील नकलांची फी सरकारनें ठरविलेल्या दराप्रमाणें आकारली जाते. अर्जदारानें एकाच वेळीं एका कागदाच्या एकापेक्षां जास्त नकला मागितल्या असतां जास्त नकलास पहिल्या नकलेच्या $\frac{1}{3}$ फी आकारली जाते.

किरकोळ माहिती.

(१) सन १८६३ चे समरी सेटलमेंट ॲक्ट २ व ७ प्रमाणें दिलेल्या सनदा अगर त्यासंबंधींचे कागद या दप्तरांत नाहींत.

(२) गॉर्डन व पेडर सेटलमेंटप्रमाणें देशमुख देशपांडे वगैरे परगणे वतनदार अगर महाल जमेदार यांस दिलेल्या सनदा अगर त्यासंबंधींचे कागद या दप्तरांत नाहींत.

(३) पाटील, कुलकर्णी वगैरे गांवकामगार, महार, तराळ वगैरे गांवनोकर यांचें वतन, चौकशी व पाळी रजिस्टर या संबंधीचे कोणतेहि कागद या दप्तरांत नाहींत.

(४) आदम साहेब यांनीं सातारा जिल्ह्यांत केलेल्या पाहणीचे कागद अगर ब्रिटिश अमदानींतील पाहणीचे कागद या दप्तरांत नाहींत.

इतिहास संशोधनास येणाऱ्या अभ्यासकाखेरीज संस्थानिक, इनामदार व जहागिरदार वगैरे बडे लोकांस त्यांचे घराण्याची ऐतिहासिक माहिती पाहण्याकरितां परवानगी देण्याकरितां सरकारनें ठराव पसार केला. या. नं. ११९४४ ता १६ नोव्हेंबर १९१४ च्या ठरावान्वयें खालीलप्रमाणें नियम मंजूर केले आहेत :—

(१) कमिशनर, मध्यभाग, यांस हें दप्तर पाहण्यास परवानगी देण्याचा अगर नाकारण्याचा पूर्ण अधिकार आहे. तसेच परवानगी दिल्यास कोणतें दप्तर पाहण्यास द्यावयाचें व कोणतें द्यावयाचें नाहीं हें ठरविण्याचा त्यास पूर्ण अधिकार आहे.

(२) वर सांगितल्याप्रमाणें परवानगी दिल्यास अर्जदारास ५० रुपये अगाऊ अनामत रक्कम खालीं सांगितलेल्या खर्चाबाबीसाठीं ठेवावी लागेल :—

(अ) दप्तर तपासण्यास आरंभ केल्यापासून संपेपर्यंत प्रत्येक दिवसाबद्दल (सुट्या व रविवार धरून) एक रुपया आकारण्यांत येईल. अर्जदारास लागणारे कागद शोधण्याबद्दल व तपासणीचे मुदतींत ऑफिसला खर्च कराव्या लागणाऱ्या वेळेबद्दल हा आकार आहे.

(ब) अर्जदारास पाहण्यास लागणारा प्रत्येक रुमाल अगर फाइलीबद्दल रुो १० आकारण्यांत येतील.

(३) वर सांगितल्याप्रमाणें अर्जदार यानें अमानत रक्कम भरल्यावर त्यास पाहण्याकरितां दप्तर दिलें जाईल व त्यास वाटणाऱ्या उपयुक्त कागदाचें टिप्पण त्यास घेतां येईल. त्यानें घेतलेलें टिप्पण व त्याचे इंग्रजी भाषांतर अर्जदार यानें आपल्या खर्चानें तयार करून कमिशनरचे माहितीसाठीं दिलें पाहिजे. नंतर त्या टिपणाची तपासणी करून जरूर वाटल्यास त्यांत दुरुस्ती करून टिपणें पसंत असल्यास कमिशनर अगर त्यांचे असिस्टंट यांचे सहीनें अर्जदारास देण्यांत येतील.

(४) कचेरींतील 'रेकॉर्ड' कोणत्याहि सबबीवर कचेरीचे बाहेर नेण्यास परवानगी दिली जाणार नाहीं. तसेच दररोजचीं घेतलेलीं टिपणें कचेरींतच ठेवलीं पाहिजे.

(५) तपासणीचें काम संपल्यावर अमानत रकमेचा हिशोब करून ज्यास्त हिशोब झाल्यास तेवढी रक्कम अर्जदाराकडून वसूल करण्यांत येईल.

रुमालाचा क्रमांक.	रुमालांतील कागदांचा विषय	रुमालाचा क्रमांक.	रुमालांतील कागदांचा विषय.
२४	१ राजकारभार		५ रामचंद्रपंताचीं पत्रें
	२ राघोबादादा व इंग्रज		६ त्रिंबकजी डेंगळे यांचीं पत्रें
	३ कोंकणांतील हालचाली	२८	१ राज्यकारभार
२५	१ उत्तर हिंदुस्थान	२९	१ पेशवे व होळकर
	२ निजाम व पेशवे		२ उत्तर हिंदुस्थान
	३ कर्नाटक		३ निजाम व पेशवे
	४ बारभाईंचें कारस्थान		४ कंपनीसरकारचे जाहीरनामे
	५ कोंकण प्रकरण		५ छत्रपति व पेशवे
	६ खाजगी		६ डेंगळे
	७ किरकोळ		७ धार्मिक
	८ छत्रपति		८ सामाजिक
	९ रामशास्त्र्याचे निवाडे		९ किरकोळ
	१० इंग्रज वकिलाची रोजनिशी		
	११ सामाजिक		रोजनिशी.
	१२ तोतया प्रकरण	३०	१ छत्रपति
	बाजीराव रघुनाथ (१७९६		२ बाजीराव व चिमाजी
	ते १८१७).		३ ताईसाहेब
२६	१ खाजगी		४ बाळाजी जनार्दन
	२ इंग्रज व मराठे		५ मोरोबा फडणीस
	३ पेंढारी		६ मल्हारराव होळकर
	४ कोंकणांतील घडामोडी		७ काशीराव होळकर
	५ प्रतिनिधि	३१	१ दौलतराव शिंदे
	६ पेशवे व त्यांचे सरदार	३२	१ मुधोजी व परसोजी भोंसले
	७ तोफखाना व दारूगोळा		२ एलफिन्स्टन
२७	१ नोकरांचे रोजमुऱ्याबाबत		३ कर्नल-क्लोज
	२ कर्नल फोर्डसंबंधीं पत्रें		४ ,, पामर
	३ पांडुरंग लक्ष्मणचीं पत्रें		५ निवाडपत्रें
	४ बहिरव नारायणचीं पत्रें		६ बडोदा संस्थानप्रकरण

रुमालाचा क्रमांक	रुमालांतील कागदांचा विषय
	पारसनीस यांनीं निवडलेलीं पत्रें.
३३	१ दौलतराव शिंदे
	२ बातमीपत्रें
३४	१ छत्रपति
	२ नाना फडणीस
	३ कर्नल-पामर
	४ ,, क्लोज
	५ दुसरे मल्हारराव होळकर
	६ एलफिन्स्टन
३५	१ खाजगी
	२ छत्रपति व पेशवे
	३ इंग्रज व पेशवे
	४ निझाम व पेशवे
	५ कर्नाटकांतील घडामोडी
	६ पेंढारी
	७ भिल्लांचे दंगे
३६	१ पेशवे व होळकर
	२ ग्वाल्हेर-दरबारचीं बातमीपत्रें
	३ नागपूर-दरबारचीं बातमीपत्रें
	४ त्रिंबकजी डेंगळे
	५ आरमार
	६ राज्यकारभार
	७ धार्मिक
	८ किरकोळ
	प्रतापसिंह महाराज सातारा.
३७	राज्यकारभार
३८	राजकीय बाबती

रुमालाचा क्रमांक	रुमालांतील कागदांचा विषय
	(२) प्रतापसिंह महाराजांच्या रोजनिशा (३९ ते ४३)
३९	रोजनिशी
४०	,,
४१	,,
४२	,,
४३	,,
	(३) अव्वल ब्रिटिश अमदानीचे (४४ ते ४७).
४४	१ रेसिडेंट दप्तरांतील निवडलेले कागद
	२ माहाराज दप्तरांतील कागद
	३ जुन्या ऐतिहासिक घराण्यांच्या कैफियती
	४ उमाजी नाईकाचें बंड
	५ राघोजी आंग्रे यांचें बंड
	६ किरकोळ
	७ विश्रामबाग येथील संस्कृत शाळा
	८ कोल्हापूरचीं बातमीपत्रें
४५	१ सैन्याबद्दल पत्रकें
४६	१ राजकीयबाबत
	२ दिवाणीबाबत
	३ लष्करावाबत
	४ मुलकीबाबत
	५ पोस्टखात्या बाबत
	६ अबकारीखातें

रुमालाचा क्रमांक	रुमालांतील कागदांचा विषय
	७ इंजिनीयरखातें
	८ शिक्षणखातें
	९ वैद्यकीयखातें
	१० सामाजिक
	११ किरकोळ
४७	१ पेशवे
	२ शिंदे
	३ होळकर
	४ गायकवाड
	५ निजाम
	६ टिपू व फ्रेंच
	७ म्हैसूर, अलवार, भोपाळ, जयपूर, मालवण, सावंतवाडी, जाट, धरमपूर वगैरेसंबंधी कागद
	८ कोल्हापूर व सातारा
	९ त्रिंबकजी डेंगळे
	१० राजकीय महत्त्वाचे कागद
	११ आंकडेवार माहितीपत्रकें
	१२ किनाऱ्यावरील व्यापारासंबधीं सर जान शोअर यांस अर्ज

(४) परत करण्याचे कागद (४८ ते ५०).

रुमालाचा क्रमांक	रुमालांतील कागदांचा विषय
४८	१ शितोळे
	२ ठकार
	३ चित्राव
	४ ढेकणे
	५ शेडगांवचे भोंसले
	६ कानेटकर गुरूजी
	७ पानसे
	८ देशपांडे
	९ पुरंदरे
	१० गोळे
	११ देव
	१२ लांडे
	१३ फडणीस
	१४ नागोजीराव मेघःशाम
	१५ आपटे
	१६ झुंझारराव देशमुख
	१७ निंबाजी भास्कर
	१८ नातू
	१९ चिटणीस
	२० दाभाडे
	२१ रास्ते
	२२ मंत्री
४९	१ जकातीसंबंधीं कागद
	२ बाजीराव बल्लाळ
	३ बाळाजी बाजीराव
	४ माधवराव बल्लाळ
	५ माधवराव नारायण
	६ बाजीराव रघुनाथ
	७ राजकीयबाबत (ब्रिटिश अंमल)
	८ बाजीराव बल्लाळचे रोजकिर्दीचे सुटे कागद
	९ पर्शियन रुमालांतील निवडलेले कागद

रुमालाचा क्रमांक	रुमालांतील कागदांचा विषय	रुमालाचा क्रमांक	रुमालांतील कागदांचा विषय
५०	१ जुने हिशोब २ छत्रपति–शिवाजी, राजाराम व शाहू ३ बाळाजी बाजीराव ४ माधवराव बल्लाळ ५ माधवराव नारायण ६ बाजीराव रघुनाथ ७ कानडी लिपीचे कागद ८ पर्शियन–सदर–		**(९) इतर भाषेंतील कागद (५९).**
		५९	संस्कृत, पर्शियन, गुजराथी व हिंदी
			(१०) प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचे अस्सल कागद (६० ते १०४).
		६०	उदगीरची मोहीम (१७६०)
		६१	*पानिपतप्रकरण (१७४७ ते १७६१)*
	(५) शाहू दप्तरांतील कागद (५१).	६२	जंजिऱ्याच्या सिद्दीवर शाहूची मोहीम (१७३२ ते १७३६)
५१	शाहू दप्तरांतील निवडलेले कागद	६३	आनंदीबाईची दिनचर्या (१७८६ ते १७८८)
	(६) जमाव दप्तरांतील निवडलेले कागद (५२ ते ५५).	६४	बारभाईचें राजकारण
		६५	छत्रपती रामराजाचें प्रकरण
		६६	शाहू व बाळाजी विश्वनाथ –आरंभींच्या हालचाली (१७०७ ते १७२०)
५२	जमाव		
५३	सदर (ब)		
५४	कर्नाटक जमाव	६७	शाहू खाजगी
५५	मोगलाई जमाव	६८	बाजीराव–कौटुंबिक (१७२० ते १७४०)
	(७) पेशवे रोजकीर्दींतील उतारे (५६).	६९	बाजीराव आणि निजाम हर्षामर्ष
५६	पेशवे रोजकीर्दींतील उतारे	७०	शाहू व संभाजी (परस्पर हितसंबंध)
	(८) प्रदर्शनीय वस्तू (५७-५८).	७१	पेशवे आणि दाभाडे
		७२	मराठ्यांचा माळव्यांत प्रवेश
५७	जुन्या बखरी व बाड	७३	मराठ्यांचे उत्तरेंतील पराक्रम
५८	जुनीं वर्तमानपत्रें व पोथ्या	७४	दिल्लीवर चढाई

रुमालाचा क्रमांक	रुमालांतील कागदांचा विषय	रुमालाचा क्रमांक	रुमालांतील कागदांचा विषय
७५	वसई मोहीम	८९	शाहू व पहिले दोन पेशवे-संकीर्ण
७६	शाहू आणि बाजीराव राज्य-कारभार	९०	जमाव विभागांतील कागद
७७	छत्रपती शाहू आणि पेशवे खाजगी पत्रव्यवहार	९१	उत्तरकालीन पेशवे—कौटुंबिक राहणी
७८	पेशवे माधवराव यांचा रघुनाथरावांस विरोध	९२	जंजिऱ्याची मोहीम (पुरवणी) (१७३३ ते १७३६)
७९	नागपूरकर भोंसल्यांची कामगिरी (१७१७-१७७४)	९३	वसईची मोहीम (पुरवणी) (१७३९ ते १७४०)
८०	बाळाजी बाजीराव—उत्तर हिंद (१७४१-१७६१)	९४	इंग्रजांचा साष्टीवर हल्ला (२९-१२-१७७४)
८१	पेशव्यांच्या रोजनिशींतील उतारे	९५	इंग्रज-मराठ्यांचें पहिलें युद्ध (१७७४ ते १७८३)
८२	बाळाजी बाजीराव राज्य-कारभार	९६	माधवराव पेशव्याच्या कर्नाटकांतील स्वाऱ्या (१७६१ ते १७७२)
८३	पश्चिम किनाऱ्यावरील पेशव्यांच्या हालचाली (१७४० ते १७७२)	९७	माधवराव बल्लाळ व निजाम (१७६१ ते १७७२)
८४	पेशवे बाळाजी बाजीराव व निजाम (१७४०-१७६१)	९८	माधवराव बल्लाळ—राजकारभार (१७६१ ते १७७२)
८५	ताराबाई आणि संभाजी (१७३८-१७६१)	९९	बाळाजी बाजीराव—संकीर्ण
८६	बाळाजी बाजीराव उत्तर हिंद (पुरवणी) (१७४२ ते १७६१)	१००	मराठी राज्याची अखेर (१७९९ ते १८१८)
८७	बाळाजी बाजीराव कर्नाटक (१७४० ते १७६१)	१०१	राजा प्रतापसिंहाची रोजनिशी व इतर कागद
८८	पेशवा माधवराव-उत्तर हिंद	१०२	पेशवेकालीन समाज (१७२७ ते १७९७)
		१०३	ऐतिहासिक घराणीं
		१०४	मराठशाहीचा कारभार

Bk Ca 1—9

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.